UNIVERSAL LIBRARY
OU_184378
UNIVERSAL LIBRARY

OUP—880—5-8-74—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M923.2 N39J Accession No. PGM1099

Author गोरे, नारायण गणेश

Title जवाहरलाल नेहरू

This book should be returned on or before the date last marked below.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प १४ वें

# जवाहरलाल नेहरू

( आत्मचरित्र )

अनुवादक
नारायण गणेश गोरे

द्वितीयावृत्ति : १९४७ ]

[ मूल्य १२॥ रुपये

प्रकाशक :
अप्पासाहेब पंत,
औंध प्रकाशन ट्रस्ट, औंध.
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.

संपादक :
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत
कार्यकारी संपादक
भाऊ धर्माधिकारी

मुद्रक :
रघुनाथ अनंत मोरमकर
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४ ठाकुरद्वार,
मुंबई २

प्रथमावृत्ति : १९३६
द्वितीयावृत्ति : १९४७

# प्रकाशकाचें निवेदन

राष्ट्रपति पंडित जवाहरलाल नेहरू यांचें आत्मचरित्र महाराष्ट्र वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आज अत्यंत आनंद होत आहे. महात्मा गांधींच्या असहकार-युगानें प्रज्वलित झालेल्या तरुण हिंदुस्थानचे पंडितजी हे प्रधान प्रतिनिधि आहेत. आपल्या दिव्य त्यागानें त्यांनीं हिंदुस्थानांतील साऱ्या जनतेचें प्रेम मिळविलें आहे. हिंदुस्थानच्या राजकारणांत महात्मा गांधींच्या खालोखाल आज त्यांनाच स्थान मिळलें असून हिंदुस्थानबाहेरहि महात्मा गांधींच्या बरोबरीनें त्यांचेंच नांव गाजूं लागलें आहे. महात्मा गांधींच्या आत्मचरित्रानें ह्या मालेला प्रारंभ झाला असल्या-मुळें पंडितजींचें आत्मचरित्रहि याच मालेंतून प्रसिद्ध करण्यास मिळावें अशी आमची तीव्र इच्छा होती. पंडितजींच्या उदारपणामुळें भाषांतराचे हक्क मालेला मिळवितां आले आणि आज हें पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आला.

पंडितजींच्या विचारसरणीशीं समरस झालेला तरुण लेखक या भाषांतरास मिळावा अशी आमची इच्छा होती. महाराष्ट्रांतील कॉं. सो. पक्षाचे चिटणीस श्री. ना. ग. गोरे यांनीं हें काम अंगावर घेऊन अल्पावधींत पूर्ण करून देण्याचें कबूल केल्यामुळें आमची ती इच्छा सफल झाली. श्री. गोरे यांची महाराष्ट्रीय वाचकांना ओळख झालेलीच असल्यानें सदर अनुवाद किती उत्तम उतरला असेल याची सहज कल्पना येईल.

मूळ ग्रंथांतील कवितांच्या उताऱ्यांचें भाषांतर महाराष्ट्रांतील तरुण साहित्य-सेवक श्री. गो. ग. तळवलकर, संपादक ‘आनंद’ यांनीं करून दिलें, आणि फ्रेंच अवतरणांचें व वाक्यांशांचें भाषांतर श्री. अ. ज. करंदीकर यांनीं करून दिलें, यामुळें पुस्तकाला विशेष शोभा आली आहे. याबद्दल श्री. गोरे यांच्याप्रमाणेंच श्री. तळवलकर आणि श्री. करंदीकर व भाषांतर उतरून घेण्याच्या कामीं मदत करणारे श्री. के. स. गोरे या सर्वांचे आम्हीं मनापासून आभार मानतों.

टिळक विद्यापीठाचे कार्यवाह श्री. स. के. भावे यांनीं पुस्तकाला सूचि करून देण्याचें काम अल्प कालांत पुरें करून दिलें याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहों.

मूळ ग्रंथ सर्व जगभर नांवाजला गेला असून हिंदुस्थानांतील इंग्रजी वाचकांनीं त्याची मनसोक्त स्तुति केली आहे. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनीं पंडितजींचें मूळ चरित्र वाचून त्याबद्दलची आपली प्रशंसा पंडितजींना कळविली होती. अशा सुंदर पुस्तकाचें महाराष्ट्रीय वाचक योग्य तें गुणग्रहण करतील अशी खात्री आहे.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेनें अशा सुंदर पुस्तकांचा प्रचार चालविला आहे. हें लोकशिक्षणाचें महनीय कार्य असल्यानें महाराष्ट्रीय जनता या मालेचें कार्य अधिक जोमानें चालवितां येईल अशा रीतीनें मालेचा पुरस्कार करीत राहील अशी आम्हांला उमेद आहे.

—प्रकाशक

## द्वितीयावृत्तीसंबंधीं

पहिली आवृत्ति संपून बराच काळ लोटला होता आणि सदर पुस्तकाबद्दलची मागणी एकसारखी होत होती, तरी युद्धजन्य परिस्थितीमुळें आम्ही ती पुरवूं शकलों नव्हतों. आज ही दुसरी आवृत्ति काढतांना अडचणी पुष्कळ आल्या असल्या तरी त्या दूर सारण्याचा प्रयत्न करून ही आवृत्ति अद्ययावत् स्वरूपांत आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत. मूळ पुस्तकाच्या अमेरिकन आवृत्तीला पंडितजींनीं वेगवेगळ्या वेळीं जीं दोन महत्त्वाचीं प्रकरणें शेवटीं जोडलीं आहेत त्यांचाहि अनुवाद श्री. ना. ग. मोरे यांच्याच अर्थवाही भाषेंत या आवृत्तीला लाभला आहे.

पहिल्या आवृत्तींतील कांहीं छायाचित्रें या आवृत्तींत गाळलीं असून त्याऐवजीं कांहीं नवीं छायाचित्रें घातलीं आहेत. पूर्वीप्रमाणें याहि आवृत्तीला पूर्ण सूचि जोडली आहे.

—प्रकाशक

कालवश

क म ले ला

समर्पण



कै. कमला नेहरू

# प्रस्तावना

ताजा कलम व कांहीं किरकोळ फेरबदल वगळून बाकीचें समग्र पुस्तक १९३४ च्या जूनपासून १९३५ च्या फेब्रुवारीपर्यंतच्या काळांत तुरुंगांतच लिहून झालें. तुरुंगांतल्या दीर्घकालीन एकांतवासांत कांहीं तरी निश्चित उद्योग लावून घेणें फार आवश्यक असतें म्हणूनच हीं पानें लिहून काढलीं. हिंदुस्थानमध्यें गेल्या कांहीं वर्षांत घडलेल्या प्रसंगांचें सिंहावलोकन करून तत्संबंधींचे आपले विचार घांसून पुसून काढावेत असाहि उद्देश होताच. आत्मसंशोधनाच्या हेतूनें मीं लेखणी उचलली, आणि तोच हेतु अथपासून इतिपर्यंत अनुस्यूत राहिलेला दिसून येईल. श्रोतृवृंद पुढें बसला आहे. अशी कल्पना मनांत बाळगून बुद्धिपुरःसर हें लिखाण झालेलें नाहीं. पण तशी कल्पना मनश्चक्षूंसमोर असलीच तर माझ्या देशांतील बंधुभगिनींचीच श्रोतृस्थानीं योजना झालेली होती हें सांगावेंसें वाटतें. परदेशस्थ लोकांना उद्देशून लिहावयाचें असतें तर बहुधा वेगळ्या प्रकारें लिहिलें असतें अथवा निराळ्या गोष्टींवर भर दिला असता, आणि निवेदनांत ज्या गोष्टींचा ओझरता उल्लेख आहे, त्या ठळकपणें मांडून ज्या कांहीं इतर गोष्टी विस्तारानें सांगितल्या आहेत त्यांचा संक्षेप केला असता. ह्या पुस्तकांत विस्तारानें मांडण्यांत आलेल्या गोष्टींत हिंदुस्थानबाहेरच्या लोकांना स्वारस्य वाटणार नाहीं; त्या स्पष्ट दिसतच आहेत, मग चर्चा आणि वादविवाद हवा कशाला, असें तें म्हणतील. पण हिंदी लोकांच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व आहे असें मला वाटतें. आमच्या देशांतर्गत राजकारणासंबंधीं व व्यक्तींसंबंधीं जे उल्लेख आले आहेत, त्यांबद्दल सुद्धां परक्या माणसाला आस्था वाटणार नाहीं.

माझ्या जीवनांतील विशेष तापदायक झालेल्या काळांत हें पुस्तक लिहिलें गेलें, ही गोष्ट वाचकवर्ग विसरणार नाहीं अशी मला आशा आहे. त्या काळच्या जखमांचे वण ठिकठिकाणीं स्पष्ट उठलेले दिसतील. परिस्थिति अधिक अनुकूल असतांना लेखन झालें असतें तर त्याचा रंग निराळाच दिसला असता व क्वचित् ठिकाणीं लेखणी अधिक संयमनानेंहि चालली असती. परंतु जें लिहिलें तें तसेंच राहूं द्यावयाचें असें मीं ठरविलें आहे; कारण लिहितांना माझ्या ज्या भावना होत्या त्यांचें यथातथ्य चित्रण म्हणून असल्या लेखांतहि इतरांना स्वारस्य वाटण्याचा संभव आहे.

अलीकडच्या हिंदी इतिहासाचें समालोचन करावें हा माझा मानस नाहीं. माझ्या मनोविकासाचा माग काढीत जावें म्हणूनच मीं हा प्रयत्न केला. पण बाह्यात्कारी ह्या निवेदनाचें स्वरूप समालोचनासारखें दिसत असल्यामुळें वाचकांची दिशाभूल होऊन त्यांच्याकडून पुस्तकाला वाजवीपेक्षां जास्त महत्त्व दिलें जाण्याचा संभव आहे. म्हणून वाचकांना सूचना देऊन ठेविली पाहिजे ती अशी कीं हें पुस्तक सर्वस्वी एकतर्फी व साहजिकच आत्मनिष्ठहि झालेलें आहे. अनेक महत्त्वाच्या बाबींची पूर्ण उपेक्षा करण्यांत आलेली असून अनेक कर्तबगार नामवंतांचा नामनिर्देश देखील केलेला आढळणार नाहीं. गतप्रसंगांच्या यथातथ्य पर्यालोचनांत असा हलगर्जीपणा अक्षम्य ठरला असता; पण आत्मनिवेदनांत मात्र अशा प्रकारची मुभा घेतां येते. ज्यांना अलीकडच्या इतिहासाचा सम्यक् अभ्यास करावयाचा असेल, त्यांना दुसरे साधन-ग्रंथ चाळावे लागतील. इतिहासगत अशा शुष्क वस्तुस्थितीचा अभ्यास करतांना जिव्हाळ्याचें वातावरण निर्माण करण्यासाठीं अथवा अधेंमधें पडणाऱ्या फटींत भराव टाकण्यासाठीं ह्या व असल्या इतर निवेदनांचा कदाचित् उपयोग होईल.

अनेक वर्षें ज्यांच्या संगतींत राहून काम करण्याचें थोर भाग्य मला लाभलें व ज्यांच्याविषयीं माझ्या मनांत आत्यंतिक प्रेमादर वसत आहे अशा कांहीं सहकाऱ्यांबद्दलचे माझे विचार मीं निःसंकोचपणानें व्यक्त केले आहेत. गटांवर व व्यक्तींवर देखील मीं टीका केलेली असून क्वचित् प्रसंगीं ती चांगलीच झणझणीत वठली आहे. परंतु त्यांच्यापैकीं पुष्कळांविषयीं मला वाटणारा आदर यत्किंचित्‌सुद्धां कमी झालेला नाहीं. पण मला असें मात्र वाटतें कीं, सार्वजनिक कार्यांत ढवळाढवळ करणारांनीं परस्परांशीं व ज्या जनतेची सेवा आपण करतों असें ते सांगतात त्या जनतेशीं अत्यंत खुल्या दिलानें वागलें पाहिजे. तोंडदेखलें सौजन्य दाखविलें आणि घोटाळ्यांत पाडणाऱ्या व क्वचित् प्रसंगीं मनाला तापदायक होणाऱ्या प्रश्नांची टाळाटाळ करीत गेलें म्हणजे परस्परांच्या वर्तनाचा योग्य बोध व आपल्यापुढील महत्त्वाच्या प्रश्नांचें आकलन नीटसें होत नाहीं. परस्परांतील साधर्म्याप्रमाणेंच वैधर्म्याची कल्पना आली आणि सर्व परिस्थिति समजली, मग ती कितीहि अडचणींत पाडणारी असो, म्हणजे जें सहकार्य होईल तेंच खरें सहकार्य. तथापि माझ्या लेखनाला व्यक्तिविषयक असूया अथवा दुष्टबुद्धि यांचा संपर्क पोंचलेला नाहीं अशी माझी खात्री आहे.

अगदीं आजच्या घटकेला हिंदुस्थानांत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर ऊहापोह करण्याचें मीं बुद्ध्याच टाळलें आहे. जी चर्चा केली आहे ती संदिग्ध व अप्रत्यक्ष अशा स्वरूपाची आहे. शेंड्यापासून बुडख्यापर्यंत त्यांचा सूक्ष्म अभ्यास करणें अथवा कोणता मार्ग स्वीकारावा तें मनाशीं पक्केपणीं ठरविणें तुरुंगांत शक्य

नव्हतें. मुक्तता झाल्यानंतर देखील मीं जें लिहिलें त्यांत भर घालावी असें मला वाटलें नाहीं. कारण हातावेगळ्या झालेल्या लेखनाशीं नवें लिखाण बेमालुमपणें सांधलें जाईल असें दिसेना. त्यामुळें ह्या "आत्मनिवेदनपर कथानकाला" गत प्रसंगांच्या स्थूल, आत्मनिष्ठ आणि अपूर्ण अशा लेखनाचें स्वरूप प्राप्त झालें असून, वर्तमान काळच्या वेशीपर्यंत कथानक अणून सोडलेलें असलें तरी आंत म्हणजे वर्तमानाच्या अव्वल प्रदेशांत पाऊल टाकण्याचें मोठ्या दक्षतेनें टाळलें आहे असें दिसून येईल.

बेदन वायरल,<br>
२ जानेवारी, १९३६

—जवाहरलाल नेहरू

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | काश्मीरांतून प्रयाण | १ |
| २ | बालपण | ७ |
| ३ | थिऑसॉफी | १३ |
| ४ | हॅरो आणि केंब्रिज | १९ |
| ५ | पुनरागमन आणि महायुद्धकालीन हिंदी राजकारण | ३० |
| ६ | विवाह आणि हिमालयांतील साहस | ४० |
| ७ | गांधीजींचें आगमन, सत्याग्रह व अमृतसर | ४३ |
| ८ | माझी हकालपट्टी | ५१ |
| ९ | किसानांतील परिभ्रमण | ५८ |
| १० | असहकार | ६५ |
| ११ | १९२१ साल व पहिली शिक्षा | ७६ |
| १२ | अहिंसा व तलवारीचा पंथ | ८४ |
| १३ | लखनौचा जिल्हा-तुरुंग | ९३ |
| १४ | पुन्हां बाहेरच्या जगांत | १०१ |
| १५ | संशय व झगडा | १०७ |
| १६ | नाभा संस्थानांतील विष्कंभक | ११२ |
| १७ | कोकोनाडा आणि महंमद अल्ली | ११९ |
| १८ | वडील आणि गांधीजी | १२६ |
| १९ | जातिनिष्ठेचें थैमान | १३७ |
| २० | नगरपालिकेचें काम | १४५ |
| २१ | युरोपांत | १५२ |
| २२ | हिंदुस्थानांतील कलह | १६० |
| २३ | ब्रुसेल्स येथील जित राष्ट्रांची परिषद | १६६ |
| २४ | पुनरागमन व पुनश्च राजकारण | १७१ |

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| २५ | लाठीचा प्रसाद .... .... .... | १८३ |
| २६ | ट्रेड युनियन कॉंग्रेस .... .... | १८८ |
| २७ | मेघांचा गडगडाट .... .... .... | १९७ |
| २८ | स्वातंत्र्य व नंतरची कथा .... .... | २०७ |
| २९ | कायदेभंगाची सुरुवात .... .... | २१५ |
| ३० | नैनी-तुरुंग .... .... .... | २२३ |
| ३१ | येरवडा-तुरुंगांतील वाटाघाटी .... .... | २३२ |
| ३२ | संयुक्त प्रांतांतील करबंदीचा लढा .... | २४० |
| ३३ | वडिलांचा मृत्यु .... .... .... | २५० |
| ३४ | दिल्ली-करार .... .... .... | २५४ |
| ३५ | कराची-कॉंग्रेस .... .... .... | २६४ |
| ३६ | दक्षिणेकडील सफर .... .... | २७४ |
| ३७ | समेटाच्या काळांतील कटकटी .... | २७८ |
| ३८ | मंडलाकार परिषद.... .... .... | २८९ |
| ३९ | संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांचा लढा .... | २९९ |
| ४० | समेटाची इतिश्री .... .... .... | ३१२ |
| ४१ | धरपकड, वटहुकुम अणि पुस्तकांवरील बंदी | ३२० |
| ४२ | हुल्लड .... .... .... .... | ३२५ |
| ४३ | बरेली व डेहराडून येथील तुरुंगवास .... | ३३६ |
| ४४ | भावतरंग .... .... .... | ३४६ |
| ४५ | तुरुंगामधील पशुपक्षी .... .... | ३५३ |
| ४६ | लढा .... .... .... .... | ३६१ |
| ४७ | धर्म म्हणजे काय ? .... .... | ३७१ |
| ४८ | ब्रिटिश सरकारचें दुटप्पी धोरण .... | ३८२ |
| ४९ | तुरुंगवासाचा शेवट .... .... | ३९६ |
| ५० | गांधीजींची भेट .... .... .... | ४०० |
| ५१ | प्रागतिकांचा परिचय .... .... | ४१० |
| ५२ | वसाहतीचें स्वराज्य व पूर्ण स्वातंत्र्य .... | ४१९ |
| ५३ | जुनें हिंदुस्थान व नवें हिंदुस्थान .... | ४२८ |
| ५४ | ब्रिटिशांची राजवट .... .... | ४३६ |

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| ५५ | रजिस्टर विवाह आणि लिपीचा प्रश्न ... | ४५३ |
| ५६ | जातिनिष्ठा आणि परागति ... ... | ४६० |
| ५७ | रस्ता बंद .... ... ... | ४७५ |
| ५८ | धरणीकंप .... ... ... | ४८३ |
| ५९ | अलिपूरचा तुरुंग ... ... | ४९५ |
| ६० | पौर्वात्य अणि पाश्चात्य देशांतील लोकशाही | ५०० |
| ६१ | शून्याकार .... ... ... | ५०६ |
| ६२ | मूर्तिमंत कोडें .... ... ... | ५१८ |
| ६३ | मतपरिवर्तन कीं सक्ती ? ... ... | ५४२ |
| ६४ | पुनश्च डेहराडून तुरुंग ... ... | ५६० |
| ६५ | अकरा दिवस .... ... ... | ५६८ |
| ६६ | पुन्हां तुरुंगांत .... ... ... | ५७३ |
| ६७ | अलीकडचे कांहीं प्रसंग ... ... | ५८१ |
| ६८ | भरतवाक्य .... ... ... | ६०४ |
| ६९ | ताजा कलम .... ... ... | ६०८ |
| ७० | पांच वर्षांनंतर .... ... ... | ६१० |
| ७१ | भिन्न मार्ग .... ... ... | ६२९ |

# जवाहरलाल नेहरू

# १

# काश्मीरांतून प्रयाण

" स्वतःसंबंधीं लिहिणें मोठें आकर्षक आहे, पण तें तितकेंच अवघडहि आहे. आत्मनिंदा करावी, तर आपलेंच मन खट्टू होणार. बरें, आत्मस्तुति करावी, तर वाचकांचे कान किटणार ! "

—एब्राहाम कॉली

श्रीमंत आईबापांचे एकुलते एक चिरंजीव लाडामुळें बिघडण्याचा संभव फार; त्यांतून हिंदुस्थानांत तर तो अधिकच. आणि वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत जर पाठीवर एकहि भावंड झालें नाहीं, तर मग त्या मुलाचे फाजिल लाड व्हावयाचे हें ठरलेलेंच. माझ्या दोघी बहिणी माझ्याहून पुष्कळच लहान आहेत आणि आम्हां तिघां भावंडांत बऱ्याच वर्षांचें अंतर आहे. त्यामुळें बालपणांत मला माझ्या बरोबरीचे सवंगडी लाभले नाहींत व मी थोडा एकलकोंडा असाच वाढलों. शाळेंतल्या वर्गबंधूंची गट्टी जमावी तर तेंहि घडलें नाहीं. कारण बालकमंदिर अथवा प्राथमिक शाळा या संस्थांत मला कधींच पाठविण्यांत आलें नाहीं. मला शिक्षण देण्याचें काम खाजगी शिक्षक आणि शिक्षकिणी यांच्यावरच सोंपविलेलें होतें.

तथापि आमच्या घरीं माणसांची वाण नव्हती. हिंदु कुटुंब म्हटलें, कीं तें सोयऱ्याधायऱ्यांनीं गजबजलेलें असावयाचें. तसेंच आमचेंहि घर होतें. पण माझीं चुलत भावंडें पुष्कळच वडील. तीं हायस्कूलांत आणि विश्वविद्यालयांतून शिकत होतीं. तेव्हां त्यांच्या कामकाजांत अगर खेळांत भाग घेण्यास मी फार लहान आहें असें त्यांना वाटे. तात्पर्य इतकेंच, कीं कुटुंबांत माणसें जरी पुष्कळ होतीं, तरी मला आपला एकान्तवासच घडे आणि स्वतःचेच मनसुबे रचावेत आणि एकट्याचेच खेळ खेळावेत असेंच भाग्य माझ्या वांटणीला येई.

आम्ही मूळचे काश्मीरांतले. अठराव्या शतकाच्या अगदीं प्रारंभीं म्हणजे दोनशेंहून अधिक वर्षांपूर्वी आमचे वाडवडील काश्मीरच्या खोऱ्यांतून निघून पैसा आणि नांव कमाविण्यासाठीं खालच्या समृद्ध प्रदेशांत उतरले. त्या वेळीं औरंगजेब पैगंबरवासी होऊन मोगल साम्राज्याची इमारत ढासळूं लागली होती. दिल्लीश्वराच्या गादीवर फरुखसिअर बसला होता. काश्मीर सोडून दक्षिणेकडे आलेल्या आमच्या प्रथम पूर्वजांचें नांव राजकौल. संस्कृत व पर्शियन भाषापंडित म्हणून त्यांचें नांव काश्मीरांत बरेंच गाजलें होतें. फरुखसिअरनें काश्मीरला भेट दिली

तेव्हां राजकौल फरुखसिअरच्या डोळ्यांत भरला आणि १७१६ च्या सुमारास बहुशः बादशहाच्या सांगण्यावरूनच कौलकुटुंब वास्तव्यासाठीं दिल्लीस आलें. एका कालव्याच्या कांठीं राहत्या घरासह एक जहागीर राजकौल यांस देण्यांत आली. कालव्याला नहर असा शब्द आहे. तेव्हां कालव्याच्या कांठीं राहणारे म्हणून "नेहरू" असें अभिधान या घराण्याला मिळालें. मूळ नांव कौल. तें बदलून कौल-नेहरू असें झालें; कालांतरानें कौल गळून पडलें आणि आम्ही नेहरू म्हणूनच ओळखले जाऊं लागलों.

त्यानंतरच्या धामधुमीच्या काळांत आमच्या कुटुंबाच्या नशिबानें अनेक कलाटण्या खाल्ल्या; जहागीर कमी होत होत अजिबात नाहींशी झाली. आमचे पणजोबा लक्ष्मीनारायण नेहरू हे दिल्लीच्या बादशहाच्या नामधारी दरबारांत "कुंपणी सरकारचे" पहिले वकील म्हणून नेमले गेले होते. गंगाधर नेहरू हे माझे आजे. १८५७ च्या प्रसिद्ध बंडाच्या जरा आधीं ते दिल्लीचे कोतवाल होते. १८६१ मध्यें ते तरुणपणींच म्हणजे वयाच्या ३४ व्या वर्षी वारले.

१८५७ च्या बंडापासून आमच्या घराण्याचा दिल्लीशीं असलेला संबंध तुटला आणि आमचे सर्व कागदपत्र व दस्तऐवज बंडांत गहाळ झाले. जवळची सर्व चीजवस्त जवळजवळ खलास झाल्यामुळें आमचें घराणेंहि इतर हजारों निराश्रित कुटुंबांप्रमाणें दिल्ली सोडून आग्र्यास गेलें. त्या वेळीं माझ्या वडिलांचा जन्म झाला नव्हता. परंतु माझे दोन चुलते त्या वेळीं चांगले जाणते झालेले होते. त्यांना थोडेंसें इंग्रजीहि कळूं लागलें होतें. एकदां इंग्रजीच्या ह्या तुटपुंज्या ज्ञानामुळें माझे धाकटे काका आणि आमच्या कुटुंबांतली मंडळी यांचा मोठ्या अपमानास्पद अरिष्टांतून बचाव झाला. कुटुंबांतल्या कांहीं मंडळींना बरोबर घेऊन ते दिल्लीहून प्रवासाला निघाले असतां त्यांच्याबरोबर त्यांची छोटी बहीणहि होती. तिचें तें कोंवळें वय आणि काश्मीरी मुलांत कोठें कोठें आढळणारें तें लावण्य पाहून वाटेंत एका इंग्रज सोजिराच्या मनांत संशय आला. माझी आत्या ही कोणी इंग्रज मुलगी असावी असें त्यास वाटून त्यानें मुलगी पळवण्याचा आरोप माझ्या काकांवर केला. आरोप, त्याचा निवाडा आणि त्याबद्दल शिक्षा हे प्रकार त्या काळांत इतके तडकाफडकी होत, कीं माझे काका आणि आमचें कुटुंब यांना शेजारच्याच झाडावर टांगून फांशी देण्यास फारसा अवधि लागला नसता! पण दैव थोर, म्हणूनच काकांच्या इंग्रजी ज्ञानामुळें निकाल जरा लांबणीवर पडला. दरम्यान कोणी ओळखीचा प्रवासी त्याच वाटेने जात होता त्यानें काकांची व इतरांची अखेर सुटका केली.

कांहीं वर्षे नेहरू घराण्याचें वास्तव्य आग्र्यासच होतें. तेथेंच ता. ६ मे १८६१ रोजीं माझ्या वडिलांचा जन्म झाला.* त्या वेळीं माझे आजोबा दिवंगत होऊन तीन

* एक योगायोग मोठा गमतीचा आणि कुतूहलजनक आहे. तो असा कीं नेमके त्याच सालीं, त्याच महिन्यांत आणि त्याच दिवशीं कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर जन्मले.

महिने झाले होते. अंगावर मोगली थाटाचा दरबारी पोषाख आणि हातांत वांकडी तलवार अशा वेषांतल्या आमच्या आजोबांचें एक लहानसें चित्र आमच्या संग्रहीं आहे. पेहरावावरून ते मोगल सरदारच असावेत असें वाटेल. परंतु त्यांच्या काश्मीरी चेहरेपट्टीची ठेवण त्यांत स्पष्टपणें उमटलेली आहे.

आमच्या कुटुंबाचा सर्व भार नंतर माझ्या दोघां काकांवर पडला. दोघेहि माझ्या वडिलांहून बरेंच मोठे होते. बन्सीधर नेहरू हे थोरले काका. त्यांना ब्रिटिश सरकारच्या न्यायखात्यांत नोकरी मिळाली. त्यांच्या अनेक ठिकाणीं बदल्या होत गेल्यामुळें त्यांचा कुटुंबाशीं असलेला संबंध थोड्याफार प्रमाणांत तुटत गेला. धाकटे काका नंदलाल नेहरू. त्यांनीं संस्थानांत नोकरी पत्करली. राजपुतान्यांतील खेत्री संस्थानच्या दिवाणाचें काम त्यांच्याकडे दहा वर्षेपर्यंत होतें. नंतर कायद्याचा अभ्यास करून ते अलाहाबादेस वकिली करूं लागले. माझे वडील त्यांच्याच घरीं राहिले आणि त्यांच्याच कृपाछत्राखालीं लहानाचे मोठे झाले. त्या परस्परांचें एकमेकांवर फार प्रेम होतें. त्या दोघांच्या प्रेमांत भ्रातृप्रेम, पितृवात्सल्य आणि पितृभक्ति ह्या सर्व भावनांचें क्वचितच आढळणारें मिश्रण झालेलें दिसून येई. माझे वडील म्हणजे शेंडेफळ. साहजिकच माझ्या आजीचा त्यांच्यावर अधिक जीव होता. माझी वृद्ध आजी मोठी करारी स्वभावाची होती. तिला डावलून कोणी पुढें गेलें, तर तें तिला खपत नसे. ती वारल्याला आज जवळजवळ पन्नास वर्षें होत आलीं; परंतु एक मोठी तोऱ्याची आणि करारी स्वभावाची बाई म्हणून तिची आठवण काश्मीरी स्त्रियांना अद्यापहि राहिली आहे.

नुकत्याच स्थापन झालेल्या आग्र्याच्या हायकोर्टांत माझे काका वकिली करूं लागले आणि हायकोर्टाचें स्थान बदलून तें अलाहाबादेला गेल्यावर नेहरू-कुटुंबहि अलाहाबादेस आलें. तेव्हांपासून अलाहाबाद हेंच आमचें घर झालें; त्याच शहरीं बऱ्याच वर्षांनीं मी जन्मास आलों. हळूहळू माझ्या काकांची वकिली मोठ्या प्रमाणांत चालू लागली आणि हायकोर्टांतील प्रमुख वकिलांत त्यांची गणना व्हावयास लागली. त्या काळीं माझे वडील कानपूर व अलाहाबाद येथील शाळा-कॉलेजांत शिक्षण घेत होते. सुरुवातीला त्यांनीं फक्त पर्शियन आणि आरबी भाषांचाच अभ्यास केला आणि सुमारें तेरा-चौदाव्या वर्षी त्यांच्या इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाला. पण तेवढ्या वयांतहि पर्शियन भाषेत त्यांनीं बरेंच प्रावीण्य मिळविलें होतें आणि अरबीशींहि त्यांचा परिचय झाला होता. या अध्ययनामुळें त्यांच्याहून वयानें पुष्कळच मोठीं माणसेंसुद्धां त्यांच्याबद्दल आदरभाव दर्शवीत असत. लहानपणीं इतकें पांडित्य संपादन केलें असलें, तरी शाळा–कॉलेजांतल्या खोड्या व व्रात्यपणा यांमुळेंच माझ्या वडिलांची विद्यार्थीदशा विशेष गाजली. आदर्श विद्यार्थी असें त्यांना म्हणतांच येणार नाहीं. अभ्यासापेक्षां खेळाकडे आणि नित्य नवा द्वाडपणा करण्याकडेच त्यांचे लक्ष अधिक असे. कॉलेजांतल्या पुंड विद्यार्थ्यांचे ते म्होरके समजले जात. त्या

काळीं मुंबई, कलकत्ता यांसारखीं फार मोठीं शहरें सोडून दिलीं, तर इतर ठिकाणच्या हिंदी लोकांत पाश्चात्य कपडे अगर रीतिरिवाज यांचा सामान्यतः प्रचार झालेला नव्हता; पण माझ्या वडिलांनीं त्या काळांत देखील पाश्चात्य वळण उचललें होतें. त्यांची वृत्ति जरा अवखळ होती हें खरें; पण इंग्रज अध्यापकांचा त्यांच्यावर लोभ असे. त्यांनीं माझ्या वडिलांची अनेक वेळां पेंचांतून सोडवणूक केली. त्यांच्या अंगच्या तेजस्वितेवर प्रोफेसर खूष असत. बुद्धीची देणगी चांगली असल्यामुळें जरा नेट लावून अभ्यास केला, कीं वर्गांत त्यांची चांगली प्रगति दिसून येई. कित्येक वर्षांनंतर त्यांच्या प्रोफेसरांपैकीं मि. हारिसन यांच्यासंबंधीं आमच्यापाशीं वडील पुष्कळ वेळां मोठ्या स्नेहभावानें बोलत असत. मि. हारिसन हे अलाहाबादच्या मूर सेंट्रल कॉलेजचे मुख्य अध्यापक होते. त्यांचें एक पत्र माझ्या वडिलांनीं आपल्या विद्यार्थी-दशेपासून जतन करून ठेविलें होतें.

विश्वविद्यालयाच्या अनेक परीक्षांतून ते उत्तीर्ण झाले; पण विशेष असे कोठेंच झळकले नाहींत. नंतर ते शेवटच्या म्हणजे बी. ए.च्या परीक्षेला बसले. परीक्षे-साठीं विशेष अभ्यास करण्याची तसदी त्यांनीं घेतली नव्हती आणि पहिली प्रश्न-पत्रिका लिहिल्यावर तर त्यांची अगदींच निराशा झाली. आरंभालाच मक्षिकापात झाला असें मनानें घेतल्यावर पास होण्याची अपेक्षाच उरली नाहीं. तेव्हां परीक्षेवर बहिष्कार घालण्याचें ठरवून परीक्षेच्या मंडपाऐवजीं आग्र्याच्या ताजमहालांतच त्यांनीं वेळ घालविला. ( त्या वेळीं विश्वविद्यालयाच्या परीक्षा आग्र्यास होत असत. ) अध्यापकांनीं त्यांना बोलावून घेऊन पहिल्या प्रश्नपत्रिकेचीं उत्तरें व्यवस्थित लिहिलीं असतां नंतरच्या प्रश्नपत्रिका न लिहिण्यांत तुम्हीं मूर्खपणा केलात अशी कडक कान-उघाडणी केली. तथापि माझ्या वडिलांचा विश्वविद्यालयीन आयुष्यक्रम तेथेंच खलास झाला हें खरें. बी. ए.ची पदवी त्यांनीं कधींच घेतली नाहीं.

आयुष्यांत बरकत मिळवावी आणि एकाद्या धंद्यांत आपलें बस्तान नीट बस-वावें अशी उत्कंठा त्यांना लागली होती. ज्यांत बुद्धिमत्तेची चमक दाखवितां येईल आणि पैसा कमावतां येईल असा धंदा हिंदुस्थानांत त्या वेळीं एकच होता. तो म्हणजे वकिलीचा. साहजिकच माझ्या वडिलांनीं वकिलीकडे जाण्याचें ठरविलें. शिवाय घरचें उदाहरण डोळ्यांसमोर होतेंच. ते हायकोर्ट वकिलीच्या परीक्षेला बसले, आणि तींत नुसते पास झाले नाहींत, तर त्यांनीं पहिला नंबर पटकावून एक सुवर्णपदकहि मिळविलें. मग त्यांच्या मनाजोगा धंदा त्यांना सांपडला म्हणा किंवा आपण निवड केलेल्या धंद्यांत यशस्वी होण्याचा निर्धारच त्यांनीं केला होता असें म्हणा.

कानपूरच्या जिल्हा कोर्टांत त्यांनीं वकिलीला प्रारंभ केला. मनांत यशाची ईर्षा असल्यामुळें त्यांनीं अंग मोडून काम केलें आणि लवकरच त्यांचा चांगला जम बसला. तथापि खेळ आणि करमणुकीचीं व मनोरंजनाचीं इतर साधनें यांकडची त्यांची ओढ कायमच होती. त्यामुळें कांहीं वेळ त्यांत खर्च होई. कुस्त्यांच्या

दंगलीची त्यांना विशेष आवड होती. त्या काळीं जाहीर कुस्त्यांविषयीं कानपूर शहराची ख्याति होती.

सुरुवातीचे धडे कानपूरला तीन वर्षे घेतल्यावर माझे वडील अलाहाबाद येथें हायकोर्टांत वकिली करण्यासाठीं आले. त्यानंतर थोड्याच वर्षांनीं त्यांचे थोरले बंधु पंडित नंदलाल हे एकाएकीं वारले. माझ्या वडिलांच्या माथ्यावर ही आकाशींची कुऱ्हाडच कोसळली; जवळजवळ पितृस्थानीं असलेल्या प्रेमळ भावाच्या सहवासास ते स्वतः अंतरले आणि कुटुंबांतला कर्ता आणि मुख्य कमावता पुरुषहि नाहींसा झाला. त्यामुळें एवढ्या मोठ्या कुटुंबाचा संसारगाडा चालवण्याची जबाबदारी तरुणपणींच माझ्या वडिलांच्या शिरावर पडली.

यापुढें आपल्या धंद्यांत ते अगदीं गढून गेले. यशस्वी व्हावयाचें ही प्रतिज्ञा. कित्येक महिनेपर्यंत इतर सर्व गोष्टींशीं असलेला संबंध त्यांनीं तोडून टाकला. काकांकडचीं बहुतेक वकीलपत्रें त्यांच्याकडे येऊन तीं कामें त्यांनीं व्यवस्थित-पणें चालवल्याकारणानें वकिलीच्या धंद्यांत प्रवीण होण्याची जी त्यांची मनीषा ती लवकरच पूर्ण झाली. यशामागोमाग अधिक काम व अधिक पैसाहि त्यांच्यापाशीं आला व तरुण वयांतच यशस्वी वकील असा त्यांचा बोलबाला झाला. पण हा मान मिळविण्यासाठीं त्यांना किंमतहि तशीच द्यावी लागली. खाजगी अथवा सार्वजनिक कोणत्याच इतर कामासाठीं त्यांना वेळ सांपडेनासा झाला. सणावाराचे आणि सुटीचे सगळेच दिवस वकिलीच्या चरणीं वाहिलेले होते. इंग्रजी शिकलेल्या मध्यमवर्गीयांचें म्हणजे पांढरपेशांचें लक्ष नुकतेच काँग्रेसकडे जाऊं लागलें होतें. काँग्रेसच्या कांहीं अधिवेशनांस वडील हजर राहत आणि तिच्याबद्दल वैचारिक निष्ठाहि दाखवीत. पण काँग्रेसच्या कामांत ते फारसें मन घालीत नसत. धंद्यांतच ते गुंतून पडलेले होते. शिवाय सार्वजनिक कार्य आणि राजकारण आपणाला कितपत जमेल याचीहि त्यांना शंका वाटत असावी; कारण त्यांनीं तोंपावेतों ह्या बाबींकडे विशेष लक्ष दिलेलें नव्हतें आणि त्याबद्दलची माहितीहि त्यांना फारच थोडी होती. शिवाय जेथें आपणाला दुय्यम दर्जाचें काम पत्करावें लागेल, अशा कोणत्याहि चळवळींत अगर संघटनेंत भाग घेण्याची त्यांची इच्छा नसे. बालपणची आणि तरुणपणची चढेल वृत्ति बाह्यात्कारी थंडावल्यासारखी दिसत असली, तरी सत्ताभिलाषेंत तिचे रूपांतर झालें होतें, इतकेंच. तिच्या जोरावर वकिलीच्या धंद्यांत ते यशस्वी झाले, आणि अधिकच स्वाभिमानी आणि स्वावलंबी बनले. खडाजंगीची, अडचणीवर मात करण्याची त्यांना फार आवड. असें असूनहि त्यांनीं त्या काळीं राजकीय क्षेत्रांत पाऊल टाकण्याचें टाळलें याचें नवल वाटतें; राष्ट्रीय सभेच्या तेव्हांच्या राजकारणांत चढाईचें वातावरण फारच थोडें होतें; तथापि राजकारणाचे मार्ग नवे आणि धंद्याच्या कामाचा रगाडा फार; त्यामुळें त्यांनीं राज-कारणांत लक्ष घातलें नसावें. यशःसोपानावरील त्यांची पक्कड आतां चांगली

घट्ट बसली होती आणि कोणाच्या मेहेरबानीनें नव्हे, व त्यांच्या समजुतीप्रमाणें दुसऱ्या कोणाची चाकरी करूनहि नव्हे, तर स्वतःच्या महत्त्वाकांक्षेच्या आणि बुद्धीच्या बळावर त्या सोपानाच्या एकाहून एक उंच पायरीवर ते पाऊल टाकीत चालले होते.

राष्ट्रीय वृत्तीची व्याख्या अगदीं कांटेतोलपणें केली नाहीं, तर ते राष्ट्रीय वृत्तीचे होते असें म्हटलें पाहिजे; परंतु इंग्रज लोक व त्यांचे रीतिरिवाज यांचें ते कौतुक करीत. आपल्या देशबांधवांचा अधःपात झालेला असून, पारतंत्र्याची बक्षिशी मिळाली ती त्यांच्या लायकीला अनुरूप अशीच मिळाली, अशी त्यांची कल्पना होती. आणि कांहींहि न करतां नुसती बडबड करीत राहणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांबद्दलच्या तुच्छतेची छटाहि त्यांच्या अन्तःकरणांत दिसून येई. परंतु बडबडण्याव्यतिरिक्त त्यांनीं काय करावें हें खुद्द वडिलांनाहि सांगतां आलें नसतें. स्वतःच्या यशाविषयीं वाटणाऱ्या अभिमानामुळें त्यांच्या डोक्यांत असाहि विचार येत असावा कीं राजकारणांत वावरणारे सगळेच नव्हे, पण बरेचजण संसारांत फजित झाले म्हणून राजकारणांत घुसले आहेत.

सारख्या फुगत चाललेल्या मिळकतीबरोबर आमच्या राहणींतहि पालट होत गेला; कारण वाढत्या उत्पन्नापाठोपाठ वाढता खर्च हा आलाच. हवा तेव्हां आणि हवा तेवढा पैसा मिळविण्याची ऐपत अंगीं असतांना पैसा सांठवणें म्हणजे आपल्या अंगच्या ऐपतीची अवहेलना करण्याप्रमाणें आहे अशी माझ्या वडिलांची कल्पना होती. खेळाडू वृत्ति आणि हरतऱ्हेचे भोगविलास चाखण्याची आवड यांची गट्टी जमल्यावर खिशांतले पैसे बाहेर निघण्याला कोणताच प्रत्यवाय उरला नाहीं. आमची राहणी अधिकाधिक पाश्चात्य वळणावर जाऊं लागली.

माझ्या लहानपणीं* आमचें घर हें अशा प्रकारचें होतें.

---

* माझा जन्म अलाहाबाद येथें १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला; तिथि मार्गशीर्ष वद्य ७, संवत् १९४६.

२

# बालपण

धकाधकीचे प्रसंग अथवा दुसऱ्या कांहीं उलाढाली माझ्या आयुष्यांत घडल्या नाहींत. आयुष्याचा प्रवाह अगदीं संथपणें वाहत होता. माझीं चुलत भावंडें मोठमोठ्या गोष्टी बोलत त्या सगळ्याच मला नेहमीं समजत नसत. पण मी त्या लक्षपूर्वक ऐकत असें. इंग्रजांच्या उद्दाम स्वभावाविषयीं आणि अपमान-कारक वर्तणुकीविषयींहि पुष्कळ वेळां बोलणीं चालत आणि मूग गिळून न बसतां प्रत्येक हिंदी मनुष्यानें याचा छातीठोकपणें प्रतिकार केला पाहिजे असेंहि मत प्रदर्शित होत असे. इंग्रज व हिंदी लोकांमधील झगड्यांचीं उदाहरणें नेहमीं घडत आणि त्यांवर मोकळेपणानें चर्चाहि चाले. इंग्रज माणसानें हिंदी मनुष्याचा खून केला तर त्याच्याच जातीच्या पंचांनीं त्याला निर्दोषी ठरवून सोडावें हा कटु अनुभव तर वारंवार येत असे. आगगाडींत युरोपियनांकरितां डबे राखून ठेवण्यांत येत. गाडींत चेंगराचेंगरी होईल इतकी जरी गर्दी झाली—आणि अशी गर्दी नेहमीं होतच असे—तरी राखीव डब्यांत हिंदी इसमानें पाऊल टाकणें म्हणजे पाप होतें; मग ते अगदीं मोकळे का असेनात. डबा राखीव नसला, तरी त्याचाहि ताबा इंग्रज माणूस बळकावून बसे आणि हिंदी इसमास आंत येण्यास तो खुशाल मज्जाव करी. सार्व-जनिक बागांतून व इतर जागीं युरोपियनांसाठीं बाकें व खुर्च्या राखून ठेवण्यांत येत. अशा उद्दामपणें वागणाऱ्या राज्यकर्त्यांचा मला मनस्वी संताप येई आणि एकाद्या हिंदी इसमानें ठोशास ठोसा लगावल्याचें समजलें कीं मला आनंद होत असे. असेहि प्रसंग कधींकधीं येत कीं माझ्या चुलत भावंडांपैकीं अगर त्यांच्या मित्रांपैकींच एकादा अशा वैयक्तिक गुद्दागुद्दींत सांपडे. मग मात्र साहजिकच आमच्या भावना उसळून येत असत. माझा एक चुलत भाऊ आमच्या सर्व कुटुंबांत दांडगा होता. एकाद्या इंग्रजाबरोबर किंवा त्याहूनहि राज्यकर्त्यांशीं आपण किती एकजीव झालेले आहोंत याचें लोकांत प्रदर्शन व्हावें म्हणून इंग्रज अधिकाऱ्यापेक्षां अगर व्यापारापेक्षांहि अधिक अरेरावी करणाऱ्या युरोपियनाबरोबर भांडण उकरून काढण्याची त्याला भारी हौस वाटे. असलीं भांडणें बहुधा आगगाडीच्या प्रवासांत व्हावयाचीं.

परकीय राज्यकर्त्यांची राजवट आणि वर्तणूक यांची मला फार चीड येई; पण वैयक्तिक इंग्रज माणसाबद्दल माझ्या मनांत द्वेषभाव उपजल्याचें मला तरी आठवत नाहीं. इंग्रज बाया माझ्या शिक्षणसंगोपनासाठीं ठेवण्यांत आलेल्या होत्या आणि कधीं कधीं माझ्या वडिलांकडे त्यांचे इंग्रज स्नेही भेटावयास येत असत. इंग्रजां-विषयीं माझ्या मनांत आदरभावच होता.

सायंकाळीं बहुधा खूपच मित्रमंडळी वडिलांना भेटण्यासाठीं येत आणि दिवसभरच्या दगदगीनंतर जरा आराम करण्याच्या मनोवृत्तींत ते असले, कीं त्यांच्या तिमजली हंसण्यानें आमचें घर दणाणून जात असे. त्यांचें हंसणें सर्व अलाहाबादेंत प्रसिद्ध होतें. क्वचित् प्रसंगीं पडद्याआडून मी वडिलांकडे आणि त्यांच्या मित्रपरिवाराकडे दृष्टि टाकीत असें. हेतु हा कीं, हीं बडीं प्रस्थें एकमेकांशीं बोलतात तरी काय, तें समजलें तर पाहावें. टेहळणी करतांना मी पकडला गेलों, तर मला बाहेर खेंचण्यांत येई आणि भीतीनें गांगरलेल्या स्थितींतच वडिलांच्या मांडीवर थोडा वेळ मला बसविण्यांत येई. एकदां मी त्यांना कोणतें तरी लाल मद्य पितांना पाहिलें. व्हिस्की माझ्या परिचयाची होती; कारण ती पीत असतांना वडिलांना व त्यांच्या मित्रांना मीं पाहिलेलें होतें. परंतु हें नवें लाल लाल पेय पाहून मला फार भीति वाटली आणि बाबा रक्त पीत आहेत असें सांगण्यासाठीं मी आईकडे धांवतच गेलों!

वडिलांबद्दल मला निस्सीम आदर होता. ते म्हणजे शक्ति, शौर्य आणि बुद्धिमत्ता यांचे साक्षात् पुतळे आहेत अशी मझी कल्पना असे. मीं पाहिलेल्या लोकांपेक्षां ते मला कितीतरी श्रेष्ठ असे वाटत. मनांतल्या मनांत दडवून ठेवलेली माझी आशा म्हणजे मोठेपणीं मी वडिलांप्रमाणें व्हावें. त्यांच्याबद्दल मला अतिशय आदर व प्रेम वाटे; पण त्याचबरोबर त्यांची मला भीतिहि वाटे. नोकरांचाकरांवर डाफरतांना मीं त्यांना पाहिलें होतें. त्या वेळीं ते भारी उग्र दिसत आणि माझें शरीर भीतीनें कांपूं लागे. नोकरचाकरांना वागविण्याच्या त्यांच्या तऱ्हेबद्दल मला वाटणाऱ्या संतापाचीहि त्यांत कधींकधीं भर पडत असे. त्यांचा राग खरोखरच भयंकर होता, आणि नंतरच्या काळांतहि त्यांच्या रागाची बरोबरी करील असा संतापी माणूस माझ्या पाहण्यांत आलेला नाहीं. पण सुदैवानें माझ्या वडिलांची विनोदबुद्धि मोठी जागृत होती व त्यांच्या इच्छाशक्तीचें बळहि दांडगें होतें. त्यामुळें बहुतेक प्रसंगीं ते आपला क्रोध आवरीत असत. जसजसें त्यांचें वय होत गेलें, तसतसा त्यांचा संयमहि वाढला आणि पूर्वीप्रमाणें शंकराचा तृतीय नेत्र उघडण्याचे प्रसंग फारच क्वचित् येऊं लागले.

माझ्या अगदीं पहिल्या पहिल्या आठवणींपैकीं एक आठवण त्यांच्या रागासंबंधींचीच आहे. कारण मीच त्यांत होरपळून निघालों होतों. मी तेव्हां पांच सहा वर्षांचा असेन. एक दिवस मला त्यांच्या कचेरींतील टेबलावर दोन फाउन्टन पेनें आढळलीं. हावरेपणानें मी त्यांच्याकडे पाहत राहिलों. मनांत विचार आला कीं वडिलांना एकाच वेळीं दोन फाउन्टन पेनें लागण्याचा कांहीं संभव नाहीं. म्हणून मीं त्यांतलें एक पेन लांबवलें. नंतर मला कळून आलें कीं गहाळ फाउन्टनपेनचा तपास मोठ्या कसोशीनें चाललेला आहे. माझ्या हातून घडलेल्या कृत्याच्या विचारानें मी अगदीं भेदरून गेलों, पण मी कबूल झालों नाहीं. शेवटीं पेन सांपडलें आणि माझा गुन्हा सर्वांना जाहीर झाला. वडील संतापानें लाल झाले आणि त्यांनीं मला यथास्थित

चोप दिला. मानहानीमुळें वाटणाऱ्या शरमेनें आणि माराच्या दुःखानें अगदीं मूढ बनून मी आईला जाऊन बिलगलों. मग किती दिवस तरी मारानें हुळहुळ्या झालेल्या आणि भीतीनें थरथरणाऱ्या माझ्या लहानग्या शरीरावर मलमपट्ट्या चालल्या होत्या !

या शिक्षेबद्दल मी वडिलांवर आकस धरलेला मला आठवत नाहीं. झाली ती शिक्षा जरा कडक, पण योग्य झाली असें मला वाटलें असावें. परंतु वडिलांबद्दल वाटणारें प्रेम व आदर हीं जरी पूर्वीप्रमाणेंच कायम होतीं, तरी, त्यांत भीतीचा अंश आला. आईविषयीं मात्र तसें नव्हतें. तिची भीति मला मुळींच वाटत नसे; कारण माझी खात्रीच असे, कीं मीं कांहीं केलें तरी ती गयच करणार. माझ्यावर तिचें निरतिशय आणि अखण्ड प्रेम असल्यामुळें मीच तिच्यावर डोळे वटारीत असें ! वडिलांपेक्षां तिच्याशींच माझा संबंध फार येई, त्यामुळेंहि मला तीच अधिक जवळची वाटे. आणि ज्या गोष्टी वडिलांपाशीं बोलाव्यात असें स्वप्नांतहि वाटणार नाहीं, त्या तिच्यापाशीं मी बोलत असें. ती नाजुक ठेंगण्या बांध्याची अशी होती. मी लवकरच तिच्याइतका उंच झालों, तेव्हां मी तिच्याबरोबरीचा आहें असें मला वाटूं लागलें ! तिच्या सौंदर्याचा मला अभिमान वाटे, आणि तिच्या असाधारण सुंदर आणि चिमुकल्या हातापायांकडे पाहिलें, कीं मला आनंद होई. तिच्यांतलें काश्मीरी रक्त अद्यापि ताजें होतें. कारण तिच्या माहेरच्या मंडळींनीं काश्मीर सोडल्याला साऱ्या दोनच पिढ्या लोटल्या होत्या.

लहानपणीं माझ्या विश्वासाचें दुसरें ठिकाण म्हणजे माझ्या वडिलांचे शिक्षक मुनशी मुबारक अली. बदाउन येथील एका सुखवस्तु कुटुंबापैकीं ते एक गृहस्थ होते. १८५७ सालच्या बंडांत त्या घराण्याची धूळधाण झाली. दुःखानुभवामुळें त्यांचा स्वभाव सौम्य झाला होता. ते सर्वांशींच आणि विशेषतः मुलांशीं मोठ्या ममताळूपणानें वागत. मी अडचणींत सांपडलों अगर माझें मन कष्टी झालें, कीं मला त्यांच्यापाशीं हटकून आसरा मिळावयाचाच. त्यांची भव्य मूर्ति व पांढरी शुभ्र दाढी पाहिली, कीं मला वाटे हे बहुत पुरातन गृहस्थ असावेत; यांच्यापाशीं जुन्या विद्येचा भरपूर सांठा असला पाहिजे. मी त्यांना अगदीं बिलगून बसें आणि अरेबिअन नाइटस्‌मधल्या अगर दुसऱ्या पुस्तकांतल्या गोष्टी अथवा १८५७–५८ सालच्या प्रसंगांचीं वर्णनें ते सांगूं लागले, कीं मी आश्चर्यचकित दृष्टीनें तासन् तास ऐकत राहत असें. नंतर कित्येक वर्षांनीं मी मोठा झाल्यावर "मुनशीजी" वारले. त्यांची स्मृति मात्र मीं मोठ्या प्रेमानें एकाद्या ठेव्याप्रमाणें अद्यापि जतन केलेली आहे.

हिंदु पुराणें, रामायण-महाभारतासारखीं महाकाव्यें यांतल्या कथाहि माझी आई अगर काकू मला सांगत, त्या मीं ऐकल्या होत्या. माझी काकू म्हणजे पंडित नंदलालांची पत्नी. हिंदु पुराणग्रंथांचें तिचें वाचन गाढ होतें. आणि त्यांतल्या गोष्टींचा तिच्याजवळ अपरंपार संग्रह झाला होता; त्यामुळें हिंदी पुराणें आणि आख्यायिका यांच्याबद्दल मलाहि बरेंच ज्ञान झालें.

धर्माविषयींच्या माझ्या कल्पना फारच अंधुक होत्या. पण मला वाटे कीं धर्म म्हणजे बायकांचें खातें! माझे वडील आणि माझीं थोरलीं चुलत भावंडें तर धर्माची टरच करीत. त्याचा गंभीरपणें विचार करण्यास ते कधींच तयार नसत. कुटुंबांतल्या यकांचीं अनेक प्रकारचीं व्रतेंवैकल्यें आणि पूजाआर्चा चालत, तेव्हां कुटुंबांतल्या वडीलधाऱ्या पुरुष मंडळींच्या बेपर्वाईची नक्कल करण्याचा मी जरी थोडाफार प्रयत्न करीत असलों, तरी मला त्यांत मौज वाटे. आईबरोबर अथवा काकूबरोबर मी केव्हां केव्हां गंगेवर स्नानासहि जात असें. कधीं अलाहाबादेंतल्या, बनारसमधल्या अथवा इतर ठिकाणच्या देवळांतूनहि आम्ही जात होतों; तर कधीं धार्मिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या एकाद्या संन्याशाच्या दर्शनालाहि बाहेर पडत होतों. पण या सर्वांचा माझ्या मनावर फारच थोडा परिणाम घडला.

याशिवाय मोठाले सण येत. होळी आली, कीं सर्व शहरांत नाचरंगाचें वातावरण पसरे आणि एकमेकांवर पिचकाऱ्यांनीं पाणी उडवण्याची आम्हांला मुभा मिळत असे. दिवाळी आली, कीं सर्व घरांवरून हजारों पणत्यांतून मंद ज्योती उजळल्या जात. जन्माष्टमीला बंदीशाळेंत मध्यरात्रीं जन्मास आलेल्या कृष्णाचा उत्सव साजरा होई. ( रात्रीं त्या घटकेपर्यंत जागत राहणें मात्र आम्हांला मोठें कठिण काम वाटत असे. ) दसरा आणि रामलीला सुरू झाल्या, कीं सोंगें आणि मिरवणुकी निघत आणि त्यांतून रामचंद्राच्या कथांचा पुनरुच्चार होई; लंकाविजय दाखवीत, तो पाहाण्यास हजारों लोक लोटत असत. मोहरमची मिरवणूक पाहण्यासहि सर्व मुलें जात. दूरच्या अरबस्थानांत हसन-हुसेनवर ओढवलेले करुण प्रसंग या मिरवणुकींत साजरे करीत असत. ईदचे दिवस आले, कीं मुनशीजी उत्तम कपडे घालून मोठ्या मशिदींत प्रार्थनेकरतां जात आणि मी त्यांच्या घरीं जाऊन गोड गोड पदार्थांवर ताव मारीत असें. रक्षाबंधन, भाऊबीज वगैरेसारखे हिंदु पंचांगांतले लहानसहान सण तर सारखे येतच असत.

आमच्या घराण्यांत आणि इतर काश्मीरी कुटुंबांत कांहीं असे खास सण साजरे होत कीं जे इतर हिंदूंत पाळण्याची चाल नव्हती. संवत् वर्षमानानुसार येणारा नवरोज किंवा वर्षप्रतिपदा हा यांपैकीं मुख्य सण. आमचा हा खास सण असे. त्या दिवशीं घरांतील सर्व माणसें नवे पोशाख करीत आणि लहान मुलांना देणगी म्हणून थोडे पैसेहि देत.

पण या सर्व समारंभांत वर्षाकाठीं एकदांच येणाऱ्या एका समारंभाची मला विशेष आवड वाटे. कारण त्यांत मुख्य ठिकाणीं माझी योजना होत असे. तो समारंभ म्हणजे माझा वाढदिवस. त्या दिवशीं माझी फार गडबड उडायची! अगदीं सकाळींच मला एका भल्या मोठ्या ताजव्यांत बसवीत व दुसऱ्या ताजव्यांत गव्हाच्या मोटल्या आणि इतर कांहीं जिन्नस घालून माझें वजन करण्यांत येत असे. नंतर ते जिन्नस गोरगरिबांना वांटून टाकीत. तुला झाली कीं मी नवा पोषाख चढवीत असें. मग मला,

देणग्या व बक्षिसें मिळत. उपरान्त भोजनाचा थाट उडे. या प्रसंगीं माझी मिजास म्हणजे राजाची ! माझी मुख्य तक्रार एवढीच होती कीं माझा वाढदिवस फार अंतरा-अंतरानें येतो ! माझे वाढदिवस अधिक वेळ करण्यांत यावेत अशी चळवळ देखील मीं सुरू केली होती ! वाढदिवस हे वाढत्या वयाची जाणीव करून देणारे दिवस म्हणून जेव्हां अप्रिय वाटूं लागतील असा एक काळ येणार आहे, याची मला तेव्हां कल्पना येत नसे.

कधीं कधीं चुलतभावंडांच्या किंवा दुसऱ्या एकाद्या नातेवाइकाच्या अथवा मित्राच्या लग्नासाठीं सगळें कुटुंबच्या कुटुंब आगगाडीनें लांबच्या शहरीं जात असे. अशा प्रवासांत आम्हां मुलांची चंगळ होई. कारण लग्नाकार्यांत शिस्तीचे बंद ढिले सुटत आणि सर्व घरभर आमचा धिंगाणा चालू राही. जानोशाच्या जागीं बहुधा अनेक कुटुंबें दाटीवाटीनें राहत. त्यामुळें तेथें मुलांमुलींचा मोठा मेळाच जमावयाचा. अशा प्रसंगीं मात्र माझी एकलकोंडेपणाची तक्रार दूर होई आणि खेळावयाची आणि खोड्या करण्याची हौस मनसोक्त भागवितां येई. क्वचित् प्रसंगीं फार दंगा झाला कीं वडील माणसें जरा डोळे वटारीत.

हिंदी लोकांच्या लग्नांत उधळमाधळ व नासधूस फार होते म्हणून त्यांचा यथेच्छ निषेध झालेला आहे. योग्यच आहे तो. नासधूस दृष्टीआड केली, तरी लग्नसमारंभांतून होणारा कलाहीन आणि रुचिहीन थाटमाट पाहिला कीं मन खट्टू होतें. ( याला कांहीं अपवाद आहेत हें सांगणें नलगे. ) या सर्वाला मध्यमवर्ग खराखुरा जबाबदार आहे. कर्जाचा बोजा पाठीवर लादून घेऊन गरीबहि उधळ-माधळ करतात, नाहीं असें नाहीं; पण सामाजिक चालीरीतींमुळें त्यांना दारिद्र्य येतें असें म्हणणें म्हणजे मूर्खपणाची कमाल आहे. त्यांचें जीवन पराकाष्ठेचें रुक्ष अणि कंटाळवाणें असतें याचा आपणांला विसर पडतो. कधींकाळीं लग्नकार्य उद्भवलें म्हणजे त्याच्या अनुषंगानें जें काय खाणेंपिणें, गाणेंबजावणें होईल तेंच त्यांच्या काबाडकष्टाच्या व नीरस अशा जीवनरूपी ओसाडींतलें विसाव्याचें स्थान; संसा-राच्या गाड्यापासून अणि पै-पैशाच्या हरघडीच्या कटकटीपासून सुटका व्हावयाची म्हणजे तेव्हांच. हंसण्याबागडण्याची संधि ज्यांना फारशी मिळतच नाहीं, त्यांना हेहि समाधान मिळूं नये असें म्हणण्याइतकें निष्ठुर कोण असेल? नासधूस जरूर कमी करा, उधळमाधळ ( बिचारी दरिद्री जनता जी थोडीफार खुलावट करीत असते तिला उद्देशून हे अगडबंब पण अर्थशून्य शब्द वापरण्यांत काय हंशील आहे ? ) जरूर बन्द करा, पण त्यांचें जीवन आहे त्यापेक्षां मात्र विटकें आणि बेचव होतां कामा नये.

मध्यमवर्गाची स्थिति देखील अशीच आहे. उधळपट्टीचा विचार क्षणभर बाजूस सारला तर असें दिसून येईल कीं अशा लग्नाच्या प्रसंगानेंच लांबचें गणगोत आणि दूरावलेली मित्रमंडळी कित्येक वर्षांनीं एकत्र जमतात, आणि लग्न म्हणजे संबंध दृढतर करणारा सामाजिक समारंभ होतो. हिंदुस्थान म्हणजे अफाट देश. त्यामुळें

जवळच्या मित्रांना भेटणें देखील सोपें काम नाहीं. मग पुष्कळांनीं एकत्र जमणें म्हणजे दुरापास्तच. म्हणूनच लग्नसमारंभ इतके लोकप्रिय झाले आहेत. त्यांच्या तोडीचे आणि सामाजिक संबंध वाढवण्याच्या दृष्टीनें आतां अनेक दृष्टींनीं त्यांच्याहून सरस असे समारंभ म्हणजे राजकीय सभा, परिषदा, आणि कॉंग्रेस.

इतर हिंदी लोकांहून, विशेषतः उत्तर हिंदुस्थानी लोकांहून काश्मीरी लोकांना एक मोठी सवलत आहे. ती अशी कीं त्यांच्यात्यांच्यांत पडदापद्धति पाळण्यांत येत नाहीं. काश्मीरचे डोंगर सोडून ते सपाटीवर आले, तेव्हां त्यांना पडद्याची चाल आढळून आली आणि त्यांनींहि ती स्वीकारली. परंतु ती अंशतः, व तीसुद्धां काश्मीरी लोकांहून इतरांशीं व्यवहारसंबंध येईल तेवढ्यापुरतीच. काश्मीरी लोक जेथें जेथें राहत, तेथें तेथें पडदा-पद्धति म्हणजे सामाजिक प्रतिष्ठेची निदर्शक समजली जात असे. परंतु आपसांत काश्मीरी स्त्रीपुरुष पूर्वीप्रमाणें खुलेपणानें वागत आणि कोणाहि काश्मीरी माणसाला काश्मीरी कुटुंबांत मोकळेपणानें वावरतां येत असे. समाराधनेच्या अथवा सणाच्या दिवशीं काश्मीरी स्त्री-पुरुष परस्परांस भेटत आणि एकत्र उठत-बसत; पुष्कळदां बायका मात्र आपला गुंजवला करून निराळ्या बसत. मुलगे–मुली हीं एकमेकांशीं साधारणतः बरोबरीच्या नात्यानेंच वागत. अर्थात् सध्यां पाश्चात्य देशांत आढळणारें स्वातंत्र्य त्यांना मिळत नसे.

या प्रकारें माझे बालपणचे दिवस गेले. कधीं कधीं कौटुंबिक कुरबुरी होत. मोठ्या कुटुंबांत त्या टाळणेंहि शक्य नसतें. अशा तक्रारी जरा अधिक भडकल्या कीं त्या माझे वडिलांचे कानावर जात, मग ते रागावत आणि बायकांच्या कोत्या बुद्धीमुळें अशा गोष्टी घडतात असें त्यांच्या मनांत येई. नेमकें काय घडलें त्याचा मला उलगडा होत नसला, तरी कुटुंबांतलीं माणसें कडवटपणें बोलत आणि परस्परांचें तोंड चुकवतांना आढळून येत. त्यामुळें कोठें तरी घोडचूक झालेली आहे एवढें मला समजत असे. माझेंहि मन बेचैन होई. जेव्हां केव्हां वडील त्यांत मन घालीत, तेव्हां सगळ्यांचेंच धाबें दणाणून जाई.

त्या काळाचा एक लहानसा प्रसंग माझ्या विशेष लक्षांत राहिला आहे. तेव्हां मी बहुधा सात अथवा आठ वर्षांचा असेन. मी रोज घोडा फिरवण्यासाठीं जात असें. माझ्याबरोबर अलाहाबादच्या घोडदळापैकीं एक स्वार देण्यांत येई. एके दिवशीं संध्याकाळीं मी घोड्यावरून पडलों आणि अर्धवट अरब अवलादीचा माझा सुंदर घोडा रिकाम्या खोगीरानेंच घरीं आला. वडिलांकडे टेनिससाठीं लोक जमले होते, तेथें मोठी गडबड उडाली. खेळासाठीं जमलेले समस्त लोक निरनिराळ्या प्रकारच्या वाहनांत बसून माझ्या शोधासाठीं बाहेर पडले. एक मोठी मिरवणूकच निघाली म्हणा ना! वाटेंतच ते मला भेटले, आणि मग माझें असें कौतुक झालें कीं मी जणुं कांहीं लढाईच मारून आलों होतों!

# ३

# थिऑसॉफी

मी दहा वर्षांचा होतों तेव्हां आम्ही एका नव्या आणि खूप प्रशस्त घरांत राहावयास गेलों. वडिलांनीं त्या घराचें नांव "आनंद भवन" असें ठेवलें होतें. घराभोंवतीं खूप विस्तीर्ण उद्यान होतें. आणि पोहण्यासाठीं तलावहि होता. तेथें मला एकसारखे नवेनवे शोध लागत असल्यामुळें माझ्या उत्साहाला अगदीं भरती आली होती. आणखी कांहीं इमारती जोडण्यांत येत होत्या. त्यामुळें खूपसें खणण्या-बांधण्याचें काम चाललें होतें. काम करणाऱ्या मजुरांकडे लक्ष लावून पाहात बसण्यांत मला मजा वाटे.

घरांत प्रशस्त असा पोहण्याचा तलाव होता. मी लवकरच पोहण्यास शिकलों. पाण्यांत वरवर हात मारणें अगर पाण्याखालीं बुडून पोहणें माझ्या चांगलें अंगवळणीं पडलें होतें. कंटाळवाण्या उकाड्याच्या दिवसांत वाटेल तेव्हां आणि वाटेल तितक्या वेळां मी पाण्यांत डुंबत असें. सायंकाळीं वडिलांचे पुष्कळ मित्र तलावावर येत. तलाव म्हणजे नवलपरीची गोष्ट होती आणि तलावावर व खुद्द घरांत विजेचे दिवे घेतले होते तेहि अलाहाबादेंत अपूर्वाईचेच समजले जात. पोहणारांचा तांडा आला कीं मला फारच आनंद होई आणि पोहतां येत नसलेल्यांना पाण्यांत ढकलण्यांत आणि ओढण्यांत जी काय गंमत होती ती मुळीं औरच! डॉ. तेजबहादुर सप्रू त्या वेळीं नव्यानेंच अलाहाबादेंत वकिली करूं लागले होते, त्यांची मला चांगलीच आठवण आहे. त्यांना मुळींच पोहतां येत नसे व पोहणें शिकण्याची त्यांची इच्छाहि नव्हती. पहिल्या पायरीवर पंधरा इंच पाण्यांत ते बसून राहत. दुसऱ्या पायरीवर जाण्यालाही ते तयार व्हायचे नाहींत आणि कोणी ओढूं लागला तर मोठमोठ्यानें ओरडायचे. माझ्या वडिलांचें पोहणेंहि यथायथाच होतें. परंतु दांतओठ आंवळून मोठ्या प्रचंड प्रयासानें तलावाची एक बाजू ते पुरी करीत असत.

त्या वेळीं बोअर-युद्ध चालू होतें त्याची मला गोडी लागली. माझी सर्व सहानुभूति बोअर लोकांच्या बाजूस होती. लढाईचें वर्तमान कळावें म्हणून मी वृत्तपत्रें वाचूं लागलों. तथापि एका घरगुती गोष्टींत माझें चित्त रंगून गेलें होतें. मला एक बहीण झाली. प्रत्येकाला बहीण-भाऊ असतांना मला मात्र ते नसावेत याचें मला मनांतून फार वाईट वाटे. आतां आपल्याला एक तरी भाऊ अगर बहीण सत्तेची अशी मिळणार ह्या विचारानें माझा आनंद गगनांत मावेना. वडील त्या वेळीं युरोपांत होते. व्हरांड्यांत उत्कंठेनें मी वाट पाहत उभा राहिलों होतों,

त्याची मला चांगली आठवण आहे. डॉक्टरांनीं मला ही बातमी सांगितली आणि बहुधा विनोदानेंच ते म्हणाले कीं मुलगा झाला नाहीं हें बरें झालें; त्यानें मिळकतींतला वांटा मागितला असता. असले अभद्र विचार माझ्या मनांत येण्याइतका मी कोत्या बुद्धीचा आहें असें एकायाला वाटावें, ही गोष्ट माझ्या मनाला फार लागून राहिली आणि मला डॉक्टरांचा राग आला.

वडिलांच्या युरोपच्या प्रवासामुळें हिंदुस्थानांतल्या काश्मीरी ब्राह्मण समाजांत खळबळ उडाली. परत आल्यावर प्रायश्चित्त घेण्यास ते तयार होईनात. कांहीं वर्षांपूर्वीच पंडित बिशन नारायण धार नांवाचे काश्मीरी ब्राह्मण बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठीं विलायतेस गेले होते. हे पुढें कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. ते हिंदुस्थानांत आल्यावर जातींतल्या पुराणप्रिय लोकांनीं त्यांच्यावर ग्रामण्य पुकारलें व त्यांस बहिष्कृत केलें. तरी त्यांनीं प्रायश्चित्तविधि उरकला होता. ह्या प्रकारामुळें जातींत साधारणपणें समान तोलाचे दोन तट पडले. पुष्कळ काश्मीरी तरुण नंतर युरोपांत अभ्यासासाठीं गेले आणि परतल्यावर सुधारकांच्या गटांत सामील झाले. पण असे लोकहि मामुली प्रायश्चित्त घेतल्याशिवाय राहत नसत. हा विधि म्हणजे एक ढोंग होतें आणि त्यांत धर्माचा काडीइतकाहि संबंध नव्हता. समाजाच्या मताला बाह्यात्कारी मान्यता दर्शविण्याचा तो प्रकार होता. एकदां प्रायश्चित्त उरकलें कीं मग हवे तसे आचार-व्यवहार करण्यास, अब्राह्मणांत व अहिंदूंत मिसळण्यास व त्यांच्याबरोबर जेवण्यास शुद्धीकृताला मोकळीक असे.

माझे वडील आणखी एक पाऊल पुढें गेले आणि ह्या बाह्यात्कारी आणि मामुली शुद्धीकरणाच्या प्रकारापुढें कोणत्याहि प्रकारें मान तुकवावयाची नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. वातावरण खूपच गरम झालें. त्याचें मुख्य कारण म्हणजे वडिलांची च्वढेलपणाची व बेपर्वाईची वृत्ति. अखेरीस पुष्कळसे काश्मीरी लोक वडिलांच्या गोटांत येऊन मिळाले आणि तिसराच एक तट पडला. कांहीं वर्षांच्या अवधींत कल्पना बदलत गेल्यामुळें आणि जुने निर्बंध शिथिल झाल्यामुळें हे भिन्नभिन्न पक्ष एकमेकांत विलीन झाले. अनेक काश्मीरी तरुण-तरुणींनीं अभ्यासासाठीं युरोप-अमेरिकेंत प्रवास केला आहे; पण परत आल्यावर प्रायश्चित्त घेण्याचा प्रश्न आतां कोणीच काढीत नाहीं. खाण्यापिण्यांतले विधिनिषेध पार लयाला गेले आहेत. थोडे कांहीं उरले आहेत ते मूठभर जुन्या लोकांत आणि त्यांतल्या त्यांत म्हाताऱ्या बायकांत. आतां काश्मीरी ब्राह्मणांव्यतिरिक्त लोकांशीं, मुसलमानांशीं, हिंदीतर लोकांशींहि सर्रास सहभोजन होतें. इतर लोकांशीं वागतांनासुद्धां काश्मीरी लोक आतां पडदा वगैरे पाळीत नाहींत. १९३० सालच्या राजकीय चळवळीच्या धक्क्यानें तर हें जुनें वळण पार कोलमडून पडलें. आंतरजातीय लग्नें मात्र अजून झालेलीं नाहींत. तथापि तीं अधिकाधिक प्रमाणांत होत आहेत. माझ्या एकाहि बहिणीचे पति काश्मीरी नाहींत; आमच्या कुटुंबांतील एका तरुणानें तर नुकताच एका हंगेरिअन मुलीशीं विवाह केला आहे. आन्तर-

जातीय विवाहाला विरोध होतो त्याचें कारण धार्मिक नाहीं, तें वांशिक कारण आहे. काश्मीरी लोकांची अशी इच्छा असते कीं आपल्या जातीचे विशेष गुण जतन व्हावेत, आपल्या नाकाडोळ्यांची विशिष्ट आर्य ठेवण बिघडूं नये. हिंदी जनतेच्या सागरांत आपण मिसळलों, तर हें सर्व नष्ट होईल अशी त्यांना धास्ती वाटते.

मी ११ वर्षांचा असतांना माझ्यासाठीं एका नव्या शिक्षकांची योजना झाली. त्यांचें नांव फर्डिनंड टी. ब्रुक्स्. त्यांच्या हवालीं मला करण्यांत आलें. त्यांचे वडील आयरिश होते आणि त्यांची आई फ्रेंच अथवा बेल्जियम होती. ते निष्ठावन्त थिऑसॉफिस्ट होते. बेझंटबाईंनीं त्यांची शिफारस माझ्या वडिलांकडे केली. ते जवळजवळ तीन वर्षें आमच्यापाशीं राहिले. त्यांची माझ्यावर बरीच छाप पडली. माझे त्या वेळचे दुसरे शिक्षक म्हणजे मला हिंदी व संस्कृत शिकवणारे पंडित. बिचारा म्हातारा मला शिकवण्याचा खूप प्रयत्न करी. पण कित्येक वर्षें मेहनत घेऊनहि माझ्या पदरीं त्याला फारसें ज्ञान बांधतां आलें नाहीं. मला प्राप्त झालेलें ज्ञान इतकें अल्प होतें कीं हॅरो विद्यालयांत आत्मसात् केलेल्या अकटोविकट लॅटिन भाषेच्या ज्ञानाशींच माझ्या संस्कृत ज्ञानाची तुलना करतां येईल! दोष माझाच होता हे निःसंशय. भाषा मला चटकन् येत नाहींत आणि व्याकारण तर मला दृष्टीसमोर नको.

एफ्. टी. ब्रुक्स्च्या सहवासानें मला वाचनाची गोडी लागली, आणि मीं किती तरी इंग्लिश पुस्तकें वाचून काढलीं. अर्थात् त्या वाचनांत विशिष्ट हेतु असा कांहीं नव्हता. बालवाङ्मयांत आणि मुलांच्या वाङ्मयांत माझी बरीच प्रगति झाली. लुई करोलचीं पुस्तकें मला भारी आवडत. "जंगल् बुक्" आणि "किम्" ह्या पुस्तकांचेंहि, तसेंच डॉन क्विक्झोटमधलीं गुस्ताव डोरेचीं चित्रें मला फार पसंत पडलीं आणि नान्सेनच्या 'फार्देस्ट नॉर्थ' ह्या पुस्तकामुळें मला नवीन दुनिया पाहावयास सांपडली. स्कॉट, डिकन्स्, थॅकरे वगैरेंच्या कितीतरी कादंबऱ्या आणि एच्. जी. वेल्स्च्या अद्भुत कथा मीं वाचल्याचें स्मरतें. मार्क् ट्वेन व शर्लाक होम्स्च्या गोष्टीहि मीं वाचल्या होत्या. "झेंडा तुरुंगांतील बन्दी" ह्या पुस्तकानें मला चटका लावला. जेरोम के. जेरोम चें 'थ्री मेन इन ए बोट' हें पुस्तक म्हणजे विनोदाचा अत्युत्कृष्ट नमुना असें मला वाटत असे. दु मोरिअरचें "ट्रिल्बी"व 'पीटर इबेटसन्' हीं पुस्तकेंहि मला चांगलीं आठवतात. काव्याची आवडहि माझ्यांत निर्माण झाली आणि ती आवड माझ्यांत बरेच बदल झाले असले, तरी अद्यापीहि थोड्या फार प्रमाणांत टिकून राहिली आहे.

विज्ञानशास्त्राचें दारहि ब्रुक्समुळें थोडें किलकिलें झालें. एक छोटीशी रसायनशाळा आम्हीं उभारली. तेथें पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्रांतले प्राथमिक प्रयोग करण्यांत माझा कितीतरी वेळ मोठ्या आनंदांत जात असे.

एफ्. टी. ब्रुक्स् यांनीं माझ्यावर एका नवीनच विचारसरणीची छाप बसविली व तिचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. ही विचारसरणी म्हणजे थिऑ-

सॉफी. त्यांच्या खोलींत दर आठवड्याला थिऑसॉफिस्टांच्या सभा भरत त्यांना मी हजर राहत असें. हळूहळू थिऑसॉफिस्टांचे वाक्प्रचार आणि कल्पना मीं उचलल्या. तेथें वेदान्त विषय निघे; पुनर्जन्म, स्वर्गीय आणि अपार्थिव देह, तेजोवलयें व कर्मसिद्धांत यांचेबद्दल वादविवाद होत. मॅडम ब्लॅव्हॅटस्की व इतर थिऑसॉफिस्टांच्या महान् ग्रंथांचा व त्याचबरोबर बुद्धधर्मीयांच्या धम्मपदांचा, पायथॅगोरस, अपलोनिअस, त्याना वगैरे तत्त्ववेत्त्यांच्या व गूढवाद्यांच्या ग्रंथांचाहि उल्लेख होई. चर्चेपैकीं पुष्कळसा भाग मला समजत नसे. पण बोलणें असें कांहीं गूढतेनें भरलेलें आणि आकर्षक वाटे कीं जगांतील सर्व कोड्यांचा उलगडा येथें सांपडणार आहे अशी कल्पना होई! त्याच काळीं धर्म आणि स्वर्लोक वगैरे गोष्टींचा बुद्धिपुरःसर आणि जाणतेपणानें मी प्रथम विचार करूं लागलों. विशेषतः हिंदुधर्माविषयींची माझी पूज्यबुद्धि फार वाढली; म्हणजे त्यांतल्या कर्मकांडाच्या अथवा याज्ञिकीच्या सोहळ्याबद्दल नव्हे, तर उपनिषदें आणि भगवद्गीता यांसारख्या श्रेष्ठ ग्रंथांबद्दलचा आदरभाव वाढला. त्यांतलीं तत्त्वें मला ग्रहण करतां आलीं नाहींत, तरी तीं मोठीं भव्य अशीं वाटत. स्वर्गीय देहासंबंधीं मला स्वप्नें पडत आणि अंतराळांतून दूरपर्यंत मी उडत चाललों आहें असा भास होई. ( कोणतेंहि साधन न वापरतां ) हवेंत उंच उडत राहण्याचीं स्वप्नें मला खूप वेळां पडलेलीं आहेत. कधीं कधीं तर तीं कमालीचीं वास्तविक आणि तपशीलवार अशीं असतात आणि भूभागाचा विस्तीर्ण चित्रपट माझ्या पायाखालीं पसरलेला दिसतो. फ्रॉइड् वगैरे आधुनिक स्वप्नवेत्ते या स्वप्नांचा काय अर्थ करतील कोण जाणे?

त्या वेळीं बेझंटबाई अलाहाबादला आल्या होत्या, त्यांनीं थिऑसॉफीवर अनेक व्याख्यानें दिलीं. त्यांच्या वक्तृत्वानें मी मंत्रमुग्ध बनून गेलों. त्यांच्या व्याख्यानाहून परत येतांना स्वप्नसृष्टींत वावरत असल्याचा अथवा मति गुंग झाल्याचा भास व्हावा. मी केवळ तेराच वर्षांचा होतों; पण थिऑसॉफिकल सोसायटीला मिळण्याचा मीं निश्चय केला. मी वडिलांकडे गेलों तेव्हां त्यांनींहि हंसत हंसत परवानगी दिली. कोणत्याच प्रकारें त्यांना त्या विषयाचें महत्त्व वाटत नव्हतेंसें दिसलें. या त्यांच्या अनास्थेची मला जरा चीडच आली. माझ्या मतें ते अनेक परींनीं थोर असले, तरी अध्यात्मप्रवणतेची त्यांच्यांत जरा वाणच होती असें मला वाटलें. वस्तुस्थिति अशी होती, कीं ते स्वतःच एका काळीं थिऑसॉफिस्ट होते. ब्लॅव्हॅटस्कीबाई हिंदुस्थानांत आल्या, तेव्हां त्यांनीं तो पंथ स्वीकारला. धर्मजिज्ञासेपेक्षां केवळ कुतूहलामुळें ते त्या पंथांत शिरले असावेत. लवकरच त्यांतून ते मोकळे झाले. त्यांच्याबरोबरच दीक्षा घेतलेल्या त्यांच्या मित्रांपैकीं जे कांहींजण तसेच चिकटून राहिले, त्यांना पंथांतल्या आध्यात्मिक अधिकाराच्या फार उंच उंच पदव्या पुढें प्राप्त झाल्या.

अशा प्रकारें तेराव्या वर्षीं मी थिऑसॉफिकल सोसायटीचा सभासद झालों, आणि मला दीक्षा दिली ती खुद्द बेझंटबाईंनीं. त्या प्रसंगीं त्यांनीं मला चांगला उपदेश

केला आणि कांहीं गूढ चिन्हें समजावून सांगितलीं. हीं चिन्हें म्हणजे फ्री मेसनरी पंथाचे अवशेष असावेत. त्या वेळीं मी आनंदानें फुलून गेलों होतों. बनारसच्या थिऑसॉफिकल परिषदेला मी हजर राहिलों व वृद्ध कर्नल अल्कॉट यांना पाहिलें. त्यांची दाढी फार रुबाबदार दिसत असे.

तीस वर्षांपूर्वी वयाच्या तेराव्या वर्षी आपण कसे दिसत होतों अथवा आपण कसला विचार करीत होतों तें आतां आकलन करणें फार अवघड काम आहे. तथापि थिऑसॉफिस्ट पंथाच्या स्त्रीपुरुष अनुयायांच्या चेहऱ्यावर ( त्या वेळीं तरी ) आढळून येणारी व भक्तीची निदर्शक मानण्यांत येणारी भावशून्यता आणि नीरसता माझ्याहि चेहऱ्यावर त्या काळीं उमटलेली होती असें मला आठवतें. जगांतील वेचक लोकांपैकीं मी एक आहें अशा ऐटींतच मी रहात असे; तेव्हां माझ्या बरोबरीच्या मुलांमुलींना माझा सहवास नकोसा झाला असला, तर त्यांत नवल नाहीं.

एफ्. टी. ब्रुक्स् यांचें आमच्याकडील राहणें संपलें व माझा थिऑसॉफीशीं येणारा संबंधहि तुटला; आणि फारच थोड्या अवधींत माझ्या आयुष्यक्रमाशीं थिऑसॉफीचा कांहींहि संबंध राहिला नाहीं. तथापि एक गोष्ट निःसंशय घडून आली ती ही, कीं ब्रुक्स् यांच्या सहवासाचा माझ्यावर खोल ठसा उमटला. त्यांनीं आणि थिऑसॉफीनें मला उपकृत केलें आहे. तथापि थिऑसॉफिस्टांविषयीं मला वाटणारा आदर तेव्हांपासून मावळत चालला आहे असें मला वाटतें. थिऑसॉफिस्ट म्हणजे वेचक दाणे नव्हत, ते अगदीं सामान्य जन आहेत. जीव धोक्यांत घालण्यापेक्षां सभाळून राहावें, हुतात्मे होण्यापेक्षां संपत्तीच्या उबेला असावें अशी त्यांची वृत्ति दिसून येते. बेझंटबाईबद्दल मात्र मला फारच आदर वाटे.

त्यानंतर माझ्या मनावर रुसो–जपानी युद्धाचा परिणाम झालेला मला आठवतो. जपान्यांच्या विजयामुळें माझ्या उत्साहाला भरती चढली. नव्या बातम्या वाचावयास मिळाव्यात म्हणून मी वृत्तपत्रांची उत्सुकतेनें वाट पाहत बसें. जपानसंबंधीं अनेक पुस्तकें मीं विकत घेतलीं आणि त्यांतलीं कांहीं वाचून काढलीं. जपानचा इतिहास वाचतांना जरा वाट चुकल्यासारखें होऊन त्यांचा सर्व संदर्भ नीटसा लागला नाहीं. परंतु पूर्वकालीन जपानी शिलेदारांचे पराक्रम मला आवडले.

राष्ट्राभिमानाच्या विचारांनीं माझें अन्तःकरण भरून येऊन हिंदुस्थान आणि आशियाखंड युरोपच्या दास्यशृंखलांतून कसे मुक्त होतील या विचारांचें चक्र डोक्यांत फिरूं लागलें. वीरोचित कामें मी करीत आहें, हातांत तलवार घेऊन मी हिंदुस्थान-साठीं लढत आहें, त्याला मुक्त करीत आहें, अशीं स्वप्नें पडूं लागलीं.

मला चौदावें वर्ष लागलें. घरांत अदलाबदल चालली होती. माझीं वडील चुलत भावंडें उद्योगधंद्याला लागल्यामुळें मूळ घर सोडून बाहेर पडत होतीं आणि आपलीं निराळीं बिऱ्हाडें थाटीत होतीं. कांहीं नवे विचार आणि अंधुक कल्पना माझ्या डोक्यांत तरंगूं लागल्या होत्या आणि स्त्रियांविषयीं निराळे भाव मनांत

उद्भवत होते. अद्यापि मुलांबरोबरच मी खेळत संवरत असें. मुलींबरोबर मिसळणें मला जरा कमीपणाचेंच वाटे; परंतु समारंभाच्या निमित्तानें काश्मीरी समाजांत दुर्मीळ नसलेल्या सुंदर मुली एकत्र झाल्या म्हणजे असे प्रसंग येत, कीं एकाद्या कटाक्षानें अगर निसटत्या स्पर्शानें माझें शरीर लहरून जाई.

१९०५ च्या मे महिन्यांत मी पंधरा वर्षांचा असतांना आम्ही इंग्लंडला जाण्यासाठीं निघालों. माझे वडील, आई, छोटी बहीण, आणि मी, सगळींच आम्ही इंग्लंडला चाललों होतों.

# ४

## हॅरो आणि केंब्रिज

मे महिन्याच्या अखेरीला एके दिवशीं आम्ही लंडनला दाखल झालों. डोव्हरहून निघालेल्या आगगाडींतच आम्हांला सुशिमा येथें जपाननें मिळवलेल्या नाविक विजयाची हकिगत समजली. त्यामुळें मी अगदीं खुषींत होतों. दुसऱ्याच दिवशीं डर्बी शर्यत होती. आम्ही सर्वच शर्यतीला गेलों. लंडनला पोंचल्यावर लगेच आम्हांला एम्. ए. अन्सारी भेटल्याचें मला आठवतें. हुशार आणि तरतरीत विद्यार्थी म्हणून त्यांनीं लौकिक मिळवला होता, व उत्तम प्रकारचें विश्वविद्यालयीन यशहि त्यांनीं संपादन केलें होतें. लंडनमधील रुग्णालयांत त्या वेळीं ते हाउस सर्जन म्हणून काम करीत असत.

सुदैवानें मला हॅरो येथील विद्यालयांत प्रवेश मिळाला. माझें वय पंधरा वर्षांचें, म्हणजे तेथें प्रवेश मिळण्यास लागणाऱ्या वयापेक्षां थोडें अधिक होतें. बाकीची मंडळी युरोपमध्यें गेली आणि कांहीं महिन्यांनीं हिंदुस्थानकडे परतली.

परकी मंडळींत पूर्वी मी एकटा असा कधींच राहिलों नव्हतों. त्यामुळें मला अगदीं एकलकोंडें वाटूं लागलें व घरची आठवण येऊं लागली. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. शालेय जीवनाशीं समरस होण्याचा मीं प्रयत्न केला. काम आणि खेळ यांच्यांत माझा वेळ जाऊं लागला. पण पूर्णपणें समरस होणें मला कधींच जमलें नाहीं. मीं त्यांच्यापैकीं नाहीं असें मला नेहमीं वाटत राही. त्यांनाहि तसेंच वाटत असावें. त्यामुळें मी दूरदूरच असें. परंतु खेळांत मात्र मी मनःपूर्वक भाग घेत असें. त्यांत मी फारसा चमकलों नसलों, तरी मी चुकारपणा करीत नाहीं याविषयीं इतरांची खात्री होती.

सुरुवातीला मला खालच्या वर्गांत बसविण्यांत आलें. कारण माझें लॅटिन बरेंच कच्चें होतें. पण लवकरच मी वरच्या वर्गांत गेलों. कित्येक विषयांत आणि विशेषतः सर्वसामान्य ज्ञानांत माझ्या वयाच्या मुलांपेक्षां मी पुष्कळच पुढें होतों. माझ्या आवडीचें क्षेत्र खात्रीनेंच विस्तृत होतें आणि माझ्या बरोबरीच्या बहुतेक विद्यार्थ्यां-पेक्षां मी अधिक पुस्तकें आणि वृत्तपत्रें वाचीत असें. इंग्रज मुलें अगदीं मठ्ठ आहेत, त्यांना आपल्या खेळांव्यतिरिक्त इतर कांहीं बोलण्याचें सुचत नाहीं असें मीं वडिलांना लिहून कळवल्याचें मला स्मरतें. परंतु मी जसजसा वरच्या वर्गांत गेलों, तसतसे मला अपवाद आढळून येऊं लागले.

फुगून गेलों होतों. बालपणाच्या शृंखला गळून पडल्या होत्या. 'जाणता' या सदरांत मी आतां हक्कानें मोडणार होतों. या नव्या जाणीवेनें उत्पन्न होणाऱ्या अर्धवट धीटपणाच्या आणि अर्धवट लाजाळूपणाच्या संमिश्र भावना, मी केंब्रिजच्या अरुंद रस्त्यांतून अथवा प्रशस्त प्रांगणांतून फिरत असतां माझ्या मनांत वागत असत. कोणी ओळखीचें माणूस भेटलें कीं मला आनंद होई.

तीन वर्षे मीं केंब्रिज येथें काढिलीं. कॅम नदीच्या ओघाप्रमाणेच तीं बिन-भानगडीचीं वर्षे संथपणें संपून गेलीं. मोठा सुखाचा काळ होता तो! चार मित्र, थोडकेसें काम आणि थोडकासा खेळ. बौद्धिक क्षितिज हळूहळू विस्तीर्ण होत चाललें होतें. माझे विषय रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, आणि भूस्तरशास्त्र असे होते व मला त्या विषयांची पदवीहि मिळाली. परंतु माझा व्याप त्या विषयांपुरताच मर्यादित नव्हता. केंब्रिजला अथवा सुटींत लंडनमध्यें अगर इतरत्र मला जे लोक भेटत ते वाङ्मय, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र वगैरे विषयांवर अधिकारवाणीनें चर्चा करीत. या उच्च वातावरणांत मी प्रथम जरा गोंधळून जात असें. पण मीं कांहीं पुस्तकें वाचलीं आणि मग त्यांच्या भाषणांतील मख्खी माझ्या ध्यनांत येऊं लागली. मीं गडबडून जाईनासा झालों. या नेहमींच्या विषयावर बोलणीं सुरू झालीं कीं माझें अज्ञान फारसें उघडकीस येत . आम्ही नित्शे, (केंब्रिजमध्यें नित्शे त्या वेळीं अगदीं प्यारा होता) बर्नार्ड शॉच्या नव्या प्रस्तावना, आणि डिकिन्सनचा अगदीं ताजा ग्रंथ यांसंबंधीं बहुधा बोलत असूं. आम्ही स्वतःला मोठे विवादपटु मनीत होतों आणि इव्हान ब्लॉक, हॅव्लॉक् एलिस्, एबिंग् वगैरेंचीं नांवें जातां जातां उच्चारून नीति व कामवासना यांच्यासंबंधीं मोठ्या उच्च भूमिकेवरून आमचीं बोलणीं चालत. तज्ज्ञां-व्यतिरिक्त इतर माणसांना या विषयांसंबंधीं जेवढें ज्ञान असावयास पाहिजे, तेवढें सर्व आपणांस झालेलें आहे अशी आमची कल्पना होती.

खरी स्थिति अशी होती कीं वरवर आम्ही बेडरपणें बोलत असलों, तरी लैंगिक प्रश्न उपस्थित झाला कीं आमचीं मनें कचरतच असत. निदान माझी तरी अशी स्थिति होत असे आणि केंब्रिज सोडल्यानंतर बराच काळपर्यंत म्हणजे आणखी किती तरी वर्षे माझें या विषयासंबंधाचें ज्ञान पुस्तकी स्वरूपाचेंच होतें. असें कां होत असे तें सांगणें कठिण आहे. स्त्रियांकडे आमचीं बहुतेकांचीं मनें खेंचलीं जात आणि त्यांत कांहीं पाप आहे असें कोणाचें मत होतें असें मला मुळींच वाटत नाहीं. मला तरी त्यांत पाप वाटत नसे. धार्मिक निर्बंधांचाहि अडथळा नव्हता. कामोपभोग हा नैतिकहि नाहीं आणि अनैतिकहि नाहीं, तर तो नीतिनिरपेक्ष आहे असें आम्ही म्हणत असूं. असें असूनहि एक प्रकारच्या शरमेमुळें त्यापासून मी दूर राहात होतों. वासनापूर्तीसाठीं जे उपाय अमलांत आणण्यांत येत, त्यांचीहि मनाला किळस येई. माझ्या एकाकी बालपणामुळें असेल कदाचित्. पण मीं त्या काळीं फार लाजाळू होतों हें निःसंशय.

माझा आयुष्याकडे पाहण्याचा त्या वेळचा दृष्टिकोण अस्पष्ट अशा सुखवादाचा होता. सुखवाद मीं पत्करला याचें अंशतः कारण असें कीं तो तारुण्यसुलभ आहे; शिवाय ऑस्कर वाइल्ड आणि वॉल्टर पेटर यांची मनावर छाप पडल्यामुळेंहि तो ग्राह्य वाटला असावा. विलासी जीवनाच्या आणि सुखानुभवाच्या इच्छेला जाडेंजुडें नांव देणें सोपें असतें, आणि त्यामुळें मनाला समाधानहि वाटतें. पण याहून खोल अशी कांहीं तरी मनोभावना सुखवादामुळें पूर्ण होत असावी; कारण बेट्या विलासी जीवनासाठीं मी हपापलेला नव्हतों. वृत्ति धार्मिक नसल्यामुळें आणि धर्माचे जाचक निर्बंध कधींच पटत नसल्यामुळें दुसरें कांहीं तरी मूल्यमापनाचें साधन शोधणें जरूर झालें होतें. मी अगदीं उथळ वृत्तीचा झालों होतों. कशाचाहि सावंत विचार करीत नसें. त्यामुळें जीवनाच्या कलामय बाजूकडे मी आकर्षिला गेलों. आपल्या प्रतिष्ठेला शोभेल अशा रीतीनें आपण जगांत रहावें, असंस्कृत रानवटाप्रमाणें उपभोगांत दंग होऊं नये, पण जीवनापासून मिळणारी मधु यावच्छक्य चाखीत अनेक प्रकारांनीं विनटलेलें जीवन व्यतीत करावें हें मला पसंत पडलें. मी जीवनाचा आनंद लुटीत होतों. आनंद लुटणें हें पाप आहे असें मानावयास मी तयार नव्हतों. त्याचबरोबर धाडसा-साहसाच्या कामाचाहि मला फार मोह पडत असे. वडिलांची बेदरकार वृत्ति माझ्यांतहि उतरली होती. प्रथम पैशाचे खेळ केले; मग उच्चतर ध्येयासाठीं जीवनच पणाला लावलें! १९०७-८ सालीं हिंदी राजकारणांत अपूर्व घडामोडी होत होत्या आणि त्यांत आपण वीरोचित भाग घ्यावा असें मनांत येई. अशा आयुष्यांत विलासपूर्ण आयुष्य मिळण्याचा संभव फार थोडा होता. संमिश्र व संकीर्ण इच्छांच्या प्रादुर्भावामुळें माझ्या डोक्यांत विचारांची गल्लत झाली. विचारसृष्टि सर्वच अस्पष्ट, व गुंतागुंतीची झाली होती. पण कोणता तरी एक ठाम निश्चय करण्यास अद्यापि अवकाश असल्यामुळें मीं जिवाला त्रास करून घेतला नाहीं. चालली घडी शारीरिक आणि बौद्धिक दृष्ट्या सुखाची होती, दृष्टिक्षेप टाकावा तों नवी नवी सृष्टि नजरेला पडत होती. करावयाच्या कामाचा पर्वत पडला होता, किती तरी पाहावयाचें बाकी होतें, किती तरी नवे मार्ग हुडकायचे राहिले होते. थंडीच्या दिवसांतला लांबलचक संध्याकाळचा वेळ शेगडीशेजारीं बसून संथपणें बोलण्यांत आणि चर्चा करण्यांत निघून जाई, आणि हा प्रकार खूप रात्र होईपर्यंत म्हणजे कोळसे विझून थंडीनें अंग अगदीं कुडकुडूं लागेपर्यंत चालू असे. कधीं कधीं चर्चा रंगली, कीं आवाजांची नेहमींची पट्टी सुटून आवेशाच्या भरांत ते तार सप्तकापर्यंत चढत जात. पण तो सर्व लुटुपुटीचा खेळ होता. जीवनांतील प्रसंगांशीं लटक्याच गांभीर्यानें आम्ही झटापटी करीत होतों; कारण आमच्या आयुष्यक्रमाशीं अजून त्यांचा साक्षात् संबंध पोंचत नव्हता, आणि जगांतल्या व्यवहारांच्या विवर्तांत आम्ही अद्यापि गवसलों नव्हतों. महायुद्धापूर्वीचा, विसाव्या शतकाचा तो प्रारंभकाल होता. तें जग लवकर राम म्हणणार होतें व त्याच्या जागीं

मृत्यु, विनाश, चिंता, नैराश्य यांमुळें जगांतल्या तरुणांना दुःखमय वाटेल अशा नव्या सृष्टीचा विस्तार पसरणार होता. परंतु भविष्यकाळाच्या पडद्यानें तें चित्र झांकलें गेलें होतें. हमखास उत्कर्ष पावणारी वस्तुरचनाच आम्हांला आमच्याभोंवतीं दिसून येत होती. ज्यांना ती परवडत होती, त्यांना त्यांत सौख्यच लाभत होतें.

१९०७ च्या नंतर कित्येक वर्षें असंतोषानें व चळवळींनीं हिंदुस्थानचें वातावरण कढत होतें. १८५७ च्या बंडानंतर इतक्या वर्षांनीं प्रथमच हिंदुस्थानची लढाऊ वृत्ति प्रकट झाली. टिळकांची कामगिरी व त्यांना झालेली अटक, अरविंद घोषांची अटक, बंगालमधील जनतेनें स्वदेशी व बहिष्काराचें स्वीकारलेलें व्रत वगैरे बातम्यांमुळें इंग्लंडांतील हिंदी लोकांत चैतन्य संचरत होतें. आम्ही बहुतेक झाडून सारेजण टिळकपक्षीय अथवा त्यावेळच्या हिंदुस्थानांतील प्रचलित शब्दांत बोलावयाचें म्हणजे " जहाल " होतों.

केंब्रिजमधल्या हिंदी लोकांचें " मजलिस " म्हणून एक मंडळ होतें. राजकीय विषयांची तेथें नेहमीं चर्चा होई. पण तेथें जे वादविवाद होत, त्यांचा संबंध प्रत्यक्ष परिस्थितीशीं थोडा असे. पार्लमेंटांतील आणि युनिव्हर्सिटी-युनिअनमधील बोलण्याची ढब आणि वक्तृत्वाचे प्रकार आपल्याला उचलतां यावेत यासाठींच मुख्यतः प्रयत्न होत असत. विषयाची छाननी करण्याचा हेतु फारसा नसावयाचा. मी मजलिसमध्यें अनेक वेळां जात असें. पण माझ्या तीन वर्षांच्या वास्तव्यांत मीं तेथें क्वचितच भाग घेतला असेल. लाजाळूपणा आणि घाबरटपणा मला कधींच घालवतां आला नाहीं. हीच अडचण कॉलेजांतील विवादसभांत माझा पाठपुरावा करीत असे. कॉलेजांतील विवादसभेचें नांव " दि मॅगपाय् अँड स्टंप " असें होतें. तिचा एक नियम असा होता कीं जो सभासद सबंध टर्ममध्यें एकदांहि भाषण करणार नाहीं, त्यानें दंड भरावा. असा दंड मीं पुष्कळदां भरला आहे !

" मजलिशींत " व खाजगी बोलण्यांत हिंदी विद्यार्थी राजकारणाचा विषय निघाला कीं नेहमींच जळजळीत भाषा वापरीत. बंगालमध्यें जे हिंसामय स्फोट होऊं लागले होते त्यांची ह्या विद्यार्थ्यांकडून प्रशंसाहि होत असे. नंतर हींच माणसें सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरलीं, हायकोर्टांत न्यायासनावर बसूं लागलीं, मोठ्या शांत आणि विवेकी वकिलांत त्यांची गणना होऊं लागली! या पर्यंकवीरांपैकीं फारच थोड्यांनीं नंतरच्या हिंदी राजकीय चळवळींत भाग घेतला.

त्या काळच्या प्रसिद्ध हिंदी पुढाऱ्यांपैकीं कांहीं केंब्रिजला भेट देऊन गेले. आम्ही त्यांच्याबद्दल पूज्यभाव दर्शवीत असलों, तरी आमच्या वागण्यांत थोडी वरचढपणाची झांक राहत असे. आमची संस्कृति अधिक व्यापक आणि आमचा दृष्टिकोण अधिक विशाल आहे अशी आमची समजूत होती. बिपिनचंद्र पाल, लजपतराय आणि गो. कृ. गोखले यांनीं आम्हांला भेटी दिल्या. आमच्या बैठकीच्या खोलींतच बिपिनचंद्र पालांची मुलाखत झाली. आमच्यापैकीं दहाबाराजणच तेथें उपस्थित



पिता-पुत्र

होते; पण पालबाबू असे गर्जत राहिले कीं जणुं कांहीं दहा हजार श्रोत्यांची जाहीर सभा त्यांच्यापुढें बसली आहे ! आवाज इतका घुमत होता कीं ते काय म्हणताहेत ते मला समजणें मुष्कील झालें. लालाजींनीं पुष्कळच हलक्या आवाजांत भाषण केलें आणि माझ्या मनावर त्यांच्या बोलण्याचा परिणाम झाला. विपिनबाबूंपेक्षां मला लालाजींचें भाषण पसंत पडलें असें मीं वडिलांना कळवलें आणि त्या वेळच्या बंगाली ज्वलज्जहाल बाबूंविषयीं वडिलांना विशेष प्रेम वाटत नसल्यामुळे त्यांनाहि माझें लिहिणें आवडलें असावें. गोखल्यांनीं केंब्रिज येथें जाहीर सभेत भाषण केलें, पण मला त्या सभेच्या प्रसंगापैकीं ए. एम्. ख्वाजा यांनीं सरतेशेवटीं विचारलेल्या प्रश्नांचीच तेवढी आठवण राहिलेली आहे. ख्वाजा श्रोतृसमुदायांतून उठून उभे राहिले आणि त्यांनीं आपला न संपणारा प्रश्न मांडण्यास सुरुवात केली. प्रश्न इतका वेळ चालू राहिला, कीं शेवटीं त्याचा प्रारंभ कसा झाला आणि तो कशासंबंधीं आहे तेहि आम्ही बहुतेकजण विसरून गेलों !

हिंदी विद्यार्थीवर्गांत हरदयाळांचें नांव प्रसिद्ध होतें. पण मी केंब्रिजला जाण्यापूर्वींच त्यांचा ऑक्स्फर्ड येथील अभ्यासक्रम सुरू झाला होता. हॅरो येथें शिकत असतांना मी त्यांना लंडन येथें सुटींत एकदोनदां भेटलों होतों.

कांग्रेसच्या भावी राजकारणांत ज्यांनीं पुढें प्रामुख्यानें भाग घेतला, असे बरेचसे विद्यार्थी केंब्रिजमध्यें माझे समकालीन होते. मी केंब्रिजला गेल्यावर थोड्याच दिवसांनीं जे. एम्. सेनगुप्त यांनीं आपला तेथला शिक्षणक्रम संपविला. सैफुद्दिन किश्लू, सय्यद महमुद, आणि तसद्दुक महमद शेरवानी हे माझे समकालीन होत. सध्यांचे अलाहाबाद हायकोर्टाचे सरन्यायाधीश एस्. एम्. सुलेमान हेहि माझ्या वेळीं केंब्रिज येथें होते. इतर समकालीन मित्र आतां मंत्रिपदांवर व सिव्हिल सर्व्हिसमध्यें अधिकारपदांवर विराजत आहेत.

लंडनमध्यें असतांना श्यामजी कृष्णवर्मांचेसंबंधीं व त्यांच्या इंडिया हाउससंबंधीं बरेंच ऐकत होतों; पण त्यांची भेट कधींच घडली नाहीं. त्यांचें ‘ इंडियन सोशिऑलॉजिस्ट ’ हे पत्र मात्र केव्हां केव्हां वाचण्यांत येत असे. कित्येक वर्षांनंतर म्हणजे १९२६ मध्यें श्यामजी मला जिनीव्हांत भेटले. इंडियन सोशिऑलॉजिस्टच्या जुन्या प्रती तेव्हांहि त्यांच्या खिशांत कोंबलेल्या होत्याच ! जो कोणी हिंदी मनुष्य त्यांच्याजवळ येईल, तो ब्रिटिश सरकारनें पाठविलेला हेर आहे अशी कल्पना ते करून घेत असत !

लंडन येथें इंडिया आफिसच्या विद्यमानें उघडण्यांत आलेलें विद्यार्थ्यांचें एक केंद्र होतेंच. परंतु तीं हिंदी विद्यार्थ्यांवर बारीक लक्ष ठेवण्याची एक जागा आहे असें मानण्यांत येई; त्याला सबळ कारणेंहि होतीं. परंतु पुष्कळ हिंदी विद्यार्थ्यांना तेथें जाणें भागच झालें; कारण तेथल्या शिफारशीशिवाय कोणत्याहि विद्यालयांत प्रवेश मिळण्याचा पुढें पंचाईत पडूं लागला.

हिंदुस्थानांतील चढ्या राजकीय वातावरणामुळें माझ्या वडिलांना प्रत्यक्ष राजकारणांत अधिकाधिक भाग घ्यावा लागला, हें पाहून मला त्यांचें राजकारण मान्य नसलें तरीहि मनांतून बरें वाटलें. त्यांच्या ओळखीच्या मवाळांना ते जाऊन मिळाले. त्यांपैकीं बरेचसे त्यांच्या पेशांतलेच होते. संयुक्त प्रांतीय परिषदेचे ते अध्यक्ष झाले आणि बंगाल-महाराष्ट्रांतील जहालांवर त्यांनीं आग पाखडली. संयुक्त प्रांत काँग्रेस कमिटीचें अध्यक्षपद त्यांना मिळालें. १९०७ सालीं काँग्रेस मोडून मवाळांच्या एकजिनशी गटांत तिचें रूपांतर झालें, तेव्हां वडील सुरतेला हजर होते.

सुरतेच्या प्रसंगानंतर एच्. डब्ल्यू. नेव्हिनसन हे आमचे पाहुणे म्हणून कांहीं काळ अलाहाबादला उतरले होते. हिंदुस्थानवरील त्यांच्या पुस्तकांत माझ्या वडिलांचें वर्णन " औदार्याव्यतिरिक्त सर्व बाबतींत नेमस्त " असें केलेलें आहे. हें अगदीं चुकीचें वर्णन झालें; कारण वडील केवळ राजकारणांतच काय ते नेमस्त होते, आणि क्रमाक्रमानें त्यांच्या या विषयांतल्या नेमस्तपणाचाहि उच्छेद होत गेला. अतिशय भावनामय, विकारवश, गर्विष्ठ, आणि प्रबळ इच्छाशक्तीचे असे ते पुरुष होते. नेमस्ताला शोभणारे गुण ते हे नव्हत. इतकें असूनहि १९०७–८ सालांत ते मवाळांतले मवाळ होते यांत शंका नाहीं. त्यांना टिळकांबद्दल आदर असला, तरी ते जहालांवर अत्यंत कडक टीका करीत असत.

असें कां व्हावें? कायदेशास्त्र व सनदशीर मार्ग अंगीं मुरलेल्या त्यांच्यासारख्यानें कायदेपद्धती सनदशीर रस्ता पत्करावा हें स्वाभाविक दिसतें. कडक, जळजळीत शब्दांच्या मागें त्यांना साजेशा क्रियेचें पाठबळ नसेल, तर नुसतें बोलून कांहीं साधणार नाहीं असें त्यांची बुद्धि त्यांना सांगत असावी. परिणामकारक चळवळीचा पत्ता नव्हता. स्वदेशी व बहिष्कार फारसा फलप्रद होईल असें त्यांना वाटेना. आणि त्या चळवळींच्या बुडाशीं असणारा धर्माभिनिवेश त्यांच्या स्वभावाशीं विसंगत होता. पूर्वकालीन आर्यावर्ताचें पुनरुज्जीवन करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्या काळाबद्दल त्यांना दखल नव्हती, अभिमान वाटत नव्हता. जुन्या सामाजिक रूढी, जातिभेद वगैरे प्रकार तर त्यांना प्रतिगामी स्वरूपाचे वाटत आणि त्यांच्याबद्दल त्यांच्या मनांत पूर्ण तिटकारा वसत असे. आदर्श म्हणून ते पाश्चिमात्य देशांकडे पाहत, पाश्चात्यांची प्रगति पाहून ते आकर्षित होत; इंग्लंडच्या साहचर्यानेच आपलीहि प्रगति होईल अशी त्यांची कल्पना होती.

१९०७ सालांत हिंदुस्थानांतला राष्ट्राभिमान हा सामाजिक दृष्ट्या निःसंशयच प्रतिगामी असला, तरी इतर पौर्वात्य देशांतल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील राष्ट्राभिमानालाहि धार्मिक स्वरूप येणें अपरिहार्य होतें. नेमस्तांची सामाजिक दृष्टि अधिक पुढारलेली होती; पण वरच्या अंगाला गहगाच्या त्या मूठभर नेमस्तांचा खालच्या जनतेशीं संबंधच येत नसे. आर्थिक दृष्ट्याहि ते फारसा विचार करीत नसत. नवोदित वरिष्ठ मध्यम वर्गाचे ते थोड्या प्रमाणांत प्रतिनिधी असल्याकारणानें

आणि ह्या वर्गाला स्वतःच्या वाढीसाठीं वाव हवा असल्यामुळें त्या वर्गाच्या मागण्या तेवढ्या नेमस्त बोलून दाखवीत. जातिभेद कमजोर व्हावेत व प्रगति-विरोधी जुन्या चाली मोडाव्यात म्हणून ते कांहीं समाजसुधारणांचीहि तरफदारी करीत असत.

मवाळांना मिळाल्यानंतर वडिलांनीं चढाईचें काम सुरू केलें. बंगाल व पुणे येथील जहाल पुढारी वगळले, तर बाकीचीं जहाल पक्षांतलीं मोहरीं अगदीं तरुण होतीं. आणि त्यांनीं मनमानेल तसें पुढें सरकावें हें वडिलांना खपेना. विरोध त्यांना सहन होत नसे. विरोधकाला चावूं कीं गिळूं असें त्यांना होई. त्यांना मूर्ख वाटतील त्यांची ते कदर करीत नसत; त्यामुळें या तरुणांवर त्यांनीं मोठ्या ईर्षेनें तलवार उपसली व संधि सांपडली तेव्हां प्रहार करण्यांत कधीं कुचराई केली नाहीं. मला वाटतें, मीं केंब्रिज सोडल्यावर त्यांचा एक लेख माझ्या वाचनांत आला. मला तो मुळींच आवडला नाहीं. बेमुर्वतखोरपणानें मीं त्यांना एक खरमरीत पत्र लिहिलें. आपल्या राजकीय कार्यक्रमाकडे पाहून ब्रिटिश सरकारला खात्रीनें आनंद होत असला पाहिजे असा टोला मीं त्यांना हाणला होता! वडिलांना बेभान व्हावयाला हें कारण पुरेसें होतें. ते अतिशय संतापले. इंग्लंडांतून मला परत बोलवावयाचें त्यांनीं जवळजवळ नक्की ठरवलें होतें.

मी केंब्रिजला असतांना पुढें कोणता मार्ग पत्करावा याची भवति न भवति झाली होती. कांहीं काळ सिव्हिल सर्व्हिसमध्यें जावें असा बेत चालला होता; त्या वेळीं त्या सर्व्हिसची प्रतिष्ठा विशेषच होती. पण वडील व मी यांच्यापैकीं कोणालाच त्या सर्व्हिसबद्दल प्रेम नसल्यामुळें तो बेत रद्द झाला. शिवाय परीक्षेंत यशस्वी झाल्या-वर इंग्लंडांत आणखी एक वर्ष काढावें लागलें असतें. इतके दिवस इंग्लंडांत राहिलों असल्यामुळें मी आतां परत फिरावें अशी घरच्या मंडळींची इच्छा होती. सिव्हिल सर्व्हिसमध्ये माझी नेमणूक झाली असती, तर मला घरापासून दूर कोठें तरी जावें लागलें असतें. पण आईवडिलांना तर इतक्या दिवसांच्या वियोगानंतर मीं त्यांच्याचजवळ असावें असें वाटत होतें. अशा अनेक कारणांमुळें वडिलांचाच धंदा पत्करावा असें ठरून मी बॅरिस्टरीच्या अभ्यासाकडे वळलों.

आश्चर्याची गोष्ट अशी कीं, माझीं राजकीय मतें अधिकाधिक जहाल बनत चाललीं असतांहि सिव्हिल सर्व्हिसमध्यें जाण्यांत आणि ब्रिटिश राज्ययंत्रांतलें एक चक्र होऊन राहण्यांत मला तेव्हां कांहींच वावगें वाटलें नाहीं! पुढच्या आयुष्यांत असल्या कल्पना मला तिरस्करणीय वाटल्या असत्या.

१९१० सालीं पदवी घेऊन मीं केंब्रिज सोडलें. माझ्या विषयांत मला बेता-बेताचेंच यश मिळालें; म्हणजे दुसऱ्या वर्गांत सन्मानपूर्वक मी उत्तीर्ण झालों. नंतरचीं दोन वर्षे मीं लंडनच्या आवर्तीभोंवतीं काढलीं. कायद्याच्या अभ्यासाकडे फारसा वेळ खर्च होत नसे. बॅरिस्टरीच्या परीक्षेत विशेष यश अथवा अपयश कांहींच न

मिळतां मी सरळ पास होत गेलों. बाकीचा वेळ भटकण्यांत, सर्वसामान्य वाङ्मय वाचण्यांत, फेबिअनांच्या व समाजवाद्यांच्या कल्पनांशीं पुसट ओळख करून घेण्यांत आणि प्रस्तुत राजकीय चळवळींच्या निरीक्षणांत संपून गेला. आयर्लंडच्या आणि स्त्रीमताधिकाराच्या चळवळींकडे माझें विशेष लक्ष लागले होतें. १९१०च्या उन्हाळ्यांत आयर्लंडांत गेलो असतां सिनफेन चळवळीकडे माझें मन आकर्षित झाल्याचें मला स्मरतें.

लंडनमध्यें हॅरोंतले जुने मित्र भेटले आणि त्यांच्या सहवासानें मला खर्चिक राहणीची चटक लागली. वडील सढळपणें मला पैसे पाठवीत ते मला पुरेनात. मी आतां रसातळाला जाणार असा विचार मनांत येऊन वडिलांना मोठी काळजी वाटूं लागली. पण रसातळाला जाण्याइतकें साहस करण्याची माझी तयारी नव्हती. श्रीमंत पण बहुशः पोकळ डोक्यांच्या इंग्लिश तरुण गर्भश्रीमंतांचें अथवा शहरी छबूचें अनुकरण करण्याचा मी माझ्याकडून प्रयत्न करीत होतों, इतकेंच. त्या बिनसायासी आणि ध्येयशून्य जिण्याचा माझ्यावर कोणताच भला परिणाम झाला नाहीं हें सांगावयास नकोच. माझ्या पूर्वीच्या आकांक्षा खुरट्या बनत चालल्या, आणि मिजासखोरपणाची मात्र भरपूर वाढ झाली!

१९०९ सालच्या उन्हाळ्याच्या सुटीत वडिलांबरोबर मी बर्लिन येथें राहत होतों. कान्स्टन्स सरोवराच्या कांठच्या फ्रेडरिक शाफेन गांवाहून निघून कौंट झेपलिननें आपल्या हवाई जहाजांतून बर्लिनपर्यंतची मजल त्याच वेळीं मारली. खुद्द कायसरनें त्याचें स्वागत केलें. तेव्हां लाखो लोक जमा झाले होते. आमच्या हॉटेल-मालकांनीं त्या दिवशीं सर्व आश्रयदात्यांना कौंट झेपलिनचा एकेक सुंदर फोटो नजर केला, तो अद्यापि मजजवळ आहे.

त्यानंतर दोन महिन्यांनीं पॅरिस येथें असतांना पहिलें विमान दृष्टीस पडलें. तें नव्या शहरावर हिंडलें आणि आयफेल मनोऱ्याभोंवतीं त्यानें मंडल काढलीं. वैमानिकाचें नांव कांत द् लांबर्त असावें. योगायोग असा कीं त्यानंतर अठरा वर्षांनीं एकाद्या तेजोमय बाणाप्रमाणें लिंडबर्गचें विमान अटलांटिक महासागरावरून झेपावत आलें तेव्हांहि मी पॅरिसमध्यें होतों.

१९१० सालीं नॉर्वे देशांत गेलो असतां मी थोडक्यांत बचावलों. डोंगराळ मुलुख तुडवीत आम्ही चाललों होतों. मुक्कामास पोंचलो ते अगदीं घामाघूम झालेले आणि शिणले-भागलेले असे पोंचलो. आम्हीं स्नानासाठीं पाणी मागितलें. त्या लोकांनीं स्नानावळींत अशा प्रकारची मागणी अपूर्वच होती! पाणी तेथें मिळेना. शेजारच्या ओढ्यांत स्नान करा असा सल्ला आम्हांला मिळाला. जवळच्या हिमनदींतून गर्जना करीत खालीं पडणाऱ्या त्या ओढ्याकडे लहानसें टॉवेल घेऊन आम्ही निघालों. मी पाण्यांत शिरलों. पाणी खोल नव्हतें, पण मनस्वी गार होतें. तळाला पाय ठरत नव्हता; त्यामुळें मी घसरून पडलों. गार पाण्यामुळें गात्रें बधिर

झालों, हातापायांवर माझा ताबा राहिला नाहीं. पाय कोठेंच ठरेना. मी झपाट्यानें खालीं वाहात चाललों होतों. माझा इंग्लिश मित्र कसाबसा बाहेर पडला. कांठा कांठानें धांवत जाऊन शेवटीं त्यानें मोठ्या शर्तीनें माझी तंगडी पकडली आणि मला बाहेर खेंचलें. मागाहून आम्हांला कळलें कीं खालीं दोनतीनशें यार्डांवर हाच गिरिप्रवाह एका प्रचंड कड्यावरून खालीं उडी घेत असून त्यामुळें जो धबधबा निर्माण झाला आहे, त्याला या भागांतलें एक निसर्गशोभेचें ठिकाण समजण्यांत येतें.

१९१२ सालीं मी बॅरिस्टर झालों आणि त्याच वर्षाच्या हेमंत ऋतूंत हिंदुस्थानला परत आलों. इंग्लंडांत मीं सात वर्षे घालविलीं. मध्यंतरीं सुटींत मी दोनदां स्वदेशीं येऊन गेलों होतों. पण आतां आलों तो कायम वास्तव्य करण्यासाठीं. मुंबईच्या धक्क्यावर मीं पाय ठेवला, तेव्हां आढ्यतेखोरपणावांचून माझ्याजवळ वाखाणण्यासारखें कांहीं नव्हतें, असें मला वाटतें !

५

# पुनरागमन आणि महायुद्धकालीन हिंदी राजकारण

१९१२ च्या अखेरीला राजकीय दृष्ट्या देश अगदीं थंड होता. टिळक तुरुंगांत पडले होते. जहालांची मुस्कटदाबी करण्यांत आली असून कर्त्या पुढाऱ्यांच्या अभावीं ते चिप् पडून होते. फाळणी रद्द केल्यानंतर बंगाल स्वस्थच बसला होता, आणि मोर्ले-मिंटोंच्या कायदेमंडळांभोंवतीं नेमस्तांचें कडें जमवण्याची योजना यशस्वी झाली होती.

१९१२ सालच्या नाताळांत बांकीपूरला भरलेल्या काँग्रेस-अधिवेशनास मी एक प्रतिनिधि म्हणून हजर राहिलों होतों. इंग्रजी शिकलेल्या वरिष्ठवर्गीयांचाच तेथें भरणा होता आणि छानपैकीं इस्त्री केलेल्या विजारी आणि सकाळीं घालायचे कोट लोकांच्या अंगावर दिसत होते! खरें म्हणजे सामाजिक सम्मेलनच होतें तें! कोणत्याहि प्रकारची राजकीय टोंचणी अगर ईर्षा त्यांच्या ठायीं दिसत नव्हती. दक्षिण आफ्रिकेतून नुकतेच परत आलेले गोखले तेथें उपस्थित होते. अधिवेशनांतली प्रभावी व्यक्ति म्हणजे गोखलेच. भावनाशील, खऱ्या तळमळीचे, आणि कुशल असे गोखलेच काय ते राजकारणाचा व जनकार्याचा गंभीरपणानें आणि कसोशीनें विचार करतांना दिसले. माझ्या मनावर गोखल्यांची छाप पडली.

बांकीपूरच्या स्टेशनवर गोखले आले, तेव्हां एक स्वभावनिदर्शक प्रसंग घडला. त्या वेळीं पब्लिक सर्व्हिसेस कमिशनचे ते एक सभासद म्हणून आगगाडीचा एक सबंध पहिल्या वर्गाचा डबा त्यांना हक्कानें मिळावयास पाहिजे होता. त्यांची प्रकृति ठीक नव्हती. गर्दीमुळें आणि अप्रिय लोकांच्या सहवासामुळें त्यांना त्रास होई. थोडा निवांतपणा मिळेल आणि काँग्रेस-अधिवेशनाच्या दगदगीनंतर तरी आगगाडीचा प्रवास शांतपणें होईल अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांना स्वतंत्र डबा मिळाला, पण बाकीच्या गाडींत कलकत्त्याला परतणाऱ्या प्रतिनिधींची खेचाखेंच झाली होती. पुढें इंडिया कौन्सिलचे सभासद झालेले भूपेंद्रनाथ बसु जरा वेळानें त्यांच्याकडे आले व त्यांनीं सहजगत्या मी तुमच्या डब्यांत येऊं काय, असा प्रश्न केला. बोलण्याच्या कामीं भूपेन्द्रनाथ बसु म्हणजे अखंड चालणारें यंत्र होतें! तेव्हां प्रश्न ऐकून गोखले जरा विचकलेच; पण त्यांनीं आपल्या स्वभावानुरूप रुकार दिला. थोड्या वेळानें बसुबाबू पुन्हां आले आणि आपला एक मित्र डब्यांत आला तर चालेल काय असें विचारू लागले! गोखल्यांनीं सौजन्यानें त्याहि विनंतीला रुकार दिला. गाडी सुटण्याच्या

जरा आधीं श्री. बसु सहजच बोलून गेले कीं आपल्याला वर झोंपणें जरा गैरसोयीचें होणार, तेव्हां हरकत नसेल तर गोखल्यांनीं ती जागा घ्यावी; आपण खालीं निजणें पसंत करूं. शेवटीं बसूंच्या म्हणण्याप्रमाणेंच व्यवस्था ठरली. बिचाऱ्या गोखल्यांना वर निजून सर्व रात्र तळमळावें लागलें असेल !

मीं हायकोर्टांत वकिली सुरू केली. तें काम मला थोडेंबहुत आवडत असे. युरोपहून परत आल्यानंतर पहिले कांहीं महिने मजेंत गेले. परत घरीं येऊन जुनीं नातीं उजळ करण्यांत मला आनंद वाटला. परंतु हळूहळू माझ्या दर्जाच्या इतर लोकांच्या संगतींत मी जें जीवन कंठीत होतों तें मला नीरस भासूं लागलें. वाटलें कीं आपण ध्येयहीन व निष्फळ आयुष्याच्या रुक्ष चाकोरींत सांपडत आहोंत. माझ्या भोंवतालच्या वातावरणांत मला समाधान लाभत नव्हतें, त्याचें कारण मला मिळालेलें अर्धवाडगें—अथवा भेसळीचें म्हणा—शिक्षण हेंच असावें. माझ्या इंग्लंडांतील सात वर्षांच्या वास्तव्यामुळें माझ्या अंगीं ज्या संवयी व कल्पना मुरल्या होत्या, त्यांना अनुरूप अशी परिस्थिति भोंवतीं आढळेना. सुदैवानें आमच्या घरचें वातावरण बरेंच अनुकूल होतें. त्यामुळें तितकेंसें जड गेलें नाहीं. पण तेवढ्यानें भागेना. उरला सुरला वेळ घालवायला कोर्टाचें ग्रंथालय अथवा क्लब होताच. पण तेथें तेच तेच लोक भेटावयाचे, तेच तेच विषय खलायचे, नेहमींचाच काथ्याकूट सुरू असावयाचा आणि तोदेखील कायदेकानूसंबंधीं ! बौद्धिक चालना माणसाला मिळेल असें वातावरण तेथें नव्हतेंच नव्हतें. मला जीवनाचा वीट येऊं लागला. बरें, नांव घेण्यासारखीं करमणुकीचीं साधनेंहि तेथें उपलब्ध नव्हतीं.

जी. एल्. डिकिन्सन् ह्यांनीं हिंदुस्थानविषयीं बोलतांना म्हटलें होतें, " इंग्रजी व हिंदी लोकांची दिलजमाई कां होत नाहीं ? हिंदी लोकांचा सहवास इंग्लिश माणसाला कंटाळवाणा होतो, हेंच त्याचें मूळ कारण आहे. " पुष्कळ इंग्रज लोकांना तसें वाटत असल्यास नवल नाहीं. देशावर पहारा करण्यासाठीं बसवलेल्या संरक्षक सैन्यांतले आपण एक सैनिक आहों असें प्रत्येक इंग्रजाला मनांतून वाटत असतें आणि तसाच तो वागतो. अशा परिस्थितींत परस्परांत सरळ मनमोकळे संबंध वाढत जाणें अशक्यप्राय होतें. परस्परांच्या सहवासांत एकमेक उबून जातात, आणि दूर सरकले कीं झाली एकदांची सुटका असें वाटूं लागतें.

बहुधा इंग्लिश माणसाला ठराविक हिंदी माणसें भेटतात, आणि तीं म्हणजे त्याच्या अधिकारकक्षेंत बसतील तेवढीं; खऱ्या योग्यतेचीं माणसें त्यांच्या नजरेस पडतच नाहींत. बरें, अशीं माणसें नजरेस पडलीं, तरी परिचय होणें कठीण जातें. त्यामुळे ब्रिटिश आणि हिंदी अधिकारी वर्गांतले लोक फार संकुचित मनोवृत्तीचे व रुक्ष असे बनतात. हिंदुस्थानांत आलेला ताज्या दमाचा तरतरीत इंग्रज तरुणहि लवकरच बौद्धिक व सांस्कृतिक दृष्ट्या सुस्तावतो आणि जिवन्त कल्पनांशीं अथवा चळवळींशीं त्याचा संबंधच उरत नाहीं. कधीं न संपणाऱ्या कागदपत्रांचे ढीग चाळून झाले, कीं

थोडासा व्यायाम घेऊन स्वारी आपल्याच सवर्गीयांत मिसळण्याकरितां क्लब गांठते आणि मग तेथें व्हिस्की पिण्यांत, 'पंच' वाचण्यांत अथवा इंग्लंडहून आलेलीं सचित्र साप्ताहिकें चाळण्यांत संध्याकाळ खर्च होते. ग्रंथ तर तो क्वचितच वाचीत असेल आणि वाचेलच तर कांहीं जुने आवडीचे लेखक. आणि अशा प्रकारें ऱ्हास होऊं लागला कीं तो हिंदुस्थानला दोष देतो, इथल्या हवापाण्याला शिव्या देतो, आपलें काम बिकट करणाऱ्या धंदेवायिक चळवळ्यांवर लाखोली वाहतो. पण त्याला हें उमगत नाहीं कीं येथल्या नोकरशाहीनें जी तगडबंद आणि अरेरावी पद्धति जारी केलेली आहे व जिचा तो स्वतः एक अल्पसा भाग होऊन राहिला आहे, ती पद्धतिच त्याच्या मानसिक अधोगतीला कारणीभूत होत असते.

मुबलक रजा मिळणाऱ्या अधिकाऱ्यांची ही दशा. मग त्यांच्या हाताखाली राबणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांची स्थिति काय असणार ? तो वरच्या अधिकाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याची धडपड करीत असतो. हिंदी समाजाच्या केंद्रस्थानीं म्हणजे नव्या दिल्लीत हिंदी व इंग्रज वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकींत बसून पगारवाढ, रजेचे नियम, बदल्या, आणि वरिष्ठ नोकऱ्यांतील काळेबेरे प्रकार यांच्याविषयीं चाललेली कंटाळवाणी संभाषणे ऐकणें म्हणजे एक संकट आहे.

इंग्लंडहून परत आल्यानंतर पहिलीं कांहीं वर्षे माझ्या मनांत यामुळेंच असमाधान उत्पन्न झालें. माझ्या धंद्यांत मन रमेना. माझ्या मतें राजकारण म्हणजे परकीय सत्तेविरुद्ध चालवलेली चढाईची राष्ट्रीय चळवळ. तिला चालू राजकारणांत मुळीं स्थानच नव्हतें मी काँग्रेसला मिळालों आणि तिच्या विद्यमानें क्वचित् होणाऱ्या सभांतहि भाग घेऊं लागलों. हिंदी मजुरांवर लागू करण्यांत येणाऱ्या फिजीमधील मुदतबंदीच्या कराराविरुद्ध चळवळ सुरू झाली अथवा दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या प्रश्नासारखा प्रश्न उपस्थित होऊन कांहीं विशेष प्रसंग निर्माण झाला कीं त्यांत मी उडी घेत असे आणि कसून मेहनत करी; पण अशीं कामें कधीं काळीं उद्भवणार.

शिकारीसारख्या करमणुकीत मी भाग घेत असे, पण त्यांत मी फारसा वाकब-गार नव्हतो आणि मला त्यांत विशेष गोडीहि वाटत नसे. मोकळ्या हवेची आणि अरण्याची मौज अनुभवावयास सांपडे एवढेंच त्यांत मला समाधान होतें; शिकारीची मी कधीं आस्था बाळगली नाहीं. अहिंसावादी म्हणूनच माझी वास्तविक ख्याति होती; तरी पण काश्मीरांत एकदां चुकून माझी गोळी बरोबर लागली व तिला एक अस्वल बळी पडला ! शिकारीची जी काय थोडीबहुत आवड माझ्यांत होती तीसुद्धां एका लहानशा प्रसंगामुळें नष्ट झाली. एकदां एक लहान निरुपद्रवी पाडस माझ्या गोळीनें जिव्हारीं घायाळ होऊन पडलें आणि अश्रूंनीं डबडबलेल्या आपल्या टपोऱ्या डोळ्यांनीं त्यानें माझ्याकडे दृष्टि लावली. ते डोळे मला अद्यापि कधीं कधीं दिसतात !

श्री. गोखल्यांच्या भारत सेवक समाजानें प्रथम प्रथम माझें मन वेधून घेतलें

होतें. परंतु त्यांचें राजकारण मला फार नेमस्त वाटे आणि माझा धंदा सोडून देण्याचीहि माझी इच्छा नव्हती. त्यामुळें भारत-सेवक-समाजांत प्रवेश मिळवावा असा विचार माझ्या मनांत मुळींच आला नाहीं. तथापि देशाची सेवा, निर्वाहापुरतेंच वेतन घेऊन एकनिष्ठेनें बजावणाऱ्या या भारत-सेवकांबद्दल मला फार आदर वाटत असे. कामाची दिशा बिनचूक नसेल; पण जें काम होत होतें तें सुसूत्र, एकसारखें, आणि तन्मयतेनें होत होतें, हें काय थोडें झालें!

राजकारणाशीं यत्किंचितहि संबंध नसलेल्या एका लहानशाच प्रसंगामुळें श्रीनिवास शास्त्र्यांबद्दल मात्र मला फार आश्चर्य वाटलें. विद्यार्थ्यांच्या सभेंत अलाहाबादला त्यांचें भाषण चाललें होतें. आपल्या शिक्षकांच्या व आचार्यांच्या आज्ञा माना, त्यांच्याबद्दल आदरबुद्धि राखा व अधिकाऱ्यांनीं घालून दिलेले नियम व शिस्त मोठ्या दक्षतेनें पाळीत जा वगैरे उपदेश त्यांनीं केला. हा गुळमुळीत उपदेश मला फारसा पसंत पडला नाहीं. तो शिळा तर होताच, पण त्यांत जीहुकूम वृत्तीवर भर दिला असल्यामुळें मला तो अनिष्टहि वाटला. हिंदुस्थानांत सगळीकडे अर्धवट नोकरशाही कल्पनांचाच जोर असल्याकारणानें असे विचार प्रकट होत असतील अशी माझी समजूत झाली. पण शास्त्र्यांनीं पुढें आणखी असाहि मंत्र सांगितला कीं, आपले वर्गबंधू कुठच्या-अवकृत्या जे कांहीं आज्ञाभंग करतील, त्यांची खबर वरिष्ठांना ताबडतोब नेऊन द्या! निराळ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे एक-मेकांवर पाळत ठेवा आणि गुप्त हेरांचें काम करीत जा. अगदीं हेच रोकडे शब्द शास्त्र्यांनीं उच्चारले नाहींत, पण त्यांचा आशय स्पष्ट होता. एका थोर पुढाऱ्यानें केलेला हा उपदेश ऐकून मी तर थक्कच झालों! मी नुकताच इंग्लंडमधून परतलों होतों. तेथल्या शाळा-कॉलेजांत मीं जर कोणता धडा घटवला असेल, तर हा कीं वर्गबंधूचा विश्वासघात केव्हांहि करूं नये. वळचणीला उभें राहून चोरून ऐकावें, वर्दी द्यावी आणि सहाध्यायाला गोत्यांत आणावें, यापेक्षां शिष्टाचाराविरुद्ध मोठें पाप नाहीं, हें तत्त्व, हिंदुस्थानांत एका झटक्यासरशीं उलटेंपालटें झालेलें पाहून माझें मन क्षुब्ध झालें. आणि मला वाटलें कीं मला शिकवलेले नीतिनियम आणि शास्त्र्यांचे नीतिनियम यांच्यांत केवढें अंतर आहे!

नंतर महायुद्धाचें अतिमहाभारत सुरू झालें व आमचें चित्त सर्वस्वीं तिकडेच लागून राहिलें. रणक्षेत्र हजारों मैलांवर असल्याकारणानें महायुद्धाचा आमच्या जीवनावर प्रारंभीं फारसा परिणाम घडला नाहीं, आणि महायुद्धाचें भीषण स्वरूपहि संपूर्णपणें या देशांत केव्हांच पहावयास मिळालें नाहीं. हिंदुस्थानांतील राजकारण हळूहळू विझत जाऊन त्याला अगदीं गौण स्थान प्राप्त झालें होतें. "हिंदुस्थान-संरक्षक कायदा" देशभर जारी होता. दुसऱ्या वर्षानंतर कटाच्या आणि गोळीबाराच्या बातम्या कानावर आदळूं लागल्या आणि पंजाबांत धाकदपटशा दाखवून चालू असलेली सैन्यभरतीची हकिकतहि ऐकूं यावयास लागली.

राजनिष्ठेचा डांगोरा पिटविण्यांत येत असला, तरी त्या काळीं ब्रिटिशांबद्दल लोकांत फारच थोडी सहानुभूति शिल्लक होती. जहाल असो वा नेमस्त असो, जर्मनीची सरशी झाली कीं त्याला बरें वाटे. जर्मनीबद्दल प्रेम होतें असें नव्हे. मनांतली इच्छा ही कीं आपले जेते चीत झालेले दिसावेत. स्वतः दुर्बल व असहाय झालेल्या माणसाला शत्रूचा सूड परस्पर दुसऱ्यानें घ्यावा असें वाटत असतें, त्यांतलाच हा प्रकार. महायुद्धाच्या वेळीं बहुतेक सर्वांच्या भावना अशाच प्रकारच्या होत्या असें माझें मत आहे. युद्धांत सांपडलेल्या सर्व राष्ट्रांपैकीं फ्रान्सविषयीं मला फार आपुलकी वाटे. दोस्त राष्ट्रांनीं निर्लज्जपणे जो मतप्रचार अव्याहत चालू ठेवला होता, त्यांतला बराचसा भाग एकतर्फी म्हणून बाद घातला, तरी त्याचा परिणाम मनावर झाल्याशिवाय राहात नसे.

हलके हलके राजकारणाचें डोकें वर निघूं लागलें. लोकमान्यांची सुटका झाली आणि त्यांनीं व बेझंटबाईंनीं होमरूल-लीग स्थापन केली. मीं दोन्हीकडे नांव दाखल केलें. परंतु विशेषतः मी बेझंटबाईंच्या लीगमध्यें काम करीत असें. हिंदी राजकारणांत बेझंटबाई उत्तरोत्तर अधिक चमकूं लागल्या. कॅांग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांत जरा चैतन्य खेळूं लागलें आणि मुस्लिम-लीग कॅांग्रेसच्या बरोबरीनें कामाचा वांटा उचलूं लागली. वातावरण उत्साहमय झालें होतें. आमच्यासारख्या तरुणांचीं मनें थरारून जाऊन कांहीं तरी महत्त्वपूर्ण गोष्टी लवकर घडणार आहेत अशी आम्हांस आशा वाटूं लागली. बेझंटबाईंच्या स्थानबद्धतेमुळें सुशिक्षित वर्गांत तर फारच खळबळ उडाली. सर्व देशभर होमरूलच्या कार्याला नवा तजेला चढला. १९०७ पासून कॅांग्रेसबाहेर उभे करण्यांत आलेले जहालच तेवढे होमरूला लीगला मिळाले असें नाहीं. मध्यम वर्गापैकीं अनेक नवे लोकहि तींत सामील झाले. होमरूल लीगचा जनतेशीं मात्र संबंध आला नाहीं.

जुन्या पिढींतील लोकांचीं आणि पुष्कळ नेमस्ताग्रणींचीं मनेंहि बेझंटबाईंच्या अटकेमुळें हललीं. त्यांना स्थानबद्ध करण्यापूर्वी वृत्तपत्रांतून येणारीं शास्त्र्यांचीं वक्तृत्वपूर्ण भाषणें ऐकून आमचीं मनें कशीं पेट घेत असत तें मला आठवतें आहे. पण त्याच सुमारास शास्त्र्यांनीं एकाएकीं तोंड मिटून घेतलें! प्रत्यक्ष कार्याची वेळ येऊन ठेपल्याबरोबर ते पसार झाले! आवाडीला लढणारा नेता हवा असतां ते गप्प बसलेले पाहून त्या वेळीं लोकांच्या वैतागाचा आणि संतापाचा पारा बराच चढला होता. तेव्हांपासून माझ्या मनाची खात्री होत आली आहे कीं शास्त्री हे कर्ते पुढारी नव्हेत, आणीबाणीचा प्रसंग त्यांच्या प्रकृतीला मानवत नाहीं.

बाकीचे नेमस्त पुढारी पुढें सरसावले. कांहींजणांनीं नंतर अंग काढून घेतलें; पण कांहीं नव्या जागींच पाय रोवून राहिले. हिंदुस्थानांतील युरोपियन संरक्षक सैन्याच्या धर्तीवर मध्यमवर्गीय तरुणांचें हिंदी संरक्षक सैन्य जमवण्याचा सरकारचा उद्योग चालू होता; त्यावर पुष्कळच भवति न भवति सुरू होती. अनेक बाबतींत ह्या

हिंदी सैन्याला युरोपियन सैन्यापेक्षां फार निराळ्या प्रकारें वागविण्यांत येई. हे मानहानीचे प्रकार बंद झाले नाहींत, तोंपर्यंत आपण सरकारशीं सहकार्य करूं नये असें आमचें पुष्कळ जणांचें मत होतें. पुष्कळ वादविवाद झाल्यावर संयुक्त प्रांतांत असें ठरलें कीं सहकार्य करावें. अशा परिस्थितींतच कां होईना, आमच्या तरुण लोकांना लष्करी शिक्षण तरी मिळेल. मीं स्वतः सैन्यांत दाखल होण्यासाठीं अर्ज केला आणि ही योजना लोकप्रिय करण्यासाठीं आम्हीं एक समिति नेमली. त्याच सुमाराला बेझंटबाईंना स्थानबद्ध करण्यांत आलें. त्या तिडकेसरशीं मी, तेजबहादुर सप्रू, चिंतामणि वगैरे समितींतील नेमस्त सभासदांचें मन वळवून संरक्षक सैन्या-साठीं चाललेल्या मतप्रचाराच्या सभा वगैरे कामें सरकारच्या या कृत्याचा निषेध म्हणून रद्द करण्याचें ठरवलें. या अर्थाची जाहीर सूचनाहि प्रसिद्ध झाली. लढाईच्या काळांत असलें बंडखोरीचें वर्तन केल्याबद्दल सही करणारांपैकीं कांहींना मागाहून पश्चात्ताप झाला असावा.

बेझंटबाईंच्या प्रकरणामुळें माझ्या वडिलांनीं व इतर नेमस्त पुढाऱ्यांनीं होमरूल लीगमध्यें नांवें दिलीं. कांहीं महिन्यांनंतर बहुतेक नेमस्त सभासदांनीं सभासदत्वाचे राजिनामे सादर केले. माझे वडील मात्र लीगमध्यें राहिले आणि अलाहाबाद शाखेचे अध्यक्ष झाले.

माझे वडील हलके हलके जुन्या नेमस्त मतापासून दूर दूर चालले होते. नेमस्त वृत्तीचा अतिरेक आणि आपणांविषयीं बेपर्वा असणाऱ्या व आपणांस तुच्छतेनें वाग-वणाऱ्या अधिकारी वर्गाची मनधरणी त्यांच्या स्वभावाला असह्य होऊं लागली. परंतु जुन्या जहाल पुढाऱ्यांकडेहि त्यांचें मन ओढ घेईना. त्यांचीं भाषणें आणि त्यांची कार्यपद्धति त्यांना मोठी कर्कश अशी वाटे. बेझंट-प्रकरण आणि त्यानंतर घडलेल्या प्रसंगांचा त्यांच्या मनावर बराच परिणाम घडला खरा; परंतु जहाल गटांत प्रत्यक्ष जाऊन सामील होण्यापूर्वी त्यांची चलबिचल झाली. त्या काळांत ते अनेकवार बोलून दाखवीत कीं नेमस्त राजकारणांत कांहीं अर्थ उरला नाहीं; पण हिंदु-मुसल-मानांचा प्रश्न सुटल्याशिवाय कोणतीहि गोष्ट परिणामकारक रीतीनें करतांच यावयाची नाहीं; तो एक प्रश्न सुटला, तर आमच्यापैकीं तरुणांतल्या तरुणांच्या शेजारीं आपण जाऊन उभे राहावयास तयार आहोंत. १९१६ सालीं लखनौ-काँग्रेसमध्यें संयुक्त काँग्रेस-लीग योजना मंजूर झाली. आतां एकीनें काम उरकतां येईल असा संभव दिसतांच वडिलांना फार आनंद झाला. आपल्या जुन्या नेमस्त मित्रांशीं असलेला संबंध तोडूनहि ते पुढें सरसावण्यास तयार झाले होते. मॅंटेग्यू हिंदुस्थानांत स्टेट सेक्रेटरी म्हणून येऊन गेले, तोंपावेतों त्यांचे व प्रागतिकांचे संबंध दृढ असे होते. पण मॅंटेग्यू-चेम्स्फर्ड-अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर लगेच मतभेद उत्पन्न झाले आणि १९१८ च्या उन्हाळ्यांत लखनौ येथें भरलेल्या खास प्रांतिक परिषदेच्या वेळीं वडील अध्यक्ष असतांना परस्परसंबंध कायमचाच तुटला. सरकारी अहवालाविरुद्ध कडक

असें धोरण या परिषदेंत स्वीकारण्यांत येईल अशी अपेक्षा असल्यामुळें नेमस्तांनीं परिषदेवर बहिष्कार पुकारला. नंतर भरलेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनावरहि त्यांनीं बहिष्कार टाकला. तेव्हांपासून प्रागतिक पक्ष राष्ट्रीय सभेच्या बाहेरच उभा आहे.

राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांतून व इतर जाहीर सभांतून हलकेच अंग काढून दूर सरावयाचें, बहुमत आपल्या विरुद्ध असलें तरी आपलें म्हणणें लोकांपुढें मांडून त्यासाठीं दोन हात करावे तें सोडून तो प्रसंगच टाळावयाचा, वगैरे जीं नेमस्तांचीं धोरणें आहेत तीं माझ्या मतें अगदीं अप्रशस्त आणि सार्वजनिक कार्यकर्त्यांना न शोभणारीं अशीं आहेत. नेमस्तांचें राजकारण इतकें भुईसपाट झालें त्याचें कारण ही त्यांची भेकड वृत्तीच होय. नेमस्तांनीं बहिष्कार पुकारल्यावरहि प्रथम प्रथमच्या अधिवेशनांस नामदार शास्त्री हे एकटेच हजर राहून आपला मुद्दा स्पष्ट करीत असत. त्यामुळें लोकांतली त्यांची प्रतिष्ठा वाढली.

महायुद्धांतील प्रारंभींच्या काळांत मीं केलेलीं राजकीय व सार्वजनिक कार्य फारच अल्प होतीं. सार्वजनिक सभांतून मी कधींच बोलत नसें. जाहीर भाषण करण्याची मला भीति वाटे. शिवाय माझी इच्छा अशी होती कीं जाहीर भाषणे इंग्रजींतून न होतां हिंदींतून व्हावींत. पण फार वेळ हिंदींत बोलणें मला जमेल कीं नाहीं याची मला जबरदस्त शंका होती. अलाहाबादेस मी अगदीं पहिलें भाषण करण्यास तयार झालों तेव्हांचा एक प्रसंग मला आठवतो. ही बहुधा १९१५ सालांतली गोष्ट असावी. पण त्याबद्दल खात्री देतां येणार नाहीं. छापखान्यांची मुस्कट-दाबी करणाऱ्या कायद्याच्या निषेधाची ती सभा होती. मीं अगदीं थोडा वेळ भाषण केलें आणि तेंहि इंग्रजींत. सभा संपतांक्षणीं तेजबहादुर सप्रूंनीं व्यासपीठावर चढून सर्व लोकांसमक्ष मला आलिंगन देऊन माझें चुंबन घेतलें. लज्जेनें मी अगदीं चूर झालों. भाषणाचा आशय अथवा पद्धति चांगली होती म्हणून नव्हे, तर निव्वळ मी सभेंत बोललों, आतां सार्वजनिक कामासाठीं आणखी एक सैनिक मिळाला एवढ्याच विचारानें सप्रूंना हर्ष झाला. व्याख्यानें देणें हेंच त्या वेळचें सार्व-जनिक काम !

अलाहाबादेंतील तरुणांना डॉ. सप्रू हे राजकारणांत अधिक जहाल भूमिका घेतील अशी आशा वाटे. कारण सर्व नेमस्तांत ते भावनाप्रधान आणि उत्साहशील होते. त्यांच्याशीं तुलना करतां आमचे वडील म्हणजे थंड प्रकृतीची कमाल असें भासावें. पंडित मदनमोहन मालवीय तर देशसेवा करतां करतां वृद्ध झालेले. त्यांच्या-बद्दल आम्हांला प्रेम होतें. त्यांच्याशीं आमचें तासन् तास बोलणें होई व देशाला वीरोचित असा मार्ग तुम्हीं दाखवला पाहिजे असा आम्ही आग्रह धरीत असूं.

घरीं राजकीय विषयांची चर्चा शांतपणें होत नसे आणि त्यांचा उल्लेख झाला —आणि तो बहुशः होईच—कीं वातावरण लगेच गरम व्हावयाचें. मी जहाल वादाकडे

झुकत चाललों होतों त्याकडे वडिलांचें बारिक लक्ष होतें. केवळ बोलक्या राजकारणावर मी एकसारखी टीका करीं, प्रतिकार झाला पाहिजे असें आग्रहानें म्हणें, तेंहि त्यांच्या नजरेंतून सुटलें नव्हतें. कार्याची दिशा माझ्या बोलण्यांत स्पष्ट झालेली नव्हती. बंगालमधील क्रांतिकारकांच्या वाटेकडेच मी तडक चाललों आहें अशी त्यांना शंका येई व ते अस्वस्थ होत. खरें म्हणजे माझ्या मनाची ओढ त्या बाजूला नव्हती; पण परिस्थितीखालीं निमूटपणें मान देणें योग्य नाहीं, कांहीं तरी केलें पाहिजे अशी टोंचणी माझ्या मनाला अधिकाधिक लागत चालली. राष्ट्रीय विचारसरणीशीं सुसंगत असें यशस्वी कार्य करणें मुळींच सोपें नाहीं हें मी ओळखून होतों; परंतु व्यक्तीची व राष्ट्राची इज्जत राखणें असेल तर परकीय सत्तेविरुद्ध अधिक चढाईचें धोरण अंमलांत आणणें अवश्य होतें. खुद्द वडिलांना ही नेमस्त विचारसरणी असमाधानकारक वाटत होती व त्यांच्याहि मनांत झगडे चालूच होते. पण दुसरा मार्ग उरला नाहीं अशी खात्री पटल्याशिवाय पहिला मार्ग सोडावयास त्यांचें हट्टी मन तयार होत नसे. एक पाऊल पुढें सरकावयाचें म्हटलें तरी त्यांच्या मनांत झोंबी सुरू होई, आणि अन्तःस्थ झोंबीचा निकाल लागून पाऊल एकादा पुढें पडलें, कीं तें मात्र ठाम. मग मागें फिरण्याची भाषा नाहीं.

बेझंट-प्रकरणापासून त्यांचें नेमस्त मित्र-मंडळ मागें पडलेंच होतें. एकेक पाऊल पुढें टाकतां टाकतां पंजाब हत्याकांडाचें १९१९ साल उजाडलें, आणि पूर्वीच्या आयुष्याशीं आणि पेशाशीं त्यांना निगडित करणारे बंध सपकन् तुटून, गांधीजींनीं सुरू केलेल्या नव्या चळवळींत त्यांनीं उडी टाकली.

पण ही फार नंतरची गोष्ट. १९१५ ते १७ पर्यंत ते संशयाच्या भोंवऱ्यांतच अडकले होते. त्यांतच माझ्यासंबंधीं काळजीची भर पडल्यामुळें रोज उपस्थित होणाऱ्या सार्वजनिक प्रश्नांवर शांतपणें बोलणें त्यांना जड जाई. कित्येक वेळां ते आमच्यावर संतापत आणि संभाषण तितकेंच थांबे.

१९१६ च्या नाताळांत लखनौ-कॉंग्रेस-अधिवेशनाच्या वेळीं मी गांधीजींना प्रथमच भेटलों. दक्षिण आफ्रिकेंत ते धैर्यानें लढले असल्यामुळें आम्हां सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. पण आम्हां पुष्कळ तरुणांना ते दूर अंतरावर उभे आहेत, साधारण माणसापेक्षां निराळे आहेत, पण राजकारणी नाहींत असें वाटलें. कॉंग्रेसच्या अथवा देशाच्या राजकारणांत भाग घेण्यास त्या वेळीं ते मुळींच तयार नव्हते. दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न बरा कीं आपण बरे ही त्यांची वृत्ति होती. नंतर लवकरच चंपारण्यांत त्यांनीं दाखवलेली हिम्मत आणि किसानांसाठीं मिळवलेलें यश ह्यांमुळें आम्हांला उत्साहाचें भरतें आलें. स्वतःची कार्यपद्धति हिंदुस्थानांत लागू करण्यास ते तयार आहेत व ती येथें यशस्वी होईल याविषयीं आमची खात्री झाली.

लखनौ-कॉंग्रेसनंतर अलाहाबादेला सरोजिनी नायडूंनीं जीं वक्तृत्वपूर्ण भाषणें

केलीं, त्यांमुळेंहि आमच्या चित्तवृत्ती थरारून गेल्या होत्या. त्यांत राष्ट्रवाद आणि देशाभिमान कांठोकांठ भरलेला असे. मीहि राष्ट्रवादी बनलों आणि विश्वविद्यालयांतील माझा अस्पष्ट असा समाजवाद कोठल्या कोठें दडला. माझ्या मतें १९१६ सालीं न्यायासनापुढें रॉजर केसमेंटनें केलेल्या चिरस्मरणीय भाषणांत जित राष्ट्रांतील नागरिकांची मनोवृत्ति उत्कृष्टपणें चित्रित झाली होती. ईस्टर वीकचें बंड अपेशी ठरलें म्हणून जणुं कांहीं तें अधिकच आकर्षक वाटूं लागलें! हमखास येणाऱ्या अपयशाला वांकुल्या दाखविणारें आणि पाशवी शक्ति कितीहि प्रचंड असली, तरी राष्ट्रतेजाचा दुर्दम्य स्फुलिंग तिला दडपून टाकतां येणार नाहीं अशी ग्वाही सर्व जगाला देणारें धैर्य तेच खरें धैर्य नव्हे का?

अशा प्रकारचे विचार मनांत येत. पण नवें कांहीं वाचलें कीं डोक्यांत घोरत पडलेले समाजवादी विचार चाळवून जागे होत. भूतदयेवर अधिष्ठित झालेल्या आदर्शवादी व अस्फुट अशा कल्पनालहरी होत्या त्या. त्यांना शास्त्रीय परिणति प्राप्त झाली नव्हती. युद्धकालीन व युद्धोत्तरकालीन माझा आवडता लेखक म्हणजे बर्ट्रांड रसेल.

ह्या विचारांमुळें व आकांक्षांमुळें माझा अन्तर्गत कलह अधिकच भडकला. वकिलीच्या धंद्याविषयीं असमाधान वाटूं लागलें. पण दुसरा कांहींच उद्योग नव्हता, म्हणून वकिलीच करीत राहिलों. परंतु अशी खात्री पटत चालली कीं, सार्वजनिक काम म्हणजे विशेषतः मला हवें होतें तसलें चढाऊ वृत्तीचें काम व वकिलीचा धंदा ह्यांचें गोत जुळायचें नाहीं. हा तत्त्वाचा प्रश्न नसून वेळ आणि शक्ति ह्यांच्या मर्यादेचा प्रश्न होता. कां कोणास कळे, कलकत्त्याच्या सुप्रसिद्ध सर राशबिहारी घोषांचा माझ्यावर लोभ जडला व वकिलींत नांव कसें मिळवावें यासंबंधीं त्यांनीं मला खूप उपदेश केला. विशेषतः माझ्या आवडत्या कायद्याच्या विषयावर एक ग्रंथ लिहिण्याचा सल्ला त्यांनीं मला दिला व स्वतः सूचना करण्याचें व पुस्तक तपासण्याचें आश्वासनहि देऊन ते मोकळे झाले. पण मी मोठा कायदेपंडित व्हावें ही त्यांची सदिच्छा फुकट होती. कारण कायद्याचीं पुस्तकें लिहिण्याइतकें माझ्या नावडीचें दुसरें काम शोधूनहि सांपडतें ना!

उतारवयांत राशबिहारी घोष भारी चिडखोर आणि संतापी झाले होते. हाताखालच्या लोकांना तर ते कर्दनकाळ भासत. वडील आणि मी १९१८ सालीं सिमल्याला त्यांच्याकडे पाहुणे म्हणून उतरलों होतों. एके दिवशीं रात्रीं त्यांनीं कांहीं मित्रांना भोजनास बोलावलें. त्यांत वृद्ध खापर्डेहि होते. भोजनोत्तर सर राशबिहारी आणि खापर्डे दोघेहि चढ्या आवाजांत वादविवाद करूं लागले. प्रहारप्रतिप्रहारास प्रारंभ झाला. दोघांचे राजकीय पंथ भिन्न. राशबिहारी कट्टर नेमस्त आणि खापर्डे त्या काळीं तरी एक प्रमुख टिळकपंथीय समजले जात. पुढें पुढें ते गोगलगायीसारखे गरीब आणि मवाळाहून मवाळ झाले. नामदार गोखले

कांहीं वर्षांपूर्वी दिवंगत झाले होते त्यांच्यावरच खापर्ड्यांनीं टीकास्त्र सोडलें. ते म्हणाले कीं गोखले ब्रिटिशांचे हेर होते, त्यांनीं माझ्या हालचालींवर लंडनमध्यें नजर ठेवली होती. राशबिहारींना हें सहन झालें नाहीं. गोखले हे उत्तमोत्तम गृहस्थ होते, ते आपले जिवलग स्नेही होते, त्यांची अशा प्रकारें कोणीं बदनामी केली तर मला खपणार नाहीं, असें राशबिहारींनीं ठासून बजावलें. मग खापर्ड्यांनीं शास्त्र्यांकडे आपला मोर्चा वळवला. राशबिहारींना हें पसंत पडलें नाहीं; पण ते तितकेसे गरम झाले नाहींत. त्यांना शास्त्र्यांबद्दल गोखल्यांइतका आदर नसावा. गोखले ह्यात असेपर्यंत भारत-सेवक-समाजाला आपण आर्थिक मदत करीत होतों, नंतर ती बंद केली, असेंहि त्यांनीं विधान केलें. नंतर खापर्ड्यांनीं विरोधानें टिळकांची स्तुति आरंभिली. खापर्डे म्हणाले, "तो खरा थोर, असामान्य पुरुष. सन्तच तो." "सन्त ! " राशबिहारी कडाडले, "मला सन्तांचा तिट्कारा आहे. सन्तांशीं मला कांहींएक कर्तव्य नाहीं !"

६

# विवाह आणि हिमालयांतील साहस

माझा विवाह १९१६ सालीं दिल्ली शहरांत झाला. वसंतागम सूचित करणाऱ्या वसंतपंचमीचा तो दिवस होता. त्या वर्षीच्या उन्हाळ्यांतील कांहीं महिने आम्हीं काश्मीरांत काढले. आमच्या कुटुंबीयांना खालच्या खोऱ्यांतच ठेवून मी आणि माझा एक चुलत भाऊ असे दोघेजण बरेच आठवडे डोंगरांतून हिंडत होतों. त्या वेळीं आम्ही 'लडाख' घाटहि चढून गेलों.

तिबेटच्या पठाराकडे जाणाऱ्या चिंचोळ्या आणि निर्मनुष्य अशा पृथ्वीवरील उंच दऱ्यांतून हिंडण्याचा हा पहिलाच प्रसंग. 'झोजीला' घाटाच्या माथ्यावरून हिरव्यागार गवतानें झांकलेल्या डोंगरांचे उतार एका बाजूस दिसत होते, तर दुसरीकडे उघडे बोडके शिलाखण्ड दृष्टीस पडत होते. दोन्हीं कुशींना पर्वतांचा पहारा असलेल्या त्या निरुंद दरींतून आम्ही वरवर चढत होतों. बर्फाच्छादित शिखरें एकीकडे चकाकत होतीं आणि त्यांतून छोटे छोटे हिमप्रवाह मंदपणें आमच्याकडे वाहत येत होते. झोंबणारा गार वारा सुटला होता. पण दिवसा सूर्याची छानदार ऊब मिळत असे. वातावरण इतकें स्वच्छ होतें कीं पदार्थांचें अंतर अजमावण्यांत चूक होऊन लांबचे पदार्थ जवळ आहेत असा भास होई.

आणखी वर गेल्यावर आम्हांला साथ द्यावयाला झाड-झाडोराहि राहिला नाहीं; उघडे फत्तर, बर्फ आणि क्वचित् वेळां डोळ्यांना रिझवणारीं फुलें एवढीच काय तीं उरलीं. परंतु निसर्गाच्या ह्या ओसाड आणि एकाकी वसतिस्थानांतहि मला एक प्रकारचें विलक्षण समाधान लाभलें. आनंद आणि उत्साह यांनीं मी फुललों होतों.

या प्रवासांत एक रोमांचकारी प्रसंग अनुभवावयास सांपडला. 'झोजीला' घाट चढल्यावर 'मातायान'पाशीं आम्हांला कळलें कीं अमरनाथची गुहा फक्त आठच मैल दूर राहिली आहे. हिम आणि बर्फ यांनीं आच्छादित असा एक प्रचंड पर्वत वाटेंत आडवा होता हें खरें. पण त्यांत काय मोठेंसें ? आठच तर मैल सारें अंतर. जोमाच्या भरांत आमच्यासारख्या अननुभवी माणसांनीं ठरवलें कीं अमरनाथला जायचें. ११,५०० फूट उंचीवरचा आमचा तळ सोडून थोडेजण पुढें निघालों. वाटाड्या म्हणून एक स्थानिक धनगर बरोबर घेतला होता.

कमरेला दोऱ्या बांधून कित्येक हिमनद्या चढून गेलों, कित्येक ओलांडल्या.

त्रास अधिकच होऊं लागला, श्वासोच्छ्वास करणेंहि जड पडूं लागलें. आमच्या हमालांच्या पाठीवर थोडें थोडेंच सामान होतें, तरीहि त्यांच्या नाकांतून रक्त वाहूं लागलें, व हिमनद्यांचीं पात्रें कमालीचीं घसरडीं झालीं. आम्ही अगदीं थकून गेलों. एकेक पाऊल मोठ्या मुष्किलीनें पडत होतें. तरी पण आमचा मूर्खपणाचा बेत आम्हीं सोडला नाहीं. सकाळीं चार वाजतां आम्हीं तळ सोडला होता. जवळ जवळ बारा तास एकसारखें चढल्यावर आम्हांला बक्षिसी काय मिळाली, तर एक विस्तीर्ण हिमाच्छादित मैदान दृष्टीस पडलें ! परंतु तो देखावा मात्र उदात्तरम्य होता. हिमशिखरांनीं वेष्टित असा तो भूभाग रत्नखचित मुकुटाप्रमाणें अथवा स्वर्देवतांच्या क्रीडांगणाप्रमाणें शोभत होता. बर्फ व धुकें अधिकच पडूं लागलें व तो देखावा लुप्त झाला. आम्ही किती उंचीवर होतों तें कळलें नाहीं. पण बहुधा १५,००० ते १६,००० फुटांवर ती जागा असावी. कारण अमरनाथाच्या गुहेच्या बरेंच वर आम्ही उभे होतों. आम्हांला आतां अर्धा एक मैलाचा तो हिमाच्छदित प्रदेश तेवढा ओलांडावयाचा होता. मग खालीं उतरलें कीं अमरनाथ. चढ मागे पडल्यामुळें आतां त्रास संपला असें आम्हांस वाटलें. साहजिकच शरीर थकलें होतें, तरी मनाला हुशारी वाटूं लागली व आम्हीं पुढें पाऊल टाकलें. जमीन फार फसवी होती. वाटेंत अनेक चर होते व नुकत्याच पडलेल्या बर्फानें कांहीं धोक्याच्या जागा झांकून गेल्या होत्या. ह्या बर्फापायींच इतिश्री होण्याचा प्रसंग मजवर येऊन ठेपला. बर्फ पाहून पाय टाकला तों बर्फाचा पापुद्रा पायाखालीं फाटून मी एका प्रचंड चराच्या जाभाडांत गडप झालों. फार विस्तृत अशी ती भेग होती. तिच्या तळाशीं वस्तु गेली कीं ती कांहीं युगें तरी सुरक्षित राहणार याविषयीं शंका घेण्याचें कारण नव्हतें ! पण माझा तोल सुटला नाहीं. त्यामुळें चराच्या कडांना मीं घट्ट धरून ठेवलें. मग मला वर खेंचण्यांत आलें. या प्रसंगामुळें मन जरा हबकलेंच; पण आम्हीं माघार घेतली नाहीं. परंतु त्यानंतर चर एका मागोमाग वाटेंत आडवे येऊं लागले. त्यांपैकीं कांहीं इतके रुंद होते कीं ते ओलांडावयास अवश्य तीं साधनेंच आमच्यापाशीं नव्हतीं. तेव्हां निरुपाय म्हणून परत वळलों. थकलों तर होतोंच; त्यांत निराशेची भर पडली आणि अमरनाथाचें दर्शन कांहीं घडलें नाहीं !

काश्मीरांतील उंच दऱ्याडोंगरांनीं माझ्या मनाला इतका कांहीं चटका लावला होता, कीं लवकरच पुन्हां तेथें जावयाचा मीं संकल्प केला. मीं किती वेळां बेत केले, प्रवासाच्या योजना आंखल्या. कुतूहलांचें स्थान बनलेल्या तिबेटांतल्या त्या मानस सरोवराचें व शेजारच्या हिममय कैलासाचें दर्शन घेण्याचाहि माझा बेत होता. त्याचा नुसता विचार मनांत आला, तरी मन आनंदानें डुलूं लागतें ! परंतु बेत करून आज अठरा वर्षे झालीं, तरी मी येथेंच आहें. जबर इच्छा असून काश्मीरांत जाणेंहि साधलें नाहीं. राजकारणाच्या व सार्वजनिक कामाच्या जाळ्यांत मी अधिकाधिकच गुंतत जात आहें व पर्वत उल्लंघण्याच्या आणि समुद्रपार होण्याच्या ऐवजीं

प्रवासाची हौस मला तुरुंगाच्या वाऱ्या करूनच भागवावी लागत आहे ! पण माझे बेत अद्यापि चालू आहेतच ! बेत करतों म्हटलें तर तुरुंगांत देखील कोणाला बंदी करतां यावयाची नाहीं ! शिवाय तुरुंगांत दुसरें करणार तरी काय ? ज्या दिवशीं हिमालय चढून मी त्या मनःपूजित सरोवराच्या कांठीं पोंचलेला असेन, त्या दिवसाचीं चित्रें मी मनाशींच रेखाटीत बसतों ! मध्यंतरींच्या काळांत आयुःकण सिकताकणाप्रमाणें झिजून चाललेच आहेत, तारुण्य जाऊन मध्यमावस्था प्राप्त झाली आहे; तीहि संपेल आणि तिच्या जागीं "कृतांताचा अमल ध्वज" फडकूं लागेल. आणि कधीं कधीं मला वाटतें कीं जरठ झाल्यावर मी कसचा जातों कैलासाला आणि मग कुठलें आलें आहे मानस सरोवर ! तथापि तो प्रवास करण्यालायक आहे; सुरुवात तर करावी, मग अखेरचा मुक्काम न कां नजरेस पडेना !

"ये अहा ! ती पर्वतांची रम्य माळा अंतरीं
संकटांना जेथ आली सांध्यरागें माधुरी
–आणि ये अद्यापि माझा जीव नेत्रीं, मोडुनी–
पाहतां अस्पृष्ट राशी त्या हिमाच्या तेथुनी."*

* कविः वाल्टर द ला मेर

७

# गांधीजींचें आगमन, सत्याग्रह व अमृतसर

महायुद्ध संपलें तेव्हां हिंदुस्थानांत खळबळ चालू होती, पण ती आंतल्या आंत. यंत्रशक्तीची प्रगति होऊन भांडवलदारांच्या सत्तेंत आणि मत्तेंत भर पडली. उत्कर्ष पावलेल्या शिखरावरच्या या मूठभर लोकांना आतां सत्तेचा हव्यास वाटूं लागला होता. आपला धनसंचय फायदेशीरपणें कोठेंतरी गुंतवून आपल्या संपत्तीची वाढ व्हावी म्हणून त्यांना संधि हवी होती. बहुसंख्य जनतेचें भाग्य एवढें थोर कोठून असणार? आपली दमछाट करणारा बोजा जरा हलका व्हावा, एवढीच तिची इच्छा होती. राज्ययंत्रांत फार मोठे बदल होऊन स्वयं-शासनाचे बरेचसे अधिकार पदरांत पडतील आणि मग प्रगतीचे अनेकविध मार्ग खुले झाले, कीं आपली भाग्यरेषा उमटेल अशी आशा मध्यम वर्ग बाळगून होता. ह्या चुळबुळीचें प्रत्यंतर जनतेंत आणि विशेषतः शेतकऱ्यांत दिसूंहि लागलें होतें. सैन्यभरतीसाठीं उपयोगांत आणलेल्या जबरदस्तीच्या मार्गाचें विस्मरण पंजाबी जनतेला झालें नव्हतें. ‘कोमागाटा मारु’ प्रकरणीं व इतर प्रसंगीं कटाचे खटले उभे करून जी भयंकर दडपशाही चालविण्यांत आली, तिच्यामुळें सार्वजनिक असंतोष अधिकच वाढला. लांबलांबच्या देशांत आघाडीवर लढलेले सैनिक रणक्षेत्रावरून परत आले होते. पूर्वी आज्ञाधारक कळसूत्री बाहुल्याप्रमाणें वागणारे ते शिपाईगडी आतां बदलून गेले होते. त्यांच्या मानसिक शक्ती वाढल्या होत्या. तेहि असंतुष्टच होते.

तुर्कस्तान आणि खिलाफत प्रकरणामुळें मुसलमानांना राग आला होता व त्यांची चळवळ फैलावत होती. तुर्कस्तानबरोबरच्या तहनाम्यावर अद्याप सह्या झाल्या नसल्या, तरी पुढें काय होणार त्याची कल्पना येण्यासारखी होती. म्हणून एकीकडे चळवळ चालू ठेवून ते वाट पाहात होते.

वाट पाहावी, अपेक्षा करीत असावें हीच मनोवृत्ति त्या वेळीं देशभर प्रभावी झाली होती. मन आशामय होतें, पण भीति व चिंता यांचीहि सावली त्याच्यावर पडलेली होती. नंतर रौलेट्-कायदे मंजूर झाले, त्यांत अटकेच्या भरमसाट सवलती देण्यांत आलेल्या असून खटल्याच्या बाबतींत नेहमींच्या कायद्यानें घालून दिलेल्या यमनियमांचा त्यांत मागमूसहि नव्हता. या कायद्यामुळें सर्व हिंदुस्थानभर संतापाची लाट उसळली. नेमस्तहि त्यांत सामील झाले व त्यांनीं ह्या कायद्यांचा कसून निषेध केला. सर्व मतांच्या लोकांनीं या कायद्यांना विरोध केला. तरीदेखील अधिकाऱ्यांनीं

कायदे तसेच पुढें रेटीत नेले व ते मंजूरहि झाले. मोठयांत मोठी सवलत मिळाली ती ही कीं कायद्यांचा अंमल तीन वर्षांपुरता मर्यादित करण्यांत आला.

पंधरा वर्षांनंतर त्या कायद्याकडे व त्यांच्यामुळें उत्पन्न झालेल्या असंतोषाकडे दृष्टि टाकणें बरेंच फायदेशीर आहे. कायद्यावर शिक्कामोर्तब झालें खरें: पण तीन वर्षांच्या मुदतींत त्यांचा एकदांहि उपयोग करण्यांत आला नाहीं. आणि तीं कांहीं शांततेचीं वर्षें नव्हतीं. १८५७ नंतर पुन्हां याच वेळीं हिंदुस्थानांत मोठयांत मोठी दंगल माजली. एकमुखी विरोधाची पर्वा न करतां ब्रिटिश सरकारनें दडपून कायदा मंजूर करून घेतला, मंजूर झाल्यावर तो म्यान करून टाकला, आणि चळवळ मात्र अंगावर ओढवून घेतली ! या सर्व प्रकारामुळें अशी कल्पना मनांत येते, कीं दंगल माजवण्याच्या हेतूनेंच हा कायदा मंजूर करून घेण्यांत आला असावा.

दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, आज पंधरा वर्षांनंतर रोजच्या रोज ज्यांची अंमलबजावणी चाललेली आहे, असे रौलॅट्‌ कायद्याहून कितीतरी कडक कायदे कायदेपुस्तकांत अन्तर्भूत झालेले आहेत. ज्या या कायद्यांच्या व वटहुकुमांच्या कृपाछत्राखालीं आम्ही ब्रिटिश राजवटीचीं सुखें चाखीत आहोंत, त्यांच्याशीं तोलून पाहिला तर रौलॅट्‌-कायदा म्हणजे स्वातंत्र्याची सनदच वाटेल ! मात्र एक फरक एवढया काळांत घडून आलेला आहे; तो असा कीं १९१९ सालापासून आम्हांला मॅंटेग्यू-चेम्स्‌फर्ड घटनेनुसार बरेचसे स्वयंशासनाचे अधिकार प्राप्त झालेले असून आतां आणखी नवे अधिकार प्राप्त होण्याचा मंगल समय दाराशींच येऊन ठेपला आहे. एकसारखी प्रगति होत आहे आमची, दुसरें काय !

१९१९ च्या प्रारंभीं गांधीजी एका जिवावरच्या दुखण्यांतून बचावले. रौलॅट्‌-कायद्यांना संमति देऊं नका अशी काकुळतीची विनंति आजारी असतांनाच त्यांनीं व्हाइसरॉयला केली होती. इतर विनंत्यांप्रमाणेंच ह्याहि विनंतीची वितहेवाट लागली, आणि जवळजवळ मोठ्या नाखुषीनेंच त्यांनीं आपल्या पहिल्या देशव्यापी चळवळीचें नेतृत्व स्वीकारलें. सत्याग्रह-सभा भरविण्याचा त्यांनीं उपक्रम सुरू केला. त्यांतल्या सभासदांनीं रौलॅट्‌-कायदा मोडण्याची प्रतिज्ञा करावयाची होती, व वेळोवेळीं निर्दिष्ट करण्यांत येतील ते जुलमी कायदे मोडण्यासहि ते प्रतिज्ञेप्रमाणें बांधलेले होते. थोडक्यांत म्हणजे जाणूनबुजून उघडपणें तुरुंगाचा मार्ग त्यांनीं चोखाळावयाचा होता.

मीं ह्या सूचना वृत्तपत्रांत वाचल्या आणि मला अतिशय समाधान वाटलें. गुंतागुंतींतून बाहेर पडण्याचा उपाय एकदांचा सांपडला. सरळ, उघड, आणि बहुशः परिणामकारक अशी एक कार्यपद्धति हातीं लागली. माझ्या उत्साहाला भरती आली. सत्याग्रह-सभेचा तात्काळ सभासद होण्याचा विचार मनांत आला. कायदेभंग, तुरुंगवास वगैरे परिणामांची मला दखल नव्हती. तसले विचार मनांत आलेच, तर मला त्यांची पर्वा वाटली नाहीं. पण एकाएकीं माझा उत्साह मावळला. गोष्ट वाटते तितकी

सोपी नाहीं हें कळून चुकलें; कारण माझे वडील त्या कल्पनांच्या सर्वस्वीं विरुद्ध होते. नवी सूचना दिसली कीं गेले हुरळून अशी त्यांची रीत नव्हती. नव्या मार्गावर पाऊल टाकण्यापूर्वी ते बारकाईनें विचार करीत. आणि सत्याग्रह-सभेविषयीं जों जों ते अधिक विचार करूं लागले, तों तों त्यांना ती जास्त जास्तच नापसंत वाटूं लागली. थोडेसे लोक तुरुंगांत गेले तर काय होणार, सरकारवर त्यामुळें कितीसें दडपण पडणार? परंतु याहिपेक्षां वैयक्तिक प्रश्नाचीच त्यांना खरी आंच लागली होती. मी तुरुंगांत जाणार ही कल्पनाच त्यांना असह्य झाली! तुरुंगाकडे जाणारा मनुष्यौघ अद्यापि पुरासारखा वाहूं लागला नव्हता. बन्दिवासाची कल्पना त्या काळांत कशीशीच वाटत असे. आमच्यावर वडिलांचें अतोनात प्रेम होतें. प्रेमाचा बाजार त्यांनीं कधीं भरवला नाहीं; पण त्यांच्या संयमाच्या पापुद्र्याखालीं वात्सल्याचा खोल सांठा भरलेला होता.

कित्येक दिवस मनाची ही तगमग चालू होती. आमच्या जीवनाची उलथापालथ करून टाकणारी फार प्रचंड समस्या आपणांपुढें उभी आहे याची जाणीव आम्हा दोघांनाहि असल्यामुळें आम्ही एकमेकांशीं वागतांना शक्य तितक्या सौजन्यानें वागण्याची खबरदारी घेत होतों. शक्यतों वडिलांचें दुःख कमी करावें अशी माझी इच्छा होती. पण सत्याग्रहाचा मार्ग हाच आतां आपला मार्ग याविषयीं मात्र मनांत शंका राहिली नाहीं. तो काळ दोघांनाहि कष्टप्रद वाटला. रात्रीमागून रात्री मीं एकट्यानेंच हिंडण्यांत घालवल्या; त्या वेळीं मनाचे अगदीं हाल होत. मी चांचपडत मार्ग शोधीत होतों. मला मागाहून समजलें कीं प्रत्यक्ष अनुभव असावा म्हणून वडिलांनीं जमिनीवर निजूनहि पाहिलें. त्यांना वाटे कीं तुरुंगांत मला जमिनीवरच निजावें लागणार.

वडिलांनीं विनंति केल्यावरून गांधीजी अलाहाबादेस आले आणि त्या दोघांचा एकांतीं खूप विचारविनिमय झाला. मीं प्रसंग अंगावर ओढवून घेऊं नये आणि वडिलांच्या मनाला त्रास होईल असें कांहींहि करूं नये असा सल्ला निष्कर्ष म्हणून गांधीजींनीं मला दिला. मला हा प्रकार बरा वाटला नाहीं. पण इतक्यांत हिंदुस्थानांत निराळ्याच घटना घडून येऊन सर्वच परिस्थिति पालटली व सत्याग्रह-सभांच्या कामाला लगाम लागला.

सत्याग्रह-दिन, सर्व देशभर हरताळ, सर्व व्यापार बंद, दिल्ली व अमृतसर येथें पोलिसांनीं व सैन्यानें केलेले गोळीबार, कित्येक इसमांचे त्या पायीं पडलेले बळी, अमृतसर आणि अलाहाबाद येथें लोकसमुदायांनीं केलेली हिंसा, जालियनवाला बागेतील कत्तल, पंजाबांत लष्करी कायद्यानें केलेली अमानुष मानहानि व त्या कायद्यामुळें ओढवलेला अनर्थ, असे प्रसंग घडत होते.

पंजाब एकाकी सांपडला. देशाशीं असलेला त्याचा संबंध तोडण्यांत आला. सबंध पंजाबवर जणुं कांहीं जाड पडदा टाकून त्याला दृष्टीआड करण्यांत आलें. वर्तमान जवळजवळ कळेनासेंच झालें. कोणाला पंजाबांत जातां येईना, कोणाला त्या कोंडींतून बाहेर पडतां येईना.

त्या यमपुरींतून कसेबसे बाहेर निसटलेले फुटकळ लोक इतके भेदरून गेले होते, कीं त्यांना संगतवार कांहींहि सांगतां येईना. आम्ही बाहेर थांबलेले लोक असहाय होऊन, दीनवाणे बनून कांहीं बातमीचे तुकडे मिळतील म्हणून वाट पाहात बसलों होतों. आमच्या अन्तःकरणांत जहर भरलें होतें. आमच्यापैकीं कांहींजणांना वाटे कीं उघडपणें संकटांत गवसलेल्या भागांतून जावें आणि लष्करी कायदा मोडावा. पण आम्ही होतों तेथेंच थबकलों. मध्यंतरीच्या काळांत सहाय्यासाठीं व चौकशी-साठीं एक वजनदार समिति काँग्रेसतर्फे नेमण्यांत आली.

मुख्य मुख्य भागांतील लष्करी कायदा मागें घेऊन बाहेरच्या लोकांना आंत येण्याची परवानगी जाहीर झाल्याबरोबर काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते भराभर पंजाबांत गेले आणि त्यांनीं सहाय्य व चौकशी करण्यास प्रारंभ केला. मदत करण्याचें काम बहुतेक पंडित मालवीय व स्वामी श्रद्धानंद यांच्याकडे व चौकशीचें काम मुख्यतः माझे वडील व चित्तरंजन दास यांच्या हातीं सोंपवलें होतें. त्यांत गांधीजी बारीक लक्ष घालीत आणि त्यांचा सल्लाहि इतर लोक घेत. अमृतसर-विभाग दासबाबूंनीं स्वतः-कडे घेतला. त्यांना हवी ती मदत करण्यासाठीं माझी नेमणूक झाली, व त्यांच्याबरोबर मला पाठविण्यांत आलें. त्यांच्याबरोबर व त्यांच्या हाताखालीं काम करण्याचा हा पहिलाच प्रसंग. मला मिळालेला तो अनुभव फार मोलाचा होता. त्यांच्या-विषयींचा माझ्या मनांतला पूज्यभाव त्या प्रसंगानें वृद्धिंगत झाला. जालियनवाला बागेसंबंधींचा आणि ज्या बोळांत मनुष्यांना पोटावर सरपटावयास लावण्यांत आलें, त्याबद्दलचा बहुतेक साक्षीपुरावा आमच्या समक्षच घेण्यांत आला. तो नंतर काँग्रेस-चौकशीच्या अहवालांत प्रसिद्ध झाला. जालियनवाला बागेंतहि आम्ही बरेच वेळां गेलों आणि तेथील तसून् तसू जागा तपासली.

मला वाटतें एड्वर्ड थॉम्सन् या गृहस्थांनीं अशी एक शक्कल काढली आहे कीं बागेंतून बाहेर पडावयास इतर दुसरे मार्ग आहेत अशी जनरल डायरची समजूत झाल्यामुळें त्यानें इतका वेळपर्यंत गोळीबार चालू ठेवला. डायरची तशी समजूत असती व वस्तुस्थितीहि तशीच असती, तरीदेखील त्याच्यावरची जबाबदारी कमी होती ना. पण त्याची अशी समजूत असेल ही कल्पनाच विलक्षण वाटते! तो उभा होता त्या उंचवट्यावर कोणीहि उभा राहिला, तर त्याला सर्व जागा दिसण्या-सारखी आहे. सर्व बाजूंनीं उंच उंच इमारती असल्याकारणानें ती कशी बंद झालेली आहे तें तेथून सहज लक्षांत येईल. फक्त एकाच बाजूला घरें नसलेली शंभर फूट जागा होती. तिच्यावर सुमारें पांच फूट उंचीची ठेंगणी भिंत होती. मृत्यूच्या अग्नि-वर्षावानें लोक पटापट मरून पडत आहेत हें पाहतांच हजारों लोक त्या भिंतीकडे धांवले आणि तिच्यावरून चढून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. आम्हांला मिळा-लेल्या पुराव्यावरून व खुद्द भिंतींत शिरून बसलेल्या असंख्य गोळ्यांवरून असें दिसतें कीं, गोळीबाराचा मारा मग भिंतवरच करण्यांत येऊं लागला! हेतु हा कीं लोकांना

निसटतां येऊं नये. हा संहार थांबला तेव्हां मेलेल्यांचे व घायाळांचे ढीगच्या ढीग भिंतीच्या दोन्ही अंगाला पडलेले दिसून आले.

१९१९ च्या अखेरीस मी रात्रीच्या गाडीनें अमृतसरहून दिल्लीला जात होतों. मी शिरलों तो डबा जवळजवळ भरलेला होता. वरचा एकच बिछाना रिकामा होता तो मीं पकडला. सकाळीं पाहतों तों माझ्या बरोबरीचे सर्व प्रवासी लष्करी अधिकारी असल्याचें आढळून आलें. एकमेकांशीं ते खड्या अवाजांत बोलत असल्यामुळें मला त्यांचें संभाषण ऐकल्यावांचून गत्यंतर नव्हतें. त्यांपैकीं एकजण मोठ्या दिमाखानें आणि उन्मत्तपणानें आपली बाजू मांडीत होता. लवकरच मला समजलें कीं जालियनवाला बागेतील वीरशिरोमणि, जनरल डायर ते हेच. अमृतसरचे आपले अनुभव ते निवेदन करीत होते. त्यांनीं सांगितलें कीं 'सर्व शहर माझ्या केवळ मुठींत होतें. एकदां मनांत आलें कीं हें बंडखोर शहर पार धुळीस मिळवावें; पण म्हटलें जाऊं द्या; आणि मग तो विचार सोडून दिला.' हंटर चौकशी-कमिटीपुढें जबानी देऊन ते लाहोरहून परत चालले होते. हें संभाषण ऐकून व त्यांचा निष्ठुरपणा पाहून माझ्या मनाला मोठा धक्का बसला. भडक गुलाबी रंगाच्या पट्टयापट्टयांचा पायजमा व अंगावर पोशाख चढवण्याच्या वेळीं घालावयाचा झगा अशा पेहेरावांत स्वारी दिल्ली स्टेशनवर उतरली.

चौकशीचें काम चालू असतां गांधीजींची भेट अनेक वेळां झाली. त्यांच्या सूचना कमिटीला पुष्कळदां विलक्षण भासत व त्या नापसतहि करण्यांत येत. परंतु वाद-विवाद करून ते आपल्या सूचना स्वीकारावयास लावीत. त्यांच्या सल्ल्यांतील मख्खी नंतर प्रसंगानें कळून आली व राजकारणाविषयींच्या त्यांच्या अचूक ज्ञानावरील माझा विश्वास त्यामुळें वाढला.

पंजाब-प्रकरणाचा व चौकशीचा माझ्या वडिलांच्या मनावर अतिशय परिणाम झाला. त्यांच्या मनाचा कायदेशीर व सनदशीर पायाच हादरला आणि एका वर्षानंतर जो पालट झाला, त्याची पूर्वतयारी या वेळेपासून आस्ते आस्ते होत गेली. अलाहाबादच्या "लीडर" या नेमस्त वृत्तपत्राचें धोरण नापसत वाटून त्यांनीं "इंडिपेंडंट" नांवाचें दुसरें दैनिक काढलें. त्याला उत्तम यश येत गेलें. पण सुरुवातीपासूनच त्याची व्यवस्था नीट लागली नाहीं. त्याला संपादक, व्यवस्थापक वगैरे सर्वच जबाबदार आहेत. मी डायरेक्टरांपैकीं एक होतों, पण मला काडीइतकाहि अनुभव नव्हता. त्या व्यवसायांतील दगदगीचा व बखेड्यांचा मला मनस्वी त्रास होऊं लागला. वडील व मी लवकरच पंजाबांत गेलों आणि आमच्या गैरहजेरींत तें वर्तमानपत्र घसरणीला लागलें, व अनेक आर्थिक अडचणी उत्पन्न झाल्या. १९२० आणि १९२१ सालीं तें चांगलें सांवरलें. पण आम्ही तुरुंगांत गेल्यानंतर १९२३ च्या सुरुवातीला त्यानें कायमची समाधि घेतली. तेव्हांपासून वर्तमानपत्राचा व्यवसाय म्हटला, कीं मला फार धास्ती वाटते.

१९१९च्या अमृतसर-काँग्रेसचे वडील अध्यक्ष होते. त्यांनीं नेमस्तांना (जे आतां स्वतःला प्रागतिक म्हणवूं लागले होते) उद्देशून तळमळीनें भरलेलें असें एक विनंतिपत्र काढलें. त्यांत लष्करी कायद्यामुळें उत्पन्न झालेल्या भीषण परिस्थितीचा विचार करून काँग्रेसला येऊन मिळा, "घायाळ झालेला पंजाब" तुम्हांला विनवीत आहे असें म्हटलें होतें. ही विनंति व्यर्थ जाणार नाहीं अशी आशा होती. पण त्यांनीं अपेक्षित उत्तर दिलें नाहीं; काँग्रेसला मिळण्याचें त्यांनीं नाकारलें. त्यांचे डोळे अगामी सुधारणांकडे लागून राहिले होते. त्यांच्या नकारामुळें वडिलांचें मन दुखावलें व प्रागतिकांतला व त्यांच्यांतला भेद दुणावला.

अमृतसर-काँग्रेस म्हणजे पहिली गांधी-काँग्रेस होय. लोकमान्य टिळक तेथें हजर होते व त्यांनीं वादविवादांत प्रामुख्यानें भागहि घेतला. परंतु प्रतिनिधींपैकीं बहुसंख्य लोक विशेषतः बाहेर जमलेला जनसमुदाय गांधीजी नेतृत्व स्वीकारणार अशा अपेक्षेनें उभा होता यांत शंकाच नाहीं. हिंदी राजकीय क्षितिजावर "महात्मा गांधी की जय" ह्या घोषणेचा नाद दुमदुमूं लागला. स्थानबद्धतेंतून नुकतेच सुटून आलेले अल्लीबंधू सरळ काँग्रेसला येऊन मिळाले व राजकारणाला नवें स्वरूप व नवी दिशा प्राप्त झाली.

खिलाफत-शिष्टमंडळाबरोबर महमदअल्ली लवकरच युरोपांत गेले व इकडे खिलाफत-चळवळ अधिकाधिक प्रमाणांत गांधीजींच्या हातीं येऊन अहिंसामय असहकाराचाहि ती विचार करूं लागली. १९२० च्या जानेवारींत दिल्लीस व्हाइसरॉयला भेटण्यासाठीं एक खिलाफतीचें शिष्टमंडळ जाणार होतें. गांधीजीहि त्यांत सामील व्हावयाचे होते. ते दिल्लीस पोंचण्याच्या आधींच व्हाइसरॉयकडे मागण्यांचा कच्चा मसुदा पाठविण्यांत आला. गांधीजींनीं मसुदा वाचून तो नापास केला; इतकेंच नव्हे, तर त्यांत मूलतः बदल होणार नसेल तर शिष्टमंडळाबरोबर जाण्याचेंहि नाकारलें. त्यांचा आक्षेप असा होता कीं मसुद्यांत संदिग्धपणा फार आहे आणि किमान मागण्यांचा मुळीं उल्लेखच नाहीं. हें व्हाइसरॉयच्या, ब्रिटिश सरकारच्या, लोकांच्या अगर स्वतःच्या कोणाच्याच दृष्टीनें रास्त नव्हे. उगीच भरमसाट मागण्या न करतां आपल्या किमान मागण्या निखालस शब्दांत मांडाव्यात व त्यांसाठीं जिवांत जीव असेपर्यंत झगडावें. मागण्यांविषयीं खरी कळकळ असेल, तर हाच एक सन्माननीय व योग्य मार्ग आहे.

हिंदी राजकारणी मंडळींना ही सूचना अगदींच नवीन वाटली. अतिशयोक्तिपूर्ण शब्दांनीं आपलें म्हणणें सजवून व्यापाऱ्यासारखी हुंगल घालीत बसण्याची आम्हांला संवय झाली होती! गांधीजींनीं व्हाइसरॉयच्या खाजगी चिटणीसांना कांहीं नवे परिच्छेद कळवले. त्यांत किमान मागण्या ग्रथित केलेल्या होत्या. व्हाइसरॉयचें उत्तर मोठें मजेशीर होतें. त्यांनीं जबाब पाठवला, कीं पूर्वींचा मसुदाच ठीक होता; नव्या मागण्या मान्य करतां येत नाहींत.

खिलाफत-समितीच्या मागण्या सरकार धुडकावून लावील ही गोष्ट स्पष्ट दिसत होती. झगडा करावा लागणार हेंहि निश्चित होतें. मौलवींशीं व उलेमांशीं खूप चर्चा झाली. अहिंसा, असहकार वगैरेंचा कीस निघाला. अहिंसेचा मार्ग संपूर्णपणं मान्य असेल तर आपण तुमच्या सेवेला सादर आहोंत, पण अहिंसेंत भेसळ, लटपट, खाडाखोडी, कोठेंहि होतां कामा नये असें गांधींनीं कळवलें. अहिंसेची कल्पना मौलवींना उलगडणें सोपें नव्हतें. पण शेवटीं आमच्या धर्मांत योग्य कामासाठीं हिंसा करण्यास प्रत्यवाय नाहीं, तेव्हां अहिंसेला तत्त्व म्हणून नव्हे तर धोरण म्हणून आम्ही मान्यता देतों, असें त्यांनीं कळवलें.

राजकीय चळवळ व खिलाफत-चळवळ १९२० सालीं जोडीनें वाढत होत्या. दोन्ही एकाच दिशेनें निघाल्या होत्या. काँग्रेसनें गांधीजींच्या अहिंसायुक्त असहकारितेचा स्वीकार केल्यावर या दोन्ही चळवळी एकमेकींशीं निगडित झाल्या. खिलाफत-समितीनें हा नवा कार्यक्रम प्रथम स्वीकारला व १ ऑगस्टपासून मोहिमेला सुरुवात करण्याचें नक्की ठरलें.

वर्षाच्या प्रारंभीं अलाहाबादेला सय्यद राझा अलींच्या घरीं मुस्लिम-लीगच्या कौन्सिलची बैठक भरली होती. माझी तेथें पूर्ण निराशा झाली. शौकतअली उत्साही दिसत होते. पण बहुतेक बाकीचे पुढारी आंबट तोंडें करून बसलेले दिसले. त्यांना विरोध करण्याचें धैर्य होईना, आणि कार्यक्रमांत सामील होण्याचेंहि धाडस होईना. हे पुढारी कशाची क्रान्तिकारक चळवळ करणार आणि ब्रिटिश सरकारला हे काय आव्हान देणार, असे विचार माझ्या मनांत आले. गांधीजी तेथें बोलले. त्यांचें तें भाषण म्हणजे त्यांच्या उत्कृष्ट अधिकारयुक्त भाषणांपैकीं एक होतें. विनययुक्त पण स्पष्ट आणि वज्राप्रमाणें कठिण, गोड व मृदु पण त्याचबरोबर सडेतोड आणि कळकळीनें भरलेले असे ते शब्द ऐकल्यावर तेथल्या मुसलमान पुढाऱ्यांची अधिकच तारांबळ उडाली.

भाषणांतील ते युद्धनीतिविषयक दृष्टांत व ती धगधगणारी तळमळ पाहून श्रोत्यांपैकीं बहुतेकांची पांचांवर धारण बसली. परंतु डगमगणाऱ्या श्रोत्यांचा धीर कायम ठेवण्याचें काम शौकतअली बजावीत होते. त्यामुळे मतदानाची वेळ येतांच बहुतेक लोकांनीं पडक्या तोंडानें हळूच ठरावाच्या बाजूनें म्हणजे लढाईला अनुकूल मतें दिलीं !

मुस्लिम-लीगपैकीं फारच थोड्यांनीं लढ्यांत भाग घेतला. बहुतेक लोक सरकारी नोकऱ्यांच्या आश्रयाला गेले. मुस्लिम-लीग ही बहुसंख्य मुसलमानांची प्रातिनिधिक अशी संस्था कधींच नव्हती. १९२० ची खिलाफत कमिटी हीच खरी प्रातिनिधिक व प्रबळ संस्था. तिनें मात्र लढ्यांत उत्साहानें भाग घेतला.

गांधीजींनीं असहकारितेच्या लढ्याला १ ऑगस्ट रोजीं प्रारंभ करावयाचा

असें ठरविलें असलें, तरी ह्या सूचनेला काँग्रेसची मान्यता अद्यापि मिळालेली नव्हती. त्याच दिवशीं मुंबईत लोकमान्यांनीं देह ठेवला. सिंधमधील दौरा आटोपून गांधीजी सकाळींच मुंबईला पोंचले होते. मीहि त्यांच्याबरोबर होतों. आपल्या प्रिय अशा महान् पुढाऱ्याच्या शवाचा सन्मान करण्यासाठीं मुंबईचे लक्षावधि लोक ज्या भव्य मिरवणुकींत सामील झाले होते, तींत आम्हीहि जाऊन मिळालों.

८

# माझी हकालपट्टी

माझ्या वर्गाचें म्हणजे मध्यम वर्गाचें माझें राजकारण होतें. त्या वेळचें शब्दनिष्ठ राजकारण ( आणि बऱ्याच प्रमाणांत हल्लींचेंहि ) मध्यम वर्गापुरतेंच असे. नेमस्त झाले काय अगर जहाल झाले काय, सगळे मध्यम वर्गाचेच प्रतिनिधी. त्यांनीं आपल्या वर्गहितासाठीं निरनिराळ्या सुरांत हाकाटी चालविली होती. वरिष्ठ मध्यम वर्गातल्या मूटभर लोकांचे प्रतिनिधी म्हणजे नेमस्त. त्यांना ब्रिटिश राजवटींतच बहुधा बरकत प्राप्त झाली होती. त्यांच्या चालू सामाजिक प्रतिष्ठेला व हिताला बाध आणील असा कोणताच मूलग्राहि पालट त्यांना पसंत पडणें शक्य नव्हते. ब्रिटिश नोकरशाहीशीं व जमीनदार वर्गाशीं त्यांचे हितसंबंध निगडित झालेले होते. जहाल हे कनिष्ठ मध्यम वर्गाचे पुरस्कर्ते म्हणून उभे होते. कारखान्यांतले कामगार महायुद्धामुळें संख्येनें बरेच वाढले होते. ठिकठिकाणीं त्यांचे स्थानिक संघ असले, तरी त्यांचा प्रभाव फारसा पडत नसे. शेतकरी मात्र आंधळा, दरिद्री व दुःखी असा राहिला होता. दैवाशीं जुळतें घेऊन सरकार, जमीनदार, सावकार, छोटेमोठे अधिकारी, शिपाई, वकील, भटजी या सर्वांच्या लाथा खात आणि पिळणूक सहन करीत तो स्वस्थ पडला होता.

वृत्तपत्रें वाचणाराच्या मनांत हिंदुस्थानांत लक्षावधि कामकरी-शेतकरी आहेत अथवा त्यांना समाजांत कांहीं महत्त्वाचे स्थान आहे, असा विचार-सुद्धां डोकावला नसता. ब्रिटिशांच्या मालकीचीं अंग्लो-इंडियन वृत्तपत्रें बड्या अधिकाऱ्यांच्या बातम्या तेवढ्या छापीत. त्यांचे नाच, त्यांच्या जेवणावळी, त्यांचीं नाटकें वगैरे मजकूर त्यांत सविस्तर असावयाचा. हिंदुस्थानच्या माणसाचा राजकीय दृष्टिकोण ते कशाला मांडतील? कॉंग्रेस-अधिवेशनाचें वृत्तदेखील मागच्या पानावर चार ओळींत असावयाचें! पण एखाद्या प्रमुख अगर फुसक्या हिंदी गृहस्थानें कॉंग्रेसची निंदा केली कीं मग ती मात्र ठळक जागीं यावयाची. कधीं कधीं संपाविषयीं ओझरता उल्लेख येई आणि शेतकरी भागांत एखादें बंडच उभें राहिले, तर त्याचाहि नाम-निर्देश होई.

हिंदी वृत्तपत्रांनीं इंग्रजी पत्रांचाच कित्ता पुढें ठेवला असला, तरी राष्ट्रीय चळवळीला ते बरेंच महत्त्वाचें स्थान देत असत. हिंदी लोकांची एखाद्या छोट्या-मोठ्या जागीं नेमणूक झाली, कीं त्यांना त्याचें मोठें महत्त्व वाटे. जमिनीची फेर-

तपासणी होऊं लागली कीं सरकारसारा वाढावयाचा हें ठरल्यासारखेंच असे. त्याविरुद्ध वृत्तपत्रांतून मोठा गिल्ला होई. कारण वाढत्या साऱ्यामुळें जमीनदाराच्या खिशाला चाट बसे. गरीब कुळांची ना दाद ना फिर्याद. वृत्तपत्रें बहुधा जमीनदार व कारखानदारांच्या हातींच असत. "राष्ट्रीय वृत्तपत्रां"ची अवस्था ही अशी होती.

प्रारंभींची काँग्रेसची नेहमींची मागणी म्हणजे कायमधारापद्धतीची. जमीनदारांचें हित साधण्याचा यांतील उद्देश स्पष्ट होता. त्यांत कुळांचा उल्लेख मुळींच दिसून येत नाहीं. राष्ट्रीय चळवळीच्या वाढीबरोबर गेल्या वीस वर्षांत परिस्थितींत फारच बदल घडून आला आहे. आणि आपले हिंदी वाचक कायम ठेवण्यासाठीं अँग्लो-इंडियन वृत्तपत्रेंहि हिंदी राजकीय प्रश्नास महत्त्वाचें स्थान देऊं लागलीं आहेत. हिंदी वृत्तपत्रांची दृष्टि मात्र जरा अधिक व्यापक झाली असून हल्लींची टूम म्हणून शेतकरी-कामकऱ्यांबद्दल तीं थोडीफार आस्था दाखवतात. औद्योगिक व ग्रामीण प्रश्नांकडेहि तीं लक्षपूर्वक पाहूं लागलीं आहेत. असें असलें, तरी पूर्वीप्रमाणें आतांहि आपल्या जमीनदार व कारखानदार मालकांच्या हितासंबंधींचेच विचार त्यांत मुख्यतः आढळून येतात. पुष्कळ हिंदी संस्थानिकहि वृत्तपत्रव्यवसायांत पैसे गुंतवून स्वतःचा फायदा करून घेत आहेत. ज्या वृत्तपत्रांचे मालक काँग्रेसचे साधे सभासदहि नाहींत, त्यांनाहि काँग्रेसपक्षाचीं वृत्तपत्रें असें म्हणण्यांत येतें. काँग्रेसचें नांव लोकप्रिय आहे, तेव्हां फायदा उकळण्यासाठीं कांहीं व्यक्ति व गट त्याचा उपयोग करीत असतात. खऱ्या जहाल मतांचा पुरस्कार करणाऱ्या वृत्तपत्रांना मात्र दंड व दडपशाही या गडांतरांपासून सदोदित भय असतें.

१९२० सालापर्यंत शेतांत व कारखान्यांत राबणाऱ्या मजुरांच्या परिस्थितीविषयीं मला कांहींच माहिती नव्हती. माझा सारा राजकीय दृष्टिकोण मध्यमवर्गीय होता. भीषण दारिद्र्य व दुःख मजुरांत पसरलेलें आहे हें मला ठाऊक होतें आणि राजकीय दृष्ट्या हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं ह्या प्रश्नांचें निराकरण करणें हें काम प्रथम हातीं घेतलें पाहिजे, असेंहि मला वाटे. परंतु पुढचा अपरिहार्य टप्पा म्हणजे मध्यम वर्गाच्या वर्चस्वाखालीं नांदणारा हिंदुस्थान, याबद्दल मला शंका वाटत नसे. गांधीजींच्या चंपारण्यांतील व कैरामधील चळवळीनंतर मी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जरा अधिक लक्ष देऊं लागलों. परंतु १९२० सालच्या राजकीय चळवळीच माझ्या डोक्यांत घोळत होत्या. माझ्या दृष्टीसमोर क्षितिजावर उदयास येत असलेल्या असहकारितेचींच चित्रें येत होतीं !

त्याच सुमाराला माझ्या राजकीय जीवनांत एक नवीनच प्रकरण उद्भवून त्याला पुढें फार महत्त्व प्राप्त झालें. जवळजवळ यदृच्छया मी शेतकऱ्यांत खेंचला गेलों म्हणाना. तो प्रसंग असा :

माझी आई व कमला ( माझी पत्नी ) आजारी होत्या. १९२०च्या मे महिन्याच्या प्रारंभीं मी त्यांना घेऊन मसुरीला गेलों. माझे वडील एका मोठ्या राज्याच्या

खटल्यांत गुंतले असून चित्तरंजन दास त्यांच्या विरुद्ध बाजूला होते. आम्ही मसुरीला सव्हॉय हॉटेलांत उतरलों. त्या वेळीं तेथें अफगाण व ब्रिटिश वकिलांत तहाच्या वाटाघाटी सुरू होत्या. अफगाण वकील सव्हॉय हॉटेलांतच उतरले होते. ते दूरदूरच राहात, एकीकडे भोजन करीत व सार्वजनिक दिवाणखान्यांत फिरकतही नसत. मलाहि त्यांची विशेष विचारपूस करण्याचें कारण नव्हतें. एक महिना गेला, तरी अफगाण वकिलातीपैकीं एकाहि माणसाचा चेहरा माझ्या नजरेला पडला नाहीं, आणि पाहिला असला तरी मला ओळख पटली नाहीं. एके दिवशीं संध्याकाळीं पोलिस सुपरिंटेंडंट अचानक माझ्या खोलीवर आले आणि स्थानिक सरकारकडून त्यांना आलेलें पत्र त्यांनीं मला दाखविलें. त्यांत मी अफगाण वकिलातीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं असें माझ्याकडून लेखी लिहून घेण्यांत यावें असें लिहिलें होतें. मला हें विचित्र वाटलें; कारण सबंध एका महिन्याच्या अवधींत मीं त्यांना एकदांहि डोळ्यांनीं देखलें नव्हतें, व पुढेंहि ते नजरेला पडण्याचें कारण नव्हतें. सुपरिंटेंडंटला ही गोष्ट माहित होती; कारण अफगाण वकीलमंडळावर त्याचें बारीक लक्ष असे. खरें म्हणजे गुप्त पोलिस खात्याचें टोळकेंच्या टोळकें तेथें टेहळणीवर होतें. लेखी हमी लिहून देणें माझ्या स्वभावाविरुद्ध होतें म्हणून मीं त्याला नकार दिला. त्यानें मला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला भेटावयास सांगितलें. मी त्याप्रमाणें गेलों. माझा नकार कायम राहिल्यामुळें माझ्यावर हद्दपारीचा हुकूम बजावण्यांत आला व डेहराडून जिल्हा चोवीस तासांत सोडून जाण्याची आज्ञा झाली. याचा अर्थ असा कीं मसुरी-हून कांहीं तासांतच मुक्काम हालवणें जरूर होतें. आजारी आईला व पत्नीला तेथेंच सोडून जावें हें मला प्रशस्त वाटेना. पण हुकुम मोडावा असेंहि वाटेना. त्या वेळीं कायदेभंग चालू नव्हता, म्हणून मी मसुरीहून निघालों.

संयुक्त प्रांताचे गव्हर्नर सर हारकोर्ट बटलर यांच्याशीं वडिलांची चांगली ओळख हती. त्यांना वडिलांनीं एक मित्रत्वाचें पत्र लिहिलें. असला मूर्खपणाचा हुकूम आपण बजवावयास सांगितलेला असणें शक्य नाहीं, सिमल्याच्या कोणा तरी फाजिल हुषार अधिकाऱ्याची ही शक्कल असावी असें त्यांनीं पत्रांत लिहिलें होतें. सर हारकोर्ट यांचें उत्तर आलें कीं हुकूम कोणत्याहि प्रकारें त्रासदायक नव्हता आणि लेखी हमी लिहून देण्यांत जवाहरलालची मानहानि झाली असती असेंहि नाहीं. वडिलांनीं प्रत्युत्तरांत आपला मतभेद व्यक्त केला व कळवलें कीं, हुकूम जाणूनबुजून मोडण्याची इच्छा नाहीं. परंतु आईची अथवा पत्नीची प्रकृति बिघडली असेल, तर हुकुमाची पर्वा न करतां मी मसुरीला गेल्यावांचून राहाणार नाहीं. योगायोग असा कीं आईची प्रकृति अधिकच खालावली आणि वडील व मी दोघेहि मसुरीस जाण्या-करितां निघालों निघण्याच्या जरा आधीं हुकूम रद्द केल्याची तार आमच्या हातीं पडली.

सकाळीं मसुरीला जाऊन पाहातों तों हॉटेलच्या चौकांत एक अफगाण वकील

माझ्या मुलीला हातांत घेऊन उभा होता. मागाहून असें कळलें कीं माझ्या हद्दपारीमुळें आमच्याबद्दल अफगाण वकीलमंडळांत कुतूहल निर्माण झालें व तेव्हांपासून माझ्या आईकडे दररोज एक फळांची करंडी व एक फुलांचा गुच्छ अफगाण वकीलमंडळा-कडून पोंचता होऊं लागला.

नंतर त्यांच्यापैकीं एकदोघांशीं आमची भेटहि झाली व अफगाणिस्थानांत या असें आग्रहाचें निमंत्रणहि त्यांनीं आम्हांला दिलें. तें नव्या राजवटींत अद्याप कायम आहे कीं नाहीं कोणास ठाऊक !

या निर्वासनाच्या हुकुमामुळें मला अलाहाबादेस दोन आठवडे काढावे लागले आणि तेवढ्या त्या काळांत मी किसान-चळवळीशीं जखडला गेलों. हा संबंध पुढें पुढें फारच वाढला व त्याचा माझ्या मनावर खूप परिणामहि झाला. मी हद्दपार होऊन त्याच सुमारास अलाहाबादेला रिकामपणीं बसलेला नसतों, तर काय झालें असतें असा विचार कधीं कधीं मनांत येतो. किसान-चळवळींत मी बहुशः केव्हां ना केव्हां तरी खेंचला गेलोंच असतों; पण मग माझें जाणें निराळ्या मार्गानें झालें असतें व माझ्या मनावर संस्कारहि निराळेच उमटले असते.

मला आठवतें तें असें कीं १९२० च्या जूनमध्यें प्रतापगडच्या अगदीं आंतल्या भागांतून सुमारें दोनशें किसान पन्नास मैलांची वाट तुडवीत अलाहाबादेला आले. तेथल्या प्रमुख राजकीय पुढाऱ्यांचें आपल्या दुःखद अवस्थेकडे लक्ष वेधावें असा त्यांचा हेतु होता. त्यांचा म्होरक्या रामचंद्र हा तेथला राहणारा नव्हता. यमुनेच्या एका घाटावर कांहीं किसान बैठक मारून बसले आहेत, असें मला कळल्यावरून कांहीं मित्रां-समवेत मी तेथें गेलों. तालुकदारांहून होणारी अतिरिक्त पिळणूक, अमानुष छळ वगैरेसंबंधीं आपली कहाणी त्यांनीं मला सांगितली. ही स्थिति असह्य होत आहे असेंहि ते म्हणाले. आमच्या सांगाती चला, विचारपूस करा, आम्ही गाऱ्हाणीं मांडण्या-साठीं येथवर आलों म्हणून रागावलेले तालुकदार सूड घेतील त्यापासून आम्हांला वांचवा, असेंहि त्यांनीं विनविलें. येत नाहीं ही भाषाच ऐकायला ते तयार नव्हते. मला त्यांनीं खरोखरी धरूनच ठेवलें. शेवटीं दोनएक दिवसांनीं त्यांच्या भागांत येतों असें मीं वचन दिलें.

कांहीं सहकाऱ्यांसमवेत मी तिकडे गेलों व तीन दिवस आगगाडीपासून आणि पक्क्या सडकेपासून दूर आंत असणाऱ्या खेड्यांत घालवले. त्या भेटीनें माझे डोळे लख्ख उघडले. तो सर्व टापू उत्साहानें चैतन्यमय झाला होता व लोकांत विलक्षण लगबग चाललेली होती. थोडी सूचना दिली कीं पुरे, लोकांचे थवेच्या थवे जमत. एक खेडें दुसऱ्याला, दुसरें तिसऱ्याला वर्दी देई. आणि सर्व माणसें खेड्याबाहेर लोटत आणि सभास्थानाकडे येणाऱ्या बायकापुरुषांची व मुलांची शेतांतून मुंग्यां-प्रमाणें रीघ लागलेली दिसत असे. त्याहून तांतडीची सभा असली तर 'सीताराम' अशी आरोळी दिली म्हणजे सर्व दिशांना ती निनादत असे आणि इतर खेड्यांतून

तिला प्रत्युत्तर मिळून लोक धांवतच येत असत. स्त्रीपुरुषांच्या अंगावर लक्तरें असलीं, तरी त्यांच्या चेहऱ्यावर उत्साहाच्या लहरी उमटलेल्या दिसून येत व कांहीं तरी चमत्कार घडून येणार असून त्यामुळें त्यांचीं दुःखें नष्ट होणार आहेत, अशी आशा त्यांच्या डोळ्यांत चमकत राही !

आम्ही त्यांच्यासाठीं कांहीं वरदान घेऊन आलों आहोंत, त्यांना आशास्थानाकडे नेणारे आम्ही जणुं कांहीं वाटाडे आहोंत, असें समजून ते आमच्याकडे मोठ्या प्रेमानें व आशेनें पाहात असत आणि तऱ्हेतऱ्हेनें आमच्यावर माया करीत. त्यांच्या दारिद्र्याकडे आणि अपरंपार कृतज्ञतेकडे पाहिलें, कीं माझें अंतःकरण दुःखानें व लज्जेनें भरून येई. माझ्या सुखासीन आणि निष्काळजी आयुष्याचा विचार मनांत आला कीं लज्जा वाटे. आणि हिंदुस्थानांतल्या लाखों अर्धनग्न स्त्रीपुरुषांकडे दुर्लक्ष करणारें आमचें शहरी राजकारण किती क्षुद्र याची जाणीव झाली आणि दारिद्र्याच्या आणि मानहानीच्या पुरांत बुडालेलें हिंदुस्थान पाहिलें कीं दुःख वाटत असे. नग्न, उपाशी, पिळलेल्या आणि गांजलेल्या हिंदुस्थानचें नवेंच चित्र माझ्या दृष्टीसमोर उभें राहिलें आणि लांब शहरांतून सहजगत्या भेटीस आलेल्या आम्हां परस्थांवरची त्यांची श्रद्धा पाहून, मनाला एका नव्याच जबाबदारीची जाणीव झाली. त्यांचें दुःख, सारखा वाढत जाणारा व कंबरडें मोडून टाकणारा खंडाचा बोजा, बेकायदेशीरपणें केलेली लुबाडणूक, खोपटांतून व जमिनीवरून त्यांची करण्यांत आलेली हकालपट्टी, मारपीट वगैरेंसंबंधीं त्यांनीं सांगितलेल्या कहाण्या मीं ऐकल्या. जमीनदारांचे पित्ते, सावकार आणि शिपाई हे गिधाडांप्रमाणें त्यांना घेरून टाकीत असत. सर्व दिवसभर राबून ते जें पिकवीत तें त्यांच्यापाशीं राहात नसे. श्रमाचे त्यांना मिळणारें फळ म्हणजे लाथाबुक्क्या, शिव्यागाळी आणि वीतभर खोल गेलेलें पोट ! तेथें हजर असलेल्या पुष्कळ लोकांना जमीन राहिली नव्हती. जमीनदारांनीं त्यांना बाहेर काढलें होतें. जमीन सुपीक असली, तरी तिच्यावरील बोजा बेफाम वाढला होता. शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडले होते, आणि त्यांच्यावर पोट भरणारांची मनस्वी गर्दी झाली होती. शेत मिळवण्यासाठीं चाललेल्या धडपडीचा जमीनदार फायदा घेत. कायद्याप्रमाणें शेकडा अमुक टक्क्यांहून जास्त खंड घेतां येत नसल्याकारणानें ते बेकायदेशीर पैसे उकळीत. कुळांना दुसरें गत्यंतर नसल्यामुळें सावकारांकडून कर्ज काढून जमीनदारांचे खिसे ते भरीत असत आणि मग कर्ज आणि खंड यांपैकीं कशाशीच फेड झाली नाहीं, कीं जमिनीवरून त्यांची हकालपट्टी होऊन ते सगळेंच गमावून बसत !

ही प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे व शेतकरी भिकारी होत चालले आहेत. असें असतां वातावरण एकाएकीं गरम होण्याचें व लोकांनीं उग्र स्वरूप धारण करण्याचें कारण काय? आर्थिक परिस्थिति. पण आर्थिक परिस्थिति कारण म्हणावी, तर सर्व औध प्रांतांत हीच दशा आढळून येते. शेतकऱ्यांनीं १९२०

व १९२१ सालीं उचल खाल्ली ती फक्त प्रतापगड, रायबरेली आणि फैजाबाद या तीन जिल्ह्यांपुरतीच. याचें कारण एवढेंच कीं, बाबा रामचंद्र याचें नेतृत्व त्या भागांतल्या शेतकऱ्यांना लाभलें होतें.

रामचंद्र हा महाराष्ट्रीय होता. त्यानें फिजी बेटांत मुदतबंदीच्या मजुराचें काम केलेलें होतें. तेथून परतल्यावर तो फिरत फिरत औंध प्रांताकडे वळला. तुळशी-दासाचें रामायण वाचीत व कुळांचीं गाऱ्हाणीं ऐकत तो भटकत असे. त्याच्या अंगीं चांगल्या प्रकारें संघटनाकौशल्य होतें. सभा भरवून आपल्या दुःखासंबंधीं विचार करण्याची गोडी त्यानें शेतकऱ्यांत उत्पन्न केल्यामुळें त्यांच्यांत एकीची भावना निर्माण झाली. कधीं कधीं शेतकऱ्यांच्या प्रचंड सभा भरत. अशा प्रसंगीं आपल्या शक्तीची ओळख त्यांना होत असे. 'सीताराम' या शब्दाला रामचंद्रानें युद्धघोषणेचें स्वरूप प्राप्त करून दिलें होतें. शेतकऱ्यांची संघटना त्यानें केली खरी, परंतु कार्यक्रम असा त्याच्यापाशीं कोणताच नव्हता. शेतकऱ्यांना त्यानेंच अलाहाबादेपर्यंत आणलें होतें.

शेतकरी-चळवळींत रामचंद्रानें पुढेंहि प्रामुख्यानें भाग घेतला आणि दोनतीन वेळां शिक्षाहि भोगल्या. परंतु नंतर तो बेजबाबदार व अविश्वासार्ह माणूस आहे, असें आढळून आलें.

शेतकरी-चळवळीला पोषक अशी भूमि औंधमध्यें होती. औंधमध्यें तालुक-दारांचा अमल चालतो. तालुकदार स्वतःला औंधचे सरदार असें म्हणवून घेतात. जमीनदारी पद्धतीचें अत्यंत हिडिस स्वरूप तेथें पाहावयास सांपडतें. जमीनदारांची पिळणूक असह्य होत होती, आणि शेतमजुरांची संख्या फुगत चालली होती. थोड-क्यांत म्हणजे कुळांचा एकच वर्ग तेथें शिल्लक राहिला असल्यामुळें संघटित प्रयत्न करणें शक्य झालें.

हिंदुस्थानचे सामन्यपणें दोन विभाग करतां येतील. मोठमोठ्या जमीन-दारांचा एक भाग आणि रयतवारी पद्धति अमलांत असलेला दुसरा भाग. कांहीं कांहीं ठिकाणीं जमीनदारी व रयतवारी अशा दोन्ही पद्धतींचें मिश्रण झालें आहे. बंगाल, विहार व संयुक्तप्रांत यांच्यामध्यें जमीनदारी अस्तित्वांत आहे. रयतवारी विभागां-तले शेतकरी सापेक्षतया जरी सुखी असले, तरी त्यांचीहि स्थिति करुणास्पदच आहे. रयतवारीच्या पंजाब व गुजरात प्रांतांतली शेतकरी-जनता जमीनदारी विभागां-तल्या कुळांपेक्षां पुष्कळच सुखी आहे. जमीनदारी प्रदेशांतल्या निरनिराळ्या प्रकारच्या कुळांचे हितसंबंध पुष्कळ वेळां परस्परविरोधी असल्यामुळें संघटित प्रयत्न करणें अवघड होतें. औंधमध्यें मात्र १९२० सालीं एकाच प्रकारचीं म्हणजे थोड्या मुदतीचीं कुळें होतीं. अधिक खंड देणारें कूळ भेटलें कीं जुन्या कुळाची हकाल-पट्टी करण्यांत येत असे. एक प्रकारचींच कुळें औंधमध्यें मुख्यतः असल्यामुळें त्यांची संघटना करणें सोपें झालें. अल्प मुदतीच्या कुळांना मुद्दां औंधमध्यें शाश्वती अशी कांहींच लाभत नसे. खंडाची पावती जमीनदाराकडून क्वचितच मिळे व खंड थकलेला

आहे हें ठेवणींतलें हमखास निमित्त सांगून कुळाची हकालपट्टी करतां येई. खंडाव्यतिरिक्त पैसा उकळण्याचे बेकायदेशीर मार्ग तर असंख्य होते. मला असें सांगण्यांत आलें कीं एका तालुक्यांत तर पन्नास निरनिराळ्या प्रकारचे कर द्यावे लागत ! जमीनदाराच्या घरीं लग्न निघालें, मुलगा विलायतेस शिक्षणासाठीं चालला, नवीन मोटर घेतली, तर त्याबद्दल कुळांना जादा कर द्यावे लागत ! अशा विशिष्ट करांना मट्रौन ( मोटर कर ), हाथौना ( हत्तीकर ) अशीं नांवेंहि तिकडे प्रचलित आहेत. अशी स्थिति असतां मोठमोठ्या शेतकरी-चळवळी उभ्या रहाव्यात ह्यांत नवल नाहीं. तथापि नवलाची गोष्ट वाटली ती ही कीं, शहराच्या अथवा कोणत्याहि राजकारणी व्यक्तीच्या सहाय्याशिवाय या चळवळी स्थानिक उत्साहाच्या बळावर फोफावल्या होत्या. शेतकरी-चळवळीचा काँग्रेसशीं अथवा नवीनच उदयास येणाऱ्या असहकारितेशीं काडीइतकाहि संबंध नव्हता. परंतु ही गोष्ट खरी कीं, असहकारितेची चळवळ काय अगर शेतकऱ्यांची चळवळ काय, ह्या दोन्हीहि व्यापक आणि प्रबळ चळवळी एकाच कारणपरंपरेंतून उदयास आल्या होत्या. शेतकऱ्यांनीं १९१९ सालच्या देशव्यापी हरताळांत भाग घेतला आणि गांधीजींचें नांव खेड्यांत लोकप्रिय झालें. आम्हां शहरांतल्या लोकांना या शेतकरी-चळवळींचा मुळींच थांगपत्ता नव्हता ह्याचेंच मला आश्चर्य वाटलें. कोणत्याहि वृत्तपत्रांत ह्यासंबंधीं एक ओळहि येत नव्हती; कारण त्यांना शेतकऱ्यांबद्दल कळकळच वाटत नसे. आम्ही खऱ्या जनतेपासून किती दूर आहोंत आणि आम्ही ज्या जगांत राहतों, काम करतों, आणि चळवळी चालवतों तें किती संकुचित आहे, याची मला त्या वेळीं जाणीव झाली.

९

# किसानांतील परिभ्रमण

तीन दिवस मी खेड्यांत राहिलों. नंतर अलाहाबादला परतलों आणि पुन्हां खेडेगांवांत गेलों. या धांवत्या भेटींत आम्ही खेड्यांखेड्यांतून बरेच हिंडलों, शेतकऱ्यांच्याबरोबर जेवलों–खाल्लों, मातीच्या खोपटांतून त्यांच्याबरोबर बसलों–उठलों, प्रहरचे प्रहर त्यांच्याबरोबर चर्चा केली, आणि लहानमोठ्या सभांतून पुष्कळ वेळां व्याख्यानेंहि दिलीं. प्रारंभीं आम्हीं एक लहानशी मोटर बरोबर घेतली होती. शेतकऱ्यांचा उत्साह इतका दांडगा होता कीं शेंकडों लोक रात्रभर खपून आमची मोटर थेट गांवांत जावी म्हणून शेतांतून कच्चे रस्ते बांधून देत आणि पुष्कळ वेळां गाडी चिखलांत रुतून बसली तर शेतकरी ताबडतोब तिला बाहेर काढीत. शेवटीं आम्हांला गाडीचा नाद सोडून देऊन बहुतेक प्रवास पायींच करावा लागला. आम्ही जाऊं तेथें शिपाई, गुप्त पोलिस व लखनौचे एक डेप्युटी कलेक्टर आमच्याबरोबर येत. आमच्या अखंड भटकण्यामुळें त्यांना खूपच त्रास झाला असावा. डेप्युटी कलेक्टरसाहेब तरुण होते, पण जरा बायकी वळणाचे होते. पेटंट कातड्याचे बूट चढवून ते आमच्याबरोबर हिंडत असत. जरा बेतानें घ्या असें ते आम्हांला मोठ्या काकुळतीनें विनवीत. सरतेशेवटीं आमच्याबरोबर फिरणें अशक्य होऊन त्यांनीं तो नाद सोडून दिला !

जून महिन्यांतले पावसाळ्याच्या जरा आधींचे ते दिवस होते. उन्हामुळें अंग भाजून निघे आणि डोळ्यांपुढें अंधेरी येई. उन्हातान्हांतून हिंडण्याची मला जरासुद्धां संवय नव्हती. इंग्लंडहून आल्यापासून तर दर उन्हाळ्यांत मी थंड हवेच्या ठिकाणीं जात असें. डोक्याला लहानसा टॉवेल गुंडाळून रखरखीत उन्हांतून सर्व दिवसभर मला भटकावें लागे. इतर गोष्टींत मन गुंतलेलें असल्यामुळें उन्हाचे मला भानच राहिलें नाहीं. अलाहाबादला आल्यानंतर माझ्या काळवंडलेल्या शरीराकडे जेव्हां माझें लक्ष गेलें, तेव्हांच मी किती उन्हांतून हिंडत होतों ह्याची मला कल्पना आली. अगदीं दणकट माणसाच्या बरोबरीनें आपणालाहि उन्हातान्हांतून काम करतां येतें, आपल्याला उगाचच उन्हाची भीति वाटत होती, असे विचार मनांत येऊन मला आनंद वाटला. कोणत्याहि प्रकारचा फारसा त्रास न होतां कडक उन्हाळा आणि कडक थंडी मला सहन करतां येत असल्यामुळें माझें काम पुष्कळच सुकर झालें आहे. त्यामुळें तुरुंगवासहि मला जड जात नाहीं. ही सहनशक्ति व्यायामाच्या संवयीमुळें व आरोग्यामुळें माझ्या अंगीं आली. व्यायामाची

गोडी मला वडिलांनींच लावली. अखेर अखेरपर्यंत ते दररोज व्यायाम करीत. त्यांचे केस पांढरे शुभ्र झाले, तोंडावर सुरकुत्या पडल्या व अतिविचारामुळें ते वृद्ध दिसूं लागले, तरी मरणापूर्वी एकदोन वर्षेपर्यंत वार्धक्याची सावली त्यांच्या इतर शरीरावर पडली नाहीं.

१९२० जूनच्या आधीं मी शेतकऱ्यांशीं अनेकदां बोललों होतों, गंगेच्या तीरावर त्यांचे प्रचंड मेळे जमलेले पाहिले होते आणि होमरूलची चळवळहि आम्हीं त्यांच्यापर्यंत पोंचविली होती. परंतु त्यांचें हिंदुस्थानच्या राजकारणांतील महत्त्व त्या वेळीं माझ्या पूर्णपणें लक्षांत आलेलें नव्हतें; तें प्रतापगड जिल्ह्यांत मी गेलों तेव्हां मला कळून आलें. कदाचित् वातावरणांत त्या वेळीं कांहीं नवें चैतन्याचें वारें खेळत असेल अथवा माझें मन अधिक संवेदनाक्षम झालेलें असेल. त्या वेळीं मीं पाहिलेल्या जीवनाचा ठसा माझ्या मनावर कायमचा कोरला गेला एवढें मात्र खरें.

शेतकऱ्यांत फिरूं लागल्यामुळें माझ्यांतला बुजरेपणा जाऊन मला सभेंत भाषण करतां येऊं लागलें. पूर्वी मी सभेंत क्वचित्च बोललों असेन. हिंदुस्तानींत भाषण करावयाचें म्हणजे तर मला भीतीच वाटे. पण शेतकऱ्यांशीं बोलणेंच प्राप्त होतें आणि ह्या भाबड्या जीवांची भीति तरी मला कशी वाटणार? मला वक्तृत्व-कला अवगत नव्हती. माझ्या मनांत जें असेल तें मी त्यांना सरळ सरळ सांगून टाकीत असें. सभेंत दहा माणसें असोत कीं दहा हजार असोत, मीं माझी संभाषणात्मक पद्धतीच चालू ठेवली होती. पुष्कळांना माझ्या म्हणण्यापैकीं बराचसा भाग समजत नसावा. माझें बोलणें व माझे विचार शेतकऱ्यांना समजतील इतके सोपे नव्हते. सभा फार मोठी असली म्हणजे माझा आवाज कित्येकांच्या कानांपर्यंत पोंचतही नसे. परंतु एकाद्या माणसावर श्रद्धा असली म्हणजे ते असल्या अडचणींची फारशी परवा करीत नाहींत.

मी मसुरीला आईकडे व पत्नीकडे गेलों खरा, परंतु माझ्या डोक्यांत शेतकऱ्यां-विषयींचेच विचार घोळत होते. परत जाण्यासाठीं मी उत्सुक झालों होतों. त्यामुळें परत आल्याबरोबर खेडेगांवांतल्या भेटींचें सत्र पुनरपि सुरू झालें. शेतकरी-चळवळीचें सामर्थ्य वाढत चाललें होतें. पायाखालीं तुडवलेल्या किसानाला नवा आत्मविश्वास वाटूं लागला होता आणि तो छाती वर काढून चालूं लागला होता. जमीनदारांचे बगलबच्चे आणि पोलिस ह्यांचें त्याला पूर्वीप्रमाणें भय राहिलें नाहीं. एकाद्याची जमीन काढून घेतली, तर इतर किसान ती खंडानें करण्याचें नाकारीत. मारपीट आणि बेकायदेशीर वसुलीचीं उदाहरणें कमी होत चाललीं व तसला कांहीं प्रकार झालाच तर त्याची तावडतोब वर्दी देण्यांत येऊन चौकशी व्हावी म्हणून प्रयत्नहि होऊं लागले. त्यामुळें शिपाई व जमीनदारांचे लोक ह्यांना जरब बसली. तालुकदारांवरहि दबदबा बसून ते नरम आले व प्रान्तिक सरकारनें औधच्या कुळांच्या कायद्यांत सुधारणा करण्याचें अभिवचन दिलें.

स्वतःला भूमिपति, "जनतेचे जन्मसिद्ध नेते" असें मोठ्या अभिमानानें म्हणवून घेणारे हे तालुकदार व मोठमोठे जमीनदार म्हणजे ब्रिटिश सरकारचीं लाडकीं बाळें आहेत. सरकारनें दिलेल्या खास शिक्षणामुळें त्यांना बौद्धिक क्लैब्य प्राप्त झालें असून कुळांच्या हिताकडे इतर देशांतील जमीनदारांइतकेंहि ते लक्ष देत नाहींत. जनता व जमीन यांच्यावर पुष्ट होणाऱ्या बांडगुळांप्रमाणें त्यांचें जीवन आहे. त्यांचें हितरक्षण करणाऱ्या स्थानिक अधिकाऱ्यांपुढें लांगूलचालन करणें हेंच त्यांचें मोठ्यांतले मोठे काम.

जमीनदार हा थोडासा फसवा शब्द आहे. सर्व जमीनदार हे मोठमोठ्या जमिनींचे मालक असावेत असा लोकांचा समज होता. रयतवारी प्रांतांत जमीनदार म्हणजे जमिनीचा मालक. संयुक्त प्रान्तांत माझ्या माहितीप्रमाणें पंधरा लक्ष लोक जमीनदार ह्या सदरांत येतात. यांपैकीं जवळ जवळ नव्वद टक्के लोकांची स्थिति अगदीं दरिद्री कुळप्रमाणें असून आणखी नऊ टक्के लोक जरा बऱ्या स्थितींत आहेत. मोठ्या जमिनीच्या मालकांची संख्या सर्व प्रांतांत पांच हजारांहून जास्त नाहीं आणि या पांच हजारांपैकीं पांचशेंच लोकांची बड्या जमीनदारांत व तालुकदारांत गणना करतां येईल. कांहीं ठिकाणीं तर दरिद्री छोट्या जमीनदारांपेक्षां मोठी जमीन कसणारीं कुळेंच अधिक बऱ्या स्थितींत आहेत. हे गरीब व मध्यम जमीनदार बौद्धिक दृष्ट्या मागासलेले असले, तरी त्यांच्यांत पुष्कळ चांगले गुण आहेत, व चांगलें शिक्षण व वळण मिळाल्यास ते उत्तम नागरिक बनतील. राष्ट्रीय चळवळींत त्यांनीं बराच भाग घेतलेला आहे. कांहीं अपवाद सोडून दिल्यास तालुकदारांची व मोठ्या जमीनदारांची गोष्ट मात्र सर्वस्वीं भिन्न आहे. त्यांची शारीरिक अधोगति झाली असून समाजाला त्यांचा आतां उपयोग होण्यासारखा नाहीं. ब्रिटिश सरकारसारखी सत्ता त्यांच्या पाठीशीं आहे तोंपर्यंतच ते टिकतील.

१९२१ सालीं माझ्या खेडेगांवच्या भेटी सर्व वर्षभर चालू होत्या. पण माझें कार्यक्षेत्र वाढतां वाढतां सर्व संयुक्त प्रान्ताचा त्यांत समावेश होऊं लागला. असहकारितेची चळवळ जोमानें चालू होती आणि तिचा संदेश अगदीं कानाकोपऱ्यांतल्या खेड्यांपर्यंत जाऊन थडकला होता. प्रत्येक जिल्ह्यांतल्या काँग्रेस-कार्यकर्त्यांचे थवेच्या थवे खेडोपाडीं हिंडत होते आणि नव्या संदेशाबरोबरच किसानांचीं गाऱ्हाणीं दूर करावींत या मताचाहि ते प्रचार करीत असत. पण त्याबद्दलच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट नव्हत्या. असहकारितेच्या व शेतकऱ्यांच्या चळवळींचे ओघ क्वचित् एकमेकांत मिसळत असले व एकमेकांवर परस्परांचा परिणामहि घडत असला, तरी ते पृथक् पृथक् पात्रांतूनच वाहात चालले होते. काँग्रेसच्या प्रचारामुळें खटल्यांची संख्या झपाट्यानें कमी झाली व भांडणें तोडण्यासाठीं खेडोपाडीं पंचायती स्थापन झाल्या. शेतकऱ्यांवर अहिंसातत्त्वाचा खूपच परिणाम झाला होता. कारण काँग्रेस-प्रचारक जाईल तेथें अहिंसेचा मुद्दा तो आग्रहानें प्रतिपादीत असे. अहिंसेच्या तत्त्वाचें



ाहरलाल नेहरू

संपूर्ण आकलन शेतकऱ्यांना झालें नसलें, तरी त्यामुळें शेतकरी हिंसेपासून परावृत्त झाला ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

हा देखील कांहीं लहानसहान परिणाम नव्हे. शेतकऱ्यांच्या चळवळी बहुधा हिंसामयच होतात असा अनुभव आहे. औधचा शेतकरी त्या वेळीं बेफाम झाला होता. तो कढत, उकळत होता. एक ठिणगी पडती तर भडका उडाला असता. असें असूनहि माणूस आश्चर्यचकित व्हावा इतके ते शांत राहिले. तालुकदारांवर झालेल्या अत्याचाराचें एकच उदाहरण मला आठवतें तें असें कीं, आपल्या मित्रमंडळीसह तालुकदार महाशय आपल्या घरीं बसले असतां एका शेतकऱ्यानें तेथें शिरून त्याचें थोबाड रंगविलें! याचें त्यानें कारण असें सांगितलें कीं तालुकदार स्वतःच्या बायकोलाच अनीतीने वागवीत असे आणि तिचा छळ करीत असे.

एका निराळ्याच प्रकारचा अत्याचार मात्र चालू होता. त्यामुळें सरकारशीं झगडेहि सुरू झाले. पण हे झगडे टाळणें शक्य नव्हतें; कारण सरकारला शेतकऱ्यांची ही वाढती शक्ति असह्य होऊं लागली होती. आगगाड्यांतून शेंकडों शेतकरी बिनतिकिटानेंच प्रवास करूं लागले. विशेषतः शेतकऱ्यांची प्रचंड सभा कोठें भरावयाची असली कीं अशीं शेंकडों उदाहरणें घडून येत. अशा सभांना साठ सत्तर हजार शेतकरी हजर रहात असत. त्यांना गाडींतून काढून लावणें मोठें अवघड काम होतें. तेच उलट खुशाल सांगत कीं जुना जमाना संपला! रेल्वे-अधिकाऱ्यांचे हुकूम ते उघड उघड धुडकावून लावीत. ही फुकट प्रवासाची टूम कोणाच्या सांगण्यावरून प्रचारांत आली तें मला माहित नाहीं. आम्हीं त्यांना असें कांहींच सांगितलें नव्हतें. कायद्यांची अंमलबजावणी कडकपणें होऊं लागल्यावर हा प्रकार थांबला.

१९२० सालीं कॉंग्रेसच्या खास अधिवेशनासाठीं मी कलकत्त्यास गेलों असतां कांहीं अल्पस्वल्प कारणासाठीं कांहीं किसान-पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. खटला प्रतापगड शहरीं चालावयाचा होता. पण खटल्याच्या दिवशीं हजारों शेतकरी एकत्र जमून त्यांनीं कोर्टाचें आवार व्यापून टाकलें व कोर्टापासून तुरुंगापर्यंतच्या रस्त्यावर त्यांनीं दुतर्फा रांगा धरल्या. हा प्रकार पाहून मॅजिस्ट्रेटच्या तोंडचें पाणीच पळालें! त्यानें चौकशी दुसऱ्या दिवसावर ढकलली. पण दुसऱ्या दिवशीं जमाव उलट वाढला आणि शेतकऱ्यांनीं तुरुंगाला जवळजवळ वेढाच घातला. मूठभर चणे असले कीं किसनांचें भागतें. तेव्हां कांहीं दिवस ते तळ देऊन सहज बसले असते. सरतेशेवटीं किसान-पुढाऱ्यांची मुक्तता करण्यांत आली. तुरुंगांतल्या तुरुंगांतच नांवाला खटला चालवलाहि असेल. किसानांना हा मोठाच विजय मिळाला. त्यांना वाटूं लागलें कीं केवळ संख्याबळ असलें कीं सरकारला आपण म्हणूं तें करावयाला लावूं. सरकारला ही गोष्ट असह्य झाली आणि लवकरच पुन्हां असा प्रसंग आला, तेव्हां त्याचें पर्यवसान निराळ्याच प्रकारें झालें.

१९२१ जुलैच्या सुरुवातीची गोष्ट. नागपूर-कॉंग्रेस आटोपून मी नुकताच

अलाहाबादेला आलों होतों. कांहीं तरी भानगड उत्पन्न होण्याचा संभव आहे, तेव्हां ताबडतोब रायबरेलीस यावें अशा मजकुराची तार मला मिळाली. दुसऱ्या दिवशीं मी अलाहाबादेहून निघालों. थोड्या दिवसांपूर्वी कांहीं किसान-पुढाऱ्यांना पकडण्यांत आलें असून त्यांना तेथल्याच तुरुंगांत अटकेंत ठेवण्यांत आलें आहे असें कळलें. शेतकऱ्यांना प्रतापगडीं लढवलेल्या डावपेचांची व विजयाची आठवण होती. त्यांनीं रायबरेलीकडे मोर्चा फिरवला. परंतु हा डाव येथें चालूं द्यावयाचा नाहीं असें सरकारनें ठरवलें व किसानांना थोपवून धरण्यासाठीं जादा शिपाई व सैन्य जमविण्यांत आलें. एका लहानशा नदीच्या पैलतीरावर, शहराच्या सीमेनजिकच किसानांच्या मुख्य जमावाला त्यांनीं रोखून ठेवलें. तथापि कित्येक किसान इतर वाटांनीं शहरांत घुसले. स्टेशनवर येतांक्षणीं मला एकदर परिस्थिति समजली आणि जेथें शेतकरी व सैन्य तळ देऊन उभे होते, त्याच जागेकडे मी थेट निघालों. वाटेंतच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें घाईघाईनें लिहिलेली चिठी मला मिळाली. त्यांत मला परत जाण्याविषयीं बजावलें होतें. त्याच कागदाच्या पाठीवर मीं उत्तर लिहिलें. मला कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमाप्रमाणें मागें फिरण्याचा हुकूम देण्यांत येत आहे तें कळवीपर्यंत मी हा असाच पुढें जात राहणार असा मजकूर उत्तरांत होता. नदीवर पोंचलों तेव्हां गोळीबाराचे आवाज पैलतीराकडून ऐकूं येत होते. फौजेनें मला पुलाजवळ अडवलें. मी तेथेंच वाट पाहात उभा राहिलों. इतक्यांत नदीच्या अलीकडच्या तीरावरच्या शेतांत लपून बसलेले पुष्कळसे किसान माझ्याभोंवतीं जमले. ते भेदरून गेले होते. तेथल्या तेथेंच दोनएक हजार किसानांची सभा भरवून त्यांची भीति व चिंता दूर करण्याचा मीं प्रयत्न केला. परिस्थिति मोठी विचित्र होती. हाकेच्या अंतरावर त्यांच्या बांधवांवर गोळी चालवण्यांत येत होती व सगळीकडे सैन्य पसरलें होतें. तथापि त्याहि स्थितींत सभा यशस्वी रीतीनें पार पडली आणि भीतीचा जोर कमी झाला. गोळीबाराच्या जागेकडून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट परत फिरला. त्याच्या विनंतीवरून मी त्याच्या बंगल्यावर गेलों. तेथेंच कांहीं तरी निमित्त काढून त्यानें मला गुंतवून ठेवलें. किसान व माझे शहरांतील मित्र यांच्यापासून मला दूर ठेवण्याचा त्याचा उद्देश असावा.

गोळीबारांत बरेच लोक मरण पावल्याचें वृत्त आम्हांला नंतर समजलें. मागें हटण्यास अथवा पांगून जाण्यास किसान कबूल होईनात. एरवीं ते अगदीं शांततेनें वागत होते. त्यांच्या विश्वासाच्या माझ्यासारख्या अगर दुसऱ्या एखाद्या इसमानें त्यांना तसें करावयास सांगितलें असतें, तर ते खात्रीनेंच कबूल झाले असते. ज्यांच्यावर त्यांचा विश्वास नाहीं अशा लोकांचे हुकूम ते कां ऐकतील ? कोणी एकानें अशी सूचनाहि मॅजिस्ट्रेटला केली कीं मी येईपर्यंत सबूर करा. पण तो ऐकेना. आपण हरलों तेथें एका चळवळ्याला यश यावें म्हणजे काय ? केवळ प्रतिष्ठेवर जगणारें परकें सरकार असले मार्ग स्वीकारीत नसतें.

रायबरेली जिल्ह्यांत त्याच सुमाराला शेतकऱ्यांवर दोनदां गोळीबार करण्यांत आला. नंतर प्रत्येक प्रमुख किसान-कार्यकर्त्यांच्या आणि पंचायतीच्या सभासदाच्या छळवादाला सुरुवात होऊन त्यापेक्षां गोळीबार बरा असें म्हणण्याची वेळ आली. चळवळ दडपून टाकण्याचा सरकारनें चंग बांधला होता. काँग्रेस-प्रचारामुळें चरख्याचा प्रचार शेतकऱ्यांतून होत होता. तेव्हां चरखा म्हणजे राजद्रोहाची निशाणीच असें सरकारचें मत होऊन चरखामालकांना त्रास देण्यांत येऊं लागला. पुष्कळ वेळां चरखा जाळून टाकण्यांत येई. धरपकड वगैरे उपायांनीं काँग्रेसची चळवळ व शेतकऱ्यांची चळवळ अशा दोन्हीहि चळवळी रायबरेली जिल्ह्यांतून खणून टाकण्याचा प्रयत्न सरकारनें सुरू केला. दोन्ही चळवळींतले कार्यकर्ते सामान्यत: एकच असत.

कांहीं काळानंतर म्हणजे १९२१ सालीं फैजाबाद जिल्ह्यावर दडपशाहीची धाड आली. तेथें कटकटी उत्पन्न झाल्या त्या निराळ्या प्रकारें. कांहीं खेड्यांतल्या शेतकऱ्यांनीं एका तालुकदाराची मालमत्ता लुटली. मागाहून असें उघडकीस आलें कीं, या जमीनदाराबरोबर हाडवैर असलेल्या दुसऱ्या एका जमीनदाराच्या नोकरांनीं ह्या शेतकऱ्यांना चिथवलें होतें. गरीब बिचारे अज्ञ शेतकरी! त्यांना दडपून असें सांगण्यांत आलें कीं तालुकदाराला लुटावा अशी खुद्द महात्माजींची इच्छा आहे. त्यांनीं मोठ्या आनंदानें या आज्ञेची बजावणी केली. लूट चालू असतां "महात्मा गांधी की जय" अशा आरोळ्याहि ते ठोकीत होते.

मला हें वृत्त ऐकल्यावर फार संताप आला व नंतर एकदोन दिवसांतच लुटीच्या जागीं म्हणजे अकबरपूरच्या जवळपास मी जाऊन पोहोंचलों. गेल्याबरोबर त्याच दिवशीं मीं सभा बोलावली आणि थोड्या तासांच्या अवधींत दहा मैलांच्या टापूंतले पांचसहा हजार लोक जमा झाले. मीं त्यांची चांगली खरडपट्टी काढली आणि अशा कृत्यांनीं ते स्वत:चें व चळवळीचें नांव बद्दू करीत आहेत, तेव्हां गुन्हेगारांनीं गुन्हा कबूल करावा असें मीं म्हटलें. (गांधींच्या सत्याग्रहाचें माझ्या मतें जें अगदीं सार तें त्या काळीं माझ्या अंत:करणांत उचंबळत होतें.) लुटालुटींत ज्यांनीं भाग घेतला असेल त्यांनीं हात वर करावेत असें मीं म्हटल्याबरोबर आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कित्येक पोलिस अधिकाऱ्यांच्या समक्ष वीस पंचवीस लोकांनीं हात वर केले. या लोकांना त्रास होणार हें उघडच दिसत होतें.

त्या लोकांनीं खाजगी रीतीनें बोलतांना जेव्हां सरळ सरळ सर्व हकिकत निवेदन केली, तेव्हां या भावड्या लोकांना कित्येक वर्षेपर्यंत तुरुंगांत डांबण्यास आपण कारणीभूत होणार ही कल्पना मनांत येऊन मला अत्यंत वाईट वाटलें. पण वीस-पंचवीस लोकांनाच त्रास होऊन भागलें असें नाहीं, तर एक हजाराहून अधिक लोकांना अटक करून जिल्हा तुरुंगांत कोंबण्यांत आलें. जवळजवळ एक वर्षपर्यंत खटला चालला होता. तेवढ्या अवधींत कित्येक लोक तुरुंगांतच मेले. पुष्कळांना लांब मुदतीच्या

शिक्षा ठोठावण्यांत आल्या. पुढें मी स्वतःच तुरुंगांत गेलों, तेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं-जणांच्या गांठी तेथें पडल्या. त्यांपैकीं कांहींजण कोंवळ्या वयाचे मुलगे होते, तर कांहीं ज्वानींतले तरुण होते. त्यांची ऐन उमेद तुरुंगांत वाया चालली होती.

हिंदी शेतकऱ्यांत फार थोडें त्राण उरलेलें आहे. फार वेळपर्यंत त्यांना प्रतिकार करतां येत नाहीं. दुष्काळ व सांथी आल्या कीं लाखों लोकांचे त्या बळी घेतात. सरकारच्या व जमीनदारांच्या संघटित सामर्थ्याविरुद्ध एक वर्षपर्यंत त्यांनीं टिकाव धरला हेंच आश्चर्य आहे. शेवटीं शेवटीं ते थकले आणि सरकारच्या कडव्या दडपशाहीमुळें हतबल होऊन चळवळ कांहीं काळ थंडावली. तथापि थोड्याफार प्रमाणांत ती चालूच होती. पूर्वीप्रमाणें प्रचंड सभा भरत नसत. पण दहशत न खाल्लेले जे अनुभवी कार्यकर्ते खेडोपाडीं उरले होते, त्यांनीं अल्प प्रमाणांत आपला उद्योग चालू ठेवला. १९२१ सालीं कॉंग्रेसनें तुरुंगभरतीचा कार्यक्रम सुरू केला, त्यापूर्वी ह्या सर्व गोष्टी घडल्या होत्या हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इतकें सर्व सोसलेलें असून देखील १९२१ च्या चळवळींतहि किसानांनीं पुष्कळच भाग घेतला.

शेतकरी-चळवळीच्या भीतीमुळें सरकारनें कुळांचा कायदा पास करून घेण्याची घाई चालवली होती. किसानांच्या हिताच्या कांहीं सुधारणा त्यांत अंतर्भूत केलेल्या होत्या. पण चळवळ काबूत आलीसें वाटतांच सुधारणा आंखडत्या घेण्यांत आल्या. या कायद्याप्रमाणें किसानाला आजीव अथवा तहाहयात कुळाचे हक्क देण्यांत आले होते. शेतकऱ्यांना ही सुधारणा त्या वेळेपुरती बरी वाटली; पण त्यामुळें आपली स्थिति सुधारत नाहीं, ही गोष्ट त्यांना मागाहून उमगली.

शेतकऱ्यांचे झगडे औधमध्यें चालू राहिले, पण ते लहानसहान प्रमाणांत. १९२९ सालच्या जागतिक मंदीनें बाजारभाव पडले व त्यामुळें मात्र पुन्हां एकवार भयंकर परिस्थिति निर्माण झाली.

१०

# असहकार

औधमधील शेतकरी-चळवळीचें मीं इतकें सविस्तर वर्णन केलें याचें कारण असें कीं त्या चळवळीच्या योगानेंच माझ्या डोळ्यांवरील पडदा दूर होऊन हिंदुस्थानांतील एका मूलभूत प्रश्नाच्या स्वरूपाचें मला आकलन झालें. या प्रश्नाकडे राष्ट्रवाद्यांनीं मुळींच लक्ष दिलेलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानभर वारंवार शेतकऱ्यांच्या धामधुमी होत असतात. धुडाशीं रसरसणाऱ्या असंतोषाचीं हीं बाह्य लक्षणें आहेत. १९२० व १९२१ सालीं औधमध्यें झालेल्या चळवळी अशाच स्वरूपाच्या होत्या. राजकारण व राजकीय पुढारी यांच्याशीं प्रारंभीं या चळवळींचा कांहीं-एक संबंध नव्हता व सर्व देशाच्या दृष्टीनें पाहतां त्यांना फक्त स्थानिक प्रश्नांचें स्वरूप प्राप्त होऊन तिकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. संयुक्तप्रांतीय वृत्तपत्रांनींहि त्यांच्याकडे बहुशः काणाडोळाच केला. संपादकांना व शहरी वाचकांना अर्धनग्न शेतकरी-जनांच्या कार्याचें राजकीय दृष्टीनें अथवा इतर कोणत्याहि दृष्टीनें कसलें महत्त्व वाटणार !

पंजाब व खिलाफत प्रकरणांचा आणि त्या प्रकरणांपासून उद्भवलेलीं गा ऱ्हाणीं दूर व्हावींत म्हणून अमलांत आणावयाच्या असहकारितेचाच सर्वत्र खल चालला होता. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रश्नावर त्या काळीं कोणीच भर देत नसे. अस्पष्ट व प्रचंड ध्येयें गांधीजींना नापसत असत. कोणत्या तरी विशिष्ट व रेखीव कार्य-क्रमावर आपलें बळ केंद्रित करण्याची त्यांची रीत होती. परंतु स्वराज्याच्या कल्पना वातावरणांत आणि जनतेच्या अंतःकरणांत घुमत होत्या आणि असंख्य सभांतून स्वराज्याचा उल्लेखहि करण्यांत येत असे.

असहकारितेसंबंधीं निर्णय देण्यासाठीं आणि पुढील कार्यक्रम ठरविण्यासाठीं, १९२० सालीं कलकत्त्यास काँग्रेसचें जादा अधिवेशन भरलें. अमेरिकेहून नुकतेच परतलेले लाला लजपतराय हे अध्यक्ष होते. असहकारितेचें नवोदित तत्त्व त्यांना रुचलें नाहीं व त्यांनीं त्याला विरोध केला. हिंदी राजकारणांत त्यांना ज्वलज्जहाल समजत असत. परंतु त्यांचा दृष्टिकोण निश्चितपणें सनदशीर व नेमस्त असा होता. मनाची खात्री पटल्यामुळें नव्हे, तर परिस्थितीच्या दडपडणामुळेंच ते लोकमान्यांचे सहकारी बनले. तथापि त्यांना आर्थिक व सामाजिक दृष्टि लाभली असून परदेशांत

बराच काळ राहिल्यानें ती कुशाग्रहि बनली होती; इतर हिंदी पुढाऱ्यांपेक्षां त्यांची कल्पनाशक्तीहि अधिक व्यापक झाली होती.

असहकाराचे लाला लजपतराय हे एकटेच विरोधक नव्हते. वडे वजनदार सहकारी त्यांना मिळाले. काँग्रेसच्या जुन्या पुढाऱ्यांचें सर्व पथकच्या पथक गांधीजींच्या असहकाराविरुद्ध होतें असें म्हटलें तरी चालेल. दासबाबूंनीं विरोधकांचें नेतृत्व स्वीकारलें. ठरावांत अन्तर्भूत असणारी कल्पना त्यांना अमान्य होती असें नव्हे. ठरावांतील मर्यादेपर्यंतच काय, पण त्याच्या पुढेंहि जाण्याची त्यांची तयारी होती. पण नव्या कायदेमंडळावरील बहिष्काराशीं त्यांचा विशेष विरोध होता.

गांधीजींच्या वतीनें जुन्या प्रमुख पुढाऱ्यांपैकीं फक्त माझे वडीलच काय ते उभे राहिले. गोष्ट सोपी नव्हती. जुन्या सहकाऱ्यांनीं घेतलेल्या आक्षेपांची त्यांना कल्पना आलेली होती, त्यांचें महत्त्वहि त्यांना पटत होतें. अज्ञात अशा क्षेत्रांत पाऊल टाकण्यापूर्वी त्यांच्या सहकाऱ्यांप्रमाणेंच त्यांनींहि मागेंपुढें पाहिलेंच. तेथें एकदां पाऊल टाकल्यानंतर पूर्वीचें जीवन कायम ठेवणें अशक्य होणार असलें, तरी कोणत्या तरी परिणामकारक कार्यक्रमाकडे वळणें अपरिहार्य झालें होतें. अगदीं त्यांना हवा त्याप्रमाणें नसेल, पण या ठरावांत प्रत्यक्ष कार्याचा समावेश होत होता. त्यांचा निश्चय व्हावयाला बराच काळ लागला. गांधीजी व दासबाबू यांच्याबरोबर खूप चर्चाहि त्यांनीं केली. एका खटल्याच्या कामामुळे दासबाबूंचा व त्यांचा पुष्कळच संबंध त्या वेळीं येत असे. पण त्यांच्या विचारसरणींतील अल्पशा फरकामुळेंच कलकत्त्याच्या जादा अधिवेशनांत ठरावाच्या दोन बाजूंना दोघेजण उभे राहिल्याचा देखावा दिसला. नंतर तीन महिन्यांनीं नागपूरच्या काँग्रेसमध्यें त्यांची पुन्हां जोडी जमली व तेव्हांपासून त्यांनीं एकदिलानें काम केलें.

कलकत्त्याच्या जादा अधिवेशनाच्या पूर्वीं माझी व वडिलांची क्वचितच भेट होत होती. पण जेव्हां जेव्हां भेटीचा योग येई, तेव्हां तेव्हां हा प्रश्न त्यांच्या मनांत कसा एकसारखा घोळत होता तें माझ्या लक्षांत आल्याशिवाय रहात नसे. त्या प्रश्नाला राष्ट्रीय बाजूव्यतिरिक्त वैयक्तिक बाजू होती. असहकार मान्य करावयाचा म्हणजे वकिली सोडणें प्राप्त होतें. त्याचप्रमाणें जुन्या आयुष्यक्रमाला मूठमाती देऊन जीवनाला नवीन वळण लावणेंहि अवश्य होतें. या गोष्टींना वयाच्या साठाव्या वर्षीं सुरवात करणें म्हणजे साधें काम नव्हे. राजकारणांतील जुने सहकारी, आपला धंदा, अंगवळणीं पडलेलें सामाजिक जीवन व स्वभावांत भिनून गेलेली खर्चिक राहणी, या सर्वांवर पडदा पाडावयाचा असा त्याचा अर्थ होता. प्रश्नाची आर्थिक बाजूहि कमी महत्त्वाची नव्हती. धंद्याचें उत्पन्न बंद झालें म्हणजे राहणीचें मान उतरवणें क्रमप्राप्तच होणार होतें.

परंतु त्यांची विचारशक्ति, त्यांचा स्वाभिमान, त्यांच्या अंगचा पीळ या सर्वांचा परिणाम होऊन हलके हलके प्रगति करीत करीत ते नव्या चळवळींत सर्वतोपरी

मिसळून गेले. अनेक प्रसंगांनीं सांचत गेलेला व पंजाबमधील हत्याकांडामुळें व त्यानंतर घडलेल्या गोष्टींमुळें शिगेस पोंचलेला राग, सरकारच्या अन्याय्य आणि असमर्थनीय वर्तनासंबंधीं होऊन चुकलेली खात्री, आणि राष्ट्राचा अपमान झाल्यामुळें मनांत उत्पन्न झालेली चीड या सर्व भावना कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें व्यक्त होणें जरूरच होतें. वकिलीच्या धंद्यांत मुरलेल्या त्यांच्या मनाचा पूर्ण विवेकाअन्तीं जेव्हां एक ठाम निश्चय झाला, तेव्हांच त्यांनीं गांधीजींच्या चळवळींत सामील होण्याचें ठरविलें.

गांधीजींबद्दल त्यांना वैयक्तिक आकर्षणहि वाटत होतें व त्याचा परिणामहि त्यांच्या मनावर झाला हें नक्की. ज्या माणसाबद्दल त्यांना प्रेम वाटत नसे, त्याच्याबरोबर खांद्याशीं खांदा भिडवून काम करणें त्यांना कधींच शक्य झालें नसतें. आवडीनिवडीच्या बाबतींत ते फार कांटेकोर असत. परंतु ही जोडी पाहून मात्र नवल वाटण्यासारखें होतें. एक संत, विलासपराङ्मुख, धर्मनिष्ठ, आयुष्यांतील शारीरिक व इंद्रियजन्य सुखांचा त्याग करणारा; तर दुसरा थोडासा विलासी, जीवनांतील अनेकविध सुखांचा आस्वाद घेण्यास तत्पर व इहलोकींच्या अस्तित्वानंतरच्या गोष्टींबद्दल बेफिकीर. मानसपृथक्करणाच्या भाषेंत सांगावयाचें, तर अंतर्मुख व बहिर्मुख व्यक्तींची ही युति झालेली होती. भेद असूनहि दोघांना सामान्य अशा बंधांनीं व मनःप्रवृत्तींनीं दोघेहि निगडित झाले होते. कांहीं वर्षांनीं दोघांचे राजकीय पंथ भिन्न झाल्यावरदेखील त्यांच्यांतील स्नेहबंध जसाच्या तसा दृढ राहिला.

भोगी आणि त्यागी व्यक्ती परस्परविरुद्ध बिंदूपासून निघून वेगवेगळ्या मार्गांनीं चालत असतात. एकाची धार्मिक वृत्ति असते, तर दुसरा धर्मविरोधी असतो आणि असें असूनहि दोघांच्या वृत्तींतील प्रखरता व ओज सामान्य जनांच्या वृत्तीहून अगदीं भिन्न असल्यामुळें सामान्य जनांच्या वृत्तीपेक्षां त्यांना परस्परांच्या वृत्तींची अधिक चांगली कल्पना येऊं शकते व कधीं कधीं तर त्यांच्या विचारक्षेत्रांच्या सीमा एकमेकींशीं भिडलेल्या दिसतात, असें वॉल्टर पेटर ह्यांनीं आपल्या एका पुस्तकांत लिहिलें आहे.

कलकत्त्याच्या अधिवेशनापासून कॉंग्रेसच्या राजकारणांत गांधीयुगाला प्रारंभ झाला व तें युग अद्यापि चालूच आहे. नाहीं म्हणावयाला मध्यंतरींच्या काळांत आपण मागें राहून देशबंधु दासांच्या स्वराज्यपक्षाला त्यांनीं अग्रस्थानीं बसविलें होतें. गांधीयुगापासून कॉंग्रेसचें स्वरूप अजिबात पालटलें. युरोपियन पोषाख गेला व त्याच्या जागीं खादीचीं वस्त्रें आलीं. कॉंग्रेसमध्यें कनिष्ठ, मध्यमवर्गीय प्रतिनिधींचा भरणा झाला. अधिवेशनांत हिंदुस्थानी भाषा अधिकाधिक प्रचारांत येऊन कॉंग्रेस-अधिवेशनांत नवें चैतन्य, नवा उत्साह व नवी कळकळ दृष्टीस पडूं लागली.

कॉंग्रेस संपल्यावर गांधीजी अमृतबझार पत्रिकेचे वयोवृद्ध संपादक श्री. मोतीलाल घोष यांच्या भेटीस गेले. घोषबाबू त्या वेळेस शरपंजरींच पहुडलेले होते.

गांधीजींबरोबर मीहि होतों. घोषबाबूंनीं गांधीजींना व त्यांच्या चळवळीला आशीर्वाद दिला व ते म्हणाले, "मी तर परलोकीं चाललों. तो लोक कोठेंहि असो, तेथें ब्रिटिश साम्राज्य नसणार याचेंच मला समाधान वाटत आहे ! अखेरीस तरी ब्रिटिश साम्राज्याच्या तावडींतून माझी सुटका होत आहे !"

कलकत्ता-काँग्रेसहून परत येतांना मी गांधीजींबरोबर रवीन्द्रनाथ टागोरांना भेटण्यासाठीं शांतिनिकेतनांत गेलों. टागोरांचे अतिशय प्रेमळ स्वभावाचे थोरले बंधु 'बोरोदादा' यांचीहि भेट झाली. तेथें सी. एफ्. अँड्रयूज ह्यांनीं मला कांहीं पुस्तकें वाचावयास दिलीं; त्यांपैकीं मोरेलच्या 'ब्लॅक मॅन्स् बर्डन' (काळ्या आदमीच्या पाठीवरील बोजा) ह्या पुस्तकानें मनाला चटका लावून सोडला.

त्याच सुमारास अँड्रयूज यांनीं हिंदी स्वातंत्र्याच्या समर्थनपर एक पत्रक लिहिलें होतें. सीलीच्या हिंदुस्थानविषयक लिखाणाच्या आधारें या उत्कृष्ट निबंधाची मांडणी करण्यांत आली होती. स्वातंत्र्याची बाजू त्यांत बिनतोडपणें प्रतिपादन केली असून आमच्या अंतरंगांत दडलेल्या भावनांचें प्रतिबिंब त्यांत उत्कृष्ट रीतीनें उमटलें होतें.

नंतरच्या तीन महिन्यांत असहकारितेला सर्व देशभर भरती आली. नव्या निवडणुकींवरील बहिष्काराच्या चळवळीला आश्चर्यकारक यश लाभलें. अर्थातच कायदेमंडळांत शिरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अडवून धरणें अगर तेथल्या सर्व जागा रिकाम्या पाडणें शक्यच नव्हतें. मूठभर लोकांनाहि एकाद्या व्यक्तीला निवडून देतां येतें; परंतु मतदारांपैकीं बहुसंख्य लोकांनीं मतें दिलीं नाहींत व देशानें धडाडीनें पुढें मांडलेल्या मतांची ज्यांना चाड होती, ते उमेदवार म्हणून उभेहि राहिले नाहींत. निवडणुकीच्या दिवशीं सर व्हॅलेंटाइन चिरोल हे अलाहाबाद येथें होते. ते सर्व मतदानाच्या जागीं फिरून आले व बहिष्काराला मिळालेलें यश पाहून त्यांना महदाश्चर्य वाटलें. अलाहाबाद शहरापासून १५ मैलांवर असलेल्या एका खेडेगांवांतल्या मतदानाच्या जागीं त्यांना एकहि मतदार आढळला नाहीं.

या बहिष्काराच्या परिणामाविषयीं दासबाबूंनीं व इतरांनीं कलकत्त्याच्या अधिवेशनांत शंका उपस्थित केली होती; परंतु काँग्रेसचा निर्णय त्यांनीं मानला. निवडणुकी पार पडल्यानंतर बहिष्कार यशस्वी झाल्यामुळें शंकितांच्या शंका दूर झाल्या आणि नागपूरच्या अधिवेशनांतील काँग्रेसमधील जुन्या पुढाऱ्यांत असहकारितेच्या प्रश्नावर एकमत दिसून आलें.

तथापि, कलकत्त्यानंतर कांहीं थोड्या जुन्या पुढाऱ्यांनीं काँग्रेसमधून अंग काढून घेतलें. अशा लोकांपैकीं एक लोकप्रिय व प्रसिद्ध व्यक्ति म्हणजे श्री. एम्. ए. जिना. 'हिंदु-मुसलमान एकीचे प्रतिनिधि' ह्या नांवानें सरोजिनी नायडू त्यांना संबोधीत असत आणि गतकालांत मुस्लिम-लीगला काँग्रेसच्या जवळ आणण्याचें बरेंचसें श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे. तथापि, असहकारितेचें तत्त्व व काँग्रेसला अधिक लोकप्रिय

व प्रातिनिधिक बनविणारी घटना या नव्या गोष्टी त्यांना सर्वस्वीं नापसंत होत्या. त्यांचा मतभेद राजकीय बाबतींत झाला; परंतु ते कॉंग्रेसमधून बाहेर पडण्यास तेवढेंच एक कारण नव्हतें. नव्या कॉंग्रेसशीं मिळतें घेतां येईल असा त्यांचा स्वभावच नव्हता. हिंदुस्थानींत भाषण करण्याचा आग्रह व खादी परिधान केलेल्या जनसमुदायांत त्यांना गुदमरल्यासारखें होई. जनतेंतील उत्साह पाहिला, कीं नुसता हैदोसधुला आहे असें त्यांना वाटे. वाळकेश्वर आणि मलबार हिल यांच्यांत व खेडेगांवांतल्या मातीच्या घरकुलांत जितका फरक, तितकाच श्री. जिना व जनता यांच्यांत फरक. फक्त मॅट्रिक पास झालेल्यांनाच कॉंग्रेसमध्यें घ्यावें असें खाजगी संभाषणांत ते एकदां म्हणाले होते. ही सूचना त्यांनीं मनापासून केली असेल अगर नसेल; पण त्यांच्या एकंदर विचारसरणीशीं ती सुसंगत अशीच होती. साहजिकच कॉंग्रेसपासून ते दूर सरकले. तेव्हांपासून हिंदी राजकारणांत ते जरा एकाकीच राहिले आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं पुढच्या काळांत हे ' एकीचे प्रतिनिधि ' प्रतिगामी वृत्तीच्या मुसलमानी जातिनिष्ठांशीं सहकार्यानें काम करूं लागले !

नेमस्तांचा अथवा प्रागतिकांचा कॉंग्रेसशीं कांहींच संबंध उरला नव्हता. ते कॉंग्रेसपासून दोन कोसांवर उभे राहिले; इतकेंच नव्हे, तर नव्या राज्यघटनेत मोठ्या अधिकारांच्या व मंत्र्यांच्या जागा पटकावून ते सरकारशीं एकरूप झाले, आणि असहकारिता व कॉंग्रेस यांच्याशीं झगडण्यांत त्यांनीं सरकारला मदत केली. त्यांच्या मागण्या जवळजवळ पूर्ण झाल्या होत्या. कांहीं सुधारणाहि देण्यांत आल्या होत्या. तेव्हां चळवळ करण्याची जरुरीच त्यांच्या मतें उरली नाहीं. देश असंतोषानें शिजत असतां आणि अधिकाधिक क्रांतिशील बनत चालला असतां ते उघडउघड क्रांति-विरोधी बनले व सरकारशीं समरस झाले. जनतेशीं त्यांचा मुळींच संबंध राहिला नाहीं, आणि कोणत्याहि प्रश्नाकडे सरकारी चष्म्यांतून पाहण्याची त्यांना जी एकदां संवय जडली, ती अद्यापि तशीच कायम आहे. खऱ्या अर्थानें त्यांचा पक्ष असा उरलाच नाहीं. श्री. श्रीनिवासशास्त्री सरकारी वकील म्हणून सरकारतर्फे ब्रिटिश प्रदेशांतून व त्याचप्रमाणें अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतून हिंडून आले. ह्या दौऱ्यांत त्यांनीं कॉंग्रेसवर व सरकारशीं झगडणाऱ्या आपल्या देशबांधवांवर टीकेची झोड उठवली.

तथापि, प्रागतिकांची स्थिति सुखासमाधानाची नव्हती. स्वतःच्या देशबांधवांशीं असलेला संबंध तुटून त्यांच्यांत व आपल्यांत उत्पन्न झालेली तेढ डोळ्यांना दिसत नसली व कानांना ऐकूं येत नसली, तरी तिच्या अस्तित्वाची बोंचक जाणीव मनाला होत राहणें ही कांहीं आनंदाची गोष्ट नव्हे. जनतेंत खळबळ माजली, कीं विरोधी लोकांना झळ लागतेच. गांधीजींच्या शिकवणुकीमुळें असहकारितेच्या चळवळीचें स्वरूप किती तरी सौम्य व सहिष्णु झालेलें होतें. तरीसुद्धां त्या काळच्या वातावरणांत असहकारितावाद्यांना जेथें नवें जीवन व नवा उत्साह प्राप्त झाला,

तेथें विरोधकांचा जीव कासावीस होऊं लागला! जनसमुदायाच्या व क्रांतीच्या चळवळी भरांत आल्या कीं नेहमींच असे दोन प्रकारचे मानसिक परिणाम घडलेले आढळून येतात.

आणि याच कारणामुळें कांहीं लोक अशी तक्रार करतांना आढळतात, कीं असहकारितेच्या चळवळीमुळें लोक असहिष्णु बनले आणि त्यांच्यांत मतांच्या बाबतींत व कार्याच्या बाबतींत सांप्रदायिकपणा निर्माण झाला. ह्या तक्रारींत तथ्य आहे; पण तें एवढ्याचपुरतें, कीं असहकारितेच्या चळवळींत जनता एकजुटीनें सामील झाली, आणि लाखों लोकांच्या मनांत आपल्याविषयीं निष्ठा उत्पन्न करणाऱ्या एका असामान्य व्यक्तीच्या हातीं सर्व चळवळीचें नेतृत्व आलें. तथापि, चळवळींत अंतर्भूत झालेलें जिवंत सत्य त्या चळवळीचा जनतेवर जो परिणाम झाला, त्यांत सांठवलेलें होतें. जनतेंत स्वातंत्र्याचें नवें वारें खेळूं लागलें आणि फार मोठें ओझें मानेवरून दूर भिरकावून दिल्याचा आनंद लोकांना मिळाला. त्यांना दडपून टाकणारी भीति पार नाहींशी झाली आणि मान वर करून ते हिंडूंफिरूं लागले. दूरदूरच्या खेड्यांतून कॉंग्रेस, स्वराज्य, पंजाबप्रकरण आणि खिलाफत वगैरेंबद्दल सामान्य लोकांतहि चर्चा होऊं लागली. खेडेगांवांतून मात्र खिलाफत शब्दाचा निराळाच अर्थ करण्यांत येऊं लागला. लोकांची कल्पना अशी कीं 'खिलाफ' म्हणजे 'विरुद्ध' ह्या उर्दू शब्दापासून खिलाफत हा शब्द सिद्ध झाला आहे. म्हणून त्यांना वाटे कीं खिलाफत म्हणजे सरकारविरोध! स्वतःच्या आर्थिक गाऱ्हाण्यांची चर्चा ते करीतच होते; परंतु असंख्य सभांच्या व परिषदांच्या द्वारा त्यांच्या राजकीय शिक्षणांतहि भर पडत होती.

आमच्यापैकीं जे कॉंग्रेसच्या कार्यक्रमाचा प्रचार करीत होते, ते १९२१ सालांत तर बेहोष होऊन गेले. आमचें जीवन भावना, आशा आणि उत्साह यांनीं भरून गेलें. एकाद्या कार्यासाठीं झिजणाऱ्या व्यक्तीच्या आनंदानुभवाची गोडी आम्ही चाखीत होतों. शंका अथवा संदेह यांना आमच्या मनांत थारा नव्हता. आमच्यापुढचा मार्ग स्पष्ट होता व आम्ही पुढें चाललों होतों. इतरांच्या उत्साहानें आमचा उत्साह द्विगुणित होई व त्यामुळें इतरहि पुढें ढकलले जात. पूर्वी कधीं केलें नसेल इतकें काम आम्ही उरकीत होतों. कारण आम्हांला अशी आंच लागून राहिली होती कीं सरकारशीं आपला झगडा लवकरच सुरू होणार; तेव्हां तुरुंगांत जाण्याच्या आधीं जेवढें काम करतां येईल तेवढें उरकून घ्यावें.

आमच्यांत स्वातंत्र्याची भावना उदित झाली व त्या भावनेमुळें आमचा अभिमानहि जागृत झाला. गांजणुकीची व निराशेची जाणीव साफ धुऊन निघाली होती. कानांतल्या कानांत कुजबुजण्याची, अधिकाऱ्यांशीं वळणावळणानें व कायदा संभाळून बोलण्याची आवश्यकता उरली नाहीं. आम्हांला जें वाटे तें खड्या आवाजांत चवाठ्यावर आम्हीं बोलून दाखवूं लागलों. परिणामाची पर्वा आम्हीं कशाला करावी? तुरुंगाची भीति ती कसली? आम्ही तेथें जाणार हें आम्हांला अगोदरच

कळलें होतें. बंदीवासानें आमच्या कार्याला उलट मदतच होणार होती. आमच्याभोंवतीं घोंगावणारे असंख्य हेर आणि गुप्त पोलिस ह्यांची आम्हांस कींव करावीशी वाटे. कारण त्यांच्यापासून आम्हांस कांहींच छपवावयाचें नव्हतें. हातांतील सर्व पत्त्यांचीं पानें टेबलावर मांडूनच आमचा खेळ चालला होता!

आमच्या डोळ्यांदेखत हिंदुस्थानचें स्वरूप पालटून टाकणारी व आमच्या समजुतीप्रमाणें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य जवळ खेंचून आणणारी राजकीय चळवळ आम्ही यशस्वी रीतीनें चालवीत आहोंत याचें समाधान तर आम्हांला मिळत होतेंच. पण त्याबरोबरच दुसरेंहि समाधान आम्हांला मिळत होतें. ध्येय व ध्येयमार्ग या दोन्ही बाबतींत आमच्या प्रतिपक्षाहून आमची नैतिक पायरी वरची आहे हा विचारहि मनास मोठें समाधान देत असे. आमच्या पुढाऱ्याबद्दल व त्यानें शोधून काढलेल्या अपूर्व मार्गाबद्दल आम्हांला अभिमान वाटे, व आमच्या मनांत कधीं कधीं सात्त्विक अहंकाराचे कढ येत. झगडा चालू असतां आणि झगडे व्हावे म्हणून आम्हीच प्रोत्साहन देत असतांहि आमच्या मनांत एक प्रकारची शांति नांदत होती.

आमची हिम्मत जसजशी वाढली, तसतशी सरकारची हिम्मत खचूं लागली. काय घडत आहे तेंच त्यांना कळेना! त्यांच्या नित्य परिचयाचें हिंदुस्थान कोसळून पडतें आहे असें त्यांना वाटलें! चढाऊ, स्वावलंबी आणि निर्भय अशी वृत्ति देशांत पसरलेली होती. आणि ब्रिटिश अधिराज्याचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे प्रतिष्ठा, ती तर कोलमडण्याच्या बेताला आली होती. थोड्या प्रमाणांत दडपशाही करावी तर चळवळीचें सामर्थ्य वाढवण्याकडे तिचा उलटा उपयोग होत असे. मोठ्या पुढाऱ्यांविरुद्ध हत्यार उपसण्याच्या अगोदर सरकारनें बराच वेळपर्यंत द्विधा वृत्ति दर्शवली. त्याचे परिणाम काय होतील याची सरकारला कल्पना नव्हती. हिंदी सैन्य राजनिष्ठ राहील ना? शिपाई आपल्या आज्ञा पाळतील ना? अशी धाकधुक त्यांना वाटत असावी. १९२१ च्या डिसेंबरांत लॉर्ड रेडिंगनें म्हटल्याप्रमाणें सरकार "गोंधळलें होतें, बुचकळ्यांत पडलें होतें."

१९२१ च्या उन्हाळ्यांत संयुक्त प्रांताच्या सरकारनें जिल्हा अधिकाऱ्याकडे एक मजेशीर गुप्त पत्रक पाठवलें होतें, तें पुढे वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें. प्रत्येक बाबतींत शत्रूच म्हणजे कॉंग्रेसच पुढाकार घेत आहे ही मोठी शोचनीय गोष्ट आहे; तेव्हां पुढाकार आपल्या हातीं घेण्यासाठीं "अमान सभा" काढाव्यात असें त्यांत सूचित करण्यांत आलें होतें. असहकाराच्या चळवळीला तोंड देण्यासाठीं नेमस्त मंत्र्यांच्या मसलतीबरहुकूम ही टूम काढण्यांत आली होती, असें सांगतात.

पुष्कळ ब्रिटिश अधिकाऱ्यांचे धाबे दणाणलें. त्यांच्या मनावर फार ताण पडत असे. वाढत्या विरोधाची व बेपर्वाईची वृत्ति अधिकारी वर्गाच्या डोक्यावर पाऊसकाळीं प्रचंड ढगाप्रमाणें ओथंबून आली होती व त्यामुळें अधिकाऱ्यांचीं मनें झांकोळून गेलीं. बरें, चळवळ शांततेनें चालत असल्याकारणानें दडपशाही करण्याकरितां

तींत कोठेंहि फट अगर संधि दिसत नव्हती. सर्वसामान्य इंग्रजांचा अहिंसेच्या खरेपणावर विश्वास बसला नाहीं. हें सर्व ढोंग आहे, आंतल्या बाजूला प्रचंड कारस्थानें गुप्तपणें सुरू असून एकादे दिवशीं हिंसामय क्रान्तीच्या रूपानें त्यांचा परिस्फोट होईल अशी त्यांची समजूत होती. पूर्वेकडील देश म्हणजे गूढतेनें भरलेले असतात. तिकडच्या बाजारांतून व गल्ल्याकुच्यांतून गुप्त कट शिजत असतात, अशी लहानपणापासून त्यांची समजूत करून दिलेली असल्यामुळें ह्या काल्पनिक गूढतेनें भरलेल्या देशांचा प्रश्न निघाला कीं इंग्रजाला सरळ विचारच करतां येईनासा झाला आहे. साध्यासीध्या व भोळ्याभाबडया पौर्वात्याचें मन समजावून घेण्याच्या फंदांत तो कधींच पडत नाहीं. त्याच्यापासून चार पावलें तो दूर राहून व गुप्त मंडळाच्या गोष्टींचीं पुस्तकें वाचून जे कांहीं ज्ञान मिळेल त्यावर तो आपले विचार सजवतो व मग आपल्या कल्पनाशक्तीला स्वैर सोडून भरमसाट चित्रें रेखाटीत बसतो! १९१९ च्या एप्रिलांत पंजाबांत असेंच झालें. अधिकाऱ्यांना व सामान्यपणें सर्वच इंग्लिश लोकांना भीतीनें ग्रासून टाकलें होतें. त्यांना जेथें तेथें कृष्ण दिसूं लागले आणि देशभर पसरलेल्या धामधुमींचीं व भयंकर कत्तलींनीं परिपूर्ण अशा बंडांचीं स्वप्नें त्यांना पडूं लागलीं. आणि कांहींहि करून आत्मरक्षण केलें पाहिजे या बुद्धीनें ते अनन्वित कृत्यास प्रवृत्त झाले. जालियनवाला बाग आणि अमृतसरचे अत्याचार हे अशाच मनोवृत्तीचे निदर्शक आहेत.

अधिकारी वर्गाला १९२१ साल मोठें जिकिरीचें व त्रासाचे गेलें. त्यांच्या मनाची धांवपळ सुरू होती. सुरू होत्या त्या गोष्टी पुरेशा तापदायक होत्याच, पण संभाव्य गोष्टींचीं जीं चित्रें डोळ्यांसमोर उभीं राहत, तीं प्रत्यक्षाहून अधिक तापप्रद असत. माझी बहीण स्वरूप हिचें लग्न १० मे रोजीं शुभ तिथि पाहून ठरवलें होतें. गांधीजींना व अलीबंधू वगैरे इतर काँग्रेस-पुढाऱ्यांना निमंत्रणें होतीं, व त्यांना सोयीचें व्हावें म्हणून वर्किंग कमिटीची बैठकहि अलाहाबादेस भरवण्याचें निश्चित झालें होतें. लांबलांबचे प्रसिद्ध पुढारी येणार, तेव्हां या संधीचा स्थानिक काँग्रेसच्या लोकांनीं फायदा करून घ्यावयाचें ठरवून एक जंगी जिल्हा-परिषद भरविण्याची योजना केली.

या राजकीय सभेमुळें अलाहाबादेंत खूपच गडबड चालू होती. कांहीं लोकांच्या मनावर याचा अति विलक्षण परिणाम झाला. एका बॅरिस्टर मित्राकडून मला कळलें कीं शहरांत कांहीं तरी प्रचंड उत्पात होणार अशी धास्ती त्या वेळीं पुष्कळ इंग्रजांना वाटत होती. स्वतःच्या हिंदी नोकरांवर ते विश्वास ठेवीनासे झाले. खिशांत पिस्तुल ठेवून ते हिंडत असत. अलाहाबादेसारख्या निद्रिस्त शहरांत अहिंसेचे आचार्य यावयाचे असतां कांहीं भयंकर प्रकार होणार आहे असें कां वाटावें तें मला कळेना. ह्या लोकांची कल्पना अशी कीं माझ्या बहिणीच्या लग्नाच्या दिवशींच १८५७ सालांतल्या मीरत येथील क्रांतीचा वाढदिवस येत होता, तो साजरा करावा ही आमची मनांतून इच्छा असणार!

खिलाफताच्या चळवळीला प्रामुख्य देण्यांत आल्यामुळें पुष्कळ मौलवींनीं

व मुसलमानांच्या धार्मिक पुढाऱ्यांनीं चळवळींत भाग घेतला होता, त्यामुळें चळवळीला थोडेंसें धार्मिक वळण लागलें. विशेष धार्मिक प्रवृत्तीचे नसलेले व पाश्चात्यांचें अनुकरण करणारे मुसलमानहि दाढी वाढवून जुन्यापुराण्या चाली पुन्हां आचरूं लागले. नव्या विचारांच्या हल्ल्यामुळें हतप्रभ होत चाललेलें मौलवींचें वजन पुन्हां टवटवीत झालें, व निसटून चाललेला मुसलमान समाज त्यांच्या पकडींत सांपडला. धर्मनिष्ठ अल्लीबंधूंनीं, व मौलवींबद्दल पराकाष्ठेचा आदर दर्शवून गांधीजींनींहि या धर्मजीर्णोद्धाराच्या क्रियेला मदतच केली.

चळवळीच्या धार्मिक व आध्यात्मिक बाजूवर गांधीजी नेहमींच भर देत असत. त्यांच्या धर्मांत कडवेपणा अथवा असहिष्णुता नव्हती. परंतु जीवनाकडे धार्मिक दृष्टीनें पाहण्याची शिकवणूक त्यापासून मिळत असे. त्याचा परिणाम चळवळीवर फार झाला आणि जनसमुदायांत तरी निदान चळवळीला धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीचें स्वरूप प्राप्त झालें. बहुतेक काँग्रेसचे कार्यकर्ते आपल्या नेत्याचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत व ते गांधीजी बोलतील तसें बोलत असत. तथापि, वर्किंग कमिटींतील गांधीजींचे सहकारी म्हणजे माझे वडील, देशबंधु दास, अथवा लाला लजपतराय हे रूढ अर्थानें धार्मिक वृत्तीचे नव्हते आणि जाहीर भाषणांतून राजकीय प्रश्नावर विचार करीत असतां ते धार्मिक बाबींचा उल्लेख देखील करीत नसत. परंतु त्यांच्या स्वार्थत्यागाचा परिणाम त्यांच्या शब्दांहूनहि किती तरी पटीनें होई. कारण सामान्य जनांना प्रिय वाटणाऱ्या सुखावर लाथ मारून साध्या राहणीचा त्यांनीं स्वीकार केला होता. हाहि धर्मप्रवृत्तीचाच एक प्रकार असें लोक समजत आणि धर्मपुनरुज्जीवनाच्या प्रसाराला त्यामुळें चालनाच मिळत जाई.

हिंदु व मुसलमान समाजांत वाढीस लागलेल्या या धार्मिक भावनांकडे पाहून मला थोडीशी काळजीच वाटत असे. मला ही गोष्ट बिलकुल पसंत नव्हती. जाहीर सभांतून हे मौलवी, मौलाना आणि स्वामी जें विचार प्रदर्शित करीत, ते फार प्रतिगामी स्वरूपाचे असत. समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास यांबद्दलचें त्यांचें ज्ञान मला इथूनतिथून चुकीचें वाटत होतें. प्रत्येक गोष्टीला धर्माची फोडणी दिल्यामुळें स्पष्टपणें विचार करणें अशक्य होऊन बसे. गांधीजींचे कांहीं कांहीं शब्दहि कर्णकटु वाटत. उदाहरणार्थ "रामराज्य" हा त्यांचा नेहमीं येणारा शब्द घ्या. पण त्यांना थोपवण्याची शक्ति माझ्यांत नव्हती. शब्द रूढ आणि जनतेला ज्ञात आहे म्हणून तो गांधीजी वापरीत असतील, असें स्वतःचें समाधान मी करून घेत होतों. कारण लोकांचीं अन्तःकरणें काबीज करण्याची कला त्यांना पूर्णपणें अवगत होती.

या गोष्टीसंबंधीं मनाला मीं फारशी खंत वाटू दिली नाहीं. प्रचंड चळवळीच्या ओघांत अनेक तऱ्हेचे व वृत्तींचे लोक असणारच. ओघाची दिशा चुकलेली नसली म्हणजे झालें. कोठें भोंवरे फिरणार, कोठें डबकीं सांचणार, हे चालायचेंच. गांधीजींबद्दल बोलायचें, तर त्यांचे विचार समजणें हें मोठें बिकट काम असे, व सामान्य माणसाला

त्यांची भाषा उलगडणें मुष्किलीचें होई. पण ते थोर व असामान्य पुरुष आहेत, विजयी सेनानी आहेत, एवढी गोष्ट आम्हांला समजण्याइतकें त्यांच्याविषयींचें ज्ञान आम्हांला होऊन चुकलें होतें. त्या काळापुरता तरी आम्हीं त्यांच्या हातीं कोरा चेक दिला होता. त्यांच्या लहरी व त्यांचे छंद यांबद्दल आपसांत चर्चा सुरू झाली, कीं आम्ही अर्धवट थट्टेनें म्हणत असूं कीं स्वराज्य मिळाल्यावर मात्र या प्रकारांना पायबंद घातलाच पाहिजे !

तथापि, आमच्यापैकीं अनेक व्यक्तींवर राजकीय व इतर बाबतींत त्यांची इतकी छाप पडली होती कीं, धार्मिक वृत्ति सर्वस्वीं टाळणें अशक्य होऊन बसलें. धर्माच्या बाह्य भपक्याचा मला तिटकारा होता. धार्मिक समजण्यांत येणाऱ्या व्यक्तींकडून जनतेची नागवणूक होई ती मला खपत नव्हती. असें असूनहि माझें मन धर्माकडे खेंचलें गेलें; आणि १९२१ सालीं माझ्या विचारांत धार्मिक प्रवृत्तींनीं जितका जोर केला तितका पूर्वीं कधींच केला नसेल. परंतु त्या काळांतहि मी धर्माच्या फारसा जवळ गेलों नाहीं.

आमच्या चळवळीची व सत्याग्रहाची जी विशुद्ध व नैतिक बाजू, तिच्याविषयीं मला फार अभिमान वाटे. अहिंसेवर परिस्थितिनिरपेक्ष व अविचल अशी निष्ठा मीं कधींच व्यक्त केली नव्हती अथवा तिचा सर्वकाळ स्वीकार करण्याचेंहि मीं ठरवलें नव्हतें; पण त्या तत्त्वाकडे मी अधिकाधिक आकर्षित होऊं लागलों. आपल्या देशाची सध्यांची परिस्थिति व परंपरा लक्षांत घेतां अहिंसेचें धोरणच योग्य आहे अशी माझी खात्री पटत चालली. राजकारण अध्यात्मपर बनवावें ही कल्पना मला फार रम्य वाटली. अर्थातच या शब्दांचा अर्थ कोणींहि संकुचित धर्मभावनेनें करूं नये. उच्च ध्येयाप्रत नेणारे मार्गहि उच्चच असावयास पाहिजेत, हें तत्त्व नैतिक दृष्ट्याच केवळ नव्हे, तर व्यावहारिक राजकारणाच्या कसोटीला उतरणाऱ्या दृष्टीनेंहि विशुद्ध आहे असें मला वाटलें. कारण मार्ग चोख नसले, कीं पुष्कळदां ते ध्येयाची नासाडी करतात व मग नव्या समस्या आणि नव्या अडचणी उपस्थित होत जातात. शिवाय हीन मार्गाच्या बरबटींतून पाय भरवीत जाणें ही व्यक्तीच्या व राष्ट्राच्या स्वाभिमानाला काळिमा लावणारी गोष्ट आहे अशी त्या वेळीं भावना होती. हीन मार्ग पत्करल्यावर व्यक्ति निर्लेप राहणार कशी ? कमरेंत लवायचं आणि पोटानें सरपटावयाचें ठरवल्यावर मार्ग झपाट्यानें व स्वाभिमानपूर्वक कसा काय काटतां येणार ?

त्या काळांत माझे विचार या प्रकारचे होते. असहकारामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त होईल, पददलितांची नागवणूक थांबेल असें मला वाटलें. शिवाय माझ्या नैतिक भावनेचेंहि त्यांपासून समाधान होतच होतें. अधिक व्यक्तिस्वातंत्र्याचा लाभ मला झाला होता. हें वैयक्तिक शांतिसुख इतकें मोठें होतें कीं चळवळ अपेशी होईल या विचारानेंहि त्यांत फारशी उणीव येत नव्हती. कारण अपयश हें सुद्धां अनित्यच

नाहीं का ? भगवद्गीतेंतील आध्यात्म मला विशेष कळत नसलें, तरी गांधीजींच्या आश्रमांत दर संध्याकाळीं म्हणण्यांत येणारा एक श्लोक मला फारच आवडला होता. ' निवाऱ्याच्या जागीं ठेवलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणें माणसानें शांत, अविचल असावें, कर्मफलाची आकांक्षा न बाळगतां आपलें कार्य करीत रहावें ' वगैरे स्थितप्रज्ञाचें वर्णन त्यांत होतें. मी स्वतः शांत अथवा संन्यस्त वृत्तीचा नसल्यामुळें या शिकवणुकीचा परिणाम माझ्या मनावर बराच झाला.

११

# १९२१ साल व पहिली शिक्षा

एकोणीसशें एकवीस साल म्हणजे आमच्या दृष्टीनें अपूर्व असें साल होतें. राष्ट्राभिमान, राजकारण, धर्मभावना, कडवेपणा व अध्यात्मभाव या सर्वांचें अपूर्व मिश्रण त्या सालीं पाहावयास सांपडलें. ह्या सर्वांच्या मागें शेतकऱ्यांच्या असंतोषाची व मोठ्या शहरांतील मजुरांच्या चढत्या चळवळीची पार्श्वभूमि खडी होती. राष्ट्रवाद आणि अस्पष्ट परंतु सर्व देशभर पसरलेला अतिशय जोरदार असा ध्येयवाद यांच्या धर्गानें या सर्व तऱ्हेच्या व क्वचित् प्रसंगीं विरोधी दिसणाऱ्या असंतोषाचा मिलाफ होऊन, त्यांची शक्ति एकत्रित झाली. तथापि या राष्ट्रवादांतहि अनेक थर होते. हिंदूंचा राष्ट्राभिमान, सरहद्दीपलीकडे दृष्टि फेंकणाऱ्या मुसलमानांचा राष्ट्राभिमान व त्या कालांत दोघांनाहि कमप्राप्त असा हिंदी राष्ट्राभिमान असे भिन्न भिन्न थर दिसून येत. कांहीं वेळपर्यंत ते एकमेकांशीं निगडित होऊन काम एकजुटीनें चाललें. त्या वेळीं सगळीकडे ' हिंदु-मुसलमान की जय ' अशीच आरोळी ऐकावयास सांपडे. गांधीजींची सर्व वर्गांवर व सर्व गटांवर विलक्षण छाप पडली असून त्या सर्वांचा अठरापगड समुदाय एकाच दिशेनें वाट चालूं लागला होता. दुसऱ्या एका पुढाऱ्यासंबंधीं काढण्यांत आलेले उद्गार गांधीजींनाहि लागू पडतात. गांधीजी म्हणजे ' जनतेच्या संमिश्र आकांक्षांचे मूर्तिमंत प्रतीक झाले होते. '

यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं त्या वेळच्या वासनांत व भावनांत परकीय सरकारविषयीं द्वेष दिसून येत नसे. राष्ट्रवाद ही वस्तुतः विरोधी भावना आहे. इतर राष्ट्रीय गटांविरुद्ध व विशेषतः स्वराष्ट्रावर सत्ता गाजवणाऱ्या परकीय सरकारविरुद्ध जी द्वेषाची व संतापाची भावना जागृत होते, तिचें खतपाणी मिळूनच राष्ट्रवाद पोसला जातो. १९२१ सालीं हिंदुस्थानांत ब्रिटिशांच्या विरुद्ध अशा प्रकारचा द्वेष नव्हता असें नाहीं. द्वेष होता; पण अशाच परिस्थितींत वागणाऱ्या इतर देशांपेक्षां येथें तो फार अल्प प्रमाणांत होता. गांधीजींनीं अहिंसावादाचें व तदन्तर्भूत यमनियमांचें जें आग्रहानें प्रतिपादन चालवलें होतें, तेंच या सौम्यपणाला कारणीभूत झालें. चळवळीच्या सुरुवातीसरशीं लोकांना शक्तीची व स्वातंत्र्याची जी जाणीव झाली व चळवळ लवकरच यशस्वी होणार असा जो आशावाद देशभर पसरला, त्याचाहि परिणाम द्वेषाच्या व संतापाच्या भावना सौम्य करण्याकडे झाला. आपली प्रगति इतक्या उत्तम रीतीनें होत असतां व यशाचें फळ लवकरच आपल्या पदरांत

पडण्याचें चिन्ह दिसत असतां संताप व द्वेष मनांत बाळगावा तरी कशाला, असे विचार मनांत येत; त्या वेळीं उदारबुद्धि दाखविणें आम्हांला परवडण्यासारखें होतें.

आमच्यापैकीं ज्या मूठभर लोकांनीं विरुद्ध बाजू घेतली आणि राष्ट्रीय चळवळीला विरोध केला, त्यांच्याशीं वागतांना आम्ही जरी दक्षतेनें व शिष्टाचार संभाळून वागत असलों, तरी आमच्या मनांत त्यांच्याविषयीं फारशी उदार बुद्धि वसत नव्हती. जनतेंत त्यांचें मुळींच वजन नव्हतें. तेव्हां द्वेषाचा अथवा संतापाचा प्रश्न त्यांच्या बाबतींत उत्पन्नच होत नव्हता. आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्षच करीत असूं. परंतु त्यांचा भेकडपणा व संधिसाधूपणा यांबद्दल व राष्ट्राची इज्जत व स्वाभिमान यांना कालिमा लागेल असें वर्तन केल्याबद्दल मनांतून त्यांचा तिटकारा मात्र वाटत असे.

अशा प्रकारें आम्ही पुढें चाललों होतों. भावना जळजळीत परंतु शबल स्वरूपाच्या होत्या. कार्याच्या उन्मादाची पकड आमच्या मनावर घट्ट बसली होती. परंतु आम्हीं ध्येयासंबंधीं स्पष्ट असा विचार मुळींच केलेला नव्हता. चळवळीच्या शास्त्रीय बाजूकडे, तिच्या तत्त्वज्ञानाकडे व तिच्यांतून साध्य होणाऱ्या ध्येयाकडे त्या वेळीं आम्हीं दुर्लक्ष कसें केलें याचें आतां आश्चर्य वाटतें. स्वराज्याबद्दल आम्ही अगदीं तावातावानें बोलत असूं. परंतु त्या शब्दाचा अर्थ प्रत्येकाच्या मनांत बहुधा निरनिराळा असावा. स्वराज्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य ( किंवा तसलेंच कांहीं तरी ) व त्याच्याच जोडीला प्रजासत्ताक राज्यपद्धति असा अर्थ तरुण लोक करीत. आम्ही त्याप्रमाणें जाहीरपणें बोलतहि होतों. आमच्यापैकीं पुष्कळांना असेंहि वाटे, कीं स्वराज्य मिळालें म्हणजे मजूर व शेतकरी यांना जमीनदोस्त करणारा बोजा आपोआप कमी होईल. परंतु बहुतेक पुढाऱ्यांना स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्याहून बऱ्याच कमी प्रतीचें असें कांहीं तरी ध्येय वाटत असावें ही गोष्ट उघड दिसत होती. गांधीजी ह्या विषयावर कांहींच स्पष्ट बोलत नसत, व त्याविषयीं स्पष्ट विचारण्याचा प्रयत्न झाला तर त्या प्रयत्नाला त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळत नसे. तथापि पददलितांच्या वतीनें ते अस्पष्टपणें पण जोरदार भाषेत बोलत असत. आम्हांला त्यामुळें फार धीर येई. पण त्याचबरोबर ते वरिष्ठ वर्गांनाहि मुबलक आश्वासनें देत. कोणत्याहि प्रश्नाकडे बौद्धिक दृष्ट्या न पाहतां व्यक्तींच्या चारित्र्यावर व धर्मभावनेवर गांधीजी भर देत असत. हिंदुस्थानांतील जनतेंत ताठरपणा व आत्मविश्वास उत्पन्न करण्याच्या कामीं गांधीजींनीं उदंड यश मिळविलें हें खरेंच. परंतु असेहि पुष्कळ निघाले, कीं ज्यांना कणखरपणा अथवा शील ह्यांपैकीं कांहींहि साध्य झालें नाहीं. पिळपिळीत शरीर व मालवलेला चेहरा हींच धर्मबुद्धीचीं बाह्य लक्षणें आहेत अशी मात्र ते कल्पना करून बसले.

जनतेंत उत्पन्न झालेली विलक्षण अशी स्वाभिमानाची वृत्ति पाहून आम्हांलाहि आत्मविश्वास वाटूं लागला. शिस्तीनें व एकजुटीनें चालणाऱ्या देशव्यापी चळवळींत जनता सामील झाली होती. ह्या चळवळीमुळें तिच्या अंगीं अलोट

सामर्थ्य निर्माण होईल असें आम्हांला वाटलें. क्रियेमागें विचारशक्ति उभी असणें आवश्यक आहे, ह्या गोष्टीकडे आमचें दुर्लक्ष झालें. स्पष्ट विचारसरणीची आणि निश्चित ध्येयाची जोड उत्साहाला व कार्यशक्तीला मिळाली नाहीं, तर जनतेची चळवळ शेवटीं निष्फळच ठरणार हें आमच्या ध्यानांत राहिलें नाहीं. राजकीय व आर्थिक चळवळींत व दुःखनिवारणाच्या कामीं स्वीकारण्यांत आलेलें जें अहिंसेचें तत्त्व तेंच सर्व जगाला आम्हांकडून मिळालेलें संदेशामृत आहे अशी आमची भावना झालेली होती. ही आमच्या चळवळींतील धार्मिक पुनरुज्जीवनाची भावना आम्हांला कांहीं अंशीं उपयोगी पडली. जगांतल्या सर्व देशांत व सर्व लोकांत जो एक विलक्षण ग्रह प्रचलित असतो कीं ईश्वराचीं विशेष लाडकीं लेंकरें आम्हीच आहोंत, त्याच ग्रहाचा पगडा आमच्यावरहि बसला होता. युद्ध वगैरे सर्व प्रकारच्या हिंसात्मक झगड्यांच्या तोलाचें नैतिक साधन म्हणजे अहिंसा. हें साधन केवळ नैतिकच नव्हतें; तर तें उत्कृष्ट प्रभावी साधन होतें. गांधीजींच्या यंत्रविषयक व वर्तमान संस्कृतीसंबंधींच्या कल्पना आमच्यापैकीं फारच थोड्यांना मान्य झाल्या असतील. ते स्वतःच आपल्या कल्पनांना आदर्शवादी व सध्यांच्या परिस्थितींत गैरलागू अशा समजत असावेत असा आमचा अंदाज होता.

मी चळवळीशीं अगदीं समरस होऊन गेलों होतों. माझ्याप्रमाणें अनेकांची स्थिति झालेली होती. इतर सर्व संबंध मीं सोडून दिले. आवडीचीं पुस्तकें, मित्र, ज्यांचा हातांतील कामाशीं साक्षात् संबंध येत नसे अशीं वर्तमानपत्रें, यांच्याकडे मी पाहातहि नसें. चळवळ सुरू होईपर्यंत नवीं नवीं पुस्तकें वाचण्याचा व जागतिक उलाढालींशीं परिचय ठेवण्याचा माझा क्रम होता. पण हें सर्व उरकण्यास आतां वेळ मिळेनासा झाला. कुटुंबांतील मंडळीवर अत्यंत प्रेम असूनहि घरच्या माणसांना, पत्नीला व मुलीला मी जवळजवळ विसरूनच गेलों. त्या काळांत माझ्यामुळें घरच्या मंडळींना किती त्रास सहन करावा लागला व माझ्या पत्नीला माझ्याशीं वागतांना किती सोशिकपणा दाखवावा लागला असेल, ह्याची मला नंतर कित्येक वर्षांनीं जाणीव झाली. कचेरींत, कमिटीच्या बैठकींत व सभांतूनच माझा सर्व वेळ खर्च होत होता. 'खेड्याकडे चला' ही घोषणा त्या वेळीं सगळीकडे दुमदुमत होती, व आम्ही तिला अनुसरून शेतें तुडवीत लांबलांबच्या खेड्यांतून शेतकऱ्यांच्या सभांसाठीं जात होतों. जनतेच्या भावनांशीं समरस होत असतांना व जनमतावर प्रभाव गाजवीत असतांना जो एक रोमांचकारी अनुभव येतो, त्याची गोडी मला त्या काळीं चाखावयास सांपडली. जनसमुदायाचा मला अधिकाधिक परिचय होत जाऊन शहरांतील जनता व शेतकरी ह्यांच्यांतील भेद मला समजूं लागले. धूळ, दगदगीची राहणी, मोठमोठ्या सभांतून होणारी धक्काबुक्की माझ्या अंगवळणीं पडली. पुष्कळदां त्यांच्या बेशिस्तपणाचा मात्र मला राग येत असे. त्यानंतर एकादी ठिणगी पडली असतां भडका उडेल अशा विरोधी मनःस्थितींत असणाऱ्या व चिडून गेलेल्या समाजास

तोंड देण्याचे कांहीं प्रसंग माझ्यावर आले. अशा प्रसंगीं त्या वेळीं मिळालेल्या अनुभवाचा व आत्मविश्वासाचा फायदा मला चांगलाच झाला. मी थेट गर्दीत जात असें. लोकांवर माझा विश्वास असे. आणि लोकांनींहि आतांपर्यंत मतभेद असला तरी मला मोठ्या सौजन्यानें व समजुतीनें वागविलें आहे. परंतु अशा वेळीं लोकांचीं मनें चंचल बनलेलीं असतात. तेव्हां भविष्यकाळीं मला कदाचित् निराळाहि अनुभव येईल.

मीं लोकसमुदायाकडे धांव घेतली व लोकहि माझ्यामागें चालूं लागले. तथापि मी त्यांच्याहून निराळा आहें ही भावना नष्ट झाली नव्हती. माझ्या विचारांच्या उंच फांदीवर बसून मी लोकांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहत असें. माझ्या भोंवतीं जमलेल्या हजारों लोकांपेक्षां माझ्या संवयी, माझ्या आकांक्षा, माझा मानसिक व आध्यात्मिक दृष्टिकोण वगैरे प्रत्येक बाबतींत मी निराळा असतां ह्या लोकांचा माझ्यावर इतका लोभ व विश्वास कां असावा, ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटे. निराळा दिसलों तरी मी तसा नाहीं असें त्यांना वाटत होतें काय ? माझ्याशीं त्यांचा अधिक परिचय झाला म्हणजे मग माझ्याशीं असलेले संबंध ते कायम ठेवतील कीं नाहीं ? कांहीं ढोंगीपणा करून तर मी त्यांचा विश्वास संपादन करीत नाहीं ना ? मी त्यांच्याशीं खुल्या दिलानें व सरळपणें वागत होतों. कधीं कधीं मी त्यांना रागेहि भरत असें आणि त्यांच्या श्रद्धाविषयांवर व चालीरीतींवर टीकाहि करीत असें. तथापि त्यांनीं मला अतर दिलें नाहीं. ते माझ्यावर प्रेम करीत नसून माझ्यासंबंधीं त्यांच्या मनांत जें कांहीं काल्पनिक चित्र निर्माण झालें होतें, त्याच्यावरच ते इतकी माया करीत असावेत हा विचार मात्र माझ्या मनांतून कधीं गेला नाहीं. तें काल्पनिक चित्र किती काळपर्यंत टिकणार ? तें टिकूं तरी कां द्यावें ? आणि ते खालीं पडून फुटून गेलें व खरी वस्तुस्थिति उघडकीला आली तर काय परिणाम घडतील ?

मी अनेक बाबकींत मोठा गर्विष्ठ आहें. परंतु या साध्याभोळ्या लोकांशीं वागतांना गर्विष्ठपणाचा प्रश्नच येत नसे. कृत्रिमता, हीन मनोवृत्ति, वगैरे गोष्टी त्यांना माहित नव्हत्या. . स्वतःला त्यांच्यापेक्षां वरिष्ठ समजणाऱ्या आपल्या मध्यम वर्गांतच त्या जास्त प्रमाणावर आढळतात. त्यांची बुद्धि निःसंशयच जड होती व व्यक्तिशः मनाला चटका लावतील असे गुणहि त्यांच्यापाशीं नव्हते. परंतु त्यांच्या समुदायाकडे दृष्टि टाकली, कीं अपरंपार दयेनें हृदय भरून येत असे व लौकरच कांहींतरी दुःखद प्रसंग ओढवणार आहे, अशी हुरहुर मनांत उत्पन्न होई.

आमच्यापैकीं निवडक मंडळींचीं कामें जेव्हां व्यासपीठावर व्हावयाचीं असत, तेव्हांच्या सभा मात्र अगदीं निराळ्या तऱ्हेच्या होत. तेथें कृत्रिमपणाला भरपूर अवसर होता व आमच्या अलकारमय भाषणांतून नटवेपणाची उणीवहि कोणाला भासली नसती. आमच्यापैकीं बहुतेक सर्वच ह्या कडक भाषणाच्या मोहाला बळी पडत असावेत; पण या बाबतींत खिलाफतीचे पुढारी सर्वांवर ताण करीत. मोठ्या

श्रोतृसमुदायापुढें भाषण करतांना स्वाभाविकपणा कायम ठेवणें बरेंच अवघड आहे. आणि आमच्यापैकीं तर फारच थोड्यांना जाहीर प्रसिद्धि पूर्वी अनुभवण्यास सांपडलेली असेल. त्यामुळें पुढाऱ्यांप्रमाणें विचारमग्न व गभीर दिसण्याचा व थट्टा-मस्करी अजिबात टाळून वागण्याचा आम्ही प्रयत्न करीत असूं. आम्ही चाल्लों, बोललों अथवा हंसलों, तरी हजारों डोळे आमच्याकडे लागलेले आहेत ह्याची जाणीव आमच्या मनाला सतत होत राही व मग वर्तनांत कृत्रिमपणा येऊं लागे. आमचीं भाषणें बहुधा चांगलीं वक्तृत्वपूर्ण अशीं होत; पण विचारांच्या दृष्टीनें तीं बहुधा पोकळच असत ! आपण दुसऱ्याच्या नजरेला जसे दिसतों, तसे स्वतःच्या नजरेला सहजासहजीं दिसत नाहीं. मला स्वतःवर टीका करतां येईना म्हणून मी दुसऱ्याच्या वागणुकीकडे लक्षपूर्वक पाहूं लागलों, आणि त्यापासून मला पुष्कळच आनंद लुटावयास सांपडला. पण नंतर मन अस्वस्थ करून सोडणारा असा एक विचार मनांत उद्‌भवला कीं मी सुद्धां दुसऱ्यांना असाच हास्यास्पद दिसत असेन.

सर्व वर्षभर काँग्रेस-कार्यकर्त्यांना व्यक्तिशः अटक करण्यांत येत होती व शिक्षाहि होत होत्या; परंतु सामुदायिक अटकेचें उदाहरण आतांपर्यंत घडलेलें नव्हतें. अली-बंधूंना हिंदी सैन्यांत अप्रीति फैलावण्याचा प्रयत्न केल्यावरून भरभक्कम शिक्षा ठोठावण्यांत आली. ज्या भाषणामुळें त्यांना शिक्षा झाली, त्या भाषणाचा शेकडों सभांतून हजारों लोकांनीं पुनरुच्चार केला. मीं केलेल्या कांहीं भाषणांमुळें माझ्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यांत येणार अशी धास्ती वाटत होती. तथापि त्या वेळीं तसा कांहींच प्रकार झाला नाहीं. वर्षाच्या अखेरीअखेरीला मात्र निकराचा प्रसंग येऊन ठेपला. 'प्रिन्स् ऑफ वेल्स्' हिंदुस्थानांत येणार होते व त्यांच्या भेटीनिमित्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या समारंभावर बहिष्कार घालण्याचा निश्चय काँग्रेसनें जाहीर केला होता. नोव्हेंबरच्या शेवटीं बंगालमध्यें स्वयंसेवकांच्या संस्था बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या व संयुक्त प्रांतांत त्याचीच पुनरावृत्ति झाली. देशबंधु दासांनीं बंगालला एक मोठा तेजस्वी संदेश पाठविला. "माझ्या मनगटाभोंवतीं बेड्यांचे चाप बसले आहेत व माझें शरीर लोहशृंखलांनीं जखडलें गेलें आहे असें मला वाटतें माझ्या जिवाला पारतंत्र्याच्या बंधनामुळें ही टोंचणी लागली आहे. सर्व हिंदुस्थान हा एकाद्या विस्तीर्ण बंदिशाळेप्रमाणें झाला आहे. मी बाहेर असलों काय किंवा तुरुंगांत पडलों काय, मी जिवंत राहिलों काय किंवा मेलों काय, काँग्रेसचें कार्य तसेंच चालू ठेवा." संयुक्त-प्रांतांत आम्हीं सरकारचें आव्हान स्वीकारून असें जाहीर केलें कीं, आमची स्वयं-सेवक-संघटना पूर्वीप्रमाणेंच काम करीत राहील. एवढ्यावरच आम्ही थांबलों नाहीं. दैनिक वृत्तपत्रांतून स्वयंसेवकांच्या नांवांच्या याद्याहि आम्हीं प्रसिद्ध केल्या. पहिल्या यादींत अग्रभागींच माझ्या वडिलांचें नांव होतें. वस्तुतः ते स्वयंसेवक नव्हते. परंतु सरकारचा अवमान करण्याच्या बुद्धीनेंच ते स्वयंसेवक दलांत दाखल झाले व त्यांचें नांवहि प्रसिद्ध करण्यांत आलें. प्रिन्स् ऑफ वेल्स् आमच्या प्रांतांत येण्याच्या

आधीं थोडे दिवस म्हणजे डिसेंबरच्या प्रारंभीं सामुदायिक अटकेस सुरुवात झाली.

घटिका अगदीं बुडण्याची वेळ आली आहे ह्याची आम्हांला कल्पना होतीच. सरकार व कॉंग्रेस ह्यांच्यामध्यें केव्हां ना केव्हां तरी होऊं घातलेला झगडा सुरू होण्याचा रंग दिसूं लागला. तुरुंगाची अद्यापि ओळख झालेली नव्हती व बंदिवासाच्या कल्पनेंतील नवखेपणा अद्याप कायम होता. एके दिवशीं उशीरापर्यंत बसून अलाहाबाद-कॉंग्रेस-कचेरींतील तुंबलेलें काम मी आटपून टाकीत होतों. इतक्यांत एक कारकून गडबडीनें तेथें आला व त्यानें झडती-वॉरंट घेऊन पोलिस आले आहेत व इमारतीला त्यांनीं गराडा घातला आहे असें सांगितलें. अशा प्रकारचा हा माझा पहिलाच अनुभव असल्यामुळें माझेंहि मन थोडेंसें प्रक्षुब्ध झालें; परंतु पोलिस आले अथवा गेले तरी आपणाला त्याची पर्वा नाहीं, आणि आपली मनाची शांति अथवा सावधानता ढळणार नाहीं, अशी बतावणी करण्याची मनांत प्रबळ इच्छा होती. म्हणून एका कारकुनाला झडतीसाठीं आलेल्या पोलिस-अधिकाऱ्याबरोबर जा व त्यांना कचेरीच्या खोल्या दाखवा असें मीं फर्माविलें व कचेरींतील बाकीच्या सर्व लोकांनीं शिपायांकडे लक्ष न देतां आपापलें काम करीत रहावें असेंहि मीं बजावलें. कांहीं वेळानें माझ्या एका सहकारी मित्राला कचेरीबाहेरच पोलिसांनीं पकडलें होतें, तो माझा निरोप घेण्यासाठीं आंत आला. पोलिस बरोबर होताच. मी अहंमन्यतेनें इतका फुगून गेलों होतों कीं हे अपरिचित प्रसंग देखील नित्याचे आहेत असें समजून आपण चाललें पाहिजे अशी मीं कल्पना करून घेतली आणि माझ्या सहकाऱ्याशीं मी अगदीं तुसडेपणानें वागलों. मी पत्र लिहीत होतों तें संपेपर्यंत जरा थांबा असें मीं माझ्या मित्राला व पोलिसाला सांगितलें व तेंहि अगदीं औपचारिक रीतीनें! थोड्याच अवकाशांत शहरांत आणखी धरपकड झाल्याची बातमी आली. शेवटीं घरीं जाऊन काय झालें आहे तें पहावें तरी, असें ठरवून मी तिकडे गेलों. तेथें आमच्या मोठ्या घरापैकीं एका भागाची पोलिस झडती घेत होते. माझ्या वडिलांना व मला दोघांनाहि पकडण्यासाठीं ते आले आहेत असें मला सांगण्यांत आलें.

प्रिन्स् ऑफ वेल्स्च्या भेटीवरील बहिष्कार आमच्या अटकेमुळें जितका यशस्वी झाला, तितका दुसरें कांहींहि केलें असतें तरी तो यशस्वी झाला नसता! जेथें जेथें युवराज गेले, तेथें तेथें हरताळांनीं व ओस पडलेल्या रस्त्यांनींच त्यांचें स्वागत केलें! अलाहाबादेला ते आले तेव्हां सारें शहर स्मशानासारखें शुष्क झालें होतें. कांहीं दिवसांनीं ते कलकत्त्याला गेले असतां त्या प्रचंड शहरांतले सर्व धंदे कांहीं काळपर्यंत एकदम बंद पाडण्यांत आले. प्रिन्स् ऑफ वेल्स्चा चांगलाच पाणउतारा झाला. पण त्यांचा त्यांत कांहींच दोष नव्हता, आणि कोणाच्याहि मनांत त्यांच्याविषयीं वैय्यक्तिक द्वेषभावहि नव्हता. आपलें मृत्युपंथाला लागलेलें वर्चस्व सांवरून धरण्यासाठीं

हिंदुस्थान-सरकारनें त्यांच्या प्रतिष्ठेचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न चालवला होता तो फसला, इतकेंच.

संयुक्त प्रांत व बंगालमध्यें अटकेचें जनमेजय सत्रच सुरू झालें. दोन्ही प्रांतांतील झाडून सगळ्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना अटक करण्यांत आली व हजारों स्वयंसेवक तुरुंगांत गेले.

संयुक्त प्रांत-कॉंग्रेस-कमिटीच्या सर्व सभासदांना (५५ सभासदांना) बैठक चालू असतांना एकाच वेळीं अटक केली गेली. ज्यांनीं कॉंग्रेसच्या राजकीय चळवळींत मुळींच भाग घेतला नव्हता, अशा कित्येकांनीं उत्साहाच्या भरांत आम्हांला अटक करा असा हट्ट धरला. कचेरींतून परत येत असतांना सरकारी कारकून या लोंढ्यांत सांपडले कीं घरीं पोंचावयाच्या ऐवजीं तुरुंगांत पोंचायचे अशीं उदाहरणें त्या वेळीं घडलीं ! पोलिसांच्या मोटरींत तरुण माणसें व मुलें घुसून बसत आणि बाहेर येण्याचें नाकारीत. दररोज संध्याकाळीं जयघोषाच्या निनादांत लॉरी मागून लॉरी तुरुंगाकडे येत असे तें आम्हांला आंत बसल्या बसल्या ऐकूं येई. तुरुंग भरून गेले आणि या विलक्षण प्रकाराला तोंड कसें द्यावें हें तुरुंगाधिकाऱ्यांना सुचेना. कधीं असें होत असे कीं पोलिस-लॉरींतून वॉरंटांत नमूद केलेली माणसांची संख्या आलेली असेल म्हणून पाहावयास जावें, तों मोटरींतून त्यापेक्षां अधिक माणसें बाहेर पडत व मग तुरुंगावरील अधिकाऱ्यास काय करावें याची पंचाईत पडे. कारण अशा प्रसंगीं कसें वागावें याबद्दलचा कोणताहि खुलासा 'जेल मॅन्युअल' मध्यें सांपडण्यासारखा नव्हता !

हलके हलके भरमसाट धरपकड करण्याची पद्धति सरकारनें सोडून दिली. प्रमुख लोकांनाच तेवढें पकडण्याचें धोरण ठेवण्यांत आलें. लोकांतील उत्साहाची पहिली लाटहि कांहीं काळानें ओसरली. आणि विश्वासाचे सगळे कार्यकर्ते तुरुंगांत अडकल्यामुळें बाहेर धरसोडीचें व असहायतेचें वातावरण पसरलें. तथापि हा बदल वरवरचा होता. आकाश अद्यापि मेघांनीं व्याप्त होतें, गडगडाट चालू होता, आणि उलथापालथी होण्याचा संभव दिसत असल्यामुळें वातावरण अद्यापि गरम होतें. डिसेंबर १९२१ ते जून १९२२ पर्यंत जवळजवळ तीस हजार लोक असहकारितेच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें तुरुंगांत गेले. बहुतेक मुख्य मुख्य पुढारी तुरुंगांत पडले असले, तरी चळवळीचे सेनानी महात्मा गांधी अद्यापि बाहेर होते व रोजच्या रोज संदेश देऊन व दिशा दर्शवून लोकांचा उत्साह ते कायम राखीत होते. अनेक अनिष्ट प्रसंगहि त्यांच्यामुळें टळले. सरकारनें अद्यापि त्यांना हात लावला नव्हता. हिंदी फौजेवर व पोलिसांवर त्यांच्या अटकेचा वाईट परिणाम तर होणार नाहीं ना, अशी सरकारला भीति वाटत होती.

१९२२ च्या सुरुवातीला यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणें सर्वच देखावा पालटला. तुरुंगांत आम्हांला कळलें कीं गांधीजींनीं चळवळीचे सर्व चढाऊ कार्यक्रम

बंद केले असून कायदेभंगाची चळवळ थांबविली आहे ! ही बातमी ऐकून आम्ही थक्क झालों, गोंधळून गेलों ! वृत्तपत्रांत बातमी वाचली कीं, चौरीचौरा नांवाच्या गांवीं खेडुतांच्या जमावानें पोलिसांचा प्रतिकार करण्याच्या उद्देशानें पोलिसांसकट चौकीला आग लावून दिली आणि त्यामुळें सहासात पोलिस जळून मेले.

आमचें बळ संघटित होत चाललें असतां व सर्व दिशांनीं आमचें पाऊल पुढें पडत असतां चळवळ थांबवण्यांत आली ह्याचा आम्हांला राग आला. परंतु आमची निराशा झाली असली अथवा आम्हांला राग आला असला, तरी आम्ही तुरुंगांत अडकलेले होतों, त्यामुळें कोणाला कांहींच करणें शक्य नव्हतें. कायदेभंग बंद पडला, असहकारितेचीहि सद्दी संपली. कित्येक महिन्यांच्या दगदगीनंतर व चिंतेनंतर सरकारला हुश्श् करावयाला फुरसत मिळाली. स्वतः पुढाकार घेण्याचा सुयोग सरकारला इतक्या दिवसांनंतर प्राप्त झाला. कांहीं आठवडे गेल्यावर सरकारनें गांधीजींना पकडून त्यांना जबरदस्त शिक्षा ठोठावली.

# १२

## अहिंसा व तलवारीचा पंथ

चौरीचौरा-प्रकरणानंतर कायदेभंग एकाएकीं थांबवण्यांत आल्यामुळें कॉंग्रेस-मधील बहुतेक प्रमुख पुढाऱ्यांचीं मनें क्षुब्ध झालीं असावींत असें मला वाटतें. गांधीजींची अर्थातच क्षुब्ध झालेल्यांत गणना नव्हती. माझे वडील त्या वेळीं तुरुंगांतच होते. त्यांचें मन फारच अस्वस्थ झालें. आमच्या उंच भरारणाऱ्या आशा संपातीप्रमाणे धरणीवर कोसळल्या. ही मानसिक प्रतिक्रिया अपेक्षित अशी होती. त्यांतल्या त्यांत चळवळ-बंदीचीं जीं कारणें दाखविण्यांत आलेलीं होतीं, तीं ऐकल्यावर व त्या कारण-मीमांसेंतून जी परिणाम-परंपरा सिद्ध होत होती, त्याची अटकळ आल्यावर आमचें मन विशेषच अस्वस्थ झालें. चौरीचौऱ्याला घडलेला प्रकार खेदजनक असेल; नव्हे, तसा तो होताहि. अहिंसामय चळवळींतील तत्त्वाशीं पूर्णपणे विसंगत असें आचरण तेथें घडलें. परंतु प्रश्न असा कीं एकाद्या कोपऱ्यांतल्या खेड्यांत शेत-कऱ्यांच्या चिडलेल्या जमावानें कांहीं कृत्य केलें म्हणून राष्ट्राचें स्वातंत्र्यासाठीं चाल-लेलें युद्ध, तात्पुरतें कां होईना, बंद पाडण्यांत यावें कीं काय ? अकल्पित अशा एकाद्या फुटकळ हिंसाकर्माचा जर हमखास हाच परिणाम व्हावयाचा असेल, तर अहिंसा-युद्धाच्या तंत्रपद्धतींत व तत्त्वज्ञानांत कोठें तरी गोम राहिलेली असली पाहिजे. कारण अशा प्रकारचे अनिष्ट प्रसंग घडून येणार नाहींतच अशी हमी कोणालाहि देतां येणें शक्य नाहीं. पुढें पाऊल टाकण्यापूर्वीं हिंदुस्थानांतील तास-पस्तीस कोटी लोकांना अहिंसातत्त्वाचें शास्त्र व त्याचा आचारधर्म उत्तम प्रकारें पढवला पाहिजे असें का म्हणावयाचें आहे ? आणि इतकें करूनहि शिपायांकडून आत्यंतिक आग-ळिकीचीं कृत्यें झालीं, तरी लोकांची शांति यत्किंचितहि ढळणार नाहीं असें आश्वासन द्यावयास कितीसे लोक धजतील ? आणि याहि गोष्टींत आम्हांला यदाकदाचित् यश मिळालें, तरी शेंकडों आगलावे लोक आमच्या चळवळींत गुप्तपणें प्रवेश करून घेऊन स्वतः अत्याचार करतील व दुसऱ्यांना तसें करण्यास प्रोत्साहन देतील, त्याची काय व्यवस्था ? चळवळ सुरू करतांना हीं सर्व पथ्यें संभाळलीं पाहिजेत असा आग्रह असेल, तर अहिंसेची चळवळ नेहमींच फसणार हें ठरलेलें.

आम्हीं आणि कॉंग्रेसनें ह्या पद्धतीचा स्वीकार, ती फलदायी होईल असा विश्वास वाटला, म्हणून केला. देशाच्या पसंतीसाठीं गांधीजींनीं ही चळवळ पुढें ठेवली ती केवळ न्याय्य होती म्हणून नव्हे, तर आमच्या ध्येयाच्या दृष्टीनें ती परिणाम-

कारक ठरण्यासारखी होती म्हणून. तिचें नांव नकारात्मक असलें, तरी ती प्रगमनशील होती. अरेरावांच्या इच्छेचे गुलाम होऊन राहण्याच्या वृत्तीच्या ती सर्वस्वीं विरुद्ध होती. युद्धाचें तोंड चुकवणाऱ्या दिवाभीतांना ह्या पद्धतींत स्थान नव्हतें. अहिंसा-पद्धति म्हणजे अन्याय व पारतंत्र्य यांच्याशीं सामना देण्यासाठीं उभ्या राहिलेल्या शूराच्या हातची समशेर होती. पण कांहीं मूठभर लोकांनीं अथवा आमच्या गोटांत शिरलेल्या प्रच्छन्न विपक्षीयांनीं बेताल वर्तन केलें, कीं जर आमचा डाव उधळला जाणार असेल, तर कितीहि शूर व खंबीर लोक असले, तरी त्यांचा उपयोग काय ?

अस्खलित वक्तृत्वाची व मतानुराधनाची शक्ति गांधीजींच्या अंगीं पुष्कळच आहे. सविनय कायदेभंगाचा व अहिंसेचा स्वीकार काँग्रेसकडून करण्यांत यावा म्हणून गांधीजींनीं ती सर्वच्या सर्व खर्ची घातली होती. त्यांची भाषा सुगम आणि साधी होती, आवाज व मुद्रा शांत, स्पष्ट आणि निर्विकार होती. परंतु वरवर दिसणाऱ्या या हिमाच्या आच्छादनाखालीं जळत्या तेजाची आणि घनीभूत इच्छाशक्तीची धग होती. त्यांच्या तोंडांतून बाहेर पडलेले शब्द आमच्या मनांत बाणाप्रमाणें खोल खोल शिरत होते. मनांत त्यांच्या शब्दामुळें विलक्षण खळबळ उत्पन्न झाली. त्यांनीं दाखवलेला मार्ग बिकट, संकटमय होता. पण तो शूराचा मार्ग होता. स्वातंत्र्याच्या नंदनवनांत नेणारा तो मार्ग आहे असें वाटलें व अशी कल्पना झाल्यामुळेंच आम्ही त्यावर श्रद्धा ठेवून पुढें सरसावलों. १९२० सालच्या "तलवारीचा पंथ" नामक एका प्रसिद्ध लेखांत त्यांनीं पुढील विचार व्यक्त केले आहेत:

"मला असें वाटतें कीं, भ्याडपणा व अत्याचार यांपैकीं कोणते तरी एक पत्करण्याची वेळ आली, तर मी अत्याचार पत्करा असाच उपदेश करीन, यांत तिळमात्र शंका नाहीं. हिंदुस्थाननें भ्याडपणा पत्करून नेभळटपणानें आपली मानखंडना झालेली पाहत राहण्यापेक्षां आपल्या इज्जतीसाठीं खड्ग हातीं घेणें अधिक श्रेयस्कर आहे असें मी म्हणेन. परंतु अनत्याचार हा अत्याचारापेक्षां शतपटीनें श्रेष्ठ आहे व शिक्षेपेक्षां क्षमा करण्यांत अधिक पौरुष आहे, असा माझा दृढ विश्वास आहे. क्षमा हेंच वीराचें भूषण.

"परंतु शिक्षा करण्याचें सामर्थ्य अंगीं असतां शिक्षा करण्याची इच्छा आवरली तरच त्याला क्षमा असें म्हणणें योग्य होईल. हतबल झालेल्यानें क्षमेची ऐट मिरवणें व्यर्थ होय. उंदीर मांजरास आपले तुकडे तुकडे करूं देतो त्या वेळीं तो मांजरास क्षमा करतो थोडीच !......पण हिंदुस्थान दुबळा आहे अथवा स्वतः मी दुबळा प्राणी आहें असें मला वाटत नाहीं.

"माझ्या या म्हणण्याचा कोणीहि गैरसमज करून घेऊं नये. शारीरिक बळ असलें म्हणजे धैर्य येतें असें नाहीं. दुर्दम्य अशा इच्छाशक्तीपासून तें निर्माण होतें.............

"मी कल्पनासृष्टींत भराऱ्या मारणारा चंडोल नव्हे. माझा ध्येयवाद व्यावहारिक

आहे असें मी मानतों. अहिंसाधर्म हा कांहीं ऋषी किंवा साधुसंत यांच्याकरतांच केवळ नाहीं. तो सामान्य लोकांकरितांहि आहे. हिंसा ही ज्याप्रमाणें पशूंचा स्वभावधर्म, त्याचप्रमाणें मानवांचा स्वभावधर्म म्हणजे अहिंसा. पशूंतील आत्म्याचें स्वरूप अविकसित असें असतें; बळी तो कान पिळी हाच त्यांचा धर्म. उच्चतर धर्माचें प्रतिपालन करणें, आत्मिक सामर्थ्याची जोपासना करणें, हें मानवजातीची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठीं आवश्यक आहे.

" म्हणूनच मी स्वार्थत्यागाचें प्राचीन तत्त्व हिंदुस्थानपुढें ठेवण्यास उद्युक्त झालों आहें. कारण सत्याग्रह व असहकार व कायदेभंग या त्याच्या शाखा म्हणजे आत्मक्लेशाच्या पुरातन तत्त्वांचींच नवीं नांवे होत. भोंवतीं हिंसा सुरू असतां अहिंसाधर्माचा शोध लावणाऱ्या ऋषींना न्यूटनपेक्षांहि अधिक प्रतिभावान् समजलें पाहिजे. वेलिंग्टनपेक्षां मोठे असे ते योद्धे होते. युद्धकला स्वतःला अवगत असूनहि तिचा फोलपणा त्यांच्या लक्षांत आला आणि युद्धजर्जर झालेल्या जगाला तुझा मोक्ष हिंसेनें होणार नसून तो अहिंसेनें होणार आहे असें त्यांनीं शिकविलें.

" जाणूनबुजून क्लेश सहन करणें हेंच अहिंसाधर्माचें क्रियात्मक स्वरूप. दुष्टांच्या अरेरावीला दुबळेपणानें मान तुकविणें हा अहिंसाधर्माचा अर्थ नसून, मदोन्मत्तांच्या अरेरावीविरुद्ध आपलें सगळेंच्या सगळें आत्मिक बळ खडें करणें हा त्याचा अर्थ आहे. या मानवाच्या स्वभावधर्माचें पालन जर व्यक्ति करील, तर आपला मान, आपला धर्म व आपला आत्मा यांचें संरक्षण करण्याकरितां तिला एकाद्या अन्यायी साम्राज्याच्या सर्व सामर्थ्यापुढें दंड थोपटून उभें राहतां येईल आणि त्या साम्राज्याच्या ऱ्हासाचा अथवा पुनरुज्जीवनाचा आरंभ करण्याची शक्तीहि त्या एकट्या व्यक्तीमध्यें निर्माण होईल.

" आणि हिंदुस्थाननें अहिंसा आचरावी असें मी प्रतिपादन करतों, तें कांहीं हिंदुस्थान दुबळा आहे म्हणून नव्हे. आपणांत सामर्थ्य व धैर्य आहे, याची जाणीव ठेवून हिंदुस्थाननें अहिंसा आचरावी असें माझें सांगणें आहे. आपला आत्मा अविनाशी आहे, कोणत्याहि शारीरिक दौर्बल्यानें हतबल न होतां तो विजयी ठरेल व सर्व जगाची शारीरिक शक्ति एकटवली तरी तिलाहि तो तोंड देईल, असा आत्मविश्वास हिंदुस्थाननें बाळगावा.

" सिनफेन पद्धतीपेक्षां असहकार फार निराळा आहे. असहकाराची उभारणीच अशा तत्त्वावर झालेली आहे, कीं अत्याचाराच्या हातांत हात घालून असहकार चालूंच शकणार नाहीं. पण अत्याचारी पंथालासुद्धां ' एकवार या शांतिमय असहकाराचा प्रयोग करून पहा ' असें माझें सांगणें आहे. असहकारितेचें तत्त्वच सदोष आहे म्हणून तें फसलें असें कदापि होणार नाहीं. जनतेचा पुरेसा पाठिंबा मिळाला नाहीं, तर असहकारिता नामोहरम होईल. त्या वेळीं मात्र आणीबाणीचा प्रसंग येईल. थोर मनाच्या लोकांना राष्ट्राचा उपमर्द यापुढें सहन करणें अशक्य होऊन आपल्या

संतापास वाव द्यावा असें वाटूं लागेल. ते अत्याचारास हात घालतील. परंतु आपल्या देशाचा अथवा स्वतःचा उद्धार न करतांच त्यांना नष्ट व्हावें लागेल, असें माझ्या मनाला वाटतें. हिंदुस्थाननें तलवार हातीं घेतली, तर कदाचित् त्याला क्षणिक विजय मिळेल. पण मग मला हिंदुस्थानविषयीं अभिमान वाटणार नाहीं. माझ्या शरीरांतील अणुरेणु हिंदुस्थानांतल्या भूमींतून निर्माण झालेला असल्यामुळें माझा पिंड हिंदुस्थानच्या पिंडाशीं एकजीव झालेला आहे. सर्व जगासाठीं हिंदुस्थानला कांहीं कार्य करावयाचें आहे असें मला निश्चयेंकरून वाटतें."

या युक्तिवादानें आम्हांला हलवून सोडलें खरें; पण अहिंसावाद हा आम्ही अगर सगळी राष्ट्रीय सभा धर्म म्हणून पत्करील हे कधींच शक्य नव्हतें. धोरण म्हणून, कांहीं विशिष्ट फल साध्य करून देणारी पद्धति म्हणून तो मान्य होणार आणि फलावरूनच त्याची परीक्षाहि होणार. अहिंसावाद हा आमचा धर्म आहे असें कांहीं व्यक्तींना म्हणतां येईल. परंतु कोणत्याहि राजकीय संस्थेला तिचें राजकीय स्वरूप कायम असेतोंपर्यंत, ही गोष्ट शक्य नाहीं.

चौरीचौरा-प्रकरणानंतर अहिंसेच्या मार्गाची व तदन्तर्भूत तत्त्वांची आम्ही छाननी करूं लागलों. गांधीजींनीं केला तोच अर्थ बरोबर असेल, तर चळवळीच्या चाकोरींत दगड ठेवण्याचें काम सरकारला केव्हाहि करतां येण्यासारखें होतें. तेव्हां अहिंसेचा मार्ग सदोष होता कीं गांधीजींचा अर्थ चुकीचा होता? अहिंसेच्या मार्गाचे गांधीजीच पिते आणि प्रणेते; तेव्हां अहिंसा-शास्त्रांतील विधिनिषेध त्यांच्याहून कोण अधिक चांगला सांगणार? आणि गांधीजींना वगळल्यावर चळवळ ती कोणती उरली?

मोठ्या समाधानाची गोष्ट अशी, कीं नंतर कित्येक वर्षांनीं म्हणजे १९३० सालच्या कायदेभंगाला सुरुवात होण्याच्या आधीं गांधीजींनीं हा मुद्दा स्पष्ट केला. त्यांनीं सांगितलें, कीं कांहीं कांहीं ठिकाणीं हिंसेचे फुटकळ प्रकार घडून आले, तरी चळवळ बंद करण्याचें कारण नाहीं. असले अपरिहार्य प्रसंग उत्पन्न झाल्यामुळें जर अहिंसामय चळवळीचा गाडा अडणार असेल, तर अहिंसेचा मार्ग हा सर्व प्रसंगीं उपयोगी पडणारा आदर्श मार्ग नव्हे ही गोष्ट उघडच सिद्ध होते. परंतु गांधीजींनीं ही विचारसरणी मान्य केली नाहीं. त्यांचा युक्तिवाद असा कीं मार्ग जर योग्य आहे, तर सर्व परिस्थितींत तो उपयुक्त ठरलाच पाहिजे आणि कांहीं प्रमाणांत विरोधी वातावरण असतांहि त्याची उपयुक्तता कमी होण्याचें कारण नाहीं. गांधीजींच्या स्पष्टीकरणामुळें अहिंसामय चळवळीचें क्षेत्र व्यापक झालें. हें स्पष्टीकरण स्वतः गांधीजींच्या मनाचाच विकास झाल्यामुळें त्यांनीं दिलें किंवा काय हें मला सांगतां येणार नाहीं.

वास्तविक १९२२ च्या फेब्रुवारींत कायदेभंगाची चळवळ बंद करण्यांत आली, त्याला एकटें एक चौरीचौरा-प्रकरणच कारणीभूत झालें असें नाहीं. लोकांची मात्र

तशी कल्पना आहे हें खरें. चौरीचौऱ्याचा दंगा केवळ निमित्तमात्र होता. गांधीजी पुष्कळ वेळां सहजप्रवृत्तींच्या प्रेरणेनुसार कार्य करतात. जनतेशीं आलेल्या चिरकालीन व दृढ परिचयामुळें त्यांना जणुं कांहीं एका नवीनच ज्ञानेंद्रियाची प्राप्ति झालेली आहे. जनतेच्या मनाची नाडीपरीक्षा त्याच्या साहाय्यानें त्यांना अचूकपणें करतां येते, व जनतेला कोणतें काम झेपेल व कोणतें झेपणार नाहीं हेंहि त्यांना चांगलें समजतें. मोठ्या-मोठ्या सर्वच लोकप्रिय पुढाऱ्यांना या अनन्यसामान्य साधनाचा लाभ झालेला आढळतो. या सहजप्रवृत्तीचा कौल घेऊन तिच्या अनुरोधानें ते वागतात आणि नंतर आपल्या भांबावलेल्या व चिडलेल्या सहकाऱ्यांच्या समजुतीखातर आपल्या वर्तणुकीचें बुद्धिगम्य असें समर्थन करणारी कारणमीमांसा शोधून काढण्याचा ते प्रयत्न करतात. ही कारणमीमांसा पुष्कळ वेळां किती अपुरी असते हें चौरीचौरा-प्रकरणाच्या वेळीं दिसून आलें. चळवळीला खूप जोर चढत आहे व सर्वत्र उत्साहाचें वातावरण पसरलें आहे असा देखावा बाह्यात्कारी दिसत असला, तरी आंतल्या बाजूनें चळवळीचा पाया डळमळूं लागला होता. संघटना व शिस्त नाहींशी होत होती, सर्व चांगले कार्यकर्ते तुरुंगांत अडकले होते, आणि स्वतःच्या बळावर चळवळ चालवण्याइतकें शिक्षण जनतेला मिळालेलें नव्हतें; कोणींहि उठावें व चळवळीचें नेतृत्व हातीं घ्यावें असा प्रकार सुरू होता. कित्येक अविश्वासी व्यक्ती व क्वचित् प्रसंगीं सरकारचे बगलबच्चेहि पुढारी म्हणून मिरवीत! कांहीं ठिकाणीं काँग्रेस व खिलाफत-संघटनेचीं सूत्रेंहि त्यांनीं आपल्या हातीं घेतलीं होतीं! ह्या गोष्टींना आळा घालणें अशक्य झालें.

अर्थात्च मोठ्या चळवळी निघाल्या, कीं अशा गोष्टींना सर्वस्वीं आळा घालणें शक्य होत नाहीं. जनतेला साध्या कार्यक्रमांचें शिक्षण देऊन ठेवणें एवढेंच काय तें आपल्या हातीं असतें. १९३० सालापर्यंत जनतेला अशा प्रकारचें थोडेंसें शिक्षण आम्हांला देतां आलें व त्यामुळें १९३० व १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळी कितीतरी संघटित व प्रभावी ठरल्या. १९२० आणि १९२२ सालीं असल्या शिक्षणाचा अभावच होता. जनतेच्या उत्साहाला व भावनांना शिक्षणाचें पाठबळ नव्हतें. चळवळ तशीच चालू राहिली असती, तर चौरीचौऱ्यासारखे दंगेधोपे आणखी अनेक ठिकाणीं झाले असते यांत शंका नाहीं. सरकारनें रक्त वाहवूनच ही दंग्याची आग विझवली असती व भयंकर दडपशाहीचा वरवंटा सर्वत्र फिरूं लागून लोकांचें मनोधैर्य पार खचून गेलें असतें.

याच कारणपरंपरेचा परिणाम मनावर होऊन गांधीजी वागले असावेत. अहिंसेचें तत्त्व संभाळून चळवळ पुढें चालवणें अवश्य आहे ही गोष्ट मान्य असेल, तर गांधीजींनीं केलें तें योग्यच केलें असें म्हणावें लागेल. डाव कुजत चालला होता तो थांबवून पुन्हां प्रारंभापासून सुरुवात करावयाची होती. एका सर्वस्वीं निराळ्या दृष्टिकोणांतून पाहिलें, तर त्यांचें वर्तन चूक ठरलें असें म्हणतां येईल. पण त्या

दृष्टिकोणाचा अहिंसेशीं कांहींहि संबंध नाहीं. जें खायाचें तेंच शिल्लकहि ठेवायचें हें कसें साधणार ? फुटकळ दंगे माजवून, सरकारचा डोकें ठेंचून काढणारा दडपशाहीचा वरवंटा त्या अर्धकच्च्या तयारीच्या काळीं आपण आपल्या कपाळीं पाडून घेतला असता, तर राष्ट्रीय चळवळ कायमची बंद झाली असती असें नव्हे. कारण अशा चळवळी सरणावरून जिवंत होऊन उठत असतात. अल्पकालिक पीछेहाटीमुळें प्रश्नांचें स्वरूप सुव्यक्त होतें आणि त्यामुळें कार्यकर्त्यांत खंबीरीहि पैदा होते. परंतु महत्त्व आहे तें तत्त्वांचें व ध्येयाचें आहे, पीछेहाटीचें अथवा वरवरच्या पराभवाचें नाहीं. हीं तत्त्वें जनतेला जर निष्कलंक अशीं राखतां आलीं, तर पराभवानंतर थोड्याच काळांत अंगांत नवीन ताकद येते. पण १९२१ व १९२२ सालीं आमच्यापाशीं तत्त्वें व ध्येय म्हणून होतें तरी काय ? मागें रेखीव विचार-सरणी नसलेलें अस्पष्ट असें स्वराज्याचें ध्येय व अहिंसामय चळवळीचें एक विशिष्ट तंत्र, ही आमची सर्व सिधासामग्री. देशांत ठिकठिकाणीं दंगेधोपे सुरू झाले असते, तर अहिंसेची वाट लागली असती. स्वराज्याच्या ध्येयाबद्दल बोलावयाचें तर त्याचें चित्रहि मनांत स्पष्ट असें उमटलेलें नव्हतें. बहुत काळपर्यंत चळवळ चाल-वण्याची ताकद जनतेत नव्हती; आणि परकीय सत्तेविरुद्ध सामान्यतः सार्वजनिक असंतोष पसरलेला असला व कांग्रेसबद्दल सहानुभूति वाटत असली, तरी संघटना अथवा प्रतिकारशक्ति यांचा देशांत पूर्ण अभाव होता. लोक तुरुंगांत गेले ते सुद्धां क्षणिक भावनेच्या भरांत गेले. ही गडबड लवकरच संपेल अशी त्यांना मनांतून आशा वाटत होती !

तेव्हां १९२२ मध्यें कायदेभंग बंद केला ही गोष्ट योग्य झाली असली, तरी तो ज्या तऱ्हेनें बंद करण्यांत आला ती तऱ्हा फारशी इष्ट नव्हती व तिचा परिणाम लोकांची हिम्मत खचण्याकडे कांहींसा झाला असें आपणांला म्हणतां येईल.

फार मोठ्या चळवळीला कासरा ताणून एकाएकीं थांबवल्यामुळें देशांत घातुक मनोवृत्तींची वाढ झाली असण्याचा संभव आहे. राजकीय क्षेत्रांत व्यक्त होणारी निष्फळ व पांगलेली हिंसावृत्ति मावळली. पण व्यक्त होण्यासाठीं कोठें तरी ती अवकाश शोधीत होती. त्यामुळें इतउत्तरच्या काळांत जातीय तंटे विकोपास गेले असावेत. असहकारितेची व कायदेभंगाची नदी दुथडी भरून वाहात होती तोंपर्यंत सर्व प्रकारचे जातिनिष्ठ व राजकीय दृष्ट्या उलट चालीचे लोक लव्हाळ्यासारखे दबून राहिले. त्यांनीं आतां डोकें वर उचललें. बातम्या पुरवून व जातीय तंट्यांचे वेताळ उभे करून अधिकाऱ्यांच्या खुशामती करणाऱ्या कानकुजबुज्यांनीं व लाळ-घोट्यांनीं जातिनिष्ठेचें ढोलकें बडवण्यास प्रारंभ केला. मोपल्यांनीं बंड केलें व अमा-नुष दडपशाही करून तें बंड मोडून काढण्यांत आलें. आगगाडीच्या बंद डब्यांत मोपला-कैद्यांना कोंबल्यावर त्यांचा गुदमरून प्राण गेला ही केवढी क्रौर्याची गोष्ट ! पण त्या बंडामुळें जातिनिष्ठांचें चांगलेंच फावलें. एक गोष्ट संभवनीय वाटते कीं कायदेभंग

थांबवला नसता आणि सरकारनें तो दडपून टाकला असता, तर जातिभावना इतक्या उत्तू गेल्या नसत्या व जातीय भांडणें लढवण्याचा फाजील उत्साहहि अंगांत राहिला नसता.

कायदेभंग थांबविण्यापूर्वी अशी एक घटना बनत होती, कीं जिच्यामुळें कदाचित् निराळेंच दृश्य पाहावयास सांपडलें असतें. कायदेभंगाच्या पहिल्या लाटेसरशीं लॉर्ड रीडिंगनें जाहीर सभेंत म्हटल्याप्रमाणें सरकार त्रासून व गोंधळून गेलें होतें. प्रिन्स् ऑफ वेल्स् त्या वेळीं हिंदुस्थानांत आलेले होते, त्यामुळें सरकारवरची जोखीमदारीहि बरीच वाढली होती. १९२१ च्या डिसेंबरांत काँग्रेस व आपण यांच्यांत कांहीं तरी समजूत निघावी म्हणून सरकारनें प्रयत्न चालवला होता. युवराज कलकत्त्याला लवकरच येणार असल्याकारणानें ही निकड सुरू होती. बंगाल-सरकारचे प्रतिनिधी व देशबंधू दास यांचें कांहीं अनौपचारिक बोलणेंचालणेंहि झालें. दासबाबू त्या वेळीं तुरुंगांत होते. एक सूचना अशी मांडण्यांत आली होती, कीं सरकार व काँग्रेस यांच्या प्रतिनिधींची एक अल्पशी मंडलाकार परिषद् भरवावी. कराची-तुरुंगांत डांबण्यांत आलेल्या मौलाना महमद अल्लींना परिषदेस हजर राहतां आलें पाहिजे असा आग्रह गांधीजींनीं धरल्यामुळें परिषदेचा सगळाच बेत ढांसळला. सरकार महमद अल्लींना सोडण्यास तयार होईना.

दासांना गांधीजींची ही वृत्ति पसंत पडली नाहीं, व सुटून आल्यावर गांधीजींवर त्यांनीं जाहीर टीका करून त्यांची या कामीं भयंकर चूक झाली असें बोलून दाखविलें. आम्ही तुरुंगांत होतों, त्यामुळें त्या वेळच्या बारीकसारीक गोष्टी आम्हांला कळल्या नाहींत. परंतु या परिषदेपासून कांहीं इष्ट गोष्टी घडल्या असत्या असें मला वाटत नाहीं. युवराजांची भेट व्यवस्थितपणें पार पाडावी यासाठीं हा खटाटोप सरकार करीत होतें! आमच्यापुढील मुख्य प्रश्नांचा निकाल त्यामुळें कधींच लागला नसता. नऊ वर्षांनंतर राष्ट्र कितीतरी पटींनीं सामर्थ्यवान् झालें असूनहि मंडलाकार परिषदेतून विशेष अशी कांहींच फलनिष्पत्ति झाली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो विचार सोडला, तरी महमद अल्लींविषयीं गांधीजींनीं धरलेला आग्रह यथायोग्यच नव्हता काय? काँग्रेस-पुढारी म्हणून व विशेषतः खिलाफत-पुढारी म्हणून ते हजर असणें अगदीं आवश्यक होतें. कोणत्याहि धोरणामुळें सहकाऱ्याला सोडावें लागत असेल तर तें धोरण कधींच बरोबर ठरणार नाहीं. सरकार महमद अल्लींची सुटका करण्यास राजी नव्हतें, त्या एका गोष्टीवरूनहि परिषदेचा फोलपणा सिद्ध होण्यासारखा आहे.

माझ्या वडिलांना व मला दोन वेगवेगळया कोर्टांनीं भिन्नभिन्न आरोपांवरून सहा महिन्यांची शिक्षा दिली होती. चौकशी म्हणजे एक सोंगच होतें. वहिवाटीप्रमाणें आम्हीं त्यांत भाग घेतला नाहीं. खटला चालू असतां सगळा वेळ माझ्या मुलीला आपल्यापाशीं घेऊन वडील बसले होते. पिंजऱ्यांत बसण्याचा हा तिचा पहिला अनुभव!

हरताळाचीं पत्रकें मीं वांटलीं हा माझा गुन्हा. आपण स्वायत्ततेकडे झपाट्यानें चाललों असल्याकारणानें हरताळाचीं पत्रकं वांटणें हा हल्लीं गुन्हा ठरला आहे खरा; पण त्या काळीं त्यांत बेकायदेशीर असें कांहीं नव्हतें. तथापि मला शिक्षा मिळालीच. तीन महिन्यांनंतर फेरचौकशी–अधिकाऱ्यानें मला निर्दोषी ठरवल्यामुळें मला सोडण्यांत आलें. मी आश्चर्यचकितच झालों! कारण माझ्याविषयीं कोणींच खटपट केलेली नव्हती. कायदेभग थांबल्यामुळें फेरचौकशी करणाऱ्या न्यायाधीशांना काम करण्याचा हुरूप आला असावा! वडिलांना सोडून बाहेर जाणें माझ्या जिवावर आलें होतें.

लगेच अहमदाबादेला जाऊन गांधीजींची भेट घ्यावयाचें मीं ठरवलें. पण मी तेथें पोंचण्यापूर्वींच गांधीजींना अटक झालेली होती. त्यांची भेट साबरमती-तुरुंगांत झाली. खटल्याच्या वेळीं मी हजर राहिलों. तो प्रसंग चिरस्मरणीय होता. आमच्यापैकीं तेथें जे लोक हजर होते, त्यांच्या आठवणींतून तो जाणें शक्य नाहीं. जज्ज् एक इंग्रज गृहस्थ होते, ते मोठ्या गंभीरपणें व सुजाणपणें वागले. गांधीजींनीं कोर्टाला उद्देशून केलेलें भाषण चित्ताला अगदीं हालवून टाकणारें असें होतें. आम्ही परत फिरलों तेव्हां त्यांतील अर्थपूर्ण वाक्यें व ठसठशीत कल्पनाशक्ति यांचीं चित्रें आमच्या डोक्यांत तरळत होतीं.

मी अलाहाबादेस परत आलों. अनेक मित्र व सहकारी तुरुंगांत अडकलेले असल्यामुळें बाहेर मला एकटें एकटें वाटूं लागलें: मनाला मुळींच करमेना. कॉंग्रेस-संस्था व्यवस्थित चालत नव्हत्या. त्यांची गाडी सरळ रुळावर आणून ठेवण्याच्या प्रयत्नाला मी लागलों. परदेशी मालावरील बहिष्कारांत मीं लक्ष घातलें. चळवळ थांबली असली, तरी कार्यक्रमाचा हा भाग चालूच होता. अलाहाबादेंतील बहुतेक कापड-व्यापाऱ्यांनीं परदेशी कापड आयात अथवा खरेदी न करण्याचें अभिवचन दिलें होतें, व त्यासाठीं एक मंडळहि काढलें होतें. नियमभंग झाला तर दंडाची शिक्षा व्हावी असा मंडळाचा नियम होता. अनेक बड्या व्यापाऱ्यांनीं नियमाचा भंग केलेला आढळून आला. वचनाला जागरूक राहिलेल्यांवर ह्यामुळें अन्याय होऊं लागला. आम्हीं निषेध केला, पण त्याचा फारसा उपयोग होईना. कोणतीहि शिक्षा करणें मंडळाच्या शक्तीबाहेरचें काम होतें. म्हणून आम्हीं निरोधन करण्याचें ठरविलें. निरोधनाची नुसती कुणकुण लागतांच आमचें काम झालें. दंड भरला गेला आणि पुन्हां आणाशपथा झाल्या. दंडाचे पैसे व्यापारी-मंडळाकडे जमा झाले.

दोनतीन दिवसांनीं मला व व्यापाऱ्यांशीं बोलणीं करण्यांत ज्यांनीं भाग घेतला होता, अशा माझ्या सहकाऱ्यांना पकडण्यांत आलें. धाकदपटशा व जबरदस्तीनें केलेली वसुली ह्या आरोपांबाबत आमच्यावर खटले झाले. राजद्रोह वगैरे आणखी दुसरेहि आरोप माझ्यावर करण्यांत आले होते. मीं बचाव केला नाहीं, पण कोर्टापुढें माझें म्हणणें विस्तारानें मांडलें. माझ्यावरील तीन आरोप शाबीत होऊन

मला सजा देण्यांत आली. झाली एवढी शिक्षा पुरेशी वाटल्यामुळेंच बहुधा राजद्रोहाचा आरोप काढून टाकण्यांत आला असावा. मला एकंदर एक वर्ष, नऊ महिन्यांची शिक्षा झाली. ही शिक्षेची दुसरी खेप. बाहेर सुमारें सहा आठवडे राहून मीं पुन्हां तुरुंगाच्या दारांत पाऊल ठेवलें.

# १३

# लखनौचा जिल्हा-तुरुंग

राजकीय गुन्ह्यासाठीं तुरुंगाची शिक्षा मिळणें ही गोष्ट १९२१ सालीं नवीन वाटण्याचें कारण नव्हतें. विशेषेंकरून वंगभंगाच्या चळवळीपासून तुरुंगाकडे जाणारांची अखंड रांगच लागलेली होती. कित्येकांना अनेक वर्षांच्या शिक्षा झालेल्या होत्या. विनाचौकशी स्थानबद्ध केल्याचीं उदाहरणेंहि घडलीं होतीं. त्या काळांतील सर्वश्रेष्ठ राजकीय पुढारी लोकमान्य टिळक यांना त्यांच्या उतार वयांत सहा वर्षांची सजा ठोठावण्यांत आली होती. महायुद्ध सुरू झालें व स्थानबद्धांची व राजबंद्यांची संख्या भराभर फुगत चालली, कटांच्या खटल्यांचें सत्र सुरू झालें व फांशीच्या व जन्मठेपेच्या शिक्षा देण्यांत येऊं लागल्या. अलीबंधू व अबुल कलम अझाद यांना महायुद्धाच्या वेळींच स्थानबद्ध करण्यांत आलें होतें. तदनंतर पंजाबच्या लष्करी कायद्याचा अंमल सुरू असतां कटाच्या खटल्यांत व तडकाफडकी निकालांत कित्येक लोकांना तुरुंग मिळाला. अशा प्रकारें राजकीय बंदिवास ही हिंदुस्थानच्या नित्य परिचयाची बाब होऊन बसली होती. परंतु आपण होऊन कोणी तुरुंगांत जावयास तयार होत नसे. कार्य करतां करतां तुरुंग वाटेंत आडवा आला, अगर गुप्त पोलिसखात्याला एकादा माणूस पसंत पडला नाहीं म्हणून तुरुंगांत जाण्याची पाळी आलीच, तर तो प्रसंग टळावा यासाठीं कोर्टांत शक्य तेवढे बचावाचे सर्व प्रयत्न करण्यांत येत असत.

तथापि १९२१ सालांत देखील तुरुंगाचें अन्तरंग अपरिचितच होतें. तुरुंगाच्या उग्र दिसणाऱ्या दरवाजानें नव्या राजबंद्याला गिळून टाकलें कीं त्याचें आंत काय होतें याची जाणीव तेव्हां थोड्यांनाच असेल. कैदी म्हणजे बेफाम आणि भयंकर व्यक्ति, इतकीच आम्हांला माहिती होती. तुरुंग म्हणजे एकान्तवास, अपमान, हालअपेष्टा, पुढें काय प्रसंग येईल याची चिंता, अशी आमची कल्पना होती. १९२० सालापासून तुरुंगवासाच्या बातम्या सारख्या वाचनांत येऊं लागल्या व प्रत्यक्ष आमच्या सहकाऱ्यांपैकीं सुद्धां पुष्कळजण तुरुंगांत गेले. त्यामुळें तुरुंगवासाच्या कल्पना पचनीं पडून पूर्वी तुरुंग म्हटला कीं मनांत नकळत जी नाखुषीची व तिटकाऱ्याची भावना जागृत होत असे, ती कमी कमी होऊं लागली. परंतु पूर्वतयारी कितीहि झालेली असली, तरी तुरुंगाच्या लोहद्वारांत पहिल्याच वेळीं उभें राहिल्याबरोबर मनोवृत्तींची जी खळबळ उडे व मनाला जो ताण बसे, तो नाहींसा होणार थोडाच? त्यानंतर गेल्या तेरा वर्षांच्या काळांत राजकीय गुन्ह्यांसाठीं कमींत कमी तीन लक्ष

स्त्री-पुरुष तरी तुरुंगाची वारी करून आले आहेत. त्यांपैकीं हजारोंनीं अनेकदां तुरुंगवास सोसला आहे, आंतल्या स्थितीची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. वैचित्र्य-हीनतेमुळें भयंकर वाटणाऱ्या, नीरस व तापदायक अशा तुरुंगांतील विलक्षण जीवनक्रमाशीं जितकें मिळतें घेणें मनुष्याला शक्य आहे, तितकें मिळतें घेण्याचा प्रयत्न त्यांनीं केलेला आहे. माणसाला बहुधा कोणतीहि परिस्थिति अंगवळणीं पडते, तसा तुरुंगवासहि आमच्या अंगवळणीं पडत चालला आहे. तरी देखील त्या दर-वाजांत पाऊल ठेवलें, कीं पूर्वीप्रमाणेंच अजूनहि मनाची थोडीशी चलबिचल उडते, ओढाताण होते व हृदय धडधडूं लागतें; व बाहेरच्या जगांतील वृक्षराजींचें, विस्तीर्ण खुलेपणाचें, लोकांचें व गाड्याघोड्यांचें आणि कित्येक दिवसपर्यंत पुन्हां ज्यांची गांठहि पडणार नाहीं अशा आप्तेष्टांचें डोळे भरून शेवटचें दर्शन घ्यावें म्हणून नजर नकळतच मागें मुरडल्याशिवाय रहात नाहीं.

पहिल्या तुरुंगवासाच्या वेळीं तीन महिन्यांनंतर माझी अचानकपणें सुटका झाली. आम्हांला व तुरुंगांवरील अधिकाऱ्यांना तो काळ मोठा धामधुमीचा गेला. नव्या प्रकारच्या कैद्यांचा लोंढाच तुरुंगांत लोटल्यामुळें अधिकारीसुद्धां हतबुद्ध झाले होते. दिवसेंदिवस वाढत जाणारी राजबंद्यांची संख्या इतक्या झपाट्यानें फुगत होती, कीं त्या पुरामध्यें तुरुंगांतील जुन्या शिस्तीच्या खाणाखुणा गडप होतात कीं काय, अशी त्यांना धास्ती वाटूं लागली ! नव्या येणाऱ्या कैद्यांची जातच विलक्षण होती ! त्यांत सर्व दर्जाचे लोक असले, तरी मध्यम वर्गाच्या लोकांचा भरणा विशेष होता. पण या सर्व वर्गांत सामान्य असें एक लक्षण होतें तें असें कीं नेहमींच्या कैद्यांहून ते अगदीं भिन्न असत. त्यामुळें त्यांना जुन्या पद्धतीनें वागवणेंहि कठिण होई. पण कोणत्या तऱ्हेनें त्यांना वागवावें याबद्दल अधिकाऱ्यांपाशीं पूर्वीचा दाखला अगर अनुभव कांहींच नव्हता. कांग्रेसचा कैदी म्हटला, म्हणजे तो बहुधा नेभळा अथवा गरीब नसावयाचा. तुरुंगाच्या आवारांत तो असला, तरी एक प्रकारची सामर्थ्याची जाणीव संख्या-धिक्यामुळें त्याला वाटत राही. बाहेर चाललेली चळवळ व तुरुंगाच्या आंत काय चाललें आहे ह्याविषयीं जनतेला वाटणारी जिज्ञासा यांमुळें त्याला धीर येत असे. आमचें वर्तन जरा चढेलखोरपणाचें असलें, तरी आम्ही तुरुंगावरील अधिकाऱ्यांशीं सहकार्यानें वागत असूं. आमची मदत मिळाली नसती, तर त्यांना फारच त्रास झाला असता. एकाद्या वेळीं स्वयंसेवकांची समजूत घालावयाची असली, म्हणजे जेलर आमच्याकडे येऊन आम्हांला त्यांच्या बराकींत घेऊन जात असे.

आम्हीं तुरुंगांत स्वतःच्या खुषीनेंच आलों होतों व कित्येक स्वयंसेवक तर तुरुंगांत घुसले होते असें म्हटलें तरी चालेल ! तेव्हां निसटून जाण्याचा कोणी प्रयत्न करील ही गोष्टच शक्य नव्हती. कोणाला सुटून जावेंसें वाटलेंच, तर केलेल्या कृत्या-बद्दल दुःख प्रदर्शित केलें अथवा इतःपर ह्या फंदांत आपण पुन्हां पडणार नाहीं असें लिहून दिलें, म्हणजे काम भागण्यासारखें होतें. निसटून जाण्याच्या प्रयत्नामुळें

स्वतःचीच नाचक्की झाली असती. आमच्या तुरुंगाच्या सुपरिटेंडंटला ह्याची पूर्ण कल्पना होती. कांहीं कैद्यांचें मन वळवून तुरुंगांतून निसटून जाण्यासाठीं त्यांना तुम्हीं प्रवृत्त केलेंत तर खानसाहेबाचे ऐवजीं खानबहादुरीची पदवी तुम्हांला देण्याची मी सरकारकडे शिफारस करीन, असें ते जेलरला विनोदानें सांगत असत.

माझ्या वडिलांना, दोघां चुलत भावंडांना व मला २०" × १६" ची एक लहान पृथक् कोठडी देण्यांत आली होती. निरनिराळ्या बराकींतून जाण्यायेण्याची आम्हांला बरीच मोकळीक असे. बाहेरच्या आप्तेष्टांशीं सुद्धां पुष्कळदां गांठीभेटी होत. दररोज येणाऱ्या वृत्तपत्रांतील ताज्या धरपकडीच्या व चळवळीच्या बातम्यांमुळें वातावरण उत्साहमय रहात असे. आपसांतील चर्चेंत पुष्कळ वेळ निघून जाई आणि वाचनासाठीं अथवा दुसऱ्या विशेष कामासाठीं फारच थोडा वेळ मिळे. आमची कोठडी झाडून लोटून स्वच्छ करण्यांत, वडिलांचे व माझे कपडे धुण्यांत व सूत कांतण्यांत माझा सकाळचा वेळ जात असे. ते हिंवाळ्याचे दिवस होते. उत्तर हिंदुस्थानांत हिंवाळ्याचे दिवस म्हणजे सर्वांत उत्तम. पहिले कांहीं आठवडे स्वयंसेवकांसाठीं हिंदी, उर्दू व इतर प्राथमिक विषयांचे वर्ग उघडण्याची आम्हांला परवानगी मिळाली होती. दुपारीं आम्ही व्हॉलीबॉल खेळत असूं. *

हळूहळू निर्बंध वाढूं लागले. आमच्या हद्दीच्या बाहेर जाण्याची आणि तुरुंगाच्या ज्या विभागांत बहुतेक स्वयंसेवकांना ठेवण्यांत आलें होतें, तिकडे चक्कर मारण्याची आम्हांला बंदी करण्यांत आली. साहजिकच वर्ग बंद पडले. तेवढ्यांत माझी मुक्तता झाली. मी मार्चच्या प्रारंभीं बाहेर गेलों, तो एप्रिलमध्यें परत आलों. परिस्थिति बरीच पालटली होती. वडिलांची रवानगी नैनीतालच्या तुरुंगांत केल्यानंतर नवे नियम लादण्यांत आले. विणण्याच्या जागेंत ठेवण्यांत आलेले सर्व राजकीय कैदी आंतल्या तुरुंगांत नेण्यांत येऊन त्यांना बराकींत बंद करण्यांत आलें. प्रत्येक बराक म्हणजे तुरुंगांतील पोटतुरुंगाप्रमाणें होती. बराकींना परस्परांशीं संबंध ठेवतां येत नसे. भेट व पत्र महिन्यांतून एकदांच मिळूं लागलें. अन्नहि निकृष्ट प्रकारचें देत. त्यांत बाहेरून भर घालण्याची मात्र परवानगी होती.

मी ज्या बराकींत होतों, तेथें सुमारें ५० माणसें होतीं. आम्ही सर्व दाटीदाटीनें रहात होतों. दोन अंथरुणांत तीन अगर चार फुटांचें अंतर असे. सुदैवाची गोष्ट म्हणजे बराकींतील बहुतेक व्यक्ती माझ्या परिचयाच्या होत्या व त्यांच्यापैकीं बरेचसे माझे मित्रच होते. पण अहोरात्रींत एकांत असा मुळींच मिळत नसल्यामुळें

* वृत्तपत्रांत एका हास्यास्पद गोष्टीचा उल्लेख वारंवार येत असतो. असें म्हणण्यांत येतें कीं, त्या वेळचे संयुक्त प्रांताचे गव्हर्नर सर हारकोर्ट बटलर हे माझ्या वडिलांसाठीं तुरुंगांत शॅम्पेन पाठवीत असत. गव्हर्नरकडून तुरुंगांत कांहींहि येत नसे व शॅम्पेन अगर कोणतेंहि मादक पेय कोणीहि पाठवीत नव्हतें. वास्तविक १९२० सालींच त्यांनीं मादक पेयें वर्ज्य केलीं होतीं व त्या काळीं ते कोणतेंहि मद्य घेत नसत.

मोठें अवघड होऊं लागलें. तेच तेच लोक आपल्याकडे पहात असावयाचे, त्याच त्याच लहानसहान कुरापती निघावयाच्या. त्यापासून सुटका करून घेणार कशी ? उघड्यावरच स्नान करावें व तेथेंच कपडेहि धुवावेत. व्यायाम घ्यावयाचा तर बराकीच्या भोंवतीं पळावें लागत असे. आम्हीं इतका वादविवाद केला, कीं कांहीं नवा युक्तिवाद सांगण्याची ताकद बहुधा कोणांतच उरली नाहीं. कौटुंबिक जीवनांत जो नीरस भाग असतो, तोच नीरस भाग शंभरपट वाढवून येथें अनुभवावा लागे. कुटुंबांतील प्रेम वगैरे इतर गोष्टींचा मात्र येथें संपूर्ण अभाव होता ! ह्या जीवनाचा सर्वांच्याच मनाला त्रास होई. माझा जीव तर पुष्कळ वेळां एकांतवासासाठीं तळमळत राही. नंतरच्या आयुष्यांत तुरुंगांतील एकांतवासाची पोटभर मेजवानी मला मिळावयाची होती ! त्या वेळीं महिनेच्या महिने तुरुंगांतील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त कोणत्याहि मनुष्याचें दर्शनसुद्धां होत नसे. तेव्हां देखील मनांत अशीच अस्वस्थता उत्पन्न झाली व कोणाचा तरी सहवास लाभावा म्हणून मन तळमळूं लागलें ! ह्या गर्दीत काढलेल्या आयुष्याचें स्मरण मला तेव्हां होत असे, व त्याचा क्वचित् मनांत हेवाहि वाटे. परंतु दोहोंपैकीं एकांतवासाचीच मला मनांतून अधिक आवड आहे हें मी जाणून होतों. मला लिहिण्यावाचण्याची परवानगी मिळाली म्हणजे पुरे.

गर्दी होती खरी; पण मित्रांचा सहवास अत्यंत सौजन्यपूर्ण व आनंदमय होता हेंहि कबूल केलें पाहिजे. आमचें एकंदरींत बरें जमत असे. परंतु कधीं कधीं इतरांची संगत नकोशी वाटे व दूर कोठें तरी जाऊन बसावें अशी इच्छा उत्पन्न होई. त्या वेळीं पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें बाहेर जाऊन बसणें शक्य होतें, म्हणून एकांतवासाची इच्छा झाली कीं बराकींतून उठून आमच्या आवारांत उघड्यावर जाऊन बसण्याचा मीं क्रम ठेवला होता. ऊन लागे व क्वचित् प्रसंगीं पावसाची सरहि येई. पण तें सहन करून मी शक्य तितका वेळ बराकीच्या बाहेरच घालवीत असें. तेथें उघड्यावर पडल्या पडल्या आकाशाकडे व मेघमालेकडे मी टक लावून बघत असें. त्या वेळीं त्यांचे बदलते रंग किती सुंदर दिसतात याची मला चांगली कल्पना आली.

आमच्या दृष्टीनें वेळेला कांहीं किंमत राहिली नव्हती. वेळ इतका मुबलक असे कीं त्याचें ओझेंच वाटावें ! क्षणोक्षणीं बदलणाऱ्या पावसाळी रंगांचें निरीक्षण करण्यांत मी जो वेळ घालवीत होतों, तो मात्र अतिशय आनंदांत जाई. बराकींतील कोंदट वातावरणांतून झालेल्या सुटकेमुळें मला समाधान वाटत असे. त्या वर्षीच्या पावसाळ्याचा माझ्यावर इतका परिणाम कां झाला कोणास ठाऊक ? त्यापूर्वी अगर नंतर असें कधींहि झाल्याचें मला आठवत नाहीं. डोंगरावर आणि समुद्रावर झालेले सूर्योदय व सूर्यास्त मीं अनेकवार पाहिलेले आहेत व त्यांच्या दिव्य सौंदर्यात अवगाहन करून त्यांच्या भव्यतेमुळें मनाला कांहीं काळ जो उल्हास प्राप्त होतो, त्याचाहि अनुभव मीं घेतलेला आहे. परंतु असें देखावे नित्य परिचयाचे झाल्यामुळें त्यांत विशेष गोडी वाटत नाहींशी झाली असावी. परंतु तुरुंगांत सूर्योदय अथवा सूर्यास्त कधींच

पहावयास मिळत नसे. क्षितिजाचें दर्शन आम्हांला कधीं घडलें नाहीं. सकाळचा बराच काळ उलटल्यानंतर आमच्या भोंवतीं उभारलेल्या तटावरून जेव्हां सूर्य उगवे, तेव्हां त्याचे किरण प्रखर झालेले असत. रंगवैचित्र्य तर कुठेंच नजरेस पडत नसे. मातीनें लिंपलेल्या भकास भिंतींकडे पाहण्याची संवय झाल्यामुळें डोळ्यांची रुचि-ग्रहणाची शक्ति जवळजवळ नष्टच झाली होती. मनांतून मात्र छाया, प्रकाश आणि रंग यांचे खेळ पाहण्यासाठीं ते आतुर झालेले असावेत. त्यामुळें पावसाळी ढगांचीं शिडें जेव्हां मोठ्या दिमाखानें फडकूं लागलीं, चित्रविचित्र आकारांच्या मेघांच्या रांगा आकाशांत गर्दी करूं लागल्या व हरतऱ्हेच्या रंगांत क्रीडा करून त्या न्हाणून निघूं लागल्या, तेव्हां आनंदानें बेहोष होऊन अनिमेष लोचनांनीं समाधि लागल्याप्रमाणें मी त्यांच्याकडे पाहतच राहिलों! कधीं कधीं ढग पांगून जात आणि मग फक्त पावसाळ्यांतच दिस-णारा मनोहारी देखावा डोळ्यांना दिसत असे. गर्द ढगांच्या फटींतून आकाशाच्या अगाध नीलिम्याचें दर्शन झालें कीं अनंताचा एक अल्पखंडच आपण पाहत आहों असा भास होई.

आमच्या चळवळीच्या वकुबाची सरकारला आतां पूर्णपणें कल्पना येऊन चुकल्यामुळें आमच्या कृत्यांबद्दल आपणाला किती राग आलेला आहे तें आमच्या चांगलें अनुभवाला आणून देण्याचा सरकारचा इरादा होता. म्हणून आमच्यावर अधिकच नियम लादण्यांत आले. नव्या नियमांची अंमलबजावणी सुरू झाल्यामुळें व अंमलबजावणीच्या रीतीमुळें अधिकाऱ्यांत व राजबंद्यांत खटके उडूं लागले. कित्येक महिनेपर्यंत शेंकडोंजणांनीं निषेध म्हणून भेटी वगैरे घेण्याचें बंद केलें. अधिकाऱ्यांची अशी कल्पना झाली असावी कीं या बाबतींत राजबंद्यांना आमचीच फूस आहे. म्हणून आम्हां सात जणांना तुरुंगांतील एका दूरच्या विभागांत, बराकींशीं कांहींहि संबंध पोंचणार नाहीं अशा ठिकाणीं नेऊन ठेवण्यांत आलें. वेगळ्या काढ-लेल्या लोकांत पुरुषोत्तमदास टंडन, महादेव देसाई, जॉर्ज जोसेफ, बाळकृष्ण शर्मा, देवदास गांधी, वर्मा व मी असे लोक होतों. आम्हांला एका लहान आवारांत ठेवण्यांत आलें. तेथें राहणें गैरसोयीचें होतें; परंतु हा बदल मला पसंत पडला. कारण येथें गर्दी तरी नव्हती; त्यामुळें थोडी अधिक शांतता व अधिक एकान्त मिळण्यासारखा होता. वाचावयास अथवा इतर काम करण्यास खूप वेळ सांपडे. तुरुंगांतील इतर सहकाऱ्यांशीं व बाह्य जगाशीं आमचा संबंध अजिबात नाहींसा झाला. कारण राजबंद्यांना वृत्तपत्रें देण्याची प्रथा सरसकट बंद करण्यांत आली होती.

आम्हांला वृत्तपत्रें मिळालीं नाहींत तरी बाहेरच्या बातम्यांचा झिरपा आंत येतच असे. दर महिन्याला मिळणाऱ्या भेटींच्या व पत्रांच्या द्वाराहि बातम्यांचे तुकडेताकडे आमच्यापर्यंत पोंचत. बाहेर चळवळ ओसरत चालली आहे, उत्कर्षाचा काळ उलटून यश भविष्यकाळाच्या अंधारांत लोपत चाललें आहे ह्याची खबर

आम्हांला आंत कळली होती. काँग्रेसमध्यें फूट होऊन फेरवाले व नाफेरवाले असे दोन गट पडले होते. देशबंधु दासांच्या व माझ्या वडिलांच्या नेतृत्वाखालीं नव्या होणाऱ्या मध्यवर्ति व प्रांतिक निवडणुकी लढवून कायदेमंडळें काबीज करण्याच्या प्रयत्नांत फेरवाल्यांचा पक्ष होता. नाफेरवाले असहकारितेचा जुना मार्ग सोडण्यास तयार नव्हते. त्यांचें नेतृत्व राजगोपालाचारी यांच्याकडे होतें. गांधीजी तर त्या वेळीं तुरुंगांतच होते. ज्या चळवळीच्या अग्रेसर लाटेवर आरूढ होऊन आम्ही पुढें सरकलों, त्या चळवळीचीं अंतिम ध्येयें या क्षुद्र भांडणांत व अधिकारप्राप्तीसाठीं चाललेल्या डावपेचांत गडप झालीं! उत्साहाच्या व भावनावेशाच्या भरांत मोठ्या शर्थीचीं कृत्यें करण्यापेक्षां चढता काळ संपल्यावर नेटानें काम करीत राहणें ही किती बिकट गोष्ट आहे, याची कल्पना आम्हांला त्या वेळीं आली. बाहेरच्या बातमीमुळें आमच्या उत्साहाला मरगळ आली आणि त्यांतच तुरुंगांतील कुंद वातावरणांत निर्माण होणाऱ्या रोगट मनोवृत्तींचा भर पडल्यामुळें मनाला फार त्रास होऊं लागला. तथापि आम्हीं आमचा स्वाभिमान व अब्रू यांचें रक्षण केलें: परिणाम कांहींहि झालेला असो; आम्हीं योग्य तेंच वर्तन केलें ही अंतःसमाधानाची भावना मनांत अद्यापि जागृत होतीच. भविष्यकाळ अंधारांत गुरफटलेला होता, त्याचें स्वरूप कसेंहि असलें, तरी आमच्यापैकीं कित्येकांना आयुष्यांतील पुष्कळसा काळ तुरुंगांत घालवावा लागणार आहे, त्याविषयीं शंका उरली नव्हती. अशाच प्रकारचीं बोलणीं आमच्यांत निघत.

कामाचें व व्यायामाचें रहाटगाडगें सुरू झालें. व्यायाम व्हावा म्हणून आवारांतल्या आवारांतच पळण्याचा क्रम आम्हीं ठेवला होता. केव्हां केव्हां आमच्यापैकीं दोघेजण बैलाप्रमाणें मोटहि ओढीत असत. त्यामुळें तेथल्या भाजीपाल्यांच्या वाफ्यांना पाणी द्यावयास मिळे. बहुतेक लोक रोज थोडेंसें कांतीत असत. परंतु त्या हिंवाळ्याच्या दिवसांत माझा मुख्य धंदा म्हणजे वाचनाचा. जेव्हां जेव्हां सुपरिंटेंडेन्टची आमच्या आवारांत फेरी येई, तेव्हां तेव्हां त्याला मी वाचीत असलेला दिसें. हें वाचनाचें वेड पाहून तो जरा चिडलाच व त्यानें माझ्यावर थोडी टीकाहि केली. "माझ्याबद्दल विचाराल, तर वयाच्या १२ व्या वर्षापासूनच मीं सर्वसामान्य वाचन सोडून दिलें आहे" असें तो म्हणे. वाचन बंद केल्यामुळें या शूर इंग्लिश पुरुषाचा फायदाच झाला असावा. कारण वाचनामुळें डोक्यांत उद्भवणाऱ्या त्रासदायक विचारतरंगांपासून त्याचा मेंदु सर्वस्वीं अलिप्त राहिला असेल, आणि शिवाय संयुक्त प्रान्ताच्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स ह्या उच्च जागीं त्याची नेमणूक करणेंहि त्यामुळें सुलभ झालें असेल!

हिंवाळ्यांत संध्याकाळ लवकर होई आणि आकाश निरभ्र असल्यामुळें आमचें चित्त साहजिकच ताऱ्यांकडे वेधलें जात असे. नकाशांच्या मदतीनें आम्ही कांहीं नक्षत्रपुंज शोधूनहि काढले. संध्याकाळीं ते उगवण्याची आम्ही वाट पहात बसत असूं. ते दिसूं लागले कीं ओळखीचे मित्र भेटल्याचा आनंद आम्हांला होई.

अशा प्रकारें आमचा काळ चालला होता. दिवसामागून दिवस जातां जातां दिवसांचे आठवडे व आठवड्यांचे महिने झाले. तुरुंगांतील दैनिक जीवनाची चाकोरी अंगवळणी पडली; पण बाहेरच्या जगांत आमच्या आयांवर, धर्मपत्नींवर, बहिणींवर संसाराचा भार पडत होता. वर्षानुवर्ष वाट पाहतां पाहतां त्या कंटाळल्या होत्या आणि त्यांचीं प्रिय माणसें तुरुंगांत अडकलेलीं असल्यामुळें बाहेरची मोकळीक त्यांच्या हृदयाला शल्याप्रमाणें बोंचत होती.

१९२१ सालीं आम्हांला प्रथम अटक झाल्यानंतर लगेच कांहीं दिवसांनीं आनंदभवनांत पोलिसांच्या येरझारा सुरू झाल्या. वडिलांना व मला करण्यांत आलेल्या दंडाची वसुली करण्यासाठीं ते येत होते. कॉंग्रेसनें दंड न देण्याचें ठरवलेलें होतें. पोलिस रोज येत व थोडें थोडें फर्निचर घेऊन जात. ही एकसारखी चाललेली उचला-उचली पाहून माझ्या चार वर्षांच्या इंदिरा नांवाच्या मुलीला फार राग येई व ती त्यांना फैलावर घेई. लहानपणीं तिच्या मनावर झालेल्या या संस्कारामुळें मला वाटतें कीं एकंदर पोलिसांविषयीं पुढेंहि तिच्या मनांतली अढी कायमच राहणार.

अ-राजकीय बंद्यांपासून आम्हांला दूर ठेवण्याची विशेष खबरदारी घेण्यांत येत असे. राजकीय बंद्यांसाठीं स्वतंत्रच तुरुंग ठेवावेत असा साधारणपणें नियम होता. तथापि त्यांच्याशीं येणारा संबंध अजिबात तोडून टाकणें शक्य नव्हतें. स्वतःच्या अनुभवांवरून व त्यांच्या मार्फत, त्या काळच्या तुरुंगांतील जीवनाविषयीं आम्हांला माहिती कळत असे. अत्याचार, लांचखाऊपणा व अनीति यांनीं तुरुंगाचें वातावरण सडलेलें होतें. अन्न अगदीं गचाळ होतें. तें घेण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण तें घशाखालीं घोटेचना! अधिकारी-वर्ग बहुधा नालायक असे व त्यांना पगारहि अगदीं निकृष्ट प्रतीचा मिळे. जेलरच्या व इतर अधिकाऱ्यांच्या जबाबदारीची व कर्तव्याची माहिती जेल-मॅन्युअलमध्यें दिलेली होती. कैद्याची सुधारणा करणें, त्याला उपयुक्त धंदे शिकविणें व इष्ट अशा संवयी लावणें हीं कामें संयुक्त प्रांताच्या तुरुंग खात्याच्या धोरणांतच बसत नव्हतीं. कैद्याला काम द्यावयाचें तें त्याला भंडावून सोडण्याच्या उद्देशानें! हाडें मोडून काढून व चळचळ कांपावयाला लावून त्याला सीधा करा-वयाचा, गुलाम बनवावयाचा, हें तुरुंगाचें उद्दिष्ट! कल्पना अशी, कीं तुरुंगाची त्याला एवढी जबरदस्त जरब बसली, म्हणजे गुन्हा करून पुन्हां तुरुंगांत यावयास त्याचें मन धजणारच नाहीं.

गेल्या कांहीं वर्षांत थोडया सुधारणा झाल्या आहेत. अन्न, कपडे व इतर गोष्टी जरा बऱ्यापैकीं असतात. तुरुंगांतून सुटलेल्या राजकीय कैद्यांनीं बाहेरची चळवळ केली त्याचा हा परिणाम आहे. असहकारितेच्या चळवळीच्या जमान्यांत वार्डरांनीं सरकारनिष्ठ राहावें म्हणून त्यांच्या पगारांतहि थोडीशी वाढ करण्यांत आलेली आहे. कैद्यांपैकीं मुलांना व तरुणांना शिक्षण देण्याचा अगदीं अल्प प्रमाणांत कांहीं प्रयत्नहि करण्यांत येतो. या सुधारणा ठीकच आहेत; पण त्यामुळें मूळ प्रश्नाचा बोटभर ढळपा-

देखील हालणार नाहीं. शिवाय तुरुंगाचें जुनें धोरण होतें तेंच आजहि कायम आहे. मग या वरपांगी सुधारणांचा कितीसा उपयोग होणार ?

राजबंद्यांपैकीं बहुसंख्य लोकांना सामान्य कैद्यांप्रमाणेंच वागवण्यांत आलें. त्यांना विशेष हक्क अगर वागवणूक अशी कांहींच नव्हती. पण इतरांहून त्यांची वृत्ति चढाऊ व बुद्धि प्रगल्भ असल्यामुळें त्यांना छळणें इतकें सोपें नव्हतें. त्यांच्यापासून फारसे पैसेहि उकळतां येत नसत. अधिकाऱ्यांची साहजिकच त्यांच्यावर खप्पा मर्जी झाली व तुरुंगाचा कायदा त्यांच्यापैकीं कोणीं मोडला कीं ती संधि साधून त्यांना कडक शिक्षा देण्यांत येऊं लागल्या. अशा एका गुन्ह्याकरितां स्वतःला "आझाद" म्हणवणाऱ्या एका पंधरा सोळा वर्षांच्या पोराला फटक्यांची शिक्षा देण्यांत आली. त्याचे कपडे उतरवून त्याला तिकाटण्यावर बांधला. प्रत्येक वेळीं अंगावर फटका बसला व चामडी फाटली कीं "महात्मा गांधी की जय" असा तो जयघोष करी ! मूर्च्छित पडेपर्यंत प्रत्येक आघाताबरोबर तो जयघोष करीत होता. हाच मुलगा पुढें उत्तर हिंदुस्थानांतील दहशतवाद्यांच्या गटाचा एक पुढारी झाला.

## १४

# पुन्हां बाहेरच्या जगांत

तुरुंगांत अनेक गोष्टींची वाण जाणवते; पण त्यांतल्या त्यांत स्त्रियांचा आवाज व मुलांचें खिदळणें ह्यांचे ध्वनी कानीं न पडल्यामुळें फार चुकल्याचुकल्या-सारखें होतें; आणि जे आवाज कानांवर पडतात ते फारसे श्रुतिमधुर नसतात. ते कठोर व दरडावणीचे असतात. मला एकदां एका नवीनच गोष्टीची उणीव फार तीव्रतेनें भासली. त्या वेळीं मी लखनौ जिल्हा-तुरुंगांत होतों. माझ्या मनांत आलें कीं गेल्या सात आठ महिन्यांत कुत्र्याचें भुंकणें कांहीं आपण ऐकलें नाहीं !

१९२३ च्या जानेवारीच्या शेवटच्या दिवशीं लखनौमधील सर्व राजबंद्यांची सुटका करण्यांत आली. लखनौ-तुरुंगांत त्या वेळीं सुमारें शंभर ते दोनशें "खास वर्गांतले बंदी" म्हणजे राजबंदी असावेत. एका वर्षाहून कमी शिक्षेचे लोक अगोदरच सुटले होते; लांब शिक्षेचे लोकच तेवढे मागे राहिले. ह्या अवचित झालेल्या सुटकेची आम्हांला आगाऊ कांहींच कल्पना नव्हती. प्रांतिक कायदे-मंडळानें शिक्षामाफीचा ठराव पसार केला होता. पण सरकारचें कार्यकारी मंडळ अशा ठरावाकडे क्वचितच लक्ष देत असतें. तथापि ही वेळ सरकारच्या दृष्टीनें योग्य होती; कारण कॉंग्रेस सरकार-विरुद्ध कांहींहि गोष्ट करीत नसून कॉंग्रेसवाले आपसांतील धुळवडींतच रंगून गेलेले होते. प्रमुख कॉंग्रेस-कार्यकर्त्यांपैकीं फारच थोडेजण त्या वेळीं तुरुंगांत राहिले असल्या-कारणानें सरकारनें असें धोरण स्वीकारलें.

तुरुंगाच्या दरवाज्यांतून बाहेर पडतांना नेहमींच सुटकेचें समाधान व आनंद यांचा अनुभव येतो. मोकळी हवा व खुलीं मैदानें, रस्त्यावरील वाहतुक व जुन्या मित्रांची भेट या सर्वांचा परिणाम मेंदूवर होऊन तो किंचित् तरल बनतो. बाह्य जगाच्या प्रथम-दर्शनासरशीं माणसाला किंचित् उन्माद चढतो असें म्हटलें तरी चालेल. आमचीं मनेंहि भराऱ्या मारूं लागलीं होतीं; पण आमचा आनंद क्षणभरच टिकला. कारण कॉंग्रेसची स्थिति निराशाजनक झालेली होती. ध्येयवाद संपून कारस्थानें सुरू झालीं होतीं व कॉंग्रेस आपल्या हातीं यावी म्हणून निरनिराळ्या गटांच्या हालचाली चालल्या होत्या. भावनाशील माणसाचा जीव उबगून जाईल असे जे मार्ग राजकारणांत नेहमीं अवलंबिले जातात, तेच मार्ग कॉंग्रेसवालेहि उपयोगांत आणीत होते !

मी स्वतः कौन्सिलप्रवेशाच्या सर्वस्वीं विरुद्ध होतों; कारण प्रवेश केला कीं

सामोपचाराचें व ध्येयच्छेदाचें धोरण स्वीकारणें भाग पडणार हें उघड दिसत होतें. परंतु देशापुढें दुसरा कोणताहि राजकीय कार्यक्रम नव्हता हेंहि खरें. नाफेरवाल्यांचा विधायक कार्यक्रमाविषयीं आग्रह होता. परिणामतः त्यांचा कार्यक्रम समाजसुधारणेचा होता. त्यांतील मुख्य गुण म्हणजे त्यामुळें कार्यकर्त्यांचा जनतेशीं निकट संबंध येत राही. तथापि एवढ्यानें राजकीय कार्याचा आग्रह धरणारांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. शिवाय प्रत्यक्ष प्रतिकाराची लाट यशस्वी न होतांच ओसरून गेल्यावर सनदशीर राजकारणाची आमदानी कांहीं वेळ चालावी ही गोष्ट अपरिहार्य होती. कायदेमंडळांतील राजकारणहि सहकार्याचें व विधायक न ठेवतां अडवणुकीचें व चढाईचें असावें, अशीच दासबाबूंची व माझ्या वडिलांची इच्छा होती.

कायदेमंडळांत शिरून तेथेंहि राजकीय लढा चालवावा असें दासबाबूंचें ठाम मत होतें. माझ्या वडिलांचें धोरणहि जवळ जवळ तसेंच होतें. १९२० सालीं गांधीजींच्या दृष्टिकोणापुढें नमतें घेऊन त्यांनीं कौन्सिल-बहिष्काराला मान्यता दिली. लढ्यांत अगदीं मनःपूर्वक भाग घ्यावयाचा असें ठरल्यानंतर गांधीजींचा सगळाच्या सगळा कार्यक्रम मान्य केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. आयर्लंडांतील सिन्‌फिन्‌नीं पार्लमेंटच्या जागा जिंकल्या व नंतर पार्लमेंटांत पाऊल टाकावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. नव्या पिढींतील लोकांना सिन्‌फिन्‌चें हें धोरण फार पसंत होतें. १९२० च्या उन्हाळ्यांत बहिष्काराची ही पद्धति तुम्हीं स्वीकारावी असा मीं गांधीजींना खूपच आग्रह केलेला मला आठवतो. पण अशा बाबतींत गांधीजी आपलें म्हणणें कदापि सोडीत नसत. महंमद अल्ली त्या वेळीं खिलाफतीच्या शिष्टमंडळाबरोबर युरोपांत गेले होते. परत आल्यावर कौन्सिल-बहिष्काराविषयीं त्यांनीहि नापसंति दर्शवली. सिन्‌फिनचा मार्गच त्यांना अधिक पसंत होता. तथापि, या विषयांत कोणाचें कांहींहि मत असलें, तरी त्याची डाळ शिजली नसती. कारण गांधीजी म्हणतील तेंच शेवटीं मंजूर होणार हें ठरलेलेंच होतें. चळवळीचे जनक तेच; तेव्हां चळवळीचा तपशील ठरविण्याच्या कामीं त्यांना स्वातंत्र्य असावें, असाच सूर वाहत होता. सिन्‌फिन्‌चा हिंसेशीं असणारा संबंध दृष्टीआड केला तरीहि मतदानावर बहिष्कार घाला हा पुकारा जनतेला जसा चटकन् समजेल, तशी सिन्‌फिन्‌ची पद्धति समजणार नाहीं असा गांधीजींचा आक्षेप होता. निवडून आल्यावर कौन्सिलांत जावयाचें नाहीं या धोरणामुळें जनतेच्या मनांत गोंधळ उत्पन्न होईल; शिवाय निवडून आल्यावर आपले उमेदवार कौन्सिलकडे ओढले जातील, त्यांना मागें खेंचून धरण्याचे उपाय यशस्वी होणार नाहींत, बराच काळपर्यंत त्यांना थांबवून धरण्यासाठीं आवश्यक तें सामर्थ्य व शिस्त आपल्या चळवळींत नाहीं, त्यामुळें कायदेमंडळाच्या द्वारा सरकारची मेहेरनजर संपादण्याच्या ज्या उघड अगर गुप्त वाटा आहेत, त्यांच्याकडे आपल्या लोकांचे पाय हलके हलके वळतील व कॉंग्रेसची प्रतिष्ठा नष्ट होईल, असें गांधीजींचें म्हणणें होतें.

गांधीजींचा हा युक्तिवाद अर्थपूर्ण होता व स्वराज्यपक्ष कायदेमंडळांत गेल्यावर त्यांच्या म्हणण्यांतील तथ्य कळून आलें. तथापि १९२० सालीं काँग्रेसनें निवडणुकी लढवल्या असत्या तर काय झालें असतें असा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं. खिलाफत-चळवळीचा काँग्रेसला पाठिंबा असल्यामुळें प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांतील बहुधा प्रत्येक लोकनियुक्त जागा काँग्रेसला मिळाली असती. आजहि ( ऑगस्ट १९३४ ) असेंब्लीच्या निवडणुकी काँग्रेसनें लढवाव्या म्हणून पार्लमेंटरी बोर्डाची स्थापना करण्यांत आली आहे. परंतु आमच्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील भेगा १९२० सालापेक्षां कितीतरी खोलावल्या असून या वेळीं काँग्रेसला निवडणुकींत कितीहि यश लाभलें, तरी १९२० सालची सर आतां येणार नाहीं.

दोन विरोधी गटांत सख्य निर्माण करण्याचे प्रयत्न कांहीं लोक करीत होते, त्यांना तुरुंगांतून सुटल्यावर मी जाऊन मिळालों. मला फारसें यश आलें नाहीं व फेरनाफेर राजकारणाचा मला वीट आला. प्रांतिक काँग्रेस कमिटीचा चिटणीस या नात्यानें मी काँग्रेस-संघटनेकडे लक्ष देऊं लागलों. गेल्या वर्षांच्या धकाधकीमुळें पुष्कळच गोष्टी करावयास हव्या होत्या. मी खूप काम करीत होतों. पण त्यांत सहेतुकता फारशी नव्हती. माझें स्वतःचें मनच अधांतरीं लोंबकळत होतें. लवकरच मला नवीन कार्यक्षेत्र मिळालें. सुटल्यानंतर कांहीं आठवड्यांतच मी अलाहाबाद-नगरपालिकेच्या अध्यक्षस्थानीं जाऊन बसलों. ही निवडणूक इतकी अनपेक्षितपणें झाली, कीं निवडणुकीच्या आधीं पाऊण तासपर्यंत माझें नांवहि कोणीं सुचवलें नव्हतें ! माझ्यासंबंधीं कोणाच्या मनांत विचारहि आला नसावा. पण शेवटच्या क्षणाला काँग्रेस-पक्षाला वाटलें असावें, कीं त्यांच्यापैकीं मीच हमखास यशस्वी होईन.

त्या वर्षी देशभर मुख्य मुख्य काँग्रेस-पुढारी नगरपालिकांचे अध्यक्ष झाले. देशबंधु दास कलकत्त्याचे पहिले मेयर झाले. मुंबई-कॉर्पोरेशनचें अध्यक्षस्थान विठ्ठलभाईंना मिळालें. सरदार वल्लभभाईंची अहमदाबादेस अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली. संयुक्त प्रांतांतील बहुतेक नगरपालिकांचे अध्यक्ष काँग्रेसवालेच होते.

नगरपालिकेंतील निरनिराळ्या कामांची मला गोडी लागून मी त्यासाठीं अधिकाधिक वेळ खर्च करूं लागलों. त्या प्रश्नांचा मीं अभ्यास केला व नगरपालिकेनें करावयाच्या सुधारणांची भव्य योजनाहि मनांत आंखून ठेविली. पण हिंदुस्थानांतील नगरपालिकांची आहे ही घटना कायम असतां कोणताहि असाधारण सुधारणा पार पाडणें शक्य नाहीं हें मला नंतर कळून आलें ! तथापि करतां येण्यासारखें पुष्कळच काम होतें. तिला अधिक कार्यक्षम करण्यासाठीं व जुन्या प्रकारणांचे गदळ काढून टाकण्यासाठीं मीं खूप मेहनत घेतली. माझें काँग्रेसचे कामहि वाढत चाललें होतें व भरींत भर म्हणून ऑल इंडिया काँग्रेसच्या चिटणीसाच्या जागींहि मला निवडण्यांत

आलें होतें. हीं सर्व कामें उरकावयाचीं म्हणजे मला रोज पंधरा पंधरा तास काम करावें लागे. दिवसभर काम केल्यावर सर्व शक्ति खलास होत असे.

तुरुंगांतून सुटल्यावर घरीं येऊन पाहतों तों टपालांतलें पहिलें पत्र अलाहाबाद हायकोर्टाच्या त्या वेळच्या मुख्य न्यायाधीशांचें म्हणजे सर ग्रिमवुड मिअर्स यांचें होतें. पत्रांतील आर्जवाची भाषा व वारंवार भेटत जावें अशी त्यांत केलेली विनंति वाचून मी जरा आश्चर्यचकितच झालों. माझा-त्यांचा परिचय नव्हता म्हटलें तरी चालेल. तथापि माझी विशेष माहिती नसतांहि त्यांना माझ्याबद्दल आपलेपणा वाटत असे. त्यांनीं मला नंतर सांगितलें कीं तुम्ही फार मोठ्या पदाला चढाल अशी माझी कल्पना असल्यामुळें ब्रिटिशांचा दृष्टिकोण तुम्हांला समजावून देण्याच्या कामीं आपला इष्ट तो उपयोग व्हावा अशी माझी मनीषा होती. त्यांची वागण्याची तऱ्हा मोठी खुबीदार असे. सर ग्रिमवुड ह्यांची कल्पना अशी कीं इंग्रज लोक सामाजिक व्यवहारांत जहाल पुढाऱ्यांना अवहेलनापूर्वक वागवीत असल्यामुळें सामान्यतः ते ब्रिटिशांचे द्वेषी बनतात. कित्येक इंग्रज लोकांची अद्यापीहि अशी समजूत आहे कीं त्यांच्या उद्दाम वर्तनामुळें हिंदी लोकांत द्वेषभावना, जहाल वृत्ति वगैरेंचा फैलाव होतो. एक आख्यायिका सांगण्यांत येते व मोठमोठ्या माणसांच्या तोंडून ती ऐकावयास सांपडते, कीं एका इंग्रजी क्लबांत माझ्या वडिलांना प्रवेश नाकरण्यांत आला व तेव्हांपासून ते इंग्रजांचे द्वेषी बनले ! ह्या गोष्टीला मुळींसुद्धां आधार नाहीं. एका निराळ्याच प्रकरणावरून ही एक दतकथा बनवण्यांत आली आहे. परंतु पुष्कळ इंग्रजांना राष्ट्रीय चळवळीची ही मीमांसा पटते व ती पुरेशीहि वाटते. खरें म्हणजे माझ्या वडिलांना अथवा मला या बाबतींत विशेष तक्रार करण्यास जागा नव्हती. अजूनसुद्धां इंग्रज मनुष्याबरोबर माझें चांगलें जमतें. तो अधिकारी असेल आणि मला शहाणपणाच्या गोष्टी शिकविण्याचा स्वाव तो करावयास लागेल, तर गोष्ट निराळी; तथापि राजकीय बाबतींत त्याच्याशीं सहकार्य करणाऱ्या प्रागतिक अथवा दुसऱ्या एखाद्या पक्षांतील माणसापेक्षां माझें त्या इंग्रजाशींच जास्त पटेल, अशी माझी समजूत आहे.

खेळीमेळीची व सौजन्याची वागणूक ठेवून द्वेषाचा हा दांतच उपटून टाकावा असा सर ग्रिमवुड यांचा मानस होता. आमची पुष्कळदां भेट झाली. नगरपालिकेनें बसवलेल्या एखाद्या करावर आक्षेप घेण्याच्या निमित्तानें ते येत व मग इतर गोष्टींची चर्चा करीत बसत. एका प्रसंगीं त्यांनीं प्रागतिकांना अगदीं शिंगावरच घेतलें. भेकड, दुबळे, संधिसाधू, चारित्र्यहीन, तेजोहीन वगैरे विशेषणांचा अहेर त्यांनीं प्रागतिकांना बहाल केला. त्यांची भाषा याहूनहि कडक व तुच्छतेची होती. "आम्हांला त्यांच्या-बद्दल आदर आहे असें का तुम्हांला वाटतें ?" असा त्यांनीं प्रश्न केला. माझ्या-पाशीं ते असें कां बोलले कोण जाणे ! कदाचित् मला त्यापासून आनंद होईल अशी त्यांची समजूत असावी ! नंतर नवीं कायदेमंडळें, मंत्रिपदें, देशाचें भलें करण्याची

दिवाणांना मिळणारी मुसंधि वगैरे विषय त्यांनीं काढले. "शिक्षणाचा प्रश्न म्हणजे देशांतला अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न; क्रियास्वातंत्र्य असल्यावर शिक्षणमंत्र्याला लाखों जीवांच्या भवितव्याला घाट देण्याची नामी संधि मिळणार आहे. आयुष्यांत एकादे वेळींच अशी संधि लाभणार. समजा, कीं तुमच्यासारखा बुद्धिवान्, शीलवान्, ध्येयवादी व कामें तडीस लावण्याची धमक अंगीं असलेला मनुष्य शिक्षणमंत्र्याच्या जागीं बसला, तर तो काय काय चमत्कार करून दाखवील: नुकतीच माझी गव्हर्नरशीं भेट झाली त्यावरून तुम्हांला तमची योजना पार पाडण्याच्या कामीं पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल याविषयीं मला मुळींच शंका राहिलेली नाहीं," असेंहि न्यायमूर्तींनीं मला आश्वासन दिलें. आपण बोलतां बोलतां बरेच वाहवलों असें वाटून ते म्हणाले, कीं "हें कांहीं अधिकृत बोलणें नव्हे हो; ही माझी आपली वैयक्तिक सूचना आहे."

ग्रिमवुडसाहेबांची ही आडवळणी मुत्सद्दिगिरी पाहून मला मोठी मौज वाटली! मंत्रिपद स्वीकारून मीं सरकारशीं सहकार्य करावें ही कल्पनाच मला असह्य वाटते: खरें बोलायचें तर किळसवाणी वाटते. परंतु त्या काळीं व तदनंतरहि कांहीं तरी भरीव विधायक असें काम करण्याची संधि आपणाला मिळावी अशी माझ्या मनाला पुष्कळदां तळमळ लागून राहिलेली आहे. चळवळ, असहकार, विध्वंस हीं कांहीं माणसांचीं नित्याचीं कामें नव्हेत. पण आमचें दैवच असें खडतर आहे, कीं झगडे आणि विध्वंसक कार्य यांनीं भरलेलीं वाळवंटें तुडवून पुढे जावें तेव्हां आम्हांला आमच्या आवडीप्रमाणें समाजरचना करतां येईल असें क्षेत्र मिळणार! आमच्यापैकीं पुष्कळांचें आयुष्य व उत्साह त्या वाळवंटांत झगडण्यांत व राबण्यांतच खर्च व्हायचा असेल व जी कांहीं बांधणी करायवची आहे, ती आमच्या मुलांना अथवा आमच्या नातवांना करावयास सांपडेल.

त्या काळीं संयुक्त प्रांतांत तरी दिवाणगिऱ्या फार सवंग झाल्या होत्या. असहकारितेच्या काळांत मंत्रिपदावर टिकून राहिलेले दोघे प्रागतिक दिवाण आतां मंत्रिपदावरून दूर झाले होते. जेव्हां कॉंग्रेस-चळवळ फार जोरांत होती व सरकारला तिच्यापासून धोका वाटत होता, तेव्हां कॉंग्रेसबरोबर दोन हात करण्यासाठीं त्या प्रागतिक दिवाणांची मदत सरकारनें घेतली. त्यांचा मोठा मानसन्मान होत असे. कारण सरकारचे मदतगार म्हणून त्या अशांततेच्या काळांत त्यांचा उदोउदो करणें फायद्याचें काम होतें. या मानसन्मानावर आपला हक्कच आहे असा त्यांचा समज झालेला असावा! जनतेनें सरकारवर केलेल्या हल्ल्यांची ही केवळ प्रतिक्रिया आहे ह्याची जाणीव त्यांना झाली नाहींसे दिसतें. कॉंग्रेसचा मोर्चा बंद पडला, त्यासरशीं प्रागतिक दिवाणांची प्रतिष्ठाहि गडगडली व सरकारकडून त्यांना मिळणारा मान-मरातब एकाएकीं कोठच्या कोठें नाहींसा झाला. त्या प्रकाराची दिवाणांना चीड आली; पण त्याचा कांहींहि उपयोग न होऊन लवकरच त्यांना राजिनामा देणें भाग पडलें. मग दिवाण शोधून काढण्याचे प्रयत्न शुरू झाले. कौन्सिलांतील मूठभर

प्रागतिक आपल्या अवमानित सहकाऱ्यांच्या सहानुभूतीखातर मंत्रिपदें स्वीकारीनात. उरलेले बहुतेक जमीनदार होते. परंतु मामुली शिक्षणाची ओळखसुद्धां त्यांपैकीं फारच थोड्यांना झालेली होती. कॉंग्रेसनें कायदेमंडळावर बहिष्कार घातल्यामुळें उठला तो माणूस कायदेमंडळांत दाखल झाला.

अशी एक वदंता आहे कीं त्या सुमारास संयुक्तप्रांताची दिवाणगिरी स्वीकारण्याविषयीं एका गृहस्थाला विनंति करण्यांत आली. तेव्हां त्यानें असें उत्तर दिलें कीं मी स्वतःला महापंडित समजत नसलों, तरी सामान्य माणसापेक्षां मला थोडी अधिक अक्कल खासच आहे व लोकांचीहि तशी समजूत असेल असें मला वाटतें. अशा परिस्थितींत सरकारनें देऊं केलेलें मंत्रिपद स्वीकारून मी महामूर्ख आहें असें जगाला जाहीर करूं कीं काय?

ही वृत्ति थोडीशी समर्थनीय होती. प्रागतिक मंत्री संकुचितपणें वागत. त्यांना राजकारणाकडे अथवा समाजकारणाकडे व्यापक दृष्टीनें पाहण्याची संवय नव्हती. परंतु हा त्यांचा दोष नसून खरा दोष प्रागतिकांच्या वांझोट्या तत्त्वज्ञानाकडे येतो. धंदेवाईक लोकांची कार्यतत्परता मात्र त्यांच्या अंगीं होती आणि ते आपलें नित्याचें काम मोठ्या दक्षतेनें करीत असत. त्यांच्या मगोमाग मंत्रिपदावर आलेले लोक बहुधा जमीनदार वर्गापैकीं होते. ते साक्षर होते, इतकेंच. त्यांना उच्चासनावर बसविण्यांत हिंदी लोकांची नालायकी सिद्ध करण्याचाच सरकारचा हेतु असला पाहिजे. अर्थात् ते सुशिक्षित असोत किंवा नसोत; जमीनदारांचीं मतें ह्या दिवाणांच्या खिशांत हमखास असत. शिवाय मोठमोठ्या अधिकाऱ्यांना मेजवान्या देण्याचें काम करावें तर तें ह्या दिवाणांनींच. उपासमारींत राहणाऱ्या त्यांच्या कुळांकडला वसूल त्यांना मिळे, त्याचा याहून अधिक चांगला उपयोग तरी कोणता करणार?

१५

# संशय व झगडा

माझ्यामागे मीं पुष्कळ कामें लावून घेतलीं होतीं व त्रासदायक प्रश्नांपासून दूर राहण्याचा मी प्रयत्न करीत होतों. परंतु माझ्या डोक्यांत जे विचार उद्भवत, त्यांच्यापासून दूर जाणें अगर त्यांच्यापासून सोडवणूक करून घेणेंच अशक्य होतें. त्या प्रश्नांना उत्तरहि सांपडेना. कामांत मन गुंतविणें हा स्वतःचा स्वतःच्याच तावडींतून सुटका करून घेण्याचा एक उपाय होता. परंतु १९२० व १९२१ सालीं कामांत मी तन्मय होऊन जाई तसें आतां होत नसे. माझ्या भोंवतालच्या जगाकडे मी पाहूं लागलों तों पूर्वी लक्षांत न आलेल्या नव्या कल्पना, नवे झगडे मला दिसूं लागले, व मार्गाची स्पष्ट जाणीव होण्याऐवजीं सगळीकडे वाढता गोंधळच दिसूं लागला. गांधीजींच्या नेतृत्वावरील माझा विश्वास कायम होता. परंतु त्यांच्या कार्यक्रमांपैकीं कांहीं गोष्टींकडे मी जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागलों. पण ते तर तुरुंगांत असल्या-कारणानें त्यांचा सल्ला घेणें शक्तीबाहेरचें काम झालें होतें. फेर अथवा नाफेर पक्षांपैकीं कोणत्याच पक्षाकडे माझा ओढा नव्हता. पहिला पक्ष तर उघड उघड सनदशीर राजकारण व सुधारणावाद यांच्याकडे झुकत होता. नाफेरवाल्यांना महात्माजींचे कट्टे अनुयायी समजण्यांत येत असलें, तरी थोर लोकांच्या बहुतेक अनुयायां-प्रमाणें ते शब्दप्रामाण्यवादी झालेले होते. प्रगतिपर असें कोणतेहि धोरण त्यांच्यांत दिसत नसे. व प्रत्यक्ष व्यवहारांत ते अधाप आणि धर्मरत अशा समाजसुधारकां-प्रमाणें वागत असत. परंतु शेतकरी-जनतेशीं त्यांचा संबंध मात्र कायम राहिला होता. कायदेमंडळांतील स्वराज्यवादी तेथल्या कारस्थानांतच अडकून पडलेले असत.

तुरुंगांतून सुटून आल्यानंतर लवकरच मला स्वराज्यवाद्यांची विचारसरणी पटवून देण्याचा दासबाबूंनीं प्रयत्न केला. पुढें काय करावें ह्याबद्दल माझ्या कल्पना यद्यपि स्पष्ट नव्हत्या, तरी त्यांच्या युक्तिवादाच्या आहारीं मी गेलों नाहीं. विशेष आश्चर्याची परंतु वडिलांच्या स्वभावाची निदर्शक अशी गोष्ट म्हणजे स्वतःला स्वराज्यपक्षाविषयीं अत्यंत तळमळ वाटत असूनहि मला त्यांनीं त्या पक्षाकडे ओढ-ण्याचा आग्रह धरला नाहीं. त्यांच्या मोहिमेंत मी सामील झालों असतों, तर त्यांना फार आनंद झाला असता ह्यांत शंका नाहीं. परंतु फार थोर मन करून त्यांनीं मला या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें.

माझे वडील व दासबाबू हे जिवलग मित्र बनले ते ह्याच वेळीं. त्यांच्यांतील

संबंध केवळ राजकीय मैत्रीपेक्षां अधिक गाढ स्वरूपाचे होते. त्यांच्या स्नेहांत जो एक जिव्हाळा व विश्रब्धपणा होता, तो पाहून तर मला फारच आश्चर्य वाटलें. कारण उतार वयांत असे जिवाभावाचे संबंध जडून येणें फार विरळा. माझ्या वडिलांचे शेंकडों लोक परिचित होते व प्रत्येकाशीं ते हंसून खेळून वागत; पण मित्र जोडण्याच्या कामीं ते जरा जपूनच पाऊल टाकीत, आणि पुढें पुढें तर ते या बाबतींत अगदीं निरुत्साही बनले होते. पण देशबंधु दास आल्यानंतर मनाची तटबंदी ढांसळून पडली असावी. ते एकमेकांवर अन्तःकरणापासून प्रेम करीत. माझे वडील दासबाबूंपेक्षां वयानें नऊ वर्षांनीं मोठे होते. पण शरीरसंपत्तीकडे पाहिले तर तेच तरुण व सशक्त दिसत. दोघांनाहि जरी सारखेंच कायद्याचें ज्ञान व वकिलींत सारखेंच यश मिळालेलें होतें, तरी त्या दोघांत इतर दृष्टींनीं बराच फरक होता. कायदेपंडित असले तरी दासबाबू कवि होते व कवीला शोभेल अशीच त्यांची जगाकडे पाहण्याची भावनामय दृष्टि होती. त्यांनीं बंगालींत उत्कृष्ट कविताहि लिहिलेल्या आहेत. ते उत्तम वक्ते असून त्यांची वृत्ति धर्मप्रवण होती. वडील अधिक हिशेबी व व्यवहारी होते. उत्तम प्रकारचें संघटनाकौशल्य त्यांच्या अंगीं होतें. पण धर्माकडे त्यांचा फारसा कल नव्हता. ते नेहमीं युद्धप्रिय असत. दोन ठोसे देण्याची, दोन घेण्याची त्यांची तयारी असे. मूर्ख माणसें त्यांना समोर उभीं राहिलेलीं खपत नसत, व विरोध त्यांना असह्य होई. विरोध झाला कीं त्याला आव्हान असें समजून ते केरमुणी घेऊनच उठत! परंतु कांहीं अंशीं विरोधी अशीं हीं दोन माणसें जुटीनें काम करू लागलीं, त्यांच्या स्वभावांचा सांधा बरोबर जमला व एकमेकांतील उणीव भरून काढून पक्षाच्या नेतृत्वाचें काम त्यांनीं फार परिणामकारक रीतीनें पार पाडलें. त्या दोघांचा एकमेकांवर इतका विश्वास असे, कीं एकादें मत जाहीर करतांना अथवा दुसरें कांहीं प्रसिद्ध करतांना पूर्वी अनुमति न घेतांच परस्परांच्या नांवाचा खुशाल उपयोग करण्यांत येत असे.

स्वराज्य-पक्षाचा पाया मजबूत होण्याच्या कामीं व त्याची शक्ति व प्रतिष्ठा देशांत वाढवण्याच्या कामीं या वैयक्तिक संबंधाचा फार उपयोग झाला. अगदीं प्रारंभापासून पक्षांत फुटी पडण्याचीं चिन्हें दिसत होतीं; कारण कायदेमंडळाच्या द्वारा आपली पोळी पिकवतां येण्याचा संभव दिसत असल्यामुळें अनेक संधिसाधू व स्वार्थसाधू शिलेदार पक्षांत घुसले होते. त्यांत कांहीं हाडाचे नेमस्तहि होते. सरकारशीं अधिक सहकार्य करावें असें त्यांस वाटे. निवडणुकी झाल्याबरोबर या प्रवृत्ती स्पष्ट दिसू लागतांच पक्षाच्या नेत्यांकडून त्यांचा निषेध करण्यांत आला. माझ्या वडिलांनीं जाहीर केलें कीं पक्षांतले असले "सडके भाग कापून टाकण्याच्या" कामीं आम्ही मागेंपुढें पाहणार नाहीं. जाहीर केल्याप्रमाणें करण्यांतहि त्यांनीं कसूर केली नाहीं.

१९२३ नंतरचें माझें कौटुंबिक जीवन अत्यंत सुखासमाधानाचें गेलें. तथापि कुटुंबांत मला फार वेळ घालवतां येत नसे. सुदैवानें मला कुटुंबांतली मंडळी फार चांगली लाभली आहेत, व अडचणीच्या व त्रासाच्या प्रसंगीं त्यांनींच मला आसरा

देऊन माझा मनःक्षोभ दूर केलेला आहे. १९२० सालापासून माझ्या पत्नीनें किती धीरोदात्त वर्तन ठेवलें आहे तें पाहिलें, कीं माझ्या नालायकीची मला शरम वाटूं लागते. ती अत्यंत अभिमानी व हळवी असूनहि तिनें माझा तालेवारपणा चालूं दिला; इतकेंच नव्हे, तर वेळोवेळीं मला सुख व समाधान व्हावें म्हणून ती झटली.

१९२० सालापासून आमच्या राहणींत थोडासा बदल झाला होता. राहणी बरीच साधी झाली होती, व कित्येक नोकरचाकर कमी करण्यांत आले होते. अर्थातच आवश्यक त्या सुखसोयींत कांहींच कमतरता पडलेली नव्हती. गाड्या-घोडे, नव्या जीवनाला अनावश्यक अशा घरांतल्या कांहीं चीजवस्तू आम्हीं विकून टाकल्या. पोलिसांनीं कांहीं फर्निचर नेऊन विकलेंच होतें. फर्निचर आणि माळी कमी झाल्यामुळें आमच्या घरांतला नीटनेटकेपणा कमी झाला व बागहि भरमसाट वाढली. वाटेल तसा पैसा खर्च करण्याची संवय लागल्यामुळें काटकसर केलेली वडिलांना आवडत नसे. तेव्हां कायद्याची खाजगी सल्लामसलत देण्याचें काम फुरसतीच्या वेळीं वडिलांनीं सुरू केलें. त्यांना फुरसत फारच थोडी मिळे, पण तेवढ्याहि वेळांत ते बरीच कमाई करीत असत.

आर्थिक मदतीसाठीं वडिलांवर अवलंबून राहावें लागतें याचें मला जरा वाईट वाटून जीव संकोचल्यासारखा होई. वकिली सोडल्यापासून माझी मिळकत अशी कांहींच नव्हती. शेअर्सवरचा कांहीं थोडा नफा मिळे, तेवढाच. माझी पत्नी व मी फारसा खर्च करीत नव्हतों. आमच्या माफक खर्चाकडे पाहून माझें मलाच आश्चर्य वाटे. खादीचे कपडे व तिसऱ्या वर्गाचा प्रवास असला कीं पैसे थोडे लागतात. वडिलांजवळ रहात असल्यामुळें शेंकडों बारीकसारीक खर्चाच्या बाबी असतात व त्यांचा आंकडा बराच फुगतो ही गोष्ट त्या वेळीं माझ्या लक्षांत आली नाहीं. तथापि गांठीशीं पैसा उरणार नाहीं ह्या विचाराचा मला कधींहि त्रास झालेला नाहीं. जरूर पडली तर मी पुरेसे पैसे मिळवीन असा मला विश्वास वाटतो आणि तसें पाहिलें तर आम्हांला पैसा लागतोहि थोडाच.

वडिलांवर आमचा विशेष असा भार नव्हता. आमचे असे कांहीं विचार चालतात अशी नुसती कुणकुण वडिलांना लागली असती, तरी त्यांना मनस्वी दुःख झालें असतें. तथापि माझें परावलंबित्व मला जाचक वाटे. पुढचीं तीन वर्षेपर्यंत मीं ह्यासंबंधीं विचार केला. पण तोड कांहींच सांपडली नाहीं. चांगल्या पगाराचें काम मिळण्यास अडचण पडली नसती. पण काम पत्करलें कीं मी करीत असलेलें सार्वजनिक काम अजिबात सोडणें, निदान त्याला मर्यादा घालणें आवश्यक होतें. आतांपर्यंत माझा सारा वेळ मी नगरपालिकेकडे अथवा काँग्रेसकडे खर्च करीत आलों होतों. पैसे कमावण्यासाठीं ह्या कामांतून अंग काढून घ्यावें हें मला बरें वाटेना. म्हणून मोठमोठ्या कारखान्यांकडून आलेल्या चांगल्या चांगल्या जागा मीं नाकारल्या. माझी लायकी होती म्हणून नव्हे, तर माझ्या नांवाचा उपयोग करून घेण्याची संधि

मिळण्यासारखी होती म्हणून ते मला इतका पैसा देण्यास तयार झाले असावेत. मोठमोठ्या कारखान्यांशीं आपलें नांव या प्रकारें जोडलें जावें, ही कल्पना मला आवडली नाहीं. पुन्हां वकिलीकडे वळण्याचा प्रश्न विचारांत घेण्याचेंहि कारण नव्हतें. मला त्या धंद्याची जी शिसारी बसली होती, ती वाढतच चालली होती.

सरचिटणिसांना पगार देण्यांत यावा अशी एक सूचना १९२४ च्या काँग्रेस-मध्यें करण्यांत आली. त्या वेळीं मीहि एक सरचिटणीस होतों. मला ही सूचना पसंत पडली. पोटापुरतामुद्धां पगार न देतां एकाद्यानें चोवीस तास काम करीत रहावें अशी अपेक्षा करणें चुकीचे आहे. पगार द्यावयाचा नसला, कीं घरचा सुखवस्तु माणूस शोधून काढावा लागतो व सुखवस्तु माणसें राजकीय दृष्ट्या नेहमींच इष्ट ठरतात असें नाहीं. शिवाय कामाबद्दल त्यांना जबाबदारहि धरतां येत नाहीं. काँग्रेसला फारसा पगार देणें शक्यच नव्हतें; पण सुचवण्यांत आलेला पगारहि बेताचाच होता. सरकारकडून पगार घेण्यास हरकत नाहीं, पण सार्वजनिक पैशांतून पगार घेतों म्हटलें कीं लोक खवळून विरोध करतात. हा विरोध मुळींच समर्थनीय नाहीं, असें माझें मन आहे. मीं पगार घ्यावा ह्याला वडिलांनींहि जोराची हरकत घेतली. स्वतःला पशाची नड असतांहि माझ्या सहकारी सरचिटणिसांनीं काँग्रेस-फंडांतून पगार घेणें हें स्वतःच्या दर्जाला कमीपणा आणणारें आहे असें मत व्यक्त केलें. मानापमानाचा प्रश्न त्यांत उपस्थित होतो अशी माझी मुळींच समजूत नसतांहि मला देखील मग पगार घेण्याची कल्पना सोडून द्यावी लागली.

आर्थिक परावलंबनाची कल्पना मला त्रासदायक होते असें मीं वडिलांपाशीं फक्त एकदांच बोलून दाखवलें. त्यांच्या मनाला माझें बोलणें लागूं नये म्हणून शक्य तितक्या सौम्य शब्दांत व आडपडदे मध्यें ठेवून मी बोलत होतों. पण सार्व-जनिक काम करण्याचें सोडून थोडक्या पैशासाठीं आपला सर्व वेळ अथवा त्यापैकीं बराचसा वेळ खर्च करणें अगदीं मूर्खपणाचें आहे असें त्यांनीं सांगितलें. तुझ्या पत्नीला व माझ्या पत्नीला आणि तुला वर्षभर पुरतील इतके पैसे चार दिवस काम केलें कीं मी सहज मिळवीन असें ते म्हणाले. त्यांचें म्हणणें सत्य होतें; पण माझें त्यापासून समाधान झालें नाहीं. तथापि मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणेंच वागत होतों.

या कौटुंबिक हकिकतींत व आर्थिक ओढाताणींत १९२३ ते १९२५ पर्यंतचा काळ गेला. मध्यंतरीं राजकीय परिस्थिति सारखी बदलत होती, व माझी इच्छा नसतांहि अनेक प्रकारच्या गटांत व ऑल इंडिया काँग्रेसकमिटीमधील अधिकाराच्या जागीं मला बसवण्यांत आलें. १९२३ सालची परिस्थिति जरा नाजुक होती. दासबाबू अध्यक्ष; तेव्हां १९२३ सालच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे ते पदसिद्ध अध्यक्ष झाले. पण कमिटींत त्यांच्या व स्वराज्यपक्षाच्या विरुद्ध अल्पसें बहुमत होतें. १९२३ सालीं मुंबईस भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींत गोष्टी निकरावर आल्या. दासबाबूंनीं अध्यक्षपदाचा राजिनामा दिला व एका मध्यवर्ति गटानें

वर्किंग कमिटी बनविली. त्या गटाला ऑ. इं. काँ. कमिटींत कांहींच पाठबळ नव्हतें. विरोधी पक्षाच्या सौजन्यामुळेंच तो अधिकारपदावर टिकणें शक्य झालें असतें. नव्या वर्किंग कमिटीचें अध्यक्षस्थान डॉ. अन्सारी यांनीं स्वीकारलें; चिटणिसांपैकीं एका जागीं माझी नेमणूक झाली.

लवकरच खटखट सुरू झाली. गुजरात म्हणजे नाफेरवाल्यांचा बालेकिल्ला. मध्यवर्ति कचेरीच्या कांहीं आज्ञा अमलांत न आणण्याचें तेथील प्रांतिक कमिटीनें ठरवलें. त्याच वर्षीं ऑ. इं. काँ. कमिटीची दुसरी बैठक नागपूर येथें भरली. तेथें झेंडा सत्याग्रह चालू होता. आमची वर्किंग कमिटी नागपूरला विलयास गेली. ही गोष्ट साहजिकच होती; कारण कोणत्याच गटाचें प्रतिनिधित्व आमच्याकडे नसतां जे वस्तुतः बलिष्ठ पक्ष, त्यांच्यावर कुरघोडी करण्याचा आमचा प्रयत्न चालला होता. आज्ञाभंगाबद्दल गुजरातवर निंदाव्यंजक ठराव आणला तो नापास झाला, तेव्हां राजिनामे देणें क्रमप्राप्तच होतें. राजिनामा दिला तेव्हां सुटलों एकदांचा असें वाटून मला फार आनंद झाला. पक्षोपपक्षांचें राजकरण पाहून मी इतक्या अल्पावधींतच कंटाळून गेलों, आणि प्रमुख काँग्रेस-पुढाऱ्यांचीं कारस्थानें बघून माझ्या मनाला तर धक्काच बसला !

बैठक चालू असतां दासबाबूंनीं मी " भावनाहीन " आहें असा माझ्यावर शेरा मारला, तो यथार्थ होता असें मला वाटतें. ज्याच्याशीं तुलना करण्यांत येते त्याच्यावर बरेंचसें अवलंबून आहे. माझ्या कांहीं मित्रांच्या व सहकाऱ्यांच्या मानानें मी खराच भावनाहीन आहें. पण मला तर नेहमीं वाटत असतें कीं भावनातिरेकांत, उत्साहाच्या व रागाच्या पुरांत मी पार बुडून अथवा वाहून जात असतों. माझ्या भावनावशतेला लगाम घालण्याची खटपट मीं कितीतरी वर्षें चालवली आहे. तरीहि या कामीं मला जें यश आलें आहे तें केवळ दिखाऊ आहे, अशी शंका माझ्या मनांत येते.

१६

# नाभा संस्थानांतील विष्कंभक

स्वराज्यपक्ष व नाफेरवाले यांच्यांतील रस्सीखेचींत स्वराज्यपक्षाची सरशी होत होती. १९२३ च्या दिल्ली येथील खास अधिवेशनांत स्वराज्यपक्षाचा आणखी एक विजय झाला. ह्या कॉंग्रेसनंतर लगेच मला एक विचित्र प्रसंग अभावितपणें अनुभवावयास सांपडला.

पंजाबांत शिखांचे, विशेषतः अकाली शिखांचे सरकारशीं झगडे सुरू होते. धर्मसुधारणेची चळवळ त्यांच्यांत पसरली असून नादान महंतांना हुसकून लावून गुरुद्वारांतील घाण काढून टाकण्याचें व प्रार्थनेच्या जागा व त्यांची मिळकत आपल्या ताब्यांत घेण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. सरकारनें त्यांना आडकाठी केली व झगड्यास तोंड लागलें. असहकारितेमुळें उत्पन्न झालेल्या जागृतींतूनच कांहीं अंशीं ही गुरुद्वार-चळवळ उद्भवली होती; अकाल्यांची कार्यपद्धतिसुद्धां अहिंसायुक्त सत्याग्रहाची होती. अनेक प्रसंग घडले, पण त्या सर्वांत 'गुरु का बाग' प्रकरण फार प्रसिद्ध आहे. तेथें शेंकडों शिखांनीं-त्यांत पुष्कळसे युद्धकालीन सैनिकहि होते-यत्किंचितहि प्रतिकार न करतां पोलिसांचा अमानुष मार सहन केला! ही अद्‌भुत चिकाटी व धैर्याची परिसीमा पाहून सर्व देश आश्चर्यानें थक्क झाला. सरकारनें गुरुद्वारसमिति बेकायदा ठरवली. हें भांडण पुढें आणखी कांहीं वर्षें चालून शिखांचा विजय झाला. शिखांना कॉंग्रेसची सहानुभूति होतीच व अकाली चळवळीशीं सारखा संबंध ठेवण्याकरतां अमृतसर येथें कॉंग्रेसनें एक अधिकारीहि नेमला होता.

मी सांगणार आहें त्या प्रसंगाचा सर्वसामान्य शीख चळवळीशीं फारसा संबंध नाहीं. परंतु मोठी चळवळ चालू असल्यामुळें हाहि प्रसंग निर्माण झाला. पंजाबांतील नाभा व पतियाळा या शीख संस्थानांच्या अधिपतींत वैयक्तिक वैमनस्य माजलेलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं नाभाच्या महाराजाला ब्रिटिश सरकार-कडून पदच्युत करण्यांत आलें, व नाभा संस्थानवर एका ब्रिटिश कारभाऱ्याची नेमणूक झाली. महाराजांच्या पदच्युतीविरुद्ध शिखांनीं नाभा संस्थानांत व बाहेरहि चळवळ सुरू केली. चळवळ चालू असतां नाभा संस्थानांतील जैतो या ठिकाणच्या धार्मिक उत्सवाला नव्या कारभाऱ्यानें बंदी केली. याचा निषेध म्हणून शिखांनीं जैतोकडे जथे पाठविण्यास प्रारंभ केला. जथ्यांना अडवून पोलिस झोडपून काढीत व नंतर अटक करून रस्त्यापासून लांब अंतरावर जंगलांत नेऊन त्यांना सोडून देण्यांत

येत असे. मारपिटीचीं वर्णनें मीं वृत्तपत्रांतून वाचलीं होतीं. मी दिल्लीला असतांना नवा जथा निघण्याच्या तयारींत होता व मलाहि तेथें येऊन सर्व गोष्टी समक्ष पहाव्यात अशा आशयाचें निमंत्रण आलें होतें; म्हणून मीं मोठ्या आनंदानें निमंत्रणाचा स्वीकार केला. ए. टी. गिडवानी व मद्रासचे के. संतानम् हेहि माझ्याबरोबर निघाले. जथा बहुतेक वाट चालूनच गेला. आम्ही बैलगाडीनें जथ्यापासून थोडें अंतर ठेवून जात होतों. जैतोला पोंचल्याबरोबर जथ्याला अटकावण्यांत आलें व नाभाच्या हद्दींत पाऊल टाकूं नये आणि हद्दींत आधींच प्रवेश केला असल्यास हुकुमदेखत हद्द सोडून जावें असा हुकूम माझ्यावर बजावण्यांत आला. तसेच हुकूम गिडवानी व संतानम् यांच्यावरहि बजावले. आम्ही जथ्यापैकीं लोक नसून प्रेक्षक आहोंत, नाभा संस्थानचे हुकूम मोडण्याची आमची इच्छा नाहीं, शिवाय नाभाच्या हद्दींतच आम्ही उभे असल्यामुळें प्रवेश न करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं; बरें, एकदम हद्द सोडावयाची म्हणजे हवेंत उडून गेलें पाहिजे, तें शक्य कसें होणार? जैतोहून जाणारी पुढची गाडी कांहीं तासांनंतर सुटणार असल्यामुळें सध्यां तरी आम्ही आहों तेथेंच रहावयाचें ठरवलें आहे असें आम्हीं पोलिस-अधिकाऱ्याला कळवलें. आम्हांला लगेच पकडून पोलिस-कोठडींत नेण्यांत आलें, व आम्हांला दूर केल्यावर जथ्याची नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें विल्हेवाट लावण्यांत आली!

सर्व दिवसभर आम्ही कोठडींतच होतों. संध्याकाळीं आम्हांला पायीं स्टेशनवर नेण्यांत आलें. संतानम् यांस व मला जोडून हातकड्या घालण्यांत आल्या होत्या. त्यांचें डावें मनगट माझ्या उजव्या मनगटाशीं जखडलें होतें, व बेड्यांना जोडलेली सांखळी धरून पोलिस आमच्यापुढें चालला होता. गिडवानींनाहि हातकड्यांनीं व सांखळीनें बांधून मागून आणण्यांत येत होतें. जैतोच्या रस्त्यांतून निघालेली आमची ही मिरवणूक पाहून मला सांखळीला बांधलेल्या कुत्र्याची आठवण झाली. प्रथम आम्ही थोडेसे चिडलों, पण नंतर परिस्थितींतील विनोदाची गोडी आम्हांला उमगून आली व एकंदरींत तो अनुभव मजेदार वाटला. पण रात्रीं मात्र मजा वाटली नाहीं. अर्धी रात्र खच्चून भरलेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत व अर्धी नाभा शहरांतील कोठडींत गेली. दुसऱ्या दिवशीं दुपारीं नाभाच्या तुरुंगांत आम्हांला डांबीपर्यंत ह्या जोड हातकड्या व अवजड सांखळी आमच्याबरोबर होती. दुसऱ्याचें सहकार्य असल्याशिवाय कोणालाच हालचाल करतां येत नसे. हा अनुभव पुन्हां मिळावा अशी कांहीं इच्छा होत नाहीं!

नाभाच्या तुरुंगांत आम्हां तिघांना अत्यंत कोंदट व गलिच्छ अशी खोली देण्यांत आली होती. ती लहान तर होतीच, पण शिवाय तिला ओलहि होती. छप्पर आमचा हात लागेल इतकें ठेंगणें होतें! रात्रीं जमिनीवर निजलों कीं मी चाळवून उठत असें व पाहावें तों एकादी घूस अथवा उंदीर माझ्या तोंडावरून गेलेला असावयाचा!

दोन-तीन दिवसांनीं खटला सुरू होऊन आम्हांला कोर्टांत नेण्यांत आलें. न्यायाधीशाला शिक्षणाचा गंधहि नसावा. इंग्लिश तर त्याला येत नव्हतेंच; पण कोर्टाची भाषा म्हणजे उर्दू तरी तो जाणत होता कीं नाहीं याची शंका आहे. आम्हीं कांहीं अर्ज वगैरे केले तर ते तो सर्व तसेच ठेवी व दुसऱ्या दिवशीं कोणाकडून तरी त्याचें उत्तर लिहून आणी! स्वतःचा बचाव न करण्याची शिस्त अंगीं बाणल्यामुळें बचाव करणें असभ्यपणाचें आहे अशी समजूतच होऊन बसली होती. तथापि वस्तु-स्थिति निवेदन करणारी व ब्रिटिश कारभाऱ्याच्या आमदानींतील नाभा संस्थानांतील दंडेली वर्णन करणारी एक कैफियत मीं कोर्टाला सादर केली.

बाब साधी असूनहि आमचा खटला कित्येक दिवस रें रें करीत चालला होता. इतक्यांत एक निराळेंच प्रकरण उपस्थित झालें. एके दिवशीं कोर्ट संपल्यावर आम्हांला कोर्टांतच थांबवून ठेवण्यांत आलें. संध्याकाळीं सात वाजतां एका दुसऱ्या खोलींत आम्हांला नेलें. तेथें टेबलापाशीं एक गृहस्थ बसला असून जवळपास कांहीं इतर लोकहि होते. जैतोला आम्हांला ज्यानें अटक केली, तो परिचित पोलिस अधिकारीहि तेथें दिसला. तो उठून उभा राहिला व आमच्यावरील फिर्याद वाचून दाखवूं लागला. आम्हांला कोठें आणलें आहे व हा काय प्रकार चालू आहे असें मीं विचारतांच ही न्यायकचेरी असून तुमची कटाच्या आरोपासंबंधीं चौकशी सुरू आहे असें उत्तर मिळालें. हा अजिबात निराळाच खटला सुरू झाला होता! प्रवेश-मनाईचा हुकूम मोडल्याबद्दल जास्तींत जास्त शिक्षा सहाच महिन्यांची देतां आली असती. ती फार अपुरी वाटल्यामुळें हा अधिक गंभीर स्वरूपाचा खटला भरण्यांत आला असावा; व कटाच्या खटल्याला तिघे पुरत नाहींत असें वाटल्यामुळें चौथा आरोपी पकडून हजर करण्यांत आला असावा! त्याचा आमच्याशीं खरोखरीच कांहीं संबंध नव्हता. जैतोला जातांना जवळच्या एका शेतांत आम्हीं त्याला फक्त पाहिला होता!!

कटाच्या खटल्यासारख्या गंभीर कामांत दाखविण्यांत येत असलेली ही बेपर्वाई पाहून माझ्या आंगच्या वकिली वृत्तीला चांगलाच धक्का बसला. खटला सपशेल खोटाच होता; परंतु जनलज्जेसाठीं तरी कांहीं शिष्टाचार पाळणें अवश्य होतें. आम्हांला खटल्याची मुळींच सूचना मिळालेली नाहीं वगैरे गोष्टी मीं न्यायाधीशाला सांगितल्या. परंतु त्याच्यावर माझ्या म्हणण्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं! तेथील रीतच न्यारी होती! बचावासाठीं वकील द्यावयाचा असेल, तर तो संस्थानांतलाच असला पाहिजे, बाहेरचा चालणार नाहीं असें सांगण्यांत आलें. रागावून 'तुम्हांला हवें तें करा, आम्ही खटल्यांत भाग घेत नाहीं' असें आम्हीं सांगून टाकलें. परंतु आमच्यासंबंधीं देण्यांत येणारा पुरावा धादांत खोट्यानाट्या माहितीनें इतका भरलेला होता, कीं निश्चयाप्रमाणें वागणें शक्य झालें नाहीं. साक्षीदारासंबंधीं आमचें म्हणणें थोडक्यांत आम्हीं मांडलें. वस्तुस्थितीविषयीं माहिती देणारी जबानीहि आम्हीं कोर्टाला सादर केली.

हे दोन्ही खटले चालू असल्याकारणानें आम्हांला कोर्टांत जावें लागे. त्यामुळें तुरुंगांतील गलिच्छ खोलींतून तेवढीच सुटका होत असे. मध्यंतरीं कारभाऱ्याच्या वतीनें तुरुंगाचे सुपरिंटेंडेंट आमच्याकडे आले व केलेल्या कृत्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून नाभा संस्थानची हद्द सोडून जाऊं असें लेखी लिहून दिल्यास खटला काढून घेण्यांत येईल, असें त्यांनीं सांगितलें. ‘दिलगिरी प्रदर्शित करण्यासारखें आम्हीं तरी कांहीं केलेलें नाहीं, संस्थानच्या अधिकाऱ्यांनींच आमची माफी मागितली पाहिजे, लेखी आश्वासन देण्यासहि आम्ही तयार नाहीं’ असें आम्हीं उत्तर दिलें.

पकडल्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं खटल्याचें काम संपलें. सरकारी पुरावा संपल्यावर आम्हीं आमची लेखी जबानी सादर केली. त्यानंतर कोर्ट उठलें. जरा वेळानें उर्दूत लिहिलेलें निकालाचें एक जाडजूड पुडकें घेऊन न्यायाधीशाची स्वारी आंत आलेली पाहून आम्ही आश्चर्यचकित झालों. कारण एवढया थोड्या वेळांत इतका मजकूर लिहिणें शक्यच नव्हतें! आमची जबानी मिळण्यापूर्वींच निकाल वगैरे लिहून तयार होता, ही गोष्ट उघडच दिसत होती! निकाल आम्हांला वाचूनहि दाखविण्यांत आला नाहीं. नाभा संस्थानचा हुकूम मोडल्याबद्दल सहा महिन्यांची सजा तुम्हांला देण्यांत आली आहे, एवढेंच सांगण्यांत आलें.

पक्कें लक्षांत नाहीं, पण बहुधा त्याच दिवशीं कटाच्या खटल्यांत आम्हांला दीड किंवा दोन वर्षांची शिक्षा देण्यांत आली. ही शिक्षा पहिल्या सहा महिन्यांनंतर भोगावयाची होती.

खटला चालू असतां अनेक विचित्र प्रकार घडले व संस्थानी कारभार अथवा ब्रिटिश-अधिकाऱ्याचा संस्थानांतील कारभार कसा चालतो याची आम्हांला कल्पना आली. सर्व खटला म्हणजे एक प्रहसनच होतें! त्यामुळेंच तेथें बातमीदारांना अथवा बाहेरच्या माणसांना येण्याचा मज्जाव असावा. पोलिस इच्छेला येईल त्याप्रमाणें हवा तसा धुडगूस घालीत. न्यायाधीशाचे हुकूमहि ते धाब्यावर बसवीत व तो तेथें जणुं कांहीं नाहींच अशा प्रकारें वागत असत! बिचारा न्यायाधीश हें सर्व निमूटपणें सहन करी. पुष्कळदां न्यायाधीशाच्या वतीनें मीच पोलिसांना खडसावीत असें! कधीं कधीं पोलिस कागदपत्रदेखील जबरदस्तीनें हिसकावून घेत व कोर्टांत शिस्त राखण्याचें काम न्यायाधीशाच्या हातून रेटेनासें झालें कीं आम्हीच काम उरकीत असूं! न्यायाधीश मोठ्या बिकट परिस्थितींत सांपडला होता. त्याला पोलिसांचें भय वाटे व आमच्या अटकेचा गवगवा वृत्तपत्रांतून झालेला असल्यामुळें त्याला आमचेंहि भय वाटे! आमच्यासारख्या थोड्याफार प्रसिद्ध लोकांच्या बाबतींत जर हा प्रकार, तर सामान्य व्यक्तींचे हाल कुत्राहि खात नसेल!

हिंदी संस्थानांसंबंधीं माझ्या वडिलांना थोडीशी कल्पना आलेली होती. त्यामुळें नाभा येथें मला अटक झाल्याचें ऐकून त्यांना फार काळजी वाटूं लागली. फक्त अटकेची बातमी कळली, पण इतर कांहींच कळेना. काळजीच्या आवेगांत त्यांनीं माझी

माहिती समजावी म्हणून व्हाइसरॉयला सुद्धां तार केली. माझ्या भेटीसाठीं नाभाकडे ते यावयास निघाले असतां वाटेंत अडथळे उत्पन्न करण्यांत आले. परंतु सरते-शेवटीं तुरुंगांत माझी भेट घेण्याची परवानगी त्यांना देण्यांत आली. जातांना कपिलदेव मालवीय नांवाच्या एका वकील मित्राला खटल्याकडे लक्ष देण्यासाठीं त्यांनीं तेथें ठेवलें. नाभा कोर्टातल्या थोड्याशा अनुभवानें कपिलदेवांचें कायद्याचें ज्ञान खूपच वाढलें असेल! भर कोर्टांत त्यांच्याजवळचे कांहीं कागद हिसकावून घेण्याचा पोलिसांनीं प्रयत्न केला!

राज्यकारभाराच्या मागसलेल्या पद्धतीबद्दल व तेथल्या अर्धवट सरंजामी रीतिरिवाजांबद्दल बहुतेक हिंदी संस्थानांची ख्याति आहे. एका व्यक्तीची अरेरावी तेथें चालते व त्या व्यक्तींत लायकी अथवा उदारबुद्धि यांचा लवलेशहि सांपडत नाहीं. लोकविलक्षण अशा गोष्टी संस्थानांतून घडतात; परंतु जगताला त्यांची दाद लागत नाहीं. या नालायकीमुळें लोकांवरील ओझें एका दृष्टीनें थोडें हलकें होतें; तें असें कीं तेथील सरकारचें कार्यकारी मंडळ कमकुवत असल्यामुळें अन्याय व दडप-शाही यांचीं चक्रें तितक्या कौशल्यानें फिरत नाहींत. अशानें दडपशाहीचा रूळ अधिक सुसह्य होतो असें नव्हे; तर त्याचा अम्मल फार मोठ्या प्रदेशावर चालणें शक्य होत नाहीं. परंतु हिंदी संस्थानांवर ब्रिटिशांचा प्रत्यक्ष अम्मल सुरू झाला कीं सर्वच गाडें बदलतें. सरंजामी पद्धति, अरेरावी, व्यक्तिस्वातंत्र्यावरील व संघ-स्वातंत्र्यावरील निर्बंध हीं सर्व कायमच राहतात; पण वरचें कार्यकारी मंडळ मात्र अधिक कर्तबगार व बळकट होत जाऊन ह्या अरेरावी कायद्यांचे बंद घट्ट आंवळण्यांत येऊं लागतात. जुनीं बंधनें व जुन्या पद्धती ब्रिटिश-कारभाराच्या अंमलांत कांहीं दिवसांनीं नष्ट होतात हें खरें; कारण सुयंत्र राज्यव्यवस्थेच्या व वाढत्या व्यापाराच्या मार्गांत त्यांची अडगळ ठेऊन चालत नाहीं. परंतु सुरुवातीला तरी लोकांवर आपली पकड ठाम बसावी म्हणून ते या सर्व बंधनांचा उपयोग करून घेतल्याशिवाय रहात नाहींत.

ह्याचा थोडासा अनुभव मला नाभा येथें घ्यावयास सांपडला. संस्थानावर नेमण्यांत आलेला ब्रिटिश अधिकारी सिव्हिल सर्व्हिसमधला एक नोकर होता, व त्याच्या हातीं सर्व अमर्याद सत्ता एकवटलेली होती. त्याच्यावर मालक काय तो ब्रिटिश सरकारच. सामान्य हक्क हिरावून घेतांना कायदा सांगण्यांत येई, तो मात्र नाभा संस्थानचा. सरंजामी पद्धति व आधुनिक नोकरशाहीचें कर्तबगार यंत्र यांचा हा संयोग जुळून आला होता. त्यांत दोन्ही पद्धतींतील दोषांची बेरीज झाली असून, दोन्ही-कडील सवलतींचे मात्र छेद उडाले होते!

खटला संपला व आम्हांला शिक्षाहि झाल्या. आम्हीं निकालाच्या नकला मागितल्या. परंतु त्यासाठीं अर्ज करा असें सांगण्यांत आलें.

संध्याकाळीं सुपरिंटेंडटनें आम्हांला बोलावून घेतलें व कारभाऱ्याच्या सहीचा

एक हुकूम दाखवला. क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या आधारें आमच्या शिक्षा तहकूब करण्यांत आल्या होत्या. त्याचबरोबर नाभा सोडून जाण्याचा व परवानगीशिवाय नाभाच्या हद्दींत न येण्याचा हुकूमहि सुपरिंटेंडेंटनें आम्हांस दाखवला. या दोन्ही हुकुमांच्या नकला मीं मागितल्या; पण त्या मला देण्यांत आल्या नाहींत. अंबालाला जाणारी गाडी थोड्याच वेळांत सुटावयाची होती. ती आम्हीं पकडली. तेथून दिल्लीच्या वाटेनें मी अलाहाबादला गेलों.

अलाहाबादला पोहोंचल्यावर निकालपत्राच्या व मनाई हुकुमांच्या नकला पाठवण्यासाठीं मीं कारभाऱ्याला लिहिलें. परंतु त्यानें मान्यता दिली नाहीं व अद्याप-पर्यंत मला नकला मिळालेल्या नाहींत. माझ्या कल्पनेप्रमाणें त्या शिक्षा अजूनहि अमलांत असतील व ब्रिटिश-सरकाराची अथवा नाभा सरकारची लहर लागेल तेव्हां त्या शिक्षा अमलांतहि आणतां येतील !

आम्हां तिघांना सोडून दिलें खरें; पण कटाच्या खटल्यांतील त्या चवथ्या शीख गृहस्थाची काय अवस्था झाली तें मला कळलें नाहीं. बहुधा त्याला सोडला नसावा. आम्हांला त्याचें विस्मरण झालें नाहीं. शक्य ती खटपट आम्हीं करून पाहिली. पुढें आम्हांला असें कळलें कीं तो "कोमागाटा मारू" प्रकारणापैकीं एक इसम होता व नुकताच मोठी शिक्षा भोगून सुटून आला होता. अशा माणसाला मोकळा सोडणें पोलिसांना आवडत नाहीं व कुठल्या तरी खोट्यानाट्या खटल्यांत त्याला ते अडकवून टाकतात !

नाभा-तुरुंगांतून येतांना आम्ही तिघेहि एक पाहुणा बरोबर घेऊन आलों. तो म्हणजे विषमज्वराचा जंतु ! विषमज्वरानें आम्हां तिघांनाहि पछाडलें. तीन-चार आठवडेपर्यंत मी अंथरुणावर पडून होतों. माझ्या दोघां मित्रांना मात्र हें दुखणें विशेषच भोंवलें.

गिडवानी हे अमृतसरमध्यें कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून शीख गुरुद्वार-कमिटीशीं सहकार्य करीत होते. कमिटीनें जैतोकडे पांचशें माणसांचा एक खास जथा पाठवला. गिडवानींनीं त्या जथ्याबरोबर प्रेक्षक म्हणून जाण्याचें ठरविलें. नाभाच्या हद्दींत पाऊल टाकण्याची त्यांची मुळींच इच्छा नव्हती. सरहद्दीजवळ पोलिसांनीं जथ्यावर गोळीबार केला व बरींच माणसें मेलीं अथवा जखमी झालीं. घायाळांचे मदतीस गिडवानी हे गेले असतां पोलिसांनीं त्यांच्यावर झडप घालून त्यांना पकडलें. कोर्टांत त्यांच्यावर खटला वगैरे कांहींएक न भरतां जवळ जवळ एक वर्षभर त्यांना तुरुंगांत डांबून ठेवण्यांत आलें व त्यांची प्रकृति फारच ढांसळली तेव्हां त्यांना सोडून दिलें !

गिडवानींना अटक करण्यांत अरेरावीचा कळस झाला असें मला वाटलें. मी पूर्वीच्याच कारभाऱ्याला पत्र लिहून गिडवानींना अशा तऱ्हेनें वागवण्याचें कारण काय, असा प्रश्न विचारला. परवानगीशिवाय नाभा संस्थानांत प्रवेश करून कायदा

मोडल्याबद्दल त्यांना अटक करण्यांत आली आहे अशा अर्थाचें उत्तर कारभाऱ्याकडून आलें. हें कृत्य बेकायदा आहे, गिडवानींनीं मोडलेल्या हुकुमाची नक्कल माझ्याकडे पाठवण्यांत यावी अगर ती प्रसिद्ध करण्यांत यावी, अशा आशयाचें दुसरें एक पत्र मीं पुन्हां त्याच्याकडे पाठविलें. पण माझ्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास तो कबूल झाला नाहीं. स्वतः नाभा संस्थानांत जावें व गिडवानींना ज्या प्रकारें वागवण्यांत आलें. त्या प्रकारें मलाहि वागविण्याची संधि कारभाऱ्याला द्यावी, असें मला वाटूं लागलें. सहकाऱ्याबद्दल निष्ठा दाखवण्याच्या दृष्टीनें असें करणें अवश्य होतें. पण पुष्कळ मित्रांचा विचार निराळा पडला व त्यांनीं माझें मन वळविलें. आणि मित्रांच्या सल्ल्याची सबब पुढें करून मींहि स्वतःचा कमकुवतपणा झांकून ठेवला ! नाभाच्या तुरुंगांत पुन्हां एकवार जाण्याची माझी इच्छा नव्हती म्हणून मी दूर राहिलों, हेंच खरें. एका सहकाऱ्याला अशा रीतीनें आपण एकाकी सोडला ह्याबद्दल मला नेहमीं थोडीशी शरम वाटत असते. पण आपण सर्वजण बहुधा शौर्यापेक्षां सावधगिरी बरी याच धोरणानें वागतों ! मींहि तेंच धोरण संभाळलें !

## १७

# कोकोनाडा आणि महंमद अल्ली

१९२३ च्या डिसेंबरमध्यें काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन कोकोनाडा येथें भरलें. तेथें मौलाना महंमद अल्ली अध्यक्ष होते. त्यांच्या संवयीप्रमाणें त्यांनीं अतिशय लांबलचक असें भाषण केलें. परंतु भाषण उद्‌बोधक होतें. मुसलमानांतील राजकीय व जातीय भावनांच्या विकासाचा इतिहास त्यांनीं वर्णन केला, व १९०८ सालीं आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं व्हाइसरॉयच्या भेटीला गेलेल्या ज्या शिष्टमंडळानें मागणी केल्यावरून स्वतंत्र मतदारसंघ मुसलमानांना प्रथमच देण्यांत आले, त्या शिष्टमंडळाची सरकारच्या सांगीवरूनच कशी उभारणी करण्यांत आली होती, तेंहि त्यांनीं विशद करून दाखविलें.

माझी इच्छा नसतांहि आपल्या एक वर्षाच्या आमदानीपुरता मीं ऑल इंडिया काँग्रेसचा चिटणीस व्हावें असा महंमद अल्लींनीं आग्रह धरला. कार्यकारी-पदाची जबाबदारी स्वीकारण्याची माझी इच्छा नव्हती. कारण काँग्रेसचें पुढचें धोरण काय असावें तें माझें मलाच स्पष्ट झालेलें नव्हतें. पण महंमद अल्लींची भीड मला मोडवेना. शिवाय नव्या अध्यक्षाबरोबर जुळतें घेऊन काम करणें माझ्याव्यतिरिक्त दुसऱ्या माणसाला तितकेंसें जमणार नाहीं असें आम्हां दोघांनाहि वाटत होतें. आवडीनिवडीच्या बाबतींत महंमद अल्ली फार घासाघीस करीत. परंतु सुदैवानें त्यांच्या आवडत्या माणसांत माझा समावेश होत असे. आमचा एकमेकांवर लोभ होता व परस्परांच्या मनोवृत्तीहि आम्हांला चांगल्या समजलेल्या होत्या. धर्माच्या ठिकाणीं त्यांची आत्यंतिक म्हणजे माझ्या मतें तर अंधश्रद्धा होती. माझी वृत्ति त्यांच्या अगदीं उलट असे. परंतु त्यांची कळकळ, त्यांचा अमर्याद उत्साह व तीव्र बुद्धिमत्ता यांविषयीं मला फार कौतुक वाटत असे. त्यांची विनोदबुद्धि अतिशय तल्लख होती; पण कधीं कधीं त्यांच्या झोंबऱ्या उपहासानें मनें दुखावलीं जात. त्यामुळें अनेक मित्रांना ते मुकले होते. एकादी चुणचुणीत कोटी सुचली कीं ती बोलून दाखवल्याशिवाय त्यांना राहवत नसे; मग तिचा परिणाम कांहींहि होवो.

सर्व वर्षभर आमचें ठीक जमलें. कांहीं किरकोळ मतभेद होत असत. ऑ. इं. काँ. कमिटीच्या सर्व सभासदांना पत्रें लिहितांना त्यांचीं फक्त नांवें लिहिण्यांत यावींत, मागें अथवा पुढें पदव्या वगैरेंचे भालदार-चोपदार ठेवण्यांत येऊं नयेत असा प्रघात मीं पाडला. हिंदुस्थानांत असले उपसर्ग असंख्य आहेत. मौलाना, महात्मा,

पंडित, शेख, सय्यद, मुनशी, मौलवी आणि अलीकडे श्रीयुत आणि श्री व त्याच-बरोबर मिस्टर आणि एस्क्वायर या पदव्यांचा इतका भरमसाट उपयोग करण्यांत येतो कीं त्यांना सरसकट चाट देऊन एक नवा पायंडा पाडावा असा माझा बेत होता. पण त्यांत मला यश मिळावयाचें नव्हतें. महंमद अलींनीं तावातावानें मला एक तार केली व अध्यक्ष म्हणून असें बजाविलें कीं पूर्वींचीच प्रथा चालवण्यांत यावी, व विशेषतः गांधीजींना लिहितांना महात्मा असाच त्यांचा उल्लेख करण्यांत यावा !

दुसरा नित्य वादविवादाचा विषय म्हणजे सर्व शक्तिमान् ईश्वर. कॉंग्रेसच्या ठरावांत देखील कोठून तरी ईश्वराचा उल्लेख घुसडण्याची महंमद अलींना विलक्षण संवय होती. तो उल्लेख प्रार्थनेच्या अथवा कृतज्ञतेच्या स्वरूपाचा असे. मीं अशा वेळीं विरोध केला कीं माझ्या पाखंडीपणाबद्दल ते माझ्यावर ताशेरा झाडीत असत; पण नंतर ते मला म्हणत कीं, "तुमची वरवरची वागणूक कशीहि असली व तुम्हीं कितीहि विरोध दर्शविला, तरी तुमची प्रवृत्ति मुळांत धर्मनिष्ठच आहे ह्याबद्दल मला तरी शंका नाहीं." अर्थात् ह्या बोलण्यांतील तथ्य धर्माधर्माची आपण जी व्याख्या करूं त्यावर अवलंबून आहे.

धर्मासंबंधीं त्यांच्याबरोबर चर्चा करण्याचें मी टाळीत असें. कारण चर्चेमुळें एकमेकांचीं मनें वैतागून जातील व कदाचित् माझ्या हातून त्यांचें मन दुखावलेंहि जाईल अशी मला धास्ती वाटत असे. कोणत्याहि धर्माच्या कट्टर अनुयायाबरोबर या विषयाची चर्चा करणें नेहमींच अवघड होतें. बहुतेक मुसलमानांच्या बाबतींत तर हा विषय अधिकच बिकट होतो. कारण धर्मानें त्यांना यत्किंचितहि विचारस्वातंत्र्य दिलेलें नाहीं. वैचारिक दृष्ट्या त्यांच्या धर्मानें आंखून दिलेला मार्ग धोपट व अरुंद असा आहे. तो सोडून कोणीहि सच्च्या मुसलमानानें जातां कामा नये. हिंदू अगदींच नाहीं तरी थोडे भिन्न आहेत. आचारांच्या बाबतींत ते कर्मठ असतील; अगदीं जुनाट, प्रतिगामी, इतकेंच काय, पण अत्यंत अनिष्ट अशा रूढींनाहि ते उराशीं बाळगून ठेवतील; पण असें असूनहि धर्माविषयीं अत्यंत पाखंडी मतांची चर्चा ते मोठ्या आनंदानें करावयाला तयार होतील. आधुनिक आर्य समाजिस्टांचा दृष्टिकोण साधारणतः इतका विशाल नसतो असें मला वाटतें. मुसलमानांप्रमाणेंच तेहि आपल्या पंथाच्या सरळ व संकुचित वाटेनें जात असतात. बुद्धिमान् हिंदू लोकांमध्यें तत्त्वज्ञानाची अशी एक परंपराच पडून गेली आहे कीं जिच्यामुळें आचारधर्मांत बदल होत नसला तरी धर्माकडे पाहण्याच्या वैचारिक दृष्टींत फरक पडत जातो. हिंदु समाजांत नांदत असणाऱ्या परस्परविरोधी मतांचा व चालीरीतींचा हा परिणाम असावा. पुष्कळदां असेंहि म्हणण्यांत येतें कीं हिंदुधर्माला रूढार्थानें धर्म म्हणणेंच बरोबर नाहीं. मतामतांचा गलबला हिंदु धर्मांत असला, तरी त्याच्या अंगची चिकाटी आश्चर्यकारक आहे. त्याच्या अंगीं जीवनशक्ति तरी किती कल्पनातीत आहे, पहा ! जुन्या तत्त्वज्ञानी चार्वाकाप्रमाणें एकादा माणूस उघड उघड निरीश्वरवादी असला

तरीहि तो हिंदु धर्मांतून उठून गेला असें म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. त्याची इच्छा असो वा नसो, हिंदुधर्मानें आपल्या लेंकरांना जणुं कांहीं घट्ट कवटाळून धरलें आहे. मी ब्राह्मण म्हणून जन्मलों, आतां धर्मासंबंधीं अथवा सामाजिक रूढींविषयीं कांहींहि बोललों अगर कसाहि चाललों तरी मी ब्राह्मणच राहणार! माझ्या नांवामागें कोणत्याहि प्रकारची सन्मानाची उपाधि लावण्यांत येऊं नये असें मला मनापासून कितीहि वाटलें, तरी हिंदी जनता मला पंडित म्हणूनच ओळखणार! स्वित्झर्लंडांत माझी एकदां एका तुर्की विद्वानाशीं गांठ पडली. माझा परिचय करून देणारें एक पत्र मीं त्याला पूर्वीच पाठविलें होतें. त्यांत माझा उल्लेख "पंडित जवाहरलाल नेहरू" असा करण्यांत आला होता. मला पाहून त्याला जरा आश्चर्य वाटलें व त्याची थोडीशी निराशाहि झाली. तो म्हणाला कीं, "पंडित या पदवीवरून कोणी तरी धार्मिक, विद्वान् व वयातीत असा गृहस्थ आपल्या भेटीला येणार आहे, अशी मीं कल्पना केली होती!"

म्हणून महंमद अल्लींनीं व मीं धर्मविषयक वादविवाद कधींहि केला नाहीं. पण गप्प बसण्याचा गुण महंमद अल्लींच्या संग्रहीं नव्हता. आणि कांहीं वर्षांनंतर, बहुधा तें १९२५ किंवा १९२६ साल असावें, हा विषय काढल्यावांचून त्यांना राहवेना! दिल्लीस त्यांच्या घरीं मी भेटण्यासाठीं गेलों असतां त्यांना उकळी आली; त्या विषयाची आपण चर्चा केलीच पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरला! मीं त्यांचें मन वळवण्याचा प्रयत्न केला व आपले दृष्टिकोण अगदीं भिन्न असल्यामुळें एकमेकांच्या विचारावर आपल्या बोलण्याचा कांहींहि परिणाम व्हावयाचा नाहीं असेंहि मी म्हणालों. पण ते बधेनात. "एकदां चर्चा ही झालीच पाहिजे. तुम्हांला मी कडवा धर्माभिमानी आहें असें वाटत असेल, नाहीं? मी तसा नाहीं हें सिद्धच करून देतों. धर्माविषयीं मीं विस्तृत व सखोल अभ्यास केला आहे" असें म्हणून इस्लामी व ख्रिश्चन धर्मावरील पुस्तकें कपाटें भरभरून त्यांच्याकडे होतीं तीं त्यांनीं मला दाखविलीं. एच्. जी. वेल्स्चें "गॉड दि इन्व्हिजिबल किंग" हेंहि पुस्तक त्यांत होतें. महायुद्ध-काळच्या कित्येक वर्षांच्या स्थानबद्धतेच्या काळांत त्यांनीं कुराणाचें अनेकदां पारायण केलें व त्यावरील सर्व टीका वाचून काढल्या. या अभ्यासावरून त्यांना असें दिसून आलें कीं कुराणांतील शेंकडा ९७ टक्के भाग पूर्णपणें बुद्धीला पटण्यासारखा असून कुराणांत तो नसता तरी त्याचें स्वतंत्र रीत्या समर्थन करतां आलें असतें. बाकीचा शेंकडा ३ टक्के भाग बुद्धीला आपाततः मान्य होण्यासारखा नव्हता. पण शेंकडा ९७ टक्के बरोबर असणारें कुराण उरलेल्या ३ टक्के भागांतहि बरोबर असेल असें म्हणावें, कीं माझी अल्पबुद्धीच बरोबर व कुराण चुकलें असें म्हणावें? तेव्हां त्यांनीं असा निर्णय केला कीं कुराणच बरोबर असण्याचा संभव अधिक आहे; आणि म्हणून सगळेंच्या सगळेंच कुराण बरोबर आहे हें मत त्यांनीं ग्राह्य धरलें!

ह्या विचारसरणींतील तर्कवाद पटण्यासारखा नसला, तरी विवाद करण्याची

माझी इच्छा नव्हती. कोणीहि पूर्वग्रहरहित व भावनायुक्त अशा अन्तःकरणानें कुराण वाचून पाहिले, तर त्यांतील सत्य त्याला पटेलच पटेल असें महंमद अल्लींचें म्हणणें होतें. गांधीजींनीं कुराण लक्षपूर्वक वाचल्याचें मला माहीत आहे व त्यांना तें अर्थात् पटलेंच असलें पाहिजे; पण अहंकारामुळें ते वाटतें तें जाहीर करीत नाहींत असेंहि महंमद अल्लींनीं सांगितलें !

अध्यक्षपदाचें एक वर्ष संपल्यावर महंमद अल्ली काँग्रेसपासून दूर सरकले, किंवा त्यांच्या धाटणीनें बोलावयाचें झाल्यास काँग्रेस त्यांच्यापासून दूर सरकली. पण ही क्रिया फार मंदगतीनें झाली व कित्येक वर्षेपर्यंत ते अधिवेशनांत व ऑ. इं. कॉं. कमिटींत हजर राहून चर्चेत धडाडीनें भाग घेत असत. परंतु मतभेदाची फट रुंदावत गेली व दुजाभाव वाढतच गेला. कोणाहि एका व्यक्तीला अगर व्यक्तींना त्याबद्दल दोषी ठरवतां येणार नाहीं. देशांतील परिस्थितीचाच तो अपरिहार्य असा परिपाक होता. पण त्यामुळें आमच्यापैकीं पुष्कळांना दुःख झालें. जातीय प्रश्नावर कांहींहि मतभेद असले, तरी राजकीय बाबतींतील मतभेद अगदीं किरकोळ होते. हिंदी स्वातंत्र्याच्या कल्पनेच्या बाबतींत ते एकनिष्ठ राहिले. राजकीय विषयांत एकमत असल्यामुळें जातीय प्रश्नासंबंधीं त्यांच्याबरोबर कांहींतरी तडजोडीचें बोलणें करतां येत असे. जातिहिताचे कैवारी म्हणून मिरवणाऱ्या प्रतिगाम्यांत व महंमद अल्लींत राजकीय बाबतींत कांहींहि साम्य नव्हतें.

१९२८ सालीं ते युरोपांत गेले हें देशाचें दुर्दैव म्हटलें पाहिजे. जातीय प्रश्नाचा गुंता सोडवण्याचा त्या वेळीं फार मोठा प्रयत्न करण्यांत आला व प्रश्न जवळजवळ सुटत आला होता. महंमद अल्ली त्या वेळीं येथें असते, तर एकंदर हालचालींना वेगळेंच वळण लागण्याचा संभव होता. पण ते परत येण्यापूर्वीच डाव फिसकटून गेला. अर्थात्च ते येथें आल्यावर विरुद्ध पक्षाला जाऊन सामील झाले.

त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे १९३० सालीं आमच्यापैकीं हजारों लोक कायदेभंगाच्या चळवळीमुळें तुरुंगांत पडले असतां काँग्रेसचा निर्णय न मानतां महंमद अल्ली मंडलाकार परिषदेला हजर राहिले. त्यांच्या जाण्यामुळें मला दुःख झालें, आणि त्यांच्या अन्तःकरणांतहि कालवाकालव होत असावी असें त्यांच्या लंडन येथील कार्यावरून सिद्ध होण्यासारखें आहे. हिंदुस्थानांत ते परत येते, तर त्यांनीं चळवळींत भाग घेतला असता अशी मला खात्री वाटते. त्यांचें सर्व शरीर पोखरून निघालेलें होतें. गेलीं कित्येक वर्षे ते दुखण्याच्या तावडींत गवसले होते. लंडनमध्यें गेल्यावर कांहीं तरी साधावें, कांहीं तरी पुरुषार्थाचें काम करावें, अशी प्रचंड तळमळ त्यांना लागून राहिली असल्यामुळें औषधोपचारांची व विश्रांतीची जरुरी असूनहि ते काम करीत राहिले व त्यामुळें त्यांचा मृत्यु आणखी जवळ ओढवला. नैनी तुरुंगांत त्यांच्या मृत्यूची बातमी मीं ऐकली, तेव्हां माझ्या मनावर फार मोठा आघात झाला.

त्यांची सरतेशेवटची भेट लाहोरला १९२९ च्या अधिवेशनांत झाली. माझ्या

अध्यक्षीय भाषणांतील कांहीं भाग त्यांना पसंत पडले नाहींत व त्यांनीं त्यांवर जोराची टीका केली. कॅांग्रेस पुढें निघाली, राजकीय दृष्ट्या ती अधिक लढाऊ बनत चालली याची त्यांना जाणीव होती. लढाऊ वृत्ति त्यांच्या अंगींहि भरपूर असल्याकारणानें आपण मागें कुचंबावें व दुसऱ्यांनीं बिनीवर मिरवावें हें त्यांच्या वृत्तीला परवडत नसे. त्यांनीं मोठ्या गंभीरपणें मला बजावलें, " हें पहा, जवाहर, मी तुला सूचना देऊन ठेवतों, आत्तांचे हे तुझे सहकारी पुढें तुला एकट्याला सोडून जातील. संकट-काळीं तुला ते सोबत करणार नाहींत. कॅांग्रेसमधील तुझे स्वतःचेच लोक तुला फांसावर चढवतील. याद राख ! " किती भीतिप्रद भविष्य आहे हें !

कोकोनाडा-कॅांग्रेसबद्दल मला विशेष आस्था होती; कारण अखिल भारतीय स्वयंसेवक-संघटनेचा म्हणजे हिंदुस्थानी सेवादलाचा पाया तेथें घालण्यांत आला. तत्पूर्वींहि तुरुंगभरतीच्या व संघटनेच्या कामीं उपयोगी पडतील अशा स्वयंसेवक-दलांची कमतरता नव्हती. पण त्यांच्यामध्यें शिस्तीचा व एकसूत्रीपणाचा अभाव दिसून येत असे. सर्वसामान्यपणें कॅांग्रेसच्या देखरेखीखालीं राष्ट्रीय कार्य करणारें सुसंघटित असें अखिल भारतीय दल स्थापन करण्याची कल्पना प्रथम डॅा. हर्डीकर यांच्या डोक्यांत आली. या कामीं मीं त्यांना साहाय्य करावें असा त्यांचा आग्रह होता. मलाहि ती कल्पना पसंत पडून मीं त्यांच्या म्हणण्याला आनंदानें रुकार दिला. कोकोनाडा येथें प्रारंभ करण्यांत आला. प्रमुख कॅांग्रेसवाल्यांनीं सेवादलाच्या कल्पनेला इतका विरोध केलेला पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. कोणी म्हणाले कीं ही नवी प्रथा घातुक आहे. कारण कॅांग्रेसमध्यें लष्करी शिक्षणाचा यामुळें शिरकाव होऊन बिनलष्करी पक्षाऐवजीं लष्करी पक्षच सर्व सत्ता बळकावून बसायचा ! इतर कांहींजण अशा विचाराचे होते, कीं वरच्या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या हुकुमाची स्वयंसेवक तामिली करतील, इतकीच शिस्त त्यांना लावण्यांत यावी; बाकीच्या लोकांना, स्वयंसेवकांनीं शिस्तीनें पावलें टाकीत गेलें पाहिजे वगैरे गोष्टींचीहि इष्टता पटली नाहीं. कांहीं लोकांच्या डोक्यांत असा एक विचार होता, कीं कवायती स्वयंसेवक दल उभारणें हें कॅांग्रेसच्या अहिंसाव्रताशीं विसंगत आहे. शंका-कुशंका कांहींहि असल्या, तरी हर्डीकरांनीं काम झटून केलें व कित्येक वर्षे चिकाटीचा प्रयत्न करून कवायती स्वयंसेवक अधिक कर्तबगार असूनहि कसे अनत्याचारी राहूं शकतात, तें सिद्ध करून दाखविलें.

कोकोनाडा येथून परत आल्यावर १९२४ च्या जानेवारींत, अलाहाबाद येथें एक निराळाच प्रसंग अनुभवावयास मिळाला. माझ्या स्मृतीवर विसंबून मी लिहीत असल्यामुळें तारखा चुकण्याचा संभव आहे. तें कुंभ अथवा अर्ध-कुंभ यात्रेचें साल असावें. कुंभमेळ्यानिमित्त त्रिवेणीस्नान करण्यासाठीं गंगेच्या घाटावर यात्रेकरूंची अलोट गर्दी झाली होती. गंगेचें मैलभर रुंदीचें पात्र हिंवाळ्यांत आटून वाळवंट उघडें पडलें कीं यात्रेकरूंची उतरण्याची सोय त्यावर करतां येते. गंगेचा ओघ

नदीच्या पात्रांत अनेक वेळां बदलतो. १९२४ सालीं प्रवाहाचें स्वरूप लक्षांत घेतां त्रिवेणीवर यात्रेकरूंनीं स्नान करणें निःसंशयच धोक्याचें होतें. एकाच वेळीं अमुक इतक्या यात्रेकरूंनीं स्नान करावें वगैरेसारखीं नियंत्रणें घालून व इतर दृष्टींनीं सावधगिरी बाळगून धोका कमी करणें शक्य झालें असतें.

नदींत स्नान करून पुण्य मिळवण्याची मला इच्छा नसल्यामुळें मला ह्या गोष्टींत मन घालण्याचें कारण नव्हतें. परंतु पंडित मालवीय व सरकार यांच्यांत वाद उत्पन्न झाल्याचें मीं वृत्तपत्रांत वाचलें होतें. प्रांतिक सरकारानें हुकूम काढून संगमाच्या जागीं स्नान करण्यास बंदी केली, याला मालवीयांनीं हरकत घेतली. कारण त्या स्थळीं स्नान करणें हा तर मुख्य मुद्द्याचा भाग होता. धोका टाळण्यासाठीं प्रयत्न करणें हें सरकारचें काम होतें यांत शंका नाहीं. पण नेहमींच्या प्रघाताप्रमाणें लोकांचीं मनें बिथरतील अशा ताठरपणानें अधिकार बजावण्यास सरकारनें सुरुवात केली.

यात्रेच्या दिवशीं सकाळींच मेळा पाहण्यासाठीं मी नदीवर गेलों. तेथें असें समजलें कीं त्रिवेणींत स्नान करण्याची परवानगी द्या अशा अर्थाचा एक निर्वाणीचा व सौम्य खलिता मालवीयजींनीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला पाठविला आहे. मालवीयजी चिडले होते व परिस्थिति गंभीर बनली होती. परवानगी नाकारण्यांत आली. मालवीयजींनीं सत्याग्रह करण्याचें ठरवून दोनशें लोकांसह संगमाकडे मोर्चा फिरविला. मीहि एकाएकीं सत्याग्रह्यांना जाऊन मिळालों. संगमाकडे लोकांना जातां येऊं नये म्हणून एक मोठें कुंपण घालण्यांत आलें होतें. तेथें पोलिसांनीं आम्हांला थोपवलें व आमच्याजवळची शिडी काढून घेण्यांत आली. आम्ही अनत्याचारी सत्याग्रही असल्यामुळें कुंपणाजवळच वाळूंत शांततेनें बसून राहिलों. सगळी सकाळ उलटून दुपारचाहि बराच वेळ गेला. ऊन्हें कडक होत चाललीं होतीं. वाळू तापत होती व पोटांत कावळे ओरडत होते. शिपायांचें पायदळ व घोडदळ आमच्या दुतर्फा उभें होतें. सैन्यांतील घोडदळहि होतें असें मला वाटतें. आम्ही अधीर झालों. कांहींतरी केलें पाहिजे असें वाटूं लागलें. अधिकारीहि आतुर झाले असावेत. घोडदळाला कांहींतरी हुकूम सुटला. ते घोड्यावर स्वार झाले. मला असें वाटलें कीं ते आमच्यावर हल्ला करून आम्हांला पिटाळून लावणार असावेत. घोडेस्वारांनीं पाठलाग करून आम्हांला उधळून द्यावें ही कल्पना मला मानवली नाहीं. शिवाय तेथें बसून राहण्याचाहि मला वीट आला होता. म्हणून कुंपण चढून जावें असें मीं जवळ बसलेल्यांना सुचवलें व स्वतः मी वर चढलों देखील. लगेच शेंकडों लोकांनीं तसेंच केलें. कांहींनीं मधले थोडे वांसे उपटून काढले. जाण्यासाठीं वाट पडली. कोणींतरी मला झेंडा आणून दिला, तो मीं कुंपणावरच रोवला. मी तेथेंच बसून होतों, लोक तटबंदीवर चढत होते, घोडेस्वार त्यांना दूर लोटीत होते, अशी मोठी धामधूम उडून राहिली होती. घोडेस्वारांनीं शक्य तों इजा न करतां आपलें काम.

चालवलें होतें ही गोष्ट कबूल केली पाहिजे. त्या वेळीं क्रांतीच्या काळांतील तटबंदीची मला अंधुक आठवण झाली.

शेवटीं मी पलीकडच्या बाजूला उतरलों व उन्हाचा ताप झालेला असल्यामुळें स्नान करून यावयाचें असें ठरवलें. परत येऊन पाहतों तों मालवीयजी व इतर पुष्कळ लोक पूर्वीच्या जागींच बसून राहिलेले पाहून मला आश्चर्य वाटलें; पण आतां सत्याग्रह्यांच्या व कुंपणाच्या मध्यें घोडेस्वार व शिपाई एकमेकाला खेटून उभे राहिले होते. मीहि मालवीयजींपाशीं जाऊन बसलों. मालवीयजींच्या मनांत प्रचंड खळबळ चालू होती असें दिसलें. कांहींतरी जोरदार भावना आवरण्याचा ते प्रयत्न करीत असावेत. इतक्यांत कोणाला कल्पनाहि नसतां अचानकपणें घोडेस्वारांच्या व शिपायांच्या मधून मालवीयजींनीं विलक्षण रीतीनें सुरकांडी मारली! अशी सुरकांडी मारणें कोणालाहि अवघड होतें. पण मालवीयजींसारख्या वृद्ध व अशक्त माणसानें असलें कृत्य करणें ही बेहद्द आश्चर्याचीच गोष्ट होती. आम्हींहि त्यांचें अनुकरण केलें. घोडेस्वारांनीं आम्हांला अडवण्याचा थोडासा प्रयत्न केला, पण जरा वेळानें त्यांनीं तो नाद सोडून दिला.

सरकार कांहीं खटले वगैरे करील अशी अपेक्षा होती. पण मालवीयजींवर खटला भरण्यास सरकार तयार नव्हतें. सरकारनें आम्हांलाहि हात लावला नाहीं. देवमासा सुटला, त्याबरोबर झिंगाही सुटला!

१८

# वडील आणि गांधीजी

१९२४ च्या सुरुवातीला गांधीजींच्या जिवावरील दुखण्याची बातमी एका-एकीं पसरली. तुरुंगांतून त्यांना लगेच रुग्णालयांत नेण्यांत येऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. काळजीनें सारा हिंदुस्थान काळवंडला होता. श्वासहि न टाकतां भयचकित मनानें आम्ही बातमीकडे डोळे लावून बसलों होतों. संकट निभावून गेलें व त्यांच्या भेटीसाठीं जाणाऱ्या लोकांचा लोंढा पुण्याकडे लोटला. ते अद्यापि रुग्णालयांतच असून त्यांच्यावर पहारा होता. पण कांहीं ठराविक मित्रांना भेटण्याची त्यांना परवानगी देण्यांत आली होती. वडिलांनीं व मीं त्यांची रुग्णालयांत भेट घेतली.

रुग्णालयांतून त्यांना परत तुरुंगांत नेण्यांत आलें नाहीं. त्यांची प्रकृति सुधारत असतांच उरलेली शिक्षा सरकारनें रद्द केली व त्यांना सोडून दिलें. सहा वर्षांच्या शिक्षेपैकीं त्यांनीं दोन वर्षें भोगलीं होतीं. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं ते मुंबईशेजारीं जुहू येथें जाऊन राहिले.

आमचें सर्व कुटुंबहि जुहूला गेलें व तेथेंच समुद्रकांठीं एका लहानशा झोंपडींत आम्ही राहिलों. तेथें कांहीं आठवडे आमचा मुक्काम होता. कितीतरी दिवसांनीं विश्रांतीचें पोटभर सुख मला घ्यावयास सांपडलें. पोहणें, पळणें व वाळवंटांत घोड-दौड करणें यांची हौस मीं फेडून घेतली. पण चैनीच्या उद्देशानें आम्ही तेथें राहिलों नव्हतों. गांधीजींबरोबर विचारविनिमय करणें हा आमचा मुख्य उद्देश होता. त्यांना स्वराज्यपक्षीयांची भूमिका समजावून देऊन त्यांची सक्रिय सहानुभूति मिळवतां आली नाहीं, तर निदान त्यांचा आशीर्वाद तरी आपल्या कार्याला मिळवावा, अशी वडिलांची मनीषा होती. माझ्या मनांत घर करून सलत राहिलेल्या कांहीं प्रश्नांच्या बाबतींत त्यांच्याकडून खुलासा करून घ्यावा अशी माझीहि इच्छा होती. त्याचप्रमाणें त्यांचा पुढचा कार्यक्रम मला समजून घ्यावयाचा होता.

गांधीजींचें मन वळवण्याचा अथवा त्यांना आपलें म्हणणें अंशतः तरी पटवून देण्याचा स्वराज्यपक्षीयांचा हेतु जुहू येथें तडीस गेला नाहीं. मोठ्या मित्रत्वाचीं बोलणीं झालीं व वागणूकहि मोठ्या सौजन्याची राहिली. परंतु तडजोड कोणत्याहि प्रकारें होऊं शकली नाहीं. दोघांचींहि मतें भिन्न आहेत, ही गोष्ट मात्र उभयतांना मान्य होऊन त्याप्रमाणें वृत्तपत्रांतून जाहीर करण्यांत आलें.

जुहूहून मीहि निराश होऊनच परतलों. कारण माझ्या एकाहि शंकेचें निरसन गांधीजींना करतां आलें नाहीं. त्यांच्या संवयीप्रमाणें भविष्यकाळांत दूरवर पहावयास अथवा चिरस्वरूपाचा कार्यक्रम आंखून द्यावयास ते तयार नव्हते. धीमेपणानें जनसेवा करीत असावें, कॅांग्रेसच्या विधायक व सामाजिक सुधारणाविषयक कार्यक्रमाच्या प्रचाराचें काम करावें, व चढाईच्या कार्यक्रमास अनुकूल अशा वेळेची मार्गप्रतीक्षा करीत रहावें, हें गांधीजींच्या मतें आमचें काम. पण अडचण होती ती अशी, कीं चढाईला प्रारंभ झाल्यावर चौरीचौरासारखा प्रसंग उद्भवून आमचें सर्व गणित विस्कटणार नाहीं कशावरून ? व त्यामुळें आमची प्रगति खुंटेल त्याचें काय ? त्याला त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ध्येयासंबंधींहि त्यांचा निश्चय झालेला नव्हता. कॅांग्रेसनें तशी घोषणा केलीच पाहिजे असा आग्रह नसला, तरी आम्ही कोठें चाललों आहोंत, त्याची स्पष्ट कल्पना आम्हांला असली पाहिजे असें आमच्यापैकीं पुष्कळांना वाटत होतें. आम्ही स्वातंत्र्य व कांहीं एका मर्यादेपर्यंत समाजपालट यांच्यासाठीं झगडत राहणार आहोंत, कीं त्यापेक्षां बरेंच कमी दर्जाचें ध्येय साध्य होतेंसें दिसलें कीं आमचे पुढारी तडजोड करणार आहेत ? कांहीं महिन्यांपूर्वीं संयुक्तप्रांतीय राजकीय परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत मीं स्वातंत्र्याचें ध्येय विशेष प्रामुख्यानें पुढें मांडलें होतें. नाभाहून सुटून आल्यावर थोड्याच दिवसांनीं ही परिषद् भरली. तेव्हां नाभाहून आणलेल्या विषमज्वरानें मी अंथरुणावर पडल्या-पडल्याच अध्यक्षीय भाषण लिहून काढलें. मला परिषदेला उपस्थित राहतां आलें नाहीं. पण माझें भाषण मात्र तेथें रुजू झालें.

आमच्यापैकीं कांहींजण स्वातंत्र्याबद्दल अट्टाहास करीत होते, तर आजचे प्रागतिक मित्र कॅांग्रेसपासून इतके दूर वाहवत गेले होते, कीं साम्राज्याच्या वैभवाचे व वर्चस्वाचे पवाडे चवाठ्यावर गाऊन दाखवण्यांतच त्यांना धन्यता वाटत होती ! साम्राज्यशाही आमच्या देशबांधवांना पायपुसण्याप्रमाणें वागवीत असे, त्याची दिक्कत त्यांना वाटली नाहीं. त्यांच्या वसाहतींत आम्ही दास म्हणून राबण्यास तयार असलों तरच ते आम्हांला किनाऱ्यावर पाय ठेवूं देतात, त्याचेंहि सोयरसुतक त्यांना नव्हतें ! श्री. शास्त्री साम्राज्याचे दूत बनले आणि १९२३ च्या लंडन येथील साम्राज्यपरिषदेंत सर तेजबहादुर सप्रूंनीं गर्वभरानें मुक्ताफळें उधळलीं कीं, "मला मोठ्या अभिमानानें असें म्हणतां येईल, कीं साम्राज्याला साम्राज्यपद प्राप्त करून दिलें तें माझ्या देशानें !"

आमच्यांत व प्रागतिकांत जणुं कांहीं सातांसमुद्रांचें अंतर पडलें होतें ! आमचें राहणें निरनिराळ्या जगांत, आमच्या भाषा भिन्नभिन्न, आम्हांला कल्पनाचित्रें दिसत–प्रागतिकांना कधींकाळीं कल्पनाचित्रें दिसत असतील तर–त्यांतहि दोघांना सामान्य असें कांहींच नव्हतें. अशी परिस्थिति असतां आपल्या तरी ध्येयासंबंधींच्या कल्पना स्पष्ट व निश्चित व्हावयास नकोत काय ?

पण असले विचार त्या काळीं फार थोड्यांच्या मनांत येत. बहुतेक लोकांना व विशेषतः राष्ट्रीय चळवळींतील लोकांना विचारांतील निःसंदिग्धपणा अप्रिय वाटतो; कारण राष्ट्रीय चळवळ ही स्वभावतःच संदिग्ध व कांहींशी गूढात्म अशी असते. १९२४ च्या सुरुवातीच्या काळांत लोकांचें लक्ष असेंब्लींतील व प्रांतिक कायदेमंडळांतील स्वराज्य-पक्षाकडे लागलें होतें. आंत घुसून विरोध करा, कायदेमंडळें मोडून टाका, वगैरे वीर-घोषणांनंतर हा पक्ष पुढें काय करतो तें पाहण्याची लोकांना उत्कंठा लागून राहिली होती. कांहीं पवित्रे चित्तवेधक झाले. त्या वर्षीचें अंदाजपत्रक असेंब्लीनें फेटाळून लावलें. हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सोडवण्यासाठीं एक मंडलाकार परिषद् बोलावण्यांत यावी हा ठरावहि पास झाला. देशबंधु दासांच्या नेतृत्वाखालीं बंगाल-कायदेमंडळानेंहि मागण्या धुडकावून लावल्या. पण दोन्ही ठिकाणीं सरकारनें अंदाजपत्रकें स्वतःच्या अधिकारांत पास केलीं व त्यांना कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें. कांहीं भाषणें झालीं, कायदेमंडळांतील वातावरण जरा तप्त झालें, स्वराज्यपक्षीयांना क्षणभर विजयोन्मादाचा अनुभव घ्यावयास सांपडला, वृत्तपत्रांत ठळक मथळे झळकले आणि...आणि कांहीं झालें नाहीं! होणार काय? ह्याच डावांची दुसरी फेरी झाली, तिसरी झाली, पण त्यांतली नवाई विटून गेली, भावनाभर ओसरला, आणि अंदाजपत्रकाच्या चिंधड्या व्हावयाच्या व गव्हर्नरानें तें शिफारशीच्या डिंकानें चिकटवून खुशाल मंजूर करावयाचें, हा प्रकार जनतेच्या परिचयाचा झाला! कायदेमंडळाच्या आंत राहून स्वराज्यपक्षाला यापुढची पायरी चढणें शक्य नव्हतें. तें काम बाहेरच करतां येण्यासारखें होतें.

त्या वर्षाच्या अधेमधें केव्हांतरी ऑ. इं. कॉं. समिति अहमदाबादला भरली होती. बैठक चालू असतां एकाएकीं गांधीजी व स्वराजिष्ट यांच्यांत चांगलीच चकमक झडली व कांहीं हृदयस्पर्शी प्रसंगहि घडून आले. गांधीजींकडूनच प्रकरणाला प्रारंभ झाला. स्वराज्याचें ध्येय व शांततेचा मार्ग ह्या कॉंग्रेसच्या ध्येयवाक्यांना जो मान्यता देईल व चार आणे वर्गणी देईल त्याला इतके दिवस कॉंग्रेस-सभासद होतां येत असे. गांधीजींनीं या नियमांत मूलगामी फरक सुचवला, तो असा कीं चार आण्यांऐवजीं ज्या व्यक्ती ठराविक लांबीचें सूत देतील त्यांनाच सभासद होतां यावें. मताधिकारावर यामुळें चांगलेंच नियंत्रण पडणार होतें. ऑ. इं. कॉं. समिति हा बदल करण्यास असमर्थ होती. पण घटना आपल्या इच्छेच्या आड येऊं लागली, तर गांधीजी तिची फारच थोडी पर्वा करीत असत. घटनेचा हा उपमर्द पाहून मला संताप आला व चिटणिसाच्या जागेचा राजिनामा मीं कार्यकारी मंडळाला सादर केला. पण दरम्यान कांहीं नवीनच भानगडी उपस्थित झाल्यामुळें मीं राजिनाम्याचा आग्रह धरला नाहीं. गांधीजींच्या ठरावाला ऑ. इं. कॉं. समितींत दासबाबूंनीं व वडिलांनीं जळजळीत विरोध करून शेवटीं आपणांला तो सर्वस्वीं अमान्य आहे हें दर्शविण्यासाठीं मतमोजणीच्या जरा आधीं ते आपल्या बऱ्याच



कै. मोतीलाल नेहरू

अनुयायांसह सभागृह सोडून चालते झाले. ठरावाविरुद्ध असलेले कांहीं लोक तेथेंच बसून होते. ठराव बहुमतानें पास झाला खरा, पण तो सरतेशेवटीं मागें घेण्यांत आला. स्वराज्यपक्षीयांच्या निष्क्रमणाचा गांधीजींच्या मनावर अतिशय परिणाम झाला आणि दासबाबूंनीं व वडिलांनीं केलेला निकराचा विरोध त्यांच्या मनाला लागून राहिला. ते भावनाविव्हल झाले होते; अशा वेळीं एका सभासदानें सहजगत्या केलेली टीका त्यांना असह्य होऊन त्यांची सारी हिम्मत खचली! झालेल्या प्रकारामुळें त्यांना जिव्हारी जखम झाली होती हें उघडच दिसत होतें. कमिटीच्या सभासदांना उद्देशून अत्यंत हृदयस्पर्शी असें भाषण त्यांनीं केलें. कित्येक सभासदांच्या डोळ्यांतून टिपें पडलीं. मन विरघळून टाकील असा तो देखावा होता! *

त्या ठरावाला कसून विरोध होईल ही गोष्ट त्यांना माहीत असावयास हवी होती. असें असतां त्यांनीं सुताच्या मताचा अत्याग्रह कां धरला ह्याचा उलगडा मला झालेला नाहीं. खादी वगैरे विधायक कार्यक्रमांवर ज्यांची श्रद्धा असेल, अशा लोकांचाच कॉंग्रेसमध्यें प्रवेश व्हावा अशी त्यांची इच्छा असावी. म्हणूनच इतरांना हांकून देण्यास अगर त्यांच्यावर शिस्त लादण्यास ते सिद्ध झाले असावेत. पण त्यांच्या बाजूला बहुसंख्या असूनहि त्यांचा निश्चय डळमळला व तडजोडीचें बोलणें त्यांनीं सुरू केलें. नंतरच्या तीन चार महिन्यांत या प्रश्नासंबंधींचीं त्यांचीं मतें अनेकवार पालटलेलीं पाहून मला आश्चर्य वाटलें. अनोळखी मुलुखांत त्यांचें मन भटकत आहे, आपल्या ठिकाणाबद्दल त्यांच्या मनाचा निश्चय झालेला नाहीं असें पहाणाराला वाटलें असतें. गांधीजींची अशी अवस्था होईल अशी कल्पनाहि करवत

* हा वृत्तान्त मीं तुरुंगांत आठवणीच्या आधारें लिहून काढला होता. त्यांत एक चूक राहून गेल्यामुळें ऑ. इं. कॉ. कमिटीच्या बैठकीचें रेखाटलेलें चित्र सदोष झालें आहे. बंगाली क्रांतिकारक गोपीनाथ सहा यांच्याविषयीं एक ठराव तेथें मांडण्यांत आला, त्याचें गांधीजींना वाईट वाटलें. ठराव शेवटीं नापास झाला. माझ्या आठवणीप्रमाणें ठरावांत सहांच्या कृत्याबद्दल निषेध व्यक्त केला असला, तरी त्यांच्या हेतूविषयीं सहानुभूति दर्शविण्यांत आली होती. ठरावापेक्षांहि त्यावर झालेल्या भाषणामुळें गांधीजींचें चित्त व्यथित झालें. अहिंसेच्या बाबतींत कॉंग्रेसमधील अनेक लोक अव्यभिचारी वृत्तीचे नाहींत हें पाहून त्यांना दुःख झालें. त्यासंबंधीं 'यंग इंडियां'त ते लिहितात, "ठरावावर झालेलीं भाषणें, ठरावाचा निकाल, व त्या वेळचे देखावे पाहून माझे डोळे साफ उघडले......कॉंग्रेसचें अहिंसामय ध्येय अथवा धोरण याविषयीं दाखवण्यांत आलेली बेपर्वाई बघून माझें अन्तःकरण तुटूं लागलें. ठरावास दुजोरा देणारे सत्तर प्रतिनिधी कॉंग्रेसमध्यें असावेत ही गोष्ट मति कुंठित करण्यासारखी होती." हा प्रसंग व गांधीजींनीं त्यावर केलेली टीका हीं अत्यंत उद्बोधक आहेत. अहिंसाव्रताला गांधीजी किती महत्त्व देतात व त्याचें खंडन करण्याचा कळत वा नकळत कोणी प्रयत्न केला तर त्यांच्या मनाला ती गोष्ट किती लागून राहते, हें ह्या प्रसंगावरून स्पष्ट होणार आहे. गांधीजींच्या सर्व धोरणाची व कार्याची इमारत अहिंसेच्या आधारस्तंभावर उभारलेली होती व तीच स्थिति अद्यापि देखील कायम आहे.

नसे. मला अचंबा वाटला तो याचमुळें. त्यांनीं उपस्थित केलेला प्रश्न माझ्या मतें तरी फारसा जिव्हाळ्याचा नव्हता. मतदानाचा अधिकार प्राप्त होण्यासाठीं श्रमसिद्धतेचा दाखला आवश्यक मानण्यांत यावा हें मत योग्यच होतें. पण ठरावाचें स्वरूप अत्यंत मर्यादित करण्यांत आल्यामुळें मूळ हेतु बाजूला पडत होता.

मीं असा निष्कर्ष काढला, कीं अपरिचित वातावरणांतून मार्ग काढावयाचा असल्यामुळें गांधीजी अडखळत आहेत. अहिंसात्मक प्रत्यक्ष प्रतिकाराच्या खास शास्त्रांत ते बिनजोड होते. त्यांचीं पावलें त्या क्षेत्रांत स्वाभाविक प्रेरणेनेंच अचूक पडत जात. जनतेंत समाजसुधारणेचें कार्य गाजावाजा न करतां स्वतः करण्याच्या व इतरांकरवीं करून घेण्याच्या कामींहि त्यांचा हातखंडा होता. पूर्ण शांति आणि उघड युद्ध हीं दोन टोकेंच त्यांना समजत. मध्यंतरींचे कार्यक्रम त्यांना उमगत नसत. कायदेमंडळांच्या आंत चालणारा स्वराज्यपक्षीयांच्या झगड्याचा व विरोधाचा कार्यक्रम पाहून त्यांना हुरूप वाटला नाहीं. ते म्हणत, कायदेमंडळांत जावयाचें तर हितप्रद कायदे पास करून घेण्यासाठीं सरकारबरोबर सहकार्य करण्याची बुद्धि ठेवून जा, विरोधासाठीं आंत जाऊं नका. सहकार्य करावयाचें नसेल, तर बाहेरच रहा. स्वराज्यपक्षाची भूमिका या दोहोंपैकीं कोणत्याच स्वरूपाची नसल्यामुळें त्यांच्याबरोबर वागतांना गांधीजींना सांकडें पडत असावें.

सरतेशेवटीं त्यांच्याबरोबर गांधीजींनीं जमवून घेतलें. सुताची वर्गणी ऐच्छिक करण्यांत आली, आणि चार आण्यांचा मताधिकार कायमच राहिला. स्वराज्यपक्षानें कायदेमंडळांत केलेल्या कामगिरीबद्दल त्यांची त्यांनीं पाठ थोपटली, पण ते स्वतः मात्र दूर राहिले. त्यांनीं राजकारणसंन्यास घेतला अशींहि विधानें करण्यांत येऊं लागलीं. सरकारची समजूत अशी झाली कीं त्यांची लोकप्रियता घटली असून त्यांच्यांत आतां कांहीं राम उरला नाहीं, ते मागें पडले; आतां दास–नेहरू यांच्या हातीं राजकारणाचीं सूत्रें आलीं आहेत! गेल्या पंधरा वर्षांत कमी-जास्त फरकानें असल्या टीका अनेकवार झालेल्या आहेत व त्यांच्यावरून एवढेंच सिद्ध झालें आहे, कीं हिंदी जनतेच्या भावनांचें सरकारला काडीमात्रहि ज्ञान नाहीं. हिंदी राजकीय क्षेत्रांत गांधीजींनीं पाऊल टाकल्यापासून त्यांच्या लोकप्रियतेला कृष्णपक्ष असा माहितीच नाहीं. ती सारखी वाढतेच आहे, व तिची वाढ अद्यापि खुंटलेली नाहीं. त्यांच्या इच्छेबरहुकूम जनता वागत नसेल; कारण मनुष्यप्राणी स्वभावतःच दुबळा आहे. पण त्यांच्याविषयीं जनतेच्या मनांत अलोट प्रेम वसत आहे खास. परिस्थिति अनुकूल मिळाली कीं जनतेच्या प्रचंड चळवळी उचल खातात; इतर वेळीं लोकसमुदाय गप्प मुई धरून पडून राहतो. पुढारी झाला म्हणून जादुगाराप्रमाणें धुळींतून चळवळी निर्माण करणें त्यालाहि शक्य होत नसतें. परिस्थिति पोषक दिसली कीं तिचा फायदा तो करून घेतो; तसा फायदा घेतां यावा अशी जय्यत सिद्धता करून ठेवतो; पण परिस्थितीच मुळासकट तयार करूं म्हटलें तर तें जमणार नाहीं.

गांधीजींबद्दलच्या बुद्धिमान् वर्गातल्या लोकप्रियतेला भरती-ओहोटी येत असते हें मात्र खरें. उत्साहाचा पूर चढत असला कीं ते त्यांच्या मागोमाग जातात व अपरिहार्य अशी प्रतिक्रिया सुरू झाली कीं टीकाहि करूं लागतात! तरीहि त्यांच्यापैकीं बहुसंख्य लोक त्यांच्या पुढें आदरानें लीन होतातच. कदाचित् पुढें दुसरा कोणताहि परिणामकारक कार्यक्रम नसल्यामुळें देखील असें होत असेल. नेमस्तपक्ष व त्याचेच सवर्गीय असे प्रतिसहकार वगैरे सारखे पक्ष जमेस धरण्याचें कारण नाहीं; आधुनिक जगांत दहशतवाद्यांचा पक्ष निष्फळ व जीर्ण समजण्यांत येत असल्यामुळें त्याचाहि विचारकर्तव्य नाहीं. समाजवादी कार्यक्रमाकडे वळावें, तर त्याचा प्रचार आतांपर्यंत तरी फारच अल्प झालेला आहे, व कॉंग्रेसमधल्या वरिष्ठवर्गीय सभासदांना त्या वादाचा मोठा बाऊ वाटत असतो.

१९२४ मध्यें कांहीं काळ खंड पडल्यानंतर पुन्हां वडिलांची व गांधीजींची दिलजमाई होऊन त्यांचे संबंध अधिकच दृढ झाले. त्यांच्यामध्यें कितीहि मतभेद असला, तरी एकमेकांविषयीं परस्परांच्या मनांत आत्यंतिक आदर व आपलेपणा वसत होता. काय म्हणून त्यांना इतका आदर वाटे? गांधीजींचे निवडक लेख "विचार-प्रवाह" या नांवानें संग्रहित करण्यांत आले होते, त्या पुस्तकाला वडिलांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेवरून या प्रश्नाचा किंचित् उलगडा होतो. ते म्हणतातः—

"संतांबद्दल व अतिमानवांबद्दल मीं पुष्कळ आख्यायिका ऐकल्या आहेत; पण त्यांची भेट होण्याचें भाग्य मला लाभलेलें नाहीं, व ते अस्तित्वांत असतील कीं नाहीं याविषयीं देखील मला शंकाच आहे हें कबूल केलें पाहिजे. कर्तबगार माणसें व पुरुषार्थ यांच्यावर मात्र माझा विश्वास आहे. या पुस्तकांत ग्रथित झालेले 'विचार-प्रवाह' एका मनुष्याच्या अन्तःकरणांत उदित झालेले आहेत व त्यांच्यामध्यें पुरुषार्थाचें पाणी खळाळत आहे. मानवी स्वभावाला भूषणभूत झालेल्या दोन भावना-विशेषांचा—श्रद्धा व सामर्थ्य यांचा—आविष्कार त्यांत पहावयास सांपडतो.

"श्रद्धाहीन व सामर्थ्यहीन माणसें असा प्रश्न विचारतात कीं 'या सर्वांचा परिणाम काय होणार?' 'मेलों तर स्वर्ग, जिंतलों तर राज्य' ह्या उत्तरानें त्यांचें समाधान होणार नाहीं...परंतु अविचल श्रद्धेच्या व अजिंक्य सामर्थ्याच्या बुरुजावर पाय रोंवून उभी राहिलेली एक विनयनम्र व्यक्ति मातृभूमीसाठीं अवश्य करावयास लागणाऱ्या त्यागाचा व भोगावयास लागणाऱ्या क्लेशाचा संदेश आपल्या देशबांधवांना ऐकवीत आहे, व त्या संदेशाचे पडसाद लाखों अन्तःकरणांत घुमत-उमटत आहेत...... "

प्रस्तावनेचा शेवट त्यांनीं स्विन्बर्नच्या खालील ओळींनीं केलेला आहे:—

"परिस्थितीवर हुकुमत ज्यांची असे थोर मोहरे
नसति का अमुच्या बाजुस बरें......"

त्यांना प्रामुख्यानें हीच गोष्ट सांगावयाची होती कीं सन्त अथवा महात्मा म्हणून नव्हे, तर थोर पुरुष म्हणून आपणाला गांधीजींबद्दल आदर वाटतो. उन्नत व कणखर अशी त्यांची स्वतःची वृत्ति असल्यामुळें गांधीजींच्या कणखर व तेजस्वी वृत्तीचें त्यांना कौतुक वाटत असे. या दुबळ्या शरीराच्या माणसाचें मन पोलादासारखे आहे, कितीहि मोठ्या शारीरिक शक्तीला न जुमानणाऱ्या काळवथरी दगडाप्रमाणे तें घट्ट आहे हें उघड दिसत होतें. दुसऱ्यावर छाप बसवणारी त्यांची मुद्रा नसली, पंचा नेसलेल्या ह्या व्यक्तीचें बाकीचें शरीर उघडेंच असलें, तरी त्यांच्यांत असें कांहीं ऐश्वर्य व राजतेज होतें, कीं दुसऱ्याला नम्र व्हावेंसेंच वाटावें! जाणूनबुजून अंगीं लहानपणा व नम्रता आणलेली असली तरी अधिकार व सामर्थ्य देखील त्यांच्यापाशीं भरपूर होतें व त्यांना या गोष्टींची जाणीवहि होती; अधून मधून अरेरावी गाजवून ते असे हुकूम सोडीत कीं त्यांची तामिली करणें भाग पडावें. आपल्या शांत व गंभीर डोळ्यांनीं ते दुसऱ्याला जागच्या जागीं खिळवून टाकीत व त्याच्या मनाचा अगदीं हळूच ठाव घेऊन येत. त्यांचा स्पष्ट व मंद आवाज अंतःकरणापर्यंत जाऊन भिडत असे व तेथें भावनांचीं उत्तरें उचंबळूं लागत. श्रोता एक असो कीं हजार असोत, त्यांचा गोडवा आणि त्यांची आकर्षणशक्ति यांचा परिणाम हटकून होई व प्रत्येकाला ते आपल्याशींच बोलत आहेत असें वाटूं लागे. मनाची अथवा बुद्धीची खात्री पटल्यामुळें ही तादात्म्यता साधत असे, असें नव्हे. तथापि भावना आळविण्याकडेहि ते अजिबात दुर्लक्ष करीत, असें म्हणतां येणार नाहीं. हा 'वशीकरणा' चा प्रयोग वक्तृत्वाच्या बळावर अगर वाग्जालाचे तलम तंतू पसरून ते सिद्ध करीत नसत. त्यांची भाषा नेहमींच साधी व मुद्देसूद असावयाची. तींत सहसा फालतू शब्द आढळावयाचा नाहीं. त्या पुरुषाची निस्सीम तळमळ आणि प्रभावी व्यक्तित्व यांच्या योगानेंच मनावर पगडा बसे. त्यांच्याकडे पाहिलें कीं यांच्या अंगीं अचाट सुप्त सामर्थ्य आहे असें वाटावें. त्यांच्या सभोंवार परंपरेची जी एक प्रभावळ तयार झाली होती, तिचाहि कदाचित् अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या कामीं उपयोग होत असेल. ज्याला ही परंपरा ठाऊक नाहीं अगर त्या वातावरणाशीं जो समरस झालेला नाहीं त्याच्यावर ह्या मोहिनीचा परिणाम झाला नसता; निदान तितक्या प्रमाणांत झाला नसता. तथापि गांधीजींची विलक्षण हातोटी आहे ती अशी कीं आपल्या विपक्षीयांनाहि ते आपलेसे करून टाकतात, किमानपक्षीं त्यांचें उपसलेलें शस्त्र तरी त्यांस खालीं ठेवावयास लावितात.

मनुष्यनिर्मित वस्तूंमधील सौंदर्य अथवा कला पारखण्याची शक्ति गांधीजींच्या अंगीं फारच थोडी होती. नैसर्गिक सौंदर्याचें मात्र ते कौतुक करीत. ताजमहाल म्हणजे जबरदस्तीनें राबवण्यांत आलेल्या मजुरांच्या घामाचें घनीभूत स्वरूप, याहून त्याची मातब्बरी नाहीं असें त्यांना वाटे. त्यांची सुवासाबद्दलची अभिरुचीहि फार माफक असे. तथापि जीवनकलेचें तंत्र त्यांनीं आपल्या परीनें हुडकून काढलें

होतें व आपल्या जीवनाला एकाद्या कलाकृतीची प्रमाणबद्धताहि प्राप्त करून दिली होती. त्यांची प्रत्येक हालचाल अर्थपूर्ण व निर्दोष अशी असे व त्यांत एक विशिष्ट चारुता प्रत्ययास येई. खडबडीतपणाचा, तीक्ष्णपणाचा लवलेशहि त्यांच्यापाशीं नव्हता. मध्यमवर्गांत भरपेठ सांपडणाऱ्या हीन व सवंग अभिरुचीचा मागमूसहि त्यांच्या अंगीं दिसत नसे. मनःशांतीचा जो दिवा त्यांना गवसला, त्याच्या दिव्य तेजाची पखरण त्यांनीं इतरांवर केली व त्याच्या उजेडानें उजळलेल्या आयुष्याच्या नागमोडी मार्गावर मोठ्या निश्चयानें व निर्भयतेनें ते आपलीं पावलें टाकीत राहिले.

माझ्या वडिलांची स्थिति किती भिन्न होती! पण त्यांच्याहि अंगीं व्यक्तिमत्तेच्या सामर्थ्याची आणि अन्तःकरणाच्या ऐश्वर्याची कळा होतीच. स्विन्बर्नच्या त्यांनीं उद्धृत केलेल्या काव्यपंक्ती त्यांनाहि लागू पडल्या असत्या. कोणत्याहि समारंभास ते उपस्थित असले कीं त्यांतलें प्रमुख स्थान त्यांच्याकडे यावयाचेंच. एका प्रसिद्ध इंग्रज न्यायाधीशानें पुढें असे उद्गार काढले कीं भोजनप्रसंगीं टेबलाच्या कोठल्याहि बाजूला ते बसलेले असोत, तीच टेबलाची (म्ह. पंक्तीची) मुख्य बाजू व्हावयाची! त्यांच्या अंगीं नम्रता नव्हती, सौम्यपणाहि नव्हता. आपल्याहून भिन्न मताच्या लोकांना गांधीजी सामोपचारानें वागवीत तसें वडिलांनीं कधीं केलें नाहीं. जाणूनबुजून ते चढेलवृत्तीनें वागत, त्यामुळें त्यांच्याविषयीं आत्यंतिक निष्ठा अथवा आत्यंतिक वैरभाव निर्माण होत असे. त्यांच्या बाबतींत तटस्थवृत्ति स्वीकारणें शक्यच नव्हतें. त्यांच्यावर एक लोभ तरी करावा अथवा त्यांच्याशीं वैर तरी साधावें! रुंद कपाळ, घट्ट मिटलेले ओंठ आणि करारीपणाची निदर्शक अशी हनुवटी यांनीं युक्त असा त्यांचा चेहरा इटलींतील वस्तुसंग्रहालयांत ठेवलेल्या रोमन सम्राटांच्या चेहऱ्याप्रमाणें दिसत असे. त्यांचा फोटो पाहिल्यावर इटलींतील आमच्या कित्येक मित्रांनीं या रूपसाम्याचा निर्देशहि केला. विशेषेंकरून वृद्धापकाळीं चकचकीत पांढऱ्या शुभ्र केसांचा थर सर्व डोक्यावर पसरल्यावर—माझ्याप्रमाणें त्यांना टक्कल पडलें नव्हतें—त्यांच्या ठिकाणीं जी एक भव्यता व आचारगौरव दृग्गोचर होई, तो हल्लींच्या जगांत दुर्मीळ होत चालला आहे. कदाचित् माझ्या मनांत त्यांच्याविषयीं पक्षपात असेल, पण दुबळेपणानें व क्षुद्रतेनें बुजबुजलेल्या या जगांत त्यांची धीरोदात्त मूर्ति डोळ्यांना न दिसल्यामुळें मला चुकल्याचुकल्यासारखें होतें, त्याला मी काय करूं? तसा आचारगौरव व तशी धीरवृत्ति दृष्टीस पडेल का म्हणून मी चोहींकडे पहात असतों; पण व्यर्थ!

स्वराज्यपक्षाशीं झगडे चालू असतां १९२४ सालीं गांधीजींना मीं वडिलांचें एक छायाचित्र दाखवलें. त्या चित्राच्या वेळीं वडिलांनीं मिशा काढलेल्या होत्या. पण गांधीजींनीं त्यांना पाहिलें होतें तें रुबाबदार मिशांसह. छायाचित्र पाहतांच त्यांना फार आश्चर्य वाटलें व त्या चित्राकडे ते किती तरी वेळ पहात राहिले! मिशा नाहींशा झाल्यामुळें तोंडाचा व हनुवटीचा कणखरपणा स्पष्ट दिसून येत होता. थोड्या

रुक्षतेनें हंसून गांधीजी म्हणाले, " कसल्या प्रतिस्पर्ध्यांशीं दोन हात करावयाचे आहेत, तें मला आतां उमगलें ! " डोळ्यांमुळें व हंसतमुख चेहऱ्यामुळें त्यांची उग्र मुद्रा जराशी सौम्य भासत असली, तरी केव्हां केव्हां त्यांच्या डोळ्यांत दाहक तेज दिसून येई.

मासा पाण्यांत वावरतो तितक्या सहजतेनें वडील असेंब्लींत वागत असत. त्यांच्या कायदेशीर व रादनशीर बुद्धीला कायदेमंडळाची हवा मानवे. सत्याग्रह व त्यांतून उद्भवणाऱ्या प्रश्नांतील मखल्या त्यांना संपूर्णपणें कळत नसत, पण कायदेमडळांतील डाव-प्रतिडाव त्यांना चांगले अवगत होते. आपल्या पक्षांत ते कडक शिस्त राखीत व इतर पक्षांचें व व्यक्तींचें मन वळवून ते प्रसंगीं साहाय्यहि मिळवीत असत. पण लवकरच खुद्द पक्षांतील लोकांनींच भानगडी उपस्थित केल्या. प्रारंभीं प्रारंभीं स्वराज्यपक्षाला नाफेरवाल्यांशीं झगडावें लागत होतें, तेव्हां कित्येक अनिष्ट माणसें पक्षाची शक्ति वाढावी म्हणून काँग्रेसमध्यें सामील करून घेण्यांत आलीं! पुढें निवडणुकी आल्या, त्यांच्यासाठीं पैशाची गरज होती. ते श्रीमंतांकडूनच येणार. त्यांना राजी राखण्यासाठीं कांहीं धनिकांना स्वराज्यपक्षातर्फे निवडणुकीस उभें रहाण्याची विनंति करण्यांत आली. सर स्टॅफर्ड क्रिप्सनें एका अमेरिकन समाज-वाद्याचें वाक्य उद्धृत केलें आहे, तो म्हणतो: " राजकारण ही एक नाजुक कला आहे. त्यांत गरिबांकडून मतें व श्रीमंतांकडून पैसे मिळवावे लागतात व त्यासाठीं दोघांनाहि अशीं आश्वासनें द्यावीं लागतात, कीं आम्ही तुमचें दोघांचेहि परस्परांपासून रक्षण करूं!"

या लोकांमुळें प्रथमपासूनच पक्ष कमजोर बनला. कायदेमंडळांत दररोज दुसऱ्या नेमस्त गटांशीं मिळतें घेणें आवश्यक होऊन बसलें. कितीहि कडवी वृत्ति व तत्त्वनिष्ठा असली, तरी ती अशा परिस्थितींत फार कळ शाबुत राहणें शक्य नाहीं. हळू हळू पक्षाच्या कडवेपणांत व शिस्तींत घळ पडून संधिसाधू आणि कमजोर लोक शेफारूं लागले. उच्चाधिकार वगैरेंची लालूच नजरेस पडल्यावर पक्षांतल्या लेच्या-पेच्या सभासदांचीं मनें गडबडूं लागलीं. वडिलांना बगलेंत मारण्याचीच खोटी होती. त्यांच्या अंगचें कर्तृत्व, त्यांची मुत्सद्देगिरी आणि गोड युक्तिवाद यांची स्तुति होऊं लागली. बाजारपेठेंतल्या व युद्धक्षेत्रावरील धुळीनें भरलेल्या वातावरणाहून सर्वस्वीं निराळें असें सुखमय व अभिलषणीय असें वातावरण त्यांच्या भोवतीं तयार करण्यांत आलें.

स्वराज्यपक्षाचा पीळ ढिला पडत चालला, माळेंतला एक एक मणी ओघळून जाऊं लागला. " सडका अवयव कापून काढण्याची " भाषा माझे वडील गर्जून व कडाडून बोलले. पण सडका अवयव आपण होऊनच गळून पडण्याच्या तयारींत असल्यावर या भाषेची भीति वाटणार कोणाला ? कांहीं स्वराज्यपक्षीय मंत्री झाले, कांहींजण प्रांतिक सरकारच्या कार्यकारी-मंडळांत गेले, कांहींजणांनीं एक सवता सुभा थाटून ते स्वतःला प्रतिसहकारवादी म्हणवून घेऊं लागले. सर्वस्वीं भिन्न

परिस्थितींत लोकमान्य टिळकांनीं हा शब्दप्रयोग उपयोगांत आणला होता. त्याचा नवा अर्थ संधि आली कीं नोकरी पत्करा व त्यांतच समाधान माना, असा करण्यांत आला! या फाटाफुटीनंतरहि स्वराज्यपक्ष चालू राहिला; पण झालेल्या प्रकारामुळें दासबाबूंना व वडिलांना थोडासा विषाद वाटला. कायदेमंडळांतील निष्फळ कार्याचाहि त्यांना कंटाळा आला होता. त्यांतच वाढत्या हिंदु-मुसलमानांच्या तेढीची भर पडली. उत्तर हिंदुस्थानांत ही तेढ वाढत होती व कोठें कोठें दंगेहि होऊं लागले होते.

१९२१ सालीं आमच्याबरोबर जे कॉंग्रेसवाले तुरुंगांत होते, त्यांच्यापैकीं आतां कोणी दिवाणपदावर, तर कोणी दुसऱ्या एकाद्या उच्च पदावर आरूढ झाले होते! १९२१ सालीं ज्या सरकारनें आम्हांला बेकायदा ठरविलें व तुरुंगांत कोंडलें, त्यांत पूर्वी कॉंग्रेसवाले असलेल्या कांहीं प्रागतिक बंधूंचा समावेश झालेला असल्यामुळें मनाला समाधान वाटत असे. यापुढें तर काय विचारूंच नका! निदान कांहीं प्रांतांत तरी आमचेच सहकारी आम्हांला बेकायदा ठरवून तुरुंग दाखवणार होते. मग अधिकच समाधान कां होणार नाहीं? प्रागतिकांपेक्षां हे नवे दिवाण व कार्यकारी-मंडळाचे सभासद या कामीं किती तरी कर्तबगार ठरले असते! आमच्यांतल्या भेदाच्या जागा त्यांना पूर्ण माहीत होत्या. त्यांचा उपयोग कसा करून घ्यावा, आमच्या पद्धती कोणत्या, ह्यांचेहि त्यांना ज्ञान होतें. जनसमुदाय व जनसमुदायाच्या भावना यांचा त्यांना परिचय झालेला होता. बाजू बदलण्यापूर्वी नाझी लोकांप्रमाणें क्रान्तिकारक चळवळी तोलण्याचा त्यांनीं प्रयत्न करून पाहिलेला असल्यामुळें त्या ज्ञानाच्या जोरावर अननुभवी प्रागतिक दिवाणांहून अधिक यशस्वी रीतीनें आपल्या जुन्या कॉंग्रेस सहकाऱ्यांना झोडपून काढणें त्यांना शक्य झालें असतें!

१९२४ च्या डिसेंबरांत बेळगांव येथें जें कॉंग्रेस-अधिवेशन भरलें, त्याचे गांधीजी अध्यक्ष होते. गेलीं कित्येक वर्षे कॉंग्रेसचे महाध्यक्ष बनून राहिलेल्या गांधीजींना कांग्रेसचे अध्यक्ष करणें म्हणजे थोडा विडंबनाचाच प्रकार होता! त्यांचें अध्यक्षीय भाषण मला आवडलें नाहीं. मला तें मुळींच स्फूर्तिदायक वाटलें नाहीं. गांधीजींनीं सांगितल्यावरून नव्या वर्षासाठीं ऑ. इं. कॉ. कमिटीच्या चिटणीसाच्या जागीं माझी निवड झाली. मी म्हणजे कॉंग्रेसचा मिराशी चिटणीस बनत चाललों होतों! माझ्या इच्छेची कोणी पर्वाच करीत नसे!

माझ्या वडिलांना १९२५ च्या उन्हाळ्यांत बरें वाटेनासें झालें व त्यांच्या दम्याच्या विकारानेंहि त्याच वेळीं उचल खाल्ली. हिमालयांत डल्हौसी येथें ते सहकुटुंब गेले होते. थोड्याच काळानें मीहि त्यांना जाऊन मिळालों. डलहौसी ते छंबापर्यंत आम्हीं एक लहानशी सफर केली. छंबा येथें आम्ही पोहोंचलों तेव्हां जून महिना चालू होता. डोंगरमाळांतील वाट चालल्यामुळें आम्ही थकून गेलों

होतों. इतक्यांत एक तार येऊन थडकली व चित्तरंजन दास इहलोक सोडून गेल्याची बातमी आम्हांला मिळाली! दुःखानें चूर होऊन वडील किती वेळ तरी अगदीं स्तब्ध बसून राहिले होते. तो आघात त्यांच्या मर्मीं बसला. त्यांना इतकें दुःख झालेलें मीं क्वचित् पाहिलें असेन. सर्व मित्रांहून जिवाभावाचा झालेला मित्र एकाएकीं परलोकीं चालता झाला व सर्व जबाबदारी त्यांच्या एकट्याच्या शिरावर येऊन पडली. जबाबदारी गेले कांहीं दिवस वाढतच चालली होती आणि दासबाबू व वडील दोघेहि जबाबदारीच्या ओझ्यामुळें व पक्षांतील लोकांच्या कमकुवतपणामुळें रंजीस आले होते. फरिद-पूर परिषदेंत केलेल्या शेवटच्या भाषणांत दासबाबूंच्या मनांतील विषण्णतेची छाया स्पष्ट दिसून येते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही छंबाहून निघालों, व डोंगर ओलांडून डलहौसी येथें पोहोंचलों. तेथून मोटरीनें लांब अंतरावरचें स्टेशन, तेथून अलाहाबाद व नंतर कलकत्ता!

## १९

# जातिनिष्ठेचें थैमान !

नाभा-तुरुंगांतून परत आल्यानंतरचा माझा आजार म्हणजे एक नवीनच अनुभव होता. आजारानें पछाडलें अथवा अशक्तता वाटूं लागली म्हणून अंथरुणावर पडून राहण्याचा मला अभ्यास नव्हता. माझ्या निकोप प्रकृतीचा मला जरासा अभिमान वाटे आणि आपल्याकडे प्रकृतीच्या बाबतींत फाजिल चोजले करण्याचा जो प्रघात आहे, तो मला बिलकूल पसंत नसे. तरुण वय व दणकट प्रकृति यांच्या साहाय्यानें मी आजारांतून सहीसलामत पार पडलों; पण संकटाचा काळ उलटून गेल्यावर अशक्तपणामुळें किती तरी दिवस माझें अंथरुण सुटलें नाहीं. प्रकृति मुंगीच्या पावलानें सुधारत होती. या काळांत भोंवतालच्या जगापासून व दैनंदिन कामापासून आपण अलग झाल्याची अननुभूत भावना मनांत उद्‌भवली. सर्व वस्तुजाताकडे दूर उभा राहून मी जणुं कांहीं पाहत होतों! झाडांच्या खिचाटांतून मी बाहेर पडलों असून सर्व अरण्य माझ्या डोळयांना आतां एकसमयावच्छेदेंकरून दिसत आहे असें वाटलें. माझें मन निवळत होतें, व पूर्वीपेक्षां अधिक शांत होत चाललें होतें. भयंकर दुखण्यांतून बाहेर पडल्यावर पुष्कळ जणांना असा अनुभव येत असेल. पण मला तो आध्यात्मिक अनुभवाप्रमाणें वाटला. मीं आध्यात्मिक हा शब्द धर्मातील संकुचित अर्थानें वापरलेला नाहीं. ह्या अनुभवाचा माझ्या मनावर अतिशय परिणाम झाला. राजकारणाच्या भावनाविवश वातावरणावर आपण स्थिर झालों असून ज्या ध्येयामुळें व प्रेरणांमुळें मी कार्यास उद्युक्त झालों, त्यांचें अधिक स्पष्ट दर्शन घडत आहे असें वाटलें. याबरोबरच आणखी कांहीं नवेच प्रश्न उत्पन्न झाले, त्यांचें समाधान मला करतां येणें शक्य नव्हतें. तथापि जीवन व राजकारण यांजकडे पाहण्याच्या धार्मिक दृष्टिकोणापासून माझी फारकत होऊं लागली. ह्या अनुभवाविषयीं अधिक लिहितां येणार नाहीं. ती अशी एक संवेदना होती, कीं तिला शब्दस्वरूप देणें अवघड आहे. त्या प्रसंगाला अकरा वर्षें होऊन गेलीं व त्याचें फक्त अंधुक स्मरण शिल्लक राहिलेलें आहे; परंतु माझ्यावर व माझ्या विचारसरणीवर त्या अनुभवाचा चिरपरिणाम घडला व पुढील दोन-तीन वर्षें माझें काम त्या प्रसंगीं उपजलेल्या अनासक्त वृत्तीनें चाललें होतें, एवढेंच मात्र मला पक्के स्मरतें.

कदाचित् फैलावत जाणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण घालणें आटोक्याबाहेरचें काम असल्यामुळें व त्यांत मी कोठेंच बसत नसल्यामुळें ही अनासक्ति आली असावी.

राजकीय घडामोडींविषयीं मीं उल्लेख केलाच आहे. हिंदु-मुसलमानांतील संबंध ( विशेषत: उत्तर हिंदुस्थानांत ) बिघडूं लागले होते. ही बाब फार महत्त्वाची होती. मोठमोठ्या शहरांतून दंगे घडून आले व क्रौर्य आणि पाशवी वृत्ति यांचा कळस झाला ! संतापाच्या व अविश्वासाच्या वातावरणांतून भांडणाचे असे नवीन मुद्दे उपस्थित झाले, कीं जे पूर्वी कोणाच्या ऐकिवांतहि आले नसतील ! पूर्वी बकरीदच्या दिवशीं गोवधाच्या प्रश्नावरून अनेकदां तंटे उपस्थित होत. हिंदु-मुसलमानांचे मोहरम व रामलीलेसारखे सण एकाच वेळीं आले, म्हणजेहि ठिणग्या उडत असत. इतिहास-कालीन एका दुःखद प्रसंगाचें मोहरम हें स्मारक होतें. उलट, रामलीला म्हणजे सत्यानें असत्यावर मिळविलेल्या विजयाची निदर्शक असल्यामुळें तो आनंदाचा व विजयाचा सण मानण्यांत येत असे. साहजिकच दोन्ही उत्सवांत वितुष्ट उत्पन्न होई. पण सुदैवानें असा प्रसंग तीस वर्षांच्या काळांत एकदांच येत असे.

आतां तंट्याचें एक नवीनच मूळ उपस्थित झालें. तें मात्र कायम स्वरूपाचें होतें. तें म्हणजे मशिदीपुढील वाद्यवादन. प्रार्थनेंत व्यत्यय आणणारें वादन अगर दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा ध्वनि मुसलमानांना खपेनासा झाला. प्रत्येक शहरांत अनेक मशिदी असतात व दिवसांतून पांच वेळां प्रार्थना चालते. लग्नाच्या, प्रेतयात्रेच्या व इतर मिरवणुकींची व निरनिराळ्या तऱ्हेच्या ध्वनींची शहरांतून मुळींच वाण नसल्यामुळें तंट्याचें कारण नेहमींच हजर असणार. विशेषतः संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं मशिदीवरून जाणाऱ्या मिरवणुकीबद्दल मुसलमान आक्षेप घेत असत; संध्या-काळची वेळ अशी आहे कीं हिंदु-देवालयांतून त्याच वेळीं आरती चालू असते व देवळांतील घंटा व नगारे यांचा ध्वनि दुमदुमत असतो. आरती–नमाज तंट्यांना त्या काळांत ऊत आला.

एकमेकांच्या सलोख्यानें व विचारविनिमयानें जे प्रश्न मिटावयाचे, त्यांना उग्र स्वरूप प्राप्त व्हावें व त्यापासून दंगे उत्पन्न व्हावेत ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे. तथापि धार्मिक भावना ही चीजच अशी आहे, कीं तिच्यावर तर्काची व विचारांचा मात्रा चालत नाहीं आणि एका गटाविरुद्ध दुसऱ्या गटाला चिथवावयाला तयार असा सत्ताधाऱ्यांचा पक्ष विद्यमान असला, कीं आग लावण्याचें काम फार सोपें होतें !

उत्तर हिंदुस्थानांतल्या शहरांतून झालेल्या ह्या दंग्यांना वाजवीपेक्षां फाजिल महत्त्व देण्यांत येण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक शहरांतील व सर्व खेड्यांतील जीवन शांततेनें चाललेलें होतें हें आपण विसरतां कामा नये. त्यांच्यावर या प्रसंगा-मुळें कांहीं परिणाम झाला नाहीं. कोठें किरकोळ जातीय भांडणें झालीं कीं त्यांना सुद्धां वृत्तपत्रांतून ठळक जागा देण्यांत येई. ही गोष्ट खरीच कीं शहरांतील जनतेंत जातीय कडवेपणा व वितुष्ट यांची बऱ्याच प्रमाणांत वाढ झाली होती. जातीय पुढाऱ्यांनीं या धुमसणाऱ्या आगींत तेल ओतलें व त्यामुळें राजकारणांतील जातीय

मागण्या अधिकाधिक कडक होऊं लागल्या. हे जातीय तंटे सुरू झाल्याबरोबर मुसलमानांतील राजकीय प्रतिगामी पुढारी-जे असहकारितेच्या काळांत मागें दडून राहिले होते, ते-पुन्हां प्रामुख्यानें चमकूं लागले. त्या बाबतींत ब्रिटिश सरकारकडूनहि त्यांना मदत झाली. जातीय मागण्यांचा विस्तार रोजच्या रोज अधिक फैलावत जाऊन त्यामुळें हिंदी स्वातंत्र्याच्या व राष्ट्रीय एकीच्या मुळावरच घाव घातला गेला! हिंदूंच्या वतीनें पुढें आलेले जातीय पुढारी सुद्धां राजकीय दृष्ट्या प्रतिगामी बुद्धीचेच होते व हिंदूंच्या हितरक्षणाच्या नांवाखालीं त्यांनीं सरकारलाच मदत केली. आपले मुद्दे यशस्वी व्हावेत म्हणून आपल्या पद्धतीनुरूप त्यांनीं खूप खटपट करून पाहिली; तथापि त्यांना यश आलें नाहीं; कारण यश येणें शक्यच नव्हतें. परंतु देशांतील जातिनिष्ठा तीव्रतर करण्याच्या बाबतींत मात्र त्यांना यश मिळालें.

कॉंग्रेस या वेळीं पेंचांत सांपडली होती. राष्ट्रीय भावनेचा आविष्कार तिच्यामार्फत होत असला व त्या भावनेचे ध्वनी कॉंग्रेसमध्यें उमटत असले तरी जातिनिष्ठ भावनांचा परिणाम तिच्यावर झाल्यावांचून राहिला नाहीं. राष्ट्रीयत्वाच्या बुरख्याआड कित्येक कॉंग्रेसवाल्यांची जातिनिष्ठा दडून राहिली होती. परंतु कॉंग्रेसमधील पुढारी मात्र राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला बळकट धरून राहिले, व सर्वसाधारण रीतीनें कोणत्याहि जातिनिष्ठ पक्षाचा कैवार त्यांनीं घेतला नाहीं. साहजिकच दोन्ही टोकांना उभ्या राहिलेल्या जहाल जातिनिष्ठांकडून कॉंग्रेसचा निषेध होऊं लागला.

फार वर्षांपूर्वी म्हणजे असहकारितेच्या चळवळीच्या अगदीं प्रारंभींच जातीय प्रश्न निकालांत काढण्याची आपली कल्पना गांधीजींनीं पुढें मांडली होती. बहुसंख्य जातीनें सौजन्य व औदार्य दाखवलें तरच हा प्रश्न सुटेल, असें त्यांचें मत होतें व म्हणून मुसलमान मागतील तें देण्याची तयारी त्यांनीं दर्शवली होती. त्यांच्याशीं सौदा ठरवावयाचा नसून त्यांना आपलेंसें करून घ्यावयाचें होतें. दूरदृष्टि राखून व योग्य काय व अयोग्य काय याचें बरोबर आकलन करून त्यांनीं प्रश्नाच्या गाभ्यालाच हात घातला होता. त्यांनीं मांडलेली कल्पना विचारांत घेण्यासारखी होती. पण प्रत्येक वस्तूची बाजारी किंमत तोंडपाठ असली, तरी तिच्या खऱ्या मूल्याचा मुळींच पत्ता नाहीं असे कांहींजण होतेच ना! त्यांनीं बाजारपेठेंतलीच पद्धति अंगीकारली. वस्तु विकत घेतांना द्यावी लागणारी किंमत पाहून त्यांच्या पोटांत भीतीचा गोळा उठला. परंतु ती किंमत मोजल्यावर जी वस्तु त्यांच्या पदरांत पडणार होती, तिचें खरें मोल किती त्याची त्यांना यत्किंचितहि पारख झालेली नव्हती.

इतरांवर टीका करणें व दोषारोप करणें सोपें आहे व आपल्या योजना अयशस्वी झाल्या तर त्याची जबाबदारी दुसऱ्यांच्या माथीं मारण्याचा मोहहि अनावर होत असतो. आम्ही सरकाराला व जातिनिष्ठांना दोष देतों, ते आम्हांला दोषी समजतात! सरकारनें व सरकारच्या साथीदारांनीं आमच्या मार्गांत जाणून बुजून

सदासर्वदा कांटे पसरले हें निःसंशय. पूर्वी व आतांहि आमच्यामध्यें भेद निर्माण करण्याचें धोरण त्यांनीं अमलांत आणलेलें आहे हेंहि खरेंच. फोडा व झोडा ही साम्राज्याची सनातन नीति आहे व ती ज्या मानानें यशस्वी ठरेल त्या मानानें जेते हे जितापेक्षां अधिक वरचढ ठरत असतात. आपण ह्याबद्दल कुरकूर करतां कामा नये. निदान त्यांच्या ह्या नीतीकडे पाहून आपणांला नवल तरी वाटूं नये; पण तिच्याकडे दुर्लक्ष करून तिच्या विरुद्ध योजावयाच्या उपायांची तयारी न करतां स्वस्थ बसणें म्हणजे आपल्याच विचारसरणींत दोष राहूं देण्याप्रमाणें आहे.

यावर कोणता उपाय करावा? गुजरींतल्या घासाघिशीच्या पद्धतींनीं हा प्रश्न सुटणार नाहीं हें निश्चित. कारण आपण कितीहि मोठा आंकडा बोललों, तरी त्याहून मोठा आंकडा बोलणारा व तें वचन पुरें पाडणारा तिसरा पक्ष तेथें नेहमींच हजर असणार. दोघांना सामान्य असा राष्ट्रीय व सामाजिक दृष्टिकोण नसेल, तर सामान्य शत्रूविरुद्ध एकजुटीनें लढाई होणें शक्य नाहीं. आपण आहे या राजकीय व आर्थिक परिभाषेच्या साहाय्यानें विचार करीत राहिलों, थोडी येथें थोडी तेथें अशी डागडुजी अथवा सुधारणा करण्याची दृष्टि ठेवली आणि प्रस्तुतच्या शासनयंत्राचें केवळ ' हिंदीकरण ' करण्याचा आपला विचार असला, तर एकजुटीनें काम करण्यास आवश्यक असा उत्साह प्राप्त होणार नाहीं. कारण त्यामुळें लुटींत आपला वांटा किती, ह्या प्रश्नालाच ध्येयाचें स्वरूप प्राप्त होतें आणि अधिकारारूढ असा जो तिसरा पक्ष त्याचा सदासर्वदा वरचष्मा राहून तो आपल्या आवडत्या बाळांवर देणग्यांची खैरात करीत सुटतो. अगदीं निराळ्या अशा राजकीय व मुख्यत्वेंकरून भिन्न अशा सामाजिक रचनेचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवलें, तरच एकजुटीच्या कार्याचा पाया मजबूत रीतीनें बांधतां येईल. स्वातंत्र्याच्या मागणीच्या बुडाशीं जी कल्पना होती, ती हीच कीं ब्रिटिश शासनयंत्राची एक हिंदी नक्कल ( पडद्यामागें ब्रिटिशांची सत्ता खडी उभी ठेवून ) तयार करण्यासाठीं आम्ही झगडत नसून सर्वस्वीं भिन्न असें एक शासनयंत्र अस्तित्वांत आणण्याकरितां आम्ही झगडत आहोंत, ह्याची कल्पना जनतेला यावी. राजकीय स्वातंत्र्य या शब्दांत फक्त राजकीय स्वतंत्रतेचाच अंतर्भाव होत होता, त्यांत सामाजिक अदलाबदल अथवा जनतेचें आर्थिक स्वातंत्र्य ह्या कल्पना समाविष्ट झाल्या नव्हत्या, हें खरें; तथापि लंडन शहराशीं आम्हांला ज्या ज्या आर्थिक शृंखलांनीं जखडून टाकण्यांत आलें आहे, त्या तोडणें अशी कल्पना राजकीय स्वातंत्र्यांत तेव्हांहि गृहीत धरलेली होती; व हा बेत सिद्धीस गेल्यावर समाजरचना बदलणें फार सोपें झालें असतें. त्या वेळीं माझे विचार ह्या प्रकारचे होते. राजकीय स्वातंत्र्य निर्भेळ स्वरूपांत आम्हांला मिळवतां येईल ही गोष्ट मला आतां शक्य वाटत नाहीं. तें हस्तगत होईल तेव्हां पुष्कळसें सामाजिक स्वातंत्र्यहि आम्हांला प्राप्त झालेलें असेल.

परंतु त्या काळच्या पुढाऱ्यांची विचारसरणी तत्कालीन राजकीय व सामाजिक

घटनेच्या पोलादी चौकटींनीं मर्यादित झालेली होती. जातीय अथवा राजकीय कोणत्याहि प्रश्नांचा विचार करतांना ह्या विचारसरणीची पक्कड त्यांच्या मनांवर कायम राही व त्यामुळें ज्या ब्रिटिश सरकारच्या हातीं तत्कालीन घटकांचें नियंत्रण करण्याची शक्ति होती, त्यानें पसरलेल्या जाळ्यांत ते नेमके फसत असत! त्याला त्यांचा निरुपाय होता! कारण प्रत्यक्ष प्रतिकाराचे प्रयोग त्यांनीं केलेले असले, तरीहि त्यांचा दृष्टिकोण क्रांतिवादी न होतां सुधारणावादीच राहिला. कोणत्याहि सुधारणावादी मार्गानें हिंदुस्थानांतले राजकीय अथवा आर्थिक अथवा जातीय प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवण्याचा काळ संपून गेलेला होता. क्रान्तिवादी विचारसरणी व योजना आणि क्रान्तिवादी मार्गपद्धति हीच त्या परिस्थितींत आवश्यक होती; परंतु त्या मार्गावर जनतेला नेईल असा एकहि पुढारी तेव्हां उपलब्ध झाला नाहीं.

आमच्या चळवळीचें ध्येय स्पष्ट नसल्याकारणानें जातीय भावनेच्या वाढीला मदत झाली यांत संदेह नाहीं. दैनंदिन हालअपेष्टा व स्वातंत्र्याचें युद्ध यांच्यांत कोणताहि संबंध जनतेला दिसेना. सहज प्रवृत्तीमुळें कांहीं प्रसंगीं ती निकारानें लढली. पण सहजप्रवृत्ति हें असें शस्त्र आहे कीं तें बोथट करणें अगर निराळ्याच कामीं त्याचा उपयोग करून घेणें ही गोष्ट सहजसाध्य असते. आणि धर्माच्या नांवावर जातिनिष्ठांनीं तिचा उपयोग करून घेतलाहि. तथापि जनतेचें अथवा कनिष्ठ मध्यमवर्गाचें हित ज्या कार्यक्रमांत कोणत्याहि प्रकारें निगडित झालेलें नव्हतें, त्या जातिनिष्ठ कार्यक्रमासाठीं हिंदु-मुसलमानांतील वरिष्ठ वर्गांनीं जनतेचा इतका तरी पाठिंबा मिळवला ही गोष्ट जराशी विलक्षण आहे यांत शंका नाहीं. जातीय मागण्यांचें पृथक्करण केलें, तर शेवटीं नोकऱ्या मिळाव्यात म्हणून ही सारी खटपट आहे असें आढळून येईल. आणि ह्या नोकऱ्या मिळावयाच्या त्या फक्त मूठभर वरिष्ठ मध्यम वर्गाच्याच लोकांना. अर्थात् कयदेमंडळांतील जागांची मागणी म्हणजे राजकीय सत्तेची मागणी असें मानण्याची चाल आहे; पण ह्या सत्तेचा उपयोग आपल्या लोकांची भरती करण्यासाठीं होत असतो, म्हणून त्या मागणीला महत्त्व. थोड्याशा वरिष्ठ मध्यमवर्गीयांची पोळी ज्यांच्या योगानें पिकणार, ज्यांच्यामुळें ऐक्याच्या व राष्ट्रप्रगतीच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न होणार, त्या मागण्या खऱ्याखुऱ्या जनतेच्या मागण्या आहेत असा आभास निर्माण करण्यांत आला व त्यांच्यांतील निष्फळपणा लक्षांत येऊं नये म्हणून धार्मिक भावनांचें इंधन घालून सगळीकडे धूरच धूर करण्यांत आला!

येणेंप्रमाणें जातीय पुढाऱ्यांचे मुखवटे घालून राजकीय दृष्ट्या प्रतिगामी स्वरूपाचे लोक राजकीय क्षेत्रांत मिरवूं लागले. त्यांनीं जे निरनिराळे उद्योग केले ते त्यांच्या अंगीं जात्यभिमान होता म्हणून नव्हे, तर राजकीय प्रगतीला मोडता घालण्याची त्यांची इच्छा होती म्हणून! मुसलमानांचे जातीय पुढारी जी भाषा बोलत, ती विलक्षणच! राष्ट्राभिमान अथवा हिंदी स्वातंत्र्य यांची त्यांना मुळींसुद्धां दरकार नसावी असें वाटे. हिंदू पुढारी वरकरणी राष्ट्राभिमानाच्या बाजूचें बोलत

असले, तरी प्रत्यक्ष राष्ट्रीय कार्यांत ते सहकार्य करीत नसत व स्वतःस प्रत्यक्ष कार्य कांहींच करतां न आल्यामुळें सरकारपुढें अवनम्र होत. पण कमरेंत लवूनहि कांहीं उपयोग होत नसे. समाजवाद वगैरेसारख्या क्रांतिकारक चळवळींचा निषेध करण्यांत मात्र दोन्ही पक्षांचें एकमत होई ! ज्यामुळें भांडवलाला धक्का पोहोंचेल अशी सूचना कोणी केली कीं दोन्ही हाडवैरी पक्षांत जी एकी होई, ती खरोखर हृदयस्पर्शी होती ! राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याला विघातक अशा अनेक गोष्टी मुसलमान जातीय पुढाऱ्यांनीं केल्या, पण गट म्हणून अथवा व्यक्ति म्हणून सरकारशीं वागण्याचा प्रसंग आला तेव्हां ते आपला आब राखून तरी वागले; हिंदूंच्या पुढाऱ्यांनीं तितका देखील पीळ दाखविला नाहीं.

कॉंग्रेसमध्यें पुष्कळ मुसलमान होते, व त्यांच्यांत हिंदुस्थानांतील अतिशय लोकप्रिय व प्रख्यात पुढाऱ्यांचा समावेश होत असे. कॉंग्रेसमधील बऱ्याच मुसलमानांनीं आपला एक गट बनवला व "राष्ट्रीय मुसलमान पक्ष" असें त्याचें नांव ठेवून जातीय मुसलमान पुढाऱ्यांशीं त्यांनीं दोन हात केले. प्रथम त्यांना थोडेसें यश आलें व बुद्धिमान् मुसलमानांपैकीं बऱ्याच जणांचा त्यांना पाठिंबा असावा असेंहि वाटलें. पण हे सर्व लोक वरिष्ठ मध्यमवर्गापैकीं होते; त्यांच्यांत धडाडीच्या कर्तबगार माणसांची वाण पडली. जो तो आपापल्या धंद्यांत गर्क असे. त्यामुळें जनतेशीं त्यांचा संबंध उरला नाहीं. खरें बोलावयाचें, तर ते जनतेच्या बाजूला कधीं फिरकलेच नाहींत ! दिवाणखान्यांत सभा भरवाव्यात, कांहीं तडजोडीचीं भाषाबोलणीं करावींत अशी त्यांची पद्धति होती. त्यांचे जातिनिष्ठ प्रतिस्पर्धी त्यांच्यापेक्षां सरस होते. त्यांनीं राष्ट्रीय मुसलमानांची आस्ते आस्ते पीछेहाट केली, व ज्या तत्त्वांना ते चिकटून राहिले होते, तीं त्यांना सोडावयास लावलीं ! होतां होतां अशी वेळ येऊन ठेपली कीं संयुक्त मतदारसंघाखेरीज दुसरें कोणतेंहि तत्त्व राष्ट्रीय गटापाशीं शिल्लक उरलें नाहीं. त्या तत्त्वरूपी आधारस्तंभावरच या गटाचें सारें अस्तित्व अवलंबून होतें. पण नेहमींप्रमाणें दगडाहून वीट मऊ म्हणून तडजोड करण्यासाठीं ते गेले व तडजोडीच्या दिव्यांतून कसेबसे बाहेर पडतात तों असें दिसून आलें कीं त्यांचा तो तत्त्वरूपी आधारस्तंभमुद्धां कोसळून पडला होता ! एवंच, या घटकेला तत्त्वें वगैरे चट्सारीं नाहींशीं झालेलीं असून राष्ट्रीय गटाचें नांव तेवढें बाकी राहिलें आहे.

राष्ट्रीय मुसलमान गटाचा अधःपात व उच्छेद यांचा इतिहास मोठा करुणाजनक आहे. त्या गटांतल्या प्रमुख व्यक्ती कॉंग्रेसमध्यें अद्यापिहि उच्चस्थानीं विराजमान झालेल्या दिसतात. गट नामशेष होण्यास बराच कालावधि लागला. त्याच्या इतिहासांतलें शेवटचें प्रकरण या सालींच ( १९३४ ) लिहिलें गेलें. १९२३ मध्यें व नंतर त्यांच्या गटाचें बळ चांगल्यापैकीं होतें, व जातीय गटाविरुद्ध त्यांनीं धडाडीनें काम चालवलें होतें. तें इतकें कीं जातीय पुढाऱ्यांच्या मागण्या स्वतःला अनिष्ट

वाटत असल्या, तरी आपली आवड-निवड बाजूला सारून गांधीजी जेव्हां जेव्हां त्या मान्य करण्यास तयार झाले, तेव्हां तेव्हां राष्ट्रीय मुसलमान गटांतल्या त्यांच्या सहकाऱ्यांनींच गांधीजींना मोडता घातला व त्यांना कसून विरोध केला.

तिसऱ्या दशकाच्या मध्याच्या सुमाराला जातीय प्रश्न सोडवण्याकरतां परस्परांत पुष्कळ बोलणें चालणें व चर्चा झाली, आणि ऐक्य-परिषदाहि भरल्या. त्यांत १९२४ मध्यें महंमद अल्लींनीं दिल्ली येथें भरविलेली परिषद् विशेष महत्त्वाची होती. गांधीजींनीं केलेल्या एकवीस दिवसांच्या उपवासाचें वातावरण अद्यापि कायम होतें. ह्या परिषदांतून पुष्कळ कळकळीचे व सद्‌बुद्धीचे लोक येत व एकी करण्याचा ते झटून प्रयत्नहि करीत. कांहीं सोज्ज्वळ ठरावहि पसार होत. पण मुख्य प्रश्नाचें घोंगडें भिजत पडलें होतें तें बाहेर निघेना. बहुमतानें प्रश्न सुटणार नसून त्यासाठीं एकवाक्यतेची जरुरी होती. पण आपल्याच म्हणण्याचा वेडा आग्रह धरणारे ज्वालामुखी दोन्ही पक्षांत असल्यावर ती साधावी कशी? खरें म्हणजे पुष्कळ वेळां प्रमुख प्रमुख जातीय पुढाऱ्यांना एकी हवी आहे कीं नको, याचीच शंका वाटे! जे राजकीय दृष्ट्या प्रतिगामी वृत्तीचे होते, त्यांच्यांत व संपूर्ण राजकीय बदल हवा असें म्हणणाऱ्यांत कोणतीच समान भूमिका सांपडण्यासारखी नव्हती.

तथापि वास्तविक अडचणींचीं मुळें फार खोलवर गेलेलीं होतीं. केवळ वैयक्तिक फितुरीमुळें त्या उत्पन्न झाल्या होत्या असें नाहीं. शिखांनींहि आपल्या जातिविशिष्ट मागण्या पुढें ढकलण्याला सुरुवात केली व पंजाबांत विलक्षण त्रांगडें उत्पन्न झालें. प्रत्येक गट दुसऱ्याविषयीं साशंक असल्यामुळें पंजाबांतलें वातावरण भावनाविष्ट व कलुषित होऊन गेलें होतें. बंगालमध्यें हिंदू जमीनदार व मुसलमान कुळें असा समाज असल्याकारणानें तेथें शेतकऱ्यांच्या चळवळी जातीय लढयाच्या स्वरूपांत पुढें आल्या. पंजाब व सिंधमध्यें श्रीमंत व सावकार लोकांत हिंदूंचाच मुख्यतः भरणा आहे, व ऋणको हे मुसलमान शेतकरी आहेत. तेथें कर्जाची पैन् पै वसूल करणाऱ्या सावकाराबद्दल शेतकऱ्यांच्या मनांत जो डूक होता त्याचाहि उपयोग जातीय तेढ वाढवण्याच्या कामीं झाला. सर्वसाधारणतः मुसलमान लोक त्यांतल्या त्यांत दरिद्री असल्यामुळें मुसलमानांच्या जातीय नेत्यांनीं निर्धनांत व धनिकांत जी विरोधवृत्ति असते तिचा उपयोग जातीय वैमनस्याचा विषवृक्ष जोपासण्याच्या कामीं करून घेतला. त्यांच्या उपद्व्यापापासून निर्धनांची स्थिति सुधारण्याचा सुतराम् संभव नव्हता. पण जातीचें नांव पुढें केल्यामुळें कांहीं प्रमाणांत जनता त्यांच्या पाठीशीं उभी राहिली व म्हणून ते बळास चढले ही गोष्ट खरी आहे. आर्थिक दृष्ट्या हिंदूंचे जातीय पुढारी हे शेठ-सावकारांचे व उद्योगधंदेवाल्यांचे प्रतिनिधी होते. त्यांना जनतेचें पाठबळ फार थोडें मिळालें; तिची फक्त सहानुभूति मात्र त्यांच्या बाजूस असे.

अशा प्रकारें ह्या प्रश्न समाजगटांच्या आर्थिक रचनेशीं थोडासा निगडित झालेला

आहे. पण ही वस्तुस्थिति सर्वांच्याच ध्यानांत येत नाहीं. भिन्न गटांच्या आर्थिक विरोधांचें स्वरूप झगड्यांच्या द्वारा अधिक उघड होत जाईलहि, पण तशी वेळ आली कीं वास्तविक गटागटांतल्या वरिष्ठ वर्गांचे प्रतिनिधी असणारे सध्यांचे चट् सारे जातीय पुढारी आपापसांतले मतभेद गुंडाळून आपल्या समान शत्रूंना ( कनिष्ठ-वर्गीयांना ) तोंड देण्यासाठीं एकजुटीनें उभे राहतील. सध्यांच्या परिस्थितींत देखील राजकीय दृष्ट्या जातीय प्रश्न सोडवतां येईल, पण—आणि हा पण बराच अवघड आहे—तिसरा पक्ष तेथें नसेल तर.

दिल्लीची ऐक्य-परिषद संपते न संपते तोंच अलाहाबादेस हिंदु-मुसलमानांचा एक दंगा आला. जाया व जखमी झालेल्यांची संख्या पाहतां तो दंगा फार मोठा होता असें म्हणतां येणार नाहीं. पण दग्याची लाट आमच्या दाराशीं येऊन भिडल्यामुळें मनाला वाईट वाटलें. इतरांबरोबर दिल्लीहून मी तडक अलाहाबादेस गेलों, तों दंगा शमला होता. पण वैमनस्य व कोर्टांतील खटले यांचें शेपूट मागें राहिलें तें बराच वेळ वळवळत होतें. दंगा कां उद्भवला तें मला स्मरत नाहीं. मशिदीपुढें वाद्य-वादनास बंदी केली होती, तिचा निषेध म्हणून रामलीला बंद ठेवण्यांत आली. ही त्याच वर्षीची अथवा दुसऱ्या वर्षींची गोष्ट असावी. आज आठ वर्षे झालीं, राम-लीलेचा उत्सव अलाहाबादेंत झालेला नाहीं, व ज्या उत्सवांत अलाहाबाद जिल्ह्यां-तले लाखों लोक आनंदानें भाग घेत असत, तो केवळ स्मृतिशेष होऊन बसला आहे ! लहानपणीं मी उत्सव बघावयाला जात असें त्याची मला चांगली आठवण आहे. कोण आमची धांदल ! केवढा जनसमुदाय तेथें लोटत असे ! सण हिंदूंचा, पण तो उघड्या मैदानावर साजरा होत असल्यामुळें मुसलमानांचीहि तेथें गर्दी होई, व सगळीकडे उल्हास भरून राही. व्यापारी उलाढाली होत. मोठा झाल्यावर पुष्कळ वर्षांनंतर, मीं पुन्हां उत्सवाला गेलों. त्या वेळीं मला फारशी मजा वाटली नाहीं, मिरवणुकीचाहि कंटाळा आला. पण जनतेला त्यापासून किती आनंद वाटत होता हें स्पष्टच दिसत होतें. तो म्हणजे त्यांचा नाचण्याबागडण्याचा दिवस. पण गेल्या आठ नऊ वर्षांत अलाहाबादेंतल्या मुलांच्या दृष्टीस कांहीं तो सण पडला नाहीं ! दररोजच्या कंटाळवाण्या वर्षाकाठीं जिण्यांत आनंदाचा एक दिवस येणार, तोहि नाहींसा झाला ! आणि याचें कारण काय ? तर क्षुल्लक भांडणें व मारामाऱ्या ! असले धर्म व असला धर्मवेडेपणा म्हणजे आनंदाच्या दुधांत पडलेले मिठाचे खडे !

## २०

# नगरपालिकेचें काम

अलाहाबाद नगरपालिकेचें काम मीं दोन वर्षेपर्यंत रेटलें खरें, पण पुढें पुढें मी मोठ्या नाखुषीनें तें करीत होतों. अध्यक्ष म्हणून माझी कारकीर्द तीन वर्षांची असावयाची. पण दुसरें वर्ष सुरू होतें न होतें तोंच त्या कामांतून मोकळें होण्याची मीं खटपट चालवली. मला तें काम आवडत असे व त्याप्रीत्यर्थ पुष्कळसा वेळहि मीं खर्च केला होता व डोकें शिणवलें होतें. मला थोडेंफार यश आलें व माझ्या सहकाऱ्यांकडून मीं 'भलें' म्हणवून घेतलें. माझ्याविषयीं प्रांतिक सरकारला वाटणारा राजकीय रागहि आतां मावळला होता; तो इतका, कीं नगरपालिकेंतील माझ्या कांहीं कामांबद्दल सरकारनें प्रशंसोद्गार काढले. पण कोणतेंहि तात्पर्याचें काम करावयास हात घालावा तों मार्गांत अडथळे आहेत, बंधारे आहेत, कुंपणें आहेत असें दिसून येई व माघार खावी लागे.

कोणी मुद्दाम अडथळे करीत होतें असें नव्हे. खरें बोलावयाचें तर आश्चर्य वाटण्याजोगें सहकार्य अनेकांनीं आपण होऊन केलें. पण एका बाजूला सरकारी यंत्र उभें होतें व दुसरीकडे नगरपित्यांची व नागरिकांचीहि बेपर्वाई होती. सरकारनें उभारलेली नगरपालिका-कारभाराची पोलादी चौकटच अशी होती, कीं मूलग्राही सुधारणांचें अगर घडामोडींचें मूळ जमिनीला टेकतच नसे. आर्थिक धोरणाची घडी अशी बसवण्यांत आली होती, कीं नगरपालिकेला मदतीसाठीं नेहमीं सरकारकडे पाहत बसावें लागे. करासंबंधीं अथवा सामाजिक सुधारणांविषयीं एकादी मूलगामी योजना आंखली, तर नगरपालिकेच्या कायद्यांत ती बसत नसे. कायद्याला मंजूर असलेल्या योजनांसाठीं देखील सरकारची मान्यता मिळवावी लागे. सरकारकडे परवानगी मागितल्यानंतर ती केव्हां मिळते त्याची वाट पाहत बसण्याचें अवसान फक्त चिवट आशावाद्यांवांचून कोणाच्याहि अंगीं असणें शक्य नाहीं. समाजसुधारणेसंबंधीं अथवा राष्ट्रहिताबाबत एकादी गोष्ट काढली रे काढली, कीं सरकारी यंत्र इतकें रेंगाळत, करकरत व नादानपणें फिरावें याचें मला आश्चर्य वाटे. राजकीय विरोधकाच्या टाळक्यांत टोला लगावण्याचा अगर त्याला पायबंद लावण्याचा प्रश्न निघूं द्या, कीं आळस व नालायकी कोठच्या कोठें नाहींशी झालीच! हा विरोध मनांत भरण्यासारखा होता.

स्थानिक-स्वराज्य खातें दिवाणाच्या हातीं असे. पण ह्या ब्रह्मदेवाला नगरपालिकेच्या कारभारासंबंधीं अगर खरें म्हणजे कोणत्याहि सार्वजनिक कार्यासंबंधीं भोपळ्याइतकें ज्ञान असावयाचें! त्याचें खातें त्याच्याकडे लक्षच देत नसे. त्याचा सर्व कारभार सनदी नोकर हांकीत असत व बऱ्या अधिकाऱ्यांत सर्वत्र आढळून येणाऱ्या समजुतीप्रमाणेंच सनदी नोकरांचीहि समजूत असे, कीं पोलिसी काम हें सरकारचें आद्य कर्तव्य! ज्यांच्यावर आपण अधिकार गाजवतों त्यांचेंहि थोडें हित आपण पाहिलें पाहिजे अशा बाबावृत्तीमुळें पोलिसी दृष्टिकोण जरा सौम्य होई, इतकेंच. पण फार मोठ्या प्रमाणावर समाजसुधारणा घडून आली पाहिजे याची जाणीवसुद्धां त्यांना होत नसे!

नगरपालिकांना सरकारच बहुधा कर्ज पुरवीत असल्याकारणानें पोलिसी दृष्टिकोणाबरोबरच सावकारी दृष्टिकोणहि सरकारच्या ठिकाणीं उत्पन्न होतो. कर्जाचे हप्ते वेळच्या वेळीं देण्यांत येतात किंवा नाहीं? नगरपालिकेची पत बिनधोक असून तिच्या हातीं पुरेशी रक्कम शिल्लक आहे कीं नाहीं? हे सर्व प्रश्न योग्य व आवश्यक आहेत. परंतु नगरपालिकेला शिक्षण, आरोग्य वगैरेसारखीं कांहीं विधायक कार्यें करावयाचीं असतात, केवळ पैसे कर्जाऊ घेणें व त्यांची वेळोवेळीं फेड करणें एवढेंच तिचें काम नाहीं, ह्या गोष्टीचा बहुधा विसर पडतो. हिंदुस्थानांतील नगरपालिकांकडून जी समाजसेवा होते ती आधींच अल्प असते व पैशाचा तुटवडा आला, कीं त्यांतसुद्धां कपात सुरू होते. अशा वेळीं पहिली सुरी फिरावयाची ती शिक्षणखात्यावर! अधिकारी-वर्गालाहि नगरपालिकेच्या शाळांविषयीं क्षिति वाटत नाहीं. कारण त्यांचीं मुलें अधिक खर्चाच्या व अधिक सुधारलेल्या खाजगी शाळांत शिकत असतात व त्या शाळांना सरकारकडून मदत होत असते.

हिंदुस्थानांतील बहुतेक शहरांचे दोन भाग पाडतां येतील. अत्यंत दाटीचा असा शहराचा मुख्य भाग आणि बंगले व बंगलेवजा घरें यांत राहणाऱ्या लोकांच्या वस्तीचा दुसरा एक विस्तृत असा भाग. ह्या विभागांतील प्रत्येक घराभोंवतीं बरेंच मोठें आवार अथवा बाग असते. या विभागाचा इंग्रजींत 'सिव्हिल लाइन्स' ह्या नांवानें उल्लेख होतो. इंग्रजी अधिकारी, व्यापारी लोक, पुष्कळसे वरिष्ठ-मध्यम वर्गांतील हिंदी लोक, धंदेवाईक लोक वगैरेंची वस्ती या टापूंत असावयाची. शहराच्या मुख्य विभागाकडून नगरपालिकेला मिळणारें उत्पन्न सिव्हिल लाइन्सकडून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षां अधिक असूनहि शहरापेक्षां कितो तरी अधिक खर्च सिव्हिल लाइन्सकडे करण्यांत येतो. सिव्हिल लाइन्समध्यें फार विस्तृत प्रदेशाचा समावेश होत असल्यामुळें अधिक लांबीचे रस्ते व त्यांची दुरुस्ती, मोऱ्या, नळ वगैरे तरतुदी मोठ्या प्रमाणावर पुरवाव्या लागतात व रस्ते स्वच्छ ठेवून त्यांवर पाणी शिंपण्याची व दिव्यांची सोय करावी लागते. शहरांतील भागाची नेहमींच अत्यंत आबाळ होते. त्यांत मोठे व चांगले असे रस्ते थोडे असतात व बोळांतून दिवाबत्तीची आणि मोऱ्यांची योग्य व्यवस्था रहात नाहीं.

ह्या सर्व गैरसोयी नागरिक धिमेपणानें सहन करतात. त्यांच्याविरुद्ध क्वचितच आरडाओरड झालेली आढळते, आणि आरडाओरड झालीच, तर त्यांतून कांहीं निष्पन्न होत नाहीं. जवळजवळ सगळे मोठेछोटे तक्रारखोर लोक सिव्हिल लाइन्समध्येंच आढळून येतात.

कराच्या ओझ्याची विभागणी जरा अधिक समानतेनें व्हावी या हेतूनें मीं जमिनीच्या किमतीवर कर बसविण्याचें ठरविलें; पण अशा स्वरूपाची सूचना मीं केली असेल-नसेल, इतक्यांत एका सरकारी अधिकाऱ्याकडून याविरुद्ध तक्रार-अर्ज दाखल झाला. ही सूचना अनेक कायद्यांच्या विरुद्ध जात आहे असें त्यानें त्यांत दाखवून दिलें होतें. ह्या कराचा बोजा उघडच सिव्हिल लाइन्समध्यें राहणाऱ्या बंगलेवाल्यांवर अधिक पडणार होता. व्यापाराची खर्ची करणारी, सर्व तऱ्हेच्या वस्तूंची किंमत—विशेषतः धान्याची किंमत—महाग करणारी जकात नगरपालिकेनें बसवली तर ती सरकारला चालते. तिच्यामुळें जीवनाला आवश्यक अशा रोजच्या गरजेच्या वस्तूंवर अप्रत्यक्ष कर बसवून त्याचा बोजा गरिबांच्या पाठीवर लादला गेला, तरी सरकारला फिकीर वाटत नाहीं. समाजाला अनिष्ट व जाचक अशा या जकातीच्याच उत्पन्नावर हिंदुस्थानांतील बहुतेक नगरपालिका जगत असतात. तथापि, मोठ्या शहरांतून आतां ही पद्धति नाहींशी होत चालली आहे असा माझा समज आहे.

एका बाजूला उभें असलेलें अन्तःकरणशून्य असें हें नोकरशाहीचें यंत्र जुन्या-पुराण्या चाकोऱ्यांतून धापा टाकीत मदपणें चालत असावयाचें. भरभर चालावयाला अगर दिशा बदलावयाला त्याची कधींच तयारी नसे. दुसऱ्या बाजूला माझे नगर-पिते सहकारी होते, तेहि असेच गतानुगतिक! त्यांच्यापैकीं कांहीं ध्येयवादी सभासद उत्साहानें काम उरकीत, पण एकंदरींत पाहतां ध्येयदृष्टीचा, अथवा कांहीं बदल केला पाहिजे या भावनेचा सर्वत्र उन्हाळाच होता! चाललें आहे तें ठीक आहे, कां उगीच प्रयोग करा? नाहीं यशस्वी झाला तर? ह्या युक्तिवादाच्या मोहिनीला ध्येयवादी व उत्साही सभासदहि हळूहळू बळी पडले. पण एक विषय मात्र असा होता, कीं त्यापुरते सगळे सभासद तत्पर असत. तो म्हणजे नेमणुकांचा व मदती-देणग्यांचा प्रश्न! पण ह्या तत्परतेमुळें अधिक कार्यक्षम लोकांचा लाभ नगरपालिकेला होतच असे, असें म्हणतां येणार नाहीं.

प्रतिवर्षी सरकारी ठरावांतून व वृत्तपत्रांतून नगरपालिकांच्या व लोकल बोर्डांच्या कारभारावर टीका येत असते, तसेच सरकारी अधिकारीहि टीका करतात; व असा निष्कर्ष काढण्यांत येतो कीं प्रजासत्ताक संस्था हिंदुस्थानला परवडत नाहींत. संस्थांचे दोष स्पष्ट दिसतच आहेत, पण कोणत्या पद्धतीच्या चौकटींत त्यांना आपलीं कामें उरकावीं लागतात याकडे फारच थोडें लक्ष दिलें जातें. पद्धत धड पुरी प्रजा-सत्ताकहि नाहीं व एकतंत्रीहि नाहीं. दोहोंचा संकर तींत झालेला आहे व दोन्हीकडचे

दोष तींत एकत्र जुळले आहेत. मध्यवर्ति सरकारला देखरेखीचा व नियंत्रणाचा अधिकार असावा हें मान्य, पण तें सरकारसुद्धां प्रजासत्ताकच हवें. तसें नसेल, तर खटके तरी सुरू होतात अथवा नगरपालिका ताटाखालचें मांजर तरी बनून राहते. ही स्थिति उघड उघड असमाधानकारक आहे. त्यामुळें प्रजेचा नियंत्रणाधिकार केवळ बेगडी स्वरूपाचा ठरतो. खुद्द नगरपालिकेंतल्या सभासदांचे डोळे सरकारकडे लागून राहतात व आपल्या मतदारांकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. प्रजादेखील नगरपालिकेकडे दुर्लक्ष करते. खऱ्या सामाजिक प्रश्नांचा निकाल लावण्याचें काम नगरपालिकेच्या अधिकाराबाहेरचें असल्यामुळें असले प्रश्न नगरपालिकेपुढें कधीं उत्पन्नच करण्यांत येत नाहींत. दृष्टीला पडणारें नगरपालिकेचें काम म्हणजे करवसुली. तिच्या लोकप्रियतेंत भर पडेल असें हें काम नव्हे.

नगरपालिकांचा मताधिकारहि फार मर्यादित ठेवण्यांत आलेला आहे. तो विस्तृत व्हावयाला पाहिजे. मुंबई-कार्पोरेशनसारखें मोठें कार्पोरेशनहि अगदीं संकुचित मताधिकारावर उभारलेलें आहे. मताधिकार विस्तृत करण्यांत यावा असा एक ठराव कांहीं काळापूर्वी खुद्द कार्पोरेशननेंच फेटाळून लावला ! यावरून आहे त्या परिस्थितींत बहुसंख्य नगरपित्यांना समाधान वाटत असून कोणत्याहि प्रकारें तींत फेरफार करण्याची आवश्यकता त्यांना दिसत नाहीं, ही गोष्ट सिद्ध होत आहे.

कारण कांहींहि असो, आमच्या स्थानिक संस्था कर्तबगारीच्या अथवा यशाच्या दृष्टीनें आदर्श संस्था ठरत नाहींत हें खरें. कर्तृत्वाच्या बाबतींत त्या बहुधा गचाळ असतात. वशिलेबाजी फार चालते व दृष्टिकोणहि बहुतकरून सदोष असतो आणि हें सर्व स्वाभाविक आहे. कारण प्रजासत्ताक पद्धति यशस्वी व्हावयाची असेल, तर शिक्षित व जबाबदारीची जाणीव ठेवणारें असें जनमत तयार हवें. परंतु त्यांपैकीं येथें कोणताच गुण विद्यमान नसल्यामुळें वैयक्तिक व जातीय स्वार्थांत अथवा असल्याच दुसऱ्या कांहीं क्षुद्र गोष्टींत लोकांचीं मनें गुंतून राहतात.

नगरपालिकेच्या कारभारांत राजकारणाचा प्रवेश होऊं नये म्हणून सरकार भारी दक्षता ठेवतें. राष्ट्रीय चळवळीबद्दल सहानुभूति दाखवणारा कसलाहि ठराव आला, कीं त्याच्या कपाळावर आठी चढलीच ! क्रमिक पुस्तकांना राष्ट्राभिमानाचा जरा वास आला, तरी तीं नगरपालिकेच्या शाळांसाठीं मंजूर व्हावयाचीं नाहींत. राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं चित्रें देखील शाळांतून दिसतां कामा नयेत. नगरपालिका बंद करूं अशी सरकारनें धमकी दिल्यामुळें नगरपालिकेवरील राष्ट्रीय झेंडा काढून टाकावा लागला, अशीं उदाहरणें घडलेलीं आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांत जे नोकर कॉंग्रेसवाले असतील, त्यांना नोकरीवरून दूर करण्यांत यावें म्हणून ठिकठिकाणच्या प्रांतिक सरकारांनीं हल्लीं संघटित प्रयत्न चालविलेला दिसतो. नगरपालिकेच्या शैक्षणिक व इतर संस्थांना मिळणारी सरकारी मदत बंद करण्याची धमकी देऊन जरा दमदाटी केली, कीं तेवढयानें काम भागतें. परंतु आतां कलकत्ता-

कार्पोरेशनच्या बाबतींत तर स्वच्छ कायदाच करण्यांत आला आहे, कीं कायदेभंगाच्या अथवा सरकारविरुद्ध दुसऱ्या कोणत्याहि चळवळींत भाग घेतल्यामुळें ज्यांना तुरुंगाची शिक्षा झालेली आहे, अशा लोकांना कामावरून काढून टाकण्यांत यावें. ह्या कायद्याचा हेतु उघडच निवळ राजकीय आहे. कामाबद्दलच्या लायकी-नालायकीशीं त्याचा कोणत्याहि प्रकारें संबंध नाहीं.

ह्या थोड्याशा उदाहरणांवरूनहि आमच्या स्थानिक संस्थांना कितपत स्वातंत्र्य आहे व त्यांत लोकशाही किती अल्प प्रमाणांत आहे हें निदर्शनास येईल. राजकीय कार्यकर्ते प्रत्यक्ष सरकारी नोकरींत कधींच जात नाहींत. पण नगरपालिकेच्या व स्थानिक संस्थांच्या नोकऱ्यांतून राजकीय विरोधकांना कमी करण्याचा जो प्रयत्न चालू आहे, तिकडे डोळेझांक होतां कामा नये. साधारणपणें गेल्या चौदा वर्षांत वेळोवेळीं तुरुंगांत गेलेल्यांची संख्या सुमारें तीन लक्ष भरेल. राजकीय कार्याचा विचार क्षणभर बाजूला ठेवला, तरी या तीन लक्ष लोकांत अत्यंत धडाडीचे व ध्येय-वादी, समाजहिततत्पर आणि निःस्वार्थी असे कांहीं लोक निःसंशय असणारच. कोणत्याहि कामासाठीं आवश्यक अशी तडफ, उत्साह व सेवावृत्ति त्यांच्या ठिकाणीं आढळून येईल. लोकहितासाठीं चालणाऱ्या संस्थांत, उत्तम प्रकारें उपयोगी पडतील असेच हे गुण आहेत. तरीहि असल्या लोकांना हुसकून लावण्याचे व त्यांना व त्यांच्याबद्दल सहानुभूति दाखवणाऱ्यांना शिक्षा देण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न होत आहेत; इतकेंच नव्हे, तर त्यासाठीं कायदे पास करण्यापर्यंतहि सरकारची मजल जाते! लांगूलचालन करणाऱ्या लोकांची अवलाद सरकार पसंत करतें, आणि आमच्या स्थानिक संस्था गचाळ आहेत अशी तक्रारहि सरकारच करीत असतें! स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या कार्यक्षेत्रांत राजकारण येऊं नये असें म्हणणाऱ्या सरकारला त्या संस्थांनीं सरकारच्या आवडत्या राजकारणांत लुडबुड केली, तर ती मात्र आक्षेपार्ह वाटत नाहीं. लोकलबोर्डाच्या शिक्षकांवर सरकारच्या बाजूचा मतप्रचार खेड्याखेड्यांतून करण्याची जवळ जवळ सक्ति करण्यांत येत असते. ती न करावी तर नोकरींतून खो बसण्याची भीति आहे.

गेल्या पधरा वर्षांत कॉंग्रेसकार्यकर्त्यांनीं अनेक अडचणींशीं टक्कर मारलेली आहे. त्यांनीं मोठमोठीं जबाबदारीचीं कामें पार पाडलीं असून विशेष म्हणजे बलाढ्य व सुसज्ज अशा सरकारशीं झुंज खेळून थोडें यशहि मिळविलें आहे. या खडतर अनुभवाच्या शाळेंत शिक्षण घेतल्यामुळें कॉंग्रेस-कार्यकर्त्यांच्या अंगीं स्वावलंबन, कार्यकौशल्य व चिकाटीनें कार्य करण्याची धमक हे गुण बाणले आहेत. लोकांचें पौरुष खच्ची करणाऱ्या नोकरशाही सरकारच्या दीर्घकालीन राजवटींत हिंदी लोकांच्या अंगांतील ज्या गुणांचा लोप झाला, तेच गुण ह्या लढाऊ शिक्षणानें कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना प्राप्त करून दिले. अर्थातच इतर मोठ्या चळवळींप्रमाणें कॉंग्रेसच्या चळवळींतहि मूर्ख आणि गचाळ अशा लोकांचा शिरकाव झाला नसेल असें नाहीं;

परंतु सामान्यपणें सारख्याच दर्जाच्या दुसऱ्या कोणत्याहि माणसापेक्षां कॉंग्रेस-कार्यकर्ता अधिक कर्तृत्ववान् व धडाडीचा ठरेल, याबद्दल मला तिळमात्र शंका वाटत नाहीं.

या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे ह्याची कल्पना सरकारला व त्याच्या सल्लागारांना आलेली दिसत नाहीं. कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना नोकरीचे व रोजगाराचे सर्व मार्ग बंद करण्याचा सरकारचा जो प्रयत्न चालू आहे, तो खऱ्या क्रांतिकारकाला इष्ट असाच वाटेल. सर्वसामान्य कॉंग्रेस-कार्यकर्ता हा खरोखरच क्रांतिकारक मताचा नसतो. कांहीं काळ अर्धवट क्रान्तिकारक स्वरूपाची चळवळ केली, कीं तो पुन्हां आपल्या नेहमींच्या उद्योगांत गढून जातो. आपल्या धंद्याच्या उलाढालींत अगर स्थानिक राजकारणाच्या भोवऱ्यांतच त्याचे हातपाय गुरफटून राहतात. देशव्यापी प्रश्नांचा त्याच्या मनावर उमटलेला ठसा पुसट होत होत त्याच्या अंगांतील क्रान्तिकारक वारें थंड पडतें; कणखरपणा जाऊन दोंद वाढतें; व तेजस्वीपणाऐवजीं सुरक्षितपणानें राहण्याची चटक त्याच्या मनाला लागते. मध्यम वर्गातील कार्यकर्त्यांत ही प्रवृत्ति हटकून आढळत असल्यामुळें कायदेमंडळांतील व स्थानिक संस्थांतील सनदशीर राजकारणाच्या चक्रव्यूहापासून व राजकारणनिवृत्त करणाऱ्या नोकऱ्यांपासून त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न प्रगमनशील व क्रान्तिवादी कॉंग्रेस-कार्यकर्ते नेहमींच करीत असतात. आतां कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना नोकरी मिळणेंच दुर्घट करून सरकार कांहीं अंशीं त्यांच्या मदतीस आलें आहे. तेव्हां कार्यकर्त्यांतील क्रांतिकारी तडफ कायम टिकेल व कदाचित् त्यांत भरहि पडेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

एक वर्षभर नगरपालिकेचें काम केल्यानंतर मला असें वाटूं लागलें, कीं माझ्या शक्तीचा व्हावा तसा उपयोग तेथें होत नाहीं. काम अधिक झपाट्यानें व अधिक दक्षतेनें व्हावयास लागलें हेंच माझें मोठ्यांत मोठें काम. कोणताहि मूलग्राही फरक मला करून दाखवतां आला नाहीं. अध्यक्षत्वाचा राजिनामा देण्याचा माझा विचार होता. पण सर्व सभासदांनीं मला राहण्याचा आग्रह केला. त्यांनीं मला इतक्या प्रेमळपणानें व सौजन्यानें वागवलें होतें, कीं त्यांचा शब्द मला मोडवेना. माझ्या कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस मात्र मीं अध्यक्षपदाला रामराम ठोकला.

ही १९२५ सालची गोष्ट. त्याच वर्षीच्या हिवाळ्यांत माझी पत्नी आजारी पडली व कित्येक महिने तिला लखनौ येथील रुग्णालयांत रहावें लागलें. त्या वर्षी कॉंग्रेसचें अधिवेशन कानपूरला भरलें होतें. मी अद्यापि कॉंग्रेसचा सरचिटणीस असल्यामुळें मन अस्वस्थ असतांहि मला अलाहाबाद, कानपूर व लखनौ अशी त्रिस्थळी यात्रा एकसारखी करावी लागत असे.

माझ्या पत्नीनें अधिक शुश्रूषेसाटीं स्वित्झर्लंडांत जावें असा अभिप्राय डॉक्टरांनीं व्यक्त केला. मलासुद्धां ही कल्पना पसंत पडली; कारण हिंदुस्थानच्या बाहेर जाण्यासाठीं मलाहि कांहीं तरी सबब हवीच होती ! माझें मन गढूळ होऊन गेलें होतें;

व पुढचा मार्गहि स्पष्ट दिसत नव्हता. हिंदुस्थानपासून दूर अंतरावर राहिलों तर वस्तुस्थितीचें अधिक चांगलें दर्शन होईल व माझ्या मनाच्या कानाकोंपऱ्यांतून घुटमळणारा अनिश्चयाचा अंधार नाहींसा होईल असें मला वाटलें.

१९२६ मार्चच्या प्रारंभीं आम्ही व्हेनिसला जाण्यासठीं निघालों. माझी पत्नी, मुलगी व मी मिळून आम्ही तिघेंजण होतों. माझी बहीण व माझा मेहुणा रणजित एस्. पंडित त्याच बोटीनें निघालीं. त्यांचा युरोपला जाण्याचा बेत आमच्या आधीं कितीतरी दिवस निश्चित झाला होता.

# २१

# युरोपांत

तेरा वर्षांहून अधिकच काळ लोटल्यानंतर मीं युरोपांत पुन्हां पाऊल टाकलें. महायुद्ध, क्रांति, कल्पनातीत उलथापालथी यांनीं खचून भरलेलीं तेरा वर्षें उलटून गेलीं होतीं. युद्धकालीन रक्ताच्या व अत्याचारांच्या समुद्रांत माझ्या परिचयाच्या जुन्या जगानें जलसमाधि घेतली असून माझ्या स्वागतासाठीं नवेंच जग उभें होते. सहा-सात महिने युरोपांत वास्तव्य होईल, फार फार तर वर्षअखेर रहावें लागेल अशी माझी कल्पना होती. पण तब्बल एक वर्ष नऊ महिने आमचा मुक्काम झाला.

ह्या काळांत माझ्या मनाला शांति व शरीराला विश्रांति मिळाली. आम्हीं बहुतेक सर्व वेळ स्वित्झर्लंडमध्यें, जिनीव्हांत व मोंटाना येथील डोंगरावरील आरोग्य-धामांत घालवला. माझी धाकटी बहीण कृष्णा १९२६ च्या उन्हाळ्यांत आम्हांला येऊन मिळाली. युरोपांत आम्ही असेपर्यंत ती आमच्याबरोबरच होती. पत्नीला सोडून फार वेळ दूर राहणें इष्ट नसल्यामुळें दुसऱ्या गांवीं मला फारच थोडा वेळ रहावयाला सांपडत असे. पत्नी बरी झाल्यावर मात्र फ्रान्स, इंग्लंड व जर्मनीमध्यें आम्ही थोडेफार हिंडलों. गिरिशृंगावरील आमच्या घराभोंवतीं बर्फाचा घेरा पडला, कीं हिंदुस्थान व त्याचप्रमाणें युरोपखंडापासून आपण सर्वस्वीं अलग झालों आहोंत असा भास होई. किनाऱ्यावरील प्रेक्षकांप्रमाणें माझी स्थिति झाली होती. लिहावें, वाचावें, प्रसंगांशीं अनुसंधान राखावें, युरोपांतील नवीन रचनेकडे पहावें, त्यांतील राजकारणाकडे, अर्थकारणाकडे व तेथें नांदणाऱ्या मनुष्यामनुष्यांतील अधिक मनमोकळ्या संबंधांकडे लक्ष द्यावें व त्यांच्यांतील रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करावा. आम्हीं जिनीव्हाला गेल्यावर राष्ट्रसंघाच्या व आंतरराष्ट्रीय मजूर-कचेरीच्या कार्याविषयीं मला जिज्ञासा वाटूं लागली.

पण हिंवाळा सुरू झाला तसें हिंवाळी खेळांत माझें मन रंगून गेलें. कांहीं महिने तरी मला दुसरें तिसरें सुचत नव्हतें, मला दुसरा कांहीं उद्योग राहिला नव्हता. बर्फावरील स्केटिंग मीं पूर्वी केलें होतें, पण स्किइंगचा मला अभ्यास नव्हता. मला त्याची फारच चटक लागली. बरेच दिवसपर्यंत त्याचा त्रास झाला, पुष्कळ वेळां साष्टांग नमस्कारहि घालावा लागला, तरी मीं त्याचा पिच्छा सोडला नाहीं. त्या खेळांत माझें मन रंगून जाई.

त्या काळांत विशेष असें कांहीं घडलेंच नाहीं. दिवसामागून दिवस चालले

होते. माझ्या पत्नीची प्रकृति हळूहळू सुधारली व तिला शक्तीहि आली. तिकडे आम्हांला फारच थोडे हिंदी लोक भेटले. पण आमच्या युरोपांतील पावणेदोन वर्षांच्या मुदतींत नांवानें माहिती असलेल्या कांहीं हिंदी निर्वासितांची व जुन्या क्रान्तिकारकांची भेट झाली.

जिनीव्हाला श्यामजी कृष्ण वर्मा आपल्या रुग्ण पत्नीसह एका घराच्या अगदीं वरच्या मजल्यावर रहात असत. त्या वृद्ध पतिपत्नींच्या घरांत कायमचे नोकर-चाकर वगैरे कोणीच नसावें. बिऱ्हाडाच्या खोल्या अंधाऱ्या व कोंदट होत्या. हरएक वस्तूवर धुळीचा जाड थर बसलेला असे. श्यामजीजवळ मुबलक पैसा होता, पण तो खर्च करावा असें त्यांना वाटत नसे. आणा दोन आणे वांचवावेत म्हणून ट्राम्-वेंत न बसतां ते पायींच जात. भेटीला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे ते साशंकतेनें पहात असत. ती व्यक्ति ब्रिटिश हेर तरी असावी अगर त्यांच्या पैशावर डल्ला मारण्यासाठीं तरी ती आली असावी असा त्यांचा ग्रह उलट पुरावा मिळेपर्यंत कायम राही! "इंडियन सोशॅलॉजिस्ट" च्या जुन्या प्रती त्यांच्या खिशांत कोंबलेल्या दिसा-वयाच्या. बारा-पंधरा वर्षांपूर्वीचे आपण लिहिलेले लेख ते मोठ्या उत्सुकतेनें वाचून दाखवीत. हॅमस्टेड् येथील इंडिया हाउस, ब्रिटिश सरकारनें त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठीं पाठवलेले हेर, त्यांची आपण केलेली फटफजिती वगैरे जुन्या जमान्यां-तील गोष्टीच ते सांगत बसत. जीर्ण आणि धुरोळा बसलेल्या पुस्तकांनीं भरलेलीं कपाटें भिंतीला टेकून सर्वत्र ठेवलेलीं होतीं. कोणत्याहि नवख्या माणसाकडे तीं पुस्तकें मोठ्या दुःखी चेहऱ्यानें पहात आहेत असा भास होई! जमिनीवर देखील कागद, पुस्तकें अस्ताव्यस्त पडलेलीं आढळत. कितीक तरी दिवस, आठवडे अगर महिने तीं तशींच पडलेलीं असावींत! त्या सर्व जागेवर औदासीन्याचें व वार्धक्याचें वाता-वरण इतकें पसरलें होतें, कीं तेथें जीवन्तपणाचा तोंडवळा देखील आगंतुक पाहुण्याप्रमाणें अनिष्ट वाटावा! त्यांच्या खोलीकडे जाणाऱ्या निःशब्द व अंधाऱ्या अशा वाटेनें जाऊं लागलें, कीं कोपऱ्याआडून मृत्यूची सांवली दत्त म्हणून पुढे उभी तर राहणार नाहीं ना, असा विचार मनांत येई! आणि त्या घराच्या बाहेर पडल्यावर मोकळा वारा अंगाला लागला कीं जिवाला सुटकेचा आनंद होत असे.

आपल्या पैशांची व्यवस्था लावावी, सार्वजनिक कार्यासाठीं निधि करून ठेवावा, व त्यांतून हिंदी विद्यार्थ्यांना परदेशांत शिक्षण घेण्यासाठीं पैसा मिळावा असें श्यामजींच्या मनांत होतें. मीं एक निधिधारक व्हावें असें त्यांनीं सुचवलें. पण ती जबाब-दारी स्वीकारण्याचो मीं विशेष उत्सुकता दाखवली नाहीं. त्यांच्या पैशाच्या व्यवहारांत स्वतःला अडकवून घ्यावयाची माझी इच्छा नव्हती. शिवाय मीं अधिक उत्सुकता दर्शवली, तर मला त्यांच्या पैशाची हांव सुटली आहे असाहि किन्तु त्यांच्या मनांत लगेच आला असता! त्यांच्यापाशीं किती माया आहे याचा थांगपत्ता कोणालाच नव्हता. जर्मन मार्कच्या घसरगुंडींत त्यांना बराच गोता बसला असेंहि लोक म्हणत.

बडेबडे हिंदी गृहस्थ प्रसंगविशेषीं जिनीव्हाला उतरत असत. राष्ट्रसंघाकरतां येणारे लोक अधिकारीवर्गापैकींच असत, तेव्हां त्यांच्या हारामोऱ्याला उभें राहणें सुद्धां श्यामजींना शक्य नव्हतें. परंतु मजूर-कचेरीच्या कामासाठीं प्रमुख बिनसरकारी व्यक्तीहि येत असत, व मधून मधून प्रसिद्ध कॉंग्रेसवालेहि येत. त्यांना भेटण्याची मात्र श्यामजी खटपट करीत. ते श्यामजींचें स्वागत कसें करीत तें पाहण्यासारखें होतें. श्यामजींची भेट घेणें त्यांना बहुधा गैरसोयीचें वाटत असल्याकारणानें समाजांत त्यांना ते टाळण्याचा प्रयत्न करीत, व खाजगी भेटीचा प्रसंग आला तर कांहींतरी सबब सांगून सटकून जात! त्यांच्याबरोबर हिंडणें फिरणें बिनधोक समजण्यांत येत नसे.

अशा प्रकारें श्यामजी व त्यांची बायको यांचें आयुष्य एकान्तवासात व्यतीत होत होतें. मुलेंबाळें नाहींत, मित्रबांधव नाहींत, ओळखीदेखी नाहींत, मनुष्यांशीं जवळजवळ संबंधच नाहीं! पुरातन काळच्या अवशेषाप्रमाणें त्यांची अवस्था झाली होती. त्याचा काळ संपला तरी ते हयात होते असेंच म्हटलें पाहिजे! वर्तमानकाळाशीं त्यांचें पटत नसे म्हणून जगाचा लोंढा देखील जणुं कांहीं त्यांना टाळून, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून वहात चालला होता. पण केव्हां केव्हां त्यांच्या डोळ्यांत पूर्वीची ठिणगी लकाकत असे. त्यांच्यांत व माझ्यांत समानभूमि अशी कोणत्याच प्रकारची नसली, तरी त्यांच्याविषयीं मला सहानुभूति व अनुकंपा वाटल्याशिवाय राहिली नाहीं.

त्यांच्या मृत्यूची बातमी नुकतीच वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली. त्यांच्या पाठोपाठ लवकरच त्यांची सुशील पत्नीहि इहलोक सोडून गेली. श्यामजींच्या परदेशांतील वास्तव्यांत आमरण ती त्यांच्याबरोबर राहिली होती. हिंदी स्त्रियांच्या परदेशांतील शिक्षणासाठीं तिनें बरीच रक्कम मागें ठेवली आहे असें कळतें.

मीं दुसऱ्याहि एका गृहस्थांचें नांव अनेकवार ऐकलें होतें. ते गृहस्थ म्हणजे राजा महेंद्रप्रताप होत. त्यांना मी स्वित्झर्लंडांत पहिल्यांदाच भेटलों. ते फार आशावादी दिसले. ( अजूनहि ते तसेच असतील असें वाटतें. ) त्यांचे विचार सदोदित नभोमंडळांत विहार करीत असत. वस्तुस्थितीशीं त्यांची पूर्ण फारकत झालेली होती! बहुरूप्याप्रमाणें असलेला त्यांचा वेष मीं प्रथम पाहिला, तेव्हां मी जरा चकितच झालों. तिबेटच्या कडेपठारावर अथवा सैबेरियाच्या सखल प्रदेशांत तो पोशाख शोभला असता. मॉंट्रू येथें आणि त्यांतूनहि उन्हाळ्यांत तो पोशाख विचित्र दिसत होता. अर्धवट लष्करी असा तो पेहेराव होता. गुडघ्यापर्यंत येणारे रशियन बूट त्यांनीं घातले होते. त्यांच्या कोटाला मोठमोठे किती तरी खिसे होते व सर्व खिशांत कागदपत्रें, फोटोग्राफ वगैरे वस्तू कोंबलेल्या होत्या! जर्मन चॅन्सेलर बेथमान होलोवेग यांचें एक पत्र, सही केलेला कायसरचा फोटोग्राफ, तिबेटच्या लामाचें एक पत्र, व अशींच शेंकडों भेंडोळीं व छायाचित्रें त्यांतच ठेवलेलीं असत. त्या निरनिराळ्या खिशांतून इतिहाससंशोधक मंडळाचें एक प्रदर्शनच होतें म्हणा ना! तें

पाहून कोणलाहि आश्चर्य वाटल्यावांचून रहात नसे. ते म्हणाले, कीं एकदां चीनमध्यें असतांना महत्त्वाच्या पत्रांची एक पेटी गहाळ झाली तेव्हांपासून सगळीं कागदपत्रें अंगावरच वागवावयाचीं असें मीं ठरवून टाकलें! इतके खिसे शिवावे लागतात तें कां ह्याचा उलगडा अशा रीतीनें झाला!

जपान, चीन, तिबेट, अफगाणिस्तान वगैरे ठिकाणच्या धाडसी प्रवासाच्या किती तरी गोष्टी महेंद्रप्रतापांच्या संग्रहीं होत्या. हजारों प्रसंग आयुष्यांत त्यांनीं अनुभविले होते. त्यांचा इतिहास फार मनोरंजक वाटे. त्यांचा अगदीं ताजा उपक्रम म्हणजे "आनंद मंडळ." तें त्यांनींच स्थापन केलें होतें. "आनंदी असा" हें त्या मंडळाचें ब्रीदवाक्य. लॅटव्हिया (कीं लिथुआनिया?) देशांत या मंडळाचा फैलाव फार मोठ्या प्रमाणांत झाला होता असें त्यांच्या सांगण्यावरून कळलें.

त्यांची मतप्रचाराची पद्धति अशी: ते वेळोवेळीं बरींचशीं पोस्टकार्डे पाठवीत. त्यांवर स्वतःचाच संदेश छापलेला असे. तीं कार्डें जिनीव्हा येथें अगर इतरत्र भरणाऱ्या निरनिराळ्या परिषदांच्या सभासदांच्या नांवें पोस्टांत पडत. संदेशाखालीं त्यांची स्वाक्षरी असे. पण नांव लावीत तें मात्र विलक्षण लांब व वैचित्र्यपूर्ण असें असावयाचें! महेंद्रप्रताप यांपैकीं फक्त आद्याक्षरें तेवढीं ठेवून मग इतर पुष्कळच नांवें जोडण्यांत येत. त्यांनीं भेट दिलेल्या व त्यांच्या आवडत्या अशा प्रत्येक देशाचें एकेक निदर्शक नांव त्या मालिकेंत होतें! आपल्या आंतरराष्ट्रीय वृत्तीला ते या प्रकारें प्रस्फुटता देत असत! हें प्रदीर्घ नांव लिहून संपलें कीं सरतेशेवटीं "मानवसेवक" असें आपलें यथायोग्य वर्णन ते करीत. महेंद्रप्रताप जें बोलत त्याचा गंभीरपणें विचार करणें मोठें कठिण काम होतें. मध्ययुगीन अद्भुतरम्य कथांतील एकादें पात्र अथवा विसाव्या शतकांत चुकून जन्मलेला डॉन क्विक्झोटच आपल्यापुढें उभा आहे असें त्यांच्याकडे पाहिलें कीं मनांत येई! पण त्यांच्या स्वभावांत सरळपणा व कळकळ दिसत असे.

मादाम कामा ह्या पॅरिस येथें भेटल्या. त्या वृद्ध झाल्या होत्या. जवळ येऊन आपल्या चेहऱ्याकडे त्या अगदीं निरखून पहात व एकदम 'तुम्ही कोण?' असें तुसडेपणानें विचारीत. बाई फार उग्र व भयंकर दिसावयाची. त्या बहिऱ्या झाल्या असाव्यात. कारण त्यांच्या प्रश्नाला कांहींहि उत्तर दिलें तरी परिणाम कोणताच होत नसे! कारण आपण कितीहि सांगितलें तरी त्यांचा जो कांहीं ग्रह एकदां बनला असेल, तो कायम राही.

इटलीमध्यें कांहीं वेळां मौलवी ओबीदुल्लांची भेट झाली. ते चलाख, म्हणजे जुन्या तऱ्हेच्या राजकीय कारस्थानांच्या कामांत चलाख दिसले. आधुनिक जगाची त्यांना ओळख नव्हती. "हिंदुस्थानच्या संयुक्त घटने"ची त्यांनीं एक योजना आंखली होती. त्यांत जातीय प्रश्न व्यवस्थित रीतीनें सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. इस्तंबूल-मधील आपल्या कामगिरीची हकिगत त्यांनीं सांगितली. पण मला त्यांत विशेष गोडी

नसल्यामुळें मला तिचें स्मरण राहिलें नाहीं. कांहीं महिन्यांनीं त्यांना लाला लजपतराय भेटल्यावर तीच गोष्ट मौलवींनीं त्यांनाहि निवेदन केली असावी. लालाजींवर त्यांच्या म्हणण्याचा बराच परिणाम झाला असावा. कारण हिंदुस्थानांतील त्या वर्षीच्या कायदेमंडळांतील निवडणुकीच्या वेळीं ती गोष्ट व त्यापासून काढलेलीं चुकीचीं अनुमानें व उपसिद्धांत यांना खूपच महत्त्व प्राप्त झालें. मौलवी नंतर हेजाज येथे गेले. नंतर मला त्यांच्याविषयीं कांहीं बातमी मिळाली नाहीं.

बरकत-उल्ला नांवाचे दुसरे एक मौलवी होते. पण ते अगदीं निराळ्या सदरांतले. माझी-त्यांची भेट प्रथम बर्लिन येथें झाली. गृहस्थ वृद्ध, मोठे रसाळ, अति उत्साही व कोणालाहि हवेसे वाटतील असे असत. स्वभाव जरा भाबडाच, फारशी बुद्धिमत्तेची देणगी नाहीं; पण नवे विचार जाणून घेण्याची, नवें जग समजून घेण्याची त्यांची तयारी होती. आम्ही स्वित्झर्लंडमध्यें असतां १९२७ सालीं सॅन्फ्रान्सिस्को येथें ते वारल्याची बातमी ऐकून मला वाईट वाटलें.

महायुद्धकालीन गटापैकीं पुष्कळसे लोक बर्लिनला रहात असत. पण त्यांचें संघस्वरूप केव्हांच विलयाला गेलें होतें. त्यांचें आपसांत पटत नसे व त्यांच्यांत भांडणे सुरू झालीं होतीं. दुसऱ्यानें विश्वासघात केला असा प्रत्येकाच्या मनांत संशय होता. सगळीकडे राजकीय निर्वासितांचें नशीबच असें. बर्लिनमध्यें राहणाऱ्या ह्या हिंदी लोकांपैकीं पुष्कळजण बेठे मध्यमवर्गीय उद्योग करीत होते. पण तसे उद्योगसुद्धां मिळाले तर मिळत. युद्धोत्तर जर्मनींत तेहि दुर्मीळच झाले होते. क्रांतिकारक वृत्ति त्यांच्यांत मुळींसुद्धां उरलेली नव्हती व ते राजकारणांत यत्किंचितहि लक्ष घालीत नसत.

ह्या महायुद्धकालीन गटाचा इतिहास मनोरंजक वाटला. १९१४ सालीं त्यांच्यापैकीं बहुतेकजण जर्मनींतील निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून शिकत होते. जर्मन विद्यार्थ्यांच्या जीवनाशीं त्यांचें जीवन एकरूप होऊन गेलें होतें. ते जर्मन गाणीं गात, जर्मन खेळ खेळत, जर्मन बीर पीत, व जर्मन संस्कृतीविषयीं त्यांच्या मनांत सहानुभूति व आदरबुद्धि वसत असे. महायुद्धाशीं त्यांचा काय संबंध होता? पण जर्मनींत राष्ट्राभिमानाचें जे वेड पिकलें, त्याचा त्यांच्यावर कांहीं अंशीं परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. वास्तविक त्यांना ब्रिटिशांचा द्वेष वाटे हें खरें; पण जर्मनीबद्दल त्यांना प्रेम वाटत होतें असें नव्हे. त्यांच्या देशाभिमानामुळें ते ब्रिटिशांच्या शत्रुपक्षाकडे झुकले, इतकेंच. महायुद्धाला तोंड लागल्यानंतर आणखी कांहीं जागृत क्रान्तिवादी हिंदी लोक स्वित्झर्लंडच्या वाटेनें जर्मनींत उतरले. ह्या लोकांनीं एक समिति बनवून हरदयाळांना पाचारण केलें. हरदयाळ तेव्हां अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर रहात होते. हरदयाळ येईपर्यंत कांहीं महिने लोटले. तितक्या अवधींत ही समिति म्हणजे एक वडें प्रस्थ होऊन बसलें होतें. समितीला जर्मन सरकारनेंच एवढें महत्त्व आणून दिलें. कारण ब्रिटिशविरोधी जितके म्हणून घटक असतील, तेवढ्यांचा उपयोग

करून घ्यावयास जर्मन सरकार एका पायावर तयार होतें. आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा फायदा आपल्या देशासाठीं करून घ्यावा ही हिंदी लोकांची दृष्टि होती. जर्मनीचें श्राद्ध विकत घेऊन आपण तर्पण करीत बसावें अशी कांहीं त्यांची इच्छा नव्हती. पण हवें-नको ठरविण्याची त्या वेळीं परिस्थिति नव्हती. जर्मन अधिकाऱ्यांना ज्या गोष्टीची विशेष आवश्यकता होती, ती गोष्ट त्यांना पुरवणें आपणांला शक्य आहे, अशी त्यांची समजूत झाली व त्या भरंवशावरच थोडीशी घासाघीस करणें शक्य झालें होतें. जर्मन सरकारनें हिंदी स्वातंत्र्याची हमी द्यावी असा त्यांनीं आग्रह धरला. असें दिसतें कीं, जर्मन परराष्ट्रीय खात्यानें त्यांच्याबरोबर तहनामाहि केलेला होता. जय झाला तर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आपण मान्य करूं असें वचन व इतरहि कांहीं अटी त्या तहनाम्यांत नमूद करण्यांत आल्या. ह्या तहनाम्यावर विसंबूनच त्यांनीं महायुद्धांत मदत करण्याचें कबूल केलें. सरकार या समितीचा सर्व प्रकारें मान-इतमाम ठेवीत असे व तिच्या प्रतिनिधींना तर जवळ जवळ परराष्ट्रीय वकिलांच्या दर्जानें वागविण्यांत येई.

या गटांतील अननुभवी तरुण माणसांना अशा प्रकारचें महत्त्व एकाएकी प्राप्त झाल्यामुळें त्यांपैकीं कांहींजण जरा शेफारल्याप्रमाणेंच वागूं लागले. आपण कांहींतरी ऐतिहासिक कामगिरी बजावीत आहोंत, नवयुगाला प्रारंभ करणारें व अत्यंत महत्त्वाचें असें कार्य आपल्या शिरावर पडलेलें आहे, अशी त्यांची समजूत होऊन बसली. त्यांपैकीं पुष्कळांना साहसाचीं कामें करावीं लागलीं व पुष्कळदां जिवावरचे प्रसंगहि त्यांच्यावर गुदरले. महायुद्धाच्या उत्तरकांडांत त्यांचें महत्त्व कमी कमी होत जाऊन सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करूं लागलें. हरदयाळ अमेरिकेहून आले, परंतु त्यांना केव्हांच गचांडी मिळाली होती. समितीबरोबर त्यांचें मुळींच जमेना. जर्मन सरकार व समितीचे लोक दोघेहि त्यांना अविश्वासू समजत असत. त्यांनीं हरदयाळांना हळूच बाजूला काढलें. १९२६–२७ सालामध्यें मी युरोपांत असतांना युरोपांतील जुने हिंदी रहिवासी हरदयाळांविषयीं इतक्या तुच्छतेनें व संतापानें बोलत, कीं मी तर त्यांचें बोलणें ऐकून चकितच झालों! त्या वेळीं हरदयाळ स्वीडनमध्यें रहात असत. मला ते भेटले नाहींत. महायुद्ध संपलें व त्याचबरोबर हिंदुस्थानी समितीचें वैभवहि संपलें. त्यांच्या सर्व आशा भग्न झाल्यानंतर जीवनांत कांहीं गोडी उरली नाहीं. उच्च महत्त्वाकांक्षा मनांत बाळगून त्यांनीं डाव टाकला, पण तो फसला. इतक्या मोठ्या साहसानंतर व युद्धाच्या जमान्यांत एवढी मानमान्यता उपभोगल्यानंतर साधें आयुष्य हें केव्हांहि रुक्षच वाटणार. पण आतां वेळ अशी आली, कीं चारचौघांसारखें पोटभरू जीवनहि महाग झालें. त्यांना हिंदुस्थानची वाट बंद झाली होती. युद्धानंतर जर्मनींत पोटाला मिळण्याची मारामार पडूं लागली. तो मोठा कठिण प्रसंग होता. नंतर त्यांपैकीं कांहींजणांना ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत परत येण्याची परवानगी दिली; पण पुष्कळांना जर्मनींतच

घर करावें लागलें. त्यांची स्थिति मोठी विचित्र झाली. ते कोणत्याच राष्ट्राचे नागरिक राहिले नाहींत. त्यांच्याजवळ अवश्य तो परवानाहि ( पासपोर्ट ) नव्हता. जर्मनीच्या बाहेर प्रवास करणें कठिण होत असे व जर्मनींत रहावें तर तेथेंहि अनेक अडचणी येत. पोलिसांचीहि मेहेरनजर असली तर ठीक. अनिश्चित व संकटमय असें त्यांचें जीवन होतें. पोट भरावें कसें याची चिंता त्यांच्या मनाला जाळीत राही.

१९३३ च्या सुरुवातीला नाझी-सत्ता प्रस्थापित झाली व तेव्हांपासून त्यांच्या दुर्दैवांत भर पडली. "अनार्य" लोकांना, विशेषतः आशियामधील लोकांना जर्मन देश सुखाचा राहिलेला नाहीं. जोंपर्यंत ते सरळ-सूत चालले आहेत, तोंपर्यंतच त्यांना तेथें राहण्याची परवानगी मिळते. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानवरील सत्तेला हिटलर-कडून स्पष्ट मान्यता मिळालेली आहे. ब्रिटिशांची सहानुभूति मिळवावी व ब्रिटिश सरकारच्या रोषाला प्राप्त झालेल्या कोणत्याहि हिंदी माणसाला आपण उत्तेजन देतों असें दिसूं नये म्हणून त्यानें ही गोष्ट केली असावी हें उघड आहे. जर्मनींतील युद्धकालीन संघांपैकीं एक प्रमुख गृहस्थ आम्हांला बर्लिन येथें भेटले. त्यांचें नांव चंपकराम पिलाई. ते जरा भंपकच दिसले. तरुण हिंदी विद्यार्थ्यांनीं त्यांना थट्टेनें अश्लाघ्य असें एक टोपण नांव दिलें होतें. त्यांना राष्ट्रवादच तेवढा समजत असे. कोणत्याहि प्रश्नाचा सामाजिक अगर आर्थिक दृष्टीनें विचार सुरू झाला, कीं ते त्या विषयाला बगल देत. जर्मन राष्ट्रवाद्यांबरोबर ( स्टील हेलमेटस् ) त्यांची खूपच दोस्ती होती. ज्या थोड्या हिंदी गृहस्थांचे नाझी विचारसरणीशीं पटत असे, त्यांपैकीं हे एक होते. कांहीं महिन्यांपूर्वी त्यांच्या मृत्यूची बातमी मला तुरुंगांत वाचावयाला सांपडली.

सर्वस्वीं निराळ्या प्रकारचे गृहस्थ म्हणजे वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय. हिंदुस्थानांतील एका प्रसिद्ध घराण्यापैकीं ते एक होते. लोकांत ते चट्टो या नांवानें ओळखले जात. अतिशय कर्तबगार व अतिशय गोड अशी ती व्यक्ति होती. त्यांची नेहमीं ओढघस्त असे. कपडे फाटके असत व पुष्कळ वेळां त्यांना एक वेळच्या जेवणा-पुरते पैसे मिळण्याचीहि पंचाईत पडे. मीं इंग्लंडांत शिक्षण घेत असतां ते माझ्या जरा पुढें होते. मी हॅरो येथें गेलों तेव्हां ते ऑक्सफर्डला शिकत होते. तेव्हांपासून ते हिंदुस्थानांत आलेच नाहींत. कधीं कधीं त्यांना घरची ओढ लागून हिंदुस्थानांत यावें म्हणून त्यांच्या मनाची तळमळ सुरू होई. त्यांचे घरचे सर्व संबंध केव्हांच तुटून गेले आहेत. ते हिंदुस्थानांत आले तर त्यांना कंटाळा मात्र खचित येईल. परंतु कितीहि काळ लोटला व कितीहि दूरदूरच्या देशांत प्रवास झाला, तरी घराकडची ओढ कायमच राहते. कोणत्याहि निर्वासिताला हा पायगोवा तोडणें शक्य होत नाहीं. यालाच मॅझिनीनें ' अंतरींची जळजळ ' असें म्हटलें आहे.

परदेशांत मला जे राजकीय निर्वासित भेटले, त्यांच्याबद्दल माझें विशेष चांगलें मत झालें नाहीं ही गोष्ट नमूद केली पाहिजे. त्यांच्या त्यागाचें मला अर्थातच

कौतुक वाटतें व त्यांनीं जे हाल सोसले व सध्यां त्यांच्या मार्गांत ज्या अडचणी उभ्या आहेत त्यांविषयींहि माझ्या मनांत सहानुभूति आहेच. त्यांच्यापैकीं पुष्कळसे लोक मला भेटले नाहींत. सर्व जगभर ते पसरलेले आहेत. फारच थोड्यांचीं नांवें आपणांला ऐकून तरी माहिती झालीं असतील. बाकीचे हिंदुस्थानी जगांतून पार नष्ट झाले असून ज्या देशबांधवांच्या भल्यासाठीं त्यांनीं खटपट केली, त्यांना त्यांची आठवणहि उरलेली नाहीं! जीं थोडीं माणसें मला भेटलीं, त्यांपैकीं दोनच व्यक्ती विशेष बुद्धिमत्तेच्या अशा वाटल्या. एक वीरेन्द्र चट्टोपाध्याय व दुसरे एम्. एन्. रॉय. यांची मास्को येथें फक्त अर्धा तासच भेट झाली. त्या वेळीं ते एक प्रमुख कम्युनिस्ट समजले जात. नंतर त्यांचा कम्युनिझम् , कट्टर कम्युनिझमहून जरा निराळा पडला. चट्टोपाध्याय कम्युनिस्ट पक्षाचे नसले, तरी त्यांचीं मतें कम्युनिझमच्या बाजूलाच झुकत होतीं. हल्लीं दोन-तीन वर्षें रॉय हे हिंदुस्थानांतील तुरुंगांतच अडकून पडले आहेत.

युरोपच्या पाठीवर कितीतरी हिंदी लोक भटकत राहिले आहेत. त्यांच्या तोंडून क्रान्तीची भाषा ऐकूं येते. विलक्षण आणि साहसाच्या अशा सूचना ते करीत असतात व आपणाला विचित्र वाटतील असे प्रश्नहि ते विचारीत असतात. ब्रिटिश हेरखात्याची भीति त्यांच्या अंतःकरणांत कायमचें ठाणें देऊन बसली असावी अशी मनाला शंका वाटते.

पुष्कळ युरोपियन व अमेरिकन लोकहि आम्हांला भेटले. जिनीव्हापासून आम्ही पुष्कळ वेळां रोमा रोलॉं ह्यांना भेटण्यासाठीं व्हिलेनोव्ह येथें जात असूं. आम्ही त्यांच्याकडे प्रथम गेलों तेव्हां गांधीजींनीं लिहिलेलें परिचयपत्र बरोबर नेलें होतें. दुसरी मोलाची भेट म्हणजे तरुण जर्मन कवि व नाटककार अर्न्स्ट टेलर यांची. नाझी-आमदानीमुळें त्यांना जर्मनींत स्थान उरलें नाहीं. न्यूयॉर्क येथील सिव्हिल लिबर्टीज युनियनचे रोजर बाल्डविन ह्यांचीहि भेट झाली. जिनीव्हाला असतांना धनगोपाल मुकर्जी यांच्याबरोबरहि आमचा स्नेह जमून आला. फ्रँक बुकमन् हे गृहस्थ मला युरोपांत जाण्यापूर्वी भेटले होते. "ऑक्सफर्ड ग्रुप मुव्हमेंट"चे ते प्रवर्तक होते. त्या विषयासंबंधीं त्यांनीं मला कांहीं वाङ्मय दिलें होतें, तें वाचून मला अतिशय नवल वाटलें व जिज्ञासाहि उत्पन्न झाली. जिनीव्हा येथें ते गृहस्थ मला पुन्हां भेटले व रुमानिया देशांत भरणाऱ्या त्यांच्या संघटनेच्या आंतरराष्ट्रीय समारंभासाठीं त्यांनीं मला आमंत्रण दिलें. पण तेथें जातां न आल्यामुळें या नव्या भावनावादी चळवळीचें सूक्ष्म निरीक्षण मला करतां आलें नाहीं. माझी जिज्ञासा अद्यापि तशीच राहिली आहे. ऑक्सफर्ड ग्रुप चळवळीचा विस्तार होत असल्याचें वाचलें कीं मला अधिकाधिकच आश्चर्य वाटत असतें.

२२

# हिंदुस्थानांतील कलह

स्विट्झर्लंडमध्यें पोंचल्यानंतर लवकरच इंग्लंडांत सार्वत्रिक संप सुरू झाला. तें वर्तमान ऐकून माझ्या मनांत खूपच खळबळ उडाली. माझी सर्व सहानुभूति अर्थातच संपवाल्यांच्या बाजूला होती. थोड्याच दिवसांनीं संप कोलमडून पडल्याचें ऐकून स्वतःची हानि झाल्याप्रमाणें मनाला धक्का बसला. मी थोडे दिवस इंग्लंडमध्यें जाऊन राहिलों होतों. खाणी-मजुरांचा संप चालू होता. रात्रीच्या वेळीं लंडन शहरभर अर्धवट काळोख पसरलेला असे. मीं एकदां खाणीच्या प्रदेशाकडे चक्कर मारली. तो डर्बीशायरचा भाग असावा. खाणीवरील मजूर, स्त्रिया व मुलें यांचे सुकलेले व निस्तेज डोळे माझ्या दृष्टीला पडले, व अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कित्येक मजुरांवर व त्यांच्या बायकांवर कोर्टांतून खटले चालू होते, तेंहि दृश्य मला पहावयास मिळालें. खाणीचे डायरेक्टर व व्यवस्थापक हेच न्यायाधीश म्हणून बसले होते! त्यांनींच मजुरांवरील खटले चालवले व तांतडीच्या कायद्यान्वयें कांहीं किरकोळ गुन्ह्यांबद्दल मजुरांना शिक्षाहि केल्या. एक खटला ऐकून मला विशेष चीड आली. संपमोड्यांची टर उडवल्याबद्दल तीन चार स्त्रियांना कोर्टापुढें खेंचण्यांत आलें होतें. त्यांचीं लहान अर्भकें त्यांच्या कडेवरच होतीं. त्या बाया व तीं मुलें दोन्हीहि केविलवाणीं व अर्धपोटीं दिसत होतीं. कित्येक दिवसपर्यंत चाललेल्या संपाचा परिणाम त्यांच्यावर होऊन तीं अशक्त झालीं होतीं. आपल्या तोंडचा घास हिसकावून घेणाऱ्या संपफोड्यांचा त्यांना साहजिकच अतिशय राग आलेला होता.

न्यायदानमुद्रा वर्गनिरपेक्ष नसतें असें आपण पुष्कळदां वाचतों. हिंदुस्थानांत तर ही नेहमींचीच गोष्ट होऊन बसली आहे. पण इंग्लंडांतहि हा अन्याय इतक्या उघडपणें चालत असेल अशी माझी कल्पना नव्हती; त्यामुळें मला प्रथम धक्काच बसला. दुसरी एक आश्चर्याची गोष्ट मला दिसली ती अशी, कीं संपवाल्यांत सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलें होतें. त्यांच्यावर अधिकाऱ्यांनीं व पोलिसांनीं दडपशाही चालवलेली होती हें तर स्पष्टच दिसत होतें. परंतु ही अपमानास्पद वागणूक ते निमूटपणें सहन करीत. कित्येक काळपर्यंत लढा चालू राहिल्यामुळें त्यांचा दम पार उखडून गेला असून ते जमीनदोस्त होण्याच्या बेताला आले होते. इतर मजूरसंघांतील त्यांचे भाईबंद त्यांना केव्हांच सोडून गेले होते. तरीहि गरीब बिचाऱ्या हिंदी

मजुरांशीं त्यांची तुलना करतां जमीन-अस्मानाचा फरक दिसून आला असता. तशा परिस्थितींतहि ब्रिटिश खाणी-कामगारांची संघटना मजबूतपणें टिकून राहिली होती व सर्व देशांतील, किंबहुना सर्व जगांतील कामगार-संघांची सहानुभूति, त्याचप्रमाणें वृत्तपत्रांत मिळणारी प्रसिद्धि वगैरे साधनांचाहि त्यांना फायदा होत होता. हिंदी मजुरांच्या वांट्याला यांपैकीं कांहींच येत नाहीं. आणि इतका फरक असून देखील दोन्ही देशांतील मजुरांच्या दृष्टींत जी भीतीची छाया दृग्गोचर होत होती, तिच्यांत किती विलक्षण साम्य आहे असा विचार मनांत आला.

हिंदुस्थानांत त्या वर्षीं मध्यवर्ति व प्रान्तिक कायदे-मंडळांच्या त्रैवार्षिक निवडणुकी व्हावयाच्या होत्या, पण त्यांत मला कांहींच स्वारस्य वाटत नव्हतें. तेथें चाललेल्या अटीतटीच्या भांडणांचे प्रतिध्वनी मात्र मला स्वित्झर्लंडांतहि ऐकावयास मिळत असत. पं. मालवीय व लाला लजपतराय ह्यांनीं स्वराज्य-पक्षाला विरोधी असा एक स्वतंत्र पक्ष स्थापन केला. त्याला ते राष्ट्रीय पक्ष असें म्हणत. ह्या नव्या पक्षाचीं तत्त्वें कोणत्या बाबतींत जुन्या पक्षापेक्षां भिन्न होतीं, हें मला त्या वेळीं व अजूनहि कळलेलें नाहीं. सध्यां कायदे-मंडळांत जे अनेक पक्षोपपक्ष उपस्थित झालेले दिसतात, त्यांच्यांत वस्तुतः तात्त्विक असा कोणताहि फरक नसतो. चढाऊ वृत्तीचे सभासद स्वराज्य-पक्षामुळेंच प्रथमतः कायदे-मंडळांत आले. त्यांचें धोरण इतर पक्षांपेक्षां पुष्कळच जहाल असे. पण त्यांच्यांत व इतर पक्षांतील सभासदांत असणारा फरक देखील प्रकाराचा नसून प्रमाणाचाच होता.

नवीन निघालेला राष्ट्रीय पक्ष निःसंशयच अधिक नेमस्त वृत्तीचा होता. खरें म्हणजे हिंदुमहासभेच्या बरोबर सहकार्यानें काम करणारा हिंदूंचा पक्ष असेंच त्याला म्हटलें पाहिजे. त्याचें पुढारीपण पं. मालवीयांनीं कां स्वीकारलें तें सहज समजण्यासारखें आहे. कारण त्यांचीं जीं सार्वजनिक मतें, जवळ जवळ तींच याहि पक्षाचीं सार्वजनिक मतें होतीं. पूर्वीच्या साहचर्यामुळें पंडितजी कॉंग्रेसला चिकटून राहिले असले, तरी त्यांच्या व प्रागतिकांच्या बौद्धिक दृष्टिकोणांत फारसा फरक नव्हता. असहकारिता व कॉंग्रेसची प्रत्यक्ष प्रतिकाराची नवी पद्धति त्यांना फारशी पसंत पडली नाहीं. कॉंग्रेसचें धोरण ठरवण्यांतहि ते फार मन घालीत नसत. वर्किंग कमिटींत त्यांचा समावेश झालेला नव्हता. कायदे-मंडळाबाबतच्या कॉंग्रेसच्या आज्ञाहि ते पाळीत नसत. हिंदुमहासभेचे ते अत्यंत लोकप्रिय पुढारी असून जातीय प्रश्नांच्या बाबतींत त्यांच्या व कॉंग्रेसच्या धोरणांत बरीच तफावत दिसून येई. कॉंग्रेस-विषयीं त्यांना जें प्रेम वाटतें तें त्या संस्थेच्या सुरुवातीपासून त्यांचा तिच्याशीं संबंध आल्यामुळें वाटतें. स्वातंत्र्याची तळमळ त्यांच्या अंतःकरणाला लागून राहिलेली असल्यामुळें व त्या ध्येयासाठीं परिणामकारक असें थोडेंबहुत कार्य करणारी कॉंग्रेस ही एकच एक संस्था आहे असें स्पष्ट दिसत असल्यामुळेंहि कांहीं अंशीं त्यांना कॉंग्रेस-

बद्दल जिव्हाळा वाटत असावा. पुष्कळदां त्यांचें अन्तःकरण कॉंग्रेसकडे ओढ घेतें कॉंग्रेसची चळवळ सुरू असली कीं अनेकदां असें होतें; पण त्यांच्या बुद्धीला मात्र दुसऱ्याच पक्षाची विचारसरणी पसंत आहे. साहजिकच त्यांच्या मनाची सतत ओढाताण चालू असते व कधीं कधीं तर एकाच वेळीं परस्परविरुद्ध दिशांना जाण्याचा ते प्रयत्न करतात! त्यामुळें जनतेचा गोंधळ उडतो. परंतु राष्ट्रवाद हा जात्याच गोंधळ उडवणारा आहे. आणि मालवीजयी तर निर्भेळ राष्ट्रवादी आहेत. त्यांना सामाजिक व आर्थिक उलटापालटीविषयीं आस्था वाटत नाहीं. सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक दृष्टया ते जुन्या समाज-रचनेचाच पक्ष घेत व अजूनहि घेतात. हिंदी संस्थानिक, तालुकदार व जमीनदार त्यांना आपले हितकर्ते मित्र समजतात तें उगीच नव्हे. हिंदुस्थानांतून परकीय सत्तेचें समूळ उच्चाटन व्हावें असें त्यांना अगदीं अन्तःकरणापासून वाटतें. पण एवढा एकच बदल त्यांना हवा आहे. तरुणपणीं त्यांनीं राजकारणाचा जो अभ्यास केला व राजकारणाचें त्यांना तेव्हां जें शिक्षण मिळालें त्याची छाप त्यांच्या विचारसणीवर अद्यापि आहे; व सध्यांच्या गतिमान् व क्रांतिकारक युद्धोत्तर जगाकडे, ते स्थायी प्रकृतीच्या एकोणिसाव्या शतकाचा चष्मा चढवून टी. एच्. ग्रीन, जॉन स्टुअर्ट मिल, ग्लॅड्स्टन व मोर्ले यांच्या दृष्टिकोणानें, तीन-चार हजार वर्षांच्या हिंदु-संस्कृतीच्या व समाजशास्त्राच्या काठीचा आधार घेऊन पहात असतात. विरोधांनीं परिपूर्ण व संमिश्र अशी त्यांची विचारसरणी आहे. पण या विरोधांचेहि निराकरण करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे असा विलक्षण दृढ विश्वास त्यांच्या ठिकाणीं वसत असावा. तरुणपणापासून अनेकविध क्षेत्रांत त्यांनीं बजावलेली कामगिरी, हिंदुविश्वविद्यालयाप्रमाणें भव्य अशी संस्था प्रस्थापित करून जोडलेलें यश, त्यांच्या अंगची निष्ठा व कळकळ, त्यांचें प्रभावी वक्तृत्व, त्यांचें सौजन्य व आकर्षकपणा, यांच्या योगानें ते हिंदु जनतेला प्यारे होऊन बसले आहेत व त्यांच्या राजकीय मतांशीं पुष्कळांचा विरोध असला, तरी ते पंडितजींना प्रेमादरपूर्वकच वागवतात. त्यांच्या वयाच्या व कार्याच्या इतिहासामुळें त्यांना हिंदी राजकीय क्षेत्रांत भीष्माचार्यांप्रमाणें मान असला, तरी आधुनिक जगाशीं त्यांचा फारच थोडा संबंध राहिलेला आहे. त्यांच्या म्हणण्याकडे लोक कान देतात; पण त्यांची भाषा जीर्ण, दुर्बोध होत चालली आहे व ती समजली तरी कोणी मानीत नाहीं.

स्वराज्य-पक्षाचीं राजकीय मतें जहाल होतीं व त्यांतील सभासदांना कॉंग्रेसची शिस्त पाळावी लागत असे. साहजिकच पंडितजी अशा पक्षाचे सभासद झाले नाहींत. त्यांना अधिक सौम्य धोरण हवें होतें व राजकीय आणि जातीय दृष्टया अधिक मोकळीकहि हवी होती; ती त्यांना त्या नव्या पक्षांत मिळूं लागली.

नव्या पक्षाविषयीं लाला लजपतराय निष्ठा दाखवीत तिचा उलगडा मात्र सहज होत नाहीं. त्यांचा कल नेमस्त व जातीय धोरणाकडे झुकता असा असे. त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत मी जिनीव्हा येथें लालाजींना भेटलों होतों. कॉंग्रेसच्या

विरुद्ध बंड करण्याची त्यांची कल्पना असेल, असें त्या वेळच्या बोलण्यावरून तरी वाटलें नाहीं. ते नव्या पक्षाला येऊन कसे मिळाले याची मला अजून कल्पना होत नाहीं. परंतु निवडणुकीच्या मोहिमेच्या वेळीं त्यांनीं संदिग्ध असे जे आरोप केले, त्यावरून त्यांच्या मनांत काय शिजत होतें याविषयीं कयास बांधतां येण्यासारखा आहे. हिंदुस्थानबाहेरच्या लोकांशीं काँग्रेसचे पुढारी संगनमत करीत असतात असा आरोप त्यांनीं केला. काबूल येथें आपली शाखा स्थापन करण्यांत काँग्रेसचा असाच हेतु होता असाहि त्यांनीं आक्षेप घेतला. अनेकवार विनंति केली असूनहि त्यांनीं आपले आरोप स्पष्टपणें अगर तपशीलवार मांडल्याचें मला आठवत नाहीं.

ह्या आक्षेपांची बातमी मला स्वित्झर्लंडांत कळली, त्या वेळीं मी चकितच झालों ! मी काँग्रेसचा चिटणीस असल्यामुळें काँग्रेसच्या कार्यसंघटनेविषयीं मला संपूर्ण माहिती होती व काबूलची शाखा काँग्रेसला जोडून घेण्याच्या कामीं देशबंधू दासांच्या श्रमाप्रमाणें माझेहि श्रम कारणीभूत झालेले होते. त्या वेळीं लालाजींनीं केलेल्या आरोपांचा तपशील मला समजला नसला, तरी त्यांचा एकंदर रोख लक्षांत घेतां त्या आक्षेपांत कांहींच तथ्य नव्हतें असें म्हणावयास हरकत नाहीं. लालाजींचा असा गैरसमज कां व्हावा तें मला सांगतां येणार नाहीं. अनेक बाजारगप्पांवर त्यांनीं विश्वास ठेवला असावा व मौलवी अबीदुल्लाबरोबर झालेल्या संभाषणाचा परिणामहि त्यांच्या मनावर झाला असावा. पण निवडणुकींची तऱ्हाच विचित्र असते. लोक त्या वेळीं लवकर हातघाईवर येतात व नेहमींच्या वृत्तीवर हरताळ फांसला जातो. निवडणुकींचा जसजसा अधिक अनुभव मला येत आहे, तसतसा लोकशाहीच्या माझ्या-सारख्या पक्षपात्याला मुळींसुद्धां न शोभणारा असा वीट मला त्यांच्याबद्दल येऊं लागला आहे.

हिंदुस्थानांतील वाढती जातीय तेढ लक्षांत घेतां राष्ट्रीय पक्ष अथवा असाच दुसरा कोणता तरी पक्ष निघणें क्रमप्राप्तच होतें. हिंदूंच्या बहुसंख्येची मुसलमानांना धास्ती वाटे आणि मुसलमान धमक्या देतात म्हणून हिंदूंना चीड येई. पैसा टाका नाहीं तर जिवास मुकाल, असली दरवडेखोरी वृत्ति मुसलमानांत फार बळावली आहे असें पुष्कळ हिंदूंना वाटत असे. त्यांना वाटे कीं विरुद्ध पक्षाला जाऊन सामील होण्याची धमकी देऊन जादा अधिकार मिळवण्याची वृत्ति मुसलमानांत वाढत चालली आहे. अशा परिस्थितींत हिंदुराष्ट्रीय भावनांच्या म्हणजे मुसलमानविरोधी जातीय भावनांच्या हिंदुमहासभेला बरेंच महत्त्व प्राप्त झालें. महासभेनें चढाईचें धोरण आंखल्यामुळें प्रतिक्रिया होऊन मुसलमानांची जातीय भावना अधिकच वाढली. अशा प्रकारें क्रिया व प्रतिक्रिया यांची चुरस लागून देशांतील जातीय भावनांचा पारा झपाट्यानें वर चढत गेला. मुळांत देशांतील बहुसंख्याक व अल्पसंख्याक जातींचा हा प्रश्न होता. पण कांहीं ठिकाणीं असा विचित्र प्रकार घडून आला कीं परिस्थितीचीं पारडीं उलटीं फिरलीं. पंजाब व सिंध प्रांतांत हिंदु व शीख ह्या

दोन्ही अल्पसंख्य जाती होत्या. सर्व हिंदुस्थानांत बहुसंख्याक हिंदू आपणाला चिरडून टाकतील असें भय ज्याप्रमाणें मुसलमानांना वाटत असे, तसेंच भय या दोन प्रांतांतील हिंदूंना व शिखांना मुसलमानांच्या बाबतींत वाटूं लागलें. याहून अचूक भाषेंत बोलावयाचें झाल्यास प्रत्येक जातीपैकीं नोकरपेशाच्या मध्यमवर्गीय लोकांना दुसऱ्या जातींतील मध्यमवर्गीय लोक आपणांला पिटाळून लावतील अशी भीति वाटूं लागली व कांहीं अंशीं वरिष्ठवर्गीयांनाहि आपल्या हितसंबंधांवर पाय येईल कीं काय अशी शंका उत्पन्न झाली.

जातीय भावनांची वाढ होत गेल्यामुळें स्वराज्य-पक्ष दुर्बळ झाला. त्यांतील कांहीं मुसलमान सभासद पक्ष सोडून गेले, तर कांहीं हिंदू सभासद राष्ट्रीय पक्षाला जाऊन मिळाले. मालवीय व लालाजी एकत्र आल्याकारणानें हिंदू मतदारांवर त्यांची खूप छाप पडली. जातीय तंट्यांचें माहेरघर असा जो पंजाब प्रान्त तेथें तर लालाजींचें खूपच वजन होतें. स्वराज्य पक्षातर्फे निवडणुकी लढविण्याच्या सर्व कामाचा बोजा माझ्या वडिलांच्याच शिरावर येऊन पडला. या जबाबदारीपैकीं कांहीं वांटा उचलतील तर दासबाबू हयात नव्हते. वडिलांना दोन हात करण्याचा कधींच कंटाळा नव्हता; निदान प्रसंग आला तर त्यांनीं कधीं माघार घेतली नाहीं. विरोधाचा वाढता जोर पाहून त्यांनीं आपलें सर्व बळ निवडणुकीच्या मोहिमेंत खर्च केलें. त्यांना जबरदस्त प्रहार सहन करावे लागले व त्यांनींहि सणसणीत उलट टोले लगावण्यास कमी केलें नाहीं. त्या पक्षयुद्धांत दयेमायेची भाषाच नव्हती! निवडणुकी पार पडल्यानंतर कित्येक कडू जहर आठवणी मागें शिल्लक राहिल्या.

राष्ट्रीय-पक्षाला चांगलें यश मिळालें. पण त्यांच्या यशामुळें कायदे-मंडळांतील राजकीय वातावरण बरेंच मवाळ होत गेलें हें निःसंशय. खुद्द स्वराज्य-पक्ष हा एकंदर कॉंग्रेसच्या मानानें मवाळच होता. आपलें बळ वाढवण्यासाठीं कितीतरी संशयास्पद निष्ठेच्या माणसांना पक्षांत सामील करून घेणें भाग पडून पक्षाचें राजकीय सत्त्व आधींच कमजोर झालें होतें. राष्ट्रीय पक्षानेंहि तेंच धोरण उचललें; पण तसें करतांना तो स्वराज्य-पक्षापेक्षांहि अधिक खालीं उतरला. त्यामुळें पदवीवाले, जमीनदार, कारखानदार वगैरे राजकारणाशीं केवळ ताकापुरता संबंध ठेवणाऱ्या व्यक्तींचा एक सरमिसळ घोळका राष्ट्रीय पक्षांत सामील झाला.

१९२६ च्या अखेरीस एक भयंकर दुःखद प्रसंग घडून येऊन सर्व हिंदुस्थानभर भीतियुक्त तिरस्काराची एक प्रचंड लाट उठली. जातीय भावना वेळ-प्रसंगीं किती हिडिस स्वरूप धारण करते ही गोष्ट त्या प्रसंगानें स्पष्ट झाली. एका धर्मवेड्या मुसलमानानें स्वामी श्रद्धानंदांचा ते बिछान्यावर पडले असतांना खून केला! गुरख्यांच्या संगिनीपुढें आपली छाती उघडी करून जो वीरपुरुष गोळ्यांचा वर्षाव झेलण्यास तयार झाला, त्याला असें मरण यावें अं! सुमारें आठ वर्षांपूर्वी एक आर्यसमाजी पुढारी म्हणून दिल्लीच्या सुविख्यात जुम्मा मशिदीच्या व्यासपीठावरून हिंदु-मुसलमानांच्या

ऐक्याची व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा ह्याच पुरुषानें केली होती. त्या वेळीं अफाट श्रोतृसमुदायानें 'हिंदु-मुसलमान की जय' अशा आरोळ्यांनीं त्यांचें स्वागत केलें व बाहेर रस्त्यावर आपलें रक्त एकत्र सांडून त्या घोषणेची पूर्णता केली. पण आतां स्वतःच्या देशबांधवांकडून मारले गेलेले तेच स्वामी श्रद्धानंद मृत्युशय्येवर पडले होते! आपण करीत आहों हें मोठें पुण्यकर्म आहे, त्यामुळें आपणाला स्वर्गलाभच होणार, अशी त्या मारेकऱ्याची खुळी समजूत होती ह्यांत शंका नाहीं.

सद्ध्येयाच्या पूर्तीसाठीं देहदंड सहन करणारें व मृत्यूलाहि न डगमगणारें असें जें शारीरिक धैर्य, त्याचें मला नेहमींच कौतुक वाटतें आणि आपल्यापैकीं बहुतेकांना माझ्याप्रमाणेंच कौतुक वाटत असेल. ही निर्भय वृत्ति स्वामी श्रद्धानंदांच्या ठिकाणीं उदंड वसत होती. भगव्या वस्त्रांनीं मंडित व वृद्धापकाळाच्या दराऱ्यापुढें यत्किंचितहि न वांकलेला असा त्यांचा भव्य आणि थोराड बांधा, तेजानें धगधगणारे त्यांचे डोळे व कधीं कधीं इतरांची दुर्बलता पाहून त्रासिकपणानें व संतापानें किंचित् काळकुद्ध भासणारी त्यांची ती चर्या—हें त्यांचें चित्र मला किती स्पष्टपणें आठवत आहे! अजूनहि किती वेळां तरी त्यांची प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर उभी असल्याचा मला भास होतो!

# २३

## ब्रुसेल्स येथील जित राष्ट्रांची परिषद

१९२६ च्या अखेरीस मी बर्लिन येथें रहात असतां ब्रुसेल्स येथें लवकरच जित राष्ट्रांची परिषद भरणार असल्याचें मला कळलें. परिषदेची कल्पना मला पसंत पडल्यामुळें हिंदी कॉंग्रेसनेंहि या परिषदेंत अधिकृत भाग घ्यावा असें मीं हिंदुस्थानांत पत्र लिहून कळवलें. माझी सूचना मान्य करण्यांत आली व हिंदुस्थानच्या वतीनें माझी प्रतिनिधि म्हणून निवड करण्यांत आली.

ब्रुसेल्स परिषद १९२७ फेब्रुवारीच्या प्रारंभीं भरली होती. परिषदेची कल्पना प्रथम कोणीं काढली तें मला माहीत नाहीं. त्या काळांत बर्लिन ही बाहेरच्या राजकीय व सामाजिक निर्वासितांची व जहाल गटांची उतारपेठच झाली होती व या बाबतींत तें पॅरिसशीं हलके हलके बरोबरी करूं लागलें होतें. बर्लिनमध्यें कम्युनिस्टांचा जोरहि खूपच होता. जित राष्ट्रांनीं एकजुटीनें कांहीं कार्यक्रम पार पाडावा व जहाल मजूर-पक्षाची व त्यांची एकी व्हावी असे विचार त्या वेळीं बऱ्याच जणांच्या मनांत घोळत होते. स्वातंत्र्याचें युद्ध हें सर्वांनीं मिळून साम्राज्यशाहीबरोबर खेळावयाचें युद्ध आहे, त्यासाठीं एका बैठकीवर जमून विचार करणें व शक्य तर एकसाथ चढाई करणें फार इष्ट आहे, याची जाणीव अधिकाधिक होऊं लागली होती. इंग्लंड, फ्रान्स, इटली वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रें साहजिकच असल्या प्रयत्नांच्या विरुद्ध होतीं. पण महायुद्धानंतर जर्मनीचें साम्राज्य नष्ट झालें, तेव्हां इतरांच्या साम्राज्यांतील वसाहतींतून व पादाक्रांत प्रदेशांतून ज्या चळवळींच्या वावटळी उठत, त्यांच्याकडे जर्मनी साभिलाष तटस्थपणानें पहात राहिला होता. बाहेरचे असंतुष्ट व प्रगमनशील लोक बर्लिनला जमत याचें हें एक कारण आहे. चीनच्या कुओ-मिन्-टांग मधील जहाल गट या सर्व लोकांत विशेष प्रामुख्यानें व धडाडीनें काम करीत असे. चीनमध्यें कुओ-मिन्-टांगची प्रगति झंझावाताच्या वेगानें होत होती व त्याच्या माऱ्याखालीं सरंजामदारीचे महान् वृक्ष उन्मळून पडत आहेत असें दृश्य त्या कालीं दिसत होतें. ह्या देखाव्याचें स्वरूप पाहून साम्राज्यवादी राष्ट्रांनीं आपली नेहमींची बेमुर्वतीची वृत्ति व हुकूमशाही भाषा हीं दोन्ही सोडून दिलीं. चीनच्या स्वातंत्र्याचा व एकीकरणाचा प्रश्न आतां फार वेळ खाणार नाहीं अशीं लक्षणें दिसूं लागलीं. कुओ-मिन्-टांग यशानें धुंद बनली असली, तरी पुढच्या अडचणीहि तिला दिसत होत्या. त्यासाठीं आंतरराष्ट्रीय मतप्रचार करून आपली

बाजू बळकट करावी अशी तिची इच्छा होती. कुओ-मिन्-टांगमधील जहाल पक्षानें बाहेरच्या कम्युनिस्ट व कम्युनिस्टसदृश लोकांचें सहकार्य मिळवून अशा तऱ्हेच्या मत-प्रचाराचा आग्रह धरला असावा. त्यामुळें बाह्य जगांत चीनचें व चीनमध्यें त्यांच्या पक्षाचें बळ वाढणार होतें. कुओ-मिन्-टांगमध्यें तोंपावेतों एकमेकांचे कट्टे वैरी असे दोन तट पडले नव्हते. त्यामुळें वरकरणी तरी कुओ-मिन्-टांग पक्ष एकदिलानें काम करतांना दिसत असे.

जित राष्ट्रांच्या परिषदेची कल्पना कुओ-मिन्-टांगच्या युरोपांतील प्रतिनिधींनीं उचलून धरली. कदाचित् त्यांनीं व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनींच परिषदेची क्लृप्ति काढली असावी. कांहीं कम्युनिस्ट व कम्युनिस्टसदृश कार्यकर्तेहि या प्रयत्नांत अगदीं प्रथमपासून होते. परंतु सर्वसाधारणपणें परिषदेंत कम्युनिस्ट मागें-मागेंच राहिले होते. युनायटेड स्टेट्सच्या आर्थिक साम्राज्यवादामुळें दक्षिण अमेरिकेंतील जनता रुष्ट झाली होती. तेथूनहि परिषदेला चांगला पाठिंबा मिळाला व मदतहि झाली. मेक्सिको देशाला जहाल अध्यक्ष लाभला असल्यामुळें, युनायटेड स्टेट्स्-विरोधी असा दक्षिण अमेरिकेचा गट आपल्या नेतृत्वाखालीं तयार करावा अशी त्यांचीहि फार इच्छा होती. त्यांनीं परिषदेंत अत्यंत उत्साहानें भाग घेतला. तेथील सरकार अधिकृत रीत्या भाग घेईल हें शक्य नव्हतें; पण परिषदेला प्रेक्षक म्हणून सरकारतर्फे एक प्रमुख मुत्सद्दी आला होता.

जावा, इंडो-चायना, पॅलेस्टाइन, सीरिया, इजिप्त या देशांचे आणि उत्तर आफ्रिकेंतील अरबांचे व आफ्रिकेंतील निग्रो लोकांचे प्रतिनिधी त्या त्या देशांच्या राष्ट्रीय संस्थांतर्फे ब्रुसेल्स येथें उपस्थित होते. पुष्कळ जहाल मजूर-संस्थांनीं देखील आपले प्रतिनिधी धाडले होते. ज्यांनीं युरोपांतील मजूर-चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला होता, अशीं कित्येक सुप्रसिद्ध माणसें परिषदेला हजर होतीं. कम्युनिस्टहि परिषदेला आले व त्यांनीं तेथील कार्यक्रमांत महत्त्वाची कामगिरी बजावली. ते परिषदेंत कम्युनिस्ट म्हणून आले नसून कामगार-संघांचे अथवा तत्सदृश संस्थांचे प्रतिनिधी म्हणून आले होते.

जॉर्ज लान्सबरी यांची अध्यक्षस्थानीं निवडणूक झाली व त्यांनीं वक्तृत्वपूर्ण असें भाषण केलें. परिषद म्हणजे जहाल लोकांची कंपूशाही नव्हती आणि कम्युनिझमच्या ध्रुवताऱ्यावर दृष्टि ठेवून परिषदेची नाव पाण्यात लोटण्यांत आली नव्हती ही गोष्ट लान्सबरी यांनीं परिषदेचें अध्यक्षस्थान मंडित केलें एवढ्यावरूनहि सिद्ध होण्यासारखी आहे. कम्युनिस्टांविषयीं परिषदेंतील लोकांच्या मनांत मित्रभाव होता हें मात्र निःसंशय. अनेक बाबतींत त्यांच्याशीं मतभेद दिसून आला, तरी कार्यक्रमाचे कित्येक समान मुद्देहि आढळून आले.

तेथें एक कायम स्वरूपाची संस्था स्थापण्यांत आली. तिचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें लान्सबरींनीं कबूल केलें. ह्या संस्थेचें नांव साम्राज्य-विरोधी लीग.

पण यांत आपली घिसाडघाई झाली असा पश्चात्ताप त्यांना लवकरच झाला असावा. अथवा त्यांच्या मजूर-पक्षांतील सहकाऱ्यांना त्यांचें करणें पटलें नसेल. त्या वेळीं "बादशहांचा विरोधी पक्ष" म्हणून मजूर-पक्ष ओळखला जात असे. लवकरच त्याची प्रगति होऊन "बादशहांचें मंत्रिमंडळ" बनवण्याचा मान त्यांच्या पक्षाला मिळावयाचा होता. तेव्हां मंत्रि-मंडळाच्या भावी सभासदांनीं असल्या साहसी व क्रान्तिकारी राजकारणाच्या कार्यांत हात विटाळून घेऊन कसें चालेल? फार काम असल्याचें निमित्त सांगून लान्सबरींनीं लीगच्या अध्यक्षपदाचा राजिनामा दिला. एवढ्यानेंच भागलें नाहीं. त्यांनीं लीगच्या सभासदत्वाचाहि राजिनामा देऊन टाकला. केवळ दोनतीन महिन्यांपूर्वी ज्या गृहस्थांच्या भाषणाचें मीं कौतुक केलें, त्यांच्यांत इतका फरक अभावितपणें पडलेला पाहून मला खेद वाटला.

तथापि साम्राज्यविरोधी लीगच्या आश्रयदात्यांत पुष्कळच थोरथोर व्यक्तींचा समावेश झालेला होता. आइन्स्टिन, मादाम सन्यत्सेन व मला वाटतें रोमाँ रोलाँ ह्यांचा समावेश आश्रयदात्यांमध्यें झालेला होता. बऱ्याच महिन्यांनंतर अरब-ज्यूंच्या तंट्यांत लीगनें अरबांचा पक्ष उचलला म्हणून आइन्स्टिननीं राजिनामा दिला.

वसाहतीच्या व इतर परावलंबी देशांतील प्रश्नांची ओळख होण्याच्या कामीं ब्रुसेल्स येथील परिषद व नंतर लीगच्या समितीच्या ठिकठिकाणीं भरलेल्या बैठकी यांची मला फार मदत झाली. पाश्चात्य मजूर-चळवळींतील विरोधी पक्षांचें अन्तरंग मला त्यामुळें कळून आलें. त्यांच्यासंबंधीं मला आधीं थोडीशी माहिती होतीच, व मीं त्याविषयीं वाचलेंहि होतें. पण प्रत्यक्ष संबंध कांहींच आला नसल्यानें माझ्या माहितीला वस्तुस्थितीविषयक ज्ञानाचा आधार मिळालेला नव्हता. दुसऱ्या व तिसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनांपैकीं तिसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनेचा मी चाहता होतों. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनेची महायुद्धापासून पुढची सगळी कारकीर्द पाहून मला अगदीं तिटकारा आलेला होता. तिचा मोठ्यांतला मोठा आधार जो ब्रिटिश मजूर-पक्ष त्याची आम्हां हिंदी लोकांना तर चांगलीच ओळख पटलेली होती. त्यामुळें ओघानेंच मी कम्युनिझम्‌कडे वळलों. त्यांत कांहींहि वैगुण्य असलें तरी तो निदान दांभिक व साम्राज्यवादी तरी नव्हता. कम्युनिझम्‌-विषयींची माझी निष्ठा शास्त्राधिष्ठित नव्हती; कारण कम्युनिझम्‌मधील गहन सिद्धांतां-संबंधीं मला विशेष ज्ञान नव्हतें. कम्युनिझम्‌मधील ठळक ठळक मुद्द्यांशीं मात्र माझा परिचय झाला होता. त्यामुळें व रशियांत सुरू असलेल्या अश्रुतपूर्व घडामोडींमुळें माझें लक्ष कम्युनिझम्‌कडे वेधलें. परंतु कम्युनिझम्‌ची हुकूमशाही, कम्यु-निस्टांची चढेलपणाची व अशिष्टपणाची कार्यपद्धति, स्वतःशीं मतैक्य नसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा धिक्कार करण्याचा त्यांचा स्वभाव वगैरे गोष्टींची मला अनेकदां चीड येत असे. कम्युनिस्ट अर्थातच असें म्हणतील, कीं माझ्या पांढरपेशा शिक्षणा-मुळें व वळणामुळें माझ्या बाबतींत ह्या अशा मानसिक प्रतिक्रिया व्हावयाच्याच.

गोष्ट जरा चमत्कारिक वाटेल; पण साम्राज्यविरोधी समितीच्या सभांतून किरकोळ मुद्द्यांवर माझें मत इंग्रजी व अमेरिकन सभासदांच्या बाजूला असल्याचें दिसून येई. कार्यपद्धतीविषयीं तरी माझ्या व त्यांच्या दृष्टिकोणांत बरेंच साम्य होतें. बाताड्या व चऱ्हाटी ठरावांना आमची हरकत असे. ठराव साधे व सुटसुटीत असावेत असें आम्हांला वाटे; पण युरोपांतील परंपरा निराळी दिसली. समिती-मध्यें कम्युनिस्टांत व इतरांत पुष्कळदां मतभेद होत. पण बहुधा कांहींतरी तडजोड निघत असे. पुढें आमच्यापैकीं कांहींजण घरोघर परतले. त्यामुळें समितीच्या बैठकींना हजर राहणें तदनंतर शक्य झालें नाहीं.

ब्रुसेल्स येथील परिषदेमुळें साम्राज्यवादी राष्ट्रांच्या परराष्ट्रीय व वसाहत-खात्यांची बरीच तारांबळ उडाली होती. परिषदेवर त्यांनीं बारीक नजर ठेवली होती. ब्रिटिश परराष्ट्रीय खात्यांपैकीं सुप्रसिद्ध लेखक "आंगुर" यानें आपल्या पुस्तकांत ह्या परिषदेबद्दल अद्भुत व क्वचित् हास्यास्पद अशी माहिती दिलेली आहे. खुद्द कॉंग्रेसच्या अधिवेशनांत आंतरराष्ट्रीय हेरांचें पेंव फुटलें होतें. पुष्कळ प्रतिनिधी तर हेर खात्याचेच प्रतिनिधी असावेत! पुढें यासंबंधीं आम्हांला एक मोठा मजेदार अनुभव आला. फ्रेंच हेर खात्यांतील एक गृहस्थ माझ्या अमेरिकन मित्राला तो पॅरिस येथें रहात असतां भेटण्यासाठीं आला. कांहीं गोष्टींसंबंधीं विचारपूस करण्याकरतां तो सहजगत्या आला होता. चौकशी झाल्यावर "तुम्हीं मला ओळखलें का? आपली पूर्वी भेट झालेली आहे." असें त्यानें म्हटलें. खूप निरखून पाहिल्यावरहि माझ्या मित्राला त्याची ओळख पटेना. मग त्या हेरानें आठवण दिली, कीं "ब्रुसेल्स परिषदेच्या वेळीं मी एक निग्रो प्रतिनिधि म्हणून तेथें आलों असतां आपली भेट झाली होती. तोंड, हात वगैरे सर्व अंग मीं त्या वेळीं काळें करून घेतलें होतें!"

समितीची एक बैठक कलोन येथें झाली. तेथें मी उपस्थित होतों. बैठक संपल्यावर जवळच ड्युसेलडॉर्फ येथें सॅक्को व्हॅनझेट्टी यांच्याबद्दल एक सभा भरणार होती तेथें यावें म्हणून आम्हांला विनंति करण्यांत आली. सभेहून परत येत असतां पोलिसांनीं परवान्याबद्दल हटकलें. बहुतेकांपाशीं परवाने होते. माझा परवाना मात्र कलोन येथें हॉटेलमध्येंच राहिला होता. ड्युसेलडॉर्फ येथें फक्त कांहीं तासच घालवा-वयाचे असल्यामुळें मीं तो बरोबर घेतला नव्हता. झालें, मला पोलिसचौकीवर नेण्यांत आलें. सुदैवानें तेथेंहि कांहीं समानशील भेटलेच. एक इंग्रज गृहस्थ व त्यांच्या पत्नी यांचेहि परवाने कलोनलाच राहिले होते. एका तासानें पोलिस-अधिकाऱ्यांनीं आम्हांला निरोप दिला.

नंतरच्या काळांत साम्राज्यविरोधी लीग कम्युनिझमच्या बाजूला अधिका-धिक झुकत गेली. तथापि तिचें व्यक्तित्व कधींच नष्ट झालें नाहीं. माझा फक्त पत्रद्वारेंच लीगशीं संबंध येत असे. १९३१ सालीं गांधी–अर्विन तहनाम्याच्या बाबतींत मीं जो भाग घेतला, त्याबद्दल लीगचा माझ्यावर अत्यंत रोष होऊन मला

बहिष्कृत करण्यांत आलें; म्हणजे कसला तरी एक ठराव करून मला लीगच्या बाहेर घालविण्यांत आलें. त्यांना राग आला तो साहजिकच होता. परंतु माझ्या धोरणाचें स्पष्टीकरण करण्याची संधि तरी त्यांनीं मला द्यावयाला हवी होती.

१९२७ च्या उन्हाळ्यांत माझे वडील युरोपमध्यें आले. मी त्यांना व्हेनिस येथें भेटलों. नंतर कित्येक महिनेपर्यंत आम्ही एके ठिकाणींच रहात होतों. वडील, माझी पत्नी, माझी धाकटी बहीण व मी असे सर्वजण सोव्हिएट रशियाच्या १० व्या वाढदिवसाच्या समारंभासाठीं नोव्हेंबर महिन्यांत मास्को येथें गेलों. मास्कोंत आम्हीं फक्त तीन किंवा चारच दिवस मुक्काम केला. मास्कोला जाण्याचेंसुद्धां अगदीं शेवटच्या क्षणीं ठरलें. पण आम्ही गेलों. त्याचा आम्हांला नंतर फार आनंद झाला. कारण तेथें जें कांहीं अल्पस्वल्प पहावयाला सांपडलें, तें सुद्धां फार महत्त्वाचें होतें. नव्या रशियासंबंधीं आम्हांला विशेष बोध झाला नाहीं आणि इतक्या थोड्या दिवसांच्या भेटींत तो होणेंहि शक्य नव्हतें: पण तेथील सर्वच सोव्हिएट व सांघिक कल्पना माझ्या वडिलांना अजिबात नवीन अशा वाटल्या. त्यांचें सगळें शिक्षण कायद्याच्या व सनदशीर राजकारणाच्या चौकटींत झालेलें असल्यामुळें त्या चौकटींतून स्वतःची सुटका करून घेणें त्यांना फार अवघड होत असे. पण मास्को येथें पाहिलेल्या दृश्यांचा त्यांच्या मनावर खूपच परिणाम झाला.

सायमन-कमिशनची घोषणा झाली तेव्हां आम्ही मास्को येथें होतों व त्यासंबंधींची बातमी आम्हीं मास्कोच्या वृत्तपत्रांतच प्रथम वाचली. नंतर कांहीं दिवसांनीं एका अपिलाच्या कामीं वडिलांना लंडन येथें जावें लागलें. सर जॉन सायमन हे त्या कामांतील त्यांचे सहकारी होते या फिर्यादीच्या बाबतींत हिंदुस्थानांत मींहि पुष्कळ वर्षांपूर्वीं काम चालवलें होतें. परंतु नतर माझा त्यांच्याशीं कांहीं संबंध राहिला नाहीं. तरी सायमन ह्यांनीं सूचना केल्यावरून मी त्यांच्या कचेरींत वडिलांच्या बरोबर विचार-विनिमयासाठीं गेलों होतों.

युरोपांतील आमचें वास्तव्य अपेक्षेबाहेर लांबलें. १९२७ साल संपत आलें होतें. वडील युरोपांत आले नसते तर आम्ही कदाचित् लवकरहि हिंदुस्थानकडे वळलों असतों. परत जातांना युरोपच्या आग्नेय भागांत व तुर्कस्तान आणि इजिप्त-मध्यें कांहीं दिवस घालवावेत असा बेत आम्हीं योजला होता. पण त्यासाठीं वेळच उरला नाहीं; कारण मद्रास येथें भरणाऱ्या कॉंग्रेस-अधिवेशनासाठीं वेळेवर पोंचण्याची मला उत्सुकता लागून राहिली होती. आम्ही मार्सेलसहून कोलंबोला गेलों. वडील मात्र आणखी तीन महिने युरोपांतच राहिले.

२४

# पुनरागमन व पुनश्च राजकारण

मी युरोपहून परतलों तेव्हां माझें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम प्रकारचें होतें. माझी पत्नी अद्यापि साफ बरी झाली नसली, तरी तिच्या प्रकृतींत पुष्कळच सुधारणा झाली असल्याकारणानें तिच्याबद्दल मला काळजी करण्याचें कारण राहिलें नाहीं. माझ्या उत्साहाला व चैतन्याला बहर आला असून मनांतील विरोधाच्या व वैकल्याच्या भावनांचा कोलाहल शांत झाल्यामुळें कांहीं काळ तरी चित्त प्रसन्न झालें होतें. माझी दृष्टि फांकून केवळ राष्ट्रवाद हा खात्रीनेंच अपुरा व संकुचित आहे असें वाटूं लागलें. राजकीय स्वातंत्र्य अवश्यमेव पाहिजे ह्यांत शंका नाहीं; पण योग्य स्थळाकडे नेणारी एक वाट, एवढेंच तिचें महत्त्व. सामाजिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय व समाजाचें व शासनयंत्राचें स्वरूप समाजवादानुसारी बनवल्याशिवाय देशाचा अगर व्यक्तीचा फारसा उद्धार होणें अशक्य असें वाटूं लागलें. जागतिक व्यवहाराविषयीं मला अधिक स्पष्ट कल्पना आली व सदोदित बदलणाऱ्या आधुनिक जगाचें मर्म मला जास्त चांगल्या तऱ्हेनें समजूं लागलें. फक्त चालू उलाढाली व राजकारण यांच्यासंबंधीं मीं खूप वाचलें होतें असें नव्हे, तर माझ्या आवडीच्या सांस्कृतिक व शास्त्रीय विषयांचेंहि मीं खूप वाचन केलेलें होतें. युरोपांत व अमेरिकेत कल्पनेला चकित करून सोडणारे जे राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक फेरबदल फार मोठ्या प्रमाणावर घडून येत होते, त्यांचा अभ्यास करणें मला अतिशय आनंदप्रद वाटत असे. कांहीं दुःखद घटना घडतांना दिसत असल्या, तरी सोव्हिएट रशियाबद्दल माझ्या मनांत प्रेम उत्पन्न होऊन जगाला देण्यासारखा कांहींतरी संदेश रशियापाशीं आहे असें माझें मन सांगूं लागलें. या शतकाच्या तिसऱ्या दशकांत आपली स्थिति सुधारण्यासाठीं युरोपचे प्रयत्न सुरू होते. आर्थिक मंदीचा काळ अजून लांब होता; पण परत यावयाच्या वेळीं माझी खात्री होऊन चुकली, कीं युरोपमध्यें स्वस्थता राखण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत ते नुसते वरपांगी असून युरोपांत व जगांत लवकरच मोठमोठे स्फोट व उलथापालथी होणार; त्या टळत नाहींत. हे जागतिक धरणीकंपाचे आंचके बसूं लागतील त्या वेळीं त्यांच्या प्रतिकारासाठीं आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या देशाची तयारी करणें हेंच आमचें प्रथम कर्तव्य होय. ही जी तयारी करावयाची, ती या विचारसरणीच्या दृष्टीनें करणें अवश्य होतें. राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या बाबतींत कोणतीहि संदिग्धता उरूं न देतां राजकीय स्वातंत्र्य हेंच एक ध्येय आम्हांला

आमच्या पुढें ठेवतां येण्यासारखें आहे, ह्याची स्पष्ट जाणीव व्हावयाला हवी होती. ह्या ध्येयांत व साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्यासंबंधीं प्रचलित असणाऱ्या संदिग्ध व संकीर्ण मतांत मूलतः भेद आहे. तदनंतर सामाजिक ध्येयाचा विचार. ह्या बाबतींत त्या काळची कॉंग्रेस जहाल धोरण स्वीकारील अशी अपेक्षा करणें योग्य ठरलें नसतें. कॉंग्रेस ही सर्वस्वीं राजकीय व राष्ट्रीय संस्था असून इतर गोष्टींचा विचार करण्याचा तिला अभ्यास नसला, तरी देखील प्रारंभ करून पाहण्याला हरकत नव्हती. कॉंग्रेसच्या बाहेर जी मजूर-मंडळी व तरुण मंडळी होती, त्यांच्यामध्यें सामाजिक ध्येयाच्या कल्पनेचा जोरदार प्रसार करणें अधिक सोपें होतें. तें काम करतां यावें म्हणून कॉंग्रेसमधील अधिकारपदाच्या लोढण्यापासून दूर राहण्याची माझी इच्छा होती. लांब खेडेगांवांत कांहीं महिने घालवून तेथील परिस्थिति अभ्यासावी अशीहि एक अस्फुट कल्पना माझ्या मनांत होती; पण हें घडावयाचें नव्हतें. प्रसंगच असे निर्माण होत गेले, कीं कॉंग्रेस-राजकारणाच्या अगदीं ऐन भोंवऱ्यांत मी खेंचला गेलों.

मद्रासला पाय ठेवतों तोंच राजकारणाच्या चक्रांत मी गुरफटलों. स्वातंत्र्य, युद्धसंभाव्यता व साम्राज्यविरोधी लीग यांच्या बाबतींत वर्किंग कमिटीपुढें मीं ठरावांचें एक भेंडोळेंच नेऊन ठेवलें! त्यांपैकीं बहुतेक सर्वांचा स्वीकार होऊन वर्किंग कमिटीचे अधिकृत ठराव म्हणून ते मांडण्यांत यावेत असें ठरलें व खुल्या अधिवेशनांत ते ठराव मांडण्याचें काम माझ्यावर सोंपवण्यांत आलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांपैकीं सर्व ठराव जवळजवळ एकमतानें मंजूर झाले. स्वातंत्र्याच्या ठरावाला बेझंटबाईंनींसुद्धां पाठिंबा दिला. ठरावांना अशा तऱ्हेनें सार्वत्रिक पाठिंबा मिळाला ही मोठी समाधानाची गोष्ट होती. पण ठरावांचें खरें मर्म प्रतिनिधींच्या लक्षांत तरी आलें नसावें अथवा त्यांतील अर्थाचा विपर्यास तरी करण्यांत आला असावा, असा संशय येऊन मन त्रस्त झालें. माझा संशय किती योग्य होता ह्याचें थोड्याच दिवसांत प्रत्यंतरहि मिळालें. स्वातंत्र्याच्या ठरावाचा अर्थ काय ह्यावरच मतभेद होऊं लागले. माझे ठराव कॉंग्रेसच्या नेहमींच्या ठरावांहून कांहींसे भिन्न होते. एक नवीन दृष्टि त्यांत अंतर्भूत झालेली होती. पुष्कळ कॉंग्रेसवाल्यांना ते खासच आवडले. कांहींच्या मनांत त्यांच्याविषयीं अस्पष्ट अशी नापसंती उत्पन्न झाली असली, तरी ठरावांना त्यांनीं विरोध करावा इतकी ती तीव्र नव्हती. कदाचित् त्यांना असेंहि वाटलें असेल कीं हे केवळ पुस्तकी ठराव आहेत. त्यांच्यापासून कोणत्याहि प्रकारें नफा ना नुकसान! ते एकदां पास केले कीं भगभग मिटली! मग अधिक महत्त्वाच्या कामाकडे वळण्याला हरकत नाहीं! एक दोन वर्षांनंतर पास करण्यांत आलेला स्वातंत्र्याचा ठराव कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याविषयीं जी एक चैतन्यमय व दुर्दम्य अशी तळमळ उत्पन्न झाली होती तिचा निदर्शक होता. पण मद्रास येथील परिस्थिति वेगळी होती. तेथील ठराव म्हणजे लोकांच्या मनांत बीजरूपानें वसत असलेल्या व क्रमशः वाढत जाणाऱ्या भावनांचें केवळ प्रतिबिंब होता.

गांधीजी त्या वेळीं मद्रासलाच होते. ते खुल्या अधिवेशनाला हजर राहिले. परंतु धोरण आंखण्याच्या कामीं त्यांनीं भाग घेतला नाहीं. स्वतः वर्किंग कमिटीचे सभासद असूनहि तिच्या बैठकींच्या वेळीं ते हजर देखील रहात नव्हते. स्वराज्य-पक्ष कॉंग्रेस-मध्यें प्रभावी झाल्या दिवसापासून राजकारणांत ते सामान्यतः याच धोरणानें वागत असत. तथापि त्यांचा सल्ला मात्र नेहमीं घेण्यांत येई. त्यांना कळविल्याशिवाय सहसा कोणतीच महत्त्वाची गोष्ट घडत नसे. मीं कॉंग्रेसपुढें मांडलेले ठराव त्यांच्या पसंतीला कितपत उतरले तें मला माहिती नाहीं; पण मला असें वाटतें कीं त्यांना ते मान्य झाले नसावेत. ठरावांतील भाषा नव्हे, तर त्या ठरावांत व्यक्त होणारा दृष्टिकोण व ठरावांची एकंदर घडण हीच त्यांना नापसंत वाटली असावी. तथापि कोणत्याहि प्रसंगीं ठरावांवर त्यांनीं प्रतिकूल टीका केली नाहीं. कॉंग्रेसच्या वेळीं माझे वडील युरोपांतच होते.

त्याच अधिवेशनांत सायमन-कमिशनच्या निषेधाचा व त्यावरील बहिष्काराचा ठराव चर्चेला निघाला असतां स्वातंत्र्याच्या ठरावाचें अवास्तविक स्वरूप उघड झालें. सायमन-कमिशनच्या तोडीला तोड म्हणून एक सर्वपक्षीय परिषद बोलावावी व तिनें हिंदुस्थानसाठीं एक राज्यघटना तयार करावी असें ठरलें. त्याकरितां ज्या नेमस्त गटांबरोबर सहकार्य करावें लागणार, त्यांना स्वातंत्र्याची विचारसरणी कधींच मान्य झाली नसती ही गोष्ट स्पष्टच होती. त्यांची मोठ्यांत मोठी उडी म्हणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्य.

मी पुन्हां एकवार कॉंग्रेसचा चिटणीस झालों. त्याला वैयक्तिक कारणें होतीं. कॉंग्रेसचे त्या वर्षीचे अध्यक्ष डॉ. अन्सारी ह्यांचा व माझा दाट स्नेह होता. शिवाय माझे बरेचसे ठराव पास झालेले असल्याकारणानें ते तडीला पोंचवण्यासाठीं काम करणेंहि अवश्य झालें होतें. सर्वपक्षीय परिषदेच्या ठरावामुळें माझ्या ठरावांना हरताळ फांसला गेला ही गोष्ट खरी. तथापि सर्वच खटाटोप वायां गेला होता असें नव्हे. मीं अधिकाराची जागा पुन्हां स्वीकारली ह्यांतील इंगित असें कीं सर्वपक्षीय परिषदेच्या द्वारा अगर इतर कांहीं सबबींचें निमित्त करून कॉंग्रेस अधिक नेमस्त मताच्या व तडजोडीच्या घसरणीला लागेल अशी मला मनांतून भीति वाटत होती. कॉंग्रेस संदेहांत पडलेली असून ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ती गोते खात होती. माझी मनीषा अशी कीं लंबक नेमस्त वृत्तीच्या बिंदूकडे झुकूं लागला, तर आपण त्याला प्रतिरोध करावा व स्वातंत्र्याच्या ध्येयापासून त्याला चळूं देऊं नये. कॉंग्रेसची पर्वणी साधून नेहमीं पुष्कळच उपसमारंभ उरकण्यांत येत असतात. अशांपैकीं एक उपसमारंभ म्हणजे मद्रास येथें प्रथमच भरलेली लोकसत्ता-परिषद (रिपब्लिकन् कॉन्फरन्स). तिचें अध्यक्षपद स्वीकारण्याची मला विनंति करण्यांत आली. मी लोकसत्तावादी असल्यामुळें मला ही कल्पना ग्राह्य वाटली. पण ह्या परिषदेचे सूत्रचालक कोण तें मला ठाऊक नव्हतें. एकाद्या उपटसुंभ संस्थेशीं संबंध जोडण्याची माझी

तयारी नव्हती. त्यामुळें अध्यक्ष व्हावें कीं नाहीं याबद्दल माझा निश्चय होईना. अखेरीस मी अध्यक्ष झालों. पण मला पश्चात्ताप करण्याची पाळी आली; कारण इतर पुष्कळ संस्थांप्रमाणें ही परिषदहि उपजल्याबरोबर मेली! आपले लोक नवीं नवीं कार्यें सुरू करण्याच्या कामांत अतिशय उतावळेपणा दाखवतात आणि नंतर सुरू केलेल्या कामांकडे दुर्लक्ष करून त्यांना गंगेंत सोडून देतात ही वृत्ति मोठी विलक्षण आहे. आम्ही प्रारंभशूर आहोंत, आमच्यांत चिकाटी नाहीं हा जो आरोप आम्हांवर करण्यांत येतो, त्यांत बराच तथ्यांश आहे.

कॉंग्रेस आटोपल्यावर मद्रासहून निघण्याच्या पूर्वींच हकीम अजमलखान मरण पावल्याची बातमी येऊन पोंचली. कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांची कॉंग्रेसच्या वृद्ध पुढाऱ्यांत गणना होत असे; पण त्यांचा अधिकार ह्यापेक्षां अधिक होता. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांत त्यांना विशेषच स्थान मिळालेलें होतें. आधुनिक विचार-सरणीचा लवमात्रहि संसर्ग नसलेल्या व मोंगल सम्राटांच्या दिल्लींतील विशिष्ट संस्कृतींत अगदीं मुरून गेलेल्या अशा जुन्या पद्धतीनेंच त्यांचें शिक्षण झालेलें होतें. त्यांचें अभिजात सौजन्य, धीमा आवाज, व गभीर विनोद अनुभवण्यांत व ऐकण्यांत मोठी मौज होती. वागण्या-सवरण्यांत पूर्वींच्या पद्धतीचा सरदारी बाणा त्यांच्या ठिकाणीं दिसून येई. राजाला शोभेल असें त्यांचें रूप व वर्तन होतें. मोंगल बाद-शहांचीं जीं छोटीं चित्रें पाहण्यांत येतात, त्यांतील चेहऱ्यांशीं हकीम साहेबांच्या चेह-ऱ्याचें पुष्कळच साम्य होतें. असा माणूस सहसा राजकारणाच्या धकाधकींत पडा-वयाचा नाहीं. चळवळ्यांच्या नव्या पिढीपासून त्रास पोंहचूं लागल्यामुळें येथील राज्यकर्त्या ब्रिटिशांनाहि अशीं जुन्या वळणाचीं माणसें गेल्याबद्दल हळहळ वाटत असेल! तरुणपणीं हकीमसाहेबांनीं राजकारणाची उठाठेव कधीं केली नाहीं. वैद्यांच्या प्रसिद्ध घराण्यांतील ते कर्ते पुरुष होते. आपला जगड्व्याळ धंदा संभाळण्यांत ते मग्न असत. महायुद्धाच्या उत्तर काळांत घडलेले प्रसंग व त्यांचे जुने सहकारी स्नेही डॉ. अन्सारी यांच्या प्रवासाचा परिणाम हे दुहेरी बंध त्यांच्याभोंवतीं पडून ते हळूहळू कॉंग्रेसकडे ओढले जात होते. नंतर पंजाबचा लष्करी कायदा व खिलाफत-प्रकरण उद्भवून त्यांचें मन खडबडून जागें झालें व गांधींच्या असहकारितेच्या पद्धतीचा त्यांनीं मोठ्या खुषानें अंगीकार केला. त्यांच्या येण्यानें कॉंग्रेसमध्यें मोठी बहुमोल व दुर्मीळ अशी भर पडली. नव्या व जुन्या पिढ्यांचे दुवे त्यांच्यामुळें जोडले जाऊन राष्ट्रीय कार्याच्या रथाला त्यांनीं जुन्या पिढीची निष्ठा आणून जोडली. त्यामुळें दोन पिढ्यांत एक-सूत्रीपणा आला व चळवळीच्या बिनीवर असणाऱ्यांची शक्ति व धीमेपणा वाढला. हिंदु-मुसलमानांना निकट आणण्याच्या कामीं त्यांना बरेंच यश आलें. कारण हिंदु व मुसलमान दोन्ही जातींना त्यांच्याविषयीं पूज्यभाव असल्यामुळें त्यांनीं घालून दिलेल्या उदाहरणाचा परिणाम दोघांवरहि झाल्यावांचून रहात नसे. गांधीजींच्या जिवलग मित्रावळींत त्यांना स्थान मिळालें होतें. हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाच्या बाबतींत ते सांगतील

तो शब्द गांधीजी प्रमाण मानीत असत. माझ्या वडिलांचा व हकीमसाहेबांचा खूपच दाट स्नेह होता.

माझें शिक्षण सदोष पद्धतीनें झाल्यामुळें व माझी पार्श्वभूमि सामान्यतः पर्शियन संस्कृतीनें रंगलेली असल्यामुळें मला हिंदूंच्या भावना जाणतां येत नाहींत असा हिंदुमहासभेच्या कांहीं पुढाऱ्यांनीं माझ्यावर गेल्या वर्षी आक्षेप घेतला होता. माझ्यापाशीं संस्कृति म्हणून कांहीं आहे, कीं मला संस्कृतीचा गंधहि नाहीं तें सांगणें कठिण आहे. पण ही गोष्ट खरी कीं माझ्या वडिलांचें शिक्षण हिंदी-पर्शियन संस्कृतीच्या वातावरणांत झालें. तिची परंपरा जुन्या दिल्लीदरबारपासून चालत आलेली आहे. ह्या विनाशकाळांतहि दिल्ली व लखनौ हीं शहरें मोंगली परंपरेचीं मुख्य केंद्रें समजण्यांत येतात. अन्य लोकांशीं समरस होण्याची हातोटी काश्मीरी ब्राह्मणांना उत्तम प्रकारें साधलेली आहे. काश्मीरांतून खालीं उतरल्यावर इंडो-पर्शियन संस्कृतीचा पगडा सर्वत्र बसलेला त्यांना आढळल्यामुळें त्यांनीं तीच संस्कृति स्वीकारली व पर्शियन आणि उर्दूचे अनेक पंडित काश्मीरी ब्राह्मणांत उदयास आले. नंतर जमाना बदलून इंग्रजी ज्ञान व पाश्चात्य चालीरीती आवश्यक होऊं लागल्याचें पाहून त्यांनीं या नव्या प्रवाहांत नाव ढकलावयाची असें ठरवलें. तरी अद्यापीहि हिंदुस्थानांत काश्मीरी ब्राह्मणांमध्यें अनेक पर्शियन पंडित विद्यमान आहेत. दोनच नांवें सांगावयाचीं तर सर तेजबहादुर सप्रू व राजा नरेंद्रनाथ यांचीं सांगतां येतील.

तात्पर्य असें कीं, हकीमसाहेब व माझे वडील यांच्यांत समान भूमिका बरीचशी होती; त्यांनीं कांहीं जुने कौटुंबिक घरोब्याचे धागेदोरेहि हुडकून काढले व त्यांचा गाढ स्नेह जमला. ते एकमेकांना भाईसाहेब अशी हांक मारीत. त्यांच्या परस्परसंबंधांत राजकारणाचा दुवा हा अगदींच क्षुल्लक म्हटला पाहिजे. हकीमसाहेबांचे घरगुती आचारविचार मात्र कमालीचे पुराणप्रिय असत. त्यांना अथवा त्यांच्या कौटुंबियांना जुन्या चाकोरींतून बाहेर पडणें मुष्किलीचें झालें होतें. त्यांच्या कुटुंबांतल्याइतकी कडक पडद्याची चाल मीं कोठेंच पाहिलेली नाहीं. तरीहि देशांतील स्त्रियांनीं स्वतःचें विमोचन करून घेतल्याशिवाय कोणत्याहि देशाची उन्नति होणें शक्य नाहीं, याबद्दल हकीमजींच्या मनांत किमपीहि संदेह नव्हता, ही गोष्ट त्यांनीं माझ्या मानावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्ययुद्धांत तुर्की स्त्रियांनीं बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांना वाटणारी धन्यता ते उघड बोलून दाखवीत. ते म्हणत कीं केमालपाशा यशस्वी होण्याचें मुख्य कारण स्त्रियांनीं बजावलेली कामगिरी हेंच होय.

हकीम अजमलखान यांच्या मृत्यूमुळें कॉंग्रेसवर जबरदस्त आघात झाला. कॉंग्रेसचा एक खंबीरांतला खंबीर आधार तुटल्याप्रमाणें झालें. आतां दिल्लीला गेलें कीं आम्हां सर्वांना तेथें कांहींतरी उणेपणा भासतो; कारण दिल्लीचें नांव उच्चारलें कीं हकीमजी व त्यांचें बिलिमारणमधील घर यांची हटकून आठवण व्हावयाचीच.

१९२८ साल राजकीय घडामोडींनीं समृद्ध असें होतें. सर्व देशभर खूप धामधूम चालू होती. कांहीं एक नवी प्रेरणा लोकांना पुढें ढकलीत होती. अगदीं निरनिराळ्या अशा गटांत एकाच वेळीं कांहींतरी नवीन चैतन्य दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें होतें. मी कित्येक महिने देशाबाहेर होतों. त्या काळांत हा बदल हळूहळू होत गेला असावा व तो परत आल्यावर साकल्यानें माझ्या दृष्टीस पडला असावा. १९२६ च्या प्रारंभीं हिंदुस्थान निश्चेष्ट व प्रतिकारशून्य असा दिसत होता. १९१९-२२ च्या धक्क्यांतून तो अद्यापि पूर्ण सांवरला नसावा. तोच देश १९२८ सालीं ताजा-तवाना, चैतन्यमय व उत्साहानें मुसमुसत असलेला असा दिसला. कारखान्यांतील मजुरांत, शेतकऱ्यांत, मध्यमवर्गीय तरुणांत व सर्वसाधारणतः पांढरपेशांत, जिकडे तिकडे ह्या नव्या तेजोलहरींची चमक दिसून येत होती.

ट्रेड युनियन चळवळीची चांगली प्रगति झाली होती व सात-आठ वर्षांपूर्वींच प्रस्थापित झालेली अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस सामर्थ्यवान् व प्रातिनिधिक अशी संस्था बनली होती. त्यांत सामील झालेल्या संघांची संख्या व संघटना वाढली; इतकेंच नव्हे, तर ट्रे. यु. कॉंग्रेसची विचारसरणी अधिकाधिक मूलग्राही व लढाऊ अशी बनत चालली. संपांचें प्रमाण चढतें होतें व वर्गजागृतीची वाढ होत होती. गिरणी-मजूर व रेल्वे-मजूर यांच्या संघटना सर्वांत सरस होत्या. त्यांतल्या त्यांत अतिशय बलिष्ठ व अत्यंत पुढारलेल्या संघटना म्हणजे मुंबईच्या गिरणी-कामगार-युनियन व जी. आय. पी. रेल्वे-युनियन ह्या होत. कामगार-संघांच्या प्रगतीबरोबर अतःस्थ कलहाचीं व फाटाफुटीचीं बीजेंदेखील पाश्चात्य देशांतून इकडे आलींच होतीं. त्यामुळें ट्रेड युनियन-चळवळ खंबीर पायावर उभी राहते न राहते तोंच तिच्यांत विरोधी तट पडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कॉंग्रेसपैकीं कांहींजण दुसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनेच्या बाजूचे होते, तर कांहीं तिसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनेच्या बाजूनें बोलत असत. कांहींजण बोलून चालून सुधरणावादी दृष्टिकोणानें काम करणारे, तर कांहीं उघड उघड क्रान्तिवादी व मूलग्राही पुनर्घटनेचे कैवारी. दोन गटांच्या दरम्यान पुष्कळ ठळक-फिके मतप्रकार दिसून येत. जनतासंघटनांत सर्वत्र आढळून येणारीं संधिसाधू बाजारबुणगीं मजूर-संघटनांतूनहि शिरलीं होतींच.

शेतकरीसुद्धां हातपाय हालवूं लागला होता. संयुक्तप्रांत व विशेषतः औध भागांत जागृति विशेष आढळत होती. गाऱ्हाणीं मांडण्यासाठीं किसानांच्या मोठ-मोठ्या सभा नित्य होऊं लागल्या. नव्या औध-कुळांच्या कायद्यानें कुळांना तहहयात हक्क दिले असले, तरी त्यांचें नष्टचर्य दूर करण्याच्या दृष्टीनें त्या कायद्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. गुजरातमध्यें शेतकरी व सरकार यांच्यामध्यें सारावाढीच्या प्रकरणीं मोठाच लढा जुंपून राहिला होता. तेथें रयतवारी पद्धति असल्यामुळें शेतकऱ्यांचा व सरकारचा साक्षात् संबंध येत असतो. सरदार वल्लभभाई पटेलांच्या नेतृत्वाखालीं चाललेला हा लढा बार्डोली-सत्याग्रह या नांवानें ओळखला जातो.

लढा अशा शर्थीनें लढवला गेला, कीं सर्व हिंदुस्थानचे डोळे गुजरातकडे लागून राहिले होते. बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं बरेंच यश संपादन केलें. तथापि त्यांच्या सत्याग्रहामुळें सर्व देशभरच्या शेतकऱ्यांवर जो परिणाम घडून आला, तेंच त्यांच्या मोहिमेंतील यशाचें खरें मर्म होय. हिंदी शेतकऱ्यांच्या मनांत बार्डोली हा शब्द आशा, सामर्थ्य व विजय ह्यांचा निदर्शक बनून राहिला आहे.

हिंदुस्थानांत त्या सालीं दुसरी लक्षांत भरण्यासारखी गोष्ट घडत होती, ती म्हणजे युवक चळवळ. जिकडे तिकडे युवक-संघ प्रस्थापित होत होते व युवक-परिषदा भरत होत्या. त्यांत अनेक प्रकार होते. कांहीं संघ अर्धेमुर्धे धार्मिक स्वरूपाचे होते, तर कांहींनीं क्रान्तीची विचारसरणी व तंत्र यांचा खल चालविला होता. त्यांचा उद्भव कसाहि झाला असला व कोणतेंहि नांव त्यांनीं धारण केलें असलें, तरी समाजांतील जिव्हाळ्याच्या अशा सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा ऊहापोह युवक-परिषदांमध्यें होऊन सर्वसाधारणपणें समाजांत आमूलाग्र फरक केला पाहिजे, असाच ध्वनि तेथें उमटत असे.

राजकारणापुरताच विचार केला, तर तें वर्ष सायमन सप्तकावरील बहिष्कारामुळें व ( बहिष्काराची विधायक बाजू असें जिला नामाभिधान देण्यांत आलें होतें त्या ) सर्वपक्षीय परिषदेमुळें गाजलें. बहिष्कारांत नेमस्त गटांनीं कॉंग्रेसबरोबर सहकार्य केलें व बहिष्कार पूर्णपणें यशस्वी झाला. जेथें जेथें सायमन कमिशन जाई, तेथें तेथें खवळलेला जनसमूह " सायमन, गो बॅक " ह्या शब्दांनीं त्याचें स्वागत करीत असे. या देशव्यापी बहिष्कारामुळें हिंदी जनतेच्या तोंडीं सर जॉन सायमनचें नांव तर बसलेंच, पण इंग्रजी भाषेंतील दोन शब्दहि तोंडपाठ झाले! कमिशनच्या सभासदांच्या डोक्यांत हे दोन अप्रिय शब्द सारखे घोळत राहिले असावेत. अशी एक दंतकथा प्रचलित आहे, कीं कमिशनचे सभासद नव्या दिल्लीमधील वेस्टर्न हॉटेलांत मुक्कामास असतां रात्रीच्या वेळीं भोंवतालच्या अंधारांतून " सायमन, गो बॅक " अशा आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. रात्रीच्या विश्रांतीच्या वेळींहि या चळवळ्यांनीं आपला पिच्छा पुरवावा ह्याचा सभासद-मजकुरांना फार संताप आला. वास्तविक साम्राज्याच्या राजधानीभोंवतालच्या ओसाड जागेंत कोल्हेकुई सुरू होती, तिचा तो आवाज होता!

राज्यघटनेचीं मुख्य मुख्य तत्त्वें सर्वपक्षीय परिषदेनें तेव्हांच निश्चित केलीं. प्रजासत्ताक पार्लमेंटरी पद्धत्यनुसार तीं असावीं असें ठरल्यावर कोणालाहि तीं मांडतां आलीं असतीं. खरी अडचण जातींच्या व अल्पसंख्याकांच्या प्रश्नाची होती व परिषदेंत अगदीं कट्टर जातीय संघटणांचे प्रतिनिधी हजर असल्यामुळें कोणतीहि तडजोड निघणें महाकठिण कर्म होऊन बसलें होतें. निष्फळ झालेल्या ऐक्य-परिषदेची पुनरावृत्ति येथेंहि झाली. वसंतऋतूंत वडील युरोपांतून परतले व त्यांनीं परिषदेच्या

कार्यांत मनःपूर्वक भाग घेतला. शेवटचा उपाय म्हणून एक लहानशी समिति नेमण्यांत येऊन वडिलांना तिचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. राज्यघटना तयार करून जातीय प्रश्नाबाबत एक विस्तृत अहवाल समितीनें सादर करावयाचा होता. समितीला नेहरू समिति असें नांव पडलें व शेवटीं समितीनें सादर केलेल्या अहवालालाहि नेहरू-अहवाल ( रिपोर्ट ) असें म्हणण्यांत येऊं लागलें. समितींत सर तेजबहादुर सप्रूहि होते. अहवालापैकीं कांहीं भाग त्यांच्या हातचा आहे.

मी समितीचा सभासद नसलों, तरी काँग्रेसचा चिटणीस म्हणून मला त्यांत बरेंच लक्ष घालावें लागे. माझी परिस्थिति मोठी विचित्र झाली होती. कागदावर कितीहि तपशीलवार राज्यघटना मांडली, तरी ती व्यर्थ आहे, आपल्या-पुढील खरें काम म्हणजे सत्ता काबीज करणें हें होय, अशी माझी समजूत होती. दुसरी अडचण अशी कीं ह्या समितीमुळें आमच्या ध्येयाची छाटाछाट होतां होतां साम्राज्यान्तर्गत स्वराज्य तेवढें काय तें उरलें. वास्तविक समितींत तर तें त्याहूनहि छाटलें गेलें होतें. पण जातीय प्रश्नाची कोंडी समिति कदाचित् फोडील असा संभव वाटत असल्यामुळें माझ्या दृष्टीनें समितीला महत्त्व होतें. तडजोडीनें अगर सामोप-चारानें प्रश्न कायमचा मिटेल अशी माझी अपेक्षा नव्हती; त्यासाठीं सर्व प्रयत्नांची गाडी सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या रुळावर नेणेंच भाग होतें. परंतु तात्पुरता समेट होऊन बऱ्याच लोकांची त्याला मान्यता मिळती तर परिस्थिति निवळली असती व लोकांचें चित्त दुसऱ्या प्रश्नाकडे वेधून घेतां आलें असतें. त्यामुळें समितीच्या कामांत व्यत्यय आणण्याची माझी इच्छा नव्हती. शक्य तों मी मदतच करीत होतों.

यश आतां चिमटींत सांपडतें असें वाटलें. दोन-तीनच प्रश्न सुटावयाचे राहिले होते; त्यांपैकीं खरा महत्त्वाचा असा प्रश्न म्हणजे पंजाबांतील हिंदु-मुसलमान-शीख यांचें त्रांगडें. पंजाबच्या प्रश्नाचा विचार समितीनें अगदीं नवीनच रीतीनें केला व आपल्या शिफारशी मांडतांना तिनें लोकसंख्येच्या विभागणीसंबंधीं कांहीं उद्बोधक आंकडेवारी नमूद केली. पण हा सर्व खटाटोप वायां गेला. दोन्ही अंगाला भीतीच्या व अविश्वासाच्या भयाणी दरडी खड्या असल्यामुळें शिल्लक उरलेल्या भेदाच्या चिंचोळ्या पात्रावर पूल बांधण्याचें काम सिद्धीला गेलें नाहीं.

समितीच्या अहवालाचा विचार करण्यासाठीं लखनौ येथें सर्वपक्षीय परिषद् भरली. आमच्यापैकीं कांहींजण पुन्हां पेंचांत पडले. जातीय प्रश्न सुटत असेल तर वाटेंत आडवी काठी लावू नये ही इच्छा. पण स्वातंत्र्याच्या प्रश्नाबर मात्र तडजोड करण्याची आमची मुळींच तयारी नव्हती. हा प्रश्न परिषदेनें अलग काढावा म्हणजे परिषदेच्या भिन्न भिन्न घटकांना या प्रश्नाच्या बाबतींत कार्यस्वातंत्र्य मिळेल, आणि काँग्रेसचें स्वातंत्र्याचें ध्येय व अधिक नेमस्त गटांचें साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचें ध्येय कायम राहील असें आम्हीं परोपरीनें विनवलें. पण वडिलांनीं अहवालाला चिकटून राहावयाचा निर्धार केलेला होता. ते मुळींच ऐकेनात. कदाचित् त्या

परिस्थितींत माघार घेणें अशक्यहि झालें असेल. परिषदेंत स्वातंत्र्यवादी सभासद बरेच होते. त्यांच्या वतीनें मीं परिषदेला एक पत्रक सादर करून स्वातंत्र्याच्या ध्येयाला विचलित करणाऱ्या कोणत्याहि बाबींशीं आमचा संबंध नाहीं असें त्यांत नमूद करण्यांत यावें असें ठरलें. त्यांमध्यें हीहि गोष्ट स्पष्ट करण्यांत आली होती, कीं जातीय प्रश्नांचा निकाल लागणें आम्हांलाहि आवश्यक वाटत असल्यामुळें परिषदेच्या कार्यांत आम्ही अडथळे मात्र उत्पन्न करणार नाहीं.

स्वातंत्र्याच्या ध्येयासारख्या मूलभूत प्रश्नावर आम्हीं स्वीकारलेल्या धोरणाला परिणामकारक धोरण म्हणतां येणार नाहीं. फार फार तर त्याला असंमतिप्रदर्शन म्हणतां येईल. आमच्या कल्पनांनीं अधिक क्रियात्मक स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून त्याच दिवशीं आम्हीं " इंडिपेन्डन्स फॉर इंडिया लीग " स्थापन केली.

सर्वपक्षीय परिषदेनें मांडलेल्या राज्यघटनेंत औधच्या तालुकदारांच्या आग्रहानुसार मूलभूत हक्कांच्या यादींत आणखी एका हक्काचा समावेश करण्यांत येऊन तदन्वयें त्यांचे हक्क अबाधित राहतील अशी हमी देण्यांत आली. यामुळें तर माझ्या मनाला अधिकच धक्का बसला. सर्व घटनेची उभारणी खाजगी मालमत्तेच्या कल्पनांवर झालेली असली, तरी प्रचंड अशा अर्धवट सरंजामी इस्टेटीसंबंधींच्या हक्कांना घटनेच्या मूलभूत तत्त्वांत समाविष्ट करून घेणें हा अन्यायाचा कडेलोट होता! यावरून एक गोष्ट सिद्ध झाली, कीं आपल्यापैकींच पण प्रगमनशील लोकांच्या सहकार्यापेक्षां कॉंग्रेस-पुढाऱ्यांना व त्यांच्यापेक्षांहि कॉंग्रेसबाहेरच्या पुढाऱ्यांना जमीनदारांचें सहकार्य इष्ट वाटत होतें. आमच्या पुढाऱ्यांत व आमच्यांत उत्पन्न झालेला मतभेद उघडच दिसत होता. अशा परिस्थितींत मीं कॉंग्रेसचा सरचिटणीस म्हणून काम करीत राहणें मला मूर्खपणाचें वाटलें. इंडिपेन्डन्स फॉर इंडिया लीगच्या संस्थापकांपैकीं मी एक असल्याचें कारण सांगून मीं आपल्या जागेचा राजिनामा दिला. सुभाषबाबूंनींहि त्याच मुद्द्यावर राजिनामा सादर केला होता. पण वर्किंग कमिटीनें तो मंजूर केला नाहीं व मला व सुभाषचंद्रांना असें सांगण्यांत आलें, कीं लीगचें काम आम्ही तसेंच करीत राहिलों तरी त्यामुळें कॉंग्रेसच्या धोरणाला विरोधी असें काम केल्याप्रमाणें होणार नाहीं; कारण कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर केलेलेंच आहे. एवढ्यावर राजिनामा परत घेण्यास मीं मान्यता दिली. माझें मन इतकें सहजासहजीं वळावें ही नवलाची गोष्ट वाटते. हा प्रकार कित्येक वेळां तरी घडून आलेला आहे. कॉंग्रेसमधील कोणत्याच गटाला दुफळीची कल्पना प्रिय नसल्यामुळें ती टाळण्यासाठीं हातीं मिळेल त्या निमित्ताचा आधार आम्ही घेत असूं.

सर्वपक्षीय समितींत गांधीजींनीं भाग घेतला नाहीं. लखनौच्या परिषदेला तर ते हजरहि राहिले नाहींत.

मध्यंतरींच्या काळांत काळ्या निशाणांचें व "गो बॅक"च्या आरोळ्यांचें स्वागत स्वीकारीत सायमन कमिशनचा दौरा सुरूच होता. प्रसंगोपात्त पोलिस

व जनता यांच्यांत किरकोळ झटापटी होत. पण लाहोरला निकराचा प्रसंग येऊन ठेपला व लोकांच्या मनांत संतापाची तिडीक उठली. लाहोर येथें सायमनविरोधी मिरवणुकीच्या अग्रभागीं लालाजी उभे होते. हजारों लोकांच्या शिरोभागीं रस्त्याच्या कडेला ते उभे राहिले असतां एका इंग्रज पोलिस-अधिकाऱ्यानें त्यांच्यावर हल्ला चढवला व दंड्यानें त्यांच्या छातीवर प्रहार केले. जनसमुदायाकडून अथवा लालाजींकडून कोणत्याहि प्रकारचा अत्याचार घडलेला नव्हता. असें असतां रस्त्याच्या कडेला शांतपणें उभ्या राहिलेल्या लालाजींना व त्यांच्या सहकाऱ्यांना पोलिसांनी झोडपून काढलें. मिरवणुकींत भाग घेणाऱ्या प्रत्येक इसमाला पोलिसांचा प्रसाद केव्हां मिळेल त्याचा नियम नसतो. आमच्या मिरवणुकी जरी बहुधा अगदीं शांत असत, तरी लालाजींना या गोष्टीची जाणीव असेलच. तेव्हां मिरवणुकींत ते मनाच्या तयारीनेच सामील झाले असले पाहिजेत. परंतु ही हल्ल्याची तऱ्हा व हल्ल्यांत दिसून आलेलें निष्कारण क्रौर्य यांच्यामुळें हिंदुस्थानांतील बहुजन-समाजाला तो प्रसंग फार लागून राहिला. पोलिसांच्या लाठी-हल्ल्याची आम्हांला त्या वेळीं इतकीशी संवय झाली नव्हती, व आमच्या भावना पाशवी वर्तनाचे नित्य प्रसंग पाहून अद्यापि बधिर होऊन गेल्या नव्हत्या. आमच्यापैकीं मोठ्यांतला मोठा पुढारी, पंजाबांतला सर्वश्रेष्ठ व अत्यंत लोकप्रिय पुरुष अशा प्रकारें अपमानित व्हावा ही पैशुन्याची परिसीमा आहे असें आम्हांला वाटलें. सर्व हिंदुस्थानभर व विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत विषादाची घनदाट छाया पसरली. देशाच्या मोहऱ्यांचें रक्षणसुद्धां आम्हांला करतां येऊं नये हा केवढा दुबळेपणा ! किती मुलुखावेगळा नादानपणा !

लालाजींच्या शरीरावर झालेल्या जखमेचें स्वरूपहि बरेंच चिंताजनक होतें. कित्येक दिवसांपासून काळजाच्या व्यथेनें लालाजी आजारी होते. तशांत त्यांच्या छातीवर हा असा मार पडला. सुदृढ तरुण माणूस असता, तर बहुधा फारसा त्रास झाला नसता. पण लालाजींचें वय झालेलें असून ते अशक्त बनलले होते. थोड्याच आठवड्यांनंतर त्यांना आलेल्या मृत्यूच्या बाबतींत ही जखम किती कारणीभूत झाली हें नक्की सांगतां येणार नाहीं. परंतु त्या मारहाणीमुळें मरण जवळ ओढवलें असें त्यांच्या डॉक्टरांचें मत होतें. शरीरावर मार पडत असतांना त्यांना ज्या मानसिक यातना झाल्या, त्यांचा लालाजींवर फार मोठा परिणाम झाला असावा याबद्दल मला संशय वाटत नाहीं. स्वतःची मानहानि झाली म्हणून नव्हे, तर आपल्यावरील हल्ल्यामुळें देशाची जी मानहानि करण्यांत येत आहे, तिचा विचार मनांत येऊन त्यांना संताप व खेद वाटला असावा.

ही राष्ट्रीय अपमानाची भावना जनतेच्या मनाला अंगाराप्रमाणें झोंबली व लवकरच लालाजींच्या मृत्यूनंतर लोक हल्ल्याचा व त्यांच्या मृत्यूचा कार्यकारण-भाव जमवूं लागले. त्यांच्या मृत्यूमुळें दुःख होण्याऐवजीं राग व चीड ह्या भावनाच मनांत उद्भवल्या. त्यानंतर घडलेल्या प्रसंगांचें यथार्थ आकलन होण्यासाठीं ही

वस्तुस्थिति ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. त्यावांचून भगतसिंग-प्रकरण व भगतसिंगाला उत्तर हिंदुस्थानांत मिळालेली असामान्य लोकप्रियता यांचें गूढ उकलणार नाहीं. मागें दडून राहिलेल्या कारणपरंपरेचा अथवा प्रेरक शक्तीचा विचार न करतां व्यक्तींचा व कृत्यांचा निषेध करणें फार सोपें आहे; पण त्याचबरोबर तें फार मूर्खपणाचेंहि आहे. भगतसिंग पूर्वी प्रसिद्ध नव्हता. त्यानें एक हिंसाकर्म केलें म्हणून तो लोकप्रिय झाला असेंहि नव्हे. गेलीं जवळ जवळ तीस वर्षें दहशतवादी ह्या देशांत निर्माण होत आले आहेत; परंतु बंगालमधील प्रारंभींचीं वर्षें सोडून दिलीं, तर भगतसिंगाला मिळालेल्या लोकप्रियतेचा एक शतांशहि दहशतवाद्यांना लाभलेला नाहीं असें म्हणावें लागेल. हें सत्य इतकें स्पष्ट आहे, कीं तें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. दुसरीहि तितकीच उघड गोष्ट अशी आहे, कीं दहशतवाद्यांचा जोर मधून मधून होत असला, तरी हिंदुस्थानांतील तरुणांना इतःपर दहशतवादाविषयीं फारशी गोडी वाटेनाशी झाली आहे. सतत पंधरा वर्षें अहिंसेचा गजर कानाशीं होत राहिल्यामुळें हिंदुस्थानची पार्श्वभूमि पार बदलून गेली असून राजकीय कार्यपद्धति म्हणून दहशतवाद्यांकडे पाहण्याची वृत्ति मावळली आहे. किंबहुना जनता या पद्धतीची विरोधक बनली आहे. दहशतवाद्यांचा भरणा बहुधा ज्या वर्गांतून होतो, त्या पांढरपेशा वर्गावरहि काँग्रेसच्या मतप्रचाराचा पुष्कळच परिणाम झाला आहे. दहशतवादानें क्रांति होणें शक्य नाहीं. दहशतवादाचें शस्त्र जुनाट व बोथट झालेलें असून त्यामुळें खऱ्या क्रान्तीच्या मार्गांत विघ्नेंहि उत्पन्न होतात याची जाणीव पांढरपेशा वर्गांतील कार्यक्षम व उतावीळ तरुणांनाहि झाली आहे. हिंदुस्थानांत व इतरत्र दहशतवाद लयाला जात आहे तो जागतिक परिस्थिति बदलल्यामुळें होय. सरकारच्या दडपशाहीमुळें दहशतवादाला पायबंद लागेल; परंतु त्याचें उच्चाटन होणार नाहीं. दहशतवाद हा बहुशः क्रांतिवादी मनोवृत्तीच्या प्रारंभकालांत आढळून येतो. तो काल उलटला कीं दहशतवादाचें महत्त्वहि अस्तंगत होतें. स्थानिक व वैयक्तिक जुलूमजबरदस्तीमुळें प्रसंगोपात्त स्फोट होत असले, तरी त्या वादाची आमदानी संपून आपला देश आतां दुसऱ्या कालांत प्रविष्ट झाला आहे. हे प्रासंगिक स्फोट देखील हळूहळू कमी होत जातील. हिंदी जनतेचा हिंसेवरील विश्वास उडाला आहे असा ह्याचा अर्थ नाहीं. व्यक्तिगत हिंसेवर मात्र लोकांची श्रद्धा राहिलेली नाहीं. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं संघटित हिंसाकर्म इतर देशांतल्याप्रमाणे येथेंहि करणें आवश्यक होईल अशा मताचे पुष्कळ लोक आहेत. तथापि हा मुद्दा सध्यां तरी शास्त्रीय स्वरूपाचाच आहे. त्यांतील खरेखोटेपणा काळच अजमावूं शकेल. दहशतवाद्यांच्या कार्यपद्धतीशीं ह्या प्रश्नाचा कांहींच संबंध येत नाहीं.

तात्पर्य, भगतसिंग लोकांचा प्यारा बनला, तो त्याच्या हिंसक कृत्यामुळें नव्हे, तर त्यानें लाला लजपतरायांचें व राष्ट्राचें नांव राखलें अशी लोकांची कल्पना झाली म्हणून. तो एक प्रकारें प्रतीक बनला. त्याच्या कृत्याचें लोकांना विस्मरण झालें,

पण प्रतीक अवशिष्ट राहून थोडक्या महिन्यांच्या अवधींत पंजाबांतील सर्व शहरां-खेड्यांत व थोड्या कमी प्रमाणांत सर्व उत्तर हिंदुस्थानांत त्याचें नांव दुमदुमूं लागलें. त्याच्यावर असंख्य कवनें रचण्यांत आलीं आणि त्याला इतकी लोकप्रियता मिळाली, कीं माणूस आश्चर्यानें थक्क व्हावा.

लाठीहल्ला झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं दिल्ली येथें भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकीला लाला लजपतराय आले होते. जखमेचे वण अद्यापि दिसत होते व त्यांना त्यापासून त्रासहि होत होता. लखनौच्या सर्वपक्षीय परिषदेनंतर ही बैठक भरली व तींत स्वातंत्र्याचा प्रश्न चर्चेसाठीं निघाला. नेमक्या कोणत्या मुद्द्यावर चर्चा सुरू होती तें मला आठवत नाहीं. पण मी त्या वेळीं बराच विस्तारानें बोललों व कॉंग्रेसनें क्रांतिवादी धोरण स्वीकारून आमच्या राजकीय आणि सामाजिक रचनेंत आमूलाग्र फेरबदल करण्यास तयार व्हावें, नाहीं तर सुधारणावादी ध्येय व कार्यपद्धति यांचा तरी स्वीकार करावा अशी वेळ येऊन ठेपलेली आहे, असा मुद्दा मीं मांडला. बैठकींत लालाजींनीं त्यावर उत्तरादाखल भाषण केलें नसतें अथवा त्यापैकीं कांहीं भागावर टीका केली नसती, तर मी तो प्रसंग विसरूनहि गेलों असतों. कारण भाषणाचें महत्त्व विशेषसें नव्हतें. लालाजींनीं अशी एक धोक्याची सूचना दिली, कीं ब्रिटिश मजूर पक्षावर आम्हीं विसंबून राहतां कामा नये. मला ब्रिटिश मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांविषयीं कधींच आदर वाटला नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला पोषक अथवा खरोखरीच साम्राज्यविरोधी अथवा समाजवादाकडे नेणारें असें एखादें कृत्य केलें असतें, तर मात्र मला नवल वाटलें असतें! तेव्हां माझ्या बाबतींत तरी लालाजींच्या सूचनेची आवश्यकताच नव्हती.

लाहोरला परतल्यानंतर माझ्या दिल्लीच्या भाषणाचा धागा लालाजींनीं पुन्हां हातीं घेतला व त्यांच्या 'दि पीपल' नांवाच्या साप्ताहिकांत त्यांनीं त्या विषया-वर लेखमाला सुरू केली; परंतु फक्त पहिला लेखच साप्ताहिकांत प्रसिद्ध झाला. दुसरा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वींच ते दिवंगत झाले. प्रसिद्धीसाठीं लिहिलेला तो त्यांचा शेवटचाच लेख असावा. माझ्या भाषणावर लिहिलेल्या त्यांच्या पहिल्याच लेखाची आठवण अशा प्रकारें मोठी दुःखद झालेली आहे.

२५

# लाठीचा प्रसाद !

लालाजींवरील हल्ला व त्यांचा मृत्यु यांच्या योगानें सायमन कमिशनवरील बहिष्काराचा जोर मात्र अधिकच वाढला. कमिशन लखनौला यावयाचें होतें व तेथील कॉंग्रेस कमिटीनें त्याच्या "स्वागताची" जय्यत तयारी केली होती. प्रचंड मिरवणुकी, सभा वगैरे गोष्टींची व्यवस्था कित्येक दिवस आधीं करून ठेवण्यांत आलेली होती. मतप्रचाराच्या व रंगीत तालमीच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग करण्यांत येई. मी लखनौला गेलों. अत्यंत व्यवस्थितपणें व शांततेनें पार पडत असलेल्या ह्या कार्याचा जोर पाहून अधिकारी बरेच चिडले असावेत; कारण त्यांनीं अडथळे आणण्यास व कांहीं भागांतून मिरवणुकी नेऊं नयेत असे मनाईहुकूम सोडण्यास सुरुवात केली, आणि म्हणूनच मला नवा अनुभव मिळून माझ्या शरीराला पोलिसांच्या दंडुक्याच्या व लाठीच्या प्रसादाची गोडी चाखावयास सांपडली.

वाहतुकीला अडथळा येतो ह्या सबबीवर मिरवणुकींना बंदी करण्यांत आली होती. ह्या बाबतींत तक्रारीला जागा राहूं नये म्हणून आम्हीं सोळासोळांचे गट करून सभेच्या जागीं आड रस्त्यानें, पृथक्पणें जावयाचें ठरविलें. कायद्याप्रमाणें पाहिलें तर हा हुकूम मोडण्याचाच एक प्रकार होता. कारण १६ इसम एक निशाण घेऊन निघाले म्हणजे ती मिरवणुकच झाली. एका गटाचा मी नायक होतों, व पुष्कळ अंतर टाकून माझे सहकारी गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्त्वाखालीं दुसरा एक गट येत होता. आम्ही सुमारें २०० यार्ड चालून गेलों. रस्त्यावर एकहि माणूस दिसत नव्हता. इतक्यांत पाठीमागून घोड्यांच्या टापांचा ध्वनि ऐकूं आला. आम्हीं वळून पाहिलें तों तीस-पस्तीस स्वार-शिपायांची टोळी मोठ्या वेगानें आमच्यावर चाल करून येत होती. थोड्याच वेळांत ते आमच्याशीं येऊन भिडले व त्यांच्या हल्ल्यामुळें आमच्या गटाची पांगापांग झाली. तदनंतर आमच्या स्वयंसेवकांना मोठमोठ्या दंडुक्यांनीं व लाठ्यांनीं झोडपून काढण्यास घोडेस्वारांनीं सुरुवात केली. तो मार चुकविण्यासाठीं स्वयंसेवक स्वाभाविकपणें रस्त्याच्या कडेला सरकले. कांहीं जण तर बाजूच्या लहान दुकानांतूनहि शिरले. त्यांचा पाठलाग करून त्यांना मार देण्यांत आला. घोडेस्वारांचा हल्ला आपल्यावर येत आहे असें पाहतांच स्वतःचें रक्षण करण्याची सहज प्रेरणा माझ्याहि मनांत जागृत झाली. हल्ला पाहून धीर सुटला. परंतु दुसऱ्या कोणत्या तरी सहज प्रेरणेनें मला त्या विचारापासून परावृत्त करून तेथेंच थांबवलें

असावें. अशा मनःस्थितींत पहिल्या हल्ल्याला तर मीं तोंड दिलें. पण नंतर रस्त्याच्या मध्यभागीं मी एकटाच उभा आहें याची मला एकाएकीं जाणीव झाली. माझ्यापासून कांहीं यार्डांच्या अंतरावर निरनिराळ्या जागीं स्वयंसेवकांना पोलिस पिटून काढीत होते. आपल्याकडे फारसें लक्ष जाऊं नये म्हणून मी अगदीं आपोआप रस्त्याच्या बाजूला सरकूं लागलों. पण पुन्हां मी थांबलों. मनांतल्या मनांतच थोडींफार प्रश्नोत्तरें झालीं व अशा रीतीनें पळून जाणें नामुष्कीचें होईल असें मनानें ठरविलें. हा सर्व प्रकार चारदोन सेकंदांतच घडला; परंतु त्या वेळीं मनांत चाललेल्या ओढाताणीची व शेवटीं झालेल्या निर्णयाची आठवण मला अगदीं स्पष्टपणें राहिली आहे. माझ्या स्वाभिमानाला नामर्दाप्रमाणें पळून जाण्याची कल्पना रुचली नाहीं म्हणूनच तशा प्रकारचा निर्णय मनानें घेतला असावा. परंतु शौर्य व भित्रेपणा यांच्यांतील भेद किती सूक्ष्म होता? कदाचित् माझें पाऊल भित्रेपणाच्या घसरणीवरहि पडलें असतें. मनाचा निश्चय झाला न झाला इतक्यांत मीं मागें वळून पाहिलें, तों एक घोडेस्वार आपली लांब काठी परजीत माझ्याकडे दौडत येतांना दिसला. 'चालूं दे तुझें काम' असें मी त्याला म्हणालों आणि माझें डोकें जरा बाजूला वळविलें. सहज प्रेरणेनेंच डोकें व तोंड बचावण्यासाठीं मीं हा प्रयत्न केला. त्यानें माझ्या पाठीवर दोन सणसणीत रट्टे लगावले. मला भोंवळ आली व माझें सर्व शरीर थरथरूं लागलें. पण आश्चर्याची व समाधानाची गोष्ट अशी, कीं मी त्याहि स्थितींत तसाच उभा राहिलों होतों. लवकरच पोलिस दूर निघून गेले व आमच्यासमोरचा रस्ता त्यांनीं अडवून धरिला. स्वयंसेवक पुनः एके ठिकाणीं जमले. त्यांच्यापैकीं कित्येकांचीं डोकीं फुटून ते रक्तबंबाळ झाले होते. पंतहि तुकडीसह आम्हांला येऊन मिळाले. त्यांनाहि मार बसलाच होता. आम्ही सर्वजण पोलिसांच्या समोर बैठक मारून बसलों. सुमारें तासभर याप्रमाणें बसल्यावर अंधार पडला. एका बाजूला बडेबडे अधिकारी जमले होते, तर आमच्या बाजूला लाठीमाराची बातमी पसरूं लागली, तसे लोकांचे प्रचंड समुदाय जमूं लागले. अखेरीस आमच्या ठराविक रस्त्यानें आम्हांला जाऊं देण्याचें अधिकाऱ्यांनीं कबूल केल्यावर आम्हांला ज्या पोलिसांनीं हल्ला करून झोडपून काढलें होतें, त्यांच्याचबरोबर आम्ही पुढें गेलों. या वेळीं मात्र पोलिस आमच्यापुढे संरक्षकांप्रमाणे चालले होते.

ह्या क्षुल्लक प्रसंगाविषयीं मीं इतक्या विस्तारानें लिहिलें याचें कारण म्हणजे त्यामुळें माझ्या मनावर घडलेला परिणाम. लाठीमाराला तोंड देण्यास व तो सोसण्यास समर्थ असें खंबीर शरीर मला लाभलें आहे या विचारामुळें मनाला जो उत्साह वाटला, त्याच्या भरांत शारीरिक दुःख मी पार विसरून गेलों. मला नवल वाटलें तें या गोष्टीचें, कीं त्या प्रसंगांतून पार पडत असतां, इतकेंच नव्हे तर अंगावर लाठीचे प्रहार चालू असतांहि माझें मन अगदीं स्थिर असून माझ्या भावनांचें पृथक्करण मी अगदीं तर्कशुद्ध रीतीनें करीत राहिलों होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं याहून

खडतर कसोटीची वेळ आली, तेव्हां या रंगीत तालमीचा मला फार फायदा झाला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच सायमन कमिशनचें आगमन व्हावयाचें होतें, व आमची जंगी मिरवणूकहि त्याच वेळीं निघणार होती.

वडील त्या वेळीं अलाहाबादेस होते. माझ्यावरील हल्ल्याची बातमी त्यांना लागली तर ते व कुटुंबांतील इतर मंडळी काळजींत पडतील अशी मला धास्ती वाटत होती. म्हणून रात्रीं टेलिफोनवरून 'मी बरा असल्यामुळें काळजीचें कांहीं कारण नाहीं' असें वडिलांना कळविलें. पण त्यांची काळजी थोडीच दूर होणार? त्यांना झोंप येईना, म्हणून मध्यरात्रींच्या सुमारास त्यांनीं लखनौला येण्याचें ठरविलें. शेवटच्या गाडीची वेळ टळून गेली असल्यामुळें मोटरनें निघावें लागलें. वाटेंत थोडासा खोळंबा झालाच. १४६ मैलांचा प्रवास करून सकाळीं पांचच्या सुमाराला ते जेव्हां लखनौला पोंचले, तेव्हां ते अगदीं थकून गेले होते.

त्याच सुमाराला आम्ही मिरवणूक घेऊन स्टेशनवर जाण्याची तयारी करीत होतों. इतर कशानेंहि झाली नसती इतकी जागृति लखनौमध्यें आदल्या दिवशींच्या प्रसंगानें झाली होती. सूर्य वर येण्यापूर्वींच हजारों लोक स्टेशनवर जमले. शहराच्या मोहल्यामोहल्यांतून लहान लहान अशा असंख्य मिरवणुकी निघाल्या व कॉंग्रेस-कचेरीपासून मुख्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. हजारों माणसें चार-चारांच्या रांगा धरून चाललीं होतीं. आम्ही ह्या मुख्य मिरवणुकींत होतों. स्टेशनजवळ आल्यावर आम्हांला पोलिसांनीं अडवलें. स्टेशनच्या समोर अर्ध्या चौरस मैला-एवढें मोठें विस्तीर्ण पटांगण होतें. (नव्या रेल्वेस्टेशनची इमारत ह्याच जागेवर आहे.) ह्या मैदानाच्या एका बाजूला आम्हांला कतार धरून उभें करण्यांत आलें. आमची मिरवणूक दाखवलेल्या जागींच थांबली. रेटारेटी करून आम्हीं पुढें घुसण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. पायदळ व घोडदळ यांची मैदानावर गर्दी झालेली होती. आमच्याविषयीं सहानुभूति दाखवणाऱ्या बघ्यांची गर्दी फुगूं लागली, व त्यांपैकीं पुष्कळजण दोघां-दोघांच्या व तिघां-तिघांच्या गटानें हळूच मैदानांत सरकले. एकाएकीं लांब अंतरावर हालचाल दिसूं लागली. घोडदळाच्या किंवा स्वार-शिपायांच्या दोनतीन लांबलचक रांगा आमच्या बाजूला वेगानें येत होत्या. वाटेंत मैदानावर रेंगाळणाऱ्या लोकांना मारपीट करीत अगर आपल्या हल्ल्याखालीं दडपीत ते दौडत निघाले होते. भरधांव सुटलेल्या त्या घोडेस्वारांचें दृश्य फार मनोहर दिसलें. त्यांत वाईट होतें ते इतकेंच कीं वाटेंत बेसावध आणि निरुपद्रवी प्रेक्षक, घोड्यांच्या टांचांखालीं गवसून त्यांच्यावर दुःखद प्रसंग ओढवत होता. घोडदळाच्या रांगा पुढें निघाल्या व हे लोक तसेच मागें पडून राहिले. कांहींना हालचाल देखील करतां येत नव्हती व कांहीं दुःखानें दुमडत, कळवळत होते. सर्व मैदानाचा देखावा एकाद्या रणक्षेत्राप्रमाणें दिसूं लागला. पण तिकडे पाहण्यास अथवा विचार करण्यास आम्हांला सवड मिळाली नाहीं. घोडदळाची लाट आमच्या अंगावरच आली, व त्यांच्या पहिल्या

रांगेची जवळ जवळ दौडती धडक आमच्या मिरवणुकीच्या अग्रभागीं असणाऱ्या लोकांवर येऊन आदळली. आम्हीं जागा सोडली नाहीं. आम्ही हटत नाहींसें पाहिल्यावर शेवटच्या क्षणाला घोड्यांचे लगाम खेंचण्यांत आले. त्यामुळें घोडे मागच्या पायांवर खडे होऊन त्यांचे पुढचे पाय आमच्या डोक्यावर अंतराळीं थयथयूं लागले. नंतर मारपिटीला सुरुवात झाली. लाठीचे व दंडुक्याचे तडाखे उडूं लागले. पायदळ व स्वार दोघेहि प्रहार करीत होते. वळवाच्या थेंबासारखे सडासड घाव पडत होते. आदल्या दिवशींची माझ्या मनाची निश्चलता नाहींशी झाली. धरलेली जागा सोडावयाची नाहीं, शरण जावयाचें नाहीं, मागें फिरावयाचें नाहीं एवढी एकच जाणीव मनांत उरली. घावामुळें दृष्टि गढूळ होऊन एक प्रकारच्या मुक्या रागानें मन व्याप्त होऊन गेलें, व परत घाव मारण्याची इच्छा बळावूं लागली. माझ्या समोरच्या पोलिस-अधिकाऱ्याला घोड्यावरून खालीं ओढून आपणच खोगिरांत बसणें किती सोपें आहे असा विचार मनांत आला. पण शिस्त व शिक्षणाचा परिणाम नष्ट झाला नाहीं व फक्त चेहऱ्याचें रक्षण करण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि कारणास्तव मीं हात वर उचलला नाहीं. शिवाय आम्हीं चढाई केली कीं भयंकर प्रसंग ओढवेल, आमच्याच असंख्य लोकांवर गोळीबारानें मरण्याची पाळी येईल, ही कल्पना मला होतीच.

किती तरी वेळ मार सहन केल्यानंतर-वस्तुत: थोडींशीं मिनिटेंच झालीं होतीं— आमची रांग पांगून न जातां हळूहळू मागें हटूं लागली. त्यामुळें मी एकटाच पुढें राहिलों, व माझ्या कुशी उघड्या पडल्या. आणखी मार पडूं लागला; इतक्यांत मला कोणी तरी अलगद उचलून लांब नेलें. मला ह्याचा फार राग आला. माझ्यावरच पोलिस तुटून पडत आहेत असा कांहीं सहकाऱ्यांचा समज होऊन माझा अशा प्रकारें बचाव करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें.

मूळ जागेच्या मागें सुमारें शभर फुटांवर आम्ही पुन्हा रांग करून उभे राहिलों. पोलिसहि मागें हटले व आमच्यापासून पन्नास फुटांच्या अंतरावर रांगेंत उभे राहिले. ह्या सर्व बखेड्याचें आदिकारण जें सायमन कमिशन, ते लांब अंतरावरून चोरट्याप्रमाणें निघून जाई तोंपर्यंत आम्ही तेथें थांबलों. पण इतकें करूनहि त्यांच्या नशिबांतील काळीं निशाणें कांहीं चुकलीं नाहींत! नंतर लगेच कॅांग्रेस-कचेरीपर्यंत आम्ही पूर्ववत् मिरवणूक घेऊन आलों व नंतर लोक घरोघर निघून गेले. वडील काळजी करीत होते, म्हणून मी त्यांच्याकडे गेलों.

आवेशाचा क्षण निघून गेल्यावर सर्व शरीरांत ठणका सुरू होऊन अतिशय ग्लानि आल्याप्रमाणें वाटूं लागलें. सर्व अंगभर मुका मार बसला होता व वळ उठले होते. पण भाग्यवशात् कोठेंहि मर्मी वार लागला नव्हता. माझे पुष्कळ सहकारी इतके भाग्यवान नव्हते; त्यांना जबर जखमा झाल्या होत्या. गोविंद वल्लभ पंत माझ्या शेजारींच होते. पुरे सहा फूट उंच असल्यामुळें ते ठळकपणें लक्षांत येत. त्यांना

असा खरपूस मार मिळाला, कीं कित्येक दिवसपर्यंत त्यांचें दुखणें संपेचना. त्यांना पाठ सरळ करतां येईना, कीं कसलें काम करतां येईना. या प्रसंगानंतर माझ्या दणदाकटपणाविषयीं मला अधिकच अभिमान वाटूं लागला. पण प्रत्यक्ष हल्ल्यापेक्षां मला हल्ला करणाऱ्या पोलिसांच्या व अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यांचीच आठवण अधिक स्पष्टपणें राहिलेली आहे. खरी मारझोड युरोपियन सार्जंटांनीं केली; हिंदी शिपायांचा हल्ला बराच सौम्य होता. रक्तपिपासेच्या व वैमनस्याच्या भावनांनीं जवळ जवळ विद्रूप झालेले ते चेहरे किती सहानुभूतिशून्य व हृदयशून्य दिसत होते! आमच्या इकडच्या लोकांचे चेहरेहि त्या वेळीं असेच बघण्यालायक झाले असावेत. आम्ही गप्प राहिलों असलों, तरी आमचीं मतें कांहीं विरोधकांविषयींच्या प्रेमानें ओसंडून वाहूं लागलीं नव्हतीं. मग आमचे चेहरे तरी कसे प्रफुल्लित दिसणार? वैयक्तिक विरोधाचा, भांडणाचा अगर द्वेषाचा तेथें संबंध नव्हता. अज्ञात व बलशाली अशा समाजशक्तीचे आम्ही पाईक बनलों होतों. तिनें आम्हांला दास बनवलें होतें. ती आम्हांला इकडे तिकडे नाचवीत फिरवीत होती. मोठ्या कौशल्यानें आमचीं मनें तिनें आपल्या मुठींत ठेवलीं होतीं. आमच्या आकांक्षा व भावना यांना प्रज्वलित करून ती लीलाविग्रही शक्ति आम्हांला कळसूत्री बाहुल्याप्रमाणें खेळवीत होती. त्या शक्तीचे आम्ही कांहीं काळ प्रतिनिधी बनलों आणि कार्यावेशाच्या धुंदींत आम्ही वागलों; परंतु तो प्रमाथी आवेश ओसरला कीं मन विचारूं लागे, "हें सगळें कशासाठीं, कशासाठीं?"

२६

# ट्रेड युनियन कॉंग्रेस

त्या वर्षी सायमन कमिशनवरील बहिष्कार आणि सर्वपक्षीय परिषद यांच्याविषयींच सर्व देशभर बोलबाला होत असला, तरी माझें लक्ष व कार्य दुसऱ्याच दिशेनें चाललेलें होतें. मी कॉंग्रेसचा सरचिटणीस असल्याकारणानें कॉंग्रेसची संघटणा सुदृढ करण्याचें काम मला पाहावें लागतच होतें. पण मुख्यतः जनतेचें लक्ष सामाजिक व आर्थिक फेरबदलाकडे वेधण्याचें काम करण्याची मला हौस वाटत असे. मद्रास येथें स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यामुळें जो विजय आम्हीं संपादन केला, तो सर्वपक्षीय परिषदेची प्रवृत्ति ध्यानांत घेतां, मजबूत करण्याच्या प्रयत्नाला लागणें आवश्यक होतें. ह्यासाठीं मीं पुष्कळ प्रवास केला व पुष्कळ महत्त्वाच्या सभांतून भाषणेंहि केलीं. १९२८ सालीं पंजाब, मलबार, दिल्ली व संयुक्त प्रांत या चार प्रांतिक परिषदांचा अध्यक्ष म्हणून मला निवडण्यांत आलें. त्याचप्रमाणें मुंबई व बंगालमधील युवक संघाच्या व विद्यार्थी परिषदांच्या अध्यक्षस्थानींहि माझी योजना झाली होती. कधीं कधीं संयुक्त प्रांतांतील खेड्यापाड्यांतून मी जात असें व क्वचित् मजुरांपुढेंहि माझीं व्याख्यानें होत. स्थानिक परिस्थितीप्रमाणें भाषणाचें स्वरूप पालटलें अगर श्रोतृवर्गाच्या प्रकाराप्रमाणें निरनिराळ्या मुद्द्यांवर देण्यांत येणारा भर कमीजास्त करण्यांत आला, तरी माझ्या भाषणांतील सूत्र एकसारखेंच असे. सर्व ठिकाणीं राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याचा मुद्दा मी पुढें मांडीत होतों व सामाजिक स्वातंत्र्याच्या मंदिरांत प्रवेश करतांना राजकीय स्वातंत्र्याच्या पायरीवरून पुढें पाऊल टाकलें पाहिजे, असें सांगत होतों. कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांत व पांढरपेशांत समाजवादी विचार फैलवावा असा माझा बेत होता. कारण राष्ट्रीय चळवळीची धुरा तेच वाहात होते. त्यांचा राष्ट्रवाद अत्यंत संकुचित होता हे खरेंच. त्यांच्या भाषणांतून पूर्वकालीन वैभवाचे पोवाडे गायिलेले असत. परकीय सत्तेमुळें देशाचें जें आध्यात्मिक व आधिभौतिक अहित झालेलें आहे, त्याचें ते वर्णन करीत. लोकांची हलाखी, परकीय अधिराज्यामुळें देशाची होणारी बेअब्रू, राष्ट्राच्या इभ्रतीसाठीं स्वातंत्र्याची आवश्यकता, व मातृभूमीच्या उद्धारासाठीं आत्मबलिदानाची तयारी वगैरे विषय ते प्रतिपादन करीत. हे नित्य परिचयाचे विषय होते. त्यांचा पडसाद प्रत्येक हिंदी अन्तःकरणांत उमटत असे. माझ्यादेखील राष्ट्रीय भावना त्यामुळें जागृत होत, हेलावत, उचंबळत असत. ह्या विषयांतील सत्य सनातन

असलें, तरी त्यांचें नावीन्य वापरण्या-वापरण्यानें विटून गेलें होतें व तें जराजीर्ण दिसूं लागलें होतें. त्याच गोष्टीचें तुणतुणें सतत वाजत राहिल्यामुळें झगड्यांतील इतर जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे व बाजूंकडे नजरच जात नसे. भावनांचा खळबळाट अशा भाषणांमुळें सुरू झाला, तरी विचारशक्तीवरील झांपड तशीच कायम राही.

हिंदुस्थानांत समाजवादी मतें मीच प्रथम प्रतिपादन करूं लागलों असें नव्हे. खरें बोलावयाचे तर मी त्या बाबतींत जरा मागसलेलाच राहिलों होतों. इतर अनेकांनीं तो मार्ग झाडून साफ केला असला, तरी त्यावर मी मोठ्या कष्टानें एकेक पाऊल पुढें टाकीत चाललों होतों. विचारसरणीच्या दृष्टीनें कामगार-चळवळ ही निःसंशय समाजवादी मताची होती; व बहुसंख्य युवकसंघांतहि तीच विचारप्रणालि दिसून येत असे. युरोपांतून मी १९२७ च्या डिसेंबरांत परतलों, तेव्हां हिंदी वातावरणांत समाजवादाचा अस्पष्ट दरवळ आधींच पसरलेला दिसला. त्यापूर्वीहि समाजवादी व्यक्ती हिंदुस्थानांत होत्या. त्यांच्यापैकीं बहुतेक रम्य कल्पनावादी होते; परंतु मार्क्स-वादाची छाप त्यांच्यावर वाढत्या प्रमाणांत बसत चालली असून कांहींजण तर स्वतःला बावनकशी मार्क्सवादी म्हणवून घेऊं लागले. सोव्हिएट रशियाच्या प्रगतीबरोबर, विशेषतः पंचवार्षिक योजनेच्या यशाबरोबर युरोपप्रमाणें हिंदुस्थानांतहि ही प्रवृत्ति पोसली गेली.

कांग्रेसमध्यें मोठ्या अधिकारावर असलेला मी एक प्रमुख काँग्रेसवाला असल्या-मुळें माझ्या समाजवादी मतांना महत्त्व मिळालें. माझ्याचसारखा विचार इतरहि कांहीं प्रमुख काँग्रेसवाल्यांच्या मनांत येऊं लागला होता. संयुक्तप्रांतीय कॉ. कमिटींत हा विचार विशेष फैलावत असून १९२६ सालींच आम्हीं एक सौम्यसा समाजवादी कार्यक्रम आंखण्याचा प्रयत्न केला. आमच्या प्रांतांत जमीनदारी व तालुकदारी चालू असल्यामुळें आम्हांला जमिनीच्या प्रश्नालाच मूळारंभीं हात घालणें प्राप्त झालें. वर्तमान पद्धति नाहींशी झाली पाहिजे व सरकार व जनता यांच्या दरम्यान मध्यस्थ राहतां उपयोगी नाहींत असें आम्हीं जाहीर केलें. असले विचार आवतीभोंवतींच्या लोकांना अगदींच अपरिचित असल्यामुळें मोठ्या सावध-गिरीनेंच आम्हांला पावलें टाकावीं लागत होतीं.

१९२९ सालीं संयुक्तप्रांतीय काँग्रेस कमिटीनें आणखी एक पायरी ओलांडून निखालस समाजवादी स्वरूपाची एक शिफारस ऑ. इं. कॉ. कमिटीकडे पाठविली. १९२९ च्या उन्हाळ्यांत कमिटीची बैठक मुंबई येथें भरली असतां संयुक्त प्रांताच्या ठरावाचा उपोद्घात कमिटीनें स्वीकारून, तदन्तर्भूत समाजवादी तत्त्वाला मान्यता दिली. ठरावाची तपशीलवार चर्चा करण्याचें मात्र लांबणीवर टाकण्यांत आलें. हे ऑ. इं. काँ. कमिटीचे व सं. प्रां. काँ. कमिटीचे ठराव लोकांच्या स्मरणांतून अजिबात नाहींसे झालेले दिसतात. गेल्या वर्षा दोन वर्षांतच काँग्रेसमध्यें समाजवादाचें भूत एकदम प्रादुर्भूत झालें अशी त्यांची कल्पना होते ती याचमुळें. त्या ठरावाला मान्यता

देतांना ऑ. इं. कॉं. कमिटीनें फार खोलवर विचार केला नव्हता व आपण काय करीत आहों याची पूर्ण जाणीवहि सभासदांपैकीं बऱ्याच लोकांना नव्हती ही गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे.

इंडिपेंडन्स फॉर इंडिया लीगची संयुक्तप्रांतीय शाखा ( या शाखेंत सर्व कॉंग्रेस-कार्यकर्तेच होते ) निश्चितपणें समाजवादी मताची असून कॉंग्रेससारख्या संमिश्र संस्थेहून ती अधिक जहाल होती. समाजस्वातंत्र्य हें लीगच्या ध्येयापैकीं एक ध्येय होतें. सर्व हिंदुस्थानभर लीगची एक बळकट अशी संघटना करावी व स्वातंत्र्य व समाजवाद या तत्त्वांचा प्रचार करण्याच्या कामीं तिचा उपयोग करून घ्यावा अशी आमची मनीषा होती. परंतु दुर्दैवानें संयुक्तप्रांतापलीकडे लीगचें क्षेत्र फारसें वाढलें नाहीं. देशांत लीगच्या ध्येयाला पाठिंबा नव्हता म्हणून असें घडलें असें नव्हे. पण लीगचे बहुतेक प्रमुख कार्यकर्ते कॉंग्रसचेहि प्रमुख कार्यकर्ते असल्यामुळें, व कॉंग्रसनें सिद्धांत म्हणूनच कां होईना पण स्वातंत्र्याचें ध्येय मान्य केलेलें असल्यामुळें त्यांना कॉंग्रसमध्यें राहूनहि काम करतां येण्यासारखें होतें. दुसरें कारण असें, कीं लीगच्या प्रस्थापकांपैकीं कांहींजणांनीं ही संस्था जोपासण्याचा प्रयत्न जितका मनापासून करावयास हवा होता, तितका केला नाहीं. कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळावर दडपण आणण्याचें एक साधन एवढयाच दृष्टीनें त्यांना लीगचें महत्त्व वाटे. त्यायोगें वर्किंग कमिटीच्या निवडणुकींवर देखील प्रभाव पाडतां येईल, अशी त्यांची कल्पना होती. इंडिपेन्डन्स लीग रोडावत चालली व कॉंग्रेसचें स्वरूप अधिकाधिक चढाईचें होत चाललें तसे धडाडीचे कार्यकर्ते कॉंग्रेसकडे ओढले जाऊन लीगच्या नाड्या आंखडूं लागल्या व १९३० सालीं कायदेभंग सुरू झाल्यावर लीग कॉंग्रेसशीं एकरूप होऊन तिचें स्वतंत्र अस्तित्व संपुष्टांत आलें.

१९२८ व १९२९ सालांत, मला अटक होणार अशा बातम्या अनेकवार उठल्या होत्या. वृत्तपत्रांतील बातम्यांना व माझ्या मित्रांकडून आलेल्या खाजगी सूचनांना काय आधार होता तें मला माहीत नाहीं. पण बातम्या-सूचनांमुळें माझ्या मनांत अनिश्चितता उत्पन्न होऊन तुरुंगाच्या अगदीं उंबरठ्यावर मी उभा आहें असें मला वाटूं लागलें. सीधें सुरक्षित जीवन माझ्या नशिबीं नाहीं याची पक्की खात्री होऊन चुकलेली असल्या-मुळें मला या बातम्यांचें विशेष कांहीं वाटलें नाहीं. अनिश्चित आयुष्य, उलथा-पालथी, व तुरुंगवास ह्यांचा अभ्यास जितका लवकर होईल तितका इष्टच होता. पुढें अटकेची कल्पना माझ्या मनांत ( व जरा कमी प्रमाणांत माझ्या नातेवाइकांच्या मनांतहि ) चांगली रुळली व अटकेचा प्रसंग आला कीं मी त्याकडे नेहमींचाच प्रसंग अशा भावनेनें पाहूं लागलों. अटकेच्या आवईपासून अगदींच लाभ होत नाहीं, असें नाहीं. त्यामुळें दैनंदिन जीवनांत जरासा चटका व चविष्टपणा निर्माण होतो व स्वतंत्रतेचा जाईल तो दिवस मोलाचा वाटतो. खरें म्हणजे १९२८ व १९२९ सालीं मला खूपच सवलत मिळाली व मला अटक झाली ती १९३० च्या एप्रिलांत. तेव्हां-

पासून मात्र तुरुंगाबाहेरचें माझें त्रोटक आयुष्य जरासें आभासमयच झालें आहे. घरांत चार दिवसांसाठीं पाहुणा यावा त्याप्रमाणें मी येत असतों. हिंडतों फिरतों त्या वेळींहि कार्यक्रमाची निश्चिति वाटत नाहीं. उद्यां काय प्रसंग येईल, तुरुंगाचें बोलावणें येईल कीं काय, अशी शंका मनांत सदैव घर करून राहिलेली असते.

१९२८ सालचे अखेरीचे दिवस आले. कलकत्ता-काँग्रेसला थोडा अवधि उरला होता. तेथें वडील अध्यक्ष व्हावयाचे होते. सर्वपक्षीय परिषद, तिला सादर केलेला अहवाल वगैरेविषयींचे विचार त्यांच्या मनांत घोळत होते व काँग्रेसकडून त्यासाठीं मान्यता मिळवून घ्यावी अशी त्यांची इच्छा होती. ह्या गोष्टींना माझी संमति नाहीं, स्वातंत्र्याच्या प्रश्नावर तडजोड करण्यास मी तयार नाहीं हें ठाऊक असल्यामुळें ते अस्वस्थ झाले होते. त्याविषयीं फारशी चर्चा आम्हीं केली नसली, तरी मानसिक विरोधाची कल्पना आम्हाला आलेली होती. दोघांचे मार्ग भिन्न होऊं लागले होते. पूर्वींहि अनेकवार तीव्र मतभेद होऊन भिन्नभिन्न राजकीय गटांत आम्ही सामील झालों होतों. परंतु त्यापूर्वीं अगर नंतर केव्हांहि मनावर इतका ताण पडलेला मला आठवत नाहीं. दोघांनाहि प्राप्तपरिस्थितीबद्दल वाईट वाटत होतें. कलकत्त्याला प्रसंग असा येऊन ठेपला कीं सर्वपक्षीय परिषदेच्या अहवालाच्या बाजूला बहुमत होत नसेल, तर आपण अध्यक्षस्थान स्वीकारणार नाहीं असें वडिलांनीं जाहीर केलें. हा मार्ग अगदीं तर्कग्राह्य व सनदशीर असाच होता. परंतु त्यांचे अनेक विरोधक त्यामुळें बुचकळ्यांत पडले. इतक्या थराला गोष्टी जाव्यात असा त्यांचा मानस नव्हता. काँग्रेसमध्यें व इतरत्र अशी एक वृत्ति आढळून येत असते कीं, टीका व निषेध करावयाचा पण स्वतःवर जबाबदारी घ्यावयाची वेळ आली कीं काढता पाय घ्यावयाचा! मनांतून आशा अशी कीं टीकाविषय झालेल्या पक्षानें आपणाला पसंत पडेल अशा रीतीनें स्वतःचा मार्ग फिरवून घ्यावा, पण आमच्या हातीं जहाजाचें सुकाणूं मात्र देऊं नये. जेथें अधिकाराच्या जागा आम्हांला मिळवतांच येत नाहींत व हिंदुस्थान सरकारप्रमाणें कार्यकारी मंडळ अप्रातिनिधिक व बेजबाबदार असतें, तेथें फक्त टीकेवरच भागवावें लागतें. अशी टीका केव्हांहि अकरणरूप अथवा वांझच असणार. तरी ती टीका देखील परिणामकारक होण्याच्या दृष्टीनें जेव्हां केव्हां संधि मिळेल तेव्हां सर्व अधिकार व सर्व जबाबदारी—सरकारच्या लष्करी व परराष्ट्रीय खात्यासुद्धां हरएक खात्याची—शिरावर घेण्याची मानसिक तयारी ठेवणें जरूर आहे. सैन्याच्या बाबतींत अर्धामुर्धा ताबा मिळावा अशी नेमस्तांप्रमाणें मागणी करणें म्हणजे कारभार चालवण्यास आम्ही नालायक आहों अशी कबुली देऊन आपल्या टीकेची नांगी आपणच मोडून टाकण्याप्रमाणें आहे!

ही निषेध करण्याची व जबाबदारी टाळण्याची वृत्ति गांधीजींच्या टीकाकारांत पुष्कळदां आढळून येते. त्यांचें कार्य नापसंत असणारे व त्यावर ताशेरा झाडणारे असंख्य लोक काँग्रेसमध्यें होऊन गेले. परंतु गांधीजींना काँग्रेसबाहेर हाकून

लावण्यास ते तयार नसत. अशी वृत्ति कां, हें समजणें सोपें काम आहे. पण असल्या वृत्तीपासून कोणत्याच पक्षाचा फायदा होत नाहीं हें ध्यानांत ठेवावें.

जवळ जवळ अशीच अडचण कलकत्त्याला उपस्थित झाली. दोन्ही गटांत बोलणीं-सवरणीं सुरू होतीं, तडजोडीचा मसुदाहि तयार झाला होता; पण नंतर तो बारगळला. असा सगळा गोंधळाचा व पोरकटपणाचा प्रकार झाला. कॉंग्रेसच्या शेवटच्या मुख्य ठरावान्वयें सर्वपक्षीय अहवाल मान्य करण्यांत आला असला, तरी असेंहि मत व्यक्त करण्यांत आलें होतें, कीं अहवालांतील राज्यघटनेला ब्रिटिश सरकारनें एक वर्षाच्या आंत जर संमति दिली नाहीं, तर कॉंग्रेस स्वातंत्र्याकडे पुन्हां वळेल. अशा प्रकारें एक वर्षाची मुदत सरकारला देण्यांत आली. हा ठराव म्हणजे सौम्य शब्दांत लिहिलेला निर्वाणीचा खलिताच होता. पण स्वातंत्र्याच्या ध्येयापासून ह्या ठरावामुळें पाऊल माघारें पडलें यांत शंकाच नाहीं. सर्वपक्षीय अहवालांत साम्राज्यान्तर्गत स्वराज्यहि सर्वच्या सर्व मागितलेलें नव्हतें. तथापि हा ठराव करण्यांत शहाणपणाच झाला. कारण त्यामुळें विरोधी गट फुटावयास तयार नसतांच जी निष्फळ फूट व्हावयाची ती टळली व १९३० सालच्या लढ्यापर्यंत कॉंग्रेस अभंग राहिली. सर्वपक्षीय घटना ब्रिटिश सरकार एका वर्षांत मान्य करणार नाहीं हें उघडच दिसत होतें. लढा टळणें शक्य नव्हतें, त्या काळच्या परिस्थितींत गांधीजींच्या नेतृत्वाशिवाय झगड्याला परिणामकारक स्वरूप येण्याचा मुतराम् संभव दिसत नव्हता.

खुल्या अधिवेशनांत मीं ठरावाला विरोध केला. पण तो मनापासून झाला नाहीं. तरीहि मला पुन्हां सरचिटणिसाच्या जागेवर निवडण्यांत आलेंच. कांहींहि होवो, चिटणिसाची जागा माझ्या मिराशीच्या जागेप्रमाणें होऊन बसली होती. कॉंग्रेसच्या गादीवर कोणताहि अध्यक्ष बसो, कॉंग्रेसचें यंत्र माझ्याच ताब्यांत राहात असे.

कलकत्ता-कॉंग्रेसच्या आधीं कांहीं दिवस कोळशाच्या खाणींच्या केंद्रस्थानीं झारिया येथें 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रसचें' अधिवेशन भरविण्यांत आलें. मीं हजर राहून पहिल्या दोन दिवसांच्या कार्यक्रमांत भाग घेतला. नंतर मला कलकत्त्याला जावें लागलें. ही माझी पहिलीच ट्रेड युनियन कॉंग्रेस. शेतकऱ्यांतील व अलीकडे कामकऱ्यांतील माझ्या कार्यामुळें मला थोडीशी लोकप्रियता प्राप्त झाली असली, तरी ट्रेड युनियन कॉंग्रेसमध्यें मी नवखाच होतों. सुधारणावादी व क्रांतिकारक गटांमधील जुनें भांडण तसेंच पुढें चालू असल्याचें दिसून आलें. कोणत्या आंतरराष्ट्रीय मजूर-संघटनेला जाऊन मिळावें, साम्राज्यविरोधी लीग व अखिल पॅसिफिक संघ यांच्याशीं संबंध ठेवावा कीं नाहीं, त्याचप्रमाणें जिनीव्हा येथील आंतर-राष्ट्रीय मजूर-कचेरीच्या परिषदेला आपला प्रतिनिधी पाठवावा कीं नाहीं, हे वादग्रस्त मुद्दे तेथें उपस्थित झालेच होते. परंतु कॉंग्रेसमधील विरोधी तटांच्या दृष्टिकोणांत जो जमीन-अस्मानाचा फरक होता, त्याचें महत्त्व विशेष होतें. राजकारणांत

नेमस्त वृत्तीचा, किंबहुना मजुरांच्या चळवळींत राजकारणाची लुडबुड नसावी अशा मताचा जुना गट तेथें हजर होता. निर्भेळ आर्थिक कार्यक्रमावर व त्यांतही सौम्य अशा कार्यक्रमावर त्याचा विश्वास असून मजुरांची स्थिति हळूहळू सुधारावी हें त्याचें ध्येय होतें. हिंदी मजुरांचे प्रतिनिधि म्हणून अनेक वेळां जिनिव्हाला गेलेले श्री. एन्. एम्. जोशी हे त्या गटाचे पुढारी होते. दुसरा गट लढाऊ व राजकीय वृत्तीचा असून क्रांतिवादी दृष्टिकोणाचा तो उघडपणें पुरस्कार करीत असे. तो गट कम्युनिस्टांच्या व कम्युनिस्टसदृश कार्यकर्त्यांच्या सर्वस्वीं मुठींत नसला, तरी त्या गटांत त्यांचें बरेंच वजन होतें. मुंबईच्या कापड-गिरण्यांतील मजुरांचे संघ या गटाच्या ताब्यांत गेलेले असून त्याच्या नेतृत्वाखालीं मुंबईत एक प्रचंड व कांहीं अंशीं यशस्वी असा संपहि घडून आला होता. मुंबईला गिरणी-कामगार युनियन या नांवाची एक नवी व प्रबळ संस्था निर्माण झाली होती, आणि मुंबईतील मजुरांवर या गटांतील कार्यकर्त्यांचा अतिशय प्रभाव होता. या क्रांतिवादी गटाच्या विचारसरणीची छाप पडलेला कामगारांचा बलिष्ठ असा दुसरा संघ म्हणजे जी. आय. पी. रेल्वे-संघ.

ट्रेड युनियन कॉंग्रेस जन्मल्यापासून तिचें कार्यकारी मंडळ व तिची कचेरी एन्. एम्. जोशी व त्यांचे निकटवर्ती सहकारी यांच्याच हातीं होती. ट्रेड युनियन चळवळीच्या विस्ताराचें बरेंचसें श्रेय श्रीयुत जोशी यांनाच द्यावें लागेल. अनुयायी-वर्गांत क्रांतिवादी गटाचें खूप वजन असलें, तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या धोरणांत बदल करण्याची संधि त्यांना मिळत नसे. त्यामुळें असमाधानाची परिस्थिति निर्माण होऊन खरी वस्तुस्थिति व्यक्त होण्यास मार्ग उरला नाहीं. असंतोष धुमसूं लागला व घासाघीस सुरू झाली. ट्रे. यु. कॉंग्रेस काबीज करावी असें क्रांतिवादी गटाला वाटूं लागलें. तरी ही गोष्ट निकरावर आणून फूट पाडूं नये अशी प्रवृत्ति दिसून येत होती. हिंदुस्थानांतील ट्रे. यु. ची चळवळ अद्यापि बाल्यावस्थेंत असून असावें तसें सामर्थ्य तिच्या अंगीं आलें नव्हतें. चळवळीचो धुरा मजुरेतर लोकच ओढीत असत. अशी परिस्थिति असली म्हणजे मजुरांची नागवणूक करण्याची प्रवृत्ति उपऱ्या पुढाऱ्यांत दिसून येऊं लागते. हिंदुस्थानांतील ट्रे. यु. कॉंग्रेसमध्यें व मजूरसंघांतून देखील तिचा प्रादुर्भाव झालेला दिसून येई. कित्येक वर्षे खपून आपली चळवळी-विषयींची तळमळ व अधिकार एन्. एम्. जोशी यांनीं सिद्ध केला होता व ते राज-कीय दृष्ट्या मागसलेले व नेमस्त वृत्तीचे आहेत असें ज्यांना वाटे, ते लोक सुद्धां हिंदी मजुरांच्या चळवळीच्या बाबतींत श्री. जोशी यांनीं बजावलेली कामगिरी मान्य करीत असत. प्रतिपक्षाकडून अशी मान्यता मिळणें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें.

झारिया येथें क्रांतिवादी गटाकडेच माझी सहानुभूति झुकत असली, तरी नवखा असल्यामुळें तेथील आपापसांतील झगडे पाहून मी हतबुद्ध झालों व त्यांच्या-पासून चार हात दूर राहाण्याचें मीं ठरविलें. मीं झारिया सोडल्यानंतर ट्रे. यु. कॉंग्रेसच्या

वार्षिक निवडणुकी झाल्या व नव्या वर्षासाठीं अध्यक्षस्थानीं माझी निवडणूक करण्यांत आली. हें वृत्त मला कलकत्ता येथें समजलें. क्रांतिवादी गटानें त्याच जागेसाठीं उमेदवार म्हणून एका कामगाराला उभा केला होता. त्यावर मात करतां यावी म्हणून नेमस्त गटानें माझें नांव पुढें केलें. निवडणुकीच्या दिवशीं मी झारिया येथें उपस्थित असतों, तर त्या कामगारासाठीं मीं माझें नांव खात्रीनेंच मागें घेतलें असतें. एका नवख्या व बिगर कामगार माणसाला एकदम अध्यक्षपदावर नेऊन बसविणें ही गोष्ट माझ्या दृष्टीनें शिष्टपणाला शोभणारी नाहीं.

त्या सालीं पुष्कळच संप व मजुरांच्या चळवळी झाल्या. पुढील सालीं तोच प्रकार चालू राहिला. मुंबईच्या दरिद्री व लढाऊ कामगारांनीं या संपांत बिनीवरचें काम केलें. बंगालच्या ज्यूट गिरण्यांतहि एक मोठा सार्वत्रिक संप घडून आला. त्याचप्रमाणें जमशेदपूरच्या लोखंड-कारखान्यांत व रेल्वेवरहि संप झाले. जमशेदपूर येथील टिन प्लेटच्या कारखान्यांतील संप फार दिवसपर्यंत मोठ्या शर्थीनें लढविण्यांत आला. जनतेची सहानुभूति या संपाला असतांहि कारखानदारांनीं संपवाल्यांना दडपून टाकलें.

हीं दोन वर्षे मजुरांचा असंतोष वाढत होता व त्यांची स्थिति अधिकाधिक भीषण होत चालली होती. हिंदी कारखानदारांना युद्धानंतरचा काळ फार तेजीचा गेला व त्यांनीं गडगज नफा मिळवला. पांच सहा वर्षेपर्यंत ज्यूटच्या व कापड-गिरण्यांच्या शेअर्सवर साधारणपणें शंभर ते दीडशें टक्के नफा प्रतिवर्षी देण्यांत येत असे! हा सर्व नफा मालकांच्या व भागीदारांच्या तिजोरींत जाऊन पडला; पण मजुरांची स्थिति मात्र पूर्वीप्रमाणेंच कायम राहिली. जी कांहीं थोडीफार वाढ मजुरींत होई, ती पदार्थांच्या वाढत्या किंमतींत जिरून जात असे. लाखों रुपयांचा नफा वर्षानुवर्षे मिळत असतां मजूर मात्र त्याच नरकवासांत राहत होते. त्यांच्या स्त्रियांना अब्रू राखण्यासाठीं पुरेल एवढें धडुतें मिळण्याची मारामार पडे. मुंबईंतील परिस्थितीसुद्धां हलाखीचीच होती. परंतु कलकत्त्यांतील भव्य प्रासादांपासून केवळ अर्ध्या तासाच्या अंतरावर राहणाऱ्या मजूर-कामगारांची परिस्थिति त्यांच्यापेक्षांहि खराब होती. तेथें अर्धनग्न स्त्रिया पोटाला पुरेल-न-पुरेल इतक्या मजुरीवर काम करीत व संपत्तीची गंगा अखंडपणें ग्लास्गो व डंडी येथील गिरणी-मालकांच्या व कांहीं हिंदी लोकांच्या घरांकडे वाहत राही.

तेजीचे दिवस होते तोंपर्यंत उद्योगधंद्यांची चंगळ चालली; पण तेजी संपून नफा घटूं लागला त्याबरोबर पहिला फटका मात्र मजुरांच्या डोक्यावर बसला; नफ्याच्या दिवसांची आठवण बुजून गेली. नफा सर्व फस्त झालेला होता, नफा पुरेसा सुटेना; मग कारखाने चालवावयाचे कसे? म्हणून असंतोष माजला. मजुरांच्या चळवळी आणि प्रचंड संप मुंबईंत होऊं लागले. त्यांचा सर्वांच्या मनावर परिणाम घडला. गिरणी-मालक व सरकार या दोघांचेंहि धाबें दणाणलें. विचारसरणीच्या व संघटनेच्या

दृष्टीनें मजूर-चळवळीला वर्ग-जागृत असें लढाऊ व उग्र स्वरूप येत चाललें होतें. राजकीय जागृतीची वाढहि झपाट्यानें होत होती. ह्या दोन्ही चळवळी जरी भिन्न व स्वतंत्र अशा असल्या, तरी त्यांचे प्रवाह समांतर वाहत असल्याकारणानें भविष्यकाळ आपणाला सुखाचा जाणार नाहीं असें सरकारला वाटूं लागलें.

१९२९ च्या मार्चमध्यें क्रांतिवादी गटांतील कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करून सरकारनें मजुरांच्या संघटनेवर एकाएकीं एक जबरदस्त टोला लगावला. मुंबईच्या गिरणीकामगार युनियनचे व बंगाल, संयुक्तप्रांत व पंजाब या प्रांतांतील मजुरांचे पुढारी पकडले गेले. त्यांपैकीं कांहीं शंभर टक्के कम्युनिस्ट होते; कांहीं अर्धकच्चे कम्युनिस्ट तर कांहीं केवळ कामगारसंघवादी होते. पुढें साडेचार वर्षे चालू राहिलेल्या मिरत खटल्याचा प्रारंभ ह्या अशा प्रकारें झाला.

मिरत खटल्यांतील आरोपींच्या बचावासाठीं एक समिति स्थापण्यांत येऊन माझ्या वडिलांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली. डॉ. अन्सारी व इतर कांहीं लोक सभासद होते; त्यांत मीहि एक होतों. आमचें काम फार बिकट होतें. पैसे सहजासहजीं जमेनात. कम्युनिस्ट व समाजवादी लोकांबद्दल व मजूर-कार्यकर्त्यांबद्दल सधन लोकांना विशेष सहानुभूति वाटत नसावी असें दिसलें. कोणाच्या तरी अंगचा लचका तोडावयास मिळत असेल तरच वकील काम करण्यास तयार होत. समितीमध्यें माझ्या वडिलांसारखे कांहीं विख्यात वकील होते. सल्ला-मसलतीसाठीं व मार्गदर्शनासाठीं त्यांचें सहाय्य आम्हांला विनामूल्य मिळत असे. परंतु महिनोगणती मिरत येथें कायम वास्तव्य करणें त्यांना शक्य झालें नसतें आणि ज्या इतर वकिलांकडे आम्हीं गेलों, त्यांना ह्या खटला म्हणजे पैसे मिळविण्याची एक नामी संधि आहे असें वाटत असावें !

मिरत-समितीप्रमाणेंच एम्. एन्. रॉयच्या व इतरांच्या बचावासाठीं नेमलेल्या समित्यांवरहि मीं काम केलेलें आहे. प्रत्येक प्रसंगीं माझ्या पेशाच्या लोकांचा लोभीपणा पाहून आश्चर्य करण्याची पाळी मजवर आली ! १९१९ सालीं पंजाब-मधील लष्करी कायद्याच्या खटल्याच्या वेळीं मला पहिला जबरदस्त धक्का बसला. लष्करी कायद्याच्या खटल्यांतील आरोपीतर्फे काम चालविण्यासाठीं एका अतिशय प्रख्यात वकिलानें भरमसाट फीची मागणी केली. आरोपींपैकीं एक जण तर वकील म्हणजे त्याचा व्यवसायबंधुच होता. पुष्कळांना कर्ज काढून व मालमत्ता विकून त्याच्या फीची भर करावी लागली ! यानंतर मला आलेले अनुभव तर यापेक्षांहि खेदजनक आहेत. कामगारांपासून पैसा-पैसा जमवावा व वकिलांच्या नांवानें अगडबंब रकमांचे चेक फाडून द्यावे, ही गोष्ट मनाला असह्य होत असे. शिवाय ही सर्व धडपडसुद्धां व्यर्थच ठरे. कारण मजुरांसंबंधीं भरण्यांत आलेल्या खटल्यांच्या वेळीं बचाव केला अगर न केला, तरी निकालांत बहुतेक तसूभर देखील फेर होत नसे. अर्थात् मिरत-खटल्यासारख्या प्रसंगीं मात्र बचाव करणें अनेक दृष्टींनीं अवश्य

होतें. परंतु आरोपींशीं व्यवहार करण्याचें कामहि सोपें नव्हतें. आरोपी मंडळींत सात ऋषींचीं सात मतें; व त्यांच्या बचावाच्या तऱ्हाहि वेगवेगळाल्या ! परस्परांत मुळींच एकमत होत नसे. कांहीं महिन्यांनीं समिति विसर्जन करण्यांत आली. वैयक्तिक मदत मात्र आम्ही करीत राहिलों. इकडे राजकीय परिस्थितींत असा बनाव होत चालला होता कीं आमचें सर्व चित्त तिकडेच लागून राहिलें. १९३० सालीं तर आम्ही सर्वच लोक तुरुंगांत गेलों.

२७

# मेघांचा गडगडाट

१९२९ सालचें कॉंग्रेसचें अधिवेशन लाहोर येथें व्हावयाचें होतें. दहा वर्षांनीं पंजाबांत कॉंग्रसचें आगमन होत होतें; तेव्हां दहा वर्षांचे दहा पडदे बाजूला सारून लोकांची दृष्टि जणूं काय १९१९ च्या जालियनवाला बागेच्या, अपमानांत बुडवून टाकणाऱ्या लष्करशाहीच्या, अमृतसर येथील कॉंग्रेसच्या व नंतर लवकरच सुरू झालेल्या असहकारितेच्या चित्रपटावर खिळून राहिली. ह्या दहा वर्षांत जरी कितीहि गोष्टी घडल्या असल्या व हिंदुस्थानचें रूप पालटलें असलें, तरी साम्यदर्शक गोष्टींची सुद्धां कांहीं वाण नव्हती. राजकीय जागृति तीव्र होत चालली होती. युद्धाचे वारे भणभणूं लागले होते आणि आगामी लढयाच्या मेघांची सुदीर्घ छाया देशभर पसरली होती.

प्रांतिक व मध्यवर्ति कायदे-मंडळाकडून लोकांचें लक्ष उडून बरेच दिवस लोटले होते. अर्थात् त्या सोंवळ्या प्राकारांत हिंडणाऱ्या भगतांची गोष्ट वेगळी. त्यांची नित्य शिळी अर्चा सुरू होतीच. सरकारच्या बेजबाबदार व अधिकारमदान्वित कृत्यांभोंवतीं पांघरूण वेढण्याचा त्यांचा खटाटोपहि चालू होता. पण पांघरूणच फाटकें व जीर्ण झालेलें, त्याला ते तरी काय करणार ? १९२८ सालीं सायमन कमिशन-बरोबर सहकार्य करूं नये असा मध्यवर्ती कायदे-मंडळानें ठराव केला, तोच लोकांची दृष्टि आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं कायदे-मंडळानें केलेला अखेरचा प्रयत्न.

त्यानंतर असेंब्लीचे अध्यक्ष व सरकार यांच्यांत खूपच झटापट सुरू झाली. सरकारशीं फटकून स्वतंत्रपणानें वागण्याचें धोरण असेंब्लीचे स्वराज्यपक्षीय अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनीं ठेवल्यामुळें सरकारच्या हृदयांत ते शल्याप्रमाणें बोंचूं लागले होते व त्यांची नांगी ठेंचण्याचा प्रयत्न सरकारतर्फे चालला होता. ह्या झगड्या-कडे जनतेचें लक्ष असलें, तरी बहुतांशीं कायदे-मंडळाबाहेरच्या घडामोडींवरच लोकांची नजर खिळून राहिली होती. कायदे-मंडळाविषयीं माझ्या वडिलांचाहि भ्रमनिरास झाला होता व तेथून अधिक कांहीं एक लभ्यांश होणें शक्य नाहीं असें ते बोलूनहि दाखवीत असत. संधि आल्याबरोबर तेथून बाहेर पडण्याची त्यांची इच्छा होती. ते सनदशीर प्रकृतीचे असले, तरी परिस्थितीचा बनावच असा होत चालला होता कीं सनदशीर समजल्या जाणाऱ्या मार्गानें गेल्यास धूळसुद्धां हातीं लागणार नाहीं असाच निष्कर्ष काढणें भाग पडावें. स्वतःच्या कायदेबाज मनाची ते अशी समजूत करीत कीं हिंदुस्थानांत घटना आहेच कोठें ? व वटहुकुमांची दडपशाही

अधिकाऱ्यांच्या इच्छामात्रेंकरून सुरू होत असल्यावर येथें कायद्याचें राज्य आहे असें तरी कसें म्हणतां येईल? मनानें अथवा आचरणानें ते मुळींच क्रांतिवादी नव्हते. भांडवलशाही लोकसत्ताक राज्यपद्धति जिला म्हणतां येईल अशी कांहीं चीज अस्तित्वांत असती तर त्या राज्यघटनेचे ते आधारस्तंभ बनून राहिले असते, याविषयीं तिळमात्र शंका नको. पण हिंदुस्थानांतील परिस्थिति डोळ्यांना दिसत असतां दिखाऊ लोकसत्तेचा बडेजाव करून सनदशीर मार्गाविषयीं वाचाळपणा करीत राहाण्याची मात्र त्यांना अधिकाधिक चीड येऊं लागली होती.

गांधीजी अजून राजकारणापासून अलिप्तच राहिले होते. नाहीं म्हणावयास कलकत्ता-काँग्रेसमध्यें त्यांनीं काय भाग घेतला असेल तेवढाच तथापि सर्व घडामोडींकडे त्यांचें लक्ष असे. काँग्रेसचे पुढारी त्यांचा सल्लाहि वारंवार घेत. खादीप्रचारासाठीं सर्व देशभर त्यांनीं मोठमोठे दौरे काढले. त्यांत लहानसहान शहरें व खेडीपाडींदेखील सोडलीं नाहींत. त्यांना पाहण्यासाठीं अलोट जनसंमर्द लोटत असे. अशा प्रकारें सर्व हिंदुस्थानभर अनेकवार हिंडून हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व कराची ते कलकत्त्यापर्यंत पसरलेल्या या अफाट भूभागाचा पूर्ण परिचय त्यांनीं करून घेतलेला आहे. हिंदुस्थानचा त्यांच्याइतका प्रवास केलेली दुसरी एकहि व्यक्ति विद्यमान असेल असें मला वाटत नाहीं

पूर्वी अखंड भ्रमण करणारे यात्रेकरू लोक होते, पण त्यांचीं प्रवाससाधनें तुटपुंजीं असत. गांधीजी आगगाडीनें व मोटर-गाडीनें प्रवास करीत; पण तेवढ्याच साधनांवर ते अवलंबून राहत नसत. पायींहि ते ठिकठिकाणीं जात अशा रीतीनें हिंदुस्थान व हिंदी जनता यांच्याविषयींचें असामान्य ज्ञान त्यांनीं संपादन केलें. त्याचप्रमाणें हजारों-लाखों लोकांनीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें व गांधीजींच्या वैयक्तिक भेटीचा लाभहि त्यांना घेतां आला.

१९२९ च्या अगदीं ऐन उन्हाळ्यांत ते संयुक्त प्रांतीं आले होते. बरेच आठवडेपर्यंत त्यांचा येथें मुक्काम होता. मधून मधून कांहीं दिवस मी त्यांच्याबरोबर हिंडावयास जात असें. त्यांच्यासाठीं हजारों लोक जमतात ही गोष्ट अनुभवानें माहिती झालेली असतांहि लोकांची गर्दी पाहून मला नवल वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. गोरखपूरसारख्या जिल्ह्यांतून होणारी लोकांची खेंचाखेंच पाहिली म्हणजे वर टोळधाडीची आठवण होई! रस्त्याच्या कडेला दहा-दहा हजार लोकांचे थवे जमत. आणि दररोजच्या मुख्य-मुख्य सभांना एक लाखावर श्रोतृसमुदाय गोळा होई. ध्वनिक्षेपणाची सोय वगैरे कांहींच नसल्यामुळें गांधीजींचें भाषण ऐकूं जाणें केवळ अशक्यच होतें. पण त्यांनीं व्याख्यानाची अपेक्षाच धरलेली नसावी. गांधीजी दिसले, एवढेंच त्यांना पुरे होतें.

संयुक्त प्रांतांतील दौऱ्यांत मी त्यांच्याबरोबर सदोदित राहात नव्हतों. माझा विशेष कांहीं उपयोग त्यांना झाला नसता. शिवाय त्यांच्याबरोबरच्या मंडळींत

आपली भर घालणें मला प्रशस्तहि वाटलें नाहीं. गर्दीचें मला कांहीं वाटत नसे. पण स्वतःची फुकट ओढाताण करून घ्यावयास मात्र मी तयार नव्हतों. गांधीजींच्या बरोबर फिरतांना इतरांप्रमाणें माझ्याहि पायांचीं बोटें गर्दीत चिरडलीं जात. मला इतर पुष्कळच कामें होतीं व खादीप्रचारावरच काय तो सगळा भर द्यावा असें मला वाटत नसे. राजकीय परिस्थितीला जोर चढत चालला असतां खादीचें काम करीत राहणें दुय्यम दर्जाचें आहे असें मानणारांपैकीं मी होतों. बिगर-राजकीय गोष्टींविषयींच्या गांधीजींच्या या छंदाची मला केव्हां केव्हां चीड येई; त्यांच्या विचारांचा उलगडा मला करतांच येत नसे. त्या काळांत खादीसाठीं ते फंड गोळा करीत व दरिद्र-नारायणासाठीं मी पैसे गोळा करीत आहें असें ते सांगत असत. छोट्या छोट्या धंद्यांत गरिबांना काम लावून द्यावें असा त्या म्हणण्याचा अर्थ असावा. पण दारिद्र्याचे देव्हारे माजवण्याची कल्पनाहि त्या शब्दांत दिसून येई. देव हा खास दीनांचा वाली आहे, त्याला दरिद्री लोक सर्वांहून आवडते आहेत, अशा धार्मिक समजुती सगळीकडे आढळून येतात. मला तें तत्त्वज्ञान पसंत पडण्याजोगें नव्हतें. दारिद्र्याचा मला तिटकारा वाटे. भांडून झगडून तें समूळ उपटून टाकलें पाहिजे, कोणत्याहि प्रकारें त्याला उत्तेजन मिळतां कामा नये, असें माझें मत होतें. पण मग ज्या पद्धतीमुळें दारिद्र्य उत्पन्न होतें व टिकतें, त्या पद्धतीवर प्रहार करण्याचें काम चुकवितां यावयाचे नाहीं. ते काम ज्यांना टाळावयाचें असेल, त्यांनीं कोणत्या तरी प्रकारें दारिद्र्याचें समर्थन करावें हें क्रमप्राप्तच आहे. त्यांचे नेहमीं दुष्काळी विचार चालावयाचे. देशांत जीवनावश्यक वस्तूंची समृद्धि झाली असें चित्र त्यांच्या डोळ्यांना पाहतांच येत नाहीं. श्रीमंत व गरीब ही जोडी यावच्चंद्रदिवाकरौ जगतावर राहणार अशी बहुधा त्यांची समजूत असावी.

ह्या प्रश्नाची चर्चा गांधीजींबरोबर करण्याचा सुयोग प्राप्त झाला कीं श्रीमंतांनीं आपली संपत्ति गरिबांसाठीं निधि म्हणून धारण करावी हा मुद्दा ते आग्रहानें प्रतिपादन करीत. हा विचार फार पुरातन कालापासून युरोपांत व हिंदुस्थानांत मांडण्यांत आलेला आहे.

ही गोष्ट घडेल व यामुळें समाजांतील एक बिकट समस्या सोडवितां येईल अशी कल्पना तरी कशी करवते तें मला तरी मुळींच समजत नाहीं.

मागें लिहिल्याप्रमाणें असेंब्लींचें काम पेगत चाललें असतां भगतसिंग व बटुकेसरदत्त यांनीं प्रेक्षकांच्या गॅलरींतून दोन बॉंब फेंकले. त्यामुळें उल्कापात झाल्या-प्रमाणें जनता खडबडून जागी होऊन असेंब्लीकडे पाहूं लागली. बॉंबमुळें कोणाला कोठेंहि विशेष दुखापत झाली नाहीं. आरोपींनीं नंतर सांगितल्याप्रमाणें ते बॉंब घायाळ करण्यासाठीं नसून आवाजानें केवळ धामधूम उडवून देण्यासाठीं फेंकण्यांत आले असावे. आणि असेंब्लींत व बाहेर त्यामुळें खरोखरीच धामधूम उडाली. लाला लजपतराय यांच्यावर ज्या तरुण इंग्रज अधिकाऱ्यानें लाठीचे प्रहार केले अशी समजूत

होती, त्याच्यावर गोळी झाडून त्याला ठार करण्यांत आलें. बंगालमध्यें व इतरत्र दहशतवादी कृत्यांना जोर चढला. कटाचे खटले भरण्यांत आले व चौकशीविना स्थानबद्ध केलेल्यांची संख्या फुगत चालली.

लाहोर कटाच्या खटल्याच्या वेळीं कोर्टांत पोलिसांनीं तऱ्हेवाईक वर्तन केल्यामुळें लोकांचें लक्ष त्या खटल्याकडे अधिकच लागून राहिलें. कोर्टांतील व तुरुंगांतील वागविण्याच्या ह्या पद्धतीचा निषेध म्हणून बहुतेक आरोपींनीं अन्नसत्याग्रहाला सुरुवात केली. सत्याग्रहाला नेमकें कारण कोणतें घडलें तें आठवत नाहीं; पण नंतर सर्वच राजबंद्यांच्या वागवणुकीच्या प्रश्नांचा त्यांत समावेश झाला.

आठवड्यामागून आठवडे उलटले तरी सत्याग्रह चालू होता. देशांत त्या बातमीनें खळबळ उडाली. अशक्तपणा आल्याकारणानें आरोपींना कोर्टांत नेणें अशक्य होऊन खटला वारंवार तहकूब करावा लागत होता. तेव्हां आरोपी अगर त्यांचा वकील कोर्टांत हजर नसला तरीहि कोर्टानें काम चालू ठेवावें अशा अर्थाचा एक कायदा सरकारनें मंजूर करून घेतला. राजबंद्यांच्या वागवणुकीचा विचारहि सरकार करणार होतें.

मी लाहोरला पोंचलों, तेव्हां अन्नसत्याग्रहाचा एक महिना संपून गेला होता. सत्याग्रह्यांपैकीं कांहींना तुरुंगांत भेटण्याची परवानगी मला मिळाली. भगतसिंग, जतीन्द्रदास वगैरे मंडळींना मी प्रथमच भेटत होतों. सगळे जण अगदीं अस्थिपंजर होऊन अंथरुणाला खिळले होते. त्यांच्याशीं फार वेळ बोलणें शक्यच नव्हतें. भगतसिंगाचा चेहरा मोठा गोड व पाणीदार होता. तो शांत व गंभीर असा दिसला. वैमनस्याचा भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला नव्हता. तो अत्यंत सौजन्यानें बोलत होता व त्याची दृष्टीहि सौजन्यपूर्ण दिसत होती. पण असेंहि वाटतें कीं, एक महिनाभर उपवास केल्यानंतर माणसाच्या तोंडावर व भाषणांत मार्दव येणारच. जतीन्द्रदास तर भगतसिंगापेक्षांहि सौम्य दिसला. एकाद्या निष्पाप बालिकेप्रमाणें त्याचा चेहरा मृदु व सालस होता. मी त्याला भेटलों तेव्हां त्याला फार वेदना होत होत्या. पुढें एकसष्ट दिवसांच्या उपोषणानंतर तो मृत्यु पावला.

लालाजींबरोबर १९०७ सालीं हद्दपार करण्यांत आलेल्या सरदार अजितसिंग नामक आपल्या चुलत्याची कांहीं तरी माहिती आपल्याला मिळावी, अशी भगतसिंगाला फार तळमळ लागून राहिली होती. पण त्यांच्याबद्दल नक्की अशी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं, असें मला वाटतें.

जतीन्द्रदासाच्या मृत्यूमुळें देशांत मोठी खळबळ उडाली. राजबंद्यांच्या वागवणुकीच्या प्रश्नाला चालना मिळून त्यासाठीं सरकारनें एक समिति नेमली. तिच्या शिफारशींवरून नवीन नियम करण्यांत आले. कैद्यांचे तीन वर्ग पाडण्यांत येऊन राजबंद्यांचा स्वतंत्र असा वर्ग मानण्यांत येऊं नये असें ठरलें. ह्या नियमामुळें कांहीं सुधारणा होतील असें वाटत होतें; पण तसें कांहींहि घडून आलें नाहीं. अद्यापि तुरुंगांतील स्थिति पूर्वीप्रमाणेंच अत्यंत असमाधानकारक अशी आहे.



विजयालक्ष्मी पंडित

उन्हाळा व पावसाळा संपून थंडीचे दिवस आले व ठिकठिकाणच्या प्रांतिक कॉंग्रस-कमिट्या लाहोरच्या अधिवेशनासाठीं अध्यक्ष निवडण्याच्या तयारीला लागल्या. त्या सालीं गांधीजींची निवड जवळ जवळ एकमतानें करण्यांत आली. त्यांची पुन: निवड केल्यामुळें त्यांचा मोठासा सन्मान झाला असें नव्हे. तथापि लढा हा होणारच व त्याचें नेतृत्व जर कार्यदृष्ट्या त्यांच्याकडेच येणार, तर मग अधिकारदृष्ट्याहि त्यांनाच मुख्य कां न नेमा, असा निवडणारांचा विचार असावा. शिवाय तितक्या लायकीचा दुसरा कोणी थोर गृहस्थ त्या वेळीं नजरेसमोर नव्हता, हेंही खरेंच.

गांधीजींनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें नाकारलें. तथापि त्यांचा नकार आग्रह धरला तर बदलेल असें वाटत होतें. पुढें लखनौ येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरली, तेव्हां आम्हां सर्वांची शेवटच्या क्षणापर्यंत ते होय म्हणतील अशी अपेक्षा होती; पण ते ऐकेनात व शेवटच्या क्षणीं त्यांनीं माझेंच नांव पुढें ढकललें. या ठाम नकारामुळें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी जराशी भांबावून गेली व अशा घोटाळ्याच्या व अडचणीच्या पेंचांत पकडल्याबद्दल सभासद थोडेसे त्रासूनहि गेले. शेवटीं दुसरें कोणी सांपडत नाहीं म्हणून वैतागून कमिटीनें माझीच निवड केली!

त्या वेळीं मला जितका राग व चीड आली, तितकी पूर्वीं फारच क्वचित् आली असेल. माझा गौरव कमिटीनें केला याची जाणीव मला नव्हती असें नाहीं. पण नेहमींच्या साध्या मार्गानें मी निवडून आलों असतों तर त्या गौरवाचा आनंद मला मनापासून झाला असता. पण मी त्या अधिकाराच्या जागीं राजरस्त्यानें राहोच, पण बाजूच्या रस्त्यानेंहि आलों नाहीं. एकदम चोरदारानें वर यावें तसा प्रकार होऊन भांबावलेल्या श्रोतृसमुदायाला माझा स्वीकार करण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं! ही अवश्यंभावी गोळी त्यांनीं गिळून बाजू राखली खरी; पण स्वाभिमानाचा तुरा मोडल्यामुळें हा गौरवाचा अहेर परत करावा असें माझ्या मनांत आलें. तथापि त्रागा करण्याचें मोठ्या संयमानें टाळून जड अंत:करणानें मी तेथून निघून गेलों.

निवडणुकीचा हा निकाल ऐकून खराखरा आनंद कोणाला झाला असेल तर तो वडिलांना. माझें राजकारण त्यांना सर्वस्वीं आवडत नसलें, तरी मी मात्र त्यांचा आवडता होतों. माझें भलें झालेलें पाहिलें कीं त्यांचें अन्तःकरण हरखून जाई. माझ्या-वर ते पुष्कळदां टीका करीत व तुसडेपणानें बोलतहि. पण कोणाला त्यांची मर्जी राखावयाची असेल, तर त्यांच्यादेखत माझ्याबद्दल नालस्तीचा शब्द तोंडावाटे न काढण्याची खबरदारी घ्यावी लागत असे.

वडिलांच्या पाठोपाठ मुलगा अध्यक्षाच्या जागेवर चढावा हें दृश्य अभूतपूर्व होतें. मी अध्यक्ष झालों, तेव्हां माझें चाळिसावें वर्ष नुकतें कोठें संपलें होतें.

काँग्रेसच्या सर्व अध्यक्षांत मी वयानें लहान असें म्हणण्यांत येई; पण ती चूक होती. गोखले व अबुल कलाम अझाद यांचें वय त्याच सुमारानें असावें. तिशी पस्तीशीच्या वयांतच गोखल्यांची अनुभवी मुत्सद्दयांत गणना होऊं लागली होती. आपल्या विशाल ज्ञानाला साजेसा गंभीर चेहरा धारण करण्याची कला अबुल कलाम अझादांना उत्तम प्रकारें साध्य झालेली आहे. मला मात्र कोणी मुत्सद्दी समजत नाहीं व अतिरिक्त ज्ञानाचा आरोपहि माझ्यावर कोणीं केलेला नाहीं. त्यामुळें माझे पिकलेले केस व जरा उतरलेला चेहरा दिसत असून सुद्धां वयोवृद्धत्वाच्या आरोपांतून मी आतांपर्यंत मोकळा राहिलों आहें !

लाहोर-कॉंग्रेस समीप येऊन ठेपली. प्रसंग तर जणुं कांहीं आपल्या अंगभूत गतीनें व अनिवार्य क्रमानें पुढें पुढें लोटले जात होते. व्यक्तिमात्रांनीं कितीहि शर्थी मिरविली, तरी त्यांचें कार्य अल्प आहे असें वाटे, आणि अविरत वेगानें फिरत राहिलेल्या एका प्रचंड यंत्राचे आपण एक घटक आहों अशी कल्पना मनांत येई.

भविष्याची ही अनिरुद्ध प्रगति थांबवावी म्हणूनच कीं काय ब्रिटिश सरकार पुढें सरसावलें व व्हाइसरॉय लॉर्ड अर्विन यांनीं मंडलाकार परिषदेची घोषणा केली. त्यांतील शब्द अशा खुबीनें योजलेले होते, कीं त्यांतून लहान-मोठा, हवा तो अर्थ काढतां यावा ! त्यांतून अर्थ निघेल तो लघु निघण्याचाच अधिक संभव आहे असें आम्हांपैकीं पुष्कळजणांना वाटलें. बरें, कितीहि मोठा अर्थ निघाला, तरी आमच्या आकांक्षा त्यामुळें पुऱ्या होणें शक्यच नव्हतें. व्हाइसरॉयची घोषणा उच्चारून होते न होते तोंच अधाशाच्या उतावळेपणानें एक "पुढाऱ्यांची परिषद" दिल्लीला बोलावण्यांत आली.

गांधीजी, माझे वडील, विठ्ठलभाई पटेल व सप्रू वगैरे नेमस्त पुढारी तेथें उपस्थित होते. व्हाइसरॉयची घोषणा कांहीं शर्तींवर मान्य करणारा एक जाहीरनामा काढण्यांत आला. मात्र त्या शर्ती अत्यंत जिव्हाळ्याच्या असून स्वीकारण्यांत आल्याच पाहिजेत असें त्यांत नमूद केलें होतें. सरकारनें शर्ती मान्य केल्या तर सहकार करावा असें ठरलें. शर्ती चांगल्या ठांशीव होत्या व त्या मान्य झाल्या असत्या तर परिस्थितीचें रूप बदललें असतें.

असल्या ठरावावर सर्व जहाल नेमस्त गटांचें एकमत होणें हें मोठें विजयाचें लक्षण होतें. एकमतानें झालेला ठराव या दृष्टीनें पाहिल्यावर तो बराच प्रगमनशील वाटला, तरी त्यामुळें कॉंग्रेसची ध्येयच्युति झाली. पण ह्या ठरावांत देखील एक घातुक फट राहिली होती. शर्तींकडे पाहण्याचे कमींत कमी दोन तरी दृष्टिकोन होतेच. ह्या अटी अत्यावश्यक आहेत, सहकार्य करण्याआधीं त्या मान्य झाल्याच पाहिजेत ही गोष्ट नंतर भरलेल्या कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीनें स्पष्ट केली. त्याचबरोबर तिनें असेंहि सांगून टाकलें कीं ही मान्यता येत्या कॉंग्रेसच्या आधीं देण्यांत आली पाहिजे. कॉंग्रेसला ज्या किमान अटी वाटत होत्या, त्या नेमस्तांच्या दृष्टीनें

कमाल अटी होत्या. त्या पुढें मांडाव्या, पण मान्य करा नाहीं तर असहकार करूं असा आग्रह धरण्यापर्यंत मजल जाऊं नये असें त्यांचें मत होतें. त्यांचा युक्तिवाद असा कीं अटी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असें म्हटलेलें असलें, तरी त्या खऱ्याखुऱ्या अटी आहेत असें मानूं नये.

मतभेदाला अशा प्रकारें फट मिळाल्यामुळें आमच्यापैकीं सर्व जण व इतर हजारों लोक तुरुंगांत डांबलेले असतां आमच्याबरोबर ज्यांनीं त्या जाहीरनाम्यावर सह्या केल्या, त्या आमच्या नेमस्त व प्रतिसहकारी मित्रांनीं आम्हांला जेलमध्यें डांबणाऱ्यांशींच सहकार्य करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं !

हें असें घडणारच अशी आमच्यापैकीं बहुतेकांची अपेक्षा होती. अर्थात् जें घडून आलें तें इतक्या प्रमाणांत घडेल असें मात्र वाटलें नव्हतें. पण अशीहि आशा होती, कीं काँग्रेस दोन पावलें मागें सरकली, तेव्हां आतां तरी नेमस्त व तत्-सदृश इतर पक्षांच्या लोकांचीं सरकारच्या सहकार्यासाठीं सारासार विवेक न करतां हटकून धांवत सुटणारीं पावलें जरा वेळ थांबतील. हा समेटाचा ठराव मान्य करण्यांत आमच्यापैकीं कांहीं जणांचा याहूनहि बलिष्ठ हेतु होता; तो असा कीं मोठ्या लढ्याची आणीबाणीची वेळ समीप आली आहे, तर या वेळीं काँग्रेसच्या अनुयायांनीं एकजुटीनें गोट आंवळून असावें. सरकार अटी पत्करणार नाहीं हें उघड दिसत होतें; त्यामुळें आमची बाजू अधिकच खंबीर होऊन काँग्रेसमधील नरम दलाला पुढें खेंचीत नेतां आलें असतें. कांहीं आठवड्यांचाच अवधि होता. मग लाहोर-काँग्रेस होती आणि आम्ही होतों.

आणि तरीहि तो जाहीरनामा आम्हां कांहीं जणांना एकाद्या कडू जहर गोळी-प्रमाणें वाटला. स्वातंत्र्याची मागणी कांहीं काळापुरती व वरपांगी का होईना सोडून देणें हें अगदीं चुकीचें व घातुक धोरण आहे असें आम्हांला वाटलें. स्वातंत्र्याच्या प्राप्तीवांचून आमची तहान शमणार नाहीं, तें अत्यावश्यक आहे असें आम्ही मानीत नसून त्याचा सौदा केला तरी आमची हरकत नाहीं, स्वातंत्र्याची घोषणा हा एक निवळ डाव म्हणून आम्हीं टाकला होता, असा त्या जाहीरनाम्याचा अर्थ होणार होता ! म्हणून मी जरा घुटमळलों व जाहीरनाम्यावर सही करण्याचें नाकारिलें. ( सुभाषबाबूंनीं स्पष्टच नकार दिला होता ) पण माझ्या नेहमींच्या संवयीप्रमाणें थोड्याशा वादविवादानंतर मीं सही केली. मी मोठ्या कष्टी मनानें परत फिरलों व दुसऱ्याच दिवशीं काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा विचार मनांत येऊन गांधीजींना मीं तसें लिहूनहि टाकलें. मी अगदीं त्रासून गेलों होतों खरा, परंतु तें माझें लिहिणें मनापासून होतें असें वाटत नाहीं. गांधीजींकडून एक स्नेहस्निग्ध पत्र आल्यावर व तीन दिवस मनाशीं विचार केल्यावर मी शांत झालों.

लाहोर-काँग्रेसच्या जरा आधीं काँग्रेस व सरकार ह्यांच्यामध्यें कांहीं तडजोड निघाली तर पाहावी यासाठीं एक शेवटचा प्रयत्न म्हणून व्हाइसरॉयशीं मुलाखतीचा

योग जुळवून आणण्यांत आला. ही जुळवाजुळव बहुधा विठ्ठलभाईनीं केली असावी अशी माझी कल्पना आहे. मुलाखतीच्या वेळीं काँग्रेसतर्फे माझे वडील व गांधीजी, जिना, सप्रू व अध्यक्ष पटेल इतकी मंडळी हजर होती. मुलाखतींतून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. सर्वसामान्य अशी भूमिकाच उपलब्ध झाली नाहीं व काँग्रेस आणि सरकार हे जे दोन मुख्य पक्ष त्यांच्यामध्यें पुष्कळच अंतर असल्याचें दिसून आलें. तेव्हां काँग्रेसला पुढें पाऊल टाकण्याशिवाय गतीच राहिली नाहीं. कलकत्त्याला दिलेली एक वर्षाची मुदत संपत आली होती. स्वातंत्र्य हेंच काँग्रेसचें ध्येय आहे अशी घोषणा करून त्याच्या प्राप्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या झगड्याच्या तयारीकरितां आवश्यक ते प्रयत्न सुरू करणें क्रमप्राप्त झालें.

लाहोर काँग्रेसच्या आधीं मला दुसऱ्या एका क्षेत्रांतील महत्त्वाची कामगिरी पार पाडावयाची होती. नागपूर येथें भरणाऱ्या ऑ. इ. ट्रे. यु. काँग्रेसचा मी अध्यक्ष होतों. राष्ट्रीय सभा व ट्रेड युनियन काँग्रेस ह्यांच्या अध्यक्षपदावर एकाच व्यक्तीनें थोड्याच दिवसांच्या अंतरानें बसावें ही घटना जरा अपूर्व होती. त्या दोन संस्थां-मधील दुव्याप्रमाणें माझा उपयोग होऊन त्या संस्था परस्परांच्या अधिक जवळ येतील अशी मला आशा वाटत होती. राष्ट्रीय सभा अधिक समाजवादी व मजुरां-विषयीं अधिक तत्पर बनेल व संघटित झालेले मजूर राष्ट्रीय लढयांत जोराचा भाग घेतील, असें मला वाटलें.

परंतु ही आशा फोल होती. कारण समाजवादाच्या दिशेनें बऱ्याच लांबवर प्रगति करावयाची असल्यास राष्ट्रवादांतील राष्ट्रीय भावना नष्ट होत गेल्या पाहिजेत. तथापि मला असें वाटतें, कीं काँग्रेसचा दृष्टिकोण मध्यमवर्गीय असला, तरी देशामध्यें ती एकच जोरदार अशी क्रांतिकारी संस्था आहे हें ओळखून कामगारांनीं तिला सहाय्य व तिच्याशीं सहकार्य केलें पाहिजे व आपलें वैशिष्ट्य व विचारसरणी स्वतंत्र आणि शुद्ध राखून तिच्यावर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतिहासाच्या ओघाबरोबर व प्रत्यक्ष प्रतिकारांत भाग घेतल्यामुळें काँग्रेसचीं मतें अधिकाधिक जहाल व्हावींत व सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांशीं तिचा जास्त संबंध यावा हें अपरिहार्य आहे अशी माझी कल्पना होती. गेल्या कांहीं वर्षांत शेतकऱ्यांच्या दिशेनें काँग्रेस मार्ग आक्रमण करीत होती. ही चाल अशीच सुरू राहिली, तर कालांतरानें काँग्रेसला प्रचंड अशा शेतकरी संघटनेचें स्वरूप प्राप्त होईल, किमान पक्षीं शेत-कऱ्यांचा गट काँग्रेसमध्यें प्रभावशाली होईल असा संभव दिसत होता. कारण काँग्रेसचें नेतृत्व मध्यमवर्गीय बुद्धिजीवि लोकांच्या हातीं असलें, तरी त्या काळांत देखील संयुक्त प्रांतांतील जिल्हा काँग्रेस कमिट्यांवर शेतकऱ्यांचे किती तरी प्रतिनिधी निवडून येत असत.

शहरें व खेडीं यांच्यांतील सनातन विरोधाची छाप राष्ट्रीय सभा व ट्रेड युनियन काँग्रेस यांच्यांतील संबंधांवर पडून ते कलुषित होण्याचा संभव असला, तरी

ती फार लांबच्या काळांतील गोष्ट होती. कारण सध्यांच्या राष्ट्रीय सभेचीं सूत्रें मध्यम वर्गाच्या हातीं असून तिच्यावर शहरांचाच अधिकार गाजत आहे. शिवाय जोंपर्यंत राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न निकालांत निघणार नाहीं, तोंपर्यंत जनतेच्या भावनांमध्यें राष्ट्रीयत्वाची भावना अत्यंत प्रबळ स्वरूपांत कायम राहणारच. तथापि कॉंग्रेसला संघटित मजुरांच्या अधिक निकट आणावी ही गोष्ट इष्ट आहे असें मला वाटत होतें. संयुक्त प्रांतांत तर ट्रे. यु. कॉंग्रेसच्या प्रांतिक शाखांपैकीं कांहीं जणांना आम्हीं प्रांतिक कॉंग्रेस कमिटीवर प्रतिनिधि म्हणून बोलाविलें होतें. त्याचप्रमाणें पुष्कळ कॉंग्रेस-कार्यकर्ते मजुरांच्या कार्यांतहि प्रामुख्यानें भाग घेत असत.

तथापि मजुरांतील आघाडीचा पक्ष मात्र कॉंग्रेसशीं फटकून वागत होता. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांबद्दल त्यांना विश्वास वाटत नसे व कॉंग्रेसची विचारसरणी मध्यमवर्गीय आणि परागतिक आहे असें त्यांचें मत होतें. मजूरवर्गाच्या दृष्टीनें पाहिलें, तर त्यांच्या मतांत तथ्यहि होतें. नांवाप्रमाणें कॉंग्रेस ही खचितच राष्ट्रवादी संस्था होती.

१९२९ सालीं एका नव्याच प्रश्नावर कामगार-संघांत मतभेद उत्पन्न झाले. हिंदी मजुरांची चौकशी करण्यासाठीं व्हिटले कमिशन नेमण्यांत आलेलें असून त्यावर बहिष्कार टाकावा असें जहाल गटाचें मत होतें. नेमस्त पक्षाची सहकार्य करण्याची इच्छा होती व त्यांच्यापैकीं कांहीं जणांची नेमणूक कमिशनवर व्हावयाची असल्या-मुळे त्या प्रश्नाला वैयक्तिक स्वरूप प्राप्त झालें होतें. इतर अनेक गोष्टींप्रमाणें ह्याहि बाबतींत माझें मत जहाल गटाच्या बाजूचें होतें. आम्हीं प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा सुरू करण्याचा विचार करीत असतां सरकारी कमिशनबरोबर सहकार्य करणें कोणत्या शहाण्या माणसाला पसंत पडेल?

नागपूरच्या ट्रे. यु. कॉंग्रेसमध्यें बहिष्काराच्या प्रश्नाला फार महत्त्व प्राप्त झालें व त्या प्रश्नावर आणि इतर कांहीं मुद्द्यांच्या बाबतींत जहाल पक्ष विजयी झाला. या कॉंग्रेसमधील माझी कामगिरी अगदीं क्षुल्लक स्वरूपाची झाली. कामगार-क्षेत्रांत मीं नव्यानेंच पदार्पण केलेलें असल्यामुळें मी चालतांना चांचपडत होतों. सर्वसामान्यपणें जहाल पक्षाच्या बाजूनें मी बोलत असलों, तरी कोणत्याहि एका गटांत मी सामील झालों नाहीं, व दिशादर्शनाचें काम करणाऱ्या अध्यक्षापेक्षां निःपक्षपाती नियंत्रकाला शोभेल अशा प्रकारचेंच काम मीं केलें. ट्रे. यु. कॉंग्रेसची फाटाफूट व नव्या नेमस्त पक्षाची स्थापना मी तटस्थ प्रेक्षकाप्रमाणें अवलोकन करीत राहिलों होतों. माझ्या मतें ट्रे. यु. कॉंग्रेसमधून निघून जाण्याचें नेमस्त गटाचें धोरण समर्थनीय नव्हतें. तथापि कांहीं जहाल पुढाऱ्यांनीं गोष्टी कडेला पोंचविल्यामुळें नेमस्त गटाला कांहीं तरी निमित्त सांपडलें. या दोन गटांच्या टकरींत मधल्या गटाची स्थिति असहाय झाली. खंबीर पुढारी लाभता, तर दोन्ही गटांना त्यानें काबूंत ठेविलें असतें; मग ट्रे. यु. कॉंग्रेसचीं शकलें पडतीं ना, आणि शकलें उडालींच असतीं, तर त्यापासून पुढें घडलेले विपरीत परिणाम तरी खास टळले असते.

झाल्या प्रकारानें ट्रे. यु. काँग्रेसला जो जबरदस्त टोला बसला, त्याचा परिणाम अद्यापि साफ गेलेला नाहीं. जहाल गटाविरुद्ध सरकारनें आपली मोहीम आधींच सुरू केली होती. त्याचें अगदीं पहिलें प्रत्यंतर म्हणजे मिरत खटला. ह्या मोहिमेचा रूळ पुढें तसाच चालू राहिला. मालक-वर्गालाहि हल्ला चढविण्यास ही संधी ठीक आहे असें वाटलें. आर्थिक मंदीला १९२९-३० सालीं सुरुवात झालीच होती. तिचे तडाखे, चोहों बाजूंनीं सुरू असलेले हल्ले व क्षीण झालेल्या कामगार संघटना, ह्या सगळ्या आपत्तींचें चक्र एकाच वेळीं डोक्यावर पडून हिंदी मजूर-वर्गाची वाताहत झाली व स्वतःच्या घसरगुंडीला लागलेल्या परिस्थितीकडे हातपाय जुडून त्याला पाहात बसावें लागलें. ट्रे. यु. काँग्रेसमध्यें दोन वर्षांनंतर आणखी एक तडा जाऊन कम्युनिस्ट गट बाहेर पडला. अशा रीतीनें हिंदुस्थानांत कामगार-संघाचीं तीन फेडरेशनें निर्माण झालीं. नेमस्तांचा गट, मूळ ट्रे. यु. काँग्रेस, व कम्युनिस्ट गट. प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें तीन्हि गट कमजोर व परिणामशून्य होऊन त्यांच्यांतील मारामाऱ्यांमुळें कामगारांचीं मनें विटून गेलीं. १९३० नंतर मी बहुधा तुरुंगांतच असल्यामुळें माझा या प्रकरणाशीं संबंध आला नाहीं. मी मध्यंतरीं बाहेर आलों तेव्हां एकीकरणाचे प्रयत्न चालले आहेत असें ऐकिलें; पण ते निष्फळ ठरले.*

रेल्वे-कामगार त्यांना चिकटून राहिल्यामुळें नेमस्त कामगार संघाचें बळ वाढलें आहे. इतर संघांपेक्षां त्यांचा विशेष असा कीं सरकारी मान्यता त्यांना लाभली व जिनिव्हाच्या मजूर-परिषदेसाठीं त्यांनीं केलेल्या शिफारशी सरकार स्वीकारूं लागलें. जिनिव्हाला जावयाला मिळतें या गोष्टीच्या मोहानें देखील कांहीं मजूर-पुढारी आपल्या संघांसह त्यांच्या गोटांत येऊन दाखल झाले!

---

* एकीकरणाचे नंतरचे प्रयत्न अधिक यशस्वी झाले असून सध्यां निरनिराळ्या ट्रेड युनियन्स बोल्याफार सहकार्यानें काम करीत आहेत.

२८

# स्वातंत्र्य व नंतरची कथा

लाहोर-काँग्रेसचें चित्र माझ्या स्मृतिपटावर अगदीं स्पष्ट व भडक रंगांत रंगविलें गेलें आहे. ही गोष्ट स्वाभाविकच होय. कारण तेथें अग्रपूजेचा मान मला मिळालेला होता व अधिवेशनाच्या केंद्रस्थानीं माझी स्थापना झाली होती. त्या धामधुमीच्या दिवसांत माझ्या मनांत जे भावनातरंग हेलावत होते, त्यांच्या आठवणी मनांत घोळीत राहावें असें कधीं कधीं वाटतें. लाहोरच्या जनतेनें माझें जें भरगच्च स्वागत केलें, तें विसरणेंच शक्य नाहीं. स्वागताचा थाट मोटा व त्यांतील जिव्हाळा गाढ होता. एका प्रतीकाचें, एका कल्पनेचें स्वागत करावें म्हणून हा उत्साह-सागर उचंबळला आहे, व्यक्तीसाठीं नव्हे, ह्याची ओळख मला पटली होती. परंतु हजारों लोकांच्या डोळ्यांपुढें व अन्तःकरणांत अगदीं अल्प काळ कां होईना तें प्रतीक म्हणून आपली स्थापना व्हावी ही मातब्बरी क्षुल्लक नव्हे. माझें मन भरारूं लागलें, जणुं कांहीं तें माझा पार्थिव देह सोडून विहरत होतें! तथापि माझ्या या मानसिक प्रतिक्रियांची किमत विशेष नव्हती. फार मोठे प्रश्न उपस्थित झालेले होते. सर्व वातावरण गंभीर व आतुर होऊन गेलें होतें. आमच्या निर्णयांचें क्षेत्र टीका, निषेध, अगर मतप्रदर्शन यांच्यापुरतेंच मर्यादित न राहतां त्यांच्यामुळें प्रत्यक्ष युद्धाच्या भेरी झडूं लागायच्या होत्या, सर्व देश त्यामुळें हादरणार असून लाखों लोकांच्या जीवनावर आमच्या निर्णयाचा ठसा उमटणार होता.

भविष्याच्या अंधारांत आमच्यासाठीं व आमच्या देशासाठीं काय वाढून ठेविलेलें आहे तें प्रतिज्ञेवर कोणालाच सांगणें शक्य नव्हतें. पण पावलापुढचा रस्ता स्पष्ट दिसत होता. आम्हांला व आमच्या आप्तबांधवांना झगड्यांतून जावें लागणार होतें, कष्ट सोसावे लागणार होते. ह्या विचारामुळें आमच्या उत्साहांतील अवखळपणा नष्ट झाला आणि आमच्यावरील जबाबदारीची पूर्ण जाणीव आमच्या मनावर बिंबली. स्वास्थ्य, सौख्य, कौटुंबिक आनंद व मित्रसहवास यांचा प्रत्येक मतागणिक आम्ही जणुं काय निरोप घेत असून चिरकालीन एकांतवासाला आणि शारीरिक व मानसिक वेदनांना प्रत्येक मतागणिक आम्ही निमंत्रण करीत होतों.

स्वातंत्र्याची व स्वातंत्र्ययुद्धाची प्रगति व्हावी म्हणून संकल्पित कार्याच्या ठरावाला जवळ जवळ एकमतानें पाठिंबा मिळाला. हजारों लोकांपैकीं

पंधरावीस इसमांनीं विरुद्ध मत दिलें. योगायोग असा, कीं जुनें वर्ष संपून नव्या वर्षाचें पाऊल उंबऱ्यावर पडत असतां म्हणजे ३१ डिसेंबर रोजीं रात्रीं बरोबर बाराच्या ठोक्याला हा मुख्य ठराव मंजूर करण्यांत आला. कॉंग्रेसनें दिलेली एक वर्षाची मुदत संपली न संपली तोंच नवा निर्णय ठरला व लढयाची सिद्धता सुरू झाली. चाकें फिरूं लागलीं; पण सुरुवात कोठें व कशी करावी ह्याची अटकल अद्यापि आलेली नव्हती. मोहिमेची योजना व चालना करण्याचें काम ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीवर सोंपविण्यांत आलें असलें, तरी अखेरचा निर्णय गांधीजींच्या हातीं आहे याची सर्वांना कल्पना आलेली होती.

शेजारच्या सरहद्द-प्रांतांतून खूप लोक लाहोर कॉंग्रेससाठीं आले होते. कॉंग्रेस अधिवेशनासाठीं या प्रांतांतील वैयक्तिक प्रतिनिधी नेहमींच येत असत. गेलीं कांहीं वर्षे खान अब्दुल गफार खान कॉंग्रेसला हजर राहून आमच्या चर्चेत भाग घेऊं लागले होते. परंतु अखिल भारतीय राजकीय आंदोलनाचें दर्शन सरहद्द प्रांतांतील पुष्कळशा तळमळीच्या तरुण कार्यकर्त्यांना लाहोर येथेंच प्रथम झालें. त्यांच्या निर्मळ अन्तःकरणावर त्या अधिवेशनाचा ठसा ठळकपणें उठला व स्वातंत्र्याच्या युद्धांत इतर प्रांतांबरोबर आपण एकजुटीनें लढलें पाहिजे याची त्यांना ओळख पटल्यामुळें त्यांचीं मनें उत्साहानें भरून गेलीं. ते साधेसुधे पण उत्कृष्ट कार्यकर्ते होते. हिंदुस्थानांतल्या इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां शब्दजंजालाच्या व शब्दच्छलाच्या कलेंत मात्र ते मागसलेले होते. घरीं परतल्यावर संघटना करण्यास व नव्या कल्पनांचा फैलाव करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. त्यांत त्यांना यश मिळालें. व हिंदुस्थानच्या लढ्यांत सर्वांत शेवटीं सामील झालेल्या सरहद्दीवरील या स्त्री-पुरुषांनीं १९३० सालानंतर झालेल्या लढयांत अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावून दाखविली.

लाहोर-कॉंग्रेस आटोपल्याबरोबर तिच्या आज्ञेनुसार वडिलांनीं मध्यवर्ति व प्रांतिक-कायदे-मंडळांतील कॉंग्रेस-सभासदांना राजीनामे देण्याची विनंति केली. फार थोडे लोक वगळून बहुतेक सर्व सभासदांनीं राजीनामे दिले.

अजूनहि भविष्याविषयीं आम्ही अंधारांतच होतों. लाहोर-कॉंग्रेसमध्यें उत्साहाचें वातावरण दिसलें खरें; पण प्रतिकाराचा कार्यक्रम सुरू केला तर किती पाठिंबा मिळेल याची कोणालाहि अटकळ होईना. आम्ही घरावर तुलसीपत्र ठेवून बाहेर पडलों; आतां माघारीं फिरणें शक्य नव्हतें; पण पुढचा रस्ता व प्रदेश सर्वच अपरिचित. मोहिमेचा प्रथमारंभ व लोकांच्या उत्साहाची चांचणी म्हणून २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन साजरा करावा व सर्व देशभर स्वातंत्र्याची शपथ घेण्यांत यावी, असें ठरलें.

इकडे कार्यक्रमाच्या अनिश्चिततेमुळें मन साशंक होतें. तिकडे उत्साहानें व कांहीं तरी परिणामकारक कार्य केलें पाहिजे अशा बलवत्तर इच्छेनें पुढें पाऊल टाकण्याकरितां तें अधीर झालें होतें. अशा मनःस्थितींत आम्ही सांपडलों होतों.

जानेवारीच्या सुरुवातीला माझा मुक्काम घरींच होता. वडील बहुधा तेथें नसतच. त्या वर्षी कुंभमेळ्यासाठीं लाखों यात्रेकरू गोळा झाले होते. शेतकरी, कामकरी, वाणी, उदमी, कारागीर, धंदेवाले सर्व प्रकारचे लोक तेथें जमले होते. हिंदी समाजाचें तें एक छोटेंसें चित्र होतें असें म्हणतां येईल. या लोकांचा नदीकडे अखंड वाहणारा लोंढा पाहिला कीं कायदेभंगाच्या चळवळीसंबंधीं यांचें धोरण काय राहील असा विचार मनांत येई. लाहोरला झालेल्या ठरावांची माहिती यांपैकीं किती जणांना असेल, किती जणांना त्याविषयीं पर्वा वाटत असेल?

आज हजारों वर्षे जो त्यांच्या पूर्वजांना व त्यांना गंगेत स्नान करण्यासाठीं अलाहाबादेपर्यंत देशाच्या कोनाकोपऱ्यांतून खेंचून आणीत आहे, त्या धर्माचें सामर्थ्य अचाट नव्हे का? स्वतःचेंच कल्याण व्हावें म्हणून या अपरंपार उत्साहाचा अल्पसा भाग देखील राजकारणाच्या व अर्थकारणाच्या पायीं खर्च होणार नाहीं काय? कीं धर्माच्या अवडंबरानें व यमनियमांनीं लोकांचीं मनें व्याप्त झाल्यामुळें असले विचार तेथें शिरण्यास अवकाशच शिल्लक नव्हता? हजारों वर्षांच्या स्तब्धतेचा भंग करणारी खळबळ तेथें चालू होती हें मी जाणून होतों. जनतेंतील ह्या अस्पष्ट आकांक्षा व इच्छा यांच्या व्यापारामुळेंच तर गेल्या एक दीड तपांतील घडामोडी होत आल्या होत्या. नव्या कल्पनांच्या अस्तित्वाविषयीं आणि त्यांच्या अंगीं असलेल्या स्फोटक सामर्थ्याविषयीं शंका घेण्याचें कारणच नव्हतें. पण निराळ्या शंका मनांत उद्भवत, त्यांचें तत्काळ समाधान करणें शक्य होत नसे. कल्पनांचा प्रसार कितीसा झाला असेल? जनतेचें सामर्थ्य किती? सांघिक उठाव करण्याची, दीर्घ कालपर्यंत तग धरण्याची लायकी लोकांत कितीशी आहे? अशा शंका उत्पन्न होत.

शेंकडों यात्रेकरू आमच्या घराकडे येत. आमचें घर भारद्वाज तीर्थाच्या जवळच होतें. जिज्ञासेनें व ज्यांचीं नांवें ऐकलेलीं आहेत अशा व्यक्तींना—विशेषतः माझ्या वडिलांना—डोळ्यांनीं पाहावें ह्या इच्छेनें ते आमच्या घरीं येत असावे. पण आमच्याकडे येणारांपैकीं बहुतेक लोक राजकीय वृत्तीचे असत व काँग्रेसविषयीं, काँग्रेसच्या ठरावांविषयीं व पुढील कार्यक्रमाविषयीं ते प्रश्न विचारीत. त्यांचीं स्वतःचीं आर्थिक गाऱ्हाणीं ते सांगत व तीं दूर कशीं करावीं याचीहि विचारपूस होई. काँग्रेसचे जयशब्द त्यांच्या चांगल्या परिचयाचे झाले होते; त्यांच्या योगानें आमचें सारें घर दणाणून जाई. सकाळपासून मी पांचपंचवीस माणसांच्या एका एका गटाला चार शब्द सांगत असे. पण अशा प्रकारें एकसारखें बोलत राहणें शक्तीबाहेरचें काम झाल्यामुळें मी त्यांचें स्वागत फक्त नमस्कारानें करूं लागलों. यालाहि कांहीं मर्यादा होतीच. ती सुद्धां लवकरच संपली. तेव्हां मी बाहेर तोंड दाखविण्याचेंहि टाळूं लागलों! पण माझा बेत निष्फळ झाला. जयशब्द अधिकच उच्च स्वरांत गर्जूं लागले; घराच्या व्हरांड्यांतून व प्रत्येक दाराखिडक्यांतून लोक आंत डोकावूं लागले.

काम, वाचन, फार काय जेवणसुद्धां अशक्य होण्याची वेळ आली. त्यामुळें मनाला संकोच तर वाटेच, पण चीडहि येई. पण पिढ्यान् पिढ्या दारिद्र्य व कष्ट सोशीत आलेले ते लोक! किती स्नेहनिर्भर दृष्टीनें ते पाहत असत! केवळ सहानुभूति व बंधुभाव त्यांना हवासा वाटतो. तेवढे दाम पटले कीं बस्! कृतज्ञतेचें व प्रेमाचें माप भरभरून ते आमच्या दारीं ओतण्यास तयार असतात. प्रेमाचा व भक्तिभावाचा हा उत्कर्ष पाहिला, कीं माझें मन अवनम्र झाल्याशिवाय राहत नसे.

आमच्या एक निकट स्नेहांतल्या बाई त्या वेळीं आमच्या घरींच राहावयास आल्या होत्या. पांच पांच मिनिटांनीं मला बाहेर जाऊन चार शब्द बोलावे लागत असल्यामुळें त्यांच्याशीं धड बोलावयालाहि सांपडेना. माझी तारांबळ पाहून त्यांना मौज वाटली. माझ्या लोकप्रियतेचें त्यांना कौतुकहि वाटलें असावें. त्यांनीं सरळ प्रश्न टाकला, "लोकांकडून ही पूजाअर्चा चालली आहे, ती तुम्हांला कशी काय वाटते? मनाला मोठा अभिमान वाटत असेल, नाहीं?" मी जरा घुटमळलों. तेव्हां त्यांना वाटलें, कीं आपण अगदीं रोकडा प्रश्न टाकल्यामुळें मी संकोचलों असेन. म्हणून त्यांनीं असला प्रश्न विचारल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. संकोच वगैरे मला मुळींच वाटला नव्हता. प्रश्नाचें उत्तर मला सुचेना. माझे विचार पांगले व मी स्वतःच्या भावनांचे व प्रतिक्रियांचे परीक्षण करूं लागलों. त्यांचें स्वरूप फार संमिश्र होतें.

एकाएकीं असामान्य लोकप्रियता माझ्या वांट्याला आली होती हें खरें. बुद्धिजीवि वर्ग माझें कौतुक करीत होता. आणि तरुण स्त्री-पुरुष तर मला विभूती-प्रमाणें मान देत असत. त्यांच्या डोळ्यांना अद्भुतरम्य कथांची प्रभा माझ्याभोंवतीं पसरलेली दिसे. माझे विरोधकहि माझ्यासंबंधीं चांगलेंच बोलत व कर्तृत्वाची व तळमळीची वाण माझ्या ठिकाणीं नाहीं अशी कबुली ते उदार मनानें देत.

अशा परिस्थितींत मन अगदीं निश्चल व अविकृत ठेवणारी व्यक्ति मुक्त अथवा पशुकोटींतील असली पाहिजे. मी यांपैकीं कोणत्याच कोटींत जमा होण्यासारखा नाहीं. अल्पोन्मादाचा अनुभव मला आला, मला हिम्मत व सामर्थ्य वाटूं लागलें. माझ्या वर्तणुकींत थोडा तुमडेपणा, थोडी अरेरावीची झांकहि आली असावी. पण माझा गर्विष्ठपणा फारसा वाढला नव्हता असें वाटतें. माझ्या शक्तीची मला नीट कल्पना आलेली होती. फाजील विनयानें माझी कर्तृत्वशक्ति दडवून ठेवण्याचा मीं प्रयत्न केला नाहीं. तथापि आपल्या ठिकाणीं असणाऱ्या कर्तृत्वशक्तींत असामान्य असें कांहीं नाहीं; आपल्यांत अनेक दोष आहेत हेंहि मी चांगलें ओळखून होतों. थोडासा आत्मपरीक्षण करण्याचा अभ्यास असल्यामुळें मला माझा तोल संभाळतां आला व कित्येक गोष्टींकडे निरासक्त दृष्टीनें पाहणें शक्य झालें. सार्वजनिक आयुष्याचा अनुभव येत गेल्यावर सर्वस्वीं अनिष्ट माणसांनाहि लोकप्रियता माळ घालते असें दिसून आलें. लोकप्रियता ही गुणांची अथवा बुद्धीची निदर्शक खासच

नव्हे. मग मीं जी लोकमान्यता मिळविली ती माझ्या अंगच्या दोषांमुळें कीं गुणांमुळें ? मी लोकांत प्रिय झालों तो कां ?

बुद्धिमत्ता हें माझ्या लोकप्रियतेचें कारण म्हणतां येणार नाहीं. कारण माझी बुद्धि अलौकिक नव्हती. शिवाय लोकप्रियता ही बुद्धीमुळें प्राप्त होत नसते. त्यागालाहि ती भुलत नाहीं. कारण लाखों लोकांनीं माझ्यापेक्षां अधिक हाल-अपेष्टा सहन केल्या आहेत, कांहींनीं तर अन्तिम बलिदानहि केलें आहे. माझ्या धारिष्ट्याविषयींची प्रसिद्धि सुद्धां अगदीं पोकळ आहे. कारण मी मोठा वीर आहें असें मला वाटत नाहीं. सर्वसामान्यपणें आयुष्यांत साहसी अथवा नाटकी धडाडी दाखवणें तर मला वेडगळपणाचेंच वाटतें. स्वच्छंद विलासाबद्दल बोलावयाचें तर माझ्या ठिकाणीं विलासप्रियता फारच अल्प प्रमाणांत आढळून येईल. कांहीं मानसिक व शारीरिक धैर्य माझ्या अंगीं आहे हें निःसंशय. तरी तें स्वतःविषयीं, समूहाविषयीं व राष्ट्राविषयीं वाटणाऱ्या अभिमानाच्या पोटीं जन्मलेलें आहे. आणि कोणत्याहि बाबतींत जुलुम, जबरदस्ती चालूं न देण्याची माझ्या अंगची वृत्तीहि त्याला कारणीभूत झाली असावी.

एवंच माझ्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मला मिळालें नाहीं. नंतर मीं निराळ्याच दिशेनें शोध सुरू केला. वडिलांच्या व माझ्याबद्दल अशी एक आख्यायिका प्रचलित होती, कीं आमचे कपडे पॅरिस येथें धुण्यासाठीं जात. या वदतेचा इन्कार आम्हीं अनेकवार केलेला आहे. पण त्याचा उपयोग झालेला दिसत नाहीं. याहून जास्त आचरट व मूर्खपणाच्या कृत्यांची मला तरी कल्पनाच करवत नाहीं व अशा प्रकारची उधळपट्टी करणारा कोणी हरीचा लाल असलाच, तर मला वाटतें कीं, त्याला मूर्खांचा राजा ही पदवीच बहाल करावयास हवी !

दुसरी एक दतकथा अशी कीं मी प्रिन्स ऑफ वेल्सबरोबर शाळेंत शिकत होतों. खरें म्हणजे मी त्यांच्याबरोबर कधींहि शाळेंत नव्हतों. इतकेंच नव्हे, तर त्यांना भेटावयाची अथवा त्यांच्याशीं बोलण्याची संधि मला कधींहि मिळालेली नाहीं.

माझी ख्याति अथवा लोकप्रियता निवळ अशा आख्यायिकांवर उभारलेली आहे असा माझ्या लिहिण्याचा आशय नाहीं. याहून अधिक सबळ कारणें असतीलहि; पण माझ्या लोकप्रियतेच्या बुडाशीं असल्या नबाबशाही कथांचा बराचसा अंश आहे ही गोष्ट या आख्यायिकांवरूनच सिद्ध होते. प्रथम वरिष्ठ वर्गांत मिसळणारा व भोगविलासांमध्यें दंग असणारा माझ्यासारखा माणूस सर्वसंगपरित्याग करण्यास सिद्ध झाला, अशी माझ्याविषयींची कल्पना खात्रीनेंच लोकांच्या मनात वागत आहे. हिंदी मनावर परित्यागाची छाप तावडतोब पडत असते. पण कार्यपराङ्मुख अशा सद्गुणापेक्षां क्रियावान सद्गुणांचा मी अधिक चाहता आहें. केवळ त्यागांत अथवा संन्यस्त वृत्तींत मला कधींच गोडी वाटली नाहीं. एकाद्या मल्लाला आपलें प्रकृति-स्वास्थ्य कायम राखण्यासाठीं युक्त आहारविहार ठेवणें ज्याप्रमाणे आवश्यक

आहे, त्याचप्रमाणें मनाला योग्य वळण लावण्याच्या दृष्टीनें त्याग वगैरे वृत्तींची आवश्यकता आहे. ज्यांना मोठमोठ्या कार्याची जबाबदारी अंगावर घ्यावयाची असेल, त्यांच्या ठायीं धक्केचपेटे सहन करून काम करीत राहण्याची सहनशक्ति व चिकाटी अवश्य असली पाहिजे. परंतु जीवनपराङ्मुख आणि विषयानंदापासून भीतीनें अलिप्त राहणाऱ्या अशा संन्यासी आयुष्यक्रमाची मला मुळींच आवड नाहीं. माझ्या मतें जें अत्यंत मोलाचें ठरलें, त्याचा मीं जाणूनबुजून न्यास केलेला नाहीं. अर्थात् जीवनांतील मूल्येंसुद्धां बदलत जातात ही गोष्ट खरीच.

माझ्या मैत्रिणीच्या प्रश्नाचें उत्तर अद्यापि द्यावयाचेंच आहे, नव्हे का? जनता माझा उदोउदो करते म्हणून मला गर्व वाटतो कीं नाहीं असा तिचा प्रश्न होता. मला बडेजाव वगैरे सर्व प्रकारें नापसंत असे. तेथून लांब निघून जावें असें मला वाटे; पण तो माझ्या इतका अंगवळणीं पडला होता, कीं तो मुळींच दृष्टीला पडला नाहीं तरीहि मला चुकल्याचुकल्यासारखें होई. म्हणजे कोणत्याहि तऱ्हेनें पूर्ण समाधान होत नसे. परंतु एकंदरींत पाहतां माझ्या मनाची कोणती तरी भूक जनसमुदाय दिसला कीं पुरवली जात असावी असें मला वाटतें. मला लोकांवर छाप बसवितां येते, मला त्यांना कार्यप्रवृत्त करतां येतें, अशी कल्पना मनांत आली, कीं त्यांच्या मनांवर माझा अधिकार चालत आहे अशा भावनेनें माझी अधिकारलालसा कांहीं अंशी तृप्त होई. आपल्या बाजूनें जनताहि माझ्यावर नाजुकसा जुलूम चालवीतच असे. कारण लोकांची श्रद्धा व प्रेम पाहिलें, कीं माझें अंतःकरण आर्द्र होऊन भावना उचंबळूं लागत. मी व्यक्तिनिष्ठ असलों, तरी कधीं कधीं व्यक्तित्वाचे अडसर निखळून पडत आणि एकटेंच तरण्यापेक्षां या लोकांबरोबर बुडून रसातळाला पोंचलों तरी बेहेत्तर असा विचार मनांत येई. तथापि व्यक्तित्वाचे बांध चांगले भक्कम असल्यामुळे ते पार वाहून जात नसत व कधीं कधीं त्या बांधांच्या आडून जनतामनांत लीन झालेल्या स्वतःच्या मनाकडे हळूच नजर फेकली, कीं माझें मलाच आश्चर्य वाटत असे.

मेदाप्रमाणें आढ्यतेचा वाढहि नकळत होत जाते. माणसाला त्याचा सुगावा-देखील लागत नाहीं. पण आडदांड जगराहाटीच्या धक्काधक्कींत हा गर्विष्ठपणा बराच नरम येतो इतकेंच नव्हे, तर अजिबात नष्टहि होऊन जातो. गेल्या कांहीं वर्षांत हिंदुस्थानांतील व्यक्तींच्या नशिबीं असे रट्टे खाण्याचे प्रसंग थोडेथोडके आलले नाहींत. आम्ही शिकतों त्या जीवनाच्या शाळेंतील शिस्त मोठी कडक असून कष्टरूपी पंतोजींनीं आमच्यावर फारसा दयालोभ दाखवलेला नाहीं.

मी दुसऱ्याहि एका दृष्टीनें दैववान् आहें. कुटुंबांतील मंडळी व मित्र मला असे लाभले आहेत, कीं माझ्या मनाचा तोल संभाळण्याच्या कामीं त्यांची फार मदत होते. सार्वजनिक समारंभ, नगरपालिकांतर्फे देण्यांत आलेलीं मानपत्रें, मिरवणुकी व सत्कार ह्यांमुळें मनावर फार ताण पडून माझा सारा खेळकरपणा व समतोलपणा मावळून जाई. माझ्याबद्दल बोलतांना अशी कांहीं स्तुतिपूर्ण व अलंकारिक भाषा

वापरण्यांत येई आणि प्रत्येक मनुष्य इतका गंभीर व सात्त्विक दिसे, कीं मोठ्यानें हंसून, किंवा जीभ बाहेर काढून अथवा डोक्यावर उभे राहून या गंभीर सदस्यांच्या मनावर काय परिणाम होतो तो एकदां पहावा तरी, अशी अनावर इच्छा मला होत असे. अर्थात् हे आचरट विचार आवरून मी शिष्टाचार संभाळीत असें हें सुदैवच समजलें पाहिजे. पण नेहमींच असा विवेक करणें अशक्य होई. अत्यंत गर्दीच्या सभेंत अथवा मिरवणुकीच्या वेळीं गोष्टी असह्य झाल्या म्हणजे माझ्या हिरवटपणाचें प्रदर्शन मीं करीत असें. कधीं कधीं आमच्या सन्मानार्थ काढण्यांत आलेली मिरवणूक अर्धीच सोडून मी गर्दीत नाहींसा होत असें. मग माझी पत्नी अथवा इतर कोणी तरी व्यक्ति मिरवणुकींत तशीच मागें राही. सार्वजनिक प्रसंगीं अशा तऱ्हेनें स्वतःच्या भावनांचा एकसारखा संयम करीत राहणें हें फार जिकिरीचें काम आहे. सामान्यतः त्याचा परिणाम असा होतो, कीं सार्वजनिक प्रसंगीं माणसें फाजील गंभीरपणानें व आंबट चेहरे करून वागतांना दिसतात. एका हिंदू मासिकानें मी एकाद्या हिंदू विधवेप्रमाणें दिसतों असें माझें वर्णन केलें होतें त्याचें हेंच कारण असेल. जुन्या वळणाच्या हिंदु स्त्रियांबद्दल माझ्या मनांत आदर असला, तरी माझें हें वर्णन ऐकून मला जरा धक्काच बसला. माझ्या ठिकाणीं वसत असलेल्या संन्यस्त वृत्तीची व करारी कर्तव्यनिष्ठेची तारीफ करावी असाच लेखकाचा हेतु होता. पण मी मात्र अशा भरंवशावर होतों कीं मी अधिक चढाऊ व तेजस्वी वृत्तीचा असून माझा स्वभाव देखील बराच विनोदप्रिय आणि खेळकर आहे. आणि हिंदु विधवांनीं सुद्धां या गुणांचें आपल्या ठिकाणीं संवर्धन केल्यास तें हिताचें होईल असें मला वाटतें. गांधीजींनीं मुलाखतींत एकदां असें सांगितलें होतें कीं, "माझ्या अंगीं विनोदप्रियता नसती तर मला बहुधा आत्महत्याच करावी लागली असती." मी इतक्या थराला गोष्टी नेईन असें कांहीं वाटत नाहीं; पण हास्यविनोदाच्या झुळुकेवांचून जीवन जवळजवळ असह्य झालें असतें असें मात्र मनाला वाटतें.

निवडक व अलंकारिक भाषेनें नटलेलीं जीं मानपत्रें मला देण्यांत येत, तीं म्हणजे माझ्या कुटुंबांतील माणसांचा व जिवलग मित्रांचा नित्य चेष्टेचा विषय बनून राहिलीं होतीं. अगडबंब व अलंकारप्रचुर अशा शब्दांची व बिरुदांची योजना राष्ट्रीय चळवळींतील पुढाऱ्यासंबधीं बोलतांना करावी असा परिपाठ पडला होता. माझी पत्नी, माझ्या बहिणी व इतर मंडळी अशा प्रकारचे शब्द निवडून काढीत व त्यांचा हवा तसा उपयोग करीत असत. मला "भारत-भूषण" किंवा "त्यागमूर्ति" अशा नांवांनीं तीं हाक मारीत असत. ह्या हास्यविनोदामुळें गंभीर सार्वजनिक सभांतून पडलेला ताण नाहींसा होऊन मन हलकें होत असे. माझी लहान मुलगीसुद्धां ह्या चेष्टेंत सामील होई. माझ्या आईला मात्र आपल्या लाडक्या लेकाची चेष्टा केलेली फारशी रुचत नसे. वडिलांना त्यांत मजा वाटे. स्वतःला वाटणारी सहानुभूति न बोलतांच व्यक्त करण्याची त्यांची हातोटी कांहीं विलक्षणच होती.

जनसमुदायांतील हलकल्लोळ, सार्वजनिक समारंभांत होणारी दगदग, कधींहि न संपणारे वादविवाद व राजकारणांतील धकाधकी आणि खकाणा यांचा माझ्यावर झाला तरी वरपांगी परिणाम होत असे. कधीं कधीं खोल जखमहि होई; नाहीं असें नाहीं. परंतु खऱ्या कलहाची आग आंत–अंतःकरणांत पेटलेली होती. कल्पना, वासना, निष्ठा, अतृप्त इच्छा यांचा व त्याचप्रमाणें बाह्य परिस्थितीशीं झगडणाऱ्या आन्तर्मनाचा कलह सदोदित चालू असे. माझें मन म्हणजे एक रणांगण झालें होतें व विजय मिळविण्यासाठीं निरनिराळ्या शक्तींचें रणकंदन तेथें माजलें होतें. यांतून सुटका व्हावी म्हणून व मनाला तालबद्धता आणि भावनासंगति प्राप्त व्हावी म्हणून माझे प्रयत्न चालले होते. पुढें प्रत्यक्ष चळवळींत उडी घेतल्यावर थोड्याशा मनःशांतीचा लाभ मला झाला. बाह्य जगतांतील झगड्यामध्यें मानसिक कलह विराम पावले.

तुरुंगांत बसून मी हें सारें कशासाठीं लिहीत आहें ? तुरुंगांबाहेर काय किंवा आंत काय, धडपड चालू आहे ती एकाच ध्येयासाठीं; आणि गतकालांतील विचार व अनुभव मी जे लिहून काढीत आहें ते एकाच आशेनें कीं, मला शांतिसुखाचा व मानसिक समाधानाचा त्यापासून लाभ व्हावा.

२९

# कायदेभंगाची सुरुवात

२६ जानेवारी १९३० रोजीं स्वातंत्र्य-दिन साजरा झाला व विजेच्या चमके-बरोबर सारा भूभाग दृष्टीला पडावा त्याप्रमाणें जनतेचा उत्साह व तळमळ दिसून आली. ठिकठिकाणीं शांतपणें व गंभीरपणें भरलेल्या प्रचंड सभांचें दृश्य मोठें परिणामकारक होतें. तेथें भाषणें, व्याख्यानें वगैरेंपैकीं कांहींहि झालें नाहीं. ह्या समारंभामुळें गांधीजींना हवी होती ती खूण पटली व जनमनाची अचूक पारख असणाऱ्या त्यांच्या बुद्धीला चढाईची ही वेळ आहे असें समजून आलें. नाटकांतील निर्वाणीच्या प्रसंगापूर्वी प्रवेशामागून प्रवेश होत जावे, त्याप्रमाणें प्रसंगांची परंपरा वाढत्या वेगानें सुरू झाली.

कायदेभंगाची वेळ जवळ येत चालली व वातावरण गरम होऊं लागलें, तशी आम्हांला १९२१–२२ सालच्या चौरीचौरा प्रकरणाची आठवण झाली. देशांत आतां अधिक शिस्त बाणली होती, युद्धाच्या स्वरूपाची कल्पना अधिक स्पष्ट झालेली होती व चळवळीचें तंत्र लोकांना अधिक चांगलें समजलें होतें. पण गांधीजींच्या दृष्टीनें सर्वांत विशेष महत्त्वाची गोष्ट अशी कीं अहिंसावादावरील त्यांची अव्यभिचारी निष्ठा लोकांना कळून चुकली होती. दहा वर्षांपूर्वी कोणाला कांहीं शंका असेल; पण आतां शंकेला जागाच नव्हती. तथापि आपोआप अथवा चिथावणी मिळाल्यामुळें कोठेंहि हिंसा होणारच नाहीं याची खात्री कशी देणार? आणि हिंसाकर्म घडलें, तर त्याचा चळवळीवर कोणता परिणाम होणार? पूर्वीप्रमाणेंच ती एकदम बंद करावयाची कीं काय? ह्या विचारांनीं मन अस्वस्थ होत असे. या प्रश्नाचा गांधीजींनींहि आपल्या परीनें विचार केला असावा असें दिसलें.

सद्यःस्थिति बदलून ती सुधारावी यासाठीं अहिंसात्मक प्रतिकाराचा मार्गच योग्य आहे व त्याचें पालन बरोबर रीतीनें केलें तर यश मिळालेंच पाहिजे, असा त्यांचा विश्वास होता. सत्याग्रह कार्यक्षम व यशस्वी होण्यासाठीं विशेष रीतीनें अनुकूल असें वातावरण असलें पाहिजे, बाह्य परिस्थिति अनुकूल नसेल, तर तो अंगिकारितां येणार नाहीं, हा सिद्धांत बरोबर आहे काय? असें असेल तर अहिंसामय मार्ग सर्व प्रसंगीं लागू पडण्यासारखा नसून तो सर्व स्थळीं उपयुक्त व सदा विजयी नाहीं असा निष्कर्ष काढावा लागेल. असला निष्कर्ष गांधीजींना मुळींच पटण्यासारखा नव्हता. अहिंसा मार्ग स्थलकालपरिस्थिति वगैरेंनीं अबाधित असा आहे अशी

त्यांची श्रद्धा होती. तेव्हां बाह्य परिस्थिति प्रतिकूल असली, तरी भोंवतीं कलह व हिंसा सुरू असली तरी त्याचें कार्य चालूच राहिलें पाहिजे. परिस्थित्यनुरूप त्याच्या कार्यपद्धतींत फेरबदल होतील; पण तो रद्द करणें म्हणजे अहिंसा मार्ग अबाधित नाहीं, अशी कबुली देण्याप्रमाणें आहे.

मला गांधीजींच्या विचाराविषयीं नक्की सांगतां येणार नाहीं; पण अशा धर्तीवर त्यांचे विचार चालू असावेत असें मला वाटतें. त्यांच्या विचारसरणींत अल्पसा बदल झालेला असून तुरळक हिंसाकर्म घडलें तरी सुरू असलेला कायदेभंग बंद करण्याचें कारण नाहीं अशी आमची समजूत झाली. अर्थात् हिंसा ही चळवळींतच अन्तर्भूत झाली तर चळवळीचें शांततामय स्वरूप नष्ट होऊन चळवळ थांबविणें अवश्य झालें असतें अथवा तिच्यांत फरक करावा लागला असता. एवढी खात्री पटल्यावर आम्हांपैकीं पुष्कळ जणांचें बरेंचसें समाधान झालें. आतां मोठा प्रश्न उरला तो हा, कीं पुढें पाऊल टाकायचें खरें; पण तें कसें? सुरुवातीचा घाव घालावयाचा कोठें? परिस्थितीशीं जुळता व जनतेला लोकप्रिय होईल असा कायदेभंगाचा कोणता कार्यक्रम आंखावा? असें कोडें पडलें असतां महात्माजींनीं आपला बेत सांगितला.

आणि मीठ या शब्दाला नवेंच महत्त्व आलें. त्या शब्दांत सामर्थ्य प्रतीत होऊं लागलें. मिठावरील करावर हल्ला चढवावयाचा, मिठाचे कायदे मोडून टाकावयाचे. आम्ही भांबावून गेलों. राष्ट्रीय चळवळीशीं मिठाचा संबंध तर आम्हांला जोडतां येईना. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे गांधीजींनीं आपले "अकरा मुद्दे" प्रसिद्ध केले. तसें पाहिलें तर मूलतः मुद्दे ठीक होते; पण आम्ही स्वातंत्र्याची भाषा बोलत असतां कांहीं राजकीय व कांहीं सामाजिक अशा मुद्द्यांची एक यादी करून होणार काय? स्वातंत्र्याचा गांधीजींचा व आमचा अर्थ एकच होता, कीं आम्ही भिन्न भिन्न अर्थानें बोलत होतों? तथापि हा वाद घालावयाला अवसर उरला नव्हता. इतिहास वाट चालूं लागला होता. आमच्या डोळ्यां-देखत राजकारणाची वाढ होत होती. त्या वेळीं आम्हांला नीट कल्पना आली नाहीं, पण सर्व जगभर घडामोड सुरू असून जग मंदीच्या पकडींत पक्कें गवसलें होतें. मालाच्या किंमती घटत होत्या. आतां पैसा वांचवतां येईल म्हणून शहरी माणसांना बरें वाटलें असेल; पण पुढचें भीषण चित्र डोळ्यांपुढें उभें राहून शेतकऱ्यांचें व कुळांचें मात्र धाबें दणाणून गेलें होतें.

त्यानंतर गांधीजींचा व्हाइसरॉयशीं पत्रव्यवहार झाला व पुढें दांडी-कूच सुरू झालें. दांडीकडे निघालेल्या सत्याग्रहींसंबंधीं रोजच्या रोज प्रगतीच्या बातम्या ऐकूं येऊन देशांतील उत्साहाचा पारा वरवर चढत चालला. ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक अहमदाबादला भरविण्यांत आली. लढ्याला साधारणतः सुरुवात झालीच होती. तेव्हां त्याबद्दल शेवटची व्यवस्था लावण्यासाठींच ही बैठक बोलावण्यांत

आली होती. परंतु आमचे सेनापति तेथें हजर राहिले नाहींत. त्यांचें कूच सुरू होतें तें सोडून येण्याचें त्यांनीं नाकारिलें. धरपकड झाल्यावर काय करावें वगैरे-बद्दल योजना करण्यांत येऊन वर्किंग कमिटीची सभा भरणें अशक्य झाल्यास अध्यक्षानें कमिटीच्या वतीनें काम करावें व आपल्या नंतरच्या अध्यक्षाची नेमणूक सर्व अधिकारा-सह करावी असे विस्तृत अधिकार त्यांच्याकडे देण्यांत आले. बरहुकूम तसेच अधिकार, प्रांतिक व स्थानिक समित्यांनींहि आपापल्या अध्यक्षांना देऊन ठेविले.

अशा प्रकारें "सर्वाधिकाऱ्यांची" राजवट सुरू होऊन चळवळीचें नियंत्रण ते काँग्रेसतर्फे करूं लागले. हुकुमतशाहीवर विश्वास ठेवणारी काँग्रेस संस्था राजकीय दृष्ट्या किती अधम व अधोगामी आहे पाहा, असा पुकार भारतमंत्री, व्हाइसरॉय व प्रांतिक गव्हर्नर यांनीं केला व हें अघोर कृत्य पाहून आपला जीव अगदीं दडपून गेला असल्याचेंहि त्यांनीं दर्शविलें. बरोबरच आहे; ही मंडळी लोकशाहीच्या तत्त्वाची कट्टी पुरस्कर्ती पडली ना? अधूनमधून हिंदुस्थानांतील प्रागतिक मताचीं वृत्तपत्रेंहि लोकशाहीचें श्रेष्ठत्व काँग्रेसला समजावून देऊं लागलीं. हीं प्रवचनें आम्ही मुकाट्यानें (तुरुंगांत अडकलेले असल्यामुळें) व आश्चर्यमुग्ध होऊन ऐकत होतों. बेशरम ढोंगीपणाची मजल यापलीकडे जाणें अशक्य आहे. वटहुकुमांच्या आधारानें सर्व प्रकारच्या नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी करून हिंदुस्थानवर निर्भेळ हुकुमतशाहीचा सोटा फिरवीत असतां आमचे राज्यकर्ते लोकशाहीचीं मोठीं रसभरित वर्णनें जनतेला ऐकवीत होते! हिंदुस्थानांत शांततेच्या वेळीं तरी लोकशाहीचा थांगपत्ता लागतो काय? आपला अधिकार व आपला कुणगा निर्वेध राखण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें प्रयत्न करावा व आपल्या अधिकाराचा उपमर्द करणाऱ्यांना दडपून टाकावें हें स्वाभाविक आहे. पण हें सर्व लोकशाहीच्या तत्त्वानुसार चाललें आहे वगैरे विधानें मात्र पुढच्या पिढ्यांच्या अभ्यासाचा व कौतुकाचा विषय होऊन बसतील!

जेव्हां नित्यक्रमानुरूप काम करतां येणार नाहीं, काँग्रेस संस्था बेकायदा ठरविण्यांत येईल व कार्ययोजनेसाठीं व विचारविनिमयासाठीं समित्यांना एकत्र जमणें अशक्य होऊन बसेल. अशा परिस्थितींत काय करावें हा काँग्रेसपुढें प्रश्न होता. गुप्तपणें जमणें शक्य झालें असतें; पण गुप्त कार्याला आम्हीं उत्तेजन दिलें नाहीं. कारण चळवळीचें स्वरूप अगदीं उघडें ठेऊन आम्हाला आमच्या चळवळीची प्रतिष्ठा व जनतेवरील वजन कायम राखावयाचें होतें. मध्यवर्ति केंद्रांतील व प्रांतांप्रांतांतील मुख्य मुख्य स्त्री-पुरुषांना तुरुंगांत जावें लागणार हें तर दिसतच होतें. मग काम चालवावयाचें कोणीं? युद्धमग्न सैन्याचा दाखला पुढें ठेवून जुन्यांच्या जागीं नवे नवे सर्वाधिकारी नेमीत जाणें हा एकच मार्ग आमच्यापुढें होता. चळवळीच्या प्रत्यक्ष क्षेत्रांत मांड ठोकून का समितीच्या बैठकी चालवतां आल्या असत्या? कांहीं वेळां तेंही केलें; पण त्या वेळीं उद्देश असा असे, कीं सर्व समितीच्या समितीच कैद

व्हावी; आणि तसें केलें म्हणजे इच्छेप्रमाणें फळहि हटकून मिळत असे. रणक्षेत्रापासून लांब मागें सुरक्षित ठिकाणीं युद्ध-विशारद मंडळ वसलें आहे अगर त्याहूनहि सुरक्षित जागीं बसून बिनलढाऊ मंत्रिमंडळ सूत्रें हलवीत आहे, असला प्रकार आमच्या बाबतींत शक्यच नव्हता. चळवळीची रचनाच अशी होती, कीं आमच्या युद्ध-विशारद मंडळांना व मंत्रिमंडळांना रणक्षेत्रावर व ऐन मोर्च्यांच्या जागीं उभें राहून काम करावें लागे. त्यामुळें लढयाच्या सुरुवातीलाच ते पकडले जात. आणि आमच्या 'सर्वाधिकाऱ्यां'च्या हातीं आम्हीं अधिकार तरी असा काय देत होतों? त्यांचें नांव जाहीर केलें म्हणजे देशाच्या धीट निश्चयाचें प्रतीक म्हणून आपणांस उभें राहतां आलें याचाच त्यांना अभिमान वाटे. पण त्यांच्या हातीं सत्ता होती ती फक्त स्वतःला तुरुंगांत पाठवण्याचीच. दडपशाहीमुळें समिति भरणें अशक्य झालें, तरच आमच्या सर्वाधिकाऱ्यांना हालचाल करतां येत असे. समिति जमली कीं सर्वाधिकाऱ्यांचे वैयक्तिक अधिकार संपुष्टांत येत. मूलभूत प्रश्नांत अथवा तत्त्वांत कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ करण्याचा अधिकार त्यांना नव्हता. चळवळीचीं बारीकसारीक कामें तेवढीं त्यांच्या हातीं राहत. कॉंग्रेसच्या सर्वाधिकारी पदावर चढणें म्हणजे खरोखर तुरुंगाच्या मोटरींत चढण्याप्रमाणें होतें व दररोज ह्या सत्याचें प्रत्यंतर येतच होतें.

अहमदाबादेला शेवटची निरवानिरव करून ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभासदांचा आम्हीं निरोप घेतला. आम्ही पुनः केव्हां भेटूं ते कोणालाच सांगतां येण्यासारखें नव्हतें. ऑ. इं. कॉं. कमिटीच्या आज्ञेनुसार स्थानिक व्यवस्था लावण्यासाठीं अथवा सरोजिनी नायडूंच्या शब्दांत तुरुंगाच्या यात्रेकरितां वळकटी बांधून घेण्यासाठीं आम्ही लगबगीनें आपापल्या जागीं परतलों.

वाटेंत वडील व मी गांधीजींना भेटण्यासाठीं गेलों. त्या वेळीं ते आपल्या पथकानिशीं जंबुसर येथें होते. कांहीं तास आम्हीं त्यांच्या सहवासांत घालविले. नतर ते आपल्या पथकाबरोबर नव्या मुक्कामीं निघून गेले. हातांत काठी घेऊन ते आपल्या पथकाच्या अग्रभागीं चालत होते. त्यांचीं पावलें खंबीरपणें पडत होतीं आणि मुद्रा शांत पण खंबीर दिसत होती. ते त्या वेळीं मीं घेतलेलें त्यांचें शेवटचें दर्शन. तें दृश्य पाहून आमचीं मनें थरारून गेलीं.

जबुसर येथें गांधीजींचा विचार घेऊन आमचें अलाहाबाद येथील जुनें घर राष्ट्राला देणगी म्हणून देण्याचा व स्वराज्यभवन असें त्याचें नूतन नामकरण करण्याचा बेत वडिलांनीं नक्की केला. अलाहाबादेस पोंचल्यावर ही गोष्ट जाहीर करण्यांत आली व त्यांनीं कॉंग्रेसला घराचा ताबाहि देऊन टाकला. घराच्या एका भागांत रुग्णालय उघडण्यांत आलें. त्या वेळीं या व्यवहाराची कायदेशीर व्यवस्था करणें त्यांना शक्य झालें नाहीं; पण दीड वर्षानंतर त्यांच्या इच्छेनुरूप मीं घराचा निधि स्थापन केला.

एप्रिल महिना आला; गांधीजी समुद्राच्या जवळ जवळ जाऊं लागले. मिठाच्या कायदेभंगानें सत्याग्रहाच्या चळवळीला सुरुवात करण्याची अनुज्ञा मिळण्याची वाट आम्ही पाहत बसलों. गेले कित्येक महिने स्वयंसेवकांना कवाईत शिकविण्याचें काम सुरू होतें. कमला व कृष्णा ( माझी पत्नी व बहीण ) स्वयंसेवकांत दाखल झाल्या. त्या पुरुषासारखे गणवेष धारण करीत असत. स्वयंसेवकांपाशीं हत्यारें अथवा साध्या काठ्याहि नव्हत्या. ते अधिक कार्यक्षम व्हावे व मोठमोठ्या जनसमुदायावर त्यांना नियंत्रण चालवितां यावें याच उद्देशानें त्यांना शिक्षण देण्यांत येत असे. जालियनवाला बागेच्या स्मरणार्थ पाळण्यांत येणाऱ्या राष्ट्रीय सप्ताहाचा प्रारंभ सहा एप्रिल रोजीं होतो, त्याच दिवशीं गांधीजींनीं दांडी येथें मिठाचा सत्याग्रह केला व त्यानंतर चार दिवसांनीं सर्व कॉंग्रेस-संस्थांना आपापल्या ठिकाणीं सत्याग्रह सुरू करण्याची अनुज्ञा देण्यांत आली.

आणि स्प्रिंगवरील दडपण एकदम काढून घेतल्याप्रमाणें झालें! सर्व देशभर शहराखेड्यांतून मीठ तयार करण्याची गडबड उडाली व तें तयार करण्याच्या अनेक विचित्र पद्धती लोकांनीं अंमलांत आणल्या. आमचें तर त्या विषयाचें ज्ञान अगाधच होतें! तेव्हां आम्ही माहिती जमवून पत्रकें प्रसिद्ध केलीं, भांडींकुंडीं जमविलीं व सरतेशेवटीं काळाबेंद्रा कांहीं तरी एक पदार्थ तयार झाला. तोच घेऊन आम्हीं विजयोन्मादानें नाचलों व भरमसाट किंमतीला तें मीठ विकलें! मीठ पांढरें झालें कीं काळें झालें हा प्रश्नच नव्हता; मिठाच्या जुलमी कायद्याचा भंग करणें हा मूळ मुद्द्याचा प्रश्न. तो आम्हीं तडीला नेला; मग मीठ कसेंहि का दिसेना. लोकांचा अमर्याद उत्साह व कुरणांतील वणव्याप्रमाणें पसरत चाललेली चळवळीची आग पाहिल्यानंतर, प्रथम गांधीजींनीं हा कार्यक्रम सुचवला त्या वेळीं शंका घेत बसल्याबद्दल आम्हाला खेद व लज्जा वाटूं लागली. जनतेला लगामीं लावून, तिच्याकडून पद्धतशीर रीतीनें काम करवून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण खरीच.

मध्यप्रांतांतील रायचूर येथील परिषदेला जाण्यासाठीं ता. १४ एप्रिल रोजीं मी आगगाडींत चढलों होतों. इतक्यांत मला अटक करण्यांत आली. त्याच दिवशीं माझा खटला चालून मला सहा महिन्यांची शिक्षा झाली. अटकेची कल्पना असल्यामुळें मी माझ्यामागून कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानीं गांधीजींची व त्यांनीं नकार दिल्यास वडिलांची नेमणूक केली होती. गांधीजींकडून अपेक्षेप्रमाणें नकार आला व वडीलच कॉंग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष झाले. त्यांची प्रकृति ढांसळली असून— सुद्धां चळवळींत त्यांनीं धडाडीनें भाग घेतला. सुरुवातीच्या काळांत त्यांनीं करारीपणानें केलेलें मार्गदर्शन व अमलांत आणलेली शिस्त यांच्यापासून चळवळीला फार फायदा झाला असला, तरी त्यांच्यांत जी कांहीं शक्ति उरली होती, तीहि या दगदगीमुळें आटून गेली.

मिरवणुकी, लाठीहल्ले, गोळीबार, प्रमुख पुढाऱ्यांच्या अटकेनिमित्त अनेकदां

पाळण्यांत आलेले हरताळ, पेशावरदिन, गढवाली दिन, वगैरे रोमांचकारी बातम्यांची त्या काळीं रेलचेल होती. परदेशी व ब्रिटिश मालावर कांहीं दिवस अगदीं कडकडीत हरताळ पडला. माझी वयोवृद्ध आई माझ्या बहिणीसमवेत भर उन्हांत निरोधना-साठीं दुकानासमोर उभी राहत असल्याचें वृत्त मी ऐकिलें, तेव्हां माझें मन उचंबळून गेलें. कमला निरोधन करीत होतीच, पण त्याव्यतिरिक्त आणखीहि बरीच कार्ये ती उरकीत होती. मला तिची इतक्या वर्षांची माहिती, पण अलाहाबाद शहरांत व जिल्ह्यांत चळवळीचें काम तिनें अशा अपूर्व तडफेनें व निश्चयानें चालवलें होतें, कीं तें पाहून मलादेखील आश्चर्यानें तोंडांत बोट घालावें लागलें. आजारबिजार ती जसा कांहीं विसरलीच. सर्व दिवसभर उन्हांतून तिची धांवपळ चालावयाची. तिनें उत्तम प्रकारचें संघटना-कौशल्य दाखविलें. या बातम्या तुरुंगांत मला उडत उडत कळत. पण नंतर वडील तुरुंगांत आल्यावर स्वत: त्यांनींच कमलच्या कामाची व विशेषत: तिच्या संघटना-कौशल्याची तारीफ केली. आईनें अथवा या मुलींनीं उन्हातान्हांतून भटकावें हे त्यांना मुळींच पसंत पडत नसे. पण क्वचित् एकाद दुसरा शब्द बोलण्या-पलीकडे त्यांनीं अडथळा केला नाहीं.

प्रारंभींच्या काळांतील सर्वांत महत्त्वाची बातमी म्हणजे २३ एप्रिल रोजीं पेशावर येथें व नंतर सर्व सरहद्दप्रांतांत घडलेले प्रसंग. मशीनगन आग ओकीत असतां अशा प्रकारचें शिस्तवार व शांततामय धैर्य हिंदुस्थानांतील कोठल्याहि भागांत प्रकट झालें असतें, तरी सर्व देशभर खळबळ उडाली असती. पण सरहद्द प्रांतांत असा प्रसंग घडला म्हणून त्या प्रसंगाला विशेष महत्त्व होतें. पठाणांचें शौर्य विख्यात असलें, तरी शांतिप्रिय म्हणून ते प्रसिद्ध नाहींत. पण सर्व हिंदुस्थानला आदर्शभूत असें उदाहरण ह्या पठाणांनीं त्या प्रसंगीं घालून दिलें. नागरिकांवर गोळ्या झाडण्याचें गढवाली सैनिकांनीं नाकारिलें, तें देखील सरहद्द प्रांतांतच. नि:शस्त्र समुदायावर गोळीबार करण्याची कोणाहि शूराला लाज वाटते म्हणून त्यांनीं बंदुका रोखण्याचें नाकारलें असलें, तरी जनतेविषयीं वाटणारी सहानुभूति हेंहि त्यांच्या नकाराचें कारण होतें यांत शंका नाहीं. तथापि अधिकाऱ्यांचा हुकूम अवमानण्यासारखें गंभीर कृत्य करण्यास सैनिक केवळ सहानुभूति वाटते म्हणून तयार होत नसतात. आज्ञाभंगाचे परिणाम त्यांना चांगले माहीत असतात. गढवाली-सैनिकांनीं इतर पलटणींप्रमाणेच ( इतर पलटणींनीहि त्या वेळीं आज्ञाभंग केले होते पण त्या गोष्टींना प्रसिद्धि मिळाली नाहीं. ) हुकूम मोडला याचें कारण ब्रिटिश सत्ता कोसळूं लागली आहे असा त्यांचा समज झालेला असावा. सैनिकांची अशी कल्पना झाली तरच ते आपल्याला वाटणाऱ्या सहानुभूतीला व आपल्या मनोवृत्तींना व्यक्त स्वरूप देण्यास धजावतात. कांहीं दिवस अगर आठवडेपर्यंत देशभर चाललेली धुमश्चक्री व कायदेभंगाचा कडका पाहून ब्रिटिशांची सद्दी संपली असा कांहीं लोकांचा समज झाला व या समजाचा परिणाम हिंदी सैनिकांवरहि घडून आला. पण नजीकच्या

काळांत तरी असें कांहीं घडण्याचा संभव नाहीं ही गोष्ट लवकरच उघड झाली व मग सैन्यांतील फितुरीहि थांबली. आणि सैन्याला कांहीं करतांच येऊं नये अशा अडचणींच्या जागीं उभें करण्याचें धोरणहि सरकारतर्फे ठेवण्यांत येऊं लागलें.

त्या काळीं अनेक विलक्षण प्रसंग घडले. पण सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या चळवळींत स्त्री-समाजानें घेतलेला भाग. घराच्या एकांतवासांतून त्या बाहेर पडल्या व सार्वजनिक कामाचा अभ्यास नसतांहि त्यांनीं चळवळींत पूर्ण उडी घेतली. परदेशी दुकानांचें व दारूदुकानांचें निरोधन स्त्रियांनीच करावें असें जणुं कांहीं ठरून गेलें. निवळ स्त्रियांच्या अशा प्रचंड मिरवणुकी शहरोशहरीं निघाल्या. सर्वसामान्यपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं पुरुषांपेक्षां स्त्रियांनीं अधिक खंबीरपणा दाखविला. अनेक ठिकाणीं त्या प्रांताच्या सर्वाधिकारी झाल्या होत्या.

लवकरच मीठ-सत्याग्रह हा सबंध चळवळींपैकीं एक कार्यक्रम होऊन सत्याग्रहाचें लोण दुसऱ्याहि क्षेत्रांत पोंचलें. सत्याग्रहाचें कार्यक्षेत्र वाढण्यास व्हाइसरॉयचे निरनिराळ्या कार्यांना बंदी करणारे वटहुकूम देखील कारणीभूत झाले. कारण कायदेभंग करण्याला तितकीच अधिक रुचि प्राप्त होऊं लागली. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांपैकीं कित्येकजणांना पकडलें असलें, तरी नवे सभासद त्यांच्या जागीं येऊन कमिटीचें कार्य पूर्ववत् चालूच होतें. नवा वटहुकूम निघाला कीं तो मोडावा कसा, याची माहिती देणारा एक ठराव वर्किंग कमिटी करीत असे. अशा रीतीनें तोडीवर तोड चालली होती. ठरावाचे आदेश सर्व देशभर आश्चर्य वाटण्याजोग्या शिस्तीनें अमलांत आणण्यांत येत असत. वृत्तपत्रांसंबंधींचा ठराव मात्र या बाबतींत अपवादभूत झाला.

वृत्तपत्रांवरील नियंत्रण अधिक कडक करावें व वृत्तपत्रांकडून जामीन घ्यावे म्हणून सरकारी वटहुकूम निघाल्यावर जामीन भरण्याऐवजीं राष्ट्रीय वृत्तीचीं वृत्तपत्रें छापणेंच बंद करावें अशी विनंती वर्किंग कमिटीनें केली. वृत्तपत्रांची मागणी नेमकी त्याच वेळीं अतिशय वाढलेली असल्यामुळें हा ठराव अमलांत आणणें वृत्तपत्रकारांना फार अवघड वाटलें. तथापि ( नेमस्त वृत्तीचीं वृत्तपत्रें वगळून ) अनेक वृत्तपत्रें बंद ठेवण्यांत आलीं. त्याबरोबर वाटेल त्या गटार बातम्या पसरूं लागल्या. पण फार वेळ वृत्तपत्रें बंद पाडणें शक्य नव्हतें; कारण आपला तोटा होतो तो होतोच. शिवाय आपले प्रतिस्पर्धी धंदाहि बळकावून बसतात हे पाहिल्यावर चैन कसें पडणार ? बंद ठेवण्यांत आलेलीं बहुतेक वृत्तपत्रें लवकरच पहिल्याप्रमाणें सुरू करण्यांत आलीं.

गांधीजींना पांच मे रोजीं अटक झाली. त्यानंतर पश्चिम किनाऱ्यावरील मिठागरांवर व मिठाच्या वखारींवर हल्ले चढविण्यांत आले. त्या प्रसंगीं पोलिसांनीं आपल्या क्रौर्याचें जें प्रदर्शन केलें, तें फार दुःखप्रद होतें. त्यानंतरच्या चळवळींत तेथील प्रचंड हरताळामुळें, मिरवणुकीमुळें व लाठीहल्ल्यामुळें मुंबईला अग्रस्थान

प्राप्त झालें. लाठीहल्ल्यांत घायाळ झालेल्या लोकांची शुश्रूषा करण्यासाठीं तात्पुरतीं रुग्णालयेंहि उघडण्यांत आलीं. पुष्कळसे प्रमुख प्रसंग मुंबईलाच घडून येत व शहर फार मोठें असल्यामुळें त्या प्रसंगांची प्रसिद्धीहि मोठ्या प्रमाणांत होई. लहान शहरांतून अगर खेड्यांतून मुंबईच्याच तोलाचे कार्यक्रम झाले, पण त्यांना प्रसिद्धि मिळाली नाहीं.

जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यांत आईला व कमलेला बरोबर घेऊन वडील मुंबईला गेले होते. त्यांचें तेथें मोठ्या थाटाचें स्वागत झालें. अत्यंत भीषण असे लाठीहल्ले वडिलांचा मुक्काम मुंबईला असतांनाच करण्यांत आले. मुंबईत लाठी-हल्ला हा एक नित्याचाच प्रकार झाला होता. त्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं लोकांची एक जंगी मिरवणुक पोलिसांनीं अडविली, तेव्हां मालवीयजीं व वर्किंग कमिटीचे सभासद हे मिरवणुकीच्या अग्रभागीं सर्व रात्रभर बसून राहिले होते.

मुंबईहून परतल्यावर वडिलांना ता. ३० रोजीं सय्यद महमद यांच्यासह पकडण्यांत येऊन दोघांनाहि सहा सहा महिन्यांचीं शिक्षा देण्यांत आली. नागरिकांवर गोळीबार करण्याचा हुकूम दिला असतां सैनिकांचें व शिपायांचें कर्तव्य कोणतें याची कल्पना आणून देणारें एक पत्रक वडिलांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्याबद्दलच त्यांना अटक करण्यांत आली असावी. हिंदुस्थानांतील कायद्याला धरूनच हें पत्रक लिहिलेलें असल्यामुळें तें पूर्णपणें कायदेशीर असेंच होतें; तथापि सरकारनें मात्र त्या पत्रकाचें स्वरूप भयंकर व चिथावणी देणारें आहे असें ठरविलें.

मुंबईच्या मुक्कामांत सकाळपासून रात्रीपर्यंत काम करावें लागत असल्यामुळें व प्रत्येक निर्णयाची जबाबदारी त्यांना स्वतःच्या शिरावर घ्यावी लागल्यामुळें वडिलांच्या प्रकृतीवर फार ताण पडला. शरीरस्वास्थ्य आधींच बिघडलेलें; त्यांतून ही दगदग पडली. परत आले तेव्हां ते अगदीं मरगळून गेले होते. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें पूर्ण विश्रांतीसाठीं त्यांनीं मसुरीला जाण्याची सर्व तयारी केली. पण मसुरीला निघण्याच्या आदल्या दिवशीं त्यांची रवानगी नैनी येथील मध्यवर्ति तुरुंगांत आमच्याच बराकींत करण्यांत आली.

३०

# नैनी तुरुंग

सुमारें सात वर्षांनंतर मी परत तुरुंगांत आलों. तुरुंगांतील जीवनाच्या आठवणी थोड्याशा बुजून गेल्या होत्या. प्रांतांतील मध्यवर्ति तुरुंगासारख्या मोठ्या तुरुंगांत मला ठेवण्यांत आलें असलें, तरी एकांतवासाचा नवाच अनुभव मला तेथें मिळाला. २२०० ते २३०० कैद्यांची वस्ति असणाऱ्या मोठ्या आवारापासून स्वतंत्र अशा आवारांत माझी व्यवस्था लावण्यांत आली. हें आवार छोटेंसें व वर्तुळाकार होतें. वर्तुळाचा व्यास सुमारें १०० फूट असून त्याच्याभोंवतीं १५ फूट उंचीची तटबंदी होती. आवाराच्या मध्यभागीं एक विद्रूप व भकास अशी चार खोल्यांची इमारत होती: त्यापैकीं एकमेकांस जोडलेल्या दोन खोल्या मला देण्यांत आल्या. एकीचा उपयोग स्नानगृह व शौचकूप म्हणून करावयाचा होता. दुसऱ्या दोन खोल्या कांहीं काळ रिकाम्याच पडून राहिल्या.

बाहेरच्या भरगच्च कार्यक्रमाच्या व उत्साहमय अशा जीवनानंतर मला येथें अगदींच एकाकी व कंटाळवाणें वाटूं लागलें. मी आलों तेव्हां फार दमून गेलों होतों; म्हणून पहिले दोन तीन दिवस पुष्कळशी झोंप घेण्यांतच निघून गेले. उन्हाळा केव्हांच सुरू झाला होता. माझ्या खोलीच्या बाहेर, इमारतीच्या व तटाच्या दरम्यानच्या जागेंत मला रात्रीं उघड्यावर निजण्याची परवानगी देण्यांत आली. माझा बिछाना सांखळदंडांनीं जखडून टाकलेला होता. तो कांखोटीला मारून मी निघून जाईन अथवा तटाची भिंत चढून जाण्याकडे मी त्याचा उपयोग करीन अशी शंका तुरुंगावरील अधिकाऱ्यांना आली असावी! रात्रभर कांहीं विलक्षण आवाज कानावर येत. मुख्य तटबंदीचें रक्षण करणारे कैदी निरनिराळ्या सप्तकांत परस्परांना साद घालीत असत! कधीं कधीं ते इतके लांबलचक हेल काढीत कीं झाडांच्या पानांतून आक्रोश करीत हिंडणाऱ्या वाऱ्याप्रमाणें त्याचा आवाज ऐकूं येई. बराकींतून देखरेख करणारे पहारेकरी आपल्या भसाड्या अशा आवाजांत कैद्यांची 'गिंती' करीत असत व 'ऑलबेल' असें ओरडत. रात्रींतून पांचपन्नास वेळां कोणी तरी अधिकारी चक्कर मारीत असे व पहाऱ्यावरील रक्षकांना मोठ्यानें ओरडून कांहीं तरी विचारीत असे. माझें आवार बऱ्याच अंतरावर असल्यामुळें मला हे सर्व आवाज अस्पष्टपणें ऐकूं येत. प्रथम प्रथम हे कसले आवाज आहेत तें मला कळेना. कधीं कधीं मला असें वाटे कीं, मी अरण्याच्या अगदीं जवळ असून

आपल्या शेतांतून जंगली जनावरांना पिटाळण्यासाठीं शेतकरी हाकाटी करीत आहेत, तर कधीं अशी कल्पना होई, कीं श्वापदेंच आपलें निशागीत आळवीत असून त्यांना सगळें अरण्य जणुं कांहीं साथच देत आहे !

चौकोनी आवारापेक्षां वाटोळ्या आवारांत बंदीवासाची कल्पना अधिक तीव्रतेनें होते असें मला वाटतें. ही माझी केवळ कल्पनाच आहे, कीं खरोखर वस्तुस्थिति तशीच आहे कोणाला ठाऊक. कोनेकोपरे कोठेंच दिसत नाहींत, त्यामुळें मनावर दडपण पडतें. त्या भिंतीमुळें दिवसा तर आकाशहि संकुचित झाल्याप्रमाणें भासावें. आकाशाचा अगदीं लहानसा तुकडाच तेवढा त्या आवारांतून दिसावयाचा !

“ नील सान तें वितान, म्हणति बंदि ज्यास गगन
संथ जाइ जलद-यान शिडांवर रुपेरी. ”

रात्रीं तर ती भिंत अधिकच जवळ आल्यासारखें होऊन मी एकाद्या विहिरीच्या तळाशीं पडलो आहें असें वाटूं लागे. अथवा माझ्या दृष्टीला पडणारा आकाशाचा तारकांकित चांदवा खरा नसून तें कृत्रिम आकाश असावें अशी शंका उत्पन्न होई.

माझी बराक व आवार हीं ‘ कुत्ताघर ’ ह्या नांवानें ओळखलीं जात. हें नांव जुनेंच होतें; माझ्याशीं त्या नांवाचा कांहींच संबंध नव्हता. ही छोटीशी बराक विशेष बेफाम कैद्यांना अलग ठेवतां यावें म्हणून बांधण्यांत आली होती. नंतर राजकीय कैदी स्थानबद्ध कैदी वगैरे मुख्य तुरुंगापासून दूर ठेवावयाच्या लोकांसाठीं तिचा उपयोग करण्यांत येऊं लागला. भिंतीच्या समोर थोड्या अंतरावर कांहीं बांधकाम केलेलें होतें. प्रथमच जेव्हां माझ्या तें दृष्टीला पडलें, तेव्हां माझ्या मनाला धक्काच बसला. भल्या मोठ्या पिंजऱ्याप्रमाणेंच तें दिसत होतें व त्यांत घाण्याच्या बैलाप्रमाणें माणसें फिरत होतीं. माणसांच्या श्रमानें चालणारी ती पाणचक्की आहे असें मला मागाहून समजलें. त्यावर एकेका वेळीं सोळा सोळा माणसें काम करीत. माणसाला सर्वच गोष्टींची संवय होते, त्याप्रमाणें याहि दृश्याची मला संवय झाली. परंतु मनुष्यशक्तीचा हा अत्यंत मूर्खपणाचा व पशुतुल्य दुरुपयोग आहे असें माझें मत झालेलें आहे. जेव्हां जेव्हां मी त्या पिंजऱ्याच्या जवळून जाई, तेव्हां तेव्हां पशुसंग्रहालयाचा विचार माझ्या मनांत येत असे.

व्यायामासाठीं अथवा इतर कोणत्याहि कामासाठीं आवाराच्या बाहेर जाण्याची मला कांहीं दिवस मनाई करण्यांत आली होती. नंतर अगदीं सकाळीं झुंजुमुंजू असतांना अर्धा तासपर्यंत बाहेर जाऊन रपेट करण्याची किंवा पळण्याची परवानगी मला मिळाली. दुसऱ्या कैद्यांशीं संबंध येऊं नये व मी त्यांच्या दृष्टीला पडूं नये, म्हणून पहाटेची वेळ नेमण्यांत आली होती. ती वेळ मोठ्या आनंदांत जाई व त्यामुळें मन अगदीं ताजेंतवानें होत असे. थोड्या वेळांत पुष्कळसा व्यायाम उघड्या

हवेंत घेतां यावा म्हणून मीं पळण्यास सुरुवात केली व हळूहळू पळण्याचें प्रमाण वाढवीत वाढवीत मी रोज दोन मैलांपेक्षां अधिक पळूं लागलों. अगदीं पहांटेस म्हणजे सुमारें चार अथवा साडेचार वाजतां चांगला अंधार असतांनाच मी उठत असें. रात्रीं वाचनासाठीं पुरेसा उजेड मिळत नसल्यामुळें लवकरच अथरुणावर पडावें लागे. लवकर जाग येण्याचें कांहीं अशीं हेंहि कारण होतेंच. ताऱ्याकडे टक लावून बसण्याची मला आवड होती. कांहीं मुख्य मुख्य तारकापुंजांच्या स्थानांवरून वेळेचीहि कल्पना येत नसे. आवाराच्या तटावरून डोकावून पाहणारा ध्रुव तारा अंथरुणावर पडल्या पडल्या डोळ्यांना दिसत असे. सदोदित त्याच ठिकाणीं तो नजरेस पडत असल्याकारणानें त्याच्या दर्शनापासून मला फार समाधान होई व बदलत्या आकाशाच्या मध्यभागीं उभा ठाकलेला हा अविचल तारा म्हणजे चिकाटी व आनंदपूर्ण धिमेपणा या गुणांचें एक प्रतीकच आहे असें वाटत असे.

एक महिनापर्यंत मला कोणीच सोबती मिळाला नाहीं. तथापि वॉर्डर, कैदी-पहारेकरी, कैदी-आचारी व एक झाडू माझ्याच आवारांत राहत असल्यामुळें मी अगदीं एकटा नव्हतों. कधीं कधीं कांहीं कारणानें दुसरे कैदीहि तेथें येत असत. जन्मठेपेचे अनेक कैदी तुरुंगांत होते. जन्मठेपेची शिक्षा बहुधा वीस वर्षांनीं अथवा जरा आधींच संपते. पण तुरुंगांत वीस वर्षांहून अधिक काळ काढलेले अनेक कैदी तेथें होते. नैनीच्या तुरुंगात एक ध्यानांत राहण्यासारखा कैदी मला आढळला. त्याच्या बिल्ल्यावर सुटकेची तारीख म्हणून १९६६ साल लिहिलेलें होतें! १९३० सालापर्यंतच त्यानें अनेक वर्षांची शिक्षा भोगलेली होती. तो मध्यम वयाचा गृहस्थ दिसला. त्याला अनेक शिक्षा झालेल्या असून सर्व शिक्षांची गोळाबेरीज जवळजवळ पंचाहत्तर वर्षे भरत होती.

एकादें मूल किंवा बाई माणूस, फार कशाला, एकादें जनावरसुद्धां या जन्मठेपीच्या कैद्यांच्या दृष्टीस कित्येक वर्षांत एकदांहि पडत नाहीं. बाह्य जगाशीं असलेला त्यांचा संबंध अजिबात तुटतो व माणसाशीं असणाऱ्या ओळखीदेखी पार बुजून जातात. भीति, द्वेष, सूड वगैरे उग्र भावनांचे लेप त्यांच्या अंतःकरणावर चढत असतात. जगांतील आनंद, दयाळूपणा, सुख वगैरे सर्व गोष्टींचा त्यांना विसर पडून वाईट विचार तेवढे जिवंत राहतात. शेवटीं शेवटीं द्वेषभावना देखील नष्ट होऊन त्यांचें जीवन यंत्राप्रमाणेंच अंतःकरणशून्य बनून जातें. यंत्राप्रमाणेंच त्यांचे दिवस जात असतात; एकामागून दुसरा, त्यांत फरक नाहीं. त्यांच्यापाशीं अवशिष्ट राहणारी भावना म्हणजे एकच—भीति. वेळोवेळीं कैद्यांच्या शरीरांचें माप व वजन घेण्यांत येतें; परंतु या भयंकर वातावरणांत झुरून व खुरटून जाणाऱ्या मनाचें माप व वजन कोणाला घेतां येणार आहे का? फांशीच्या शिक्षेविरुद्ध लोक मुद्दे मांडतात व ते मला पटतातहि; पण दुःखानें भरलेलें हें तुरुंगांतील प्रदीर्घ आयुष्य

दृष्टीला पडलें म्हणजे मनुष्याला हळू हळू इंचा-इंचानें मारण्यापेक्षां फांसावर चढविणें बरें असें वाटूं लागतें. जन्मठेपीच्या कैद्यांपैकीं एक जण एकदां माझ्याकडे आला व त्यानें विचारलें, " आमची अवस्था काय होणार हो ? स्वराज्यांत तरी आम्हांला या नरकांतून बाहेर यावयास मिळेल काय ? "

आणि हे जन्मठेपेचे कैदी म्हणजे असतात तरी कोण ? त्यांपैकीं पुष्कळसे टोळ्या टोळ्यांनीं येतात. पुष्कळदां पन्नास अथवा शंभर माणसांच्या टोळीलाहि एकदम शिक्षा देण्यांत येते. त्यांपैकीं कांहीं अपराधी असतील, पण सगळेच जण अपराधी असतील कीं नाहीं याबद्दल मला शंका आहे. अशा खटल्यांत माणूस सहज गोंवला जातो. माफीच्या साक्षीदाराचा पुरावा मिळवला, थोडी ओळख पटली कीं पुरे होतें. दरोड्यांची संख्या वाढत असून तुरुंगांतील लोकसंख्या दरवर्षी फुगत चालली आहे. उपाशी पोटीं लोक दुसरें करणार काय ? गुन्ह्यांच्या वाढीविषयीं न्यायाधीश लांबलचक व्याख्यानें झोडीत असतात; परंतु त्यांच्या आर्थिक कारणांकडे कांहीं ते डोळे उघडून पाहत नाहींत.

शेतकऱ्यांचीं जमिनीच्या बाबींत भांडणें जुपतात, लाठ्या फिरतात, कोणी मरून जातो. परिणाम काय ? तर कित्येक लोकांना लांब मुदतीच्या अथवा जन्मठेपीच्या शिक्षा होतात. अशा प्रकारें सगळेच्या सगळे गडी तुरुंगांत पडून बायामाणसांना कशी तरी गुजराण करावी लागते. यांपैकीं एकालाहि गुन्हेगार प्रवृत्तीचा म्हणतां येणार नाहीं. बहुतकरून हे लोक जवान व खेड्यांतील इतर माणसांपेक्षां शरीरानें व मनानें दणकट असल्याचें दिसून येतें. थोडें शिक्षण दिलें आणि जरा निराळ्या विषयांकडे व धंद्याकडे मनाचा पन्हळ लावला, कीं त्यांच्यापासून देशाचा बहुमोल फायदा होईल.

हिंदुस्थानांतील तुरुंगांतून कांहीं निगरगट्ट, समाजकंटक व राष्ट्रघ्न माणसें आहेत, नाहीं असें नाहीं. पण ज्यांच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवावा असे सत्प्रवृत्त मुलगे व तरुण इतके आहेत, कीं माणसाला आश्चर्य वाटावें. कैद्यांमध्यें अशी निवड पाखड करण्याची बुद्धि तुरुंगावरील एकाहि अधिकाऱ्याला बहुधा सुचत नसेल. न्यूयॉर्कमधील सिंगसिंग तुरुंगाच्या लुई इ. लॉवेज् या वॉर्डरनें याविषयीं कांहीं उद्बोधक आंकडे प्रसिद्ध केले आहेत. तो म्हणतो कीं, आपल्या ताब्यांतील कैद्यांपैकीं पन्नास टक्के लोकांत गुन्हेगार प्रवृत्ति मुळीं नाहींच. पंचवीस टक्के केवळ परिस्थितीमुळें गुन्हेगार झाले आहेत व उरलेल्या पचवीस टक्क्यांपैकीं फक्त साडेबारा टक्के लोकांना हाडाचे समाजकंटक म्हणतां येईल. हें प्रमाण इरसाल गुन्हेगारांना जेथें पाठविण्यांत येतें, त्या सिंगसिंग तुरुंगांतील आहे ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे. हिंदुस्थानांत प्रवृत्तीनें गुन्हेगार असलेल्या लोकांचें प्रमाण याहूनहि कमी असेल असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जरा अधिक सहानुभूतीचें आर्थिक धोरण आंखलें, बेकारी कमी केली, शिक्षणाचा अधिक प्रसार केला, तर आमचे तुरुंग रिकामे

होतील. पण हें साध्य होण्यासाठीं समाजांत बदल करणारी योजना हातीं घेतली पाहिजे. दुसरा उपाय सध्यां ब्रिटिश सरकार योजीत आहे. तो म्हणजे, पोलिसांची संख्या वाढविणें व अधिक मोठे तुरुंग बांधणें. अखिल भारतीय कैदी साहाय्यक मंडळाच्या चिटणीसांनीं प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांप्रमाणें १९३३ सालीं नुसत्या मुंबई इलाख्यांतून तुरुंगांत पाठविलेल्यांची संख्या १,२८,००० होती. बंगाल प्रांतांतून १,२४,००० लोक तुरुंगांत गेले. हिंदुस्थानांतील सर्व प्रांत घेतले तर कैद्यांची एकंदर संख्या कदाचित् दहा लाखांपर्यंत जाईल. तुरुंगांतील ही नेहमींची लोकसंख्या नव्हे. कांहीं कैद्यांच्या शिक्षा फार लहान असतात. परंतु ते वगळले तरीहि कैद्यांची संख्या खूपच भरेल. असें म्हणतात कीं जगांतील मोठ्यांत मोठीं तुरुंगखातीं हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांतून आहेत. संयुक्त प्रांताच्या वांट्याला हा संशयास्पद गौरवाचा मान आलेला असून तेथील पूर्वापार चालत आलेली पद्धति अत्यंत परागतिक व मागसलेली आहे. कैद्यांचा व्यक्ति म्हणून, मनुष्य प्राणी म्हणून विचारच करण्यांत येत नाहीं व त्यांच्या मनावर संस्करण करण्याचे मुळींसुद्धां प्रयत्न होत नाहींत. ते तुरुंगांतून पळून जाऊं नयेत म्हणून मात्र संयुक्तप्रांतीय तुरुंगखातें फार दक्षता बाळगीत असतें. निसटण्याचा प्रयत्न फारच थोडे लोक करतात आणि हजारांत एकादा तरी प्रयत्न सफल होतो कीं नाहीं याची वानवाच आहे.

तुरुंगांत जर कशाचा विशेष खेद होत असेल तर तेथें पंधरा वर्षांपासून पुढचे कित्येक तरी तरुण नजरेस पडतात ह्या गोष्टीचा. त्यांच्यापैकीं बहुतेक चांगले चलाख दिसतात आणि संधि मिळाली तर ते नांव काढतील असें वाटतें. त्यांना लिहिण्या-वाचण्याची गोडी लावावी म्हणून अलीकडे कांहीं फुटकळ प्रयत्न सुरू झाले आहेत. पण ते अगदींच किरकोळ प्रयत्न होत. खेळण्यासवरण्याला संधि नाहीं, वृत्तपत्रांना बंदी आणि पुस्तकावर करडी नजर. सध्याकाळ झाली कीं तेव्हांपासून बारान् बारा तास कैदी बराकींत डांबून पडलेला असतो.

तीन महिन्यांनीं एक भेट व एक पत्र. तीन महिने हा फार दीर्घ काळ आहे. पण त्याहि सवलतीचा फायदा कैद्यांना घेतां येत नाहीं. बहुतेक कैदी निरक्षर असतात; तेव्हां कोणी तरी अधिकारी लिहून देईल का म्हणून त्यांना तिष्ठत बसावें लागतें. स्वतःच्या मागें आणखी एक काम कशाला लावून घ्या म्हणून अधिकाऱ्याची टाळाटाळ सुरू असते. पत्र लिहिलेंच तर पत्ता बरोबर नसतो म्हणून तें पोंचत नाहीं. भेटीचे तर याहून हाल आहेत. रौप्यपुष्पदक्षिणा देऊन अधिकारी प्रसन्न करून घेतला तरच ती बहुधा मिळावयाची. पुष्कळदां कैद्यांची निरनिराळ्या तुरुंगांतून बदली करण्यांत येते व मग घरच्या माणसांना त्यांची दाद लागत नाहीं. मला असे अनेक कैदी आढळले, कीं ज्यांना कित्येक वर्षांत घरच्या माणसांची हालहवाल कांहींसुद्धां कळलेली नसल्यामुळें तीं जिवंत आहेत कीं मेलीं ह्याची सुद्धां त्यांना कल्पना नव्हती.

तीनचार महिन्यांनीं भेट झालीच. तर तीदेखील मासलेवाईकच व्हावयाची. जाळीच्या एका अंगाला बरेचसे कैदी व पलीकडच्या अंगाला त्या सर्वांचीं नातेवाईक माणसें अशीं एकदमच उभीं करतात. एकाच वेळीं सगळीं बोलूं लागतात म्हणून ओरडूनच बोलावें लागतें; त्यामुळें भेटीच्या वेळीं जें कांहीं थोडेंफार स्निग्ध वातावरण निर्माण व्हावयाचें, तेंहि नाहींसे होतें.

बऱ्यापैकीं अन्न व थोड्या अधिक भेटी व पत्रें ह्या सवलती ( युरोपियन कैदी वगळल्यास ) हजारांत एकाददुसऱ्याला मिळत असतील. कायदेभंगासारख्या मोठ्या चळवळीच्या काळांत हजारों लोक तुरुंगांत पडले कीं अशा खास कैद्यांचें प्रमाण जरा चढतें. परंतु राजकीय कैद्यांपैकीं देखील पंचाण्णव टक्के स्त्री-पुरुषांना इतर कैद्यां-प्रमाणेंच वागवितात.

क्रांतिकारक कार्याबद्दल ज्यांना दीर्घकालीन शिक्षा होतात, अशा कांहीं इसमांना कित्येक दिवसपर्यंत एकांतवासांत ठेवण्यांत येतें. संयुक्त प्रांतामध्यें अशा कित्येक इसमांच्या कपाळीं एकान्तवास ठेवलेला असतो. सर्वसाधारणपणें तुरुंगांतील अपराधाबद्दल एकान्तवासाची शिक्षा देण्यांत येते. पण ह्या तरुण मुलांची तुरुंगांतील वर्तणूक आदर्शभूत असली, तरीहि त्यांच्या कपाळचा एकान्तवास चुकत नाहीं.

अशा रीतीनें तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं निष्कारण लादलेल्या ह्या भयंकर शिक्षेची भर कोर्टानें दिलेल्या शिक्षेंत पडत असते. हा प्रकार सर्वस्वीं विपरीत असा आहे व कोणत्याहि कायद्याचा आधार या बाबतींत दाखवितां येईल असें वाटत नाहीं. एकान्तवास कितीहि अल्पकालीन असला, तरी तो फार त्रासदायक होतो. मग तो वर्षानुवर्ष चालू राहिला म्हणजे बोलावयालाच नको. मन हलके हलके किडून जातें व वेड लागण्याचा प्रसंग येतो. चेहऱ्यावर शून्यपणा दिसूं लागून, भेदरलेल्या जनावराप्रमाणें कैद्याचे डोळे भासूं लागतात. मनःसामर्थ्याचा भुगाभुगा करणारी व अन्तःकरणाचीं खांडोळीं उडविणारी ही पद्धति आहे. त्यांतून मनुष्य शिरसलामत बचावला, तरीहि तो विचित्र व जगाहून न्यारा असा बनून बाहेर पडतो. मनांत शंका उत्पन्न होते कीं, " हा गृहस्थ खरोखर अपराधी होता कीं नाहीं ?" हिंदुस्थानांतील पोलिसांबद्दल आधींच वाटत असलेला संशय राजकीय कैद्यांच्या बाबतींत तर द्विगुणितच होतो.

युरोपियन अथवा युरेशियन कैद्यांचा गुन्हा कसलाहि असो, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा कोणत्याहि दर्जाची असो, त्यांना सरळ वरिष्ठ वर्गांत घालण्यांत येतें. चांगलें अन्न, हलकें काम, अधिक भेटी व पत्रें, अशी त्यांची व्यवस्था असते. दर आठवड्यास पाद्री येतो, त्याच्या द्वारां जगांतील बातम्या त्यांना मिळत राहतात. पाद्री महाशय बरोबर सचित्र व विनोदी वृत्तपत्रेंहि कांखोटीस मारून आणतात व जरूर तर कैद्यांच्या कुटुंबांना निरोप वगैरेहि पोंचवितात.

युरोपियन कैद्यांचा कोणालाहि हेवादावा वाटणार नाहीं; कारण त्यांना मिळतात त्या सवलतीदेखील क्षुद्रच आहेत. पण युरोपियनेतर स्त्री-पुरुषांच्या बाबतींत साध्या माणुसकीची सुद्धां वाण असावी, ही दुःखदायक गोष्ट आहे. कैद्याला मानवी व्यक्ति असें समजण्यांत येत नाहीं व मानवी व्यक्ति म्हणून स्त्री-पुरुष कैद्यांना वागवण्यांतहि येत नाहीं. राजसत्तेच्या अंमलबजावणी खात्याच्या पराकाष्ठेच्या अमानुष दडपशाहीचें प्रदर्शन तुरुंगांत पाहावयास सांपडतें. विचार न करतां, दयामाया न ठेवतां, आपल्या तावडींत सापडेल त्यांचीं हाडें मोडून त्यांचे पीठ करीत हें यंत्र फिरत राहतें. तें तसें फिरत रहावें या उद्देशानेंच तुरुंगाचे नियम बसविलेले असतात. भावनाशील स्त्री-पुरुष असल्या यंत्राच्या कचाट्यांत सांपडले, कीं त्यांचीं अंतःकरणें पोळलीं जातात, कुस्करलीं जातात. या जीवनाच्या रुक्षतेला कंटाळून विटून गेलेले दीर्घकालीन कैदी एकाद्या लहान मुलाप्रमाणें ढसढसा रडतांना मीं पाहिलेले आहेत. या वातावरणांत दुर्मीळ असणारा सहानुभूतीचा व उत्तेजनाचा एकादा शब्द जरी त्यांच्या कानीं पडला, तरी त्यांचे चेहरे आनंदानें व कृतज्ञतेनें फुलून जातात.

पण असल्या मारक वातावरणांत वावरणाऱ्या कैद्यांच्या मनांत सुद्धां नांदणारी मैत्री व दानत पाहिली कीं मात्र आश्चर्य वाटतें. १३ वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर एका आंधळ्या कैद्याची सुटका झाली; परंतु बाहेर पडतांना त्याच्याजवळ सुतळीचा तोडा देखील नव्हता. जगांत कोणी मित्रहि उरले नव्हते. त्याच्या कैदी बंधूंची खूप इच्छा कीं आपण त्याला मदत करावी; पण ते कितीशी मदत करूं शकणार? कोणी त्याला आपला सदरा दिला, कोणीं दुसरें कांहीं दिलें. त्याच दिवशीं सकाळीं एका कैद्याला नवीन चप्पल जोडी मिळाली, तेव्हां ती त्यानें मला मोठ्या अभिमानानें दाखविली. तुरुंगांत चप्पल जोडी मिळणें म्हणजे मोठ्या भाग्याची गोष्ट. परंतु हा म्हातारा आंधळा अनवाणी जाणार असें पाहून त्यानें आपल्या नव्या कोऱ्या चपला त्याला देऊन टाकल्या. "तुरुंगाच्या आंत बाहेरच्यापेक्षांहि अधिक दयाळू माणसें आहेत म्हणावयाचीं," असा विचार माझ्या मनांत आला.

अनेक अनपेक्षित व स्फूर्तिदायक प्रसंगांनीं तें साल भरून गेलें होतें. परंतु जनतेच्या मनांत चैतन्य खेळवण्याची जी शक्ति गांधीजींच्या ठिकाणीं दिसून आली, तिनें मला सर्वांत अधिक आश्चर्य वाटलें. मोहिनी विद्येचाच मासला त्या वेळीं पहावयास सांपडला व त्यांच्यासबंधीं गोखल्यांनीं काढलेल्या उद्गारांची आठवण झाली. गोखले म्हणाले होते कीं, मातीच्या गोळ्याला शूराचें कार्य करावयाला लावील अशी शक्ति गांधीजींच्या अंगीं आहे. राष्ट्राचें ध्येय कायदेभंगानें मिळेल असा आत्मविश्वास देशाला वाटूं लागला व आम्ही यशाची वाट चालूं लागलों अशी आमच्या शत्रु-मित्रांची कल्पना झाली. चळवळींत भाग घेत होते त्यांच्याच मनांत नव्हे, तर कैद्यांच्या मनांतहि रोमांचकारी सुखस्वप्नें तरगूं लागलीं व 'हें आलेंच स्वराज्य' असें साधे कैदी देखील म्हणूं लागले. स्वराज्यांत आपलें कांहीं तरी भलें होईल अशा

स्वार्थी बुद्धीनेंच ते स्वराज्याची वाट पाहत होते. लहान सहान अधिकाऱ्यांची मात्र त्या वेळीं थोडी तारांबळ उडाली.

तुरुंगांत आम्हाला फक्त एक हिंदी साप्ताहिक मिळत असे. पण त्यांतल्या तुटपुंज्या बातम्या वाचून देखील आमच्या डोक्यांत कल्पनांचे कल्लोळ उठावयाचे. दररोज लाठीहल्ले, कधीं कधीं होणारे गोळीबार, राष्ट्रीय निशाण नेल्याबद्दल सोलापूर येथें लष्करी अंमलांत झालेल्या दहा-दहा वर्षांच्या शिक्षा ! आमच्या देशबांधवांचें व विशेषत: आमच्या भगिनींचे आम्हाला विशेष कौतुक वाटे. माझ्या आईचें, पत्नीचें व बहिणींचें आणि त्याचप्रमाणें माझ्या कित्येक चुलत बहिणींचें व मैत्रिणींचें कार्य पाहून माझ्या मनाला फार समाधान होई. तुरुंगांत असल्यामुळें मी शरीरानें त्यांच्यापासून दुरावलों असलों, तरी एका थोर कार्यातील सहकार्याच्या नवीन भावना-बंधानें आम्ही वास्तविक एकमेकांशीं अधिकच निगडित होत चाललों होतों. त्या वेळीं आमचें कुटुंब जणुं कांहीं फार मोठ्या अशा देशव्यापी कुटुंबांत विलीन होऊन गेलें. तथापि त्यामुळें आमच्या कुटुंबांतील जुनें वैशिष्ट्य व परस्पर प्रेम कांहीं नष्ट झालें नाहीं. कमलानें तर मला थक्क करून टाकलें. तिच्या उत्साहाला व तळमळीला भिऊनच दुखणें पळालें असावें ! कसेंहि असो, कांहीं काळ तरी अतिशय दगदग होत असतांहि तिची प्रकृति उत्तम राहिली होती.

दुसरे लोक बाहेर कष्ट व संकटें यांच्याशीं झुंजत असतां माझें तुरुंगांतील जीवन त्या मानानें बरेंच सुखाचें आहे असा विचार मनाला डांचूं लागला. आपण बाहेर समरांगणावर जावें अशी तळमळ मला लागून राहिली होती; पण तें शक्यच नव्हतें. तेव्हां तुरुंगांतील जीवन शक्य तितकें कडक करण्याचा मीं प्रयत्न केला. माझ्या चरख्यावर मी दररोज तीन तास कांतीत बसें. दोन तीन तास नवार विणण्यांत जात. नवारीचें काम मीं मुद्दाम मागून घेतलें होतें. मला त्या कामाची गोडी लागली. त्यांत फारसा त्रासहि पडत नव्हता व विशेष डोकेंफोडहि करावी लागत नव्हती. कामांत मन गुंतून राहिल्यामुळें विचारांचें वादळहि शांत होत असे. मीं पुष्कळसें वाचण्याचा शिरस्ता ठेवला होता. झाडणें, लोटणें, कपडे धुणें वगैरे कामें चालू होतींच. माझी शिक्षा साधी असल्यामुळें मीं आवड म्हणूनच काम पत्करलें होतें.

अशा प्रकारें जेलमधील दैनंदिन काम व बाहेरच्या जगासंबंधीं विचार यांच्यांत नैनी तुरुंगांतील आयुष्य व्यतीत होत होतें. तुरुंगाचें निरीक्षण केल्यावर मला असें आढळून आलें कीं, ब्रिटिश सरकारची राज्यपद्धति व येथील कार्यपद्धति ह्यांत फारसा फरक नाहीं. सरकारी खातीं कर्तबगार असल्यामुळें देशावर सरकारी पक्कड कायम राहत असली, तरी देशांतील जनतेची काळजी त्यांना मुळींच वाटत नाहीं. तुरुंगांतील व्यवस्थादेखील बाह्यत: चोख असल्याचें आढळून येईल. परंतु कैदी म्हणून आंत येणाऱ्या व्यक्तीला आपण सुधारलें पाहिजे, याची दखलगिरी

कोणालाहि असल्याचें दिसून येत नाहीं. कैद्यांची हड्डी नरम करावी ही एकच कल्पना तेथें दृढमूल झालेली आहे. तुरुंगाचें नियंत्रण कोणत्या प्रकारें करण्यांत येतें ? कैद्यांना कोणत्या मार्गानें शिस्त लावण्यांत येते ? त्यांना शिक्षा काय होतात ? कैद्यांपैकींच कांहीं जणांना वॉर्डर व पहारेकरी बनवतात. भीतीमुळें व माफीच्या व बक्षिशीच्या आशेनें ते अधिकाऱ्यांबरोबर सहकार्य करूं लागतात. बिगरकैदी व पगार देऊन ठेवलेले असे वॉर्डर फारच थोडे आहेत. एकमेकांवर पाळत ठेवण्याची व चहाडखोरीची संवय तुरुंगामध्यें बोकाळल्याचें आढळतें. कोणतेंहि काम एकदिलानें अथवा सांघिक रीतीनें करण्याची तुरुंगांत मोकळीक असत नाहीं. ह्याचें कारण सहज समजण्यासारखें आहे. कैद्यांत फाटाफूट असली, म्हणजे त्यांना काबूंत ठेवणें सोपें जातें.

बाहेरच्या जगांत ह्याच मासला मोठ्या प्रमाणावर चाललेला पहावयास सांपडतो. पण तो तुरुंगांतल्याइतका उघड असत नाहीं. बाहेरच्या वॉर्डर पहारेकऱ्यांचीं नांवें निराळीं असतात. त्यांच्या पदव्या मोठ्या भरदार व त्यांचे दरबारी पोषाख अधिक रुबाबदार असतात. तुरुंगांतल्याप्रमाणेंच त्यांच्याहि मागें त्यांचे हुकुम मान्य करावयास लावण्यासाठीं सशस्त्र राजदूत असतातच.

आधुनिक राजयंत्राला तुरुंग ही किती अत्यावश्यक संस्था होऊन राहिली आहे ! हा विचार निदान कैद्याच्या मनांत तरी खास येऊं लागतो आणि तुरुंग, पोलिस व सैन्य या महत्त्वाच्या खात्यांच्या मानानें सरकारचीं दुसरीं खातीं अगदीं क्षुल्लक वाटूं लागतात व राजसत्ता ज्या गटाच्या आधीन असेल, त्याच्या हुकुमांची तामिली जबरदस्तीनें करून घेण्याचें दंडसाधन म्हणजेच राज्ययंत्र हा मार्क्सचा सिद्धांत तुरुंगांत पटूं लागतो.

एक महिनापर्यंत माझ्या बराकींत मी एकटाच होतों. नंतर नर्मदाप्रसाद सिंह नांवाचे एक गृहस्थ तेथें आले. ते माझे मित्र होते. जूनच्या शेवटच्या दिवशीं आमच्या लहानशा आवारांत मोठी धामधूम उडाली. कांहीं कल्पना नसतां सकाळीं पाहतों तों वडील व डॉ. सय्यद महमूद तेथें आलेले. उठण्यापूर्वीं अंथरुणांत असतांनाच त्यांना आनंदभुवनांत गिरफदार करण्यांत आलें होतें.

# ३१

# येरवडा तुरुंगांतील वाटाघाटी

वडिलांना अटक झाली त्याच वेळीं किंवा त्याच्या जरा आधीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीला बेकायदा ठरविण्यांत आलें. त्यामुळें कमिटीची बैठक भरली कीं त्यांतील सर्वच सभासदांची मोट सरकार एकदम बांधणार असा प्रसंग येऊन ठेपला. कार्यकर्त्या अध्यक्षानें आपल्या अधिकारांत बदली सभासद नेमावे अशी व्यवस्था लावून दिलेली होती. त्या काळांत अनेक स्त्रिया वर्किंग कमिटीच्या सभासद झाल्या. कमलादेखील एकदां वर्किंग कमिटीची सभासद झाली होती.

तुरुंगांत आले तेव्हां वडील अगदीं क्षीण झालेले दिसले. त्यांची तुरुंगांत ठेवण्यांत आलेली व्यवस्थाहि अगदीं गैरसोयीची होती. सरकारनें तसें मुद्दामच केलें होतें असें नाहीं. आपणाकडून होईल ती व्यवस्था करण्याची अधिकाऱ्यांची तयारी होती. पण नैनीच्या तुरुंगांत ते तरी काय करणार? आम्ही चौघेजण बराकीच्या चार खोल्या धरून राहिलों होतों. तुरुंगाच्या दुसऱ्या एकाद्या भागांत वडिलांना ठेवावें म्हणजे त्यांना अधिक प्रशस्त जागा मिळेल असें सुपरिंटेंडंटनें सुचवलें, पण वडिलांजवळ आमच्यापैकीं कोणी तरी असणें जरूर वाटल्यामुळें अडचण सोसून देखील आम्हीं एकत्रच राहण्याचें पसंत केलें.

पाऊसकाळाला नुकती कोठें सुरुवात होती. छप्पर ठिकठिकाणीं गळत असल्यामुळें खोलीच्या आंत बसून मुद्दां अंग कोरडें ठेवणें कठिण झालें होतें. आमच्या खोलीला जोडून असलेल्या १०-५ च्या व्हरांड्यांत रात्रीं वडिलांचा बिछाना कोठें घालावा अशी पचाईत पडे. केव्हां केव्हां त्यांना ताप येई. शेवटीं आणखी एक चांगला प्रशस्त व्हरांडा बांधण्याचें तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं ठरविलें व ठरविल्याप्रमाणें तो बांधूनहि दिला. पण व्हरांड्याचें काम संपतें न संपतें तोंच वडिलांची सुटका झाल्याकारणानें त्यांना त्याचा फायदा फारसा झालाच नाहीं. नंतर आम्हीं मात्र त्याचा यथास्थित उपयोग करून घेतला.

सरकार व कॉंग्रेस यांमध्यें समेट घडवून आणण्याचा सर सप्रू व श्री. जयकर यांचा प्रयत्न चालू आहे, अशा बातम्या जुलैअखेर सारख्या येत होत्या. त्यांची व व्हाइसरॉयची पत्रोत्तरें वडिलांना खास सवलत म्हणून मिळत असलेल्या दैनिकांत आम्हीं वाचलीं. हे "शांतिदूत" गांधीजींना भेटून आल्याचें वृत्तहि समजलें. असले प्रयत्न करण्याची प्रेरणा त्यांना कोठून मिळाली, त्यांचा हेतु काय, वगैरेची

आम्हांला कांहींच कल्पना येईना. नंतर त्यांच्याच तोंडून आम्हांला समजलें कीं, अटक होण्यापूर्वी मुंबईंत असतांना वडिलांनीं एक लहानसें पत्रक काढलें होतें, त्यामुळें त्यांना समेटाची आशा वाटूं लागला. हें पत्रक लंडन डेली हेरल्डचे बातमीदार स्लोकंब यांनीं वडिलांच्या मुलाखतीनंतर लिहून काढलें होतें व त्यासाठीं वडिलांची मान्यताहि मिळविली होती. सरकारनें अमुक इतक्या अटी मान्य केल्या तर काँग्रेस कायदेभंग कदाचित् थांबवील, असें त्या पत्रकांत म्हटलें होतें. पत्रकाचें स्वरूप संदिग्ध व जुजबी असें होतें, व गांधीजींशीं व माझ्याशीं मुलाखत झाल्याशिवाय त्या पत्रकांतील अटी विचारांत घेतां येणार नाहींत, असा खुलासा वडिलांनीं पत्रकांत स्पष्टपणें करून ठेविला होता. मी काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून माझा त्यांत संबंध आला. गैरसमज पसरेल असें संदिग्ध पत्रक घाईघाईनें प्रसिद्ध केल्याबद्दल वडिलांनीं नैनी येथें आल्यावर खेद प्रदर्शित केल्याचें मला स्मरतें. पत्रकामुळें गैरसमज झाला याबद्दल शंकाच नाहीं. अगदीं निःसंदिग्ध शब्दांचे सुद्धां विपरीत अर्थ आपल्या-पेक्षां भिन्न विचारसरणीच्या लोकांकडून केले जातात; मग ह्या पत्रकाची गोष्ट कशाला?

सर तेजबहादूर सप्रू व जयकर हे २७ जुलै रोजीं नैनी येथें अभावितपणें आमच्या भेटीला आले. खिशांत गांधीजींची चिठी घेऊनच ते आले होते. त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं त्यांच्याबरोबर खूप चर्चा झाली. वडिलांच्या अंगांत ताप असल्यामुळें चर्चेनंतर त्यांना फार थकवा वाटूं लागला. आमच्या राजकीय दृष्टि-कोणांत एवढें महदंतर होतें, कीं तेच मुद्दे आम्ही फिरफिरून मांडीत होतों, पण परस्परांना एकमेकांची भाषा तरी कळत होती कीं नाहीं याची शंकाच आहे. आहे या परिस्थितींत सरकार व काँग्रेस यांच्यांत तडजोड होण्याचा काडीइतकाहि संभव नाहीं ही गोष्ट उघडच दिसत होती. वर्किंग कमिटीवरील आमच्या सहकाऱ्यांशीं व विशेषतः गांधीजींशीं बोलणें झाल्याशिवाय कोणतीहि सूचना करण्यास आम्ही तयार नव्हतों. गांधीजींना आमचा हा मानस आम्हीं पत्रद्वारें कळवून ठेवला.

अकरा दिवसांनंतर म्हणजे ८ ऑगस्ट रोजीं व्हाइसरॉयचें उत्तर घेऊन डॉ. सप्रू पुनः आमच्या भेटीला आले. आम्हांला गांधीजींना भेटूं देण्यास त्यांची हरकत नव्हती. पण बाहेर सरकारविरोधी मतप्रचार प्रत्यक्ष करीत असलेल्या सरदार वल्लभभाई, अबुल कलम आझाद वगैरे वर्किंग कमिटीच्या सभासदांची भेट घेण्याची परवानगी देण्यास मात्र व्हाइसरॉय व त्यांचें कौन्सिल तयार नव्हतें. गांधीजींची भेट घेण्यास आम्ही केव्हांहि तयार आहोंत, पण इतर सभासदांची भेट होत नसल्यामुळें कोणताहि निश्चयात्मक निर्णय घेतां येणार नाहीं असें आम्हीं कळविलें. त्या दिवशींच्या कीं आदल्या दिवशींच्या वृत्तपत्रांत मुंबईला भयंकर लाठीहल्ला झाल्याची व वल्लभभाई पटेल, मालवीय व शेरवानी यांना अटक केल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. ह्या प्रसंगामुळें राजकीय वातावरण निवळण्याच्या कामीं मदत झालेली नाहीं असें तुम्हीं व्हाइसरॉयला स्पष्ट कळवावें, असेंहि आम्हीं डॉ. सप्रूंना बजावलें.

पण शक्य तितक्या लवकर गांधीजींची भेट घेण्यांत कोणताच तोटा नाहीं असें त्यांचें म्हणणें पडल्यामुळें आम्ही कबूल झालों.

दहा आगस्टला आम्हां त्रिवर्गांना—वडील, महमूद व मी—खास गाडीनें पुण्याला पाठविण्यांत आलें. मोठमोठ्या स्टेशनांवर मुळींदेखील न थांबतां गाडी आड स्टेशनवर उभी राहत असे. तरीहि आमच्या प्रवासाची बातमी अगोदरच जाऊन थडकली होती व आम्हां थांबलों न थांबलों तरी स्टेशनवरून लोकांची गर्दी होतच असे. ११ तारखेला रात्रीं बऱ्याच उशिरा आम्ही खडकीला पोंचलों.

गांधीजींच्याच बराकींत आम्हांला ठेवतील, निदान त्यांची आमची भेट तरी लवकर होईल अशी आमची अपेक्षा होती. येरवड्याच्या सुपरिंटेंडटनें व्यवस्थाहि तशीच केली होती; पण नैनीहून आमच्याबरोबर आलेल्या पोलिस अधिकाऱ्या-मार्फत मिळालेल्या हुकुमावरून बेत बदलण्यांत आला. सुपरिंटेंडट ले. क. मार्टिन या गुप्त मसलतीचा दाद लागूं देईना. पण वडिलांनीं चारदोन मार्मिक प्रश्न टाकतांच इतका उलगडा झाला, कीं आमची व गांधीजींची पहिली भेट तरी निदान जयकर व सप्रूंच्या अपरोक्ष होऊं नये अशी सरकारची इच्छा होती. आधींच भेट झाली तर आम्ही अधिकच अडून बसूं व एकोप्यानें काम करूं अशी सरकारला भीति वाटली असावी. ती रात्र व दुसरा सबंध दिवस आम्हांला स्वतंत्र बराकींत ठेवण्यांत आलें. वडिलांच्या अगाचा अगदीं तिळपापड झाला. गांधीजींना भेटण्यासाठीं नैनीहून इतक्या लांबवर आलों आणि आतां गांधीजींपासून चार हातांवर राहूनहि त्यांची भेट होईना! १३ तारखेला दुपारीं सप्रू व जयकर आले आहेत व त्यांच्यांसह गांधीजी कचेरींत बसले आहेत, तेव्हां आम्हींहि तिकडे जावें असें सांगण्यांत आलें. वडिलांनीं चक्क नकार दिला. पण अधिकाऱ्यांनीं अनेक प्रकारें स्पष्टीकरण केल्यावर आणि दिलगिरी प्रदर्शित केल्यावर ते कबूल झाले. पण तेहि एका अटीवर कीं, प्रथम गांधीजी आम्हांला एकटेच भेटले पाहिजेत. वल्लभभाई पटेल व जयरामदास दौलतराम येरवड्यास होते व समोरच स्त्रियांच्या तुरुंगांत सरोजिनी नायडू होत्या, त्यांना आम्हां सर्वांच्या विनंतीवरून चर्चेसाठीं बोलावून घेण्यांत आलें. त्या दिवशीं संध्याकाळपासून मात्र आम्हांला गांधीजींच्या आवारांतच ठेवण्यांत आलें. चर्चा करण्यास सोपें जावें म्हणून नंतरचे कांहीं दिवस वल्लभभाई, जयरामदास वगैरे आम्ही सर्वच मंडळी तेथें एकत्र राहत होतों.

सप्रू व जयकर यांच्याशीं तारीख १३, १४ व १५ रोजीं आमच्या मुलाखती झाल्या, व कायदेभंग थांबवण्यासाठीं व सरकारशीं सहकार्य करण्यासाठीं आवश्यक त्या किमान मागण्या आम्हीं पत्रद्वारा नमूद करून ठेवल्या. हीं पत्रें पुढें वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलीं.

त्या मुलाखतीचा वडिलांना बराच त्रास होऊन १६ तारखेला त्यांना एकाएकीं बराच ताप आला, त्यामुळें आमचें जाणें थांबलें. शेवटीं १९ तारखेला रात्रीं

आम्ही नैनीला निघालों. वडिलांना प्रवास सुखाचा व्हावा म्हणून मुंबई सरकारनें सर्व प्रकारें काळजी घेतली. येरवड्यांतील चारसहा दिवसांच्या अवधींत तर त्यांना सुख व्हावें, म्हणून फारच दक्षता राखण्यांत आली होती. येरवड्याला आम्ही पोंचलों त्या रात्रीं घडलेला एक मनोरंजक प्रसंग मला आठवतो. कोणत्या प्रकारचें जेवण आपण घ्याल असें कर्नल मार्टिन यानें वडिलांना विचारलें. मी अगदीं साधें व हलकें अन्न घेतों असें उत्तर देऊन सकाळच्या चहापासून तों तहत रात्रीच्या जेवणापर्यंतच्या आपल्या सर्व गरजा त्यांनीं कर्नल मार्टिन ह्यांना सांगितल्या. ( नैनी येथें आम्ही घरचेच अन्न मागवीत होतो. ) अगदीं सहज म्हणून वडिलांनीं सांगितलेले यादींतील अन्नाचे प्रकार पचनाला हलके असले, तरी त्यांचीं नांवें ऐकून कोणालाहि आश्चर्य वाटलें असतें. रिट्झ अथवा सॅव्हॉयसारख्या हॉटेलमध्यें अशा अन्नाची गणना कदाचित् साध्या अन्नांत झाली असती, पण येरवड्याच्या तुरुंगांत हीं नांवें फारच अपरिचित, उच्च व तुरुंगांतील परंपरेला न झेपणारीं अशीं वाटल्यास नवल नाहीं. वडिलांची यादी ऐकून कर्नल मार्टिन यांनीं असा कांहीं चेहरा केला कीं तो पाहून महमूद यांना व मला फार मौज वाटली. हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ व अत्यंत थोर अशी व्यक्ति मार्टिन यांच्या ताब्यांत कित्येक दिवसपर्यंत होती; पण शेळीचें दूध, खजूर व क्वचित् प्रसगीं संत्रीं एवढें मिळालें कीं तिचें काम भागत असे. पण हा नवा आलेला पुढारी मात्र कांहीं औरच आहे असें त्यांना वाटलें असेल.

नैनीला परत जातांना आम्ही आलों तसेच गेलों. तरी मोठमोठ्या स्टेशनांच्या फ्लाटांवर व केव्हां केव्हां तर रेल्वेच्या रुळांवरहि माणसांची गर्दी जमलेली होतीच. असे प्रकार हर्दा, इटारसी व सोहागपूर येथें घडले. थोडक्यांत निभावलें, नाहीं तर अपघातच व्हावयाचे.

वडिलांची प्रकृति झपाट्यानें खालावत चालली होती. त्यांच्या खास डॉक्टरांकडून त्यांना तपासण्यांत आलें. प्रांतिक सरकारनेंहि आपले डॉक्टर पाठविले होते. तुरुंगाचें वातावरण त्यांना मुळींच मानवत नाहीं व तेथें योग्य तें औषधपाणी होणें शक्य नाहीं हें उघडच दिसत होतें. परंतु आजारी असल्यामुळें त्यांना सोडण्यांत यावें अशी सूचना एका मित्रानें वर्तमानपत्रांत केली होती ती वाचून मात्र त्यांना राग आला. आपणच या सूचनेच्या बुडाशीं आहों असा तर्क लोक करतील असें त्यांना वाटलें, आणि मेहेरनजर म्हणून आपल्याला सोडण्यांत येऊं नये अशा अर्थाची तारसुद्धां त्यांनीं लॉर्ड अर्विन ह्यांना केली: पण त्यांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत चालली होती. त्यांचें वजन भराभर उतरत असून शरीर अत्यंत कृश झालें होतें. बरोबर दहा आठवडे तुरुंगांत काढल्यावर त्यांना सोडून देण्यात आलें.

ते गेल्याबरोबर आमच्या बराकींतला सर्व आनंद नष्ट होऊन बराक सुनी दिसूं लागली. ते होते तेव्हां त्यांना सुख वाटावें म्हणून बारीकसारीक किती तरी गोष्टी

आम्हां तिघांना कराव्या लागत व त्या उरकीत असतां आमचा वेळ मोठ्या आनंदांत जाई. नवार विणणें मीं बंद केलें होतें. मी फारसें सूतहि कांतीत नव्हतों. पुस्तकांकडे लक्ष देण्यास मला फारसा वेळच मिळत नसे. पण वडील गेल्यावर आम्हीं आपापलीं कामें मोठ्या जड अन्तःकरणानें पुनः हातीं घेतलीं. ते गेले तसें दैनिक वृत्तपत्रहि बंद झालें. चारपांच दिवसांनंतर माझा मेहुणा रणजित एस. पंडित याला अटक करण्यांत येऊन शिक्षा झाली. त्याला आमच्याच बराकींत पाठविण्यांत आलें.

११ ऑक्टोबर रोजीं सहा महिन्यांची शिक्षा संपून मी सुटलों. चळवळीचें स्वरूप अधिकच तीव्र झालें असल्यामुळें मला फार वेळ बाहेर मोकळीक मिळणार नाहीं ह्याची मला कल्पना होती. सर सप्रू व जयकर यांची शिष्टाई व्यर्थ ठरली होती. मी सुटलों त्याच दिवशीं दोन नवे वटहुकुम जाहीर झाले. मला मिळणाऱ्या फुरसदीच्या अल्प काळांत कांहीं तरी परिणामकारक असा कार्यक्रम करावा अशी मला उत्सुकता लागली होती.

कमला त्या वेळीं अलाहाबाद येथेंच कॉंग्रेसच्या कामांत गढून गेली होती. उपचारासाठीं वडील मसुरीला जाऊन राहिले होते. आई व बहिणी त्यांच्याच-जवळ होत्या. कमलेसह मसुरीला जाण्यापूर्वी एक दीड दिवस मी अलाहाबादेस राहिलों. तो सगळा वेळ अतिशय कामांत गेला. आमच्यापुढें मुख्य प्रश्न होता तो असा कीं, करबंदीची चळवळ खेड्यांतून सुरू करावी कीं नाहीं? खंड व सारा भरण्याचे दिवस डोक्यावर येऊन ठेपले होते. धान्याच्या किंमती कमालीच्या घटल्यामुळें सारा देणें फार जड होणार हें दिसतच होतें. जागतिक मंदीची लाट हिंदुस्थानपर्यंत पोंचल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

करबंदीची चळवळ सुरू करण्यास अगदीं उत्कृष्ट अशी ही घटका होती. त्या वर्षीच्या उत्पादनांतून खंड अगर सारा देणें कुळांना अथवा जमीनदारांना सारखेंच जिकिरीचें होणार होतें. जवळ शिल्लक असेल तर ती खर्चून टाकावी अथवा कर्ज काढावें असा प्रसंग आला होता. जमीनदारांपाशीं कांहीं ना कांहीं तरी शिल्लक असे. कर्जसुद्धां त्यांना सहजगत्या मिळालें असतें. पण नेहमीच दारिद्र्याच्या शेजारांत वाढलेल्या खंडकऱ्यांपाशीं शिल्लक कोठली ! कोणत्याहि लोकशाहीच्या राष्ट्रांत अगर व्यवस्थितपणें संघटित झालेल्या शेतकऱ्यांच्या देशांत असा जुलूम शेतकऱ्यांवर होणें शक्य झालें नसतें. परंतु हिंदुस्थानांत शेतकऱ्यांच्या शब्दाला कांहींच किंमत नव्हती. कोठें कोठें कॉंग्रेस त्यांच्या बाजूनें नेट धरी, क्वचित् प्रसंगीं जुलुम असह्य झाला तर शेतकरी बंड करतील अशी भीति वाटे, एवढाच काय तो शेतकऱ्यांचा दरारा. ब्रहि न उच्चारतां पडेल तेवढा भार सहन करण्याचें बाळकडू आज पिढ्यान् पिढ्या त्यांना देण्यांत आलें होतें. गुजरातमध्यें व कांहीं प्रांतांतून त्या वेळीं करबंदीची चळवळ सुरू होती; पण तिचें स्वरूप उघडपणें राजकीय होतें. कायदेभंगाच्या चळवळीचाच एक प्रकार म्हणून ती सुरू करण्यांत आली होती. रयत-

वारी पद्धति तेथें अमलांत असल्यामुळें करबंदी सुरू झाली कीं रयतेचा सरकारशींच साक्षात् संबंध येई. पण जमीनदारी व तालुकदारी असल्यामुळें संयुक्त प्रांतांतील परिस्थिति भिन्न होती. कुळांनीं खंड नाकारला कीं पहिला धक्का ताबडतोब जमीनदाराला बसून वर्गस्वरूपाचा प्रश्न उद्भवणार होता. कॉंग्रेस ही राष्ट्रीय संस्था होती व तिच्यांत लहान-मोठ्या बऱ्याच जमीनदारांनाहि स्थान होतें. वर्गकलह उत्पन्न करण्याची अथवा जमीनदार वर्गाला दुखवण्याची कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना फार भीति वाटत असे. म्हणून कायदेभंगाच्या पहिल्या सहामाहींत परिस्थिति अनुकूल असूनहि सार्वत्रिक करबंदीची घोषणा करण्याचें त्यांनीं टाळलें. अशा प्रकारें अथवा अन्य तऱ्हेनें वर्गकलह उत्पन्न करण्याची मला भीति वाटत नव्हती. परंतु कॉंग्रेसचें स्वरूप लक्षांत घेतां वर्गकलहाला उत्तेजन देणें शक्य होणार नाहीं हें मी जाणून होतों. जमीनदार व कुळें या दोघांनींहि खंड व सारा नाकारावा असें मात्र कॉंग्रेसला म्हणतां आलें असतें. नंतर कॉंग्रेसच्या आज्ञेविरुद्ध बहुधा सर्व जमीनदारांनीं सारा देऊन टाकलाच असता; पण तो प्रश्न वेगळा.

ऑक्टोबरांत मी तुरुंगांतून बाहेर आल्यावर खेड्यांतून करबंदीची चळवळ सुरू करण्याची अतिशय आवश्यकता आहे असें मला आढळून आलें. शेतकऱ्यांची आर्थिक दुरवस्था कोणालाहि दिसण्यासारखी होती. राजकीय दृष्टया आमची कायदेभंगाची चळवळ जराशी शिळी भासूं लागली होती. थोड्याफार प्रमाणांत लोक तुरुंगांत जात असले, तरी वातावरणांतील पहिली हिरीरी नाहींशी झाली असून हरताळ-मिरवणुकींना मध्यमवर्गीय लोक कंटाळले होते व नव्या चैतन्याची, ताज्या रक्ताची वाण भासत होती. आणि शेतकऱ्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं तें उपलब्ध होणार ! तेथील जमीन अद्यापि पड होती: त्यांत रुजलेल्या चळवळीचा जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांशीं संबंध येऊन तिला प्रचंड स्वरूप प्राप्त झालें असतें. त्यांतल्या त्यांत अशा चळवळीमुळें सामाजिक प्रश्न धसाला लागले असते, ही माझ्या मतें महत्त्वाची बाब होती.

दोन दिवसांत या प्रश्नांचा माझ्या सहकाऱ्यांबरोबर मीं खल केला. आमच्या प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची तांतडीची बैठक बोलावण्यांत आली व खूप ऊहापोह होऊन करबंदीची चळवळ ज्या जिल्ह्याची तयारी असेल तेथें ती सुरू करण्याची अनुमति देण्याचें ठरलें. प्रांतांतील अमुक एका ठिकाणीं करबंदी सुरू करण्यांत येईल, असें आम्ही आमच्याकडून घोषित केलें नाहीं, व वर्गकलह टाळतां आला तर पहावा म्हणून जमीनदार व कुळें या दोघांनींहि करबंदीची चळवळ करावी असा कार्यकारी मंडळानें ठराव केला. तथापि या ठरावाला कुळांकडूनच मुख्यतः पाठिंबा मिळणार अशी आमची अटकळ होतीच.

पुढें पाऊल टाकण्याची परवानगी मिळाल्याबरोबर पहिलें पाऊल आपण उचला-वयाचें असें अलाहाबाद जिल्ह्यानें ठरविलें. एका आठवड्यानें जिल्ह्यांतील

शेतकऱ्यांची परिषद भरून नव्या मोहिमेला चालना देण्यांत यावी असें ठरलें. तुरुंगांतून सुटल्याबरोबर पहिल्या दिवसाचा हिशोब आपण चोख रीतीनें दिला असें समाधान मला वाटत होतें. त्याच दिवशीं अलाहाबादेंत एका मोठया सभेमध्यें मीं करबंदी-संबंधीं सविस्तर असें भाषण केलें, व याच भाषणाकरतां मला नंतर शिक्षा झाली.

यानंतर कमला व मी मसुरीला तीन दिवस वडिलांकडे गेलों. त्यांची प्रकृति नुकतीच सुधारूं लागली होती. संकट टळून त्यांना आराम पडूं लागला, हें पाहून मला आनंद झाला. शांति व सुख यांनीं भरलेल्या वातावरणांत घालवलेले ते तीन दिवस मला अजूनहि स्मरतात. मी पुनः आपल्या माणसांत आलों, त्यामुळें मला किती तरी समाधान वाटत होतें. माझी मुलगी इंदिरा व माझ्या तीन लहान भाच्या तेथेंच होत्या. मी या मुलांशीं खेळत असे. व कधीं कधीं घराभोंवतीं आमची मोठी गंभीर अशी मिरवणूक निघे. सर्वांत लहान मुलगी हातांत निशाण घेऊन पुढें चालावयाची व बाकीच्या तीनचार जणींनीं " झेंडा ऊंचा रहे हमारा " हें पद म्हणावयाचें. काळाचा झडप वडिलांवर पडण्यापूर्वीं त्यांच्या सहवासांत घालविलेले हे अखेरचेच तीन दिवस.

मला लवकरच पुनः पकडण्यांत येणार, तेव्हां माझा शक्य तेवढा अधिक सहवास घडावा असें मनांतून वाटत असल्यामुळेच बहुधा अलाहाबादला परत फिरण्याचा बेत वडिलांनीं एकाएकीं केला असावा. १७ आक्टोबरच्या शेतकरी परिषदेस हजर राहतां यावें म्हणून कमला व मी जरा आधीं निघालों.

प्रवासांत बऱ्याच विलक्षण गोष्टी घडल्या. डेहराडूनला क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या १४४ कलमान्वयें माझ्यावर हुकुम बजावण्यांत आला. लखनौला आम्ही कांहीं तास थांबलों होतों, तेथेंहि १४४ कलमाखालीं एक हुकुम माझ्यावर बजावण्यांत येणार होता असें कळलें. परंतु माणसांची अतोनात गर्दी असल्यामुळें माझ्याजवळ फिरकण्यास पोलिस-अधिकाऱ्यांना सवडच सांपडली नाहीं. तेथें म्युनिसिपालिटीनें मला मानपत्र अर्पण केलें व नंतर अलाहाबादेस जाण्यासाठीं आम्ही मोटरनें निघालों. शेतकऱ्यांच्या सभा वाटेंत ठिकठिकाणीं भरल्या होत्या तेथें थांबत थांबत १८ तारखेच्या रात्रीला आम्ही अलाहाबादला पोंचलों.

१९ तारखेला सकाळीं १४४ कलमाप्रमाणें आणखी एक हुकुम माझ्यावर बजावण्यांत आला. माझी गठडी आंवळण्यासाठीं सरकार हात धुवून माझ्या पाठीस लागलें आहे हें स्पष्टच झालें. परंतु पुनः पकडला जाण्यापूर्वीं शेतकरी परिषदेस तेवढें हजर राहतां यावें अशी माझी फार इच्छा होती. परिषदेचें स्वरूप सार्वजनिक नसून ही फक्त प्रतिनिधींचीच खाजगी सभा आहे असें आम्हीं जाहीर केलें, व प्रतिनिधींव्यतिरिक्त कोणत्याहि परक्या इसमाचा तेथें प्रवेश होऊं दिला नाहीं. ती अलाहाबाद जिल्ह्याची खरीखुरी प्रातिनिधिक परिषद होती असें म्हणतां येईल; कारण तिला सोळाशें प्रतिनिधी हजर राहिले होते. आमच्या मुख्य कार्यकर्त्यांच्या

मनांत थोडी चलबिचल, हें कार्य यशस्वी होईल किंवा नाहीं याबद्दल थोडासा संदेह उत्पन्न झाला होता. कारण सरकारचें पाठबळ घेऊन जमीनदार हवा तसा धुमाकूळ घालूं लागले, तर त्याचा रयतेला प्रतिकार करतां येणार नाहीं अशी शंका येणें साहजिक होतें. परंतु शेतकऱ्यांचे जे सोळाशें प्रतिनिधी तेथें जमले होते, त्यांच्या मनांत यत्किंचित् देखील संदेह नव्हता. निदान तो दिसून तरी आला नाहीं. ह्या परिषदेंत मींहि भाषण केलें. १४४ कलमाचा त्या भाषणामुळें माझ्याकडून भंग झाला किंवा काय याची मला कल्पना नाहीं.

नंतर वडिलांना व इतर मंडळींना उतरवून घेण्यासाठीं मी तसाच स्टेशनवर गेलों. गाडीला उशीर झाला होता म्हणून मंडळी स्टेशनवर उतरतांच भोंवतालच्या खेड्यांतील शेतकऱ्यांची व शहरच्या लोकांची एक संयुक्त सभा भरणार होती, तिकडे मी निघून गेलों. रात्रीं आठ वाजल्यानंतर कमला व मी घराकडे परत फिरलों. श्रमामुळें आम्ही अगदीं थकून गेलों होतों. वडील घरीं वाट पाहत बसले असतील, ते आल्यापासून त्यांच्याशीं दोन शब्दसुद्धां बोलावयास आपणांला वेळ झाला नाहीं, पण आतां मोकळेपणीं बोलतां येईल असें मनोराज्य चालू होतें; इतक्यांत आमच्या घराजवळच आमची मोटर थांबविण्यांत आली व मला पकडून यमुनेच्या पलीकडे, माझ्या पूर्वीच्या नैनी तुरुंगांतील बराकींत नेण्यांत आलें. ह्या नवीन घटनेची बातमी वाट पाहत बसलेल्या कुटुंबांतील मंडळींना देण्यासाठीं कमला एकटीच आनंदभवनाकडे चालती झाली आणि इकडे नवाच्या ठोक्याबरोबर नैनी तुरुंगाच्या भव्य प्रवेशद्वारांत मीं पाऊल टाकलें.

# ३२

## संयुक्त प्रांतांतील करबंदीचा लढा

आठ दिवसांच्या गैरहजेरीनंतर नैनी तुरुंगांत मी पुनः दाखल झालों. सय्यद महंमद, रणजित पंडित व नर्मदाप्रसाद हे पूर्वीच्याच जुन्या बराकींत होते. तेथेंच मला ठेवण्यांत आलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं तुरुंगांतच माझी चौकशी सुरू झाली. अलाहाबाद येथील भाषणांत आलेल्या अनेक मुद्द्यांबद्दल माझ्यावर बरेच आरोप ठेवण्यांत आले होते. मीं बचाव केला नाहीं. १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाबद्दल मला १८ महिने सक्तमजुरी व पांचशें रुपये दंड अशी शिक्षा झाली. मिठाच्या कायद्यान्वयें सहा महिने व १०० रुपये दंड व १९३० च्या सहाव्या वटहुकुमाप्रमाणें सहा महिने व १०० रुपये दंड अशा शिक्षा देण्यांत आल्या. म्हणजे एकंदर दोन वर्षे सक्तमजुरी व त्याच्या भरीला दंड न दिल्यास पांच महिने शिक्षा मिळाली. ही माझी तुरुंगांतील पांचवी खेप.

माझ्या अटकेमुळें कायदेभंगाची तीव्रता कांहीं काळ अधिक वाढली. अधिक उत्साहानें व नेटानें चळवळीचे काम होऊं लागलें. त्याला वडीलच कारण होते. माझ्या अटकेची बातमी कमलानें त्यांना सांगितली तेव्हां त्यांच्या मनाला जरा धक्काच बसला. परंतु तात्काळ त्यांनीं मन सांवरलें व यापुढें आजारी राहावयाचें नाहीं असा निश्चय आपल्यापुढील टेबलावर मूठ आपटून त्यांनीं व्यक्त केला. आजारी न पडतां पुरुषार्थाला साजेसें काम करण्याचा त्यांनीं निर्धार केला खरा, पण त्यांच्या शरीरांत घर करून राहिलेलें दुखणें त्यामुळें उन्मूलन होणें शक्य नव्हतें. तथापि कांहीं दिवस त्यांच्या प्रकृतींत आश्चर्य वाटण्यासारखी सुधारणा दिसून आली. येरवड्याहून आल्यापासून त्यांच्या थुंकींतून रक्त पडत असे तें हा निश्चय झाल्यावर एकाएकीं बंद झालें. वडिलांनाहि त्यामुळें आनंद होऊन भेटीच्या वेळीं त्यांनीं या गोष्टीचा माझ्यापाशीं थोड्या अभिमानानेंच उल्लेख केला. परंतु दुर्दैव असें कीं, कांहीं दिवसांनंतर रक्त अधिक प्रमाणांत पडूं लागलें. दरम्यानच्या काळांत पूर्वीच्याच नेटानें त्यांनीं काम सुरू केलें होतें, त्यामुळें चळवळीला नवीन हुरूप आला. माझ्या भाषणांतील आक्षेपार्ह भाग सर्व देशभर जाहीर रीतीनें वाचून दाखविण्यासाठीं त्यांनीं एक दिवस मुक्रर केला. ( त्या दिवशीं माझा वाढदिवस येत होता. ) त्या प्रसंगीं अनेक ठिकाणीं लाठीमार झाले, मिरवणुकी व सभा जबरदस्तीनें उधळून

लावण्यांत आल्या, व सुमारें पांच हजार लोकांना अटक करण्यांत आली. माझा त्या वर्षीचा वाढदिवस अशा विलक्षण रीतीनें साजरा झाला !

वडिलांची प्रकृति इतकी अशक्त झाली असतां त्यांनीं अशा जबाबदारीचीं कामें अंगावर घ्यावींत व इतकें अंग मोडून काम करावें हें मला रास्त दिसेना. पण हिंदुस्थानांत कोठेंहि ते असले, तरी चळवळींत चढउतार झाल्याबरोबर त्यांना लक्ष घालावेंसें वाटणार व लोकहि सल्लामसलत घेण्यासाठीं त्यांच्याकडे येत राहणार हें मी ओळखून होतों. तेव्हां त्यांनीं रंगून, सिंगापूर, डच इंडीज इकडच्या बाजूला समुद्रप्रवास करून यावें असें मीं सुचविलें, व त्यांनाहि ती कल्पना पसत पडली. एक डॉक्टर सोबतीला घ्यावयाचा असेंहि मुक्रर झालें. प्रवासाला निघावयाचें म्हणून ते कलकत्त्यापर्यंत गेलेदेखील; पण तेथें प्रकृतींत अधिकच बिघाड झाल्याकारणानें कलकत्त्याच्या उपनगरांत त्यांनीं मुक्काम केला. लवकरच कुटुंबांतील माणसेंहि त्यांना जाऊन मिळालीं. कमला तेवढी अलाहाबादेलाच कॉंग्रेसचें काम करीत राहिली होती.

करबंदीच्या चळवळीसंबंधीं माझा उद्योग सुरू होता म्हणूनच मला पकडण्याची त्वरा करण्यांत आली असावी. पण किसान-प्रतिनिधी अलाहाबादेत असतांना परिषद संपल्याबरोबर त्याच दिवशीं मला पकडण्यांत आल्यामुळें करबंदीच्या चळवळीला जितका जोर चढला तितका जोर मी बाहेर राहूनहि कदाचित् चढला नसता. माझ्या शिक्षेमुळें त्यांचा उत्साह द्विगुणित झाला व परिषदेंत मंजूर झालेले ठराव त्यांनीं खेडोपाडीं नेऊन पोंचविले. एक दोन दिवसांच्या आंत करबंदीची चळवळ सुरू झाल्याचें वृत्त सबंध जिल्हाभर पसरून सगळीकडून मोठ्या आनंदानें चळवळीला पाठबळ मिळूं लागलें.

त्या वेळीं दळणवळणाची अडचण आम्हांला फार भासत असे. आम्ही काय करीत आहों व लोकांनीं काय केलें पाहिजे हें त्यांना कळविण्याचें कांहींच साधन हातीं नव्हतें. सरकार रसातळाला पोंचवील या धास्तीनें वृत्तपत्रें आमच्या बातम्या देत नसत. हस्तपत्रकें व सूचना छापण्यास छापखाने कबूल होत नसत. पत्रें व तारा गडप तरी होत अगर त्यांतील मजकुरांत छाटाछाट तरी होई. विश्वसनीय मार्ग म्हणजे संदेश देऊन हलकारे पाठविणें हा. पण त्यांनाहि कधीं कधीं अटक करीत. शिवाय हो पद्धति खर्चाची होती व तिच्यासाठीं बरीच संघटनाहि करावी लागत असे. तशी संघटना करण्यांत थोडेंफार यश येऊन मुख्य ठिकाण व इतर केंद्रें यांत दळणवळण एकसारखें चालू राहिलें होतें. शहरांत बातमी पसरवणें फारसें कठीण नव्हतें. पुष्कळ शहरांतून अनधिकृत बातमीपत्रें सायक्लोस्टाइलवर छापून वांटण्यांत येत व त्यांना मागणीहि बरीच असे. जाहीर सूचना ढोल वाजवून दिल्या जात. पण ढोलक्याला बहुधा तुरुंगांत जावें लागे. पण तुरुंगांत जावयाची

तयारी असल्यावर अटकेची भीति वाटण्याचें कारण काय? जासुदांमार्फत खेड्यांशीं पोंच ठेवण्याचा प्रयत्न केला, पण तो नीट जमला नाहीं. त्यामुळें आमचे आदेश खेडोपाडीं जाऊन पोंचण्यास बराच अवधि लागे.

पण अलाहाबादेच्या किसान परिषदेमुळें ही एक अडचण दूर झाली. जिल्ह्यांतील बहुतेक मुख्य मुख्य खेड्यांतून प्रतिनिधी आलेले होते. त्यामुळें, चळवळी-संबंधींचे ठराव व माझ्या अटकेची बातमी परत फिरतांना त्यांनीं आपल्या मुंडाशांत बांधून नेली, व हीं सोळाशें तोंडें करबंदीचा संदेश सांगत फिरूं लागल्याकारणानें वातावरणांत उत्साह खेळूं लागला. अशा प्रकारें सुरुवातीच्या कामांत यश येणार हें निश्चित झालें. प्रारंभीं शेतकरी खंड देण्याचें नाकारणार आणि दमदाटी झाली नाहीं तर शेवटपर्यंत ते मुळींच खंड भरणार नाहींत याविषयींहि शंका नव्हती पण सरकारच्या व जमीनदारांच्या अत्याचारापुढें व दडपशाहीपुढें मात्र ते किती वेळ टिकाव धरतील, तें सांगणें कठीण होतें.

करबंदीच्या बाबतींत जमीनदार व शेतकरी या दोघांनाहि विनंति करण्यांत आली होती. शास्त्रार्थ पाहिला तर या विनतीच्या ठरावांत वर्गकलह नव्हता. पण प्रत्यक्ष व्यवहार असा झाला कीं बहुतेक जमीनदारांनीं चुकता कर भरला. राष्ट्रीय चळवळीबद्दल आस्था बाळगणाऱ्या जमीनदारांनीं सुद्धां सारा दिला! त्यांच्यावर खूपच दडपण आणण्यांत आलें, आणि त्यांचें नुकसानहि अधिक झालें असतें. कुळें मात्र ठाम राहिली व आमच्या चळवळीला आपोआपच खंडबंदीचें स्वरूप प्राप्त झालें. अलाहाबाद जिल्ह्यांतील ही साथ कांहीं इतर जिल्ह्यांतहि पसरली. पुष्कळ जिल्ह्यांत करबंदी जाहीर न होतांच कुळांनीं खंड थकवला. बाजारमंदीमुळें कित्येकांच्या अंगीं खंड देण्याचें मुळीं त्राणच उरलें नव्हतें. गोष्ट अशी घडली कीं कुळांची ही बंडखोरी दडपून टाकण्याचा प्रयत्न सरकार अगर जमीनदार यांच्या-पैकीं कोणीहि कित्येक महिन्यांपर्यंत केला नाहीं. एकीकडे राजकीय लढा व दुसरी-कडे आर्थिक मंदी यांच्या कैचींत सरकार गवसलें होतें. परिस्थितीचें अचूक निदान सरकारला त्या काळीं झालेलें नव्हतें. या दोन वावटळी एकठाय होऊन त्यांतून शेतकरी बंडाची तिसरी वावटळ उपस्थित होते कीं काय अशी धास्ती सरकारला एकसारखी वाटत होती, आणि लंडन येथें मंडलाकार परिषद सुरू होती अशा वेळीं हिंदुस्थानांत अधिक धामधूम माजवण्याचा व आपल्या सोटेशाहीचें अधिक प्रदर्शन करण्याचा सरकारचा इरादाहि नव्हता.

करबंदीच्या चळवळीमुळें संयुक्त प्रांतापुरता तरी एक महत्त्वाचा परिणाम घडून आला. आमच्या लढ्याचें केंद्रस्थान शहरांतून उठून खेड्यांत गेलें व त्यामुळें आमच्या लढ्याला खतपाणी मिळून त्याचीं पाळेंमुळें अधिक फैलावलीं व बळावलीं. आमचे 'नागर' देशबांधव कंटाळून दमून गेले होते, आमचे मध्यवर्गीय कार्यकर्तेहि निरुत्साही दिसूं लागले होते; पण संयुक्त प्रांतांतील चळवळीचा बोज पूर्वीप्रमाणेंच

कायम राहिला, थोडा वाढलाच म्हणाना. इतर प्रांतांतील चळवळीच्या रोपट्यांची फेरलावणी इतक्या प्रमाणांत झाली नाहीं, शहरी स्वरूपाऐवजीं खेडवळ व राजकीय स्वरूपाऐवजीं आर्थिक स्वरूप चळवळीला इतर प्रांतांत न आल्यामुळें चळवळीवर शहरांचेंच प्रभुत्व कायम राहून मध्यमवर्गीयांचा आळस तिलाहि बाधूं लागला. चळवळींत एकसारखी गाजत राहिलेली एवढी मुंबई, पण तेथील कार्याला देखील शिळेपणा येऊं लागला. कायद्यांचा उपमर्द तेथें व इतरत्र सुरू होता; लोक तुरुंगांत जात होते; पण त्यांत एक प्रकारची कृत्रिमता आली होती; त्यांतील ओज नष्ट झालें होतें. जनतेंतील क्रांतिवृत्ति फार वेळपर्यंत इतकी चढ ठेवणें अशक्य असल्यामुळें जें झालें तें स्वाभाविकच होतें. क्रान्तिकारक वृत्तीची भरती कांहीं दिवसपर्यंतच टिकते; पण कायदेभंगाचें वैशिष्ट्य हें कीं तो ही वृत्ति महिनेन् महिने टिकवून धरतो व नंतरहि अमर्याद काळापर्यंत अल्प प्रमाणांत ती दृग्गोचर होत राहते.

दडपशाहीचा रूळ अधिक झपाट्यानें फिरूं लागला. इतके दिवस काँग्रेस-कमिट्या व युवक संघ चालू राहिले हेंच आश्चर्य. आतां त्यांना बेकायदा ठरवून जमीनदोस्त करण्यांत आलें. राजबंद्यांना जाच होऊं लागला. सुटका होते न होते तों लोकांनीं पुनः तुरुंगांत यावें ही गोष्ट सरकारच्या मनांत डांचत होती. शिक्षा लावूनहि लोक नमत नाहींत ह्या अनुभवानें सरकारचा स्वाभिमान दुखावला. सन १९३० च्या नोव्हेंबर-डिसेंबरच्या सुमाराला संयुक्त प्रांतांतील कांहीं राजबंद्यांना फटके मारण्यांत आले. आतां अशा व याहूनहि दुःखद गोष्टी आमच्या अंगवळणीं पडल्या आहेत; पण त्या वेळीं फटक्यांची बातमी नैनी तुरुंगांत आम्हांला कळली, तेव्हां आमचें मन भडकून गेलें. अगदीं नाठाळ कैद्यांनासुद्धां फटक्यांची शिक्षा देणें अनिष्ट आहे असें मला वाटतें. त्यांतून कोंवळ्या भावनाक्षम तरुणांना शिस्तीचें निमित्त पुढें करून फटके मारणें हा तर शुद्ध रानटीपणा आहे. आम्हीं चौघांनीं सरकारला लिहून कळविलें व कांहींच उत्तर मिळत नाहींसें पाहून शिक्षेविषयींचा आमचा निषेध व दुःखितांबद्दलची सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं बहात्तर तास उपवास करण्याचा आम्हीं संकल्प केला. इतर उपवासांच्या मानानें हा उपवास म्हणजे कांहींच नव्हे. पण मीं पूर्वी चोवीस तासांहून अधिक काळ क्वचितच उपवास केलेला असल्यामुळें हा प्रसंग कसा काय निभावून जातो याची मला चिंताच वाटत होती.

पण फारसा त्रास न होतां उपवास पार पडला, व उपवास म्हणजे कांहीं भयंकर अवघड प्रकरण नव्हे हें कळल्यामुळें जरा बरें वाटलें. उपवासाच्या दिवसांतसुद्धां धांवणे वगैरे माझे व्यायामाचे प्रकार मीं नेहमीसारखे चालू ठेविले होते. तेवढ्या अवधींत आमचे प्रत्येकाचे वजन सात आठ पौंडांनीं घटलें. नैनीच्या तुरुंगांत आल्यापासून अगोदरच प्रत्येकाचें पंधरा ते पंचवीस पौंड वजन उतरलें होतें, त्यांत ही नवी भर पडली.

फटक्यांच्या शिक्षेमुळें संयुक्त प्रांतांत तुरुंगाबाहेरहि बरीच खळबळ उडाली. मला

वाटतें कीं त्याचा परिणाम होऊन असल्या शिक्षा यापुढें करण्यांत येऊं नयेत, असा प्रांतिक सरकारचा फतवा निघाला. पण तो हुकुम तेवढयाचपुरता होता. यानंतर एक वर्ष उलटतें न उलटतें तों आमच्या प्रांतांत व इतर ठिकाणीं फटक्यांच्या शिक्षा सर्रहा देण्यांत येऊं लागल्या.

असले प्रसंग सोडले, तर तुरुंगांतील आमचें आयुष्य सुरळीतपणें चाललें होतें. हिंवाळ्यांत अलाहाबादची हवाहि फार सुंदर असते. रणजित पंडित आमच्या बराकींत आला हा सुयोग म्हटला पाहिजे. कारण त्याला माळीकामाची बरीच माहिती होती, त्यामुळें स्मशानभूमीप्रमाणें दिसणारें आमचें आवार थोड्याच दिवसांत रंगीबेरंगी फुलांनीं भरून गेलें. त्या चिंचोळ्या जागेंत त्यानें एक गोल्फची जागाहि थाटून दिली !

नैनींच्या तुरुंगांत असतांना डोक्यावरून विमानें जाऊं लागलीं कीं फार आनंद वाटे. पश्चिम व पूर्व गोलार्धांना जोडणारे आकाशमार्ग आहेत. या मार्गावर अलाहाबाद येथें एक विमानांचा तळ आहे. ऑस्ट्रेलिया, जावा व फ्रेंच इंडोचायना या देशांना जाणारीं अजस्त्र विमानें आमच्या अगदीं डोक्यावरून जात. बटेव्हियाला जाणारीं व तिकडून येणारीं डच विमानें सर्वांत भव्य दिसत. बरोबर वेळ साधली तर हिंवाळ्याच्या दिवसांत मोठ्या पहांटे अंधारांत तारे चमचमत असतांच एखादें विमान जातांना दिसे. विमानावर दिव्यांचा झगझगाट दिसून येई व त्याच्या दोन्ही टोंकांना लाल दिवे लावलेले असत. अंधाराच्या पटावरून अशा प्रकारें सरकत जाणाऱ्या विमानाचें दृश्य मोठें मनोरम भासत असे.

दुसऱ्या कोणत्या तरी तुरुंगांतून पंडित मालवीयांना नैनी येथें आणण्यांत आलें होते. त्यांची जागा पृथक् असली, तरी त्यांची दररोज गांठभेट होई. ते अतिशय उत्साही व जगांत वावरतांना तरुणसुलभ होशीनें वागत असल्यामुळें त्यांचा सहवास फार आनंददायक झाला. रणजितच्या मदतीनें त्यांनीं जर्मन शिकण्यासहि प्रारंभ केला होता. त्यांची धारणाशक्ति उत्तम प्रकारची होती. फटक्यांच्या शिक्षेची बातमी आम्हांला कळली, तेव्हां ते नैनी येथेंच होते. बातमी ऐकल्यावर राग येऊन त्यांनीं प्रांताच्या हंगामी गव्हर्नरला पत्र लिहिलें. तुरुंगांतील थंडी त्यांना सोसवेना. ते लवकरच आजारी पडले. पुढें आजार इतका गंभीर झाला, कीं त्यांना शहरांतील रुग्णालयांत न्यावें लागलें. तेथूनच त्यांची मुदत भरण्यापूर्वी सुटका झाली.

१ जानेवारी १९३१ रोजीं कमलाला पकडल्याची बातमी आम्हांला समजली. आपले इतके सहकारी तुरुंगांत गेले त्यांच्या मागोमाग आपणहि गेलें पाहिजे अशी तिला तळमळ लागून राहिली होती. तिला, माझ्या बहिणींना व इतर स्त्रियांना त्या पुरुष असत्या तर केव्हांच तुरुंग दिसला असता. पण आतां तिची इच्छा पूर्ण झाली. पकडल्यावर तिला आनंद झाला असेल; पण तिची प्रकृति नाजुक आहे, तुरुंगवासामुळें ती बिघडेल अशी भीतीहि मला वाटली.

अटक झाल्यावर तिचा संदेश मिळावा म्हणून एका बातमीदारानें तिला विनंती केली असतां तिच्या तोंडून संदेशाचे जे शब्द अगदीं सहजासहजीं बाहेर पडले, त्यांवरून तिचा स्वभाव उत्तम प्रकारें कळून येतो: "माझ्या पतीच्या पावलावर पाऊल टाकण्याची मला संधि मिळाली, ह्याबद्दल मला निरतिशय आनंद व अभिमान वाटतो. जनता आपला हा झेंडा सदैव फडकत ठेवील अशी मला आशा आहे." पूर्वविचारानंतर तिनें संदेश दिला असता, तर कदाचित् अगदीं हेच शब्द तिनें उच्चारिले नसते. कारण पुरुषांच्या दास्यांतून स्त्रियांचें विमोचन करणाऱ्या स्त्रियांच्या आपण अग्रणी आहों असें ती स्वतःला समजत असे. पण त्या क्षणीं पुरुषांच्या अरेरावीचें भान न राहून तिच्या हाडींमाशीं खिळलेली हिंदु पत्नीची मनोवृत्ति प्रकट झाली असावी.

वडील कलकत्त्याला आजारीच होते. पण कमलच्या अटकेची व शिक्षेची बातमी ऐकून त्यांचें मन व्यथित झालें आणि त्यांनीं अलाहाबादला परत यावयाचें निश्चित केलें. १२ जानेवारी रोजीं ते मला नैनी येथें भेटण्यासाठीं आले. त्यांना दोन महिन्यांपूर्वीं मीं पाहिलें होतें. या खेपेला त्यांना पाहिल्याबरोबर मी दचकलोंच; पण माझ्या मनांतील भाव मीं मोठ्या प्रयासानें छपवून ठेवले. माझ्या मनांत उत्पन्न झालेल्या काळजीची त्यांना कांहींच कल्पना आली नसावी. त्यांच्या चेहऱ्यावर सूज आली होती, पण ती तात्पुरती कांहीं कारणामुळें आली आहे असा त्यांचा समज झालेला दिसला.

त्यांचा तो सुजलेला चेहरा माझ्या डोळ्यांपुढून जातां जाईना. ते असे कधींच दिसत नसत. त्यांच्या प्रकृतीसंबंधीं खरी चिंता अशी त्या वेळीं प्रथमच माझ्या मनांत आली. कारण त्यांचें नांव उच्चारलें कीं उत्तम प्रकृति व दणकट शरीर हींच नेहमीं डोळ्यांसमोर यावयाचीं. ते आणि मृत्यु ही जोडीच असंभाव्य वाटे. मृत्यूच्या कल्पनेची ते टर उडवीत, व मी आणखी खूप वर्षे जगणार आहें, असें आम्हांला सांगत असत. अलीकडे मात्र एकादा मित्र गमावला कीं एकाकी-पणाचा विचार त्यांच्या मनांत डोकावे. अपरिचित जगांत आपण एकटेच उरलों आहों असें वाटून शेवटच्या क्षणाची कल्पना त्यांच्या मनांत लहरून जात असावी. पण लवकरच त्यांच्या उत्साहाला भरती आली, कीं हे विचार धुवून जात. त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्वाची व सर्वंकष प्रेमाची आम्हां कुटुंबांतील मंडळींना इतकी सवय झाली होती कीं ते गेल्यावर जग कसें दिसेल याची कल्पनाहि आम्हांला असह्य होत असे.

त्यांचा चेहरा पाहून मनाला विलक्षण हुरहुर वाटूं लागली व डोक्यांत भलभलते विचार येऊं लागले. पण संकट फार लवकर येईल असें मला वाटलें नाहीं. कां कोणाला ठाऊक, पण माझीहि प्रकृति त्या वेळीं बिघडली होती.

मंडलाकार परिषद संपत आली होती. शेवटच्या अंकाच्या वेळीं जें

मित्रभावाचें प्रदर्शन मांडण्यांत आलें, तें मोठें मजेशीर होतें. ती मित्रभावाची संपादणी पाहून केवळ गंमत वाटली नाहीं, मनांत तिटकारा देखील उत्पन्न झाला. तीं सर्व भाषणें आणि त्या सर्व चर्चा पोकळ व फोल आहेत असा विचार होवयांत आला. देश भीषण दिव्यांतून जात असतां व आमचे देशबांधव व भगिनी आपल्या पराक्रमाची शर्थ करीत असतां वस्तुस्थितीकडे काणाडोळा करून आमच्याचपैकीं कांहीं देशबांधव विपक्षीयांना आपला नैतिक पाठिंबा देत आहेत, ही एकच गोष्ट ढळढळीतपणें दिसत होती. राष्ट्रीय भावनेच्या फसव्या पांघरुणाखालीं वस्तुतः भिन्न भिन्न अशा आर्थिक संबंधांचे झगडे सुरू आहेत व मोठमोठे वतनदार राष्ट्रीयत्वाचें नांव पुढें करून वस्तुतः आपलीं वतनें कायम राहावीं म्हणून प्रयत्न करीत आहेत ही गोष्ट आम्हांला आतां अधिक स्पष्टपणें दिसूं लागली. या बड्या धेंडांची मजलस म्हणजेच मंडलाकार परिषद. त्यांपैकीं कित्येकांनीं चळवळीला विरोध केला होता. कांहीं जण तीरावर उभे राहून ओरडत होते कीं, " तटस्थपणा म्हणजेच सहकार्य." परंतु लंडनमधून खूण झाल्याबरोबर त्यांचा तटस्थपणा एकाएकीं मावळला व स्वतःच्या हितसंबंधाचें डबोलें रक्षण करण्यासाठीं व पुढें टाकण्यांत येणाऱ्या तुकड्यांपैकीं एकादा तुकडा उचलण्यास मिळाला तर पाहावा म्हणून त्यांची धांवपळ सुरू झाली. कॉंग्रेस अधिकाधिक जहाल बनत चालली असून जनतेची छाप तिच्यावर जास्त प्रमाणांत पडत चालली आहे ह्या जाणीवेमुळें तर बड्या धेंडांची संघटना अधिक तत्परतेनें होऊं लागली. सहजप्रवृत्तीनेंच त्यांना कळून चुकलें, कीं हिंदुस्थानांत जर मूलग्राही स्वरूपाचे फेरबदल घडून आले, तर जनतेच्या हातीं अधिकार जाऊन, निदान पक्षीं जनतेला वर्चस्व प्राप्त होईल व मग खालचे वर्ग ओघानेंच सामाजिक पुनर्घटनेचा आग्रह धरतील आणि आपल्या हितसंबंधांना धोका उत्पन्न होईल. ह्या भयंकर दृश्याचा विचार मनांत येतांच भांडवलदार वर्ग मागें सरला व कोणतीहि मूलग्राही राजकीय सुधारणा होऊं लागली, तर ती हाणून पाडण्याचे प्रयत्न करावयाचे असा मनसुबा ते रचूं लागले. परिस्थितीचें नियंत्रण करण्यासाठीं व सध्यांची सामाजिक घटना व हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठीं ब्रिटिशांनीं येथें रहावें असें त्यांचें मत होतें. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचा आग्रह धरण्याचें मुख्य कारण हेंच. ब्रिटिशांबरोबर तडजोड व्हावयाची असेल तर ब्रिटिश सैन्य ताबडतोब परत नेण्यांत यावें व हिंदी सैन्यावर हिंदी लोकसत्तेचा अधिकार सुरू व्हावा असा हट्ट मीं धरला, म्हणून एक प्रसिद्ध प्रागतिक पुढारी माझ्यावर फार गरम झाले होते. ब्रिटिश सरकारनें माझे हे लाड पुरविण्याचें कबूल केलें तरीहि आपण ह्या योजनेला शक्य तितका विरोध करूं असें सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक अशा ह्या गोष्टीला त्यांनीं विरोध केला याचें कारण वर्तमान परिस्थितींत ती प्राप्त होणें त्यांना असाध्य वाटत होतें म्हणून नव्हे, तर अनिष्ट वाटत होतें म्हणून. परचक्राची भीति मनाला भेडसावीत असल्यामुळें ब्रिटिशांनीं

आपलें रक्षण करावें ह्या इच्छेनें ते असें म्हणत असतील असे कांहीं जणांना वाटण्याचा संभव आहे. दुसऱ्यानें आपलें रक्षण करावें हा विचारच असा आहे, कीं तो कोणत्याहि तेजस्वी हिंदी माणसाला असह्य व्हावा. पण परचक्राची भीतीहि प्रागतिकांच्या विचारसरणीच्या बुडाशीं नाहीं. हिंदी लोकांच्या हातून, खऱ्या लोकसत्तेच्या हातून, म्हणजे प्रबळ झालेल्या जनतेच्या हातून, वरिष्ठवर्गीयांचें भांडवल सुरक्षित राखण्यासाठीं प्रागतिकांना ब्रिटिश सैन्य हवें आहे.

त्यामुळें मंडलाकार परिषदेला गेलेल्या प्रतिनिधींपैकीं फक्त परागतिक व जातिनिष्ठ लोकांनाच नव्हे, तर स्वतःला प्रागतिक व राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या लोकांनाहि असें दिसून आलें कीं ब्रिटिश सरकारचीं व आपलीं मतें बऱ्याच प्रमाणांत जुळण्यासारखीं आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्याकरितां जे तुरुंगांत गेले व आम्हांला तुरुंगांत घालणाऱ्यांबरोबर हाताला हात मिळवून ज्यांनीं उभय पक्षांना मान्य असें धोरण आंखतां येईल कीं काय याचा ऊहापोह केला, त्या सर्वांनाच राष्ट्राभिमानी म्हणावयाचें असेल, तर राष्ट्रवादाचें क्षेत्र बरेंच विस्तृत करावयास हवें हें उघडच आहे. स्वदेशी चळवळीचा सर्वतोपरी पुरस्कार करणारे व स्वदेशी म्हणजेच स्वराज्य असें सांगून स्वदेशी माल महाग पडला तरी स्वार्थत्यागपूर्वक तोच घ्या असा मतप्रचार करणारे वाक्शूर राष्ट्रवादी आमच्या देशांत होतेच. त्यांचें सुदैव असें बलवत्तर कीं त्यांना कोणताच स्वार्थत्याग करावा लागला नाहीं. त्यांचा व्यापार व नफा यांच्यांत मात्र स्वदेशीमुळें वाढ झाली कित्येक जणांनीं तुरुंग पाहिला व कित्येकांचीं लाठीमारानें डोकीं फुटलीं; पण हे मात्र आपल्या पेढीवर रुपये-आणे करीत जेठा मारून बसले होते ! नंतरच्या काळांत राष्ट्रवाद चढाईचा व धोक्याचा होऊं लागला, तसे हे लोक जहालांचा निषेध करूं लागले. त्यांची स्वतःची भाषा नरम पडूं लागली, व विरोधी पक्षाबरोबर त्यांचें संगनमत सुरू झालें.

मंडलाकार परिषदेंत काय घडत होतें, याचा आम्हीं खरोखरी विचार अथवा कदर केली नाहीं. परिषद भरली होती शेंकडों कोस दूर, व तिच्यांत चालणारे वादविवाद होते लुटपुटीचे आणि निरर्थक. खरा लढा ह्याच देशांतील शहरांतून व खेड्यांतून लढविण्यांत येत होता. आम्हांस झटपट यश मिळेल असा भ्रम आमच्या मनाला मुळींच शिवला नाहीं. पुढें वाढून ठेवलेल्या संकटपरंपरेची आम्हांला पुरेपूर जाणीव होती. परंतु १९३० सालच्या चळवळीमुळें आमच्या ठिकाणीं जो आत्मविश्वास व जी सहनशक्ति उत्पन्न झाली, त्यांच्या बळावरच भविष्यकाळाकडे निर्भय दृष्टीनें पाहणें आम्हांला शक्य होत होतें.

त्या सालच्या डिसेंबरांत अगर जानेवारींत घडलेल्या एका प्रसंगामुळें आमच्या मनाला अत्यंत दुःख झालें. एडिंबरो येथें नामदार शास्त्री यांचा सन्मान झाला, त्या वेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत कायदेभंग करून तुरुंगांत जाणारांविषयीं तुच्छता प्रदर्शित केली. तें भाषण व तो प्रसंग ह्या दोन्ही गोष्टी आमच्या जिव्हारीं लागल्या.

नामदार शास्त्री यांच्याशीं आमचा कितीहि मतभेद असला, तरी आमच्या मनांत त्यांच्याबद्दल आदरभाव वसत होता.

रॅम्से मॅक्डोनल्ड ह्यांनीं गोलमेज परिषदेचें भरतवाक्य उच्चारतांना नेहमींच्या लकबीप्रमाणें बंधुभावाचे शब्द उच्चारले. कॉंग्रेसनें आपले वक्र मार्ग सोडून मंडलाकार परिषदेच्या आनंद-मंडळांत सामील व्हावें अशा इच्छेचे सूर त्यांच्या भाषणांत ध्वनित झाले होते. त्याच वेळीं म्हणजे १९३१ च्या जानेवारींत कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीची बैठक अलाहाबाद येथें भरून तेथें ह्या भाषणाचा व विनंतीचा विचार करण्यांत आला. वडील नुकतेच कलकत्त्याहून आले होते. ते फार आजारी होते; पण स्वतःला अंथरुणावरून उठण्याची ताकद नसतांहि सभासदांनीं आपल्या बिछान्याभोंवतीं जमून तेथें चर्चा करावी असा त्यांनीं आग्रह धरला. मॅक्डोनल्डच्या भाषणाचा अनुकूल विचार व्हावा अशी सूचना एका सभासदानें केल्याबरोबर वडील खवळून अंथरुणावर उठून बसले, व ध्येय साध्य होईपर्यंत आपण लढा थांबविणार नाहीं, मग मी एकटा उरलों तरी बेहेत्तर, असें आपलें मत त्यांनीं जाहीर केलें. हा मानसिक ताण सहन न होऊन त्यांचा ताप एकाएकीं चढला व शेवटीं डॉक्टरांना भेटीला आलेल्या लोकांना बाजूला काढून लावावें लागलें.

विशेषतः वडिलांच्याच आग्रहामुळें वर्किंग कमिटीनें एक सडेतोड ठराव पास केला. पण तो प्रसिद्ध होण्यापूर्वींच सप्रू व नामदार शास्त्री यांच्याकडून, आमच्याबरोबर चर्चा करण्यापूर्वी कोणताहि निर्णय घेऊं नये, अशा आशयाची एक तार येऊन थडकली. ठराव केव्हांच पास झालेला आहे, परंतु आपल्याशीं चर्चा होईपर्यंत तो प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं, असें उत्तरीं कळविण्यांत आलें.

तुरुंगाच्या आंत आम्हांला या घटनांचा पत्ता लागला नाहीं. परंतु कांहीं तरी शिजत आहे एवढी कुणकुण मात्र लागली व आमचीं मनें जरा अस्वस्थ झालीं. स्वातंत्र्यदिनाची तारीख जवळ येत चालली होती, व स्वातंत्र्यदिनाचा हा पहिला वाढदिवस कसा साजरा होणार या फिकीरींत आम्ही पडलों होतों. जाहीर सभा भरवून सर्व देशभर हा दिन साजरा करण्यांत आला व स्वातंत्र्याच्या ध्येयाची आठवण करून देणारा ठराव सगळीकडे पास झाला. वृत्तपत्रांचें व छापखान्यांचें सहाय्य नाहीं, पोस्ट व तारखात्यासारख्या सरकारी खात्यांची तर गोष्टच बोलावयास नको; अशा परिस्थितींत हा दिन साजरा व्हावा हा आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. अनेक ठिकाणीं हुकुम धाब्यावर बसवून सभा भरविण्यांत आल्या होत्या. त्या पोलिसांनीं जबरदस्तीनें उधळून लावल्या.

२६ जानेवारीला नैनीच्या तुरुंगांत गत व आगामी वर्षाविषयीं विचार करीत आम्ही बसलों होतों. इतक्यांत वडिलांची प्रकृति अधिक बिघडली असल्यामुळें मीं तावडतोब घरीं जावें असें मला अकस्मात् सांगण्यांत आलें. अधिक चौकशी केल्यावर असें कळलें कीं, मला सोडून देण्यांत येत आहे. रणजितची सुटकाहि माझ्याबरोबरच झाली.

हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या तुरुंगांतून त्या दिवशीं संध्याकाळीं कित्येक जणांना सोडण्यांत आलें. सुटलेले सर्व लोक वर्किंग कमिटीचे मूळ अगर बदली सभासद होते. एकत्र जमून परिस्थितीचा विचार करण्याची संधि आम्हांला द्यावी असा सरकारचा विचार दिसला. म्हणजे त्या दिवशीं मी सुटावयाचा हें ठरलेलेंच होतें. वडिलांच्या आजारीपणामुळें कांहीं तास आधीं सुटलों, इतकेंच. २६ दिवसांचा तुरुंगवास भोगल्यावर कमलचीहि त्याच दिवशीं लखनौ-तुरुंगांतून सुटका झाली; कारण वर्किंग कमिटीच्या बदली सभासदांपैकींच तीहि एक होती.

## ३२

# वडिलांचा मृत्यु

नैनीच्या तुरुंगांत मला वडील भेटले, त्यानंतर पंधरा दिवसांनीं त्यांची ही भेट होत होती. तुरुंगांतील भेटीच्या वेळीं त्यांच्या सुजलेल्या चेहऱ्याकडे पाहून माझ्या अंतःकरणांत चर्र झालें होतें; आतां तर त्यांची स्थिति अधिक बिघडलेली दिसली. त्यांना बोलतांना त्रास होई व त्यांच्या विचारांचाहि गोंधळ उडत असे. पण पूर्वीची इच्छाशक्ति अद्यापि तग धरून होती, तिच्या बळावरच त्यांच्या मनाचे व शरीराचे व्यापार चालले होते.

रणजित व मी आलेले पाहून त्यांना समाधान वाटलें. परंतु रणजित हा वर्किंग कमिटीचा सभासद असल्यामुळें त्याला एकदोन दिवसांनंतर पुनः तुरुंगांत पाठविण्यांत आलें. ही गोष्ट वडिलांच्या मनाला फार लागलेली दिसली. त्यांनीं रणजितचा ध्यास घेतला. इतके लोक लांबलांबून आपणाला भेटावयास येत असतां स्वतःचा जांवई मात्र दूर रहावा ह्याबद्दल त्यांना खेद वाटत होता. तीन-चार दिवसांनंतर डॉक्टरांच्या सूचनेवरून प्रांतिक सरकारनें रणजितला सोडून दिलें. २६ जानेवारी रोजीं मी सुटलों. तिकडे येरवड्याच्या तुरुंगांतून गांधीजींचीहि मुक्तता झाली. त्यांनीं अलाहाबादला यावें अशी माझी फार इच्छा होती, व त्यांच्या मुक्ततेची बातमी मीं वडिलांना कळविली, तेव्हां त्यांना भेटण्याची वडिलांनाहि उत्कंठा लागली होती असें दिसून आलें. गांधीजींच्या स्वागतार्थ मुंबई येथें प्रचंड सभा भरली होती. ती आटोपून दुसऱ्याच दिवशीं गांधीजी मुंबईहून निघाले. ते अलाहाबादला पोंचले, तेव्हां बरीच रात्र झाली होती; तरीसुद्धां वडील त्यांच्यासाठीं जागे राहिले होते. त्यांना पाहून व त्यांचे चार शब्द ऐकून वडिलांना बरेंच समाधान वाटलें आणि त्यांच्या आगमनानें आईला देखील पुष्कळ धीर आला.

वर्किंग कमिटीचे मूळचे सभासद व बदली सभासद सर्व सुटून आले असून बैठकीच्या हुकुमाची ते वाट पाहत राहिले होते. वडिलांची भेट घेण्याची पुष्कळांची इच्छा असल्यामुळें अलाहाबादलाच बैठक भरविण्याचें निश्चित झालें. दोन दिवसांनतर तीस चाळीस सभासद दाखल होऊन आमच्या घराशेजारींच स्वराज्य भवनांत सभा भरली. मधून मधून मीहि सभेला जात होतों. परंतु सभेंत भाग घ्यावयाला मन ठिकाणावरच नव्हतें. तेथें काय निर्णय ठरला तें मला आतां मुळींच आठवत नाहीं. कायदेभंग चालू ठेवण्याचा निर्णय तेथें झाला असावा.

आलेल्या लोकांत पुष्कळ जुने मित्र व सहकारी होते. तेहि तुरुंगांतून नुकतेच सुटून आले असून लवकरच पुन: तेथें जावें लागेल असा रंग दिसत असल्यामुळें वडिलांची भेट घेऊन त्यांचें अखेरचें दर्शन व अखेरचा निरोप घ्यावा अशी त्यांची मनीषा होती. सकाळ-संध्याकाळ दोन-दोन तीन-तीन जण येत असत. आपल्या जुन्या मित्रांचें स्वागत करण्याकरितां वडील बळेंच एका आराम खुर्चीवर बसून राहत. चेहऱ्यावर सूज आल्याकारणानें भावनाविष्कार होणें कठिणच झालें होतें. पण मित्रांमागून मित्र आणि सहकाऱ्यांमागून सहकारी अशी रीघ लागली, कीं ओळखीची चमक त्यांच्या डोळ्यांत दिसूं लागे, व डोकें किंचित् अवनम्र होऊन नमस्कारासाठीं हात जुळले जात. फारसें बोलतां येत नसलें, तरी एकाद दुसरा शब्द ते बोलत. तशाहि स्थितींत त्यांची विनोद वृत्ति मावळली नाहीं. एकाद्या घायाळ व मरणोन्मुख झालेल्या सिंहाप्रमाणें वडील तेथें पडून राहत. तथापि त्या वनराजाची ऐट व ऐश्वर्य नष्ट झालेलें नव्हतें. त्यांच्याकडे पाहिलें, कीं त्यांच्या डोक्यांत कोणते विचार चालले असतील, कीं आतां त्यांना आमच्या कार्याबद्दल गोडी वाटेनाशी झाली असेल वगैरे प्रश्न माझ्या मनांत येत. हातांतून सुटून जाऊं पाहणाऱ्या वस्तुजातावर आपली पकड कायम राखण्यासाठीं त्यांच्या मनाची प्रबळ धडपड चालली आहे हें स्पष्ट दिसत होतें. अगदीं अखेरपर्यंत हा झगडा चालू राहिला, आणि त्यांत त्यांनीं माघार घेतली नाहीं. केव्हां केव्हां ते आमच्याशीं अत्यंत सुसगतपणें बोलत. पुढें त्यांचा घसा धरल्यामुळें शब्दोच्चार करणें अवघड झालें तेव्हां आपलें म्हणणें ते लिहून दाखवूं लागले.

अगदीं शेजारींच वर्किंग कमिटीची बैठक चालू होती. पण त्याविषयीं त्यांनीं जवळजवळ मुळींच आस्था दाखविली नाहीं. हीच बैठक पंधरा दिवसांपूर्वीं चालू असती, तर त्यांचें सारें लक्ष तिकडे लागून राहिलें असतें; पण असल्या गोष्टींपासून आपण आतां फार दूर चाललों आहों असें त्यांना वाटत होतें. "महात्माजी, मी आतां लवकरच जाणार, येथें राहून स्वराज्य मिळालेलें पाहण्याचें माझ्या नशिबीं नाहीं. पण स्वराज्याचा लढा तुम्हीं जिंकला आहे. तें थोडक्याच दिवसांत तुमच्या पदरांत पडेल हें निश्चित." असें ते गांधीजींपाशीं म्हणाले होते.

ठिकठिकाणच्या शहरांतून आलेले लोक निघून गेले. अगदीं थोडे जिवलग मित्र, आप्तमंडळी व वडिलांच्या दाट स्नेहांतले असे तीन डॉक्टर, अन्सारी, बिधन-चंद्र रॉय व जीवराज मेहता एवढीच मंडळी उरली. ४ फेब्रुवारी रोजीं त्यांच्या प्रकृतींत जरा सुधारणा दिसली; तेव्हां क्ष-किरणांच्या विशिष्ट उपचाराची सोय लखनौला होती तेथें त्यांना हलवावें असे ठरून आम्हीं त्यांना मोटरीनें लखनौला घेऊन गेलों. गांधीजी वगैरे मंडळी मोटरीने मागून येत होती. मोटर अगदीं बेतानें हाकली, तरीहि वडिलांना फार थकवा आला. दुसऱ्या दिवशीं प्रवासाचा शीण गेलासा दिसला खरा, पण इतर लक्षणें दिसूं लागलीं तीं जरा चिंताजनकच होतीं.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे ६ फेब्रुवारी रोजीं पहाटे मी त्यांच्याजवळ बसलों होतों. सबंध रात्र त्यांची तगमग सुरू होती. पण एकाएकीं त्यांची मुद्रा शांत झाली, चेहऱ्यावरील धडपडीच्या ऊर्मी निमाल्या. त्यांना झोंप लागली असेल अशी कल्पना होऊन मला हायसें वाटलें. परंतु आईनें बरोबर ताडलें व तिनें हुंदका दिला. अशानें त्यांची झोंप मोडेल, आपलें रडें आवर म्हणून मीं तिला विनविलें. पण त्यांची ती अखेरची चिरनिद्रा होती; त्यांतून जाग कोठून येणार !

त्याच दिवशीं त्यांचा मृत देह आम्हीं मोटरींतून अलाहाबादेस घेऊन आलों. मी मोटरींत बसलों होतों आणि रणजित मोटर हाकीत होता. वडिलांचा खास आवडता नोकर हरि त्याच मोटरींत होता. आईची व गांधीजींची मोटर मागोमाग येत होती. सर्व दिवसभर माझें डोकें सुंद झालें होतें. काय घडलें त्याची नीटशी कल्पनाहि मला आली नाहीं, आणि लोकसमुदायाच्या खेंचाखेंचीमुळें व गोष्टीमागून गोष्टी घडत असल्यामुळें विचार करण्यास वेळहि मिळाला नाहीं. त्यांच्या शवाभोंवतीं राष्ट्रीय निशाण लपेटलेलें होतें. मोटरीवरहि एक भलें मोठें निशाण फडकत होतें. अलाहाबादेला आलों, तेव्हां त्यांच्या मृत देहाचा सत्कार करण्यासाठीं लक्षावधि लोक जमा झाले. घरीं थोडेसे धार्मिक विधि उरकण्यांत आल्यावर गंगेच्या तीराकडे एक अफाट स्मशानयात्रा निघाली. शिशिरकालीन संध्येची सावली गंगातीरावर पसरत असतां चितेच्या ज्वाळा धडकल्या आणि आम्हाला व लाखों हिंदवासीयांना मोलाचा वाटणारा तो देह भस्मीभूत झाला. डोळे टिपावयास लावील असें छोटेंसें भाषण गांधीजींनीं केल्यावर आम्हीं सर्वजण हळू हळू परत फिरलों. खिन्न व शून्य अंतःकरणानें आम्हीं घरीं येत असतां आकाशांत तारे चमचमत होते.

आईला व मला हजारों लोकांनीं सहानुभूतीचे संदेश पाठविले. लार्ड व लेडी अर्विन यांनींहि मोठा सौजन्यपूर्ण असा संदेश आईकडे धाडला होता. इतक्या अलोट स्नेहभावाचा आणि सहानुभूतीचा वर्षाव झाल्यामुळें आमच्या दुःखाची दाहकता थोडी कमी झाली. पण त्या संकटकालीं गांधीजींचा स्नेहस्निग्ध सहवास मिळाला, म्हणूनच आईचें व आमचें सर्वांचें दुःख हलकें झालें व हृदयाचे घाव भरून निघाले.

वडील आम्हांला सोडून गेले हें मला खरेंच वाटेना. तीन महिन्यांनंतर माझ्या पत्नीला व मुलीला बरोबर घेऊन मी सिलोनमध्यें नुवारा एलिया येथें विश्रांतीसाठीं जाऊन राहिलों होतों. मला तें स्थळ इतकें आवडलें, कीं वडिलांना येथें खासच आराम वाटेल अशी माझ्या मनांत कल्पना आली. ते किती थकून गेले असतील, विश्रांति मिळाली, कीं त्यांना जरा हुषारी येईल, तेव्हां त्यांना इकडे या असें कळवावेंच असें मनाशीं ठरवून मी अलाहाबादेला तार करण्याच्या बेतांत होतों !

सिलोनहून आम्ही अलाहाबादेला पोंचल्यावर मला पोस्टांतून एक पत्र मिळालें. पत्रावर माझाच पत्ता वडिलांच्या हस्ताक्षरांत लिहिलेला होता व किती तरी भिन्न भिन्न पोस्ट कचेऱ्यांचे छाप पाकिटावर उठलेले होते. चकित मनानें मी पाकिट

फोडून पाहतों तों खरोखरी वडिलांनीं लिहिलेलेंच तें पत्र होतें. त्यावरची तारीख मात्र २८ फेब्रुवारी १९२६ अशी होती. साडेपांच वर्षांनीं मला तें पत्र मिळालें. १९२५ मध्यें कमला व मी युरोपच्या सफरीवर गेलों तेव्हां वडिलांनीं अहमदाबादेहून तें पत्र लिहिलें होतें. पत्रावर इटालियन लॉइड बोटीचा पत्ता होता. आमची थोडी चुकामूक झाली व नंतर अनेक ठिकाणीं तें पत्र हिंडलें. पुढें कोणा तरी डोकेबाज गृहस्थाला तें माझ्याकडे पाठविण्याचा विचार सुचला असावा. चमत्कार असा, कीं त्या पत्रांतसुद्धां निरोपादाखल मजकूरच लिहिलेला होता.

## ३४

# दिल्ली-करार

वडिलांनीं देह ठेवला, त्याच दिवशीं व जवळ जवळ त्याच घटकेला मंडलाकार परिषदेला गेलेले बरेचसे प्रतिनिधी मुंबई बंदरांत येऊन दाखल झाले. शास्त्री व सप्रू थेट अलाहाबादेला आले. गांधीजी व वर्किंग कमिटीचे कांहीं सभासद तेथें होतेच. आमच्या घरींच खाजगी बैठकी होऊन मंडलाकार परिषदेंत काय घडलें तें निवेदन करण्यांत आलें. सुरुवातीलाच एक प्रसंग घडून आला. एडिंबरो येथील भाषणाबद्दल नामदार शास्त्र्यांनीं आपण होऊनच खेद प्रदर्शित केला. परिस्थितीचें दडपण नेहमींच आपल्या मनावर पडतें व आपल्या " पुष्पिता वाणी " चा दरवळ पसरूं लागला, कीं आपल्याला भान राहत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

आम्हांला माहिती नाहीं अशी एकदेखील महत्त्वाची बातमी प्रतिनिधि महाशयांनीं सांगितली नाहीं. पडद्याआड कोणतीं कारस्थानें सुरू होतीं, लॉर्ड 'क्ष' व सर 'ज्ञ' खाजगी रीत्या काय बोलत आणि काय करीत यासंबंधीं त्यांनीं बरीच माहिती आम्हांला दिली. मला वाटतें कीं आमचे प्रागतिक मित्र हिंदुस्थानच्या वस्तुस्थितीकडे न पाहतां व तींत अनुस्यूत झालेल्या तत्त्वांकडे न पाहतां आपलें सारें लक्ष बडे अधिकारी काय खलबतें करतात व काय चकाट्या पिटतात याकडेच लावीत आलेले आहेत ! अलाहाबाद येथें झालेल्या चर्चेतून कांहींसुद्धां निष्पन्न झालें नाहीं. मंडलाकार परिषद म्हणजे नुसता पाचोळा आहे हा आमचा पूर्वग्रह मात्र ठाम झाला. गांधीजींनीं व्हाइसरॉयकडे मुलाखत मागावी व त्यांच्याशीं मोकळेपणानें चर्चा करावी असें कोणीं तरी सुचविलें. सूचना करणाराचें नांव आतां लक्षांत नाहीं. गांधीजींनीं पत्र लिहिण्याचें कबूल केलें; पण मुलाखतीपासून कांहीं एक निष्पत्ति होईल अशी आशा त्यांच्या मनांत होती असें मला वाटत नाहीं. पण वांकडी वाट करावी लागली तरी आपल्या विरोधकांना भेटावें व त्यांच्याशीं बोलावें ही पद्धति तत्त्वतः त्यांना मान्य होती. आपली बाजू शंभर टक्के खरी आहे अशी त्यांची खात्री असल्यामुळें दुसऱ्या पक्षाची खात्री आपण पटवून देऊं अशी आशा त्यांना वाटे. पण केवळ विरोधकांच्या बुद्धीला आपलें म्हणणें पटवावें इतकेंच ध्येय ते डोळ्यांपुढें ठेवीत नसत. अन्तःकरणपालट घडावा, राग व गैरविश्वास यांचे अडसर निखळून पडावेत, विरोधकांच्या पोटांत व मनांत रिघावें अशी त्यांची इच्छा असे. असा पालट झाला कीं खात्री पटविणें सोपें होतें; खात्री नच पटली, तर निदान विरोधाचे तणावे ढिले पडतात,

आणि कलहाच्या नांगीचा कांटा झडून जातो, हें गांधीजी जाणून होते. विरोधकांशीं संबंध आला असतां त्यांनीं अनेकवार विजय मिळविलेला आहे. केवळ व्यक्तित्वाच्या जोरावर ते विरोधकांना आपलेसे करीत ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या व्यक्तित्वाच्या प्रभावामुळें हतबल होऊन अनेक टीकाकार व निंदक त्यांचे चाहते बनले. तदनंतर त्यांनीं केलेल्या टीकेंत टवाळीचा लवलेशहि आढळून येत नसे.

आपल्या अंगच्या ह्या शक्तीची जाणीव असल्यामुळें, मतभेद असणाऱ्या लोकांना भेटण्यास गांधीजी केव्हांहि तयार असत. पण वैयक्तिक अथवा क्षुल्लक प्रश्नाच्या बाबतींत व्यक्तीशीं मुकाबला करणें निराळें आणि ब्रिटिश राज्ययंत्रासारख्या विजयी साम्राज्यशाहीच्या प्रतिनिधिभूत व्यवस्थेशीं दोन हात करणें निराळें. ही गोष्ट माहित असल्याकारणानें गांधीजी लॉर्ड अर्विनच्या मुलाखतीला गेले, ते फारशा आशेनें गेले नाहींत. इकडे कायदेभंगाची चळवळ सुरूच होती; पण वाटाघाटीच्या बातम्या सर्वांच्या तोंडीं झाल्यामुळें त्यांतील तीव्रता थोडीशी कमी झाली.

भेटीची व्यवस्था करण्यांत मुळींच दिरंगाई झाली नाहीं. व्हाइसरॉयबरोबरच्या संभाषणांत तात्पुरत्या तडजोडीविषयीं कांहीं महत्त्वाचें बोलणें निघालें, तर वर्किंग कमिटीच्या सभसदांना मी बोलावून घेईन असें सांगून गांधीजी दिल्लीला निघून गेले. थोड्याच दिवसांत आम्हांला दिल्लीचें आमंत्रण आलें. तीन आठवडे आम्हीं तेथें होतों. दररोज बैठकी भरून लांबलचक आणि कंटाळवाण्या चर्चा चालत. गांधीजींनीं व्हाइसरॉयची अनेकवार भेट घेतली. केव्हां केव्हां अगदीं क्षुल्लक बाबींवर किंवा एकाद दुसऱ्या शब्दावरदेखील मतभेद होऊन वाटाघाटी तटून राहत. कायदेभंगाची चळवळ "तहकूब" करावी, यांतील तहकूब ह्या शब्दावर असेंच तट्टू अडलें. कायदेभंग कायमचा बंद करणें अथवा त्याचा अजिबात त्याग करणें केव्हांहि शक्य होणार नाहीं; कारण जनतेच्या हातांत एवढें एकच एक शस्त्र उरलें आहे, असें गांधीजी नेहमींच स्पष्टपणें बोलून दाखवीत; तथापि कायदेभंग तहकूब करणें मात्र शक्य होतें. शब्द निर्णायक स्वरूपाचा असावा असा मुद्दा लॉर्ड अर्विन यांनीं मांडला; पण तो गांधीजींनीं मान्य केला नाहीं. सरतेशेवटीं कायदेभंग "पुढें चालविण्यांत येऊं नये" अशी शब्दरचना मान्य करण्यांत आली. परदेशी कापडावरील व गुत्त्यावरील निरोधनासबधींसुद्धां असाच काथ्याकूट झाला. तडजोडीच्या तात्कालिक मुद्द्यांचा ऊहापोह करण्यांतच आमचा बहुतेक वेळ गेला. मूलभूत तत्त्वाकडे फारसें लक्ष देण्यांत आलें नाहीं. या चर्चेमुळें युद्धतहकुबी होऊन मागाहून खऱ्या ऐन प्रश्नावर संभाषण होईल असा आमचा कयास होता.

त्या वेळीं दिल्ली येथें पंचमेळ लोक जमलेले होते. त्यांत परदेशी बातमीदारहि —विशेषतः अमेरिकन—आलेले होते. आमच्या मौनामुळें ते जरा डोक्यांत राख घालीत. गांधी-अर्विन संभाषणाबद्दलची माहिती तुमच्यापेक्षां नव्या दिल्लीच्या सेक्रेटरियटमधूनच आम्हांला जास्त मिळते असें ते म्हणत आणि तें खरेंच होतें. महात्माजींचे

ग्रह त्या वेळीं उच्चीचे असल्यामुळें बडेबडे पदवीवालेहि त्यांना लवून सलाम करूं लागले होते. ज्या लोकांनीं गांधीजी व कॉंग्रेस ह्यांचा विटाळ मानला व त्यांना शिव्यांची लाखोली वाहिली, ते लोक आतां दिलजमाई करण्यासाठीं लगबग करीत असलेले पाहून मोठी मजा वाटे! कॅांग्रेसची कमान चढती दिसत होती, तेव्हां भविष्य-काळीं ती तशीच चढती रहाणार नाहीं कशावरून? एकंदरींत कॅांग्रेसशीं व तिच्या पुढाऱ्यांशीं गोडीगुलाबीनें वागावें हीच नीति फायद्याची ठरेल अशी कल्पना होती. एका वर्षानंतर त्यांच्या धोरणांत आणखी एकवार बदल होऊन ते कॅांग्रेस व तिचे कार्यक्रम यांच्याबद्दल तिरस्कार व्यक्त करूं लागले व तिचा-आपला कांहीं संबंध नाहीं असें दर्शविण्याची अहमहमिका त्यांच्यांत सुरू झाली!

नवीन जमान्यांत आपल्याला कदाचित् मानाचें स्थान मिळणार नाहीं अशी थोडी धास्ती मनांत उत्पन्न होऊन जातिनिष्ठ पुढारीसुद्धां गांधीजींकडे येऊन आपण पुढाकार घ्याल तर तडजोड होण्याला अडचण पडणार नाहीं अशीं आश्वासनें देऊं लागले.

गांधीजी व आम्हीं डॉ. अन्सारी ह्यांच्या घरीं उतरलों होतों. तेथें उच्चनीच सर्व तऱ्हेच्या लोकांची अखंड रांग लागून राहिलेली असे. फुरसत सांपडली कीं त्यांच्याकडे पाहत बसणें बोधप्रद व मोठें मनोरंजक होतें. गेलीं कांहीं वर्षे आमचा संबंध शहरांतल्या व खेडोपाडींच्या साळ्यामाळ्यांशीं व तुरुंगांतील दरिद्री कैद्यांशींच फक्त येत असे. गांधीजींकडे जे लक्ष्मीपुत्र येत होते, त्यांनीं मनुष्यस्वभावाचा एक निराळाच नमुना आम्हाला दाखवून दिला. जिकडे शक्ति व यश दिसेल, तिकडे वळून हंसऱ्या चेहऱ्यानें त्याचें स्वागत करावें अशा मोठ्या लवचिक मनुष्यस्वभावाचा तो नमुना होता! त्यांच्यापैकीं पुष्कळजण हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचे आधारस्तंभ समजले जात. पण हिंदुस्थानांत जी कोणती सत्ता प्रस्थापित होईल, तिचे आधारस्तंभ व्हावयाला ते एका पायावर तयार आहेत हें पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं?

पुष्कळदां गांधीजींबरोबर मी सकाळीं फिरावयास जात असें. त्यांच्याशीं बोलण्याची आम्हांला तेवढीच एक संधि मिळत होती. फिरण्याच्या वेळींहि केव्हां केव्हां मुलाखत घेण्यासाठीं परदेशचे लोक अथवा एकादा मित्र यावयाचाच. भूत, वर्तमान व विशेषतः भविष्यकालीन अनेक गोष्टींवर आमची चर्चा होत असे. भविष्यकाळच्या कॅांग्रेसविषयीं गांधीजींची कल्पना ऐकून मी चकितच झालों. माझी समजूत अशी कीं स्वातंत्र्य मिळाल्यावर कॅांग्रेस संस्था आपोआपच नष्ट होईल. त्यांचें मत असें कीं कॅांग्रेस पुढेंहि चालू राहावी, मात्र ती एका अटीवर. तिच्या कोणत्याहि सभासदानें सरकारी नोकरी स्वीकारूं नये व कोणालाहि नोकरी पत्करावयाची असेल तर त्यानें कॅांग्रेसमधून अंग काढून घ्यावें. अशी शिस्त कॅांग्रेसनें सभासदांवर जारी करावी. त्यांची योजना सगळीच्या सगळी मला आठवत नाहीं. परंतु तिच्यांतील आधारभूत कल्पना अशी होती, कीं आपल्या वैराग्यानें व निःस्वार्थीपणानें शासनसंस्थेच्या

कार्यकारी मंडळावर व इतर खात्यांवर काँग्रेसला आपली नैतिक छाप पाडतां येईल व त्यांना योग्य मार्गावर राखतां येईल.

ही कल्पना फार विचित्र दिसते. मला तिचा नीटसा उलगडा होत नाहीं. व तिच्यासंबंधीं मनांत अनेक शंका उपस्थित होतात. अशा संस्थेची कल्पना मनानें केली, तरी अशा संस्थेचा देखील दुरुपयोग वरिष्ठ वर्गांना करतां येईल, असें मला वाटतें. व्यावहारिक गोष्टी सोडून दिल्या, तर गांधीजींच्या विचाराची बैठक समजून घेण्याच्या कामीं या योजनेचा थोडासा उपयोग खात्रीनेंच होण्यासारखा आहे. आधीं निश्चित ठरलेल्या कल्पनांप्रमाणें राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्घटना करण्यासाठीं राजसत्तेचा कबजा घेतां यावा म्हणून पक्षसंघटना करण्याची आधुनिक काळांतील जी कल्पना आहे, तिच्या गांधीजी सर्वस्वीं विरुद्ध आहेत. आर. एच. टॉने ह्यांच्या शब्दांत सांगावयाचें तर ' अधिकांत अधिक गाजरें, अधिकांत अधिक खेचरांना मिळावींत ' म्हणून अस्तित्वांत आलेले जे पक्ष आजकाल समाजांत दिसतात, तसला पक्ष स्थापन करण्याचीहि गांधीजींची इच्छा नाहीं.

गांधीजींची लोकसत्तेविषयींची कल्पना आध्यात्मिक आहे हें निःसंशय. बहुसंख्या, प्रतिनिधित्व वगैरे नेहमींच्या अर्थानें वापरण्यांत येणाऱ्या कल्पनांशीं तिचा संबंध नाहीं. त्यांची लोकशाही, सेवा व त्याग यांवर आधारलेली असून नैतिक दडपण हेंच तिच्या हातचें शस्त्र होय. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पत्रकांत * त्यांनीं लोकसत्तावाद्यांची व्याख्या दिली आहे. मी " जन्मजात लोकसत्तावादी आहें " असें ते म्हणतात. " मानव जातीमधील दरिद्र्यांतील दरिद्री माणसाशीं एकरूप होणें, ते राहतात तसेंच आपणहि राहावें अशी तळमळ वाटत असणें व आपली राहणी देखील त्यांच्यासारखी व्हावी म्हणून मनःपूर्वक प्रयत्नहि त्याचबरोबर सुरू ठेवणें, इतक्या गोष्टी केल्यावर स्वतःला लोकसत्तावादी समजण्यास जर हरकत नसेल तर मीहि स्वतःला लोकसत्तावादी म्हणूं इच्छितों. " नंतर लोकशाहीचें ते विवेचन करतात :

" काँग्रेसला लोकसत्ताक स्वरूपाची व लोकसत्तेच्या बळाची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, ती प्रतिवर्षी काँग्रेसला हजर राहणाऱ्या प्रतिनिधींच्या व प्रेक्षकांच्या संख्येमुळें नव्हे, तर तिच्या वाढत्या सेवेमुळें होय. पाश्चात्य लोकशाहीची जळून राख झाली नसेल, पण ती मुशींत वितळत पडली आहे हें खास. लोकशाही येथें यशस्वी करून दाखवून लोकशाहीचें खरें शास्त्र पूर्णावस्थेस नेण्याचा मान हिंदवासीयांनाच मिळावा, अशी माझी इच्छा आहे.

" सध्यांच्या लोकशाहीच्या पोटीं ढोंगीपणा व सांवळा गोन्धळ हे जन्मास येतात हें निःसंशय आहे; पण त्या गोष्टी अपरिहार्य समजण्याचें कारण नाहीं. केवळ संख्याबळ हें लोकशाहीचें निदर्शक नव्हे. ज्या समाजाचे ते प्रतिनिधि समजले जातात

* तारीख १७ सप्टेंबर १९३४.

त्या समाजाचें तेज, आशा व महत्त्वाकांक्षा त्यांच्यामार्फत नीट व्यक्त होत असतील, तर अशा प्रतिनिधींच्या हातीं असलेली सत्ता लोकशाहीशीं विसंगत ठरण्याचें कारण नाहीं. मारपीट करून लोकशाहीचा विकास होणेंच शक्य नाहीं. लोकशाहीची मनोवृत्ति बाहेरून लादतां येणार नाहीं. तिचा मनांतूनच उद्‌भव व्हावयास पाहिजे."

गांधीजी मान्यच करतात कीं ही पाश्चात्य लोकशाही नव्हे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कम्युनिस्टांच्या लोकशाहीविषयक कल्पनेशीं मात्र गांधीजींच्या कल्पनेचें बरेंचसें साम्य दिसून येतें. कारण त्यांच्याहि कल्पनेंत थोडी आध्यात्मिकता आहे. जनतेला आपल्या अडीअडचणींची दादहि नसली, तरी तिच्या खऱ्या गरजांचे व आकांक्षांचे आपण प्रतिनिधि आहोंत, असें मूठभर कम्युनिस्ट हक्कानें सांगतील. अर्थात् हें साम्य अल्प आहे व त्यावर फारसें विसंबून राहतां येणार नाहीं; कारण मार्ग व हिंसा यांसबंधींच्या दोघांच्या दृष्टिकोणांत अतिशय भिन्नता आहे.

गांधीजी लोकसत्तावादी असोत वा नसोत, हिंदी शेतकरी जनतेचे ते प्रतिनिधि आहेत हे खरें. त्या लाखों जीवांच्या व्यक्त व सुप्त इच्छाशक्तीचा परिपाक गांधीजींच्या ठिकाणीं उतरलेला आहे. शेतकऱ्यांचे ते केवळ प्रतिनिधीच नाहींत, तर असंख्य शेतकरी समाजाची गांधीजी म्हणजे जणूं काय घनीभूत प्रतिमा आहे. अर्थात् ते सामान्य शेतकऱ्याप्रमाणें खासच नाहींत. अत्यंत तीव्र बुद्धिमत्ता, मृदु अन्तःकरण, सदभिरुचि आणि विशाल दृष्टिकोण हे गुण त्यांच्या ठायीं आहेत. मानवी भावनांनीं त्यांचें हृदय नटलेलें असलें, तरी वासनाभावनांचें ज्यानें दमन केलें आहे व त्यांचें शोधन करून ज्यानें त्यांना अध्यात्मप्रवण बनविलें आहे, असे ते एक विरागी आहेत. अचाट व्यक्तिसामर्थ्य त्यांच्या अंगीं असून लोहचुंबकाप्रमाणें ते माणसें आपणांकडे खेंचून घेतात, व त्यांच्या अन्तःकरणांत जाज्वल्य निष्ठेची व प्रेमाची ओढ निर्माण करितात. हें सर्वसामान्य शेतकऱ्याला पेलणारें काम नव्हे. तरीहि त्यांना महान् शेतकरीच म्हटलें पाहिजे. कारण त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण शेतकऱ्याचाच आहे. जीवनांतील कांहीं कांहीं गोष्टी शेतकऱ्यांप्रमाणें त्यांच्याहि ध्यानांत येत नाहींत. पण आपल्या या शेतकरीप्रधान देशाची मात्र त्यांना पूर्ण माहिती आहे. त्यांत एवढीशेवढी हालचाल झाली, तरी गांधीजींच्या मनावर तिचे छाप उमटतात. जणूं कांहीं सहजप्रवृत्तीनेंच त्यांना परिस्थितीचें अचूक निदान बांधतां येतें. वेळेचें टिपण साधून कार्याला आरंभ करण्याची हातोटी त्यांना साधून गेली आहे.

गांधीजी म्हणजे सरकारला पडलेलें कोडें आहे. त्यांच्या देशबांधवांची व जिवलग मित्रांची अवस्था देखील सरकारप्रमाणेंच होते! इतर देशांत त्यांचें बस्तान कदाचित् बसणार नाहीं. पण पापाचरण, मुक्ति, अहिंसा वगैरेसंबंधीं धर्मप्रवर्तकाप्रमाणें बोलणाऱ्या ह्या माणसाची चहा हिंदुस्थानांत अद्यापि होत आहे, त्यांच्या शब्दांची खूण या देशांत अजूनहि पटत आहे. आपल्या त्यागाच्या व तपःसिद्धीच्या बळावर पुण्याईचे पर्वत रचून ज्यांनीं अल्पदेवांच्या अधिकाराला धाक दाखविला व नवा

युगधर्म फैलावला, अशा ऋषिवर्यांच्या गोष्टी हिंदी पुराणांतून पानोपानीं लिहिलेल्या आढळतात. अथांग भरलेल्या दैवी प्रभावाच्या संचयांतून अखंड स्रवणारें गांधीजींचें आश्चर्यकारक कर्तृत्व व मनःसामर्थ्य पाहून मला कधीं कधीं त्या गोष्टींची आठवण होते. सामान्य मातीपासून त्यांचा पिंड बनलेला नाहीं. गांधीजी म्हणजे दुर्मिळ धातूचें भांडें आहे. त्यांच्या डोळ्यांच्या गवाक्षांत अज्ञाताची मूर्ति उभी असलेली आम्हीं अनेकवार पाहिली आहे.

शहरी हिंदुस्थानवर, नव्या यंत्रयुगीन हिंदुस्थानवर सुद्धां या शेतकरी मनोवृत्तीचा ठसा उमटलेला आहे. अशा देशानें बाह्यात्कारी आपल्याचसारख्या पण असामान्य अशा आपल्या पुत्रालाच आपलें दैवत बनवावें, आपला पुढारी करावें, हें साहजिकच होय. जुन्या नामशेष होऊन पडलेल्या स्मृतिशिला त्यांच्या स्पर्शानें जिवंत झाल्या व देशाला आपल्या पूर्वस्वरूपाचें दर्शन घडलें. वर्तमानकालीन भीषण विपत्तींच्या चाकाखालीं देशाचा चेंदामेंदा उडाला होता. इतिहास व भविष्यकालीन परिस्थितीचीं अंधुक सुखस्वप्नें रंगवून, तर कधीं दीनपणें विव्हळून सांप्रतच्या यातना विसरण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण गांधीजींच्या आगमनाबरोबर त्याच्या मनाला विसांवा मिळाला आणि त्याच्या विशीर्ण झालेल्या देहांत सामर्थ्य संचरून, भविष्याच्या पटावर उज्ज्वल चित्रें रंगलीं. 'जानस' नामक द्विमुखी ग्रीक देवतेप्रमाणें हिंदुस्थान देशसुद्धां भूत व भविष्य काळाकडे दृष्टिक्षेप करीत होता व त्या दोन कालखंडांचा समन्वय करण्यासाठीं त्याची धडपड चालली होती.

आमच्यापैकीं कित्येकांनीं या शेतकरी दृष्टिकोणाचा त्याग केला होता. जुनी विचारपरंपरा, चालीरीति, धर्म वगैरे गोष्टी आम्हांला परक्या वाटत. आम्ही स्वतःला आधुनिक म्हणवून घेत होतों. "प्रगतीची" भाषा आमच्या तोंडीं खेळत असे. यंत्रयुग, उच्च दर्जाचें राहणीचें मान, सामुदायिक शेती वगैरे विचार आमच्या मनांत घोळत राहत शेतकऱ्याचा दृष्टिकोण उफराटा आहे असें आम्हाला वाटत असून समाजवाद, कम्युनिझम्, यांची आवड आमच्यांत उत्पन्न झाली होती. असें असूनहि आम्हीं गांधीजींबरोबर राजकारणांत सहकार्य केलें, त्यांचे अनेक बाबतींत कट्टर अनुयायी बनलों, हे कसें ! उत्तर देणें मोठें बिकट काम आहे आणि गांधीजींशीं ज्यांचा परिचय झालेला नाहीं, त्यांचें कोणत्याहि उत्तरानें समाधान होणार नाहीं. कारण व्यक्तित्व ही मानवाच्या अन्तःकरणाला मिठी घालणारी एक विलक्षण शक्ति आहे, तिचें वर्णन कसें करणार ? ही शक्ति गांधीजींच्या अंगीं भरपूर प्रमाणांत असून निकट येणाऱ्या लोकांना त्याचें स्वरूप निरालेंच भासूं लागतें. अगच्या व्यक्तित्वामुळें लोक त्यांच्याकडे आकर्षित होत असले, तरी अखेराला बुद्धीची खात्री पटते म्हणूनच ते त्यांच्या भजनीं लागतात हें मान्य केलें पाहिजे. त्यांचें तत्त्वज्ञान अगर त्यांचीं ध्येयें त्यांना सर्वस्वीं पटत नसतील, पुष्कळदां त्यांचा युक्तिवादहि समजत नसेल; परंतु प्रत्यक्ष कार्यासंबंधींच्या त्यांच्या सूचना मात्र वस्तुस्थितीला धरून असतात. आमच्या

नेभळ्या राजकारणाचा ऐदीपणा इतका काळ चालला होता कीं, कोणताहि कार्यक्रम आंखला असता तरी तो इष्टच वाटावा. गांधीजींनीं सुचविलेला कार्यक्रम तर धैर्याचा व परिणामकारक असून त्यावर नीतीचा उजळा चढलेला असल्यामुळें बुद्धि व भावना दोन्हीहि त्यांच्या योगानें थरारून गेल्या. त्यांचें तत्त्वज्ञान आम्हीं स्वीकारलें नसलें, तरी हलके हलके त्यांच्या कार्यक्रमाचा बिनचूकपणा आम्हाला पटूं लागला व आम्ही त्यांच्या निशाणाभोंवतीं गोळा झालों. अशा रीतीनें त्यांच्या तत्त्वज्ञानाची व कार्याची फारकत करण्यांत आमची चूक झाली असेल व त्यामुळें पुढें मानसिक झगडे व धुसफूस चालू होणें अपरिहार्यहि झालें असेल. पण गांधीजी हे कार्यप्रवण व बदलती परिस्थिति नीट पारखून वागणारे असल्यामुळें आम्हाला बरोबर वाटणाऱ्या मार्गालाच ते भविष्य काळीं येऊन मिळतील, अशी अस्पष्ट आशा आम्हाला मनांतून वाटत होती. कांहींहि असलें, तरी आतांपर्यंत त्यांनीं आंखलेला मार्ग तरी खासच योग्य होता. इतउत्तर वेगळे मार्ग फुटतील म्हणून आधींपासूनच अंतर सोडून चालूं लागणें मूर्खपणाचें आहे असें आम्हांस वाटलें.

ह्या सर्व विचारांदोलनाचा निष्कर्ष हा कीं आमचीं मनें अद्यापि ठाम, अथवा निःशंक बनलीं नव्हतीं. आमचे विचार अधिक तर्कशुद्ध असले, तरी जनमनाचें नाडीज्ञान गांधीजींना फार चांगलें आहे, त्यांच्यावर लोक इतकी निष्ठा व श्रद्धा ठेवतात तेव्हां जनतेला जी गोष्ट हवी ती त्यांच्या अंगीं असली पाहिजे, असे विचार नेहमीं मनांत येत. त्यांची खात्री पटवली कीं जनतेचीहि खात्री पटली असती. दृष्टिकोण शेतकऱ्यांचा असला तरी जन्मजात बंडखोरी त्यांच्या रक्तांत होती. प्रचंड बदल घडवून आणण्याचें कंकण त्यांनीं हातीं बांधलेलें असून परिणामाच्या भीतीनें त्यांचें पाऊल अडखळणारें नव्हतें, त्यामुळें त्यांची खात्री पटवितां येईल असें वाटे.

आमच्या बेहिमती व सुस्त लोकांना शिस्त लावून त्यांनीं केवढें काम करवून घेतलें! आणि त्यांत जुलूम नाहीं कीं लालुच नाहीं. प्रेमळ नजरेनें, गोडशा शब्दानें, आणि सर्वांत अधिक परिणामकारी अशा स्वतःच्या उदाहरणानें त्यांनीं लोकांना जागें केलें. १९१९ सालीं सत्याग्रह हिंदुस्थानांत नुकताच सुरू झाला होता, तेव्हां मुंबईचे उमर सोबानी गांधीजींचें "लोकप्रिय मुकादम" असें वर्णन करीत! १९३१ सालापासून मागचें सिंहावलोकन केलें कीं सानंद गर्व वाटे. १९३० सालीं हिंदुस्थानांत जणूं कांहीं नवल वर्तलें. आपल्या मंत्रशक्तीनें गांधीजींनीं देशाचें स्वरूप जणूं कांहीं पालटून टाकलें. आम्हीं ब्रिटिश सरकारला कायमचें लोळवलें अशी मूर्खपणाची समजूत कोणींच करून घेतली नव्हती. पण आम्हाला अभिमान वाटत होता तो सरकारवर मात केली म्हणून नव्हे. आमच्या बधुभगिनींविषयीं, तरुणांविषयीं, मुलांविषयीं आम्हांला अभिमान वाटे. कोणत्याहि काळीं, कोणत्याहि राष्ट्राला हितप्रद होईल असाच मानसिक उत्कर्ष आम्हीं साधला होता. त्यांतल्या

त्यांत आमच्या जित आणि पददलित राष्ट्राचें तर अत्यंत मोठें कल्याण झालें होतें. ह्या मोलाच्या संचयांतून एक पैसुद्धां गहाळ होऊं नये म्हणून आम्ही जपत होतों.

गांधीजी मला अतिशय ममतेनें व सौजन्यानें वागवीत असत. वडिलांच्या मृत्यूमुळें आमचा संबंध विशेषच दृढ झाला. मी म्हणेन तें सगळें ते शांतपणें ऐकून घेत व माझ्या इच्छेनुसार शक्य तों वागण्याचा प्रयत्न ठेवीत. ह्यामुळें मनाला अशी आशा लागून राहिली होती कीं मी व माझे कांहीं सहकारी मिळून त्यांना हलके हलके समाजवादी मार्गावर आणून सोडूं. आपणाला तो मार्ग पटला, तर एकेक पाऊल त्या दिशेनें टाकण्याची आपली तयारी आहे असें ते सुद्धां म्हणाले होते. सध्यांच्या सामाजिक व्यवस्थेंत नांदत असणारी विपत्ति, उधळमाधळ, अन्याय्यता व हिंसा हीं सर्व दुःखें नष्ट करावयाचीं असतील, तर समाजवादाचे मूलभूत सिद्धांत मान्य करण्याशिवाय गांधीजींना गत्यंतर नाहीं असें त्या वेळीं मला वाटत होतें. कार्य-पद्धतीबद्दल मतभेद झाला, तरी ध्येयाच्या बाबतींत मतभेदाला जागा आहेच कोठें? हे तेव्हांचे विचार. पण गांधीजींचें ध्येय व समाजवाद्यांचें ध्येय यांच्यामध्यें मूलतः भेद आहेत, हा गोष्ट मला आतां स्पष्टपणें कळून चुकली आहे.

असो. १९३१ सालच्या दिल्ली येथील प्रसंगाकडे पुनः वळूं या. गांधी-अर्विन वाटाघाटी कांहीं काळ चालून पुनः एकाएकीं बंद पडल्या. कित्येक दिवस गांधीजींना व्हाइसरॉयकडून निमंत्रण आलें नाहीं व तडजोड फिसकटली असें वाटून वर्किंग कमिटीचे सभासद घरोघर जाण्याच्या तयारीला लागले. पुढील कार्यक्रमा-विषयीं व कायदेभंगाविषयीं एकत्र जमून आम्हीं पुनः विचार केला. कारण तडजोड फिसकटल्याचें जाहीर झाल्यावर पुनः भेटणें शक्य होणार नाहीं हें उघडच दिसत होतें. पूर्वीहून फार भयंकर अशी दडपशाही या खेपेला सरकार सुरू करील अशा वदंता कानीं येत होत्या, म्हणून चळवळीला मार्गदर्शक होतील असे अनेक ठराव आम्हीं पसार केले. एक ठराव थोडासा महत्त्वाचा होता. इतके दिवस प्रत्येक हंगामी अध्यक्ष आपल्यानंतरच्या अध्यक्षाची व वर्किंग कमिटीच्या सदस्यांची नेमणूक करी. पण बदली वर्किंग कमिटीच्या हातीं चळवळीला नवी दिशा लावण्याचा फारच थोडा अधिकार होता. ह्या बदली कमिट्यांची परंपरा चालू राहिली, तर पुढें घोटाळा माजण्याचा संभव दिसूं लागला. तेव्हां यापुढें नेमणुका करण्यांत येऊं नयेत असा ठराव दिल्ली येथें झाला. जोंपर्यंत वर्किंग कमिटीच्या सभासदांपैकीं कोणीहि मोकळे असतील (अथवा मोकळा असेल) तोंपर्यंत त्यांनींच पूर्ण वर्किंग कमिटी म्हणून अधिकार चालवावा, आणि सर्वच सदस्य अडकून पडले कीं वर्किंग कमिटीचे अधिकार देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या हातीं यावे व नंतर सर्व जनतेनें नेटानें लढा चालवावा, असें ठरविण्यांत आलें.

या ठरावानें अगदीं रोखठोक मार्ग दाखवून दिला; त्यांत तडजोडीला जागाच राहिली नाहीं. पण मुख्य केंद्राला देशांतील इतर केंद्रांशीं व्यवस्थित प्रकारें दळण-

वळण ठेवणें अशक्य होत चाललें होतें, हेंहि ह्या ठरावावरूनच स्पष्ट होत होतें. आमचीं कार्यकर्तीं माणसें सरकारला चांगलीं ठाऊक होतीं. तीं उघडपणें काम करीत असल्यामुळें दळणवळणाच्या अडचणी उद्भवणें अपरिहार्य झालें. १९३० सालीं अहवाल आणण्यासाठीं, हुकुम पोंचविण्यासाठीं व तपासणीचें काम करण्यासाठीं गुप्त व्यवस्था करण्यांत आली होती. ह्या अधिकारी दलाचें काम ठाकठीकपणें चालत असे. मनांत आलें तर असें गुप्त खातें यशस्वी रीतीनें चालवितां येतें ही गोष्ट एवढ्यावरून सिद्ध झाली. परंतु हा प्रकार गांधीजींना नापसंत होता. हा व इतर ठराव पास करून आम्हीं जावयास निघालों. पण इतक्यांत लॉर्ड अर्विनकडून पुन: बोलावणें आलें व वाटाघाटींना पुन: सुरवात झाली.

४ मार्च रोजीं मध्यरात्रीपर्यंत गांधीजींची वाट पाहत आम्हीं बसलों होतों. पण ते सुमारें दोन वाजतां परत आले व आम्हांला उठवून तडजोड निश्चित झाल्याचें वृत्त त्यांनीं आम्हांला कळविलें. आम्हीं मसुदा पाहिला. त्यांतील बहुतेक मुद्दे मला माहीत होतेच; परंतु संरक्षक बंधनांविषयींचें त्यांतील दुसरें कलम पाहून मात्र मी थक्क झालों. त्या विषयावर मीं विचार केलेला नसल्यामुळें मी त्या वेळीं कांहीं बोललों नाहीं, व आम्हीं सर्वजण झोंपण्यासाठीं निघून गेलों.

गोष्ट होऊन गेली. आतां तिच्याविषयीं अधिक वाच्यता करण्यांत अर्थ नव्हता. आमच्या नेत्याचा शब्द गुंतला होता. आणि आमचा मतभेद असला तरी आम्हीं करणार होतों काय ? त्यांना खालीं ओढणार होतों ? त्यांच्यापासून फुटून निघणार होतों ? कीं आपला मतभेद चावडीवरून जाहीर करणार होतों ? असें करून एखाद्या व्यक्तीचें समाधान झालें असतें; पण निर्णयाला त्यामुळें बाध येणार होता थोडाच. आतां कांहीं काळ तरी कायदेभंग थांबला ही गोष्ट निश्चित होती. तडजोडीला गांधीजींची मान्यता आहे असें सरकारला जाहीर करतां आलें असतें. अशा वेळीं मनांत असतें, तरी खुद्द वर्किंग कमिटीलाहि कायदेभंग सुरू करणें शक्य झालें नसतें. कायदेभंग कांहीं काळ थांबवून सरकारशीं तात्पुरती तडजोड करावयास मी व माझे सहकारी पूर्णपणें तयार होतों. आपल्या बांधवांना परत तुरुंगांत पाठवणें अथवा तुरुंगामध्यें जे हजारों लोक खितपत पडले होते त्यांना तेथें तसेंच डांबून ठेवणें सोपें काम नव्हतें. तुरुंगांत दिवसच्या दिवस आणि रात्रीच्या रात्री घालवणें ही सुखाची बाब नाहीं. शिवाय तीन आठवड्यांपर्यंत चाललेल्या ह्या वाटाघाटींमुळें देशामध्यें अपेक्षेचें वातावरण पसरलें असून तडजोड फिसकटली असती, तर जनतेची निराशा झाली असती. म्हणून कोणत्याहि मूलभूत धोरणाला बट्टा लागत नसेल, तर तात्पुरता समेट करावा असेंच वर्किंग कमिटीच्या सर्व सदस्यांचें मत होतें.

ज्या कित्येक मुद्द्यांवर वादविवादाचीं वादळें उत्पन्न झालीं, ते मला विशेष महत्त्वाचे वाटले नाहींत. दोन बाबींकडेच माझें विशेष लक्ष होतें. स्वातंत्र्याचें ध्येय कोणत्याहि प्रकारें मलिन होऊं नये हा एक मुद्दा व ह्या तडजोडीचा

परिणाम संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काय होणार हा दुसरा. खंडबंदीची व करबंदीची चळवळ मोठ्या यशस्वी रीतीनें चालू असून कांहीं कांहीं ठिकाणीं तर कवडीसुद्धां वसूल झाली नव्हती. शेतकरी दमदारपणें लढत होते. जागतिक मंदीमुळें त्यांची स्थिति बिकट होत चालली होती. आमच्या करबंदीच्या चळवळीचें स्वरूप राजकीय व आर्थिक असें दुहेरी होतें. समेट तात्पुरता झाला तर कायदेभंग थांबेल व करबंदीचें राजकीय स्वरूप नष्ट होईल, पण तिची आर्थिक बाजू कायमच राहणार; कारण बाजारभाव कमालीचे घटल्यामुळें खंड अथवा कर देण्याचें त्राण शेतकऱ्यांत लवमात्र राहिलें नव्हतें, त्याची वाट काय? हा मुद्दा गांधीजींनीं व्हाइसरॉयजवळ स्पष्ट केला. करबंदीची चळवळ मागें घेऊं, पण शेतकऱ्यांना न झेपेल असा कर भरण्याचा सल्ला आम्ही देणार नाहीं असें त्यांनीं बजावून सांगितलें. ही प्रांतिक बाब असल्याकारणानें हिंदुस्थान सरकार-बरोबर तिची बारकाईनें वाटाघाट करणें शक्य झालें नाहीं. प्रांतिक सरकार आमच्याशीं वाटाघाटी करून शेतकऱ्यांची दुःस्थिति निवारण करण्याचा प्रयत्न करील, असें आश्वासन देण्यांत आलें. आश्वासनाची भाषा मोघम होती; पण त्या परिस्थितींत ह्याहून अधिक निश्चित असें कांहींहि हाताला लागणें शक्य झालें नसतें. अशा रीतीनें हा मुद्दा कांहीं वेळपर्यंत तरी निकालांत निघाला.

राहतां राहिला स्वातंत्र्याच्या ध्येयाचा प्रश्न. तडजोडींतील दुसऱ्या कलमा-मुळें आमचें ध्येय बाधित झालें होतें. एक वर्षपर्यंत लोक इतक्या शर्थीनें लढले ते यासाठींच का? आमच्या उक्तींचा व कृतींचा शेवट अशा रीतीनें व्हावा काय? कॉंग्रेसचा स्वातंत्र्याचा ठराव, पुनःपुनः उच्चारलेली २६ जानेवारीची प्रतिज्ञा, ह्या सर्वांचा हाच का निष्कर्ष? हेच विचार त्या रात्रीं मी अंथरुणावर पडलों असतां माझ्या डोक्यांत घोळत होते आणि कांहीं तरी बहुमोल वस्तु गहाळ व्हावी, हरपून जावी, त्याप्रमाणें माझ्या अन्तःकरणामध्यें एक तऱ्हेचा शून्याकार माजला होता.

३५

# कराची-काँग्रेस

माझ्या अस्वस्थतेची कुणकुण गांधीजींच्या कानीं गेली व दुसऱ्या दिवशीं सकाळीं फिरावयास जातांना त्यांनीं मला बोलावून घेतलें. आम्हीं खूप वेळ चर्चा केली. कोणताहि मुख्य मुद्दा आपण गमावलेला नाहीं व आपल्या हातून कोणत्याहि प्रकारची तत्त्वच्युति झालेली नाहीं हें पटवून देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. स्वातंत्र्याच्या ध्येयाशीं जमेल असा अर्थ तडजोडींतील दुसऱ्या कलमावर त्यांनीं बसवून दाखविला. "हिंदुस्थानच्या हिताचे" ह्या शब्दांवर त्यांचा सारा भर होता. ही अर्थनिष्पत्ति ओढून ताणून बसविलेली होती. तीमुळें माझी खात्री पटली नसली, तरी माझी अस्वस्थता बरीच कमी झाली. 'तडजोडीच्या मसुद्याचे गुणावगुण कांहींहि असोत, पण आम्हांला आश्चर्यचकित करून टाकण्याची तुमची ही रीत पाहून मला तुमचें थोडें भय वाटूं लागलें आहे. १४ वर्षांच्या दाट परिचयानंतरहि आम्हांला ज्यांचा थांग लागलेला नाहीं, अशा कित्येक अज्ञात गोष्टी तुमच्यांत दडलेल्या असल्यामुळें प्रसंगीं काय घडेल याविषयीं मन साशंक होतें' असें मीं बोलून दाखविलें. वस्तुस्थिति तशी असल्याचें त्यांनींहि मान्य केलें. पण आपल्या मनांतील अज्ञात दालन उघडून दाखविणें अथवा त्यापासून काय काय घटना घडून येतील त्याविषयीं ठाम मत देणें मला देखील शक्य नाहीं असें ते म्हणाले.

विचारांचा हिंदोळा एकदोन दिवस असाच खालवर होत होता. काय करावें तें सुचेना. तडजोडीला विरोध अगर आडकाठी करण्याचा प्रश्नच नव्हता. फार तर प्राप्तस्थिति म्हणून व्यवहारांत तडजोड मान्य करून तर्कदृष्ट्या मात्र आपली अमान्यता स्पष्ट करावयाची, एवढेंच मला करतां आलें असतें. तसें केल्यानें माझा वैयक्तिक अभिमान कदाचित् सुखावला असता; पण त्यापलीकडे त्याचें महत्त्व तें काय? झालें हेंच गोड मानून चालावें व गांधीजींप्रमाणें आपल्याला इष्ट तो अर्थ त्यांतून काढावा हें बरें नव्हे का? तडजोडीनंतर बातमीदारांना दिलेल्या मुलाखतींत त्यांनीं तोच अर्थ आग्रहानें प्रतिपादन केला होता व पूर्ण स्वातंत्र्य हेंच आमचें ध्येय आहे असेंहि सांगितलें होतें. लॉर्ड अर्विनशीं झालेल्या सभाषणांतहि हा मुद्दा त्यांनीं निःसंदिग्धपणें मांडला होता. मंडलाकार परिषदेला कांग्रेसनें यदाकदाचित् प्रतिनिधि पाठवला, तर हा हक्क मांडण्यासाठींच तो तेथें जाईल ही गोष्टसुद्धां त्यांनीं स्पष्ट केली.

पुष्कळ शारीरिक व मानसिक तगमगीनंतर तडजोड मान्य करून ती टिकविण्यासाठीं मनापासून झटावयाचें असें सरतेशेवटीं मीं ठरविलें. दुसरा-तिसरा मार्गच मला दिसत नव्हता.

कायदेभंगाव्यतिरिक्त इतर कारणांनीं तुरुंगांत पडलेल्या राजकीय कैद्यांच्या मुक्ततेविषयीं तडजोडीपूर्वी व नंतरहि गांधीजी अर्विन यांच्याशीं बोलले होते. कायदेभंगांतील कैद्यांची सुटका व्हावी असें कलम समेटांतच होतें. परंतु चौकशी-वांचून किंवा चौकशीनतर तुरुंगांत ठेवलेले हजारों कैदी होते, त्यांची गत काय? चौकशीविना कित्येक स्थानबद्ध राजबंदी वर्षानुवर्षे अडकून पडले होते व त्यामुळें सर्व देशभर आणि विशेषतः बंगालमध्यें बराच असंतोष पसरला होता. परंतु पुरावा नसणें हाच मोठ्यांत मोठा पुरावा असें हिंदुस्थान सरकारला वाटत असे. कारण पुरावा आणलाच नाहीं तर तो नाशाबीत तरी कसा करणार? स्थानबद्ध राजबंदी हे फार भयंकर क्रांतिकारक आहेत अथवा होण्याचा संभव आहे असें सरकारतर्फे सांगण्यांत येई. राजकीय वातावरण शांत व्हावें व बंगालमधील व्यवहार अधिक सुरळीत चालावे म्हणून अशा राजबंद्यांची सुटका करणें आवश्यक आहे असा आग्रह गांधीजींनीं धरला होता; पण सरकारनें त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

जनतेतील असंतोष लक्षांत घेऊन भगतसिंगाची फांशीची शिक्षा रद्द करावी यासाठीं गांधीजींनीं परोपरीनें विनविलें, पण त्याचाहि उपयोग झाला नाहीं.

त्याच सुमाराला घडलेला एक प्रसंग माझ्या चांगला लक्षांत राहिला आहे. हिंदुस्थानांतील दहशतवाद्यांच्या मनःस्थितीची मला त्यामुळें चांगली कल्पना आली. वडिलांच्या मृत्यूच्या आगेमागें घडलेली ही गोष्ट असावी. मला भेटण्यासाठीं एक अनोळखी गृहस्थ आमच्या घरीं आला व आपलें नांव चंद्रशेखर आझाद आहे असें त्यानें सांगितलें. मीं त्याला पूर्वी कधीं पाहिला नव्हता. परंतु १९२१ च्या कायदे-भंगाच्या चळवळींत शाळा सोडून तो तुरुंगांत गेला त्या वेळीं त्याचें नांव माझ्या कानीं आलेलें होतें. १५ वर्षे वयाच्या त्या मुलाला तुरुंगांतील शिस्तीचा भंग करण्याबद्दल फटक्यांची शिक्षा देण्यांत आली. त्यानतर तो दहशतवादी गटाला जाऊन मिळाला व उत्तर हिंदुस्थानांतील दहशतवाद्यांत त्याला प्रामुख्याचें स्थान प्राप्त झालें. या सर्व बातम्या उडत उडत माझ्या कानीं पोंचत, पण यांत मी फारसें लक्ष घालीत नसें. त्यामुळें तो आला याचें मला नवल वाटलें. काँग्रेस व सरकार यांच्यामध्यें वाटाघाटी सुरू होणार अशी अपेक्षा असल्यामुळें माझ्याकडे यावें असें त्याला वाटलें. तडजोड ठरलीच तर आपल्या गटांतील लोकांना कोठें थारा मिळेल कीं नाहीं याबद्दल चौकशी करण्यासाठीं तो आला होता. पूर्वीप्रमाणेच कायद्याच्या संरक्षणापलीकडचीं माणसें असें समजून आपणाला पकडणारास बक्षिसें देण्याच्या जाहिराती फडकावण्यांत येऊन आपली शिकार चालू राहील, व आपल्या मानेभोंवतीचे फांस पूर्वीप्रमाणेंच आवळले

जातील कीं आपणाला इतर नागरिकांप्रमाणें शांततेनें उद्योगधंदे करण्याची सवड मिळेल? केवळ दहशतवादानें भलें होणार नाहीं, दहशतवादाची कार्यपद्धति निष्फल आहे अशी आपली व आपल्या सहकाऱ्यांची खात्री झाल्याचें त्यानें मला सांगितलें. अर्थातच शांततामय मार्गानें हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवितां येईल ह्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तो तयार नव्हता. भविष्यकाळांत केव्हां तरी हिंसामय लढा खेळावा लागेल असें त्याला वाटे. परंतु लढा म्हणजे दहशतवाद नव्हे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळींत दहशतवादाला स्थान उरलेलें नाहीं ह्याबद्दल त्याला शंका राहिली नव्हती. पण त्यांना स्थायिक होण्याची संधीच मिळाली नाहीं; सर्व काळ सरकारी कुत्रे पाठलाग करीत राहिले तर त्यांनीं काय करावें हा मोठा प्रश्न होता. अलीकडे घडलेलीं दहशतवाद्यांचीं कृत्यें केवळ आत्मरक्षणासाठीं करावीं लागलीं असें त्याचें म्हणणें होतें.

दहशतवादावरील विश्वास नष्ट होत चालला आहे ही गोष्ट अझादनें सांगितल्यावर मला समाधान वाटलें. त्याच्या म्हणण्याचें प्रत्यंतरहि पुढें मला मिळालें. संघटित कार्याची पद्धति या दृष्टीनें दहशतवाद जवळ जवळ नामशेष झाला होता. वैयक्तिक व फुटकळ अशीं कृत्यें घडत त्यांच्या मुळाशीं सूडाचीं अथवा वैयक्तिक लहरीपणाचीं कारणें असत. जुने दहशतवादी अथवा त्यांचे सहकारी अहिंसावादाचे भक्त झाले होते अथवा ब्रिटिश राजसत्तेचे स्तुतिपाठक बनले होते, असा मात्र याचा अर्थ नव्हे. तथापि पूर्वींच्या दहशतवादासंबंधींच्या कल्पना आतां उरल्या नव्हत्या. त्यांच्यापैकीं पुष्कळांची विचारसरणी आतां फॅसिस्ट पंथाकडे झुकली आहे असें मला वाटतें.

माझी राजकीय कार्यक्रमाची कल्पना मीं चंद्रशेखरला स्पष्ट करून सांगितली, व त्याचें मन वळविण्याचा मीं प्रयत्न केला. पण त्याच्या एका मुद्द्याच्या प्रश्नाचें मला उत्तर देतां आलें नाहीं. त्यांच्या गटांतील लोकांना स्वस्थता लाभेल अशी कोणतीच तडजोड घडून येण्याचा संभव नव्हता. त्यानें आपलें वजन खर्च करून इतःपर दहशतवादी कृत्यें न होतील अशी तजवीज करावी, कारण त्यामुळें त्यांच्या स्वतःच्या गटाचें व त्याचप्रमाणें राष्ट्रीय लढ्याचेंहि नुकसान होईल, एवढीच सूचना मीं त्याला केली.

नंतर दोनतीन आठवड्यांनीं गांधी–अर्विन मुलाखती चालू असतांना चंद्रशेखर अझादला अलाहाबादेस पोलिसांनीं गोळी घालून ठार मारल्याचें वृत्त मला दिल्ली येथें समजलें. एका बागेंत दिवसा तो ओळखला जाऊन त्याच्याभोंवतीं पोलिसांचा गराडा पडला. झाडाआड दडून आपला बचाव करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला होता. पोलिस व चंद्रशेखर यांच्यामध्ये गोळीबाराची लहानशी चकमक उडाली. एकदोन पोलिसांना घायाळ केल्यानंतर तो स्वतः गोळीबाराला बळी पडला.

तडजोड झाल्यानंतर मी लखनौला गेलों. सर्व देशांतील कायदेभंग थांबवण्या-

हुकुम आम्हीं ताबडतोब सोडले, व ते सर्व काँग्रेस-संस्थांनीं अत्यंत शिस्तीनें अंमलांत आणले. आमच्यापैकीं पुष्कळ लोक ज्वलज्जहाल होते, ते असंतुष्ट झाले. जुन्या कार्यक्रमापासून त्यांना परावृत्त करण्याचें कोणतेंच साधन काँग्रेसपाशीं नव्हतें. पुष्कळांनीं तडजोडीवर टीका केली. तथापि काँग्रेसचा आदेश सगळीकडे निरपवादपणें पार पाडण्यांत आला. आमच्या प्रांतांत करबंदीच्या चळवळीला जोर लागला असल्यामुळें या नव्या धोरणाची अंमलबजावणी तेथें कशी होते इकडे माझें विशेष लक्ष लागून राहिलें होतें. कायदेभंग करून तुरुंगांत गेलेल्या राजबंद्यांना सोडवून आणणें हें आमचें आद्य कर्तव्य होतें. दररोज हजारों कैद्यांची सुटका होऊं लागली.

मुक्त झालेले कैदी आपआपल्या शहरीं अथवा गांवीं गेले कीं स्वागत-समारंभ करण्यांत येई. गांवकरी ध्वजापताका लावीत, मिरवणुकी काढीत, सभा भरवीत, अभिनंदनाचीं भाषणें होत. ह्या सर्व गोष्टी अगदीं स्वाभाविक अशाच होत्या. पण नित्य डोळ्यांना दिसणारें लाठीराज्य व सभाविध्वंसाचा काळ आणि हे समारंभ यांत एकाएकीं जमीन-अस्मानाचा फरक पडला तो डोळ्यांत खुपून पोलिसांना शरमिंदेपणा वाटूं लागला. तुरुंगांतून बाहेर पडणारे लोक विजयी मुद्रेनें बाहेर पाऊल टाकीत. गर्व वाटण्यासारखें कांहीं घडलेलें होतें असें नाहीं; पण तुरुंगांत माणूस सफाई खच्ची झाला नसेल तर सुटकेनंतर तो थोडा तरी खुलतोच, व हजारोंची मुक्तता एकदम झाली म्हणजे तर आनंदाला चांगलीच भरती येते.

मीं ह्या प्रसंगाचा येथें उल्लेख केला त्याचें कारण असें कीं, नंतर कांहीं दिवसांनीं ह्या स्वागत-समारंभाबद्दल सरकारचा आमच्यावर रोष झाला, व ह्या "विजय प्रदर्शना"ला तें हरकत घेऊं लागलें. हुकुमी वातावरणांत वाढलेल्या व वागणाऱ्या आणि जनशासन म्हणजे लष्करी दडुकेशाही अशी कल्पना जनतेच्या प्रेमाचा अथवा पाठबळाचा स्वतःला आधार नसल्यामुळें होऊन बसलेल्या सरकारला आपली प्रतिष्ठा कमी होत चाललेली पाहून अपरंपार दुःख होणारच. ही गोष्ट आमच्या मुळीं ध्यानांतच आली नाहीं. आणि नंतर जेव्हां आम्हांला समजलें कीं सिमल्याच्या शिखरस्थ अधिकाऱ्यांपासून तों तहत दऱ्याखोऱ्यांतील अंमलदारापर्यंत सगळे जण लोकांचा हा बेमुर्वतखोरपणा पाहून मनांतून अगदीं कुढत होते, तेव्हां आम्ही थक्कच झालों! त्यांची री ओढणारीं वृत्तपत्रें तर तो काळ अद्यापि सुद्धां विसरलीं नाहींत. विजयानें फुगून जाऊन काँग्रेसचे लोक ज्या वेळीं वागत, त्या कलिकालाची आठवण झाली कीं, अजूनहि त्यांच्या अंगावर शहारे येतात. त्या काळांत त्यांची किती तारांबळ उडाली होती व खऱ्या भावना दडपून ठेवाव्या लागल्याकारणानें मनें कशीं नासून गेलीं होतीं तें सरकारच्या व वृत्तपत्रांच्या अकांडतांडवामुळें उघडकीस आलें. काँग्रेसच्या साध्याभोळ्या अनुयायांनीं चारदोन सभा भरविल्या अथवा मिरवणुकी काढल्या कीं त्यांचें पित्त खवळून जावें ही नवलाची गोष्ट नव्हे काय?

सरकारला खडे चारल्याचा गर्व त्या काळीं कॉंग्रेसच्या अनुयायांना झाला नव्हता; पुढारी वर्गाला तर नव्हताच नव्हता. पण आमच्या देशबांधवांचा त्याग व शौर्य पाहून मात्र आम्हांला विजय मिळाल्याप्रमाणें आनंद झाला. १९३० सालीं जें कार्य आम्हीं केलें, त्या योगानें आमचा स्वाभिमान व आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन आमचा साधा स्वयंसेवकदेखील छाती पुढें काढून चालूं लागला. या महत्प्रयत्नाच्या योगानें जगाचें लक्ष आमच्याकडे वेधून ब्रिटिश सरकारवर खूपच दडपण आणतां आलें व आम्ही आमच्या ध्येयाच्या आणखी जवळ आलों आहोंत अशी आमची कल्पना झाली. परंतु सरकारच्या पराभवाचा यांत कांहीं संबंध नव्हता. उलट, दिल्ली-समेटामुळें सरकारचीच सरशी झाली याची आम्हाला पूर्ण जाणीव होती. ध्येय अद्यापि फार दूर आहे, मध्यंतरींच्या काळांत फार बिकट व प्रचंड लढे लढावे लागतील असें आमच्यापैकीं जे म्हणत, त्यांना सरकारचे घरजांवई उलट नांवें ठेवीत कीं, हे युद्धाला लालचावलेले व दिल्ली-समेट मोडूं पाहणारे लोक आहेत.

संयुक्त प्रांतांत आमच्यापुढें शेतकऱ्यांचा प्रश्न खडा होता. शक्य तों ब्रिटिश सरकारशीं सहकार्य करण्याचें धोरण आंखण्यांत आलेलें असल्यामुळें आम्हीं प्रांतिक सरकारशीं तावडतोब पत्रव्यवहार सुरू केला. गेले एक तप सरकारचे व आमचे संबंध तुटले होते ते पुनः सांधले जाऊन मीं प्रांतांतील कांहीं बड्या अधिकाऱ्यांच्या या बाबतींत गांठीभेटी घेतल्या. लांबलचक पत्रव्यवहारहि सुरू झाला. प्रांतिक सरकारशीं बोलणें चालणें करण्यासाठीं प्रांतांतील एक प्रमुख कार्यकर्ते गोविंद वल्लभ-पंत यांची कॉंग्रेस कमिटीनें नेमणूक केली. शेतकऱ्यांची दुरवस्था, बाजारभावांतील अभूतपूर्व मंदी, खंड भरण्याची कुळांची अपात्रता, ह्या सर्व गोष्टी मान्य करण्यांत आल्या. पण सूट किती द्यावी ह्या प्रश्नाचा निकाल लावणें सरकारच्या हातीं होतें. खंडाची सूट देण्याबाबतचा कारभार बहुधा जमीनदारांच्या हातीं असे; त्यांत ढवळा-ढवळ करण्याचा सरकारचा शिरस्ता नव्हता. पण सरकारनें सारासूट दिली नाहीं तोंपर्यंत खंडसुटीचें नांवदेखील जमीनदार काढूं देईनात. शिवाय खंडसूट देण्यास ते फारसे तयारहि नसत. एवंच, सव शेंडी होती सरकारच्याच हातीं.

शक्य तेवढा खंड भरा, कायदा थांबला आहे, असें प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें शेतकऱ्यांना सांगितलें. पण इकडे शेतकऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून ते सरकारकडे जात तेव्हां मात्र सरकारनें भरपेस सूट द्यावी अशी मागणी करीत. बराच काळ सरकारनें कांहीं निर्णय दिला नाहीं. गव्हर्नर सर माल्कम हेली रजेवर अगर कांहीं खास कामावर गेले होते, त्यामुळें घोंगडें भिजत पडलें असावें. कांहीं तरी उपाय दूरदर्शी-पणानें पण तत्काळ करावयास हवे होते. परंतु हंगामी गव्हर्नर आपला हात अडकवून घेण्यास कचरूं लागले. या चालढकलीमुळें आधींच बिकट असलेली परिस्थिति अधिक बिकट झाली व शेतकऱ्यांचें फार नुकसान झालें.

दिल्ली-समेटानंतर कांहीं दिवस माझी प्रकृति बिघडली होती. तुरुंगांत

असतांनाच प्रकृतींत थोडा बिघाड झाला होता. नंतर वडिलांच्या मृत्यूचा धक्का बसला. उपरान्त दिल्ली येथील वाटाघाटी सुरू झाल्या त्याची दगदग बाधली. कराची-कॉंग्रेसपर्यंत प्रकृतींत थोडी सुधारणा झाली होती.

कराची हिंदुस्थानच्या एका टोंकाला व आडबाजूला असूनहि तेथें दूरदूरहून पुष्कळच लोक आले होते. देशाच्या त्या वेळच्या मनःस्थितीचें उत्तम प्रतिबिंब कराची-अधिवेशनांत दिसून आलें. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीचा वाढता आणि जोरदार कोंब पाहून शांत व गंभीर समाधानाची छटा तेथें उमटलेली होती. आणीबाणीच्या वेळीं सुद्धां मोठ्या मानानें व त्यागानें मिरवून राहिलेल्या कॉंग्रेस संघटनेविषयीं अभिमान वाटत होता. जनतेविषयीं विश्वास वाटत असल्यामुळें उत्साहांत देखील धिम्मेपणा दृग्गोचर होत होता. पण पुढयांत पसरलेल्या प्रचंड प्रश्नांच्या व संकटांच्या जबाबदारीची विस्मृति मात्र मनाला झाली नाहीं. कॉंग्रेसच्या शब्दागणिक व ठरावागणिक देशव्यापी कार्य चालू व्हावयाचीं असल्याकारणानें ते सहजासहजीं उच्चारणें अथवा पसार करणें शक्य नव्हतें. दिल्ली-समेट प्रचंड बहुमतानें मंजूर झाला असला, तरी तो लोकप्रिय झाला नव्हता व त्यामुळें उत्तरोत्तर आपण तत्त्वभ्रष्ट होत जाऊं अशी शंकाहि मनांत डोकावत असे. कां कोणास ठाऊक, पण देशापुढें येऊन उभ्या राहिलेल्या प्रश्नांचें स्पष्ट स्वरूप समेटामुळें झांकलें गेलें असें वाटत होतें. कॉंग्रेस उद्यांवर येऊन ठेपली; इतक्यांत एक अतिशय क्षोभजनक प्रकार घडला. भगतसिंगाला फांशीं देण्यांत आलें. त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील जनता विशेष क्षुब्ध झाली. कराची शहर उत्तर हिंदुस्थानांत असल्यामुळें खुद्द पंजाबांतील अनेक लोक तेथें हजर राहिले होते.

पूर्वींच्या कोणत्याहि कॉंग्रेसमध्यें मिळाला नाहीं एवढा वैयक्तिक विजय, गांधीजींना कराची-कॉंग्रेसमध्यें मिळाला. अध्यक्ष वल्लभभाई पटेल हे हिंदुस्थानांतील अतिशय लोकप्रिय आणि वजनदार पुढारी होते व गुजराथमधील विजयामुळें त्यांची उदंड कीर्ति झालेली होती. परंतु कराची-अधिवेशनांतील खरे सूत्रचालक महात्माजीच होते. अबदुल गफार खान यांच्या नेतृत्वाखालीं "लाल डगलेवाल्यांची" फौजहि कराचीला आली होती. ते फार लोकप्रिय झाले. १९३० सालापासून चाललेल्या गांजणुकीला मोठ्या विलक्षण धैर्यानें व शांत मनानें त्यांनीं तोंड दिल्याकारणानें हिंदुस्थानभर त्यांची वाहवा झाली होती. त्यामुळें ते जात तेथें त्यांचें सहर्ष स्वागत होई. "लाल डगलेवाले" या नांवावरून लोकांची फसगत होत असे. त्यांना वाटे कीं हे कम्युनिस्ट अथवा जहाल कामगार पक्षाचे लोक असावेत. त्यांचें खरें नांव "खुदा-इ-खिदमतगार" असें होतें. १९३१ अखेर ते कॉंग्रेसलाच संपूर्णपणें येऊन मिळाले. त्यांच्या रक्तवर्णी गणवेषावरून त्यांना हें नांव देण्यांत आलें होतें. राष्ट्रवादी व समाजसुधारणावादी अशा त्यांच्या कार्यक्रमांत कोणत्याहि आर्थिक धोरणाचा समावेश झालेला नव्हता.

कराची-काँग्रेसमधील मुख्य ठराव दिल्ली-समेट व मंडलाकार परिषद यांच्यासंबंधीं होता. वर्किंग कमिटीमार्फतच तो आलेला असल्याकारणानें मीं त्याला मान्यता दिलीच, पण खुल्या अधिवेशनांत मीं तो मांडावा असें गांधीजींनीं सांगितल्यावर मात्र माझ्या मनाची चलबिचल होऊं लागली. मला तो पसंत नसल्यामुळें मीं सुरुवातीला नाहीं म्हटलें खरें; पण आपलें धोरण कमकुवतपणाचें व असमाधानकारक आहे असा विचार मागाहून डोक्यांत आला. एक ठरावाच्या बाजूनें तरी बोलावें, नाहीं तर विरोध तरी करावा. लटपट करण्यांत, लोकांच्या तर्कशक्तीवर गोष्टी सोंपविण्यांत अर्थ नाहीं असें ठरवून काँग्रेसमध्यें ठराव मांडला जाण्याच्या आधीं कांहीं मिनिटें मीं संमति दिली. माझ्या भावना काय आहेत व मी ठरावाला पूर्णपणें कां पाठिंबा देत आहें याचें स्पष्टीकरण मीं त्या अफाट जनसमुदायापुढें अगदीं मोकळेपणानें केलें व ठरावाला श्रोतृवर्गानेंहि पाठिंबा द्यावा अशी विनंति केली. माझ्या अंतःकरणाचे बोलच त्या भाषणांत उमटले होते; त्यांत अलंकार अथवा शब्दलालित्य नसूनहि तें फार उत्तम वठलें. पूर्वतयारीनंतर केलेल्या माझ्या अनेक भाषणांहून तें भाषण सरस झालें.

ह्याशिवाय भगतसिंगाच्या ठरावावर व मूलभूत हक्कांच्या व आर्थिक धोरणासंबंधींच्या ठरावावर देखील मीं भाषणें केलीं. आर्थिक धोरणाच्या ठरावाकडे माझें विशेष लक्ष होतें. त्या ठरावांत एका नव्या दृष्टीचा अंतर्भाव झालेला होता. आतांपर्यंत फक्त राष्ट्रवादी विचारसरणीनुरूप काँग्रेसचे कार्यक्रम आंखण्यांत येत असत. सामान्यतः स्वदेशी व जोडधंदे हे विषय सोडून बाकीचे आर्थिक प्रश्न हातीं धरण्याचें काँग्रेस टाळीत असे. परंतु कराचीच्या ठरावाप्रमाणें मुख्य धंद्यांचें राष्ट्रीकरण करण्याचा निश्चय करून काँग्रेसनें समाजवादाच्या दिशेनें अत्यंत अल्प अशी प्रगति केली. अर्थातच त्या ठरावांत समाजवाद असा यत्किंचितहि नव्हता. एकाद्या भांडवलदार राष्ट्राला सुद्धां त्या ठरावांतील सर्व मुद्दे मान्य झाले असते.

तथापि ह्या अत्यंत सौम्य व साध्या ठरावामुळें देखील हिंदुस्थान सरकारच्या बड्या अधिकाऱ्यांत फार मोठी खळबळ उडून राहिली. आपल्या नेहमींच्या अक्कलहुषारीनें त्यांनीं असाहि तर्क बांधला असेल कीं, कराची बंदरांत बोल्शेविक रशियाच्या सोन्याच्या रक्तलांछित लगडी येऊन पोंचल्या असून काँग्रेसमधील पुढाऱ्यांना रशियानें लांच देऊन आपलेसे करून घेतलें आहे. हे बडे अधिकारी एक प्रकारच्या राजकीय गोषांत ठेवल्याप्रमाणें राहतात. बाह्य जगाशीं त्यांचा संबंध येत नाहीं व सर्वत्र गुप्ततेचें वातावरण पसरलेलें असल्याकारणानें त्यांच्या उतावळ्या मनावर अद्भुत व कपोलकल्पित गोष्टींचा तत्काळ परिणाम होतो. त्यांच्या हातीं लागलेला गुप्त गोष्टींचा पाझर त्यांच्या कुंपणांतील वृत्तपत्रांतून मोठ्या रहस्यमय रूपानें प्रसिद्ध करण्यांत येतो व त्याचबरोबर हळूच असेंहि सुचविण्यांत येत असतें कीं, सर्व गूढ उकलतां आलें तर कळल्या त्यापेक्षां किती तरी अद्भुत गोष्टी उजेडांत येतील. ह्या

नेहमींच्या वक्र मार्गानें कराची येथें पास झालेल्या मूलभूत हक्कांच्या ठरावाचा अनेक वेळां उल्लेख झालेला आहे. त्या उल्लेखांत सरकारी दृष्टिकोणाचें प्रतिबिंब उमटलेलें आहे असें मी तरी समजतों. किंवदंति अशी आहे कीं, हा ठराव अथवा त्यापैकीं बराचसा भाग एका अज्ञात कम्युनिस्ट व्यक्तीनें तयार केला व नंतर हा ठराव मान्य करा, नाहीं तर दिल्ली-समेटाला मीं विरोध करीन, अशा तऱ्हेचा धमकीचा खलिता मीं गांधीजींना पाठविला. आणि नंतर मला खुलविण्यासाठीं गांधीजींनीं ठरावास मान्यता देऊन शेवटच्या दिवशीं कंटाळून गेलेल्या विषयनियामक कमिटीच्या माथीं तो ठराव लादला.

आतांपर्यंत ह्या अज्ञात व्यक्तीचें नांव स्पष्टपणें कोणींच सांगितलेलें नाहीं, परंतु संदर्भावरून तें कळण्यासारखें आहे. छपवाछपवीची अगर वळसेदार पद्धतीची मला आवड नसल्यामुळें ही व्यक्ति म्हणजे एम. एन. रॉय असावी असें म्हणण्यास मला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं. त्या ठरावाबद्दल खुद्द एम. एन. रॉय यांचें काय मत आहे तें समजलें तर सिमला व दिल्ली येथील बड्या धेंडांना त्यापासून बराच बोध मिळेल असें वाटतें. मध्यमवर्गीयांच्या सुधारणावादी दृष्टिकोणाचा छानसा नमुना म्हणून कम्युनिस्ट त्या ठरावाबद्दल तिरस्कारच दर्शवीत असतात.

गेलीं १७ वर्षें तरी निदान गांधीजींचा व माझा दृढ परिचय झालेला आहे. त्यांना धमकीचीं पत्रें पाठविण्याची अथवा त्यांच्याबरोबर सौदा करण्याची कल्पनाच माझ्या मनाला असह्य वाटते. आम्ही कांहीं प्रश्नांवर आपसांत जुळतें घेऊं अगर एकमेकांस रामराम ठोकूं; पण बाजारी सौद्याचा व्यवहार परस्परात होणें कधींच शक्य नाहीं.

अशा तऱ्हेचा ठराव कॉंग्रेसनें करावा ही कल्पना फार पूर्वींपासून होती. संयुक्त-प्रांतीय कॉंग्रेस कमिटीनें समाजवादी ठरावाला मान्यता मिळावी म्हणून बरेच दिवस खटपट चालविली असून १९२९ सालीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडून तात्त्विक मान्यता मिळविण्याच्या कामीं तिला थोडेंसें यशहि आलें होतें. नंतर कायदेभंग सुरू झाला. १९३१ च्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत फिरावयास जातांना गांधीजींबरोबर माझें जें बोलणें झालें, त्या वेळीं यासंबंधीं मीं माझें म्हणणें त्यांना सांगितलें होतें. आर्थिक धोरणासंबंधीं एक ठराव पास करण्यांत यावा ही कल्पना त्यांनाहि पसंत पडली. ठरावाचा मसुदा तयार करून मला तो दाखवा, आपण कराचीला त्याची चर्चा करूं, असें त्यांनीं मला सांगितलें. मीं मसुदा तयार केल्यावर त्यांनीं त्यांत अनेक फेरबदल व सूचना केल्या. वर्किंग कमिटीपुढें विचारासाठीं तो ठराव मांडण्यापूर्वीं ठरावावर आम्हां दोघांचें एकमत व्हावें अशी त्यांची इच्छा होती. पुष्कळ मसुदे मला करावे लागले, त्यामुळें थोडा विलंब झाला. सरते शेवटीं एका मसुद्यावर गांधीजींचें व माझें एकमत होऊन वर्किंग कमिटीपुढें व तदनंतर विषयनियामक कमिटीपुढें तो मांडण्यांत आला. अशा तऱ्हेचा ठराव

विषयनियामक कमिटीपुढें नव्यानेंच येत होता. त्यामुळें कमिटींतील कांहीं सभासदांना थोडें आश्चर्यहि वाटलें.

ठरावाचा मसुदा तयार करीत असतां अनेक लोक माझ्या तबूंत येत, व मी ठरावाच्या बाबतींत त्यांच्याशीं विचारविनिमय करीत असें. पण एम. एन. रॉय यांचा त्यांत कांहींच संबंध नाहीं एम. एन. रॉय यांना हा ठराव अमान्य होईल, हास्यास्पद वाटेल, ही गोष्ट मी जाणून होतों.

कराचीला येण्याच्या आधीं कांहीं दिवस अलाहाबादेस मला एम. एन. रॉय भेटले. एके दिवशीं संध्याकाळीं ते अचानकपणें आमच्या घरीं आले. ते हिंदुस्थानांत आहेत याची मला कल्पना देखील नव्हती. तरी पण त्यांना १९२७ सालीं मास्को येथें पाहिलेलें असल्यामुळें येतां क्षणींच मीं त्यांना ओळखलें. नंतर ते मला कराचीला भेटले. पण ते केवळ पांचच मिनिटें गेल्या कांहीं वर्षांत राजकीय दृष्ट्या माझा निषेध करणारें बरेंचसें लिखाण रॉय यांनीं लिहिलेलें आहे, व टीका करतां करतां मला सडकून दंश करण्याच्या कामांत त्यांना बरेच वेळां यशहि आलेलें आहे. त्यांच्या व माझ्या मतांत पुष्कळ भेद असला, तरीहि त्यांच्याबद्दल मला एक प्रकारचें आकर्षण वाटे व त्यांच्यासाठीं जी कांहीं अल्पस्वल्प गोष्ट करतां येईल ती मी हौसेनें करीत असें. त्यांच्या बुद्धिमत्तेमुळें मला त्यांच्याविषयीं जसें आकर्षण वाटत होतें, त्याचप्रमाणें त्यांची एकाकी अवस्था पाहून मला त्यांच्याविषयीं जिव्हाळा वाटूं लागला होता. सर्वजण त्यांना सोडून गेले होते. त्यांच्या मागे ब्रिटिश सरकारचा ससेमिरा तर होताच. हिंदुस्थानांत स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेणारे लोक विश्वासघातकी म्हणून त्यांचा धिक्कार करीत होते. रशियांतील कित्येक वर्षांच्या वास्तव्यानंतर व कोमिंटर्नशीं केलेल्या सहकार्यानंतर त्यांची व कम्युनिस्टांची फाटाफूट झाली असेल अथवा विरोधी पक्षानें सहकार्य चालू ठेवणें अशक्य करून सोडलें असेल. हें असें कां घडलें ? त्यांचीं सध्यांचीं मतें काय आहेत ? अथवा कट्टर कम्युनिस्टांशीं त्यांचा विरोध कोठें येतो ? याविषयीं मला तेव्हां कांहींच माहिती नव्हती व अद्यापिसुद्धां नाहीं. पण अशा दर्जाच्या माणसाला सर्वांनीं वाळींत टाकावें याचें मला दुःख झालें व माझा तसा शिरस्ता नसतांहि त्यांच्या बचाव-कमिटीमध्यें मी सामील झालों. १९३१ सालापासून तुरुंगांत रॉय हे जवळ जवळ एकांतवासाचीच शिक्षा भोगीत आहेत.

कराचीच्या अधिवेशनाच्या शेवटीं नवी वर्किंग कमिटी निवडण्यांत आली. कराची येथें वर्किंग कमिटीची निवड झाल्यानंतर आम्हाला कल्पना नव्हती असा एक अनिष्ट प्रसंग घडून आला. ऑ. इं. कॉं. कमिटीच्या मुसलमान सदस्यांनीं वर्किंग कमिटींतील एका मुसलमान गृहस्थाच्या बाबतींत हरकत उत्पन्न केली. त्यांच्या गटापैकीं कोणालाहि निवडण्यांत आलें नाहीं, म्हणूनहि कदाचित् त्यांचीं मनें दुखावलीं असतील. वर्किंग कमिटीच्या १५ जागांत सर्व गटांच्या प्रतिनिधींचा

समावेश करून घेणें शक्य नाहीं. शिवाय भांडणाचें कारणसुद्धां स्थानिकच होतें. या भांडणाचा परिणाम असा झाला कीं, पंजाबांतील काँग्रेसमधून हा विरोधी पक्ष निघून गेला व इतरांच्या सहाय्यानें त्यानें अहरार पक्षाची स्थापना केली. पंजाबांतील कांहीं धडाडीचे व लोकप्रिय मुसलमान काँग्रेसकार्यकर्ते त्या पक्षाभोंवतीं गोळा झाल्यामुळें त्या पक्षाला पंजाबांतील पुष्कळ मुसलमान मिळाले. वरिष्ठ वर्गांतील लोकांनीं चालविलेल्या मुसलमानांच्या दुर्बळ अशा जातीय संघटनेपेक्षां किती तरी जोरदार अशी संघटना या पक्षानें करून दाखविली. पुढें अहरार पक्षसुद्धां जातिनिष्ठच बनला. परंतु मुसलमान जनतेशीं त्याचा संबंध येत असल्यामुळें त्या पक्षांतील जिवंतपणा व आर्थिक दृष्टिकोण मात्र कायम राहिला. हिंदी संस्थानांमधील व विशेषत: काश्मीरमधील मुसलमानांच्या चळवळींत ह्या पक्षानें महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. अहरार पक्षाचे पुढारी काँग्रेसमधून गेल्यामुळें आमचें केवढें नुकसान झालें त्याची कल्पना आम्हांला कराची येथें आली नाहीं. बाकी त्यांच्या रुसव्याला वर्किंग कमिटीची निवडणूक हें एकच कारण नव्हतें. खरीं कारणें फार खोलवर गेलेलीं होतीं.

आम्ही कराचीस असतांनाच कानपूर येथील हिंदु-मुसलमानांच्या दंग्याचें वृत्त आम्हांला कळलें. लोकांना मदत करण्याचें कार्य करीत असतां गणेश शंकर विद्यार्थी यांना जातीय भावनेनें बेहोष झालेल्या लोकसमुदायानें जीवें मारल्याचें वृत्तहि त्यानंतर लगेच आमच्या कानीं आलें. त्या भीषण व पाशवी दंग्याची बातमी मुळांत खेदजनक होतीच, परंतु गणेशजींच्या मृत्यूमुळें आमच्या अंत:करणाला असह्य वेदना झाल्या. काँग्रेसमधील हजारों लोकांच्या ते परिचयाचे होते. शूर आणि निर्भय, दूरदर्शी व शहाणा असा एक जिवलग सहकारी व मित्र म्हणून संयुक्त प्रांतांत आम्ही सर्वजण त्यांना ओळखीत होतों. निराशा हा शब्दच त्यांना ठाऊक नव्हता. प्रसिद्धीकडे, अधिकाराकडे व लोकेषणेकडे पाठ फिरवून शांतपणें ते आपल्या उद्योगांत गढलेले असत. ज्या कार्याचा आदर्श त्यांनीं मोठ्या आवडीनें आपल्यासमोर ठेवला होता, त्या कार्यासाठीं ऐन तारुण्यांत त्यांनीं आपल्या जिवाचें बलिदान केलें. जनतेच्या अज्ञानानें त्यांचा बळी घेतला आणि कानपूरचें व सर्व प्रांताचें एक अत्यंत तेजस्वी रत्न हरपून गेलें. त्यांच्या निधनामुळें कराची येथील संयुक्तप्रांतीय लोकांच्या छावणींत दु:खाचा अंधार पसरला. आनंद लोपून गेल्याप्रमाणें आम्हांला वाटलें. पण मृत्यूच्या छातीशीं धैर्यानें छाती भिडवून त्यांनीं वीरोचित मरण पत्करलें ह्याबद्दल आम्हांला अभिमानहि वाटला.

३६

# दक्षिणेकडील सफर

मी हवा पालटण्यासाठीं जावें व थोडीशी विश्रांति घ्यावी असा आग्रह माझ्या डॉक्टरांनीं धरल्यामुळें मीं एक महिनाभर सिलोनमध्यें जावयाचें ठरविलें. हिंदुस्थान देश मोठा खरा, पण मी कोठेंहि गेलों तरी, मानसिक विश्रांति मिळण्याचा संभव मला मुळींच दिसत नव्हता. कारण, मी जेथें जाईन तेथें राजकीय सहकारी मला भेटणार व तेच तेच प्रश्न मला भंडावून सोडीत राहणार हें ठरलेलेंच होतें. हिंदुस्थानच्या अगदीं नजीकचा देश म्हणजे सिलोन. म्हणून कमला, इंदिरा व मी सिलोनलाच गेलों. १९२७ सालीं युरोपहून परत आल्यावर पत्नीला व मुलीला बरोबर घेऊन केलेली ही माझी पहिलीच सफर. त्यानंतर अशा सफरीचा योग पुन: आला नाहीं आणि पुढें तसा योग कधीं येईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

सिलोनमध्यें देखील नुवारा एलिया येथें दोन आठवडे जी काय विश्रांति मिळाली, तेवढीच. इतर ठिकाणीं सर्व दर्जाच्या लोकांनीं आमच्यावर सत्काराचा व मित्रभावाचा जो मारा केला, त्याखालीं आम्हीं जवळजवळ दडपूनच गेलों. हें सौजन्य पाहून मनाला फार आनंद होई. पण पुष्कळ वेळां संकोचहि वाटे. नुवारा एलिया येथें आम्हीं राहत होतों, तेथेंहि मजूर, चहाच्या मळ्यांतील कामकरी, वगैरे लोक कित्येक मैलांवरून येत, व रानफुलें, भाजीपाला, लोणी वगैरे जिन्नस भेटीदाखल आणीत. भाषाभिन्नतेमुळें एकमेकांशीं बोलणेंहि आम्हांला शक्य नव्हतें. एकमेकांकडे पाहून थोडेंसें स्मित मात्र आम्हीं करीत असूं. त्यांनीं दिलेल्या भेटींनीं आमचें घर फुलून जात असे. त्या वस्तू आम्हीं स्थानिक रुग्णालयांत आणि अनाथालयांत पोंचत्या करीत होतों.

पुष्कळच प्रसिद्ध ठिकाणें व इतिहासप्रसिद्ध स्थळें आम्हीं पाहिलीं. अनेक बुद्धविहारांना भेटी दिल्या. घनदाट जंगलांतून हिंडलों. अनुराधापूर एथील बुद्धाचा बद्धपद्मासनस्थ पुतळा मला अतिशय आवडला. डेहराडून जेलमध्यें असतांना माझ्या एका सिलोनी मित्रानें पाठवलेलें ह्या पुतळ्याचें छायाचित्र मीं कोठडींतील माझ्या लहानशा टेबलावर ठेवून दिलें होतें. त्या चित्राचा सहवास मला किती मोलाचा वाटत असे! बुद्धाची ती धीरगंभीर मुद्रा पाहून मला शांतीचा व सामर्थ्याचा लाभ होई, व विषण्णतेचे विचार मनांतून दूर जात.

बुद्धाबद्दल मला नेहमींच आदरभाव वाटतो. ह्या भावनेचें पृथक्करण

करणें फार अवघड आहे. परंतु इतकें मात्र सांगतां येईल कीं तिचा धर्माशीं कांहींहि संबंध नाहीं. बुद्धाच्या व्यक्तिमत्त्वाचा मोह माझ्या मनाला पडलेला आहे. ख्रिस्ताचीहि माझ्या मनावर अशीच विलक्षण छाप बसलेली आहे.

विहारांत व रस्त्यांवर अनेक बुद्ध भिक्षु मला दिसले. त्यांना सर्वत्र मान देण्यांत येत असे. त्यांची चर्या शान्त दान्त अशी दिसत होती. जगांतील चिंतेपासून ते अलिप्त आहेत असें वाटे बुद्धीची चमक मात्र त्यांच्या डोळ्यांत नव्हती. मनामध्यें "रात्रंदिन चाललेल्या युद्धाच्या प्रसंगाच्या" खुणाहि त्यांच्या चेहऱ्यांवर आढळल्या नाहींत. अथांग सागराकडे गंभीरपणें वाहत चाललेल्या नदीप्रमाणें ह्या मानवी जीवनाचा ओघ त्यांना भासत असावा. मला त्यांच्याबद्दल किंचित् हेवा वाटला. त्यांच्याप्रमाणें आपणालाहि शांतिधाम लाभावें म्हणून जरा तळमळ उत्पन्न झाली; पण मनांत मी जाणून होतों कीं, कल्लोळांतून व वादळांतूनच आपणाला आपली जीवन-नौका हाकावयाची आहे. आणि बाहेरच्या वादळांइतकींच प्रचंड वादळें माझ्या अन्तःकरणांत देखील उठत असत. मग माझ्या मनाची तरी नांगर टाकून वरवा करणार तरी कोठ? आणि वादळाच्या माऱ्यापासून बचाव करील असें निवाऱ्याचें बंदर मला गवसले तरी तेथें मला सुख वाटेल असें कशावरून?

पण कांहीं काळ सिलोनची भूमि मोठी रम्य वाटली. मनांत आलें कीं भोंवतीं स्वप्नसृष्टीचीं फुलें उमलूं द्यावींत आणि रिझविणारा व गुंगवणारा सुखोष्ण वारा अंग गोंजारीत असतां तेथेंच स्वस्थ पडून राहावें. माझ्या त्या वेळच्या मनःस्थितीशीं सिलोनचें वातावरण जुळतें असें होतें. तेथील वनःश्री पाहून मी आनंदानें वेडा झालों. पण हा विश्रांतीचा काळ लवकरच संपला आणि निरोप घेतांना आम्हांला खरेंखुरें दुःख झालें. तेथील निसर्गशोभेची व लोकांची मला वारंवार आठवण होते. माझ्या तुरुंगांतील लांबलचक व कंटाळवाण्या जीवनांत ह्या आठवणीमुळें बऱ्याच वेळां विरंगुळा उत्पन्न झालेला आहे. एक लहानसा प्रसंग मला आठवतो; तो जाफना येथें घडला असावा. आमची मोटर थांबवून तेथील शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनीं आमचें स्वागत केलें. विद्यार्थ्यांचे उत्साही व आनंदी चेहरे डोळ्यांत भरण्यासारखे होते. त्यांपैकीं एक जण चटकन पुढें झाला व माझ्याशीं हस्तांदोलन करून मीं प्रश्न विचारला नसतांहि म्हणाला, "मार्गांत मी घुटमळणार नाहीं." ते पाणीदार डोळे व तो करारी तरतरीत चेहरा मला अद्यापि आठवतो. तो मुलगा कोण याचा मला पत्ता लागला नाहीं. कां कोणास ठाऊक, पण आयुष्याच्या बिकट वाटेवर तो अडखळणार नाहीं, घुटमळणार नाहीं, अशी खात्री मला वाटत असते.

सिलोनहून आम्ही थेट कन्याकुमारीला गेलों. तेथून त्रावणकोर, कोचीन, मलबार, म्हैसूर, हैद्राबाद वगैरे कांहीं पुष्कळच पुढारलेल्या, तर कांहीं मध्ययुगांत घोरत पडलेल्या हिंदी संस्थानांतून प्रवास केला. म्हैसूर व त्रावणकोर संस्थानांत त्या वेळीं थोडेंसें राजकीय व नागरिक स्वातंत्र्य मिळत होतें. पण आतां तेंहि नष्ट झालें आहे.

म्हैसूर संस्थानांत बंगलोर येथें प्रचंड समुदायापुढें माझ्या हस्तें राष्ट्रीय झेंडा उभारण्यांत आला. ध्वजस्तंभ उंचच उंच असून, लोखंडाचा होता. मी इकडे परत आल्यावर थोड्याच दिवसांनीं ध्वजस्तंभाचे तुकडे करण्यांत येऊन राष्ट्रीय निशाण उभारणें हा गुन्हा आहे असें फर्मान म्हैसूर सरकारनें काढलें. मीं उभारलेल्या झेंड्याचा अशा रीतीनें अपमान झाल्याचें ऐकून मला अतिशय वाईट वाटलें.

ब्रिटिश हिंदुस्थानांत कायदेभंग थांबविल्यापासून काँग्रेस ही कायदेशीर संस्था झालेली आहे. पण त्रावणकोरमध्यें मात्र ती अद्यापि बेकायदेशीर आहे. म्हैसूर व त्रावणकोर ह्या संस्थानांची राजकीय दृष्टया अशा प्रकारें पुच्छप्रगति होत आहे. हैद्राबादमध्यें तर पुच्छप्रगतीचा प्रश्नच संभवत नाहीं; कारण जें संस्थान कधींच पुढें सरकलें नाहीं, तें मागें तरी सरकणार कोठें ? तेथें राजकीय सभा नाहींत, प्रतिष्ठित वृत्तपत्रें नाहींत, सामाजिक सभा नाहींत आणि बाहेरचीं वृत्तपत्रेंहि प्रजाजनांचीं मनें बिघडतील म्हणून आंत येऊं देत नाहींत !

कोचीनमध्यें आम्हांला "श्वेत यहुदी" पाहावयास सांपडले. त्यांची प्रार्थना बघावयास आम्ही गेलों होतों. ह्या फार पुरातन जमातीची संख्या झपाट्यानें घटत चालली आहे. कोचीनमधील त्यांच्या वस्तीची जागा पुराण्या जेरुसलेम शहरासारखी दिसत असे, असें सांगतात.

मलबारच्या अन्तर्भागांत सीरियन चर्चच्या संप्रदायानुरूप चालणाऱ्या ख्रिश्चन लोकांच्या वस्तीचीं गांवेंहि आम्हीं पाहिलीं. युरोपच्या अगोदर पहिल्या शतकाच्या सुमारास ख्रिश्चन धर्माचा प्रसार हिंदुस्थानांत झाला होता, याची कल्पना आपल्या देशांत फारच थोड्या लोकांना असेल.

दक्षिणेकडे नेस्टोरियन लोकांची एक वसाहत आम्हाला आढळली. ती पाहून मी चकितच झालों ! आपल्या संप्रदायांत सुमारें दहा हजार लोक आहेत असें त्यांच्या धर्मगुरूचें म्हणणें होतें. माझी समजूत अशी कीं नेस्टोरियन पंथ इतर पंथांत केव्हांच विलीन होऊन गेला असावा. हिंदुस्थानांत त्याचा कधींकाळीं प्रचार झाला असेल, याची तर मला कल्पनाहि नव्हती. पण एके काळीं या पंथाचे अनुयायी बनारसपर्यंत पसरले होते असें सांगण्यांत आलें.

सरोजिनी नायडू व त्यांच्या मुली पद्मजा व लैलामणि यांना भेटण्यासाठीं आम्ही मुद्दाम हैद्राबाद येथें गेलों होतों. तेथें असतांना पडदानशीन स्त्रियांची सभा त्यांच्या घरीं भरली व कमलानें त्या सभेंत भाषण केलें. पुरुषांनीं केलेल्या धर्माविरुद्ध व रूढीविरुद्ध आपण लढलें पाहिजे वगैरे तिच्या आवडत्या मुद्द्यांवर ती बहुधा बोलली असावी. यानंतर दोनतीन आठवड्यांनीं एक मनोरंजक गोष्ट घडून आली. 'तुमचें भाषण ऐकल्यापासून माझी बायको विचित्र चाळे करूं लागली आहे, माझें ती ऐकत नाहीं, उलट जबाब देते, इतकेंच नव्हे तर चढेलपणानें वागते' वगैरे तक्रारींनीं भरलेलें एक पत्र एका पिसाळून गेलेल्या नवरोजींनीं कमलेकडे पाठविलें !

सात आठवड्यांनीं आम्ही पुनः मुंबईला आलों व लगेच मी कॉंग्रेसच्या राजकारणाच्या प्रवाहांत उडी टाकली. हिंदुस्थानांतील वाढती व बदलती परिस्थिति, संयुक्त प्रांतांतील किसानांची चळवळ, खान अबदुल गफारखान यांच्या नेतृत्वाखालीं फोंफावत चाललेलें लाल डगलेवाल्यांचें दल, बंगालमधील कळसास पोंचलेला असंतोष व संताप, सनातन बनलेला जातीय प्रश्न, सरकार व कॉंग्रेस यांच्यांत सुरू असलेले अनेक मुद्द्यांवरील स्थानिक बखेडे, वगैरे प्रश्न वर्किंग कमिटीपुढें दत्त म्हणून उभे होतेच. शिवाय सारखा उपस्थित होणारा आणखी एक प्रश्न होता, तो असा कीं, दुसऱ्या मंडलाकार परिषदेला कॉंग्रेसनें प्रतिनिधि पाठवावा कीं नाहीं? व प्रतिनिधि म्हणून महात्मा गांधींनीं जावें कीं काय ?

३७

# समेटाच्या काळांतील कटकटी

मंडलाकार परिषदेला गांधीजींनीं जावें न जावें ह्या प्रश्नाची भवति-न-भवति एकसारखी सुरू होती. पण निश्चित उत्तर कांहीं मिळेचना. अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत कोणालाच कल्पना नव्हती; कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीला अथवा खुद्द गांधीजींनाहि कल्पना नव्हती. नवे नवे प्रसंग घडून येत, त्याप्रमाणें वातावरणांत चढउतार होई, व त्याबरोबर प्रश्नाच्या उत्तरांतहि बदल पडे.

राज्यघटनेचा पाया मंडलाकार परिषदेनें तयार केलेलाच आहे, चित्रांतील मुख्य रेषा ओढून झालेल्या आहेत, आतां फक्त रंग भरणें बाकी आहे असें ब्रिटिश सरकारकडून सांगण्यांत येई; पण कॉंग्रेसच्या मतें जें कांहीं चित्र काढावयाचें, रंगवायचें असेल त्याची अगदीं कोऱ्या कागदावर सुरुवातीपासून मांडणी करणें अवश्य होतें. संयुक्त राज्यघटना व संरक्षक बंधनें यांच्या कल्पना दिल्ली-समेटान्वयें मान्य करण्यांत आल्या हें खरें; पण हिंदुस्थानचा प्रश्न संयुक्त राज्यघटनेच्या द्वाराच सुटेल ही गोष्ट आम्ही किती तरी दिवसांपासून मान्य करीत आलों आहों. परंतु तेवढ्यावरून मंडलाकार परिषदेंत तयार झालेली संयुक्त राज्यघटना आम्हाला मान्य आहे असें तर्कशास्त्र लढविणें योग्य ठरलें नसतें. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक क्रान्ति यांशीं पूर्णपणें सुसंगत अशीच संयुक्त घटनेची कल्पना होती. परंतु संरक्षक बंधनें मात्र स्वातंत्र्याच्या कल्पनेशीं सुसंगत आहेत हें सिद्ध करणें कठीण झालें असतें. त्यांच्या योगानें हिंदुस्थानच्या अधिराज्याला फार मोठा बाध येणार होता. तथापि " हिंदुस्थानच्या हिताचीं " ही पुस्ती बंधनांच्या मागें जोडलेली असल्यामुळें नदींतून बाहेर पडण्याचा राजमार्ग नसला तरी थोडीशी फट आम्हांला मिळण्यासारखी होती. सैन्य, परराष्ट्रीय खातें व आर्थिक धोरण यांच्यावर पूर्ण ताबा इतकें दिल्याशिवाय घटनेचा स्वीकार करण्यांत येणार नाहीं आणि हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय (म्ह. मुख्यतः ब्रिटिश) कर्जाची छाननी केल्याशिवाय तें फेडण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारणार नाहीं हें कराची-कॉंग्रेसमध्यें स्पष्टच झालें होतें. त्याचबरोबर नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या ठरावामुळें कॉंग्रेसला कोणत्या राजकीय व आर्थिक पुनर्घटना इष्ट वाटतात, तेंहि समजण्यासारखें होतें. मंडलाकार परिषदेच्या निर्णयांच्या व हिंदुस्थानांतील विद्यमान राज्यकारभाराच्या चौकटींत कॉंग्रेसचें हें धोरण बसणें अगदीं अशक्य होतें.

कॉंग्रेसच्या व सरकारच्या दृष्टिकोणांत साती समुद्रांचें अंतर असल्याकारणानें त्यांची कधींकाळीं संगति जुळेल ही कल्पना असंभाव्य कोटींतील वाटत होती. मंडलाकार परिषदेंत आपलें व सरकारचें कोणत्याहि बाबतींत एकमत होईल अशी फारच थोड्या कॉंग्रेसभक्तांची अपेक्षा असेल. गांधीजी वस्तुतः आशावादी, पण त्यांनाहि फारसें कांहीं निष्पन्न होईल असें वाटत नव्हतें. पण निराश न होतां अगदीं अखेरपर्यंत प्रयत्न करण्याचें त्यांनीं ठरविलें. दिल्ली-समेटाप्रमाणें प्रयत्न करणें तर प्राप्तच होतें; मात्र मंडलाकार परिषदेसमोर आमची बाजू साकल्यानें मांडण्याची स्वतंत्रता आम्हास मिळाली व आमच्या या स्वातंत्र्याच्या मार्गांत पूर्वी ठरलेल्या निर्णयांची आडकाठी लावण्यांत आली नाहीं, तरच कॉंग्रेसनें परिषदेंत भाग घ्यावा असें ठरलें होतें. हिंदुस्थानांतील परिस्थिति बिकट झाली असती, तर मंडलाकार परिषदेला जाणें तसेंच राहिलें असतें; कारण मग सरकारबरोबर दोन हात करून भयंकर दडपशाहीला तोंड द्यावें लागलें असतें. आणि इकडे आमचीं घरेंदारें जळूं लागल्यावर, आगीच्या डोंबाकडे डोळेझांक करून राज्यघटनेच्या शास्त्रार्थाची चर्चा कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनीं लंडनमध्यें बसून करणें अनुचित ठरलें असतें.

देशांतील परिस्थिति भराभर बदलत होती. बंगाल, संयुक्त प्रांत, आणि सरहद्द प्रांत यांतील बदल चांगलाच लक्षांत येण्याजोगा होता. बंगालमधील हजारों राजबंदी तसेच तुरुंगांत राहिले, दिल्ली-समेटाचा त्यांना कांहींच फायदा झाला नाहीं. शिवाय स्थानबद्ध कैदी होते ते निराळेच. राजद्रोहाच्या निमित्तानें नव्या नव्या लोकांची धरपकड सुरूच होती. सरकारनें अगदीं समेटापूर्वींच्याच नेटानें दडपशाहीचें सत्र चालू ठेविलें आहे असें दिसून येत होतें. बंगालमधील दहशतवादामुळें तेथील कॉंग्रेसचें काम बिकट होऊन बसलें होतें. कॉंग्रेसच्या नित्य कार्याचें व कायदेभंगाच्या मानानें दहशतवाद्यांच्या कार्याचें क्षेत्र व महत्त्व फारच अल्प होतें. तथापि त्यांच्या कामाचा गाजावाजा अतिशय होऊन त्यांच्याकडे लोकांचें लक्ष जात असे. दहशतवादाच्या वातावरणांत कॉंग्रेसचा शांततामय प्रत्यक्ष प्रतिकारसुद्धां जोमानें मूळ धरीना. परंतु दहशतवादी कार्याच्या पाठोपाठ सरकारची जी सक्त दडपशाही सुरू होई, तिचा प्रसाद मात्र दहशतवादी व बिनदहशतवादी कार्यकर्त्यांना सामान्यतः सारख्याच प्रमाणांत भोगावा लागे.

कायदे दहशतवाद्यांसाठीं केलेले असले, तरी तेथील पोलिस व अधिकारी यांना अप्रिय वाटणाऱ्या कॉंग्रेसमधील व मजूर-शेतकरी यांच्यामधील कार्यकर्त्यांवर ते लागू केल्याशिवाय कां राहतील? वर्षानुवर्षे तुरुंगांत कुजत पडलेल्या स्थानबद्ध कैद्यांपैकीं कित्येक कैद्यांचा दहशतवादाशीं कदाचित् कांहीं संबंधहि नसेल; पण आपलें निरपराधित्व सिद्ध करण्याची अथवा आपल्याविरुद्ध आणलेला पुरावा खोडून काढण्याची संधीच त्यांना मिळालेली नव्हती. आपण सरकारचें कोणतें घोडें मारलें हेंहि त्यांना कळलेलें नव्हतें. राजकीय गुन्ह्यांच्या बाबतींत हिंदुस्थानांतील कायदे किती

सूक्ष्म व सर्वंकष केलेले आहेत तें सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या जाळ्यांतून सहसा कोणी निसटावयाचा नाहीं. इतकें असूनसुद्धां ह्या लोकांची न्यायासनासमोर चौकशी करण्यांत आली नाहीं याचें कारण पोलिसजवळ भरपूर पुरावाच नसावा. पुष्कळदां असेहि प्रसंग घडतात कीं, कोर्टांत निर्दोषी ठरून माणूस बाहेर पडतो न पडतो तोंच त्याच्या हातीं बेड्या ठोकून स्थानबद्ध कैदी म्हणून त्याला तुरुंगांत ढकलण्यांत येतें.

बंगालमधील हा पेंच सोडविण्याच्या बाबतींत वर्किंग कमिटी अगदीं मेटाकुटीस आलेली होती. निरनिराळ्या स्वरूपांत बंगालचा प्रश्न पुढें उभा राही व त्यासबंधीं वर्किंग कमिटी यथाशक्ति निर्णयहि देत असे. अशानें प्रश्नाचें मूळ उपटलें जाणार नाहीं हें ती ओळखून होती. पण वर्किंग कमिटीला तरी दुसरा तिसरा काय मार्ग होता ? तथापि वर्किंग कमिटीचें हे वर्तन पाहून बंगालमध्यें असंतोष वाढूं लागला. कॉंग्रेसचें कार्यकारी मंडळ व इतर प्रांत यांच्या मनांत आपल्याविषयीं सहानुभूति वसत नाहीं, संकटसमयीं सर्व सोयरे आपणांस सोडून जातात असें बंगालला वाटूं लागलें. ही कल्पना सर्वस्वी खोटी होती. सर्व देशाला बंगालविषयीं आपुलकी वाटत असे. पण ह्या भावना परिणामकारक रीतीनें व्यक्त कशा कराव्या ते मात्र लोकांना समजत नव्हतें. शिवाय ज्याला त्याला आपल्या परसांत लागलेल्या आगी विझवावयाच्या होत्याच.

संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांचा प्रश्न फारच बिकट होत चालला होता. त्यासंबंधांत प्रांतिक सरकारनें कालहरणाचे धोरण स्वीकारलें होतें. धाकदपटशा देऊन वसुलीला सुरुवातहि करण्यांत आली. जप्त्या वगैरेंचें सत्र सरसकट सुरू झालें. आम्ही सिलोनमध्यें असतांना दोनतीन ठिकाणीं वसुलीची जबरदस्ती केल्यामुळें शेतकऱ्यांचे दंगेहि पेटले. दंगे तसे फार मोठे नव्हते. परंतु दुर्दैवानें त्यांत एका जमीनदाराचा किंवा त्याच्या हस्तकाचा खून पडला. गव्हर्नर सर मालकम हेली यांच्याबरोबर संयुक्त प्रांतांतील परिस्थितीविषयीं चर्चा करण्यासाठीं गांधीजी नैनीताल येथें गेले होते. तेथील वाटाघाटी वांझच ठरल्या. सरकारनें सूट जाहीर केली ती अपेक्षेपेक्षां पुष्कळच कमी होती. खेड्यांतून अतिशय जोराची अशी चळवळ अव्याहत चालू होती. जमीनदारांबरोबर सरकारचीहि दडपशाही सुरू होऊन हजारों शेतकऱ्यांची हकालपट्टी व्हावयास लागली व त्यांच्या मालमत्तेवर जप्त्या येऊं लागल्या. त्यामुळें परिस्थिति अशी निर्माण झाली कीं, दुसरा तिसरा देश असता तर शेतकरी खात्रीनेंच बंड करून उठते. ते हिंसेपासून अलिप्त राहिले त्याचें बरेंचसें श्रेय माझ्या मतें कॉंग्रेसलाच दिलें पाहिजे. उलट शेतकऱ्यांवर मात्र हवा तितका अत्याचार करण्यांत आला.

या संकटकालांत धान्याचे भाव अतोनात उतरल्यामुळें ज्यांच्या जमिनी अद्यापि हिसकावून घेतलेल्या नव्हत्या, अशा दरिद्री लोकांना घांसभर अन्न तरी मिळूं लागलें ही एक त्यांतल्या त्यांत बरी गोष्ट घडली म्हणावयाची.

सरहद्द प्रांतांतहि बंगालप्रमाणेंच परिस्थिति होती. तेथील राज्यकारभार नेहमींच लष्करी स्वरूपाचा असे, व खास कायद्याप्रमाणें व वटहुकुमाप्रमाणें व्यवस्था चालत असून साध्या गुन्ह्याबद्दल भयंकर कडक शिक्षा देण्यांत येई. त्यामुळें तेथें नेहमींच आग धुमसत असायची. अशा प्रकारच्या जुलुमी राज्यकारभाराचा प्रतिकार करण्यासाठीं अबदुल गफार खान यांनीं फार मोठी चळवळ सुरू केली व लवकरच सरकारच्या डोळ्यांत ते सलूं लागले. सहा फूट तीन इंच उंचीचा त्यांचा धिप्पाड देह खेडोपाडीं नजरेस पडूं लागला. ठिकठिकाणीं त्यांनीं डगलेवाल्यांचीं केंद्रें प्रस्थापित केलीं व लवकरच त्यांनीं व त्यांच्या पट्टशिष्यांनीं सर्व प्रांतांत "खुदा-इ-खिदमतगारां"चें जाळें विणून टाकलें. हे लोक पूर्ण शांततेनें आपल्या कार्याचा प्रचार करीत असत. त्यांच्यावर संदिग्ध असे अनेक प्रकारचे आरोप करण्यांत आले असले, तरी अत्याचाराचा एकहि आरोप शाबीत झालेला नाहीं. युद्धाचें व हिंसेचें वातावरण सरहद्द प्रांतांत पिढ्यान् पिढ्या चालत आलेलें असून सरहद्दीवरील आडदांड लोकांचा शेजारहि खुदा-इ-खिदमतगारांना मिळालेला होता. अशा क्षेत्रांत शिस्तशीर संघटनेचें भरघोस पीक येत चाललेलें पाहून व त्यांत रसरसणारें राष्ट्रीयत्वाचें तेज दृष्टोत्पत्तीस येऊन सरकारचें धाबें दणाणून गेलें. लाल डगलेवाल्यांच्या शांततामय अहिंसावादी धोरणावर सरकारचा विश्वास असेल असें मला वाटत नाहीं. परंतु तसा विश्वास असता तरीहि सरकारला त्यांच्या चळवळीची भीति वाटल्यावांचून राहती ना. सरकारचें चित्त बेचैन व्हावें अशाच प्रकारची जागृत व सुप्त शक्ति त्या संघटनेच्या ठायीं होती.

या प्रचंड चळवळीचे नेते म्हणजे अबदुल गफार खान. त्यांना "फक्र-इ-पठाण" म्हणजे "पठाणांचा अभिमान" अथवा "गांधी-इ-सरहद्द" म्हणजे "सरहद्द गांधी" असें संबोधण्यांत येई. आपल्या धीम्या व चिकाटीच्या प्रयत्नांच्या जोरावर त्यांनीं विलक्षण लोकप्रियता संपादन केली होती. सरकारच्या दडपशाहीमुळें त्यांचें धैर्य अणुमात्र खचलें नाहीं. नेहमींच्या अर्थानें त्यांना मुत्सद्दी म्हणतां येणार नाहीं; कारण राजकारणांतील डावपेंच अथवा कारवाया त्यांच्या परिचयाच्या नाहींत. शरीरानें जसे ते सरळ, तसे ते मनानेंहि सरळ आहेत. अवडंबर अथवा पाल्हाळ माजवण्याचा त्यांना तिटकारा आहे. हिंदुस्थानबरोबर सरहद्द प्रांतालाहि स्वातंत्र्य लाभावें ही त्यांची इच्छा. परंतु राज्यघटना अथवा कायदेशीर भाषा या विषयांतले ते मर्मज्ञ नाहींत आणि त्या विषयांत त्यांना गोडीहि वाटत नाहीं. कोणतीहि गोष्ट साध्य करून घ्यावयाची असेल तर कर्म आचरलें पाहिजे, चढाई केली पाहिजे, एवढेंच ते जाणतात. गांधीजींनीं शांततामय मार्गानें चढाई कशी करावी हें दाखवून दिलें होतेंच; तो मार्ग अबदुल गफार खानांना पटला. पण चढाई करावयाची तर संघटना हवी; म्हणून ते संघटनेच्या उद्योगाला लागले. संघटनेचे नियम करण्याची विशेष फिकीर न करतां त्यांनीं संघटनेला सुरुवात केली व त्यांत त्यांना अपूर्व असें यशहि मिळालें.

गांधीजींविषयीं त्यांना फार आदरभाव वाटतो. प्रथम प्रथम लाजाळूपणामुळें व अंगच्या नम्रतेमुळें ते गांधीजींपासून दूरदूरच राहत. नंतर अनेक गोष्टींची चर्चा करतां करतां त्यांचा संबंध वाढत गेला. आपल्यापैकीं पुष्कळांना न पटलेलें अहिंसेचें शास्त्र या पठाण गृहस्थाला मान्य व्हावें हें मोठें आश्चर्य आहे. त्या तत्त्वावर त्यांची श्रद्धा बसली म्हणूनच जुलुमाची पर्वा न करतां अहिंसापालनाची शिकवणूक आपल्या लोकांना देणें त्यांना शक्य झालें. सरहद्द प्रांतांतील लोकांनीं आपल्या डोक्यांतून हिंसामय विचारांचें पूर्ण निर्मूलन केलें आहे असें म्हणणें मूर्खपणाचें ठरेल. कोणत्याच प्रांतांतील लोकांबद्दल असें विधान करतां येणार नाहीं. कारण भावनेच्या लाटेबरोबर जनता हेलकावे खात असते. अशी एकादी लाट उसळली म्हणजे जन-समुदाय कसा वागेल याबद्दल भविष्य करणें शक्य नाहीं. तथापि सरहद्दीवरील लोकांनीं १९३० सालीं जी शिस्त पाळली ती आश्चर्यजनक होती यांत शकाच नाहीं.

सरकारी अधिकारी व आमचे कांहीं बुजरे देशबांधव सरहद्द गांधींकडे साशंक नजरेनें पाहत असतात. त्यांच्या शब्दावर ह्या लोकांचा विश्वास बसत नाहीं. या गृहस्थाचें कांहींतरी खोल कारस्थान असावें असें त्यांना वाटतें. परंतु गेल्या कांहीं वर्षांत खुदा-इ-खिदमतगारांशीं कॉंग्रेसचे दाट मैत्रीचे संबंध जुळून आले असून परस्परांबद्दल एकमेकांना आदर वाटूं लागला आहे. कॉंग्रेसकार्यकर्त्यांत अबदुल गफारखान यांच्याबद्दल पुष्कळच प्रेम वसत आहे. परंतु केवळ वैयक्तिक सहकारी एवढ्या एकाच दृष्टीनें त्यांना महत्त्व आलेलें नाहीं. आमच्या राष्ट्रीय लढ्यांतील शूर व दुर्दमनीय सैनिक बांधवांच्या त्यागाचें व धैर्याचें ते एक प्रतीक होऊन बसले आहेत.

अबदुल गफार खान यांचें नांवहि माझ्या कानीं आलें नव्हतें, तेव्हांपासून मी त्यांच्या बंधूंना म्हणजे डॉ. खानसाहेब यांना ओळखतों आहें. मी कॅंब्रिज येथें असतांना ते लंडनमधील सेंट थॉमस रुग्णालयांत शिक्षण घेत होते. नंतर इनर टेंपलमध्यें. बॅरिस्टरीच्या मेजवान्या मी झोडीत असतां माझी व त्यांची चांगलीच गट्टी जमली. मी हिंदुस्थानांत आल्यानंतर बरींच वर्षेंपर्यंत ते लंडनमध्येंच राहिले होते. लढाईच्या काळांत त्यांनीं सरकारी नोकरीहि केली. त्यानंतर त्यांची माझी गांठ पडली ती नैनीच्या तुरुंगांत.

लाल डगलेवाले कॉंग्रेसशीं सहकार्यानें वागत. परंतु त्यांची संघटना मात्र पृथक् होती. ह्या दोन्ही संस्थांचा दुवा सांधून देणारी व्यक्ति म्हणजे अबदुल गफार खान होत. १९३१ च्या उन्हाळ्यांत वर्किंग कमिटीमध्यें खल होऊन लाल डगले-वाल्यांना कॉंग्रेसमध्यें समाविष्ट करून घेण्याचें नक्की ठरलें व लाल डगलेवाल्यांची चळवळ कॉंग्रेसच्या चळवळींतच समाविष्ट झाली.

कराची-कॉंग्रेस उरकली कीं लगेच सरहद्द प्रांतांत जावें अशी गांधीजींची इच्छा होती. पण सरकारला ही गोष्ट पसंत पडली नाहीं. नंतर जेव्हां जेव्हां सरकारी अधिकारी लाल डगलेवाल्यांच्या कृत्यांबद्दल तक्रारी सांगूं लागत, तेव्हां तेव्हां

आपल्याला सरहद्द प्रांतांत जाण्याची परवानगी मिळावी अशी आग्रहाची विनंति गांधीजी करीत असत. सरहद्द प्रांतांत जाण्याचा मीं बेत केला त्यालाहि सरकारकडून हरकत झाली. पण समेट झालेला असल्यामुळें सरकारच्या जाहीर इच्छेविरुद्ध सरहद्द प्रांतांत जाऊं नये असें मत पडलें.

ह्याव्यतिरिक्त वर्किंग कमिटीपुढील दुसरा प्रश्न म्हणजे जातीसंबंधींचा. तो जुनाच होता म्हणा; परंतु विलक्षण स्वरूपांत तो पुनः पुनः उद्भवत असे. मंडलाकार परिषदेमुळें त्याला अधिकच महत्त्व प्राप्त झालें. ब्रिटिश सरकार ह्या प्रश्नाला अग्रस्थानीं बसवणार व त्याला सर्वांत अधिक महत्त्व देणार ही गोष्ट उघडच दिसत होती. जातींच्या व गटांच्या प्रश्नांना महत्त्व चढावें याच धोरणानें परिषदेच्या सदस्यांची नेमणूक सरकारकडून झाली होती. सर्वसामान्य हिताच्या प्रश्नापेक्षां या मतभेदावर सदस्यांनीं अधिक जोर द्यावा हेंच सरकारला हवें होतें. राष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमानांपैकीं कोणाचीहि निवड करण्याचें सरकारनें साफ नाकारलें. अगदीं सुरुवातीपासूनच जातीय प्रश्नांच्या जाळ्यांत परिषद गुरफटून पडली तर मुख्य राजकीय व आर्थिक प्रश्न बाजूला राहतील अशी गांधीजींना धास्ती वाटत होती. मग परिषदेला जाऊन कांहीं फायदा होण्यासारखा नव्हता. म्हणून दोन पक्षांमध्यें जातीय प्रश्नाबाबत कांहीं तरी तडजोड झाल्यानंतरच आपण परिषदेसाठीं निघावें अशी सूचना गांधीजींनीं वर्किंग कमिटीपुढें मांडली. परिस्थितीचें निदान त्यांनीं अचूक केलें होतें. पण वर्किंग कमिटीनें त्यांची सूचना अमान्य करून जातीय प्रश्न आम्हाला मिटवितां आला नाहीं म्हणून त्यांनीं जाण्याचें नाकारूं नये असा निकाल दिला. जातीय तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्नहि वर्किंग कमिटीनें करून पाहिला, पण त्यांत फारसें यश आलें नाहीं.

हे आमच्यापुढील प्रमुख प्रश्न. इतर अनेक किरकोळ बाबीहि होत्याच. स्थानिक अधिकाऱ्यांनीं दिल्ली-समेटाचा भंग केल्याबद्दलच्या अनेक तक्रारी आमच्याकडे सारख्या येत असत. ह्यांपैकीं विशेष महत्त्वाच्या तक्रारी आम्ही सरकारकडे पाठवून देत होतों. त्यावर काँग्रेसवाल्यांनींच समेट मोडला आहे असे उलट आरोप सरकारतर्फे करण्यांत येत. हे आरोप-प्रत्यारोप पुढें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आले. सरकारचे व काँग्रेसचे संबंध दृढतर करण्याच्या कामीं या घासाघिशींचा उपयोग झाला नाहीं हें सांगणें नकोच.

बारीकसारीक गोष्टींवरून चाललेली ही घासाघीस वास्तविक विशेष महत्त्वाची नव्हती; परंतु त्यावरून एका मूलगामी विरोधाचें निदर्शन होत असल्याकारणानें तिला महत्त्व आलें होतें. तो मूलगामी विरोध कांहीं व्यक्तींनीं निर्माण केला होता असेंहि नव्हे. राष्ट्रीय चळवळींतून व शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनांतील विषमतेंतून तो निर्माण झालेला असून समाजांत आमूलाग्र फरक घडवून आणल्याशिवाय तो उन्मूलन होणें, फार काय सौम्य होणें देखील अशक्य होतें. आमच्यांतील वरिष्ठ मध्यम

वर्गाला आपल्या सामर्थ्याचा वापर व विकास करण्यासाठीं संधि पाहिजे होती, म्हणून राष्ट्रीय चळवळीचें देवक बसलें. राष्ट्रीय चळवळीच्या बुडाशीं राजकीय व आर्थिक प्रेरणांची शक्ति होतीच. फैलावतां फैलावतां ती कनिष्ठ मध्यम वर्गापर्यंत पोंचून कॉंग्रेस ही देशांतील एक सामर्थ्यवान् संस्था बनली. आपला अत्यंत भिकारडा जीवनक्रम चालवणें सुद्धां ज्यांना दिवसेंदिवस अशक्य होत चाललें होतें, अशा जनतेंतहि राष्ट्रीय चळवळीच्या निनादानें जागृति होऊं लागली. पूर्वीचें स्वयंपूर्ण आर्थिक जीवन खेडेगांवांतून केव्हांच नष्ट झालें होतें. अंशतः सरकारी धोरणामुळें व विशेषतः यंत्रसामर्थ्याशीं स्पर्धा करणें शक्य नसल्यामुळें जोड धंदे साफ बुडाले होते. त्यामुळें अधिकाधिक पोटांचा भार जमिनीवर पडूं लागला. ह्या भार देशांतील उद्योगधंद्यामुळें हलका व्हावयाचा. पण येथील उद्योगधंद्यांची वाढ फारच आस्तेकदम होत होती. असली गाफील व साधनहीन शेतकरी जनता जगाच्या समुद्रासारख्या बाजारांत खेंचली जाऊन तेथें ती लाटांबरोबर हेलकावे खात राहिली. जागतिक बाजारांत तिला स्पर्धा करतां येईना. उत्पादन पद्धति, जमीनधारणाची पद्धति वगैरेंतील दोषांमुळें विशेष स्वरूपाच्या सुधारणा करणें अशक्य झालें व कुळें व जमीनदार दोघेहि घसरगुंडीला लागले. आपलें ओझें कुळांच्या पाठीवर सरकवण्याचा प्रयत्न जमीनदार करूं लागला. कुळें आणि छोटे जमीनदार जसजसे दरिद्री होऊं लागले, तसतसे ते राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित होत गेले. ज्या शेतमजुरांपाशीं मालकीचा असा जमिनीचा टीचभर तुकडा देखील राहिला नव्हता, तेमुद्धां राष्ट्रीय चळवळींत लक्ष घालूं लागले. स्वराज्य आलें कीं आपल्या टाळूवरील बोजा हलका होईल व आपल्यासारख्या भणंगांना जमिनीचा तुकडा तरी मिळेल अशी त्यांची कल्पना होती. पण ह्या वर्गाच्या इच्छा शेतकरी अथवा मध्यम वर्गांतील राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तोंडून खणखणीत शब्दांत उमटत नसत.

सुरुवातीला पुढाऱ्यांना कल्पना आली नाहीं, पण १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीचा सांधा जागतिक मंदीशीं जुळून गेला होता. ह्या मंदीचा तडाखा शेतकऱ्यांच्या तोंडावर बसल्याकारणानें ते कायदेभंगाकडे व कॉंग्रेसकडे वळले लंडनमध्यें किंवा दुसऱ्या इतर ठिकाणीं एकादी सुंदर राज्यघटना तयार झाली काय अथवा न झाली काय देहाती जनतेला त्याचें सोहेरसुतक बाळगण्याचें कारण नव्हतें त्यांना जमीनवाहतुकीच्या पद्धतींत व विशेषतः जमीनदारी प्रांतांतील पद्धतींत आमूलाग्र फेरबदल झाला तर पाहिजे होता. वास्तविक जमीनदारी पद्धति निरुपयोगी झाली असून तिच्यामध्यें कांहींहि त्राण उरलेलें नव्हतें; तथापि या पद्धतीमध्यें विशेष स्वरूपाचे फेरबदल करण्याचें धाडस ब्रिटिश सरकारच्या हातून होणें शक्य नव्हतें. शेतकीसंबंधीं चौकशी करण्याकरितां रॉयल कमिशनची नेमणूक झाली. तेथें देखील त्यांनीं जमिनीच्या मालकीसंबंधीं व जमिनीच्या वाहतुकीसंबंधीं चर्चा करूं नये असा निर्बंध त्यांच्यावर घालण्यांत आला होता.

तात्पर्य हें कीं, हिंदुस्थानांतील परिस्थितींतच विरोधाचीं बीजें असल्यामुळें केवळ गोड शब्द बोलून अगर तडजोडी करून तो नाहींसा होण्याचा संभव नव्हता. जमिनीच्या मूलभूत प्रश्नाचा निकाल लागल्यानंतरच तो सुटला असता. पण अशा तऱ्हेचा निकाल ब्रिटिश सरकारमार्फत लागेल ही गोष्ट सर्वस्वी असंभवनीय होती. तात्कालिक उपाययोजनांच्या योगानें कांहीं काळ कमी हाल होत, दडपशाहीचा सोटा उगारला तर लोक घाबरून गप्प बसत व त्यांची आरडाओरड बंद होई. पण मूळ प्रश्न मात्र जशाचा तसाच राहून जात असे.

ब्रिटिश सरकारची अशी एक कल्पना आहे कीं, हिंदुस्थानांतील सर्व धामधुमीला हे चळवळे लोक कारणीभूत आहेत. ही अगदींच बालिश कल्पना आहे. गेलीं पंधरा वर्षें हिंदुस्थानला असा एक थोर पुढारी लाभला आहे कीं, ज्यानें हिंदी जनतेचीं मनें प्रेमाच्या धाग्यानें बद्ध करून टाकलीं असून जो आपल्या इच्छेप्रमाणें अनेक बाबतींत जनतेला हलवून सोडीत आहे. विद्यमान इतिहासांत त्यानें फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. पण जी जनता त्याच्यामागून डोळे मिटून गेली, तिचें महत्त्व त्या पुढाऱ्यापेक्षां फार अधिक आहे. चळवळीच्या रंगभूमीवरील मुख्य कामें ह्या जनसमुदायानेंच पार पाडलीं. पडद्याआडून प्रभावी अशा ऐतिहासिक प्रेरणा जनतेला खेळवीत होत्या. त्या प्रेरणांमुळेंच आपल्या पुढाऱ्याचे शब्द ऐकून घेण्याची जनतेची मानसिक तयारी झाली. ह्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचें व राजकीय आणि सामाजिक प्रेरणांचें साहाय्य मिळालें नसतें, तर कोणत्याहि पुढाऱ्याला अथवा चळवळ्याला जनतेस कार्यप्रवृत्त करणें शक्य झालें नसतें. गांधीजींचा मुख्य गुण हाच कीं, जनतेची नाडी त्यांना बरोबर ओळखतां येत असे व विकासाला आणि कार्याला अनुकूल अशी परिस्थिति केव्हां उत्पन्न झाली आहे हें ते अचूकपणें ताडीत असत.

देशांतील वाढत्या सामाजिक आंदोलनाशीं १९३० सालची चळवळ कांहीं काळ संवादी झाल्यामुळें तिला वास्तवता प्राप्त होऊन तिच्यांत अपूर्व असें सामर्थ्य संचरलें. आधुनिक स्वातंत्र्येच्छु तरुणीप्रमाणें इतिहासाच्या हातांत हात घालून ती जणूं कांहीं चालत होती. काँग्रेसद्वाराच ही राष्ट्रीय चळवळ प्रकट होत असल्या-कारणानें तिच्या सामर्थ्याबरोबर व सत्तेबरोबर काँग्रेसची प्रतिष्ठाहि वाढली. ह्या प्रतिष्ठेचें स्वरूप अस्पष्ट, अननुमेय, अव्याख्येय असें असेल; पण प्रतिष्ठा वाढत होती, हें त्रिवार सत्य. शेतकरी काँग्रेसमध्यें आला व तिची शक्ति वाढली. मुख्यतः कनिष्ठ मध्यमवर्गीय जनतेंतूनच काँग्रेसमध्यें करोल सैनिकांचा भरणा झाला व गडबडून गेलेले वरिष्ठ वर्गांतील लोकहि काँग्रेसशीं सख्य ठेवणें बरें असें म्हणून वागूं लागले. काँग्रेसनें सांगितल्याप्रमाणें बहुतेक कापड-गिरण्यांनीं प्रतिज्ञा लिहून दिल्या व काँग्रेसचा रोष होईल असें कृत्य करण्याची त्यांना धाकधूक वाटूं लागली. तिकडे मंडलाकार परिषदेंत कायद्याचा मऊ कीस काढीत बडीं धेंडें बसलीं असतां, हळूहळू नकळतपणें सत्तेचा ओघ काँग्रेसकडे वाहत चालला आहे असें दृश्य दिसूं

लागलें. दिल्ली-समेटानंतर हें दृश्य अधिकच स्पष्ट झालें. त्याला १९३० सालचे व नंतर घडून आलेले प्रसंगच कारणीभूत झाले होते. शब्दबंब व्याख्यानबाजीमुळें ही परिस्थिति निर्माण झाली असें म्हणतां येणार नाहीं. कारण काँग्रेस-पुढाऱ्यांना आपल्या पुढील अडचणींची व संकटांची पूर्ण कल्पना होती, व ती झांकून न ठेवण्याची खबरदारीहि ते घेत असत.

देशांत दोन सरकारें निर्माण होऊं घातलीं आहेत, ह्या कल्पनेचा फैलाव होत चाललेला पाहून ब्रिटिश शास्त्यांना चीड येणें साहजिकच होतें. शासनदंड सर्वस्वी सरकारच्या हातीं असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत या कल्पनेला आधार सांपडत नसला, तरी जनतेच्या मनांत तसे विचार डोकावूं लागले होते हें अगदीं निःसंशय. बेजबाबदार हुकुमशाही सरकारला ही परिस्थिति खपली नाहीं. चारदोन खेड्यांत झालेलीं भाषणें अगर निघालेल्या मिरवणुकी यांच्यावर त्यांचा खरा रोष नसून हें जें खाजरें वातावरण पसरत चाललें होतें, त्यामुळें त्यांच्या अंगाचा भडका उडत असे. त्यामुळें झगडा होणें क्रमप्राप्तच झालें होतें. सरकारला राजी राखावें म्हणून आपल्या पोटांत सुरी खुपसून " हाराकिरी " करण्यास काँग्रेस तरी कां तयार होईल? हें सत्ताद्वंद्वाचें वातावरण सरकारला मुळींच मानवेना. त्यांनीं काँग्रेसला भरडून काढण्याचा चंग बांधला. पण दुसऱ्या मंडलाकार परिषदेमुळें हें कार्य जरा मुदतीवर पडलें. कांहींहि करून गांधीजींना लंडन येथें न्यावयाचेंच असा सरकारचा ठाम निश्चय झालेला असावा.

इकडे कलहभावनेच्या ज्वाला प्रज्वलित होत चालल्या होत्या. सरकारच्या बाजूनें बेमुर्वत वाढत होती. दिल्ली-समेटानंतर लॉर्ड अर्विनच्या जागीं लॉर्ड विलिंग्डन व्हाइसरॉय होऊन आले. नवा व्हाइसरॉय मोठा कडक आहे, तो तडजोडी मानणारा गृहस्थ नव्हे, वगैरे दंतकथा पिकूं लागल्या. तत्त्वदृष्ट्या विचार न करतां व्यक्तिदृष्ट्या विचार करण्याची " नेमस्त " संवय आमच्यांतील पुष्कळ राजकीय कार्यकर्त्यांना जडलेली आहे. व्हाइसरॉयच्या जागीं जी कोण व्यक्ति बसली असेल, तिच्यावर ब्रिटिश साम्राज्यशाहीचें मुख्य धोरण थोडेंच अवलंबून असतें! कोण व्हाइसरॉय आला व कोण गेला ही गोष्ट मतलबाची नाहीं. परिस्थिति बदलत जाईल तसें सरकारी धोरण हलके हलके बदलत जातें ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. काँग्रेसशीं समेट व वाटाघाटी झाल्या ही गोष्ट सिव्हिल सर्व्हिसमधील लोकांना पसंत पडली नव्हती. बरोबरीनें वागल्यामुळें काँग्रेस व गांधीजी यांच्या प्रतिष्ठेंत व सामर्थ्यांत आपण होऊन भर टाकली; आतां तरी त्यांचा नक्षा चार अंगुळें उतरविलाच पाहिजे असें त्यांना वाटत होतें. ही कल्पना अर्थातच निखालस मूर्खपणाची होती. परंतु हिंदी सिव्हिल सर्व्हिसमध्यें कल्पना-नाविन्याचें जरा दुर्भिक्ष्यच आहे. तें कांहींहि असो, सरकारनें ओंठ दावून मुठी वळण्यास सुरवात केली होती हें खरें; जणूं कांहीं जुन्या धर्मप्रवर्तकाच्या भाषेंत तें काँग्रेसला बजावीत होतें कीं, " माझ्या बापदादांच्या

लत्ताप्रहारांत जितका जोर नव्हता, तितका माझ्या दोन बोटांच्या चपराकींत आहे. तुझ्या अंगावर आसूड ओढून ते थांबले असतील; पण मी तुझ्या अंगाला इंगळ्या डसवीन, सोडणार नाहीं."

पण हा यमपुरीचा खेळ सुरू होण्यास अद्यापि अवकाश होता. मंडलाकार परिषदेसाठीं शक्य तर काँग्रेसचा प्रतिनिधि मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. दोन वेळां सिमल्याला जाऊन गांधीजींनीं व्हाइसरॉय व इतर अधिकारी यांच्याबरोबर चर्चा केली. बंगालव्यतिरिक्त सरकारच्या घशांत खवखवत असणारे दोन प्रश्न म्हणजे एक लाल डगलेवाल्यांचा व दुसरा सयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांचा. त्यांविषयीं सुद्धां ऊहापोह झाला.

सिमल्याहून गांधीजींनीं मला बोलावणें पाठविलें म्हणून तेथें जाऊन मीं सरकारी अधिकाऱ्यांशीं चर्चा केली. आमची चर्चा संयुक्त प्रांतांतील प्रश्नापुरतीच मर्यादित होती. आम्ही अगदीं दिलखुलास करून बोललों. वरकरणी चाललेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या तळाशीं दडलेल्या विरोधांविषयीं सुद्धां तेथें बोलणें चालणें झालें. १९३० च्या फेब्रुवारीमध्यें सरकारची अशी संगीन तयारी होती कीं अधिकांत अधिक म्हणजे तीन महिन्यांच्या आंत कायदेभंगाची चळवळ सरकारला पाळामुळांसकट नांगरून काढतां आली असती असें मला सरकारी अधिकाऱ्यांनीं सांगितलें दडप-शाहीचें सारें यंत्र जय्यत तयार होतें. एक झटका दिला, एक कळ दाबली, कीं यंत्र सुरू. पण जबरदस्तीपेक्षां सामोपचारानें समेट झाला तर पाहावा म्हणून परस्पर वाटाघाटी सुरू करण्यांत आल्या. आपसांत मिटलें नाहीं तर वरवंटा होताच हाताशीं. आम्ही सुधे चाललों नाहीं तर कदाचित् लवकरच तो दडपशाहीचा नांगर सुरू करावा लागेल असा इषाराहि मला देण्यांत आला. अर्थात् हीं सर्व बोलणीं सौजन्याचीं व प्रांजलपणाचीं होतीं. परंतु कसेंहि बोललें आणि कसेंहि चाललें, तरी झुंज टळत नाहीं ही गोष्ट दोन्ही पक्षांना कळून चुकली होती.

दुसऱ्या एका बड्या अधिकाऱ्यानें काँग्रेसची पाठ थोपटली. त्या वेळीं आम्ही राजकारणाव्यतिरिक्त अधिक विस्तृत प्रश्नांची चर्चा करीत होतों. राजकारण सोडलें तरी इतर बाबतींत काँग्रेसनें हिंदुस्थानचें फार कल्याण केलें आहे असें ते म्हणाले. हिंदी लोकांत संघटना-कौशल्य नाहीं असा आरोप सदोदित करण्यांत येत असे; पण १९३० सालीं इतक्या अडचणी व इतका विरोध असतांहि काँग्रेसनें जी संघटना केली, ती आश्चर्यजनक होती असें ते म्हणाले.

गांधीजी पहिल्या खेपेला सिमल्यास गेले तेव्हां मंडलाकार परिषदेला जाण्या-न जाण्याचा प्रश्न तसाच अनिर्णीत राहिला होता. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत ते दुसऱ्यांदा सिमल्यास गेले. तेव्हां कांहीं तरी निर्णय करणें भागच होतें. पण हिंदुस्थान सोडून जाण्यास त्यांचें मन अद्यापि तयार होईना. कारण बंगाल, संयुक्त प्रांत व सरहद्द प्रांत या ठिकाणीं वादळ होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

सरते शेवटीं उभय पक्षांना मान्य असा मसुदा एकदांचा तयार झाला व तो एका पत्रकांत नमूद होऊन कांहीं पत्रोत्तरेंहि झालीं. मंडलाकार परिषदेचे प्रतिनिधि ज्या बोटीनें निघणार होते, त्या बोटीनें गांधीजींना जातां यावें म्हणून अगदीं शेवटच्या क्षणीं मसुदा तयार करण्यांत आला. तसें म्हटलें तर शेवटचा क्षणहि उलटून गेला होता. कारण सिमल्याहून निघणारी शेवटची गाडी आधींच निघून गेली होती. पण सिमला ते काल्कापर्यंत खास गाडीची व्यवस्था करण्यांत येऊन गांधीजींना पुढील गाडी गांठतां यावी म्हणून इतर गाड्यांची खोटी करण्यांत आली.

मी गांधीजींबरोबर सिमल्याहून मुंबईपर्यंत गेलों. ऑगस्टच्या अखेरी-अखेरीला एके दिवशीं सकाळीं मीं त्यांना निरोप दिला. पश्चिम समुद्राकडे नाळ फिरवून बोटीचे पंखे पाणी कापूं लागले त्या वेळीं स्वच्छ ऊन पडलें होतें. त्यानंतर दोन वर्षें मला त्यांचें दर्शन झालें नाहीं.

३८

# मंडलाकार परिषद्

हिंदुस्थानांत व मंडलाकार परिषदेच्या वेळीं लंडनमध्यें पुष्कळ वेळां गांधीजींशीं आपल्या गांठीभेटी झालेल्या आहेत असें सांगणाऱ्या एका इंग्रज वृत्तपत्रकारानें आपल्या पुस्तकांत खालीलप्रमाणे मजकूर लिहिला आहे :

" कॉंग्रेस वर्किंग कमिटींत गांधीजींच्या विरुद्ध कट करण्यांत आला आहे ही गोष्ट मुलतान बोटीवरील पुढाऱ्यांना माहीत होती. योग्य संधि सांपडली कीं गांधीजींना गचांडी देण्यांत येईल हें ते जाणून होते. पण गांधीजींना गचांडी मिळाली कीं त्यांच्या पाठोपाठ अर्धे अधिक सभासद कॉंग्रेसमधून बाहेर पडणारच. कॉंग्रेस-मधून असा कंपू बाहेर पडला कीं, त्याला प्रागतिक गटांत ओढून घ्यावा असा सर सप्रू व श्री. जयकर यांचा बेत होता. श्री. गांधी म्हणजे एक " बथ्थड डोक्याचा " गृहस्थ आहे हें त्यांचें मत ते कधींहि छपवून ठेवीत नसत. पण " बथ्थड डोक्या " पुढाऱ्याच्या मागोमाग जाणाऱ्या लक्षावधि बथ्थड डोक्या अनुयायांचा कळप हातीं लागणार असेल तर तसल्या पुढाऱ्यालासुद्धां आपलासा करून घेणें अगत्याचें होऊन बसतें." *

सर सप्रू, जयकर वगैरे मंडलाकार परिषदेच्या प्रतिनिधींचीं सत्य मतें या उताऱ्यांत कितपत उतरलीं आहेत तें मला सांगतां येणार नाहीं. परंतु हिंदी

* गांधीजींची करुण कहाणी ( दी ट्रॅजिडी ऑफ गांधी ) ह्या ग्लोर्नो डाल्टन यांच्या पुस्तकावरून. माझ्या समजुतीप्रमाणें डाल्टनसाहेबांनीं केलेलीं बरींचशीं विधानें व अनुमानें साफ चुकीचीं आहेत. विशेषतः दिल्ली-समेटाच्या वेळीं वर्किंग कमिटीच्या कार्यासंबंधीं दिलेली वस्तुस्थितिविषयक माहिती सत्यास धरून नाहीं. गांधीजींना विरोध करून वल्लभभाईनीं १९३१ सालीं कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान व तद्वारां कॉंग्रेसचें नेतृत्व पटकावलें वगैरे गोष्टी तर अजब वाटतील.

दुसऱ्याहि अनेक चुका आहेत. पण त्यांचा समाचार तळटीपेंत घेणें शक्य नाहीं. माझ्या वडिलांना युरोपियन क्लबाचे सभासद करून घेतलें नाहीं म्हणून त्यांच्या आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली असेंहि एक विधान त्यांनीं ठोकून दिलें आहे. पण ही गोष्ट साफ खोटी आहे. अलाहाबाद कोर्टाचे सरन्यायाधीश सर जॉन एज यांची माझ्या वडिलांवर विशेष मर्जी होती. अलाहाबाद क्लबाच्या सभा-सदत्वासाठीं मी तुमचें नांव सुचवितों असें त्यांनीं वडिलांना सांगितलें. परंतु खुद्द वडिलांच्या आग्रहावरून सभासदत्वाचा विषय तेवढ्यावरच थांबला. या प्रसंगामुळें

राजकारणाची पमटमुद्रां ओळख असणारा कोणताहि इसम अथवा पत्रपंडित अथवा "पुढारी" असें मत जाहीर करील तर ती मोठ्या आश्चर्याचीच गोष्ट म्हटली पाहिजे. वरील उतारा वाचून मी तर थक्कच झालों! वरीलप्रमाणें कोणाचें मत आहे अशी साधी कुणकुणदेखील यापूर्वी माझ्या ऐकिवांत नव्हती. परंतु मी बराच वेळ तुरुंगांत असल्यामुळें तसें घडणें शक्य आहे.

कट कोणीं केला? आणि कसला? वल्लभभाई व मी म्हणजे आत्यंतिक मतांचे सभासद असा समज प्रचलित असल्यामुळें कटवाल्यांच्या पुढाऱ्यांत आमचीं नांवें तर असणारच. खरें पाहू गेलें तर सर्व हिंदुस्थानांत वल्लभभाईंपेक्षां एकनिष्ठ असा सहकारी गांधीजींना लाभलेला नाहीं. काम करण्याच्या बाबतींत ते वाघ असले तरी गांधीजींवर व त्यांच्या तत्त्वज्ञानावर आणि धोरणावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे. माझी श्रद्धा तशाच प्रकारची आहे असें म्हणतां येणार नाहीं. परंतु गांधीजींच्या अत्यंत निकट सहवासांत काम करण्याचा सुयोग मला लाभला होता. गांधीजींच्या विरुद्ध कोणत्याहि प्रकारचें कारस्थान रचावें ही कल्पना मला अधमपणाची वाटते, आणि सर्वच वर्किंग कमिटीला माझ्याप्रमाणें वाटत असावें. ही कमिटी तरी जवळ जवळ त्यांनींच बनवलेली होती. दुसऱ्या सहकाऱ्यांच्या विचारानें त्यांनींच वर्किंग कमिटींतील सभासदांचीं नांवें सुचविलीं होतीं. निवडणूक झाली ती केवळ उपचारापुरती; त्यांतील प्रमुख सभासदांनीं वर्किंग कमिटींत गेलीं कित्येक वर्षे काम केलेलें होतें; त्यांना वर्किंग कमिटीचें कायम सभासदच समजण्यांत येई. त्यांच्यांत राजकीय मतभिन्नता होती, त्यांचे दृष्टिकोण व स्वभावहि भिन्न होते; पण कित्येक वर्षांचें सहकार्य व संकटप्रसंगीं एकदिलानें जबाबदारी शिरावर घेण्याची संवय, यामुळें ते मनानें निगडित झाले होते. परस्परांत केवळ सहकार्यच होतें असें नव्हे; तर शरीराच्या निरनिराळ्या अवयवांप्रमाणें त्यांच्यांत एकदेहीपणा उत्पन्न झाला होता. एकमेकांविरुद्ध तेथें कारस्थानें रचण्यांत येतील ही गोष्टच शक्य नव्हती. सर्व कमिटीवर गांधीजींचें वर्चस्व चालत असे, आणि सल्लामसलतीची वेळ आली म्हणजे गांधीजींच्या तोंडाकडेच कमिटीचे सदस्य पाहत. १९३१ नंतर तर गांधीजींचा विचार घेण्याची दरघडी जरूर भासूं लागली.

प्रश्न असा कीं गांधीजींना अडचण देऊन कमिटींतील अतिरेकी सदस्यांना साधावयाचें होतें तरी काय? त्यांची वृत्ति कमालीची सामोपचाराची असल्यामुळें

---

त्यांनीं इंग्रजांशीं वैरभाव मुळींच धरला नाहीं. उलट त्यांचे इंग्रजांशीं जे स्नेहसंबंध जुळून आले ते यानंतरच्या काळांतले होत. ही १८ व्या शतकांतील नवव्या दशकांतली गोष्ट आहे. त्यानंतर जवळ जवळ पंचवीस वर्षे लोटल्यावर ते असहकारी बनले. त्यांचीं मतें हलकेहलके जहाल बनत चाललीं होतीं, पण पंजाबांतील लष्करी कायद्याच्या वेळीं कडेलोट झाला, व ते उघडपणें जहाल गटांत सामील झाले.

आम्हांला गळ्यांतील लोढण्याप्रमाणें त्यांची अडचण होत असेल असा तर्क कोणी केला असेल. पण ते नसते तर सत्याग्रह, कायदेभंग, चळवळ वगैरे गोष्टी जन्मालाहि आल्या नसत्या. गांधीजी म्हणजे चळवळीचा एक अत्यावश्यक भाग अशी स्थिति झाली होती; किंबहुना चळवळीचा प्राण म्हणजे गांधीजी असा प्रकार झाला होता. बोलण्याचें तात्पर्य असें नाहीं कीं सबंध राष्ट्रीय चळवळ गांधीजींनींच निर्माण केली. ती एका मनुष्यावर अवलंबून होती असेहि म्हणणें नाहीं; तिचीं मुळें फार खोलवर घुसलेलीं होतीं. परंतु राष्ट्रीय चळवळीच्या ज्या विशिष्ट अगाचें कायदेभंग हें प्रतीक समजण्यांत येत होतें, तें अंग मात्र सर्वस्वीं गांधीजींवर अवलंबून होतें. गांधीजींना घालवून द्यावयाचें तर कायदेभंगाची चळवळ गुंडाळून ठेवून नव्या चळवळीचा पाया बांधण्यास सुरुवात करावयाला हवी होती. हें काम करणें कोणत्याहि काळीं अवघडच झालें असतें म्हणा. पण १९३१ सालीं तर त्यासंबंधीं विचार करणें देखील शक्य नव्हतें.

१९३१ सालीं कॉंग्रेसमधून त्यांची हकालपट्टी करण्याचा व्यूह आमच्यापैकीं कांहीं जण रचीत आहेत अशी कांहीं लोकांची कल्पना व्हावी याची मोठी मौज वाटते. केवळ सौम्यशा सूचनेने जे काम उरकतां आलें असतें त्यासाठीं व्यूह आणि कट कशाला ? मी कार्यनिवृत्त होतों असें त्यांनीं जरा कुठं म्हटलें तरी वर्किंग कमिटींत व त्याचप्रमाणें सर्व देशांत मोठी गडबड उडून जात असे. आमच्या चळवळीशीं ते इतके एकजीव झालेले आहेत कीं त्यांनीं आम्हाला सोडून जावें ही कल्पना सुद्धां सहन होत नाहीं. गांधीजी लंडनला गेले म्हणजे इकडची सर्व जबाबदारी आमच्यावर पडणार ही कल्पना फारशी प्रिय वाटत नसल्याकारणाने त्यांना तिकडे पाठविण्याच्या बाबतींत आमची चालढकल चालली होती. जबाबदारी आली कीं ती पडशी सरळ गांधीजींच्या खांद्यावर लादावी असाच आमचा क्रम असे. वर्किंग कमिटींतील व बाहेरील कांहीं लोकांचे व गांधीजींचे परस्परसंबंध इतके जिव्हाळ्याचे होते कीं, त्यांना घालवून देऊन तात्कालिक लाभ करून घेण्यापेक्षां त्यांच्याशीं सहकार्य करतां करतां अपयश पदरीं पडलें तरी हरकत नाहीं असें वाटावें.

गांधीजी "बथ्थड डोक्याचे" आहेत कीं नाहींत याबद्दल निर्णय देण्याचें काम आमच्या प्रागतिक मित्रांवर सोपविलेलें बरें ! ही गोष्ट खरी कीं त्यांचें राजकारण पुष्कळ वेळां अधिभौतिकाच्या पलिकडचें व समजण्यास कठीण असें असतें. पण आपली कामाची धडाडी, आपलें अलोट धैर्य व आपला अधिकार त्यांनीं सिद्ध केलेला आहे. बथ्थड डोक्यांतून जर अशीं फायद्याचीं कलमें पैदा होत असतील तर अभ्यासमंडळें व निवडक लोकांच्या मजलशी यांच्यापलीकडे ज्यांचें राजकारण पोंचत नाहीं, अशांच्या "व्यवहारी राजकारणाशीं" तुलना करतां गांधीजींचें राजकारण फिक्कें वाटण्याचें काय कारण ! त्यांचे लक्षावधी अनुयायीसुद्धां मग डोक्याचे आहेत

ही गोष्ट देखील खरीच आहे. राजकारण व राज्यघटना वगैरे गोष्टींचें त्यांना ज्ञान नाहीं. त्या बिचाऱ्यांना अन्नवस्त्र, निवाऱ्याची जागा आणि धान्य पिकविण्यासाठीं जमीन एवढ्याच मानवी गरजा समजतात.

मनुष्यस्वभावाची पारख करण्याचा दृढ व्यासंग असलेल्या प्रसिद्ध परराष्ट्रीय पत्रपंडितांचीं अनुमानें हिंदुस्थानच्या बाबतींत चुकावीत ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. पौर्वात्य देश हे सर्वस्वीं भिन्न आहेत व त्यांची पारख नेहमींच्या निकषावर घांसून करतां येणार नाहीं अशी लहानपणापासून झालेली समजूत मनांतून दूर करणें अशक्य झाल्यामुळें अशीं चुकीचीं अनुमानें ते करितात कीं काय? कीं साम्राज्यमदाची धुंदी डोळ्यांवर चढून इंग्रज लोकांची दृष्टि आणि विचारशक्ति कलुषित होत असते! कोणतीहि गोष्ट कितीहि अविश्वसनीय असली, तरी ती ते बेधडकपणें खरी मानून चालतात. कारण समजूतच ही कीं, गूढ अशा ह्या पौर्वात्य देशांत अशक्य म्हणून कांहीं नाहींच. उत्कृष्ट निरीक्षणशक्ति व तीव्र बुद्धिमत्ता ह्यांची साक्ष देणारीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत, पण मधून मधून ते सपशेल घसरलेले दिसतात.

१९३१ सालीं गांधीजी युरोपकडे निघाले तेव्हां लंडन येथील एका वृत्तपत्राच्या पॅरिसमधील एका नाणावलेल्या बातमीदारानें लिहिलेला एक लेख माझ्या वाचनांत आला होता. लेख हिंदुस्थानविषयक असून त्यांत १९२१ सालीं प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत आले तेव्हां (लेखकाच्या मतें) येथें घडलेल्या एका प्रसंगाचा उल्लेख करण्यांत आला होता. महात्मा गांधी एकाएकीं युवराजाला सामोरे गेले व त्याचे पाय घट्ट धरून 'आमच्या दुर्दैवी देशाला शांतीचा लाभ आपण करून द्या हो' अशी त्यांनीं युवराजाला विनंती केली असें त्या प्रसंगाचें वर्णन लेखकानें केलें आहे! ही विलक्षण गोष्ट, आम्ही तर राहोच, पण खुद्द गांधीजींनींहि कधीं ऐकलेली नव्हती. ही चूक मीं लेखकाच्या निदर्शनास आणल्यावर त्यानें खेद व्यक्त केला. पण एका विश्वसनीय माणसाकडून हा प्रसंग मला कळला असेंहि त्यानें लिहिलें. परंतु म. गांधी अथवा काँग्रेस अथवा हिंदुस्थान यांच्याबद्दल यत्किंचितहि माहिती असणाऱ्या माणसाचा ज्यावर विश्वास बसणें सर्वस्वीं अशक्य आहे, त्या वर्णनावर लेखकानें चौकशीचा प्रयत्नदेखील न करतां खुशाल विश्वास ठेवावा याचें मला नवल वाटलें. दुर्दैवानें कित्येक वर्षें हिंदुस्थानांत वास्तव्य करूनहि पुष्कळ इंग्रजांना ह्या देशासंबंधीं, काँग्रेससंबंधीं अथवा गांधीजींसंबंधीं काडीचीहि माहिती असत नाहीं. कँटरबरीचे आर्चबिशप एकदम मुसोलिनीच्या खोलींत शिरले व डोक्यावर उभे राहून त्यांनीं नमस्काराच्या ऐवजीं हवेंत तंगड्या झाडण्यास प्रारंभ केला, असल्या कपोलकल्पित थापांच्या योग्यतेचीच वरील गोष्ट होय!

दुसऱ्या एका वृत्तपत्रानें निराळ्याच मासल्याची एक गोष्ट प्रसिद्ध केली आहे. गांधीजींपाशीं कोट्यवधि रुपयांचा खजिना असून तो त्यांच्या मित्रापाशीं अनामत ठेवलेला आहे. तो पैसा बळकावण्यास मिळावा असें काँग्रेसच्या मनामध्ये असल्या-

कारणानें, गांधीजी काँग्रेसमधून निघून गेले तर हें डबोलें आपल्या हातीं लागणार नाहीं अशी भीति काँग्रेसला वाटत असते, असें त्यांत लिहिलें आहे. या गोष्टींतला आचरटपणा सहज लक्षांत येण्याजोगा आहे. कारण, गांधीजी स्वतःपाशीं गुप्त असें कोणतेंच धन ठेवीत नाहींत व ते जें कांहीं जमा करितात तें ते लगेच सार्वजनिक संस्थांना देऊन टाकीत असतात व त्यांचा हिशोबहि जाहीर रीत्या प्रसिद्ध होत असतो.

१९२१ सालीं काँग्रेसनें जे एक कोटी रुपये जमविले, त्यावर ही गोष्ट आधारलेली असावी. एक कोटी रुपयांचा आंकडा एकरकमी सांगितला म्हणजे मोठा घसघसीत वाटतो. पण सर्व हिंदुस्थानच्या मानानें ही रक्कम फार मोठी नाहीं. राष्ट्रीय विश्व-विद्यालयें व शाळा, घरगुती उद्योगधंदे व विशेषतः खादी, त्याचप्रमाणें हरिजन-कार्य वगैरे अनेक विधायक कार्यक्रमांकडे त्या पैशाचा विनियोग करण्यांत आला. त्यांपैकीं बहुतेक पैसे विशिष्ट कार्यासाठीं बाजूस काढण्यांत आलेले होते व तीं कार्यें अद्यापि चालू आहेत. बाकीचा फंड काँग्रेसचें संघटनात्मक व राजकीय कार्य चालू ठेवण्यासाठीं स्थानिक कमिट्यांच्या हवालीं करण्यांत आला होता. असहकारितेच्या चळवळीला व त्यानंतरच्या कांहीं वर्षांतील कार्याला त्यांतून मदत झाली. अत्यंत काटकसरीनें राजकारणाचें काम उरकण्याची शिकवणूक आम्हांला देशाच्या दारिद्र्याप्रमाणेंच गांधीजींपासूनहि मिळालेली आहे. आमचें बहुतेक काम विनावेतनच करण्यांत येतें व वेतन दिलेंच, तर तें जेमतेम पोटाला पुरेल न पुरेल इतक्या प्रमाणांत असतें. इंग्लंडांतील बेकारांना जितका भत्ता मिळतो त्याहिपेक्षां कमी पगार आमच्या कुटुंब-वत्सल अशा पहिल्या प्रतीच्या सुशिक्षित कार्यकर्त्यांना आम्ही देत असतों. गेल्या पंधरा वर्षांत काँग्रेससारखी प्रचंड चळवळ जितक्या काटकसरीनें चालविण्यांत आली आहे, तितक्या काटकसरीनें कोणतीहि राजकीय अथवा मजूर-चळवळ जगाच्या पाठीवर कोठेंहि चालली असेल कीं नाहीं याची मला शंका आहे. कायदेभंगाच्या काळांत काँग्रेस संस्था बेकायदा ठरली होती तेव्हांचा काळ सोडला, तर दरवर्षी आपल्या-जवळील फंडाचा हिशेब काँग्रेसनें प्रसिद्ध केल्याचें आढळून येईल

काँग्रेसच एकमेव प्रतिनिधि म्हणून गांधीजी मंडलाकार परिषदेला गेले. खूप ऊहापोह होऊन शेवटीं असें ठरलें होतें कीं त्यांच्याव्यतिरिक्त दुसरा प्रतिनिधि पाठवावयाचा नाहीं. अडचणीच्या वेळीं आमचीं बिनीवरचीं माणसें जवळच असावीं अशी इच्छा त्या निर्णयाला कांहीं अंशीं कारणीभूत होतीच. लंडनला मंडलाकार परिषद सुरू असली तरी राजकारणाचा गुरुत्वमध्य हिंदुस्थानांतच आहे, येथें जशी परिस्थिति बदलेल तसे रंग तिकडे उमटतील असें आम्हाला वाटत होतें. परिस्थितींत बिघाड होऊं नये व आमची संघटना शाबूत राखावी अशा दृष्टीने आम्हीं प्रयत्न चालू ठेवले. एकमेव प्रतिनिधि लंडनला पाठविण्याचें खरें कारण हेंच एक होतें असें नव्हे. अवश्य व इष्ट दिसलें असतें, तर इतरहि लोकांना आम्हीं धाडलें असतें. पण असें करण्याचें आम्हीं मुद्दामच टाळलें.

राज्यघटनेंतील बारीक पापुद्रे सावकाशपणें सोलीत व सोडवीत बसण्यासाठीं आम्ही मंडलाकार परिषदेला हजर राहणार नव्हतों. आमच्या दृष्टीनें तपशीलाचें मुळींच महत्त्व नव्हतें. ब्रिटिश सरकारशीं मूलभूत बाबतींत कांहीं समेट झाल्यानंतर त्याचा विचार करतां आला असता. लोकसत्ताक हिंदुस्थानच्या हातीं किती सत्ता पडणार, हा खरा महत्त्वाचा प्रश्न होता. नंतरचे तपशील ठरविण्याचें व मसुदा तयार करण्याचें काम एखाद्या सॉलिसिटरनेंमुद्धां उरकून टाकलें असतें. या पायाभूत प्रश्नासंबधीं कॉंग्रेसची बाजू अगदीं सहज समजण्यासारखी होती. त्यावर फारसा वादविवाद होण्यास अवकाश नव्हता. अशा परिस्थितींत प्रशस्त मार्ग म्हणजे एका प्रतिनिधीनें व त्यांतल्या त्यांत आमच्या पुढाऱ्यानें तेथें जाऊन आपली बाजू मांडावी, आमच्या ध्येयाची तर्कशुद्धता व अपरिहार्यता त्यांच्या नजरेस आणून द्यावी, व शक्य तर ब्रिटिश सरकारचें मन आपल्या बाजूला वळवावें असें आम्हांला वाटलें. गोष्ट अशक्यप्राय आहे हें आम्ही ओळखून होतोंच. पण दुसरा मार्ग उरला नव्हता. आमचें ध्येय, आमचीं तत्त्वें अथवा आम्ही स्वीकारलेला मार्ग आम्हांस सोडून देणें शक्यच नव्हतें. कारण त्यांचा स्वीकार आम्हीं प्रतिज्ञेवर केला होता, त्यांवर आमचा विश्वास होता. कांहीं अघटित घटना होऊन त्या मूलभूत सिद्धांतांच्या भूमिकेवर समजूत निघाली असती, तर बाकीचें आपोआप सिद्ध होणारच होतें. आणि आपसांत आम्ही असेंहि ठरवलें होतें कीं, तसा समेट घडून आला तर गांधीजींनीं वर्किंग कमिटीच्या कांहीं अथवा सर्व सभासदांना तात्काळ लंडनला बोलावून घ्यावें म्हणजे तपशीलवार वाटाघाटींत सर्वांनाच भाग घेणें सोपें होईल. बोलावणें आलें कीं निघतां येईल अशा तयारीनें आम्हीं असावें, अवश्य तर विमानमार्गें लंडनला जावें, इतका बेत झालेला होता.

पण मुद्द्याच्या गोष्टीवरच मतभेद झाला तर विगतवार चर्चा करण्याची जरूरीच नव्हती. आणि मंडलाकार परिषदेसाठीं अधिक प्रतिनिधि पाठवण्याचेंहि कारण नव्हतें. म्हणून एकट्या गांधीजींनाच पाठवावयाचें ठरलें. सरोजिनी नायडू परिषदेला गेल्या होत्या; पण त्यांना हिंदी स्त्रियांच्या प्रतिनिधि म्हणून सरकारनें निमंत्रण केलें म्हणून त्या गेल्या. वर्किंग कमिटीनेंहि त्यांना जाण्याची परवानगी दिली.

आमचें म्हणणें मान्य करावें अशी सरकारची मुळींसुद्धां इच्छा नव्हती. ऐन प्रश्नांचा विचार लांबणीवर टाकून किरकोळ मुद्द्यांच्या चर्चेतच परिषद जिरवून टाकावी असा त्यांनीं घाट घातला. महत्त्वाचे मुद्दे निघाले कीं, सरकार तोंडाला कुलुप घालून बसे. आतांच आम्ही स्वतःला बांधून घेत नाहीं, पूर्ण विचाराअंतीं काय तें मत व्यक्त करूं असें सरकार म्हणें. सरकारच्या हातचें सर पान म्हणजे जातीय प्रश्न. त्याचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला आणि परिषदेंतील मुख्य चर्चा त्याच प्रश्नावर झाली.

मंडलाकार परिषदेचे बहुतेक हिंदी प्रतिनिधि कळत न कळत या सरकारी

व्यूहांत फसले. सतरा ऋषी तेथें जमले होते. कांहींच्या बाबतींत तर आपण आपलेच प्रतिनिधि असा प्रकार होता! अशा लोकांत देखील कांहीं कर्तबगार व आदरणीय व्यक्ति होत्या. परंतु एकंदरीनें राजकीय व सामाजिक दृष्ट्या अत्यंत प्रगति-पराङ्मुख अशा मतांची सगळी खरवड तेथें सांचली होती. ते लोक असे इरसाल मागासलेले आणि परागतिक होते कीं नेमस्त व सावध वृत्तीचे म्हणून विख्यात असलेले हिंदी प्रागतिक सुद्धां त्यांच्या घोळक्यांत प्रगतिप्रिय म्हणून चमकूं लागले! ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं निगडित झालेल्या हिंदी वरिष्ठ वर्गांचे ते प्रतिनिधि होते. साम्राज्याचें कृपाछत्र डोक्यावर घेऊन आत्महिताचा पंथ आक्रमावा असा त्यांचा मानस होता. मुख्य मुख्य प्रतिनिधि जातिहिताचें जतन करण्यासाठींच आलेले होते. या धेंडांचें कोणाशींहि पटणें शक्य नव्हतें. आपसांत देखील त्यांच्या मारामाऱ्या चालू असत. राजकीय प्रगति गहाण पडली तरी बेहेत्तर, पण आपलें जातिहित साधलें पाहिजे, अशी त्यांची उफराटया चालीची मनोवृत्ति होती. जातीय मागण्या पुऱ्या झाल्याशिवाय अधिक राजकीय स्वातंत्र्य आम्हाला नको असें ओरडून सांगण्याचेंहि त्यांनीं बाकी ठेविले नाहीं. हें दृश्य असें होतें कीं कोणाचेंहि मन त्यामुळें कष्टी व्हावें. परतंत्र लोकांच्या अधोगतीची मजल कोठपर्यंत जाऊं शकते व आम्ही साम्राज्यशाहीच्या हातचीं खेळणीं कसे बनतों तें ह्या प्रसंगीं चक्क दिसून आलें. तेथें जमलेल्या राजामहाराजांच्या, व इतर वाशिंगबहाद्दरांच्या टोळक्यांतील लोक म्हणजे हिंदी जनतेचे प्रतिनिधि नव्हत ही गोष्ट स्पष्टच होती. ब्रिटिश सरकारकडूनच त्यांची नेमणूक झाली होती त्यांची निवड करतांना सरकारनें आपलें हित पाहिलें यांत शंका नाहीं. परंतु आमच्या लोकांना ब्रिटिश सरकारनें असें राबवावें व तावडावें या एकाच गोष्टीवरून आमचें दौर्बल्य उघडकीस येत नाहीं काय? त्यांच्या फुसलावणीनें आम्हीं एकमेकांचा कार्यनाश करण्यास सहजासहजीं तयार व्हावें हें केवढें आश्चर्य! आमच्यावर साम्राज्य गाजवणाऱ्यांचीच विचारसरणी आमचा धनिक वर्ग चघळीत राहिला होता आणि त्यांचाच कार्यभाग हे वरिष्ठवर्गीय लोक उरकीत होते. साम्राज्यशाहीचा कावा त्यांना काय कळत नव्हता? कीं त्यांतलें इंगित उमगल्यावरहि लोकशाहीची व स्वातंत्र्याची भीति वाटून त्या तत्त्वज्ञानाचा त्यांनीं जाणून बुजून स्वीकार केला?

या साम्राज्यवाद्यांच्या, सरंजामदारांच्या, बँकवाल्यांच्या, कारखानदारांच्या, धर्मनिष्ठांच्या व जातिनिष्ठांच्या कंपूचें आधिपत्य आगाखान यांच्याकडे यावें हें स्वाभाविकच होय. त्यांच्या ठायीं कांहीं अंशीं सर्व स्वार्थसमन्वय झालेला आहे. ब्रिटिश साम्राज्यवादी वर्ग व अधिकारी वर्ग यांच्याशीं इंग्लंडांतील पचवीस वर्षांच्या वास्तव्यामुळें त्यांचा दाट परिचय झालेला असून, जेत्यांच्या स्वार्थाशीं व दृष्टिकोणाशीं एकरूप होण्याची ऐपतहि त्यांच्या अंगीं आलेली आहे. साम्राज्यवादी इंग्लंडचे प्रतिनिधि म्हणून जरी ते मंडलाकार परिषदेंत बसले असते, तरी देखील त्यांनीं उत्कृष्ट

कामगिरी बजावली असती; पण दैव असें खवचट कीं ते हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून तेथें हजर राहिले.

आमच्या विरुद्ध बाजूचें पारडें कमालीचें जड होतें. तेथें कांहीं फलनिष्पत्ति होईल अशी अपेक्षा आम्हीं अगोदरपासून बाळगली नव्हती, तरीसुद्धां परिषदेंतील घडामोडींकडे पाहून आम्ही आश्चर्यमूढ होऊन गेलों. मनाला शिसारी वाटूं लागली. राष्ट्रीय व आर्थिक प्रश्नांच्या वर्मी घावांवर मलमपट्टी लावण्याचे वरपांगी प्रयत्न चालले होते. डावपेंच आणि कारस्थानें सुरू होतीं. आमचेच कांहीं देशबांधव कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिशांच्या गळां मिठी पडत होते, क्षुद्र प्रश्नांचा काथ्याकूट चालला होता, जिव्हाळ्याचे प्रश्न अडगळींत लोटण्यांत येत होते, आपसांतील डोकेफोड थांबली नव्हती, मेजवान्या व अहोरूपमहोध्वनीच्या मजलशीं झडत होत्या. हा सारा हमामा पाहून परमावधीचा खेद झाला. नोकऱ्यांसाठीं गोळा झालेल्या गिधाडांची पंगत तेथें बसली होती—मोठ्या नोकऱ्या, छोट्या नोकऱ्या, हिंदूंसाठीं नोकऱ्या, मुसलमानांसाठीं नोकऱ्या, शिखांसाठीं नोकऱ्या, अँग्लो-इंडियनांसाठीं नोकऱ्या, युरोपियनांसाठीं नोकऱ्या; पण ही सर्व नोकऱ्यांची कावकाव वरच्या लोकांसाठीं. पंक्तींत जनतेसाठीं कोठेंच पाट नव्हते. संधिसाधूपणाचा तेथें कळस झाला. भुकेलेल्या लांडग्याप्रमाणें निरनिराळे गट नव्या राज्यघटनेनुसार मिळणाऱ्या मांसखंडाच्या आशेनें जिभा चाटीत आवतीभोंवतीं वावरत होते. स्वातंत्र्य म्हणजे नोकरीचा बाजार–त्याचें गोंडस नांव 'हिंदीकरण' हें आहे–असा अर्थ होऊन सैन्यखातें व मुलकीखातें यांत अधिक हिंदी लोकांची वर्णी लावा असा गोंगाट सुरू झाला. खरें स्वातंत्र्य मिळावें, लोकसत्ताक हिंदुस्थानच्या हातीं शासनाधिकार यावे, हिंदी जनतेपुढें आं पसरून उभ्या असलेल्या जिव्हाळ्याच्या आर्थिक प्रश्नांचा तड गांठावी, ह्याचा विचार कोणाला सुचेल तर शपथ. यासाठीं का हिंदी जनता शौर्यानें झुंजली? चळवळींतील उच्च स्वार्थत्यागाच्या व उच्चतर ध्येयाच्या दुर्लभ वातावरणाचा त्याग आम्हीं केला तो ह्या दुर्गंधीनें भरलेल्या गटारांत लोळावयास मिळावें म्हणून कीं काय?

मंडलाकार परिषदेच्या त्या सुशोभित दिवाणखान्यांत गांधीजी प्रतिनिधींच्या दाटींत बसलेले असूनहि किती एकाकी दिसत होते. वस्त्रप्रावरणामुळें अथवा वस्त्रप्रावरणांच्या अभावामुळें म्हणा, ते इतरांपेक्षां भिन्न दिसत होतेच, पण त्यांच्या मागेंपुढें कडकडीत पोषाख करून बसलेल्या प्रतिनिधींच्या व त्यांच्या विचारांत व दृष्टिकोणांतहि अतिशय भिन्नता होती. पाय खोड्यांत अडकावा त्याप्रमाणें त्यांना झालें. ती स्थिति त्यांना किती दिवस सहन करतां येईल याविषयीं आम्हीसुद्धां साशंकच होतों. परंतु त्यांनीं विलक्षण सहिष्णुता दाखवली व समेट व्हावा म्हणून हरप्रयत्न सुरू ठेविले. त्यांनीं एक सूचना मांडल्याबरोबर जातिनिष्ठेच्या बुरख्या-आड साळसूदपणें वावरणाऱ्या राष्ट्रघातकी वृत्तीचें अंग उघडें पडलें. जातिनिष्ठ

मुसलमान प्रतिनिधींच्या मागण्या त्यांना व त्यांच्या राष्ट्रीय मुसलमान सहकाऱ्यांना नापसंत होत्या. त्या मागण्यांमुळें स्वातंत्र्याच्या वाटेवर कांटे पसरले जात आहेत असें गांधीजींना वाटत होतें. असें असूनसुद्धां स्वातंत्र्याच्या बाबतींत जातिनिष्ठ मुसलमान प्रतिनिधि कॉंग्रेसशीं सहकार्य करण्यास तयार असतील तर त्यांच्या सगळ्याच्या सगळ्या मागण्या आपण मान्य करण्यास तयार आहों असें त्यांनीं कळविलें.

हें वैयक्तिक आश्वासन असलें, तरी कॉंग्रेसचा पाठिंबा गांधीजींना मिळणार त्याविषयीं शंका घेण्याचें कारणच नव्हतें. पण त्यांची सूचना जातिनिष्ठांना मान्य झाली नाहीं. आगाखान आणि गांधी हिंदी स्वातंत्र्यासाठीं एकदिलानें झटणार ही कल्पना जरा विचित्रच नाहीं का? जातीय प्रश्नाचें दुखणें खरें नाहीं. राष्ट्रघातकी लोकांची ती एक बतावणी आहे ही गोष्ट मात्र या प्रसंगानें स्पष्ट झाली. सगळे विघ्नसंतोषी गणंग ब्रिटिश सरकारनें वेंचून एकत्र आणले होते. कार्याचीं सूत्रें सरकारच्या हातीं असल्यामुळें सर्व काळ रंगभूमीवर यांचाच धांगडधिंगा चालू राहिला. असे हटवादी लोक तेथें आल्यावर काय बिशाद जातीय प्रश्न निकालांत निघेल !

सरकारनें त्या वेळीं डाव साधला हें निःसंशय. साम्राज्य टिकविण्यास अवश्य ती दंडशक्ति आमच्यापाशीं आहेच, पण त्याच्या जोडीला मुत्सद्देगिरी व आवडाव हेहि आहेत याचें प्रत्यंतर सरकारनें पटवून दिलें. हिंदी लोकांना अपयश आलें याचें कारण असें कीं, लढयासंबंधीं त्यांची विचारसरणी पक्की झालेली नसल्यामुळें त्यांची दिशाभूल सहज करतां आली. आमच्या प्रगतीच्या आड पदोपदीं येणाऱ्या वरिष्ठ वर्गातील लोकांच्या स्वार्थाचें जूं फेकून देण्याइतकी शक्ति आमच्या अंगांत आलेली नव्हती, तेंहि आमच्या अपयशाचें कारण आहे. धार्मिक भावनेचा कडवेपणा व छू म्हणतां उत्तेजित करतां येण्यासारखी जातिनिष्ठा यादेखील आम्हांला आलेल्या अपयशाच्या बुडाशीं आहेतच. थोडक्यांत म्हणजे आमची पुरेशी प्रगति झालेली नव्हती व पुरेशी कुवत आमच्या अंगांत आलेली नव्हती, म्हणून आम्ही नामोहरम झालों.

मंडलाकार परिषदेमध्यें जिंकण्याचा किंवा हरण्याचा प्रश्नच नव्हता; कारण त्यांतून फारसें कांहीं निष्पन्न होईल अशी आशाच नव्हती. तथापि दुसऱ्या मंडलाकार परिषदेच्या वेळीं फरक आढळून आलाच. पहिल्या परिषदेच्या वेळीं लोकांचें सर्व लक्ष कायदेभंगाच्या चळवळीकडे वेधलेलें होतें. परंतु १९३१ सालीं कॉंग्रेसचे प्रतिनिधि व हिंदुस्थानांतील लक्षावधि जनतेचे पुढारी म्हणून गांधीजी तेथें गेल्याबरोबर साराच नूर पालटला. त्यांच्या आगमनानें परिषदेची प्रतिष्ठा वाढली, व परिषदेंतील हालचालींकडे लोक अधिक लक्षपूर्वक पाहूं लागले. तेथें अपयश आलें तर त्यामुळें हिंदुस्थानचीच बदनामी होणार होती. गांधीजींनीं मंडलाकार परिषदेंत भाग घ्यावा म्हणून हिंदुस्थान सरकारचा इतका आग्रह कां चालला होता, त्याचा उलगडा आतां आम्हांला झाला.

परिषदत अनेक कारस्थानें झालीं, शुष्क वादविवाद झाले, व संधिसाधूपणाला ऊत आला. तरीसुद्धां परिषदेंत हिंदुस्थानच्या तोंडाला अपेशाचा कलंक लागला असें म्हणतां येणार नाहीं. परिषद अपेशी व्हावी अशीच जर तिची रचना केलेली, तर मग अपेशाची जबाबदारी हिंदी जनतेवर काय म्हणून यावी? परंतु हिंदुस्थानांतील खऱ्या लढ्याकडे लागलेलें जगाचें लक्ष ढळलें व तें परिषदेकडे लागलें ही गोष्ट सत्य आहे. शिवाय परिषदेच्या निमित्तानें राष्ट्रघातकी वृत्तीलाहि पुन्हा एकवार उचल खाण्यास संधि मिळाली.

हिंदुस्थानांत घडून येणाऱ्या प्रसंगांवरच हिंदी जनतेचें यशापयश अवलंबून होतें. दूरच्या लंडन शहरीं कितीहि कारस्थानें झालीं, तरी त्यामुळें हिंदुस्थानांतील प्रबळ अशी राष्ट्रीय चळवळ मावळणार होती थोडीच! मध्यम वर्गाच्या व शेतकऱ्यांच्या वास्तविक व तात्कालिक गरजांचा आविष्कार राष्ट्रवादाच्या द्वारां झालेला असून राष्ट्रीय चळवळीच्या मार्फत आपल्या मागण्या पार पाडण्याचा त्यांनीं संकल्प केलेला होता. तेव्हां त्यांच्या मागण्या पुऱ्या होऊन चळवळ यशस्वी व्हावी व तिच्या जागीं जनतेला अधिक प्रगति व स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या दुसऱ्या एखाद्या चळवळीचा उद्भव व्हावा अथवा सरकारनें कांहीं काळपर्यंत ही राष्ट्रीय चळवळ जबरदस्तीनें अजिबात दडपून टाकावी, ह्यांपैकीं कोणती तरी एकच गोष्ट घडणें शक्य होतें. तदनंतर हिंदुस्थानांत लवकरच लढा सुरू होऊन त्याला तात्पुरती हार खावी लागली. दुसऱ्या मंडलाकार परिषदेचा या लढ्यावर कोणताहि विशेष परिणाम होणें शक्यच नव्हतें. परंतु लढ्याला थोड्याफार प्रमाणांत अननुकूल असें वातावरण परिषदेमुळें निर्माण झालें, एवढें मात्र खरें.

३९

# संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांचा लढा

मी काँग्रेसचा एक सरचिटणीस व वर्किंग कमिटीचा सभासद असल्यामुळे अखिल भारतीय राजकारणाशीं माझा नित्य संबंध येत असे व मला मधून मधून थोडा प्रवासहि करावा लागे. प्रवासाचे प्रसंग होतां होईतों टाळण्याकडे माझी प्रवृत्ति होती. आमच्यावरील जबाबदारी व आमचें कार्यक्षेत्र जसजसें वाढत गेलें तसतशा वर्किंग कमिटीच्या बैठकीसुद्धां लांबलचक होऊं लागल्या. त्या इतक्या कीं एकेका वेळीं दोन दोन आठवडेपर्यंत ह्या बैठकी चालत. कारण फक्त निषेधपर ठराव करून काम भागेनासें झालें. विस्तृत प्रमाणावर चालणाऱ्या व अनेकविध स्वरूपाच्या विधायक कार्यक्रमावर नियंत्रण ठेवणें व ज्यांचें पर्यवसान देशव्यापी लढ्यांत होण्याचा संभव आहे, अशा प्रश्नांचा निकाल लावणें वगैरे कामें वर्किंग कमिटीला करावीं लागत.

तथापि माझ्या कार्याचें मुख्य केंद्र संयुक्त प्रांतांतच होतें. तेथल्या प्रांतिक काँग्रेस समितीचे १५० च्या वर सभासद असून ते दोन तीन महिन्यांनीं एकदां एकत्र जमत. तेथील कार्यकारी मंडळांत १५ सभासद होते व त्यांच्या हातीं किसानांचा प्रश्न सोंपविण्यांत आला होता.

१९३१ च्या उत्तरार्धांत ह्या कार्यकारी मंडळानें एका खास शेतकरी समितीची नेमणूक केली. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं कार्यकारी मंडळाला व ह्या समितीला पुष्कळ जमीनदारांचें सहकार्य लाभलेलें असून त्यांच्या सल्ल्यानेंच सर्व गोष्टी ठरत असत. प्रांतिक समितीचे त्या वर्षीचे अध्यक्ष श्री. शेरवाणी हे स्वतःच एका प्रसिद्ध जमीनदार घराण्यांतले होते. सरचिटणीस श्रीप्रकाश व कार्यकारी मंडळावरील पुष्कळ प्रमुख सभासद देखील स्वतः जमीनदार, अथवा जमीनदार कुटुंबांतील होते. बाकीचे सभासद उद्योगधंद्यांतले लोक असत. आमच्या प्रांतिक कार्यकारी मंडळावर कुळांपैकीं अथवा गरीब शेतकऱ्यांपैकीं एकहि इसम नव्हता. जिल्हा-समित्यांतून शेतकऱ्यांचो निवड होई. परंतु कार्यकारी मंडळापर्यंत पोंचण्यापूर्वी ज्या अनेक निवडणुकी होत, त्यांच्या चाळण्यांतून असे शेतकरी क्वचितच सुटत आणि शेवटीं कार्यकारी मंडळांतील सर्व सत्ता मध्यमवर्गीय पांढरपेशांच्याच हातीं जात असे. त्यांत जमीनदारांचा भरणाहि बऱ्याच प्रमाणांत आढळून येई. अशा कार्यकारी मंडळांत निदान शेतकऱ्यांच्या बाबतींत तरी जहाल मताचा जोर होणें शक्यच नव्हतें.

मी कार्यकारी मंडळाचा व शेतकरी समितीचा एक सभासद होतों. ह्याहून

जास्त अधिकाराची जागा मजकडे नव्हती. विचारविनिमयाच्या कामांत मी प्रामुख्यानें भाग घेत असलों तरी त्या कार्यातील नेतृत्व मजकडे होतें असें म्हणतां येणार नाहीं. तसें पाहिलें तर आमच्या प्रांतांत पुढारी असा कोणीच नव्हता. कारण सहकार्यानें व संस्थास्वरूपानें काम करण्याची संवय आम्हीं लावून घेतलेली असल्यामुळें व्यक्तीला महत्त्व न देतां संघटनेला महत्त्व देण्याचा आमचा शिरस्ता होता.

अलाहाबाद जिल्हा काँग्रेस समितीचा मी एक सभासद होतों. शेतकरीविषयक प्रश्नांच्या बाबतींत पुरुषोत्तमदास टंडन यांच्या नेतृत्वाखालीं या समितीनें बराच महत्त्वाचा भाग घेतला होता. १९३० सालीं प्रांतांत करबंदीची चळवळ सुरू झाली त्या वेळीं आमची समिति आघाडीला होती. आर्थिक मंदीचा चटका अलाहाबाद जिल्ह्याला अधिक बसला म्हणून आम्हीं चळवळीला प्रारंभ केला असें नव्हे. उलट औधमधील तालुकदारी जिल्ह्यांतील स्थिति अधिक भीषण होती. पण अलाहाबाद जिल्हा जास्त संघटित व राजकीय दृष्ट्या अधिक जागृत असे. कारण अलाहाबाद शहर हें राजकारणाचें केन्द्र झालेलें असल्यामुळें पुष्कळ प्रमुख कार्यकर्ते तेथें येत व ते आले म्हणजे भोंवतालच्या खेडेगांवांनाहि भेटी देत असत.

दिल्ली-समेट झाल्याबरोबर कायदेभंग व करबंदीची चळवळ तहकूब झाल्याची बातमी खेडोपाडीं कळविण्यासाठीं आम्हीं पुष्कळ कार्यकर्ते पाठविले होते. खंड न देण्याला राजकीय कारण आतां उरलें नसलें, तरी बाजारभावाचा घट लक्षांत घेतां शेतकऱ्यांना बरीच सूट मिळणें आवश्यक आहे व ती मिळविण्यासाठीं आपण एकजुटीनें प्रयत्न केला पाहिजे असाहि संदेश आम्हीं त्यांच्याकरवीं पाठविला होता. सुबत्तेच्या दिवसांत देखील खंड भरतांना नाकीं नऊ येत. तेव्हां मंदीच्या काळांत तर सर्व खंड भरणें केवळ अशक्यच होतें. शेतकऱ्यांचे प्रतिनिधि जमवून आम्हीं परिषदा भरवल्या व जुजबी सूचना म्हणून सरसकट ५० टक्के व कांहीं ठिकाणीं अधिक सूट देण्यांत यावी असें ठरविलें.

कायदेभंगाच्या चळवळीपासून शेतकऱ्यांचा प्रश्न निराळा काढावा म्हणून आम्हीं प्रयत्न चालविला होता. निदान त्या सालीं तरी फक्त आर्थिक दृष्ट्या त्याचा विचार व्हावा, राजकीय प्रश्नांत तो गुंतविला जाऊं नये हें आम्हांला इष्ट वाटलें. पण मागील कालांत या दोन चळवळींची सांगड एकत्र बांधली गेल्यामुळें आतां त्या अलग करणें मोठें कठिण होऊन बसलें होतें. शिवाय आम्ही जिल्ह्यातर्फे काम करीत होतों, ती कांग्रेस संस्था सर्वस्वी राजकीयच होती. त्या वेळेपुरतें आपणाला शेतकरी संघ म्हणून ( आणि या शेतकरी संघाचें नियंत्रण मात्र बिगर शेतकऱ्यांच्याच नव्हे तर खुद्द जमीनदारांच्याहि हातीं राहणार होतें ! ) काम करतां यावें म्हणून प्रयत्न चालू होते. परंतु स्वतःचें राजकीय स्वरूप गमावून बसावें अशी मात्र आमची इच्छा नव्हती. सरकारहि आम्ही करूं तें काम राजकीय आहे असें समजूनच वागत असे. भविष्यकाळच्या कायदेभंगाचीं चिन्हें क्षितिजावर दिसत होतीं.

कायदेभंग सुरू झाला कीं, आर्थिक व राजकीय चळवळी पुनः खांद्याशीं खांदा भिडवून चालूं लागणार ह्याविषयीं तिळमात्र शंका नव्हती.

मार्गांत अशा प्रकारच्या अडचणी असल्या तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला राजकारणाचा वास होतां होईं तों लागूं न देण्याची खबरदारी दिल्ली-समेटापासून आम्ही घेत आलों होतों. दिल्ली-समेटामुळें आर्थिक लढे अडून राहण्याचें कारण नाहीं ही गोष्ट आम्हांला सरकारच्या व जनतेच्या निदर्शनास आणून द्यावयाची होती. अवश्यंभावी होणाऱ्या कोणत्याहि स्थानिक अथवा आर्थिक लढ्याच्या बाबतींत दिल्ली-समेटाचा संबंध पोंचत नाहीं अशा अर्थाचा स्पष्ट इषारा गांधीजींनीं लॉर्ड अर्विन यांना देऊन ठेवलेला होता. त्या वेळीं संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांचा प्रश्न आम्हां सर्वांच्या डोळ्यांसमोर होताच. कारण सयुक्त प्रांतांत या प्रश्नाच्या बाबतींत संघटित प्रयत्न सुरू झालले होते. वस्तुस्थिति पाहिली तर सर्व हिंदुस्थानभर शेतकऱ्यांची अशीच अवस्था झालेली होती. सिमला येथील संभाषणांत या मुद्द्याचा गांधींनीं पुनरुच्चार केला. नंतर प्रसिद्ध झालेल्या प्रश्नोत्तरांतसुद्धां त्याविषयीं उल्लेख सांपडतो.* युरोपला निघण्याच्या सुमारास त्यांनीं निःसंदिग्धपणें बजावलें होतें कीं जनतेच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या आर्थिक लढ्याच्या वेळीं त्यांचें हितरक्षण करण्यासाठीं कांग्रेसला त्यांत भाग घेणें आवश्यक होण्याचा संभव आहे. अशीं भांडणें चेतवण्याची माझी इच्छा नाहीं; मला तीं टाळावयाचीं आहेत. पण तें अशक्य झालें, तर लढाईला तोंड हें दिलेंच पाहिजे. जनतेला अधांत्रीं सोडणें आमच्यानें कदापि होणार नाहीं. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं कायदेभगाच्या बाबतींत दिल्ली-समेट लागू पडत असला तरी तो आर्थिक लढ्यांच्या आड येत नाहीं.

करबंदीची चळवळ सुरू करून सयुक्तप्रांतीय कॉंग्रेस समितीनें व तिच्या पुढाऱ्यांनीं दिल्ली-समेटाखालीं सुरुंग ठासले असा आरोप नेहमीं करण्यांत येत असल्या-मुळें मला हा इतिहास येथें सांगावा लागला. उत्तर देण्यास समर्थ असे सगळे लोक तुरुंगांत डांबले गेल्यावर व सर्व वृत्तपत्रांचीं तोंडें मुस्क्यांनीं बांधून टाकल्यावर हे आरोप निर्धास्तपणे करण्यांत आले. १९३१ सालीं संयुक्तप्रांतीय कॉंग्रेस कमिटीनें करबंदीची चळवळ आधीं मुळीं सुरूच केली नाहीं, आणि वादासाठीं सुरू केली असें मानलें तरी तेवढ्यावरून दिल्ली-समेटाचा भंग केल्यासारखें होत नाहीं एवढेंच मला सिद्ध करावयाचें आहे. करबदीच्या युक्तायुक्ततेचा प्रश्न अलाहिदा. आर्थिक गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं संप करण्याचा अधिकार ज्याप्रमाणें कामकऱ्यांना आहे तसाच करबंदी करण्याचा हक्क शेतकऱ्यांनाहि आहे. दिल्ली ते सिमल्यापर्यंतच्या वाटाघाटींत आम्ही एकसारखा हाच मुद्दा मांडीत आलों होतों व सरकारनें तो नुसता समजून घेतला होता असें नव्हे, तर सरकारनें आमच्या मुद्द्याला मान्यता दिली होती.

शेतकऱ्यांची स्थिति एकसारखी बिघडत चालली होती, ती १९२९ पासून

* गांधी-इमर्सन पत्रव्यवहार पाहा : तारीख २७ ऑगस्ट १९३१.

सुरू झालेल्या मंदीच्या योगानें तळाला जाऊन पोंचली. तत्पूर्वी शेतीच्या उत्पन्नाचे भाव सारखे तेजीचे राहिले होते. या तेजीचा फायदा हिंदी शेतकऱ्यालाहि मिळाला. सर्व जगभर यांत्रिक उद्योग व शेती यांच्या वाढीमध्यें प्रमाणबद्धता न राहिल्यामुळें शेतीच्या उत्पादनाचे भाव कडाडले. पण बाजार तेजीचा झाल्याबरोबर हिंदुस्थानांतील सरकार-सारा, जमीनदारांचा खंड वगैरे बाबतींतहि वाढ झाली. त्यामुळें चढत्या बाजार-भावाचा योग्य फायदा शेतकऱ्यांच्या पदरांत मुळींच पडला नाहीं, व एकंदरीनें कांहीं टापू वगळल्यास शेतकऱ्यांची स्थिति खालावतच गेली. संयुक्त प्रांतांत साऱ्याच्या मानानें खंड फार झपाट्यानें वाढला. माझ्या आठवणीप्रमाणें ह्या दोन बाबतींत झालेल्या गेल्या तीस वर्षांतील वाढीचें प्रमाण एकास पांच असें आहे. सरकारला बरकत आली, जमीनदारांचीहि पोळी पिकली; पण कुळाचें खपाटीला गेलेले पोट होतें तसेंच राहिलें. किंमती उतरल्या अगर महापूर, अवर्षण, गारा अथवा टोळधाड यांच्या-सारखी अस्मानी सुलतानी झाली तरी खंड व सारा यांच्यामध्यें उतार होत नसे. सूट मिळालीच तर मोठ्या मिनतवारीनें मिळायची, व ती देखील त्या मोसमापुरती. सुबत्तेच्या काळांत देखील खंड देतांना शेतकरी उरीं फुटत. मग इतर वेळीं सावकारा-शिवाय पान तरी हालावें कसें ! शेतकरी-कर्जाचा डोंगर अशा प्रकारें वाढत गेला

शेतकीवर अवलंबून असणारे सर्वच वर्गांचे लोक—जमीनदार, स्वतंत्र शेतकरी व खंडकरी—सावकाराच्या पंजांत गवसले. प्राथमिक अवस्थेंत असणाऱ्या सध्यांच्या ग्रामीण आर्थिक जीवनांत अत्यावश्यक होऊन बसलेली एक कामगिरी सावकारवर्ग बजावीत आहे. आपल्या स्थितीचा भरपूर फायदा त्यानें पदरांत पाडून घेतला असून शेतकीशीं संबंध असलेले सगळे लोक त्याच्या फांसांत गुतले आहेत. आतांपर्यंत त्याच्या-वर कोणाचेंहि नियंत्रण नव्हतें. कायदा त्याच्या बाजूचा होता. कर्जरोखा समोर ठेवून पैन् पैचा तो हिशोब मागे व त्याप्रमाणें त्याला वसूलहि मिळे. हलके हलके छोट्या जमीनदारांच्या व स्वतंत्र शेतकऱ्यांच्या जमिनी त्याच्या हातीं गेल्या व सुरवंटाचें फुलपांखरूं व्हावें तसें सावकाराचें मोठ्या जमीनदारांत रूपांतर झालें. स्वतःची जमीन करणारा शेतकरी ह्या सावकाराच्या जमिनीवर जवळ जवळ गुलामा-प्रमाणें राबूं लागला. कुळाची स्थिति तर ह्याहिपलीकडची होती. तोहि सावकाराचा गुलाम बनला, अथवा गरीब जमीनवाल्या मजुरांच्या ओळीला जाऊन बसला. पैदावाल्यांचे जे जमीनदार झाले त्यांचा जमिनीशीं अगर कुळांशीं जिव्हाळ्याचा संबंध राहिला नाहीं. बहुशः शहरांत ते राहत व तेथें गादीवर बसून कर्ज-वामाचा व्यवहार करीत. खंडवसुलीचें काम त्यांचे हस्तक एखाद्या यंत्राप्रमाणें निष्ठुरपणें व अमानुषपणें उरकीत असत.

जमीनधारणेच्या पद्धतींतील सदोषता वाढत्या शेतकरी-कर्जावरूनहि सिद्ध होण्यासारखी आहे. जनतेपैकीं लक्षावधि लोक असे आहेत कीं ज्यांच्या गांठीला एक छदामदेखील राहिलेला नाहीं, आणि त्यांच्यांत त्राण अथवा प्रतिकाराची शक्ति

उरलेली नाहीं. जवळजवळ उपासमारींतच ते दिवस काढीत असतात. एकादा सांथीचा रोग आला कीं लाखों माणसें मुंग्यांसारखीं मरून जातात. १९२९ व १९३० सालीं हिंदुस्थानांतील शेतकरी कर्जाची रक्कम ८६० कोटी रुपये इतकी असावी असा सरकारनियुक्त बँकिंग इन्क्वायरी कमिटीचा अभिप्राय आहे. यांत जमीनदार, स्वतंत्र शेतकरी व कुळें यांच्या कर्जाचा अन्तर्भाव झालेला असला, तरी त्यांतील बहुतेक कर्ज जातीनें जमीन कसणाऱ्यांचेंच आहे. सरकारचें चलनावळीचें धोरण सावकारांच्याच फायद्याचें झालें व त्यायोगानें कर्जबोजा अधिकच फुगला. तीव्र विरोधाला धाब्यावर बसवून १६ पेन्सांऐवजीं १८ पेन्सांचा रुपया केल्यामुळें शेतकरी कर्जांत १०७ कोटींची भर पडली. *

महायुद्धानंतर बाजार कडाडून नंतर पुनः मंदीची घसरण सुरू झाली व शेतकरी भिकेची वाट चालूं लागले. त्यांतच १९२९ च्या अरिष्टाचा टोला त्यांच्या कपाळीं बसला.

आमचें १९३१ सालीं असें म्हणणें होतें कीं, बाजारभावांच्या प्रमाणांत खंड-आकारणी व्हावी: म्हणजे १९३१ सालाप्रमाणेंच १९०१ सालीं बाजारभाव होते म्हणून खंडसुद्धां त्या काळचेच वसूल करावेत. अर्थात् हा ठोकळ नियम होता. दुसरा नियम—आणि अधिक न्याय्य नियम—असा सुचविण्यांत आला कीं, उत्पादनाचा खर्च व राहणीचा खर्च वजा जाऊन जी शिल्लक कुळापाशीं राहील, तिच्यावरून कुळाची लायकी ठरवून खंड आकारावा. पण हा नियम लागू करावयाचा म्हटला म्हणजे राहणीचा खर्च कितीहि किमान धरला तरी हिंदुस्थानांतील कित्येक खातीं अनिर्वाही म्हणजे बुडित ठरवावीं लागतील व १९३१ मध्यें आम्हीं कांहीं बाबतींत दाखवून दिल्याप्रमाणें घरदार विकल्याशिवाय अथवा जबरदस्त व्याजानें कर्जाऊ रकमा उचलल्याशिवाय पुष्कळांना खर्चाची भरपाई करणेंच अशक्य आहे असें दिसून येईल.

सं. प्रां. काँ. समितीकडून अशी मामुली सूचना करण्यांत आली होती कीं, मिरासदार कुळांना ५० टक्के सूट देण्यांत यावी, व ज्यांची स्थिति अधिक हलाखीची असेल त्यांना ह्यापेक्षां अधिक सूट मिळावी. १९३१ मध्यें गांधीजी व सर हेली यांची मुलाखत झाली, तेव्हां त्यांच्यामध्यें कांहीं मतभेद झाले. त्यानतर लगेच संयुक्त प्रांतांतील जमीनदारांना व कुळांना उद्देशून गांधीजींनीं विज्ञापन-पत्रें प्रसिद्ध केलीं. त्यांत कुळांनीं शक्य तेवढा खंड द्यावा असें म्हटलें असून किती खंड द्यावा त्याबद्दलचें प्रमाणहि सुचविलें होतें. आमच्या समितीच्या सूचनेहून हा आंकडा

* ८६० कोटींचा आंकडा फाजील संकोच करून दिलेला दिसतो. ह्या कमिटीच्या मतानें पंजाबांतील शेतकरी कर्जाचा आंकडा १३५ कोटी इतका आहे. पण १९३४ सालच्या पंजाबकर्जनिवारण कमिटीनें तो "निदान पक्षीं २०० कोटी असावा." असें म्हटलें आहे. ही तफावत इतर प्रांतांतहि लागू केली, तर हिंदुस्थानच्या शेतकरी-कर्जाची रक्कम १२०० कोटी रुपयांपर्यंत होईल.

थोडासा अधिक होता. प्रांतिक समितीनें गांधीजींचा आंकडा मान्य केला, पण त्याचाहि उपयोग फारसा झाला नाहीं; कारण सरकार त्यालाहि समति देईना.

प्रांतिक सरकारला मोठा पेंच पडला होता. त्यांचें मुख्य उत्पन्न साऱ्यापासूनच होत असतें. त्याच्यावर अजिबात तुळशीपत्र ठेवून अथवा त्यांतल्या बऱ्याचशा भागाची सूट देऊन खर्च भागता ना; दिवाळें निघालें असतें. पण शेतकऱ्यांच्या बंडाची भीति एकीकडे वाटत असल्याकारणानें बरीचशी सूट देऊन कुळांना चुचकारतां आलें तर पाहावें अशीहि त्यांची इच्छा होती. हा स्वार्थ-परमार्थाचा मेळ घालणें सोपें नव्हतें. सरकारच्या व कुळांच्या दरम्यान जमीनदार उभा होता. त्याची चंदी तोडून मात्र सरकारला आपलें व कुळांचें हित साधणें शक्य झालें असतें पण राजकीय परिस्थिति लक्षांत घेतां, आपल्याला चिकटून राहणाऱ्या फार थोड्या वर्गांपैकीं जो एक जमीनदारांचा वर्ग, त्याला नाराज करण्याची सरकारची तयारी नव्हती.

सरतेशेवटीं जमीनदार व कुळें या दोघांनाहि सूट देण्याचें प्रांतिक सरकारनें जाहीर केलें. सूट आकारणीची पद्धति किचकट होती व तिचा एकदम उलगडा होत नसे. पण मिळालेलो सूट अपेक्षेहून फारच कमी आहे, हें स्पष्ट दिसत होतें. शिवाय थकबाकीविषयींचा त्यांत कांहींच उल्लेख नव्हता यंदाच अर्ध्या वर्षाचा खंड देणें ज्याच्या जिवावर आलें होतें, तो गेल्या सालच्या बाक्या चुकत्या करणार कशा? तेव्हां हें धोरण शेतकऱ्याच्या दृष्टीनें अहितावह झालें असतें. कारण एकदर आकारणी-पैकीं कोणती तरी बाकी काढून दाखवून त्याची जमीन लिलावासाठीं पुकारतां आली असती.

प्रांतिक कॉंग्रेस कार्यकारी मंडळापुढें मोठा पेंच येऊन पडला. कुळावर फार अन्याय होत आहे ह्याबद्दल आमची खात्री झालेली होती. पण करणार काय? खंड देऊं नका असें कुळांना सांगण्याची जबाबदारी आम्ही शिरावर घेण्यास तयार नव्हतों. यथाशक्ति खंड त्यांनीं द्यावा हाच मंत्र आम्ही जपीत राहिलों. त्यांच्या कष्टमय स्थितीविषयीं सर्वसाधारणपणें सहानुभूति दाखविणें व त्यांना धीर देण्याचा प्रयत्न करण एवढीं कामें आम्ही करीत होतों. सूट वजा घालून देखील उरलेला खंड डोईजड आहे हें कुळांचें म्हणणें आम्हांला मान्य होतें.

लवकरच दडपशाहीचे सूक्ष्मासूक्ष्म प्रकार सुरू झाले. हजारों लोकांवर जप्त्या आल्या. गाईबैल, घरेंदारें, लिलावाला निघालीं, जमीनदारांच्या हस्तकांची मारपीट सुरू झाली. कुळांपैकीं पुष्कळ लोकांनीं अंशतः खंड दिला. तेवढीच त्यांची शक्ति होती. पण त्यामुळें त्यांचा बचाव झाला असें नाहीं. कायद्याचा रूळ वाटेंत सांपडेल त्याला जमीनदोस्त करीत पुढें धांवत चालला होता. एकादा हप्ता भरला तरीहि जप्त्या, लिलाव वगैरेंत खळ पडत नसे. मग कुळांनीं दिडकीहि दिली नसती तरी ह्यापेक्षां वांकडें तें काय होणार होतें? तेवढे चार पैसे कडोसरीला राहून तेवढाच फायदा तरी झाला असता.

तुमच्या सल्ल्याप्रमाणें आम्ही शक्त्यनुसार खंड भरला त्याचें हें प्रायश्चित्त असें गाऱ्हाणें ते आमच्याकडे येऊन सांगूं लागले. एकट्या अलाहाबाद जिल्ह्यांतच हजारों लोकांच्या जमिनी जप्त झाल्या. आणखी हजारों लोकांवर खटले भरण्यांत आले होते, ते निराळेच. हे संकटग्रस्त लोक सर्व दिवसभर जिल्हा काँग्रेस समितीच्या कचेरीभोंवतीं गराडा घालून बसत. आमच्या घराला असाच वेढा पडे व हें दुःख पाहणें नको, येथून पळून जाऊन कोठें तरी तोंड लपवून बसावें, असे विचार मनांत येत. पुष्कळ लोक येत व जमीनदारांच्या हस्तकांनीं केलेल्या मारहाणीच्या जखमा दाखवीत. आम्ही त्यांना रुग्णालयांत पाठवीत असूं. यापलीकडे ते काय करणार आणि आम्ही तरी काय करणार? गोविंद वल्लभ पंत, शेरवाणी, मीं सगळ्या जणांनीं प्रांतिक सरकारकडे भलीं वाववाव पत्रें पाठविलीं.

जून-जुलै महिन्यांत पावसाळा सुरू झाला तशी नवीनच अडचण उपस्थित झाली. नांगरणी-पेरणीचा हंगाम आला होता. जमिनी जप्त झालेल्या कुळांनीं हातपाय जुडून आपल्या शेतांत हरळी वाढते ती पाहत बसावयाचें कीं काय? ही गोष्ट शेतकऱ्याला कशी परवडणार? पुष्कळ ठिकाणीं जप्ती झालेली होती, पण ती नांवाला. शेतकऱ्याची हकालपट्टी झालेली नव्हती. तेव्हां त्यांनीं शेतांत नांगर घालून जबरदस्तीनें शेतांत घुसल्याचा गुन्हा करावा आणि मारामारीचा प्रसंग ओढवून घ्यावा कीं काय? बरें, दुसरे लोक आपल्या वहिवाटींतली जमीन नांगरीत आहेत, हें दृश्यहि सहन करणें अवघड होतें. ते सल्ला मागण्यासाठीं आमच्याकडे आले. तेव्हां आम्हीं कोणता सल्ला द्यावा असा मोठा पेंच पडला.

गांधीजींबरोबर मी सिमल्यास गेलों असतां तेथें एका बड्या अधिकाऱ्याला, अशा परिस्थितींत काय सल्ला द्यावा, असा प्रश्न मीं विचारला होता. त्याचें उत्तर फार उद्बोधक होतें. तो म्हणाला कीं शेतकरी माझ्याकडे आला तर मी त्याला सल्ला देण्याचेंच नाकारीन! म्हणजे हे गृहस्थसुद्धां शेतकऱ्याला तूं जमीन नांगरूं नकोस असें सरळ सरळ सांगावयाला तयार नव्हते. अर्थात् सिमल्याच्या थंड शिखरावर बसून व्यवहारी अपूर्णांकाचें गणित सोडवावें तशा निर्विकारपणें एखाद्या प्रकरणाचा निकाल लावणें सोपें काम आहे. कारण तेथल्या अगर प्रांतांतल्या अधिकाऱ्यांचा संकटग्रस्त मनुष्यांशीं प्रत्यक्ष संबंधच येत नाहीं.

कुळांनीं सगळ्याच्या सगळ्या खंडाची भरपाई करावी, निदान शक्य तेवढा खंड त्यांनीं द्यावा, असा सल्ला देण्याविषयीं आम्हाला सिमला येथें सांगण्यांत आलें. म्हणजे जमीनदारांचे आम्हीं हस्तक बनावें अशी सरकारची इच्छा होती. शक्य तेवढा खंड द्या अशासारखा सल्ला आम्ही देतच होतों; पण गुरेंढोरें विकून अथवा कर्ज काढून खंड भरा, असें मात्र आम्हीं सांगितलें नाहीं.

त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत अगदीं कहर उडाला. हिंदी शेतकऱ्याला आपदांची सोबत सदाच लाभलेली असल्याकारणानें तो कमालीचा सोशीक बनला आहे.

परिस्थिति असह्य झाली कीं हजारों, लाखों शेतकरी पिकल्या पानांप्रमाणें शब्द न उच्चारतां गतप्राण होऊन खालीं पडतात. दुःखांतून सुटण्याचा त्याला ठाऊक असलेला मार्ग म्हणजे मरण. नियतकालिक आपत्तींच्या मानानें १९३१ सालची ही आपत्ति फारशी दुस्तर नव्हती; परंतु निसर्गाच्या अतर्क्य लहरींचा या प्रासंगिक आपत्तीशीं कांहीं एक संबंध दिसत नाहीं; मग ती निमूटपणें सहन कां करावी असा विचार त्यांच्या मनांत आला असावा. आतांपावेतों मिळालेल्या राजकीय शिक्षणाचा रोपा बाजूं लागला होता. त्या वेळेचा प्रसंग आम्हांलाहि दुःखद वाटला. कारण आमच्याच सल्ल्याप्रमाणें शेतकरी वागले होते. तथापि आमची मदत नसती तर शेतकऱ्यांचे हाल कुत्रा खाता ना ही गोष्ट देखील खोटी नव्हे. आमच्यामुळें ते एक-दिल, एकसंघ राहिले व जुटीच्या जोरावर त्यांना अधिक सूट मिळवितां आली. जुलूम, मारपीट झाली, ती त्यांच्या नेहमींच्या संवयींची होती. पण दंडेलींतहि थोडासा फरक पडला. पूर्वी मारझोड झाली तर या कानाचें त्या कानाला कळत नसे. कुळ मेलेंच तर गोष्ट निराळी. पण आतां कुळें संघटित झालीं असल्यामुळें असले प्रकार झाले कीं, लगेच नगाऱ्यावर टिपरूं पडे.

उन्हाळा संपत आला तशी जबरदस्तीची सारावसुली जरा ढिली पडूं लागली. पण ज्यांच्या जमिनी गेल्या त्या कुळांची काय गति? कुळांना ज्या जमिनीवरून उठवून लावलें होतें, अशा बहुतेक जमिनी पड राहिल्या होत्या. त्या ज्यांच्या त्यांना परत मिळण्याच्या कामीं सरकारनें मदत करावी अशासाठीं आम्ही सरकारचे खनपटीस बसलों होतों. आणि पुढच्या हंगामांत सूट मिळणार कीं नाहीं हा प्रश्न त्याहिपेक्षां महत्त्वाचा होता. ऑक्टोबरपासून नव्या वसुलीला आरंभ होणार तेव्हां त्याच मरणांतून पुनः जावें लागणार किंवा कसें? सरकारच्या व जमीनदारांच्या प्रतिनिधींची एक समिति सरकारनें नेमिली. तींत शेतकऱ्यांतर्फें कोणींच नेमण्यांत आलें नाहीं. अगदीं शेवटच्या क्षणाला म्हणजे समितीच्या कामाला प्रारंभ झाल्यावर सरकारनें गोविंद वल्लभ पंतांना काँग्रेसतर्फे काम करण्यासाठीं निमंत्रण केलें. सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय घेऊन झाल्यानंतर शेवटच्या घटकेला समितीला जाऊन मिळण्यांत कांहीं हांशील आहे, असें पंतांना वाटलें नाहीं.

शेतकऱ्यांच्या परिस्थितीविषयीं आंकडेवार माहिती मिळवून अहवाल तयार करण्यासाठीं सं. प्रां. कॉं. समितीनें एक लहानशी समिति नेमली होती. तिनें निरीक्षणात्मक असा एक उत्तम व विस्तृत अहवाल सादर केला. त्यांनीं केलेल्या शिफारशी मूलगामी स्वरूपाच्या होत्या. तो अहवाल गोविंद वल्लभ पंत, रफी अहमद किडवाई, व व्यंकटेश नारायण तिवारी यांच्या सह्यांनिशीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आला.

हा अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हां गांधीजींना लंडनला जाऊन बरेच दिवस झाले होते. ते निघाले त्या वेळीं सं. प्रां. शेतकऱ्यांचा प्रश्न त्यांच्या मनांत घोळत

होताच. लंडनला जावयाचें नाहीं असें ठरलें तर स्वतः संयुक्त प्रांतांत येऊन हा भानगडीचा प्रश्न हातीं घ्यावा असा त्यांनीं बेत केला होता. ते गेल्यावरहि आम्ही परिस्थितीबद्दल सर्व बातमी त्यांना येथून कळवीत होतों. पहिले दोन तीन महिनें मी त्यांना विमान:मार्गानें व साध्या टपालानें परिस्थितीसंबंधींचीं पत्रें नियमितपणें लिहीत: असें. त्यानंतर मात्र इतक्या नियमितपणें पत्रव्यवहार चालू राहिला नाहीं. अधिकांत अधिक म्हणजे तीन महिन्यांच्या आंत मी परत येईन असें ते सांगून गेले असल्यामुळें त्यांच्या आगमनापूर्वी तरी निदान आणीबाणीचा प्रसंग गुदरणार नाहीं अशी आशा सर्वांना वाटत होती. सरकारशीं शक्य तों तंटा होऊं नये म्हणून आमचा प्रयत्न होता. परंतु त्यांचें आगमन लांबणीवर पडूं लागलें व परिस्थिति अधिकाधिक उग्र होत चालली, तेव्हां सर्व हकीकत समजावून देणारी सविस्तर मजकुराची तार गांधीजींकडे पाठवून, आमचा कसा नाइलाज होत आहे तें मीं त्यांच्या निदर्शनास आणून दिलें. आपणाला या बाबतींत कांहींहि करतां येणें शक्य नाहीं, तुम्हांला योग्य दिसेल त्याप्रमाणें खुशाल वागावें असा उलट जबाब त्यांच्याकडून आला.

प्रांतिक कॉंग्रेस कार्यकारी मंडळानें वर्किंग कमिटीकडे सर्व माहिती पाठविली होती. परिस्थिति गंभीर होत चालली असल्यामुळें वर्किंग कमिटीमध्यें मी असतांहि तिनें शेरवाणी व पुरषोत्तमदास टंडन यांच्याशीं चर्चा केली.

सरकारनियुक्त शेतकी समितीनें आपल्या अहवालांत ज्या शिफारशी केल्या होत्या, त्या बऱ्याच गुंतागुंतीच्या व संदिग्ध अशा असून स्थानिक अधिकाऱ्यांवर बऱ्याच गोष्टी सोंपविण्यांत आल्या होत्या. गेल्या खेपेपेक्षां अधिक सूट देण्यांत आली असली, तरीहि आमच्या मतें ती अपुरीच होती. सरकारी शिफारशींत अंतर्भूत झालेलीं तत्त्वें व तीं लागू करण्याची पद्धति हीं दोन्हीहि आम्हांला आक्षेपार्ह वाटलीं. थकबाक्या, कर्ज, वगैरेसंबंधीं अहवालांत कांहींच तरतूद नव्हती. प्रश्न असा पडला होता कीं, या वेळीं आम्हीं कोणतें धोरण स्वीकारावें? मागच्याप्रमाणें 'यथाशक्ति खंड भरा' हा अष्टाक्षरी मंत्र जपावा व जें जें होईल तें तें पाहावें कीं काय? असला उपदेश करणें अत्यंत मूर्खपणाचें आहे हें आमच्या प्रत्ययास येऊन चुकलें होतें. मग त्याची पुनरावृत्ति करण्यांत अर्थ काय? पोटाला चिमटा घेऊन शेतकऱ्यांनीं पुरेपूर खंड तरी भरावा अथवा मुळींच खंड न भरतां काय होतें त्याची वाट पाहात राहावी, या दोन मार्गांपैकीं कोणता तरी एक मार्ग पत्करणें अवश्य होतें. खंडापैकीं अल्पसा भाग देण्यांत ना स्वार्थ ना परमार्थ; त्या प्रयत्नांच्या पायीं त्यांचें भांडवल संपायचें तें संपणार आणि वरकड जमिनी गमवाव्या लागणार त्या निराळ्याच, हें सत्य आम्हांला दिसत होतें.

आमच्या प्रांतिक कार्यकारी मंडळानें परिस्थितीसंबंधीं अनेकदां मोठ्या गंभीरपणें चर्चा करून असें ठरविलें कीं, सरकारच्या शिफारशी पूर्वीच्या सुटीहून

अधिक सढळ असल्या तरी त्या आहेत त्या स्वरूपांत स्वीकारणें शक्य नाहीं. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांत बदल करतां येण्यासारखा आहे. आमच्या मतास सरकारची संमति मिळावी म्हणून आम्हीं खूप जोर धरला. परंतु यश येण्याची फारशी आशा नव्हती. नको तो झगडा जवळ येऊन ठेपला होता. प्रांतिक सरकारचें व हिंदुस्थान सरकारचें कॉंग्रेससंबंधींचें धोरण बदलत चाललें असून तें प्रखर होऊं लागलें होतें. आमच्या प्रयत्नांत आम्हांला यश मिळावें अशी सरकारची इच्छा नाहीं हें स्पष्ट दिसत होतें. सरकारची एक तक्रार अशी दिसली कीं, शेतकऱ्यांना अधिक सूट दिली कीं, कॉंग्रेसची प्रतिष्ठा फारच वाढेल. त्याची त्यांना मोठी अडचण वाटत असावी. सरकारला संवयीमुळें प्रतिष्ठेचें वेडच लागलें होतें. खंड-सुटीचें श्रेय जनतेनें कॉंग्रेसला द्यावें ही गोष्ट सरकारच्या मनाला शल्याप्रमाणें टोंचत असल्यामुळें तो प्रसंग यावच्छक्य टाळावा असा सरकारचा इरादा होता.

लवकरच सर्व कॉंग्रेसवर हल्ला चढविण्याचा सरकारचा बेत आहे अशा बातम्या दिल्ली वगैरे ठिकाणांहून आमच्याकडे येऊं लागल्या. या खेपेला आमची चामडी लोळवण्यांत येणार होती. त्यांच्या योजनेचा तपशील सुद्धां आम्हांला कळला. नोव्हेंबर महिन्यांत केव्हां तरी डॉ. अन्सारींनीं माझ्याकडे व कॉंग्रेसचे अध्यक्ष वल्लभभाई पटेल यांच्याकडे एक निरोप पाठविला. पूर्वीं आम्हांला मिळालेल्या बातमीस आणि विशेषतः सरहद्द व संयुक्त प्रांतांत लागू करण्यांत यावयाच्या वटहुकुमासंबंधींच्या बातम्यांना अन्सारींच्या निरोपामुळें बळकटीच मिळाली. बंगालला नव्या वटहुकुमांचा प्रसाद मिळालाच होता किंवा थोड्याच दिवसांत मिळणार होता. बरेच आठवडे लोटल्यानंतर अन्सारींचे शब्द पुष्कळ अंशीं खरे ठरल्याचें आढळून आलें. नवे वटहुकूम जाहीर झाले. जणूं कांहीं नवीनच परिस्थिति निर्माण झाली होती. मंडलाकार परिषदेचें कामकाज अपेक्षेबाहेर लांबल्यामुळें सरकारला इतका वेळ तलवार म्यान करून ठेवावी लागली असावी. मंडलाकार परिषदेच्या प्रतिनिधींची परस्परांशीं गोड पण निरर्थक कुजबूज चालू असतांनाच इकडे हिंदुस्थानांत सार्वत्रिक दडपशाही सुरू व्हावी हें सरकारला नको होतें.

आकाशांत वादळ जमूं लागलें. आमच्यासारख्या क्षुद्र मानवांनीं कांहींहि केलें तरी काळाचा प्रवाह पूर्वनिर्णित वाटेनेंच वाहत राहणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. प्रसंग येतील त्यांना व्यक्तिशः व संघशः तोंड देण्याची आपण तयारी ठेवावी व जीवनाच्या रंगभूमीवर जो बहुशः दुःखमयच खेळ आपणास खेळवा लागणार आहे त्यांत मागें न पडण्याची दक्षता बाळगावी एवढेंच काम आम्हांला करतां येण्यासारखें होतें. परंतु पडदा वर जाऊन हा संग्राम सुरू होण्याच्या आंत गांधीजी परत येऊन पोंचतील व सर्व जबाबदारी ते आपल्या शिरावर घेतील अशी आशा आमच्या मनाला अद्यापिहि वाटत होती. त्यांच्या गैरहजेरींत जबाबदारीचें ओझें स्वतःच्या खांद्यावर घेण्यास आमच्यापैकीं कोणीच तयार नव्हता.

संयुक्त प्रांतांत सरकारनें नवीनच एक टूम काढल्या कारणानें खेडोपाडीं फार गडबड उडून गेली. कुळांना सूटचिठ्या वांटण्यांत आल्या. त्यांत सुटीचा आंकडा लिहिलेला होता व उरलेला खंड महिन्याच्या आंत भरण्यांत आला नाहीं तर कायदेशीर इलाज म्हणजे जप्ती, लिलांव वगैरे करणें सरकारला भाग पडेल, अशी धमकी देण्यांत आली होती. नेहमी कुळें खंड देत तो दोन तीन महिन्यांच्या मुदतींत हप्त्याहप्त्यानें देत असत. तेवढीहि मुदत या खेपेला देण्यांत आली नाहीं. सर्वच शेतकऱ्यांवर संकट येऊन गुदरलें. हातांत चिठी घेऊन जो तो तक्रार करीत व सल्लामसलत विचारीत धांवाधांव करूं लागला. असली धमकी देणें म्हणजे शुद्ध अचरटपणा होता. त्या धमकींत विशेष तथ्य नव्हतें असें आम्हांला मागाहून सांगण्यांत आलें. पण त्यामुळें समेटाचा संभव अगदीं कमी होऊन झगड्याकडे लोक एकेका पावलानें खेंचले गेले यांत शंका नाहीं.

शेतकऱ्यांनीं व काँग्रेसनें चट्दिशीं कांहीं तरी निर्णय करणें आवश्यक होऊन बसलें. गांधीजी येईपर्यंत चालढकल करणें योग्य झालें नसतें. मागितलेली रक्कम देण्याचें त्राण शेतकऱ्यांच्या अंगीं नाहीं हें माहित असूनहि ती भरा असें सांगणें कितपत योग्य ठरलें असतें? आणि थकलेल्या खंडाची वाट काय? खंडापैकीं बराचसा भाग चुकता केला तरीहि जप्तींतून त्यांची सुटका होण्याचा संभव नव्हता. चालू सालचा सगळा खंड दिला असता तरी तो थकबाकीकडे लावून पुनः कुळांवर जप्ती आणण्याची सोय होतीच.

अलाहाबाद जिल्हा काँग्रेस समितींत बरेचसे शेतकरी होते. त्यांनीं प्रसंगाला तोंड देण्याचें ठरविलें. शेतकऱ्यांना खंड भरा असें सांगणें शक्य नाहीं, असें जिल्हा कमिटीचें मत होतें. तथापि प्रांतिक कार्यकारी मंडळ व वर्किंग कमिटी यांच्याकडून अधिकृत परवानगी मिळाल्याशिवाय कोणतीहि प्रत्यक्ष चढाई करण्याचा अधिकार जिल्हा समितीला नसल्याकारणानें प्रकरण वर्किंग कमिटीपुढें मांडण्यांत आलें. तेथें शेरवाणी व टंडन हे दोघेहि हजर होते. परंतु आमच्यापुढें फक्त अलाहाबाद जिल्ह्याचाच प्रश्न होता व त्याचें स्वरूपहि निवळ आर्थिक असें होतें. परंतु त्या काळच्या वादळी वातावरणांत ह्या प्रश्नामुळें उठणारी धूळ फार दूरवर पसरणार हें आम्ही ओळखून होतों. जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं खंडाची भरपाई सध्यांच करूं नये, वाटाघाटी होऊन अधिक सवलतीचा निकाल लागेपर्यंत खंड पाडून ठेवावा, असा सल्ला अलाहाबाद जिल्हा समितीनें द्यावा कीं नाहीं एवढ्याच प्रश्नाचें उत्तर वर्किंग कमिटीला द्यावयाचें होतें. गांधीजी येण्यापूर्वी सरकारशीं भांडण उपस्थित होऊं नये व ज्याला वर्ग-कलहाचें स्वरूप प्राप्त होण्याचा संभव आहे असा आर्थिक लढा शक्य तों टाळावा यासाठीं वर्किंग कमिटीची सर्व धडपड चालू होती. राजकीय दृष्ट्या जहाल असें धोरण वर्किंग कमिटीला मान्य असलें, तरी जमीनदार विरुद्ध कुळें असा सामाजिक लढा उपस्थित करा असें म्हणण्याइतकी वर्किंग कमिटींतील सभासदांची प्रगति झालेली नव्हती.

माझ्या मनाचा कल समाजसत्तावादाकडे असल्यामुळें आर्थिक व सामाजिक बाबतींत माझा सल्ला बिनधोक समजण्यांत येत नसे. संयुक्त प्रांतांत परिस्थितिच अशी निर्माण झाली आहे कीं आमच्यापैकीं अगदीं नेमस्त वृत्तीच्या व विवेकी सभासदांना- सुद्धां मोठ्या नाखुशीनें लढयाची तयारी करणें प्राप्त वाटत आहे, ही गोष्ट वर्किंग कमिटीच्या लक्षांत आणून देणें मला आवश्यक वाटलें. शेरवाणी वगैरे आमच्या प्रांतांतील लोक वर्किंग कमिटीच्या बैठकीला हजर राहिले ह्याचा मला फार आनंद झाला. कारण शेरवाणी हे ज्वलज्जहाल म्हणून ओळखले जात नसतः स्वभावतः राजकीय व सामाजिक बाबतींत त्यांचा दृष्टिकोण सौम्य असा असे. सं. प्रां. कॉं. समितीच्या शेतकरीविषयक धोरणाच्या बाबतींत सुरुवातीला त्यांचें मन कलुषित झालेलें असलें, तरी अध्यक्षाची जबाबदारी त्यांच्या स्वतःच्या शिरावर पडल्यानंतर प्रांतिक समितीला दुसरें गत्यंतर नाहीं, ही गोष्ट त्यांना कळून चुकली. त्यानंतर प्रांतिक समितीनें कोणतेहि कार्य आंखलें तरी तें त्यांच्या अनुमतीनें व ते अध्यक्ष म्हणून त्यांच्याचमार्फत आंखण्यांत येत असे.

तेव्हां शेरवाणी यांच्या बोलण्याचा वर्किंग कमिटीच्या सभासदांवर माझ्या बोलण्यानें झाला असता त्याहून फार मोठा परिणाम झाला. होय नाहीं करतां करतां सरते शेवटीं निरुपायाची गोष्ट आहे हें जाणून, कोणत्याहि टापूंत करबंदीची व खंड- बंदीची चळवळ करण्याचा अधिकार तिनें प्रांतिक समितीला दिला. पण त्याच वेळीं प्रांतिक समितीनें शक्य तों असा प्रसंग टाळावा आणि सरकारशीं वाटाघाटी सुरू कराव्या अशी आग्रहाची सूचना वर्किंग कमिटीनें करून ठेवलीच.

वाटाघाटी कांहीं वेळ चालू होत्या, पण त्यांतून फारसें कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अलाहाबाद जिल्ह्यांतील सारासुटीच्या आंकड्यांत थोडीशी सुधारणा झाली इतकेंच. एरवींच्या काळांत तडजोड निघाली असती तर प्रकरण हातघाईवर आलें नसतें असें वाटतें. मतभेद मिटविण्याची खटपट चालू होती. पण ह्या वेळचें वातावरणच भिन्न होतें. लढा टळत नाहीं अशीच भावना दोन्ही पक्षांत असल्या- मुळें वाटाघाटी चालल्या होत्या. त्या मनापासून चालल्या नव्हत्या. कोणीं कांहीं केलें तरी तें पवित्रा खंबीर करण्यासाठीं करीत आहे असा संशय येई. सरकार आपली बाजू गुप्तपणें भक्कम करीत होतें. आमची सारी मदार लोकांच्या हिंमतीवर असल्यामुळें काम लपून छपून करणें आम्हांला शक्यच नव्हतें. आमच्यापैकीं पुष्कळांनीं —मीहि त्यांपैकींच एक होतों—जाहीर सभेंत असें बजावलें होतें कीं, स्वातंत्र्ययुद्ध अजून संपलेलें नाहीं, लवकरच किती तरी दिव्यांतून व अडचणींतून मार्ग काढावा लागेल, त्यासाठीं तुम्हीं तयार रहा, हा इषारा आम्हीं जनतेला दिला, त्यामुळें आगलावे म्हणून आमच्यावर टीका झाली. खरें बोलावयाचें तर मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांचें प्रत्यक्ष परिस्थितीकडे फार थोडें लक्ष होतें. कांहीं तरी घडेल व लढा मिटेल अशी वेडी आशा ते उराशीं बाळगून राहिले होते. वृत्तपत्रांच्या वाचकांचे

डोळेसुद्धां लंडनकडे लागलेले होते. मध्यमवर्ग अशा प्रकारें उदास असला तरी, बंगाल, संयुक्त प्रांत व सरहद्द प्रांत येथील परिस्थिति भडकत चालली होती. नोव्हेंबरांत मात्र आतां लवकरच संकट कोसळणार असें लोकांनाही वाटूं लागलें.

लढा चालू झाला तर आपण गाफिल सांपडूं नये म्हणून सं. प्रां. कॉं. समितीनें आपल्या घरची व्यवस्था लावली. अलाहाबाद समितीच्या विद्यमानें शेतकऱ्यांची एक प्रचंड सभा भरवून असा ठराव करण्यांत आला कीं, सुटीच्या बाबतींत अधिक सवलती देण्यांत न आल्यास खंड व सारा देऊं नका असा सल्ला शेतकऱ्यांना देणें आम्हांस भाग पडेल. हा ठराव पाहिल्यावर प्रांतिक सरकारच्या तळव्याची आग मस्तकास पोंचली, व हाच युद्धाचा एल्गार असें समजून इतःपर आमच्याबरोबरच्या वाटाघाटी बंद करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याची प्रतिक्रिया पुनः प्रांतिक समितीवर झाली; सरकारची ही वृत्ति म्हणजे आगामी वादळाचें पूर्वचिन्ह होय असें मानून तिनें आपल्याकडून तयारीला जोरानें सुरुवात केली. अलाहाबाद येथें दुसरी एक शेतकरी परिषद भरून वाटाघाटी झाल्या व अधिक सवलती मिळेपर्यंत शेतकऱ्यांनीं खंड व सारा देऊं नये असा अगदीं स्पष्ट व खणखणीत ठराव पास झाला. त्या वेळीं व अगदीं शेवटपर्यंत आम्हीं असेंच धोरण ठेवलें होतें कीं, करबंदी न करतां न्याय्य करासाठीं चळवळ चालवावी. वाटाघाटी व्हाव्या म्हणून आम्ही सारखी विनंति करीत असतां सरकार पक्ष बेगुमानपणें निघून गेला, त्याला काय उपाय ?

१९३१ च्या नोव्हेंबरच्या अखेरीअखेरीला संयुक्त प्रांतांत हा असा बनाव जमला होता. बंगालमध्यें न भूतो न भविष्यति असा जुलमी वटहुकुम जारी करण्यांत आला होता. हीं शांततेचीं लक्षणें नव्हतीं. ते युद्धाचे वारे होते. गांधीजी केव्हां येणार ? सरकारनें हल्ला चढविण्यापूर्वी त्यांचे पाय हिंदुस्थानच्या किनाऱ्यास लागतील कीं नाहीं ? कीं ते येतात तों त्यांचे पुष्कळसे सहकारी तुरुंगांत पडलेले असतील ? ते परत यावयास निघाले असून डिसेंबर अखेरीला ते हिंदुस्थानांत पोंचतील अशी बातमी आली होती. ते येईपर्यंत लढा टळावा अशी प्रत्येक कॉंग्रेस-कार्यकर्त्याची मनापासून इच्छा होती. केवळ लढ्याच्या दृष्टीनें पाहिलें तरी त्यांना भेटणें, त्यांची सल्लामसलत घेणें जरूरीचें होतें. पण या बाबतींत आम्ही लाचार बनलों होतों. कारण सगळीं सूत्रें ब्रिटिश सरकारच्या हातीं राहिलीं होतीं.

४०

# सभेटाची इतिश्री

संयुक्त प्रांतांतील घडामोडींत मी गुंतून पडलों असलों तरी जीं दुसरीं दोन वादळाचीं केंद्रें बंगाल व सरहद्द प्रांत, तेथें जाऊन यावें असें अनेकदां मनांत येत असे. जाग्यावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिति अवलोकन करावी, सहकाऱ्यांना भेटावें असा माझा विचार होता. पण त्याहूनहि बलवत्तर इच्छा अशी होती कीं ह्या प्रांतांतील लोकांनीं राष्ट्रीय चळवळींत जें शौर्य व तेज प्रकट केलें, त्याविषयींची कृतज्ञता आपण व्यक्त करावी. सरकारी धोरणामुळें सरहद्द प्रांतांत जाण्याचा नादच सोडून द्यावा लागला. कारण मुद्दाम बखेडा माजवण्याचा आमचा इरादा नव्हता.

बंगालमधील परिस्थितिहि बिनसत चालली होती, म्हणून मीं सुद्धां जावें न जावें अशा विचारांत पडलों. तेथें फारसें काम आपणाला करतां येणार नाहीं हें मला कळून चुकलें होतें. तेथील काँग्रेसवाल्यांत कित्येक दिवसांची दुही माजलेली असल्यामुळें आपण कोणत्या तरी एका बाजूचे पक्षपाती आहों असा समज होईल म्हणून परप्रांतीय काँग्रेसवाले बंगालमध्यें जावयाचें म्हटलें कीं बिचकत असत. हें घुंघट पांघरण्याचें धोरण कमकुवतपणाचें निदर्शक होतें. त्यामुळें बंगालच्या प्रश्नां-तील तिखटपणा कांहीं कमी झाला अथवा प्रश्न निकालांत निघाला असें कांहींच घडलें नाहीं. गांधीजी लंडनला पोंचल्यावर अचानकपणें हिजली व चितगांव येथें असे दोन प्रसंग घडून आले कीं सर्व हिंदुस्थानचे डोळे बंगालवर खिळून राहिले.

हिजली येथें स्थानबद्ध राजबंद्यांचा एक खास तुरुंग होता. तेथें दंगा उद्भवून राजबंद्यांनीं अधिकाऱ्यांवर हल्ला चढविला, तेव्हां निरुपायानें अधिकाऱ्यांना गोळीबार करणें भाग पडलें असें वृत्त सरकारमार्फत जाहीर करण्यांत आलें. या गोळीबारांत एक बन्दी मरण पावला व बऱ्याच जणांना जखमा झाल्या. तदनंतर सरकारमार्फत नेमण्यांत आलेल्या चौकशीसमितीनें अधिकारी सर्वतोपरी निर्दोषी आहेत असा निर्णय दिला. पण बऱ्याच कुतूहलजनक गोष्टी तेथें घडून आलेल्या होत्या. आणि तत्संबंधीं ज्या कांहीं बातम्या बाहेर फुटल्या, त्यांचा सरकारी हकीकतीशीं मेळ बसेना. तेव्हां कसून अधिक चौकशी करण्यांत यावी म्हणून सगळीकडून ओरड सुरू झाली. आपल्या नेहमींच्या वहिवाटीला सोडून सरकारनें न्यायखात्यांतील उच्च अधिकाऱ्यांची एक चौकशी समिति नेमली. समिति सरकारनियुक्त खरी, पण तिनें निर्णय मात्र तुरुंगावरील अधिकाऱ्यांच्या विरुद्ध दिला. अधिकाऱ्यांकडेच

बरीचशी चूक असून गोळीबार सर्वस्वी असमर्थनीय आहे असा निकाल समितीनें लिहिल्यामुळें सरकारनें हिजली प्रकरणासंबंधीं पूर्वी काढलेलें पत्रक साफ लटकें ठरलें.

या प्रकरणांत अभूतपूर्व असें कांहींच नव्हतें. हिंदुस्थानांत असे प्रसंग अथवा अपघात दुर्मिळ नाहींत. "तुरुंगांत दंगा" होऊन असहाय व निःशस्त्र कैद्यांचें बंड सशस्त्र तुरुंगाधिकाऱ्यांनीं मोठ्या हिंमतीवर मोडून काढलें, अशा बातम्या पुष्कळ वेळां वाचावयाला सांपडतात. अशा बाबतींतली सरकारी माहिती किती असत्य असते तें या प्रसंगीं सरकारच्याच चौकशी समितीनें निदर्शनास आणून दिलें म्हणून हिजली-प्रकरण असामान्य असें म्हणावयाचें. पूर्वी देखील सरकारी पत्रकावर लोक फारसा विश्वास ठेवीत नसतच; पण आतां सगळीच लबाडी उजेडांत आली.

कटकटी उपस्थित होऊन कधीं गोळीबार तर कधीं निराळ्या प्रकारची जबरदस्ती अधिकारी वर्गाला करावी लागली असे प्रसंग हिंदुस्थानांतील तुरुंगांतून सगळीकडे घडून आलेले आहेत. नवलाची गोष्ट ही कीं या दंग्यांत फक्त कैद्यांनाच जखमा होतातसें दिसतें. अधिकारी वर्ग निर्दोषी असल्याबद्दलचें सरकारी पत्रक बहुधा हटकून प्रसिद्ध होतेंच. खोडसाळपणा जो काय होतो तो सगळा कैदी करतात. अधिकारी वर्गापैकीं एकाद्याला खात्यामार्फत शिक्षा होते, पण ती विरळा. खात्यामार्फत झाली तेवढी चौकशी पुरी आहे असें म्हणून पूर्ण चौकशीबद्दल केलेल्या मागण्या धुडकावून लावण्यांत येतात. निःपक्षपाती चौकशी कमिटी पुनः नेमावयाची नाहीं असा बोध सरकारनें या प्रकरणापासून घेतला असेल. आणि जनतेनें असा बोध घेतला असेल कीं एकतर्फी हकीकत तेवढी सरकारी पत्रकांत प्रसिद्ध होते, सत्यस्थिति प्रसिद्ध होत नाहीं.

चितगांव प्रकरणाचें स्वरूप ह्यापेक्षां बरेंच गंभीर होतें. एका दहशतवाद्यानें एका मुसलमान पोलिस अधिकाऱ्याला गोळी झाडून ठार केलें. असें प्रसिद्ध झालें कीं त्यानंतर हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. नेहमींच्या जातीय दंग्याहून ह्या दंग्याचें स्वरूप वेगळें आहे ही गोष्ट स्पष्टच दिसत होती. दहशतवाद्यांच्या कृत्याचा जातीय प्रश्नाशीं कांहीं एक संबंध नव्हता हें निःसंशय. पोलिस अधिकाऱ्यावर त्याला हत्यार चालवावयाचें होतें; मग तो हिंदु असो कीं मुसलमान असो, मागाहून थोडा जातीय दंगा माजला ही गोष्ट खरी. त्याला सुरुवात कोणीं केली, निमित्त काय घडलें वगैरे गोष्टींचा खुलासा झाला नाहीं. दंग्याच्या वेळीं विशेष प्रकार घडला तो असा कीं, अँग्लो-इंडियन ( विशेषतः रेल्वे-खात्यांतील व इतर सरकारी खात्यांतील अँग्लो-इंडियन ) वगैरे गटांनीं दंग्यांत बराचसा भाग घेतला. श्री. सेनगुप्त वगैरे बंगालमधील पुढाऱ्यांनीं या प्रकरणाच्या बाबतींत रोखठोक आरोप केले व दंग्याची चौकशी व्हावी अगर आमच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद लावावी असें आव्हान दिलें; पण सरकारनें हूं कीं चूं केलें नाहीं.

चितगांवला जे अभूतपूर्व प्रसंग घडले, त्यांच्या योगानें दोन भयंकर गोष्टींची संभाव्यता नजरेस आली. दहशतवादाचा धिक्कार अनेक दृष्टींनीं करण्यांत आलेला असून क्रांतिशास्त्राच्या आधुनिक तंत्रानुसार देखील तो सदोषच ठरतो. पण मला नेहमीं भीति वाटे ती या गोष्टीची कीं दहशतवादामुळें फुटकळ जातीय अत्याचारांचा फैलाव हिंदुस्थानांत कदाचित् होईल. हिंसेविषयीं मला तिट्कारा असला तरी त्यामुळें गारठून जाणारा असा "भ्याड हिंदु" मी नाहीं. पण दुहीचा जोर हिंदुस्थानांत अद्यापि फार आहे आणि फुटकळ अत्याचारांचें खाद्य एकदां मिळालें कीं हा दुहीचा विषवृक्ष फारच फोंफावेल व मग एकजुटीची व शिस्तीची संवय राष्ट्राला लावणें फार दुर्घट कर्म होईल असें मला वाटतें. धर्माचें नांव घेऊन किंवा स्वर्गात एक आयती खोली मिळेल म्हणून जेथें खून पडतात, तेथें लोकांना दहशतवादी अत्याचारांच्या कल्पनांची शिकवण देणें फार धोक्याचें ठरेल. राजकीय हेतूनें केलेला खून देखील वाईटच. पण राजकीय दहशतवाद्याबरोबर विचारविनिमय करणें अथवा त्याला आपल्या बाजूला वळवणें तरी शक्य असतें. कारण त्याचें ध्येय वैयक्तिक स्वार्थाचें नसून तें राष्ट्रीय व ऐहिक असें असतें. पण धार्मिक खून हे परलोकप्राप्तीसठीं असल्यामुळें त्याविषयीं बुद्धिवाद करणेंच शक्य होणार नाहीं. म्हणून असले खून अत्यंत अनिष्ट होत; पण पुष्कळ वेळां या दोन कृत्यांतील भेद इतका सूक्ष्म असतो कीं तो ओळखणें जवळजवळ अशक्य होतें. राजकीय खुनाला अध्यात्मवादाची पुस्ती मिळाली म्हणजे त्याला देखील अर्धेमुर्धे धार्मिक स्वरूप प्राप्त होत असतें.

राष्ट्रैक्य व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या मार्गांत दहशतवादामुळें किती संकटें येऊन पडतील त्याची स्पष्ट कल्पना चितगांव प्रकरणामुळें आलीच. पण त्यानंतर जे हल्ले-प्रतिहल्ले झाले, त्यांच्या योगानें हिंदुस्थानांत फॅसिझमचे अंकुर फुटूं लागले असल्याचेंहि प्रत्ययाला आलें. पुढें असे प्रकार बंगालमध्यें बऱ्याच वेळां घडले. युरोपियन आणि अँग्लो-इंन्डियन जमातींत व हिंदी वरिष्ठ वर्गांत फॅसिझमचा प्रसार निःसंशय झालेला आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीची लाळ घोटणाऱ्या हिंदी गव्हर्नर-देखील फॅसिझमची विचारसरणी फैलावलेली दिसते.

सांगितलें तर नवल वाटेल पण खुद्द दहशतवाद्यांमध्येंहि पुष्कळ लोक फॅसिस्ट मतांचे आहेत. मात्र त्यांची दृष्टि निराळ्या ध्येयाकडे लागली आहे. वर उल्लेख केलेल्या लोकांचा फॅसिझम व दहशतवाद्यांचा फॅसिझम ह्यांत बराच विरोध आढळून येतो.

१९३१ च्या नोव्हेंबरमध्यें मी कलकत्त्याला कांहीं दिवस राहिलों होतों. तेथील माझा कार्यक्रम भरगच्च झाला. व्यक्तींना व निरनिराळ्या गटांना मी खाजगी रीतीनें भेटलोंच, पण जाहीर व्याख्यानेंहि बरींचशीं झालीं. ह्या सर्व सभांतून दहशतवादासंबंधीं मीं चर्चा केली व तो किती चुकीचा व निष्फळ आहे आणि हिंदी स्वातंत्र्याला तो किती विघातक होईल हें पटवून देण्याचा मीं प्रयत्न केला.

दहशतवाद्यांना मी शिवीगाळ करीत नसें. स्वतःच्या अंगीं शौर्याच्या अथवा धाडसाच्या भावना आहेत असें आपल्या उभ्या ह्यातींत ज्यांनीं क्वचितच सिद्ध केलें असेल अशा आमच्या कांहीं देशबांधवांप्रमाणें मी दहशतवाद्यांना भ्याड अथवा षंढ म्हणून हिणवलें नाहीं. स्वतःचा जीव सतत तळहातावर घेऊन काम करणाऱ्या स्त्रीला किंवा पुरुषाला भ्याड म्हणणें म्हणजें कमालीचा मूर्खपणा आहे असें मला वाटतें. अशा दुःशब्दांचा परिणाम इतकाच होतो कीं, ज्याला उद्देशून असे शब्द वापरण्यांत येतात तो या लांबून भुंकणाऱ्या कर्तृत्वशून्य आणि घाबरट टीकाकारांकडे अधिकच तुच्छतेनें पाहूं लागतो.

शेवटच्या दिवशीं संध्याकाळीं स्टेशनवर निघण्याच्या आधीं कांहीं वेळ दोन तरुण मुलें मला भेटण्यासाठीं आलीं. त्यांचें वय वीसएक वर्षांचें असेल नसेल. त्यांचे चेहरे फिकट व भावनापूर्ण आणि डोळे फार पाणीदार असे दिसत होते. त्यांचीं नांवें मला माहीत नसलीं, तरी त्यांचें काय काम असावें हें मीं ताबडतोब ओळखलें. दहशतवादाविरुद्ध मीं मतप्रचार केला म्हणून ते माझ्यावर अतिशय संतापले होते. तरुणांच्या मनांवर तुमच्या भाषणाचा अतिशय वाईट परिणाम होत आहे, तुमची ही लुडबूड आम्हांला खपणार नाहीं असें त्यांनीं बजाविलें. आमच्यांत थोडी चकमक उडाली आणि माझी निघण्याची वेळ झाली असल्यामुळें उत्तर-प्रत्युत्तर फार घाईघाईनें करावें लागलें. मला वाटतें दोन्ही बाजूंचे आवाज व संतापाचा पारा चढला असावा. त्यांना लागतील असे कांहीं शब्दहि माझ्या तोंडून निघून गेले. तुमचा हा अनिष्ट उद्योग तसाच चालू राहिला तर इतरांप्रमाणेंच तुमचीहि वाट लावल्यावांचून आम्ही राहणार नाहीं ' असा इषारा त्यांनीं मला निघतांना देऊन ठेवला.

कलकत्ता स्टेशनवरून गाडी हालली व मी अंथरुणावर जाऊन पडलों. पण किती वेळ तरी त्या मुलांचे संतापानें लाल झालेले चेहरे माझ्या डोळ्यांपुढून हालेनात. त्यांच्या डोळ्यांत तेजाची आणि उत्साहाची चमक होती. त्यांना योग्य मार्ग-दर्शक भेटला असता तर किती उत्कृष्ट कामगिरी त्यांनीं बजावली असती ! मी इतक्या घाईघाईनें व डाफरून त्यांच्याशीं बोललों ह्याबद्दल मला पश्चात्ताप झाला आणि त्यांच्याशीं बराच वेळ बोलण्याची संधि मिळाली असती तर फार बरें झालें असतें असें मला वाटूं लागलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं व सेवेसाठीं जरा निराळ्या मार्गानें आपलें तेजस्वी जीवन समर्पण करा असा उपदेश करून मला त्यांची कदाचित् खात्रीहि पटवितां आली असती; कारण इतर मार्गानें गेलें तरीहि धाडस व त्याग करण्याची संधी त्यांना हवी तितकी मिळण्यासारखी आहे. त्यानंतरच्या काळांत त्या मुलांविषयीं पुष्कळदां माझ्या मनांत विचार येऊन गेले. त्यांचीं नांवें मला केव्हांहि कळलीं नाहींत, त्यांचा ठावठिकाणाहि मला लागला नाहीं. कधीं कधीं मनांत विचार येतो कीं ते मुलगे गतप्राण तर झाले नसतील ना ? अंदमान-मधील एकाद्या कोठडींत ते खितपत तर पडले नसतील ना ?

डिसेंबर उजाडला. अलाहाबादची दुसरी शेतकरी परिषद आटोपली व मी घाईघाईनें कर्नाटकच्या दौऱ्यावर गेलों. तिकडे येईन म्हणून मी हिंदुस्थानी सेवादलाच्या डॉ. हर्डीकरांना वचन दिलें होतें. स्वयंसेवक दलाचें मुख्य ठिकाण कर्नाटक प्रांतांत हुबळी येथें होतें. दलासंबंधीं बरेच कार्यक्रम तेथें व्हावयाचे असल्या-मुळें मीं हुबळीला यावें असा डॉ. हर्डीकरांचा आग्रह होता. हुबळीचें काम संपल्यावर त्यांनीं मला कर्नाटकमध्यें ठिकठिकाणीं हिंडविलें. सर्वत्र दिसून येणारा जनतेचा उत्साह पाहून मी चकित झालों. परत येतांना वाटेंत लष्करी कायद्यामुळें प्रसिद्धीस आलेल्या सोलापूर शहरासहि मीं भेट दिली.

माझा कर्नाटकांतील दौरा म्हणजे निरोपाच्या समारंभाप्रमाणेंच झाला. तेथील माझीं भाषणें अखेरचींच ठरलीं. संयुक्त प्रांतांतून आलेल्या बातम्यांचें स्वरूप अगदीं उघड होतें. सरकारनें खूप निकराचा हल्ला चढविला होता. कर्नाटकांतून अलाहाबादेकडे जातांना कमलाला भेटण्यासाठीं मी मुंबईस उतरलों. ती पुनः आजारी पडली होती म्हणून मुंबईतच तिच्या औषधोपचारांची व्यवस्था मीं लावून दिली. संयुक्त प्रांतामध्यें हिंदुस्थान सरकारनें नवा वटहुकुम जारी केला आहे असें वृत्त मुंबईस असतांनाच आम्हाला समजलें. गांधीजी येईपर्यंत वाट पाहावयाची नाहीं असा सरकारचा निश्चय झालेला दिसला. वटहुकुमाचें क्षेत्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांपुरतें मर्यादित राहील अशी कल्पना होती. परंतु त्याचा व्याप इतका विस्तृत व दूरस्पर्शी होता कीं कोणतेंच राजकीय अथवा सामाजिक काम करणें त्यामुळें अशक्य होणार होतें. मुलांच्या अपराधाबद्दल पालकांना व आईबापांना शिक्षा व्हावी अशीहि त्यांत तरतूद केलेली होती! बायबलांत बापाच्या अपराधाबद्दल मुलांना दंड होई असा उल्लेख आहे. या वटहुकुमानें मुलाच्या अपराधाबद्दल बापाला शिक्षा मिळणार होती, इतकाच फरक!

गांधीजींनीं रोममध्यें असतांना "जर्नेल ड इटालिया" या वृत्तपत्रासाठीं त्यांनीं दिलेली म्हणून एक मुलाखत प्रसिद्ध झाली, ती याच वेळीं आमच्या वाचनांत आली. ती वाचून आम्ही आश्चर्यचकित झालों. रोममध्ये अशा प्रकारची मुलाखत गांधीजींनीं सहजासहजीं द्यावी हें त्यांच्या स्वभावाला धरून नव्हतें. अधिक बारकाईनें मुलाखत वाचून पाहिल्यावर गांधीजींच्या तोंडीं न बसणारे शब्द व वाक्यें आम्हांला आढळून आलीं, आणि त्यामुळें गांधीजींचा इन्कार प्रसिद्ध होण्यापूर्वीच मुलाखतींत बनावट भाग आहे हें आम्हांला कळून चुकलें. नंतर आपण रोममध्यें केव्हांहि मुलाखत दिली नाहीं असें गांधीजींनीं जाहीरहि केलें. कोणीं तरी कुत्सित बुद्धीनें ही मुलाखत शिजवून व रांधून दिली असावी. पण आश्चर्य असें कीं, ब्रिटिश वृत्तपत्रें व पुढारी गांधीजींवर विश्वास ठेवण्यास तयार होईनात व लबाड माणूस म्हणून त्यांनीं गांधीजींचा उल्लेख करण्यासहि कमी केलें नाहीं. या गोष्टीचें शल्य आमच्या हृदयाला अतिशय झोंबलें.

अलाहाबादला जाण्यासाठीं मी अगदीं उतावीळ झालों होतों. संयुक्त प्रांतांत जाऊन माझ्या सहकाऱ्यांच्या खांद्याशीं खांदा लाऊन उभें राहणें हें माझें कर्तव्य आहे,

असें मला वाटलें. घराकडे धामधूम सुरू असतां आपण लांब राहणें म्हणजे एक दिव्यच आहे. पण कर्नाटकचा दौरा संपवावयाचा असा मीं निश्चय केला होता. मुंबईस परतल्यावर गांधीजी येईपर्यंत म्हणजे एक आठवडाभर मीं तेथेंच राहावें असा सल्ला कांहीं मित्रांनीं दिला. पण तें शक्य नव्हतें. पुरुषोत्तमदास टंडन वगैरेंच्या अटकेची बातमी अलाहाबादेहून आली होतीच. शिवाय त्या आठवड्यांत आमची प्रांतिक परिषद इटावा येथें भरण्याचेंहि नक्की झालें होतें. तेव्हां प्रथम अलाहाबादला जावें व नंतर गांधीजींना भेटण्यासाठीं व वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठीं आपण मोकळे असलों तर मुंबईला परत यावें असा विचार मीं ठरविला. मुंबईहून मी निघालों तेव्हां कमला अंथरुण धरूनच होती.

अलाहाबादला पोंचण्यापूर्वी चौकी स्टेशनवरच नव्या वटहुकुमान्वयें माझ्यावर निर्बंध बजावण्यांत आला. नंतर अलाहाबाद स्टेशनवर त्याच हुकुमाची दुसरी एक नक्कल व माझ्या घरीं तिसरी एक नक्कल मजवर बजावण्यांत आली. कोठेंहि फट राहूं द्यावयाची नाहीं असा सरकारचा उद्देश असावा. मी अलाहाबाद नगरपालिकेच्या हद्दींत राहावें, कोणत्याहि सार्वजनिक सभेला अथवा समारंभाला उपस्थित राहूं नये आणि तेथें भाषण करूं नये, कोणत्याहि वृत्तपत्रांत अथवा हस्तपत्रकांत लिहूंसवरूं नये असा त्या निर्बंधाचा आशय होता. इतरहि अनेक बंधनें लादण्यांत आलीं होतींच. अशाच अर्थाचे निर्बंध शेरवाणी वगैरे इतर सहकाऱ्यांवरहि लादण्यांत आले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला लिहून कळविलें कीं, ' मी काय करावें अथवा न करावें ह्यासंबंधींचे हुकूम डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून घेण्याचा माझा परिपाठ नाहीं. माझें नित्याचें काम मी नेहमींप्रमाणेंच चालू ठेवणार आहें व त्यांतील एक भाग म्हणून लवकरच गांधीजींना भेटण्यासाठीं व एक चिटणीस म्हणून वर्किंग कमिटीच्या बैठकीला हजर राहण्यासाठीं मुंबईला जाण्याचाहि माझा मानस आहे. '

इतक्यांत आमच्यापुढें एक नवाच प्रश्न उपस्थित झाला. त्या आठवड्यांत इटावा येथें प्रांतिक परिषद भरावयाची होती. गांधीजींच्या आगमनाची वेळ व परिषदेची वेळ यांमध्यें तेढा पडत असल्यामुळें परिषद लांबणीवर टाकावी अशी सूचना करण्यासाठीं मी मुंबईहून आलों होतों. सरकारबरोबरचा बखेडाहि टाळण्याचा त्यांत हेतु होताच. पण मी अलाहाबादला पोंचण्यापूर्वीच आमचे अध्यक्ष शेरवाणी यांच्याकडे सरकारचा एक खलिता येऊन थडकला. परिषदेमध्यें शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा खल व्हावयाचा असेल तर परिषदेला बंदी करणें भाग पडेल असें सरकारनें कळविलें होतें. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार व्हावा म्हणून तर परिषदेचा खटाटोप करण्यांत आला. परिषद भरवावयाची आणि सबंध प्रांतभर ज्यामुळें खळबळ उडून राहिली होती तो प्रश्न मात्र विचारांत घ्यावयाचा नाहीं असें ठरविलें असतें तर वेडगळपणाची व आत्मघातकीपणाची सीमाच झाली असती. शिवाय परिषदेनें

काय करावें वगैरेबद्दल निर्बंध लादण्याचा अधिकारहि आमच्या अध्यक्षांच्या अथवा दुसऱ्या कोणाच्या हातीं नव्हता. सरकारचा खलिता येण्यापूर्वींच परिषद पुढें ढकलण्याचा आमच्यांपैकीं कांहीं जणांचा विचार चालू होता. पण सरकारकडून धमकावणी आल्यावर मात्र गाडें उलटलें. असल्या बाबतींत माघार घ्यावयाची नाहीं अशा तऱ्हेची हटवादी वृत्ति आम्हां बऱ्याच जणांत होती. सरकारनें हुकुमशाही गाजवलेली आम्हांस खपत नसे; पण बऱ्याच विचारानंतर आपला अभिमान गिळून परिषद तहकूब करण्याचें आम्हीं ठरविलें. कांहीं झालें तरी गांधीजींचें आगमन होईपर्यंत वणवा पेटूं देऊं नये अशी आमची इच्छा होती. त्यांची तयारी नसतां आपल्याबरोबर त्यांना वादळांत सांपडलेल्या गलबताचें सुकाणूं हातीं घ्या असें सांगणें आम्हांला योग्य वाटत नव्हतें. प्रांतिक परिषद पुढें ढकलली तरीहि पोलिसांनीं आणि सैन्यानें इटावा येथें आपल्या सामर्थ्याचें प्रदर्शन केलेंच व चुकून माकून आलेल्या कांहीं प्रतिनिधींना अटकहि करण्यांत आली, आणि तेथील स्वदेशी प्रदर्शन सैन्यानें आपल्या ताब्यांत घेतलें.

शेरवाणींनीं व मीं असें ठरविलें कीं, २६ डिसेंबर रोजीं सकाळीं अलाहाबादहून निघून मुंबईस जावें. संयुक्त प्रांतांतील परिस्थितीसंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं शेरवाणींना मुद्दाम बोलावण्यांत आलें होतें. अलाहाबाद शहर सोडून न जाण्याचे निर्बंध आम्हां दोघांवरहि होतेच. अलाहाबादमधील व इतर जिल्ह्यांतील खेड्यां-मधून खंडबंदीची चळवळ होऊं नये म्हणून हे निर्बंध लादले होते असें सांगण्यांत येई. तेव्हां खेड्यापाड्यांत जाण्याची आडकाठी सरकारनें केली तर गोष्ट समजण्यासारखी होती. पण मुंबई शहरामध्यें करबंदी अथवा खंडबंदीची चळवळ करणें आम्हांला शक्य नाहीं ही गोष्ट स्पष्टच दिसत होती. खरोखर निर्बंधाचा हेतु आम्हीं शेतकऱ्यां-मध्यें चळवळ करूं नये असा असता तर आम्ही संयुक्त प्रांत सोडून निघालों याचा सरकारला आनंदच वाटावयास हवा होता. वटहुकुम जारी झाल्यापासून आतां-पर्यंतचें आमचें धोरण बचावाचेंच होतें व सं. प्रां. काँ. समिति सरकारशीं येणारे झगड्याचे प्रसंग सध्यांपुरते तरी टाळीत होती. मुंबईला गांधीजी व वर्किंग कमिटी यांच्याबरोबर या प्रश्नाच्या बाबतींत वाटाघाट करण्यासाठीं आम्ही निघालों होतों. शेवटीं ते काय निर्णय देतील याबद्दल कोणालाच कांहीं कल्पना नव्हती. निदान मी तरी त्यांच्या निर्णयासंबंधीं साशंक होतों एवढें खरें.

सारासार विचार करून पाहतां मुंबईला जाण्यांत आमच्या हातून हुकुमाचें उल्लंघन होत असलें तरी सरकार तिकडे दुर्लक्ष करील असें बुद्धि सांगत होती, पण मनाचा कौल मात्र निराळाच लागत होता.

गाडींत बसल्यावर लगेच सकाळच्या वृत्तपत्रांत सरहद्द प्रांतांतील नव्या वट-हुकुमासंबंधीं व खान अबुद्दल गफारखान, डॉ. खानसाहेब, व इतर लोक यांच्या अटके-

संबंधीं बातमी वाचावयास मिळाली. थोड्याच वेळांत आमची बॉम्बे मेल इरादत-गंज येथें एकाएकीं थांबली. बॉम्बे मेल तेथें थांबत नसे. पोलिस अधिकारी आमच्या डब्यांत शिरले व त्यांनीं आम्हांला अटक केली. रस्त्यावर पोलिसांची मोटर उभी होतीच. त्यांत आम्हांला बसविल्यावर मोटर नैनी तुरुंगाकडे वेगानें निघाली. ज्या दिवशीं सकाळीं आम्हांला अटक झाली, तो बॉक्सिंग डे* होता. आम्हांला अटक करण्यासाठीं आलेल्या इंग्रज पोलिस सुपरिंटेंडेंटची मुद्रा अगदीं अप्रसन्न झालेली दिसली. त्याच्या नाताळांतील आनंदावर आमच्यामुळें विरजण पडलें असावें.

इतक्यांत तुरुंग आलाच.

“ हो दूर जरासा आनंदापासुनी
दिन कांहीं जीवन घेई दुःखांतुनी ”

---

* नाताळच्या सुरुवातीनंतरचा ( आदितवारव्यतिरिक्त ) पहिला दिवस.

४१

# धरपकड, वटहुकुम आणि पुस्तकावरील बंदी

आम्हांला पकडल्यानंतर गांधीजी मुंबईला येऊन पोंहोचले. देशांत घडलेल्या प्रसंगांची बातमी त्यांना प्रथम तेथेंच कळली. बंगालमधील वटहुकुमाचें वृत्त त्यांस लंडन येथें कळलें तेव्हांच त्यांचें मन फार अस्वस्थ झालें होतें. पण बंदरांत पाय ठेवतांक्षणींच नाताळची भेट म्हणून नव्या वटहुकुमांचीं आणखी कांहीं भेंडोळीं त्यांच्या हातीं पडलीं. सरहद्द प्रांतांतील त्यांचे कांहीं जिवलग सहकारी तुरुंगांत डांबले गेले होते. युद्धांतील पहिला बाण सुटला असून आशेला फारच थोडी जागा उरली होती. तरीहि तडजोडीचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केल्यावांचून ते राहिले नाहींत. लॉर्ड विलिंग्डननें आपल्याला भेट द्यावी म्हणून त्यांनीं पत्र लिहिलें. दिल्लीहून उत्तर आलें कीं, मुलाखत होईल पण ती कांहीं अटींवर होईल. घालण्यांत आलेल्या अटी अशा कीं, बंगाल, संयुक्त प्रांत व सरहद्द प्रांत या ठिकाणीं लागू करण्यांत आलेले नवे वटहुकुम व तदन्वयें झालेली पकडापकड यासंबंधीं त्यांनीं चर्चा करूं नये. हे प्रश्न वगळल्यावर इतर कोणत्या बाबतींत गांधीजी व्हाइसरॉयबरोबर कॉंग्रेसतर्फे चर्चा करणार होते हें एक न समजण्यासारखें कोडें आहे. उत्तराचा मथितार्थ इतकाच कीं, कॉंग्रेसला झोडपून काढण्याचा सरकारनें निश्चय केलेला होता. कॉंग्रेसशीं कांहीं एक संबंध ठेवावयाचा नाहीं असें सरकारनें ठरवून टाकलें. तेव्हां कायदेभंगावांचून वर्किंग कमिटीला गत्यंतरच उरलें नाहीं. कोणत्याहि क्षणीं आपणांस पकडण्यांत येईल, तेव्हां आपण उचलले जाण्यापूर्वी देशाला मार्ग दाखवून द्यावा अशी वर्किंग कमिटीची इच्छा होती. पण अशी परिस्थिति असतांहि वर्किंग कमिटीनें कायदेभंगाचा जो ठराव केला तो तात्पुरत्या स्वरूपाचा होता. बिनशर्त मुलाखतीसाठीं गांधीजींनीं पुनः एकवार प्रयत्न करून पाहिला. उत्तरादाखल सरकारनें गांधीजींना व कॉंग्रेसच्या अध्यक्षांना तुरुंगाची वाट दाखविली. एक कळ दाबल्याबरोबर जें यंत्र सुरू व्हावयाचें होतें तें आतां सुरू होऊन सर्व देशभर दडपशाहीचा भयंकर वेताळ नाचूं लागला. युद्धाची इच्छा दुसऱ्या कोणाला असो वा नसो, सरकारला खुमखुमी आली होती हें या वेळीं उघड झालें.

त्या वेळीं आम्ही तर तुरुंगांतच होतों. तेथें आम्हांला याविषयींच्या बातम्या तुटक व संदिग्ध स्वरूपांत कळत असत. आमचा खटला जानेवारीपर्यंत पुढें ढकलण्यांत आल्यामुळें आम्हांला आरोपी म्हणून कैद्यापेक्षां अधिक भेटी मिळत असत. व्हाइस-

रॉयनें भेट द्यावयास हवी होती कीं नको ह्याबद्दल बाहेर फार कडाक्याचा वाद सुरू आहे असें आम्हांला कळलें. जणूं कांहीं व्हाइसरॉयच्या होकाराला अथवा नकारालाच विशेष महत्त्व होतें. पण ह्या मुलाखतीच्या प्रश्नावर माजलेल्या गोंगाटामुळें खऱ्या प्रश्नावरील लोकांचें अवधान उडालें. लॉर्ड अर्विन असते, तर त्यांनीं मुलाखत दिली असती व सर्व कांहीं सुरळीत झालें असतें अशा प्रकारचे विचार प्रदर्शित करण्यांत येत होते. हिंदी वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून इतका वरपांगी विचार करावा ह्याचें मला फार आश्चर्य वाटलें. हिंदी राष्ट्रवाद व ब्रिटिश साम्राज्यशाही यांच्यामधील अटळ अशा विरोधाचें मूळ व्यक्तींच्या लहरींत शोधूं पाहणें योग्य आहे काय? गोडसें स्मित केलें व शिष्टाचार पाळले म्हणून दोन इतिहासप्रसिद्ध विरोधी सामर्थ्यांची झोंबी सुटेल कशी? अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या बाबतींत परकीय राज्यकर्त्यांनीं सोडलेले हुकुम पाळून स्वतःचा आत्मघात करणें हिंदी राष्ट्रवादाला शक्य नव्हतें, म्हणूनच गांधीजींना एका विशिष्ट प्रकारें वर्तन करणें भाग पडलें, आणि राष्ट्रवादाचें आव्हान स्वीकारून ब्रिटिशांचा वर्गस्वार्थ जतन करणें आवश्यक असल्याकारणानें व्हाइसरॉयला दुसऱ्या एका मार्गानें जावें लागलें. त्या काळीं कोण व्यक्ति व्हाइसरॉयच्या पदावर होती ह्या मुद्द्याला मुळींच महत्त्व नाहीं. लॉर्ड अर्विन असते तर लॉर्ड विलिंग्डनप्रमाणेंच त्यांनाहि वागणें भाग पडलें असतें. कारण ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या ठाम धोरणाचें प्रतिपालन करणाऱ्या 'निमित्तमात्र' अशा त्या व्यक्ती होत्या. व्यक्ती निरनिराळ्या म्हणून धोरणांत सुता अर्ध्या सुताचा फरक झाला असता इतकेंच. पुढें ब्रिटिश सरकारच्या प्रधान मंडळांत खुद्द लॉर्ड अर्विन यांचा समावेश झाला, तेव्हां त्यांनीं काय केलें? हिंदुस्थानच्या बाबतींत स्वीकारण्यांत आलेल्या धोरणाची तळी त्यांनीं उचलूनच धरली! सारांश, ब्रिटिशांच्या धोरणाबद्दल ह्या किंवा त्या व्हाइसरॉयला जबाबदार धरणें म्हणजे बुद्धीचा कच्चेपणा प्रदर्शित करण्याप्रमाणें आहे. आपल्या लोकांत ही वृत्ति दिसून येते त्याचें कारण आपलें अज्ञान तरी असेल किंवा वस्तुस्थितीकडे डोळेझांक करण्याची इच्छा तरी त्याला कारणीभूत होत असेल.

४ जानेवारी १९३२ हा संस्मरणीय दिवस ठरला; कारण सगळाच वादविवाद आणि चर्चा त्या दिवशीं बंद पडली. त्या दिवशीं पहाटे गांधीजी व वल्लभभाई यांना अटक करून चौकशीविना दरबारी बंदी म्हणून तुरुंगांत टाकण्यांत आलें. चार नवीन वटहुकुम निघून मॅजिस्ट्रेट व पोलिस अधिकारी यांना व्यापक अधिकार देण्यांत आले. नागरिक स्वातंत्र्याची इतिश्री झाली. कोणत्याहि व्यक्तीला पकडण्याचा अथवा मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार अधिकाऱ्याच्या हातीं येऊन सर्व हिंदुस्थानभर लष्करी कायदा पुकारल्याप्रमाणें परिस्थिति निर्माण झाली. वटहुकुमांचीं कलमें

किती कडकपणें व किती मर्यादेपर्यंत लागू करावींत तें ठरविण्याचें कामहि स्थानिक अधिकाऱ्यांकडे सोपविण्यांत आलें होतें.

नैनीच्या तुरुंगांत आमचा खटला ४ जानेवारी रोजींच सुरू झाला. शेरवाणी यांना सहा महिने सक्तमजुरी व १५० रुपये दंड व मला दोन वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंड ( दंड न दिल्यास सहा महिने शिक्षा ) अशा शिक्षा झाल्या. आमचा गुन्हा एकच होता. आमच्यावरील निर्बंधहि एकच प्रकारचे होते. आम्ही दोघेहि मुंबईला जात होतों. आम्हांला अटकदेखील एकदम करण्यांत आली व एकाच वेळीं आमची चौकशी झाली. पण शिक्षा झाल्या त्यांत मात्र इतका फरक पडला. पण थोडा फरक होता तो असा कीं, मी हुकुम मोडून मुंबईला जाणार असें मॅजिस्ट्रेटला कळविलें होतें, पण शेरवाणींनीं आगाऊ सूचना दिली नाहीं. मात्र ते मुंबईला जाणार ही गोष्ट वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. निकाल सांगितल्याबरोबर मी मुसलमान आहें म्हणून मला कमी शिक्षा झाली कीं काय असा प्रश्न शेरवाणींनीं विचारला. त्यामुळें कोर्टांत हजर असलेल्या प्रेक्षकांत हंशा पिकला खरा, पण न्यायाधीशाचा चेहरा मात्र गोरामोरा झाला.

त्या दिवशीं सर्व देशभर अनेक उत्पात घडले. आमचा खटला सुरू होता तेथून नजिकच असणाऱ्या अलाहाबादेंत प्रचंड जनसमुदायाची व पोलिस लष्कराची चकमक उडाली. नेहमींप्रमाणें लाठीमार झाला, कांहीं लोकांचे मुडदे पडले, व कांहीं लोकांना जखमा झाल्या. सत्याग्रही कैद्यांमुळें तुरुंग भरून गेले. सुरुवातीला कैदी जिल्हा-तुरुंगांतून पाठविण्यांत येत व बाकी कांहीं उरलेच तर तेवढे नैनी-सारख्या मध्यवर्ति तुरुंगांत पाठवीत. पण लवकरच सर्वच तुरुंग भरून गेले, तेव्हां मोठमोठे छावणी तुरुंग उभारण्यांत आले.

नैनी येथील आमच्या छोट्या आवारांत मात्र फार लोक आले नाहींत. नर्मदाप्रसाद, रणजित पंडित व माझा चुलत भाऊ मोहनलाल नेहरू एवढेच काय ते माझ्या आवारांत होते. आमच्या सहा नंबरच्या बराकींतल्या भ्रातृमंडळांत एक अभावित अशी भर पडली, ती म्हणजे सिलोनचे एक तरुण बॅरिस्टर बर्नार्ड अलुविहारे यांची. इंग्लंडहून ते नुकतेच परत आले होते. ‘ आमच्या सभा-मिरवणुकींत तुम्ही सामील होऊं नका बरं ’ असें माझ्या बहिणीनें त्यांना बजाविलें असतांहि उत्साहाच्या भरांत ते एका कॉंग्रेस-मिरवणुकींत सामील झाले आणि पोलिसांनीं त्यांना सरळ तुरुंगांतच आणून सोडलें.

कॉंग्रेस बेकायदा ठरविण्यांत आली. वर्किंग कमिटीपासून ते थेट किरकोळ स्थानिक संस्थांपर्यंत असंख्य संघटना बेकायदा ठरल्या. किसान सभा, युवक संघ, विद्यार्थी मंडळें, राष्ट्रीय विश्वविद्यालयें, रुग्णालयें, स्वदेशी उद्योगधंदे, वाचनालयें, एकंदरींत ज्यांचा ज्यांचा म्हणून कॉंग्रेसशीं कांहीं संबंध पोंचत होता अशा सर्व संस्था बेकायदा ठरविण्यांत आल्या. अशा संस्थांची संख्या हजारांनीं मोजतां येईल. ही कॉंग्रेसची व राष्ट्रीय चळवळीची थोरवी नव्हे तर काय ?

माझी पत्नी मुंबईलाच दुखण्यामुळें पडून होती. कायदेभंगांत भाग घेतां येत नाहीं याबद्दल तिच्या जीवाला यातना होत. माझी आई व माझ्या दोन्ही बहिणी यांनीं कामाचा धूमधडाका सुरू केला व थोड्याच दिवसांत दोन्ही बहिणींना एक एक वर्षाची शिक्षा झाली. नवे सत्याग्रही आले कीं त्यांच्या तोंडून व आम्हांला मिळणाऱ्या साप्ताहिक वर्तमानपत्रांतून तुटक्या फुटक्या बातम्या आम्हांला कळत. वर्तमानपत्रांच्या तोंडाला नियंत्रकांची मुस्की असल्यामुळें व जामिनकीची तरवार मस्तकावर टांगलेली असल्याकारणानें आम्हांला बाहेरच्या गोष्टी तर्कानेंच जाणाव्या लागत. अटक अगर शिक्षा झालेल्या इसमांचें नांव छापणे हा देखील कांहीं प्रांतांतून गुन्हा समजण्यांत येत असे.

बाहेरच्या वादळापासून अलिप्त असे आम्ही नैनीच्या तुरुंगांत सुकाट बसलों होतों. तरीहि आमचें मन बाहेरच्या वातावरणाशीं अनेक रीतींनीं निगडित झालेलें असे. कांतण्यात, वाचण्यांत, अथवा इतर कांहीं तरी करण्यांत आमचा वेळ निघून जाई, कांहीं गोष्टींवर चर्चाहि होई, पण आमचें सारें लक्ष भिंतीपलीकडे काय घडत आहे तिकडे होतें. शरीरानें रणक्षेत्राच्या बाहेर पण मनानें रणक्षेत्राच्या आंत अशी आमची स्थिति होती. मनाला लागलेल्या ध्यासाची केव्हां केव्हां भयंकर ओढ बसत असे; कधीं चूक झालेली कळली तर अंगाचा दाह होई; भ्याडपणा अथवा चावटपणा पाहिला कीं, तिट्कारा वाटे. कधीं कधीं मन वीतरागी बने व मग सर्व गोष्टींचें निरीक्षण मोठ्या शांत, निर्विकार चित्तानें करणें शक्य होऊन असे विचार मनांत येत कीं, प्रचंड शक्तींची झुंज सुरू असतां व विश्वकर्म्याचीं सृष्टिचक्रें फिरत असतां मानवांच्या किरकोळ चुकांची व कमजोरीची मातब्बरी ती काय? उद्यां काय दंगल उडते, कसली रणधुमाळी माजते, कोणत्या प्रकारचा उत्साह दृष्टीस पडतो, कसल्या प्रकारच्या दडपशाहीची व भ्याडपणाची बातमी कानीं पडते असे विचार मनांत घोळत राहत. हें गाडें जाणार तरी कोठें? आम्ही कोणीकडे चाललों आहोंत? भविष्य काळानें आपलें मुख झांकून घेतलेलें होतें, आणि तसें होतें म्हणूनच बरें. वर्तमानाचा चेहरा तरी आम्हांला सगळाच्या सगळा कोठें दिसत होता? पण एका गोष्टीची मात्र आम्हीं पक्की खूणगांठ बांधून ठेवली होती कीं, सध्यां व पुढेंहि झुंजाचे, कष्टाचे, त्यागाचे प्रसंग सदोदित येत राहणार आहेत.

होईल पुनरपी झुंज उद्यां मैदानीं
झळकेल अतिरथी पलाश पुष्पावाणी
ते समरधुरंधर वावरतील सलील
त्रैलोक्य-सुंदरी*तटावरुनि पाहील

---

* त्रैलोक्य-सुंदरी म्हणजे ग्रीस देशाची राणी हेलेन. तिला ट्रॉय नगराचा राजपुत्र पॅरिस यानें पळवून नेलें. पुढें तिच्या प्राप्तीसाठीं ग्रीक लोकांचें व ट्रोजन लोकांचें घनघोर रणकंदन ट्राय नगरीपाशीं चालू असतां खुद्द हेलेन ही तटावरून युद्ध पाहत असे त्याला अनुलक्षून हे काव्यचरण आहेत.

मग झळकूं आम्ही रणीं होउनी गाजी
वा सडून जाऊं कृतान्तछायेमाजीं
आंदोलत आशानिराशेमधीं अंध
लाविले पणाला प्राण अम्हीं बेबंद—
काळजी कुणाला देहाची असणार
पसरला भविष्यावरी घोर अंधार !

—मॅथ्यू आर्नोल्डच्या कवितेवरून

## ४२

# हुल्लड

१९३२ च्या आरंभीं सरकारनें काँग्रेसविरुद्ध जें कांहीं रान उठविलें तें विलक्षणच! छोटेमोठे अधिकारी स्वतःच्या गुणांची व सौजन्याची तारीफ करीत व काँग्रेस किती भांडकुदळ व नष्ट आहे तें सांगत सगळीकडे फिरत होते. 'सरकारला लोकशाही हवी, तर काँग्रेसला हुकुमशाही हवी. पाहा, काँग्रेसच्या अध्यक्षाला सर्वाधिकारी म्हणतात कीं नाहीं तें.' या उत्साहाच्या भरांत वटहुकुम, नागरिक स्वातंत्र्याची, वृत्तपत्रांची व छापखानेवाल्यांची मुस्कटदाबी, चौकशीवांचून तुरुंगवास, लोकांच्या मालमत्तेवरील जप्त्या, वगैरे प्रत्यहीं घडणाऱ्या किरकोळ गोष्टींचें मात्र त्यांना विस्मरण झालें. महिना फक्त कांहीं हजार रुपयांच्या अल्प वेतनावर लोककल्याणासाठीं आपण देह झिजवीत असतां, काँग्रेस तिकडे बखेडे माजविण्याच्या तयारींत गुंतलेली आहे, वगैरे रसभरित वर्णनें सरकारचे मंत्री बनलेले आमचेच देशबांधव करूं लागले. खालचे न्यायाधीश कडक शिक्षा तर देतच, पण वर आणखी व्याख्यानें झोडीत व काँग्रेस आणि काँग्रेसमधील व्यक्ती यांना शिव्या देत. फार काय, उच्च पदावर विराजमान झालेले सर सॅम्युअल होअर सुद्धां बोलून गेले कीं, कुत्र्यांच्या भुंकण्यानें उंटांचा काफिला थांबत नसतो. पण कुत्रे आधींच तुरुंगामध्यें डांबण्यांत आलेले आहेत व जे बाहेर राहिले होते त्यांच्या तोंडांना घट्ट मुसक्या घालण्यांत आल्या आहेत, याची आठवण त्यांना झाली नाहीं.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे कानपूर येथील हिंदु-मुसलमान दंग्याची जबाबदारी खुशाल काँग्रेसच्या माथीं मारण्यांत आली! ह्या भयंकर दंग्याचा सर्व छडा लागलेला होता, तरी देखील काँग्रेसच दंग्याला कारणीभूत आहे, असें विधान वारंवार करण्यांत येत असे. वास्तविक त्या दंग्यांत माणुसकीला शोभणारें वर्तन जर कोणीं केलें असेल तर तें काँग्रेसनें. काँग्रेसचा एक श्रेष्ठ सुपुत्र दंग्यांत कामीं आला म्हणून कानपूरमधील प्रत्येक गटाला व जातीला हळहळ वाटत होती. दंग्याची बातमी कळतां क्षणींच काँग्रेसनें एक चौकशी समिति नेमली. तिनें बारीक चौकशी करून पुष्कळ महिन्यांनंतर एक भला मोठा अहवाल प्रसिद्ध केला. अहवाल प्रसिद्ध होतांच तो आक्षेपार्ह ठरवून त्याच्या छापील प्रती सरकारनें जप्त केल्या. अशी दडपशाही करूनच्या करून, अधिकारी वर्गांतील टीकाकार व ब्रिटिशांच्या मालकीचीं वर्तमानपत्रें काँग्रेसच्या कार्यामुळेंच हा दंगा झाला असें नेहमीं म्हणत

असतात. इतर बाबतींप्रमाणें याहि बाबतींत अखेरीला सत्याचा जय होणार हें ब्रह्मवाक्यच आहे. पण पुष्कळ वेळां असें घडतें कीं, असत्याला आगाऊ किती तरी सवड मिळून जाते.

" संपवून अपुलें काम–पावेल असत्य विराम
म्हणतात सत्य तें थोर–अन् तेंच टिकेल अखेर
परि उत्सुकता त्याविषयीं–राहील कुणा त्या समयीं "

अर्थात् ही युद्धकालीन हुल्लड अगदीं स्वाभाविक होती. तशा परिस्थितींत सरकार सत्यनिष्ठा दाखवील अथवा संयमानें वागेल अशी अपेक्षा करणें चुकीचें झालें असतें. परंतु सरकारनें आमच्या अपेक्षेबाहेर उडी मारली व आश्चर्य वाटेल इतका मनमुराद हैदोस घातला! ही गोष्ट, अधिकारी वर्गाच्या मनांत समेटाच्या दिवसांत काय जळत होतें, त्याची निदर्शक आहे. आम्हीं जें कांहीं केलें त्याविषयींचा संताप ह्या प्रकरणाला कारणीभूत नसून साम्राज्यनाशाची भीति कारणीभूत झाली असावी. स्वतःच्या सामर्थ्याची खात्री असणारे अधिकारी अशा हुल्लडी करीत नाहींत. दोन पक्षांमधील भेद लक्षांत घेण्याजोगा होता. दुसऱ्या बाजूचे लोक तुरुंगांत पडल्यामुळें व सरकारी दडपशाहीची धास्ती वाटत असल्यामुळें स्तब्ध राहिले होते. त्यांच्या तोंडांत बोळा कोंबलेला नसता तर त्यांनींहि अशीच हुल्लड, अतिशयोक्ति व शिवीगाळ मांजवली असती, यांत शंका नाहीं. या मनोवृत्तींना बाहेर पडण्यास एकच मार्ग मोकळा राहिलेला होता; तो म्हणजे निरनिराळ्या शहरांतून प्रसिद्ध होणारीं अनधिकृत पत्रकें.

रान उठविण्याच्या कामीं ब्रिटिशांच्या मालकीच्या अँग्लो–इंडियन वर्तमानपत्रांनीं अगदीं मनःपूर्वक साहाय्य केलें. कित्येक दिवसपर्यंत मनाच्या अगदीं आंतल्या कप्यांत शिजत राहिलेलें गरळ त्या वेळीं ओकून पडलें. शांततेच्या काळांत जें कांहीं लिहावयाचें तें त्यांना जरा जपूनच लिहावें लागतें; कारण त्यांचे पुष्कळसे वाचक हिंदी असतात. परंतु या प्रसंगीं सगळेच धरबंध सुटून इंग्रज व हिंदी लोकांचीं मनें चव्हाट्यावर आलीं. हिंदुस्थानांत फारच थोडीं अँग्लो–इंडियन वर्तमानपत्रें अद्यापि तगून राहिलीं आहेत. त्यांपैकीं पुष्कळशीं वृत्तपत्रें बातमीच्या व एकंदर सजावटीच्या दृष्टीनें उच्च दर्जाचीं आहेत. जागतिक घडामोडींसंबंधीं त्यांत येणारे लेख जुनाट मताचे निदर्शक असले, तरी ते मोठे माहितीपूर्ण असतात. हिंदुस्थानांतील अत्युत्तम वर्तमानपत्रांत त्यांची गणना करण्यास प्रत्यवाय नाहीं. परंतु हिंदी राजकारणाचा प्रश्न निघाला कीं त्यांचा तोल एकाएकीं सुटतो व पक्षपातीपणाचें अगदीं अचरट व हिडिस स्वरूप लेखांतून प्रकट होऊं लागतें. सरकारची बाजू ते मोठ्या निष्ठेनें मांडीत असतात व सरकारच्या वतीनें त्यांचा जो मतप्रचार एकसारखा सुरू असतो, तो लोकांना न उमगेल अशा कौशल्यानें करणें त्यांना मुळींच साधत नाहीं.

या कांहीं निवडक अँग्लो–इंडियन वृत्तपत्रांशीं तोलून पाहिलें तर हिंदी वर्तमान-

पत्रें बहुशः गचाळ असलेलीं आढळतात. अगोदर त्यांचें भांडवल फार अल्प असतें; व पत्रांत सुधारणा करण्याचे मालकांकडून प्रयत्नहि होत नाहींत. तीं कसेबसे दिवस ढकलीत असतात व त्यांचा दरिद्री संपादकवर्ग सुखाला पारखा होऊन राहतो. त्यांची सजावट गबाळ, जाहिराती पुष्कळ वेळां आक्षेपार्ह व आयुष्याकडे व राजकारणाकडे पाहण्याची दृष्टि भावनावश व आक्रोशी असते. आम्ही हिंदी लोकच भावनावश आहों हें ह्याचें कारण असावें. पण असेंहि एक कारण असणें शक्य आहे कीं इंग्रजी ही परकी भाषा असल्यामुळें त्या भाषेंत आम्हांला आमचे विचार सोप्याशा शब्दांत पण जोरदारपणें व्यक्त करण्याची पंचाईत पडते. परंतु खरें कारण असें दिसतें कीं फार काळपर्यंत दडपशाहीच्या व मानहानीच्या वातावरणांत आम्ही वाढल्यामुळें विचार-प्रदर्शनाला जी जी वाट मिळेल तेथें तेथें भावनांची गर्दी होत असावी.

हिंदी मालकीच्या इंग्रजी वर्तमानपत्रांत सजावटीच्या व बातमीच्या दृष्टीनें मद्रासचें "दी हिंदु" हें वृत्तपत्र सर्वोत्कृष्ट आहे. त्याला पाहून एकाद्या शीलवान व ठाकठीक अशा वृद्ध कुमारिकेची मला आठवण होते. तिच्यादेखत जरा एकादा वाह्यात् शब्द उच्चारला कीं तिला धक्का बसतो. सुखासीन अशा मध्यम वर्गाची मनोवृत्ति या वर्तमानपत्रांत उत्कृष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. जीवनाच्या अंधाऱ्या बाजूकडे, त्यांतील धकाधकीकडे व कलहाकडे ह्या वृत्तपत्राचें लक्षच जात नाहीं. बहुतेक नेमस्त वृत्तीचीं वृत्तपत्रें अशींच वृद्ध–कुमारिका वृत्तीचीं आहेत; पण त्यांच्यांत 'हिंदू'चा ठसकेबाजपणा नसल्यामुळें तीं अगदींच कंटाळवाणी होतात.

सरकारनें चढाईची तयारी बरेच दिवस चालविली होती. सुरुवातीसरशीं घे घे मार करीत निकराचा हल्ला चढवावयाचा हें त्यांचें धोरण उघडच दिसत होतें. १९३० सालीं कॉंग्रेस पुढें जात असे व सरकार मागोमाग रखडत येई. पण १९३२ सालची सरकारची पद्धति अगदीं निराळी होती. त्यांनीं सुरुवातीलाच चौफेर चढाई सुरू केली. शिवाय १९३२ सालीं गांधीजींची व वर्किंग कमिटीपैकीं बहुतेक सभासदांची इच्छा अशी कीं, सत्याग्रहाचा प्रसंग टाळावा. लढा कितीहि नकोसा वाटला तरी तो चुकवतां येणार नाहीं; तेव्हां आपण तयारींत असावें, असें माझ्याप्रमाणें इतर कांहीं सभासदांचें मत होतें; परंतु मध्यमवर्गीयांना व पांढरपेशा लोकांना त्या वेळीं मनांतून लढा नको होता ही गोष्ट खरी. गांधीजी आले कीं, कांहीं तरी मार्ग निघेल व लढा टाळतां येईल असें त्यांना वाटत होतें. "इच्छा तसे विचार" ही म्हण त्यांच्या बाबतींत बरोबर लागू पडली असती.

त्यामुळें १९३२ सालीं लढाईचीं सूत्रें सरकारच्या हातीं राहून कॉंग्रेसला एकसारखें बचावाचें धोरण ठेवावें लागलें. वटहुकुम निघाले व त्यांच्या पाठोपाठ सत्याग्रह सुरू झाला. ह्या परिस्थितींतील आकस्मिक फरक पाहून ठिकठिकाणचे कॉंग्रेस-पुढारी तर आश्चर्यचकित होऊन गेले. परंतु अशा बेसावध परिस्थितींतहि कॉंग्रेसच्या हांकेसरशीं हजारों सत्याग्रही धांवून आले. माझी तर अशी खात्री आहे कीं

१९३२ सालीं जनतेनें केलेला प्रतिकार १९३० सालापेक्षां किती तरी अधिक होता. १९३० सालीं मोठमोठ्या शहरांतून प्रतिकाराची जाहिरात व प्रदर्शन फार झालें. परंतु १९३२ सालीं आम्हीं अधिक सोशिकपणा व शांतवृत्ति दाखविली असली तरी १९३० सालची हिरीरी त्या वेळीं लाभली नाहीं. युद्धामध्यें आम्ही खेंचले गेलों आहोंत, अशी भावना त्या काळीं सर्वत्र पसरलेली होती. १९३० सालचा महिमा नंतरच्या दोन वर्षांत बराच मंदावला होता. सर्व हिंदुस्थानभर जवळ जवळ लष्करी कायद्याचें राज्य सुरू होतें. पुढाकार घेण्यास अथवा कार्यक्रम आंखण्यास कॉंग्रेसला उसंतच मिळाली नाहीं. पहिल्या टोल्यासरशीं कॉंग्रेस व मध्यम वर्गांतील तिचे पूर्वकालीन आधारस्तंभ यांची विचारशक्ति बधिर होऊन गेली. नेमका त्यांच्या खिशावरच मार बसला व कॉंग्रेसविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांना आपलें स्वातंत्र्य व त्याचबरोबर आपली मालमत्ता गमवावी लागेल, अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. संयुक्त प्रांताप्रमाणें जेथें सगळा दरिद्र्यांचाच कारभार होता, तेथें या गोष्टीचा विशेष परिणाम झाला नाहीं. पण मुंबईसारख्या शहरांतून सर्व स्थिति पालटली. व्यापारी वर्ग व धंदेवाले लोक यांची धूळधाण उडण्याचा प्रसंग होता. नुसत्या दटावणीबरोबर सुखवस्तु लोक थंडे पडले. अर्थात् सरकारच्या या धमक्या पोकळ होत्या असें नव्हे. त्या वेळीं सर्व अधिकार पोलिसांच्या हातीं असत व अशा धमक्यांची अंमलबजावणीहि मधून मधून करण्यांत येई.

सर्वस्वी अहिंसामय अशा सत्याग्रह्यांच्या विरुद्ध सरकारनें अशी जुलुम-जबरदस्ती करावी ही गोष्ट सुसंस्कृत दृष्टीला कितीहि आक्षेपार्ह वाटली, तरी त्याबद्दल कॉंग्रेसला तक्रार करण्याचा अधिकार आहे असें मला वाटत नाहीं. क्रांतीच्या उद्देशानें आपण प्रत्यक्ष प्रतिकाराला सुरुवात केल्यानंतर आपले मार्ग कितीहि अहिंसामय असले, तरी हरतऱ्हेची दडपशाही आपणाला सहन करावी लागेल.ह्याची जाणीव आपण मनाशीं बाळगली पाहिजे. दिवाणखान्यांत बसल्या बसल्या क्रान्ति घडवून आणतां येत नसते. पण कांहीं लोक असे आढळतात कीं ज्यांना दिवाणखान्यांतील गादीहि पाहिजे आणि क्रांतिहि पाहिजे. क्रान्ति करावयास निघालेल्या माणसानें सर्वस्व गमावण्याची तयारी ठेवावयास हवी. सधन आणि सुखवस्तु लोक क्रांतीला तयार नसतात ते यामुळेंच. व्यवहारकुशल माणसांच्या दृष्टीनें मूर्खपणाचे व स्वतःच्या वर्गाला घातक ठरणारे असले मार्ग पत्करण्यास एकाद दुसरी व्यक्तीच तयार झाली तर व्हावयाची.

लढ्याचा मुख्य भर ज्या जनतेवर होता, त्यांच्यापाशीं गाड्याघोडे, मालमत्ता वगैरे कांहींच नसल्यामुळें त्यांना वठणीवर आणण्यासाठीं कांहीं तरी निराळी उपाय-योजना करणें आवश्यक झालें, सरकारच्या सर्वव्यापी दंडुकेशाहीचें एक मनोरंजक उदाहरण असें कीं, जी-सरकारवाल्या लोकांना सुद्धां एकजात वेठीला धरण्यांत आलें. भविष्य काळची कांहीं कल्पना नसल्यामुळें त्यांपैकीं कांहीं जण कॉंग्रेसशीं लाडीगोडी

करूं लागले होते. पण सरकार असल्या गोष्टींची गय करण्याच्या मनःस्थितींत राहिलें नव्हतें. क्रियाशून्य राजनिष्ठा त्यांना नको होती. बंडाच्या वेळीं प्रसिद्धीस आलेल्या फ्रेड्रिक कूपरच्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास सरकारला "१०० टक्के सक्रिय निष्ठा हवी होती. प्रजेच्या नुसत्या नैतिक पाठबळावर खूष राहण्यास सरकार तयार नव्हतें." एक वर्षांपूर्वी राष्ट्रीय सरकारला सामील झालेल्या ब्रिटिश प्रागतिक पक्षाच्या पुढाऱ्याचे व आपल्या जुन्या सहकाऱ्यांचें वर्णन करतांना लॉइड जॉर्जनें असे शब्द उच्चारले कीं, हे लोक म्हणजे "आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणें रंग बदलणाऱ्या सरड्यांचे भाईबंद आहेत." हिंदुस्थानांतील नव्या परिस्थितींत तटस्थरंगी माणसें खपण्यासारखीं नव्हतीं. म्हणून आमच्या कांहीं देशबांधवांनीं सरकारमान्य अशा झळझळीत रंगाचें पट्टे आपल्या अंगावर ओढून घेतले व आपल्या अंतःकरणांत जेत्यांबद्दल केवढें अलोट प्रेम व आदर वसत आहे तें मोठ्या समारंभानें त्यांनीं जाहीर केलें. वटहुकुम, निर्बंध, सूर्यास्ताचे कायदे आणि इतर सतराशेंछपन्न बंधनें यांच्यापासून त्यांना काडीचेंहि भय नव्हतें. कारण राजद्रोही व निष्ठाहीन लोकांच्या डोक्यांत हाणण्यासाठींच हे बडगे आहेत, राजनिष्ठ लोकांना कोणत्याहि प्रकारें भिण्याचें कारण नाहीं, अशी सरकारनें द्वाहीच फिरविली होती. तेव्हां भोंवतीं चाललेल्या घडामोडींकडे व कलहाकडे त्यांचेच कांहीं देशबांधव भयचकित अंतःकरणानें पाहत असतां या सांबांची शांति मात्र ढळली नाहीं.

"उत्सुक मीं इतकी असतां
देहदान करण्याकरितां
विनयभंग करणे माझा शक्य का कुणीं?"

असें "फेथफुल शेपर्डेस" या ग्रंथांत क्लो नांवाच्या स्त्री-पात्रानें म्हटलें आहे. हे तिचे शब्द उपरोक्त "जी-सरकारवाल्यांनाहि" लागू पडण्यासारखे आहेत, नव्हे?

सरकारच्या डोक्यांत ही कल्पना कोणीं शिरवली होती कोणास ठाऊक? पण सरकारला असा संशय येऊं लागला होता कीं, स्त्रियांना चांगलें वागवण्यांत येतें व त्यांना शिक्षाहि हलक्या होतात, तेव्हां त्यांचाच उपयोग (!) तुरुंग भरण्याच्या कामीं करण्याचा कॉंग्रेसचा बेत आहे. ही कल्पना अचाट होती. जणूं कांहीं घरच्या स्त्रियांना तुरुंगांत ढकलणें कोणाला हवेंच असतें. बहुधा मुली व स्त्रिया कायदेभंग करीत तो वडील भावांची व नवऱ्यांची इच्छा धाब्यावर बसवून करीत असत. निदान त्यांची संपूर्ण अनुमति तरी मिळत नसेच. तथापि स्त्रियांना जबर शिक्षा करून व त्यांना वाईट तऱ्हेनें वागवून सरकारनें त्यांच्या उत्साहास पायबंद घालण्याचें ठरविलें. माझ्या बहिणीला शिक्षा झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं कांहीं तरुण मुली अलाहाबादेला विचारविनिमय करण्यासाठीं एकत्र जमल्या होत्या. त्यांपैकीं बहुतेकांचीं वयें १५ ते १६ वर्षांचीं असावीं. खाजगी ठिकाणीं चर्चा चालू असतांच त्यांना पकडण्यांत आलें व प्रत्येकीला दोन दोन वर्षांची शिक्षा ठोठवण्यांत आली. हा एक क्षुल्लक

प्रसंग आहे. असले प्रकार प्रत्यहीं सगळ्या देशभर घडत होते. तुरुंगांत पुरुषांपेक्षांहि स्त्रियांना अधिक वाईट तऱ्हेनें वागवण्यांत येई. यासंबंधींच्या अनेक दुःखदायक बातम्या माझ्या कानीं आलेल्या आहेत, आणि मुंबई तुरुंगांतील सत्याग्रहींच्या स्थितीसंबंधीं मीराबेननीं ( मॅडेलाइन स्लेड ) लिहिलेली हकीकत तर फारच विलक्षण आहे.

संयुक्त प्रांतांतील चळवळ खेड्यांतून केंद्रित झालेली होती. काँग्रेसच्या दडपणामुळें बरीचशी सूट देण्यांत आली, पण ती आम्हांला पुरेशी वाटली नाहीं. आम्हांला अटक झाल्यानंतर आणखी थोडी सूट जाहीर करण्यांत आली. ही सूट आधींच मिळाली असती तर सहकार्याचा हात झिडकारणें आम्हांला जड वाटलें असतें व परिस्थितींत किती तरी पालट झाला असता. पण सुटीचें श्रेय काँग्रेसच्या पदरीं पडूं नये अशी सरकारची इच्छा असल्यामुळें एकीकडे काँग्रेसला जात्यांत घालून दुसरीकडे शेतकरी गप्प होईल इतकें सुटीचें पीठ त्यांच्या तोंडांत भरावें असा सरकारचा डाव होता. काँग्रेसचें दडपण जसजसें वाढत जाईल तसतसा सुटीचा हात सरकार अधिकाधिक सैल सोडीत जात असे ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

सुटीच्या ह्या नव्या हप्त्यामुळें मूळ प्रश्न सुटला असें नाहीं, पण असंतोषाची तीव्रता कमी होऊन तवा जरासा निवाला ही गोष्ट खरी. आमच्या मोठ्या चळवळीचें बळहि थोडेंसें क्षीण झालें. लढ्यामुळें संयुक्त प्रांतांतील हजारों शेतकऱ्यांना दुःख सहन करावें लागलें, कित्येक घरें तर धुळीला मिळालीं. पण या सरकारच्या अमदानींत जितकी जास्तीत जास्त सूट मिळणें शक्य होतें तेवढी मिळाली ती लढ्याच्या दडपणामुळेंच. भयंकर हालअपेष्टांतून शेतकरी बचला. एकंदर शेतकरी समाजाचा तात्पुरता फायदा झाला, पण त्यासाठीं त्यांच्यांतील वेंचक लोकांना स्वतःचें वाटोळें करून घ्यावें लागलें होतें.

१९३१ च्या डिसेंबरांत संयुक्त प्रांतासाठीं काढलेला खास वटहुकुम जाहीर करण्यांत आला. त्याच्या समर्थनार्थ त्याला एक पत्रकहि जोडलें होतें. या व इतर वटहुकुमांना जोडण्यांत आलेल्या अशा पुस्त्यांत असत्य व अर्धसत्य विधानांची रेलचेल असावयाची. ही रान उठवण्याची पूर्वतयारी होती. पण आम्ही तुरुंगांत असल्यावर सरकारी लिखाणांतील मुसळासारखे दोष दाखवून देणार कोण ? शेरवाणींवर असाच एक आळ घेण्यांत आला होता, तो अटकेपूर्वी जरा आधीं शेरवाणींनीं खोडून काढला. आधीं विधानें करावयाचीं व मग माफ्या मागावयाच्या यावरून सरकारच्या विकृत मनःस्थितीची कल्पना येते. जेसूट लोकांना आपल्या राज्यांतून हद्दपार करतांना स्पेनच्या तिसऱ्या चार्लसनें जो फतवा काढला होता, तो परवां वाचीत असतां मला हिंदुस्थान सरकारच्या वटहुकुमांची व सरकारनें दिलेल्या कारणमीमांसेची आठवण झाली. चार्लसनें लिहिलें आहे, "न्याय, शांतता व आज्ञापालनाची वृत्ति कायम राखण्याचें जें माझें कर्तव्य, तें बजावण्यासाठीं हा फतवा काढण्यांत आला

आहे. त्याला दुसरींहि आवश्यक कारणें आहेत, पण तीं मीं माझ्या महान् अंतः-करणांत दडवून ठेवलीं आहेत. ”

तात्पर्य असें कीं, वटहुकुम जारी करण्याचीं खरीं कारणेंसुद्धां व्हाइसरॉयच्या अथवा साम्राज्य सल्लागारांच्या हृदय-कपाटांत बंदिस्त राहिलीं होतीं. पण त्याहि परिस्थितींत तीं आमच्या. डोळ्यांना मात्र उघड उघड दिसत होतीं. वटहुकुमांत नमूद केलेल्या कारणांवरून हिंदुस्थान सरकारनें मतप्रचार करण्याचें जें नवीन तंत्र हातीं घेतलें होतें, त्याची कल्पना येण्यास आम्हांला चांगली मदत झाली. पुढें आम्हांस असें समजलें कीं, निमसरकारी पत्रकांचा सुळसुळाट खेडोपाडीं झाला असून त्यांत हव्या त्या थापा छापल्या आहेत, व काँग्रेसमुळेंच धान्याचे भाव घटले आहेत असेंही त्यांत सूचित केलेलें आहे. मनांत आणलें तर काँग्रेस जगभर मंदी पसरवूं शकते असें म्हणणें म्हणजे काँग्रेसच्या सामर्थ्याची केवढी प्रशंसा ! काँग्रेसची प्रतिष्ठा नष्ट व्हावी म्हणून असा मतप्रचार एकसारखा दक्षतेनें करण्यांत येत होता.

सरकारी व निमसरकारी उद्योग अशा प्रकारें सुरू असूनसुद्धां संयुक्त प्रांतांतील मुख्य मुख्य जिल्ह्यांतून कायदेभंगाला जोरदार पाठिंबा मिळाला. १९३० साला-पेक्षां ह्या वर्षींचा पाठिंबा किती तरी अधिक व शिस्तवार होता. सुरुवातीला तर शेतकऱ्यांनीं खेळाडू वृत्तीहि दाखविली. रायबरेली जिल्ह्यांत बाकुलिया गांवीं पोलिस तुकडी गेली असतां घडलेली एक मजेदार हकीकत आम्हांला समजली. खंडबंदी केल्याबद्दल मालमत्ता जप्त करण्यासाठीं त्या गांवीं पोलिस गेले होते. खेड्याची स्थिति जरा बऱ्यापैकीं होती व रहिवाशीहि चांगले तेजस्वी होते. वसुलीखात्याच्या अधिकाऱ्यांचा व पोलिसांचा यथासांग आदरसत्कार त्यांनीं केला आणि तदनंतर सर्व घरांचीं कवाडें सताड उघडून “ हवें तें घेऊन जा ” अशी त्यांनीं विनंति केली. कांहीं गुरेंढोरें जप्त करण्यांत आलीं. उपरांत पोलिसांना व अधिकाऱ्यांना शेत-कऱ्यांनीं पानसुपारी देऊन निरोप दिला, तेव्हां मात्र अधिकाऱ्यांचीं तोंडें लाजेनें काळ-वंडून गेलीं ! पण असा प्रकार दुर्मिळ होता. लवकरच लढ्यांतील खेळाडू वृत्ति, उदारपणा, सहृदयता सर्व कांहीं नाहींसें झालें. सौजन्य दाखविलें म्हणून बाकुलियाच्या शेतकऱ्यांच्या कपाळाच्या शिक्षा कांहीं चुकल्या नाहींत.

या विशिष्ट जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं कित्येक महिन्यांपर्यंत खंड पाडून ठेवला होता. तो उन्हाळ्याच्या सुरुवातीला थोडा फार जमा होऊं लागला. बरीच धरपकडहि झाली. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर, खेड्यांतील पुढाऱ्यांवरच सरकारची विशेष करडी नजर असे. बाकीच्यांना नुसतें झोडपून काढण्यांत येई. तुरुंग व गोळीबार यांपेक्षां लाठीमार चांगला फलदायी होतो असें अनुभवास आलें होतें. हवी तेव्हां लाठी चालवितां येई व लांबलांबच्या खेड्यांतून मारहाण केली तर त्याचा गवगवा फारसा होत नसे. शिवाय तुरुंगांची भरती त्यामुळें थांबली. जप्त्या वगैरेचें होमकुंड अर्थात् सुरू होतेंच. आपलें किडुकमिडुक जप्त होऊन लिलावांत

मातीमोलानें चाललेलें पाहिलें कीं शेतकऱ्यांच्या हृदयाला इंगळ्या डसल्याप्रमाणें वेदना होत.

देशांतल्या इतर इमारतींप्रमाणें स्वराज्यभवनहि सरकारनें ताब्यांत घेतलें. त्यांत असलेलीं काँग्रेस-रुग्णालयाचीं उपकरणेंसुद्धां वगळलीं नाहींत. त्यामुळें रुग्णालय कांहीं काळ अजिबात बंद ठेवावें लागलें. पण पुढें शेजारच्या बागेमध्यें उघड्या मैदानांत एक औषधालय सुरू करण्यांत येऊन नंतर तें स्वराज्य भवनाजवळच एका घरांत दोन-अडीच वर्षें चाललें होतें.

प्राप्तीवरील कर मीं भरला नाहीं म्हणून आमचें राहतें घर आनंदभवन, सरकार जप्त करणार अशीहि वदंता होती. दिल्ली समेटानंतर करवसुलीच्या अधिकाऱ्याबरोबर बोलणें होऊन मीं आकारलेल्या रकमेपैकीं एक हप्ता भरलादेखील. पण इतक्यांत वटहुकुमांचें राज्य सुरू झालें. आतां कर द्यावयाचा नाहीं असा मीं निश्चय केला. खंड व सारा देऊं नका असें शेतकऱ्यांना सांगून स्वतः मात्र कर भरावयाचा हा कारभार लबाडीचा किंबहुना नीतिबाह्य आहे असें माझें मन मला सांगे. सरकार आमच्या घराचा कबजा घेईल अशी माझी अपेक्षा होती. माझ्या आईला घराबाहेर पडावें लागणार; जीं पुस्तकें, जे कागदपत्र, जे जिन्नसपान्नस आमच्या भावनांशीं निगडित झाल्यामुळें आम्हांला प्रिय वाटूं लागले होते त्या सर्वांना परक्यांचे हात लागतील व ते कदाचित् गहाळहि होतील; आणि आमच्या घरावर फडफडणारें राष्ट्रीय निशाण खालीं ओढण्यांत येऊन तेथें युनियन जॅक चढवण्यांत येईल; हे विचार मनांत आले कीं जप्तीची कल्पना असह्य वाटत असे. पण त्याच वेळीं घर जाणार ही कल्पना आकर्षकहि वाटे. मग भणंग बनलेल्या शेतकऱ्यांशीं मी अधिक एकरूप होईन व त्यामुळें शेतकऱ्यांना अधिक हुरूप चढेल असें मला वाटलें. चळवळीच्या दृष्टीनें घर जप्त व्हावें ही गोष्ट निःसंशय फायद्याची होती. आईच्याबद्दल मनांत विचार आला म्हणा किंवा उगीच आगींत तेल कशाला ओता अशी सुबुद्धि सुचल्यामुळें म्हणा, सरकारनें आमच्या घराला हात लावला नाहीं. नंतर बऱ्याच महिन्यांनीं माझे कांहीं रेल्वेशेअर तेवढे जप्त करण्यांत आले. माझी एक व माझ्या मेहुण्याची एक अशा दोन मोटरी पूर्वीं लिलावानें विकण्यांत आल्याच होत्या.

चळवळीच्या आरंभीं घडलेल्या एका प्रसंगाचें मला विशेष दुःख झालें. अनेक सार्वजनिक संस्थांनीं व नगरपालिकांनीं आपल्या इमारतीवरील राष्ट्रीय निशाण उतरवून ठेविलें. बहुसंख्य सभासद काँग्रेसचे असलेल्या कलकत्ता नगरपालिकेनें सुद्धां तसेंच वर्तन करावें ही मनाला विशेष लागणारी गोष्ट होती. पोलिसांच्या व सरकारच्या धमकावणीमुळें ही गोष्ट करण्यांत आली. राष्ट्रीय निशाण खालीं उतरलें नसतें तर सरकारनें नगरपालिका बंद केली असती अथवा सभासदांना शिक्षा दिल्या असत्या. संस्थांचीं संस्थानें बनलीं कीं त्यांच्या अंगीं असा भ्याडपणा येतोच. त्या गोष्टी स्वाभाविकहि असतील; पण त्यामुळें अंतःकरणाला वेदना झाल्याशिवाय

कशा राहणार? राष्ट्रीय निशाण म्हणजे आमच्या प्रिय वस्तूंचें एक प्रतीक. त्याच्या-भोंवतीं उभें राहून त्याचा मान राखण्याच्या प्रतिज्ञा आम्हीं अनेकदां केल्या होत्या. तेंच निशाण स्वतःच्या हातानें खालीं ओढणें अथवा दुसऱ्याकरवीं खालीं काढवणें हा केवळ प्रतिज्ञाभंगच नव्हे, हें अधर्माचरण आहे असा विचार माझ्या मनांत आला. वाटलें कीं ही पौरुषाची लाचारी आणि सत्यवृत्तीची अवहेलना आहे. बलिष्ठ भौतिक सामर्थ्याच्या दरडावणीमुळें असत्याचा अंगीकार करणारें हें कर्म आहे. अशा प्रकारें जे वागले, त्यांनीं राष्ट्राची हिंमत खचवली, आणि अभिमानाच्या मंदिराचा कळस मोडला.

त्यांनीं वीराप्रमाणें वागावें, चितेवर उडी घ्यावी अशी मुळींच अपेक्षा नव्हती. आघाडीला उभे राहून तुरुंगवास पत्करला नाहीं म्हणून कोणालाहि दोष देणें हास्यास्पद आहे. प्रत्येकाला अनेक कर्तव्यें व जबाबदाऱ्या संभाळावयाच्या होत्या. दुसऱ्यांना जाब विचारण्याचा कोणाला काय अधिकार? पण स्वस्थ बसणें अगर पिछाडीला राहून काम करीत राहणें ही गोष्ट निराळी आणि आपणाला सत्य म्हणून जी गोष्ट पटली तिचा इन्कार करणें ही गोष्ट निराळी. हा फार गंभीर अपराध आहे. राष्ट्राच्या अभिमानाला ज्यामुळें कालिमा लागेल असें कृत्य करण्याची आज्ञा झाल्याबरोबर आपल्या जागांचे राजिनामे देण्याचा मार्ग नगरपालिकांच्या सभासदांपुढें मोकळा होता. पण तसें कांहींच न करतां बहुतेक लोक आपापल्या जागांना चिकटून राहिले.

"सुमनीं शिरतांच मक्षिका। अपुल्या थांबवितात गुंजना
अधिकारपदीं विराजतां। करती नच 'नेमस्त' गर्जना."

संकटाच्या एकाएकीं भडकलेल्या वणव्यांत आपण गुरफटून जाणार अशी भीति उत्पन्न झाली असतां कोणीं कसें वर्तन करावें त्याचा निवाडा करणें कदाचित् अन्यायाचें ठरेल. महायुद्धाच्या काळीं ही गोष्ट वारंवार सिद्ध झालेली आहे कीं, कधींकधीं मी मी म्हणणाऱ्या महारथ्यांची सुद्धां बोबडी वळते. १९१२ सालीं टिटानिक आगबोट बुडाली तेव्हां थोर थोर लोक कीं, ज्यांच्या अंगीं भ्याडपणा आहे म्हणणें पातक ठरलें असतें त्यांनीं खलाशांचे खिसे भरून आपली सुटका करून घेतली व इतरांना खुशाल बुडूं दिलें. मोरो कासल बोटीला कांहीं दिवसांपूर्वी आग लागली तेव्हांहि असाच लांछनास्पद प्रकार घडल्याचें उघडकीस आलें आहे. संकटाच्या वेळीं जेव्हां असंस्कृत मनोवृत्ति प्रबळ होतात व बुद्धि आणि तर्क यांची बोळवण होते, तेव्हां आपल्या हातून काय घडेल याची ग्वाही देतां येणार नाहीं. म्हणून कोणाला निंदूं नये हें बरें. पण योग्य मार्गापासून कोण च्युत झाला याची नोंद ठेवणें व राष्ट्रनौकेचें सुकाणूं वादळ उठलें असतां लटपटणाऱ्या व गारठणाऱ्या हातांत जाऊं नये म्हणून इतःपर सावधगिरी बाळगणें अवश्य आहे. आमच्या तत्त्वभ्रष्टतेचें समर्थन करून, केलें तेंच बरोबर होतें, असा आग्रह धरणें गर्हणीय होय. तत्त्वभ्रष्टतेपेक्षां तत्त्वभ्रष्टतेचें समर्थन हा बलवत्तर अपराध आहे.

लढा हा नैतिक बल व हिंमत यांच्यावर अवलंबून असतो. रक्तपाताच्या युद्धांतहि ह्या दोन गोष्टींवरच मदार असते. "अखेरीला ज्याची हिम्मत त्याची सरशी" असें मार्शल फॉक म्हणत असे. अहिंसामय युद्धांत तर नैतिक बल व हिंमत यांची आवश्यकता फारच अधिक आहे. जो कोणी आपल्या वर्तनानें राष्ट्राचें नैतिक बल कमी करील व राष्ट्राची हिंमत ढांसळून टाकील, त्याला ध्येयघातकीच समजलें पाहिजे.

बऱ्यावाईट बातम्यांचा करभार आम्हांला अर्पण करून एक एक महिना चालला होता; हळूहळू तुरुंगांतुरुंगांतील एकमार्गी व निरानंद जीवन आमच्या अंगवळणीं पडत चाललें. देशभर राष्ट्रीय सप्ताह ६ एप्रिलपासून सुरू झाला. या सात दिवसांत अनेक प्रसंग घडतील हें आम्ही समजून होतों आणि अनेक प्रसंग घडून आलेहि. पण माझें सारें चित्त एका प्रसंगानें वेधून घेतलें. अलाहाबादला माझी आई ज्या मिरवणुकींत दाखल झाली होती ती पोलिसांनीं अडवली व नंतर मिरवणुकीवर लाठीहल्ला चढविला. मिरवणूक थांबल्यावर कोणी तरी खुर्ची आणून दिली, त्या खुर्चीवर आई बसून राहिली होती. जवळ माझे चिटणीस वगैरे मंडळी उभी होती; त्यांना कैद करून नेण्यांत आलें. तदनंतर लाठीहल्ला झाला. आई खुर्चीवरून खालीं पडली व तिच्या डोक्यावर छडीचे तडाख्यावर तडाखे बसले. त्यामुळें डोक्यांत मोठी खोक पडून रक्त वाहूं लागलें. रस्त्याच्या कडेला मूर्च्छित होऊन ती पडली होती. खुद्द मिरवणुकींतील लोकांना व इतर बघ्यांना अगोदरच पिटाळून लावण्यांत आलें होतें. नंतर कांहीं वेळानें एका पोलिस अधिकाऱ्यानें तिला आपल्या मोटरींतून आनंदभवनांत पोंचतें केलें.

त्या रात्रीं अलाहाबादेंत आईच्या मृत्यूची आवई उठली. लोकसमुदाय खवळून गेला. शांति व अहिंसेचें भान लोकांना राहिलें नाहीं. त्यांनीं पोलिसांवर झडप घातली व पोलिसांच्या गोळीबारांत कांहीं लोक मृत्युमुखीं पडले.

कांहीं दिवसांनंतर मला ही बातमी आमच्या साप्ताहिकांत वाचावयास मिळाली. माझी अशक्त व वृद्ध माता धुळीनें भरलेल्या रस्त्याच्या कडेला पडलेली आहे हें चित्र माझ्या डोक्यांत थैमान घालूं लागलें. मी तेथें असतों तर माझ्या हातून काय प्रकार घडला असता तें सांगवत नाहीं. माझी अहिंसा वृत्ति कोठवर टिकली असती? मला वाटतें ती फार वेळ टिकती ना. एक तपभर प्रयत्नपूर्वक शिकलेला धडा तें दृश्य पाहिल्याबरोबर मी साफ विसरून गेलों असतों. माझ्या कृत्यामुळें माझ्यावर अथवा राष्ट्रावर काय आपत्ति येतील याची मी त्या क्षणाला पर्वा केली असती, असें म्हणवत नाहीं.

आईची प्रकृति अगदीं हलके हलके सुधारली. बरेली तुरुंगामध्यें ती पुढच्या महिन्यांत माझ्या भेटीला आली तेव्हां सुद्धां तिची जखम बांधलेलीच होती. आपल्या स्वयंसेवक तरुण-तरुणींच्या बरोबरीनें आपण घाव सहन केले या अभिमानानें

व आनंदानें तिचें मन भरून गेलें होतें. पण तिच्या प्रकृतींत सुधारणा झाली ती दिखाऊ ठरली. इतक्या वृद्धापकाळीं तिच्या शरीराला त्या दिवशीं जो धक्का बसला, त्यामुळें तिचें सर्व शरीरयंत्र खिळखिळें झालें असावें; कारण इतके दिवस आंतल्या आंत धुमसणारे रोग पुढें प्रगट होऊन एका वर्षानंतर त्यांनीं अतिशय उग्र स्वरूप धारण केलें.

## ४३

# बरेली व डेहराडून येथील तुरुंगवास

सहा आठवड्यांनंतर नैनीच्या तुरुंगांतून माझी बदली बरेलीच्या जिल्हा-तुरुंगांत करण्यांत आली. माझी प्रकृति यथातथाच होती. रोजच्या रोज बारीक ताप येऊं लागल्यामुळें मी बेचैन झालों होतों. बरेलीला चार महिने काढल्यानंतर उन्हाळ्याच्या ऐन भरांत मला हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या थंड हवेच्या डेहराडून तुरुंगांत नेण्यांत आलें आणि नंतरचे साडेचौदा महिने मीं तेथेंच काढले. भेटीच्या व पत्रांच्या द्वारां त्याचप्रमाणें सरकारमार्फत मिळणाऱ्या वर्तमानपत्रांच्या द्वारां मला बातम्या समजत असत. पण बाहेरच्या जगाशीं माझा कांहींच संबंध उरला नसल्यामुळें मुख्य मुख्य प्रसंगांची केवळ अस्पष्ट अशी कल्पना आतां माझ्या डोक्यांत राहिलेली आहे.

माझी सुटका झाल्यानंतर माझ्या वैयक्तिक कामामध्यें व त्या काळच्या राजकीय परिस्थितीमध्यें मी पुन: गढून गेलों. पांच महिन्यांहून अधिक काळ मी मोकळा होतों. नंतर पुन: मला तुरुंगांत आणण्यांत आलें आणि अद्यापि मीं तुरुंगांतच आहें. म्हणजे गेल्या तीन वर्षांतला बहुतेक काळ मीं तुरुंगांतच काढला असून बाहेरच्या जगांत घडलेल्या प्रसंगांचें तपशीलवार ज्ञान करून घेण्यास मला फुरसत मिळालेली नाहीं. गांधीजी ज्या मंडलाकार परिषदेला गेले, तेथें पडद्याआड सूत्रें कशीं हालत होतीं ह्या-संबंधींच्या माझ्या कल्पना अगदीं सांगोवांगीच्या आहेत. कारण ह्या बाबतींत गांधीजींशीं बोलण्याचा प्रसंगच मला आला नाहीं. त्यानंतर घडलेल्या प्रसंगासंबंधीं सुद्धां त्यांच्याशीं अथवा इतर कोणाशीं चर्चा करण्याची संधि मला मिळालेली नाहीं.

तथापि राष्ट्रीय लढयाच्या रंगभूमीवरील पात्रें व लढयाची पार्श्वभूमि माझ्या पूर्ण परिचयाची असल्याकारणानें मला बारीकसारीक गोष्टींचा बरोबर कयास बांधतां येत होता. त्यामुळें चळवळीविषयीं मीं बांधलेली कल्पना बऱ्याच अंशीं बिनचूक ठरली. पहिले चार एक महिने कायदेभंगाचें स्वरूप जोरदार व चढाईचें राहून नंतर ओहटी सुरू झाली. मधून मधून एकादी लाट उठेल तेवढीच. प्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळींतील क्रांतिकारक मनोवृत्तीचा पीळ फार थोडा वेळपर्यंत टिकणेंच शक्य असतें. तो एकाच स्थितींत फार वेळ राहूं शकत नाहीं. तिला भरती तरी चढेल अथवा ओहटी तरी लागेल. प्रारंभींच्या जोरानंतर कायदेभंग ओसरत चालला. तथापि अल्प प्रमाणांत कायदेभंगाची चळवळ बराच काळपर्यंत

चालवतां येते. बेकायदा ठरविण्यांत आल्यानंतर सुद्धां कॉंग्रेसचें कार्य बऱ्याच यशस्वी रीतीनें चालू राहिलें होतें.

प्रांतिक संघटनांचें कामहि सुरळीत चालू होतें. सुटकेनंतर चौकशी करतां मला असें समजून आलें कीं, संयुक्त प्रांतांतील कॉंग्रेसच्या कचेरीचें काम १९३२ सालीं व १९३३ च्या पहिल्या सहामाहींत, म्हणजे गांधीजींच्या सल्ल्यानें कायदेभंग प्रथम तहकूब करण्यांत आला तोंपर्यंत, व्यवस्थितपणें होत होतें. जिल्ह्याजिल्ह्यास हुकुम पाठवणें, छापील अथवा सायक्लोस्टाइलवरील बातमीपत्रें प्रसिद्ध करणें, जिल्ह्यांतील कामांची तपासणी करणें व राष्ट्रीय कार्यकर्त्यांना पगार वांटणें वगैरे कामें वेळच्या वेळीं होत असत. अर्थात् यांपैकीं बरेंचसें काम गुप्तपणें चाले. अटक होईपर्यंत प्रांतिक समितीचा चिटणीस मात्र उघडपणें काम करीत राही.

सर्व देशभर गुप्त बातमीदार संस्थांचें जाळें पसरवणें सहज साध्य आहे याचा अनुभव १९३०–३२ सालीं आम्हांला आला होता परंतु अशा गुप्त मार्गानें काम करणें सत्याग्रहाच्या तत्त्वाला धरून नाहीं व त्याचा लोकमतावर अनिष्ट परिणाम होतो असें आमच्यापैकीं कांहीं जणांचें मत होतें. १९३३ च्या जुलैमध्यें गांधीजींनीं हरएक प्रकारचें गुप्त कार्य निषिद्ध आहे असें ठरविलें.

गुजराथ व कर्नाटकमध्येंहि शेतकऱ्यांनीं कांहीं काळ करबंदीची चळवळ चालविली होती व तिच्या पायीं तेथील शेतकऱ्यांना अतोनात नुकसान सोसावें लागलें. त्यांना साहाय्य करण्याचे प्रयत्न कॉंग्रेसकडून करण्यांत आले पण ते साहजिकच अपुरे पडले. संयुक्त प्रांतांत प्रांतिक कॉंग्रेसनें असे प्रयत्न केले नाहींत. कारण तेथील प्रश्नांचें स्वरूप फारच जगड्व्याळ होतें. चळवळीमुळें निराश्रित झालेल्या हजारों कुटुंबांना साहाय्य करणें आमच्या शक्तीबाहेरचें काम होतें. शिवाय मदत करतांना चळवळींत पडलेले लोक व नेहमींच अर्धपोटीं राहणारे लोक यांच्यांत पंक्तिप्रपंच तरी कसा करावयाचा? त्यांच्यांत डावा-उजवा असा फरक केला असता तर तो वैमनस्याला कारण झाला असता. तेव्हां आर्थिक साहाय्य कोणालाहि करावयाचें नाहीं असें आम्हीं ठरविलें व ही गोष्ट सुरुवातीलाच आम्हीं जाहीर करून टाकली. आमचें म्हणणें शेतकऱ्यांना पटलें. तक्रार न करतां त्यांनीं इतके हाल सहन केले ही खरोखरच नवलाची गोष्ट होय. तुरुंगांत गेलेल्या कार्यकर्त्यांच्या बायकापोरांना आम्ही शक्य तों मदत करीत होतों. आपल्या देशांतील दारिद्र्य इतक्या कळसाला पोंचलेलें आहे कीं महिन्याकाठीं एक रुपयाची मदत केली तरी लोक दुवा देत असत.

कार्यकर्त्यांचें वेतन, प्रवास खर्च, छपाईचा खर्च वगैरे खर्चाच्या बाबी सं. प्रां. कॉं. समितीला पार पाडाव्या लागत. १९३२ च्या जानेवारीपासून १९३३ च्या ऑगस्ट पर्यंतच्या वीस महिन्यांत सरकारसारख्या बलाढ्य शत्रूशीं निकराची झुंज चालू असतां सं. प्रां. कॉं. समितीचा एकंदर खर्च फक्त ६३००० रुपये म्हणजे

दर महिना ३१४० रुपये याप्रमाणें झाला. सत्याग्रहाच्या चळवळींत सं. प्रांतानें जी कामगिरी बजावली त्या मानानें ही रक्कम अगदींच किरकोळ वाटते. प्रांतिक सरकारनें कायदेभंग दडपून टाकण्यासाठीं खर्च केलेल्या रकमेची या आंकड्यांशीं तुलना करून पाहण्यासारखी आहे. काँग्रेसच्या दृष्टीनें बिहार प्रांत सं. प्रांतापेक्षांहि दरिद्री आहे; परंतु त्या प्रांतानेंहि सत्याग्रहाच्या चळवळींत मोठी शर्थीची कामगिरी बजावल्याचें दिसून येईल.

पुढें पुढें सत्याग्रहाचें सामुदायिक स्वरूप नष्ट होत चाललें. सरकारची दडपशाही सुरू होतीच. परंतु १९३२ च्या सप्टेंबरांत हरिजन कार्यासाठीं गांधीजींनीं जो पहिला उपवास सुरू केला त्याचाहि जबरदस्त विघातक परिणाम चळवळीवर झाल्याखेरीज राहिला नाहीं. गांधीजींच्या उपवासामुळें जनता जागृत झाली, परंतु तिचा उपयोग निराळयाच कामीं होऊं लागला. १९३३ च्या मेमधील तहकुबीमुळें कायदेभंगाला व्यवहारतः पूर्णविराम मिळाला. नंतर तो चालू राहिला होता, पण नांवाला. आतां हें खरेंच कीं कायदेभंग तहकूब केला नसता तरी देखील तो हळूहळू बंद झाला असता. सरकारच्या हिंसाचारामुळें व कठोर दडपशाहीमुळें जनता भांबावून गेली होती व तिच्यांतील उत्साह मालवला होता. नव्या चैतन्याची ज्योत जनतेच्या अन्तःकरणांत फुलवण्याचें कार्य कोणीहि केलें नाहीं. वैय्यक्तिक सत्याग्रह करण्यास तयार अशीं कांहीं माणसें असलीं तरी त्यांचा कायदेभंग कांहींसा कृत्रिम भासे.

एका मोठ्या चळवळीचा विनाश होत असलेला पाहून आम्हांला समाधान कसें वाटेल? परंतु या चळवळीमुळें अभूतपूर्व यश आमच्या पदरीं पडेल अशी आमच्यापैकीं फारच थोड्या लोकांची अपेक्षा होती. जनतेची दुर्दम्य अशी उठावणी झाली असती तर यशाचा हडपा गपदिशीं कदाचित् मिळालाहि असता; परंतु ह्या कल्पनेवर विसंबून राहणें वेडेपणाचें झालें असतें. यशापयशाचे धक्केचपेटे खात असतां व डाव कुजत पडला म्हणजे प्राप्त होणाऱ्या निराशेचे चटके अनुभवीत असतांच जनतेला एकजुटीचें व राजकीय विचारसरणीचें शिक्षण प्राप्त होईल व लढ्याचा दीर्घकाळपर्यंत विकास होत जाईल अशी आमची कल्पना होती. १९३२ च्या प्रारंभीं अचानकपणें यश प्राप्त होईल कीं काय अशी एक प्रकारची भीतिच मला वाटूं लागली होती; कारण असलें यश आलें म्हणजे सरकारबरोबर तडजोड होऊन मग संधिसाधु लोक व जी-सरकारवाले यांची अब्रू जशीच्या तशी साफ राहणार हें ठरलेलेंच. याचा अनुभव आम्हांला १९३१ सालीं मिळाला होता. लोकांची हिम्मत कायम आहे व दृष्टि साफ आहे तोंपर्यंत यश मिळालें तरच त्याची किंमत. नाहीं तर जनता लढून फुकट मरून जाते आणि यशाचा प्रसंग आला म्हणजे दुसरेच भायतोबा हजर राहून लूट मिळवतात. तसा प्रकार त्या वेळीं घडला असता. कारण कोणत्या प्रकारचें शासनयंत्र अथवा समाजरचना आपणाला ध्येयभूत आहे त्याबद्दल

काँग्रेसमध्यें रेखीव व स्पष्ट विचारसरणीचा बराच अभाव दिसून येत होता. कांहीं काँग्रेस-कार्यकर्त्यांना तर असें वाटत होतें कीं सध्यांची समाजरचना अथवा शासनसंस्था यांत फारसा फरक करण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश अथवा विदेशी लोक कामावरून दूर करून त्यांच्या जागीं देशीछाप लोक बसवले कीं काम फत्ते.

जे कोणी अधिकारपदावर चढतील त्यांच्यावर चौऱ्या ढाळावयाच्या हेंच ज्यांचें महान् तत्त्व, त्या जातिवंत "जी-सरकार" वाल्यांना महत्त्व देण्याचें विशेष कारण नव्हतें. परंतु प्रागतिक व प्रतिसहकारवादीसुद्धां ब्रिटिश सरकारची विचारसरणी पूर्णपणें मान्य करीत असल्यामुळें त्यांच्याकडून सठीपण्मासीं होणाऱ्या टीकेचा सरकारवर रतिमात्र परिणाम होत नसे. कांहीं झालें तरी सनदशीरपणानें वागण्याची मनोवृत्ति त्यांच्या हाडींमासीं खिळलेली असून कायदेभंगाचें त्यांना वावडें आहे, ही गोष्ट तर स्पष्टच दिसत होती. पण त्यांची मजल याहूनहि पुढें गेली आणि थोड्या-बहुत प्रमाणांत ते सरकारच्या गोटांत सामील झाले. सर्व तऱ्हेच्या नागरिक-स्वातंत्र्याची मुस्कटदाबी चालू असतां हे लोक तटस्थ किंबहुना भेदरलेल्या प्रेक्षका-प्रमाणें मुकाटपणें पाहत राहिले होते. त्या वेळीं सरकारची दडपशाही केवळ कायदे-भंगापुरतीच मर्यादित राहिलेली नसून राजकीय व सार्वजनिक जीवनाची सर्वतोपरी गळचेपी चालली होती. परंतु या कृत्यांचा निषेध करणारा एकहि आवाज कोठें निघेल तर शपथ. जे अशा नागरिक-स्वातंत्र्यासाठीं झगडावयाचे ते प्रत्यक्ष लढ्यां-तच गुंतले होते. सरकारच्या अरेरावीला मान तुकावण्याचें त्यांनीं नाकारलें म्हणून त्यांना तुरुंगवासहि पत्करावा लागला आणि बाकीच्या लोकांनीं पूर्ण शरणागतीचा मार्ग स्वीकारला. टीका करण्याचें धैर्य त्यांना होईना. जेव्हां कधीं सौम्यशी टीका करण्यांत येई तेव्हां त्यांत अजीजीचा ध्वनिच अधिक असे व सरकारवर टीका करीत असतां इकडे काँग्रेसचा व लढा चालवणाऱ्या लोकांचा तीव्र निषेध करण्याची संधीहि ते वायां दवडीत नसत.

नागरिक स्वातंत्र्याचें जतन व्हावें म्हणून पाश्चात्य देशांत प्रभावी लोकमत तयार झालेलें आहे. नागरिक स्वातंत्र्यावर जरा कोठें पायबंद घालण्यांत आला तरी लोक चिडून विरोध करूं लागतात. (सध्या अशा प्रकारची जागृति तिकडेसुद्धां विरळा झाली आहे.) स्वतः प्रत्यक्ष प्रतिकाराच्या अथवा चढाईच्या कार्यक्रमांत भाग घेणार नाहींत, पण जे भाषण व लेखनस्वातंत्र्य, संघ व सघटनास्वातंत्र्य, व्यक्ति-स्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य यांसंबंधीं दक्ष राहतील असे कित्येक लोक त्या देशांत आढळून येतात. मतप्रचाराचें कार्य अखंड चालू ठेवून नागरिक स्वातंत्र्यावर सरकार-कडून होणारे हल्ले थोपवून धरण्याचें कार्य त्यांच्याकडून होत असतें. हिंदी प्रागतिक व ब्रिटिश प्रागतिक यांच्यामध्यें नांवावांचून दुसरें कसलेंच साम्य नाहीं. तथापि ब्रिटिश प्रागतिकांचीच परंपरा आपण चालवीत असतों अशी बढाई आमचे प्रागतिक बंधू मारीत असल्यामुळें या स्वातंत्र्यापहरणाला ते थोडा तरी बौद्धिक प्रतिकार

करतील अशी अपेक्षा होती; कारण सरकारच्या अरेरावीमुळें त्यांची देखील मुस्कट-दाबी झालीच होती. परंतु त्यांनीं कांहींच चमक दाखवली नाहीं. "तुमचें म्हणणें मला मुळींसुद्धां मान्य नाहीं पण तुमची बाजू पुढें मांडण्याचा तुम्हाला हक्क आहे व तो हक्क सुरक्षित रहावा म्हणून जिवंत जीव असेपर्यंत झगडल्यावांचून मी राहणार नाहीं" हे व्हॉल्टेरचे शब्द उच्चारणें आमच्या प्रागतिक बंधूंना शक्य झालें असतें का?

त्यांच्या ह्या वर्तनाबद्दल त्यांना दोष देणें कदाचित् योग्य होणार नाहीं. कारण लोकशाही व स्वातंत्र्य यांचे कैवारी म्हणून ते कधींहि पुढें सरसावलेले नाहींत. आणि परिस्थिति तर अशी प्राप्त झाली होती कीं चुकून माकून भलता सलता शब्द तोंडांतून निघण्याचा अवकाश, लागलीच संकट गुदरायचें. स्वातंत्र्याचे एके काळचे भोक्ते जे ब्रिटिश प्रागतिक व ब्रिटिश मजूर पक्षांतील नवे समाजवादी सभासद त्यांनीं हिंदुस्थानांतील दडपशाहीसंबंधींचीं मतें अजमावून पाहणें मात्र अधिक योग्य ठरेल. हिंदुस्थानांतील प्रसंग दुःखद खरे, पण डोकें अगदीं शांत ठेवून त्यांचें निरीक्षण करण्याची कला ह्या तत्त्ववेत्त्यांना साधली आहे. "शास्त्रशुद्ध दडपशाहीचा" (मँचेस्टर गार्डीयनच्या बातमीदाराचे शब्द) होत असलेला विजय पाहून त्यांना आनंद झालेला स्पष्ट दिसत होता. इंग्लंडच्या राष्ट्रीय सरकारनें नुकताच राज-द्रोहाचा एक कायदा पास केला आहे. त्यावर टीका करतांना प्रागतिक व मजूर-पक्षीय सभासदांनीं अनेक कारणें सांगितलीं. त्यांत ह्या कायद्यामुळें भाषणस्वातंत्र्यावर गदा येते व न्यायाधीशांना झडती वारंट काढण्याचा अधिकार प्राप्त होतो हीं कारणें सांगण्यांत आलीं. हीं टीका वाचल्याबरोबर माझ्या डोळ्यांपुढें हिंदुस्थानचें चित्र उभें राहिलें. इंग्लंडांतील राजद्रोहाच्या कायद्याहून शंभर पटींनीं कडक असे कायदे हिंदुस्थानांत आज अस्तित्वांत आहेत; पण इंग्लंडमध्यें स्वतःच्या डोळ्यांत कुसळ गेलें तरी सहन न करणारा ब्रिटिश माणूस हिंदुस्थानच्या डोळ्यांत मुसळ सारलें तरी कसा स्वस्थ चित्तानें पाहत राहतो याचें मला आश्चर्य वाटलें. आपल्या ऐहिक फायद्याला उपयुक्त अशीं नैतिक मूल्यें शोधून काढण्याची व आपलें साम्राज्य ज्यामुळें वाढीस लागलें त्या सर्व गोष्टी नीतीला धरूनच आहेत असें मानण्याची जी विलक्षण फायदेशीर लकब ब्रिटिश मनाला लागलेली आहे, ती पाहून मला नेहमींच आश्चर्य वाटतें. मुसोलिनी व हिटलर हे लोकशाहीच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वांचा खून पाडतात म्हणून त्यांच्यावर निःशंकपणें व सात्त्विक संतापातिरेकानें टीकास्त्र सोडतांना ब्रिटिश गृहस्थ मागेंपुढें पाहावयाचे नाहींत; पण त्याचबरोबर हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याची गळचेपी करणें अत्यंत आवश्यक आहे असें म्हणतांना व आम्हीं खऱ्या निःस्वार्थ बुद्धीनें व उच्च नैतिक विचारांनीं प्रेरित होऊनच हें कठोर कर्म आचरीत आहोंत असें बोलून दाखवतांनाहि त्यांची जीभ कचरावयाची नाहीं.

हिंदुस्थानभर वणवा पसरत असतां व स्त्री-पुरुषांच्या अन्तःकरणाची दडप-

शाहीच्या कठोर निकषावर पारख होत असतां तिकडे लंडनमध्यें सरकारचे मानसपुत्र हिंदुस्थानसाठीं राज्यघटना तयार करण्याच्या कामांत गढून गेले होते! १९३२ सालीं तिसरी मंडलाकार परिषद् भरली. तिला जोडून असंख्य समित्याहि नेमण्यांत आल्या. तेव्हां सार्वजनिक कार्याबरोबर वैयक्तिक विलास उपभोगण्याची पर्वणीहि साधून घेतां आली तर पाहावी म्हणून मध्यवर्ती कायदेमंडळांतील सभासदांचें लांगूलचालन सुरू झालें. रयतेच्या पैशावर एक भलें मोठें प्रतिनिधींचें टोळकें मंडलाकार परिषदेसाठीं लंडनला निघालें. नंतर १९३३ सालीं जॉइन्ट कमिटीच्या बैठकी सुरू झाल्यावर दिलदार सरकारनें साक्षीदारांना फुकट तिकिटें दिलीं. देशाची सेवा बजावण्यासाठीं आतुर झालेल्या अनेक लोकांनीं रयतेचा पैसा घेऊन पुन्हां एकवार समुद्रपर्यटनाचें दिव्य करून दाखविलें आणि असें सांगतात कीं अधिक प्रवासखर्च मिळावा म्हणून कांहीं सेवातत्पर सद्गृहस्थांनीं बरीच घासाघीसहि करून पाहिली!

हिंदुस्थानांतील जनसमुदायाच्या चळवळीला घाबरलेले हे वरिष्ठ वर्गांचे प्रतिनिधी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या गोटाचा आश्रय करून लंडनला एकत्र जमावेत यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. पण मायदेश जीवन-मरणाच्या लढ्यांत गवसला असतां कोणत्याहि हिंदपुत्रानें असें वर्तन करावें ही गोष्ट आमच्या राष्ट्रीय मनोवृत्तीला मर्मभेदक वाटल्यावांचून कशी राहील? तथापि एका दृष्टीनें झालें तें ठीकच झालें असें आमच्यापैकीं पुष्कळ जणांना वाटलें; कारण प्रतिगामी गणंग प्रगतिपर समुदायापासून एकदांचे पाखडून वेगळे तरी निघतील अशी आमची समजूत झाली. (पण ती चुकीची होती असें आतां वाटत आहे.) ही चाळणी जनतेच्या शिक्षणाच्या कामीं उपयुक्त ठरून सामाजिक प्रश्न सोडवावयाचे असतील आणि जनतेच्या उरावरचा बोजा दूर करावयाचा असेल तर पूर्ण स्वातंत्र्यावांचून अन्य मार्ग नाहीं ही गोष्टहि स्पष्ट होईल असा आमचा तर्क होता.

दैनंदिन जीवनांतच नव्हे तर नैतिक व मानसिक दृष्टयाहि हिंदी जनता व उपरोक्त लोक यांच्यामध्यें महदंतर पडलें होतें. ज्या आन्तरिक प्रेरणांमुळें हिंदी जनता त्याग व कष्ट सहन करण्यास सिद्ध झाली होती त्या प्रेरणांची कल्पनाच त्यांना होईना. त्यांना एकच सत्य माहित होतें, तें म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीचें अधिराज्य. त्याचा यशस्वी प्रतिकार शक्य नाहीं, तेव्हां आनंदानें म्हणा, कण्हत-कुंथत म्हणा, त्याचा स्वीकार हा केलाच पाहिजे असें त्यांचें तर्कशास्त्र होतें. जनतेच्या संमतीशिवाय खरी जीवंत अशी राज्यघटना बनवणें अथवा हिंदुस्थानचा प्रश्न सोडवणें शक्य नाहीं ह्या गोष्टीची त्यांना मुळींच बूझ नसावी. १९१० सालच्या आयर्लंडच्या जॉइन्ट कॉन्फरन्ससंबंधीं लिहितांना मि. जे. ए. स्पेंडर लिहितात कीं संकटाचा ऐन भर असतांना जे पुढारी राज्यघटना तयार करीत बसले होते त्यांचा प्रयत्न घर पेटलें असतां त्याचा विमा उतरवण्याच्या प्रयत्नाप्रमाणें होता! १९१० सालच्या आयर्लंड-मधील आगीपेक्षां हिंदुस्थानांतील १९३२ आणि १९३३ सालची आग किती तरी

पटींनीं मोठी होती. आणि आतां आगीचे लोळ विझले असले तरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलालसेच्या निखाऱ्यांचा धगधगीतपणा किती तरी वेळ कायम राहणारच.

अधिकारीवर्गाची हिंसावृत्ति त्या वेळीं फारच चेकाळली. हें पूर्वपरंपरेला साजेसेंच होतें. येथील ब्रिटिशांची राजवट म्हणजे पोलिशी कारभार. मुलकी अधिकारीसुद्धां परप्रांत बळकावून बसलेल्या सैन्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानकडे पाहतात. त्यांच्या सत्तेच्या पायाला खणती लागल्याबरोबर त्यांच्या हिंसा वृत्तीला चेव चढला आणि बंगालमधील व इतर ठिकाणच्या दहशतवाद्यांच्या कृत्यामुळें सरकारला आपल्या झोटिंगशाहीचें समर्थन करतां येऊं लागलें. वटहुकुमामुळें व सरकारी धोरणामुळें अधिकारीवर्गाच्या हातीं एवढी सत्ता आली कीं हिंदुस्थानभर पोलिसांचा अनिर्बंध हुतूतू सुरू झाला.

थोड्याबहुत प्रमाणांत हिंदुस्थानांतील सर्वच प्रांतांना दडपशाहीच्या या अग्निदिव्यांतून जावें लागलें; पण सरहद्द प्रांत व बंगाल यांच्या हालअपेष्टांना पारावार राहिला नाहीं. सरहद्द प्रांतांत लष्कराचा नेहमींच वरचष्मा असे व तेथील राज्यकारभारहि अर्धवट लष्करी स्वरूपाचा होता. लष्करी दृष्ट्या त्या टापूचें महत्त्व फार आहे. लाल डगलेवाल्यांच्या उद्योगामुळें सरकार अगदीं त्रासून गेलें व "शांतता प्रस्थापित करण्यासाठीं व बंडखोर खेड्यांना कह्यांत आणण्यासाठीं" प्रांतभर लष्करी तुकड्या फिरूं लागल्या. सबंधच्या सबंध खेड्यांवर दंड लादण्याची प्रथा हिंदुस्थानभर जारी झाली होती. पोलिसांच्या हातीं अचाट सत्ता आल्यावर अतिरेकाला काय कमी? कायद्याच्या बेकायदेशीर वर्तनाचीं व व्यवस्थारक्षकांच्या धिंगाण्याचीं उदाहरणें त्या वेळीं पुष्कळच घडून आलीं.

बंगालमधील कांहीं ठिकाणची परिस्थिति तर विलक्षणच झाली होती. सर्व जनतेला (हिंदु जनतेला) आपली दुष्मन लेखून सरकारनें १२ ते २५ वयाच्या पुरुषांना व स्त्रियांना, मुलांना व मुलींना बरोबर निशाणीचीं तिकिटें बाळगण्यास भाग पाडलें, शेंकडों लोकांना हद्दपार अगर स्थानबद्ध करून टाकलें, अमुकच पोषाख वापरला पाहिजे अशी सक्ति झाली, शाळांवर नियंत्रण लादलें अथवा त्या अजिबात बंद करण्यांत आल्या, सायकली वापरण्यास मनाई झाली, जाण्यायेण्याची वर्दी पोलिस-चौकीवर द्यावी असा हुकुम सुटला; सूर्यास्ताचे कायदे, लष्करी मिरवणुकी, धाक देण्यासाठीं बसवलेले पोलिसांचे तळ, सामुदायिक दंड, एक ना दोन प्रकार. वेढा पडावा तशी मोठमोठ्या टापूंची अवस्था झाली होती. पॅरोलवर सुटलेल्या स्त्री-पुरुषांप्रमाणें तेथील रहिवाशांची स्थिति होती. त्यांच्यावर सरकारी दूतांची सक्त नजर असे. सरकारला खरोखरच इतका कडेकोट बंदोबस्त आवश्यक वाटत होता कीं काय तें मला कसें सांगतां येईल? तो आवश्यक नसेल तर रहिवाशांना छळण्याचा, त्यांचा अपमान करण्याचा व त्यांचें अपरिमित नुकसान केल्याचा महाभयंकर गुन्हा सरकारनें केला असें म्हटलें पाहिजे. आणि जर इतकीं दावीं व मुसक्या

जनतेच्या तोंडीं घालणें अवश्य होत असेल, तर त्यावरून देखील ब्रिटिश सरकारच्या कारभाराची लायकी समजून येईलच.

तुरुंगांत टाकल्यानंतर देखील सरकारच्या आसुरी वृत्तीपासून लोकांची सुटका झाली नाहीं. राजबंद्यांची वर्गवारी म्हणजे केवळ नाटक होतें. वरच्या वर्गांत घातलेल्यांना केव्हां केव्हां अत्यंत त्रास होई. साध्या कैद्याहून राजकीय कैद्याचें जीवन दुःखदायक करून टाकावयाचें असेंच धोरण सरकारनें ठरवून टाकलें असावें. तुरुंगाच्या इन्स्पेक्टर जनरलनें तर एक गुप्त आज्ञापत्रक काढून सत्याग्रही कैद्यांना " चांगले लंबे करा " अशी सूचना केली होती. तुरुंगांत फटक्यांची शिक्षा हा सर्वसामान्य प्रकार होऊन बसला. पार्लमेंटमध्यें २७ एप्रिल १९३३ रोजीं दुय्यम भारतमंत्र्यांनीं सांगितलें कीं, " १९३२ सालांत हिंदुस्थानांतील ५०० हून अधिक सत्याग्रह्यांना फटक्यांची शिक्षा देण्यांत आली, ही गोष्ट सर सॅम्युअल होअर यांना माहित आहे. " तुरुंगांतील शिस्त मोडल्याबद्दल ज्या फटक्यांच्या शिक्षा झाल्या त्यांचा समावेश या आंकड्यांत झालेला आहे कीं नाहीं तें यावरून स्पष्ट होत नाहीं. १९३० च्या डिसेंबरांत फटक्यांच्या एक दोन फुटकळ शिक्षा झाल्या तेव्हां आम्हीं उपवास केला होता, त्याची आठवण १९३२ सालीं वारंवार होणाऱ्या फटक्यांच्या शिक्षेमुळें मला होऊं लागली. शिक्षेची बातमी ऐकिली कीं अंतःकरणांत मागच्याप्रमाणेंच मुका दाह होत असे. पण शिक्षांचा निषेध करावा अथवा अन्नत्याग करावा असें माझ्या मनांत येईना. मन अगदीं हताश झालें होतें. पाशवी अत्याचार पाहून कांहीं कालानें तें निर्ढावलें. कोणतीहि वाईट प्रथा बराच काळ चालू राहिली कीं जगाच्या ती अंगवळणीं पडते, हेंच खरें.

आमच्या स्वयंसेवकांना अवघडांतलें अवघड काम देण्यांत येई—चक्की, घाणा वगैरे. त्यांनीं सरकारची माफी मागावी या हेतूनें त्यांचें जीवन जितकें असह्य करतां येईल तितकें करण्याची खबरदारी घेण्यांत येत होती.

तुरुंगांतील ह्या असल्या शिक्षा बहुधा तरुण लोकांच्याच वांट्याला येत. कारण जुलुम, जबरदस्ती व अपमान ते सहन करीत नसत. तेजस्वी व स्वाभिमानी, तडफदार व धाडसी अशीं तीं मुलें होतीं. इंग्लंडांतील पाठशालांत व विश्वविद्यालयांत हीं मुलें असतीं तर हरतऱ्हेचें प्रोत्साहन त्यांना मिळालें असतें, त्यांचें कौतुक झालें असतें. पण येथें हिंदुस्थानांत त्यांच्या तारुण्यसुलभ ध्येयवादाला व स्वाभिमानाला कोणतें बक्षीस मिळणार ? बेडी, एकांतवास आणि फटके.

तुरुंगांत पडलेल्या आमच्या भगिनींच्या नशिबीं खडतर दिवस आले. त्यांपैकीं बहुतेक मध्यम वर्गांतल्या असल्यामुळें सावलींतल्या आयुष्याची त्यांना संवय झालेली होती. आपल्या मतलबासाठीं पुरुषांनीं समाजांत रूढ केलेल्या यमनियमांपासून त्यांना जो काय त्रास होईल तेवढाच त्यांना ठाऊक. स्वातंत्र्याच्या हाकेचा त्या दुहेरी अर्थ लावीत. चळवळींत त्या इतक्या उत्साहानें व धडाडीनें भाग घेऊं

लागल्या त्याच्या मुळाशीं घरगुती गुलामगिरींतून सुटका करून घेण्याची तीव्र इच्छा-देखील होतीच. ती कदाचित् अस्पष्ट असेल व अज्ञात असेल, एवढेंच. फारच थोड्या स्त्रिया वगळल्या, तर बाकीच्यांना सामान्य कैदीच समजण्यांत येई व अगदीं हीन दर्जाच्या कैद्यांबरोबर दुर्धर परिस्थितींत त्यांची दावण बांधण्यांत येत असे. एकदां स्त्रियांच्या कोठडीशेजारीं मला राहण्याचा प्रसंग आला. माझ्या व त्यांच्या कोठडीमध्यें फक्त एक उंच भिंत तेवढी होती. पलीकडच्या कोठडींत सामान्य कैदी-बायकांतच कांहीं सत्याग्रही स्त्रिया होत्या. त्यांच्यापैकीं एका बाईच्या घरीं एकदा मी पाहुणा म्हणून राहिलों होतों. मध्यें भिंत असली तरी रात्रीच्या वेळीं स्त्री वॉर्डरांची जी शिवीगाळ त्यांना सहन करावी लागत होती, ती ऐकून माझें मन व्यथित होऊन गेलें.

१९३० सालच्या व १९३२ सालच्या तुरुंगांतील वागणुकींत फेर पडलेला दिसून आला. अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक लहरी ह्याला कारणीभूत होत्या असें म्हणतां येणार नाहीं. सरकारचें धोरणच त्याला कारणीभूत झालें असावें. राजकीय कैद्यांची गोष्ट राहो, सामान्य कैद्यांच्या बाबतींत सुद्धां संयुक्त प्रांतांतील तुरुंगखातें माणुसकीच्या सर्वस्वीं विरुद्ध असल्याबद्दल सगळीकडे ख्याति होती. यासंबंधीं एका मनोरंजक प्रसंगाची अगदीं शहाजोग हकीकत आम्हांला समजली ती अशी : एका सन्मान्य " सर "की वाल्यांनीं, आमच्यासारख्या बंडखोर राजद्रोह्यानें नव्हे, एकदां आमची तुरुंगांत भेट घेतली. त्यांनीं सांगितलें कीं, " कांहीं महिन्यांपूर्वी मीं एका तुरुंगाला भेट दिली होती. तुरुंग पाहून झाल्यावर शेरेबुकांत तेथील जेलरचा मी " शिस्तीचा चाहता पण सदय अंतःकरणाचा गृहस्थ " असा उल्लेख केला. " माझ्या सदयतेविषयीं आपण कृपा करून कांहीं लिहूं नका " असें जेलरनें मोठ्या काकुळतीनें मला विनविलें. पण मी त्याच्या म्हणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. परिणाम काय झाला ठाऊक आहे ! लांब कोपऱ्यांतल्या एका तुरुंगावर पाठवून त्याच्या सहृदयतेचें बक्षीस त्याला देण्यांत आलें. "

उलट्या काळजाचा व क्रूर म्हणून ज्या जेलरची ख्याति असेल त्याला बढती मिळे, पदव्या मिळत. लांचखाऊपणा तर तुरुंगांत नेहमींचाच होऊन बसला आहे. माझा व माझ्या मित्रांचा अनुभव तर असा आहे कीं, कडक शिस्तीचा रुबाब करणारे अधिकारी सर्वांत अधिक लांचखाऊ असतात.

तुरुंगांत असो कीं तुरुंगाबाहेर असो, मी मोठा भाग्यवान. माझी लायकी असो नसो, मला भेटणारा प्रत्येक माणूस मला सौजन्यानें व आदरानें वागवीत असतो. परंतु एका प्रसंगामुळें मात्र माझ्या आप्तेष्टांच्या व माझ्या मनाला फार खेद झाला. माझ्या मेहुण्याला भेटण्यासाठीं माझी आई, कमला व इंदिरा, अलाहाबाद जिल्ह्याच्या तुरुंगांत गेल्या होत्या. त्यांचा कांहीं अपराध नसतां तेथील जेलरनें त्यांचा अपमान केला व त्यांना तुरुंगाच्या बाहेर काढून लावलें. ही बातमी ऐकून मला फार वाईट

वाटलें. झालेल्या प्रकारासंबंधीं प्रांतिक सरकारनें जी वृत्ति प्रकट केली ती तर फारच आश्चर्यकारक होती. जेलरकडून पाणउतारा करून घेण्याचा प्रसंग आईवर येऊं नये म्हणून भेट घेणेंच वर्ज्य करावें असा मीं निश्चय केला आणि डेहराडून येथें असतांना जवळ जवळ सात महिन्यांत मी एकदांसुद्धां कोणाला भेटलों नाहीं.

४४

# भावतरंग

बरेलीच्या तुरुंगांत माझी व गोविंद वल्लभ पंत यांची डेहराडून जेलकडे रवानगी झाली. लोकांची गर्दी वगैरे टाळण्याकरितां आम्हांला बरेली येथें गाडींत न बसवतां ५० मैलांवरील आडस्टेशनवर नेण्यांत आलें. रात्रीच्या वेळीं आम्हांस गुप्तपणें मोटरींतून स्टेशनवर पोंचतें करण्यांत आलें. पुष्कळ महिन्यांच्या एकांतवासानंतर रात्रीच्या थंड वेळीं ती मोटरींतील सहल फारच आल्हाददायक वाटली.

बरेली तुरुंगांतून निघतांना घडलेल्या एका लहानशा प्रसंगाची आठवण अद्यापि ताजी राहिली आहे. बरेलीचे पोलिस सुपरिंटेंडेंट त्या वेळीं तेथें हजर होते. ते जातीनें इंग्रज होते. मी मोटरींत बसत असतां त्यांनीं माझ्या हातीं एक भेन्डोळें दिलें आणि " जुनीं सचित्र जर्मन मासिकें आहेत हीं. तुम्ही जर्मन शिकतां असें कळल्यावरून हीं मीं तुमच्यासाठीं आणलीं आहेत." असें त्यांनीं सांगितलें. ह्यापूर्वी आमची भेट कधींहि झाली नव्हती व त्यानंतरहि ते मला कधीं भेटले नाहींत. त्यांचें नांवसुद्धां मला माहीत नाहीं; पण हें स्वयंस्फूर्त सौजन्य व हा मित्रभाव पाहून मला त्यांच्याबद्दल फार कृतज्ञता वाटूं लागली.

मोटर चालू असतां इंग्रज व हिंदी लोक, शास्ते व शासित, अधिकारी व जनता यांचे संबंध कशा प्रकारचे आहेत ह्यासंबंधींचे विचार माझ्या मनांत घोळूं लागले. या दोन गटांत केवढें मोठें अंतर! त्यांच्या मनांत परस्परांबद्दल केवढा मोठा गैरविश्वास व द्वेष! परंतु ह्या अविश्वासापेक्षां व द्वेषापेक्षां त्यांचें एकमेकांविषयींचें अज्ञानच फार दाट आहे, त्यामुळें परस्पर एकमेकांबद्दल साशंक असतात, व दोन्ही बाजू आपला बचाव करण्याच्या कामीं चूर होऊन राहतात. दुसऱ्या गटांतील माणसें तुसडीं, मनुष्यद्वेषी आहेत असें प्रत्येकाला वाटत राहतें. विरुद्ध गटाच्या अंतःकरणांत शिष्टाचार व सदयता यांचें वास्तव्य असेल अशी कल्पनाच त्यांच्या मनाला शिवत नाहीं. देशाचे राज्यकर्ते असल्यामुळें व हातीं अपरिमित अधिकार एकत्रित झाल्यामुळें त्यांच्याभोंवतीं स्वार्थसाधु लोकांचा व नोकरीवाल्या लोकांचा प्रचंड घोळका जमतो व त्यांच्यावरूनच हिंदुस्थानांतील इतर लोकांविषयीं ते अंदाज करीत असतात. आणि हिंदी इसमालादेखील यंत्राप्रमाणें अधिकाराचें काम बजावणारे व आपल्या स्वार्थाचें रक्षण मानी कुत्र्याप्रमाणें करणारे इंग्रज अधिकारीच दृष्टीस पडत असतात. परंतु व्यक्ति म्हणून व्यवहार करणाऱ्या माणसाचें वर्तन,

व नोकरशाहींतील घटक म्हणून अधिकाऱ्यांचें काम करतांना दिसून येणारें त्याच माणसाचें वर्तन ह्यांत केवढें महदंतर असतें. 'हुःशार' म्हटल्याबरोबर ताठ उभा राहणारा सैनिक यंत्राप्रमाणें बनलेला असतो. त्याच्या मानवी वृत्ति नष्ट होतात व त्याचें ज्यांनीं कांहींहि वांकडें केलेलें नाहीं अशा निरपराधी व निःशस्त्र लोकांना तो खुशाल गोळ्या घालतो. माझ्या मनांत विचार आला कीं, पोलिस अधिकाऱ्याच्या बाबतींत सुद्धां असेंच नाहीं का घडत? एकाद्या माणसाशीं निर्दयपणें वागण्याची वेळ आली तर त्याच्या मनाची चलबिचल उडेल; पण तोच उद्यां निरपराधी लोकांवर लाठीहल्ला चढविण्याचा हुकुम देण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. त्या वेळीं तो व्यक्ति म्हणून विचार करणार नाहीं आणि ज्या जमावावर तो लाठीहल्ला चढवतो अथवा गोळ्या झाडतो, त्यालाहि तो व्यक्तींचा समुदाय असें मानीत नाहीं.

दुसऱ्या बाजूचा, समुदाय अथवा जमाव म्हणून आपण विचार करूं लागलों कीं त्याचें मानवी स्वरूप जणूं कांहीं आपल्या डोळ्यांना दिसेनासें होतें. प्रेम, द्वेष आदिकरून मनोभावनांनीं संपन्न अशीं माणसेंच त्या जमावांत आहेत या गोष्टीचें भानच आपणांस राहत नाहीं. सर्वसामान्य इंग्रज गृहस्थाला त्याचें प्रांजल मत विचारलें तर तो असें सांगेल कीं, कांहीं चांगलीं हिंदी माणसें माझ्या माहितीचीं आहेत, पण तीं अपवादभूत. एकंदर हिंदी लोक घेतले तर ते कोणालाहि तिटकारा वाटेल असेच असतात. आणि सर्वसामान्य हिंदी माणूस म्हणेल कीं, माझ्या माहितीचे कांहीं इंग्रज लोक मोठे नेकदार आहेत; पण ते सोडले तर उरलेले सर्व इंग्रज म्हणजे नुसते बेमुर्वतखोर पशू आहेत, त्यांचें नांवसुद्धां काढूं नका. प्रत्येक माणूस आपल्या परिचयाच्या व्यक्तीवरून दुसऱ्या गटांतील व्यक्तींसंबंधीं अनुमानें न बांधितां ज्यांच्यासंबंधीं त्याला फारसें, किंबहुना मुळींच ज्ञान नाहीं त्यांच्यावरूनच सर्व गटाविषयीं अनुमानें करीत असतो, हा चमत्कार नव्हे काय?

सुदैवानें माझे देशबांधव व इंग्रज लोक हे दोघेहि मला सौजन्यानें वागवीत आले आहेत माझे जेलर आणि मला कैद करून इकडून तिकडे नेतांना माझ्याबरोबर येणारे पोलिस या सर्वांनींच माझ्याशीं गोडीगुलाबीचें वर्तन ठेविलेलें आहे. ह्या सौम्य वृत्तीमुळे मला तुरुंगांतील जीवनाचा कठोरपणा बराचसा कमी भासत असे. माझ्या देशबांधवांनीं मला चांगलें वागवावें ह्यांत आश्चर्य नाहीं; कारण मीं थोडीशी लोकप्रियता व प्रसिद्धि संपादन केलेली आहे. इंग्रज मनुष्यसुद्धां मला दहा जणां-सारखाच एक अकरावा माणूस असें न मानतां एक विशिष्ट व्यक्ति म्हणून वागवीत असतो. मीं इंग्लंडमध्यें शिक्षण घेतलें आहे व विशेषतः मी एका प्रख्यात इंग्रजी शाळेचा विद्यार्थि होतों त्यामुळें त्यांना मजबद्दल आपलेपणा वाटत असावा. "आपल्याच-प्रमाणें हा देखील एक थोडाफार सुसंस्कृत मनुष्यप्राणी आहे, मग त्याचें सार्वजनिक कार्य किती कां विपरीत असेना," असा विचार त्यांच्या मनांत येत असावा. माझ्या

सहकाऱ्यांना मिळणारी वागवणूक व मला मिळणारी वागवणूक यांतील फरक पाहून पुष्कळ वेळां माझ्या मनाचा गोंधळ उडून जाई व मला शरमिंधें वाटूं लागे.

या सवलती मला मिळत असल्या तरी तुरुंग तो तुरुंगच. तेथील वातावरण कधीं कधीं असह्य होत असे. क्रौर्य, अधमपणा, असत्याचरण वगैरे नीच वृत्तींनीं तेथील वातावरण गजबजून गेलेलें असे. लाळघोटेपणा अगर शिवीगाळ ह्यांपैकीं एक कोणचें तरी तेथें चालू असावयाचेंच. भावनाशील मनाची तेथें एकसारखी ओढाताण होत राही. लहानसहान प्रसंगावरून देखील एकाद्याचें चित्त अस्वस्थ व्हावें. पत्रांत अनिष्ट मजकूर असावा अथवा वर्तमानपत्रांत एकादी बातमी वाचावयास मिळावी आणि अंतःकरण चिंता अथवा संताप ह्यांनीं व्याकुळ होऊन जावें. तुरुंगाच्या बाहेर कामामुळें मन व्यापृत राहतें व त्यामुळें शरीराचा व मनाचा तोल सांवरण्यास मदत होते. पण तुरुंगामध्यें बाटलींत घालून वर बूच बसवल्याप्रमाणें माणसाची अवस्था होत असते. मनाला साहजिकच एकलकोंडेपणा व दृष्टीला विकृतपणा येतो. तुरुंगामध्यें आजारपण आलें म्हणजे तर असा त्रास होतो कीं पुसतां सोय नाहीं.

तरी पण हें आयुष्यदेखील माझ्या अंगवळणीं पडूं लागलें. व्यायाम व अभ्यास यांच्या साहाय्यानें माझें प्रकृतिस्वास्थ्य व मनःस्वास्थ्य मी कायम ठेवीत होतों. तुरुंगांत व्यायाम व अभ्यास यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यावांचून माणसाची धडगत नाहीं. मी अगदीं टीपबंद असें वेळापत्रक ठेविलें होतें व टापटिपीची संवय कायम राहावी म्हणून मी शक्य तेवढा नित्याप्रमाणेंच वर्तनक्रम आंखला होता. रोजची दाढी मीं चुकवली नाहीं. ही क्षुल्लक गोष्ट नमूद करण्याचें कारण असें कीं इतर लोक तुरुंगामध्यें दाढीच्या बाबतींत व इतर बाबतींतहि चालढकल करीत. सर्व दिवसभर सपाटून काम केलें कीं संध्याकाळीं शरीर अगदीं थकून जाई, पण मन मात्र आनंदित राहत असे. शरीर थकलेलें असलें म्हणजे केव्हांच डोळा लागून जाई तें कळतहि नसे.

याप्रमाणें दिवसामागून दिवस, आठवडे, महिने लोटले. कधीं कधीं महिना असा कंटाळवाणा होई कीं तो संपतां संपत नसे. केव्हां केव्हां माझेंच मन इतकें विटून आंबून जाई कीं, प्रत्येक माणसाचा व प्रत्येक गोष्टीचा मला राग येऊं लागे. तुरुंगांतील माझे सहकारी, जेलचे अधिकारी, बाहेरचे लोक, ब्रिटिश साम्राज्य, या सर्वांवरच मी चिडून जात असें. ( अर्थात् ब्रिटिश साम्राज्यावरील माझा राग कायमचाच होता. ) आणि मला जर कोणाचा सर्वांत अधिक राग येत असेल तर तो स्वतःचाच. मनाला सर्व बाजूंनीं कळा लागल्या आहेत असा भास होई. या मनस्तापांतून माझी थोड्याच वेळांत सुटका होत होती, हें सुदैव म्हणावयाचें.

भेटीचा दिवस म्हणजे तुरुंगांत सणासारखा वाटे. कैदी त्या दिवसाची किती उत्सुकतेनें वाट पाहत बसतो. बिचारा एकेक दिवस मोजीत राहतोः पण

भेटीची गडबड एकदां संपली कीं, प्रतिक्रिया सुरू होते. सगळीकडे शून्यता व एकाकीपणा कोंदटला आहे असें वाटूं लागतें. कांहीं तरी वाईट बातमी भेटीच्या वेळीं कानीं आली अथवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें भेट बरोबर जमली नाहीं कीं माझ्या मनाची तगमग होत राही. भेटीच्या वेळीं तुरुंगावरील अधिकारी नेहमींच हजर राहत, पण बरेलीला असतांना दोन तीन वेळां असें घडलें कीं, कागद-पेन्सिल घेऊन एक गुप्त पोलिसहि तेथें बसूं लागला. संभाषणांतील शब्दन् शब्द तो टिपून घेत असे. मला त्या प्रकाराची फार चीड येई. त्यामुळें बरेली तुरुंगांतील भेटीचें खोबरें होत असे.

पुढें माझ्या आईचा व बहिणीचा अपमान झाल्याकारणानें मीं भेट घेण्याचेंच सोडून दिलें. नंतर सात महिन्यांनीं भेटी पुनः सुरू होऊन माझे आप्तेष्ट जेव्हां मला भेटण्यासाठीं आले तेव्हां माझा आनंद गगनांत मावेना. माझ्या बहिणीचीं लहान लहान मुलेंहि मला भेटण्यासाठीं आलीं होतीं. त्यांपैकीं एकानें नेहमींप्रमाणें माझ्या खांद्यावर चढण्याचा हट्ट धरला, तेव्हां मात्र मला माझा भावनावेग आवरेना. सात महिन्यांच्या तळमळीनंतर कौटुंबिक वात्सल्याचा जिव्हाळा मला प्राप्त होत असल्यामुळें भावनातिरेकानें माझें मन विरघळून गेलें.

भेटी बंद झाल्या होत्या. तेव्हां दर पंधरवड्यानें घराकडून अथवा तुरुंगांतील बहिणीकडून येणाऱ्या पत्राच्या वाटेकडे मी डोळे लावून बसत असें. त्या वेळीं पत्रें इतकीं मोलाचीं वाटत कीं बा! ठरलेल्या दिवशीं पत्र आलें नाहीं तर मन वैतागून जाई; पण पत्र एकदां हातीं पडलें कीं मग मात्र तें एकदम उघडण्याचा धीर होत नसे. निश्चित सुखाचा ठेवा आतां हातीं पडलेला आहे, तेव्हां त्याचा यथावकाश उपभोग घ्यावा अशा विचारानें रमत गमत मी तें पत्र हातांतल्या हातांत चाळवीत बसावयाचा. कदाचित् आपल्या मनाला त्रास होईल अशी एखादी अप्रिय बातमी अथवा एखादा उल्लेख तर त्यांत नसेल ना अशी पापशंकाहि माझ्या मनांत डोकावल्यावांचून राहत नसे. पत्र वाचावयाचें आणि पत्र लिहावयाचें म्हटलें कीं तुरुंगांतील एकमार्गी शांत जीवनांत केवढी खळबळ उडून जाई. मन भावनातरल होऊन एक दोन दिवसपर्यंत सैरावैरा भटकत राही. त्यामुळें रोजच्या कामावर चित्त एकाग्र करणें दुरापास्त होत असे.

नैनी व बरेलीच्या तुरुंगांत माझ्याबरोबर पुष्कळ सहकारी होते. डेहराडून येथें सुरुवातीला गोविंद वल्लभ पंत, काशीपूरचे कुंवर आनंदसिंग व मी असे तिघेजण होतों. १९३३ च्या जानेवारींत माझे सर्व सहकारी सुटले तेव्हांपासून तों ऑगस्टअखेर माझी सुटका होईपर्यंत जवळ जवळ आठ महिने मला एकट्यालाच तेथें राहावें लागलें. हा सर्व काळ मोठा रुक्ष असा गेला. गांठीभेटी पुनः सुरू झाल्यावर जिवाला थोडासा विरंगुळा मिळाला. मला वाटतें माझ्यावर खास

मेहेरबानी म्हणून बाहेरून ताजीं फुलें व चारदोन फोटो खोलींत ठेवण्याची मला परवानगी देण्यांत आली होती. कारण सामान्यत: फुलें व चित्रें ठेवण्याची परवानगी जेलमध्यें मिळत नाहीं. आपली कोठडी सजविण्याचा कोणीं प्रयत्न केल्यास अधिकारी जरा करड्या नजरेनेंच पाहूं लागतात. एकदां माझ्या मित्रानें आपली केशप्रसाधनाचीं साधनें जरा विशेष रीतानें रचून ठेविलीं म्हणून तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटनें हरकत घेतल्याचें मला स्मरतें. आपली खोली अशा रीतीनें शृंगारणें योग्य नव्हे अशी समज त्याला देण्यांत आली. खोली शृंगारण्याचीं साधनें कोणतीं होतीं म्हणाल, तर दांतांचा ब्रश, पेस्ट, फाउंटन पेनची शाई, तेलाची बाटली, कंगवा, केसांचा ब्रश व असल्याच एक दोन इतर किरकोळ गोष्टी !

तुरुंगांत असलें म्हणजे मनुष्याला बारीकसारीक गोष्टींचें महत्त्व समजून येतें व बाहेरच्या जगांत ज्या चिजा आपण केराच्या टोपलींत फेकून देऊं, त्या तुरुंगांत माणूस मोठ्या आस्थेनें जवळ बाळगून ठेवतो. मालकी सांगण्यासारखी व जतन करण्यासारखी चीजवस्तु जवळ नसली तरी देखील मनांतली मालकीहक्काची भावना कांहीं नष्ट होत नाहीं.

कधीं कधीं जीवनांतील सुखोपभोगांसाठीं शरीर तृषार्त होतें. शारीरिक सुख मिळावें, भोंवतीं रम्य वातावरण असावें, मित्रमंडळींचा सहवास घडावा, चमकदार संभाषणाची माधुरी चाखावी, मुलाबाळांबरोबर खेळांत दंग व्हावें इत्यादि इत्यादि......वर्तमानपत्रांतील एकादें चित्र पाहून अगर एकादा परिच्छेद वाचून तरुणपणच्या निष्काळजी जीवनाचें दृश्य डोळ्यांपुढें उभें राही व मन पुन:पुन: घराकडे धांव घेऊं लागे. अशा वेळीं सर्व दिवस मन अस्वस्थ होऊन जाई.

दररोज थोडेंसें सूत कांतण्याचा मीं क्रम ठेवला होता. मानसिक श्रम फार झाले म्हणजे अशा तऱ्हेच्या हस्तव्यवसायामुळें मनाला आराम मिळतो. परंतु लेखन व वाचन हाच माझा मुख्य उद्योग होता. निर्बंधाच्या चाळणींतून मला हवीं तीं सर्वच पुस्तकें सुटत नसत. पुस्तकावरील मथळा जरा भयंकर व राजद्रोही स्वरूपाचा आहे अशी अधिकाऱ्यांची समजूत झाल्यामुळें स्पेंग्लरचें “पाश्चात्य देशांचा ऱ्हास” हें पुस्तक मला मिळालें नाहीं. तथापि एकंदरींत बरींच पुस्तकें माझ्या संग्रहाला असत; तेव्हां मला तक्रार करण्यास जागा नाहीं. माझ्या सहकाऱ्यांना मात्र तात्कालिक विषयावरील पुस्तकें मिळणें दुरापास्त होत असे. बनारस तुरुंगांत राज्यघटनेच्या सरकारी शुभ्र-पत्रिकेलाहि मज्जाव करण्यांत आला. धार्मिक पुस्तकें व कादंबऱ्या मात्र ब्रिटिश अधिकारी अगदीं खुषीनें आंत येऊं देत असत. ब्रिटिश सरकारचें धर्मविषयक पराकाष्ठेचें प्रेम व सर्व धर्मांबद्दल त्यांच्याकडून दाखविण्यांत येणारी सहिष्णुता पाहिली कीं मनाला मोठा अचंबा वाटतो.

ज्या देशांत अगदीं सामान्य अशा नागरिक हक्कांच्या गळ्याला नख लागलेलें आहे तेथें कैद्यांच्या हक्कांबद्दल शब्द उच्चारणें हा अप्रयोजकपणाच ठरेल. तरीदेखील

ही एक विचार करण्यासारखी बाब आहे. न्यायासनासमोर एकादा इसम अपराधी ठरला म्हणजे त्याच्या देहाबरोबर त्याच्या मनालाहि कारागृहवास घडावा हें योग्य आहे काय? कैद्यांचीं मनें स्वतंत्र कां राहूं नयेत? माझे हे प्रश्न ऐकून तुरुंगांतील अधिकारी चकितच होतील हें मी जाणून आहें. कारण नवे विचार ग्रहण करण्याची अथवा बराच काळपर्यंत विचार करण्याची शक्ति त्यांच्या अंगीं उरलेली नाहीं. वाङ्मयावर निर्बंध पडल्यामुळें आधुनिक वाङ्मयाच्या व प्रगतिपर नियतकालिकांच्या व वृत्तपत्रांच्या सहवासाला आम्हीसुद्धां आंचवलों होतों सामान्य कैद्याला तर आणखी किती तरी निर्बंध सहन करावे लागतात. त्यामुळें जीं थोडींबहुत पुस्तकें व वृत्तपत्रें बाहेर उघडपणें विकतां येतात अगर वाचतां येतात त्यांचाहि प्रवेश तुरुंगांत होत नाहीं.

कांहीं दिवसांपूर्वी नेमके हेच प्रश्न न्यूयॉर्कमधील प्रसिद्ध सिंगसिंग तुरुंगाच्या बाबतींत उपस्थित झाले होते. त्या तुरुंगांत कम्युनिस्ट वाङ्मय आणण्याची मनाई असे. अमेरिकेंतील वरिष्ठ वर्गांत कम्युनिझमच्या विरुद्ध अत्यंत तीव्र असा वैरभाव जागृत असतांहि कम्युनिस्ट वृत्तपत्रें व मासिकें यांच्यासकट कोणतेंहि पुस्तक तुरुंगांतील कैद्यांना मागवतां यावें या गोष्टीला तुरुंगावरील अधिकाऱ्यांनीं मान्यता दिली. फक्त व्यंगचित्रें मात्र आपण आंत येऊं देणार नाहीं असें तेथील मुख्य अधिकाऱ्यानें सांगितलें. कारण, वाङ्मयापेक्षां व्यंगचित्रामुळेंच लोकांचीं मनें अधिक भडकतात, असें त्याचे म्हणणें होतें.

हिंदुस्थानांतील बहुसंख्य कैद्यांना जेथें वृत्तपत्रें अथवा लेखनाचें साहित्य यांपैकीं कांहींच मिळत नाहीं तेथें मानसिक स्वातंत्र्याचा प्रश्न देखील उपस्थित करणें वेडगळपणाचें आहे. येथें तक्रार करावयाची आहे ती मर्यादित नियंत्रणाविरुद्ध नसून अजिबात बंदीविरुद्ध करावयाची आहे. अ वर्गाच्या (बंगालमधील १ वर्गाच्या) कैद्यांना लेखनसाहित्य तेवढें हक्कानें मिळतें! त्यांच्यापैकीं सुद्धां सगळ्यांना दैनिक वृत्तपत्रें मिळत नाहींतच. ब व क वर्गाच्या साध्या व राजकीय कैद्यांनीं बरोबर लेखनसाहित्य बाळगूं नये असा कायदा आहे. ब वर्गाला मेहेरनजर म्हणून तें देण्यांत येतें, पण तें हवें तेव्हां काढूनहि नेतां येतें. अ वर्गाचे कैदी हजारांत एक या प्रमाणांत असतील, तेव्हां कैद्यांचा विचार करतांना अ वर्गाला मिळणारे हक्क लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. तथापि हिंदुस्थानांतील अवर्गीय कैद्यांना देखील सुधारलेल्या देशांतील सामान्य कैद्यापेक्षांहि कमी हक्क आहेत ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

बाकीच्या हजारांतील ९९९ कैद्यांना एका वेळीं तीनपर्यंत पुस्तकें जवळ बाळगण्याची मुभा देण्यांत येते. पण परिस्थिति अशी आहे कीं त्यांना या सवलतीचा फायदाच घेतां येत नाहीं. स्वतंत्र लेखन करणें अथवा वाचनांत आलेल्या पुस्तकांचें टिपण करणें हेंहि फार भयंकर समजलें जातें. मानसिक विकासाची ही जी जाणून बुजून गळचेपी करण्यांत येते ती विचित्र असली, तरी तुरुंग खात्याची मनोवृत्ति उघडी करून दाखवण्यास पुरेशी आहे. कैद्याला सुधारून त्याला नागरिक बनवावयाचा

असेल तर त्याच्या मनाला गोंजारून तें दुसऱ्या मार्गाकडे वळविलें पाहिजे व त्याला साक्षर करून कोणता तरी उद्योगधंदा त्याला शिकविला पाहिजे. पण ही दृष्टि हिंदुस्थानांतील तुरुंगाधिकाऱ्यांना मान्य होत नसावी. नुकतीच तुरुंगांतील मुलांना व तरुणांना लिहिणेंवाचणें शिकविण्यास सुरुवात करण्यांत आली आहे; पण त्यासाठीं नेमलेले शिक्षक स्वतःच नालायक असतात! शिक्षकांची नालायकी झांकावी यासाठीं कैद्यांना शिक्षणाची आवडच नाहीं असा एक आरोप करण्यांत येतो. पण माझा स्वतःचा अनुभव याच्या अगदीं उलट आहे. माझ्याकडे कांहीं शिकावें म्हणून जे लोक आले त्यांच्यापैकीं पुष्कळांना शिक्षणाविषयीं खरीखुरी आंच होती; ते खूप मेहनत करीत. आश्चर्याची गोष्ट अशी कीं केव्हां केव्हां मध्यरात्रीं उठून पाहावें तों बराकींतल्या मिण-मिण दिव्याच्या उजेडांत उद्यांचे धडे तयार करीत बसलेले एकदोन कैदी दृष्टीला पडत!

वाचनांत माझा वेळ जात असे तें सांगितलेंच. एका विषयाचें वाचन संपलें कीं दुसरा विषय घ्यावा असें चाललें होतें. पण विषय बहुधा "जाडेच" असत. कादंबऱ्यांमुळें मन सुस्त होत जातें म्हणून त्या मी फारसा वाचीत नसें. वाचनाचा कंटाळा आला कीं लेखणी उचलायची. माझ्या मुलीला मी जीं इतिहासविषयक पत्रें लिहिलीं तीं मला तब्बल दोन वर्षें पुरलीं; त्यांच्या योगानें माझें मनहि चांगलें तल्लख राहिलें. तीं लिहीत असतां मी गतकालांतच वावरत आहें असें वाटून तुरुंगांतील परिस्थितीचा विसर पडत असे.

ह्यूएन्त्सांग, मार्कोपोलो, आणि इब्न बतूता वगैरे पुराण्या प्रवाशांचे इतिहास आणि मध्य आशियाचा प्रवास करणारा स्वेन हेडिन व तिबेटमध्यें अनेक साहसांशीं झुंजणारा रोरिश वगैरे आधुनिक प्रवाशांचीं वर्णनें नेहमींच वाचावींशीं वाटत. चित्रांचीं पुस्तकें व त्यांतल्या त्यांत पर्वतांच्या, हिमनद्यांच्या व वाळवंटांच्या चित्रांचीं पुस्तकें दूर करवत नसत. विस्तृत प्रदेश, अफाट महासागर व गगनभेदी पर्वत ह्यांच्या दर्शनासाठीं तुरुगांत दृष्टि तहानेलेली असल्यामुळें अशा चित्रसंग्रहांची महती विशेषच वाटे. मॉंट ब्लांक, आल्प्स व हिमालय यांचीं सुंदर चित्रें असलेला एक संग्रह मजजवळ होता. माझ्या कोठडींतील वातावरण ११५ डिग्रीपर्यंत पोंचलें अथवा त्याच्याहि वर गेलें कीं मी तो संग्रह उघडून हिमनद्यांच्या चित्रांकडे पाहत बसत असें. नकाशासंग्रहामुळें मनांत विचारचक्र सुरू होई. आपण पाहिलेल्या स्थळांच्या स्मृति व जाऊं म्हणत होतों त्या स्थळांचीं स्वप्नें मनांत रंगू लागत व पूर्व-परिचित ठिकाणीं पुनः जावें आणि ठिपक्यांनीं दर्शविलेल्या नगरांचें, काळ्या रेषांनीं दर्शविलेल्या पर्वतांचें, व निळ्या रंगानें दर्शविलेल्या महासागरांचें दर्शन घेऊन, जगांतील रम्य स्थळांचा आनंद लुटावा आणि बदलत्या मानवी समाजांतील झगड्यांचें व कलहांचें निरीक्षण करावें, यासाठीं जीवाची तळमळ सुरू होई; आणि या तळमळीचा जोर वाढून गळा दाटून आला कीं नकाशासंग्रह बाजूला सारून पुनः माझ्या ओळखीच्या तटाच्या भिंताडाकडे पाहत नित्य दैनिक कार्यक्रमाला मी प्रारंभ करीत असे.



मैं स्वरूपरानी नेहरू

## ४५

# तुरुंगामधील पशुपक्षी

डेहराडूनच्या तुरुंगांतील माझ्या लहानशा कोठडींत मीं तब्बल साडेचौदा महिने घालविल्यावर मी जणूं कांहीं त्या खोलीचा दगडातुळवटासारखा एक भागच होऊन गेलों आहें असें मला वाटूं लागलें. चुना दिलेल्या भिंतीवरच्या खांचखळग्यांच्या, जमिनीवरच्या व वाळवीनें किडलेल्या छपरांतील वाशांवरच्या एकूण एक खाणाखुणा माझ्या परिचयाच्या झाल्या होत्या. खोलीच्या बाहेर अंगण होतें, त्यांतील लहानसहान गवताचे पुंजे अगर दगडधोंडे दृष्टीला पडले तरी जुने मित्र भेटल्याप्रमाणें मला हर्ष होई. माझ्या खोलींतदेखील मी एकटा राहत नव्हतों. बऱ्याच गांधीलमाशांनीं आपला संसार तेथें थाटलेला होता. वाशांच्या आड पुष्कळ पाली राहत, त्या संध्याकाळ झाली कीं भक्ष्य शोधण्यासाठीं बाहेर पडत. विचार व भावनांचे ठसे वस्तुजातावर उमटत असते तर त्या खोलींतील वातावरण अशा ठशांनीं भरून गेलें असतें व त्या चिमकुल्या जागेतील प्रत्येक वस्तूवर ते पाहावयास सांपडले असते.

इतर तुरुंगांतून मला जास्त चांगल्या खोल्या मिळाल्या असल्या तरी डेहराडून येथें देण्यांत आलेली एक सवलत मला फार मोलाची वाटली. मुख्य तुरुंग फार लहान होता. तेव्हां आम्हांला तुरुंगाच्या तटबंदीबाहेरच्या पण तुरुंगाच्या आवाराच्या आंत असलेल्या एका जुन्या कोठडींत ठेवण्यांत आलें होतें. कोठडी सुद्धां इतकी लहान होती कीं हिंडणे, फिरणें तेथें शक्यच नव्हतें. म्हणून सकाळ-संध्याकाळ बाहेर जाऊन दारापुढील सुमारें शंभर यार्डांच्या पट्टींत फिरण्याची मोकळीक आम्हांला मिळाली. तेथून डोंगर, शेतें व दूर अंतरावरचा एक सार्वजनिक रस्ता वगैरे दृष्टीस पडत. ही सवलत खास माझ्यासाठीं म्हणून देण्यांत आली असें नव्हे. डेहराडून तुरुंगांतील सर्वच अ व ब वर्गांतील कैद्यांना ती मिळत असे. तुरुंगाच्या बाहेरच्या आवारांतल्या दुसऱ्या एका इमारतींत युरोपियन कैद्यांची व्यवस्था होती. आमच्या इमारतीभोंवतीं तटबंदी नसल्यामुळें आंतून डोंगराचें व बाह्य जगांतील व्यापाराचें दृश्य दिसत असे. दुसऱ्या इमारतींत ठेवण्यांत आलेल्या युरोपियन व इतर कैद्यांनाहि तुरुंगाच्या दारासमोर फिरण्याची मोकळीक होती.

बाहेरच्या वातावरणाला व देखाव्यांना मानसिक दृष्ट्या किती मोल आहे याची बरोबर कल्पना तुरुंगाच्या उंच उंच भिंतींच्या आड बरेच दिवस खडकून

पडलेल्या कैद्यालाच येणें शक्य आहे. मोकळ्या वातावरणांत फिरण्याची मला फार मौज वाटे. पाऊसकाळीं पावसाच्या सरीवर सरी पडत राहत व घोटाभर पाण्यांत चालावें लागे तरी सुद्धां बाहेर जाण्याचा क्रम मीं सोडला नाहीं. बाहेरची हवा कोणत्याहि स्थळीं मिळाली असती तरी मीं ती सोडली नसतीः मग येथें तर काय जवळच उभ्या असलेल्या गगनचुंबी हिमालयाचें दृश्य दिसत होतें. तुरुंगांतील कंटाळवाण्या जीवनाचें मालिन्य त्याच्या दर्शनामुळें बरेंचसें झडून जाई. कित्येक दिवस मला भेटी मिळत नसत. कित्येक महिने मला एकट्यानें काढावे लागले. अशा वेळीं मला प्रिय वाटणाऱ्या गिरिशिखराकडे पाहण्याची सवलत मिळाली हें सुदैवच म्हटलें पाहिजे. माझ्या कोठडींतून पर्वतराजि दिसत नसली तरी तिच्या सान्निध्याची जाणीव मनांत सतत जागत राही आणि वाटे कीं, जणूं कांहीं तिच्यांत व माझ्यांत जगाच्या डोळ्यांना न दिसणारा प्रेमभाव वाढत चालला आहे.

पक्ष्यांचे ते अगणित थवे दूर कोठें उडाले !
एकाकी हा जलद वळला, तोहि बाजूस चाले !
मी एकांतीं गिरिशिखर हे न्याहळीतों बसून,
अन्योन्यांचा मजसि गिरिला ये कधींही न शीण ”

ली टाई पो प्रमाणें पर्वतांकडे पाहण्याचा मला कधीं कंटाळा येत नसे असें म्हणतां येणार नाहीं. पण त्यांच्याकडे पाहत बसणें हा एक विलक्षण अनुभव होता. त्यांच्या सान्निध्यामुळें मला फार समाधान वाटत असे. कित्येक युगांच्या तपश्चर्येच्या ज्ञानानें सांद्र व स्थिर झालेल्या दृष्टीनें ते नगाधिराज माझ्या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या मनोविकारांकडे जरा हंसून बघत आहेत व माझें तापदग्ध मन शांतवीत आहेत असा मला भास होई.

डेहराडून येथील वसंतकाल फारच सुंदर असतो व खालच्या प्रदेशांतल्यापेक्षां बराच अधिक काळ येथें त्याचें वास्तव्य होतें. वनश्रीचीं हिरवीं वस्त्रें शिशिर ऋतूनें हरण करून नेलीं होतीं. झाडें उघडीं बागडीं दिसत होतीं. तुरुंगाच्या दारासमोर उभ्या असलेल्या चार प्रचंड पिम्पळांचीं पानें सुद्धां बहुतेक सगळींच्या सगळीं गळून पडलीं याचें मला मोठें नवल वाटलें. खडबडीत व रूक्ष असे ते दिवस होते. पण वसंत वातानें त्यांच्या अंगांत ऊब आली, नवजीवनाचा दिव्य संदेश त्यांच्या अणुरेणूं-पर्यंत जाऊन पोंचला. पिंपळाच्या व इतर झाडांत एकाएकीं जणूं कांहीं सळसळ सुरू होऊन आंतल्या आंत कांहीं गुप्त घडामोड चालू असावी तसें वातावरण त्यांच्या-सभोंवार उत्पन्न झालें. थोड्याच दिवसांत आश्चर्य घडून येईल आणि जिकडे तिकडे इवलाले हिरवे कोंब डोकावूं लागतील. किती मनोरम दृश्य आहे हें. पाहतां पाहतां लक्षावधि पल्लवांच्या पताका उभारल्या जाऊन सूर्यप्रकाशांत तकाकूं लागतील, वायुलहरींबरोबर डोलूं लागतील. इतक्या थोडक्या अवधींत कोंबाचीं पानें व्हावीत हा केवढा चमत्कार आहे !

आंब्याची नवी पालवी तांबडसर असते ही गोष्ट माझ्या लक्षांत पूर्वी कधींच आली नव्हती. त्यांचा रक्तधूसर वर्ण, हिंवाळयांत काश्मीरांतील टेकड्यांवर पसरणाऱ्या छटांप्रमाणें दिसतो. पण तो रंग फार वेळ टिकत नाहीं. लवकरच आंब्याचीं पानें हिरवीं होतात.

पावसाळा सुरू झाला कीं उन्हाळयाचा ताप धुवून निघाला असें वाटून आनंद होई. पण चांगल्या गोष्टीचा केव्हां केव्हां अतिरेकहि होतोच. डेहराडून हें वरुण राजाचें मोठें आवडतें निवासस्थान आहे. सुरुवातीच्या पहिल्या पांचसहा आठव-ड्यांतच पन्नास साठ इंच पाऊस पडून जावयाचा. बाहेर पावसाची मुसळधार सुरू झाली कीं त्या अरुंद कोठडींत छपरांतून गळणाऱ्या व खिडकींतून झपाटणाऱ्या पाण्याचा मारा चुकवीत अंगाची घडी करून बसून राहण्यांत कांहीं मौज वाटत नसे.

डेहराडूनचे शरद व हेमंत ऋतु मजेदार असत, आणि पाऊस नसेल तेव्हां हिंवाळयांतहि मौज वाटे. पण मेघगर्जना सुरू होऊन छपरावर पावसाच्या सरी तड-तडूं लागल्या आणि अंगाला झोंबणारे वारे भणभणूं लागले कीं, सोईवार निवाऱ्याची जागा मिळावी, जरा ऊब मिळावी म्हणून मनाची तळमळ होऊं लागे. कधीं कधीं गारांचें वादळ झालें आणि बंदुकीहून टपोऱ्या गारांचा छपरावरील पत्र्यांवर वर्षाव सुरू झाला म्हणजे असा कानठळया बसवणारा आवाज होत असे कीं, तोफा सुटूं लागल्याचा भास व्हावा !

मला एक दिवस विशेष आठवतो. त्या दिवशींची तारीख २४ डिसेंबर १९३२ ही होती. त्या दिवशीं वादळ झालें तें विलक्षणच. पाऊस एकसारखा पडत होता. थंडी मी म्हणत होती. तुरुंगांत त्या दिवसाइतका शारीरिक त्रास कधीं झाल्याचें मला स्मरत नाहीं. पण संध्याकाळीं एकाएकीं आकाश निवळलें व शेजारच्या डोंगरटेकड्यांनीं पांघरलेली पांढऱ्या शुभ्र हिमाची वाकळ पाहिल्या-बरोबर माझी उद्विग्नता कोठच्या कोठें नाहींशी झाली. दुसऱ्या दिवशीं—म्हणजे नाताळच्या दिवशीं—हवा सुंदर पडली होती, व हिमाच्छादित पर्वतांचें दृश्य नयन-रम्य दिसत होतें.

नेहमींचे व्यवसाय बंद असल्यामुळें निसर्गाच्या लीलांकडे आमचें लक्ष जाऊं लागलें. आम्हाला आढळणाऱ्या प्राण्यांची व कीटकांचीहि आम्ही अधिक विचारपूस करूं लागलों. बारकाईनें निरीक्षण केल्यावर मला आढळून आलें कीं तऱ्हेतऱ्हेचे कृमिकीटक माझ्या खोलींत व परड्यांत वावरत आहेत. मी एकाकीपणाबद्दल तक्रार सांगतों खरा, पण माझ्या ओसाड भासणाऱ्या अगणांत जीवांची समृद्धि नांदत होती. सरपटणारे अथवा उडणारे हे सर्व कृमिकीटक माझ्या वाटेस न जातां आपापली जीवनयात्रा आक्रमीत असत. मग मीं तरी त्यांच्या जीवनांत कां बरें ढवळाढवळ करावी ? पण ढेकूण व डांस यांच्यावरोबर मात्र माझें अखंड वैर चाललेलें असे. माशांच्याहि बाबतींत थोडाफार तोच प्रकार होता. गांधीलमाश्या असल्या तरी

मला चालत आणि शेंकडों गांधीलमाशा माझ्या खोलींत नांदतहि होत्या. एक गांधीलमाशी मला चुकून चावली तेव्हां मात्र आमची थोडीशी जुंपली होती. संतापून मी त्यांच्या कुळाचाच संहार करण्यासाठीं धांवलों, पण आपलें घरदार संभाळण्यासाठीं त्या किती निकरानें लढल्या. घरट्यांत त्यांचीं अंडीं असावींत. आपल्या वाटेला त्या जाणार नसतील तर राहीनात का बिचाऱ्या सुखानें, असा विचार करून मीं हात आंखडता घेतला. नंतर एक वर्षाहून अधिकच काळ मी त्याच कोठडींत होतों. गांधीलमाशा माझ्या आजूबाजूला वावरत असत, पण त्यांनीं माझ्यावर केव्हांहि हल्ला केला नाहीं. आम्ही एकमेकांचा मान राखून राहत असूं.

पाकोळ्या मला आवडत नसत. पण त्यांच्याशीं माझें वैर नव्हतें. संध्याकाळच्या अंधारांत अगदीं आवाज न करतां त्या इकडून तिकडे भिरभिरीत जात. अंधारांत चाललेल्या वातावरणांत त्यांचे देह डोळ्यांना दिसत न दिसत. मोठे विचित्र प्राणी ते. त्यांचें मला भय वाटे. कधीं कधीं त्या इतक्या जवळून उडत कीं त्यांच्या पंखांचा फटका तोंडावर बसेल अशी मला भीति वाटे. खूप उंचावरून वरहीं मारीत वटवाघुळें जात असत.

मुंग्या, वाळवी, वगैरे कीटकांकडे मी तासन् तास पाहत बसावयाचा. संध्याकाळ झाली कीं पाली बाहेर पडत, आपल्या भक्ष्याची शिकार करीत, आणि आपल्या शेपट्या मजेशीर रीतीनें हलवीत हलवीत शिवाशिवीचा खेळ खेळत. गांधीलमाशांना पकडण्याच्या फंदांत त्या सहसा पडत नसत; पण पाठलाग करून मोठ्या शिताफीनें गांधीलमाशांना तोंडाकडून पकडतांना मी दोन वेळां पाहिलें आहे. त्यांचा दंश टाळण्याची ही सहजवृत्ति होती कीं, पाली जाणून बुजून धोरणानें वागत तें सांगतां येणार नाहीं.

झाडें जवळपास असलीं कीं खारींना तोटा नसतो. तो प्राणी भारीच धिटुकला. त्या आपल्या अगदीं जवळ येतात. लखनौच्या तुरुंगांत असतांना घटका घटका मी जरासुद्धां न हालतां वाचीत बसलों कीं, एकादी खार पायांवरून चढून हळूच गुडघ्यावर येऊन बसे व सभोंवर दृष्टि टाकी. माझी तिची नजरानजर झाली कीं मात्र मी म्हणजे कांहीं दगड-झाड नाहीं अशी तिची खात्री होई, आणि भयमूढ होऊन किंचित् काळ ती जेथल्या तेथें खिळल्याप्रमाणें बसून राही. नंतर जी धूम ठोकी म्हणतां! खारींचीं चिमुकलीं पिल्लें केव्हां केव्हां झाडावरून पडत. मग त्यांची आई येत असे व त्यांचा चेंडूप्रमाणें गुंडाळी करून त्यांना सुरक्षित जागीं नेत असे. कधीं कधीं पिलांची चुकामूक व्हावयाची. माझ्या एका सहकाऱ्याला अशा प्रकारें चुकलेलीं खारींचीं तीन पिल्लें सांपडलीं. त्यांची जोपासना ते करीत असत. त्या चिमण्या जीवांना अन्न कसें घालावें याची मोठी पंचाईत पडली. पण खूप डोकें चालवून एक मार्ग काढला हुडकून. फाउंटन पेन भरण्याच्या कांचेच्या नळीला बोंथी लावल्यावर त्यांतून उत्तम प्रकारें दूध वगैरे पाजतां येऊं लागलें.

सर्व तुरुंगांत पारवे आढळून आले. अलमोरा तुरुंग तेवढा याला अपवाद होता. नैनी तुरुंगांत तर हजारों पारवे येत आणि संध्याकाळीं त्यांच्या गर्दीमुळें आकाश व्याप्त होई. कधीं कधीं त्यांना मारून तुरुंगाचे अधिकारी फराळहि करीत. तेथें मैनाहि दिसल्या. पण त्या सर्वत्रच दृष्टीस पडतात. डेहराडून येथें माझ्या कोठडीच्या दारावरच त्यांनीं आपला संसार थाटला होता. मी त्यांना चारा चारीत असें. पुढें त्या इतक्या माणसाळल्या कीं सकाळ-संध्याकाळच्या खाण्यांत जरा दिरंगाई झाली कीं त्या माझ्या अगदीं शेजारीं येत व जोरजोरानें ओरडून आपला वांटा मागूं लागत. त्यांच्या खाणाखुणा पाहण्याची व त्यांची उतावळी बडबड ऐकण्याची मोठी मौज वाटे.

नैनी तुरुंगांत हजारों पोपट होते; माझ्या बराकीच्या भिंतींतील भोकशांतून किती तरी पोपट राहत. त्यांचें प्रियाराधन मोठें मजेशीर असे. कधीं कधीं एकाद्या मादीवरून दोन नरांत सुंदोपसुंदी सुरू होई आणि युद्धाच्या निकालाची व विजयी वीराचें स्वागत करण्याची वाट पाहत मादी जवळच बसून राही.

डेहराडूनला तऱ्हतऱ्हेचे पक्षी होते; त्यांच्या गाण्याची व किलबिलाटाची एकच गडबड उडून जावयाची. त्या सर्व वातावरणावर कोकिळेचा द्विधा व आर्त असा स्वर निनादत असे. पावसाळ्यांत व त्याच्या जरा आधीं " वेडा " पक्षी येई. त्याला असें नांव कां मिळालें त्याचा उलगडा नंतर झाला. बिचारा वेडा खराच. रात्र असो दिवस असो, ऊन असो मुसळधार पाऊस असो, एकच एक सूर तो सारखा घोकीत बसावयाचा. आमच्या छोट्या आवारांत झाडें नसल्यामुळें आम्हाला हे पक्षी बघावयास सांपडत नसत. फक्त त्यांचे शब्द ऐकूं येत. पण ऐटदार मंडळें घेत घेत अस्मानांत उंच चढत जाणारे गरुड व घारी मात्र दृष्टीस पडत. त्यांच्याकडे मी टक लावून बघत असें. ते एकदम खालीं झेंप घेत व पंख तसेच स्थिर ठेवून नुसत्या वाऱ्याच्या झोतावर पुन्हा वर चढत. मधून मधून पाणकोंबड्यांचा थवाहि आमच्या डोक्यावरून उडत जाई.

बरेलीच्या तुरुंगांत माकडांची एक पेठच वसली होती. त्यांचे चाळे बघण्यासारखे असत. एक प्रसंग माझ्या पक्का ध्यानांत राहिला आहे. एक माकडाचें पिलूं आमच्या आवारांत उतरून आलें. पण पुन्हां भिंत चढून त्याला वर जातां येईना. कांहीं वॉर्डरांनीं व कैद्यांनीं त्याला पकडून त्याच्या गळ्यांत दोरी अडकवली. आपल्या पिलाची ही स्थिति पाहून भिंतीवर बसलेल्या त्याच्या आईबापांना संताप आला. एकाएकीं त्या जोडीपैकीं एक दांडगा हुप्प्या भिंतीवरून खालीं उतरला व पिलाभोंवतीं जमलेल्या घोळक्यावर त्यानें सरळ मोहरा धरून चाल केली. वॉर्डरांच्या हातीं लाठ्याकाठ्या होत्या व ते त्या परजीतहि होते. तेथें जमलेले लोक देखील कांहीं थोडेथोडके नव्हते. अशा स्थितींत थेट हल्ला चढविणें म्हणजे धाडसाचेंच काम आहे हें निःसंशय. पण माकडाच्या बेछूट साहसाचा विजय झाला व तो मानवांचा घोळका घाबरून काठ्या जागच्या जागीं टाकून चारी वाटा पळत सुटला! पिलाची सुटका झाली हें सांगवयास नकोच.

पण कधीं कधीं आवारांत असेहि पाहुणे येत कीं त्यांचा सत्कार करणें शक्य होत नसे. आमच्या कोठड्यांतून पुष्कळदां विंचू सांपडत. वादळ होऊन गेलें कीं ते हटकून यावयाचे. बिछान्यावर, हातीं घेतलेल्या पुस्तकावर, वाटेल तेथें ते उपटत. असें असून मला एकदांहि विंचू चावला नाहीं ही मोठी नवलाची गोष्ट आहे. एक भयंकर विषारी काळाकुळकुळीत असा विंचू मीं बाटलींत घालून ठेवला होता. त्याला मी माशा वगैरे खावयास देत असें. नंतर एकदां त्याला दोरा बांधून मी भिंतीवर टांगून ठेवला असतां, स्वारी तेथून पसार झाली. तो सुटा असतां पुन्हा त्याची माझी गांठ पडावी अशी माझी इच्छा नव्हती, म्हणून मीं सर्व खोलींतलें सामान बाहेर काढलें व कोनान् कोपरा धुंडाळला; पण वृश्चिकमहाशयांचा पत्ता लागला नाहीं !

माझ्या खोलींत व खोलीच्या जवळपास तीन चार वेळां सापहि निघाले. एकदां ती बातमी बाहेर फुटून लगेच वर्तमानपत्रांतून ठळक अक्षरांत ती छापली गेली. खरें म्हणजे या प्रसंगामुळें माझी जराशी करमणूकच झाली. तुरुंगांतलें आयुष्य इतकें बेचव असतें कीं त्यांत थोडें जरी वैचित्र्य आलें तरी तें हवेंसें वाटतें. मीं कांहीं सापांचा चाहता नव्हे. पण कांहीं लोकांची साप म्हटला कीं दांतखिळी बसते तशी माझी स्थिति होत नाहीं. ते दंश करतील म्हणून अर्थात् मला भीति वाटतेच आणि सर्प दिसला तर स्वसंरक्षणाचा मी प्रयत्नहि करीत असतों. पण साप म्हटला कीं मला किळस वाटत नाहीं किंवा माझी घाबरगुंडी उडाली असें होत नाहीं. घोणीची मला सापापेक्षां अधिक भीति वाटते. खरें बोलावयाचें तर त्यांत भीतीचा अंश नसून साहजिक वाटणाऱ्या किळसाचाच भाग अधिक आहे. अलिपूर तुरुंगांत असतांना एके दिवशीं पायावर कांहीं भुळभुळल्यामुळें मी मध्यरात्रीं जागा झालों. जवळच्या टॉर्चचा उजेड पाडून पाहिला तों बिछान्यावर एक घोण आढळली. सहज प्रवृत्तीनें मी ताड्कन् अंथरुणाच्या बाहेर उडी मारली ती इतक्या जोरानें कीं डोकें जवळ जवळ भिंतीवरच आपटायचें, पण थोडक्यांत चुकलें. पॅव्हलाव्हनें सांगितलेली सहजप्रेरणा म्हणजे काय चीज आहे तें त्या वेळीं माझ्या लक्षांत आलें.

डेहराडूनला असतांना मीं एक नवीन प्राणी पाहिला किंवा मी तो नव्यानेंच पाहत होतों असें म्हणणें रास्त होईल. तुरुंगाच्या दाराशीं उभा राहून मी तुरुंगावरील अधिकाऱ्याबरोबर कांहीं बोलत होतों. इतक्यांत एक विचित्र प्राणी हातांतून घेऊन जातांना एका माणसाला मीं पाहिलें. जेलरनें त्याला जवळ बोलाविल्यावर बघितलें तेव्हां अर्धवट सरड्यासारखा आणि अर्धवट सुसरीसारखा दोन फूट लांबीचा अणकुचीदार नख्या असलेला व खवल्याखवल्याचा एक प्राणी नजरेस पडला. त्या माणसानें त्या प्राण्याचें नांव " बो " आहे असें सांगितलें. ह्याचें काय करणार असें जेलरनें विचारल्यावर हंसून तो म्हणाला, " आम्ही याची भुज्जी म्हणजे एक प्रकारची कढी बनवणार. " तो माणूस जंगलाचाच रहिवासी होता. नंतर एफ्.

डब्ल्यू. चँपियन यांचें ' दि जंगल इन् सनलाइट अँड शॅडो ' हें पुस्तक वाचून पाहतां त्या जनावराला इंग्रजींत पँगोलिन म्हणातत असें कळून आलें.

लांब मुदतीच्या कैद्यांच्या भावना तशाच अतृप्त राहतात. त्या अंशतः तरी तृप्त व्हाव्या म्हणून पुष्कळदां ते जनावरें पाळतात. साध्या कैद्यांना असें करण्याची सुभा मिळत नाहीं. परंतु वॉर्डर लोकांना थोड्याफार सवलती घेतां येतात व तुरुंगावरील अधिकारीहि तिकडे कानाडोळा करितात. तुरुंगांतील सर्वांना आवडणारा प्राणि म्हणजे खार. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुंगसांचीहि आवड असणारे लोक आढळून येतात. तुरुंगांत कुत्र्यांना मज्जाव असला तरी मांजरांची तेथें बरीच चलती आहे असें दिसतें. एका मांजरीच्या पिलाची व माझी एकदां गट्टी जमली. पण तें एका तुरुंगावरील अधिकाऱ्याचें मांजर असल्यामुळें त्याची बदली झाल्यावर तो तें घेऊन गेला व मला मात्र चुकल्या चुकल्यासारखें वाटूं लागलें. तुरुंगांत कुत्र्यांना मनाई असून देखील एकदां माझ्या गळ्यांत कुत्र्याचें लफडें पडलें होतें. डेहराडून येथील एका अधिकाऱ्यानें कुत्री पाळली व बदली झाल्यावर तिला तेथेंच टाकून तो निघून गेला. गरीब बिचारी तुकडे शोधीत अर्धपोटीं हिंडत असे. ती माझ्याकडेहि अन्नासाठीं येई. मी तिला रोज चतकोर नितकोर घालूं लागलों. पुढें तिला पाटी-भर पिलें झालीं ! त्यांपैकीं बरींच पिलें कोणी कोणी घेऊन गेले तरी तीन पिलें उरलींच. त्यांना मी भाकर तुकडा टाकीत असें. पुढें त्यांपैकीं एक पिलूं आजारी पडून मोठमोठ्यानें केंकाटूं लागलें. त्याचा मला फार त्रास होत असे. पण मी त्याची फार काळजीपूर्वक जोपासना करीत होतों. केव्हां केव्हां रात्रींतून मी त्याच्या-साठीं दहाबारा वेळ उठलेला आहें. इतकी काळजी घेतल्यासारखें तें दुखण्यांतून बचावलें याचा मला फार आनंद झाला.

बाहेरच्यापेक्षां तुरुंगांतच माझा जनावरांशीं अधिक संबंध आला. मला कुत्र्यांची भारी आवड आहे. स्वतः मीं कुत्रे पाळलेहि होते. पण इतर गोष्टींच्या गड-बडींत त्यांच्याकडे मला द्यावें तसें लक्ष देतां येत नसे. तुरुंगामध्यें अनेक प्राण्यांचा सहवास मला घडला. हे त्यांचे माझ्यावर फार उपकार झाले म्हणावयाचे. आपल्या लोकांना घरांत जनावरें बाळगणें फारसें आवडत नाहीं, आणि एकंदरींत आपण अहिंसा वृत्तीने असलों तरी जनावरांशीं आपली वागणूक बरीच क्रौर्याची व निष्काळजीपणाची असते. हिंदु लोक गाईला अगदीं देवाप्रमाणें मानतात व तिच्यावरून दंगेहि होत असतात; पण ते गाईला मोठ्या ममतेनें वागवितात असें मात्र नाहीं. भक्ति व ममताळूपणा यांचें नेहमींच पटत नसावेंसें दिसतें.

निरनिराळ्या राष्ट्रांनीं निरनिराळ्या जनावरांना आपल्या महत्त्वाकांक्षेचीं व स्वभावाचीं प्रतीकें म्हणून मान्य केलें आहे. अमेरिकेचा व जर्मनीचा गरुड, इंग्लंडचा सिंह व बुल्डॉग, फ्रान्सचा लढाऊ कोंबडा व झारच्या रशियाचा अस्वल, वगैरे प्रतीकें जगप्रसिद्ध आहेत. राष्ट्राचा स्वभाव बनविण्याच्या कामीं या प्रतीकरूप

जनावरांचा कितपत उपयोग होत असेल बरें ? वरील सर्व जनावरें चढाऊ व लढाऊ वृत्तीचीं असून हिंसेनें उपजीविका करणारीं आहेत. ह्या श्वापदांचीं प्रतीकें डोळ्यांसमोर वागवून जे लहानाचे मोठे झाले त्यांनीं त्याचेंच जाणून बुजून अनुकरण करावें व त्यांच्याचसारखी चढाईची व हिंस्र अशी वृत्ति दाखवावी यांत काय आश्चर्य ? आणि गाईला दैवत मानणारा हिंदु गाईप्रमाणेंच गरीब व नेभळा व्हावा यांत नवल तें कसलें ?

## ४६

# लढा

बाहेर लढा चालू होता. आपणाला लवकर यश मिळणें शक्य नाहीं ही गोष्ट स्पष्ट माहित असतांहि शूर स्त्रिया व पुरुष बलाढ्य सरकारला न जुमानतां शांतपणें कायदेभंग करीत राहिले होते; सतत चाललेली दडपशाही व तिचें एकसारखें चढतें वाढतें प्रमाण यांवरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्ता कशाच्या आधारावर उभी आहे त्याचेंहि प्रदर्शन होत होतें. त्यांत आतां आडपडदा राहिला नाहीं ही आमच्या दृष्टीनें कांहीं अंशीं समाधानाची बाब होती. तरवार विजयी ठरली खरी; परंतु एका महान् योद्धयानें म्हणून ठेवलें आहे ना, कीं "तरवारीच्या बळावर हवें तें करतां येते, पण तरवारीचेंच सिंहासन मांडून त्यावर कोणी बसूं म्हणेल तर तें मात्र जमणार नाहीं." आपलीं मनें विकून बौद्धिक वेश्याव्यवसाय करण्यापेक्षां आम्ही असे चिरडले गेलों तरी बेहेत्तर आहे. तुरुंगांत पडल्यावर स्वतःच्या हातानें कोणतीच मदत चळवळीला करणें शक्य नव्हतें. पण बाहेर स्वस्थ बसून राहिलेल्या कित्येक जणांपेक्षां आमचीच मदत लढ्याला जास्त होत होती असे आम्हांला वाटे. आम्ही दुर्बळ म्हणून आमची कातडी बचावण्यासाठीं देशाच्या भवितव्याची आम्हीं राखरांगोळी करावी काय? मनुष्याची चिकाटी व त्याचें बळ अल्प आहे; कित्येक माणसें जायबंदी झालीं, मेलीं, सैन्यांतून निघून गेलीं, कांहींनीं विश्वासघातहि केला, हें सगळें मान्य. पण अडथळे आले तरी त्यांची तमा न करतां लढा चालू राहिलाच कीं नाहीं? निष्कलंकित ध्येय व दुर्दमनीय ईर्षा एवढें साहित्य जवळ असल्यावर अपयश येईल म्हणजे काय गोष्ट आहे? तत्त्वच्युत होणें, हक्कावर पाणी सोडणें, असत्याला शरण जाणें हेंच अपयश. शत्रूच्या हातून झालेल्या जखमा लवकर भरून येतात, पण स्वतःच्या हातानें मारून घेतलेला घाव भरून येण्यास वेळ लागतो.

आमचा दुबळेपणा व योग्य मार्गापासून विचलित होत चाललेलें जग पाहिलें कीं कधीं कधीं चित्त व्यग्र होत असे. उलट आमच्या कृत्यांबद्दलचा विचार मनांत आला कीं अभिमानहि वाटे. कारण जनतेनें खरोखरीच उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. अशा शूर व्यक्तींच्या पथकापैकीं आपण एक आहों ही कल्पना कोणाला आनंददायक होणार नाहीं?

कायदेभंग सुरू असतां कॉंग्रेसचें खुलें अधिवेशन भरवण्याचे दोन प्रयत्न झाले. एक दिल्ली येथें व दुसरा कलकत्त्याला. बेकायदेशीर संस्थेनें खुलें अधिवेशन

करावयाचें म्हणजे पोलिसांशीं प्रसंग येणार हें दिसतच होतें. लाठीहल्ला करून सभा उधळण्यांत आल्या आणि अनेक लोकांना अटक झाली. आश्चर्याची गोष्ट अशी कीं अधिवेशनासाठीं ठिकठिकाणचे हजारों प्रतिनिधि जमा झाले होते. सं. प्रांतांतील लोकांनीं या अधिवेशनांत प्रामुख्यानें भाग घेतला हें ऐकून मला समाधान वाटलें. १९३३ मेच्या कलकत्ता-अधिवेशनाला जाण्याचा आग्रह माझ्या आईनें धरला. तथापि कलकत्त्याच्या वाटेवर पंडित मालवीयांसह तिलाहि असन्सोल येथें कांहीं दिवस अटकावून धरण्यांत आलें. रुग्ण व क्षीण अशी झाली असूनहि तिनें दाखवलेली ईर्षा व उत्साह पाहून मी थक्क झालों. कारागृहाचा धाक तिला वाटला नाहीं. कारण त्याहून कटतर प्रसंग तिनें अनुभवले होते. मुलगा, दोन्ही मुली व तिच्या प्रेमाचीं इतर माणसें यांनीं कित्येक वर्षेपर्यंत कारागृहवास भोगला होता. राहतें घरच आपणाला खायला येत आहे असें तिला वाटे.

आमचा लढा थंडावत चालला तसे माझे विचार दुसऱ्या देशाकडे वळूं लागले. तुरुंगांत असून आर्थिक मंदीच्या झपाट्यांत सांपडलेल्या जगाचें मीं यथाशक्ति निरीक्षण चालवलें होतें. हाताला सांपडलीं तेवढीं त्या विषयावरील सर्व पुस्तकें मीं वाचून काढलीं, व प्रतिक्षणीं मनाला त्या विषयाची अधिकाधिक गोडी वाटूं लागली. सर्व पृथ्वीवर चालू असलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या राजकीय व आर्थिक लढ्यांनीं युक्त अशा जगन्नाटकाचा, हिंदुस्थानांतील चळवळी व हिंदुस्थानचे प्रश्न हा एक भाग आहे असें दिसूं लागलें. या लढ्याचें निरीक्षण करतां करतां कम्युनिस्टांविषयीं मला अधिकाधिक सहानुभूति वाटूं लागली.

समाजवाद व कम्युनिझम यांच्याकडे फार दिवसांपासून माझा ओढा होता. रशियाकडे माझें मन आकर्षित होई. विरुद्ध मताची सर्वतोपरी मुस्कटदाबी, सर्वत्र सुरू करण्यांत आलेली लष्करी शिस्त व धोरणांची अंमलबजावणी करतांना अनवश्यक ( माझ्या मताप्रमाणें अनवश्यक ) अशी हिंसा वगैरे रशियांतील अनेक गोष्टी मला नापसंत होत्या. पण भांडवलशाही जगांत सुद्धां मुस्कटदाबी आणि अत्याचार यांची कमतरता नव्हती. आपल्या परिग्रही व स्वार्थमूलक समाजाची इमारतच हिंसेवर अधिष्ठित आहे ही गोष्ट क्रमशः माझ्या लक्षांत येऊं लागली. हिंसेशिवाय वर्तमान समाजाची धारणा फार काळ होणेंच शक्य नाहीं. सर्व जगभर उपाशीं पोटाच्या टोंचणीमुळें शेंकडा नव्वद लोकांना मूठभर धनिकांच्या वैभवासाठीं व फायद्यासाठीं त्यांच्या इच्छेप्रमाणें जोंपर्यंत राबावें लागत आहे, तोंपर्यंत एवढें तेवढें राजकीय स्वातंत्र्य असलें काय आणि नसलें काय सारखेंच.

दोन्हीकडे हिंसा होतीच, पण भांडवलदार समाजांत हिंसावृत्ति जन्मजात आहे असें दिसतें. रशियांतील हिंसावृत्ति वाईट खरीच. पण शांतता, सहकार्य व जनतेचें खरें स्वातंत्र्य हीं प्राप्त व्हावींत म्हणून हिंसेचा उपयोग तेथें साधनरूपानें केला जातो.

घोडचुका झाल्या असतील, पण रशियानें प्रबळ अडथळ्यांच्या माथीं पाय देऊन नव्या समाजरचनेच्या दिशेनें झपाट्यानें प्रगति केली व दिग्विजय संपादन केला हें सत्य आहे. बाकीचें जग मंदीच्या जाभाडांत तडफडत असतां, मार्गे हटत चाललें असतां, पाहतां पाहतां सोव्हियट रशियांत नव्या समाजाच्या मंदिराचे मजले चढत जात होते. थोर लेनिनचा मागोवा घेत, भविष्याकडे व पुढें जन्मास येणाऱ्या जगाकडे दृष्टि रोखून, रशियन राष्ट्र मार्ग कापीत चाललें होतें; तर बाकीचे देश इतिहासकालरूपी मृत घटोत्कचाच्या कलेवराखालीं निपचित पडून राहिले होते. अथवा कालाधीन झालेल्या युग-देहाच्या सडक्या अवशेषांचें रक्षण करण्यांतच त्यांची सर्व शक्ति खर्च होत होती. रशियन राजवटींत मध्य आशियांतील मागासलेल्या प्रदेशांनीं जी फार मोठी प्रगति साधली त्यासंबंधींची हकीगत वाचून तर माझ्यावर फारच परिणाम झाला आणि बेरीज-वजाबाकी केल्यावर रशियाच्या बाजूलाच माझें मत पडलें. नैराश्याच्या अंधारानें व्याप्त झालेल्या जगांत रशियानें उदाहरण व सान्निध्य हा एकच तेवता किरण आहे.

कम्युनिस्ट शासनशास्त्राचा एक व्यावहारिक प्रयोग या दृष्टीनें रशियाच्या यशापयशाचें केवढेंहि महत्त्व असलें तरी त्यामुळें कम्युनिस्ट सिद्धांतांच्या पायाशुद्ध-पणावर परिणाम होण्याचें कांहीं कारण नाहीं. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परि-स्थितीमुळें रशियन बोल्शेव्हिकांच्या हातून कदाचित् घोडचुका झाल्या अथवा ते अपेशी ठरले तरीहि कम्युनिस्ट सिद्धांत अचूक ठरण्याचा संभव आहे. देशांतील परिस्थिति व त्या देशाची ऐतिहासिक दृष्ट्या वाढ यांवरूनच कम्युनिस्ट सिद्धांत तेथें कितपत लागू होतात हें ठरवलें पाहिजे, असें खुद्द कम्युनिझमचें शास्त्रच सांगत असल्या कारणानें रशियाची डोळे मिटून नक्कल करणें मूर्खपणाचें ठरेल. शिवाय रशियाला येणाऱ्या यशापयशावरून हिंदुस्थानला अथवा दुसऱ्या कोणत्याहि देशाला बोध मिळवतां येईल. परकीयांच्या आक्रमणाच्या भीतीनें रशियानें आपला गाडा फार वेगानें पिटाळला असें म्हणणें असेल तर आपण जरा धीमेपणानें गाडी हाकावी म्हणजे ग्रामीण जनतेची फरपट निघणार नाहीं. पण मग प्रश्न उपस्थित होतो तो असा कीं मंदगतीनें बदल करूं म्हटलें तर मूलगामी परिवर्तन शक्य होईल कीं नाहीं? मूळ रचनेंतच फरक करणें जेव्हां आवश्यक होऊन बसतें, तेव्हां अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सुधारणावाद पुरा पडत नाहीं. मागाहून किती मंद प्रगति करावयाची असेल ती करा, पण निरुपयोगी झालेल्या व भविष्यकालीन सुधारणेच्या गळ्यांतील लोढणें होऊन बसलेल्या सद्यःस्थितीशीं प्रथमारंभीं एकदम फारकतच करून घ्यावयास हवी.

हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांचा व शेतीचा प्रश्न आणि त्याचप्रमाणें इतरहि मुख्य प्रश्न क्रांतिवादी योजनेनेंच सुटणें शक्य होईल. "महायुद्धाच्या आठवणी" या ग्रंथांत लॉइड जॉर्ज म्हणतात, "खड्डा एका उडीसरशीच ओलांडला पाहिजे, दोन हप्त्यांनीं उडी मारूं असें म्हणणें अत्यंत मूर्खपणाचें आहे."

मार्क्सवादामुळें माझ्या मनाच्या कोनाकोपऱ्यांत दडून राहिलेलें बरेंच अज्ञान-तिमिर नष्ट होऊन इतिहासाला नवा अर्थ प्राप्त झाला. मार्क्सवादाच्या प्रकाशाचा झोत इतिहासाच्या सृष्टीवर पडल्याबरोबर त्याला प्रमाणबद्ध नाट्यकृतीचें स्वरूप प्राप्त झालें व त्याच्या मागे अबोधपूर्व कां होईना कांहीं सूत्रबद्धता व सहेतुकता आहे असें दिसूं लागलें. भूत आणि वर्तमान कालांत कितीहि विध्वंस व पीडा झालेली असो ह्या मध्यंतरींच्या खडतर मार्गानंतरचा भविष्याचा प्रदेश आशारम्य दिसत होता. मार्क्सवादांतील शास्त्रीय दृष्टिकोण व विचारस्वातंत्र्य या दोन गोष्टी मला फार पसत पडल्या. रशियांत व इतर ठिकाणीं शब्दप्रामाण्याची वाढ बऱ्याच प्रमाणांत झालेली असून पाखंडखंडाचें निर्मूलन करण्यासाठीं मोहिमाहि काढण्यांत येत आहेत ही खेदाची गोष्ट आहे. पण सोव्हियट रशियांत प्रचंड फेरबदल इतके झपाट्यानें होत आहेत कीं यशस्वी होण्याइतकी शक्ति विरोधी पक्षांत ठेवली असती तर सरकारी धोरणाचा कदाचित् चुथडा उडाला असता. ही परिस्थिति ध्यानांत घेतल्यावर असहिष्णुता कां वाढली तें समजणें अवघड नाहीं.

जगावर कोसळलेल्या आर्थिक अरिष्टामुळें मार्क्सवादाचें समर्थन झालें. बाकीचीं शास्त्रें व सिद्धांत अंधारांत चांचपडत असतां मार्क्सवादानेंच काय तो या अरिष्टाचा सुसंगत उलगडा करून दाखवला आहे.

मार्क्सवादी विचारसरणीवरील माझी श्रद्धा दृढ होत गेली तसा नवा दृष्टिलाभ झाल्याचा आनंद मनाला होऊन, कायदेभंगाच्या अपेशानें आलेली विषण्णता बरीच कमी झाली. इष्ट ध्येयाकडे जग चाललेलें आहे. मध्यंतरीं युद्धाचीं व विध्वंसाचीं संकटें आहेत खरीं, पण आम्ही पुढें जात आहों, जगाचा प्रवाह तुंबून राहिलेला नाहीं. आमची राष्ट्रीय चळवळ म्हणजे या दीर्घ प्रवासांतील एक टप्पा. दडपशाहीचे व संकटांचे घण सोसून भावी लढ्यासाठीं जनता-मनाचें पोलाद कणखर बनत चाललें होतें व जगाला हलवून सोडणाऱ्या भावनांचें पाणी त्यावर चढत चाललें होतें ही स्थिति इष्ट नव्हे काय? या भट्टींत हीण जळून जाईल व जें उरेल तें बळकट, शिस्तशीर, चिवट असें पोलाद उरेल. काळच आमचा कैपक्षी झाला आहे.

रशिया, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, जपान, चीन, फ्रान्स, स्पेन, इटली व मध्य युरोप या देशांतील घडामोडी मी बारकाईनें पाहत होतों, व जागतिक व्यवहाराची बिकट आढी समजून घेण्याचा प्रयत्न चालवला होता. संकटांतून पार पडण्याचे जे राष्ट्राराष्ट्रांचे सामुदायिक व वैयक्तिक खटाटोप सुरू होते, त्यांच्याकडे मी मोठ्या उत्सुकतेनें पाहत असें. राजकीय व आर्थिक पेंच आणि शस्त्रास्त्रांचा प्रश्न सोडवण्यासाठीं एका मागोमाग एक अशा भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांचे ओंफस झालेले पाहून मला आपल्या देशांतील जातीय प्रश्नांची आठवण झाली. आपल्याला तो प्रश्न अद्यापि सोडवतां आलेला नाहीं. आणि आंतरराष्ट्रीय परिषदा अपेशी ठरल्या तर जगावर संकट गुदरेल ह्याची खात्री असूनहि युरोपांतील व अमेरिकेंतील

पट्टीच्या मुत्सद्द्यांना एकजूट करणें शक्य झालेलें नाहीं. दोन्ही बाबतींत ( जातीय व आंतरराष्ट्रीय ) प्रारंभच चुकलेला आहे. बरें, ज्या जनतेचे हितसंबंध त्या प्रश्नांशीं निगडित झालेले आहेत, त्या जनतेनेंहि रास्त मार्ग स्वीकारण्याची हिम्मत बाळगल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

जागतिक कलहाचे विचार मनांत आले कीं स्वतःच्या व राष्ट्राच्या दुःखाचा कांहीं अंशीं विसर पडे. जागतिक इतिहासांतील अशा क्रांतिकारक घटकेचे आपण साक्षी आहों ह्या जाणीवेनेंच मन केव्हां केव्हां उल्हसित होई. ज्या भव्य घडामोडी होऊं घातल्या आहेत, त्यांसाठीं माझ्या चाहूरभर जागेंत मलाहि कांहीं काम करावें लागेल, नाहीं कशावरून ? कधीं कधीं सर्व जगभर चाललेली झोंबाझोंबी व डोके-फोडी पाहून मन खिन्नहि होत असे. पण गुलामगिरीचीं व मानवी अधोगतीचीं दृश्यें संवयीचीं झाल्यामुळें ज्या सुशिक्षित स्त्री-पुरुषांचीं मनें इतकीं मुर्दाड बनलीं होतीं कीं हालअपेष्टा, दारिद्र्य व अमानुषपणा, यांच्याबद्दल त्यांच्या मनाला चीडच वाटेनाशी झालेली आहे, त्यांच्याकडे पाहून तर अतिशयच उद्वेग वाटे. जीव गुदमरून सोडणाऱ्या या वातावरणांत वायफळ हलकटांची आणि संघटित सोद्यांची चलती चालत आहे आणि सज्जन लोकांना चूप बसणें प्राप्त झालें आहे. हिटलरचा व त्याच्या भुतावळीचा विजय पाहून मनावर जबरदस्त आघात झाला; पण हेहि दिवस जातील असा विवेक करून मीं मनाचें सांत्वन करून घेतलें. कधीं पुरुषप्रयत्नांचें वैफल्य मनाला पटल्यासारखें वाटे. मन म्हणे हें विश्वयंत्र बेगुमानपणें चाललें आहे, आपण क्षुद्र मानव, आपलें तेथें काय चालणार ?

पण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानामुळें मनाला पुन्हां शांति लाभली, आशा पालवूं लागली. हिंदुस्थानाला हें तत्त्वज्ञान कसें लागू करावयाचें ? राजकीय स्वातंत्र्याची समस्या अद्यापि सुटलेली नव्हती. राष्ट्रीय भावनांचा जोर अजून कायम होता. आम्ही आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचीं ध्येयें एका झेंसरशीं गांठावीत कीं राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्य यांपैकीं एकेक हस्तगत करावें ? मग त्या दोहोंमधील कालांचें अंतर किती अल्प असो. जागतिक घडामोडींमुळें व देशांतल्या परि-स्थितीमुळें समाजविषयक प्रश्नांना प्रामुख्य येत चाललें होतें. त्यांची व राजकीय स्वातंत्र्याची फारकत करतां येईल असेंहि वाटेना.

ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळें देशांतील सामजिक दृष्ट्या परागतिक वर्ग राजकीय स्वातंत्र्याच्या मार्गांत अडथळे आणीत होता. असें होणें एक प्रकारें अपरिहार्य होतें. हिंदुस्थानांत वर्गांतील व गटांतील भेद स्पष्ट होत चाललेले पाहून मला बरें वाटलें; पण ही गोष्ट इतरांच्या लक्षांत येत असेल का ? पुष्कळ जणांना ही गोष्ट उमगली नसावी. कांहीं मोठ्या शहरांतून मूठभर कट्टर कम्युनिस्ट होते ते राष्ट्रीय चळवळीवर कठोर टीका करीत असत ही गोष्ट खरी. संघटित असा मजूर-वर्ग, विशेषतः मुंबईचे व कांहीं अंशीं कलकत्त्यांतले मजूर थोड्याबहुत प्रमाणांत

समाजसत्तावादी विचारसरणीचे होते. परंतु मजूर-संघटनेचीं छकलें उडालीं असून आर्थिक मंदीचा टोला तिला चांगलाच जाणवला होता. समाजसत्तावादाविषयींच्या अस्पष्ट कल्पना बुद्धिवन्तांमध्यें व हुशार सरकारी नोकरांमध्येहि पसरलेल्या होत्या. कॉंग्रेसमधील तरुणतरुणी, व्राइस आणि मोर्ले, कीथ आणि मॅझिनी यांच्या-ऐवजीं शक्य असेल तेव्हां समाजवाद व रशिया यांच्यासंबंधीं ग्रंथ वाचीत असत. ह्या नव्या विचारांकडे लक्ष वेधून घेण्याच्या कामीं मिरत-खटल्याचा बराच उपयोग झाला, आणि जागतिक मंदीमुळें तर त्यांचा विचार करणें अवश्यमेव होऊन बसलें. सगळीकडे जिज्ञासावृत्ति व प्रचलित संस्थांविषयीं शंकाभाव प्रकट होऊं लागला. वैचारिक वारे सामान्यतः कोणत्या बाजूनें वाहत होते हें उघडच दिसत होतें; पण ते अजून मंद झुळकीच्या स्वरूपाचे होते. त्यांत सामर्थ्य प्रतीत होत नसे. कांहीं लोक फसिस्ट विचारसरणीशीं देखील लघळपणा करूं लागले होते. परंतु स्पष्ट व निश्चित अशा विचारसरणीची उणीव सगळीकडे दिसून येत असून राष्ट्रीय विचाराचा पगडा अद्यापि कायम होता.

राजकीय स्वातंत्र्य कांहीं प्रमाणांत हस्तगत होईपर्यंत जनतेचें मन राष्ट्रवादा-कडेच ओढ घेत राहणार ही गोष्ट मला स्पष्ट दिसत होती. त्यामुळेंच कॉंग्रेसला हिंदुस्थानांत अत्यंत प्रगतिपर ( कांहीं मजूर संघटना वगळून ) व अत्यंत प्रबळ असें स्वरूप प्राप्त झालें होतें. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं गेल्या तेरा वर्षांत तिनें अभूतपूर्व अशी जागृति जनतेत पसरवली. तिची विचारसरणी मध्यवर्गीय असली तरी क्रान्तिकार्याला तिच्यामुळें साहाय्य झालें होतें. तिची उपयुक्तता अद्यापि नष्ट झाली नसून राष्ट्रीय प्रेरणेच्या जागीं सामाजिक प्रेरणांचें आरोपण होईपर्यंत कॉंग्रेसची उपयुक्तता नष्ट होणें शक्यहि नव्हतें. तेव्हां बहुतांशीं कॉंग्रेस द्वारेच विचारविषयक व कार्यविषयक प्रगति होणें शक्य झालें असतें. अर्थात् या कामीं इतर संस्थांचाहि उपयोग करून घेतां आला असता.

अशा परिस्थितींत कॉंग्रेसचा संबंध तोडणें म्हणजे राष्ट्राच्या जोरदार प्रवाहा-पासून अलग राहिल्याप्रमाणें अथवा आपल्या हातचें अत्यंत प्रभावी शस्त्र बोथट करून टाकल्याप्रमाणें झालें असतें. आणि त्यामुळें निष्फळ साहसकर्मांत स्वतःची शक्ति कदाचित् वायांहि गेली असती. तथापि आहे ह्या स्वरूपांतच कॉंग्रेस राहिली तर मूलगामी असे मार्ग ती कधीं तरी पत्करणें शक्य आहे काय ? असा एकादा मार्ग स्वीकारण्याची वेळ आली तर कॉंग्रेसमध्यें दोन अथवा अधिक गट पडतील, निदानपक्षीं बरेच लोक कॉंग्रेसमधून फुटून निघतील ही गोष्ट उघड दिसत होती. अर्थात् अशा प्रसंगीं देशापुढील प्रश्नाचें स्वरूप अधिक स्पष्ट होणार असेल अथवा उत्कृष्ट प्रकारें संघटित असा बहुसंख्य अथवा अल्पसंख्य गट मूलग्राही सामाजिक कार्यक्रमासाठीं लढण्यास सिद्ध होणार असेल, तर कॉंग्रेसमध्यें फूट पडली म्हणून फारसें बिनसलें असें म्हणण्याचें कारण नाहीं.

परंतु सध्यां तरी कॉंग्रेस म्हणजे गांधीजी असा प्रकार दिसत होता. ते कोणतें धोरण आंखतील? कधीं कधीं विचारसरणीच्या बाबतींत ते इतके मागासलेले असत कीं त्यांचें आश्चर्य वाटे. पण प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदुस्थानांत त्यांच्याएवढा क्रांतिकारक झाला नाहीं असें कबूल करावें लागेल. गांधीजी ही व्यक्ति असामान्य कोटींतील असल्यामुळें नेहमींच्या मापानें त्यांना मोजणें अथवा नेहमींच्या तर्कवादाचा आश्रय करून त्यांची विचारसरणी जोखणें शक्य होणार नाहीं. स्वभावानें ते बंडखोर असल्यामुळें व राजकीय स्वातंत्र्याशीं ते वचनबद्ध झालेले असल्याकारणानें स्वातंत्र्य मिळेपर्यंत निकारानें झुंज करणें त्यांना प्राप्त होईल आणि ही क्रिया सुरू असतां जनतेच्या अचाट सामर्थ्याचे प्रवाह निर्माण होऊन खुद्द गांधीजीसुद्धां हळूहळू सामाजिक ध्येयाकडे वळतील अशी माझ्या मनाला आशा वाटत होती.

हिंदुस्थानांतल्या व बाहेरच्या कट्टर कम्युनिस्टांनीं गेलीं कित्येक वर्षे गांधीजी व कॉंग्रेस ह्यांच्यावर दांतओंठ खाऊन हल्ले चढवलेले असून कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांवर त्यांनीं नीच हेतूंचे आरोपहि केलेले आहेत. कॉंग्रेसच्या विचारसरणीसंबंधी त्यांची बहुतेक शास्त्रीय टीका अत्यंत मार्मिक व मुद्देसूद असे. त्यांच्या टीकेंतील अचूकपणा नंतरच्या काळांत कांहीं अंशीं सिद्ध झालेला आहे. कम्युनिस्टांनीं हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीसंबंधीं सुरुवातीला केलेलें पृथक्करण बरेंच अचूक ठरलें आहे. पण सर्वसामान्य तत्त्वांचें विवेचन सोडून तपशिलाचा विचार सुरू झाला, आणि विशेषतः कॉंग्रेसच्या कार्यासंबंधींचें विवेचन ते करूं लागले कीं त्यांचे कयास साफ चुकूं लागतात. कम्युनिस्टांचें संख्याबल व त्यांचें वजन इतकें क्षुल्लक राहण्याचें एक कारण असें आहे कीं, कम्युनिझमसंबंधीं शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करून लोकांचीं मनें वळवण्या-ऐवजीं त्यांनीं आपली बहुतेक शक्ति इतरांवर आग पाखडण्यांतच खर्च केली. ह्या चुकीचें प्रायश्चित्त त्यांना भोगावें लागलें, व त्यामुळें त्यांचें पुष्कळसें नुकसानहि झालें. कम्युनिस्टांपैकीं बहुतेकांनीं मजूरवर्गांत कार्य केलेलें आहे. तेथें चार दोन घोषणांवर काम भागतें. पण पांढरपेशा वर्गांत तेवढ्या सामुग्रीवर निभाव लागणार नाहीं. या देशामध्यें सांप्रत काळीं बुद्धिजीवि मध्यमवर्ग हा अत्यंत क्रांतिप्रवण वर्ग आहे ही गोष्ट त्यांना समजलेली दिसत नाहीं. असेंहि म्हणतां येईल कीं कट्टर कम्युनिस्टांच्या विरोधी सिद्धांतांना न जुमानतांच पुष्कळशा बुद्धिजीवि लोकांनीं कम्युनिझमचा स्वीकार केलेला आहे.

कम्युनिस्टांच्या मताप्रमाणें जनतेच्या शक्तीचें दडपण सरकारवर आणून हिंदी भांडवलदार व जमीनदार यांच्यासाठीं चार सवलती मिळवाव्या हें कॉंग्रेस-पुढाऱ्यांचें उद्दिष्ट आहे. कॉंग्रेसचें साध्य काय? तर "शेतकरी, कनिष्ठ मध्यमवर्ग, व मजूर यांच्यामध्यें भाजलेला आर्थिक व राजकीय असंतोष मुंबई, अहमदाबाद व कलकत्ता येथील भांडवलवाल्यांच्या गाड्यांस जुंपणें." कम्युनिस्टांच्या कल्पनेप्रमाणे

हिंदी भांडवलदार पडद्याआड बसून राहतात आणि कॅाँग्रेस वर्किंग कमिटीला पहिला हुकुम सोडतात कीं सामुदायिक चळवळ सुरू करा, आणि सामुदायिक चळवळ फार फोफावली व तिचें स्वरूप अतिशय उग्र झालें कीं लगेच दुसरा हुकुम सोडतात कीं आतां ती बंद करा अगर तिला निराळ्याच मार्गावर न्या. त्यांची अशीहि कल्पना आहे कीं ब्रिटिश लोक येथून जावे अशी कॅाँग्रेसच्या पुढाऱ्यांची मनापासून इच्छा नाहीं. अर्धपोटी जनतेचें नियंत्रण करण्याचें व तिची पिळवणूक चालू ठेवण्याचें काम येथील मध्यमवर्गाला झेपावयाचें नाहीं, यासाठीं कॅाँग्रेसला ब्रिटिशांचें वास्तव्य हवेंसें वाटतें, असा बुद्धिवाद कम्युनिस्ट करीत असतात.

या विचित्र मीमांसेवर अधिकारी कम्युनिस्टांचा विश्वास बसावा ही नवलाची गोष्ट होय. पण ज्यांचा असल्या कल्पनाभारुडावर विश्वास बसला ते हिंदुस्थानांत अपेशी ठरले तर त्यांत मात्र कांहीं नवल नाहीं. मूलभूत चूक अशी कीं हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळ ते युरोपांतील मजूर-चळवळीच्या मापानें मोजतात. तेथील मजूर-पुढाऱ्यांनीं चळवळीचा विश्वासघात केला त्यांचाच दाखला ते कॅाँग्रेसच्या पुढाऱ्यांनाहि लागू करतात. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळ मजुरांची अथवा वर्गजागृत कामकऱ्यांची चळवळ नव्हे ही गोष्ट स्पष्टच आहे. ती मध्यमवर्गीयांचीच चळवळ असून सामाजिक रचना बदलणें हें तिचें ध्येय नाहीं. तिचें ध्येय राजकीय स्वातंत्र्य आहे ही गोष्ट ' राष्ट्रीय सभा ' ह्या नांवावरूनसुद्धां कळून येईल. हें ध्येय मूलगामी नाहीं, आधुनिक काळांत राष्ट्रवाद हा शिळा झाला आहे अशी टीका हवी तर करावी, पण चळवळीचा मूळ पाया मान्य केल्यानतर कॅाँग्रेसचे पुढारी ज्या अर्थी जमीनदारी अथवा भांडवलदारी पद्धतींत उलथापालथ करीत नाहींत, त्या अर्थी ते जनतचा विश्वासघात करतात असें म्हणणें मूर्खपणाचें आहे. अशा उलथापालथी आम्ही करूं अशी प्रतिज्ञा त्यांनीं कधीं केलीच नव्हती. जमीनदारी व भांडवलदारी पद्धतींत फेरबदल करावा अशा मताचे कांहीं लोक कॅाँग्रेसमध्यें आहेत व त्यांचें संख्याबल वाढतहि आहे. परंतु कॅाँग्रेसतर्फे अधिकृत रीत्या बोलण्याचा हक्क त्यांना अद्यापि प्राप्त झालेला नाहीं.

हिंदी भांडवलदारांचा ( बड्या जमीनदारांचा व तालुकदारांचा नव्हे ) राष्ट्रीय चळवळीपासून व परदेशी बहिष्कारापासून बराच फायदा झाला ही गोष्ट खरी आहे. परंतु कोणत्याहि राष्ट्रीय चळवळींत असें घडणारच. मुंबईच्या गिरणीसंघानें तर कायदेभंग व ब्रिटिश मालाचा बहिष्कार सुरू असतां लँकेशायरबरोबर तह करण्याची बहादुरी गाजवून दाखविली ! ह्या त्यांच्या कृत्यामुळें स्वातंत्र्याच्या लढ्याचा घात झाला असें कॅाँग्रेसला वाटलें व कॅाँग्रेसनें तसें स्पष्ट शब्दांत बोलूनहि दाखविलें. मुंबईतील गिरणी-मालकांच्या असेंब्लींतील प्रतिनिधीनें आमच्यापैकीं बहुतेक जण तुरुंगांत असतांना कॅाँग्रेसची व इतर जहाल लोकांची बदनामी करण्याचें कार्य देखील अव्याहत चालू ठेविलें होतें.

गेल्या कांहीं वर्षांत हिंदी भांडवलदारांनीं जें धोरण प्रकट केलें आहे, त्याच्याकडे कॉंग्रेसच्या व राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें पाहिलें तरीहि तें निंद्यच ठरतें. ओटावा-करारामुळें कांहीं गटांचा तात्कालिक फायदा झाला असला तरी एकंदरींत हिंदी उद्योगधंद्यांचें त्यामुळें नुकसान झालेलें असून त्यांच्यावर ब्रिटिश भांडवल व ब्रिटिश कारखाने यांचा अधिकच पगडा बसला आहे. हजारों लोक तुरुंगांत पडलेले होते, व राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू होती तेव्हां जनतेला अहितकारक अशा ह्या करारनाम्यावर सह्या करण्यांत आल्या. प्रत्येक वसाहतीनें इंग्लंडकडून अत्यंत कडक अशा अटी कबूल करून घेतल्या, परंतु हिंदुस्थानचें भाग्य काय विचारावें! त्यानें इंग्लंडकडे नजराण्याचीं तबकेंच्या तबकें पोंचविलीं. आणि गेलीं कांहीं वर्षें जनतेच्या हिताहिताची पर्वा न करितां येथील भांडवलदार सोन्यारुप्याचे सट्टे खेळत आहेत.

मोठया जमीनदारांविषयीं व तालुकदारांविषयीं विचार करावयाचा तर मंडलाकार परिषदेमध्यें त्यांनीं आपलें सर्व बळ कॉंग्रेसच्या विरुद्ध पारड्यांत रिचवलें व कायदेभंगाच्या काळांत आपण सरकारच्या बाजूचे आहोंत असें छातीठोकपणें त्यांनीं जाहीरहि केलें. अनेक प्रांतांतून सरकारनें दडपशाहीचे कायदे पास करून घेतले ते त्यांच्याच साहाय्यानें. सं. प्रां. कायदे मंडळांत असलेल्या जमीनदारांच्या प्रतिनिधींपैकीं बहुसंख्य लोकांनीं सत्याग्रही कैद्यांच्या मुक्ततेविरुद्ध मतें दिलीं होतीं.

जनतेचें दडपण आल्यामुळें वरवर चढाईची दिसणारी चळवळ गांधीजींना १९२१ व १९३० सालीं सुरू करावी लागली, ही कल्पना साफ चुकीची आहे. जनतेंत खळबळ होती हें खरें; पण दोन्ही वेळां जनतेला चालना दिली ती गांधीजींनींच. १९२१ सालीं तर त्यांनीं एकटयाच्या बळावर कॉंग्रेसला असहकारितेकडे खेंचून नेलें. आणि कोणत्याहि प्रकारें त्यांनीं विरोध दर्शविला असता तर चढाईची व परिणाम-कारक अशी कसलीहि चळवळ करणें १९३० सालींसुद्धां अशक्य झालें असतें.

वेडीविद्री वैयक्तिक टीका करण्यांत येतें हें दुर्दैव होय. कारण त्यामुळें खऱ्या प्रश्नांतील लक्ष उडून तें दुसरीकडे वेधलें जातें. गांधीजींच्या शुद्ध हेतू-बद्दल शंका घेणें म्हणजे आपणच आपल्या पंथाचें मातेरें करून घेण्यासारखें आहे. कारण सत्याची प्रति मूर्ति म्हणून त्यांना लाखों लोक समजतात, आणि सत्य तितकें आचरण्यासाठीं ते किती जीव तोडून प्रयत्न करीत असतात तें त्यांच्या दृढ परिचयाच्या हरएक माणसाला चांगलें ठाऊक झालेलें आहे.

मोठया शहरांतील मजुरांशींच हिंदी कम्युनिस्टांचा संबंध आल्यामुळें खेडेगांवांची त्यांना फारच थोडी माहिती आहे. हिंदी कामगारांचें लढ्यांतील स्थान महत्त्वाचें आहे व त्यांचें महत्त्व इत्युत्तर वाढतहि जाईल. तथापि सध्यां तरी त्यांना शेतकऱ्या-नंतरचेंच स्थान पत्करिलें पाहिजे. कारण, आज शेतकऱ्यांचाच प्रश्न हिंदुस्थानपुढें प्रामुख्यानें आहे. कॉंग्रेसचे प्रचारकहि सर्व देशभर पसरलेले आहेत. कॉंग्रेसची

प्रगति होत होत तिला प्रचंड अशा शेतकरी संघटनेचें स्वरूप प्राप्त व्हावें हेंच क्रमप्राप्त होय. शेतकऱ्यांचें निकटवर्ती ध्येय साध्य झालें कीं, त्यांचें क्रांतिकारक स्वरूप नष्ट होत असतें. शहर विरुद्ध खेडीं व कामगार विरुद्ध शेतकरी हा नेहमींचा लढा भविष्यकाळीं हिंदुस्थानांत कदाचित् उपस्थित होईलहि.

काँग्रेसच्या कार्यकर्त्यांपैकीं व पुढाऱ्यांपैकीं पुष्कळ लोकांशीं परिचय घडून येण्याचें भाग्य मला लाभलेलें आहे. त्यांच्याहून उमदीं माणसें भेटणें दुरापास्त आहे असें मला वाटतें. तरीहि अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत त्यांचे-माझे मतभेद होतात व मला इतक्या उघड उघड दिसत असलेल्या गोष्टी त्यांना आकलन होऊं नयेत, अथवा त्यांचें महत्त्व त्यांना वाटूं नये हें पाहून माझें मन केव्हां केव्हां उद्विग्नहि होतें. बुद्धिमांद्याचा ह्यांत कांहीं संबंध नाहीं. निरनिराळ्या विचार-पद्धतींच्या चाकोरींतून आमच्या गाड्या चालत आहेत हेंच आमच्यांतील मतभेदाचें कारण होय. एकदम चाकोरी बदलणें किती अवघड असतें बरें? दुसऱ्या पक्षाला दोष देण्यांत तात्पर्य नाहीं. समाजवाद म्हटला कीं जीवनाकडे व जीवनांतील समस्येकडे पाहण्याचा एक मानसिक दृष्टिकोण त्यांत समाविष्ट झालेला असतो. समाजवादाची व्याप्ति केवळ तर्कशास्त्रापुरतीच नाहीं. जीवनाचे खडतर अनुभव आपणांस नव्या मार्गावर बळेंच ओढून नेतात आणि सरते शेवटीं भिन्न विचारसरणीचा स्वीकारहि आपण करतों. पण हें सारें घडत असतां किती कष्ट पडतात. या मतपरिवर्तनाच्या कामीं आपणाला कदाचित् अल्पस्वल्प साहाय्यहि करतां येईल. आणि एका फ्रेंच सुभाषितांत सांगितल्याप्रमाणें कदाचित् असेंहि घडेल कीं :

" दैवा ठकवाया एक्या मार्गें जावें
दैवानें गांठावें त्याच मार्गीं. "

## ४७

# धर्म म्हणजे काय ?

आमच्या शांत व सरळसूत अशा तुरुंगांतील जीवनांत १९३२ सप्टेंबरच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यांत एकाएकीं बॉंबगोळा पडावा त्याप्रमाणें खळबळ उडून गेली. रॅम्से मॅक्डोनल्डच्या जातिनिर्णयामुळें हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्यांत आले या गोष्टीचा निषेध म्हणून "प्राणान्तिक उपवास" करण्याचें गांधीजींनीं ठरविलें आहे अशी बातमी येऊन थडकली. लोकांना धक्के देण्याचें अचाट सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें ! माझ्या डोक्यांत हजारों विचारांचें काहूर माजलें. किती तरी संभाव्यता, किती तरी अडचणी डोळ्यांपुढें दिसूं लागल्या व माझ्या मनाची शांति पार लयाला गेली. दोन दिवस माझ्याभोंवतीं अंधाराचें राज्य पसरलें होतें. प्रकाशाचा एक किरणहि तेथें फिरकेना, मग मार्ग न्याहाळणार कोठून ? खाजगी स्नेहाची ओढ तर विलक्षणच होती. गांधीजी पुनः आपल्या दृष्टीस पडणार नाहींत असें मनांत आलें कीं वेदना होत. एका वर्षापूर्वीं त्यांनीं इंग्लंडच्या बोटीवर पाय ठेवला तेव्हां मीं त्यांना पाहिलें, तेंच अखेरचें दर्शन ठरणार का ?

त्यांनीं मतदारसंघासारख्या किरकोळ मुद्द्यावर अंतिम बलिदान करण्यास तयार व्हावें यामुळें मला त्यांचा राग आला. आमच्या स्वातंत्र्याच्या चळवळीवर त्याचा काय परिणाम होईल ? जिव्हाळ्याचे प्रश्न कांहीं काळ तरी मागें पडणार नाहींत का ? आणि समजा त्यांना हवी ती गोष्ट मिळाली, हरिजनांना संयुक्त मतदार संघ देण्यांत आला तर काय घडून येईल ? आपण कांहीं तरी मिळविलें, आतां सध्यां तरी अधिक चळवळ करण्याचें कारण नाहीं अशी भावना लोकांत प्रसृत होणार नाहीं का ? आणि मग सरकारच्या जातिनिर्णयाचा व एकंदर धोरणाचा आपण स्वीकार केला असेंच नाहीं का ठरणार ? असहकार व कायदेभंग यांशीं हें वर्तन कितपत सुसंगत आहे ? त्यागाच्या आणि वीरोचित प्रयत्नांच्या समुद्रांत आजवर आम्हीं अवगाहन केलें; आतां सरते शेवटीं असल्या क्षुल्लक गोष्टींच्या डबक्यांत डुंबत राहण्यांत आम्ही धन्यता मानावी काय ?

राजकीय प्रश्नांत धर्म व भावना यांची मिसळ करावयाची व पदोपदीं देवाचें नांव घेत असावयाचें ही गोष्ट मला मुळींच पसंत पडत नसे. त्यांच्या बोलण्यावरून असें वाटावें कीं, उपवासाची तिथीदेखील जणूं कांहीं ईश्वरानेंच त्यांच्या कानांत सांगितली होती. ही किती अनिष्ट प्रथा ते पाडीत होते !

पण बापू जर अंतरले तर? हिंदुस्थानची मग काय अवस्था होईल? राजकारण कसें चालेल? पुढचा काळ भयाण व तमोमय दिसूं लागला आणि माझें अंतःकरण निराशेनें व्याप्त होऊन गेलें.

विचार कर कर केला, पण डोक्यांत सगळा गोंधळ माजला होता. संतापाचे आणि विषादाचे भाव दाटले होते; आणि या मनस्तापाला कारणीभूत झालेली जी व्यक्ति तिच्याविषयीं वाटणाऱ्या प्रेमाच्या लहरीहि त्यांतच मिसळत होत्या. काय करावें तें सुचेना. सर्वांशींच व विशेषतः स्वतः माझ्याशीं मी तुसडेपणानें वागूं लागलों.

इतक्यांत एक विलक्षण गोष्ट घडून आली. भावनांचें वादळ होऊन गेल्यावर हृदयाकाश जरा प्रसन्न झालें आणि भविष्यकाळ पूर्वीइतका अंधकारमय वाटेना. लोकांच्या मनःस्थितीचा अचूक अंदाज बांधून योग्य तीच गोष्ट करण्याची कला बापूजींच्या अंगीं होती. माझ्या दृष्टीनें असमर्थनीय असलेलें त्यांचें हें कृत्य केवळ तात्कालिक राजकीय उद्दिष्टाच्या संकुचित क्षेत्रांतच नव्हे तर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या विस्तीर्ण क्षेत्रांतहि बहुपरिणामी ठरणारें असेल. आणि समजा बापूंना मृत्यु आला, तरीहि आमचें हें युद्ध चालू राहणारच. तेव्हां कांहींहि घडो, आपण तयारीनें राहिलें पाहिजे. गांधीजींना मृत्यु आला तरी धीर गमवायचा नाहीं असा मनाचा धडा केल्यावर कोलाहल शांत झाला आणि जगांत कोणतेंहि संकट आपणावर गुदरलें तरी त्याला तोंड देण्याइतकें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे अशी हिंमत वाटूं लागली.

गांधीजींच्या उपवासानें सर्व देशभर अपूर्व अशी खळबळ माजून एकाएकीं हिंदु समाजांत उत्साहाची एवढी प्रचंड लाट उसळली कीं, तिच्या धक्क्यानें अस्पृश्यता मुळासकट उलथून पडणार असें वाटूं लागलें, येरवड्याच्या तुरुंगांत बसलेल्या या लहानशा मूर्तीच्या हातांत केवढी जादू आहे, लोकांचीं अंतःकरणें हालवून सोडण्याची काय विलक्षण हातोटी तिच्या ठायीं आहे, असें मला वाटलें!

त्यांनीं मला एक तार पाठविली. माझ्या शिक्षेनंतर त्यांनीं मला पाठविलेला हा पहिलाच संदेश. तारेंत पुढीलप्रमाणें मजकूर होता :

"ह्या आत्यंतिक यातनेच्या काळांत डोळ्यांना तुमची मूर्ति दिसत होती. उपवासासंबंधीं तुमचें मत काय आहे तें जाणण्याची माझी फार इच्छा आहे. तुमचें मत मला किती मोलाचें वाटतें तें तुम्हाला माहिती आहेच. इंदु व सरूपचीं मुलें भेटावयास आलीं होतीं. इंदु आनंदांत आहे. गालहि जरा वर आलेले दिसले. माझी प्रकृति छान आहे. उत्तर तारेनें यावें. सप्रेम आशीर्वाद."

उपवासाच्या यातना होत असतां व इतर अनेक व्यवधानें सांभाळावयाचीं असतां माझी मुलगी व माझ्या बहिणीचीं मुलें भेटावयास आलीं होतीं वगैरे गोष्टी त्यांनीं लिहाव्या, इतकेंच नव्हे तर इंदिरा थोडी लठ्ठ झाली आहे असाहि उल्लेख केल्याशिवाय राहूं नये हें किती विलक्षण! पण त्याचबरोबर गांधीजींच्या स्वभावाला

किती अनुरूप ! जीवनांतील दिसावयाला क्षुल्लक पण महत्त्वानें मोठ्या गोष्टी गांधीजींच्या नजरेंतून कधींहि सुटावयाच्या नाहींत.

मतदारसंघासंबंधीं कांहीं तरी तडजोड ठरल्याची बातमीहि मला त्याच वेळीं कळली. सुपरिंटेंडेंटच्या मेहरबानीमुळें मला गांधीजींना तारेनें उत्तर पाठवितां आलें. मी असें लिहिलें होतें:

" तुमची तार व तडजोडीसंबंधीं त्रुटित बातमी समजली त्यामुळें फार समाधान व आनंद वाटला. तुमच्या प्राणांतिक उपवासाची बातमी प्रथम कळली तेव्हां मानसिक यातना होऊन गोंधळ उडाला, पण अखेरीस आशावादाची सरशी होऊन मन शांत झालें. पददलित वर्गासाठीं करावा तो त्याग थोडाच आहे. खालच्यांतल्या खालच्या वर्गांना मिळणाऱ्या स्वातंत्र्यावरूनच राष्ट्रीय स्वातंत्र्याची किंमत ठरविली पाहिजे. पण एकमेव ध्येय इतर प्रश्नांच्या गर्दींत अदृश्य होईल कीं काय अशी चिंता वाटते. धार्मिक दृष्ट्या विचार करणें मला शक्य नाहीं. तुमच्या साधनांचा इतर लोक दुरुपयोग करतील ही भीति आहेच. पण तुमच्यासारख्या किमयागाराला मी कोण उपदेश करणार ? सप्रेम नमस्कार. "

पुण्याला जमलेल्या मंडळींच्या तडजोडीवर सह्या होऊन ब्रिटिश मुख्य प्रधानानेंहि कधींहि न दाखविलेल्या तत्परतेनें ती मान्य केली व तदनुरूप जातिनिर्णयांत फरक करण्यांत आला. गांधीजींनीं उपवास सोडला. मला असे तह व तडजोडी फारशा पसंत पडत नाहींत; पण आंतील कलमांचा विचार सोडून दिला तर पुण्याची तडजोड मला पसंत पडली असें म्हटलें पाहिजे.

गडबड थांबली, आणि तुरुंगांतील जीवनाचें रहाटगाडगें पुनः फिरूं लागलें. हरिजनचळवळीविषयींच्या व गांधीजींच्या तुरुंगवासांतील कार्यक्रमाविषयींच्या बातम्या आम्हांला कळत, पण त्यांपासून मला फारसा आनंद होत नसे. अस्पृश्यता-निवारणाची व अस्पृश्योद्धाराची चळवळ झपाट्यानें पुढें भरारली यांत शंका नाहीं. तें इष्टच होतें. पण त्यामुळें कायदेभंगाचा जोर हटला हें निःसंशय. देशाचें लक्ष दुसरीकडे लागलें व अनेक कॉंग्रेस-कार्यकर्त्यांनीं हरिजनकार्य हातीं घेतलें. तुरुंगवास आणि विशेषतः लाठीमार व जप्त्या हीं अरिष्टें टाळण्यासाठीं या लोकांपैकीं बहुतेकांस कांहीं तरी निमित्त हवें होतें. गोष्ट स्वाभाविक होती; कारण हजारों कार्यकर्त्यांनीं घरादारांची राखरांगोळी करून आत्यंतिक दडपशाही एकसारखी सहन करीत राहावें अशी अपेक्षा तरी कशी करतां येईल ? असें असलें तरी राष्ट्रीय चळवळीचा हळूहळू होणारा हा अधःपात पाहून मनाला विषाद वाटे. इकडे कायदेभंग चालू होताच. १९३३ च्या कलकत्ता-कॉंग्रेसप्रमाणें कांहीं लाटाहि मधूनमधून उठत असत. हरिजन-कार्यासाठीं गांधीजींना तुरुंगांत कांहीं सवलती मिळाल्याकारणानें त्यांच्या कारागृहवासामुळें मनाला बोंचत राहणारें शल्यहि पूर्वींप्रमाणें बोंचेनासें झालें. ह्या सर्व बनावामुळें माझ्या मनाचा हिरमोड होऊन गेला.

नंतर बऱ्याच महिन्यांनीं म्हणजे १९३३ च्या मे मध्यें गांधीजींचा एकवीस दिवसांचा उपवास सुरू झाला. त्याहि वेळीं प्रथम बातमी कळतां क्षणींच मनाला धक्का बसला; पण हे प्रसंग अपरिहार्य समजून मीं मन घट्ट केलें होतें. त्यांनीं एकदां निश्चय जाहीर केल्यावर लोकांनीं उपवास सोडण्यासाठीं त्यांना गळ घालावी ह्याचीच मला चीड आली. उपवास म्हणजे मला गौडबंगाल वाटे. त्यांचा निश्चय होण्यापूर्वीं माझें मत विचारलें असतें तर मीं खात्रीनेंच जोराचा विरोध केला असता. पण गांधीजींच्या शब्दाला फार किंमत आहे असें माझें मत असल्याकारणानें त्यांना शब्द परत घ्यावयास लावणें चुकीचें आहे अशी माझी समजूत होती. शिवाय ते करीत असलेली गोष्ट स्वत: त्यांना अपरंपार महत्त्वाची अशी वाटत होती.

उपवासास आरंभ होण्यापूर्वीं कांहीं दिवस आधीं त्यांनीं मला वैशिष्टय-निदर्शक असें एक पत्र लिहिलें. तें वाचून माझें मन विरघळून गेलें आणि मीं पुढीलप्रमाणें तार केली.

" पत्र पावलें. कळत नाहीं त्या गोष्टीबद्दल काय लिहिणर ? अपरिचित अशा प्रदेशांत माझी वाट चुकली आहे. अंधारांत चांचपडत पुढें जाण्याचा प्रयत्न मी करीत आहें, पण पावलें ठेंचाळत आहेत. ह्या रानांत परिचित असे काय ते तुम्हीच. कांहींहि घडो, तुमच्याबद्दलचें प्रेम व तुमच्याविषयींचे विचार मनांतून नाहींसे होणार नाहींत. "

त्यांच्या कृत्यांबद्दलच्या तीव्र नापसंतीचा विचार मीं आवरता घेतला. तरीहि त्यांना आनंददायक असा संदेश आपण पाठविला नाहीं. भयंकर अशा दिव्यांतून जाण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे, कदाचित् ते मृत्युमुखींहि पडतील तेव्हां त्यांच्या मनाला संतोष वाटेल असा संदेश पाठवलाच पाहिजे; या दिव्यांतून बाहेर पडावयाचें तर सर्व शक्ति एकवटून झुंजावयास हवें; अशा प्रसंगीं लहान दिसणाऱ्या गोष्टींचा मनावर फार परिणाम होत असतो. कांहींहि घडलें, त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकावी लागली, तरी आपण धीर धरून सारें सहन केलें पाहिजे, असे अनेक विचार मनांत येऊं लागले. म्हणून मीं पुन: एक तार केली:

" फार मोठ्या संकटमय अशा प्रवासांतलें पहिलें पाऊल तुम्हीं टाकिलें आहे. या प्रसंगीं मी पुनश्च आपलें सप्रेम अभिनंदन करतों. परिणाम कांहींहि घडला तरी उत्तम असें फळच त्यापासून मिळेल व कांहींहि झालें तरी तुम्हींच यशस्वी व्हाल असें मला वाटूं लागलें आहे याची खात्री असूं द्यावी. "

उपवास पार पडला. पहिल्याच दिवशीं त्यांना तुरुंगांतून सोडून देण्यांत आलें व गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणें कायदेभंग सहा आठवड्यांपर्यंत तहकूब करण्यांत आला.

देशामध्यें पुन: भावनांना पूर लोटला आणि हे प्रयोग राजकीय दृष्टया बरोबर आहेत कीं नाहींत अशा विचारांत मी पडलों. ही केवळ धर्मपुनरुज्जीवनाची

चळवळ होती. तर्कशास्त्राला तिचा प्रवाह क्षणभर देखील थोपवतां आला नसता. सारा देश त्या महात्म्याकडे आदरपूर्ण दृष्टीनें पाहत राहिला होता. चमत्कारामागून चमत्कार ते करून दाखवतील, अस्पृश्यता ते नष्ट करतील, स्वराज्य मिळवतील आणि अशाच इतर अनेक गोष्टी घडतील अशी जनतेची अपेक्षा होती. स्वतः मात्र थोडेंसुद्धां काम करण्याची लोकांची तयारी नव्हती, आणि इतरांनीं विचार करावा असा गांधीजींचाहि आग्रह नव्हता. आत्मशुद्धि व त्याग यांच्यावर त्यांचा सगळा भर. गांधीजींबद्दल माझ्या मनांत कितीहि प्रेम असलें, तरी विचारदृष्ट्या मी त्यांच्यापासून लांब लांब चाललों आहें असें मला वाटूं लागलें. राजकीय चळवळींत ते आपल्या बिनचूक अशा स्वाभाविक प्रेरणांचा पुष्कळदां कौल घेत. कार्य करण्याची ईर्षा देखील त्यांच्या अंगीं मुबलक होती. परंतु राष्ट्राला शहाणें करावयाचें असेल तर श्रद्धेच्या मार्गाची शिकवण देणें योग्य ठरेल काय ? कांहीं काळ त्यापासून फायदाहि होईल, पण अखेरीस काय ?

शिवाय मला हेंहि कळेना कीं हिंसा व कलह यांवर आधारलेली चालू समाजघटना ते कशी मान्य करतात ? तुरुंगांतून बाहेर पडलों कीं माझ्यापुढें संकटें उभीं राहणार ह्याची मला जाणीव होती. पण आतां मी एकाकी आणि पोरका झालों आहें असें मला वाटूं लागलें. ज्या हिंदुस्थानच्या चरणीं मी माझें प्रेम अर्पण केलें, ज्याच्या उन्नतीसाठीं मी खपलों, तो हिंदुस्थान मला एकाद्या अपरिचित प्रदेशाप्रमाणें वाटूं लागून माझ्या मनाचा गोंधळ उडाला. माझ्या देशबांधवांची विचारधारा व त्यांची अंतःकरणप्रवृत्ति मला मान्य होत नाहीं हा माझाच दोष असेल काय ? अगदीं निकटचे सहकारी व मी यांच्यामध्यें डोळ्यांना न दिसणारा एक प्रचंड तट उभा राहिलेला आहे, त्यावरून आपल्याला पलीकडे जातां येणार नाहीं असे विचार डोक्यांत येऊन मन खिन्न झालें कीं तें भ्यालेल्या गोगलगाईप्रमाणें सर्व बाजूंनीं आक्रसून जाई. जुनी विचारसरणी, जुन्या आशा, जुन्या आकांक्षा, एकंदरींत जीर्ण जगाचेंच वातावरण आपल्या सहकाऱ्यांभोंवतीं पसरलेलें आहे असें मला वाटत असे. आणि मला हवें असलेलें नवें जग ? तें तर अद्यापि किती तरी दूर होतें.

" नाहिं कुठें टेकाया मस्तक हें थारा
एक नष्ट होय जगत
न दुजें जनना समर्थ
चालति या दोहोंमधिं सतत येरझारा । "

हिंदुस्थान हा धर्मप्रधान देश आहे असा समज प्रचलित आहे. एकमेकांचीं टाळकीं सडकून हिंदु, मुसलमान व शीख आपापला धर्मावरील विश्वास जगजाहीर करीत असतात. धर्माचें संघटित स्वरूप हिंदुस्थानांत व इतरत्र जें माझ्या दृष्टीस पडलें, त्यामुळें मला तर तिरस्कारयुक्त भीति वाटूं लागली आहे. अशा धर्माचा मीं अनेकवार निषेध केलेला असून त्याचा निःपात केला पाहिजे असें माझें मत आहे.

धर्माच्या नांवाखालीं बहुतेक वेळां अन्धश्रद्धा आणि प्रगतिपराङ्मुखता, कर्मठपणा आणि कडवेपणा, प्रज्ञाहतवृत्ति, पिळवणूक, आणि स्वार्थरक्षण यांचाच धांगडधिंगा सुरू असलेला दिसतो. तथापि मनुष्याच्या अंतरंगांतील एक खोल दडलेली तहान ज्यामुळें तृप्त होईल असें कांहीं तरी धर्मांत आहे हें मी ओळखून आहें. वेदनापीडित असंख्य जीवांना त्यानें शांतविलें, सुखविलें, आणि अचाट शक्तिसामर्थ्य संपादन केलें तें एरवीं कसें शक्य झालें असतें? ती शक्ति व तें सुख, अंधश्रद्धेच्या व संशयाभावाच्या आडोशाला बसल्यामुळेंच प्राप्त झालें आहे काय? उघड्या समुद्रावरील वादळापासून अन्धश्रद्धेच्या बंदरांत मुक्काम केला म्हणजे बचाव होतो, ह्या कल्पनेंतूनच त्या मनःशांतीचा उद्भव झाला असेल का? कीं धर्मामुळें प्राप्त होणाऱ्या मानसिक शांतीमध्यें अधिक कांहीं तथ्यांश आहे? कांहीं व्यक्तींकडे पाहून तरी त्या मनःशांतींत सत्त्वांश असेल असा ग्रह होतो हें खास.

संघटित धर्माचें इतिहासकालीन स्वरूप कांहींही असो, वर्तमान काळांत तरी खोबरें निघून गेलेल्या करवंटीचें स्वरूप त्याला प्राप्त झालेलें दिसतें. त्याचा बाह्य पापुद्रा पूर्ववत् कायम असला तरी आंत अजिबात निराळाच मालमसाला भरलेला आढळतो, आणि आंतल्या गाभ्यांतला पुष्टितुष्टिमय भाग कोठें शिल्लक असलाच तर त्याच्याभोंवतीं हानिकारक अशा इतर द्रव्यांचा साख जमलेला असतो.

पौर्वात्य त्याचप्रमाणें पाश्चात्य धर्मांचीहि अशीच स्थिति आहे. धर्माशीं ज्याचा काडीचाहि संबंध नाहीं अशा नाममात्र धर्माचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे इंग्लिश चर्च.* इंग्लिश चर्च म्हणजे तेथील शासनसंस्थेचें एक राजकीय खातेंच बनून गेलें आहे. इंग्लिश चर्चचे पुष्कळ भक्त फार थोर व चारित्र्यवान् पुरुष आहेत ह्यांत शंका नाहीं. परंतु भांडवलशाही व साम्राज्यशाही यांना आपलें हिडिस स्वरूप झांकण्याकरतां चर्चकडून नीतीची व ख्रिस्त धर्माची झूल वापरण्यास मिळावी याचें नवल वाटतें. आशिया व आफ्रिका खंडांतील ब्रिटिशांच्या पेंढारी वृत्तीचें समर्थन नैतिक सिद्धान्तानुसार चर्चकडून होत गेल्यामुळें आपण जें जें करूं तें तें योग्यच आहे अशी लोकविलक्षण धिटाईची वृत्ति इंग्रज लोकांच्या मनांत रुजत गेली. ही वृत्ति चर्चमुळें उत्पन्न झाली कीं या वृत्तींतून सध्याच्या चर्चची निर्मिति झाली तें मला सांगतां येणार नाहीं. "विश्वासघातकी इंग्लंड" ही पदवी इंग्लंडला फार जुन्या

---

* हिंदुस्थानांत तर सरकार व चर्च यांची एकरूपता परमावधीला पोचल्याचें दिसून येतें. हिंदी करांतून तनखा खाणारे धर्मगुरु हे सनदी अधिकाऱ्यांप्रमाणेंच साम्राज्य सत्तेचीं प्रतीकें बनून राहिले आहेत. अर्थात् कांहीं अभिनंदनीय अपवाद त्यांच्यामध्येंहि सांपडतातच. पुण्याच्या ख्रिस्त सेवा संघांत कांहीं थोर इंग्रज माणसें असून हिंदी लोकांची ते निःस्वार्थपणें सेवा करीत असतात. हिंदुस्थानांतील जनता ज्यांची आठवण दुवा देऊन काढते असे इतरहि पुष्कळ इंग्रज धर्मगुरु आढळून येतील.

काळीं प्राप्त झालेली आहे. तथापि ज्यांचा स्वतःचाच इतिहास काळाकुट्ट आहे त्या साम्राज्यवादी राष्ट्रांनीं इंग्लंडला विश्वासघातकी म्हणून हिणवण्यांत काय तात्पर्य ? इतर राष्ट्रें ब्रिटिशांपेक्षांहि अधिक क्रूर वृत्तीनें वागत आलीं आहेत, परंतु आपल्या स्वार्थावर धर्माचा मुलामा चढविण्याच्या कामीं ब्रिटिशांसारखें यश कोणालाच लाभलेलें नाहीं. स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ तसेंच राहूं देऊन दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ काढण्यासाठीं उतावळेपणा करण्याचा गुण आपणा सर्वांतच असतो, पण ब्रिटिश लोक या गुणांत बिनजोड ठरतील.

प्रॉटेस्टंट पंथानें इहपरलोकीं दोन्हीकडे डल्ला मारण्याचा प्रयत्न केला. इहलोकीं त्यांनीं आपल्या दुकानाचा थाट जमवला खरा, पण त्या पंथाचें धार्मिक स्वरूप हिणकस होत चाललें व हळूहळू त्याची धार्मिक बाजू नष्ट होऊन प्रॉटेस्टंटांच्या धर्ममठांना मोठ्या पेढीचें स्वरूप प्राप्त झालें. पाश्चात्य देशांत रोमन कॅथॉलिक पंथ एवढाच काय तो एक जिवंत धर्मपंथ उरला आहे. इस्लामी व हिंदु धर्माप्रमाणेंच कॅथॉलिक धर्मांतहि शंकाकुशंकांना अथवा संदेहबुद्धीला अवकाश नाहीं. ह्या आयुष्यांत कोठें कांहीं कमतरता असेल तिची भरपाई पुढील आयुष्यांत होऊन जाईल असें आश्वासन कॅथॉलिक पंथांतहि भक्तगणांना मिळत असतें.

असल्या ह्या धर्मरूपी बंदराचा आश्रय मला करतां येईल असें वाटत नाहीं. वादळांचा व लाटांचा मारा सहन करीत उघड्या समुद्रावर राहणेंच मला पसंत आहे. मरणोत्तर जीवनाविषयींहि मला फारशी फिकीर वाटत नाहीं. इहलोकींच्या प्रश्नांतच माझें सारें लक्ष गुंतलेलें आहे. नीतीवर अधिष्ठित व धर्माविषयीं साशंक असा चिनी लोकांचा परंपरागत दृष्टिकोण मला स्वीकारावासा वाटतो; पण तदन्तर्भूत व्यवहारविषयक सिद्धान्त मात्र मला मुळींच मान्य होण्यासारखे नाहींत. या धर्म-दृष्टीचें नांव ‘ टाओ. ’ जीवनाचा संन्यास न करतां त्याचा स्वीकार करा. त्याच्याशीं आपले व्यवहार मिळते करून घ्या, त्यांत सुधारणा करा अशी ‘ टाओ’ मार्गाची शिकवण आहे. परंतु आपल्या नित्य परिचयाच्या धर्मदृष्टीची या जगाशीं फारकत झालेली दिसते. तर्कवादाला तिचा विरोध असतो. कांहीं तत्त्वें अक्षर व सनातन आहेत असें निःशंकपणें मानून तिचे व्यवहार चालू असतात. एवढेंच नव्हे, तर तिची भिस्त, भावना व विकार यांच्यावरहि असल्याचें आढळून येतें. माझ्या मतें ज्या आध्यात्मिक व जीवाशीं संलग्न अशा गोष्टी आहेत त्यांच्याशीं या धर्मदृष्टीचा कांहींच लागाबांधा दिसून येत नाहीं. आपल्या पूर्व-कल्पनांच्या सांच्यांत प्रत्यक्ष वस्तुस्थिति बसणार नाहीं अशी धास्ती वाटत असल्यामुळें उपरोक्त धर्मदृष्टीला अनुसरणारे लोक भोंवतालच्या जगाकडे डोळे उघडून पाहण्यासहि तयार नसतात. भिन्न मतें अथवा कल्पना त्यांना सहन होत नाहींत. संकुचित, स्वयंकेंद्रित व अहंकारमय अशी ही धर्मदृष्टि स्वार्थसाधु व संधिसाधु लोकांच्या हातचें पुष्कळदां खेळणें होऊन बसल्याचें आढळून येतें.

धार्मिक लोकांत विशुद्ध चारित्र्याच्या व अध्यात्मप्रवण अशा व्यक्ती झाल्या नाहींत अथवा सध्यां उपलब्ध नाहींत हा माझ्या म्हणण्याचा आशय नव्हे. पण धर्मदृष्टि हितकारक ठरत नाहीं, उलट लोकांची नैतिक व आध्यात्मिक उन्नति त्यामुळें स्थगित होते असें म्हणणें प्राप्त आहे. अर्थात् नैतिक व आध्यात्मिक उन्नति म्हणजे काय तें वैकुंठ–पेठेंतील वजनामापांनीं न ठरवतां इहलोकींचीं वजनें मापें त्यासाठीं घेतलीं तरच ह्या आक्षेपांतील रास्तपणा कळून येईल. ब्रह्मजिज्ञासा ही बहुशः समाज-पराङ्मुख असते व धार्मिक माणसाचें सर्व लक्ष समाजहितापेक्षां स्वतःच्या मोक्ष-प्राप्तीकडे लागल्याचें प्रत्ययास येतें. मोक्षमार्गी मनुष्य अहंकारापासून सुटका करून घेण्याची धडपड करीत असतां अहंकाराच्या जाळ्यांत अधिकाधिकच गुरफटत जातो. धर्माला संघटित स्वरूप प्राप्त झालें कीं त्याला स्वार्थपरायणता प्राप्त होऊन तो परिवर्तनविरोधी व प्रगतिविरोधी बनत जातो.

गुलामांची सामाजिक उन्नति करण्याच्या कामीं ख्रिस्ती धर्मपीठांचें मुळींच साहाय्य झालें नाहीं ही गोष्ट सर्वश्रुत आहे. गुलाम होते ते आगरी बनले, पण तें केवळ आर्थिक परिस्थितीमुळें. अगदीं अलीकडच्या काळांत ( १७२७ मध्यें ) लंडन येथील धर्मगुरूनें अमेरिकेंतील गुलाम मालकांना लिहिलेल्या पत्रावरूनसुद्धां चर्चची वृत्ति स्पष्ट कळून येईल. *

" ...ख्रिश्चन धर्मामुळें पापाच्या, सैतानाच्या, मानवी विकारांच्या, विषयांच्या व अनिर्बंध वासनांच्या बंधनापासून मुक्ति मिळते; परंतु मानवांची बाह्य परिस्थिति जशी असेल–म्हणजे ते बंधनांत असोत किंवा स्वतंत्र असोत–तशीच ती कायम राहणार. बाप्तिस्मा घेऊन ते ख्रिस्ती झाले म्हणून त्यांच्या बाह्य परिस्थितीमध्यें बदल होण्याचें कारण नाहीं. "

कोणताहि संघटित धर्म आजच्या काळांत इतक्या प्रांजलपणें आपलें मत बोलून दाखवणार नाहीं. परंतु वर्तमानकालीन मालकी हक्क व समाजरचना यासंबंधीं त्याची विचारसरणी अशाच प्रकारची असावयाची.

शब्दांची अर्थवाहक शक्ति फारच अपूर्ण आहे. शब्दाचे निरनिराळे अर्थ केले जातात. 'धर्म' या शब्दाचा अर्थ जितक्या भिन्न भिन्न तऱ्हेनें करण्यांत येतो तितक्या भिन्न भिन्न प्रकारांनीं दुसऱ्या कोणत्याहि शब्दचा अर्थ क्वचितच करण्यांत येत असेल. धर्म हा शब्द ऐकला कीं दोन माणसांच्या मनांत कांहीं एकच एक विचार-स्तबक उभें राहणार नाहीं. धार्मिक विधि व आचार, धर्मग्रंथ, विशिष्ट लोकसमूह, धर्मतत्त्वें, नीतिनियम, पूज्यभाव, प्रेम, द्वेष, तिरस्कार, दयाबुद्धि, त्याग, संन्यस्त वृत्ति, उपोषणें, भोजनसमारंभ, प्रार्थना, लग्नसंस्था, मृत्यु, स्वर्ग लोक, दंगे व हाणामारी, एक ना दोन, हजारों विचारचित्रें त्या एका शब्दोच्चाराबरोबर डोळ्यांपुढें उभीं

* राइनहोल्ड नेब्हूर यांच्या **Moral Man and Immoral Society** या पुस्तकांत हें पत्र उद्धृत केलें आहे ( पा. ७८ ).

राहतात; व त्यांच्या भरीला मनांत एवढा भावनावेश उत्पन्न होतो कीं निःपक्षपाती वृत्तीनें विचार करणेंहि अशक्य व्हावें. धर्म या शब्दाला कधीं रामकाळीं निश्चित अर्थ असलाच तर तो आतां तरी पार लुप्त झालेला आहे. सध्यांच्या काळीं धर्मामुळें वितंडवाद व गोंधळ मात्र निर्माण होत असतो. तेव्हां ह्या ऐसपैस शब्दाला विश्रांति देऊन अधिक संकुचित अर्थाचे ईश्वरविषयक शास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, अध्यात्मशास्त्र वगैरे शब्द वापरण्यास घ्यावेत. हे शब्द सुद्धां संदिग्धच आहेत. पण धर्म या शब्दाइतके ते सैल नाहींत. तसेंच त्यांच्याभोंवतीं धर्म ह्या शब्दाप्रमाणें भावनांची व विकारांची फारशी गर्दीहि अद्यापि झालेली नसल्यामुळें हे शब्द वापरण्यापासून पुष्कळ फायदा होईल असें वाटतें.

मग धर्म म्हणजे काय? मनुष्याच्या अन्तःशक्तींचा विकास, हितप्रद समजण्यांत येणाऱ्या दिशेनें ज्ञानशक्तीची उत्क्रांति, असाच साधारणतः धर्माचा अर्थ असावा. पण उन्नतीची दिशा कोणती असावी ह्यावर वाद उद्भवणारच. पण माझ्या समजुतीप्रमाणें धर्माचा भर अंतर्विकासावर असून बाह्य स्थितीचें परिवर्तन हें मनांतील परिवर्तनाचें आविष्कृत स्वरूप आहे असें धर्म मानतो. अंतर्विकासाचा बाह्य सृष्टीवर पुष्कळच परिणाम होतो यांत शंका नाहीं. पण मनाचा घाट बनत असतां बाह्य परिस्थितीच्या दडपणाचाहि अतिशय परिणाम होत असतो हेंहि तितकेंच उघड आहे. बाह्य व अंतःशक्तींच्या एकमेकींवर क्रिया व प्रतिक्रिया चालू असतात. यंत्रांनीं परिपूर्ण अशा पाश्चात्य समाजांत अन्तर्विकासाच्या मानानें बाह्य विकास फार मोठ्या प्रमाणांत झालेला आहे ही गोष्ट सत्य असली तरी आम्ही ज्या अर्थी औद्योगिक दृष्ट्या फार मागासलेले आहोंत त्या अर्थी आमचा मनोविकास मोठ्या प्रमाणांत झालेला असला पाहिजे हें त्यावरून सिद्ध होत नाहीं. अशा भ्रांत कल्पनांच्या साहाय्यानें स्वतःचें समाधान करण्याचा व स्वतःच्या हीन स्थितीकडे पाहून मनाला वाटणाऱ्या विषादाचा उपशम करण्याचा आपण प्रयत्न करीत असतों. परिस्थितीच्या सांपळ्यांतून बाहेर निसटून कांहीं व्यक्तींना मनोविकासाच्या नभोमंडळांत उंच भराऱ्या मारतां येत असतील. पण मोठमोठ्या गटांची अथवा राष्ट्रांची मानसिक वाढ व्हावयाची असेल तर कांहीं किमान प्रमाणांत बाह्य परिस्थितींतहि वाढ झालेली असली पाहिजे. आर्थिक संकटांनीं घेरलेल्या व जगावें कसें या विवंचनांनीं पोळलेल्या माणसाला अन्तर्विकासाच्या कितीशा पायऱ्या चढणें शक्य आहे? पायाखालीं तुडवलेला व पिळून निघालेला वर्ग आत्मोन्नति कशाची करणार? राजकीय व आर्थिक दृष्ट्या दुसऱ्यांचे गुलाम बनलेलें, सर्व बाजूंनीं नाडलें व नागवलें गेलेलें राष्ट्र मनोविकास साधणार तरी कसा? तात्पर्य असें कीं अन्तःकरणाच्या विकासाला बाह्य स्वातंत्र्य आणि अनुकूल परिस्थिति यांची आवश्यकता आहे. पण तशी परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असतां डोळ्यांपुढें असलेल्या ध्येयाचा उच्छेद करतील अशीं साधनें मात्र हातीं घेऊन चालणार नाहीं. साध्यापेक्षां साधनांचें

महत्त्व अधिक आहे असें गांधीजी म्हणतात तेव्हां असाच कांहीं तरी अर्थ त्यांना अभिप्रेत असावा अशी माझी समजूत आहे. पण साधनें घ्यावयाचीं तीं मात्र साध्याकडे नेणारीं असावींत; नाहीं तर प्रयत्न निष्फळ ठरून त्यापासून अन्तर्बाह्य असा दोन्ही बाजूंनीं अधःपात व्हावयाचा.

"कोणाहि माणसाला धर्माशिवाय जगणें शक्य नाहीं" असें गांधीजींनीं कोठें तरी म्हटलें आहे. ते पुढें लिहितात, "बुद्धीच्या अहंकारानें पछाडलेले लोक आम्हांला धर्माची जरूरी नाहीं असें ठांसून सांगतात. पण मी श्वासोच्छ्वास करीत असलों तरी मला नाक नाहीं असें सांगणाऱ्या माणसासारखाच त्यांचाहि प्रकार आहे." "सत्यावरील भक्तीमुळेंच मीं राजकारणांत पाऊल टाकलें. मोठ्या नम्रमणें पण अगदीं निःशंकपणें मी म्हणतों कीं राजकारणाशीं धर्माचा कांहीं संबंध नाहीं असें विधान करणाऱ्या लोकांना धर्म म्हणजे काय तेंच उमगलेलें नाहीं." धर्मावर टीका करणारांचा व गांधीजींचा धर्म शब्दाचा अर्थ भिन्न आहे हें यावरून स्पष्ट होईल. अशा प्रकारें एकाच शब्दाचे भिन्न अर्थ लावण्यांत येत असल्यामुळें परस्परांच्या विधानांचें आकलन होणें दुर्घट होऊन बसतें.

"जीवनांतील फुटकळ व अनित्य अशा घटनांचें यथार्थ व समुचित असें दर्शन जो घडवून देतो तो धर्म" अशी प्रो. जॉन ड्युई यांनीं धर्माची एक नवी व्याख्या केली आहे. ती धर्मनिष्ठांना अर्थात्‌च पसंत पडणार नाहीं. "कोणतेंहि ध्येय सामुदायिक व चिरंतन हिताचें आहे अशी खात्री पटल्यावर त्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं वैयक्तिक हानीची पर्वा न करतां, अडथळ्यांना न जुमानतां करण्यांत येणारें जें जें कार्य त्याला त्यांतील अंगभूत गुणांच्या योगानें धार्मिक कार्याची पदवी प्राप्त होते," असेंहि ते म्हणतात. ही धर्माची कल्पना असेल तर अशा धर्माविरुद्ध कोणीच आक्षेप घेणार नाहीं.

रोमाँ रोलाँ यांनीं धर्मकल्पनेचा विस्तार करून तिचें स्वरूप असें बनविलें आहे कीं संघटित धर्मांच्या कट्टर भगतांच्या अंगीं हुडहुडीच भरावी. "रामकृष्णांचें चरित्र" या ग्रंथांत ते म्हणतातः—

"... सर्व प्रकारच्या धार्मिक श्रद्धेपासून मुक्त असणारे अथवा आपण मुक्त आहोंत असें मानून चालणारे लोक सुद्धां वास्तविक तर्कातीत अशा संवेदनांच्या उपासनेंत गढलेले असतात. त्या तर्कातीत संवेदनेलाच ते समाजवाद, कम्युनिझम, भूतदया, राष्ट्रवाद, इतकेंच काय पण तर्कवाद अशीं नांवें देतात. विचारांचा उगम धर्मापासून झाला अथवा नाहीं हें ठरवावयाचें असेल तर ध्येय हा निकष न मानतां विचारांत दिसून येणारा जिव्हाळा हाच निकष मानला पाहिजे. एकाग्र मनानें, अव्यभिचारी निष्ठेनें, केवढयाहि त्यागाची तमा न बाळगतां, व्यक्ति निर्भयचित्त होऊन जर सत्याच्या शोधासाठीं झटत असेल, तर ती व्यक्ति धार्मिक आहे असेंच मी म्हणेन; कारण वर्तमानकालीन समाजाच्या जीवनाहून उच्चतर, इतकेंच

नव्हे तर अखिल मानव्याच्या जीवितापेक्षांहि उच्चतर, व मानवी प्रयत्नांना ध्येयभूत झालेल्या अशा अंतिम साध्यावर त्या व्यक्तीचा विश्वास असतो. जिवंत मनाच्या गर्भातून उत्स्फूर्त होणारा, आणि लाचार मनोवृत्तीचा नव्हे तर कणखर मनोवृत्तीचा निदर्शक असा शंकावाद स्वीकारणाऱ्यांना सुद्धां धर्मनिष्ठ आत्म्यांच्या दिव्य फौजेंत सामील करून घेण्यास हरकत वाटूं नये. ”

रोमाँ रोलाँनीं घातलेल्या अटी मला पार पाडतां येतील असें म्हणावयास माझी जिव्हा धजत नाहीं. पण त्यांनीं घातलेल्या अटींवर त्या दिव्य फौजांच्या मागोमाग बाजारबुणगा म्हणून जाण्याची मात्र माझी तयारी आहे.

## ४८

# ब्रिटिश सरकारचें दुटप्पी धोरण

गांधीजींच्या नेतृत्वाखालीं हरिजन-चळवळ चालू होती. मंदिरप्रवेशाच्या बाबतींत हरिजनांच्या मार्गांतील अडथळे दूर करावेत म्हणून फार मोठा मतप्रचार सुरू होता व मध्यवर्ती कायदेमंडळांत एक बिलहि आणण्यांत आलें होतें. त्या वेळीं एक आश्चर्यजनक दृश्य नजरेस पडलें. कॉंग्रेसमधील एक प्रमुख पुढारी दिल्ली शहरांत घरोघर खेटे घालून सभासदांनीं त्या बिलाला पाठिंबा द्यावा म्हणून खटपट करीत होते. त्यांच्यामार्फत गांधीजींनीं एक विनंतिपत्रकहि खासदारांकडे पाठवलें. इकडे कायदेभंग सुरूच होता, लोक तुरुंगांत जातच होते, कॉंग्रेसचा कायदेमंडळावरील बहिष्कारहि कायम होता, आणि आमचे सर्व खासदार राजीनामा देऊन बाहेर पडलेले होते. असेंब्लींत मागें उरलेल्या ह्या शेपटानें ख्याति मिळवली ती संकटकालीं कॉंग्रेसला विरोध व सरकारला सहकार्य करून. वटहुकुमांतील लोकविलक्षण कलमांना थोडेंफार चिरस्थायी स्वरूप आणून देऊन दडपशाहीच्या कामीं त्यांच्यापैकीं बहुसंख्य सभासदांनीं सरकारला मदतच केली होती. ओटावा-करारांचें विषहि त्यांनीं पचवलें; दिल्ली, सिमला व लंडन येथील बड्या धेंडांबरोबर त्यांनीं मजा मारली; हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्तेचे पवाडे गायिले; आणि सरकारच्या "दुटप्पी" म्हणून गाजलेल्या धोरणाला यश मिळो म्हणूनहि याच सद्गृहस्थांनीं प्रार्थना केल्या.

गांधीजींचें विनंतिपत्रक व त्याहिपेक्षां राजगोपाळाचारियर यांची आटापीट पाहून मी अगदीं थक्क झालों; कारण राजगोपालाचारी कांहीं आठवड्यांपूर्वीच कॉंग्रेसचे कार्यकर्ते अध्यक्ष होते. कायदेभंगाच्या चळवळीवर त्यांचा परिणाम झाला म्हणूनच नव्हे तर नैतिक दृष्ट्याहि मला या व्यवहारांची फार चीड आली. हजारों लोक तुरुंगांत असतां व चळवळ चालू असतां असे खटाटोप गांधीजींनीं अथवा कोणत्याहि इतर कॉंग्रेस-पुढाऱ्यानें करणें नैतिक अधःपाताचें आणि जवळ जवळ विश्वास-घाताचें कृत्य आहे असें मला वाटलें. या प्रश्नाकडे पाहण्याची गांधीजींची दृष्टि वेगळी आहे हेंहि मी ओळखून होतों.

सरकारनें या बिलाच्या मार्गांत शक्य ते अडथळे उपस्थित केले. चालढकल केली, विरोध चेतविला, व शेवटीं स्वतःच विरोध करून त्याला भुईवर लोळविलें. समाजसुधारणाविषयक बहुतेक ठरावांसंबंधीं सरकारचें धोरण सामान्यतः अशाच

प्रकारचें असतें. धार्मिक बाबतींत ढवळाढवळ नको या सबबीवर सामाजिक प्रगतीला सरकार कोलदांडा घालीत असतें. अर्थात् आमच्या अनिष्ट चालीरीतींवर स्वतः टीका केल्यावांचून व इतरांना तसें करण्यासाठीं उत्तेजन दिल्यावांचून मात्र सरकार राहत नाहीं. कर्मधर्मसंयोगानें कधीं व्हावयाचा नाहीं तो शारदा कायदा पास झाला. पण कोणत्याहि सामाजिक कायद्याची अम्मलबजावणी करण्यास सरकार किती नाखूष असतें तें या कायद्याच्या इतिहासावरून लक्षांत येईल. वटहुकुमांचे राक्षस अर्ध्या रात्रींत ज्या सरकारला निर्माण करतां आले व त्यांतील कलमांचा भंग झाला म्हणून ज्या सरकारनें हजारों लोकांना तुरुंग दाखवला तें सरकार शारदा-कायद्याची अंमलबजावणी केली तर केवढें बंड होईल कोणास ठाऊक अशा भीतीनें जणूं कांहीं गांगरून गेलें होतें. हा कायदा म्हणजे निवळ एक बुजगावणें आहे, त्याचा भंग केला तरी सरकार लक्ष देत नाहीं असें लवकरच कळून आलें. कायदा समजावून देण्याचा अथवा त्यासंबंधीं मतप्रचार करण्याचा प्रयत्न सरकारनें जरा-देखील केला नाहीं. खेड्यांतील पुष्कळ लोकांना हा कायदा म्हणजे काय प्रकरण आहे त्याची मुळींसुद्धां माहिती नव्हती.

समाजांतील रूढ असलेल्या अनिष्ट चालींविषयीं ही जी सहिष्णुता दाखवण्यांत येते त्याचें कारण सरकारला त्या हव्या आहेत असें नाहीं. राज्यशासनाच्या अथवा धनशोषणाच्या कार्यांत त्यांच्यामुळें आडकाठी येत नसल्यामुळें त्या दूर करण्याच्या बाबतींत सरकार फारशी उत्सुकता दाखवीत नाहीं, इतकेंच. शिवाय अशी एक भीति आहे कीं सामाजिक सुधारणा हातीं घेतली कीं अनेक गटांचीं मनें दुखवलीं जाण्याचा संभव असतो. राजकीय क्षेत्रांत असंतोष पसरलेला आहे तेवढा पुरेसा आहे, त्यांत आणखी सामाजिक असंतोषाचें इंधन टाकण्याची सरकारची इच्छा नाहीं. तथापि अलीकडच्या काळांत समाजसुधारकाच्या दृष्टीनें परिस्थिति विशेषच बिकट होत चालली आहे. कारण सरकार ह्या अनिष्ट चालीरीतींचें संरक्षक बनणार अशीं चिन्हें दिसत आहेत. राजकीय विरोधाच्या वाढत्या धगीबरोबर सरकार नवे नवे दोस्त शोधून काढीत असून कडवे जातिनिष्ठ परागतिक, हे सर्व ब्रिटिश सत्तेचे कट्टे पुरस्कर्ते बनले आहेत. मुसलमानांच्या जातीय संस्था राजकीय, आर्थिक, सामाजिक, वगैरे सर्व तऱ्हेच्या प्रगतीच्या कडव्या विरोधक म्हणून प्रसिद्धच आहेत. त्यांच्या तोडीस तोड देणारी अशी हिंदुमहासभा आहे. पण ह्या मागें मागें पळण्याच्या शर्यतींत सनातन्यांच्या ती पासंगालाहि लागणार नाहीं; कारण त्यांच्या ठायीं कमालीचा प्रगतिविरोध व उतू चाललेली अथवा निदान पक्षीं वाचाट अशी राजनिष्ठा हीं दोन्ही एकवटलेलीं आहेत.

शारदा कायद्याच्या बाबतींत सरकार मुकाट्यानें बसलें, त्यानें कांहींच कार्य केलें नाहीं असें म्हणतां तर कॉंग्रेस अथवा इतर बिनसरकारी संस्था पुढें कां सर-सावल्या नाहींत असा प्रश्न ब्रिटिश व इतर परदेशीय टीकाकार विचारीत असतात.

गेलीं पंधरा वर्षें व विशेषतः १९३० सालापासून कॉँग्रेस ब्रिटिश सरकारबरोबर राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं जीवावरची झुंज खेळण्यांत गुंतलेली आहे. दुसऱ्या संस्थांचे जनतेशीं खरे जिव्हाळ्याचे संबंध येत नाहींत, आणि त्यांच्यांत खरें सामर्थ्यहि नाहीं. ध्येयवादी, शीलवान्, आणि वजनदार अशीं माणसें कॉँग्रेसकडे खेचलीं जातात, पण त्यांचें बरेंचसें आयुष्य ब्रिटिश सरकारच्या तुरुंगांतच खर्च होतें.

जनतेच्या खांद्याशीं खांदा भिडवण्याची ज्यांना भीति वाटते अशा पांचपन्नास निवडक मंडळींनीं जमावें, कांहीं तरी ठराव पास करावेत, ह्यापलीकडे कोणतेंहि कार्य इतर संस्थांमार्फत होणें शक्य नव्हतें. शिष्ट गृहस्थांना अनुरूप अथवा अखिल-भारतीय-महिला-मंडळप्रमाणें शिष्ट स्त्रियांना अनुरूप अशा निर्भेळ भारदस्त हालचाली तेवढ्या या संस्था करीत असतात. चढाऊ मतप्रसाराचे मार्ग त्यांना कसे झेपणार ? शिवाय दडपशाहीमुळें त्यांचींहि गात्रें लुळीं पडलीं होतीं. लष्करी कायद्यानें क्रान्तिकारक चळवळी दडपल्या जातात, पण त्यांच्याबरोबर संस्कृति व संस्कृतीशीं संबद्ध असणारीं इतर कार्येंहि रसातळाला पोंचतात हें विसरतां कामा नये.

परंतु कॉँग्रेस व इतर बिनसरकारी संस्थांना समाजसुधारणेचें कार्य करतां येत नाहीं याचें खरें कारण यापेक्षां खोल आहे. राष्ट्रवादाचें वेड आमच्या अंगीं चांगलें मुरलें आहे. त्याचाच आम्हांला ध्यास लागून राहिला असून राजकीय स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत तो नष्ट होणें शक्य दिसत नाहीं. "कॅन्सर झालेल्या माणसा-प्रमाणें जित राष्ट्राची अवस्था असते. त्याला दुसरें कांहीं सुचतच नाहीं. राष्ट्रीय चळवळीसारखा दुसरा शाप नाहीं. राष्ट्राच्या दडपून टाकलेल्या नैसर्गिक शक्तींचा उद्रेक राष्ट्रीय चळवळींच्या द्वारा होत राहतो. पण त्यापासून फार यातना होतात. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून हा हृद्रोग हटवावा या एकमेव उद्देशानें जित राष्ट्रांची अव्याहत धडपड चालू असल्यामुळें त्यांना इतर जगाच्या बरोबरीनें आपली प्रगति करतां येत नाहीं," असें बर्नार्ड शॉ म्हणतो तें खरें आहे.

कांहीं खात्यांचे अधिकार लोकप्रतिनिधींच्या हातीं वरकरणीं दिलेले असले तरी सध्यांच्या स्थितींत फारशी सामाजिक प्रगति करतां यावयाची नाहीं असें अनुभवानें सिद्ध झालेलें आहे. जमीन धरून बसणाऱ्या स्थितिप्रिय गटांना सरकारचा निरुत्साह नेहमींच साहाय्यक होत असतो. शिवाय सरकारनें आतांपर्यंत अरेरावी गाजवलेली असल्यामुळें लोकांतील कर्तृत्वशक्तिसुद्धां वापराच्या अभावीं वठून गेलेली आहे. बिनसरकारी संस्थांनीं मोठमोठ्या संघटना करून कार्य सुरू केलें तर सरकारला तें खपत नाहीं व त्यांच्या हेतूबद्दल शंका उपस्थित करण्यांत येतात. कार्यकर्त्यांकडून इतकी खबरदारी बाळगण्यांत येत असून देखील हरिजन-चळवळीचा व सरकारी अधिकाऱ्यांचा क्वचित् प्रसंगीं खटका उडतोच. सर्व देशभर 'अधिक साबण वापरा' असा धडाक्याचा मतप्रचार कॉँग्रेसनें जर उद्यां सुरू केला तरीसुद्धां पुष्कळ ठिकाणीं सरकारची व कॉँग्रेसची जुंपल्यावांचून राहणार नाहीं !

सरकारनें समाजसुधारणेची बाब मनावर घेतली तर जनतेचें मत वळवणें फार अवघड आहे असें मला वाटत नाहीं. परंतु परकीय सरकारच्या हेतूविषयीं लोक नेहमींच साशंक असल्यामुळें सरकारला मतपरिवर्तनाचें कामसुद्धां फार मोठ्या प्रमाणांत करतां येत नाहीं. परकीय सत्ता नष्ट करून आर्थिक प्रश्न अगोदर धसाला लावले तर कोणत्याहि तडफदार शासनसंस्थेला दूरपरिणामी अशा सुधारणा समाजांत सहजासहजीं घडवून आणतां येतील.

तथापि तुरुंगामध्यें समाजसुधारणा, शारदा कायदा, आणि हरिजन-चळवळ यांचे विचार आमच्या डोक्यांत फारसे घोळत नव्हते. सत्याग्रह संग्रामाला हरिजन-चळवळीमुळें अडथळा झाला म्हणून तिच्याविषयीं थोडी चीड वाटत असे, इतकेंच. १९३३ सालच्या मे महिन्याच्या प्रारंभीं सहा आठवडेपर्यंत कायदेभंग थांबवण्यांत आला. नंतर काय होतें त्याची आम्हीं उत्सुकतेनें वाट पाहत होतों. या युद्धबंदीमुळें राहिली साहिली सत्याग्रहाची चळवळसुद्धां पार निकालांत निघाली. कारण राष्ट्रीय चळवळ म्हणजे कांहीं विजेचा दिवा नव्हे कीं हवा तेव्हां तो लावावा आणि नको तेव्हां बंद करावा! याच्या अगोदर सुद्धां चळवळीच्या पुढाऱ्यांचा कमकुवतपणा स्पष्ट दिसून आला होता. छोट्या छोट्या बैठकी भरत असत; पण तत्संबंधीं बातम्या पसरत त्या चढाऊ कार्यक्रमाला विघातक अशाच असत. कॉंग्रेसचे कार्यकर्ते अध्यक्ष म्हणून ज्यांची नेमणूक झाली, ते मोठे आदरणीय लोक होते. पण मोठमोठ्या चळवळीचे त्यांना सेनापति बनवणें हा निव्वळ जुलुम आहे. ते शिणल्या-भागल्या-प्रमाणें दिसत व सर्व अडचणींतून मार्ग काढतांना त्यांना महत्प्रयास होत असावेत असा भास होई. अधिकारी-मंडळांत दिसून येणाऱ्या अनिश्चिततेविरुद्ध थोडासा असंतोष पसरत चालला होता, परंतु कॉंग्रेस बेकायदेशीर असल्यामुळें त्या असंतोषाला व्यक्त स्वरूप आलें नाहीं.

त्यानंतर गांधीजींचा एकवीस दिवसांचा उपवास सुरू झाला. त्यांना तुरुंगांतून सोडण्यांत आलें. उपवास संपला व त्यांची प्रकृति अगदीं मंद गतीनें सुधारूं लागली. युद्धबंदीचा काळ आणखी सहा आठवड्यांनीं वाढवण्यांत आला असला तरी सरकारच्या चढाईंत कोणत्याहि प्रकारचा सौम्यपणा आलेला नव्हता. अंदमानांतल्या राजबंद्यांचा अन्नसत्याग्रह सुरू होऊन त्यांपैकीं एक दोन जण उपवासामुळें मृत्युमुखींहि पडले. बाकीचे मरणपथारीवर पडून होते. अंदमानमध्यें घडत असलेल्या प्रकाराचा ज्यांनीं कोणी जाहीर सभांतून निषेध केला, त्यांनाहि सरकारनें अटक करून तुरुंगांत डांबलें. आम्हीं हाल तर भोगावेच, पण निषेधाचा दुसरा कोणताहि मार्ग शिल्लक न राहिल्यामुळें उपवास करून कैदी मेले तरी आम्ही हूं का चूं करूं नये अशी सरकारची इच्छा होती. १९३३ च्या सप्टेंबरांत अंदमानमधील कैद्यांना अधिक माणुसकीनें वागविण्यांत यावें आणि शक्य तर त्यांना हिंदुस्थानांतील तुरुंगांत

ठेवावें अशा आशयाचें एक पत्रक रवींद्रनाथ टागोर, अँड्रयूज वगैरे लोकांच्या सह्यां-निशीं प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. त्यांतल्या पुष्कळशा लोकांचा काँग्रेसशीं कांहींसुद्धां संबंध नव्हता. पण ह्या पत्रकासंबंधीं हिंदुस्थान सरकारच्या होममेंबरनीं तीव्र नापसंती व्यक्त करून कैद्यांबद्दल सहानुभूति दाखवणारावर त्यांनीं खूप ताशेरा झाडला. पुढें अशा प्रकारची सहानुभूति दाखवणें हा बंगालमध्यें एक गुन्हा समजण्यांत येऊं लागला अशी माझी समजूत आहे.

युद्धबंदीचा दुसरा सहा आठवड्यांचा हप्ता संपण्याच्या अगोदर गांधीजींनीं पुणें मुक्कामीं एक खाजगी परिषद् बोलाविल्याचें वृत्त कानीं आलें. परिषदेसाठीं दोन तीनशें लोक जमा झाले होते. गांधीजींच्या मसलतीप्रमाणें सामुदायिक सत्याग्रह बंद करून वैयक्तिक सत्याग्रहाला अनुज्ञा देण्यांत आली व सर्व गुप्त कार्य नियम-बाह्य ठरविण्यांत आलें. परिषदेचे निर्णय फारसे उत्साहवर्धक नसले तरी त्यांच्या-विरुद्ध माझा विशेष असा कोणताच आक्षेप नव्हता. सामुदायिक सत्याग्रह त्या काळीं चालू नव्हताच; तेव्हां तो बंद केला ह्याचा अर्थ इतकाच कीं वस्तुस्थितीला मान्यता देण्यांत आली.

मला आश्चर्य व विषाद वाटला तो अशाकरितां कीं सद्यःस्थिति व आमचें उद्दिष्ट यांच्यासंबंधीं कसलाच विचार पुणें-परिषदेंत झालेला आढळेना. दोन वर्षांच्या निकराच्या लढ्यानंतर व दडपशाहीनंतर काँग्रेसचे लोक एकत्र जमले होते. मध्यं-तरींच्या काळांत जगामध्यें व हिंदुस्थानांत अनेक घडामोडी झाल्या होत्या, आणि शुभ्रपत्रिकाहि जाहीर झाली होती. तुरुंगांत असल्यामुळें ह्या सर्व गोष्टीं-संबंधीं आम्हांला सक्तीचें मौन स्वीकारावें लागलें असून विरुद्ध पक्षाकडून विपर्यस्त असा प्रकार अव्याहतपणें करण्यांत येत असे. सरकारचे केवळ दोस्तच नव्हेत तर प्रागतिक व इतर लोकहि काँग्रेसनें आतां आपलें संपूर्ण स्वराज्याचें ध्येय गुंडाळून ठेवलें आहे, अशीं विधानें करीत होते. आमचें राजकीय ध्येय खणखणीत शब्दांत पुढें मांडून तें विशद करणें व शक्य तर त्याला सामाजिक व आर्थिक ध्येयाची पुस्ती जोडणें एवढें तरी काम पुणें-परिषदेंत व्हावयास हवें होतें. पण त्याऐवजीं सामुदायिक व वैयक्तिक सत्याग्रहाचे सापेक्षी गुणावगुण व गुप्त कार्याची इष्टानिष्टता यांवरच सर्व वादविवाद रंगला. सरकारबरोबर व्हावयाच्या समेटाविषयीं देखील कांहीं न समजण्यासारखीं बोलणीं चालू होतीं. भेट मिळावी म्हणून गांधीजींनीं व्हाइस-रॉयला एक तार पाठविली आणि व्हाइसरॉयनें स्वच्छ नकार दिला. गांधीजींकडून पुन्हां एक तार गेली, तींत ' सन्मानपूर्वक समेटासंबंधींचा ' कांहीं तरी उल्लेख होता. सरकार सर्व बाजूंनीं राष्ट्राची लांडगेतोड करीत असतां व अंदमानांतील कैदी उपाशीं तडफडत असतां, हा समेटाचा कांचनमृग कोणाच्या दृष्टीस पडला कोणास ठाऊक? कांहींहि घडलें असलें तरी समेटासाठीं आपण होऊन दोन पावलें पुढें जावयाचें ही गांधीजींची नेहमींचीच रीत होती म्हणा.

दडपशाही इतक्या जोरांत सुरू होती कीं १९३३ फेब्रुवारीमध्यें माझ्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त जाहीर झालेल्या सभेलाहि पोलिसांनीं बंदी केली. सभेचा कॉंग्रेसशीं कांहीं संबंध नव्हता व सर तेजबहादूर सप्रूंसारखे विख्यात प्रागतिक सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारणार होते. पुढें आमच्यावर होणाऱ्या बादशाही कृपाप्रसादाची वानगी म्हणूनच कीं काय आम्हांला शुभ्रपत्रिका नजर करण्यांत आली होती.

शुभ्रपत्रिका अशी विलक्षण होती कीं ती वाचून कोणाचाहि राजकीय दम उखडून जावा. हिंदुस्थानला भल्या मोठ्या हिंदी संस्थानचें स्वरूप प्राप्त होणार होतें. संयुक्त घटनेंत संस्थानिकांच्या प्रतिनिधींचें वर्चस्व राहावें अशी योजना केलेली होती. परंतु खुद्द संस्थानांविषयीं विचाराल तर त्यांच्या अंतर्गत कारभारांत कोणाचें बोटहि शिरणार नाहीं व अनिर्बंध अरेरावी पूर्वीच्याच दिमाखानें चालवितां येईल अशी व्यवस्था करून ठेवली होती. साम्राज्यशाहीच्या खऱ्या सांखळदंडाच्या म्हणजे राष्ट्रीय कर्जाच्या योगानें लंडन शहराशीं आम्हांला कायमचें बांधून टाकण्यांत आलेलें असून रिझर्व बँकेच्या द्वारां आमच्या चलनावळीच्या पद्धतीवर बँक ऑफ इंग्लंडची हुकमत चालू राहणार होती. वरिष्ठवर्गीयांच्या स्वार्थाभोंवतीं तटबंदी उभारण्यांत येऊन त्यांत नव्या स्वार्थहिताला वाव करून देण्यांत येणार होता. आणि ह्या वर्गाच्या हिताची हमी म्हणून देशाचा सगळाच्या सगळा वसूल गहाण लावून दिलेला होता. आणि आमचे सनदी नोकर? त्यांच्या अनिर्बंध कारभाराला बोटहि लावण्यांत आलेलें नव्हतें. त्यांनीं आम्हांला पढवून स्वराज्याच्या पुढील हप्त्यासाठीं लायख बनवावें अशासाठीं ही योजना होती. प्रांतिक स्वातंत्र्य मिळणार होतें, परंतु आमच्या प्रांतांतून सुव्यवस्था राहावी म्हणून सदय आणि सर्वसत्ताधारी अशा गव्हर्नरांची नेमणूक करून त्या सर्वांच्या डोक्यावर सर्वश्रेष्ठ, परमेष्ठी, सर्वतंत्र-स्वतंत्र अशा व्हाइसरॉयची योजना व्हावयाची होती. त्यानें हवें तें जोडावें, हवें तें मोडावें. वसाहतींतील कारभार चालविण्याचें ब्रिटिश अधिकारी वर्गाचें कसब इतक्या उत्कट प्रमाणांत पूर्वी कधींहि आढळून आलें नसेल. हिटलर व मुसोलिनी यांनाहि मत्सर वाटावा असे अधिकार व्हाइसरॉयच्या हातीं एकवटण्यांत आले होते.

हिंदुस्थानचे हातपाय अशा तऱ्हेनें बांधून टाकण्यांत आल्यानंतर त्याच्याभोंवतीं संरक्षक बंधनांचे आणखी कांहीं पाश आंवळण्यांत आले. ते असे कीं, हिंदुस्थानला जरासुद्धां चलनवलन करतां येऊं नये. "मनुष्याच्या बुद्धीला शोधून काढतां येतील असे सर्व पाश (संरक्षक बंधनें) आम्हीं या राज्यघटनेच्या भोंवतीं आंवळलेले आहेत," असें त्यांचें वर्णन चेंबर्लेन ह्यांनीं केलें आहे.

आणि ह्या कृपाप्रसादाचा मोबदला म्हणून आम्हांला जबरदस्त पैसा द्यावा लागेल असेंहि सांगण्यांत आलें. हिंदुस्थान हा दरिद्र्यांतला दरिद्री देश असून त्याच्या पाठीवर आधीं असह्य असा बोजा लादलेला आहे वगैरे खुळचट समजुती उराशीं

बाळगून आम्ही बसलों होतों आणि स्वातंत्र्य मिळालें कीं, हा बोजा हलका होईल अशीं स्वप्नेंहि आम्हांला पडत असत; पण आतां असें कळून आलें कीं हा पाठीवरचा बोजा अधिकच जड होत जाणार.

अशा प्रकारें हिंदुस्थानचा प्रश्न ब्रिटिश लोकांनीं मोठ्या दिलदारपणानें सोडवून दाखविला. त्यांचे स्तुतिपाठक म्हणूं लागले कीं, आमचे राज्यकर्ते किती उदार आहेत पाहा. साम्राज्यवादी राष्ट्रानें आपल्या प्रजाजनांना आपखुषीनें असे अधिकार व अशी सुसंधि प्राप्त करून द्यावी ह्या प्रकाराला इतिहासांत तोड नाहीं असा डिंडिम वाजूं लागला. राज्यघटनेचे दाते व त्यांच्या दातृत्वाकडे पाहून आश्चर्यविमूढ झालेले त्यांचेच आक्षेपक यांच्यामध्यें मोठा खडाजंगी वाद इंग्लंडांत उपस्थित झाला. तीन मंडलाकार परिषदा, हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या दरम्यान घातलेले हजारों हेलपाटे, असंख्य समित्या व असंख्य चर्चा यांचें फळ काय? तर ही शुभ्रपत्रिका !

तथापि इंग्लंडचीं पर्यटनें एवढयानें संपलीं असें नाहीं. हिंदी राज्यघटनेचे गुणावगुण तपासण्यासाठीं पार्लमेंटची जॉइंट सिलेक्ट कमिटी बसणार होती. तिच्यापुढें साक्षी देण्यासाठीं हिंदी लोकांना पाठवावें असें ठरलें. दुसऱ्याहि इतर समित्या लंडनला भरणार होत्या. त्यांपैकीं एकाद्या तरी समितीचें सभासदत्व आपल्या पदरीं पडावें म्हणून झटापटी सुरू झाल्या. कारण इंग्लंडपर्यंतचा प्रवास फुकट होऊन साम्राज्याच्या केंद्रस्थानीं म्हणजे लंडनमध्ये राहण्याची पर्वणी प्राप्त होणार होती. धन्य ते पुरुष ! शुभ्रपत्रिकेंतील विपरीत सूचनांनीं घाबरून न जातां समुद्रप्रवासाचें, वैमानिक प्रवासाचें आणि विशेषतः लंडनमधील वास्तव्याचें संकट सोसूनहि शुभ्रपत्रिकेंतील सूचना बदलून घेण्यासाठीं तेथें जावयाचेंच असा त्यांनीं निर्धार केला. मतानुराधनाची आपल्या अंगीं होती नव्हती तेवढी सर्व शक्ति खर्च करण्यासाठीं त्यांनीं चंग बांधला. हें कार्य अशक्य आहे ह्याची जाणीव त्यांना होती व ती त्यांनीं बोलूनहि दाखविली. पण ते कच्च्या गुरूचे चेले नव्हते. ऐकावयास कोणीं उरलें नाहीं तरी बेहेत्तर, पण आपलें म्हणणें मांडूं तेव्हांच राहूं अशी धमक त्यांच्या अंगीं होती. त्यांपैकीं एक जण प्रतिसहकार पक्षाचा पुढारी होता. सर्व लोक निघून गेले तरी ह्या पठ्ठयानें पिच्छा सोडला नाहीं. मुलाखतीमागून मुलाखती घेत व जेवणावळीमागून जेवणावळी झोडीत लंडनमधील अधिकाऱ्यांना गांठण्याच्या तो प्रयत्नांत असे. आपल्याला कोणते राजकीय फेरबदल हवे ते तो त्यांना समजावून देत असावा. सरते शेवटीं ते गृहस्थ जेव्हां मायभूमीला परत आले, तेव्हां आतुर होऊन बसलेल्या जनतेपुढें त्यांनीं जाहीरपणें सांगितलें कीं, मराठ्यांच्या जगविख्यात चिकाटीला अनुसरून हातचें काम खालीं ठेवावयाचें नाहीं अशा निश्चयानें मी लंडनमध्यें शेवटपर्यंत ठिय्या देऊन बसलों होतों.

या प्रतिसहकारवादी लोकांना विनोदबुद्धि कशी ती मुळीं माहितीच नाहीं,

अशी तक्रार माझे वडील करीत असल्याचें मला स्मरतें. ते विनोदानें कांहीं बोलले कीं त्याचा भलताच अर्थ लावण्यांत येई आणि त्यामुळें अनेक घोटाळे निर्माण होत. मग आपल्या म्हणण्याचें स्पष्टीकरण त्यांना करावें लागे, प्रतिसहकारवाद्यांची समजूत घालावी लागे—साराच कंटाळवाणा प्रकार. लंडन येथें गेलेल्या त्या प्रतिसहकार-वादाचे उद्‌गार ऐकले आणि माझ्या मनांत गतकालांतच नव्हे, तर चालू लढ्यांतसुद्धां मराठ्यांनीं प्रकट केलेल्या तेजस्वी आणि लढाऊ वीरवृत्तीचे विचार येऊन मोडेन पण वांकणार नाहीं अशा बाण्याच्या महान् व अदम्य अशा टिळकांचीहि मला आठवण झाली.

शुभ्रपत्रिका प्रागतिकांना सर्वस्वी नापसंत होती. त्यांना तरी दररोज सुरू असलेली दडपशाही आवडत होती थोडीच. क्वचित् ते दडपशाहीच्या विरुद्ध सुद्धां बोलत; पण त्याच वेळीं कॉंग्रेस व कॉंग्रेसचें हरएक प्रकारचें कार्य यांचाहि निषेध आपण करीत आहों असें स्पष्ट शब्दांत ते सांगत असत. कांहीं प्रमुख कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना सरकारनें सोडून द्यावें असेंहि ते सुचवीत. त्यांच्या ओळखीच्या मंडळींची तेवढी त्यांना आठवण होई. शांतताभंगाची भीति आतां राहिलेली नसल्यामुळें अमक्या तमक्या व्यक्तीला मुक्त करण्यांत यावें हा प्रागतिक अथवा प्रतिसहकारवादी यांचा ठराविक मुद्दा असावयाचा. बरें, कोणीं गैरशिस्त वर्तन केलें तर त्याला पुनः पकडण्याचा सरकारला अधिकार आहेच. मग सरकारचें करणें अधिक समर्थनीयहि ठरेल. वर्किंग कमिटीच्या कांहीं सभासदांना सोडून देण्यांत यावें अशी मागणी इंग्लंडांतील कांहीं लोकांनीं करून आपला चांगुलपणा आम्हांला पटवून दिला. आम्ही तुरुंगांत असतां आमच्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या ह्या लोकांविषयीं आम्हांला कृतज्ञता कां बरें वाटणार नाहीं? पण या सन्मित्रांच्या तावडींतून आमची सुटका होईल तर बरें असाहि विचार मनांत डोकावल्याशिवाय राहत नसे. त्यांच्या सद्धेतूबद्दल शंकाच नव्हती, पण ब्रिटिश सरकारच्या विचारसरणीचा त्यांनीं संपूर्णतया अंगीकार केलेला असल्यामुळें त्यांच्या-आमच्यांत फार मोठें अंतर पडलें होतें.

हिंदुस्थानांत सुरू असलेल्या बऱ्याच गोष्टी प्रागतिकांना पसंत नव्हत्या. त्यांच्या अंतःकरणाला विषाद वाटे; पण ते तरी काय करणार? सरकारविरुद्ध चढाईचा प्रतिकार करावा असा विचार त्यांच्या डोक्यांत कधींच येणें शक्य नव्हतें. आपल्या गटाचें स्वतंत्र अस्तित्व सुरक्षित राखण्यासाठीं त्यांना जनतेपासून व चळवळ्या लोकांपासून आणखी चार हात लांबच सरावें लागलें. त्यामुळें ते सरकारच्या इतके जवळ जाऊन खेटले कीं, खगोलशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें तर सरकार व प्रागतिक यांचें "पिधान" झालें आणि सरकार व प्रागतिक यांच्यांतील भेदच उमगेना! संख्येनें अत्यल्प, आणि जनतेंतील प्रतिष्ठा पाहावी तर शून्य, अशी प्रागतिकांची स्थिति असल्यामुळें त्यांच्या आगेंमागें होण्यानें सामुदायिक चळवळींत चढउतार होण्याचा कांहींच संभव नव्हता. पण प्रागतिकांत अशा कांहीं सुविख्यात व्यक्ति

होत्या कीं ज्यांच्याबद्दल आदर वाटत असे. ह्या व्यक्तींनीं व सर्वसामान्यतः प्रागतिक व प्रतिसहकारपक्षांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं सरकारी धोरणाला नैतिक पाठिंबा देऊन ब्रिटिश राज्यकर्त्यांची बहुमोल चाकरी बजावली. प्रागतिकांकडून कडकडून विरोध न झाल्यामुळें आणि क्वचित प्रसंगीं सरकारी दडपशाहीला त्यांच्याकडून संमति व मान्यता मिळत गेल्यामुळें सरकारच्या दडपशाहीला व स्वैरपणाला अवसान चढलें. भयंकर व अभूतपूर्व अशा त्या दडपशाहीच्या काळांत स्वतःच्या कृत्यांचें समर्थन करतांना सरकारची फें फें उडत असतां सरकारला प्रागतिकांचा व प्रतिसहकारवाद्यांचा नैतिक पाठिंबा अशा प्रकारें मिळत गेला.

शुभ्रपत्रिका वाईट आहे, काळीकुट्ट आहे, वगैरे उद्गार प्रागतिक पुढाऱ्यांनीं काढले. पण पुढें काय? कलकत्ता येथें १९३३ च्या एप्रिलांत प्रागतिक परिषद भरली असतां प्रागतिकांचे मेरुमणि श्री. श्रीनिवास शास्त्री यांनीं असा युक्तिवाद लढविला कीं, घटनाविषयक फेरफार कितीहि असमाधानकारक असले, तरी आपण ते राबवलेच पाहिजेत. "कांठावर राहून वाहत्या पाण्याकडे पाहत बसण्याची ही वेळ नाहीं." जें मिळेल तें स्वीकारावें व तें राबवतां येतें कीं नाहीं तें पाहावें, एवढीच त्यांची कार्याची कल्पना असावी. त्यांच्या मतें याहून निराळा मार्ग म्हणजे कांहींच न करतां स्वस्थ बसणें. नंतर ते म्हणाले, "आपणाजवळ शहाणपणा, अनुभव, नेमस्तवृत्ति, मताराधनेची शक्ति, थोर प्रतिष्ठा व खरें कर्तृत्व हे गुण जर असतील, तर ते संपूर्णतया प्रगट करण्याची हीच वेळ आहे." "ओजस्वी वाणी" ह्या शब्दांत शास्त्र्यांच्या उपरोक्त रसाळ वक्तृत्वाची तारीफ कलकत्त्याच्या स्टेटस्मननें केली होती.

श्री. शास्त्र्यांचें वक्तृत्व नेहमींच रसाळ असतें. वेंचक शब्दांचें व आपल्याच स्वरमाधुर्याचें एखाद्या वक्त्याप्रमाणेंच त्यांनाहि वेड आहे. पण उत्साहाच्या भरांत ते वाहवत जातात आणि शब्दांची जी जादू ते निर्माण करतात तिच्या योगानें दुसऱ्याची व त्यांची स्वतःचीहि नजरबंदी होते. त्यांचें कलकत्त्याचें भाषण बारकाईनें पाहण्यासारखें आहे. त्या वेळीं सत्याग्रह सुरू होता. शास्त्र्यांच्या भाषणांतील दोन मुद्दे माझ्या दृष्टीनें ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. पहिला मुद्दा असा कीं कांहींहि झालें, आपला कितीहि अपमान झाला, आपण कितीहि चिरडले गेलों, आपली कितीहि बेअब्रू आणि पिळवणूक झाली, तरी ब्रिटिश सरकारपुढें आपण मान तुकवलीच पाहिजे. एखादा किडासुद्धां कातावला म्हणजे उलटून चावण्याचा प्रयत्न करील; पण शास्त्र्यांचें अनुयायित्व पत्करल्यास हिंदी माणूस प्रतिकार करण्यास धजावेल म्हणजे काय गोष्ट आहे? त्यांच्या दृष्टीला दुसरा मार्गच दिसत नाहीं. ब्रिटिश सरकारचे हुकुम स्वीकारणें व ते पाळणें हाच त्यांचा धर्म. विधात्यानें आमच्या ललाटीं हेंच लिहिलेलें आहे, तेव्हां त्याच्यापुढें इच्छा असो, वा नसो, मस्तक नम्र केलेंच पाहिजे.

बरें, परिस्थितीची पक्की रूपरेषा समजून घेऊन ते सल्ला देत होते असेंहि नाहीं.

" घटना " अजून तयार व्हावयाची होती. शुभ्रपत्रिकेंतील सूचना अनिष्ट आहेत खऱ्या; पण त्यांनाच कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें तर परिस्थितीचा विचार करतां आपण तसला कायदासुद्धां राबवून घेतला पाहिजे असें शास्त्र्यांनीं सांगितलें असतें तर त्यांचीं विधानें चांगलीं-वाईट कशींहि असोत, तीं अप्रासंगिक तरी ठरलीं नसतीं. पण शास्त्री चार पावलें पुढें गेले आणि आगामी कायदा कितीहि असमाधानकारक असला तरी तो राबवा असाच मी सल्ला देईन असें ते म्हणाले. ब्रिटिश सरकारच्या हातीं राष्ट्राच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या बाबतींत कोरी हुंडी द्यावयास ते तयार होते असा याचा अर्थ आहे. भविष्यकाळीं घडणाऱ्या अज्ञात गोष्टीविषयीं कोणत्याहि व्यक्तीला, गटाला अगर पक्षाला अशा रीतीनें आधीं वचनबद्ध कसें होतां येतें याचें मला गूढच पडलें आहे. अर्थात् कोणतींच नैतिक अथवा राजकीय अधिष्ठानें नसतील व राज्यकर्ते म्हणतील ती पूर्व दिशा हेंच सनातन धोरण ठरलेलें असेल, तर मात्र गोष्ट निराळी.

दुसरा मुद्दा केवळ डावपेंचांचा होता. शुभ्रपत्रिकेवर अद्यापि बरींच संस्करणें व्हावयाचीं होतीं. अर्थात् शुभ्रपत्रिकेंत जे फेरबदल होणार ते ब्रिटिश सरकार व पार्लमेंट यांच्यावर निरनिराळ्या गटांकडून जसें दडपण आणण्यांत येईल तदनुरूप होत जाणार होते. रस्सी-खेंचींत हिंदी प्रागतिकांचें पाठबळ आपल्या बाजूला मिळविण्यासाठीं सरकारनें शुभ्रपत्रिकेंतील कडकपणा कदाचित् जरा सौम्य केला असता, निदानपक्षीं पत्रिकेंतील सूचनांत छाटाछाट तरी होऊं दिली नसती. पण शास्त्र्यांच्या भाषणामुळें प्रागतिकांना प्रसन्न करून घेण्याचें कारणच उरलें नाहीं हें सरकारला कळून चुकलें. त्यांचीं मनें वळविण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. हें ठरून गेलें कीं, गचांडी मारून बाहेर काढिले तरी ते हिंदु स्त्रीप्रमाणें सरकारशीं निष्ठेनेंच वागणार. प्रागतिकांच्या दृष्टीनें सुद्धां शास्त्र्यांच्या कलकत्ता येथील भाषणांतील धोरण साफ चुकीचें होतें व त्या पक्षाच्या राजकारणाची त्यामुळें हानि झाली असें मला वाटतें.

शास्त्र्यांच्या भाषणाचें अथवा प्रागतिकांच्या परिषदेचें मला फार महत्त्व वाटतें म्हणून या विषयाची मीं इतकी चर्चा केली असें नसून प्रागतिक पुढाऱ्यांचें धोरण व अंतःकरण यांसंबंधीं मला जिज्ञासा वाटत असे म्हणून ही चर्चा करावी लागली. तसे ते मोठे आदरणीय व कर्तृत्ववान लोक आहेत. पण ते असे कां वागतात त्याचा उलगडा मला कांहीं केल्या होत नाहीं. तुरुंगांत असतां शास्त्र्यांचें दुसरें एक भाषण वाचूनहि मला फार आश्चर्य वाटलें. १९३३ च्या जूनमध्यें भारत सेवक समाजापुढें त्यांनीं भाषण केलें. ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांतून एकाएकीं काढून घेण्यांत आली तर वैमनस्य, छळ, पक्षोपपक्षांनीं परस्परांवर केलेली दडपशाही वगैरेंचा हिंदी राजकारणांत सुळसुळाट होईल अशी भीति त्यांनीं व्यक्त केली. उलट परमत-सहिष्णुता हा ब्रिटिश राजकारणाचा नित्य गुण झालेला असल्यामुळें ब्रिटिशांशीं

सहकार्य करून हिंदुस्थाननें आपला भावि प्रश्न सोडवला तर येथेंहि सहिष्णुतेचें वातावरण कायम राहण्याचा बराच संभव आहे, वगैरे वगैरे. तुरुंगांत असल्यामुळें 'स्टेट्स्मन' मध्यें आलेल्या शास्त्र्यांच्या भाषणाचा गोषवारा आधारादाखल घेऊनच मी हें लिहीत आहें. 'स्टेट्स्मन' म्हणतो, "किती सुंदर विचारसरणी आहे ही. डॉ. मुंजेसुद्धां हल्लीं याच अर्थानें बोलत असतात." रशिया, जर्मनी व इटली येथें चाललेल्या दडपशाहीच्या अमानुष व पाशवी अत्याचारांचा उल्लेख शास्त्र्यांनीं तदनंतर केल्याचें स्टेट्स्मनमध्यें नमूद करण्यांत आलें आहे.

ब्रिटन व हिंदुस्थान यांच्यासंबंधींचा श्री. शास्त्र्यांचा दृष्टिकोण व कट्टर ब्रिटिश हुजूरपक्षाचा दृष्टिकोण यांच्यामधील विलक्षण साम्य हें भाषण वाचतांच माझ्या लक्षांत आलें. दोघांमध्यें तपशीलांत अर्थातच फरक होता; पण दोघांच्याहि विचारसरणी मूलतः एकरूपच दिसल्या. विन्स्टन चर्चिल यांच्या तोंडीं श्री. शास्त्र्यांचे शब्द कसे शोभून दिसले असते. तरी श्री. शास्त्र्यांची गणना जहाल प्रागतिकांत होत असून प्रागतिकांचे सर्वांत अधिक कर्तृत्ववान पुढारी असा त्यांचा नांवलौकिक आहे.

श्री. शास्त्र्यांनीं केलेला इतिहासाचा व विशेषतः ब्रिटन-हिंदुस्थानच्या इतिहासाचा उलगडा मला मान्य होण्यासारखा नाहीं. आणि इंग्रजाव्यतिरिक्त कोणत्याहि परराष्ट्रीय व्यक्तीला तो मान्य होईल असेंहि वाटत नाहीं; इतकेंच काय, पण प्रगतिपर अशा पुष्कळ इंग्रजांचाहि श्री. शास्त्र्यांशीं मतभेद होण्याचा संभव आहे. ब्रिटिश अधिकारी वर्गाचा रंगीत चष्मा स्वतःच्या डोळ्यांवर चढविण्याची मोठी नामी खोड श्री. शास्त्र्यांना लागलेली आहे. त्यांच्या भाषणापूर्वीं सतत अठरा महिनेपर्यंत हिंदुस्थानांत जो धिंगाणा सुरू होता, त्याचा नामोच्चारसुद्धां त्यांच्या भाषणांत झाला नाहीं, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. रशिया, जर्मनी आणि इटली इतक्या लांब वळसा मारून ते आले; पण हिंदुस्थानांत काय जळतें आहे तें त्यांना दिसेना. सरहद्द प्रांतांतील व बंगालमधील धुमाकूळ त्यांच्या कानीं कदाचित् आला नसेल; कारण बातम्यांवरील सरकारी नियंत्रणामुळें तेथील प्रसंगांना वाचा फुटणें कठिण झालें होतें. पण बलिष्ठ प्रतिपक्षाशीं हिंदी जनता जी जिवावरची लढाई खेळत होती, देशाला ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या, त्याहि श्री. शास्त्र्यांना दिसूं नयेत म्हणजे काय? पोलिसांची दंडुकेशाही, वटहुकुमांची अरेरावी, अन्नसत्याग्रह, तुरुंगांतील हालअपेष्टा यांची त्यांना कांहींच माहिती नव्हती काय? ज्या सहिष्णुतेबद्दल व स्वातंत्र्याबद्दल त्यांनीं ब्रिटिशांचे पोवाडे गायिले, ती सहिष्णुता व तें स्वातंत्र्य त्याच ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत पायांतळीं तुडविलें याची खबर श्री शास्त्र्यांपर्यंत पोंचली नाहीं का?

काँग्रेसचें व त्यांचें एकमत असेल अगर नसेल; तो प्रश्न अलाहिदा. काँग्रेसच्या धोरणावर टीका करण्याचा, तिचा निषेध करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार होता. पण हिंदी गृहस्थ म्हणून, स्वातंत्र्याचा एक भक्त म्हणून, संवेदनाक्षम मानव म्हणून,

त्यांच्या मनांत आपल्या देशबांधवांनीं व भगिनींनीं दाखविलेल्या अपूर्व धैर्याविषयीं व त्यागाविषयीं कोणते विचार येत होते ? हिंदुस्थानच्या हृदयावर ब्रिटिश सरकारच्या कुऱ्हाडीचे घावावर घाव पडत असतां त्यांना दुःख, यातना मुळींसुद्धां वाटल्या नाहींत ना ? उद्दाम साम्राज्यशाहीच्या आधिभौतिक सामर्थ्यापुढें शिर झुकविण्याचें हजारों लोकांनीं नाकारिलें, देह भरडला गेला, घरदार मोडून पडलें, आप्त-स्वकीयांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी बेहेत्तर, पण रुमालानें हात बांधून उभे राहणार नाहीं, मन कोणाला विकणार नाहीं, असा निर्धार त्यांनीं दाखवला या दृश्याचा काडीमात्र परिणाम श्री. शास्त्र्यांच्या अंतःकरणावर झाला नाहीं काय ? तुरुंगांत व तुरुंगाबाहेर आम्हीं धिमेपणा दाखवला, सस्मित मुद्रेनें आणि हंसऱ्या तोंडानें आम्ही वागलों सवरलों, पण पुष्कळ वेळां ओठांवर स्मित दिसत असलें तरी आमच्या डोळ्यांत आसवें दाटलेलीं असत आणि तोंडावर हास्याच्या लहरी खेळत असल्या, तरी आंत दुःखाचे कढ येत असत.

व्हेरिअर एल्विन नांवाच्या एका उमद्या व उदारमनस्क इंग्रजानें आपले त्या काळांतील विचार पुढीलप्रमाणें मांडलेले आहेत. १९३० सालासंबंधीं तो म्हणतो : " सर्व राष्ट्रच्या राष्ट्र आपले गुलामी वृत्तीचे पाश झुगारून देऊन निर्भय निश्चयाच्या खऱ्या उच्च पदावर आरूढ होत असतांनाचें दृश्य खरोखर उदात्त होतें. "

लढा चालू असतां श्री. शास्त्र्यांसारख्या कर्तबगार व भावनानुकूल माणसाच्या मनांत आपल्या देशबांधवांविषयीं अशासारखे विचार येत नसतील हें संभवनीय वाटत नाहीं. सर्व प्रकारच्या नागरिक स्वातंत्र्याची व सार्वजनिक कार्याची गळचेपी केल्याबद्दल ते सरकारची हजेरी घेतील अशीच कोणींहि अपेक्षा केली असती. ते व त्यांचे सहकारी बंगाल व सरहद्द प्रांतासारख्या संकटग्रस्त प्रांतांना भेटी देतील अशीहि आशा वाटत होती. अर्थात् कॉंग्रेसला अथवा कायदेभंगाला साहाय्य करण्यासाठीं नव्हे, तर सरकारी दंडेलीची हकीकत उजेडांत आणून तिला आळा घालतां यावा यासाठीं. स्वतःला स्वातंत्र्याचे व नागरिक हक्कांचे कैवारी म्हणवणारे इतर देशांतील लोक नेहमीं अशीं कामें करतांना आढळून येतात. पण असें कांहीं करण्याऐवजीं, हिंदी स्त्री-पुरुषांच्या पाठीवर नालबंद टापा रोंवणाऱ्या व नेहमींच्या स्वातंत्र्याला जमिनींत तुडवून टाकणाऱ्या अधिकाऱ्यांच्या लीलांना अटकाव करण्याचें सोडून, निदान काय प्रकार चालले आहेत तें पाहण्याची तसदीहि न घेतां, ब्रिटिशांना त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेबद्दल व सहिष्णुतेबद्दल एक प्रशस्तिपत्र देऊन श्री. शास्त्री पार मोकळे झाले ! आणि हें केव्हां, तर ब्रिटिशांचे हे गुण हिंदुस्थानांत औषधालाहि दिसून येत नव्हते अशा वेळीं ! ! सरकारच्या पाठीशीं अशा प्रकारें आपलें नैतिक पाठबळ उभें करून दडपशाहीच्या कृत्यांना त्यांनीं उत्तेजन मात्र दिलें.

श्री. शास्त्र्यांची तशी इच्छा नसेल, आपल्या कृत्याचे परिणाम काय होतील याची कल्पनाहि त्यांना आली नसेल, याबद्दल मला अणुमात्र शंका नाहीं. पण

त्यांच्या भाषणाचा परिणाम खासच असा झाला असणार. त्यांच्याकडून असा विचार व आचार कां घडला?

आपल्या देशबांधवांशीं व आधुनिक विचारांशीं प्रागतिकांनीं मुळींच संबंध ठेवलेला नाहीं. ह्या उत्तराव्यतिरिक्त दुसरें समाधानकारक उत्तर वरील प्रश्नाला देतां यावयाचें नाहीं. त्यांच्या वाचनांत येणाऱ्या पुराण पुस्तकांचा धुरोळा डोळ्यांत उडाल्यामुळें भोंवतीं पसरलेलें हिंदी जगत् त्यांना दिसेनासें झालें आहे. एक प्रकारच्या आत्मानंदांतच ते गुंगलेले असतात. आम्ही तुरुंगांत पडलों आणि आमचीं शरीरें गजांच्या आड डांबलीं गेलीं, पण आमच्या मनाचा स्वैरसंचार थांबला नाहीं कीं आमची हिंमत खचली नाहीं. पण प्रागतिकांनीं स्वतःच आपल्या मनाचे कैदखाने बनविले होते. त्यांत ते चकरावर चकरा मारीत, पण तेथून त्यांची सुटका होत नसे. प्रागतिक म्हणजे सद्यःस्थितीचे पुजारी असा प्रकार झाला आहे. पण या गतिमान् जगांत सद्यःस्थिति बदलत असते, आणि तसा बदल झाला कीं मग सुकाणू व होकायंत्र जवळ नसलेल्या सारंगाप्रमाणें त्यांची स्थिति होते. मनानें व शरीरानें ते दुर्बल बनतात व त्यांचीं ध्येयें व नैतिक कल्पनाहि अस्तंगत होतात. आपण होऊन पुढें सरकावें, नाहीं तर पुढें रेटलें जावें एवढा एकच विकल्प मनुष्याच्या हातीं आहे. ह्या चर सृष्टींत अचर राहणें शक्य नाहीं. भोंवतालीं वादळांची घनचक्कर माजलेली पाहून या जडभरत प्रागतिकांची गाळण उडाली. त्यांचें दुबळें शरीर पुढें सरेना. महासागरावर ते हेलकावे खात होते. गवतकाडी कोठें दिसली कीं तिला मिठी मारण्याचा प्रयत्न ते करीत असत. शंकेनें व अनिश्चयानें ग्रस्त झालेले हे प्रागतिक हिंदी राजकारणाच्या रंगभूमीवर अतिरिक्त विचारांची सुतकी मुद्रा धारण करून वावरणाऱ्या हॅम्लेटप्रमाणें भासतात.

"काळाचीं चक्रें उलटीं फिरती काय अनर्थ !
सुलटीं तीं फिरण्यासाठीं झटणें आम्ही व्यर्थ."

कायदेभंगाच्या पडत्या काळांत सर्व्हंट ऑफ इंडिया नांवाच्या एका प्रागतिक साप्ताहिकानें कॉंग्रेसवाल्यांवर अशी टीका केली कीं, तुरुंगांत जाण्यासाठीं हे आतुर झालेले असतात व तुरुंगांत गेले कीं मग त्यांना बाहेर येण्याची घाई होते. ह्याच साप्ताहिकानें चिडून असेहि उद्गार काढले कीं कॉंग्रेसपाशीं कार्यक्रम असा काय तो एवढाच आहे. ह्याऐवजीं इंग्लिश प्रधानमंडळाकडे शिष्टमंडळें पाठवावीं अथवा इंग्लंडांतील प्रधानमंडळ बदलावें म्हणून अनुष्ठान मांडावें असा मार्ग संपादकांच्या मनांत सुचवावयाचा असावा.

ही गोष्ट खरी कीं वटहुकुम वगैरे जुलमी कायद्यांचा भंग करणें हेंच कॉंग्रेसचें त्या वेळचें धोरण होतें. त्यासाठीं अर्थातच लोकांना तुरुंगांत जावें लागे. कॉंग्रेस व देशांतील जनता बराच काळ चाललेल्या लढ्यानंतर थकून गेली असल्यामुळें सरकारवर पुरेसें

दडपण आणणें शक्य झालें नाहीं. परंतु व्यवहाराच्या व नीतीच्या दृष्टीनें प्रतिकार करणें आवश्यकच होतें.

अगदीं नागवी दडपशाही सरकारलासुद्धां सहजासहजीं परवडण्यासारखी नसते. तिच्यामुळें आपल्या सत्तेचा पाया खिळखिळा होतो हें सरकारला ठाऊक आहे. दडपशाहीमुळें राजसत्तेच्या खऱ्या स्वरूपाचें जनतेला व जगाला दर्शन होतें, म्हणून पोलादी वाघनखें मखमली हातमोज्यांत दडवतां आलीं तर तें जेत्यांना हवें असतें. ही सरकारी नीति असल्यामुळें दडपशाहीचा प्रतिकार फुटकळ स्वरूपांत झाला तरी त्यापासून बहुमोल कामगिरी होते, ती अशी कीं जनतेचें सामर्थ्य वाढून सरकारच्या नैतिक बळाला खणती लागते.

कायदेभंगाचें नैतिक दृष्ट्या तर ह्यापेक्षांहि अधिक महत्त्व आहे. थोरोचें एक प्रसिद्ध वचन आहे कीं, "ज्या वेळीं लोकांना अन्यायानें तुरुंगांत डांबून ठेवण्यांत येत असेल त्या वेळीं न्यायप्रिय स्त्रीपुरुषांनीं तुरुंग हेंच आपलें घर असें मानलें पाहिजे." हा उपदेश प्रागतिकांना कदाचित् पटणार नाहीं. परंतु सरकारकडून एकसारखी दडपशाही होत असतां व आमचा अपमान व पिळणूक चालली असतां खरें नीतियुक्त जीवन अनुसरणें शक्य होणार नाहीं असें आमच्यापैकीं पुष्कळ जणांचें मत आहे. स्वतःच्या देशांत आम्ही गुन्हेगार ठरलों आहोंत. आमच्यावर नेहमीं पाळत ठेवण्यांत येत असून सर्वव्यापी अशा राजद्रोहाच्या कायद्याचा भंग होतो कीं काय हें पाहण्यासाठीं आमच्या तोंडून बाहेर पडणारा शब्द न् शब्द टिपून घेण्यांत येत असतो. आमचीं पत्रें फोडण्यांत येतात. सरकारी निर्बंध अथवा तुरुंगवास ह्यांची कृष्णच्छाया आमच्या मार्गावर सदोदित पडलेली असते. तेव्हां राजसत्तेपुढें लाचार बनून राहावें, मानसिक अधोगति खुशाल होऊं द्यावी, सत्याचा अपलाप करावा व स्वतःला अधम वाटणाऱ्या कृत्यांना मदत करून आपल्या नैतिक कल्पनेला भोगदासी बनवावी, किंवा परिणामाची कदर न बाळगतां विरोधाला तयार व्हावें, हे दोनच मार्ग आम्हांस दिसत आहेत. तुरुंगांत जाणें अथवा स्वतःवर हालअपेष्टा ओढवून घेणें कोणालाच आवडत नाहीं. परंतु पहिला मार्ग पत्करण्यापेक्षां तुरुंगाची वाट बरी असें आम्हांला वाटतें. बर्नार्ड शॉनें म्हटलें आहे कीं "आपण ज्यांना नीच कृत्यें असें समजतों तीं पार पाडण्याच्या कामीं स्वार्थी लोकांकडून आपला उपयोग केला जावा ही आयुष्यांतील अधोगतीची परमावधि होय. तिच्याशीं तुलना करून पाहतां इतर सर्व दुःखें म्हणजे दैवाच्या लीला आहेत, आयुष्यांतील मानवप्राप्त घटना आहेत असें म्हणतां येईल. परंतु अशी अधोगति म्हणजे मात्र प्रत्यक्ष यमयातना, गुलामगिरी, अथवा इहलोकींचा नरकवास होय."

## ४९

# तुरुंगवासाचा शेवट

सुटकेची वेळ जवळ येत चालली होती. चांगल्या वर्तणुकीबद्दल मला माफी मिळाली असल्याकारणानें दोन वर्षांच्या शिक्षेंतील साडेतीन महिने कमी झाले होते. मनाची शांति अथवा तुरुंगामध्यें मनाला येणारें मांद्य सुटकेच्या कल्पनेमुळें नाहींसें झालें होतें. पण बाहेर गेल्यावर पुढें काय? प्रश्न मोठा बिकट होता. त्याचें उत्तर देतां येईना. त्यामुळें सुटकेचा आनंदहि थोडासा कमी झाला. अर्थात् ही विषण्णता अल्पकालिकच ठरली. कारण फार दिवस ठाणबंद करून ठेवलेला माझा उत्साह लवकरच थयथयाट करूं लागला आणि मी केव्हां एकदां बाहेर जातों असें होऊन गेलें.

१९३३ जुलैच्या अखेर श्री. जे. एम. सेनगुप्त एकाएकीं निवर्तल्याची फार दुःखदायक बातमी कानीं आली. आमचा दोघांचा केवळ वर्किंग कमिटीमुळेंच निकट संबंध आला होता असें नाहीं. केंब्रिजपासूनची आमची ओळख होती. नवा विद्यार्थी म्हणून मी केंब्रिजला गेलों होतों तेव्हां ते नुकतेच पदवीधर झाले होते.

स्थानबद्ध असतांनाच सेनगुप्तांना मृत्यु आला. १९३२ सालीं युरोपांतून परत आल्यापासून ते तुरुंगांत अथवा नजरकैदेंत होते. तेव्हांपासून त्यांची प्रकृति ढांसळली. स्मशानयात्रेच्या वेळीं त्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं अफाट जनसमुदाय लोटला. जणूं कांहीं आपल्या हृदयांत दीर्घ कालपर्यंत दाबून ठेवलेलें दुःख बंगाल त्या वेळीं व्यक्त करीत होता.

सेनगुप्त तर गेले. दुसरे दरबारचे कैदी म्हणजे सुभाष बोस. कित्येक वर्षांच्या तुरुंगवासामुळें त्यांचीहि प्रकृति क्षीण झाली होती. अगदीं सरतेशेवटीं उपचाराखातर युरोपमध्यें जाण्याची परवानगी सरकारकडून त्यांना देण्यांत आली. विठ्ठलभाई पटेलांसारखा अनुभविक लढवय्या युरोपांतच अंथरुणावर पडून होता. तुरुंगवास व बाहेर अव्याहत चालू असणारी धांवपळ शरीराला न झेपल्यामुळें असे कित्येक लोक खंगून गेले असतील आणि कित्येक मृत्युमुखीं पडले असतील. कित्येक लोक असे होते कीं, ते बाहेरून बदललेले दिसत नसले, तरी त्यांच्या मनामध्यें या अनैसर्गिक जीवनाच्या आघातामुळें विकृती उत्पन्न झाल्या होत्या.

या भयंकर स्थितीची जाणीव सेनगुप्तांच्या मृत्यूमुळें मला झाली व त्यामुळें मनाला थकवा आल्याप्रमाणें वाटूं लागलें. इतक्या हालअपेष्टा कशासाठीं सहन करावयाच्या? कोणत्या ध्येयासाठीं हें सारें सोसावयाचें?

प्रकृतीच्या बाबतींत मी मोठा दैववान् होतों. कॉंग्रेसच्या धामधुमीमुळें खूप दगदग होई व आहारविहाराच्या बाबतींत अनियमितपणाहि उत्पन्न होत असे. परंतु एकंदरींत माझी प्रकृति चांगली टिकून राहिली. थोडीबहुत वडिलार्जित देणगी व थोडीबहुत स्वतः ठेवलेली दक्षता यांमुळें प्रकृति चांगली राहिली असावी. आजारपण, अशक्त प्रकृति, आणि स्थूलपणा ह्या गोष्टी माणसाला शोभणाऱ्या नव्हेत असें मला वाटे. व्यायाम, भरपूर मोकळी हवा व साधें अन्न यांच्या साहाय्यानें मीं उपरोक्त आपत्तींपासून शरीराचा बचाव केला होता. माझा अनुभव असा आहे कीं हिंदुस्थानांतील मध्यम वर्गांत आढळणारे बरेचसे रोग सदोष आहारापासून उत्पन्न झालेले असतात. जें अन्न खाण्यांत येतें तें फाजील पौष्टिक व वाजवीपेक्षां अधिक असतें ( उधळमाधळ करण्याची ऐपत असणाऱ्यांनाच हें विधान लागू पडेल. ) मुलांचे लाड करणाऱ्या आया, मुलांना गोड व चमचमीत पदार्थ अवश्य त्यापेक्षां अधिक प्रमाणांत खावयाला घालून त्यांना कायमचा अपचनाचा रोग जडवून ठेवतात. मुलाच्या अंगाभोंवतींसुद्धां जरुरीहून अधिक कपडे लपेटण्यांत येतात. हिंदुस्थानांत आलेल्या इंग्रजांना देखील फाजील आहाराची संवय लागली आहे. तथापि गेल्या पिढीपेक्षां त्यांच्यांत आतां थोडीशी सुधारणा झालेली दिसते.

अन्नाचे प्रयोग करण्याच्या भानगडींत मीं कधीं फारसें लक्ष घातलेलें नाहीं. अधाशीपण व मिष्टान्न हीं टाळण्याचा तेवढा मीं प्रयत्न करीत असतों. सर्वच काश्मीरी ब्राह्मणांप्रमाणें आम्हीहि मांस खातों, आणि मला विशेष आवड नसली, तरी लहानपणापासून माझ्या खाण्यांत मांस येत असे. १९२० सालीं सत्याग्रह सुरू होतांच मांसाशन सोडून मीं शाकाहार पत्करला. सहा वर्षांनीं मी युरोपला गेलों, तोंपर्यंत शाकाहार चालू राहिला होता. नंतर मात्र पुनः मांसाशन सुरू झालें. हिंदुस्थानांत परत आल्यावर फिरून शाकाहार घेऊं लागलों व आतांपर्यंत तो बहुतेक चालू राहिलेला आहे. मांसाशन माझ्या प्रकृतीला मानवतें. पण माझ्या मनांत त्याबद्दल किळस उत्पन्न झाली असून मांसाशनांत एक प्रकारचा रानवटपणा आहे असें मला वाटूं लागलें आहे.

१९३२ सालीं तुरुंगांत असतांना मी आजारी पडलों. तेव्हां स्वतःच्या निकोप प्रकृतीविषयीं वाटणाऱ्या अभिमानाला धक्का बसून मी त्रासल्यासारखा झालों होतों. त्या वेळीं आयुष्यांत पहिल्याप्रथमच मनांतील उफाळणाऱ्या आनंदाचे व उत्साहाचे विचार नष्ट होऊन मंद गतीनें हात जोडणाऱ्या प्रकृतिक्षयाचीं भयानक चित्रें डोळ्यांसमोर उभीं राहूं लागलीं. मृत्यूचें मला फारसें भय वाटत नाहीं; परंतु शरीराच्या व मनाच्या क्षणशः व कणशः होणाऱ्या ऱ्हासाची कल्पना मात्र माझ्या मनाला भयप्रद वाटते. पुढें कांहीं दिवसांनीं शरीरयंत्र पुनः सुरळीत चालू झालें. हिंवाळ्यांत मी पुष्कळ वेळपर्यंत सूर्यस्नान करीत असें त्याचाहि उपयोग झाला.

व्यायामाच्या सर्व प्रकारांत मला शीर्षासनाची फार आवड आहे. शरीरास

त्यापासून फार फायदा होतो असें मला वाटतें. पण त्यापेक्षांहि शीर्षासनाच्या मानसिक परिणामामुळें तें मला अधिक प्रिय झालें आहे. हें आसन करतांना शरीराची जी विचित्र उलटापालट होते, त्यामुळें खेळकर वृत्तींत भर पडून आयुष्याच्या विचित्र लीलांकडे देखील आनंदी मुद्रेनें पाहण्याची मनाची तयारी होते.

तुरुंगांतील जीवनांत क्रमप्राप्त असणाऱ्या निरुत्साहांतून माझी सुटका होत असे ती प्रकृतिस्वास्थ्यामुळेंच. तुरुंगांत व तुरुंगाबाहेर बदलत्या परिस्थितीशीं मला जमवून घेतां आलें तेंहि प्रकृति उत्तम होती म्हणूनच. आयुष्यांत पुष्कळ वेळां मला असे धक्के बसले कीं मी आतां जमीनदोस्त होणार असें वाटावें. परंतु मी त्वरितच पूर्वस्थितीवर येत असें. डोकें दुखणें अथवा झोंपेवांचून तळमळणें म्हणजे काय याची तर मला ओळखहि नाहीं. मुळांतच माझा मेंदू फार शांत व विचारी आहे हें ह्यावरून सिद्ध होत नाहीं का? वाचनाच्या व लेखनाच्या कामीं तुरुंगांतील अपुऱ्या उजेडांतहि मीं डोळ्यांकडून भरपूर चाकरी बजावून घेतली असून सुद्धां माझी दृष्टि कमी झालेली नाहीं. माझी साफ दृष्टि पाहून गतवर्षी एका नेत्र-विशारदानें आश्चर्य व्यक्त केलें. एक दोन वर्षांतच मला चष्मा घ्यावा लागेल असें भविष्य त्यानें आठ वर्षांपूर्वी करून ठेविलें होतें. पण तें भविष्य अजिबात चुकीचें ठरलें. चष्म्याचें साहाय्य न घेतां माझे डोळे अद्यापि व्यवस्थितपणें काम करीत आहेत; ह्या सर्व गोष्टींवरून माझी शांतवृत्ति व विवेकीपणा सिद्ध होत असला तरी सदासर्वदा मन शांत ठेवणारे आणि विवेकाची कास न सोडणारे लोक मला मुळींच आवडत नाहींत हेंहि नमूद करून ठेवलें पाहिजे.

तुरुंगांत सुटकेची वाट पाहत असतां बाहेर वैयक्तिक सत्याग्रहाला सुरुवात झाली. गुजराथमधील शेतकऱ्यांना १ ऑगस्टपासून आपण सत्याग्रहाची शिकवणूक देण्यास सुरुवात करणार आहों असें गांधीजींनीं सरकारला कळविलें व तशी सुरुवातहि त्यांनीं केली. त्यांना तावडतोब अटक करून एक वर्षाची सजा देण्यांत आली व त्यांना पुनः येरवड्यास पाठवण्यांत आलें. ते तुरुंगांत गेल्याचें ऐकून मला आनंद वाटला पण लवकरच दुसरी एक भानगड उपस्थित झाली. पूर्वीप्रमाणेंच तुरुंगांतून हरिजनकार्य चालविण्यासाठीं आपणांस सवलती मिळाव्यात अशी गांधीजींनीं मागणी केली. त्या गोष्टीला सरकार तयार नव्हतें. म्हणून गांधीजींनीं पुनः उपोषणाला सुरुवात केली आहे असें आम्हांला कळलें. इतक्या क्षुल्लक गोष्टीसाठीं त्यांनीं आपला जीव पणाला लावावा या गोष्टीचा मला मुळींच उलगडा होईना. परंतु त्या बाबतींत कांहींहि करणें हातीं नसल्यामुळें भयचकित अंतःकरणानें आम्हीं नुसते पाहत राहिलों.

एका आठवड्याच्या उपोषणानंतर त्यांची प्रकृति झपाट्यानें खालावत चालली. त्यांना रुग्णालयांत नेण्यांत आलें असलें तरी ते तेथेंहि कैदी म्हणूनच होते. सवलतीच्या बाबतींत माघार घेण्यास सरकार तयार होईना. आणि गांधीजीहि जीवना-

विषयीं उदासीन बनले होते. ( पूर्वीच्या उपोषणाच्या वेळीं त्यांची मनःस्थिति अशा प्रकारची नसे. ) खालावत चाललेल्या प्रकृतीविषयीं त्यांना क्षिति वाटेनाशी झाली. अखेर जवळ आली असें वाटूं लागलें. सर्वांचा निरोप घेऊन स्वतःपाशीं जी कांहीं चीजवस्त होती तिची त्यांनीं व्यवस्था लावून टाकली. परिचारिकांनाहि त्यांपैकीं कांहीं वस्तू त्यांनीं दिल्या, परंतु आपल्या ताब्यांत असतां गांधीजींना मृत्यु यावा अशी सरकारची मुळींच इच्छा नव्हती. म्हणून गांधीजींची अभावितपणें सुटका करण्यांत आली. ही मुक्तता अगदीं वेळेवरच झाली म्हणावयाची. एकादा दिवस उशीर होता तर सर्वच कारभार आटोपण्याचा संभव होता. त्यांना वांचवण्याचें बरेंचसें श्रेय अँड्रयूज यांना दिलें पाहिजे.

दरम्यान डेहराडूनहून २३ ऑगस्ट रोजीं मला नैनी येथें आणण्यांत आलें. आई एकाएकीं आजारी पडल्यामुळें तिला रुग्णालयांत नेल्याची बातमी मला त्याच वेळीं समजली. आईची प्रकृति चिंताजनक झाली होती म्हणून ३० ऑगस्ट रोजीं माझी मुक्तता करण्यांत आली. वास्तविक माझी सुटका १२ सप्टेंबर रोजीं होणारच होती; पण मला प्रान्तिक सरकारनें ११ दिवस जादा माफी दिली.

८०

# गांधीजींची भेट

तुरुंगांतून सुटल्याबरोबर मी लखनौला आईकडे गेलों व तेथेंच तिच्यापाशीं कांहीं दिवस राहिलों. बऱ्याच दिवसांनीं मी बाहेर येत असल्यामुळें भोंवतालच्या जगाचा संबंध तुटल्यासारखा झाला होता. पण मी तुरुंगांत गुंतून पडलों म्हणून जगाच्या गतींत कांहीं खळ पडला नाहीं. ही जाणीव झाल्याबरोबर माझ्या मनाला धक्का बसला. आपणा सर्वांचेंच असें होत असेल. मुलगे, मुली वाढत असतात. लग्नें, जन्म, मृत्यु, प्रेम आणि वैर, काम आणि खेळ, अश्रु आणि हास्य सर्व कांहीं सुरू असतें. जीवनांत नवे लागेबांधे, संभाषणांत नवे विषय जें जें कांहीं माझ्या दृष्टीस पडे त्या सर्वांत नवल करण्यासारखें असें कांहीं तरी दिसून येई. जीवनाचा प्रवाह मला बाजूला सारून जणूं कांहीं तसाच पुढें निघाला होता आणि मी कोठच्या डबक्यांत राहिलों होतों. हा विचार फारसा आनंददायी नव्हता. परिस्थितीशीं मला चटकन् समरसहि होतां आलें असतें; पण आंतून तशी उमकाच वाटेना. तुरुंगाच्या बाहेर जरा वेळ आपण आलेले आहोंत, लवकरच त्या स्थानीं परतावें लागणार हें मी जाणून होतों. तेव्हां ज्या जगांतून आपण लवकरच जाणार त्याच्याशीं समरस होण्याची धडपड तरी करा कशाला? राजकीय दृष्ट्या देश शांत होता, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. सार्वजनिक स्वरूपाचे व्यवहार सरकारनें अजिबात दडपून तरी टाकले होते अथवा नियंत्रित तरी केले होते. क्वचित् धरपकडहि सुरू होती. पण हिंदुस्थानांतील त्या वेळची शांतता फार अर्थपूर्ण होती. प्रखर दडपशाहीचे फटके सोसल्यानंतर थकल्यामुळें आलेल्या ग्लानीप्रमाणें ती शांतता होती. एक प्रकारें किती बोलकी शांतता होती ती! पण असले बोल दडपशाही करणाऱ्या सरकारच्या ध्यानांत येत नसतात. हिंदुस्थान देश पोलिशी राज्याचा आदर्श नमुना बनला होता. पोलिशी वृत्ति सर्व सरकारी खात्यांतून पसरलेली होती आणि देशभर हेरांचा व चुगलखोरांचा सुळसुळाट झाला होता. लोकांची हिम्मत खचली होती. अन्तःकरणें भयभीत झालीं होतीं. खेडोपाडीं जरा राजकीय हालचाल दिसली कीं ती ठेंचून काढण्यांत येत असे. नगरपालिकांमधून व स्थानिक संस्थांतून काँग्रेसच्या लोकांना हुसकून लावण्याचे प्रयत्न सरकार करीत होतें. ह्यासंबंधीं कलकत्ता-कार्पोरेशनचें उदाहरण सुप्रसिद्धच आहे.

जर्मनींतील नाझींच्या अत्याचारांच्या बातम्यांचा येथील ब्रिटिश अधिकारी व त्यांच्या बगलेंतील छापखाने यांच्यावर मोठा विचित्र परिणाम झालेला आढळून

आला. त्यांच्या कृत्यामुळें आपण हिंदुस्थानांत जें जें केलें तें तें समर्थनीय ठरत आहे असें वाटून आणि सदाचरणाच्या आढयतेनें फुगून जाऊन ते आम्हांला सांगूं लागले कीं नाझींचा अंमल येथें असता तर काय दशा उडाली असती पाहा. खरेंच, दडपशाहीच्या बाबतींत नाझींनीं जो 'विक्रम' करून दाखविला, त्याची बरोबरी करणें सोपें नव्हतें. आमचें नशीब कदाचित् अधिक खडतर झालें असतें; पण गेल्या पांच वर्षांत हिंदुस्थानमध्यें ठिकठिकाणीं जे कांहीं प्रकार घडले त्यांची पूर्ण माहिती नसल्यामुळें मला या बाबतींत निश्चित मत देतां येणार नाहीं. डावा हात काय करतो त्याची उजव्या हाताला दाद लागूं नये ह्या राजनैतिक तत्त्वावर ब्रिटिशांचा विश्वास असल्यामुळें निःपक्षपाती चौकशीबद्दल केलेल्या सर्व मागण्या सरकारनें झिडकारून लावल्या आहेत. सर्वसामान्य इंग्रज माणसाला पाशवी कृत्याची चीड असते ही सत्य गोष्ट असावी. नाझीप्रमाणें "पशुवृत्ति" या शब्दाचें इंग्रज लोक मोठें कौतुक करतील आणि तो शब्द मोठ्या प्रेमानें चघळीत बसतील असें मला वाटत नाहीं. पाशवी कृत्य हातून घडलें त्याची त्यांना जराशी शरम वाटत असावी. पण आपण जर्मन, इंग्रज, अथवा हिंदी कोणीहि असलों, तरी सभ्यतेचा आपल्या मनावरील मुलामा फारच वालीफ आहे व वासना खतखतूं लागल्या कीं हें संस्कृतीचें सायटें फाटून जावयाला वेळ लागत नाहीं. आणि मग जी कांहीं घाण बाहेर पडते ती न पाहणेंच बरें. महायुद्धामुळें या पाशवी वृत्तीचा फार फैलाव झाला. त्याचा परिणाम तह झाल्यानंतर सुद्धां जर्मनीची अन्नसामग्रीच्या बाबतींत जी 'कोंडी' चालू ठेवण्यांत आली होती तिच्यावरून स्पष्ट झालेला आहे. "कोणत्याहि राष्ट्रानें आतांपर्यंत केलेल्या कृत्यांत अत्यंत बेअकलीपणाचें, कमालीच्या पाशवी वृत्तीचें व गर्हणीय क्रौर्याचें निदर्शक असें हें कृत्य होतें" असें या कोंडीचें वर्णन एका इंग्रजानें केलें आहे. १८५७ व १८५८ साल हिंदुस्थान अद्यापि विसरलेला नाहीं. आपल्या स्वार्थाला ढका लागतो असें दिसलें कीं आपलें शिक्षण, शिष्टाचार, वगैरेंचा आपणाला विसर पडतो. मग "असत्य-नारायणाच्या" पूजा सर्वत्र सुरू होतात आणि पाशवी वर्तनाला "शास्त्रशुद्ध दडपशाही" व "कायदा व सुव्यवस्था यांचें रक्षण" अशीं नांवें देण्यांत येऊं लागतात.

हा कोणा व्यक्तीचा अथवा राष्ट्राचा दोष नाहीं. हिंदुस्थानांत व इतर परकीय सत्तेखालच्या देशांत सत्ताधाऱ्यांविरुद्ध नेहमींच असंतोष धुमसत असतो आणि कधीं कधीं ज्वाळा निघूं लागून त्यांपासून धोकाहि वाटूं लागतो. अशा प्रसंगीं सत्ताधाऱ्यांच्या ठिकाणीं नेहमींच लष्करी गुणावगुणांचा प्रादुर्भाव होत असतो. लष्करी गुणावगुणांचा अनुभव गेल्या पांच वर्षांत आम्हांला यथेच्छ घ्यावयास सांपडला. कारण या काळांतच आमच्या विरोधाला सामर्थ्य प्राप्त होऊन तो प्रभावी होऊं लागला होता. तथापि लष्करी वृत्ति ( अथवा हिंदी प्रजाजनांत तिचा अभाव ) ही आमच्या नित्य परिचयाची झालेली आहे. साम्राज्याचा परिणाम .जित व जेते

यांच्या अधःपतनांतच होत असतो. आमचा अधःपात झालेला स्पष्ट दिसत आहे. आमच्या जेत्यांचें अधःपतन मात्र शरीराच्या अंतर्भागांत झालेल्या रोगाप्रमाणें अदृष्ट असें आहे. पण बुरा वखत ओढवला कीं त्याचें स्वरूप उघडकीस येतें. दरम्यान जो तिसरा गट आहे, त्याच्या वांट्याला दोन्होहि पक्षांचा अधःपात येत असतो.

बड्या अधिकाऱ्यांचीं भाषणें, मध्यवर्ति कायदेमंडळांत व प्रांतिक कायदेमंडळांत विचारलेल्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरें, व सरकारचीं पत्रकें वाचण्यास तुरुंगामध्यें मला खूपच सवड मिळत असे. गेल्या तीन वर्षांत उत्तरांच्या पद्धतीमध्यें किती तरी तफावत पडल्याचें आढळून येतें. सरकार अधिकाधिक अरेरावीच्या व दरडावणीच्या सुरांत बोलूं लागलें आहे. जसा कांहीं शिपायांना हुकुम सोडणारा लष्करांतील सार्जंट मेजरच. १९३३ च्या नोव्हेंबरांत किंवा डिसेंबरांत मिदनापूर येथें कमिशनरनें केलेल्या भाषणांत या वृत्तीचा ध्वनि स्पष्ट उमटलेला दिसून आला. बंगालमधील बिनसरकारी युरोपियन तर इस्से जादा आहेत; त्यांच्या हरएक उच्चारांतून व आचारांतून फॅसिस्ट मनोवृत्तीचा दर्प येत असतो.

सिंधमध्यें कांहीं कैद्यांना नुकतेंच जाहीर रीत्या फाशीं देण्यांत आलें, हा देखील पाशवी मनोवृत्ति फैलावण्याचाच एक प्रकार आहे. हें भयंकर दृश्य पाहतां यावें म्हणून लोकांची सर्व प्रकारें सोय करण्यांत आली होती, आणि असें म्हणतात कीं हजारों प्रेक्षक जमाहि झाले होते!

बाहेर येऊन हिंदुस्थानच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण केल्यावर माझ्या मनाला फारशी उमेद वाटेना. माझे बरेच सहकारी तुरुंगांत होते, धरपकड चालू होती, वटहुकुमांचा रूळ फिरत होता, व नियंत्रकांनीं वर्तमानपत्रांच्या मानेभोंवतीं घातलेली पकडहि कायम होती. त्यांच्या ढवळाढवळीमुळें आमच्या पत्रव्यवहाराचीहि दाणादाण उडे. नियंत्रकांच्या लहरीपणाचा माझे मित्र रफी अहमद किडवाई यांना अतिशय संताप आला. त्यांचीं पत्रें ते अडकवून ठेवीत, पुष्कळदां तीं उशीरा पोंचत अथवा गहाळ होत. त्यामुळें त्यांच्या कामाच्या वेळा हुकत. काम जरा अधिक कसोशीनें करण्याबद्दल नियंत्रकाला कळवावें असा विचार किडवाईंच्या डोक्यांत आला, पण ते लिहिणार कोणाला? नियंत्रकाचें काम गुप्त पोलिस खात्यापैकीं कोणीतरी अधिकारी गपचूपपणें करीत असणार. किडवाईंनीं एक शक्कल काढली. नियंत्रकाला उद्देशून लिहिलेल्या पाकिटावर त्यांनीं स्वतःचाच पत्ता लिहून तें डाकेंत टाकलें. हें पत्र योग्य ठिकाणीं गेलें याबद्दल शंकाच नको. कारण पत्राच्या बाबतींत त्यानंतर थोडी सुधारणा दिसून येऊं लागली.

तुरुंगांत परत जाण्याची माझी इच्छा नव्हती. अगदीं पोटभर तुरुंगवास झाला होता. पण वर्तमान परिस्थितींत राजकारणाचा संन्यास घेतल्यावांचून तुरुंगाचा लकडा सुटणार कसा हें मला कळेना. राजकारणाला रामराम ठोकण्याची तर माझी मुळींच तयारी नव्हती. तेव्हां सरकारशीं खटका उडणार हें ठरून गेल्या-

प्रमाणेंच होतें. अमुक करा अथवा तमुक करूं नका असा हुकुम कोणत्याहि क्षणीं माझ्यावर बजावण्यांत आला असता; आणि तोंडांत कोणी लगाम अडकवूं पाहील तर बंड करून उठावें हा तर माझा स्वभाव पडला. सगळ्या हिंदुस्थानला नरम आणून त्याला हवा तसा दामटण्याचा प्रयत्न सुरू होता. सर्व देशाच्या बाबतींत मी काय करणार ? पण स्वतःवर मात्र हा प्रयोग चालूं द्यावयाचा नाहीं, असें मीं ठरवलें होतें.

तुरुंगांत परत जाण्यापूर्वीं कांहीं गोष्टी प्रथम उरकून घेणें अवश्य दिसलें. माझी आई अंथरूण धरून होती. तिच्याकडे लक्ष देणें जरूर झालें होतें. पुण्याला जाऊन गांधीजींनाहि भेटून यावयाचें होतें. त्यांना भेटल्याला दोन वर्षे होऊन गेलीं होतीं. शक्य तेवढे प्रांतिक सहकारी जमवून त्यांच्याशीं देशाच्या सद्यःस्थितीबद्दलच नव्हे तर जागतिक परिस्थितीबद्दलहि चर्चा करावी व माझ्या डोक्यांत सांठून राहिलेले विचार त्यांच्यापुढें मांडावे असेंहि मनांत होतें. जग झपाट्यानें धांवत सुटलें असून त्याचा लवकरच राजकीय व आर्थिक कडेलोट होणार आहे असें मला वाटत असल्यामुळें आपला राष्ट्रीय कार्यक्रम आपण त्या धोरणानें आंखीत गेलें पाहिजे असा मुद्दा मला मांडावयाचा होता.

घरच्या व्यवहाराकडेहि नजर टाकावयास हवी होती. आतांपर्यंत मी तिकडे ढुंकूनहि पाहत नसें. वडील वारल्यावर मीं त्यांचे कागदपत्र देखील चाळले नाहींत. बरीच छाटाछाट करूनसुद्धां खर्च ऐपतीबाहेरच जात असे. पण त्या घरांत वास्तव्य असे तोंपर्यंत खर्चांत याहून अधिक कपात करणें शक्य नव्हतें. झेपत नव्हतें म्हणून व सरकार ती कोणत्याहि क्षणीं जप्त करील अशी भीति होती म्हणून आम्हीं मोटर ठेवली नाहीं. खर्चाचें संकट भेडसावीत असलें तरी याचकांच्या पत्र-व्यवहारामुळें मात्र मनाची करमणूक होई ( नियंत्रकाच्या कात्रींतून असलीं पत्रें हटकून निसटत असत ) लोकांची, विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांतील लोकांची, एक अशी चुकीची समजूत झालेली होती कीं माझ्यापाशीं गडगंज पैसा आहे.

माझ्या मुक्ततेनंतर माझी धाकटी बहीण कृष्णा हिचा वाङ्‌निश्चय ठरला. माझी उचलबांगडी होण्यापूर्वीं हा विवाह उरकावा अशी माझी इच्छा होती. कृष्णा नुकतीच तुरुंगांतून सुटून आली होती.

आईच्या प्रकृतींत थोडासा आराम पडल्याबरोबर मी गांधीजींना भेटण्यासाठीं पुण्यास गेलों. ते क्षीण झाले होते. पण त्यांची प्रकृति झपाट्यानें सुधरत असल्याचें पाहून मला आनंद झाला. आम्ही खूप खूप बोललों. जीवन, राजकारण, अर्थकारण या विषयांवर आमच्यांत बराच मतभेद असल्याचें दिसून आलें. पण माझ्या दृष्टिकोणाशीं शक्य तितकें जमवून घेण्याची उदारबुद्धि त्यांनीं दाखवली हे त्यांचे माझ्यावर उपकारच आहेत. मागाहून प्रसिद्ध झालेल्या आमच्या पत्रव्यवहारांत माझ्या मनांत घोळत असणाऱ्या अधिक व्यापक प्रश्नांविषयीं चर्चा करण्यांत आलेली

आढळेल. त्या प्रश्नांवरील पत्रांत प्रकट झालेली मतें थोडीं संदिग्ध असलीं तरी त्यांचा रोख सहज लक्षांत येण्याजोगा आहे. मालकवर्गाची मालकी नष्ट केली पाहिजे ही गोष्ट गांधीजींनीं जाहीरपणें मान्य केल्यामुळें मला फार समाधान वाटलें. तथापि मालकी हक्क दंडेलीनें नष्ट न करतां मतपरिवर्तनाच्या मार्गानें करावेत असा मात्र त्यांचा आग्रह होता. पण त्यांचें कांहीं मतपरिवर्तनाचे मार्ग माझ्या दृष्टीनें सामोपचाराच्या शिष्टाचारसंपन्न अशा सक्तीहून फारसे निराळे नसल्या कारणानें मला त्यांच्या आग्रहामुळें आमच्यांत फार तफावत आहे, असें वाटलें नाहीं. त्यांच्याशीं भाषण करतांना पूर्वीप्रमाणेंच मला पुन्हा एकवार वाटलें कीं, शास्त्रीय सिद्धांतावर काथ्याकूट करीत बसण्याच्या ते विरुद्ध असले तरी वस्तुस्थितींत अन्तर्भूत असलेल्या तर्कवादाच्या प्रकाशांत अपरिहार्य अशा सामाजिक क्रांतीचा मार्ग ते धीरे धीरे चालूं लागतील. गांधीजी म्हणजे एक विलक्षण व्यक्ति आहे. मि. व्हेरिअर एल्विन म्हणत त्याप्रमाणें ते मध्ययुगीन कॅथॉलिक संतांप्रमाणें आहेत. पण त्याचबरोबर ते व्यवहार-चतुर असे पुढारीहि आहेत. त्यांचा शेतकऱ्यांच्या नाडीवरचा हात कधीं दूर झालेला नाहीं. आणीबाणीच्या वेळीं ते कोणीकडे मिळतील तें सांगणें कठीण असलें, तरी ते ज्या बाजूला मिळतील त्या बाजूवर त्यांच्या प्रतिष्ठेचा फार मोठा परिणाम झाल्या-शिवाय राहणार नाहीं, ही एक गोष्ट निरपवाद आहे. आणि आम्हांला चुकीचा वाट-णारा मार्ग त्यांनीं पत्करला, तरी त्यांत छक्केपंजे असणार नाहींत, सरळ सीध्या अशाच तऱ्हेनें ते वागतील. त्यांच्याबरोबर सहकार्यानें काम करतां आलें तर उत्तमच आहे; पण अवश्य झालें तर निराळा मार्ग पत्करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे.

पण मला वाटलें कीं सध्यां तरी हा प्रश्न उद्‌भवत नाहीं. नांवाला कां होईना वैयक्तिक कायदेभंग चालू आहे. तेव्हां काम तसेंच पुढें रेटलें पाहिजे. समाजवादी विचारसरणी लोकांत व विशेषतः राजकारणदक्ष अशा काँग्रेस कार्यकर्त्यांत पेरली पाहिजे. म्हणजे पुन्हा धोरण ठरवण्याची वेळ उगवली कीं पुढें पाऊल टाकण्याची आपली तयारी राहील.

गांधीजींच्या पुढें त्या वेळीं उभा असणारा मुख्य प्रश्न वैयक्तिक स्वरूपाचाच होता. पुढें काय करावयाचें? ते पेंचांत पडले होते. तुरुंगांत जावें तर हरिजन-कार्याचा प्रश्न पुनरपि उपस्थित होणार, सरकार बहुधा परवानगी देणार नाहीं, व पुन्हा उपवास करावा लागणार. पण हें चक्र चालणार किती दिवस? असा उंदरा-मांजराचा खेळ चालू ठेवण्यास ते मुळींच तयार नव्हते. हरिजन-कार्याच्या सवलती-साठीं आपण पुन्हा उपवास सुरू केला तर सुटका झाल्यावरहि मी तो चालूच ठेवणार असें ते म्हणाले. म्हणजे देहपात होईपर्यंत ते उपोषण करणार असा त्याचा उघड उघड अर्थ होता.

दुसरा संभवनीय मार्ग म्हणजे शिक्षेच्या उरलेल्या काळांत तुरुंगांत न जातां

हरिजन-कार्याकडे स्वतःला वाहून घ्यावें व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना भेटून त्यांना अवश्य ती सल्लामसलत देत असावें.

तिसरा एक मार्ग त्यांनीं सुचवला तो असा कीं, कांहीं काळ काँग्रेसमधून अजिबात निवृत्त होऊन, त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर "तरुण पिढीच्या" हातीं सर्व सूत्रें सोंपवावीं.

पहिला मार्ग सरळ मृत्यूच्या जबड्यांत जात असल्यामुळें आम्ही कोणी त्याची शिफारस करूं हें शक्यच नव्हतें. काँग्रेस बेकायदा असतां तिसरा मार्ग पत्करला तर फार अनिष्ट परिणाम होईल असें आम्हांला वाटलें. त्यामुळें कायदेभंग, प्रत्यक्ष प्रतिकार, वगैरे चट्सारें गुंडाळून ठेवून काँग्रेस कायदेशीर सनदशीर राजकारणाच्या रंगणावर पुन्हां गेली असती अथवा गांधीजींचा आधार गेल्यामुळें सरकारनें काँग्रेसचा पुरा नायनाट करण्याचा चंग बांधला असता. शिवाय धोरणाची चर्चा करण्यासाठीं एकत्र जमणें अशक्य असल्यामुळें काँग्रेससारख्या बेकायदा संस्थेचा ताबा एकाद्या गटाला घेतां येणेंहि शक्य नव्हतें. राहतां राहिला दुसरा मार्ग. आमच्यापैकीं बहुतेकांना तो मान्य नव्हता. उरलीसुरली प्रतिकारबुद्धीहि त्यामुळें नष्ट होणार होती. स्वतः पुढारीच रणांगणांतून निघून गेल्यावर आगींत उडी घालण्याचा उत्साह कितीसे कार्यकर्ते दाखवतील? पण खोड्यांतून बाहेर पडण्याचा दुसरा कोणताहि मार्ग उपलब्ध न झाल्याकारणानें गांधीजींनीं तोच मार्ग पत्करण्यरचा आपला निश्चय जाहीर केला. कारणें भिन्न भिन्न असलीं तरी सत्याग्रहाचा झिरपा चालू ठेवावा, तो आतांच बंद करूं नये, याबाबत आमचें दोघांचें एकमत झालें. माझ्या मतानें दुसरें काम म्हणजे जनतेचें लक्ष समाजवाद आणि जागतिक परिस्थिति यांच्याकडे वळवणें.

परत येतांना वाटेंत मुंबईला मी कांहीं दिवस थांबलों. तेथें सुदैवानें उदयशंकरचें नृत्य पाहण्याची संधि मिळाली. त्यांचें नृत्य पाहून मला फार आनंद झाला. नाटक, संगीत, चित्रपट, बोलपट, नभोवाणी, ध्वनिक्षेपण वगैरे गोष्टी गेलीं कित्येक वर्षें माझ्या आटोक्याबाहेर गेल्या होत्या. कारण बाहेर असलों तरी माझ्या मागें कार्याचा व्याप इतका असे कीं, डोकें वर उचलण्याची पंचाईत पडायची. आतांपर्यंत फक्त एकच बोलपट मीं पाहिलेला आहे व चित्रपटांतील प्रसिद्ध नटनटींचीं नांवें काय कानावरून गेलीं असतील तेवढींच. नाटक पाहावयास न मिळाल्यामुळें मात्र मला फार चुकल्याचुकल्यासारखें होतें. पण उत्तर हिंदुस्थानांत चांगलें नाटक दृष्टीस पडणें कठीण. बंगाली, गुजराथी, व मराठी रंगभूमीची थोडीफार प्रगति झालेली आहे असें ऐकतों. हिंदुस्थानी रंगभूमीला कला व रसिकता कशाशीं खातात तें सुद्धां माहिती नाहीं. हिंदी चित्रपट व बोलपट कलाभिरुचि व्यक्त करण्याच्या भानगडींत फारसे पडत नाहींत, असें माझ्या ऐकिवांत आहे. ऐतिहासिक दप्तरें आणि पुराणांच्या पोथ्या यांतलेच कथाप्रसंग बहुधा उचलून त्यांना संगीताची फोडणी व अश्रुधारांचा लिंबूरस यांची जोड दिली कीं काम खलास!

मला वाटतें कीं शहरी लोकांत ज्या मालाची मागणी आहे अशाच मालाचा पुरवठा कंपन्या करीत असाव्या. ओबडधोबड व हीन अभिरुचीचे निदर्शक असे हे शहरी प्रकार व ग्रामीण गीतांतून, नृत्यांतून व नाटयांतून अद्यापि जीव धरून राहिलेली कला यांच्यांतला भेद स्पष्ट लक्षांत येण्यासारखा आहे. बंगाल, गुजराथ, व द्राविड देश या ठिकाणच्या शेतकरी वर्गांतली सरस कलाप्रीति पाहिली कीं मोठें कौतुक वाटतें. मध्यम वर्गाची स्थिति निराळी आहे. त्याचीं मुळें जमिनींतून उपळून निघालेलीं आहेत. जतन करण्याच्या योग्यतेची स्वतःची कलापरंपराहि त्या वर्गांत आढळली नाहीं. जर्मनी व ऑस्ट्रियामध्यें खंडीवारी छापून निघणाऱ्या सवंग आणि भडक अशा चित्रापासून त्यांच्या कलासक्तीचें समाधान होत असतें. रविवर्म्याचीं चित्रें कोणीं लावलीं म्हणजे अभिरुचि कळसाला पोंचली असें समजावयाचें. त्यांचें आवडतें वाद्य म्हणजे बाजाची पेटी. (स्वराज्य मिळाल्यानंतर अगदीं पहिली जनहिताची गोष्ट म्हणून हे भयंकर वाद्य बंद करण्यांत येईल अशा आशेवर मी जगत आहें.) तथापि विलक्षण असा कलाविपर्यास व सर्व कलानियमांचा सत्यनाश जर कोठें पाहावयाचा असेल तर लखनौच्या अथवा इतर ठिकाणच्या मोटमोठ्या तालुकदारांच्या वाड्यांतून एक चक्कर टाकावी. पदरीं संपत्ति असते व तिचें प्रदर्शन करण्याची त्यांना इच्छाहि असते. ते तिचें मन मानेल तसें प्रदर्शन करतात आणि त्यांच्या कलाप्रेमाचें हें प्रदर्शन पाहण्याचें दुर्भाग्य त्यांच्या घरीं जाणाऱ्या लोकांच्या वांट्याला येत असतें !

कलेच्या नवयुगाला नुकताच कोठें प्रारंभ झालेला आहे. टागोरांच्या कुटुंबानें या कामीं पुढाकार घेतलेला असून ह्या नवयुगाची प्रभा सर्व देशभर फांकूं लागलेली दिसत आहे. परंतु देशांतील जनतेच्या मार्गांत पावलापावलागणिक अडथळे व निर्बंध येत असतां व त्यांच्या आकांक्षा दडपून टाकल्या जात असतां अभिनव कलेचा प्रसार मोठ्या प्रमाणांत व्हावा कसा ?

मुंबईमध्यें तुरुंगांतून नुकतेच सुटून आलेले कांहीं मित्र व सहकारी मला भेटले. समाजवादी तत्त्वांचा प्रभाव तेथें बऱ्याच प्रमाणांत दिसून आला. कॉंग्रेसमधील पुढाऱ्यांच्या कांहीं कृत्यांबद्दल त्यांच्यामध्यें बराचसा असंतोषहि पसरलेला दिसत होता. राजकारणाकडे पाहण्याच्या गांधीजींच्या आध्यात्मिक दृष्टिकोणावरहि त्यांनीं सडेतोड टीका केली. टीकेपैकीं बराचसा भाग मलासुद्धां मान्य होता; परंतु आहे त्या परिस्थितीमध्यें दुसरा मार्ग नसल्यामुळें आपण तसेंच पुढें गेलें पाहिजे ही गोष्ट मीं निःसंदिग्ध शब्दांमध्यें सांगून टाकली. कायदेभंग बंद करण्यापासून कोणत्याहि प्रकारचा फायदा झाला नसता. सरकारची चढाई तशीच चालू राहिली असती व कोणताहि चढाऊ कार्यक्रम हातीं घेतल्याबरोबर तुरुंगांत जाणें क्रमप्राप्त झालें असतें. राष्ट्रीय चळवळ अशा एका टप्प्याला येऊन पोंचली होती कीं सरकारनें दडपशाही चालवली नसती तर सरकारवर कुरघोडी केल्याशिवाय ती

कधींच राहती ना. ह्याचें तात्पर्य इतकेंच कीं सरकारनें आमच्या चळवळीला नेहमीं बेकायदा ठरवावें असेंच स्वरूप तिला प्राप्त झालें होतें. आणि कायदेभंग बंद केला असता तरीहि राष्ट्रीय चळवळीचें पाऊल प्रत्यक्ष प्रतिकारापासून मागें हटणें आतां शक्य नव्हतें. कायदेभंग चालू ठेवून व्यवहारतः कांहींच फरक पडणार नव्हता, हें खरें. परंतु नैतिक प्रतिकार म्हणून त्याला महत्त्व होतेंच. लढाऊ वातावरण कायम असतां नव्या कल्पनांचा फैलाव करणें जितकें सोपें असतें तितकें लढा थांबून सनदशीर वृत्ति प्रबळ झाल्यानंतर तें सहजासहजीं करतां येत नाहीं. लढा बंद केल्यावर, सामोपचाराचें धोरण आणि कायदेमंडळांतील सनदशीर राजकारणाचा स्वीकार एवढा एकच मार्ग खुला राहिला असता.

माझ्या सहकाऱ्यांच्या मनांतील खळबळ मी जाणून होतों. कारण माझी स्वतःची मनःस्थिति त्यांच्याचप्रमाणें झाली होती. परंतु इतर ठिकाणच्याप्रमाणें मुंबईतसुद्धां आपली निष्क्रियता दडवण्यासाठीं बड्या बड्या समाजवादी तत्त्वांचें अवडंबर माजवणारे कांहीं लोक मला भेटलेच. स्वतः कांहीं एक न करतां, चळवळीच्या धुमश्चक्रींत ज्यांनीं जबाबदारीची धुरा आपल्या खांद्यावर वाहिली त्यांना प्रतिगामी म्हणून नांवें ठेवणारे हे निंदक पाहिले कीं, मला चीड येत असे. विराटपुत्र उत्तराप्रमाणें अन्तःपुरांत समाजवादाचीं शस्त्रें परजणारे हे लोक गांधीजींवर ते प्रतिक्रांतिकारकांचे मेरुमणि म्हणून तुटून पडत असतात. त्यांच्या घटपटीच्या वटवटींत तर्कशास्त्राला कोणताहि दोष दाखवतां येणार नाहीं. परंतु एक लहानशीच गोष्ट त्यांच्या नजरेंतून सुटलेली आहे ती ही कीं, या प्रतिगामी गांधीला हिंदुस्थानच्या लोकांची इतकी खडान्खडा माहिती आहे कीं गांधी म्हणजे हिंदुस्थानचा शेतकरी वर्ग असें बिनदिक्कत म्हणतां येईल. कोणत्याहि क्रांतिकारकानें माजवली नसेल एवढी प्रचंड खळबळ हिंदुस्थानांत त्यांनींच माजवली आहे. त्यांची अगदीं अलीकडची हरिजन-चळवळ घेतली, तरी तिच्या टोल्यानें सुद्धां पुराणमतवादी हिंदु धर्माच्या पायाचा एक एक दगड हळूहळू निखळून पडत आहे. आणि सर्व सनातनी त्यांच्याविरुद्ध हात उचलून खडे झाले आहेत. गांधीजींना ते भयंकर शत्रूप्रमाणें लेखतात. जलाशयावर तरंग उठावे त्याप्रमाणें जनतेमध्यें कार्योत्साहाच्या प्रचंड लाटा उठविण्याचें काम गांधीजी आपल्या विशिष्ट मार्गानुसार करीत असतात. ह्या खळबळींचा परिणाम लाखों लोकांवर होत असतो. त्यांना प्रतिगामी म्हणा कीं क्रान्तिवादी म्हणा, त्यांनीं हिंदुस्थानचा माथा खासच उजळ केला आहे. अवनत झालेल्या व लाचार बनलेल्या जनतेला अभिमानाची व शीलसंपन्न जीवनाची शिकवणूक त्यांनीं दिलेली आहे. त्यांनींच जनतेंत जागृति व सामर्थ्य निर्माण केलें असून हिंदुस्थानच्या प्रश्नाचा दुवा जागतिक प्रश्नाशीं नेऊन त्यांनींच जोडला आहे. अहिंसा मार्गाचें ध्येय कोणतें व आध्यात्मिक दृष्ट्या अहिंसेंत कोणत्या गोष्टी अंतर्भूत होतात वगैरे विचार बाजूस ठेवला, तरी अहिंसामय सत्याग्रहाची पद्धति ही हिंदुस्थानला व जगाला

गांधीजींनीं दिलेली अपूर्व देणगी आहे व हिंदुस्थानांतील परिस्थितीला ती विशेष करून मानवणारी आहे, यांत शंका नाहीं.

प्रामाणिक टीकेला अवसर मिळावा व आमच्या पुढील प्रश्नांचा शक्य तितका सार्वजनिक खल व्हावा हें इष्टच आहे. गांधीजींच्या वर्चस्वामुळें खुली चर्चा होणें जरा कठीण होतें ही मोठया दुर्दैवाची गोष्ट होय. त्यांच्यावर अवलंबून असावें व निर्णयाचें सर्व काम त्यांच्यावरच सोंपवावें अशी वृत्ति नेहमींच आढळून येत असते. हें धोरण अगदीं चुकीचें आहे. ध्येयासंबधीं व पद्धतीसंबंधीं बुद्धिवाद करून व त्या बुद्धिवादावर अधिष्ठित झालेल्या शिस्तीचें व सहकार्याचें धोरण मान्य करूनच राष्ट्राची प्रगति होणें शक्य आहे. ती अन्धश्रद्धेनें व्हावयाची नाहीं. कोणी कितीहि मोठा असो, त्याच्यावर टीका करण्याची सवड असली पाहिजे. परंतु स्वतःची निष्क्रियता छपवून ठेवण्यासाठीं जर टीकेचा उपयोग करण्यांत येत असेल, तर ती सदोष आहे असेंच म्हणावें लागेल. अशा तऱ्हेची धुळवड समाजवादी खेळूं लागले तर जनतेचा रोष ते आपणावर ओढवून घेतील. कारण कार्य पाहूनच जनता आपलें मत ठरवीत असते. लेनिन म्हणतो कीं "भविष्यकालांतील निष्कंटक कार्याच्या सुखस्वप्नांत दंग राहून जो आजचीं खडतर कार्यें विसरतो त्याला संधिसाधु समजण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रत्यक्ष जगांत चालू असलेल्या घडामोडींच्या अनुरोधानें कार्याची आंखणी करण्याऐवजीं त्या घडामोडींपासून अलिप्त राहून भविष्यकालीन स्वप्नांत डुंबत राहण्यांत त्याला मौज वाटते असाच त्याच्या वर्तनाचा अर्थ करावा लागेल."

यंत्रयुगीन मजूरवर्गासंबंधींचें वाङ्मय वाचून येथील समाजवादाची व कम्युनिझम्‌ची बहुतांशीं वाढ झालेली आहे. मुंबई व कलकत्ता यांसारख्या कांहीं विशिष्ट ठिकाणीं पुष्कळसे गिरणीमजूर असले, तरी बाकीचा हिंदुस्थान शेतकऱ्यांचाच आहे. मजुरीचा दृष्टिकोण पत्करून हिंदुस्थानच्या प्रश्नाचा निकाल परिणामकारक रीतीनें लावतां येणार नाहीं. राष्ट्रवाद व शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन हे आपल्यापुढील दोन मोठया महत्त्वाचे प्रश्न आहेत. युरोपियन समाजवादानें ह्या प्रश्नांची मांडणी केल्याचें क्वचितच आढळून येतें. रशियांतील महायुद्धापूर्वीची स्थिति व हिंदुस्थानांतील आजची स्थिति ह्यांत पुष्कळच साम्य आहे; परंतु रशियांत अनेक असामान्य व विचित्र असे प्रकार घडून आले. त्यांची पुनरावृत्ति पुन्हां दुसऱ्या कोणत्याहि देशांत होईल अशी अपेक्षा करणें वेडेपणाचें ठरेल. कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाच्या साहाय्यानें कोणत्याहि देशांतील वर्तमान परिस्थिति समजण्यास व तिचे धागेदोरे उकलण्यास मदत होऊन प्रगतीचा पुढील मार्ग दिसूं लागतो, ह्याबद्दल मला शंका नाहीं. परंतु वस्तुस्थितीचा विचार न करतां आंधळ्याप्रमाणें कम्युनिझम्‌ची कार्यपद्धति अंमलांत आणणें, म्हणजे त्या तत्त्वज्ञानाचा विपर्यास करण्यासारखें आहे.

जीवनांत अनेक प्रकारची गुंतागुंत असते व त्यांत आढळणारे विरोध व कलह पाहून मन कधीं कधीं थोडेंसें हताशहि होतें. पण लोकांत अनेक मतभेद व्हावे

अथवा एकाच पद्धतीनें प्रश्न सोडवूं पाहणाऱ्या सहकाऱ्यांतहि निर्णयाच्या बाबतींत मतभिन्नता दिसावी ह्यांत नवल नाहीं. परंतु शब्दांचा पोकळ नगारा वाजवून जो आपला दुर्बळपणा झांकून ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्याच्याबद्दल मात्र मनांत साहजिकच शंका उपस्थित होतात. सरकारला आश्वासनें देऊन किंवा अशाच कांहीं शंकास्पद प्रकारानें तुरुंगापासून स्वतःचा बचाव करून दुसरीकडे लोकांवर तोंडसुख घेणारे लोक स्वतःचाच कार्यनाश करीत असतात असें म्हटलें पाहिजे.

मुंबईला अठरा पगड जातींची वस्ति असल्यामुळें सर्व तऱ्हेचे लोक तेथें दृष्टीस पडतात. तथापि मला एक प्रमुख नागरिक असा आढळला कीं राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक बाबतींतील त्याची कमालीची विशाल दृष्टि पाहून मी चकितच झालों. मजुरांचे पुढारी म्हणून ते स्वतःला समाजवादी म्हणवीत असत. सर्वसाधारण राजकारणांत ते प्रतिसहकारवादी म्हणून समजले जात. जुन्या धार्मिक व सामाजिक चालीरीतींचें मी रक्षण करीन व कायदेमंडळाला सामाजिक बाबतींत लुडबुड करूं देणार नाहीं असें आश्वासन देत असल्यामुळें हिंदु-महासभेंतहि त्यांची चहा होत असे. प्राचीन गूढवादाचे उपासक असे जे सनातनी त्यांच्या तर्फेचे उमेदवार म्हणून निवडणुकीच्या वेळीं ते उभे राहिले होते. हीं विविध व मनोरंजक कार्यें उरकूनहि त्यांची कर्तृत्वशक्ति खलास होत नसल्याकारणानें कॉंग्रेस व गांधीजी यांची प्रतिगामी म्हणून निंदा करण्याच्या कामीं राहिल्या साहिल्या शक्तीचा ते व्यय करीत असत. कांहीं इतर लोकांच्या मदतीनें त्यांनीं लोकशाही स्वराज्य पक्ष स्थापन केला. अर्थात् लोकशाहीशीं ह्या पक्षाचा कांहींच संबंध नव्हता, व कॉंग्रेसवर टीका करण्यापुरताच काय तो त्या पक्षाचा कॉंग्रेसशीं संबंध येई. एवढा दिग्विजय मिळवूनहि रग जिरली नाहीं तेव्हां मजुरांचे प्रतिनिधि म्हणून ते जिनिव्हा येथील मजूर-परिषदेला हजर राहिले. कधीं काळीं इंग्लंडमधील मॅक्डोनल्ड यांच्या ‘ राष्ट्रीय ’ मंत्रिमंडळाप्रमाणें एकादें मंत्रिमंडळ येथें स्थापन झालें, तर आपणाला मुख्य प्रधानकी मिळावी म्हणून त्यांची ही उमेदवारी सुरू आहे कीं काय, अशी एकाद्याला शंका आली असती.

इतके विविध दृष्टिकोण व इतक्या विविध चळवळी हाताळण्याचें भाग्य फारच थोड्यांच्या वांट्याला येत असेल. तथापि निरनिराळ्या क्षेत्रांत लुडबुड करणाऱ्या असल्या इतर अनेक लोकांचा कॉंग्रेसच्या टीकाकारांत समावेश झालेला आहे. खरवसाच्या अनेक भांड्यांमध्यें ह्या मांजरांचीं तोंडें खुपसलेलीं आढळून येतील. पण त्यांच्यापैकीं कांहींजण स्वतःला समाजवादी म्हणवून घेत असल्याकारणानें समाजवादाचें नांव मात्र बद्दू होत आहे.

## ५१

# प्रागतिकांचा परिचय

गांधीजींना भेटण्यासाठीं पुण्यास गेलों असतां एके दिवशीं संध्याकाळीं मी त्यांच्याबरोबर भारत सेवक समाजाच्या निवासस्थानीं गेलों. सुमारें एक तासभर समाजाच्या सदस्यांनीं राजकीय बाबींसंबंधीं गांधीजींना प्रश्न विचारले व गांधीजींनीं प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. श्री. श्रीनिवास शास्त्री अथवा इतर सभासदांपैकीं सर्वांत कर्तबगार असे पं. हृदयनाथ कुंझरू या दोघांपैकीं कोणीच तेथें नसले, तरी कांहीं चांगले अनुभवी सदस्य सभास्थानीं उपस्थित होतेच. त्यांचे प्रश्न ऐकून आम्हांला अधिकाधिकच आश्चर्य वाटूं लागलें. कारण प्रश्नाचे विषय अत्यंत क्षुल्लक असे होते. गांधीजींनीं व्हाइसरॉयला केलेली विनंति व व्हाइसरॉयनें दिलेला नकार याच विषयावर बहुतेक प्रश्न विचारण्यांत आले. जगामध्यें प्रश्न विचारण्याजोगे विषय खच्चून भरलेले होते आणि स्वातंत्र्यासाठीं देशांत निक-राची झुंज सुरू असून शेंकडों संस्था बेकायदा ठरविण्यांत आल्या होत्या. असें असतांना भेटीचा विषय त्यांना एवढा महत्त्वाचा वाटावा हें आश्चर्य नव्हे काय? शेतकऱ्यांवर संकट गुदरलें होतें व औद्योगिक मंदीमुळें सर्वत्र बेकारी माजली होती. बंगाल व त्याचप्रमाणें देशांत इतरत्रहि भयंकर प्रकार घडत होते. विचाराच्या, भाषणाच्या, लेखनाच्या आणि संघटनाच्या बाबतींतील स्वातंत्र्याची राळ उडाली होती. इतरहि अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मुद्दे डोळ्यांपुढें दिसत होते. परंतु गांधींनीं पुन्हा प्रयत्न करून पाहिला तर व्हाइसरॉय आणि हिंदुस्थान-सरकार कोणतें धोरण स्वीकारतील वगैरेसारख्या किरकोळ मुद्द्यापलीकडे प्रश्नांची मजल जाईच ना.

जेथील रहिवाशांचे बाहेरच्या जगाशीं असणारे संबंध कित्येक वर्षांपासून तोडून टाकण्यांत आलेले आहेत, अशा एकाद्या बंदिस्त मठांत बसल्याप्रमाणें मला तेथें वाटूं लागलें. पण तसें म्हणावें तर आमच्या भारत सेवक समाजाचे सदस्य प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेणारे व स्वार्थत्यागी असे सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. समाजाचे सदस्य व कांहीं थोडे इतर लोक हेच प्रागतिक पक्षाचे खरे आधारस्तंभ. पक्षांतील बाकीचे लोक म्हणजे पंचमेळ खिचडीप्रमाणें होते. आपलाहि राजकारणाशीं संबंध आहे अशी समाधानाची झुळुक मिळावी म्हणूनच ते

कधींमधीं राजकारणांत डोकावत असत. आणि मुंबई व मद्रासकडील प्रागतिक आणि सरकारी नोकर यांच्यामध्यें तर मुळीं फरकच राहिला नव्हता.

देशांतील लोकांच्या तोंडीं असणारे प्रश्न त्या देशाच्या राजकीय विकासाचे निदर्शक ठरत असतात. पुष्कळ वेळां देशाला अपयश पदरीं घ्यावें लागतें तें देशांतील लोकांना आपल्या पुढील प्रश्नांची अचूक मांडणी करतां आलेली नसते म्हणूनच. जातिजातींना कायदे-मंडळांत मिळालेल्या जागांसंबंधींच्या भांडणांत अथवा जातीय निर्णयाच्या मुद्द्यावर पक्षसंघटना करून निष्फळ वादविवादांत आपण आपला काळ, उत्साह व ईर्षा यांचा अपव्यय करीत बसतों यावरून आपण राजकारणांत किती मागासलेले आहोंत तें सिद्ध होत आहे. भारत सेवक समाजाच्या निवासस्थानीं गांधींना विचारण्यांत आलेल्या प्रश्नांत प्रागतिक पक्षाची विलक्षण मनोवृत्ति उत्तम प्रकारें प्रतिबिंबित झालेली होती. त्यांच्यापाशीं राजकीय अथवा आर्थिक तत्त्वें तर नाहींतच, पण व्यापक दृष्टिकोणहि नाहीं असें दिसून आलें. आणि त्यांचें राजकारणसुद्धां बडे अधिकारी काय करतील, काय म्हणतील, ह्याचा खल करणारें, म्हणजे पर्यंकी थाटाचेंच दिसलें.

'प्रागतिक पक्ष' ह्या नांवावरून दिशाभूल होण्याचा संभव आहे.* इतर ठिकाणीं व विशेषेंकरून इंग्लंडांत हा शब्द एका विशिष्ट आर्थिक धोरणाचा, अनियंत्रित अर्थव्यवहाराचा व खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाचा निदर्शक म्हणून वापरण्यांत येत असे. व्यक्तिस्वातंत्र्य, नागरिक हक्क वगैरेंचा देखील त्या पक्षाच्या तत्त्वांत समावेश होई. हिंदी प्रागतिकांच्या मागें इंग्लिश प्रागतिकांप्रमाणें कोणतीच तात्त्विक अथवा ऐतिहासिक पार्श्वभूमि नाहीं. ह्यांच्यापैकीं बहुतेक लोक संरक्षक जकातींचे पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांना खुला व्यापार मान्य नाहीं. बरें नुकत्याच घडलेल्या इतिहासावरून नागरिक हक्कांना ते किती महत्त्व देतात, तें दिसतेंच आहे. हिंदी संस्थानांशीं असणारे त्यांचे घनिष्ठ संबंध व तेथील अरेरावीला व अर्धवट सरंजामी पद्धतीला त्यांच्याकडून मिळणारा सर्वसामान्य पाठिंबा, यांच्यामुळेंहि त्यांच्यांतील व युरोपियन प्रागतिकांतील भेद स्पष्ट होईल. खरें म्हटलें तर हिंदी प्रागतिक कोणत्याहि अर्थानें प्रागतिक नाहींत. फार फार तर प्रागतिक मतांच्या छटा मधून मधून यांच्यावर दिसतात असें म्हणतां येईल. ह्या पक्षाचें नक्की स्वरूप वर्णन करणें अवघड आहे; कारण कोणत्याहि निश्चित विधिरूपी कल्पनांच्या पायावर ह्या पक्षाची उभारणी झालेली नाहीं; पक्षाचे सभासद मूठभर असले तरी त्यांच्यांत मतभेद मात्र पाटीभर आहेत. न-कर्तेपणांत त्यांच्या पक्षाचें नांव गाजलेलें

---

* Liberal Party (लिबरल पार्टी) ह्याचें भाषांतर मवाळ पक्ष, नेमस्त पक्ष, प्रागतिक पक्ष, वगैरे अनेक प्रकारें करण्यांत येतें. शब्दशः भाषांतर करावयाचें तर उदार पक्ष असें म्हणावें. परंतु ह्या सामासिक शब्दानें देखील मूळ अर्थ पूर्णपणें व्यक्त होत नाहीं.

आहे. सगळीकडे त्यांना चुकाच चुका दिसतात व त्या टाळण्यासाठीं त्यांचा खटाटोप सुरू असतो. तेवढे दोष टाळीत राहिलें कीं सत्याचा ऐन गड्डा हातीं लागेल अशी त्यांना आशा वाटते. सत्य हें नेहमींच दोन टोंकांच्या मध्यें असते अशी त्यांची कल्पना आहे. जी जी गोष्ट त्यांना आत्यंतिक वाटते, तिच्यावर टीका केली कीं, आपला चांगुलपणा, सद्भाव व नेमस्तपणा सिद्ध होतो असा त्यांचा समज आहे. या पद्धतीमुळें विचारांच्या बिकट वाटांवरील खांचखळग्यांचें दुःख व हिसके सहन करावे लागत नाहींत आणि विधायक सूचना करण्याची जबाबदारीहि टाळतां येते. त्यांच्यापैकीं कांहीं जणांना आतां कोठें अंधुक शंका येऊं लागली आहे कीं, युरोपांत भांडवलशाही पूर्णपणें यशस्वी झालेली नसून ती सध्यां जरा पेंचांत पडली असावी. अर्थात् समाजवाद हा तर निःसंशय टाकाऊच आहे. कारण तो मिरासदारीवर तुटून पडणार. त्यांच्या मतें पुढें केव्हां तरी मध्यम असा रस्ता उपलब्ध होईल, कांहीं तरी तडजोड निघेल, तोंवर मिरासदारीचें रक्षण आपण केलेंच पाहिजे. पृथ्वी वाटोळी आहे कीं सपाट आहे असा वाद जर उद्यां निघाला, तर दोन्ही पक्ष आत्यंतिक मताचे आहेत म्हणून त्या दोघांचाहि निषेध करून, पृथ्वी चौकोनी अथवा लंब-वर्तुळाकार आहे अशी तात्पुरती तडजोड प्रागतिक सुचवून पाहतील !

क्षुल्लक व बिनमहत्त्वाच्या प्रश्नांवर ते अगदीं तावातावानें बोलतात, आणि मग जो कांहीं वितंडा माजतो आणि जो कांहीं आरडाओरडा होतो तो पुसूंच नका. जाणतेपणीं असो कीं अजाणतेपणें असो, मूलभूत प्रश्नांना हात घालण्याचें ते टाळीत असतात. कारण मूलभूत प्रश्न घेतला कीं, मूलग्राही उपाय योजणें प्राप्त होऊन विचारांतील व आचारांतील धैर्य कसोटीला लागतें. आणि असले प्रश्न प्रागतिकांच्या धोरणांत बसत नसल्यामुळें त्यांना जय आले काय आणि अपजय आले काय, दोहोंची मातब्बरी सारखीच. बऱ्या-वाईट सर्वच गोष्टींत नेमस्तपणा राखणें हेंच त्या पक्षाचें प्रमुख लक्षण अथवा वैशिष्ट्य आहे. जीवनाकडे पाहण्याची त्यांची एक विशिष्ट दृष्टि आहे. मला वाटतें कीं नेमस्त पक्ष हें जुने नांवच अगदीं योग्य होतें.

“ जहालांत मवाळांत, ना कोठें आसरा जरा
नेमस्त राजनीतीचा उपासक परी खरा ”

नेमस्तपणा कितीहि कौतुकास्पद असला तरी तो कांहीं झळझळीत व तेजस्वी असा गुण नव्हे. त्यामुळें आचारविचारांत मांद्य उत्पन्न होत असल्याकारणानें येथील प्रागतिक पक्ष म्हणजे “ रड्या राउतांच्या पथका ” प्रमाणें झाला आहे. आंबट चेहरा, रडवी लेखणी, आणि रडवी वाणी असा त्यांचा थाट असतो. खेळाडू वृत्ति त्यांच्या रानांत पिकतच नाहीं. अर्थात् या नियमाला सर तेज बहादुर सप्रू यांच्याप्रमाणें कांहीं अपवादभूत माणसें आहेत. त्यांच्या खाजगी आयुष्यक्रमांत ते आंबलेले विटलेले नसतात. हास्यविनोदहि ते भरपूर करतात आणि त्यांना ओरखडा निघेल अशी कोटी कोणीं केली तरी तिचा ते हंसतमुखानें स्वीकारहि करतात. परंतु एकंदरींत

प्रागतिक पक्ष म्हणजे वरिष्ठ मध्यम वर्गाच्या रखडणाऱ्या दृष्टिकोणाचा व बेचव मनोवृत्तींचा उत्कृष्ट नमुना आहे. अलाहाबादचें "लीडर" हें प्रागतिकांचें प्रमुख मुखपत्र समजण्यांत येतें. त्यामध्यें गतवर्षी एक फार उद्‌बोधक संपादकीय लेख आला होता. त्यांत संपादक महाशयांनीं असें लिहिलें होतें कीं, जे जे थोर व असामान्य पुरुष होऊन गेले त्यांनीं जगांत तंटेबखेडेच निर्माण केलेले आढळतात. त्यामुळें साधीं सामान्य माणसेंच आम्ही अधिक पसंत करतों. अशा प्रकारें अगदीं निःसंकोचपणें सामान्य बुद्धीची पताका हातींखांदीं घेऊन ते मिरवीत आहेत.

नेमस्तवृत्ति, पुराणप्रियता, साहसाभाव आणि क्रांतिकारक फेरबदलांविषयीं निरुत्साह वगैरे गोष्टी वार्धक्याच्या सहचरच होत. तरुणांना त्या शोभत नाहींत. पण आमची मायभूमि पुरातन असल्यामुळें तिची प्रजामुद्धां जन्मतःच हातींपायीं शिणलेली, निस्तेज व वार्धक्यानें सुरकुतलेली अशी असते. पण आतां क्रांतीचें रक्त या प्राचीन देशाच्या पिंडांत सळसळूं लागलेलें आहे. त्यामुळें प्रागतिक मात्र भांबावून गेले आहेत. जुना जमाना संपुष्टांत येत असून प्रागतिकांच्या चाटु वचनांचा कांहींच परिणाम होत नाहीं. वादळाशीं वादविवाद करून आणि महापुरापुढें प्रवचनें झोडून काय साधणार? त्यांचे सर्व सिद्धांत लटके पडले असून आचारविचारांचे नवे मार्ग हुडकण्याची धमक त्यांच्या ठायीं उरलेली नाहीं. युरोपांतील परंपरेसंबंधीं लिहितांना डॉ. व्हाइटहेड म्हणतात: "आपल्या वडिलांचें जीवन नियंत्रित करणाऱ्या परिस्थितीच्या चौकटींतच बहुशः प्रत्येक पिढी नांदेल; इतकेंच नव्हें तर आपल्या मुलाबाळांच्या जीवनालाहि घाट देण्यासाठीं परिस्थितीचा तोच सांचा शाबूत ठेवून तो ती भावी पिढीच्याहि हातीं देईल ह्या सदोष कल्पनेच्या विटाळ्यांत ही सर्व परंपरा, जखडून पडली आहे. मानवी इतिहासांत आजच पहिल्या प्रथम असा काळ उगवला आहे कीं, ज्या काळांत हे सिद्धांत अपसिद्धांत ठरत आहेत." व्हाइटहेड यांनीं केलेलें वरील विधानसुद्धां त्यांतील सौम्यपणामुळें सदोष झालें आहे. कारण त्यांनीं ज्या सिद्धांताचा उल्लेख केला, तो सिद्धांत आतांच नव्हे तर सर्व काळीं खोटाच ठरलेला आहे. आणि युरोपियन परंपरा जर स्थितिप्रिय म्हणावयाची, तर आमच्या परंपरेला कोणतें नांव देणार? पण क्रांतीचा काळ समीप आल्यावर परंपरेच्या ढेंकळामुळें इतिहासाचीं चाकें अटकत नसतात. आपण मात्र असहायपणें उगाच पाहत राहतों. आणि आपले बेत फसले म्हणून इतरांवर तणतणतों. गेराल्ड हर्ड यांनीं म्हटल्याप्रमाणें "आपण फसलों तें आपल्या विचारसरणींत आयब होतें म्हणून फसलों हें न उमगतां दुसऱ्या कोणीं तरी आपल्या योजनेंत मुद्दाम कोलदांडा घातला म्हणून आपणाला अपयश आलें अशी समजूत करून घेण्यासारखी भयंकर फसवणूक दुसरी कोणतीच नाहीं."

आपणां सर्वांचीच अशी फसवणूक होत असते. मला वाटतें कीं, गांधीजीसुद्धां या दोषापासून मुक्त नाहींत. पण आम्हीं निदान कांहीं तरी कार्य करीत

राहतों, जीवनाचा धागा हातचा सुटूं नये असा प्रयत्न करतों. त्यामुळें आमची फसवणूक होण्याचा संभव कमी होत जाऊन ठेचा खात खात कां होईना पण आमचीं पावलें पुढें पडत राहतात. पण प्रागतिकांचे हाल काय विचारतां? चूक होईल म्हणून ते कार्याला हात घालीत नाहींत, घसरूं म्हणून बसली जागा सोडीत नाहींत, जनतेचा विटाळ मानून दूर दूर सरतात, आणि आपल्याच मनोमंदिरांत "आत्मवंचनेचा" खेळ खेळत बसतात. दीड वर्षापूर्वी श्री. शास्त्र्यांनीं "कांठावर राहून वाहत्या पाण्याकडे पाहत बसण्याची ही वेळ नाहीं." असें प्रागतिकांना बजावलें. श्री. शास्त्र्यांना अभिप्रेत असेल त्याहून अधिक अर्थ त्या शब्दांत भरलेला होता. दुर्दैव प्रागतिकांचें कीं, देशबांधव पुढें निघाले असतां त्यांचा पायगोंवा निघेना. ते कांठचे कांठावरच राहिले. जनतेंत त्यांच्या हाडामासाचेच लोक, पण त्यांचीच त्यांना भीति वाटे म्हणून सरकारबरोबर तंटा करण्यापेक्षां जनतेपासून दूर सरकलेलें बरें, असा त्यांचा विचार ठरला. मग स्वतःच्याच घरीं ते उपरे वाटूं लागले, त्यांच्याकडे कोणीं लक्ष देईना, यांत नवल कसलें? देशबांधवांनीं स्वातंत्र्यासाठीं, जिवावर उदार होऊन रणकंदनांत उडी घेतली तेव्हां प्रागतिक कोणत्या शिबिरांत उभे होते त्याबद्दल आतां काडीमात्र संदेह राहिलेला नाहीं. पलीकडच्या गोटांत उभे राहून त्यांनीं आमच्याकडे उपदेशामृताचे घडे पाठविले. खवट झालेल्या नीतितत्त्वांच्या पिस्त्यांची सवंग बर्फी, ताटें भरभरून आमच्याकडे धाडिली. मंडलाकार परिषदेंत व इतर समित्यांवर त्यांचें सहकार्य लाभल्यामुळें सरकारला नैतिक पाठबळ मिळत गेलें. तें मिळतें ना तर परिस्थितींत फरक दिसून आला असता. अशा एका परिषदेला ब्रिटिश मजूर पक्षसुद्धां गैरहजर राहिला, पण आमचीं प्रागतिक तट्टें तेथेंहि हजरच. आपण ह्या प्रसंगीं उपस्थित राहूं नका अशी विनंति कांहीं ब्रिटिश सद्गृहस्थांनीं करून पाहिली, पण तिचा उपयोग झाला नाहीं.

कमीअधिक प्रमाणांत निरनिराळ्या मुद्द्यावर आपण सगळेच जण नेमस्त अथवा अतिरेकी आहोंत. एकाद्या विषयाचा आपणास हव्यास असेल तर त्या विषयाबद्दलचीं आपलीं मतें अगदीं ठाम व कडवीं अशींच असणार. तसें नसलें कीं मग मतांची दिलदारी व तत्त्वज्ञसुलभ अशी नेमस्त वृत्ति दाखवण्यास अडचण पडत नाहीं. खरें म्हणजे ह्या उदार वृत्तीच्या बुडाशीं थोड्याफार प्रमाणांत आपली बेपर्वाईच दडलेली असते. देशांतील मिरासदारी समूळ नष्ट करावी अशी सूचना केल्याबरोबर अट्टल मवाळसुद्धां भीमरूप धारण करतात, हें मीं पाहिलेलें आहे. प्रागतिक हे सधन व सुखी लोकांचे प्रतिनिधि असल्यामुळें स्वराज्य येईपर्यंत स्वस्थ चित्तानें वाट पाहत बसण्याइतकी सवड त्यांच्यापाशीं आहे. स्वराज्यासाठीं आटापीट करण्याचें त्यांना कारण नाहीं. पण समाजांत क्रांति करावी असें म्हटलें कीं त्यांच्या कपाळांत तिडीक उठते आणि त्यांची नेमस्त वृत्ति व मोठा तर्कवाद कोठेंच्या कोठें नाहीसा होतो. इत्यर्थ हा कीं, सरकारबरोबर वागण्याच्या वेळीं

तेवढा त्यांचा नेमस्तपणा प्रत्ययास यावयाचा. आपल्या अंगीं पुरेसा आदरभाव व मनमिळाऊपणा आहे असें सिद्ध केलें कीं, उत्तम वर्तणुकीचें बक्षीस म्हणून ब्रिटिश लोक आपलें म्हणणें ऐकून घेतील अशी आशा त्यांना वाटत असते. सरकारी मसुदे हेच त्यांचे वेदग्रंथ, अर्स्किन मे यांचें "कायदे मंडळांतील कामकाज" वगैरेसारखीं पुस्तकें हीच त्यांची नित्यपठणाची गीता. अमेरिकन आंकड्यांवर उत्सुक व अज्ञ जनतेच्या उड्या पडाव्या त्याप्रमाणें नव्या सरकारी अहवालांवर प्रागतिकांच्या उड्या पडतात व मग त्यांचे अंदाज व त्यांच्या अटकळी सुरू होतात. इंग्लंडहून परत आलेले प्रागतिक पुढारी व्हाइट हॉलमधील भूदेवांची करणी गूढगंभीर भाषेंत वर्णन करून सांगत असतात; कारण व्हाइट हॉल म्हणजे प्रागतिकांच्या, प्रतिसहकारवाद्यांच्या व इतर गटांच्या दृष्टीनें इहलोकींची इंद्रसभाच आहे. पूर्वीच्या काळीं अशी म्हण प्रचलित होती कीं, पुण्यवान् अमेरिकन मृत्यूनंतर पॅरिस शहरीं जातो. मला वाटतें कीं, पुण्यावान् प्रागतिकांचे आत्मे मरणोत्तर व्हाइट हॉलच्या आजूबाजूला घिरट्या घालीत राहत असावेत.

मी प्रागतिकांविषयीं हें लिहितों आहें; पण कॉंग्रेसमधील आम्हां पुष्कळांना तें लागू पडेल. नेमस्तपणांत प्रागतिकांनाहि मागें टाकणाऱ्या प्रतिसहकारवाद्यांच्या बाबतींत तर माझी टीका चांगलीच लागू पडण्यासारखी आहे. सामान्य कॉंग्रेसवाला आणि सामान्य प्रागतिक यांच्यामध्यें जरी बरीच भिन्नता असली, तरी त्यांच्यांतील भेदरेषा स्पष्ट व निश्चित अशी नाहीं, आणि पुढारलेला प्रागतिक आणि नेमस्त कॉंग्रेस-वाला यांच्यामध्यें सरसनिरस प्रती लावणें कठिण आहे. गांधीजींच्या प्रयत्नांमुळें प्रत्येक कॉंग्रेसवाल्याचा जनतेशीं थोडा तरी संबंध कायम राहिलेला असतो आणि चळवळींत कमीअधिक प्रमाणांत भाग घेत गेल्यामुळें अनिश्चित व अस्पष्ट विचार-सरणीचे दोष कॉंग्रेसवाल्यांच्या बाबतींत कांहीं अंशीं टाळतां येतात. पण प्रागतिकांची स्थिति तशी नाहीं. त्यांचा ना जुन्याशीं संबंध ना नव्याशीं परिचय. त्यांचा गट म्हणजे नष्टप्राय संस्कृतीचें एक प्रतीक आहे.

पूर्वींच्या काळांतील मानवांचा वन्य उन्माद आपल्यापैकीं कोणाशीं उरलेला नाहीं; बरें, नवी दिव्य दृष्टिहि आम्हांला अद्यापि लाभलेली नाहीं. फेनधवल मुक्ता-मालांनीं अलंकृत आणि नित्य नव्या समुद्रवसनांनीं विभूषित अशा वरुणाची आकृति समुद्राकडे पाहतांच दिसावी अथवा मेघव्याप्त अन्तरीक्षाकडे पाहून ऐरावतावर बसलेल्या व विजेचीं लेणीं लेवून हातीं सप्तरंगी धनुष्य धारण केलेल्या इंद्राची आठवण व्हावी, हें आतां कोठलें घडावयाला ?

"वालुकाकणीं जग भरलें
वनफुलामधें सुरलोक
ये अनन्तत्व तळहातीं
घटिकेंत अमरा एक—"

ह्या वृत्तीचें देणें ज्यांच्या वांट्याला आलें असेल असे कितीसे दैववान् प्राणी सध्या आपल्यामध्यें सांपडतील ?

निसर्गाच्या गूढ जीवनाचें भांडार आतां आपल्यापुढें खुलें होत नाहीं, सृष्टीचे हळुवार निःश्वास आपल्याला ऐकूं येत नाहींत, तिच्या स्पर्शानें आपलें अंग आनंदानें मोहरून जात नाहीं, अन्तःकरण उन्मेषून जात नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. तो काळ निघून गेला. तथापि सृष्टीचीं भव्य इंगितें पूर्वीप्रमाणें दिसणार नसलीं तरी मानवांच्या विजयानंदांत व दुःखाश्रूंत, त्यांच्या थोर मनोरथांत व अन्तःकरणांतील कल्लोळांत, त्यांच्या यातनांत आणि अपयशांत, विग्रहांत आणि विपदांत, आणि त्याहि-पेक्षां त्यांच्या उच्च भवितव्यावरील श्रद्धेमध्यें व तें भवितव्य भूमितलावर अवतीर्ण व्हावें यासाठीं अविरत चालू असणाऱ्या मानवांच्या भगीरथ प्रयत्नांमध्यें जीवनांतील भव्यतेचा साक्षात्कार आपणांस व्हावा म्हणून आपण झटत असतों. हा शोध चालू असतां जे हृदयविदारण करून टाकणारे प्रसंग त्यांची भरपाई या साक्षात्काराच्या आशेनेंच होत आली आहे, व तत्संबंधीं विचार मनांत आले कीं, जीवनांतील क्षुद्र पाशांच्या बेड्या गळून पडलेल्या आहेत. परंतु शोधाच्या ह्या बिकट मार्गावर फारच थोड्या लोकांनीं पाऊल ठेवलेलें आहे. बाकीचे लोक जुन्या बंदरांच्या आसऱ्याला पारखे झाले असून त्यांना आजच्या घटकेला पुढची वाट दिसेनाशी झाली आहे. वर्तमानकालीन अंधःकारापलीकडच्या उषःकालाचीं स्वप्नें त्यांना दिसत नाहींत, व काम करण्याचा हुरूपहि त्यांना वाटत नाहीं. फ्रेंच राज्यक्रांति अथवा रशियन राज्यक्रांति अशांसारख्या मानवी प्रक्षोभांचा अन्वय त्यांना लावतां येत नाहीं. दीर्घकालपर्यंत आंतल्या आंत दडपून टाकण्यांत आलेल्या मानवी आकांक्षांचा ज्या वेळीं अभावित स्फोट होतो तेव्हां त्यांचें संमिश्र व उग्र असें रूप पाहून त्यांची गाळण उडते. जनतेच्या गुलामगिरीच्या द्योतक अशा बॅस्टिल तुरुंगाच्या भिंती अद्यापि तशाच उभ्या आहेत अशी ह्या बिचाऱ्यांची समजूत दिसते.

पुष्कळदां मोठ्या सात्त्विक संतापाच्या आवेशानें लोक म्हणतात कीं "राष्ट्रा-भिमानाचा मक्ता कांहीं कॉंग्रेसलाच दिलेला नाहीं." ह्या उष्ट्या व शिळ्या वाक्याचा उच्चार इतके वेळां करण्यांत येत असतो कीं कधीं कधीं मन विटून जातें. राष्ट्राभि-मानाची मिरासदारी आपणाकडेच आहे असें कोणीहि कॉंग्रेस-कार्यकर्त्यानें सांगितलें असेल असें मला वाटत नाहीं. राष्ट्राभिमानाच्या वतनाचा ताम्रपट कोणाच्याहि नांवें करून देण्यास मी तरी मोठ्या आनंदानें तयार होईन. कारण राष्ट्राभिमानाचा बुरखा ओढून कित्येक स्वार्थसाधु वावरत असतात आणि सर्व वर्गांच्या, सर्व रुचींच्या लोकांना पसंत पडतील असे राष्ट्राभिमानाच्या शिक्क्याचे तऱ्हेतऱ्हेचे वाणहि मिळूं शकतात. ख्रिस्ताचा विश्वासघात करणारा जुडास आज हयात असता, तर त्यानें सुद्धां राष्ट्राभिमानाची पताका खांद्यावर घेऊन आपलें काम चालू ठेवलें असतें. इतःपर केवळ देशाभिमानानें काम भागणार नाहीं; त्याहून अधिक भव्य, उच्च, आणि

व्यापक अशा वृत्तीची जोपासना केली पाहिजे. आणि नेमस्तवृत्ति ही नेहमींच चांगली असते असेंहि नाहीं. संयम हा अवश्य हवा; कारण आपली संस्कृति त्यावरून सूचित होत असते. पण संयम करण्यासारखें, आंवरून धरण्यासारखें कांहीं अवसान अंगीं असलें तर संयम ठीक दिसतो. पंचमहाभूतांना वेठीला धरावें, विजेला बटीक बनवावी, दाहक अग्नीला कामाला जुंपावें, पाण्याचे धबधबे राबवावे हा ललाटलेख माणसाच्या कपाळीं लिहिलेला आहे, आणि त्याप्रमाणें आज व्यवहारांत घडतहि आहे. पण अन्तःकरणाला जाळणाऱ्या विकारांवर खोगीर चढवण्याच्या कामीं त्याला अद्यापि यश मिळालेलें दिसत नाहीं. आणि तें शक्य झालें नाहीं तावत्कालपर्यंत मानव-जातीच्या संपूर्ण भाग्याचें अधिराज्य त्याला प्राप्त होणार नाहीं. पण पांगळ्या पायांना आवरायचें काय, आणि लुल्या हातांना रोखायचें काय ?

ह्या प्रसंगीं कोण्या एका दक्षिण आफ्रिकेंतील कादंबरीकाराला उद्देशून रॉय कँबेलनें लिहिलेल्या चार ओळी उद्धृत करण्याचा मोह मला आवरत नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक राजकीय गटांना त्या बरोबर लागू पडतील :

" तव लेखनांतिल वानितो बुध फार संयम नेहमीं
स्तुति ती तुझी मज मान्य रे ! तव चाहता नच काय मी ?
धरण्यांत प्रग्रह ओढुनी कुशलत्व फार तुझें दिसे
परि तेजदार तुरंग तो सखया, तुझा कोठें असे ? "

सुवर्णमध्यमाच्या चिंचोळ्या पाऊलवाटेनें आम्हांस जपून जावें लागतें, कॉंग्रेस व सरकार या दोन खडकांमधून मोठ्या दक्षतेनें आमचें तारूं आम्हांला हाकारावें लागतें असें आमचे प्रागतिक मित्र आम्हांला सांगत असतात. दोघांच्याहि चुका काय होतात तें हे ठरवणार आणि आपण त्या चुकांपासून मुक्त आहोंत म्हणून स्वतःला धन्य म्हणवून घेणार ! हातांत ताजवा घेऊन न्यायदेवतेप्रमाणें ते बसलेले आहेत. आणि बहुधा न्यायदेवतेप्रमाणेंच त्यांचे डोळेदेखील अंध अथवा बंद असावेत. कित्येक युगांपूर्वी उच्चारलेल्या पुढील प्रसिद्ध वचनाचे ध्वनि माझ्या कानीं पडत आहेत हा केवळ माझ्या कल्पनाशक्तीचा खेळ असेल काय ? " हे लेखकांनो आणि शब्दप्रामाण्यवादी सनातन्यांनो...अहो, अंध पुढाऱ्यांनो, जाईल तेथें हत्ती जाईल आणि नाहीं तेथें मुंगीहि जाणार नाहीं. काय हा तुमचा विपरीत न्याय ! "

## ५२

# वसाहतीचें स्वराज्य व पूर्ण स्वातंत्र्य

गेल्या सतरा वर्षांत कॉंग्रेसच्या धोरणाची ज्यांनीं आंखणी केली, त्यांपैकीं बहुतेक लोक मध्यम वर्गांतील होते; मग ते प्रागतिक असोत कीं कॉंग्रेसवाले असोत. त्या वर्गाभोंवतीं नेहमीं आढळून येणाऱ्या परिस्थितींतच ते वाढले होते. त्यांचें सामाजिक जीवन, नात्यागोत्याचे संबंध व त्यांचे सगेसोयरे एकाच प्रकारचे होते व त्यांनीं आपल्यापुढें ठेवलेल्या मध्यमवर्गीय ध्येयामध्येंहि प्रारंभीं फारसा फरक नव्हता. स्वभावभेदामुळें त्यांच्यामध्यें फरक पडूं लागला व त्यांनीं निरनिराळे मार्ग स्वीकारले. सरकार व धनाढ्य असा वरिष्ठ मध्यम वर्ग यांच्याकडे एक गट वळला तर दुसरा कनिष्ठ मध्यमवर्गाच्या दिशेनें जाऊं लागला. तरीदेखील विचारसरणी व ध्येय यांच्यामध्यें तफावत पडलेली नव्हती. परंतु दुसऱ्या गटाच्या मागें "तेल्या-तांबोळ्यांचें," छोट्या व्यापारी उदमी लोकांचें आणि पांढरपेशांतील बेकारांचें बळ संघटित होऊं लागलें होतें. त्यामुळें बोलण्याच्या भाषेंत फरक पडूं लागला. पूर्वीची आदराची व नरमाईची भाषा आतां कडक व चढाईची झाली. प्रतिकाराची कुवत अंगांत आलेली नसल्यामुळें, जहाल भाषा वापरली कीं मनाचें थोडेंसें समाधानहि होत असे. ह्या घटनेची धास्ती वाटून नेमस्त गट बाहेर झटकले व एका बाजूला जाऊन सुरक्षित राहावें असा त्यांचा विचार ठरला. तथापि वरिष्ठ वर्गाची छाप कॉंग्रेसवर फार मोठ्या प्रमाणांत राहिली होती. संख्या-बलाच्या दृष्टीनें मात्र कनिष्ठ मध्यम वर्गाचें पारडें जड झालेलें होतें. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या झगड्यांत यश मिळवावें एवढी एकच इच्छा मनांत बाळगून ते कॉंग्रेस-मध्यें सामील झाले होते असें नाहीं, तर त्या लढ्यामध्यें त्यांच्या अन्तरंगांत खोल दडलेल्या दुसऱ्याहि कांहीं आकांक्षा तृप्त होणार होत्या. गमावलेला स्वाभिमान परत मिळवावा व ती गेलेली प्रतिष्ठा पुन्हां सांधावी ह्यासाठीं त्यांचा हा प्रयत्न चालू होता. राष्ट्रवादामध्यें सर्वत्र आढळून येणाऱ्या उपरोक्त भावना हिंदुस्थानांतहि दिसून आल्या. पण राष्ट्रवादाचा आविष्कार सर्वांच्याच अन्तःकरणांत होत असला तरीहि नेमस्त व जहाल यांच्यामधील स्वभावभेदानुरूप त्याचें स्वरूप बदलल्याशिवाय राहिलें नाहीं. क्रमशः कनिष्ठ मध्यम वर्गाचें वर्चस्व कॉंग्रेसमध्यें प्रस्थापित होत गेलें, व नंतरच्या काळांत कॉंग्रेसवर शेतकऱ्यांची छाप पडली.

कॉंग्रेस जसजशी शेतकऱ्यांची प्रतिनिधि बनत गेली, तसतसें तिच्या व प्रागतिकां-

मधील अंतर वाढत जाऊन प्रागतिकांना काँग्रेसचा दृष्टिकोण समजणेंहि अशक्य होऊं लागलें! भरजरी पैठणीला घोंगडीचीं दुःखें कळणार कशीं? दोहों-मध्यें एवढा मोठा फरक असला तरी प्रागतिकांची व काँग्रेसची विचारसरणी व ध्येय यांचें स्वरूप राष्ट्रवादी व मध्यमवर्गीय असेंच राहिलें होतें. त्यांच्यामध्यें फरक होता तो प्रकाराचा नसून प्रमाणाचा होता. अगदीं शेवटपर्यंत काँग्रेसमध्ये असे कांहीं लोक राहून गेले कीं ज्यांना मवाळांच्या गोटांतहि सुखेनैव वावरतां आलें असतें.

हिंदुस्थान म्हणजे आपली जहागीर अशा थाटानें ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत वागत होते. मालक म्हणून आपण दिवाणखाना व रंगमहाल वापरावा आणि हिंदी लोक हे शागीर्द-पाणके म्हणून त्यांच्याकडे स्वयंपाकघरांतील व ओसरी-पडवीचा व्यवहार सोंपवावा असा शिरस्ता त्यांनीं ठेवला. अर्थात् खालच्या नोकरवर्गांत सुद्धां मानपानाच्या वहिवाटी होत्याच आणि त्या पाळल्याहि जात. पण मालक मंडळी व नोकरचाकर यांच्यामधील भिंत मात्र सामाजिक व राजकीय दृष्ट्या दुर्लंघ्य अशी होती. ब्रिटिश सरकारनें आमच्यावर अशी शिस्त लादावी यांत नवल नाहीं; परंतु त्यांनीं लावून दिलेली शिस्त आम्हीं नैसर्गिक व अढळ समजून चालावें हें मात्र आश्चर्य-कारक होतें. कधीं कधीं खाविंदांची मेहेरनजर होऊन आमचा सन्मान करण्यांत येत असे. तो कोणता, तर खास बैठकीच्या जागीं नेऊन आम्हांला कपभर चहा देण्यांत येई. आपली मान्यता वाढावी व उच्च पदावर आपली व्यक्तिशः बढती होत [illegible] हीच आमच्या महत्त्वाकांक्षेची परमोच्च पायरी बनली. शस्त्राच्या अथवा राजनी[illegible]या विजयापेक्षां ब्रिटिशांनीं हिंदुस्थानभर मिळवलेला हा मानसिक विजय फ[illegible] मोठा होय. कारण त्यामुळें गुलाम हा हाडाचा गुलाम बनला.

आतां काळ बदलला आहे. ही खानदानी शिस्त आतां इंग्लंडां[illegible] काय अगर हिंदुस्थानांत काय पसंत पडेनाशी झाली आहे. परंतु आपण चाक[illegible]हणून ओसरी-पडवीलाच राहावें व चाकरांचे भरजरी पोषाख घालूनच [illegible] मिरवावें असा हव्यास बाळगणारे कांहीं लोक अजूनहि आमच्यामध्यें आ[illegible]त. प्रागतिकांसारखे दुसरे कांहींजण ही सरदारी शिस्त पूर्णपणें मान्य कर[illegible] धन्याच्या इमल्याची बांधणी पाहून त्यांना मोठें कौतुक वाटतें. त्यांची [illegible]च इच्छा आहे कीं या घराच्या सध्याच्या मालकांपैकीं एक एक जणाला बाहे[illegible]काढून आपण त्यांच्या गादीवर जाऊन बसावें. याचेंच नांव हिंदीकरण. मा[illegible]ांच्या कातडीचा रंग बदलला म्हणजे सर्व प्रश्न सुटला असें त्यांचें मत आहे. [illegible]बात नवीनच शासनयंत्र उभारलें पाहिजे ही भाषा त्यांना मान्य नाहीं.

त्यांना वाटतें कीं स्वराज्य म्हणजे [illegible] पूर्वींचाच थाट. फक्त अधिकाऱ्यांचा रंग मात्र जरा काळसर. तशाच नोकऱ्या. तशींच सरकारी खातीं, तींच कायदेमंडळें, तेच उद्योग, तेच कारखाने, पूर्वींप्रमाणेंच आपापल्या कचेऱ्यांतून सनदी नोकर बसतील,

आपल्या प्रजाजनांचे डोळे दिपवून टाकावे म्हणून चित्रविचित्र पोषाख व भाराभर रत्नजडित अलंकार अंगावर चढवून सणावारी गांवांतून मिरवणारे तेच संस्थानिक आपल्या राजवाड्यांत राज्य करीत राहतील, खास हक्कासाठीं पूर्वीसारखेच जमीनदार भांडत राहतील व कुळांना नागवतील; जमीनदार व कुळें या दोघांनाहि पिळणारा सावकार पैशांच्या थैल्या जवळ घेऊन पेढीवर बसलेला दिसेल, फी घेऊन काम करणारे तेच वकील कोर्टांत कज्जे लढवतील आणि स्वर्गांत देखील पूर्वीचेच देव अमृत पीत असतील. प्रागतिकांच्या स्वराज्याचें चित्र हें असें आहे.

आहे ही स्थिति कायम राखावी अशीच त्यांची इच्छा आहे. त्यांना फेरबदल हवेत, पण ते केवळ वैयक्तिक स्वरूपाचे असावेत व ते ब्रिटिशांची मर्जी संपादन करून साध्य करून घ्यावेत असा त्यांचा प्रयत्न असतो. ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वावर व संस्थितीवरच त्यांच्या अर्थकारणाची व राजकारणाची सर्व इमारत उभारलेली आहे. हें साम्राज्य अविनाशी आहे, निदान बराच काळ तरी त्याला कसलेंहि भय नाहीं अशी त्यांची समजूत असल्याकारणानें त्यांतील राजकीय व आर्थिक विचारसरणीचाहि ते अवलंब करतात; इतकेंच नव्हे तर ब्रिटिश वर्चस्व कायम टिकावें ह्या एकाच दृष्टीनें निर्माण करण्यांत आलेलीं नैतिक मूल्येंहि ते बहुतेक जशींच्या तशीं स्वीकारीत असतात.

काँग्रेसचें धोरण मूलतःच भिन्न आहे. काँग्रेसला केवळ अधिकाऱ्यांचाच संच ्रावयाचा नसून नवीन शासनसंस्था प्रस्थापित करण्याचा तिचा इरादा आहे. ह्या पनसंस्थेचें स्वरूप कसें असावें यासंबंधीं सामान्य काँग्रेस-कार्यकर्त्याला स्पष्ट कल्पना ालेली नसेल व त्याबद्दल मतभिन्नताहि आढळून येईल. पण काँग्रेसमधील नेमस्त म त्यांची अल्पशी कोर वगळली, तर बाकीच्या लोकांत, सध्याची परिस्थिति व पद्धति चा राहतां उपयोगी नाहीं, त्यांत मूलतः बदल घडवून आणला पाहिजे याविषयीं एकम असल्याचें आढळून येईल. आणि येथेंच वसाहतीचें स्वराज्य व संपूर्ण स्वराज्य य ्यांतील फरक स्पष्ट होतो. वसाहतीच्या स्वराज्यांत हेंच राज्ययंत्र कायम राहू आमचा आर्थिक व्यवहार ब्रिटिश व्यवहाराशीं बद्ध होऊन राहणार तर पूर्ण स्वतंत्र ंदुस्थानांत आमच्या परिस्थितीला अनुरूप असें शासनयंत्र उभारण्याची आम्हांला मोकळीक मिळणार.

इंग्लंडशीं व इंग्लिश ोकांशीं असलेल्या हाडवैराचा अथवा कांहींहि होवो त्यांच्याशीं असलेला संबंध तोडला पाहिजे अशा हटवादीपणाचा येथें कांहींच संबंध नाहीं. आतांपर्यंतच्या इतिहासानंतर ंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें वैरभाव जागृत झाला असेल तर तो मात्र साहजिक आहे. "ाधिकाराची नशा चढली कीं किल्ली वापरावयाची तेथें माणूस टिकाव चालवूं लागतो." असें टागोरांनीं म्हटलें आहे. आमच्या अन्तःकरणाचीं कवाडें ज्या किल्लीनें उघडलीं असतीं, ती इंग्रजांनीं मागेंच हरवून टाकली आहे. आणि आमच्या अंतःकरणावर ब्रिटिशांनीं आतांपर्यंत जे टिकावाचे घाव घातले, त्यांमुळें

आमच्या अंतःकरणांतून प्रेमाचे पाझर फुटले असतील अशी का कोणाची समजूत आहे? तथापि हिंदुस्थानचें व मानवजातीचें व्यापक हित जर आम्हांला साधावयाचें असेल, तर ह्या क्षणिक वैरभावाची शिदोरी पाठीशीं बांधून चालणार नाहीं आणि समजा तशी आमची इच्छा असली, तरी गांधीजींनीं गेल्या पंधरा वर्षांत असें सक्त शिक्षण दिलें आहे कीं तिला पायबंदच बसावा. ब्रिटिश तुरुंगामध्यें बसूनच माझें हें लिखाण चालू आहे. गेले कांहीं महिने दारुण चिंतेनें माझ्या अंतःकरणांत विन्हाड केलें असून अनेक प्रसंगीं संताप व चीड यांनीं माझें मन भरून आलेलें आहे. अशा परिस्थितींत येथें बसल्या बसल्या मीं माझ्या अन्तःकरणाचा कोनान् कोपरा जेव्हां धुंडाळला, तेव्हां इंग्लंड अथवा इंग्रज लोक यांच्याविषयींच्या वैमनस्याचीं जळमटें मला कोठेंहि आढळून आलीं नाहींत. मी ब्रिटिश साम्राज्यशाहीचा तेवढा तिरस्कार करतों. तिचें हिंदुस्थानवरील वर्चस्व मला सहन होत नाहीं. भांडवलशाही मला नापसंत आहे. ब्रिटनमधील अधिकारी वर्गानें चालवलेली हिंदुस्थानची पिळणूकहि मला नापसंत आहे; त्यांचीं कृत्यें पाहून मला चीड येते. पण इंग्लंडला अथवा एकजात सर्व इंग्रजांना मी त्याबद्दल दोष देत नाहीं. आणि मीं तसा दोष दिला, तरी काय साधणार आहे? उलट सर्व राष्ट्रावर तणतणणें अथवा त्यांतील सगळ्याच लोकांचा निषेध करणें मूर्खपणाचेंच ठरेल. आपल्याप्रमाणेंच तेहि परिस्थितीचे गुलाम आहेत.

माझ्या मनोवृत्तींचा घाट पुष्कळसा इंग्रजी वळणाचाच आहे. त्यामुळें इंग्लंडम[illegible] शाळेंत व विश्वविद्यालयांत शिकत असतांना ज्या मानसिक संवयी व इतर [illegible]च्या गुणावगुणांचें व जीवनाचें मोजमाप करण्याच्या ज्या वृत्ती माझ्या अंगीं [illegible]नल्या त्या प्रयत्न केला तरी दूर होणें शक्य नाहीं. राजकारणाव्यतिरिक्त [illegible]र बाबतींत इंग्लंड व इंग्लिश लोक यांच्याकडेच माझ्या मनाचा ओढा आहे. [illegible] जवळ जवळ माझ्या इच्छेविरुद्ध ब्रिटिश राजसत्तेचा मला कट्टर विरोधक बन[illegible] लागलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इंग्लिश लोकांशीं आमचा विरोध नसून त्यांच्या [illegible]धारित्वाला, त्यांच्या वर्चस्वाला आमचा विरोध आहे. हिंदुस्थान जराजर्जर झा[illegible]ला आहे. त्याला नव्या विचारांची, नव्या वातावरणाची, निकोप सहकार्याची [illegible]री आहे. पण वाघाप्रमाणें आमच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं इंग्रज येऊं लाग[illegible] तर आमच्यापासून मैत्रीची व सहकार्याची अपेक्षा त्यांनीं कां धरावी? कोणाचीहि दयामाया न ठेवतां साम्राज्यशाहीरूपी वाघिणीचा प्रतिकार केलाच पाहिजे आणि हिंदुस्थानवर आज ह्याच क्रूर श्वापदानें झडप घातलेली आहे. एक वेळ रानच्या वाघाला माणसाळतां येईल, त्याची नैसर्गिक क्रूरता सुद्धां घालवतां येईल, पण भांडवलशाहीचा व साम्राज्यशाहीचा हा वाघ माणसाळण्याचा मुळींसुद्धां संभव नाहीं.

मी अथवा माझा देश कधींच तडजोड करणार नाहीं हें विधान वेडेपणाचें

आहे. कारण जीवनामध्यें तडजोड करणें भाग पडतें. परंतु असलें विधान एकाद्या पद्धतीविषयीं अथवा परिस्थितीविषयीं केलें तर तें योग्य ठरेल. हिंदी स्वातंत्र्य आणि ब्रिटिश साम्राज्यशाही हीं परस्परविरोधी आहेत, आणि कितीहि कडक लष्करी कायदे पुकारले अथवा गुळचट भाषणें केलीं तरी हीं दोन विरोधी सत्यें एकत्र सांधलीं जाणें अथवा त्यांच्यामधील विरोध नष्ट होणें शक्य नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीचें ज्या दिवशीं हिंदुस्थानच्या भूमीवरून उच्चाटन होईल, त्याच दिवशीं खऱ्याखुऱ्या हिंदी ब्रिटिश सहकार्याला अनुकूल परिस्थिति निर्माण होईल.

आधुनिक जगांतील निरनिराळे देश अधिकाधिक प्रमाणांत परस्परावलंबी बनत चालले असतां संकुचित दृष्टीनें स्वातंत्र्यासाठीं हट्ट धरून बसणें म्हणजे घड्याळाचे कांटे उलटे फिरवूं पाहण्यासारखें होणार आहे असें आम्हांला सांगण्यांत येतें. ब्रिटनमधील प्रागतिक, शांततावादी आणि नामधारी समाजवादीहि हाच मुद्दा उपस्थित करून आम्हाला आमच्या ह्या संकुचित वृत्तीबद्दल हिणवीत असतात. आणि जातां जातां जगद्धितेच्छु असे हे सद्गृहस्थ असेंहि सुचवून ठेवतात कीं समृद्धतर अशा राष्ट्रीय जीवनाचा आनंद चाखावयाचा असेल तर "ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत राष्ट्रसंघांत" राहणें हाच एक मार्ग आहे. प्रागतिक, शांततावादी, समाजवादी, वगैरे इंग्लंडांतील सर्व तऱ्हेचे दगड ब्रिटिश साम्राज्याची तटबंदी बळकट करण्याच्या कामींच उपयोगी पडावेत हें दृश्य मोठें कुतूहलजनक आहे. ट्रॉटस्की म्हणतो कीं "अधिकारारूढ राष्ट्राची आपलें स्थान कायम राखण्याची इच्छा पुष्कळ वेळां 'राष्ट्रवादापेक्षां' आपली भूमिका उच्चतर आहे असा टेंभा मिरवतांना आढळून येते. गिळंकृत केलेले प्रदेश हातचे जाऊं नयेत म्हणून जेत्या राष्ट्रानें विजयानंतर शांततावादाचा पुरस्कार करण्यापैकींच हा प्रकार आहे. गांधींच्या समोर उभें राहिलें कीं आपण आंतरराष्ट्रवादी आहोंत असा डौल मॅक्डोनल्डला मारावासा वाटतो त्यांतील इंगित हेंच आहे."

राजकीय स्वातंत्र्य हस्तगत झाल्यावर हिंदुस्थान काय करील व कसा दिसेल तें मला सांगतां येणार नाहीं. पण आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणारे बरेचसे लोक आंतरराष्ट्रवादी आहेत एवढें मात्र निश्चित. समाजवाद्यांना राष्ट्रवादाचें महत्त्व वाटत नाहीं. पण कॉंग्रेसमध्यें समाजवाद्यांव्यतिरिक्त सुद्धां असे पुष्कळ लोक आहेत कीं ज्यांचा आंतरराष्ट्रवादावर दृढ विश्वास आहे. जगाशीं फटकून राहतां यावें म्हणून आम्हांला स्वातंत्र्य हवें असें नाहीं. खरीखुरी आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था नांदणार असेल तर इतर देशांच्या बरोबरीनें आम्हीहि आपल्या स्वातंत्र्यापैकीं कांहीं भागाचा त्याग करण्यास तयार होऊं. पण कोणत्याहि साम्राज्यशाहीला कितीहि गोजिरवाणीं विशेषणें लावलीं, तरी अभिजात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा व तिचा विरोध येणार ही काळ्या दगडावरील रेघ. जागतिक सहकार्य व जागतिक शांतता साम्राज्यशाहींतून निर्माण होणें सर्वतोपरी अशक्य आहे.

स्वयंपूर्णता आणि आर्थिक साम्राज्यवाद ह्या तत्त्वांचा अंगीकार केल्यामुळें

जगांतील निरनिराळीं साम्राज्यें परस्परांशीं कशीं तुसडेपणानें वागत आहेत तें अलीकडच्या घडामोडींवरून कळून येईल. आंतरराष्ट्रीय भावनेकडे जगाची गाडी न जातां सध्यां ती विरुद्ध दिशेनें चालली आहे. ह्या उलट्या प्रवाहाचें कारण शोधण्यासाठीं फार लांब जावयास नको. कमकुवत बनत चाललेल्या वर्तमान आर्थिक रचनेची ती निशाणीच आहे. एकीकडे स्वयंपूर्णतेच्या तत्त्वाच्या कक्षेंत समाविष्ट झालेल्या प्रदेशांत अधिक सहकार्य होत जातें व दुसरीकडे इतर जगापासून ते देश अधिकाधिक दूर जातात. ओटावा-करारामुळें हिंदुस्थानचें इतर राष्ट्रांशीं असलेलें दळणवळण तुटलें, आणि तेव्हांपासून ब्रिटिश कारखानदारांच्या कुबडीचा आधार आम्हांला जास्तच आवश्यक होऊन बसला. तात्कालिक नुकसान सोडून दिलें तरीसुद्धां ह्या धोरणामुळें गुदरणारीं इतर संकटें सहज लक्षांत येण्यासारखीं आहेत. सारांश, वसाहतीचें स्वराज्य मिळालें तर आंतरराष्ट्रीय संबंध न वाढतां उलट एकलकोंडेपणा मात्र वाढत जाईल.

पण आमचे प्रागतिक मित्र नाकावर अस्सल ब्रिटिश बनावटीचा चष्मा ठेवूनच जगाकडे व विशेषतः स्वदेशाकडे बघत असतात. काँग्रेस काय म्हणते, कशासाठीं म्हणते तें समजावून न घेतां स्वातंत्र्याचें ध्येय संकुचितच आहे व वसाहती स्वराज्य मोक्षपद देणार आहे हें ब्रिटिशांनींच पढवलेलें पालुपद ते घोकीत राहतात. हिंदुस्थानांत प्रत्यक्ष प्रतिकाराची अथवा चढाईची कोणतीहि चळवळ सुरू झाली तर त्यांचें मस्तक भणाणतें; पण नवल असें कीं असल्या मार्गाचा स्वीकार इतर देशांत कोणी केला तर त्याला मात्र त्यांची ना नाहीं. लांबून ते त्याचें कौतुक करतात. आणि अशा राजकीय मार्गांच्या साहाय्यानें अधिकारपदावर चढलेल्या पाश्चात्य देशांतील कांहीं विद्यमान सर्वाधिकाऱ्यांवर त्यांनीं स्तुतिसुमनेंहि उधळलेलीं आहेत.

आम्हाला केवळ नवा अधिकारी वर्ग हवा कीं नव्या शासनसंस्थेची प्रतिष्ठापना हवी हा खरा मुद्द्याचा प्रश्न आहे. प्रागतिकांचें मत स्पष्टच आहे. त्यांना पहिली गोष्ट इष्ट वाटते व तीहि बऱ्याच काळानंतर यावी असें त्यांचें मत आहे. वसाहती-स्वराज्य या शब्दाचा उच्चार ते वारंवार करीत असले, तरी त्यांचें खरें उद्दिष्ट "मध्यवर्ती जबाबदारी" या संदिग्ध शब्दांनीं व्यक्त होत असतें. सत्ता, स्वायत्तता, स्वातंत्र्य, वगैरे निःसंदिग्ध शब्दांचा उच्चार करण्यालहि ते कचरतात. कायदेपंडिती भाषा व कायदेपंडिती मनोवृत्ति त्यांना फार पसंत आहे. मग जनतेला त्यापासून स्फुरण चढो वा न चढो. श्रद्धेसाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं व्यक्ति व गट संकटांशीं झुंजल्याचे व प्राणाहुति देण्यास तयार झाल्याचे दाखले इतिहासांत पावलोपावलीं आढळतात. पण "मध्यवर्ति जबाबदारी" अथवा असल्याच दुसऱ्या एखाद्या वकिली ध्येयासाठीं एक वेळचें जेवण अथवा दोन तास झोंप तरी गमावण्यास कोणी तयार होईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

हें त्यांचें ध्येय; बरें, तें साध्य कसें करावयाचें? तर श्री. शास्त्री यांनीं

कलकत्त्यास उपदेशलेल्या मार्गानें, चढाईनें नव्हे. सचोटीनें वागलें व चोख काम बजावलें कीं आपली सत्ता सोडून द्यावी अशी इच्छा सरकारच्या मनांत उदित होईल अशी त्यांची कल्पना आहे. आमच्या चढेलपणाची चीड येते म्हणून म्हणा अथवा आमच्या कर्तबगारीविषयीं संशय असल्यामुळें म्हणा, ते आम्हाला आज प्रतिरोध करीत आहेत. कदाचित् त्यांच्या मनांत चीड व साशंकता हीं दोन्हींहि असतील. हप्त्याहप्त्यानें आणि राज्यकर्त्यांच्या सहकार्यानें सत्ता प्राप्त करून घेण्याच्या कल्पनेसंबंधीं प्रो. टॉने या ओजस्वी लेखकानें अत्यंत मननीय असे विचार प्रगट केले आहेत. त्याची टीका ब्रिटिश मजूर पक्षाला उद्देशून केलेली असली, तरी हिंदुस्थानला ती अधिकच समर्पकपणें लागू पडते. कारण इंग्लंडांत नांवाला तरी लोकशाही राज्यपद्धति असल्यामुळें बहुसंख्य पक्षाला राज्ययंत्रावर आपला प्रभाव पाडतां येईल असा मुद्दा पुढें मांडणें तरी शक्य होतें.

एकेक पापुद्रा सोलून कांदे खातां येतील; पण जीवन्त वाघाचा एकेक पंजा सोलून खाऊं म्हटलें तर तें शक्य नाहीं. कारण देहविदारणाची कला आपल्यापेक्षां त्यालाच चांगली अवगत असते, आणि आधीं तोच आपलें नरडें पकडतो.

" अक्कलशून्य वरिष्ठवर्ग असलेला एकादा देश जगाच्या पाठीवर कोठें असेल तो असो, मात्र इंग्लंड तसा नाहीं खासच. मजूर पक्षाची बाजू जरा धोरणानें व सौजन्यानें मांडली कीं तुमचेंहि कल्याण ह्यांतच आहे अशी भुरळ वरिष्ठ वर्गाला पाडतां येईल ही कल्पना कसलेल्या वकिलाच्या हातची मालमत्ता त्याला बनवून काढून घेण्याच्या कल्पनेइतकीच हास्यास्पद आहे. गोडबोल्या, चतुर, कर्तबगार, हिम्मतवान् आणि प्रसंग आला तर उलट्या काळजानें वागणाऱ्या लोकांचा भरणा इंग्लंडांतील धनिक वर्गांत भरपूर आहे. पोळीच्या कोणत्या अंगाला तूप चोपडलेलें आहे तें त्यांना समजतें व नेहमीं पूर्वीप्रमाणेंच तूप चोपडतां यावें अशीहि त्यांची इच्छा असते. त्यांच्या जिवावर बेतलें तर हाउस ऑफ लॉर्ड्स्चे अधिकार, राजाची प्रतिष्ठा, छापखान्यांची शक्ति, सैन्यांतील फितुरी, बँकांचें दिवाळें, आंतरराष्ट्रीय कुलंगडीं, आणि १९३१ सालीं सिद्ध झाल्याप्रमाणें स्वतःचा खिसा गरम राहावा म्हणून देशहिताचा घात करण्याची तयारी, वगैरे पटावरील सर्व मोहरीं इरेस घालावयाला ते कमी करणार नाहींत. "

ब्रिटिश मजूर पक्षाचें बळ अफाट आहे. वर्गणी देणारे लक्षावधि सभासद असलेल्या मजूर संघाचें त्या पक्षाला पाठबळ आहे. इंग्लंडमध्यें लोकमताला जबाबदार अशी राज्यपद्धति असून नागरिक स्वातंत्र्याची दीर्घ परंपरा तेथें विद्यमान आहे. इतकें असून देखील मजूर पक्षाला गोडसें हंसून आणि मिष्टसें बोलून खरी राजसत्ता काबीज करणें शक्य नाहीं हें टॉने यांचें मत किती बरोबर होतें तें अलीकडे घडलेल्या प्रसंगावरून सिद्ध झालें आहे. मजूर पक्षाला पार्लमेंटांत बहुसंख्य जागा मिळाल्या तरी राजकीय, सामाजिक, आर्थिक व लष्करी नाक्याच्या जागा अडकवून बसलेल्या वरिष्ठ वर्गांच्या विरोधाला धुडकावून मूलगामी सामाजिक फेरबदल करणें मजूर

पक्षाला शक्य होणार नाहीं असें टॅाने यांनीं ध्वनित केलें आहे. हिंदुस्थानांत सर्वच स्थिति भिन्न आहे. येथें लोकशाहीचें नांव नाहीं आणि सोटेशाही मात्र नित्याची होऊन बसली आहे. नागरिक स्वातंत्र्याची तर वाताहत उडालेली आहे. बरें, प्रागतिकांच्या पाठीशीं संघटना कितीशी आहे पुसाल तर भोंपळ्याएवढें पूज्य. राहतां राहिलें लाघवी हंसण्याचें हत्यार. तेवढें मात्र त्यांना वापरतां येईल.

प्रागतिक लोक 'असनदशीर' अथवा 'बेकायदेशीर' कार्यांच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत. ज्या देशांत लोकसत्ताक राज्यघटना चालू असते तेथें 'सनदशीर' अथवा 'राज्यघटनानुसारी' या शब्दाला व्यापक असा अर्थ असतो. कायदे करणें, नागरिक स्वातंत्र्याचें रक्षण करणें, सरकारी अधिकाऱ्यांचें नियंत्रण करणें व आर्थिक व सामाजिक फेरबदल लोकशाहीच्या तत्त्वाला अनुसरून घडवून आणतां येतील अशी व्यवस्था करणें ह्या सर्व गोष्टी राज्यघटनेंत अन्तर्भूत केलेल्या असतात. परंतु हिंदुस्थानांत अशी सनदशीर राज्यघटनाच नसल्यामुळें त्या त्या शब्दाला कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. थोड्याफार अंशीं अधिकाऱ्यांच्या लहरींप्रमाणेंच कां म्हणाना जें जें कांहीं होईल त्याला त्याला सनदशीर म्हणावयाचें असा येथें शिरस्ताच पडून गेलेला आहे. सनदशीर याचा अर्थ केव्हां केव्हां कायदेशीर असाहि केला जातो. "कायदेशीर" व "बेकायदेशीर" हे शब्द बरेच संदिग्ध असले व त्यांचा अर्थ दिसागणिक बदलत असला तरी तेच शब्द वापरणें अधिक बरें असें मला वाटतें.

नव्या वटहुकुमाबरोबर नवीन गुन्हे तयार होत असतात. जाहीर सभेला हजर राहणें, पायगाडीवर बसणें, अमुक एका तऱ्हेचे कपडे वापरणें, सूर्यास्ताबरोबर घरीं न येणें, दररोज पोलिसकडे वर्दी न देणें—आजकाल हिंदुस्थानच्या कांहीं भागांतून हे सर्व गुन्हेच ठरले आहेत. जें कृत्य एका प्रान्तांत बेकायदेशीर तेंच दुसऱ्या प्रान्तांत कायदेशीर अशा तऱ्हेचे कायदे बेजबाबदार सरकारला लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं जाहीर करतां येतात. अशा परिस्थितींत कायदा याचा अर्थ अधिकाऱ्यांची लहर यापेक्षां जास्त असूं शकत नाहीं. बहुधा लोक अधिकाऱ्यांचा ताल संभाळूनच वागतात. मग ते खुषीनें असो अगर नाखुषीनें असो. कारण आज्ञाभंगाचे परिणाम सुखाचे होत नाहींत. तथापि अशा लहरीपुढें सदासर्वदा मान तुकवणें म्हणजे नामर्दा-प्रमाणें सोटेशाहीला संमति देण्याप्रमाणें आहे, आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा विक्रय करण्याप्रमाणें आहे. तेव्हां अशा वर्तणुकीनें स्वातंत्र्य कधीं काळीं मिळेल ही आशाच करावयास नको.

चालू राज्ययंत्राच्या द्वारा मूलगामी आर्थिक फेरफार समाजामध्यें करतां येतील किंवा नाहीं यासंबंधीं प्रत्येक लोकसत्ताक देशांत विचारसंघर्ष चालू आहेत. सनदशीर मार्गानें असे फेरबदल करणें शक्य नाहीं, त्यासाठीं कोणता तरी असामान्य आणि क्रान्तिकारक मार्गच स्वीकारला पाहिजे असें पुष्कळांचें मत आहे. पण हिंदुस्थानांत हा प्रश्न अप्रस्तुत ठरतो. कारण आम्हांला हवे ते फेरबदल घडवून

आणण्यासाठीं जरूर ते सनदशीर मार्ग येथें उपलब्धच नाहींत. शुभ्रपत्रिकेला अथवा तसल्याच दुसऱ्या एकाद्या मसुद्याला राज्यघटना कायद्याचें स्वरूप आलें तर सनदशीर प्रगतीची गति अनेक बाजूंनीं अजिबात कुंठित होऊन जाईल. हें विघ्न कसें टाळावयाचें ? फेरबदल करण्याची कल्पना मुदलींच सोडून देऊन हरि हरि म्हणत बसावयाचें कीं काय ?

हिंदुस्थानांतील परिस्थिति वस्तुतः ह्यापेक्षांहि विलक्षण आहे. ज्या ज्या सार्वजनिक कृत्यापासून आपणाला भय आहे असें सरकारला वाटेल, तें तें कृत्य सरकार दडपून टाकतें. गेल्या तीन वर्षांतल्याप्रमाणें सार्वजनिक कार्य येथून तेथून बंद करून टाकणें सरकारला शक्य आहे. पण सरकारच्या ह्या इच्छेला मान द्यावयाचा म्हणजे हरएक प्रकारचें सार्वजनिक कामच वर्ज्य करावें लागेल. असली मुस्कटदाबी सहन करणें शक्य नाहीं.

मी नेहमींच कायदा संभाळून काम करीन असें कोणालाहि म्हणतां यावयाचें नाहीं. लोकसत्ताक देशांतून सुद्धां असे प्रसंग निर्माण होतात कीं मनुष्याच्या सदसद्विवेक बुद्धीला कायदा मोडून वागावें असें वाटूं लागतें. जेथें अरेरावी अथवा मनःपूत राज्यकारभार चालू असेल, तेथें तर अशा तऱ्हेनें वागण्याचे प्रसंग वारंवार निर्माण होतात. कारण तेथें कोणत्याहि प्रकारचें नीतितत्त्व उरलेलेंच नसतें.

प्रत्यक्ष प्रतिकार हा अनिर्बंध सत्तेचा अनुषंगी आहे, लोकसत्तेचा नव्हे, म्हणून ज्यांना लोकसत्तेचा विजय व्हावा असें वाटत असेल त्यांनीं प्रत्यक्ष प्रतिकार धर्मबाह्य मानला पाहिजे असें प्रागतिकांचें म्हणणें आहे. त्यांचें हें म्हणणें म्हणजे गोंधळलेल्या विचारांचा व ढिल्या लेखनाचा एक नमुना आहे. कधीं कधीं प्रत्यक्ष प्रतिकारसुद्धां—उदाहरणार्थ मजुरांचा संप—कायदेशीर असूं शकतो. परंतु प्रागतिकांच्या उपरोक्त विधानांत राजकीय स्वरूपाचा प्रत्यक्ष प्रतिकारच अभिप्रेत असावा. पण विचार करा कीं हिटलरच्या अमदानींत जनतेला दुसरा कोणत्या प्रकारचा प्रतिकार करणें शक्य होईल ? लाचार होऊन राहावें अथवा बेकायदेशीर व क्रान्तिकारक कृत्यें तरी करावीं. जर्मनीमध्यें राजकीय स्वरूपाच्या प्रत्यक्ष प्रतिकाराव्यतिरिक्त कोणत्या मार्गानें लोकसत्तेला साहाय्य करतां येईल ?

लोकसत्तेच्या काशीयात्रेला जावें असें हिंदी प्रागतिक नेहमीं घोकीत असतात. परंतु तेथें जाण्याची त्यांच्या मनांत मुळींच इच्छा नाहीं. प्रागतिकांचे एक पट्टीचे पुढारी सर शिवस्वामी अय्यर यांनीं १९३४ च्या मे मध्यें असें सांगितलें कीं "राज्य-घटना परिषद् बोलवावी असा आग्रह कॉंग्रेस धरीत आहे ह्याचा अर्थ सामान्य जनतेच्या शहाणपणावर तिचा फाजील विश्वास असून अनेक मंडलाकार परिषदांतून भाग घेतलेल्या लोकांच्या कळकळीचें व कर्तबगारीचें चीज करण्यास ती तयार नाहीं. राज्यघटना परिषदेनें मंडलाकार परिषदेपेक्षां अधिक कार्य केलें असतें कीं काय याबद्दल मला जबरदस्त शंका आहे." ह्या उताऱ्यावरून लोकशाही ही जनसमुदायापेक्षां

कांहीं निराळी असून ब्रिटिश सरकारनें नेमलेल्या "कळकळीच्या व कर्तबगार" लोकांच्या गटाशीं तिचें अधिक जवळचें नातें आहे असा सर शिवस्वामी यांच्या म्हणण्याचा आशय दिसतो. या विधानानंतर शिवस्वामींनीं शुभ्रपत्रिकेला आशीर्वादहि देऊन ठेवलेला आहे. इतकें केल्यावर ब्रिटिश सरकार व सर शिवस्वामी यांच्यामध्यें संपूर्ण सलोखा कां बरें दिसून येणार नाहीं ?

कॉंग्रेसनें कायदेभंग बंद केलेला पाहून प्रागतिकांना साहजिकच हर्ष झाला. असल्या "मूर्खपणाच्या व आचरट चळवळीपासून" आपण अलिप्त राहण्याचा जो शहाणपणा दाखवला त्याबद्दल त्यांनीं स्वतःची पाठ थोपटून घेतली ! "आम्हीं अगोदरच नव्हतें सांगितलें ?" असे त्यांनीं उद्‌गार काढले ! त्यांचा हा युक्तिवाद बिनतोड होता. आम्ही उभे राहून गुद्दागुद्दी केली म्हणून आम्ही पडलों; त्यावरून त्यांनीं असें तात्पर्य काढलें कीं उभें राहणें हीच चुकीची गोष्ट आहे. बिनधोक सुरक्षितपणाचा मार्ग म्हणजे सरपटत जाणें. एकदां कां तो भुइसपाट पवित्रा घेतला, कीं पडण्याची अथवा गडगडण्याची शंका देखील नको ! !

५२

# जुनें हिंदुस्थान व नवें हिंदुस्थान

हिंदी राष्ट्रवादाला परकीय सत्तेची चीड यावी ही गोष्ट नैसर्गिक व अपरिहार्य अशी होती. तरीहि अनेक बुद्धिवान् लोक एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत ब्रिटिश साम्राज्याच्या विचारसरणीचाच कळत अथवा नकळत स्वीकार करीत राहिले ही आश्चर्याची गोष्ट आहे. आपल्या कैफियतीची उभारणी ते त्या विचारसरणीच्या आधारावरच करीत, आणि टीका करावयाची झालीच तर त्या विचारसरणीच्या केवळ कांहीं बाह्य उपाधीवरच टीका करण्यांत येई. शाळा-कॉलेजांतून इतिहास, अर्थशास्त्र वगैरे जे विषय शिकवण्यांत येत, त्यांचें अथेति विवेचन ब्रिटिश साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें केलेलें असे व आमच्यांतील अनेक भूतकालीन व वर्तमानकालीन दोष ठळकपणें दाखवून ब्रिटिशांच्या गुणांचे व शिकंदर नशिबाचे पोवाडे त्यांत गायिलेले असत. ह्या विपर्यस्त दृष्टिकोणाचा थोड्याबहुत प्रमाणांत आमच्यावरहि पगडा बसलेला होता. त्याला आम्हीं अधून मधून विरोध दर्शवीत असलों, तरी आमच्या मनोवृत्तीवर त्याचा परिणाम घडल्यावांचून राहत नसे. दुसऱ्या मुद्द्यांचें अथवा तत्त्वांचें शस्त्र हातीं न सांपडल्यामुळें त्या विचारसरणीच्या पाशांतून मुक्त होणें आमच्या बुद्धीला जमेना. तेव्हां निदानपक्षीं धर्म व तत्त्वज्ञान ह्या विषयांत तरी आम्ही कोणाला हार जाणार नाहीं अशा समजुतीनें आम्ही धार्मिक राष्ट्रवादाचा आश्रय करूं लागलों. पाश्चात्यांचा बाह्य भपका आणि नखरा आमच्यापाशीं नसला, तरी जीवनांतील तत्त्वमसि आम्हांला हस्तगत झालेलें आहे आणि तीच खरी मोलाची जिन्नस आहे अशी समजूत करून घेऊन प्राप्त दुर्दैवाच्या व अधोगतीच्या दिवसांत आम्हीं समाधान मानून घेतलें. विवेकानंद व इतर लोक यांच्या खटपटीनें व आमच्या पुराण तत्त्वज्ञानाविषयीं पाश्चात्य पंडितांनीं दाखविलेल्या जिज्ञासेच्या योगानें आमचा इतिहासाविषयींचा अभिमान पुनः जागृत होऊन स्वाभिमानाचें थोडेंसें मांसहि आमच्या अंगावर चढलें.

आमच्या गत व वर्तमान अवस्थेसंबंधीं ब्रिटिशांनीं केलेल्या विधानांविषयीं मनांत शंका उत्पन्न होऊन त्यांची सूक्ष्म तपासणी सुरू झाली. परंतु अद्यापि ब्रिटिश विचारसरणीची चौकट तोडून आम्ही मोकळेपणानें विचारूं वावरूं लागलों नव्हतों. एकादी गोष्ट वाईट असली तर ती "ब्रिटिश परंपरेशीं" विसंगत आहे असें म्हणण्याचा प्रघात असे. एकाद्या ब्रिटिश इसमानें हिंदुस्थानांत कांहीं गैरवर्तन केलें तर तो

राज्यपद्धतीचा दोष असें न समजतां त्याचा वैयक्तिक दोष आहे असें मानण्याची चाल होती. तथापि ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील राजवटीसंबंधीं जमा झालेल्या टीकात्मक पुराव्याचें संकलन करणाऱ्या लेखकांचा दृष्टिकोण जरी नेमस्त असला तरीहि त्यामुळें क्रांतिकारक परिणाम घडून आले व आमच्या राष्ट्रवादाला राजकीय व आर्थिक विचारांचें अधिष्ठान प्राप्त झालें. दादाभाई नौरोजी, रमेश दत्त, विल्यम डिग्बी व इतर लोक यांच्या पुस्तकांचा राष्ट्रीय विचारसरणीची वाढ होण्याच्या कामीं क्रांतिकारक असा उपयोग झाला. जुन्या इतिहासाचें संशोधन होऊन अत्यंत प्रभावशाली व संस्कृतिसंपन्न अशा कालखंडाची माहिती उपलब्ध होत गेली. ती वाचून आम्हांला फार समाधान वाटत असे. ब्रिटिशांनीं लिहिलेल्या पुस्तकांतून ब्रिटिश राजवटीचें जें चित्र रंगविण्यांत आलेलें आहे, त्याहून वस्तुस्थिति अगदीं निराळी होती हेंहि आम्हाला समजून आलें.

अशा रीतीनें ब्रिटिशांच्या ऐतिहासिक ज्ञानाला, आर्थिक ज्ञानाला व त्यांच्या राज्यकारभाराला आव्हान देण्याची आमच्या अंगची धमक एकसारखी वाढत चालली होती. तथापि ब्रिटिश विचारसरणीच्या जेरबंदापासून हिंदी राष्ट्रवादाची अद्यापि सुटका झाली होती असें म्हणतां येणार नाहीं. ही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरची स्थिति. प्रागतिक व इतर कांहीं गट आणि काँग्रेसमधील कांहीं नेमस्त वृत्तीचीं माणसें अजूनहि त्याच स्थितींत रेंगाळत आहेत. त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याशीं सर्वस्वी विरोधी असणाऱ्या हिंदी स्वातंत्र्याची कल्पना प्रागतिकांना मान्य होणें शक्य नाहीं. पायरीपायरीनें आपण उंच उंच पदावर पोहोंचूं, अधिक लठ्ठ व अधिक महत्त्वाचीं बाडें आपल्या हातीं पडतील अशीं स्वप्नें त्यांना पडत असतात. सरकारचा गाडा पूर्वीप्रमाणेंच सुरळीत चालू राहील व मागच्या बाजूला लांब कोठें तरी राज्यकारभारांत फारशा उचापती न करतां पण जरूर पडेल तेव्हां साहाय्य देण्यासाठीं तत्पर अशा ब्रिटिश सैन्याचा तळ असेल अशीहि त्यांची कल्पना आहे. साम्राज्यांतर्गत स्वराज्याची रूपरेषा ही अशी आहे. ब्रिटिश सैन्याकडून संरक्षण म्हणजे हिंदुस्थानची गुलामगिरी असें वास्तविक समीकरण असल्याकारणानें प्रागतिकांची ही भोळसर कल्पना सत्यसृष्टींत अवतरणें कदापि शक्य नाहीं. स्वातंत्र्य व ब्रिटिशांकडून संरक्षण ह्या दोन्ही गोष्टी एके ठिकाणीं नांदणें अशक्य आहे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकांत सर फ्रेड्रिक व्हाइट म्हणतात*, "हिंदी माणसाची अद्यापि अशी समजूत आहे कीं, आपणाला पाठीशीं घालून इंग्लंड आपल्यावरील संकट दूर करील. ही भ्रांत कल्पना हिंदी इसम जोंपर्यंत आपल्या उराशीं बाळगून ठेवील तोंपर्यंत स्वराज्याच्या नव्या ध्येयाचा पाया त्याला घालतां येणें शक्य नाहीं." येथील मध्यवर्ति कायदेमंडळाचे अध्यक्ष असतांना सर फ्रेड्रिक व्हाइट यांचा प्रागतिक, जातिनिष्ठ लोक, वगैरे प्रतिगामी व्यक्तींशीं संबंध येत असल्यामुळें त्यांनाच उद्देशून

* सर फ्रेड्रिक व्हाइट यांचें "दि फ्यूचर ऑफ ईस्ट अँड वेस्ट."

त्यांनीं हे विचार प्रगट केले असावेत. काँग्रेसची अशी समजूत नाहीं; मग काँग्रेस-पेक्षांहि जहाल मतांच्या लोकांची तर नाहींच नाहीं. हिंदुस्थानवर कोसळणाऱ्या संकटांना तोंड देण्याची धमक हिंदुस्थानच्या अंगीं येईपर्यंत स्वातंत्र्यलाभ होणें शक्य नाहीं हें सर फ्रेड्रिक व्हाइट यांचें मत आम्हांसहि मान्य आहे. ब्रिटिश सैन्यांतील एकूण एक शिपाई ज्या वेळीं हिंदुस्थानचा किनारा सोडून जाईल, त्याच वेळीं हिंदी स्वातंत्र्याचें तोरण चढेल.

ब्रिटिशांच्या विचारसरणीच्या तावडींत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला बुद्धिजीवि वर्ग सांपडला यांत नवल नाहीं. पण विसाव्या शतकांतील रोमांचकारी घटना डोळ्यांनीं देखल्यावरहि ज्यांच्या दृष्टीवरची जुनी झांपड उडाली नाहीं त्यांचें मात्र कौतुक वाटतें. एकोणिसाव्या शतकामध्यें ब्रिटिश अधिकारी वर्ग सर्व जगाचा मानकरी बनला होता. संपत्ति, विजय व सामर्थ्य यांची अविच्छिन्न परंपरा त्यांच्या मागें खडी होती. ह्या परंपरेमुळें व शिक्षणामुळें वरिष्ठ वर्गांना प्राप्त होणारे गुणावगुणहि त्यांच्या अंगीं बाणले. हें थोर वैभव त्यांना प्राप्त करून देण्याच्या कामीं बहुतेक अवश्य ती मदत गेलीं पावणेदोनशें वर्षें आम्हीच करीत आलों आहों याबद्दल हवें तर आम्ही समाधान मानून घ्यावें. आम्ही ईश्वराचीं लाडकीं लेंकरें आहोंत व आमचें साम्राज्य म्हणजे इहलोकींचा स्वर्ग आहे अशी आतांपर्यंत होऊन गेलेल्या अनेक जेत्या जातींप्रमाणें व राष्ट्राप्रमाणें त्यांचीहि कल्पना होती. त्यांच्या वर्चस्वाला धक्का लावला नाहीं, त्यांच्या अधिकारांत व्यत्यय आणला नाहीं, तर आपला स्वार्थ शाबूत ठेवून, दाखवतां येईल तेवढी कृपादृष्टि ते दाखवीत असत. परंतु आपणाला जो कोणी विरोध करील तो साक्षात् ईश्वरी योजनेचाच वैरी अतएव पापी मनुष्य, त्याचा नायनाट करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें समजून ते वागत असत.

आन्द्र सिग् फ्रीड यांनीं ब्रिटिशांच्या या मनोव्यापारांचें फार मनोरंजक असें विवेचन केलेलें आहे.

"ऐश्वर्याबरोबर सत्तेचीहि संवय झाल्यामुळें ब्रिटिश वरिष्ठवर्गाच्या अंतः-करणांत आपल्या वंशाला सत्तेचें ईश्वरदत्त वरदान असल्याची भावना निर्माण झालेली आहे. जगाच्या राजकारणांत त्यांच्या तोलाचे प्रतिस्पर्धी निर्माण झाल्यावर देखील ही भावना तीव्र होत गेल्याचें दिसून येतें. गेल्या शतकाच्या अखेरीच्या इंग्लिश तरुण पिढीच्या मनांत नकळत असा अभिनिवेश उत्पन्न झाला कीं यश म्हणजे आपली जन्मसिद्ध मत्ताच आहे.

"परिस्थितीचा अशा तऱ्हेनें विचार करण्याची ही इंग्रजांची प्रवृत्ति नीट ध्यानांत घेतली पाहिजे. कोणत्याहि परिस्थितीसंबंधीं त्यांच्या ठिकाणीं दृग्गोचर होणाऱ्या मानसिक प्रतिक्रियांचें आकलन त्यांच्या मनोवृत्तींतील ही गोम लक्षांत घेतल्याशिवाय होणार नाहीं. वाचकांच्या हें लक्षांत आलेंच असेल कीं आपल्या संकटाचें मूळ कारण इंग्रजांना नेहमीं बाह्य परिस्थितींत आढळतें. इंग्लंडवर कोणतेंहि संकट

गुदरलें तर त्यांच्या दृष्टीला त्यांत दुसऱ्यांचाच अपराध दिसतो. इतरांनीं आपलें वर्तन सुधारलें तर इंग्लंडला आपलें पूर्व वैभव पुनरपि प्राप्त होईल असें त्यांना वाटत असतें. ह्यामुळें स्वतःची मनोवृत्ति सुधारण्याचा प्रयत्न न करतां दुसऱ्या लोकांच्या मनोवृत्तींत पालट करण्यावर त्यांचा विश्वास असतो."

सर्व जगांतील देशांसंबंधीं ब्रिटिशांची जर ही वृत्ति, तर हिंदुस्थानांत तिला विशेषच जोर चढावा हें स्वाभाविकच होय. हिंदी प्रश्नांकडे पाहण्याचा ब्रिटिशांचा दृष्टिकोण अतिशय संतापजनक असला, तरी त्यांत एक प्रकारची आकर्षकता आहे. आपलीं सर्व कृत्यें योग्यच आहेत व आपल्या शिरावर पडलेली प्रचंड जबाबदारी आपण अभिमानास्पद रीतीनें पार पाडलेली आहे अशाविषयीं त्यांना वाटणारा दृढ विश्वास, आपल्या जातीच्या भवितव्यावरील व आपल्या साम्राज्यपद्धतीवरील त्यांची श्रद्धा, व ह्या त्रिकालाबाधित अशा सत्ताधर्माविषयीं शंका घेणाऱ्या व त्याचें उच्चाटन करूं पाहणाऱ्या पाखंड्याविषयीं त्यांना वाटणारी तुच्छता व संताप ह्या सर्व भावना पाहिल्या कीं, ही एक प्रकारची धर्मनिष्ठाच आहे असें वाटूं लागतें. जणूं कांहीं आमची इच्छा असो वा नसो, आम्हांला मोक्षपदाला नेण्याचें कंकणच त्यांनीं हातीं बांधलें आहे. हा सद्धर्मप्रसाराचा व्यापार करीत असतां सहजासहजीं त्यांच्या हातीं सुवर्णपुष्पदक्षिणा पडते, पण त्यायोगें "सचोटीचा व्यापार म्हणजे नफ्याचा सुकाळ" या म्हणीची सत्यताच पुनः एकवार सिद्ध होत नाहीं काय? साम्राज्यशाहीच्या योजनांना पोषक होईल असें स्वरूप हिंदुस्थानला देत राहिलें आणि निवडक हिंदी लोकांना ब्रिटिश सांच्यांतून ओतून काढलें म्हणजे हिंदुस्थानची प्रगति झाली असा जुना समज होता. ब्रिटिशांचीं ध्येयें व त्यांचें उद्दिष्ट यांचा जसजसा स्वीकार आम्ही करीत जाऊं, तसतसे आम्ही 'स्व-राज्या'ला लायक ठरणार होतों. ब्रिटिशांच्या मर्जीबाहेर आम्ही जाणार नाहीं असें ज्या क्षणीं आम्ही त्यांना पटवून देऊं, त्या क्षणीं स्वातंत्र्याचें उदक आमच्या हातावर पडेल असें मानण्यांत येई.

हिंदुस्थानांतील ब्रिटिशांची राजवट काय लायकीची झाली तें ठरवूं लागलें तर हिंदी व इंग्रज लोकांत मतभेद होतील असें मला वाटतें आणि तसें होणें साहजिकच आहे. पण सेक्रेटरी ऑफ स्टेटसारखे उच्च पदावर विराजमान झालेले अधिकारी-सुद्धां हिंदुस्थानच्या गत व वर्तमानकालीन स्थितीविषयीं विलक्षण व निराधार विधानें करीत सुटतात तेव्हां त्यांचें मात्र नवल वाटतें. वस्तुस्थितीविषयीं जर इतकी भ्रामक समजूत, तर हिंदी लोकांच्या मनःप्रवृत्तीबद्दल त्यांच्या ठायीं केवढें गाढ अज्ञान असेल? भारतभूला हाताशीं धरून त्यांनीं खेंचीत नेली खरी; पण हा निवळ बलात्कारानें मिळविलेला ताबा आहे. तिचें अन्तःकरण त्यांना समजलें नाहीं, तें समजून घेण्याचा त्यांनीं प्रयत्नहि कधीं केला नाहीं. तिच्या डोळ्यांतले भाव जाणून घेणें त्यांना शक्य झालें नाहीं, कारण त्यांची दृष्टि दुसरीकडे वळलेली होती आणि तिची दृष्टि शरमेनें आणि अपमानानें जमिनीकडे लागलेली होती. एकमेकांचा संबंध

येऊन आज शेंकडों वर्षे झालीं, पण ह्या घटकेलादेखील तीं एकमेकाकडे तिरस्कारयुक्त नजरेनेंच पाहत आहेत.

हिंदभू दरिद्री आणि पतित झाली असली तरी तिचें आर्यत्व आणि तिचें थोर मन अद्यापि कायम होतें. परंपरेच्या ओझ्यानें आणि सद्यःस्थितीच्या यातनांनीं ती हैराण झाली असली आणि शीण आल्यामुळें तिच्या डोळ्यांवर झांपड आली असली, तरी "अन्तःकरणाची दीप्ति तिच्या शरीरावर पसरली होती; व असामान्य विचारांची, कल्पनाविलासांची आणि रम्य भावनांची पालवी तिच्या रोमरोमांच्या ठायीं बहरून गेलेली होती." शतधा विदीर्ण झालेल्या तिच्या देहरूपी गाभाऱ्यांत पडलेल्या विशाल अन्तःकरणाचें क्वचित् दर्शनहि घडत असे. कित्येक युगांच्या जीवनयात्रेंत ज्ञानाचा बहुमोल संचय तिनें केला होता, परदेशीयांशीं अनेक वेळां तिच्या भेटीगांठी झाल्या होत्या व आपल्या भव्य कुटुंबांत त्यांच्यासाठीं तिनें जागाहि करून दिली होती. विजयोन्मादाचे व विनाशाचे दिवस तिनें पाहिले होते, अपमानाच्या व दारुण यातनांच्या अश्रूंनीं तिचे डोळे ओले चिंब झालेले होते, आणि कित्येक विपरीत प्रसंगांचा विषदग्ध पेला तिला ओठीं लावावा लागला होता. परंतु जीवनयात्रेच्या सर्व अवस्थांतून जात असतां आपल्या अतिप्राचीन संस्कृतीचा तिला विसर पडला नाहीं. त्या संस्कृतीपासूनच तिला सामर्थ्य व उत्साह प्राप्त होत असे. त्या संस्कृतीपासून मिळणाऱ्या सुखाचा आनंद तिनें इतर देशांना पंक्तीला घेऊन उपभोगला. तरंगाप्रमाणें ती हेलकावे खात होती. कधीं विचारांच्या अमोघ वारूवर आरूढ होऊन स्वर्गगेचा तट गांठावा व तारकांचे गूढ वार्तालाप ऐकावे, तर कधीं वैतरणीच्या कांठीं नरकाचीं भीषण दुःखें अनुभवावीं. अंधश्रद्धेनें आणि अधोगतीला नेणाऱ्या रूढींच्या अंधतमानें घेरलें असतांहि इतिहासाच्या उषःकालीं तिच्या द्रष्ट्या सुपुत्रांनीं उद्घोषित केलेली उपनिषदांतील प्रज्ञा व प्रतिभा यांचें विस्मरण तिला केव्हांहि झालें नाहीं. तिच्या त्या सुपुत्रांचीं तलवारीच्या पात्याप्रमाणें तीक्ष्ण व तल्लख मनें कधीं श्रांत झालीं नाहींत. त्यांचा अखंड शोध चालू होता; यज्ञयागादि कर्मकांडानें त्यांचें समाधान झालें नव्हतें. आपणांस सद्यःकालीन दुःखांतून व्यक्तिगत मोक्ष मिळावा, मरणोत्तर आपणाला स्वर्गांत स्थान मिळावें म्हणून नव्हे, तर ज्ञानरवीचें तेज आपणास दिसावें म्हणून त्यांची अभ्यर्थना चालत असे कीं, "मला असत्यांतून सत्याकडे, अंधारांतून प्रकाशाकडे, मृत्यूपासून मोक्षाकडे न्या. *" आणि प्रत्येक दिवशीं लक्षावधि लोक ज्या गायत्री मंत्राचा उच्चार करतात त्यांतहि ज्ञानासाठींच प्रार्थना केलेली आहे.

राजकीय दृष्ट्या तिचा देह खंडविखंड करण्यांत आलेला असला, तरी तिच्या अखंड संस्कृतीला बाध आलेला नाहीं.† तिच्या विविधतेंतहि आश्चर्यजनक अशी

---

* बृहदारण्यकोपनिषद् १, ३. २७

† सर फ्रेड्रिक व्हाइट यांचें 'दि फ्यूचर ऑफ ईस्ट अँड वेस्ट' हें पुस्तक पाहा.

एकात्मता दृष्टीस पडत असते. सगळ्या पुरातन देशांप्रमाणें या देशांतहि बऱ्या-वाईटाची भेसळ झाली आहे. पण येथील चांगुलपणा मातींत मिसळलेल्या सुवर्ण-रजाप्रमाणें शोधून काढावा तेव्हांच दिसतो. आमच्या अधःपतनाची घाण मात्र सर्व दिशांना पसरली असून येथील सूर्याच्या रखरखीत प्रकाशामुळें आमचा वाईटपणा तेवढा जगजाहीर झाला आहे.

इटली व हिंदुस्थान यांमध्यें थोडेंसें साम्य आहे. हिंदुस्थानच्या मानानें इटलीचा उदय मागाहून झाला असला आणि हिंदुस्थान देश इटलीपेक्षां आकारमानानें फार मोठा असला, तरी हे दोन्ही देश पुरातन असून संस्कृतीचा प्रदीर्घ मार्ग त्यांनीं मागें टाकलेला आहे. राजकारणामुळें दोन्ही देशांचीं शकलें झालीं तरी 'हिंदभू'-प्रमाणेंच 'इटालिया' ही कल्पना कदापि नाहींशी झाली नाहीं. इटलीमध्यें रोमच्या संस्कृतीचा ठसाच सर्वत्र उमटलेला होता आणि संस्कृतीचें तीर्थ आणि वैभवाचें प्रतीक म्हणून सर्व देशभर रोम नगरीचा प्रभाव पडलेला होता. पण असें एकमेव केंद्रनगर हिंदुस्थानांत नव्हतें. हिंदुस्थानचीच काय, पण पौर्वात्य देशांची अक्षय्य नगरी असें काशीनगरीला म्हणतां येईल. पण रोमप्रमाणें तिनें राजकारणाची उठाठेव कधींहि केली नाहीं, कीं ऐहिक सत्तेचा हव्यास धरला नाहीं. हिंदी संस्कृतीचें राज्य इतकें सुविस्तीर्ण होतें कीं कोणत्याहि एका ठिकाणाला राजधानीचें नगर म्हणणे शक्यच झालें नसतें. कन्याकुमारीपासून तों थेट अमरनाथ आणि बद्रीनाथ-पर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत एकच संस्कृतिसागर पसरलेला असून त्यांत कोठेंहि भिन्न कल्पनांची खळबळ झाली कीं तिचे तरंग देशाच्या कानाकोंपऱ्या-पर्यंत पोचत असत.

पाश्चात्य देशांना संस्कृतीचें व धर्माचें पसायदान इटलीनें दिलें. तेंच कार्य पौर्वात्य देशांत हिंदुस्थाननें बजावलें आहे. चीन देश हिंदुस्थानइतकाच पुराण व पूज्य असला, तरी पौर्वात्य देशांत संस्कृति व धर्मप्रसाराचें कार्य हिंदुस्थाननेंच केलेलें आहे. राजकीय दृष्ट्या देश घायाळ होऊन धरणीवर पडला होता, तेव्हांहि इटालियन संस्कृतीचें जीवन सर्व युरोपभर चैतन्य फुलवीत राहिलें होतें.

इटली हें केवळ "भौगोलिक नांव" आहे असें मॅटर्निचचें म्हणणें होतें आणि मॅटर्निच होऊं पाहणाऱ्या कांहीं लोकांनीं हिंदुस्थानबद्दलहि असेच उद्‌गार काढले आहेत. हिंदुस्थान व इटली यांच्या भौगोलिक परिस्थितींत विलक्षण साम्य दिसून येत असलें तरी इंग्लंड व ऑस्ट्रिया यांची तुलना करून पाहतां त्यांच्या-मधील साम्य अधिक उद्‌बोधक वाटेल. एकोणिसाव्या शतकांतील ऑस्ट्रियाप्रमाणेंच आजचें इंग्लंड उद्दाम, मानी आणि प्रबल दिसत आहे; परंतु त्या काळच्या ऑस्ट्रियन साम्राज्याच्या प्रचंड वृक्षाचीं जीवनदात्रीं मुळें ज्याप्रमाणें सुकून चाललीं होतीं व वृक्षाचें खोड पोखरलें जात होतें, त्याचप्रमाणें आज इंग्लंडचीहि अवस्था झाली आहे.

देशाला सगुण असा मनुष्याकार देण्याचा मोह किती अनावर असतो तें बघण्यासारखें आहे. हिंदुस्थानला भारतमातेचें स्वरूप देण्यांत आलें आहे. तिचा देह सुंदर आहे, ती प्राचीन असली तरी अक्षय्ययौवना आहे, निराशेनें आणि दुःखानें परिपूर्ण अशी तिची दृष्टि असून परकीयांच्या छळापासून माझें रक्षण करा असें ती आपल्या लेंकरांना उद्देशून म्हणत आहे, अशा प्रकारचीं कल्पनाचित्रें लाखों लोकांच्या अंतःकरणांत रंगत असतात व त्यामुळें प्रतिकार आणि त्याग करण्याची त्यांची तयारी होते. वस्तुस्थिति पाहिली तर हिंदुस्थान हा मुख्यतः शेतकरी-कामकऱ्यांचा देश आहे; मग तो डोळ्यांना सुंदर कसा दिसेल? दारिद्र्यांत सौंदर्य नाहीं. ही सुंदर स्त्री म्हणजे शेतांतून व कारखान्यांतून नग्नप्राय स्थितींत पाठ दुमडेपर्यंत काम करणाऱ्या शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची प्रतिनिधि असें का समजावयाचें? कीं युगानुयुगें ज्यांनीं जनतेला भरडून व पिळून काढिलें आहे, क्रूर अशा रूढींच्या बंधनांनीं जखडलें आहे आणि ज्यांनीं कित्येक जणांना अस्पृश्यही ठरविलें आहे त्यांच्या गटाची ही प्रतिनिधि असें मानावयाचें? सत्यावर कल्पनासृष्टीचा मुखवटा चढवून वास्तव जगाला विसरावें आणि स्वप्नांच्या मयसभेंत गुंगून राहतां यावें यासाठीं असले उद्योग आपण करीत असतों.

हिंदुस्थानांत भिन्न भिन्नवर्ग व त्यांच्यांतील कलह यांची गर्दी झालेली असली, तरी त्यांना एका माळेंत गुंफणारा धागा ह्या देशाजवळ आहे असें प्रत्ययास येतें. त्या धाग्यांत इतका आश्चर्यजनक चिवटपणा, एवढा जिवंतपणा आला तरी कसा? स्थितिप्रियतेचें आणि परंपरेचें सामर्थ्य कितीहि दांडगें असलें, तरी ह्या धाग्यांत केवळ क्रियाशून्यतेचें बळ सांठवलेलें होतें असें नाहीं. क्रियाप्रवण आणि जीवनदायी असें कांहीं तरी तत्त्व त्यांत होतें खास. कारण बाहेरून बसणाऱ्या धक्क्यांचा प्रतिकार करण्यांत त्यानें यश मिळविलें; त्याचप्रमाणें आंतून निर्माण होणाऱ्या आत्मविरोधी शक्तींनाहि त्यानें पचवून टाकलें. तथापि इतकें सामर्थ्य असूनसुद्धां राजकीय स्वातंत्र्यरक्षणाचें कार्य त्याच्यकडून पार पडलें नाहीं आणि राजकीय ऐक्य साधण्याचा प्रयत्नहि त्याच्याकडून झाला नाहीं. ह्या गोष्टींना विशेष महत्त्व आहे असें मानण्यांत येत नसावें. ह्या मूर्खपणाबद्दल आपणास आजपर्यंत भरपूर प्रायश्चित्त घ्यावें लागलें आहे. इतिहासाकडे पाहिलें तर असें दिसून येईल कीं, राजकीय व लष्करी विजयाचें स्तोम हिंदी संस्कृतीनें माजविलेलें नाहीं आणि धन आणि धनवान् लोक यांचा जरा अवहेलनेच्या स्वरांतच उल्लेख केलेला आहे. संपत्ति तेथें कीर्ति असा प्रकार नव्हता आणि लाभेच्छा न धरतां जे समाजाची सेवा करतील तेच पूज्य होत असें निदान शास्त्रांत तरी सांगितलेलें असे.

अनेक वादळांतून आणि संकटांतून निभावून ही जुनी संस्कृति बाहेर पडली आहे. बाह्य आकार कायम राहिला असला, तरी तिचा गाभा वठून गेलेला आहे. आजकाल अत्यंत प्रबल अशा भांडवलदारी—बनिया—संस्कृतीशीं निःशब्द पण

निकराचा असा झगडा ती खेळत आहे. ह्या नव्या शत्रूपुढें तिला निःसंशय नामोहरम व्हावें लागणार. कारण पाश्चात्य संस्कृति शास्त्रीय ज्ञानानें सज्ज अशी असून त्या ज्ञानानें हजारों तोंडांत अन्न घालण्याची सोय करतां येणार आहे. जग उजाड करणाऱ्या ह्या यंत्रसंस्कृतीच्या बरोबरच पाश्चात्यांनीं तिच्या परिहाराचा उपायहि आणलेला आहे. समाजवादाचें, सहकार्याचें व सामाजिक हितार्थ करावयाच्या सेवेचें तत्त्व हाच तो उपाय होय. ब्राह्मणांच्या पुरातन सेवाव्रताहून हें नवें तत्त्व सर्वस्वी भिन्न नाहीं. परंतु आपणाला सर्व वर्गांचें ब्राह्मणीकरण ( धार्मिक दृष्ट्या नव्हे ) करावें लागेल, वर्गभेदांना मूठमाती द्यावी लागेल असा मात्र या नव्या तत्त्वाचा आग्रह आहे. जुनीं, जीर्ण लक्तरें टाकून देऊन हिंदुस्थान नवीं तत्त्वें पेहरील तेव्हां तीं नव्या तऱ्हेनेंच बेतावीं लागतील असें वाटतें. पण नव्या परिस्थितीबरोबरच जुन्या विचारांशींहि तीं विसंगत दिसूं नयेत अशी खबरदारी घ्यावयाला हवी. कारण कल्पना उचलावयाच्या त्या आपल्या भूमींत रुजतील अशाच असल्या पाहिजेत.

## ५४

# ब्रिटिशांची राजवट

हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या राजवटीचा इतिहास कोणत्या स्वरूपाचा आहे? ह्या प्रश्नाचें उत्तर कोणत्याहि इंग्रजी अथवा हिंदी माणसाला निःपक्षपातीपणानें अथवा वस्तुगतबुद्धीनें देतां येईल असें मला वाटत नाहीं. पण ही गोष्ट शक्य आहे असें धरून चाललें, तरी देखील इतिहासांतील मानसिक व इतर घटनांचें मोजमाप करणें फारच अवघड होईल. "ब्रिटिशांच्या राज्यामुळें हिंदुस्थानांतील शतकानुशतकांची एक उणीव दूर झाली. अगदीं दऱ्याखोऱ्यांतूनसुद्धां ज्या राजसत्तेचा अंमल चालतो अशी राजसत्ता या खंडसमान देशाला पूर्वीं कधीं लाधली नव्हती ती ब्रिटिशांमुळें मिळाली." ब्रिटिशांनीं कायदा आणला, राज्यव्यवस्था न्यायाची व चोख केली, लोकशाहीच्या तत्त्वांचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा परिचय करून दिला; आणि "हिंदुस्थानांत एकछत्री राजसत्तेच्या द्वारा हिंदी जनतेंत एकराष्ट्रीयत्वाचा भाव प्रसृत करून" राष्ट्रीय वृत्तीचा श्रीगणेशा आम्हांला पढवला.§ ही ब्रिटिशांची कैफियत झाली. गेल्या बऱ्याच वर्षांत कायद्याच्या राज्याचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा पत्ता नसला, तरीहि या कैफियतींत बराच तथ्यांश आहे.

आंग्लाईचें परीक्षण हिंदी लोक करतात तेव्हां ह्याव्यतिरिक्त दुसऱ्या अनेक मुद्द्यांचा विचार प्रामुख्यानें करून परकीय सत्तेमुळें आमची जी भौतिक व आध्यात्मिक अवनति झाली आहे तिचा निर्देश करण्यांत येत असतो. हे दोन दृष्टिकोण इतके भिन्न आहेत कीं, ज्या गोष्टींची ब्रिटिश लोक स्तुति करतील त्याच गोष्टींची हिंदी परीक्षक निंदा करतांना आढळतील. "आमच्या अहिताचें जें जें कृत्य ते करतात तें तें बाह्यात्कारी आमच्या हिताचें दिसतें हा ब्रिटिश राजवटीचा आश्चर्यकारक विशेष होय." असें डॉ. आनंद कुमारस्वामी ह्यांनीं म्हटलेलें आहे.

वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, गेल्या पुऱ्या अधिक शतकामध्यें हिंदुस्थानांत जीं स्थित्यंतरें झालीं, तीं सामान्यतः जगभर घडून आलेलीं दिसतात. प्रथम पाश्चिमात्य देशांत व तदनंतर सर्व जगांत जें यांत्रिक उत्पादन सुरू झालें, त्याच्याबरोबरच राष्ट्रवाद आणि एकछत्री राष्ट्र ह्यांचाहि उद्भव झाला. हिंदुस्थानची पश्चिमेकडची खिडकी उघडून पाश्चात्य यंत्रयुगाची व विज्ञानाची वानगी आंत टाकली

§ हिंदी राज्यघटनेबाबतच्या संयुक्त पार्लमेंटरी समितीच्या अहवालांतून (१९३४) हे उतारे घेतलेले आहेत.

याबद्दलचें श्रेय ब्रिटिशांनीं हवें तर घ्यावें. पण नंतर मात्र अगदीं निरुपाय होईपर्यंत हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांच्या गळ्याला त्यांनीं नख लावून ठेविलें होतें. पश्चिम आशियांतील इस्लामी संस्कृति व अतिपूर्व देशांपर्यंत पसरलेली खुद्द हिंदुस्थानची संस्कृति यांचा मिलाफ हिंदुस्थानांत ब्रिटिश लोक येण्याच्या पूर्वीं झाला होता. पाश्चात्य संस्कृतीची तिसरी प्रचंड लाट इस्लामी देशांच्याहि पलीकडे असलेल्या पाश्चिमात्य देशांतून आली. आणि हिंदुस्थान म्हणजे नव्या-जुन्या विचारांच्या संघर्षाचें एक केंद्र बनलें. ह्या संस्कृतिसंगरांत पाश्चात्य संस्कृतीचा विजय झाला असता व हिंदुस्थानांतील अनेक शतकें सांचून राहिलेले जुने प्रश्न जळून गेले असते, यांत संशय नाहीं. पण ज्या ब्रिटिशांनीं ही नवी संस्कृति वाहून आणिली, त्यांनींच तिची प्रगति रोखून ठेविली. आमची औद्योगिक प्रगति थांबवून त्यांनीं आमची राजकीय प्रगतिहि खुंटवली आणि सरंजामशाही वगैरेंचे जे जुनाट अवशेष त्यांच्या दृष्टीस पडले, ते त्यांनीं जतन करून ठेवले. आमचे बदलते व कांहीं अंशीं प्रगतिक्षम कायदे व चालीरीति त्यांनीं जशा मिळाल्या तशा पक्क्या करून टाकल्या. त्या शृंखलांतून आम्हांला स्वतःची सुटका करून घेतां येईना. हिंदुस्थानांत मध्यम वर्ग उदयास आला तो त्यांच्या कृपेनें अथवा उत्तेजनानें नव्हे. पण यंत्रयुगांतील आगगाड्या वगैरे प्रकार येथें एकदा सुरू केल्यानंतर प्रगतीचें चक्र त्यांना थांबवतां येईना. तिच्या गतींत अडथळे उत्पन्न करून ती मंद करणें त्यांना शक्य होतें; तेवढें काम त्यांनीं केलें, व त्यांचा त्यामुळें फायदाहि झाला.

" ......१८५८ सालीं ईस्ट इंडिया कंपनीचा सर्व प्रदेश ब्रिटिश सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्यापासून हिंदुस्थानची जितकी शैक्षणिक व भौतिक प्रगति झाली आहे, तितकी प्रगति आपल्या दीर्घकालीन इतिहासांत त्याला केव्हांहि करणें शक्य झालें नव्हतें. "* हें विधान वाटतें तितकें स्वयंसिद्ध नाहीं. उलट असेंहि म्हणतात कीं ब्रिटिश राजवटीपासून देशांतील साक्षरतेचें प्रमाण घटलेंच आहे. तथापि वरील विधान अक्षरशः खरें आहे असें गृहीत धरलें तरीहि आधुनिक यांत्रिक युगाची गतयुगाशीं आपण तुलना करीत आहों हें विसरून चालणार नाहीं. जगांतील बहुधा हरएक देशांत यंत्रयुग व विज्ञान यांच्या साहाय्यानें झालेली भौतिक व शैक्षणिक प्रगति पाहिली तर डोळे दिपून जातील. त्या देशांच्या बाबतींत मात्र वरीलप्रमाणें विधान करणें उचित ठरेल. ब्रिटिश लोकांचें राज्य नसतें तरीहि ह्या यंत्रयुगाच्या काळांत हिंदुस्थानची यांत्रिक प्रगति कशी तरी झाल्यावांचून राहती ना असें आम्हीं म्हटलें तर आम्ही भांडकुदळ अथवा विकृत मनोवृत्तीचे आहोंत हें कसें सिद्ध होतें? दुसऱ्या देशांकडे पाहून असें आम्हीं कां म्हणूं नये कीं आमच्या प्रगतींत ब्रिटिशांनीं कोलदांडा घातला नसता, तर आमची झाली याहून किती तरी अधिक प्रगति झाली असती? आगगाड्या, तारायंत्रें, टेलिफोन, नभोवाणी वगैरे गोष्टी ब्रिटिशांच्या

---

* संयुक्त पार्लमेंटरी समितीचा अहवाल (१९३४.)

चांगुलपणाच्या अथवा हितबुद्धीच्या द्योतक आहेत असें म्हणतां येणार नाहीं. त्या आल्या उत्तम झालें, त्या इष्टच होत्या; आणि प्रथम त्या ब्रिटिशांनीं येथें आणिल्या म्हणून जरूर ती कृतज्ञता आपण दाखविलीच पाहिजे. पण यांत्रिक युगाच्या ह्या दूतांचें आगमन येथें झालें तें ब्रिटिश सत्ता दृढ करण्यासाठीं झालें. वास्तविक ह्या शिरांतून व धमन्यांतून हिंदुस्थानचें रक्त खळाळून वाहावयास हवें होतें. व्यापारवृद्धि, मालाची ने-आण, व लक्षावधि लोकांना नवीन जीवनाचा व समृद्धीचा लाभ त्यामुळें व्हावयास हवा होता. कधीं काळीं अवश्य तो परिणाम घडून आलाहि असता, पण मुळांत ह्या सर्व गोष्टी देशावरील साम्राज्यशाहीची पकड दृढ व्हावी व ब्रिटिश मालाला बाजारपेठ मिळावी ह्या हेतूनेंच करण्यांत आल्या व ब्रिटिशांचा हा हेतु सिद्धीसहि गेला. यांत्रिक उत्पादन व्हावें व वाहतुकीचीं आधुनिक साधनें प्रचारांत यावीं असेंच माझेंहि मत आहे; परंतु आगगाडींतून प्रवास करीत असतां आगगाडीचे रूळ म्हणजे हिंदुस्थानला बद्ध करून टाकणाऱ्या बेड्याच आहेत कीं काय असा विचार मनांत डोकावून जातो.

हिंदुस्थानवर अधिकार चालविण्याची ब्रिटिशांची कल्पनाहि पोलिशी थाटाची होती. राज्ययंत्र सुरक्षित ठेवणें हेंच जसें कांहीं सरकारचें काम. बाकीच्या गोष्टींचा विचार इतरांनीं करावा. त्यांच्या खर्चाच्या बाबी म्हणजे लष्कर, पोलिस, मुलकी कारभार व कर्जावरील व्याज. नागरिकांच्या आर्थिक गरजांकडे लक्ष देण्याची काय जरूरी आहे? ब्रिटिश लोकांच्या हितासाठीं हिंदुस्थानच्या आर्थिक हिताचा बळी देण्यांत येई. कांहीं किरकोळ बाबी सोडल्या, तर लोकांच्या सांस्कृतिक व इतर गरजांकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करण्यांत येत असे. मोफत असें सार्वत्रिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्याची सुधारणा, गरीब व वेड्या व्यक्तींची निगा, आजारपण, वार्धक्य व बेकारी वगैरे आपत्तींपासून श्रमजीवि लोकांचा बचाव इत्यादि ज्या अनेक सार्वजनिक खर्चाच्या गोष्टी इतर देशांत दृष्टोत्पत्तीस येतात, तिकडे तर येथील सरकारची दृष्टिहि जावयाची नाहीं. सरकारची करवसुलीची पद्धति विपरीत स्वरूपाची असल्यामुळें असले लोकहिताचे रंगढंग करण्यास सरकारला सवड मिळणार कोठून?

आपल्या राजकीय व आर्थिक वर्चस्वाची बळकटी ज्यायोगें वाढत जाईल, त्या गोष्टीकडे सरकारचें सारें लक्ष लागलेलें असतें हा ब्रिटिश राजवटीचा एक विशेष होय. बाकीच्या सर्व गोष्टी गौण समजल्या जातात. आपण अत्यंत बलिष्ठ असें मध्यवर्ति सरकार व कर्तव्यदक्ष असें पोलिसांचें दळ निर्माण केलें याबद्दल हवें तर सरकारनें आपणाला धन्य म्हणून घ्यावें. परंतु हिंदी लोकांना धन्यता वाटावी असें त्यांत काय आहे? एकता असणें हें उत्तम, पण सगळेच गुलामगिरींत असल्यामुळें प्राप्त झालेल्या एकतेबद्दल कोणाला क्वचितच अभिमान वाटेल. सरकार अरेराव असेल, तर त्याचें सामर्थ्य जनतेच्या मानगुटीवर दिलेल्या शिळेप्रमाणें होतें.

तें वाढलें कीं मानेवरचा बोजाहि वाढतो. अनेक दृष्टींनीं उपयुक्त असे पोलिस पुष्कळदां ज्या जनतेचें रक्षण त्यांनीं वस्तुतः करावें, तिच्यावरच उलटवण्यांत येतात. आधुनिक संकृतीची ग्रीक संस्कृतीशीं तुलना करतांना बर्ट्रांड रसेल यांनीं असें म्हटलें आहे कीं, " आपल्या संकृतीहून वरचढ असा कोणता गुण ग्रीक संस्कृतींत असेल तर तो हा कीं, त्या वेळचे पोलिस गबाळ असत व त्यामुळें अनेक सद्‌गुणी लोकांना पोलिसांच्या कृपेपासून सुरक्षित राहतां येत असे." ब्रिटिशांच्या सत्तेमुळें, आम्हांला शांततेचा लाभ झाला आणि हिंदुस्थानला इतक्या दिवसांच्या त्रासानंतर शांतता मिळणें आवश्यकहि होतें. शांतता ही चीज अत्यंत बहुमोल व प्रगतीसाठीं अवश्य अशी आहे; पण कधीं कधीं तिच्यासाठीं फाजील किंमत मोजल्याचा मूर्खपणा पदरीं येत असतो. शांतता मिळते ती स्मशानशांतता ठरते आणि सुरक्षितपणा प्राप्त होतो तो सुद्धां पिंजऱ्यांतल्या पोपटाला मिळणारा सुरक्षितपणा ठरतो. केव्हां केव्हां आपली उन्नति करून घेण्यास नालायक ठरलेल्या लोकांचें धननैराश्य हेंहि शांततेप्रमाणें भासतें. खऱ्या शांतीपासून होणाऱ्या समाधानाचा अथवा विश्रांतीचा लाभ जित राष्ट्रावर जेत्यांनीं लादलेल्या शांतीपासून होणें शक्य नाहीं. युद्ध हें महाभयंकर आहे, पण मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स यांच्या मतें युद्धामुळें कांहीं गुणांचा प्रकर्षहि होत असतो. ते गुण म्हणजे निष्ठा, एकी, चिकाटी, शौर्य, सदसद्विवेक, कर्तृत्व, काटकसर, शारीरिक सामर्थ्य आणि धडाडी. समाजांत या गुणांचें संवर्धन करील असें युद्धाव्यतिरिक्त दुसरें कोणतें तरी नैतिक तत्त्व शोधून काढण्याचा जेम्स यांचा प्रयत्न चालू होता. अहिंसामय सत्याग्रहाची खबर त्यांच्या कानीं पोंचली असती तर जेम्स यांना कदाचित् आपल्याला इष्ट तें तत्त्व सांपडलें म्हणून समाधान वाटलें असतें.

इतिहासांतील संभाव्यतेचा व "जर–तारी" प्रकरणांचा ऊहापोह करणें हा कालाचा केवळ अपव्यय आहे. विज्ञानसंपन्न व यंत्रसंपन्न अशा पाश्चात्य देशांशीं हिंदुस्थानचा संबंध आला ही निःसंशय उत्तम गोष्ट झाली. विज्ञानावांचून हिंदुस्थानचा अधःपात थांबता ना. पण पाश्चात्य देशांशीं आमचा संबंध ज्या रीतीनें आला ती रीति फार कष्टप्रद ठरली हें खरें. तथापि आमच्या डोळ्यांवरची झांपड नाहींशी होण्यासाठीं असे जबरदस्त धक्के कदाचित् आवश्यकहि असतील. ह्या दृष्टीनें विचार केला, तर प्रॉटेस्टंट पंथाचें व्यक्तिनिष्ठ, व इतर पाश्चात्य लोकांपेक्षां बरेचसे भिन्न, असे इंग्रजच आमच्या नशिबीं आले हें बरें झालें असें म्हटलें पाहिजे. कारण एवढे जबरदस्त धक्के देणें इतरांना साधलें नसतें.

त्यांच्यामुळें आमच्यामध्यें जी राजकीय एकीची भावना निर्माण झाली ती इष्ट अशीच होती. परंतु ही एकीची भावना ब्रिटिशांनीं आणली नसती तरीहि हिंदी राष्ट्रवादाची वाढ झाल्यावांचून राहती ना. आणि राष्ट्रवादाच्या वाढीबरोबरच राजकीय एकीचीहि आवश्यकता भासूं लागली असती. आज

अरबस्तानचे अनेक तुकडे झालेले दिसतात व प्रत्येकांतील राज्यपद्धतीहि भिन्नभिन्न आहे. असें असलें तरी एकीची इच्छा सर्व अरबस्तानांत प्रादुर्भूत होत असून पाश्चात्य साम्राज्यशाही राष्ट्रांनीं भोचकपणा केला नाहीं तर अरब लोक त्यांना इष्ट असलेली एकी घडवून आणतील ह्यांत तिळमात्र शंका नको. तथापि हिंदुस्थानप्रमाणें अरबस्तानांतहि भेदवृत्तींना उत्तेजन देणें व अल्पसंख्याकांच्या प्रश्नांचीं पिलें राजकारणांत सोडून गोंधळ माजवणें हें साम्राज्यशाही राष्ट्रांचें कर्तव्यच होऊन बसलें आहे.

साम्राज्यशाहीची प्रगति होत असतां हिंदुस्थानांतील राजकीय ऐक्याला आपोआप घाट येत गेला. तदनंतर ह्या ऐक्यभावाचा राष्ट्रवादाशीं संबंध जुळून येऊन परकीय सत्तेला धोका उत्पन्न झाल्याबरोबर येथेंहि भेदनीतीला कशी सुरुवात झाली व आमच्या प्रगतीच्या मार्गांत कसे अडथळे आणण्यांत येऊं लागले तें आपण पाहत आहोंतच.

ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत आल्याला आज किती तरी काळ लोटला. आज पावणेदोनशें वर्षें ते सत्ता उपभोगीत आहेत. इतर जुलमी सरकारांप्रमाणें तेहि हिंदुस्थानांत हवे तसे नाचत होते. या देशाला आपल्या इच्छेनुरूप घाट देण्याची अगदीं उत्तमोत्तम संधि त्यांना प्राप्त झाली होती. ह्या काळांत इंग्लंड, युरोप, अमेरिका, जपान व सोव्हियट रशिया या देशांमध्यें इतका फेरबदल झाला कीं, त्याला तुलना नाहीं. हिंदुस्थानांतहि फार मोठा बदल झाला आहे. अठराव्या शतकानंतर आतांपर्यंतच्या काळांत आगगाड्या, कालवे, कारखाने, शाळा आणि विश्वविद्यालयें, मोठमोठ्या सरकारी कचेऱ्या वगैरे गोष्टी आपल्या देशांतहि दिसूं लागल्या आहेत.

आणि इतक्या घडामोडी होऊन देखील हिंदुस्थानची स्थिति कोणत्या प्रकारची आहे? त्याचें अचाट सामर्थ्य पिंजऱ्यांत कोंडलेलें असून त्याला पुरा श्वासोच्छ्वासहि टाकतां येत नाहीं. हजारों कोसांवरून परकी लोक अंमल गाजवीत आहेत. जनतेच्या दारिद्र्याला तोड नाहीं. ते लोक अल्पायुषी बनले असून इतके दुर्बल झाले आहेत कीं, कोणताहि रोग आला कीं ते मुंग्यांसारखे मरतात; शिक्षणाच्या नांवानें गरगरीत पूज्य आहे. मोठमोठ्या टापूंत औषधपाण्याची अथवा साफसफाईची सोय नांवालाहि नाहीं; मध्यम वर्गांत आणि जनतेंत अमर्याद बेकारी माजलेली आहे; आणि अशा गुलामगिरींत आम्हीं काळ कंठीत आहों. स्वातंत्र्य, लोकसत्ता, समाजवाद, कम्युनिझम् वगैरे गोष्टी म्हणजे व्यवहारशून्य ध्येयवाद्यांच्या, पुस्तकी पंडितांच्या, आणि बदमाष लोकांच्या थापा आहेत, समस्त लोकांचें हित होतें कीं नाहीं तें प्रथम पाहिलें पाहिजे, वगैरे उपदेशाच्या गोष्टी आम्हांस ऐकवण्यांत येतात. खरोखरच ही अत्यंत महत्त्वाची कसोटी आहे व ती लावून पाहा म्हणजे आज हिंदुस्थानची स्थिति किती शोचनीय आहे तें उघड झाल्याशिवाय राहणार नाहीं. बेकारी व दुःखनिवारणाच्या मोठमोठ्या योजना इतर देशांत आंखण्यांत येत असल्याचें आपण

ऐकतों; पण आमच्या येथें असलेल्या लाखों बेकारांची व परमावधीच्या दुःखाची वाट काय? गृहरचनेच्या योजनांच्या बातम्याहि आपल्या कानीं येतात, पण आमच्या देशांतील लाखों लोकांचीं घरें कोठें आहेत? मातीच्या खुराड्यांचा आश्रय त्यांना मिळतो न मिळतो. इतर देश झपाट्यानें मार्ग आक्रमीत आहेत व आम्ही गोगलगायीच्या पावलानें पुढें खुरडतों आहों हें दृश्य पाहून दुसऱ्या देशांचा हेवा आम्हांला कां न वाटावा? केवळ बारा वर्षांच्या अल्पावधींत भगीरथ प्रयत्न करून रशियानें निरक्षरता तणून काढली इतकेंच नव्हे, तर अद्ययावत् शिक्षणपद्धतीचा सर्वत्र फैलाव केला. केमाल अतातुर्कांच्या नेतृत्वाखालीं कालपर्यंत मागसलेलें तुर्कस्तान वादळाच्या वेगानें शिक्षणप्रसार करीत चाललें आहे. फॅसिस्ट इटलीनें आपल्या अमदानीच्या सुरुवातीलाच निरक्षरतेच्या तट्टावर धडाक्यानें हल्ला चढविला आहे. त्याच्या शिक्षणमंत्र्यानें अशी घोषणा केली कीं, "निरक्षतेवर सरळ समोरून मारा केला पाहिजे. निरक्षरतेच्या भयंकर प्लेगानें आमचें राष्ट्र निपचित पडलें आहे, सडत चाललें आहे. समाजदेहांत तापलेल्या सळ्या खुपसून त्या रोगाचीं बीजें जाळून टाकावयास हवींत." शब्द कडक आहेत, दिवाणखान्यांतून शोभण्यासारखे नाहींत; पण ह्या विचारामागें कसला दांडगा उत्साह आणि किती दृढ विश्वास उभा आहे तें असल्या शब्दांवरून उत्तम प्रकारें समजून येतें. आम्ही हिंदुस्थानचे लोक अधिक सभ्य आहोंत; अधिक गुळगुळीत भाषा आम्ही बोलतों आणि आम्ही पावलें टाकतों तीं कशीं अगदीं जपून. त्यामुळें कमिशनें व कमिट्या यांच्या कामांतच आमची सर्व शक्ति खर्च होते.

करणें थोडें आणि मचमच फार अशी हिंदी लोकांची वृत्ति आहे म्हणून टीका करण्यांत येते. टीका योग्यच आहे. पण कमिशनें व कमिट्या भरविण्यचा ब्रिटिशांचा दुर्दम्य हव्यास पाहिला कीं आम्हाला सुद्धां आश्चर्यानें तोंडांत बोट घालावेंसें वाटतें. ह्या कमिट्या राबराबून एक भला लठ्ठ असा पांडित्यप्रदर्शक अहवाल प्रसिद्ध करतात. पण त्या अहवालाच्या बारशाबरोबरच सरकार त्याचें बारावें उरकून टाकतें! त्यामुळें दुहेरी लाभ होतो. अहवाल वाचला कीं, प्रगतीच्या वाटेवर आपण बरीच मजल मारली असा भास होतो आणि अहवालानुरूप कांहींच कार्य व्हावयाचें नसल्यामुळें बसल्या जागेवरून उठण्याचा त्रासहि वांचतो; इकडे प्रतिष्ठेची भावना सुखावते आणि तिकडे वरिष्ठ वर्गाचा कुणगाहि बिनधोक राहतो. पुढें कसें करावें याविषयींचा विचार इतर देश करीत असतात, तर आमच्या देशांत आपण फार भरभर पुढें जाऊं ह्या भीतीनें अडसर, बांध, सांखळदंड कोठें किती घालावे आणि बांधावे ह्यासंबंधींच्याच योजना सुरू असतात.

मोगल अमदानीविषयीं वर उद्धृत केलेल्या पार्लमेंटरी समितीच्या अहवालांत म्हटलें आहे कीं "बादशाही वैभवावरून जनतेच्या दारिद्र्याचें अनुमान करण्यांत येत असे." हें विधान सत्यच आहे. पण तें आजच्या काळाला लागू पडणार नाहीं

काय? नवी दिल्ली, व्हाइसरॉयची मिजास आणि प्रांताधिपतींचा बडेजाव ह्यांच्यावरून काय बोध घ्यावा? ह्या वैभवाची पार्श्वभूमि परमावधीच्या दारिद्र्याच्या काळ्याकुट्ट रंगांनींच रंगलेली आहे ना? डोळ्यांत खुपेल इतका विरोध त्या दोहोंत आहे. भावनाशील माणसाला तो सहन कसा होतो कोण जाणें? ह्या साम्राज्यशाहीच्या भरजरी पडद्यामागें आधुनिक परिस्थितीमुळें अधिकाधिक भरडला जाणारा कनिष्ठ मध्यम वर्ग, त्याच्या मागें दारिद्र्यानें गांजलेले कामकरी व त्यांच्यानंतर "चिरकालीन रात्रीच्या अंधारांत" वावरण्यासाठीं जन्मलेला शेतकरी अशा श्रेणी उभ्या आहेत.

"मुखिं निष्फलता युगायुगांची
शिरावरी ओझीं शतकांचीं
घे जगताचें जूं मानेवर
आणि लावितो नजर भूमिवर......
"दिसतें भीषण त्या दृश्यांतुन
किति शतकांचें कष्टी जीवन
सहन भयंकर करित वेदना
शोकमयी काळाची घटना
दलित, पदच्युत, अन् लुटलेली
मानव जाती दिसते सगळी." *

ह्या सर्व दुःखदायक परिस्थितीची जबाबदारी ब्रिटिशांवर रिचवण्यांत अर्थ नाहीं. ती आपणच पत्करली पाहिजे. आपल्या कमकुवतपणाच्या परिणामांचें खापर दुसऱ्याच्या माथीं मारणें मनुष्याला शोभत नाहीं. हुकुमशाही सरकार आणि त्यांतून परकी. मग लोकांत लांगूलचालनाची वृत्तिच पैदा होणार व त्यांची दृष्टि संकुचितच राहणार. तरुणांना भूषणभूत असणाऱ्या धाडस, कल्पकता, तडफदार वृत्ति वगैरे गुणांचा अशा शासनपद्धतींत नायनाटच व्हावयाचा. अशा राजवटींत बिनलाखी सेवावृत्ति कधींच प्रगट होत नाहीं. ज्यांच्यामध्यें सार्वजनिक वृत्तीचा अभाव असेल व स्वार्थ साधणें हेंच ज्यांचें जीवितसाफल्य होऊन बसलें असेल, अशा वेचक दाण्यांनाच सरकार निवडून घेतें. हिंदुस्थानांत सरकारभोवतीं कोणत्या लायकीचे लोक गर्दी करीत असतात तें आपण पाहतोंच. त्यांपैकीं कांहींजण बुद्धीचे तल्लख आणि मोठे कर्तृत्ववान् असे असतात. ते सरकारी अथवा निम-सरकारी नोकरींत शिरतात ह्याचें कारण त्यांना दुसरीकडे वाव मिळणें शक्य होत नाहीं म्हणून. हलके हलके त्यांचें तेज मंद होत होत मोठ्या यंत्रांतील ते एक भाग बनून जातात. सार्वजनिक सेवेविषयीं नोकरवर्गाला दुर्दम्य उत्साह वाटणें कोणत्याहि परकीय राजवटींत शक्य होणार नाहीं.

---

* अमेरिकन कवि मार्कहाम् यांच्या कवितेंतील उतारा.

वरिष्ठ नोकरवर्ग सोडून दिला तर खालच्या बारीकसारीक अधिकाऱ्यांमध्यें वाखाणण्यासारखा कोणताहि गुण नाहीं. वरिष्ठांची थुंकी झेलून कनिष्ठांना लाथ मारण्याची संवय त्यांना लागलेली असते. हा दोष त्यांचा नव्हे, पद्धतीचा आहे. अशा परिस्थितींत लाळघोटेपणाला व वशिलेबाजीला ऊत आला तर त्यांत नवल कसलें? नोकरीवर असतांना कोणताहि ध्येयवाद त्यांच्या अन्तःकरणांत वसत नसतो. बेकारी व बेकारीमुळें ओढवणारी उपासमार यांचें भीषण चित्र मात्र त्यांच्या डोळ्यांसमोर सदैव नाचत असतें. तेव्हां आहे ती नोकरी घट्ट पकडून ठेवावयाची आणि आपल्या सग्यासोयऱ्यांची वर्णी लावावयाची एवढीच एक काळजी ते वाहतात. हेर आणि चहाडखोर हे नेहमी पाठीशीं उभे असल्यावर जनतेंत सद्‌गुणांची वाढ होईल अशी अपेक्षाच करावयाला नको.

अलीकडे होणाऱ्या घटनांमुळें तर संवेदनाक्षम आणि सार्वजनिक कार्याविषयीं कळकळ असणाऱ्या व्यक्तींना सरकारी नोकरी पत्करणें अधिकच अवघड वाटूं लागलें आहे. आधीं सरकारला असे लोक नकोच असतात व आर्थिक अडचणीमुळें निरुपाय झाल्याशिवाय तेहि सरकारशीं फारशी लगट करावयास जात नाहींत.

परंतु साम्राज्याचें जूं खरें खुरें कोणी वाहत असेल तर तें गोरा आदमी वाहतो, काळा आदमी नव्हे ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे. खास साम्राज्यासाठीं म्हणून अनेक नोकऱ्या आहेत व त्यांतील नोकरांच्या खास हक्कांचें संरक्षण व्हावें म्हणून त्यांच्या-भोंवतीं जरूर तीं कुंपणेंहि घातलेलीं असून तीं सर्व हिंदुस्थानच्या हितासाठीं आहेत असेंहि वर सांगण्यांत येतें. हिंदुस्थानचें हित अशा प्रकारें ह्या सनदी नोकरांच्या हिताशीं इतकें एकरूप झालेलें पाहून मोठें आश्चर्य वाटतें. सनदी नोकरांचा एकादा हक्क जर काढून घेतला, तर राज्यकारभार बिनसेल, अंदाधुंदी माजेल असा बाऊ आम्हांला दाखवण्यांत येत असतो. हिंदी मेडिकल खात्याच्या राखीव कुरणांतील कांहीं जागा कमी केल्या तर "हिंदुस्थानचें आरोग्य बिघडेल" अशी हाकाटी करण्यांत येते आणि सैन्यांतील गोरे लोक कमी केले तर सर्व तऱ्हेच्या भयंकर संकटांची दाराशीं ही गर्दी होईल असा धाकहि घालण्यांत येतो.

सर्व वरिष्ठ अधिकारी एकदम चालते झाले आणि निरनिराळ्या खात्यांचा कारभार पाहण्याचें सर्वच काम खालच्या नोकरांवर पडलें, तर थोडासा गोंधळ माजेल ही गोष्ट खरी. पण राज्यकारभारपद्धति सदोष आहे हें त्याचें कारण आहे. खालच्या जागांवर उत्तम लायकीचीं माणसें नेमीत नाहींत व त्यांना जबाबदारीचीं कामें करण्याची संधिहि देण्यांत येत नाहीं. हिंदुस्थानांत लायक माणसें भरपूर प्रमाणांत आहेत व योग्य दिशेनें प्रयत्न केला तर थोड्याच अवधींत तीं मिळूं शकतील याविषयीं मला शंका वाटत नाहीं. पण तो प्रयत्न घडून येण्यासाठीं निराळेंच शासनयंत्र प्रस्थापित केलें पाहिजे.

पण सध्या परिस्थिति अशी आहे कीं कोणत्याहि प्रकारची राज्यघटना आम्हांला

देण्यांत आली तरी सनदी नोकऱ्यांची तटबंदी तशीच राहणार व सरकारी मंदिरांतल्या दिव्य मूर्ती सुरक्षित राहाव्यात व अमंगल लोकांचा शिरकाव आंत होऊं नये म्हणून हे सनदी द्वारपाल तेथें रखवाली करीत राहणार. आमचें मनोमालिन्य आम्ही जसजसें नष्ट करूं तसतशीं त्या मंदिराचीं द्वारें उघडण्यांत येऊन केव्हां तरी कुतूहलानें व आदरानें भरलेल्या आमच्या डोळ्यांचें पारणें फिटण्याचाहि संभव आहे.

साम्राज्यशाहीच्या सर्व नोकऱ्यांत इंडियन सिव्हिल सर्व्हिसचें स्थान श्रेष्ठ आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील गुणांचें अथवा दोषांचें सर्व श्रेय त्यांना दिलें पाहिजे. ह्या नोकरीचें गुणवर्णन अनेक वेळां आमच्यासमोर करण्यांत येत असतें. हिंदुस्थानांत त्यांना प्राप्त झालेलें अपूर्व स्थान व त्याबरोबरच प्राप्त होणारी अप्रतिहत सत्ता, आणि त्यांच्यावर होणारा स्तुतीचा वर्षाव, ह्या सर्व गोष्टी एकत्र जमल्यावर कोणत्याहि व्यक्तीचें अथवा गटाचें मन ताळ्यावर राहणें कठीणच होणार. ह्या नोकरींतील लोकांबद्दल माझ्या मनांत कितीहि आदर असला, तरी शेख महंमदी विचारांचें वेड त्यांच्या डोक्यांत असतें असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

इं. सि. सर्व्हिसमध्यें जे चांगले गुण आहेत ते नाकारण्यांत कांहीं हंशील नाहीं. पण त्यांचें इतकें अवास्तव थोतांड माजवण्यांत येत असतें कीं ह्या थोतांडाची दहीहंडी एक वेळ फोडणें आवश्यक होऊन बसलें आहे. वरिष्ठ वर्गांना उद्देशून अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ व्हेब्लेन हा "ठेवलेले वर्ग" असे शब्द योजीत असतो. इं. सि. सर्व्हिसलाहि "ठेवलेली सर्व्हिस" असें यथार्थतेनें म्हणतां येईल; कारण "ती ठेवणे" म्हणजे फार खर्चाची होऊन बसली आहे.

ब्रिटिश मंत्रिमंडळांतील एक माजी मजूर मंत्रि मेजर ग्रॅहॅम पोल हे हिंदुस्थान-विषयक प्रश्नांत फार बारीक लक्ष घालीत असतात. कांहीं दिवसांपूर्वी "मॉडर्न रिव्ह्यू" मध्यें लिहिलेल्या लेखांत "इं. सि. सर्व्हिसच्या लायकी आणि कर्तब-गारीबद्दल कोणाचाहि मतभेद नाहीं," असें एक विधान त्यांनीं केलें आहे. इंग्लंडांत अशाच प्रकारचीं विधानें करण्यांत येतात व त्यांच्यावर लोक विश्वासहि ठेवतात, तेव्हां त्यांचा विचार करावयास हवा. अशा तऱ्हेचीं ठाम आणि अस्तिपक्षीं विधानें करण्यांत नेहमींच धोका असतो. कारण तीं सहज खोटीं पाडतां येतात. इं. सि. सर्व्हिसविषयीं दुमत नाहीं ही ग्रॅहॅम पोल यांची समजूत सर्वस्वी चुकीची आहे; कारण अनेक वर्षांपूर्वी कै. गो. कृ. गोखले यांनींच तिच्यावर सणसणीत कोरडे ओढलेले आढळतील आणि कॉंग्रेसमधील व कॉंग्रेसबाहेरचा सर्वसामान्य हिंदी माणूस पोल यांच्या विधानाला विरोधच करील. तथापि ह्या प्रश्नाकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोण असल्यामुळें दोन्हीहि बाजूंच्या म्हणण्यांत तथ्यांश आहे. लायकी व कर्तबगारी आहे, पण ती कोणत्या कामांत? हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचीं पाळेंमुळें खोलवर घुसावीं आणि द्रव्यशोषण अखंड चालू राहावें यासाठीं जें कांहीं करावयाचें तें करतांना इं. सि. सर्व्हिसनें उत्तम लायकी व कर्तबगारी दाखवली यांत शंका नाहीं.

परंतु हिंदी जनतेचें कल्याण ही जर कसोटी ठरवली, तर सर्व्हिस अगदीं अपेशी ठरली आहे असेंच कबूल करावें लागेल. ज्या लोकांची सेवा करण्यासाठीं सिव्हिल सर्व्हिसची स्थापना झाली व ज्यांनीं दिलेल्या करामुळें सर्व्हिसचे हरतऱ्हेचे तनखे चालू राहतात, त्या लोकांची राहणी व उत्पन्न आणि सर्व्हिसमधील लोकांची राहणी व उत्पन्न यांची तुलना केली म्हणजे तर सर्व्हिसची अपात्रता अधिकच स्पष्ट दिसूं लागते.

गुणांच्या दृष्टीनें सामान्यच पण कामाचा एक विशिष्ट दर्जा सर्व्हिसनें संभाळला आहे आणि क्वचित् प्रसंगीं असामान्य कर्तबगारीच्या व्यक्तीहि सर्व्हिस-मधून तयार झालेल्या आहेत ह्यांत शंका नाहीं. आणि याहून अधिक फलनिष्पत्ति सर्व्हिसपासून होईल अशी अपेक्षा धरणेंहि योग्य होणार नाहीं. तिनें विशिष्ट दर्जा कायम राखला खरा, पण ठराविक सांच्याहून निराळी वृत्ति कोठें दिसली कीं ती बिल-कुल पसंत पडेनाशी झाली, आणि दैनंदिन कामाच्या घाण्यांत वैयक्तिक बुद्धीच्या देणग्यांचा भुगा होऊन गेला. शिवाय आपण सर्वांहून निराळे दिसूं ह्या भीतीनें नोकरहि आपापलीं वैशिष्ट्यें दडवून ठेवीत. अभिजात तळमळीचे, सेवाप्रवण असे लोक नोकरीवर होते, पण प्रथम साम्राज्याची चाकरी करावी तेव्हां हिंदुस्थानचा विचार. सर्व्हिसमधील लोक संख्येनें थोडे, आणि भोंवतीं परकी आणि विरोधी लोकांचा गराडा, अशा परिस्थितींत आपल्या जातीची व पदवीची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठीं एकजूट करून एक विशिष्ट दर्जा संभाळून राहणें आवश्यकच होतें. मनसोक्त सत्ता हातीं आल्यामुळें त्यांना टीका सहन होईना. बेजबाबदार सत्ताधाऱ्यांचे दुर्गुण त्यांच्याहि अंगीं संचरूं लागले. त्यांची बुद्धि स्वयंसंतुष्ट आणि स्वयंपूर्ण, संकुचित आणि स्थितिप्रिय, बदलत्या जगांत दगडासारखी अचल आणि प्रगतीशीं सर्वस्वी विसंवादी अशी बनली. त्यांच्याहून अधिक कर्तबगार व अधिक तल्लख विचारांच्या व्यक्ती पुढें येऊन त्यांनीं हिंदुस्थानचा प्रश्न हातीं घेतल्याबरोबर यांचें पित्त भडकलें, आणि त्यांना दडपून टाकण्याचा व त्यांच्या मार्गांत कांटे पसरण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. महायुद्ध उलटल्यावर जेव्हां झपाट्यानें फेरबदल होऊं लागले, तेव्हां तर पायाखालची जमीन गरगर फिरत आहे असें वाटून त्यांना तोल सावरेनासा झाला. असले आणीबाणीचे व अभूतपूर्व प्रसंग आले असतां काय करावें तें त्यांच्या पोथ्यांतून लिहिलेलें नव्हतें. बेजबाबदारपणें अधिकार गाजवण्याची सवड मिळत गेल्यामुळें ते स्वैर बनले होते. त्यांचा गट म्हणून विचार केला तर त्यांच्या हातीं अनियंत्रित अधिकार होते. पार्लमेंटचें नियंत्रण काय, नांवाला मात्र मान्य करावें लागे तेवढेंच. लॉर्ड ॲक्टन यानें म्हणून ठेवलें आहे कीं " सत्ता आली कीं अधोगति होते, आणि अमर्याद सत्ता असली कीं अधोगतीलाहि मर्यादा राहत नाहीं."

ह्या सर्व्हिसमधील लोक एकंदरीनें विश्वासू व आपलें रोजचें ठराविक काम बरेंचसें सुव्यवस्थितपणें पार पाडणारे असे आहेत. परंतु त्यांना शिक्षणच अशा तऱ्हेचें मिळालेलें असतें कीं पूर्वी कधीं न देखलेला प्रसंग पुढें उभा राहिला कीं ते

गडबडून जातात; अर्थात् आत्मविश्वास, धोपटमार्गीपणा व एकजूट यांच्या बळावर ते कशी तरी वेळ निभावून नेतात इतकेंच. मेसॅपोटेमियामधील सांवळागोंधळ उघडकीला आल्यामुळें हिंदुस्थान सरकारची नालायकी आणि ठोंबेपणा जगजाहीर झाला आहे. परंतु प्रत्येक वेळीं गोष्टी उघडकीला येतात असें नाहीं. कायदेभंगाच्या वेळची सरकारची वृत्ति नाकाडोळ्यांच्या वैदूप्रमाणेंच होती. कुत्र्याप्रमाणें लोकांना गोळ्या घातल्या अथवा त्यांचीं टाळकीं सडकलीं म्हणजे कांहीं काळ विरोध नाहींसा होत असला, तरी त्यामुळें मूलभूत प्रश्न निकालांत न निघतां जी प्रतिष्ठा रक्षण करण्यासाठीं ही बडवेगिरी करण्यांत आलेली असते, तिचा मात्र बोजवारा उडतो. चढाऊ राष्ट्रीय चळवळीला तोंड देण्यासाठीं सरकारनें अत्याचाराचा उपयोग केला यांत नवल नाहीं. जगांतील प्रत्येक साम्राज्यशाहीचा डोलारा हिंसेवरच उभारलेला आहे आणि विरोध शमन करण्याचा एकच मार्ग त्यांना शिकवण्यांत आलेला आहे. तो म्हणजे हिंसा. तेव्हां हिंसा करणें क्रमप्राप्तच ठरलें, परंतु आत्यंतिक व अनावश्यक असे जे अत्याचार सरकारकडून घडले, त्यांवरून परिस्थितीचें बरोबर आकलन त्यांना झालें नव्हतें, आणि त्यांच्या ठिकाणचा संयम नष्ट झाला होता असेंच सिद्ध होतें. अंतःकरणांतील खोल खोल ठिकाणीं दडून राहिलेले दोष संकटसमयीं नेमके उघडकीस येत असतात. सत्याग्रह हें अशा प्रकारचें संकट होतें. त्या रसायनांत बुचकळून पाहिल्यावर काँग्रेसकडील काय किंवा सरकारकडील काय फारच थोडे लोक बावनकशी असल्याचें आढळून आलें असेल. अव्वल दर्जाचीं फारच थोडीं माणसें दुनियेंत असतात हें संकटाच्या वेळीं लक्षांत येतें, असें लॉइड जॉर्ज यांनीं म्हटलें आहे. ते पुढें म्हणतात कीं बाकीच्या खुर्यांची अशा वेळीं गणती करण्याचेंहि कारण उरत नाहीं. फक्त अत्युच्च शिखरें तेवढींच पाण्याच्या वर दिसत राहतील एवढा प्रचंड पूर आला म्हणजे एरवींच्या काळांत फार उंच वाटणारीं टेकाडें कोठच्या कोठें गडप होतात, त्याचा पत्ताहि लागत नाहीं.

इं. सि. सर्व्हिसच्या लोकांना मिळालेलें शिक्षण व्हिक्टोरिया राणीच्या काळाला साजेसें असलें, तरी आधुनिक जगाशीं तें विसंगत असें आहे. ते लोक तळहाताएवढ्या संकुचित जगांत वावरत असतात. त्यांच्या जगाचें नांव अँग्लो-इंडियन जग. धड इंग्रजीहि नाहीं व धड हिंदुस्थानीहि नाहीं अशी त्यांची धेडगुजरी अवस्था आहे. सद्यःकालीन समाजांतील घडामोडींचा अन्वय त्यांना लावतां येत नाहीं. हिंदी जनतेचे आपण निधिधारक व पालक आहों असा आव ते आणीत असले, तरी जनतेची पुसट अशी देखील ओळख त्यांना नसते. मग नवीन आक्रमणशील मध्यमवर्गाबद्दल तर पुसावयासच नको. त्यांच्याभोंवतीं गोंडा घोळणाऱ्या लोकांवरून ते हिंदी जनतेची परीक्षा करतात आणि जे त्यांची हांजी-हांजी करणार नाहींत, त्यांना चळवळे व बदमाष लोक म्हणून नांवें ठेवतात. महायुद्धानंतर जगभर सुरू असलेल्या स्थित्यंतरांची व विशेषतः आर्थिक जगांतील फेरबदलांची त्यांना असलेली माहिती अभाव-

रूपी असून जुन्या चाकोऱ्यांतून त्यांचे पाय असे गच्च रुतून बसले आहेत कीं तेथून बाहेर पडून नव्या जगांत येऊन मिसळणें त्यांच्या शक्तीबाहेरचें काम आहे. थोडक्यांत म्हणजे हल्लींच्या जगाशीं पूर्णपणें विसंगत असा हा सनदी नोकरांचा वर्ग आहे.

तथापि ब्रिटिश साम्राज्य असेंतोंपर्यंत हा वर्ग आहे तसाच राहणार. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार हें एकाद्या किडक्या पण पक्क्या दाताप्रमाणें झालें आहे. यातना तर होतात, पण सहजासहजीं तो उपटून तर काढतां येत नाहीं. तो दांत उपटून काढीपर्यंत अथवा आपोआप गळून पडेपर्यंत दुःख कायम राहणार, किंबहुना तें वाढत जाणार हें निश्चित.

इं. सि. स. मध्यें उत्कृष्ट असे इंग्रज व हिंदी लोक नाहींत असें नव्हे; पण सध्याची परिस्थिति कायम आहे तोंपर्यंत हिंदी जनतेला अहितकारक अशा कार्यांतच त्यांची कर्तबगारी खर्च होत राहणार. ह्या परिस्थितीचा प्रभाव कांहीं हिंदी नोकरांवर इतका पडतो कीं ' खुद्द राजाहून अधिक राजनिष्ठ ' अशा प्रकारची त्यांची मनोवृत्ति बनलेली आढळते. एका हिंदी सनदी नोकराशीं माझी गांठ पडली. स्वतःला तो फार श्रेष्ठ समजत असे. या बाबतींत माझा त्याच्याशीं मतभेद होता ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सनदी नोकरांचे अनेक गुण त्यानें मला वर्णन करून सांगितले आणि ब्रिटिश साम्राज्याच्या समर्थनपर असा एक बिनतोड युक्तिवादाचा मुद्दा मांडून त्यानें आपलें भाषण आटोपतें घेतलें. त्याचा मुद्दा असा कीं रोमन लोकांच्या अथवा चेंगीझखान व तैमूरलंग यांच्या साम्राज्याहून तरी ब्रिटिश साम्राज्य चांगलें आहे कीं नाहीं ?

आपण आपलीं कामें अत्यंत चोख रीतीनें बजावीत असल्यामुळें तऱ्हेतऱ्हेच्या अधिकारांसाठीं भांडण्याचा आपणाला हक्कच आहे अशी सनदी नोकरांची समजूत झालेली दिसते. हिंदुस्थान दरिद्री असला, तर हिंदुस्थानांतील सामाजिक पद्धति व बनिये लोक त्याला जबाबदार आहेत, आणि विशेषतः हिंदुस्थानची लोकसंख्या ह्या दारिद्र्याला कारण आहे असें ते म्हणतात. परंतु हिंदुस्थानांतील सर्व बनियांचा ज्याला दादा म्हणतां येईल असें जें ब्रिटिश सरकार त्याच्याकडे मात्र ह्या लोकांचं लक्ष पोंचत नाहीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याला कारणीभूत झालेल्या लोकसंख्येची वासलात ते कशी काय लावणार आहेत कोणास ठाऊक ? कारण दुष्काळ, सांथीचे रोग व भयंकर असें मृत्यूचें प्रमाण इतक्या गोष्टींचें भरपूर साहाय्य त्यांना लाभत असूनहि येथील भरमसाट लोकसंख्या हटल्याचें प्रत्ययाला येत नाहीं. त्यावर संततिनियमन करावें असें सुचविण्यांत येतें. संततिनियमनाच्या पद्धतीचा व तत्संबंधीं ज्ञानाचा प्रसार करावा या गोष्टीला माझी अनुमति आहे. परंतु ही पद्धति अंमलांत आणावयाची तर जनतेच्या राहणीचें मान बरेंचसें वाढलें पाहिजे, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावयास पाहिजे व सर्व देशभर संततिनियमनाची माहिती करून देणारीं केंद्रें उघडावयास पाहिजेत. सध्याच्या परिस्थितींत संततिनियमनाचा

अवलंब करणें जनतेला शक्य नाहीं. मध्यम वर्गाचा त्या पद्धतीपासून फायदा होईल व माझ्या समजुतीप्रमाणें ह्या पद्धतीचा प्रचार मध्यमवर्गांत हल्लीं वाढत्या प्रमाणांत होतहि आहे.

तथापि लोकसंख्येच्या प्रश्नाचा अधिक बारकाईनें विचार करणें इष्ट आहे. आज सर्व जगांत जो प्रश्न उपस्थित झालेला आहे तो अन्नाच्या अथवा इतर आवश्यक वस्तूंच्या टंचाईसंबंधीं नसून आवश्यक असणाऱ्या गोष्टी विकत घेण्याचें सामर्थ्य गरजू जनतेंत कसें उत्पन्न करावें यासंबंधींचा आहे. केवळ हिंदुस्थानचाच विचार केला तरी येथेंहि अन्नाची कमतरता नाहीं. लोकसंख्येच्या वाढीबरोबर पिकांचीहि वाढ होत आलेली आहे व ती पुढेंहि होत राहील. गेलें एक दशक सोडून दिलें तर हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण बहुतेक पाश्चात्य देशांतील प्रमाणाहून कमीच असल्याचें आढळून येतें. अनेक घटना घडून येत असल्यामुळे पाश्चात्य देशांतील लोकसंख्येची वाढ कमी प्रमाणांत होण्याचा अथवा अजिबात बंद होण्याचाहि संभव आहे, व तसें झाल्यावर भविष्यकाळीं ते देश व हिंदुस्थान यांच्यामध्यें फार मोठा फरक पडत जाईल. परंतु लवकरच हिंदुस्थानांतहि लोकसंख्येच्या वाढीला आळा बसेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

जेव्हां केव्हां हिंदुस्थान स्वतंत्र होईल व आपल्या पसंतीप्रमाणें तो आपला नवा संसार थाटूं लागेल, तेव्हां हिंदुस्थानांतील उत्तमोत्तम स्त्री-पुरुषांचें साहाय्य त्या कामीं मिळणें फारच आवश्यक आहे. उत्तम माणसें नेहमींच दुर्मिळ असतात आणि ब्रिटिशांच्या अमदानींत काम करण्याची संधि दुर्लभ झाल्यामुळें हिंदुस्थानांत तर अशा लोकांची चणचण विशेषच जाणवणार. तेव्हां ज्या खात्यांतून खास यांत्रिक व शास्त्रीय ज्ञानाची आवश्यकता आहे, तेथें परकीयांची मदत घेतल्यावांचून आम्हांला गत्यंतर नाहीं. सध्या इं. सि. सर्व्हिसमध्यें अथवा दुसऱ्या कोणत्याहि सनदी नोकरीमध्यें काम करणाऱ्या बऱ्याचशा माणसांचा नवीन राजवटींत फार उपयोग होईल व त्यांना मोठ्या आनंदानें कामावरहि घेण्यांत येईल ह्यांत शंका नाहीं. परंतु सध्या अधिकारी वर्गांत दिसून येणारी मनोवृत्ति कायम राहिली, तर मात्र राज्यकारभाराची नवी घडी बसविणें शक्य होणार नाहीं. सध्याची हुकुमशाही वृत्ति ही स्वातंत्र्याची वैरी असून ती स्वातंत्र्याचा तरी नायनाट करील किंवा ती स्वतः तरी नष्ट होईल. फॅसिस्ट पद्धतीच्या राज्यव्यवस्थेंत मात्र तिचा सुंदर जम बसेल. असें असल्याकारणानें नव्या शासनसंस्थेच्या बांधकामास सुरुवात करतांना आरंभीं इं. सि. सर्व्हिस वगैरे सारख्या नोकरांचें आपणाला समूळ उच्चाटन करावें लागेल असें मला वाटतें. अर्थात् लायक व तत्पर अशा व्यक्तींना नव्या समाजांत स्थान मिळेल ह्यांत शंका नाहीं. पण नव्या अटी त्यांनीं मान्य केल्या तरच तें घडणार. सध्याचे भरमसाट पगार व भरमसाट भत्ते मिळत राहतील अशी आशा देखील करावयास नको. लठ्ठ पगार मिळतो म्हणून नव्हे, तर काम करण्यांत आनंद व वैभव आहे असें मानून उत्साहानें, दक्षतेनें,

व जळजळीत श्रद्धेनें काम करण्यास पुढें येतील त्यांचीच नेमणूक व्हावयास पाहिजे. नव्या राजवटींत स्वार्थदृष्टि शक्य तितकी कमी करण्याचे प्रयत्न व्हावयास हवेत. परकीय तज्ज्ञांच्या साहाय्याची जरी बरीचशी गरज लागली, तरी मुलकी कामकाज पाहण्याकरितां बाहेरून फारच थोडे लोक आणावे लागतील. कारण मुलकी कारभारासाठीं लायक अशा लोकांची वाण हिंदुस्थानांत भासण्याचें मुळींच कारण नाहीं.

हिंदुस्थानच्या कारभाराच्या बाबतींत प्रागतिकांनीं ब्रिटिश विचारसरणीचा स्वीकार केला आहे हें मीं मागें सांगितलेंच. सनदी नोकऱ्यांचें हिंदीकरण करण्यांत यावें एवढीच त्यांची मागणी आहे. शासनसंस्था व सनदी नोकऱ्या यांचें स्वरूप व मनोवृत्ति आमूलाग्र बदलली पाहिजे असा त्यांचा आग्रह नाहीं. ह्या बाबतींत प्रागतिकांचें म्हणणें केव्हांहि मान्य करून चालणार नाहीं. कारण ब्रिटिश सैन्य व ब्रिटिश सनदी नोकर येथून निघून गेले म्हणून तेवढ्यानें हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार नसून ज्या हुकुमशाही वृत्तींतून सनदी नोकऱ्यांचा उगम झाला, ती हुकुमशाही वृत्ति नष्ट करून सनदी नोकरांना मिळणारे पगार व अधिकार यांची छाटाछाट करणें हिंदी स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे.

संरक्षक खात्याची मिजास तर पुसावयासच नको. त्या खात्यावर आम्ही टीका करतां कामा नये, त्याच्या कारभाराविषयीं चकार ब्र काढता कामा नये. कारण अशा बाबतींत बोलण्याचा आम्हांला अधिकार काय! त्या खात्याला ओझ्यावारी पैसे बिनतक्रार द्यावे एवढेंच आमचें काम. १९३८ सप्टेंबरमध्यें वरिष्ठ कायदेमंडळांत भाषण करीत असतां हिंदुस्थानचे सरसेनापति सर फिलिप चेटवुड यांनीं आपल्या तिखट लष्करी भाषेत हिंदुस्थानांतील राजकारणी लोकांना एक चपराक लगावली व तुम्ही तुमचें संभाळा, माझ्या कामांत ढवळाढवळ करण्याचें तुम्हांला कारण नाहीं असेंहि त्यांनीं बजावून सांगितलें. कोणत्या तरी ठरावावर उपसूचना मांडणाऱ्या एका गृहस्थांना उद्देशून ते म्हणाले कीं "आपलें साम्राज्य तलवारीच्या जोरावर मिळवणाऱ्या व तलवारीच्या जोरावरच त्याचें संरक्षण करणाऱ्या रणधीर व रणनिपुण ब्रिटिश लोकांना खुर्चीवर पडल्या पडल्या टीका करून आपण नवें ज्ञानामृत पाजूं अशी उमेद उपसूचना मांडणारे नामदार व त्यांचे मित्र बाळगतात कीं काय?" अशाच प्रकारचीं आणखीहि कांहीं अमोलिक मुक्ताफळें सेनापतिसाहेबांनीं उधळलीं.

सरसेनापतींबरोबर लष्करी प्रश्नाच्या बाबतींत अनभ्यस्त माणसानें वादविवाद करावा हा उर्मटपणा आहे यांत शंका नाहीं. तरी पण ह्या प्रश्नाच्या बाबतींत चारदोन विचार प्रदर्शित करण्यास कांहीं हरकत नसावी. साम्राज्याचें रक्षण तलवारीनें करणारे जेते व ती तलवार ज्यांच्या शिरावर तळपते आहे ते जित लोक

यांच्यामध्यें हितविरोध असा मुळीं नसेलच असें नाहीं. हिंदी सैन्याचा उपयोग दोन्ही प्रकारें म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या हितासाठीं अथवा हिंदुस्थानच्या हितासाठीं करतां येणें शक्य आहे. आणि तें हितसंबंध परस्परभिन्न किंबहुना परस्परविरोधी सुद्धां नसतील कशावरून ! शिवाय महायुद्धांतील अनुभवानंतर अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं आमच्या कामांत ढवळाढवळ करूं नका ही सेनानायकांची दरडावणी कितपत समर्थनीय ठरेल याबद्दल राजकारणी लोकांना शंका वाटावी. महायुद्धाच्या कालांत सर्व सेनानायकांना जवळ जवळ अनिर्बंध सत्ता मिळालेली होती. तिचा उपयोग ब्रिटिश फ्रेंच, जर्मन, ऑस्ट्रियन, इटालियन, रशियन वगैरे हरएक राष्ट्रांच्या सैन्याचा हरएक प्रकारें चुथडा करून दाखवण्याकडे त्या बहाद्दरांनीं कसा केला तें इतिहासच बोलला आहे. कॅप्टन लिडेल हार्ट नांवाच्या धुरंधर युद्धेतिहासज्ञानें लिहून ठेवलें आहे कीं, “महायुद्ध चालू असतां एकदां तर असा अनवस्थाप्रसंग ओढवला कीं, एकीकडे ब्रिटिश फौज शत्रूंशीं लढत होती, तर दुसरीकडे ब्रिटिश सेनापति आपसांतच झुंजत होते ! राष्ट्र संकटाच्या भोंवऱ्यांत सांपडलें आहे अशा जाणीवेमुळें त्यांच्या विचारांत अथवा प्रयत्नांत एकजूट झालेली दिसून आली नाहीं. थोर लोक सामान्य जनांहून कांहीं निराळ्या रंगाचे बनवलेले असतात ही मूर्तिपूजकांची श्रद्धा महायुद्धामुळें लयाला गेली आहे.”

राजकारण-कोविदांचे मेरुमणि लॉइड जॉर्ज यांनीं आपल्या ‘ युद्धाच्या आठवणी ’ या ग्रंथांत महायुद्धकालांतील सेनानींच्या व दर्यासारंगांच्या घोडचुकांचें भयंकर वर्णन केलेलें आहे. आपल्या घोडचुकांमुळें त्यांनीं लक्षावधि लोकांच्या आहुति मृत्युकुंडांत टाकल्या. दोस्त राष्ट्रांनीं युद्ध जिंकलें खरें; पण त्याला शत्रुपक्षाच्या कल्पनातीत चुकाच बऱ्याच अशीं कारणीभूत झाल्या. लॉर्ड जेलिकोच्या टाळक्यांत ठोकून ठोकून कल्पना घुसडण्यासाठीं आपणाला किती जालीम उपाय योजावे लागले त्याचें स्पष्टीकरण लॉइड जॉर्जनें करून ठेवलें आहे. फ्रेंच सेनापति मार्शल जॉफ्रे यांच्यासंबंधीं ते म्हणतात कीं मनांत धीर उत्पन्न करणारी निश्चयी मुद्रा हाच त्यांचा सर्वांत मोठा गुण. “ संकटग्रस्त लोक साहजिकच अशा माणसाकडे धांव घेतात. त्या बिचाऱ्या भोळ्या जीवांना वाटतें कीं बुद्धीचें स्थान डोक्यांत नसून माणसाच्या हनुवटींतच आहे ”

तथापि लॉइड जॉर्जच्या टीकेची मुख्य शिस्त इंग्लंडचा सर सेनापति फील्ड-मार्शल हेग यांच्यावरच असल्याचें दिसून येईल. लॉर्ड हेगचा स्वभाव विलक्षण आढ्यतेखोर व हेकट असल्याकारणानें अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी तो खुद्द ब्रिटिश प्रधान-मंडळापासून दडवून ठेवीत असे. अपयश जबडा वासून पुढें उभें असतांहि केवळ हट्टीपणामुळें कित्येक महिनेपर्यंत त्यानें आपली चढाई पॅशेंडेल आणि कांब्राईच्या दल-दलींतून सुरूच ठेवली. आणि ती कोठपर्यंत ? तर सतरा हजार अव्वल सैन्याधिकारी मृत्युमुखीं पडून करोल असे चार लाख ब्रिटिश सैनिक गारद होईपर्यंत ! “ अज्ञात

वीरांचें " यशोगान आतां चालू आहे हें ठीकच आहे. ते जिवंत होते, तेव्हां मात्र त्यांचें रक्त पाण्याच्या मोलानें सांडत होतें आणि हाल कुत्रा खात नव्हता.

इतर लोकांप्रमाणें राजकारणी पुरुषहि चुका करतात. परंतु लोकशाहींतील राजकारणी पुरुषांना लोकांचें धोरण आणि प्रसंगांचें वळण पाहून बेत आंखावे लागतात व ते बहुधा आपल्या चुका लक्षांत घेऊन त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्नहि करतात. पण सैनिक निराळ्याच वातावरणांत वाढलेला असतो. तेथें सारें हुकुमाचें राज्य. तेथें टीकेची बातच नाहीं. साहजिकच दुसऱ्याचा मसलतीचा शब्द त्याला पसंत पडत नाहीं. तेव्हां चुकेल तेथें तो सपशेल चुकेल, आणि तीच चूक पुनः पुनः करीत राहील. डोक्यापेक्षां हनुवटी खंबीर आहे कीं नाहीं, मुद्रा करारी आहे कीं नाहीं इकडेच त्याचें लक्ष लागलेलें असतें. हिंदुस्थानांतील मुलकी अधिकारीसुद्धां अर्धवट लष्करी मजावाचे बनले आहेत. त्यांच्या ठिकाणीं सैन्याधिकाऱ्यांप्रमाणेंच हुकुमबाजी आणि हेकेखोरपणा आलेला आहे. तेव्हां सैन्याधिकाऱ्यांचे करारी मुद्रा वगैरे इतर सर्व गुण त्यांच्याहि ठिकाणीं निर्माण झाले आहेत हे सांगणे नकोच.

असें सांगण्यांत येते कीं सैन्याचें हिंदीकरण झपाट्यानें सुरू आहे व आणखी तीस एक वर्षांनतर एकादा हिंदी जनरल सुद्धां सद्भाग्य असले तर पाहावयास सांपडेल, आणि सुमारें शंभर वर्षांच्या आंतबाहेर सैन्याचें हिंदीकरण बरेंचसें झालेले दिसेल. आपत्काळीं साऱ्या एक दोन वर्षांच्या अवधींत लाखों सैनिक इंग्लंडला कसे काय तयार करता आले हें एक मोठें गूढच आहे. आमच्याकडचे भीष्माचार्य इंग्लंडांत असते तर इंग्लंडला एवढी बिसाडघई त्यांनीं खात्रीनेंच करू दिली नसती. आणि आमच्या भीष्माचार्यांची संपूर्ण शिक्षित फौज तयार होण्याच्या सितीं तर आर्ता महायुद्ध कदाचित् सरूनहि गेले असतें. शालिवाहनाच्या सैन्याप्रमाणें जणूं कांहीं चिखलांतून वर आवळलेल्या रशियन सैन्यानें अनेक शत्रूंचा धुव्वा उडवावा आणि आज जगांतील अत्युत्कृष्ट सैन्याच्या पंक्तीला बेऊन बसावें ही घटना देखील विस्मयजनक नाहीं का? हिंदुस्थानांतल्या सारखे " रणशूर व रणनिपुण " सेनानी रशियांत नसतील, दुसरें काय?

डेहराडूनला तर आतां आपल्यासाठीं लष्करी विद्यालयच निघालें आहे. तेथें लष्करी अधिकारी शिकून तयार होत आहेत कवाइतीच्या कामांत ते अगदीं तरबेज आहेत असें म्हणतात. लष्करी अधिकाऱ्यांचें काम ते योग्य रीतीनें बजावतील यांत शंकाच नाहीं. यांत्रिक शिक्षणाची जोड नसेल तर या हडेलहप्पी शिक्षणाचा उपयोग काय होणार असा मात्र मनाला विचार पडतो. हवाई युद्ध, धुराचे बाँब, टँक व प्रबळ तोफखाना यांच्या जमान्यांत शिपायांच्या तुकड्यांचा व बंदुकांचा उपयोग कितीसा होणार?

मग हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजवटीच्या इतिहासाचें स्वरूप कोणतें? त्यांत आढळून येणाऱ्या दोषांना जर आपलीच नालायकी कारणीभूत झालेली आहे, तर आपणाला कुरकुर करण्याचा काय अधिकार? बदलत्या कालप्रवाहापासून बाजूला

सरकून आपण होऊनच जर कडेच्या डबक्यांत उतरलों, प्राप्तस्थितींतच दंग होऊन राहिलों, आणि डोळे मिटून घेऊन आजूबाजूला कसले वारे वाहत आहेत तें पाहावयाचेंच नाहीं असा घातकी निर्धार केला, तर आपल्या पायांवर आपणच धोंडा पाडून घेतल्याप्रमाणें होईल. जगांत उचंबळणाऱ्या एका नव्या ऊर्मीच्या मस्तकावर आरूढ होऊन ब्रिटिश लोक आपल्या देशांत येऊन पोहोंचले. ज्या प्रबळ अशा ऐतिहासिक शक्तीचे ते पुरःसर झाले होते, त्या शक्तीच्या विचारसामर्थ्याची कल्पना त्यांनाहि आली नव्हती. पाळामुळासकट उपटून दूर भिरकावून देणाऱ्या झंझावाताविरुद्ध अथवा अंगांत हुडहुडी भरवणाऱ्या थंड वाऱ्याविरुद्ध आपण थोडीच कोणाकडे फिर्याद नेतों ? गतेतिहासांचीं थडगीं खोदून अश्रू ढाळीत न बसतां भविष्याकडे नजर देऊन पाऊल उचलूं या. विज्ञानाचें वायन ब्रिटिशांनीं आपणाला दिलें याबद्दल आपण त्यांचे आभारी असलें पाहिजे. तथापि जीर्णमतवादी, परागतिक, जातिनिष्ठ आणि संधिसाधु मनोवृत्तींना उत्तेजन देऊन येथें सवतें सुभे निर्माण करण्याचे ब्रिटिश सरकारने जे प्रयत्न केले ते विसरून जाणें अथवा त्यांच्याकडे शांत मनानें पाहत बसणेंहि शक्य नाहीं. परंतु देवकळा प्राप्त होण्यासाठीं अशा तऱ्हेनें टाकीचे घाव अंगावर घेणें हेंहि कदाचित् आवश्यक असेल. आणि नवजन्म प्राप्त होण्यापूर्वी अमंगलांचें क्षालन करणाऱ्या, दुरितांचें भस्म करणाऱ्या व दुर्बळ मनाला सबळ करणाऱ्या अग्निदिव्यांतून या देशाला कदाचित् वारंवार जावें लागणारहि असेल.

५५

# रजिस्टर विवाह आणि लिपीचा प्रश्न

१९३३ सप्टेंबरमध्यें पुण्या-मुंबईकडे एक आठवडा राहून मी लखनौला परत फिरलों. आई अद्यापि रुग्णालयांतच असून तिची प्रकृति अगदीं मंद गतीनें सुधारत होती. कमलासुद्धां लखनौलाच येऊन राहिली होती. मी देखील दोन तीन आठवडे लखनौलाच राहिलों. कारण अलाहाबादपेक्षां तेथेंच मला अधिक स्वास्थ्य लाभे. तेथें असतांना रोजचें मुख्य काम म्हणजे रोज दोन वेळां रुग्णालयांत खेप टाकणें. रिकाम्या वेळांत मीं वृत्तपत्रांसाठीं कांहीं लेख लिहिले. सर्व देशभर त्यांना प्रसिद्धि मिळाली. "हिंदुस्थानचें भवितव्य" या नांवाची एक लेखमाला मीं लिहिली, त्यांत हिंदुस्थानांतील परिस्थितीच्या जागतिक उलाढालीशीं असणाऱ्या संबंधांची मीं पाहणी केली होती. त्या लेखमालेनें बऱ्याच लोकांचें लक्ष वेधून घेतलें. त्यांतील लेखांचीं भाषांतरें तेहरान आणि काबूल येथें पर्शियन भाषेंतहि छापण्यांत आलीं असें मला नंतर समजलें. आधुनिक जगाची ओळख असणाऱ्या माणसाला नवीन वाटेल असें कांहींच त्यामध्यें नाहीं. पण आम्ही घरच्या भानगडींतच इतके चूर होतों कीं बाहेर तोंड काढून पाहण्यास आम्हांला फुरसतच मिळाली नव्हती. पण माझ्या लेखांचें जें स्वागत करण्यांत आलें, त्यावरून लोकांची दृष्टि व्यापक होत चालली होती असें दिसून आलें.

आईला रुग्णालयांत पडून राहण्याचा अगदीं कंटाळा आला होता, म्हणून तिला परत अलाहाबादेस न्यावें असें आम्हीं ठरवलें. माझी बहीण कृष्णा हिचा वाङ्निश्चय नुकताच ठरला होता हेंहि अलाहाबादेस जाण्याचें एक कारण होतेंच. इच्छा अशी कीं माझी तुरुंगांत रवानगी होण्याच्या आधीं शक्यतों लवकर विवाह उरकून घ्यावा. कायदेभंग अद्यापि सुरू असल्यामुळे मला केव्हां उचलण्यांत येईल त्याचा मुळींच नेम नव्हता.

अलाहाबाद मुक्कामीं ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत विवाहाचा दिवस निश्चित केला. विवाह रजिस्टर पद्धतीनें करावयाचा ठरला म्हणून मला आनंद झाला. पण खरें म्हणजे आम्हांला दुसरा मार्गच मोकळा नव्हता; कारण वधू ब्राह्मण आणि वर अब्राह्मण. आंतरजातीय विवाहांचा प्रसार व्हावा असें माझें मत आहे. पण त्या बाबतींत मतप्रचार होवो अथवा न होवो, सर्व धर्मांच्या लोकांना लागू पडणारा असा एकादा अनुज्ञापक कायदा असणें मात्र जरूरीचें वाटतें. त्या कायद्यान्वयें

विवाह करणारांना आम्ही कोणताहि धर्म मानीत नाहीं असा प्रतिज्ञालेख लिहून देण्याचेंहि कारण पडूं नये.

माझ्या बहिणीच्या विवाहाचा जरादेखील गाजावाजा करण्यांत आला नाहीं. समारंभाचा बेत अगदीं साधा ठेवण्यांत आला होता. हिंदुस्थानांतील विवाहांतून दिसून येणारा गाजावाजा मला मुळींच आवडत नाहीं. शिवाय आई आजारी, बाहेर सत्याग्रहाचें वातावरण, आणि अनेक मित्रसुहृद तुरुंगांत, अशा स्थितींत भपका करणें अगदींच अप्रशस्त ठरलें असतें. कांहीं आप्त आणि स्थानिक मित्रमंडळी यांनाच फक्त निमंत्रणें गेलीं. पण त्यामुळें वडिलांच्या कांहीं जुन्या स्नेह्यांना फार राग आला. त्यांची अशी समजूत झाली कीं, मीं त्यांना मुद्दामच वगळलें.

विवाहाच्या छोट्या निमंत्रण-पत्रिका हिंदुस्थानी भाषेंत छापून घेतल्या होत्या. पण लिपि मात्र रोमन होती. ही एक नवलपरीचीच गोष्ट झाली. कारण अशा समारंभाच्या निमंत्रण-पत्रिका बहुशः नागरी अथवा पर्शियन लिपींत छापण्यांत येतात. हिंदी भाषा रोमन लिपींत लिहिण्याची पद्धति सैन्यांत व मिशनच्या संस्थांमधून तेवढी प्रचलित आहे. मीं हा प्रयोग म्हणून करून पाहिला. लोक काय म्हणतात तेंहि पाहावयाचें माझ्या मनांत होतेंच. अनुकूल-प्रतिकूल दोन्ही प्रकारचीं मतें मला ऐकावयास सांपडलीं. पण बहुसंख्य लोक प्रतिकूलच दिसले. माझी कल्पना गांधीजींना पसंत पडली नाहीं.

मी कांहीं रोमन लिपीचा भक्त बनलों नव्हतों. पण तुर्कस्तान व मध्य आशिया या प्रदेशांत तिला मिळालेल्या यशामुळें माझें चित्त त्या लिपीकडे वेधून राहिलें होतें. तिच्या स्वीकाराच्या बाजूनें जे मुद्दे मांडण्यांत येत तेहि मला विचार करण्यालायक वाटले. तथापि माझी खात्री पटलेली नव्हती, आणि खात्री पटली असती तरीहि सध्यांच्या काळीं हिंदुस्थानांत ती लिपि स्वीकारण्यांत येईल असा काडीमात्र संभव दिसत नव्हता. राष्ट्रीय, सनातनी, हिंदु, मुसलमान, जुन्या व नव्या सगळ्याच गटांनीं ह्या उपक्रमाचा जोरानें प्रतिकार केला असता; आणि हा विरोध केवळ भावनावशतेमुळें झाला असता असेंहि मला म्हणावयाचें नाहीं. संपन्न परंपरेच्या कोणत्याहि भाषेची लिपि बदलणें म्हणजे मर्मस्थानची शस्त्रक्रिया करण्याप्रमाणें आहे. कारण वाङ्मयांत लिपीला अत्यंत जिव्हाळ्याचें स्थान प्राप्त झालेलें असतें: लिपि बदलली कीं शब्दांचें निराळेंच स्वरूप आपल्यापुढें उभें राहून त्यांतून निराळ्याच ध्वनींची व कल्पनांची निर्मिति होऊं लागते. अन्य लिपीमुळें नव्या व जुन्या वाङ्मयामध्यें दुर्लंध्य असा तट उभारल्याप्रमाणें होऊन एखाद्या परकीय व मृत भाषेप्रमाणें जुन्या वाङ्मयाची अवस्था होईल. ज्या देशांत जतन करण्याजोगें जुनें वाङ्मयच नसेल, तेथें अन्य लिपीचा प्रयोग करून पाहण्यास हरकत नाहीं. पण हिंदुस्थानांत असला प्रयोग यशस्वी होईल असा संभव दिसत नाहीं. कारण आमचें जुनें वाङ्मय समृद्ध व मौल्यवान् आहे, इतकेंच नव्हे तर आमच्या इतिहासाशीं व

विचारांशीं तें निगडित झालेलें असून देशांतील असंख्य जनतेच्या रोमरोमीं तें भिनून गेलेलें आहे. अशा परिस्थितींत जुनी लिपि काढून टाकणें हें अंगावरील कातडी सोलून काढण्यासारखें मोठें क्रूर कर्म होईल. नव्या लिपीमुळें देशांतील शैक्षणिक प्रगतीला सुद्धां पायबंद बसण्याचा संभव आहे.

पण हिंदुस्थानांत ह्या प्रश्नाला आतां केवळ शास्त्रीय स्वरूप राहिलेलें नाहीं. हिंदी, बंगाली, मराठी व गुजराथी ह्या संस्कृतच्या पोटीं जन्मास आलेल्या भाषा-बहिणींनीं सुधारणा म्हणून एक लिपि स्वीकारणें आवश्यक झालें आहे. ह्या निरनिराळ्या भाषांच्या विद्यमान् लिपीदेखील एकाच लिपीपासून निर्माण झालेल्या असून त्यांच्यामध्यें फारसे फरक नाहींत. कोणत्या तरी एका लिपीचा स्वीकार केला म्हणजे ह्या भाषा अधिकच जवळ येतील.

हिंदुस्थानांत शेंकडों भाषा प्रचलित आहेत अशी एक गप्प आमच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं सर्वत्र फैलावून दिली आहे. ह्या शेंकडों भाषांचें एकच गांठोडें बांधून इंग्रज लोक त्या भाषांना 'व्हर्न्याक्युलर' भाषा म्हणजे गुलामांच्या भाषा (व्हर्ना म्हणजे गृहोत्पन्न गुलाम ह्या लॅटिन शब्दावरून.) असें संबोधतात. शब्दांतील खोच लक्षांत न आल्यामुळें आमच्यापैकीं पुष्कळ लोकांनीं हेंच नामकरण चालू ठेविलें आहे. सारा जन्मच्या जन्म हिंदुस्थानांत घालवून येथील एकहि भाषा चांगली शिकण्याची तसदी इंग्रज माणसानें घेऊं नये ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. खानसमे आणि अय्या यांच्या मदतीनें ते स्वतःची अशी निराळीच धेडगुजरी हिंदुस्तानी तयार करतात आणि तीच खरी हिंदुस्तानी भाषा असें समजून वागत असतात! अस्सल हिंदुस्तानी भाषा बोलावी तर "साहेब लोकांना" अर्थ कळणार नाहीं ह्या धास्तीनें घरांतील चाकर माणसें सुद्धां त्यांच्याशीं धेडगुजरी भाषेंतच बोलतात. हिंदुस्तानी व इतर देशी भाषा यांच्या सग्रहीं उच्च दर्जाचें विपुल वाङ्मय आहे ह्या गोष्टीची साहेब लोकांना अजिबात दखल नसते.

हिंदुस्थानांत दोनतीनशें भाषा आहेत असें खानेसुमारीच्या आंकड्यांवरून सिद्ध होत असले, तर जर्मनीमध्येंहि पन्नास साठ भाषा प्रचलित आहेत असें खाने-सुमारीच्या आंकड्यांवरून दाखवतां येईल. परंतु त्यांच्या आधारें जर्मनींत विषमता अथवा बेकी माजलेली आहे असें सिद्ध करण्याचा कोणीं प्रयत्न केल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. खरी स्थिति अशी आहे कीं, फक्त एक हजार लोकांपुरती चालू असणारी बारीकसारीक बोली सुद्धां खानेसुमारींत नमूद झालेली असते व शास्त्राच्या सोयीसाठीं बोल-भाषांना देखील निरनिराळ्या स्वतंत्र भाषा समजण्यांत येतें. हिंदुस्थानचा विस्तार लक्षांत घेतला तर येथें फारच थोड्या भाषा प्रचलित आहेत असें म्हटलें पाहिजे. हिंदुस्तानी, (तींत दोन प्रकार: हिंदी व ऊर्दू), बंगाली, गुजराथी, मराठी, तामिल, तेलगू, मल्याळम् आणि कानडी या हिंदुस्थानच्या (ब्रह्मदेश वगळून) प्रमुख भाषा होत. त्यांत आसामी, ओरिया, सिंधी, पुश्तु व पंजाबी इतक्या भाषांच

समावेश केला म्हणजे जंगली जाती वगळून बाकीच्या सर्व लोकांच्या भाषांची गणति झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांपैकीं संस्कृतोद्भव भाषांनीं हिंदुस्थानांतील सबंध उत्तर, मध्य व पश्चिम भाग व्यापून टाकलेला आहे. दक्षिणेकडच्या द्राविड भाषा भिन्न असल्या, तरी त्यांच्यावर संस्कृतचा पुष्कळच परिणाम झालेला असून बरेच संस्कृत शब्द तिकडेहि प्रचलित आहेत. ह्या आठ प्रमुख भाषांमधून पुरातन काळांत मौल्यवान् असें वाङ्मय निर्माण झाल्याचें आढळून येते व त्यांचा प्रचार आजच्या घटकेला सुद्धां विस्तृत पण निश्चित अशा प्रदेशांत चालू आहे. पांच कोटी लोक बंगाली भाषा बोलतात. हिंदुस्तानींतले निरनिराळे भेद जमेस धरले, तर ती भाषा चौदा कोटी लोकांच्या तोंडीं असून देशांतील असंख्य लोकांना ती सामान्यतः समजते. अशा भाषेचा वाटेल तेवढा विस्तार होणें शक्य आहे. संस्कृत व पर्शियन भाषांचीं भांडारें तिच्या हाताशीं असल्याकारणानें हवीं तेवढीं शब्दरत्नें हिंदुस्थानीला वेचून घेतां येतील. इंग्रजी भाषेतूनहि तिनें कांहीं शब्द अलीकडे घेतले आहेत. द्राविड हिंदुस्थान हा एकच भाग असा आहे कीं जेथें हिंदुस्तानी ही परक्या भाषेप्रमाणें वाटावी. परंतु हिंदुस्तानी शिकण्यासाठीं तेथील रहिवासी भगीरथ प्रयत्न करीत आहेत. गेल्या चौदा वर्षांत एकट्या मद्रास इलाख्यांत ५,५०,००,० लोकांनीं हिंदी भाषा शिकून घेतली ही खरोखरी कौतुकास्पद गोष्ट आहे.

हिंदुस्तानी हीच राष्ट्रभाषा बनणार ह्याबद्दल मला बिलकुल संदेह नाहीं. सर्वसाधारणपणें आजहि राष्ट्रभाषेचें स्वरूप तिला प्राप्त झालेलें आहे. लिपि नागरी असावी कीं पर्शियन असल्या फुकट वादामुळें हिंदुस्तानीची प्रगति थांबून राहिली आहे आणि शक्य तितके अधिक संस्कृत किंवा पर्शियन शब्द हिंदुस्तानी भाषेमध्यें घुसडण्याच्या प्रयत्नामुळें देखील तोच कुपरिणाम घडून येत आहे. लिपीच्या भांडणांतून सुटण्याचा एकच मार्ग म्हणजे अधिकृत रीत्या दोन्ही लिपींना मान्यता देऊन त्यांपैकीं कोणत्याहि लिपींतून लिहिण्याची मुभा लोकांना ठेवावी. संस्कृत व पर्शियन भाषाभिमान्यांचे आत्यंतिक प्रयत्न खोडून काढून सध्या प्रचलित असलेल्या भाषेच्या पद्धतीवर एक मध्यम भाषा निर्माण करण्याच्या उद्योगाला आपण नेटानें लागलें पाहिजे. जनतेला शिक्षण मिळालें कीं अशी एक मध्यम भाषा आपोआप तयार होईल. सध्या मात्र वाङ्मयाभिरुचि व वाङ्मयविलास यांचे ज्यांना नियंते समजण्यांत येतें ते अल्पसंख्य मध्यमवर्गीय गट मनानें कमालीचे संकुचित व स्थितिप्रिय असे बनले आहेत. निःसत्त्व बनलेल्या जुनाट वाङ्मयप्रकारांनाच ते बिलगून राहत असतात. जनतेशीं अथवा जागतिक वाङ्मयाशीं त्यांचा फार थोडाच संबंध येतो.

हिंदुस्तानीची वाढ व विस्तार होऊं लागला तरी प्रांतिक भाषांशीं तिचा विरोध येण्याचें कारण नाहीं व तसा विरोध येणारहि नाहीं. प्रांतिक भाषांपैकीं कांहीं भाषा हिंदुस्तानीपेक्षां अधिक जागृत व बौद्धिक दृष्ट्या तल्लख अशा असल्यामुळें शिक्षणाच्या व इतर कामीं त्या त्या प्रांतांतून त्यांचाच उपयोग व्हावयास हवा.

त्यांच्या द्वारांच शिक्षण व संस्कृति यांचा प्रचार सामान्य लोकांत अधिक झपाट्यानें करतां येईल.

इंग्लिश हीच हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होईल अशीहि कांही लोकांची कल्पना दिसते. वरिष्ठ वर्गांतील मूठभर बुद्धिजीवी लोकांची गोष्ट सोडून दिली, तर ही कल्पना केवळ स्वप्नसृष्टींतील ठरणार असें म्हटलें पाहिजे. जनतेच्या शिक्षणाचा व संस्कृतीचा प्रश्न इंग्रजीसारख्या परकी भाषेनें सुटणें शक्य नाहीं. सध्यां आहे तोच क्रम वाढत जाऊन यांत्रिक, वैज्ञानिक व व्यापारी व्यवहारांच्या बाबतींत आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांत इंग्रजी शब्द वापरले जाण्याचा संभव आहे. तसेच जागतिक विचारांशीं व व्यवहारांशीं आपले संबंध कायम राखण्यासाठीं आपल्यापैकीं पुष्कळ जणांना परकी भाषांचा अभ्यासहि करावा लागेल. इंग्रजीखेरीज फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश व इटालियन वगैरे भाषांचा अभ्यास करण्याच्या कामीं विश्वविद्यालयांनीं विद्यार्थ्यांना उत्तेजन दिलें पाहिजे. इंग्रजीकडे दुर्लक्ष करावें असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. परंतु जागतिक घडामोडींविषयीं समतोल निदान आपणांस करतां यावें अशी इच्छा असेल, तर केवळ इंग्रजी चष्मा नाकावर बाळगून चालणार नाहीं. एकच एक विचारसरणी व एकच एक दृष्टि इतके दिवस स्वीकारल्यामुळें आपल्या विचारशक्तींतील समतोलपणा आधींच नष्ट झालेला आहे. केवळ ब्रिटिश विचारसरणी आपणावर लादली गेल्यामुळें आपल्या हिंदुस्थानविषयक दृष्टिकोणांत सुद्धां केवढा संकुचितपणा निर्माण झाला आहे ह्याची पूर्ण कल्पना एखाद्या आत्यंतिक राष्ट्रवाद्याला सुद्धां आलेली असेल कीं नाहीं कोणास ठाऊक !

दुसऱ्या परराष्ट्रीय भाषांना आपण कितीहि उत्तेजन दिलें, तरी आपला इतर जगाशीं होणारा व्यवहार मुख्यतः इंग्रजींतून होणार हें निश्चित आणि ही गोष्ट योग्यच आहे. गेल्या कित्येक पिढ्या इंग्रजी शिकण्याचा खटाटोप आपण चालू ठेवला असून त्यांत आपणाला बरेंचसें यशहि प्राप्त झालेलें आहे. तेव्हां सर्व पाटी पुनः चक्क पुसून आतांपर्यंत मिळालेल्या शिक्षणाचा फायदा घेण्याचें नाकारणें वेडगळपणाचें होईल. शिवाय इंग्रजी भाषेचा विस्तार व महत्त्व वाढत असून इतर भाषांवर ती मात करीत चालली आहे ह्यांत शंकाच नाहीं. इंग्रजी भाषा हीच आंतरराष्ट्रीय व्यवहाराचें व नभोवाणीच्या प्रसाराचें माध्यम होणार असा संभव दिसतो. यासाठीं इंग्रजी भाषेचा प्रचार आपणाला केलाच पाहिजे. शक्य तितक्या उत्तम प्रकारें त्या भाषेचें शिक्षण घ्यावें हेंहि योग्यच होय. तथापि त्यांतील खांचाखोंचा समजून घेण्यासाठीं हल्लीं पुष्कळ लोक करतात त्याप्रमाणें आपला पुष्कळसा वेळ व उत्साह खर्च करणें योग्य आहे असें मात्र मला वाटत नाहीं. कांहीं व्यक्तींनीं वाटल्यास असे प्रयत्न करावे; परंतु बहुजनसमाजापुढे अशा प्रकारचा आदर्श ठेवला तर लोकांच्या मानेवर अनावश्यक बोजा लादून त्यांची इतर दिशांनीं होणारी प्रगति कुंठित केल्याप्रमाणें होईल.

" बेसिक इंग्लिश " ( सुलभ इंग्रजी ) संबंधीं मला अलीकडे विशेष आवड उत्पन्न झालेली आहे. ह्या सुलभ इंग्रजी भाषापद्धतीची भविष्यकाळांत फारच भरभराट होईल असें मला वाटतें. राजमान्य इंग्रजीच्या ऐवजीं ह्या भाषेचा मोठ्या प्रमाणांत प्रसार करण्यांत यावा असें माझें मत आहे.

माझ्या मतें इंग्रजी व इतर परकी भाषांतील पुष्कळ शब्द हिंदुस्तानीनें दत्तक घेतले पाहिजेत. आपल्याजवळ आधुनिक परिभाषा नसल्यामुळे असें करणें जरूर आहे. संस्कृत, पर्शियन, अथवा अरबी भाषेच्या साहाय्यनें नवे व कठीण शब्द बनवीत बसण्यापेक्षां रुळलेले परकी शब्द घेणेंच इष्ट आहे. यावनी शब्दांविरुद्ध शुद्धिवाले लोक गिल्ला करतील, परंतु त्यांचें हें धोरण चुकीचें आहे. कारण भाषा लवचिक व इतर भाषांतील शब्द व कल्पना आत्मसात करण्यास समर्थ अशी झाल्याशिवाय ती समृद्ध होणें शक्य नाहीं.

माझ्या बहिणीच्या विवाहानंतर माझे स्नेही शिवप्रसाद गुप्त यांना भेटण्यासाठीं मी बनारसला गेलों. लखनौ-तुरुंगांत झालेल्या पक्षघाताच्या विकारांतून ते अद्यापि साफ बरे झाले नव्हते. बनारस येथें असतांना एका हिंदी वाङ्मय मंडळातर्फे मला मानपत्र अर्पण करण्यांत आलें. त्या वेळीं मंडळाच्या सभासदांशीं मोठी मनोरंजक अशी चर्चा करावयास मला मिळाली. हिंदीमध्यें नित्य आढळून येणारी क्लिष्ट व अलंकारिक भाषा हाच माझ्या टीकेचा विषय होता. त्यातल्या पुष्कळशा बिकट संस्कृत शब्दांमुळें ती कृत्रिम आणि जुनाट अशी दिसते. निवडक लोकांना अनुलक्षून लिहिण्यांत येणारी ही अलंकारप्रचुर व दरबारी भाषा लिहिण्याचें सोडून जनतेला समजेल अशा भाषेत व जनतेसाठीं लेखन करण्याचा हिंदी साहित्यिकांनीं बुद्धिपुरःसर प्रयत्न करावा असें मीं सुचविलें. जनतेशीं संबंध आला म्हणजे भाषेत नवीन चैतन्य व नवीन तळमळ दिसून येऊं लागेल आणि जनतेत उसळणाऱ्या उत्साहाचे खुद्द लेखकांहि अंशभागी होऊन त्यांना अधिक नेटानें काम करतां येईल. पाश्चात्य विचार व वाङ्मय यांच्याकडे लक्ष पुरवल्यास हिंदी साहित्यिकांचा बराच फायदा होईल. त्यासाठीं युरोपीय भाषांतील विदग्ध वाङ्मयाचीं व आधुनिक वाङ्मयाचीं भाषान्तरें हिंदीमध्यें होणें आवश्यक आहे, वगैरे सूचना मीं सदस्यांपुढें मांडल्या; आणि या बाबतींत बंगाली, गुजराथी व मराठी भाषा अधिक प्रगतिपर आहेत व अलीकडच्या काळांत हिंदीपेक्षां बंगालीमध्यें अधिक स्वतंत्र वाङ्मयरचना झालेली आहे असेंहि मत मीं व्यक्त केलें.

ही सर्व चर्चा खेळीमेळीची असल्यामुळे माझ्या सूचना वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतील अशी माझी कल्पना नव्हती; पण हजर असलेल्या कोणा एका इसमानें हिंदी वृत्तपत्रांना चर्चेची माहिती पुरवण्याची कामगिरी बजाविलीच.

आणि मग बंगाली, गुजराथी व मराठी या भाषांशीं हिंदीची तुलना करून तिच्यातील वैगुण्य दाखविण्याचे धारिष्ट्य केल्याबद्दल हिंदी वृत्तपत्रकारांनीं माझ्या-

विरुद्ध मोहोळच उठविलें, व मी ज्ञानलवदुर्विदग्ध आहें वगैरे अनेक कडक शब्दांनीं माझी संभावना करण्यांत आली. हेतु हा कीं, मीं पुनः डोकें वर काढूं नये. पण ह्या वादविवादाकडे लक्ष द्यावयास मला सवडच नव्हती. मला मागाहून कळलें कीं, तुरुंगांत माझी पुनः रवानगी होईपर्यंत हा मारा तसाच चालू ठेवण्यांत आला होता.

त्या प्रसंगापासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे. हिंदी साहित्यिक व संपादक किती हळवे असतात तें त्यावरून स्पष्ट झालें. त्यांचें भलें चिंतणाऱ्या माणसानें केलेली एवढी तेवढी टीका देखील त्यांना सहन झालेली नाहीं. पण त्यामुळें त्यांच्या अंगच्या हीन मनोगतांचें चांगलेंच प्रदर्शन झालें. आत्मसंशोधन ही चीज त्यांना ठाऊकच नसावी. तेव्हांच्या हिंदी वाङ्मयांतील टीकेचा दर्जाहि अगदीं सामान्य असे. हिंदी साहित्यिकांची दृष्टि संकुचित व वृत्ति कूपमंडूकी थाटाची होती. बहुजन-समाज व त्याचे हितसंबंध यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्या भोंवतालच्या दहावीस माणसांसाठींच जणूं कांहीं ते लेखणी चालवीत असत. क्षेत्र इतकें विस्तीर्ण व इतकें आकर्षक असतां त्यांनीं आपलेंच वाडगें पेरीत बसण्याचा हट्ट धरावा ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे असें मला वाटतें.

हिंदी वाङ्मयाचा गतेतिहास उदात्त आहे हें खरें, परंतु वडिलांची शालजोडी पांघरून सदासर्वकाळ कसा निभाव लागणार? हिंदी साहित्याला उज्ज्वल भविष्यकाळ प्राप्त होईल व हिंदी वृत्तपत्रें म्हणजे देशांतील एक अत्यंत प्रबल अशी शक्ति बनतील याविषयीं मला तिळमात्र शंका वाटत नाहीं. तथापि हिंदी वाङ्मय काय किंवा वृत्तपत्रें काय, जोंपर्यंत संकुचित संकेतांच्या बेड्या तोडून जनतेला सामोरीं जाणार नाहींत, तोंपर्यंत त्यांची प्रगति होणें शक्य नाहीं.

५६

# जातिनिष्ठा आणि परागति

माझ्या बहिणीचा विवाह झाला त्याच सुमाराला विठ्ठलभाई पटेल युरोपमध्यें निधन पावल्याची बातमी येऊन पोहोंचली. बरेच दिवस ते दुखणाईत होते. आजारी पडल्यामुळेंच त्यांची तुरुंगांतून मुक्तता करण्यांत आली होती. त्यांच्या निधनाची बातमी वाचून मला अतिशय खेद झाला. लढाईच्या ऐन प्रसंगीं मृत्यु आमचे कसलेले पुढारी एकामागून एक ओढून नेत आहे अशा निराशेच्या विचारानें मन व्याप्त होऊन गेलें. विठ्ठलभाईंवर स्तुतीचा वर्षाव झाला. परंतु बहुतेक ठिकाणीं त्यांचें कायदेमंडळांतील कर्तृत्व व मध्यवर्ति कायदेमंडळाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं मिळविलेलें यश यांवर भर देण्यांत येत होता. गोष्टी सत्यच होत्या. परंतु त्यांचा जागजागीं पुनरुच्चार होत असलेला पाहून मला थोडी चीडच आली. हिंदुस्थानांत कायदेमंडळांत चमकतील व कायदेमंडळाच्या अध्यक्षस्थानीं बसून उत्कृष्ट कामगिरी बजावतील असे लोक थोडेथोडके का सांपडले असते? असलीं कामें करतां यावीं एवढ्याचकरतां तर आम्हांला कायदा पढविण्यांत आलेला आहे. केवळ कसलेल्या कायदेपंडितापेक्षां विठ्ठलभाईंची योग्यता फार मोठी होती; स्वातंत्र्ययुद्धांतील ते एक दुर्दमनीय आणि महान असे झुंझार होते.

मी नोव्हेंबरमध्यें बनारसला गेलों असतां हिंदु-विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपदेश करावा म्हणून मला पाचारण करण्यांत आलें. या आमंत्रणाचा मीं मोठ्या आनंदानें स्वीकार केला व पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं विद्यार्थ्यांच्या प्रचंड श्रोतृसमुदायापुढें माझें भाषण झालें. भाषणांत मीं जातिनिष्ठेवर कडक टीका केली आणि विशेषेंकरून हिंदु महासभेच्या कार्याचा मीं निषेध केला. अर्थात अशी टीका करण्याच्या उद्देशानें मी व्याख्यानाला उभा राहिलों नव्हतों. सर्व तऱ्हेच्या जातिनिष्ठ गटांच्या प्रगतिविरोधी प्रयत्नांविषयींची चीड माझ्या मनांत सांठत आली होती ती बोलण्याच्या भरांत प्रकट झाली, इतकेंच. हिंदु समाजापुढें मुसलमान जातिनिष्ठांवर टीका करण्यांत कांहीं हंशील नसल्यामुळें मीं जाणून बुजून हिंदु-जातिनिष्ठांच्याच परागति वृत्तीची हजेरी घेतली. ज्या संस्थेचे मालवीयजी हे स्वतः आधारस्तंभ आहेत, त्या संस्थेवर त्यांच्याच अध्यक्षतेखालीं टीका करणें हें शिष्टाचाराला साजेसें वर्तन नव्हे. तथापि हिंदु महासभेंतील नव्या दमाच्या शर्त्तींनीं त्यांना जवळ जवळ हुसकून लावल्याचा

देखावा दिसत असल्यामुळें आपल्याकडून अतिप्रसंग होत आहे हा विचार माझ्या डोक्यांत आला नाहीं. हिंदुमहासभेची धुरा त्यांच्या खांद्यावर असेतोंपर्यंत महासभा राजकीय दृष्ट्या परागतिक बनली नव्हती. तथापि हिंदुमहासभेची परागतिक वृत्ति अलीकडे स्पष्ट होत चालली असून त्यांत मालवीयजी केव्हांहि सामील असणें शक्य नाहीं. त्यांना ही वृत्ति मान्य नसणार हें मी जाणून होतों. तें कांहींहि असलें, तरी त्यांच्या आमंत्रणाचा फायदा घेऊन त्यांना पेंचांत पाडतील अशीं विधानें करणें गैरच होय. मला माझ्या आचरणाविषयीं मागाहून फार पश्चात्ताप झाला.

माझ्या हातून त्या वेळीं आणखीहि एक चूक घडली. अजमीरला कोण्या एका हिंदु तरुणांच्या संघटनेनें पास केलेला म्हणून एक ठराव कोणी तरी आमच्याकडे पाठवला. ठराव अत्यंत आक्षेपार्ह असाच होता. त्याचाहि परामर्ष मीं माझ्या व्याख्यानांत घेतला. परंतु तसा ठराव कोणींहि पास केला नाहीं असें मागाहून सिद्ध झालें, आणि मी मात्र तोंडघशीं पडलों.

माझ्या बनारसच्या भाषणाचा त्रुटित सारांश प्रसिद्ध झाल्याबरोबर प्रति-टीकांचें काहूर उठलें. प्रतिटीकांचा मला सराव झालेला असून देखील हिंदुमहा-सभेच्या पुढाऱ्यांच्या टीकेचा आवेश पाहून मी जरा थक्कच झालों. ह्या टीका बहुतेक सर्व वैयक्तिक असत. मुद्द्याला धरून अशा टीका क्वचितच होत होती. त्यांचें त्यांनाच भान राहिलें नाहीं आणि माझें म्हणणें मांडण्याची मला लव-करच संधि मिळाला. तुरुंगांत असतांना माझें मन त्या प्रश्नाविषयींच्या विचारांनीं उलून आलें होतें. पण सुरुवात कशी आणि कोठें करावी त्याचा निश्चय झाला नसल्या-मुळें मीं हात आंखडता घेतला होता. लेखणींतून अक्षरें निघालीं कीं मधमाशीचें मोहोळ उठणार हें ठरलेलेंच होतें. वैयक्तिक शिवीगाळीवर येऊन ठेपणारीं असलीं भांडणें भांडत बसणें सुखाचें होत नसतें. पण आतां मला गत्यंतरच उरलें नव्हतें, म्हणून हिंदुमुसलमान जातिवादावर मीं एक तर्कशुद्ध असा लेख लिहिला आणि हे दोन्ही वाद जातिहिताची खरीखुरी दक्षता बाळगणारे नसून जातिहिताच्या नांवानें राजकीय व सामाजिक प्रगतीचे विरोधक बनलेले आहेत असें मीं दाखवून दिलें. जातिनिष्ठ पुढाऱ्यांच्या भाषणांचीं व जाहीर पत्रकांचीं बरींचशीं कात्रणें मीं तुरुंगांत करून ठेवलीं होतीं तीं मला ह्या वेळीं उपयोगी पडलीं. खरें बोलावयाचें म्हणजे माझ्यापाशीं साधनसामुग्री इतकी होती कीं वर्तमानपत्राच्या एका लेखांत ती समाविष्ट कशी करावी हाच पेंच मला पडला होता.

हिंदी वृत्तपत्रांतून माझ्या ह्या लेखाला खूपच प्रसिद्धि देण्यांत आली. पण लेखांत हिंदु व मुसलमान जातीय पुढाऱ्यांवर शिस्त धरलेली असतांहि त्यांपैकीं कोणीच कांहीं प्रत्युत्तर देईना. अत्यंत कडक व वैचित्र्यपूर्ण शब्दांत माझा निषेध करणारे हिंदुमहासभावाले त्या वेळीं चूप बसले. मुसलमानांच्या वतीनें सर महंमद इक्बाल यांनीं मंडलाकार परिषदेसंबंधीं माझ्या लेखांत आलेलीं कांहीं विधानें दुरुस्त

करण्याचा प्रयत्न केला, पण माझा मुद्दा खोडून काढण्याच्या प्रयत्नांत ते पडले नाहींत. त्यांना उत्तर देतांनाच राजकीय व जातीय प्रश्नावर राज्यघटनापरिषदेनें निर्णय द्यावा असें मीं सुचवलें होतें. ह्यानंतर जातीय प्रश्नावर मीं आणखी एक दोन लेख लिहिले. लेखांचें होत असलेलें स्वागत व त्याहिपेक्षां विचारी लोकांच्या मनावर त्यांच्या योगानें होत असलेला परिणाम पाहून मला बराच धीर आला. जातीय प्रश्नांशीं सलग्न झालेल्या तीव्र भावनांचीं पिशाच्चें मी हुंकारासरशीं पळवून लावीन अशी अवास्तव कल्पना मीं करून घेतली नव्हती. माझी मनीषा एवढीच होती कीं हिंदुस्थान व इंग्लंडमधील अत्यंत प्रतिगामी अशा गटांशीं जातीय पुढारी निगडित झालेले असून राजकीय प्रगतीला व त्याहिपेक्षां सामाजिक प्रगतीला त्यांचा विरोध आहे हें सिद्ध करावें. त्यांच्याकडून मांडण्यांत येणाऱ्या मागण्यांचा जनतेशीं काडीमात्र संबंध नाहीं. समाजांत वरिष्ठ जागीं बसलेल्या मूठभर लोकांच्या हिताच्या दृष्टीनें त्या मागण्यांचा मांडणी केलेली असते. हा हल्ला असाच पुढें चालू ठेवावा अशी माझी इच्छा होती. पण इतक्यांत तुरुंगाचीं दारें बंद झालीं. हिंदु-मुसलमानांतील फुटीचीं कारणें शोधून काढण्याचा प्रयत्न न करता केवळ हिंदु-मुसलमानांची एकी करा अशी पुन्हा पुन्हा विनंती करीत राहणें व्यर्थ आहे असें माझें मत होतें. पण हा मंत्र वारंवार जपला कीं एकी निर्माण होईल अशी कांहीं लोकांची समजूत असावी.

१८५७ सालच्या बंडापासून आतांपर्यंतचें इंग्रजांचें जातिविषयक धोरण अभ्यासून पाहण्यासारखें आहे. हिंदु-मुसलमानांना एकदिलानें कोणतीहि गोष्ट करतां येऊ नये व परस्परांत लाथाळी माजावी हाच त्या धोरणांतील तात्पर्यार्थ आहे. १८५७ नंतर हिंदूंपेक्षां मुसलमानांवरच इंग्रजांची अधिक करडी नजर होती. मुसलमान हे अधिक तापट व लढाऊ असून गतवैभवाच्या स्मृती त्यांच्या अन्तःकरणांत जागृत असल्याकारणानें मुसलमानांपासून आपल्याला अधिक धोका आहे असें सरकारला वाटे. नव्या शिक्षणक्रमापासून मुसलमान अलिप्त राहिले व सरकारदरबारीं त्यांना जागाहि फार थोड्या मिळाल्या. तोंडीं इंग्रजी भाषा आणि हातीं लेखणी घेऊन खर्डेघाशी पत्करण्याची तत्परता हिंदूंनीच अधिक दाखवली होती.

राष्ट्रवादाचे नवे अंकुर फुटूं लागले ते वरून खालीं असे वाढत होते. इंग्लिश भाषा जाणणाऱ्या वरिष्ठ वर्गांत त्याचें बीं प्रथम रुजलें. ह्या वर्गात अर्थात् हिंदूंचाच भरणा होता. कारण शैक्षणिक बाबतींत मुसलमान कोठच्या कोठें मागें राहिले होते. ह्या राष्ट्रवादाची पहिली बालभाषा अगदीं बोबडी आणि अजीजीची असली तरी ती देखील सरकारला मानवली नाहीं. आणि मुसलमानांना जवळ करून त्यांना शक्य तों राष्ट्रवादाचा संपर्क लागूं द्यावयाचा नाहीं असा सरकारनें बेत केला. मुसलमान राष्ट्रवादाकडे येतील तर मध्यें शिक्षणाभावाचा फार मोठा अडथळा होताच. पण तो फार वेळ टिकून राहण्याचा संभव नसल्याकारणानें ब्रिटिशांनीं दूरदर्शीपणानें

आधींपासूनच तयारी ठेवली आणि ह्या कामीं सर सय्यद अहमदखान नांवाच्या विख्यात गृहस्थांचें त्यांना बहुमोल साहाय्य झालें.

आपली जात शिक्षणांत मागसलेली आहे ही गोष्ट सर सय्यद यांच्या जिवाला लागून राहिली होती. ब्रिटिशांच्या दरबारीं आपणाला वजन नाहीं, आश्रय नाहीं, या गोष्टीचेंहि त्यांना वाईट वाटत होतें. त्यांच्या इतर समकालीनांप्रमाणें त्यांनाहि ब्रिटिशांविषयीं अत्यंत आदरभाव होता. युरोपची सफर करून आल्यावर त्यांच्या मनावर फार विलक्षण परिणाम घडून आला. त्या वेळीं म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत, विशेषतः पश्चिम युरोप तर, संस्कृतीच्या शिखरावर आरूढ झालेलें होतें. सर्व जगाचें तें स्वामी बनलें होतें. आणि ज्या गुणांमुळें त्याला हें वैभव प्राप्त झालें, ते गुण त्या वेळीं प्रत्यक्ष आचारांत दिसूनहि येत. उदारमतवादाची कमान चढती होती. एका विशाल भवितव्याची रचना आपण करीत आहोंत अशा श्रद्धेनें सर्व व्यवहार चालत. हा देखावा पाहून तेथें गेलेले हिंदी लोक मंत्रमुग्ध झाले तर त्यांत काय नवल ? प्रथम बरेचसे हिंदु लोक तिकडे गेले व परत आल्यावर युरोपचें व इंग्लंडचें यशोगान गाण्यास त्यांनीं सुरुवात केली. पण त्या वैभवाचा परिचय दृष्टीला होत गेला तसतसे त्यांचे डोळे पूर्वीसारखे दिपेनात. १८६९ सालीं इंग्लंडांतून सर सय्यदांनीं लिहिलेलीं वर्णनात्मक पत्रें वाचलीं म्हणजे त्यांच्या डोळ्यां-वरची भुरळ मात्र कशी कायम होती तें स्पष्ट दिसून येईल. एका पत्रांत ते लिहितात : " हिंदुस्थानांत इंग्रज लोक असभ्यपणानें वागत नाहींत असें मला म्हणावयाचें नाहीं. ते आम्हांला पशुप्रमाणें लेखतात हें खरें. पण गैरसमजामुळें त्यांच्या हातून तसें वर्तन घडत असावें. आणि त्यांचें आपल्याविषयीं जें मत बनलें आहे तें फारसें चुकीचें आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. इंग्रजांची स्तुति करण्याचा माझा मानस नाहीं; पण एतद्देशीय माणूस मग तो श्रीमंत असो, गरीब असो, छोटा अगर मोठा व्यापारी, सुशिक्षित, अशिक्षित, कोणीहि असो, त्याची शिक्षण, शिष्टाचार, प्रामाणिकपणा, वगैरे बाबतींत इंग्रजांशीं तुलना केली, तर उकिरड्यावर लोळणारें जनावर आणि सौंदर्यवान् माणूस यांच्यांत जेवढें साम्य असतें, तेवढेंच या दोघांत आहे, असें बिनदिक्कत म्हणतां येईल. हिंदुस्थानच्या लोकांना इंग्रज दुबळे पशु समजतात, तें उगाच नव्हे. येथें मी रोजच्या रोज जें डोळ्यांनीं पाहतों आहें त्याची कल्पना-सुद्धां हिंदी रहिवाशाला करतां येणार नाहीं. ज्या मनुष्यमात्राच्या ठायीं असाव्यात त्या सर्व उत्तमोत्तम ऐहिक आणि आध्यात्मिक गोष्टींचे देणें सर्वशक्तिमान् ईश्वरानें युरोपियन माणसाला आणि विशेषतः इंग्रज माणसाला दिलेलें आहे. "*

युरोपची व इंग्लंडची याहून अधिक स्तुति कोण कशी करणार ? आपल्या लोकांची निद्रा दूर व्हावी व त्यांनीं पुढें पाऊल टाकावें या हेतूनेहि कदाचित् त्यांनीं इतकी उत्तान विरोधाची भाषा वापरली असेल. पाश्चात्य शिक्षणाच्या मार्गानेंच

* हान्स् कोहन यांच्या " पूर्वेकडील राष्ट्रवादाचा इतिहास " या ग्रंथावरून.

आपण पावलें टाकलीं पाहिजेत असें त्यांचें ठाम मत होतें. इंग्रजी शिक्षण घेतलें कीं मागोमाग नोकऱ्या, वृत्तिस्वास्थ्य, प्रतिष्ठा, मान वगैरे गोष्टी यावयाच्याच. म्हणून शिक्षण हें एकच ध्येय त्यांनीं डोळ्यांसमोर ठेवलें. हिंदु मध्यमवर्गांत उत्पन्न झालेला हा राष्ट्रवाद आपल्या एकाग्रतेंत व्यत्यय आणणारा आहे असें वाटून त्यांनीं त्याला विरोध केला. पाश्चात्य शिक्षणाच्या शर्यतींत आधीं पन्नास वर्षें धांवावयास लागलेल्या हिंदूंना सरकारवर टीका करण्याचे खेळ खेळावयास फुरसद मिळत असेल; पण सर सय्यदांना आपल्या कामांत सरकारची मदत हवी असल्यामुळें सुरवातीलाच कार्यनाश करणारे उद्योग ते कसे बरें आरंभतील! म्हणून हिंदी राष्ट्रीय सभेकडे त्यांनीं साहजिकच पाठ फिरवली. तिकडे सरकार त्यांचें स्वागत करण्यास उत्सुक होतेंच.

सर सय्यदांचा निर्धार अगदीं योग्य होता यांत संशय नाहीं. पाश्चात्य शिक्षणावांचून हिंदुस्थानांतील मुसलमानांना नव्या राष्ट्रवादाच्या उभारणीच्या कामांत भाग घेतां आला नसता व शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेल्या व आर्थिक दृष्ट्या अधिक बलिष्ठ अशा हिंदूंची री ओढीत त्यांना बसावें लागलें असतें. ऐतिहासिक परंपरेनें अथवा विचारसरणीनें मध्यमवर्गीयांचा राष्ट्रवाद स्वीकारण्याची ऐपत मुसलमानांना आली नव्हती. कारण हिंदु जातीप्रमाणें मुसलमानांत मध्यमवर्ग निर्माण झालेला नव्हता. तेव्हां बाह्यात्कारी मवाळ दिसणारें सर सय्यदांचें कार्य नीट क्रान्तीच्या मार्गानेंच जात होतें. हिंदूंचा वाढता मध्यमवर्ग युरोपांतील उदार मतवाद्यांच्या विचारसरणीचा अंगीकार करीत असतां मुसलमान लोक मात्र अद्यापि लोकसत्ता-विरोधी अशा सरजामी विचारप्रणालींतच गटंगळ्या खात राहिले होते. दोन्ही गट नेमस्त असून ब्रिटिश सत्तेवर ते दोघेहि संपूर्णतया अवलंबून होते. मूठभर जमीनदार मुसलमानांत दिसून येणारा नेमस्तपणा सर सय्यद यांच्या द्वारां प्रकट होत असे. व्यापारधंद्यांत बरकत यावी आणि पैसा पेरण्यास अधिक विस्तृत असें क्षेत्र सरकारची मर्जी फारशी न दुखवतां लाभावें म्हणून हिंदु मध्यम वर्गदेखील नेमस्तपणेंच वागत होता. इंग्लिश उदार मताचे पुरस्कर्ते ग्लॅडस्टन, ब्राइट वगैरे लोकांना हिंदु राजकारणी पुढारी आदर्श म्हणून समजत. पण मुसलमानांना तसें वाटत नसावें. ग्लॅडस्टननें तुर्कस्तानवर व आर्मेनियांतील कत्तलीवर कडक टीका केली म्हणून मुसलमानांच्या दृष्टीनें तर तो काफिरच ठरला. डिझराएलीचें तुर्कस्तानविषयक धोरण जरासें सौम्य होतें. त्यामुळेंच मुसलमानांच्या मनांत त्याच्याबद्दल थोडा पक्षपात दिसून येत असावा.

सर सय्यद अहमदखान यांचीं भाषणें आज वाचून पाहिलीं तर आपणाला मोठें नवल वाटेल. १८८७ च्या डिसेंबरमध्यें त्यांनीं लखनौ येथें केलेल्या भाषणांत राष्ट्रीय सभेच्या अगदीं सौम्य मागण्यांवर सुद्धां ताशेरा झाडलेला आढळून येतो.

'इस्लामी लोकशाहीचे' पुरस्कर्ते व प्रतिनिधि म्हणून समजले जाणारे सर सय्यद अहमदखान ज्या तऱ्हेचीं भाषणें करीत होते, तशीं भाषणें खुद्द औधचे तालुकदार

अथवा आग्रा, बिहार व बंगाल येथील जमीनदार सर यांच्या काळांत करतील किंवा नाहीं याची शंका आहे. तथापि असलीं भाषणें करणारे सर सय्यद हे एकटे एकच होते असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. त्या काळचीं पुष्कळशीं कॉंग्रेसमधील भाषणेंसुद्धां आतां वाचून पाहिलीं तर विलक्षण भासतात. त्या काळच्या हिंदु-मुसलमान प्रश्नाचें स्वरूप असें होतें कीं आर्थिक दृष्टीनें आक्रमणशील व उदयोन्मुख अशा मध्यमवर्गाला (हिंदूंना) सरंजामी वृत्तीचा जमीनदारवर्ग (मुसलमान) विरोध करीत होता. हिंदु जमीनदार वर्ग मध्यम वर्गाशीं निगडित झालेला असून मध्यम वर्गाच्या मागण्यांविषयीं तो तटस्थ वृत्ति स्वीकारीत असे, अथवा पुष्कळ वेळां त्यांच्याविषयीं तो सहानुभूतिहि दाखवी. मध्यमवर्गावर त्यांच्या विचारसरणीची छाप पडल्याचें दिसून येई. सरकार अर्थातच नेहमीप्रमाणें सरंजामशाहीच्या बाजूला होतें. उभय जातींतील कनिष्ठ मध्यमवर्ग व जनता यांचा त्या वेळीं राजकारणांत प्रवेशसुद्धां झालेला नव्हता.

सर सय्यद यांचें व्यक्तिमाहात्म्य मोठें असल्यामुळें हिंदी मुसलमान समाजांत त्यांचें चांगलें वजन पडून अलिगड कॉलेज म्हणजे आपल्या आशा व अकांक्षा यांचें केंद्रस्थान आहे असें त्या समाजाला वाटूं लागलें. बदलत्या परिस्थितींत एकाद्या कल्पनेंतील प्रगतिप्रवणता लवकरच नाहींशी होऊन तिचा प्रगतीला उलट अडथळा मात्र होऊं लागतो. हिंदी प्रागतिक हे अशा प्रकारचें ढळढळीत उदाहरण होत. कॉंग्रेसची जुनी परंपरा आम्हींच संभाळून ठेवली आहे, तुम्हीं आंत घुसलेले नवे लोक उपऱ्यांप्रमाणें आहांत असें प्रागतिक आम्हाला वारंवार बजावीत असतात. त्यांचें म्हणणें सत्य आहे. तथापि त्यांना असें उमजेना कीं जग पालटत आहे. कॉंग्रेसची जुनी परंपरा आजपर्यंतच्या पावसाच्या पाण्यानें साफ वाहून गेली असून आतां ती केवळ इतिहासरूपानें शिल्लक राहिलेली आहे. जी स्थिति प्रागतिकांची तीच स्थिति सर सय्यद यांच्या उपदेशाची. त्याचा उच्चार झाला तेव्हां तो योग्य होता व आवश्यकहि होता, परंतु प्रगतिपर अशा एका जातीचें तो ध्येय बनणें संभवनीय नाहीं. त्यांचें आयुष्य एकाद्या पिढीनें वाढलें असतें तर खुद्द त्यांनींच आपल्या धोरणाची दिशा बदलली असती. त्यांनीं दिलेल्या संदेशांत पालटणाऱ्या परिस्थितीला अनुरूप असे फेरफार दुसऱ्या पुढाऱ्यांनाहि करतां आले असते. परंतु सर सय्यदांची कामगिरी इतकी यशस्वी झाली होती आणि त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत एवढा आदरभाव निर्माण झाला होता कीं त्यांनीं आंखून दिलेल्या मार्गांत फेरबदल करणें अवघड होऊन बसलें. शिवाय हिंदी मुसलमानांच्या दुर्दैवानें त्यांना नवा मार्ग दाखवतील असे महान् लोकहि त्यांच्यांत पैदा झाले नाहींत. अलिगड कॉलजनें उत्तम कामगिरी बजावली, पुष्कळ लायक अशीं माणसेंहि तयार केलीं, व बुद्धिजीवि वर्गाच्या अभिरुचींत पालट घडवून आणला. परंतु ज्या सामाजिक चौकटींत त्या विद्यालयाची संस्थापना

झाली होती, त्या चौकटीच्या बाहेर विद्यालयाचें पाऊल पडलें नाहीं. त्याच्यावर सरंजामी मनोवृत्तींची छाप बसलेली होती. सरकारी नोकरी हेंच तेथें शिकणाऱ्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांचें ध्येय होऊन बसलें. कांहीं धाडस करावें, नभोमंडळांत स्वैर भराऱ्या माराव्या अशी त्याला ईर्षाच वाटत नसे. डेप्युटी कलेक्टरची जागा मिळाली कीं त्याचे घोडे गंगेंत न्हाले. इस्लामच्या कित्येक देशांवर पसरलेल्या लोकशाहीचे आपण घटक आहोंत ह्या विचारानें त्याचें समाधान होई. व ह्या अफाट बंधु-समाजापैकीं आपण एक आहों हें जगाला दाखवण्यासाठीं तो मोठ्या ऐटीनें तुर्की फेज टोपी डोक्यावर तिरकी ठेवून हिंडत असे. इतर मुसलमानांच्या बरोबरीनें खाण्यापिण्याचे आणि नमाज पढण्याचे हक्क त्याला मिळाले कीं लोकशाहीचे सर्व हक्क आपणांस प्राप्त झाले असें समाधान मानून घेऊन हिंदुस्थानांत राजकीय लोकसत्ता आहे कीं नाहीं याबद्दल तो कधींच फिकीर करीत नसे.

अर्थात् ही संकुचित वृत्ति व सरकारी नोकरीबद्दल वाटणारा हव्यास हीं अलिगडच्या अथवा इतर ठिकाणच्या मुसलमान विद्यार्थ्यांतच दिसून येतात असें नाहीं. हिंदु विद्यार्थ्यांतहि याच वृत्ति प्रगट होत असतात. पुढें परिस्थितिच अशी निर्माण झाली कीं पुष्कळांना ही चाकोरी सोडून बाहेर पडावें लागलें. सर्व सुशिक्षितांच्या वांट्याला येतील इतके नोकरीचे चतकोर सरकारजवळ नसल्याकारणानें सुशिक्षितांचें मध्यमवर्गीय स्वरूप नष्ट झाले आणि असले वर्गच्युत लोकच आज राष्ट्रीय क्रान्तिकारक चळवळींचे आधारस्तंभ बनलेले आहेत.

सर सय्यदांच्या राजकीय संदेशाचा विपरीत परिणाम थोडाफार नाहींसा होतो न होतो तोंच विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अशा घटना घडून आल्या कीं मुसलमान व अधिक तेजस्वी झालेली राष्ट्रीय चळवळ यांच्यांतील दुही वाढवण्यास सरकारला चांगलीच सवड मिळाली. १९१० सालीं "हिंदुस्थानांतील असंतोष' या पुस्तकांत सर व्हॅलेन्टाइन चिरोल ह्यांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं "ब्रिटिश सत्तेचा बलिष्ठपणा व टिकाऊपणा यांच्याशींच आपले हितसंबंध व आपल्या आकांक्षा निगडित झालेल्या आहेत अशी हिंदुस्थानांतील एकजात मुसलमानांची खात्री आजच्या घटकेइतकी पूर्वीं कधींहि पटलेली नव्हती असें म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं." राजकारणासंबंधीं भविष्य करणें मोठें धोक्याचें असतें. कारण व्हॅलेन्टाइन चिरोलनीं वरील विधान केल्यानंतर पांच वर्षांचा काळ लोटण्याच्या आंतच मुसलमानांतील बुद्धिजीवि लोक आपल्या भोंवतालचें कुंपण मोडून कॉंग्रेसच्या निशाणाखालीं येऊन राहण्याचा विचार करूं लागले होते. त्यानंतरच्या आणखी पांच वर्षांच्या अवधींत मुसलमान कॉंग्रेसपेक्षांहि जहाल बनले व कॉंग्रेसलाच चढाऊ कार्यक्रमाचे धडे देण्यास त्यांनीं सुरुवात केली. परंतु या दहा वर्षांच्या काळांत फारच उलाढाली झाल्या होत्या, आणि महायुद्धामुळें सर्व जगाचा सांगाडा खिळखिळा होऊन गेला होता.

तथापि सर व्हॅलेन्टाइन ह्यांनीं दिलेला निर्णय योग्यच होता असें वरवर

पाहणाऱ्याला वाटेल. कारण आगाखान हे मुसलमानांचे पुढारी म्हणून मिरवूं लागले होते. आगाखान स्वतः मध्यम वर्गाचे पुढारी मुळींच नसतांहि हें स्थान त्यांना प्राप्त करून घेतां आलें ह्यावरून मुसलमान समाजांत सरंजामदारी परंपरेचा प्रभाव अद्यापि टिकून होता ही गोष्ट सिद्ध होण्यासारखी आहे. ब्रिटनमधील अधिकारी वर्गाशीं त्यांचे फार घरोब्याचे संबंध असल्यामुळें ब्रिटिशांना ते प्रिय वाटावे ह्यांत नवल नाहीं. अनेक संस्कृतितीर्थांत त्यांनीं निमज्जन केलेलें होतें. त्यांचें वास्तव्य बहुधा युरोपमध्येच असे. श्रीमान् इंग्रज जमीनदाराप्रमाणें खेळ वगैरे करमणुकींत त्यांचा वेळ जाई. जातीय प्रश्नाबाबद त्यांचीं मतें मुळींसुद्धां संकुचित नव्हतीं. मुसलमानांचे ते पुढारी झाले याचा अर्थ असा कीं मुसलमान जमीनदार वर्ग व उदयोन्मुख मध्यमवर्ग हे इतःपर सरकारच्या गोटांत सामील व्हावयास उत्सुक बनले होते. ह्या मुख्य ध्येयाचा उत्कर्ष साधावा म्हणून वस्तुतः दुय्यम दर्जाच्या जातीय प्रश्नावर विशेष भर देण्यांत येऊं लागला होता. बंगालच्या फाळणीमुळें उत्पन्न झालेल्या राजकीय परिस्थितीचा विचार मुसलमानांच्या हितसंबंधांच्या दृष्टीनें करून, " हिंदूंना राजकीय हक्क दिले तर राजकारणांत बहुसंख्य हिंदु वरचढ होतील व त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याला व त्याचप्रमाणें अल्पसंख्य व निःसंशय राजनिष्ठ अशा मुसलमान समाजाला धोका येण्याचा संभव आहे. " ही गोष्ट आगाखानांनीं त्या वेळच्या व्हाइसरॉयच्या नजरेस आणून दिली, असें सर व्हॅलेंटाइन चिरोलनीं म्हटलें आहे.

अशा प्रकारें ब्रिटिश सरकारशीं मुसलमानांचें संगनमत झाल्याचें वरकरणीं दिसत असलें, तरी आंतून निराळाच बनाव बनत होता. नवोदित मध्यमवर्गीय मुसलमानांना सद्यःस्थिति जाचक वाटूं लागली होती व राष्ट्रीय चळवळीकडे ते अधिकाधिक प्रमाणांत खेंचले जात होते ही गोष्ट खुद्द आगाखान यांच्याहि लक्षांत येऊन चुकली होती व त्यांनीं आपल्या स्वभावानुरूप ब्रिटिश सरकारला बजावूनहि ठेवलें होतें. लढाई सुरू होण्यापूर्वी पुष्कळ दिवस १९१४ सालच्या जानेवारींत एडिंबरो रिव्ह्यूमध्यें लिहिलेल्या एका लेखांत हिंदु-मुसलमानांत फूट पाडण्याचें धोरण सोडून देऊन हिंदु व मुसलमान तरुणांतील जहाल राष्ट्रीय वृत्तीला पायबंद घालण्यासाठीं दोन्ही जातींतील नेमस्त लोकांना सरकारने एकत्रय करावें असा सल्ला त्यांनीं सरकारला दिल्याचें आढळतें. ह्यावरून मुसलमानांच्या जातीय हितसंबंधांचे रक्षण करण्यापेक्षां हिंदुस्थानांत राजकीय परिवर्तन घडूं नये ह्या दृष्टीनेच त्यांची धडपड सुरू होती हें उघड दिसतें.

परंतु आगाखान कांहींहि बोलले अथवा ब्रिटिश सरकारनें कांहींहि केलें, तरी राष्ट्रवादाकडे मध्यम वर्गातील मुसलमानांचीं पावलें वळावीं हें क्रमप्राप्तच झालें होतें. महायुद्धामुळें ही क्रमप्राप्त गोष्ट अधिकच त्वरेनें सिद्ध झाली. आघाडीवर नवे नवे पुढारी चमकूं लागल्याबरोबर आगाखानांची प्रभा नष्ट होत चालली. अलिगड कॉलेजचेंहि स्वरूप पालटलें. नव्या राजकीय पुढाऱ्यांपैकीं अत्यंत प्रभावशाली असे

दोघेहि अली-बंधू अलिगडचेच विद्यार्थी होते. डॉ. अन्सारी, मौलाना अबुल कलम आझाद वगैरे अनेक मध्यमवर्गीय पुढारी मुसलमानांच्या राजकारणांत लक्ष घालूं लागले. श्रीयुत जिन्हा हेहि सौम्यसा भाग घेत असत. गांधीजींनीं जिन्हांव्यतिरिक्त सर्व मुसलमान पुढाऱ्यांना असहकाराच्या चळवळीकडे खेंचून नेलें व १९१९ ते २३ पर्यंतच्या चळवळींत ह्या पुढाऱ्यांनीं चांगली कामगिरीहि बजावली.

तदनंतर मात्र पिछेहाटीला सुरुवात झाली. हिंदु व मुसलमान जातींतील जातिनिष्ठ आणि मागसलेले घटक पुन्हां पुढें सरसावले. त्यांची प्रगति फार सावकाश पण अव्याहतपणें होत होती. जातिविरोधानें पेट घेतलेला असल्यामुळें हिंदु महासभेला याच वेळीं पहिल्या प्रथम थोडेसें महत्त्व प्राप्त झालें. तथापि राजकारणांत तिची छाप कॉंग्रेसवर फारशी पडली नाहीं. गमावलेली प्रतिष्ठा पुन्हां मिळवण्याच्या कामीं मुसलमान जातीय संस्थांना हिंदुमहासभेपेक्षां अधिक यश प्राप्त झालें. तरीहि एक प्रबळ असा मुसलमान पुढाऱ्यांचा गट कॉंग्रेसला चिकटून राहिला होता. राजकीय दृष्ट्या निखालसपणें परागतिक अशा जातिनिष्ठ पुढाऱ्यांना ब्रिटिश सरकारनें उत्तेजन दिलें. ह्या लोकांना यश मिळतेसें पाहून हिंदुमहासभाहि परागतीच्या बाबतींत त्यांच्याशीं स्पर्धा करूं लागली. अशानें तरी सरकार कृपावन्त होईल अशी तिला आशा वाटत होती. महासभेंतील जहाल लोकांची हकालपट्टी झाली अथवा ते आपण होऊनच हिंदुमहासभेला सोडून गेले आणि हिंदुमहासभा वरिष्ठ मध्यम वर्गाची व विशेषतः सावकारांची व पेढीवाल्यांची कैवारी बनली.

दोन्ही बाजूंच्या जातिनिष्ठ कार्यकर्त्यांचा लढा मध्यमवर्गाला मिळणाऱ्या नोकऱ्यांसाठींच चालू होता व सर्वांना पुरतील इतक्या नोकऱ्या नसल्यामुळें हिंदु-मुसलमान जातिनिष्ठांमध्यें हमरातुमरी सुरू होती. विद्यमान नोकऱ्या स्वतःच्या हातीं असल्यामुळें हिंदु बचावाच्या धोरणानें, तर अधिकाधिक नोकऱ्या मिळाव्या म्हणून मुसलमान चढाईच्या धोरणामुळें लढत होते. नोकऱ्यांसाठीं सुरू असलेल्या ह्या लढ्याच्या मागें आणखी एक बराच महत्त्वाचा कलह सुरू होता. त्याचें स्वरूप ततोतंत जातिनिष्ठ असें नसलें, तरी जातीय प्रश्नावर त्याचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. एकंदरीनें पाहतां पंजाब, सिंध आणि बंगालमध्यें शहरांत राहणाऱ्या सधन व सावकार लोकांत हिंदूंचा भरणा होता. त्या प्रांतांतील मुसलमान गरीब व कर्जबाजारी असून ते शेतकी काम करीत. त्यांच्यामध्यें उत्पन्न होणारे कलह बहुधा आर्थिक स्वरूपाचे असले, तरी त्याला जातीय स्वरूप देण्यांत येत असे. अलीकडच्या कांहीं महिन्यांत शेतकरी-कर्जाचा बोजा कमी व्हावा म्हणून जे ठराव निरनिराळ्या प्रांतांतून ( विशेषतः पंजाबमध्यें ) आलेले आहेत, त्यांवर झालेल्या चर्चेत एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते ती अशी कीं हिंदुमहासभेच्या प्रतिनिधींनीं असल्या प्रकारच्या कायद्यांना नेहमींच विरोध केलेला असून सावकारांच्या वतीनेंच ते तरफदारी करीत असलेले दिसतात.

मुसलमानांच्या जातिनिष्ठेवर टीका करून आपली राष्ट्रभक्ति मात्र शंकातीत आहे असें हिंदुमहासभा मोठ्या आग्रहानें प्रतिपादीत असते. मुसलमानांच्या जातीय संस्थांची जातिनिष्ठा कळसाला पोंचली आहे ही गोष्ट तर स्पष्टच दिसत आहे. हिंदु महासभेची जातिनिष्ठा इतक्या उघडपणें दिसून येत नाहीं. तिच्यावर राष्ट्रवादाच्या मुलाम्याचा हात चढवलेला असतो. परंतु खऱ्या राष्ट्रहिताच्या व लोकसत्ताक स्वरूपाच्या मागण्यांच्या तेजाबाचा हात लागून वरिष्ठवर्गीय हिंदूंच्या हितसंबंधांना धोका पोंचणार असा प्रसंग उत्पन्न झाला कीं हा राष्ट्रीयत्वाचा मुलामा उडून जातो. ज्या ज्या वेळीं असा प्रसंग आला, त्या त्या वेळीं महासभा कसाला उतरत नाहीं असें सिद्ध झालेलें आहे. अल्पसंख्याकांच्या आर्थिक हितसंबंधांचें रक्षण व्हावें एवढ्याच हेतूनें बहुसंख्याकांच्या वारंवार जाहीर झालेल्या मतांची पर्वा न करतां सिंध प्रांताचें विभक्तीकरण होऊं नये असा हट्ट हिंदुमहासभेनें धरला होता.

तथापि हिंदु व मुसलमान जातिनिष्ठांच्या अराष्ट्रीयत्वाचें अगदीं नग्न प्रदर्शन मंडलाकार परिषदेच्या वेळीं झालें. अगदीं कट्टर जातिनिष्ठ मुसलमानांची नेमणूक करण्याचें धोरण सरकारनें ठेवलें होतें. आगाखान व त्यांचे साथीदार यांचें लार्ड आयर्विन यांच्या करूबरोबर जें कांहीं मेथकूट जमलें, तें औरच! तेवढ्यावर भागलं नाहीं म्हणूनच कीं काय एक पाऊल पुढें जाऊन युरोपियन असोसिएशन वगैरे संस्थांच्या प्रतिनिधींशींहि त्यांनीं संगनमत केलें. ही घटना मात्र फारच खेदजनक होती. कारण हिंदुस्थानांत राहून हिंदी स्वातंत्र्याचे कट्टे वैरी कोणी असतील तर ते युरोपियन असोसिएशनचे लोक.

आगाखान कंपूच्या तोंडास तोंड म्हणून ब्रिटिशांच्या हितास पोषक व जनतेच्या स्वातंत्र्यास विघातक अशा हरतऱ्हेच्या संरक्षक बंधनांची मागणी हिंदुमहासभेनेंहि पुढें टाकली व ब्रिटिश सरकारबरोबर सहकार्य करण्यासाठीं मुसलमानांबरोबर त्यांची अहमहमिका सुरू झाली. त्यामुळें फलप्राप्ति तर झाली नाहींच, पण स्वतःची नाचक्की आणि राष्ट्राचा विश्वासघात मात्र त्यांनीं केला. मुसलमान जातिनिष्ठ कांहीं आब राखून तरी बोलले. पण हिंदु पुढाऱ्यांनीं त्याची सुद्धां पर्वा केली नाहीं.

हे दोन्ही बाजूंचे जातीय पुढारी संख्येनें अल्प अशा वरिष्ठवर्गीय प्रगतिविरोधी गटांचे प्रतिनिधि असून जनतेच्या धार्मिक श्रद्धेचा उपयोग ते आपलें हित साधावें म्हणून करून घेत असतात ही गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. आर्थिक प्रश्न आले कीं ते दडपून टाकावयाचे किंवा त्यांना बगल द्यावयाची असे प्रयत्न दोन्ही जातींच्या पुढाऱ्यांकडून होत असतात. हे प्रश्न दडपून टाकणें इतःपर शक्य नाहीं असा काळ लवकरच येईल, आणि मग आगाखानांनीं वीस वर्षांपूर्वी सरकारला जो उपदेश केला होता त्याचेच प्रतिध्वनि दोन्ही जातींचे पुढारी काढूं लागतील ह्याविषयीं शंकाच नको. तो प्रकार कांहीं अंशीं आताच सुरू झालला दिसत आहे. कारण हिंदुमुसलमानांच्या पुढाऱ्यांनीं लोकांसमक्ष कितीहि दगडफेक केली तरी मध्यवर्ती

कायदेमंडळांत दडपशाहीचे कायदे पास करण्यासाठीं दोघेहि सरकारला हातभार लावीत असतात. ओटावा-कराराच्या ताटाभोंवतीं तर हे तीन्ही गट अगदीं मांडीला मांडी लावून बसले होते.

इकडे हुजूर पक्षांतील कट्टर लोकांशीं आगाखानांचें रहस्य चालूच आहे. १९३४ आक्टोबरमध्ये झालेल्या ब्रिटिश नेव्ही लीगच्या खान्याच्या वेळीं आगाखान हे सन्मान्य पाहुणे म्हणून व लॉर्ड लॉइड हे अध्यक्ष म्हणून हजर होते. ब्रिटिश आरमार वाढवण्यांत यावें ह्या लॉर्ड लॉइड यांच्या ब्रिस्टल येथील हुजूर-परिषदेंतील सूचनेला आगाखानांनीं मुक्तकंठानें पाठिंबा दिला. ब्रिटिश आरमार वाढवावें ह्याची काळजी खुद्द ब्रिटनपेक्षां आगाखानांनाच अधिक लागलेली दिसते!

नंतर एकाच महिन्यानें म्हणजे १९३४ च्या नोव्हेंबरांत अशी बातमी आली कीं लंडनमध्यें मुसलमान प्रजा व ब्रिटिश तख्त यांची मैत्री चिरकाल टिकावी म्हणून एक चित्रपट खाजगी रीत्या दाखवण्यांत येत आहे. त्या प्रसंगीं सन्माननीय पाहुणे म्हणून आगाखान व लॉर्ड लॉइड हा दुक्कल हजर होता. साम्राज्यांतील घडामोडींत आगाखान आणि लॉर्ड लॉइड यांची जोडी आपल्या इकडच्या राष्ट्र आणि जयकर यांच्या जोडी-प्रमाणें अभेद्य झालेला दिसते. या दोघांचें अशा प्रकारें मेतकूट जमलें असून देखील हिंदुस्थानला फार मोठा सुधारणांचा हप्ता दिला म्हणून अधिकारारूढ हुजूर पक्षावर लॉर्ड लॉइड यांनीं निर्दयपणें एकसारखी टीका चालू ठेवलीच होती.*

अलीकडे मुसलमान जातिनिष्ठ पुढाऱ्यांच्या भाषणांतून व वर्तमानपत्रांतील मुलाखतींतून एक निराळाच ध्वनि उमटूं लागला आहे. त्याला विशेष महत्त्व नसलें तरी सर्वच लोकांना तसें वाटणार नाहीं. त्यावरून जातिनिष्ठ भावनांचा कल समजून येण्यासारखा आहे. ह्या नवीन कल्पनांना प्रसिद्धिहि बरीच मिळत असते. "मुसलमान राष्ट्र" "मुसलमान संस्कृति" "हिंदु व मुसलमान संस्कृतींतील चिरस्थायी भेद" वगैरे मुद्द्यांवर विशेष भर देण्यांत येतो. ह्यावरून सिद्धांत असा काढावयाचा असतो कीं या दोन संस्कृतींत सलोखा राहावा व त्यांच्यामध्यें उच्चनीच असे प्रकार उत्पन्न होऊं नयेत म्हणून ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत राहणें आवश्यक आहे.

कांहीं हिंदु जातिनिष्ठ पुढाऱ्यांचे विचार ततोतंत अशाच धर्तीचे आहेत. फरक इतकाच कीं आपण बहुसंख्य असल्यामुळें आपलीच संस्कृति अखेर मात करणार अशी त्यांच्या मनाला आंतून आशा वाटत असते.

हिंदु आणि मुसलमान "संस्कृति" आणि "मुसलमान राष्ट्र" हे शब्द उच्चारले कीं इतिहासाची केवढी परंपरा, आणि वर्तमान व भविष्य काळासंबंधींचा केवढा तरी चित्रपट डोळ्यांपुढें उभा राहतो. हिंदुस्थानांत पाकिस्तान म्हणजे

---

* कट्टर प्रगतिविरोधक अशा सर्व व्यक्तींची पक्की एकजूट करण्याच्या उद्देशानें नुकतेंच ब्रिटिश सरदार आणि हिंदी मुसलमान यांचें कौन्सिल स्थापन कर-ण्यांत आलें आहे.

राष्ट्रांतर्गत राष्ट्र स्थापावयाचें आणि तें सुद्धां एकसंघ नव्हे तर विखुरलेलें, व अनिश्चित असें. राजकीय दृष्ट्या वेडगळपणाची आणि आर्थिक दृष्ट्या अचाट अशी ही कल्पना आहे. तथापि कल्पना टाकाऊ असली तरी तिच्यामुळें अन्तःस्थ मनोवृत्ति समजण्यास मदत होते. अशीं स्वतंत्र आणि फुटीर राष्ट्रें मध्ययुगांत आढळून येत असत. जातिनिष्ठांच्या कल्पनेनें वसवलेलें हें मुसलमान राष्ट्र, खरें राष्ट्र न राहतां फक्त धर्मानें एकत्र जखडलेला देशसमुदाय असा त्याचा अर्थ होईल. त्यांची इच्छा अशी दिसते कीं, आधुनिक पद्धतीचीं राष्ट्रें असतांच उपयोगी नाहींत. आधुनिक संस्कृतीला कचऱ्याची पेटी दाखवून फिरून मध्ययुगांत प्रवेश करावा असा त्यांच्या म्हणण्यांतील तात्पर्यार्थ असावा. अशा राष्ट्रासाठीं नियता म्हणून साहजिकच एक अरेराव तरी हवा अगर परकीय सरकार तरी हवें. म्हणजे हा एक केवळ सावर्णी भावनांचा किल्ला उभा करण्यांत आलेला असून, आर्थिक प्रश्नांच्या धकाधकींतून आसरा घेण्यासाठीं तो फार उपयुक्त ठरणार आहे. भावनावेगांत तर्कशास्त्रसुद्धां वाहून जातें हेंच खरें; पण भावनांचीं उपेक्षा करूनहि चालणार नाहीं. 'मुसलमान राष्ट्र' ही मात्र केवळ एक टूमच आहे. वृत्तपत्रांनीं गाजावाजा केला नसता तर लोकांच्या कानीं हे शब्द पोंचले देखील नसते. ह्या कल्पनेवर कांहीं व्यक्तींचा दृढ विश्वास असला तरी वास्तविक जगाच्या स्पर्शाबरोबर हें कल्पनांचें धुकें वितळून जाईल.

हिंदु-मुसलमान संस्कृतींच्या कल्पनांचेंहि असेंच होणार. राष्ट्राराष्ट्रांतील संस्कृतींमधील भिन्न भाव नष्ट होत असून सांस्कृतिक दृष्ट्या जग हें एकसंध देहाप्रमाणें होत चालले आहे. भाषा, रीतिरिवाज, विचारसरणी वगैरे राष्ट्राचा खास वारसा राष्ट्रापाशीं बराच काळपर्यंत राहील. परंतु यंत्रशक्तीच्या व विज्ञानाच्या साहाय्यानें व बातम्या, नभोवाणी, चित्रपट वगैरेंच्या द्वारां सर्व राष्ट्रें अधिकाधिक एकरूप होत जातील. सलग्न होण्याची ही प्रवृत्ति क्रमप्राप्त आहे व ती कोणींहि अटकावूं शकणार नाहीं. वज्राघात होऊन आधुनिक संस्कृतीच्या ठिकऱ्या उडाल्या तर गोष्ट वेगळी. हिंदु व मुसलमान यांच्यामधील तत्त्वज्ञानाची परंपरा भिन्न असली, तरी आजच्या शास्त्रीय व औद्योगिक काळांतील दृष्टिकोणाशीं तुलना करून पाहिली म्हणजे या दोन तत्त्वज्ञानांतील भेद फार मोठा आहे असें वाटत नाहीं. हिंदुस्थानांत खरें रण हिंदु व मुसलमान संस्कृति यांच्यामध्यें माजलेलें नसून ह्या दोन्ही संस्कृति व त्या दोहोंपासून अत्यंत भिन्न असणारी जो आधुनिक संस्कृति त्यांच्यामध्यें माजलें आहे. मुसलमान संस्कृतीचें जतन करण्याची तळमळ ज्यांना लागली असेल, त्यांनीं हिंदु संस्कृतीकडे भयचकित मुद्रेनें पाहण्याची जरूरी नाहीं; त्यांनीं पश्चिमेकडून आलेल्या रावणाचा प्रतिकार करण्याची तयारी ठेवावी. आधुनिक संस्कृतीची मुसंडी थोपविण्याचे कितीहि प्रयत्न हिंदु व मुसलमान संस्कृति यांच्या अभिमान्यांनीं केले तरी ते फसणार याविषयीं मला तरी तिळमात्र शंका नाहीं. आणि असले प्रयत्न

निष्फळ ठरले तर मला त्याबद्दल वाईटहि वाटावयाचें नाहीं. जेव्हां या देशांत आगगाडी आली तेव्हांच कोणती संस्कृति आपण स्वीकारणार तें ठरून गेलें. त्याची आपणास दाद नसेल, ती संस्कृति स्वीकारावी अशी आपणास इच्छाहि नसेल, तें वेगळें. आणि सर सय्यदांनीं अलिगड विद्यालय स्थापन केलें तेव्हांच हिंदी मुसल्मानांचें भवितव्य निश्चित झालें. खरें बोलावयाचें तर आवडनिवड पाहत बसावयाला आपणाला फुरसतच नव्हती. बुडणाऱ्या माणसानें सांपडेल त्याचा आधार घ्यावा. त्या वेळीं आवड कसली आणि निवड कसली ?

पण "मुसलमान संस्कृति" म्हणजे तरी काय ? अरब, पर्शियन व तुर्क लोकांनीं गाजवलेल्या पराक्रमांची स्मृति ? कीं भाषा ? कीं कला आणि संगीत कीं रीतिरिवाज ? आधुनिक मुसलमानी कला अथवा आधुनिक मुसलमानी संगीत असा शब्दप्रयोग कधीं कोणीं केलेला माझ्या ऐकिवांत नाहीं. येथील मुसलमानांच्या विचारसरणीवर अरबी व पर्शियन भाषांच्या द्वारां पुष्कळ संस्कार झाले. पण पर्शियन भाषेची जी छाप हिंदुस्थानवर पडली ती धार्मिक स्वरूपाची नव्हती. पर्शियन भाषा, पर्शियन चालीरीति वगैरे गोष्टी हजारों वर्षे इकडे झिरपून येत होत्या व उत्तर हिंदुस्थानांतील सगळ्या भूमींत त्या खोलपर्यंत मुरल्या होत्या. पाश्चात्य देशांत फ्रान्सची जी योग्यता, तीच पौर्वात्य देशांत पर्शियाची. तेथील भाषा व संस्कृति यांचे किरण भोंवतालच्या सर्व देशांत फांकत असत. हा संस्कृतीचा ठेवा सर्व हिंदुस्थानला मौल्यवान वाटावा असाच आहे.

निरनिराळ्या इस्लामी वंशांनीं व देशांनीं जीं महान् कृत्यें केलीं त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या अभिमानाचा बंध मात्र सर्वांत चिवट असा असणार. पण तुमच्या भिन्न भिन्न वंशांचा महनीय इतिहास विसरून जा असें मुसलमानांना कोणीच सांगत नाहीं. त्याविषयींची स्मृति पल्लवित राहावी अशी जर मुसलमानांची इच्छा असेल, तर त्या इतिहासाचें विस्मरण पाडण्यास कोण समर्थ होईल ? वास्तविक पाहतां आपण सर्व आशियांतील लोक युरोपच्या वर्चस्वाला हाणून पाडण्यासाठीं एक होऊं पाहणारे, म्हणून मुसलमानांच्या गतपराक्रमाचा ठेवा हा आपणां सर्वांच्याच मालकीचा आहे असें आपण मानिलें पाहिजे. अरब आणि स्पॅनिश लोकांच्या युद्धांचा अथवा धर्मयुद्धांचा ( क्रुसेड ) इतिहास वाचूं लागलें कीं, माझ्या मनांत नेहमींच अरबांविषयीं पक्षपात उत्पन्न होतो. निःपक्षपाती धोरण ठेवण्याचा कितीहि प्रयत्न केला, तरी आशियांतील लोकांचा प्रश्न आला कीं, माझी पक्षपाती वृत्ति उचल खाल्ल्याशिवाय राहत नाहीं.

'मुसलमान' संस्कृति ही काय चीज आहे तें समजून घेण्याचा मीं बराच प्रयत्न केला; पण मला त्याचा मुळींच कांहीं उलगडा झालेला नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील मध्यमवर्गापैकीं मूठभर मुसलमान आणि हिंदु लोकांवर पर्शियन भाषा आणि रीतिरिवाज यांचा पगडा बसलेला आढळतो. जनतेकडे पाहावें तर फार लांब नाहीं, फार आंखूड नाहीं असा एक विशिष्ट पायजमा, विशिष्ट तऱ्हेनें कापलेल्या

मिशा, मुळींच न कापलेली दाढी आणि एक प्रकारचा वेश हींच काय तीं " मुसलमान संस्कृतीचीं " लक्षणें त्यांच्यापाशीं उरलेलीं आहेत. खरें म्हणजे हे भेदमुद्रा शहरांतून विशेषेंकरून आढळतात. पण तेहि विलयास जात आहेत. मुसलमान शेतकरी आणि कामकरी त्यांच्या हिंदी बांधवांपेक्षां मुळींच निराळे दिसत नाहींत. मुसलमानांतील पांढरपेशा लोकांत मुद्धां दाढीचें प्रस्थ उरलेलें नाहीं. तथापि अलिगडच्या लोकांना तुर्की फेझ टोपी वापरण्यांत अद्यापि भूषण वाटतें. (तिला तुर्की म्हणतात, पण तुर्कस्ताननें ती केव्हांच भिरकावून दिली आहे.) मुसलमान स्त्रियांत साडीचा प्रसार होत आहे व पडद्यांतूनहि त्यांचें पाऊल हलकेच बाहेर पडूं लागलें आहे. दाढी-मिशा, शेंड्या वगैरे गोष्टी मला आवडत नाहींत, पण अभिरुचीबद्दलचे माझे नियम दुसऱ्यावर लादण्याचा मला काय अधिकार? परंतु काबूलमधील नागरिकांच्या दाढ्या सफा उतरवण्यास अमानुल्लानें सुरुवात केलेली पाहून मात्र मला फार आनंद वाटला होता हें कबूल केलें पाहिजे. सदोदित मागें मुरडून पाहणाऱ्या व हातांतून निसटून चाललेल्या गोष्टी पकडून ठेवण्यासाठीं सदोदित धडपड करणाऱ्या हिंदुमुसलमानांचें दृश्य मोठें करुणाजनक आहे. गतकालाचा उच्छेद करावा अथवा त्याला जलसमाधि द्यावी असें मी म्हणत नाहीं. खरोखर सुंदर अशा अनेक गोष्टींनीं आपला इतिहास अलंकृत झालेला आहे आणि त्या गोष्टी टिकूनहि राहतील हें निःसंशय. पण तसल्या सुंदर वस्तु रक्षण करण्यासाठीं त्या पुराणप्रिय व्यक्तींची धडपड चालू नसून केवळ निर्माल्यवत् आणि क्वचित् प्रसंगीं अहितकर अशा गोष्टींचें जतन करण्याचाच ते प्रयत्न करीत असतात!

अलीकडच्या कांहीं वर्षांत मुसलमानांना चांगलेच धक्के मिळाले असून त्यांनीं हृदयाशीं घट्ट धरून ठेवलेल्या मूर्ती छिन्नविछिन्न झाल्या आहेत. इस्लामी राष्ट्रांपैकीं अत्यंत पुढारलेलें असें राष्ट्र जें तुर्कस्तान त्यानें खिलापतीचा गाशा गुंडाळला इतकेंच नव्हे तर धर्मापासून एक एक हात तें दूरच सरकत आहे. आणि इकडे १९२० सालीं खिलापतीसाठीं आम्हीं केवढें पानिपत केलें! तुर्कस्तानच्या राज्यघटनेंत तुर्कस्तान हें मुसलमान राष्ट्र आहे असे शब्द घालण्यांत आलले असले, तरी त्याचें स्पष्टीकरण करतांना १९२७ सालीं केमालपाशानें स्पष्ट बजावलें कीं, " .... हे शब्द तडजोडीच्या स्वरूपाचे असून अनुकूल काल येताक्षणींच त्यांवर हरताळ फांसण्यांत येईल. " हा संकल्प त्यानें पुढें तडीसहि नेला अशी माझी कल्पना आहे. इजिप्त जरा सावधगिरीनें पण त्याच वाटेनें चालले आहे. तेथें राजकारणाचा धर्माशीं कांहीं एक संबंध ठेवण्यांत आलेला नाहीं. तोच प्रकार अरबी राष्ट्रांचा. खुद्द अरबस्तान मात्र मागसलेला असल्यामुळें तेथें जरा निराळी परिस्थिति आहे. इस्लामपूर्वीच्या काळांत नांदत असलेली संस्कृति डोळ्यांसमोर ठेवूनच पर्शिया *

* तेथील सरकारच्या नव्या हुकुमाप्रमाणें या देशाचें अधिकृत नांव इराण असें ठरलें आहे. —अनुवादक

आपला मार्ग आक्रमीत आहे. एवंच, जिकडे तिकडे धर्माला ओहोटी लागली असून राष्ट्रवादाच्या लाटा उचंबळत आहेत आणि त्या लाटांच्या पोटीं नव्या आर्थिक व सामाजिक "वादांची" खळबळ सुरू झालेली दिसत आहे. "मुसलमान राष्ट्र" आणि "मुसलमान संस्कृति" यांची गत काय होणार? भावी काळांत ब्रिटिश निशाणाखालीं फक्त उत्तर हिंदुस्थानांतल्या धार्मिक चिन्हा कायम राहणार आहेत कीं काय?

राजकारणांत गुरफटल्या गेलेल्या प्रश्नांकडे अधिकाधिक व्यापक दृष्टीनें पाहणें म्हणजेच प्रगति असा जर प्रगतीचा अर्थ असेल, तर जातिनिष्ठांचें व सरकारचें आतां-पर्यंतचें वर्तन जाणून बुजून आणि अव्याहतपणें प्रगतिविरोधी राहिलें आहे. कारण दृष्टि व्यापक न होतां ती अधिकाधिक संकुचित व्हावी असेच प्रयत्न त्यांनीं आतां-पर्यंत केले नाहींत काय?

५७

# ‘ रस्ता बंद ’

मला पकडून पुनः तुरुंगांत घालतील ही भीति कायमचीच होती. ब्रिटिश सरकारचा स्वभाव धर्म आणि माझा स्वभावधर्म यांच्यांत छत्तीसाचा आंकडा असल्यामुळे माझी मुस्कटदाबी होणें क्रमप्राप्तच होतें. या नित्य डोळ्यांपुढें दिसणाऱ्या संभवाचा परिणाम माझ्या कामावर झाला. कोणतेंहि काम स्वस्थपणें बसून करावें तर मन लागेना आणि मिळालेल्या वेळांत शक्य तितकें काम भरडून काढावें अशी तर माझी फार इच्छा होती.

तथापि मुद्दाम काढून पकडून घ्यावें असें मला मुळींच वाटत नव्हतें. म्हणून तुरुंगाच्या वाटेनें जाण्याचें मी शक्य तों टाळीत असें. प्रांतांतून व प्रांताबाहेर दौऱ्यासाठीं मला निमंत्रणें आलीं, पण मीं नकार दिला. कारण असा दौरा वावटळीप्रमाणें कांहीं काळ चालला असता, पण सरकारनें माझी लगेच उचलबांगडी केली असती. एकादां काम सुरू केल्यावर मध्येंच थांबवणेंहि शक्य झालें नसतें. गांवी अथवा वर्किंग कमिटीच्या सभासदांना भेटण्यासाठीं मी कोठें गेलों तर मात्र मी खुल्या मनानें जाहीर सभांतून भाषण करीत असें. जबलपूरला फार मोठी सभा व मिरवणूक झाली. दिल्ली येथे तर मीं कधीं पाहिला नसेल इतका श्रोतृसमुदाय जमला होता. या सभा इतक्या यशस्वी झाल्या कीं, असल्या प्रकारांची पुनरावृत्ति सरकारला खपणार नाहीं हें स्पष्ट दिसू लागलें. दिल्लीची सभा झाल्यानंतर मला पकडणार अशी दाट बातमी पसरली होती. पण मी त्या वेळीं बचावलों. अलाहाबादेला परत येतांना अलिगड येथील मुस्लिम विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपुढें भाषण करण्यासाठीं मी थांबलों होतों.

हरतऱ्हेचें राजकीय कार्य सरकारनें दडपून टाकलें असतां राजकारणाव्यतिरिक्त दुसऱ्या सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची कल्पना मला पसंत नव्हती. ज्यांचा आमच्या चळवळीशीं कांहीं एक संबंध नाहीं अशा अनेक किरकोळ गोष्टींमागें दडून राहण्याची प्रवृत्ति काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत बळावत चाललेली दिसली. ही प्रवृत्ति कितीहि स्वाभाविक असली, तरी त्या वेळीं तिला उत्तेजन देणें बरोबर नाहीं असें माझें मत होतें.

परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील कामाची योजना करण्यासाठीं १९३३ च्या ऑक्टोबरमध्यें संयुक्त प्रांतांतील कार्यकर्ते जमा झाले. त्या वेळीं प्रां. कॉं.

समिति बेकायदेशीर असल्यामुळें आम्हीं अधिकृत रीत्या सभा बोलावली नाहीं. कारण केवळ कायदेभंग करावा असा आमचा विचार नव्हता. सभेचें स्वरूप खाजगी असलें तरी त्यांत गुप्तपणा असा कोणत्याच प्रकारचा नव्हता. या बाबतींत सरकार कांहीं ढवळाढवळ करील कीं काय याविषयीं शेवटपर्यंत आम्हाला कांहींच कल्पना आली नव्हती. सभेमध्यें जागतिक परिस्थितीविषयीं म्हणजे आर्थिक मंदी, नाझीपंथ, कम्युनिझम वगैरे गोष्टींविषयीं बराच ऊहापोह झाला. इतर ठिकाणीं होणाऱ्या घडामोडींशीं हिंदुस्थानांतल्या चळवळीचा कसा संबंध पोंचतो ते आमच्या कार्यकर्त्यांना कळावें असा एकत्र जमण्यांतला हेतु होता. अखेरीला परिषदेनें एक समाजवादी ठराव पास करून कायदेभंग बंद करण्यांत येऊ नये असें आपलें मत जाहीर केलें. फार मोठ्या प्रमाणांत कायदेभंग चालणें शक्य नाहीं व वैयक्तिक सत्याग्रहसुद्धां थोड्याच वेळांत बंद पडेल याची जाणीव प्रत्येकाला झालेली होतीच. परंतु सरकारची दडपशाही कायम असल्यामुळें सत्याग्रह थांबवूनहि कोणताच फायदा होण्यासारखा नव्हता. तेव्हां केवळ मनःस्थिति प्रकट करण्यासाठीं म्हणूनच कायदेभंग चालू ठेवण्याचें आम्हीं ठरविलें. तथापि होतां होईल तों मुद्दाम वांकड्यांत शिरून शिक्षा अंगावर ओढवून घेऊं नये अशा सूचनाहि कार्यकर्त्यांना देण्यांत आल्या होत्या. त्यांनीं आपलें नित्याचें काम करीत राहावें व तें करीत असतां शिक्षा झाली तर तिचा आनंदानें स्वीकार करावा असें धोरण ठरविण्यांत आलें. विशेष काम म्हणून त्यांनीं शेतकऱ्यांशीं असलेल्या परिचयाला पुनः उजळा देऊन खंडमुटीचा व सरकारी दडपशाहीचा शेतकऱ्यांवर काय परिणाम झाला आहे त्याचें निरीक्षण करावयाचें होतें. खंडबंदीचा त्या वेळीं प्रश्नच नव्हता. खंडबंदीची चळवळ पुणे-परिषदेनें अधिकृत रीत्या बंद केलेली होती आणि त्या काळच्या परिस्थितींत पुनः उठावणी करणेंहि शक्य झालें नसतें.

आम्हीं आंखलेला कार्यक्रम अगदीं सौम्य व सरकारच्या डोळ्यांत न खुपेल असा होता. परंतु बेकायदेशीर असें त्यांत कांहींहि नसलें तरी सरकार धरपकड केल्याशिवाय राहणार नाहीं अशी आम्हाला खात्री होती. त्याप्रमाणें कार्यकर्ते खेडो-पाडीं पोंचल्यावर खंडबंदी करण्याविषयीं प्रचार केला ह्या सबबीवर त्यांना पकडण्यांत आलें व शिक्षा हि झाल्या. अनेक कार्यकर्त्यांना अशा प्रकारें अटक झाल्यानंतर त्या भागांत खुद्द आपण स्वतः यावें असें माझ्या मनांत आलें; परंतु इतर कार्यक्रमांत मी गुंतून पडल्यामुळें माझें जाणें लांबणीवर पडलें. आणि त्यांतून मी मोकळा झालों तोंपर्यंत वेळ निघून गेली होती.

तेवढ्या वेळांत वर्किंग कमिटीचे सभासद देशांतील परिस्थितीचा विचार करण्यासाठीं दोनदां एकत्र जमले. वर्किंग कमिटी बेकायदेशीर होती म्हणूनच नव्हे, तर पुणे-परिषदेनंतर गांधीजींच्या सांगण्यावरून सर्वच कॉंग्रेस समित्या व अधिकाराच्या जागा तात्पुरत्या बंद करण्यांत आल्या असल्यामुळें वर्किंग कमिटीचा

अधिकृत असा कोणताहि व्यवहार त्या वेळीं चालू नव्हता. माझी स्थिति मोठी विचित्र झाली. तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर हें आत्मनिरोधनाचें शास्त्र मानावयाचें नाहीं असें ठरवून मीं स्वतःला कांग्रेसचा सरचिटणीस म्हणण्याचा क्रम चालूच ठेवला. परतु माझी अवस्था त्रिशंकूप्रमाणें झाली होती. ना कचेरी, ना हाताखालीं माणसें, ना अध्यक्ष. गांधीजींचा सल्ला मिळत असला तरी हरिजन-कार्यासाठीं काढलेल्या अखिल भारतीय दौऱ्यांत ते चूर असत. तथापि आम्हीं त्यांना दौऱ्यावर असतांनाच जबलपूर व दिल्ली येथें गांठून विचारविनिमय केला. तेथें वर्किंग कमिटींतील निरनिराळ्या सभासदांत असणारे मतभेद स्पष्ट दिसून आले. सगळ्यांना मान्य होईल असा मार्गच सांपडेना. कोंडींत सांपडल्याप्रमाणें झालें होतें. सत्याग्रह चालू ठेवावा अशा मताच्या, व सत्याग्रह बंद करावा असें म्हणणाऱ्यांच्या पारड्यांपैकीं कोणतें पारडें जड करावयाचें तें ठरविणें गांधीजींच्या हातीं होतें. त्या वेळीं गांधीजींचें मत सत्याग्रह चालू ठेवण्याला अनुकूल असल्यामुळें होती तीच स्थिति कायम राहिली.

कायदे मंडळाच्या निवडणुकी कॉंग्रेसनें लढवाव्या कीं नाहीं ह्याबद्दल कॉंग्रेस-वाल्यांत चर्चा सुरू असली तर त्या चर्चेंत भाग घेण्यांत तात्पर्य आहे असें वर्किंग कमिटीच्या सभासदांना वाटण्याचें कारण नव्हतें. आणि तशी चर्चा करणें उतावळेपणा-चेंहि दिसलें असतें. ' सुधारणा ' कायदा दोन तीन वर्षे तरी अस्तित्वांत येण्याचा संभव नव्हता, व मध्यवर्ती कायदेमंडळाच्या नव्या निवडणुकी होतील अशीहि कांहीं बातमी नव्हती. मी स्वतः निवडणुकी लढविण्याच्या विरुद्ध नव्हतों. वेळ आली म्हणजे कॉंग्रेसला निवडणुकींत भाग घ्यावा लागेल हें निश्चित दिसत होतें. तथापि तो प्रश्न त्या वेळीं उपस्थित केल्यामुळें बुद्धिभेद मात्र झाला असता. चळवळ चालू राहिली म्हणजे आमच्यापुढील प्रश्नाचें स्वरूप अधिक विशद होत जाईल व नरम वृत्तीच्या लोकांना कॉंग्रेसचें खोगिर बळकावणें शक्य होणार नाहीं अशी आशा मी बाळगून होतों.

वर्तमानपत्रासाठीं लेख लिहिणें व मुलाखती देणें वगैरे माझे उद्योग सुरूच होते. अर्थात् शाईंत थोडें पाणी मिसळूनच लेख लिहावे लागत. लेख छापले जावयाचे असल्याकारणानें नियंत्रकांच्या काकदृष्टीपासून व अनेकविध कायद्यांच्या कचाटींतून त्यांचा बचाव व्हावा म्हणून थोडी सावधगिरी ठेवणें भागच पडे. आणि धाडस करण्यास मी तयार झालों तरी मुद्रक, प्रकाशक व संपादक काय म्हणून तयार होतील? पण एकंदरींत उपरोक्त लोकांनीं माझ्याशीं फार सौजन्याचें वर्तन ठेविलें व मला अनेक बाबतींत बरीच मोकळीकहि दिली. अशी सवलत नेहमींच मिळे असें नाहीं. कधीं कधीं मुलाखती व लेखांतील कांहीं भाग गाळण्यांत येई. एकदां तर मीं बरेच श्रम घेऊन लिहिलेला सबंध लेखच्या लेख दडपून टाकण्यांत आला. वाचकांच्या हातीं तो कधींहि पडला नाहीं. मी कलकत्त्याला असतांना १९३४ च्या जानेवारींत तेथील एका प्रमुख दैनिकाचे संपादक मला भेटावयास आले. माझी एक मुलाखत

कलकत्त्यांतील सर्व संपादकांच्या 'दादा' कडे अभिप्रायासाठीं पाठविली, परंतु ती त्यांनीं नापसंत केल्याकारणानें आम्हांलाहि ती मागें ठेवावी लागत आहे असें त्यांनीं मला सांगितलें. हा सर्व संपादकांचा दादा म्हणजे सरकारनें नेमलेला एक नियंत्रक होय.

वृत्तपत्रांसाठीं दिलेल्या कांहीं मुलाखतींतून व पत्रकांतून कांहीं गटांवर व व्यक्तींवर मीं सडेतोड टीका करीत असें, म्हणून माझा त्यांना राग येई. गांधीजींच्या वृत्तीमुळे लोकांत असा एक समज प्रसृत झाला होता कीं कोणींहि उठावें आणि काँग्रेसवर हवें तसें तोंडसुख घ्यावें. त्याचा प्रतिकार होईल अशी भीति नको. टीकाकारांचा असा समज करून देण्याला खुद्द गांधीजीच कारणीभूत झालेले होते व बहुतेक काँग्रेसचे पुढारीहि त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून चालत आम्हींच संदिग्ध व सौम्य अशी भाषा वापरण्याचें धोरण ठेवल्यामुळें आमच्या टीकाकारांच्या विचारसरणींतील दोष आणि त्यांची संधिसाधु वृत्ति हीं कधींच चवाठ्यावर मांडली जात नसे व दोन्हीं बाजू खऱ्या मुद्द्यांच्या प्रश्नांना बगल देत. त्यामुळें फॅसिस्ट देशाव्यतिरिक्त इतर पाश्चात्य देशांत ज्या प्रकारची खुली चर्चा होते व जसे प्रहार प्रतिप्रहार होतात, तसें कांहींच येथें घडत नसे.

तुमच्या पत्रकांतील तडाखे पाहून आपण तर आश्चर्यचकित झालों असें माझ्या मैत्रिणीनें मला पत्रद्वारें कळविलें. एखाद्या मांजराप्रमाणें तुम्हीं भांडखोर झालेले दिसतां, आशाभंगाचा तर हा परिणाम नसेल ना! असा प्रश्न तिनें विचारला. तिचीं मतें मला विचारार्ह वाटत असत. त्यामुळें तिचें पत्र वाचून मला विस्मय वाटला. आशाभंगाचा कटु अनुभव ह्या देशांतील सर्वच लोकांना येत असतो. कांहीं अंशीं माझा व्यक्तिशः सुद्धां आशाभंग झालेला असेल, परंतु विचारदमन केल्यामुळें अथवा अपयश आल्यामुळें लागणारी आशाभंगाची टोंचणी माझ्या मनाला बोंचत होती असें मला वाटत नाहीं. राजकारणांत गांधीजींशीं माझा परिचय झाल्यापासून एवढी तरी गोष्ट मी शिकलों आहें कीं परिणामाच्या भीतीनें विचारांची मुस्कटदाबी करावयाची नाहीं. राजकारणाच्या क्षेत्रांत ह्या व्रताच्या पालनामुळें मला अनेक वेळां हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या असल्या, तरी एक प्रकारच्या समाधानाचा लाभहि झालेला आहे. मला वाटतें कीं अशी वृत्ति अंगीं होती म्हणून आशाभंगाची कीड आमच्या अंतःकरणाला कधींहि लागली नाहीं. शिवाय अनेक लोकांच्या मनांत आपल्याविषयीं स्नेहभाव वास करीत आहे ह्या कल्पनेनेंसुद्धां मनुष्याचें औदासीन्य बऱ्याच प्रमाणांत कमी होतें, व पराजयानें घायाळ झालेल्या मनाला आराम वाटतो. इतर लोक आपणाला विसरलेले आहेत, आपण जगांत एकाकी उरलेले आहों, ह्या कल्पनेसारखी हृदय जाळून टाकणारी दुसरी भयंकर कल्पना नाहीं.

असें असलें तरी विचित्र आणि दुःखमय अशा जगामध्ये थोडा तरी आशाभंग झाल्यावांचून कसा राहणार? अनेक वेळां असें वाटतें कीं, जगाचें रहाट-

गाडगें खासच उलटें फिरत आहे. आपण आपलें कर्तव्य बजावीत असलों तरी आजूबाजूच्या लोकांची कुवत पाहिली कीं मनांत संदेह उत्पन्न होतो. जगांतील घडामोडींची आणि मानवी व्यवहारांचा, इतकेंच काय तर व्यक्तींची व गटांची देखील मला चीड येते. आणि अलीकडे पोशाखी वृत्तीच्या माणसांचा तर मला अधिकाधिकच संताप येऊं लागला आहे. जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे त्यांचें लक्ष नाहीं; अशा प्रश्नांचा कोणीं उल्लेख केला तर तो त्यांना खपत नाहीं. कारण त्यामुळें त्यांच्या खिशाला चाट बसेल अथवा त्यांच्या आवडत्या रूढींचा भंग होईल अशी भीति त्यांच्या मनाला वाटत असते. पण अशा प्रकारें माझा आशाभंग झाला असला व मी रागीट आणि मांजरासारखा भांडखोर बनलों असलों, तरीहि स्वतःच्या व इतरांच्या दोषांकडे पाहून हंसण्याची वृत्ति माझ्या मनांतून लुप्त झाली आहे असें मला वाटत नाहीं.

ईश्वराच्या दयाळूपणावर लोकांची अलोट श्रद्धा असलेली पाहून मला केव्हां केव्हां आश्चर्य वाटतें. कितीहि धक्के बसोत, ती ढांसळत नाहीं. संकटामागून संकटें कोसळून ईश्वराचा कृपाळुपणा नाशाबित झाला तरीहि ईश्वरानें आपल्या श्रद्धेची परीक्षा घेण्यासाठींच हीं संकटें उत्पन्न केलीं आहेत असें त्यांना वाटतें. गेरार्ड हॉपकिन्स यांच्या सुंदर कवितेत व्यक्त झालेले विचार कित्येकांच्या अन्तर्यामीं स्फुरत असतील.

प्रगतीवरील, ध्येयावरील, कार्यावरील, मनुष्याच्या चांगुलपणावरील अथवा मानवजातीच्या भवितव्यावरील श्रद्धा ईश्वरावरील श्रद्धेप्रमाणेंच नाहीं काय? बुद्धिवादानें आपण त्यांचें समर्थन करूं लागलों तर तत्काळ अनेक अडचणी उत्पन्न होतात. आपल्या अंतरंगांतील कांहीं तरी तत्त्व केवळ त्या आशेवर आणि त्या श्रद्धेवरच फुलत पालवत राहिलेलें असतें. तेवढा ओलावा नसेल तर जीवन म्हणजे एखाद्या वैराण कातळाप्रमाणें तृणपर्णहीन बनून जाईल.

माझ्या समाजवादी मतप्रचाराच्या परिणामाकडे पाहून वर्किंग कमिटीवरील माझे कांहीं सहकारीसुद्धां बिथरले. गेलीं कित्येक वर्षे माझ्या मतप्रचाराकडे त्यांनीं कानाडोळा केला तसा पुढेंहि केला असता. पण आतां माझ्या कार्यामुळें वरिष्ठ-वर्गीय लोक दहशत खाऊं लागल्यामुळें मतप्रचाराचे निरुपद्रवी स्वरूप कमी कमी होऊं लागलें होतें. माझ्या सहकाऱ्यांचा समाजवादावर मुळींच विश्वास नाहीं हें मला माहित होतें. पण वर्किंग कमिटीचा सभासद असलों तरी माझ्या मतप्रचारानें तिचा हात कोणत्याहि प्रकारें गुंतण्याचा संभव नसल्यामुळें मला समाजवादाचा प्रचार करण्याची पूर्ण मुभा आहे अशी माझी समजूत होती. परंतु माझ्या कांहीं सहकाऱ्यांचें मत निराळें असल्याचें पाहून मला नवल वाटलें. माझ्या मतप्रचारा-मुळें ते पेंचांत सांपडले म्हणून त्यांचा मजवर रोष झाला. पण मी तरी काय करणार? मी ज्या कार्याचें महत्त्व अत्यंत मोठें समजत होतों, तें मीं अंगाबाहेर टाकावें

कीं काय ? काँग्रेससभेचीं माझें कर्तव्य व माझा विश्वास यांत विरोध उत्पन्न झाल्या-वर जागेचा राजीनामा देऊन बाजूस सरणें समुचित ठरलें असतें. परंतु वर्किंग कमिटी बेकायदा असतां व तिचें कामहि धडपणें चाललेलें नसतां राजीनामा तरी कसा देणार ?

डिसेंबर अखेर गांधीजींनीं मद्रासहून मला पत्र पाठविलें तेव्हां देखील हीच अडचण पुनः उपस्थित झाली. 'मद्रास मेल' मध्यें प्रसिद्ध झालेल्या आपल्या मुलाखतीचें कात्रण त्यांनीं मजकडे पाठविलें होतें. बातमीदारानें मजविषयीं प्रश्न टाकला असतां त्यांनीं माझ्या कार्याबद्दल जवळ जवळ दिलगिरी व्यक्त करणारे उद्गार काढले होते, व काँग्रेसच्या नांवानें मी ह्या नव्या विचारसरणीचा प्रचार करणार नाहीं असा माझ्या प्रामाणिकपणाबद्दल विश्वासहि प्रकट केला होता. माझ्या-बद्दलचा हा उल्लेख मला पसंत पडला नाहींच, पण जमीनदारी पद्धतीचें त्यांनीं जें समर्थन पुढें मांडलें होतें तें वाचून माझें डोकें बरेंच गरम झालें. ती पद्धति म्हणजे राष्ट्राच्या व शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाचें एक इष्ट अंग आहे असें त्यांना वाटत असल्याचें पाहून मी थक्कच झालों. कारण मोठ्या जमीनदारांचें व तालुक-दारांचें समर्थन करणारे फारच थोडे लोक सध्यां विद्यमान असतील. सर्व जगभर त्यांची प्रतिष्ठा पार नष्ट झाली असून, ते येथेंहि फार काळ टिकणार नाहींत याविषयीं बहुतेकांची खात्री पटलेली आहे. पुरेसा मोबदला मिळून ह्या पद्धतीची इतिश्री झाली तर ती खुद्द जमीनदार तालुकदारांनाहि हवी आहे.* तथापि गांधीजींना मात्र ती पद्धति इष्टच वाटत होती आणि निधिधारकत्व वगैरेसंबंधीं आपले विचार ते अद्यापि बोलून दाखवीतच होते. माझ्या त्यांच्या दृष्टिकोणांत केवढा हा मतभेद ! भविष्यकाळीं त्यांच्याबरोबर आपण कसें सहकार्य करणार, असे विचार माझ्या मनांत आले. वर्किंग कमिटींत मी राहावें कीं न राहावें ? तेव्हां तरी बाहेर पडण्याचा कांहींच मार्ग नव्हता, आणि पुढें मी तुरुंगांतच गेल्यामुळें वर्किंग कमिटींत राहावें कीं नाहीं या प्रश्नाला कांहीं महत्त्वहि उरलें नाहीं.

घरच्या आवरासावरींत माझा बराच वेळ गेला. आईची प्रकृति सुधारत होती पण अगदीं मुंगीच्या पावलांनीं. अद्यापि ती अंथरुणावरच पडून असली, तरी आतां प्रकृतीला धोका मात्र कांहींच राहिला नव्हता. पैशाअडक्याच्या व्यवहाराकडे मीं कित्येक दिवसांत पाहिलें नसल्यामुळें सगळीच बजबजपुरी माजली होती. आयापेक्षां खर्च जास्त होत होता, पण खर्चांत कात्री कोठें लावावी तें कळेना. हातांशीं पैसा उरला नाहीं असा काळ कधीं येईल म्हणून मी जवळ जवळ उत्सुकतेनें वाट पाहत

* अखिल बंगाल जमीनदार परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. पी. एन. टागोर यांचें भाषण: "आयर्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतील जमीनदारांना पुरेसा मोबदला देऊन त्यांच्या जमिनींचें राष्ट्रीकरण झालें तर व्यक्तिशः मला मुळींच खेद होणार नाहीं." (ता. २३ डिसेंबर, १९३४.)

होतों. आधुनिक जगांत पैसा व मालमत्ता यांचा फार उपयोग होतो खरा, पण लांबवर प्रवास करण्यासाठीं निघालेल्या माणसाला त्यांचें ओझें त्रासदायकहि होतें. कारण मालमत्ता नष्ट होईल, सरकारजमा होईल अशी भीति वाटत राहिल्यामुळें हातून धाडस घडत नाहीं. म्हणून जवळ जें कांहीं थोडेंफार उरलें होतें तेंहि संपून गेलें म्हणजे बरें असें मनांत येई. आमच्या गरजा अल्प असत आणि त्या भागवतां येतील इतकें आपण कमावूं असा आत्मविश्वासहि मला आला होता. राहणीचें मान कमी केल्यामुळें माझ्या आईला अखेरीच्या दिवसांत त्रास झाला; असें होऊं नये म्हणून मी दक्ष असें. माझ्या मुलीच्या शिक्षणाचीहि आबाळ होऊं नये असें मला वाटे. योग्य शिक्षण घ्यावयाचें तर माझ्या मतें तिला युरोपमध्यें ठेवणें जरूर होतें. ह्याव्यतिरिक्त गोष्टीकरितां माझ्या पत्नीला अथवा मला पैशाची विशेष अशी गरज नव्हती म्हटलें तरी चालेल. कदाचित् रिकामा खिसा म्हणजे काय याचा कधींच अनुभव नसल्यामुळेंहि आम्हाला असें वाटत असेल. आज गांठीला पैसा नाहीं असा काळ खरोखरीच आला तर मनाला गोड वाटणार नाहीं हे निश्चित. एका बाबतींत पैसा उधळण्याची मला चटक लागलेली आहे ती मात्र सुटणें शक्य दिसत नाहीं; ती बाब म्हणजे पुस्तकें खरेदी करणें.

जमाखर्चाची तात्पुरती तोंडमिळवणी करण्याकरितां माझ्या पत्नीचे दागिने व इतर चांदीचीं भांडींकुंडीं वगैरे सामान विकावें असें आम्हीं ठरविलें. दहाबारा वर्षांत कमलानें दागिना असा अंगावर चढवलाच नव्हता. सगळे दागिने बँकेंतच पडून होते. पण डाग विकण्याची कल्पना कमलाला पसंत पडली नाहीं. आपल्या मुलीला देणगी म्हणून ते द्यावेत असा तिचा बेत होता.

१९३४ ची जानेवारी उजाडली. अलाहाबाद जिल्ह्यांतील आमच्या कार्यकर्त्यांची धरपकड चालू असल्यामुळें आम्हांहि त्यांच्या मागोमाग खडोपाडीं जाणें इष्ट होतें. सं. प्रां. कॉ. समितीचे कर्तृत्ववान चिटणीस रफी अहमद किडवाई हे देखील अटकेंत पडले. स्वातंत्र्य-दिनाचा दिवस सव्वीस जानेवारी जवळ येत चालला. तो सुना जाऊं देणें शक्य नव्हतें, कारण वटहुकुमांना आणि निर्बंधांना न जुमानतां १९३० सालापासून तो दरवर्षी साजरा करण्याचा प्रघात पडून गेला होता. पण पुढाकार घेणार कोण? आणि सांगणार काय? ऑ. इ. कॉंग्रेसच्या अधिकारी वर्गापैकीं नांवाला कां होईना अधिकारी म्हणून मींच तेवढें काम चालविलें होतें. मित्रांचा सल्ला विचारला तेव्हां कांहीं तरी केलें पाहिजे या बाबतींत एकमत दिसलें. पण काय करावें ते एकमतानें ठरेना. मोठ्या प्रमाणावर धरपकड होईल अशी कोणतीहि गोष्ट होतां होईल तों टाळावी अशी वृत्ति दिसून आली. सरते शेवटीं स्वातंत्र्यदिन योग्य प्रकारें साजरा करावा अशा आशयाचें एक छोटेंसें विनंतिपत्रक मीं प्रसिद्ध केलें. कोणत्या रीतीनें तो साजरा करण्यांत यावा तें स्थानिक

कार्यकर्त्यांनीं ठरवावयाचें होतें. अलाहाबाद जिल्ह्यांत स्वातंत्र्यदिन बऱ्याच विस्तृत प्रमाणावर साजरा होईल अशी आम्हीं व्यवस्था करून ठेविली.

आमची अशी अटकळ होती कीं, स्वातंत्र्यदिनाच्या बाबतींत खटपट करणारांस त्या दिवशींच पकडण्यांत येईल. तेव्हां तुरुंगांत जाण्यापूर्वी बंगालमध्यें जाऊन यावें असा मी बेत केला. जुन्या सहकाऱ्यांना भेटण्याची इच्छा होतीच. परंतु गेल्या कांहीं वर्षांत अभूतपूर्व अशीं संकटें बंगाल प्रांतानें ज्या धैर्यानें सहन केलीं, त्या धैर्याबद्दल आदर व्यक्त करण्याचाहि माझा मानस होता. बंगालच्या जनतेला मदत करणें आपणाला शक्य नाहीं हें मी ओळखून होतों. कारण सहानुभूतीनें कितीसें कार्य होणार? पण तीदेखील हवीशी वाटतेच. संकटकाळीं सर्व हिंदुस्थाननें आपणाकडे पाठ फिरवली, आपण असहाय पडलों आहोंत अशी बंगालची समजूत झाली होती. बंगाल-संबंधीं इतर प्रांतांची वृत्ति तशी नसली, तरी तेथें हा गैरसमज पसरला होता खरा.

कमलाची प्रकृति दाखविण्यासाठींहि कलकत्त्याला जाणें जरूर होतें. पण तुरुंगाबाहेरचा काळ शक्य तेवढा एकमेकांच्या सहवासांत जावा अशी मनांतून इच्छा असल्यामुळें तिच्या प्रकृतीची हयगय चालली होती. "मी तुरुंगाआड झालों कीं, हवा तेवढा वेळ मिळेल; मग डॉक्टर, पथ्यपाणी आणि ती" असा माझ्या मनांत विचार येई. पण आतां लवकरच आपण अटकेंत पडणार; तेव्हां तिच्या प्रकृतीचें निदान तरी आपल्या समक्ष करावें असें मीं ठरविलें. बाकीचें मग यथावकाश उरकतां आलें असतें.

१५ तारखेला कलकत्त्याला जाण्याकरितां निघावयाचें असें कमलनें आणि मीं ठरविलें. कलकत्त्याहून परत आल्यावर स्वातंत्र्यदिनाच्या तयारीसाठीं पुरेसा वेळ मिळावा म्हणून इतक्या लवकरचा बेत धरला होता.

## ५८

# धरणीकंप

१९३४ जानेवारीच्या १५ तारखेची दुपार. आमच्या घराच्या व्हरांड्यांत उभा राहून मीं कांहीं शेतकऱ्यांबरोबर बोलत होतों. वार्षिक माघ मेळ्याला आरंभ झाला असल्यामुळें आमच्या घरीं लोकांची एकसारखी रीघ लागून राहिली होती. एकाएकीं माझे पाय लटपटूं लागले आणि तोल सांवरतां सांवरतां नाकीं नऊ आले. जवळच्या एका खांबाला मी घट्ट धरून राहिलों. दरवाजे दणदण आपटूं लागले व जवळच्या स्वराज्य-भवनावरील कौलें घसरत होतीं त्यांचा गडगडाटासारखा आवाज होऊं लागला. धरणीकंपाचा कांहींच अनुभव नसल्यानें प्रथम हा काय प्रकार चालला आहे तेंच उमगेना. पण लौकरच सर्व प्रकार लक्षांत आला, व हा नवा अनुभव मला मोठा मजेशीर वाटला. शेतकऱ्यांना उद्देशून चाललेलें भाषण मीं सुरू ठेविलें आणि त्यांना धरणीकंपाची माहिती सांगूं लागलों. इमारतीच्या बाहेर धूम ठोक असें माझी वृद्ध आत्या मला ओरडून सांगत होती. पण ती कल्पनाच मला वेडेपणाची वाटली. धरणीकंपाची मला फारशी भीति वाटत नव्हती. आणि कांहींहि झालें असतें तरी अंथरुणाला खिळलेल्या आमच्या आईला आणि वर सामानाची बांधाबांध करीत असलेल्या माझ्या पत्नीला तसेंच सोडून मी दूर जाणें शक्यच नव्हतें. बराच वेळ धक्के बसत होते. मग ते थांबले. थोडा वेळ तो एक चर्चेचा विषय होऊन राहिला होता. नंतर कोणालाच त्याची आठवण राहिली नाहीं. बिहारमधील लक्षावधि लोकांना तीं तीन मिनिटें कशीं गेलीं असतील त्याची आम्हास त्या वेळीं दाद ना खबर.

त्या रात्रींच आम्ही कलकत्त्यास गेलों. धरणीकंपानें उध्वस्त झालेल्या बिहारच्या दक्षिण भागांतून आमची गाडी गेली, पण आम्हाला कांहींच कल्पना आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं कलकत्त्याला धक्क्याची अगदीं उडत उडत बातमी कळली. नंतर हळूहळू फुटकळ बातम्या येऊं लागल्या. व तिसऱ्या दिवशीं संकटाचा स्थूल आराखडा आमच्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

आमच्या कलकत्ता येथील कार्यक्रमांत आम्ही मग्न होतों. अनेक डॉक्टरांच्या वरचेवर भेटी घ्याव्या लागत. अखेरीस एक-दोन महिन्यांनीं औषधोपचारासाठीं कमलनें पुनः कलकत्त्यास यावें असें ठरलें. पुष्कळ दिवसांत मित्रांच्या व कॉंग्रेसमधील सहकाऱ्यांच्या गांठीभेटी झाल्या नव्हत्या त्याहि झाल्या. पण तेथे

असतांना सर्व काळ छातीवर कसलें तरी दडपण पडल्याप्रमाणें मला वाटत होतें. सरकारची वक्र दृष्टि आपणांकडे वळेल या भीतीनें लोक हातपाय हालविण्यासहि तयार नव्हते असें दिसून आलें. त्यांनीं स्वपच हाल सोसले होते. हिंदुस्थानांत दुसऱ्या कोठें घेत नसतील इतकी दक्षता कलकत्त्याचीं वृत्तपत्रें घेत असत. इतर प्रांतांतल्याप्रमाणें येथेंहि पुढील कार्याविषयींच्या विचारांत अस्पष्टता व गोंधळ आहे असें आढळून आलें. भीतीपेक्षां त्या संदेहवृत्तीमुळेंच काम होत नसावें. कलकत्त्याला फॅसिस्ट, समाजवादी व कम्युनिस्ट असे सर्व प्रकारचे विचार दृष्टीस पडले. निरनिराळ्या विचारसरणीच्या गटांना एकमेकांपासून अलग करणेंहि मोठें कठिण काम होतें; कारण विचारांची गुंतागुंत होऊन गेली होती. दहशतवाद्यांच्या चळवळीचा ताशा सरकार सारखा बडवीत असलें, तरी त्याविषयींची अधिक चौकशी करण्याची संधि मला मिळाली नाहीं व मला तितकी सवडहि नव्हती. तथापि दहशतवादाला राजकारणाच्या दृष्टीनें मुळींच महत्त्व उरलें नसून खुद्द दहशतवाद्यांचा त्या कार्यपद्धतीवरील विश्वास उडाला असल्याचें मला समजलें. ते निराळ्या दृष्टीनें विचार करूं लागले होते. सरकारी दडपशाहीमुळें मात्र सूडाची भावना जागृत होऊन कांहीं व्यक्ति खवळून जात व त्यांची वैरबुद्धि जागृत होई. दोन्ही पक्षांत सूडाची भावना खोल रुजल्याप्रमाणेंच व्यवहार घडत होते. दहशतवादी कृत्यें घडूं लागलीं कीं कोणतेहि सरकार त्यांचा बीमोड करण्याचा प्रयत्न करणारच. पण सुक्याबरोबर ओल्यालाहि सरसकट भाजीत जाण्यापेक्षां धीमेपणानें आपला व्यवहार चालविणेंच सरकारला जास्त शोभून दिसतें. कदाचित् अशा प्रसंगीं सावधानता राखणेंहि अशक्य होत असेल. दहशतवादाचीं कृत्यें हीं रोगाच्या बाह्य लक्षणाप्रमाणें आहेत. रोगाचें उच्चाटन न करतां केवळ बाह्य लक्षणावर उपाय करीत बसणें व्यर्थ होय.

दहशतवाद्यांशीं संबंध ठेवल्याचा आरोप ज्या तरुण स्त्री-पुरुषांवर करण्यांत येतो, त्यांच्यापैकीं अनेकजण गुप्त कामाचें आकर्षण वाटल्यामुळें तिकडे वळत असावेत. धाडसी प्रवृत्तीच्या तरुणतरुणींना गुप्त व साहसाचीं कामें साहजिकच प्रिय असतात. बित्तंबातम्या आपणाला कळाव्या, बाहेर ज्याच्याविषयीं एवढा डांगोरा पिटला जात आहे तें आहे तरी काय व गुप्तपणें वावरणारे हे लोक तरी कोण आहेत तें पाहावें असें त्यांना वाटतें. गुप्त पोलिसांच्या गोष्टीविषयीं जशी उत्सुकता तशीच दहशतवाद्यांबद्दल. दहशतवादी कृत्य आपण करावें अशी त्यांचीं मुळींच इच्छा नसते; पण पोलिसांचें तर्कशास्त्र असें धावतें कीं, शंकास्पद लोकांशीं ज्यांचा ज्यांचा नुसता संबंध असेल, ते सगळेच शंकास्पद. दुर्दैवाचा विशेष जोर नसला तर स्थानबद्धता अथवा राजकीय कोंडवाडा एवढ्यावरच भागतें.

कायदा आणि व्यवस्था यांच्यासाठीं ब्रिटिशांचे गोडवे गाण्यांत येतात. कायदा व व्यवस्था ह्यांचा मी देखील चाहता आहे. जीवनांत शिस्त असणें मला आवडतें. गोंधळ,

गैरव्यवस्था आणि गबाळेपणा यांचा मला मोठा तिटकारा आहे. पण जनतेच्या माथीं सरकारकडून जो कायदा व जी व्यवस्था लादण्यांत येते, त्यांच्याविषयीं स्वतःच्या कटु अनुभवामुळें माझें मन साशंक झालें आहे. सत्तारूढ गटाची इच्छा म्हणजे कायदा आणि सर्वत्र भीतीमुळें प्रस्थापित झालेली शांतता व निःशब्दता म्हणजेच सुव्यवस्था. ज्या राष्ट्रांतील व्यवस्था सरकारच्या दंडुकेशाहीवांचून टिकूं शकत नाहीं, त्या राष्ट्रावर लष्करशाही चालू आहे. असेंच म्हटलें पाहिजे. एक हजार वर्षांपूर्वी लिहिलेल्या कल्हण कवीच्या राजतरंगिणी नांवाच्या ऐतिहासिक महाकाव्यांत कायदा व व्यवस्था यांच्या ऐवजीं धर्म व अभय असे शब्द वापरलेले असून त्यांचें रक्षण राजानें प्रयत्नपूर्वक करावें असें सांगितलें आहे. यावरून त्या काळीं कायद्याची कल्पना अधिक उच्च प्रकाराची असावी, व लोकांतील निर्भय वृत्तीवरच राज्यांतील सुव्यवस्था अवलंबून असणें योग्य आहे अशी समजूत असावी. लोकांच्या डोक्यावर जबरदस्तीनें शांतता लादण्यापेक्षां त्यांच्या मनांत निर्भय वृत्ति बाणावी म्हणून प्रयत्न व्हावेत, ही कल्पना कितीतरी पटींनीं अनुकरणीय अशी वाटते.

कलकत्त्यास आम्हीं साडेतीन दिवस राहिलों; पण तेवढ्यामध्यें मीं तीन ठिकाणीं जाहीर व्याख्यानें दिलीं. पूर्वीप्रमाणें ह्याहि खेपेला मीं दहशतवाद्यांच्या कृत्यांचा निषेध केला व तीं कशीं अहितकारक आहेत तें दाखवून दिलें. नंतर बंगालमध्ये चालू असलेल्या दडपशाहीचाहि मीं समाचार घेतला. बंगाल प्रांतांत घडून आलेल्या प्रसंगांनीं माझें अंतःकरण हेलावून गेलेलें असल्यामुळें मी बोललों तें सर्व अत्यंत तळमळीनें बोललों. सर्व जनतेवर सारासार विवेक न करतां दडपशाही करून सरकारनें मनुष्यजातीची जी अप्रतिष्ठा केली होती, त्याबद्दलचें दुःख माझ्या मनाला विशेष जाणवत होतें. ह्या अप्रतिष्ठेच्या प्रश्नामुळें राजकीय प्रश्नाला दुय्यम स्थान प्राप्त झालें होतें. ह्या तीन भाषणांवरूनच पुढें माझ्यावर तीन निरनिराळे आरोप ठेवण्यांत येऊन मला जी शिक्षा करण्यांत आली ती अद्यापि चालूच आहे.

कलकत्त्याहून रवीन्द्रनाथ टागोर यांना भेटण्यासाठीं म्हणून आम्हीं शांतिनिकेतन येथें गेलों. त्यांची भेट झाली म्हणजे आनंदाचा ठेवाच मिळाल्याप्रमाणें वाटे. ह्यापूर्वी मी दोनदां शांतिनिकेतनला गेलों होतों. कमला मात्र प्रथमच येत होती. आमच्या मुलीला येथें ठेवण्याचा विचार असल्यामुळें जागा एकदां पाहावी म्हणून मुद्दाम कमला तेथवर आली होती. इंदिरा लवकरच मॅट्रिक्युलेशन परीक्षेला बसणार असल्यामुळें तिला कोठें ठेवावें, असा प्रश्न आम्हांला पडला होता. सरकारी अथवा निमसरकारी शाळांतून तिनें शिकावें ही गोष्ट मला मुळींच पसंत नव्हती. तेथील सर्वच वातावरण बुद्धि खुरटून टाकणारें व अरेरावीचें असें असतें. अशा शाळांतून देखील उत्तम दर्जाच्या स्त्रिया व पुरुष निर्माण झालेले आहेत व होतील यांत शंका नाहीं. परंतु तरुणांच्या उच्च भावना खुडून व वठवून टाकण्याचें कार्य विश्वविद्यालयांतून होत असतें. हा आरोप अशा अपवादामुळें नाहींसा होणें शक्य नाहीं.

शांतिनिकेतनांत असली दंडुकेशाही नसल्यामुळें तीच जागा आम्हीं पसत केली. परत येत असतां पाटणा येथें थांबून धरणीकंपसाहाय्याच्या प्रश्नासंबंधीं राजेन्द्रबाबूंबरोबर चर्चा झाली. तुरुंगांतून त्यांची नुकतीच सुटका झालेली होती, व बिनसरकारी साहाय्याच्या कामाचें नेतृत्व ओघानेंच त्यांच्याकडे आलें होतें. आमचें येणें अगदींच अनपेक्षित असें झालें. कारण आम्हीं केलेल्या तारा तेथें पोंचल्याच नाहींत! कमलेच्या भावाकडे आम्हीं उतरणार होतों, पण तें घर जमीनदोस्त होऊन गेलें होतें. तेव्हां इतरांप्रमाणें आम्हीहि उघड्यावरच राहिलों.

दुसऱ्या दिवशीं आम्हीं मुजफ्फरपूरला गेलों. धरणीकंप होऊन बरोबर सात दिवस लोटून गेले होते तरीहि मुख्य रस्ते सोडून इतर ठिकाणच्या दगडविटांच्या राशी बाजूला करण्याचा मुळींच प्रयत्न झालेला दिसला नाहीं. सफाईचें काम चालू असतांना अनेक प्रेतें बाहेर काढण्यांत येत होतीं. तेथील उध्वस्त झालेलीं घरें पाहून मनांत भीतीच्या व गांभीर्याच्या भावना निर्माण होत. धरणीकंपांतून [illegible] बाहेर पडलेलीं माणसें घाबरून अर्धवेडीं झालेलीं दिसलीं.

अलाहाबादला आल्यानंतर काँग्रेसमधील व काँग्रेसबाहेरील लोकांनीं [illegible] वण्याच्या कामाला अंग झाडून सुरवात केली. धरणीकंप झाल्यामुळें २६ [illegible] स्वातंत्र्यदिन तहकूब करावा असें कांहीं सहकाऱ्यांचें मत पडलें. परंतु धरणीकंप झाला म्हणून आमच्या कार्यक्रमांत खंड कां पडावा तें मला व माझ्या दुसऱ्या कांहीं सहकाऱ्यांना कळेना. २६ जानेवारी रोजीं अलाहाबाद जिल्ह्यांतील अनेक [illegible] तून सभा भरल्या. शहरांतहि सभा झाली व आम्हांला अपेक्षेबाहेर यश [illegible] पोलिस ह्या कार्यक्रमांत विघ्न आणतील अशी कल्पना होती. परंतु [illegible] गोष्ट म्हणजे तसें कांहींच घडून आलें नाहीं. आमच्या जिल्ह्यांतील कांहीं [illegible] व इतर कांहीं शहरांतून थोडीफार धरपकड झाली असेल तेवढीच.

बिहारमधून परत आल्यानंतर लगेच मीं एक जाहीर पत्रक काढून मदतीची याचना केली. धरणीकंप झाल्यानंतरच्या पहिल्या कांहीं दिवसांत सरकारनें जी दिरंगाई दाखविली तिच्यावर मीं त्या जाहीर पत्रकांत टीका केली होती. धरणीकंप झालेल्या भागांतील सरकारी अधिकाऱ्यांवर माझा टीका करण्याचा इरादा नव्हता. कारण कोणाचेंहि धैर्य कसास लागेल अशा परिस्थितीशीं त्यांना टक्कर द्यावयाची होती. मात्र मीं त्यांनाच अनुलक्षून लिहिलेलें आहे अशी समजूत होण्याजोगे शब्द दुर्दैवानें माझ्या लेखांत आले ही गोष्ट खरी. तथापि बिहार सरकारनें दगड-मातीचे ढीग उचलून टाकण्याच्या कामीं फारशी चलाखी दाखविली नाहीं, असें मात्र माझें ठाम मत होतें. तशी तत्परता दाखविली असती, तर अनेक जीव वांचले असते. एकट्या मोंगीर शहरांतच हजारों लोक मृत्युमुखीं पडले. मी तीन आठवड्यांनी तेथें गेलों, तेव्हांदेखील दगडमातीच्या राशींच्या राशी तशाच पडून होत्या. कांहीं मैलांच्या अंतरावर जमालपूर येथें हजारों रेल्वेकामगारांची वसाहत होती; तेथील

मजुरांचा धरणीकंप झाल्याबरोबर थोड्याच अवधींत उपयोग करून घेणें शक्य झालें असतें. धरणीकंप झाल्यानंतर बाराबारा दिवसांनीं माणसें जिवंत निघालीं. मालमत्ता सुरक्षित राहावी म्हणून मात्र सरकारनें तावडतोब इलाज केले, पण जमिनींत ढिगाऱ्या-खालीं गडप झालेल्या लोकांना बाहेर काढण्याच्या बाबतींत व्हावी तशी खटपट सरकारच्या हातून झाली नाहीं. त्या टापूंतील नगरपालिकेचें कामहि थंड पडलें होतें असें दिसलें.

माझी टीका योग्य होती असें मला वाटतें. आणि धरणीकंप झालेल्या भागां-तील लोकांचें मतहि माझ्याप्रमाणेंच होतें, असें मलाहि मागाहून समजलें. परंतु टीका योग्य असो वा अयोग्य असो, मीं ती प्रामाणिकपणें केली होती. त्यांत सरकारला दोष देण्याचा इरादा नसून काम तातडीनें सुरू व्हावें म्हणून सरकारला इषारा देण्याचीच इच्छा होती. सरकारनें बुद्ध्या तसें वर्तन केलें असा आरोप कोणीच केला नव्हता. प्रसंग अगदीं अभूतपूर्व आणि धिराची बोथडी वळवील असा असल्यामुळें हातून चुका घडणेंहि स्वाभाविक होतें. माझ्या माहितीप्रमाणें त्यानंतर बिहार सरकारनें अत्यंत नेटानें व दक्षतेनें संकटनिवारणाचें काम हातीं घेतलें.

तथापि माझी ही टीका सहन न होऊन बिहारमधील कांहीं लोकांनीं मला प्रत्युत्तर म्हणून व सरकारची शिफारस म्हणून एक जाहीरपत्रक प्रसिद्ध केलें. धरणीकंप व त्यामुळें आवश्यक झालेल्या गोष्टी यांना गौण स्थान देऊन सरकारवर टीका झाली असतां आधीं आपली राजनिष्ठा व्यक्त करणें हेंच अधिक महत्त्वाचें काम आहे अशी ह्या राजशासकांची समजूत असावी. हिंदुस्थानांत सर्वत्र आढळ-णाऱ्या मनोवृत्तीचें हें एक अत्युत्तम उदाहरण आहे. येथें सरकारवर टीका केला तर ती सहन होत नाहीं. पण पाश्चात्य देशांत सरकारवर अशी टीका नेहमींच होत असते. येथील मनोवृत्ति उफराटा स्वरूपाची असल्यामुळें टीका झाली कीं सरकारचा तिळपापड होतो. राजाच्या हातून कधीं चूक होत नाहीं असा ब्रिटिश राज्यघटनेंतील एक संकेत आहे; त्याचप्रमाणें येथील नोकरशाहीचा असा संकेत आहे कीं हिंदुस्थान सरकार कधीं चुकत नाहीं आणि सरकारकडून चूक झाली असें नुसतें सूचित करणें म्हणजे सुद्धां प्रत्यक्ष राजाचा उपमर्द करण्याप्रमाणें आहे.

सरकार फार कडक अथवा जुलमी आहे असा आरोप केला असतां जितका राग येतो त्याहून तें गचाळ आहे, अथवा नालायक आहे असा आरोप केला तर सर-कारला अधिक राग येतो. जुलुमासंबंधींच्या तक्रारींना सरकार निढावलें आहे. आणि एका अर्थी जनतेनें अशा तक्रारी कराव्या हें साम्राज्यवाद्यांना भूषणास्पदच नव्हे काय? परंतु अधिकारी नालायक आहेत अथवा त्यांच्या अंगीं चारित्र्य नाहीं, असा आरोप केला म्हणजे त्यांच्या अहंकारावर घाव घातल्याप्रमाणें होतें.

ब्रिटिशांचें वर्चस्व कमी झालें अथवा नष्ट झालें तर हिंदुस्थानच्या कारभारांत कमालीची अदाधुंदी माजणार असा जणूं कांहीं सिद्धांतच ठरून गेला आहे. इंग्रजांचा

सर्वसाधारणपणे अशीच समजूत झालेली असते व ती ते पुष्कळदां बोलूनहि दाखवतात. हा समज भ्रम असला तरीहि प्रगतिपर व जहाल मताचे इंग्रज लोक मोठ्या उदार-मनस्कतेनें असे विचार प्रगट करतात कीं, ‘ कांहीं झालें तरी स्वराज्याची महती सुराज्याला प्राप्त होणें शक्य नाहीं, म्हणून हिंदी लोकांना स्वराज्यपत्र दिलें पाहिजे. मग ते मसणांत कां जाईनात? जाऊ देत, त्यांची उठाठेव आपणाला नको. ’ ब्रिटिश वर्चस्व नाहींसें झालें तर हिंदुस्थानवर काय प्रसंग ओढवेल हें मीं काय सांगणार? येथून निघून जातांना ब्रिटिश लोक कशा प्रकारची वर्तणूक ठेवतात, हिंदुस्थानवर कोणाची सत्ता प्रस्थापित होते वगैरे अनेक राष्ट्रीय व आन्तरराष्ट्रीय गोष्टींवर देशाचें भवितव्य अवलंबून राहील. ब्रिटिशांची मदत घेऊन देखील सध्यां आहे त्याहून अधिक नालायक व सर्वतोपरी अधिक गचाळ अशी राज्यव्यवस्था येथें प्रस्थापित करतां येणें शक्य आहे, असे मला वाटतें. उलट सध्याच्या राज्यकारभारापेक्षां अधिक चोख व हिंदी लोकांच्या दृष्टीनें अधिक हितकारक अशी राज्यव्यवस्था ब्रिटिशांच्या मदतीवांचूनहि येथें सहज प्रस्थापित करून दाखवितां येईल. असा मात्र संभव आहे कीं, शासनयंत्रांतील हिंसक चक्रें आतां इतक्या बिनचूकपणानें चालणार नाहींत, व राज्यकारभाराचीं यंत्रें देखील आतांइतकीं चकचकीत दिसणार नाहींत. पण उत्पादनाचीं, उपभोगाचीं आणि जनतेच्या शारीरिक, मानसिक व सांस्कृतिक उन्नतीला पोषक अशीं कार्यें मात्र अधिक दक्षतेनें व धडाडीनें सुरू होतील, हें निःसंशय. कोणत्याहि देशाला स्वराज्य उपकारकच ठरेल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. पण खऱ्या-खुऱ्या स्वराज्याचा अभाव असेल तर मात्र स्वराज्याची किंमत मला वाटणार नाहीं. जनतेचें हित साध्य होत असेल तरच स्वराज्यांत राहाण्याचा फायदा. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अंगीं सुराज्याची प्रस्थापना करून जनतेच्या राहणीचा दर्जा सुधारण्याची पात्रता उरलेली नाहीं, अशी माझी खात्री झालेली असल्यामुळेंच तें हिंदुस्थानच्या दृष्टीनें निरुपयोगी झालें आहे, असें मी म्हणतों. सध्यापेक्षां लोक-कल्याणाविषयीं दक्ष असें शासनयंत्र, जनतेच्या राहणीच्या दर्जाची सुधारणा, औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्रांची वाढ आणि साम्राज्यशाहीच्या दडपशाहीमुळें दृढमूल झालेल्या भीतिग्रस्त मनोवृत्तींचें उच्चाटन, इतक्या गोष्टी होणार असतील तरच हिंदुस्थान स्वतंत्र होण्यांत कांहीं अर्थ आहे. हिंदी जनतेच्या मानेवर आपल्या आज्ञेचें जूं चेपून बसवण्याच्या कामीं ब्रिटिश सरकार व इं. सि. सर्व्हिसचे लोक समर्थ ठरत असले तरी आजकाल या देशांत उपस्थित होणारे प्रश्न सोडवण्याची धमक त्यांच्या अंगीं नाहीं, मग भविष्यकाळीं उत्पन्न होणारे प्रश्न ते कसे सोडवतील तें दिसतेंच आहे. त्यांचीं गृहीतकृत्यें व समजुतीच चुकीच्या असून त्यांचा वस्तुस्थितीशीं संबंध राहिलेला नाहीं. मावळत्या समाजरचनेचे प्रतिनिधि बनलेल्या व नकर्त्या अशा कोणत्याहि सरकारनें अथवा नोकरशाहीनें जनतेवर आपली इच्छा लादण्याच्या कामीं फार काळ यश मिळवण्याची आशाच बाळगूं नये.

कंपपीडित भागांत जाऊन तेथें चालू असलेल्या मदतीच्या कामाविषयीं अहवाल सादर करण्याकरितां अलाहाबाद-धरणीकंप-साहाय्यक समितीनें माझी योजना केली व मी बिहारकडे लगेच रवानाहि झालों. त्या उध्वस्त व विच्छिन्न झालेल्या प्रदेशांत मी एकटाच दहा दिवसपर्यंत हिंडत होतों. प्रवासांत फार दगदग झाली. धड झोंपसुद्धां मिळत नसे. सकाळीं पांच वाजल्यापासून रात्रीं जवळजवळ बारा वाजेपर्यंत आम्हाला काम करावें लागे. भेगाळलेल्या रस्त्यावरून मोटर हांकावी, जेथले पूल कोसळले असतील अथवा रस्ते पाण्याखालीं गडप झाले असतील तेथें होड्यांचा आश्रय करावा असें चाललें होतें. जमीनदोस्त झालेल्या इमारती आणि एकाद्या राक्षसी हाताने विदीर्ण केलेले, वळवलेले आणि दुतर्फा असणाऱ्या घरांच्या पायापेक्षांही उंच उचललेले शहरांतील रस्ते पाहिले कीं मनाला धाक वाटे. रस्त्यांवर पडलेल्या प्रचंड विवरांतून पाण्याचे आणि वाळूचे लोटच्या लोट वर उफाळून मनुष्यें व गुरेंढोरें त्यांत वाहून गेलीं. पण त्या शहरापेक्षां सुद्धां उत्तर बिहारमधील ' बिहारची बाग ' असें म्हटल्या जाणाऱ्या प्रदेशाची पार वाताहत उडून गेली होती. तो टापू बेचिराख झाला होता. मैलच्या मैल वाळू पसरली, पाण्याचीं तळीं सांचलीं आणि जमिनींत मोठमोठ्या घळी पडल्या; ठिकठिकाणीं जमिनीचे फुगे वर येऊन त्यांतून पाणी व वाळू यांचे लोट बाहेर पडले. या प्रदेशाची विमानानें पाहणी करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं सांगितलें कीं कांहीं अंशीं महायुद्धाच्या काळांतल्या उत्तर फ्रान्सच्या रणक्षेत्राप्रमाणें खालचा देखावा दिसत होता.

त्या वेळची स्थिति भयंकरच असली पाहिजे. धरणीकंपाच्या सुरुवातीला या कुशीवरून त्या कुशीवर असे झोके बसल्यामुळें उभे होतें तेवढें माणूस जमिनीवर लोळवलें गेलें. मग खालवर हिसके सुरू होऊन तोफा डागाव्या अथवा हजारों विमानें आकाशांत घरघरूं लागावीं, त्याप्रमाणे गडगडाट झाला आणि जमिनीवर प्रचंड टेंगळें उठून त्यांतून व खोल विवरांतून पाण्याचे एवढाले लोंढे वर उसळले कीं जमिनी-वर दहा ते बारा फूट पाणी सांठलें. दोनतीन मिनिटांतच ही सारी उलथापालथ होऊन नंतर सर्व गप्प झालें. पण हें घडत असतां ज्यांनीं तें पाहिलें, त्यांना प्रत्यक्ष प्रलयकाळ सामोरा उभा ठाकला असें वाटले असल्यास त्यांत नवल नाहीं. शहरां-मध्ये घरें कडाडून पडूं लागलीं, रस्त्यांतून नद्या वाहूं लागल्या, आणि हवेंत धूळ तर अशी घनदाट पसरली कीं चार हातांवरची वस्तुसुद्धां न्याहाळवेना. खेड्यांतून इतकी धूळ उडाली नाहीं. पण भोंवतालचें दृश्य पाहावयाला कोणाचें डोकें ठिकाणावर होतें ? त्या अरिष्टांतून बचावलेले सारे लोक जमिनीवर उताणेपाताणे पडले होते.

मला वाटतें मुझफ्फरपूरलाच असेल, एका बारा वर्षांच्या मुलाला दहा दिवसांनीं उकरून काढलें तेव्हां तो जिवंत निघाला. तो अगदीं भांबावून गेला होता. खालीं कोसळणाऱ्या दगडविटांच्या वर्षावाखालीं तो गाडला गेला, तेव्हां धरित्री बुडाली आणि आपण काय ते एकटेच शिल्लक राहिलों, अशी त्याची कल्पना झाली होती.

मुझफ्फरपूर येथें धरणीकंपानें घरें कोसळून शेंकडों लोक आजूबाजूला पटापट मरत असतां एका मुलीचा जन्म झाला. आईबाप तरुण आणि अननुभवी होतीं; त्यांना काय करावें तें सुचेना. पण बाळबाळंतीण खुशाल असून धरणीकंपाच्या ऐन धटकेला जन्मलेल्या त्या मुलीचें नांव कम्पोदेवी असें ठेवण्यांत आलें आहे, असें मला सांगण्यांत आलें.

आमच्या दौऱ्यांतील शेवटचें ठिकाण म्हणजे मोंगीर शहर. आम्ही जवळ जवळ नेपाळच्या सरहद्दीपर्यंत जाऊन आलों होतों व अनेक भीषण देखावे डोळ्यांनीं पाहिले होते. जिकडे तिकडे धूळधाण झालेली पाहावयाची डोळ्यांना सवय झालेली होती. परंतु ह्या धनाढ्य शहराची राखरांगोळी झालेली जेव्हां आम्हीं पाहिली, तेव्हां आमच्या शरीरावर भीतीनें कांटाच उभा राहिला. तें भयानक दृश्य मी कदापि विसरणार नाहीं.

धरणीकंपाच्या सपाट्यांत सापडलेल्या सर्व प्रदेशांत-मग तें शहर असो की खेडें असो–स्वावलंबनाचा पूर्ण अभाव पाहून मनाला खेद वाटे. या बाबतींत सर्वांत मोठे अपराधी कोणी असतील तर ते शहरांतील पांढरपेशे लोक. सरकार अथवा दुसरें कोणी तरी साहाय्य करतें कीं काय याची वाट पाहत ते स्वस्थ बसून राहत.

बिहारमधील इतर भागांतून व परप्रांतांतून आलेल्या लोकांचा उत्साह व लायकी पाहिली कीं, अगदीं निराळेंच चित्र डोळ्यांसमोर उभें राही. झटून काम करण्याची ती स्त्री-पुरुषांतील वृत्ति पाहून कौतुक वाटे. अनेक दुःख-निवारक संस्थांतर्फे तेथें काम चालू असलें तरी बरेंचसें काम परस्परांच्या सहकार्यानेंच चालत असे.

खोदकाम आणि ढबर वाहण्याचें काम या बाबतींत स्वावलंबन सुरू व्हावें म्हणून मोंगीर येथें थोडासा गाजावाजा करून कामाला प्रारंभ करून द्यावा असें मी मनांत योजलें. प्रथम मनांत थोडा धाकधुक वाटत होती, पण काम फत्ते झालें. दुःखनिवारक संस्थांचे झाडून सारे पुढारी एके दिवस पाट्या व खोरीं हातांत घेऊन बाहेर पडले आणि त्यांनीं खणण्याचें काम केलें. त्या दिवशीं खणीत असतां आम्हाला एका लहान मुलीचें प्रेत सांपडलें. त्या दिवशीं मी मोंगीरहून निघालों. पण सुरू केलेलें काम व्यवस्थितपणें चालू राहिलें.

दुःखनिवारक संस्थांपैकीं बाबू राजेंद्रप्रसादांच्या हाताखालीं काम करणारी मध्यवर्ति दुःखनिवारक समिति फार महत्त्वाची होती. निखालस कॉंग्रेसची अशी ती संस्था नव्हती. अनेक गट व अनेक दाते यांच्या साहाय्यानें तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें होतें. तिच्या दिमतीला खेड्यापाड्यांत पसरलेली कॉंग्रेस-संघटणा मिळाल्याकारणानें तिचा मोठाच फायदा झाला. गुजराथ व सं. प्रांतांतील कांहीं जिल्हे वगळले तर हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां बिहारमधील कॉंग्रेस-कार्यकर्त्यांचा शेतकऱ्यांशीं अधिक निकटचा संबंध आलेला आहे; खरें म्हणजे पुष्कळसे कार्यकर्ते शेतकरीच आहेत. बिहार म्हणजे खराखुरा शेतकऱ्यांचा प्रांत. तेथील

मध्यम वर्ग सुद्धां शेतकऱ्यांशीं जुडलेला आहे. केव्हां केव्हां कॉंग्रेसचा चिटणीस म्हणून मी बिहार प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची कचेरी तपासावयास गेलों असतां त्यांच्या नालायकीवर आणि त्यांच्या गबाळेपणावर मी सणसणीत टीका करीत असें. बसून भागतें तर उभें कशाला राहा, पडून भागतें तर बसा कशाला अशा वृत्तीचे तेथील लोक दिसत. माझ्या पाहण्यांत आलेल्या सर्व कचेऱ्यांत बिहारची कचेरी सावी. कचेरींत नेहमी लागणाऱ्या सामुग्रीशिवायच काम रेटण्याकडे कल असे. हें कसेंहि असलें, तरी कॉंग्रेसवरील श्रद्धेच्या दृष्टीनें विचार केला तर बिहार म्हणजे अत्यंत कळकळीचा व एकनिष्ठ प्रदेश आहे, हें मी ओळखून होतों. कॉंग्रेसची बाह्य झकपक तेथें नसेल, पण कॉंग्रेसनिष्ठेचें मूळ बिहारी शेतकऱ्यांच्या हृदयांत खोल रुजलेलें होतें. अ. इ. कॉं. समितींत बिहारचे सभासद कधींहि धडाडी दाखवावयाचे नाहींत. येथवर आपण चढलों कसे ह्याचेंच त्यांना जणूं कांहीं नवल वाटत असावें. पण दोन्ही वेळीं सत्याग्रहाच्या लढ्यांत बिहारनें नांव गाजवलें. वैयक्तिक सत्याग्रहांतहि बिहारनें सरस कामगिरी बजावली होती.

दुःखनिवारक समितीनें शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीं ह्या चोख संघटणेचा चांगलाच उपयोग करून घेतला. खेड्यापाड्यांतून सरकारी नोकरांचा देखील इतका उपयोग झाला नसता. दुःखनिवारक समितीचें व त्याचप्रमाणें बिहार कॉंग्रेस समितीचें नेतृत्व बाबू राजेन्द्रप्रसाद यांच्याकडे बिनविरोध देण्यात आलें होतें. राजेन्द्रबाबू अगदीं अस्सल बिहारी शेतकऱ्याप्रमाणें दिसतात. प्रथमदर्शनीं त्यांची मनावर छाप पडत नाहीं. पण त्यांच्या डोळ्यांत व्यक्त होणारी त्यांची तीव्र बुद्धिमत्ता आणि ऋजुता व चेहऱ्यावर दिसून येणारी तळमळ ध्यानात आली कीं पाहणाराची कल्पना पालटूं लागते. त्यांच्या मुद्रेचा अथवा डोळ्यांचा माणसाला कधीं विसर पडणें शक्य नाहीं. कारण मूर्तिमंत सचोटीची ज्योत तेथें तेवत आहे. शेतकऱ्याप्रमाणेंच त्यांची दृष्टि जरा संकुचित आहे, आधुनिक जगाच्या मानानें ते जरासे भावडेहि वाटतील. पण त्यांची दांडगी कर्तृत्वशक्ति, अविकृत सरलता, त्यांचा उत्साह व स्वातंत्र्यासाठीं त्यांना लागलेला ध्यास या गुणांमुळें केवळ बिहारमध्येंच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत आज त्यांच्याविषयीं प्रेमाची भावना आढळून येते. मला वाटतें कीं राजेन्द्रबाबूंचें पुढारीपण बिहारमध्यें जितकें सर्वमान्य आहे तितकें कोणाहि पुढाऱ्याचें हिंदुस्थानांतील कोणत्याहि दुसऱ्या प्रांतांत नसेल. गांधीजींचा संदेश देखील त्यांच्याप्रमाणें फारच थोड्यांनीं आत्मसात केला असेल.

अशा दर्जाचे गृहस्थ दुःखनिवारणाच्या कार्यासाठीं मिळावेत हें बिहारचें सुदैव. त्यांच्यावरील विश्वासामुळें सर्व देशांतून लाखों रुपये गोळा झाले. प्रकृति बेताबाताची असून देखील दुःखनिवारणाचें काम त्यांनीं धडाडीनें सुरू केलें. सर्व कामाचा मुख्य भर त्यांच्यावर पडे व सगळे लोक सल्लामसलत लागली कीं त्यांच्याकडेच धांव घेत; त्यामुळें त्यांना अतिरिक्त दगदग होई.

धरणीकंप म्हणजे अस्पृश्यतेच्या पापाबद्दल ईश्वरानें आपणाला केलेली शिक्षा आहे अशा अर्थाचें एक विधान ह्याच सुमाराला गांधीजींनीं केलें होतें, तें वाचून माझी मति गुंग होऊन गेली. आणि ह्या विलक्षण स्पष्टीकरणाला रवीन्द्रनाथ टागोरांनीं दिलेलें प्रत्युत्तर वाचून मला फार आनंद झाला. मला टागोरांचें म्हणणें पूर्णपणें मान्य होतें. गांधीजींच्या विधानाइतकें तर्कदुष्ट विधान दुसरें कोणतें असेल अशी कल्पनाहि करतां यावयाची नाहीं. भावना आणि मानसिक व्यापार यांच्या जड वस्तूंवर होणाऱ्या परिणामांसंबंधीं आज विज्ञानशास्त्र देखील हट्टवादीपणानें एकादा ठाम सिद्धांत मांडणार नाहीं हें खरें. मन अस्वस्थ झालें तर त्यामुळें अपचन अगर त्याहून भयंकर असा रोगहि उमटेल. पण मनुष्यांतील रीतिरिवाज अथवा दोष यांचा परिणाम भूकवचाच्या हालचालींवर होत असतो असें म्हणणें म्हणजे हद्दच झाली ! पाप, ईश्वरी प्रकोप, आणि ब्रह्मांडाच्या व्यापारांत मानवांचें स्थान यांविषयीं विचार सुरू झाले कीं कित्येक शतकें मागें हटून युरोपांतील धर्म-कोर्टांच्या काळांत आपण जाऊन पडलों कीं काय असें वाटूं लागतें. विज्ञानाचें पाखंड लोकांच्या मनांत भरवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल गिओर्डानो ब्रूनो याला जींवें जाळण्यांत आलें आणि कित्येक चेटक्या सरणावर चढवल्या गेल्या त्या याच काळांत.

प्रायश्चित्त म्हणून जर धरणीकंपाची शिक्षा, तर ती कोणत्या पापाबद्दल हें कळावयास नको का ? कारण ह्या मानवजातींत प्रायश्चित्त घेण्यालायक अशा पापांचा डोंगर वाढला आहे. आणि प्रत्येकाची उपपत्ति तर वेगवेगळी असणार: परकीयांच्या जोखडाखालीं मान तुकवली ह्या पातकाबद्दल ही शिक्षा असेल, अथवा अन्याय्य समाजरचना आम्ही चालूं देत आहों म्हणूनहि असेल. दरभंग्याच्या महाराजांच्या मालकीच्या अफाट शेतजमिनी बिहारमध्यें आहेत, त्यांचें धरणीकंपामुळें अतोनात नुकसान झालें. तेव्हां जमीनदारी पद्धतीवर ईश्वराचा कोप झाला असेंहि म्हणतां येईल. दक्षिण हिंदुस्थानांतील लोकांच्या अस्पृश्यतेबाबतच्या पापाबद्दल बिहारमधील जवळ जवळ निष्पाप जनतेवर संकट गुदरलें, असें द्राविडी स्पष्टीकरण करीत बसण्यापेक्षां हें वरील स्पष्टीकरण अधिक योग्य नाहीं काय ? बरें, जेथें अस्पृश्यतेचें पाप माजलें होतें, तेथेंच धरणी कां फाटली नाहीं ? ब्रिटिश सरकारला असेंहि म्हणतां आलें असतें कीं कायदेभंगाचें पाप केलेंत, म्हणून देव कोपला, आणि तसें पाहावयास गेलें तर धरणीकंपानें जेथें आक्रांत करून सोडला त्या उत्तर बिहारनें कायदेभंगाच्या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला होता हें कबूल केलेंच पाहिजे.

ह्या तर्कटाला अंत नाहीं. पण मग प्रश्न असा उद्भवतो कीं जगन्नायकाचें हें नाटक चालू आहे त्या प्रयोगांत आपण कशाला फेरफार करावेत ? ईश्वरी चक्राची धार मानवी प्रयत्नांनीं कशाला बोथट करावयाची ? ईश्वराचा विनोद तरी किती जीवघेणा पाहा. आम्हांला पापाचें रांजण बनवावयाचें, भोंवतीं अनेक खड्डे, अनेक अडीअडचणी रचून ठेवावयाच्या, कांट्यांनीं भरलेल्या जगाचा विस्तार

मांडावयाचा, वाघाशेजारीं शेळीला जन्मास घालावयाचें आणि मग शिक्षेचा आसूड परजीत जगभर फिरावयाचें.

" फेकुनी तेज बाणातें जेधवां दूर तारका
आपुल्या निर्मलाश्रूंनीं शिंपिती सुरभूमिका
आपुली कृति देखाया होई काय समर्थ तो ?
जन्म दे कोकराला जो, तोच का तुज निर्मितो ? "

शेवटच्या दिवशीं पाटण्याला अनेक मित्रांच्या व सहकाऱ्यांच्या बरोबर चर्चा करीत रात्रीं बराच वेळ बसलों होतों. सं. प्रांतांतले बरेच लोक तेथें हजर होते. त्यांपैकीं कांहीं आमच्या प्रांतांतील निवडक कार्यकर्ती मंडळी होती. आमच्या मनांत घोळणाऱ्या प्रश्नांचीच आम्हीं चर्चा केली. दुःखनिवारणाच्या कामांत आम्हीं किती भाग घ्यावा ? कारण हें काम करावयाचें तर राजकीय कार्य तेवढ्या-पुरतें तरी बाजूला सारले पाहिजे. बिहारमधील काम मोठें किचकट होते. जरा वेळ केलें मग सोडून दिलें असें करून चालले नसतें. त्यांत पुरतें लक्ष घालावयाचें म्हटलें तर प्रत्यक्ष राजकारणापासून बराच काळपर्यंत दूर राहणें प्राप्तच होतें. राजकीय दृष्ट्या आमच्या प्रांतावर त्याचा फारच अनिष्ट परिणाम झाला असता. काँग्रेसमध्यें लोकांची वाण नसली तरी खरे योजक कार्यकर्ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच होते. त्यांना सोडून कसें भागेल ? धरणीकंपामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणें शक्य नसलें, तरी सर्व वेळ धरणीकंपाच्या कामीं खर्च करण्याची माझी तयारी नव्हती. त्या कामाला हवे तितके लोक मिळतील, चणचण आहे ती अधिक जोखमीचें कार्य करणारांची आहे असें मला वाटलें.

अशी चर्चा होतां होतां बरीच रात्र उलटली. गेल्या स्वातंत्र्य-दिनाचाहि नामनिर्देश झाला. त्या वेळीं अनेक सहकारी पकडले गेले, पण आम्ही मात्र तावडींतून सुटलों. म्हणून मीं विनोदानें म्हणालों, ' लढाऊ राजकारणाची आणि संपूर्ण सुरक्षित-पणाची सांगड कशी घालावी तें रहस्य मला बरोबर कळलें आहे कीं नाहीं पाहा. '

फेब्रुवारीच्या ११ तारखेला मीं घरीं अलाहाबादेस पोंचलों. बिहारच्या दौऱ्यानें माझी खात्रीच केली होती. दहा दिवस अविश्रांत श्रम केल्यामुळें मी चिपाडासारखा शुष्क झालों होतों. माझी दशा पाहून घरच्या मंडळींना अचंबा वाटला. अलाहाबाद दुःखनिवारक समितीचा अहवाल लिहिण्यासाठीं मीं लेखणी उचलली; पण डोळ्यांवर झोंप इतकी लोटली होती कीं पापणी उघडेना. पुढील चोवीस तासांपैकीं निदान तब्बल बारा तास तरी मीं झोंपून काढले असतील.

तिसऱ्या दिवशीं दुपार उलटून गेल्यावर कमलानें व मीं चहा घेतला. इतक्यांत पुरुषोत्तमदास टंडन येऊन दाखल झाले. आम्हीं व्हरांड्यांत उभे होतों तोंच एका पोलिस अधिकाऱ्याची मोटर दाराशीं खडी झाली. मी समजलों कीं माझी वेळ भरली मी त्याच्याजवळ गेलों व म्हणालों, " बहुत दिनों से आपका इंतजार था " ( "कित्येक

दिवस आपली वाट पाहत होतों.") ते थोडे शरमल्याप्रमाणें झाले व म्हणाले, "कलकत्त्याहून वॉरंट आलें आहे त्यांत आमचा काय दोष ?"

पांच महिने आणि तेरा दिवस बाहेर राहून मी पुन्हां एकांतवासाच्या आधीन झालों. पण खरी जबाबदारी माझ्या शिरावर नव्हती; नेहमींप्रमाणें याही वेळीं खरी जबाबदारी पडली ती माझ्या क्षीण झालेल्या आईवर, पत्नीवर व बहिणीवर.

## ५९

# अलिपूरचा तुरुंग

त्या क्षणापासून आलों दूर मी आधींच ना ?
बघ नाहीं, अन् दिसेना स्नेहतारा लोचना
नेतसे वाहून वारा कोठच्या कोठें तरी
जायचें आयुष्य का हें कापशी तंतूपरी ?

—रॉबर्ट ब्राउनिंग

त्याच रात्रीं मला कलकत्त्यास नेण्यांत आलें. हौरा स्टेशनवर पोलिसी मोटरीच्या प्रचंड धुडांत बसून आम्ही लाल बाजार पोलिस ठाण्यावर गेलों. त्या कलकत्ता पोलिसांच्या मुख्य ठाण्याबद्दल मीं अनेक उल्लेख वृत्तपत्रांतून वाचले होते. तेव्हां तें ठिकाण कसें काय आहे म्हणून मीं आजूबाजूला पाहिलें. उत्तर हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि पोलिस ठाण्यांत दिसले नाहींत इतके युरोपियन सार्जंट व इन्स्पेक्टर तेथें मला दिसले. कॉन्स्टेबल बहुतेक बिहार व सं. प्रांताच्या पूर्व भागांतले असावे. कोर्ट व तुरुंग यांच्या दरम्यान येरझारा घालतांना मोटरींत त्यांच्यापैकीं बरेच जण माझ्या सांगातीं येत. त्यांना आपलें काम आवडत नसावें असें त्यांच्या दुःखीकष्टी मुद्रेवरून वाटे. सहानुभूतीनें त्यांच्या डोळ्यांत कधीं कधीं अश्रू दाटून येत असत.

सुरुवातीला मला प्रेसिडेन्सी जेलमध्यें ठेवलें होतें. तेथून खटल्यासाठीं मला कोर्टांत घेऊन जात असत. कोर्टाची इमारत नित्य परिचयाच्या खुल्या कोर्टाप्रमाणें नसून एकाद्या किल्ल्याप्रमाणें दिसत होती. कांहीं बातमीदार व वकील यांव्यतिरिक्त कोणालाहि कोर्टांत येण्याची मुभा नव्हती. न्यायाधीशाच्या खोलींत पोलिसांची व काळे झगे पांघरलेल्या वकिलांची गर्दीच गर्दी होत असे.

कोर्टांतील खटले माझ्या परिचयाचे होते. माझ्यावरील पुष्कळसे खटले तुरुंगाच्या आवारांतच चालवण्यांत आले. पण त्या वेळीं नेहमीं जवळ मित्र म्हणा, नातेवाइक म्हणा, कोणी तरी ओळखीचीं माणसें हजर असल्यामुळें तुरुंगांतील वातावरण जरा उजळत असे. पोलिस नेहमीं मागे राहत व भोंवतीं पिंजऱ्याची आठवण करून देणारे गज वगैरे कांहीं दिसत नसत. येथें मात्र सर्वच निराळा प्रकार होता. माझ्या दृष्टीला जे अपरिचित चेहरे पडत होते, त्यांच्या माझ्यांत हाडामासाचा अथवा विचारांचा कसलाच संबंध नव्हता. मला वाटतें झगे घातलेले पुष्कळसे वकील एकत्र आले म्हणजे तें दृश्य फारसें दर्शनीय होत नाहीं, आणि पोलिस कोर्टांत

काम करणाऱ्या वकिलांची मुद्रा अमळ क्रूरच दिसूं लागते कीं काय कोण जाणे ! त्या सर्व काळ्या घोळक्यांत एकच ओळखीचा चेहरा मोठ्या प्रयत्नानें मीं हुडकून काढला. पण लवकरच त्या गर्दींत ते गृहस्थ दिसेनासे झाले.

खटला सुरू होण्याच्या आधीं बाहेरच्या सज्जांत बसलों असतां मला अगदीं एकाकी असें वाटलें. माझी नाडी जलद उडत असावी. पूर्वीच्या खटल्याच्या वेळीं माझें मन ज्याप्रमाणें शांत होतें तसें या खेपेला राहिलें नाहीं. इतके खटले व इतक्या शिक्षा झालेल्या माणसाचें चित्त जर असें बेचैन होतें, जर नवख्या व अननुभवी अशा तरुण मुलांची अवस्था काय होत असेल असा विचार त्या वेळीं माझ्या मनांत आला. पिंजऱ्यांत उभें राहिल्यावर मात्र मला जरा हायसें वाटलें. बचाव करण्यांत आला नाहींच. माझें म्हणणें मीं थोडक्यांत वाचून दाखवलें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे फेब्रुवारीच्या १६ तारखेला मला २ वर्षांची शिक्षा फर्मावण्यांत आली. तुरुंगांतील ही माझी सातवी खेप.

गेल्या पांच-साडेपांच महिन्यांतील कामाकडे पाहून मनाला थोडें समाधान वाटत होतें. मला वेळ मोकळा मिळाला त्याचा मीं सामान्यपणें सद्व्ययच केला होता व कांहीं उपयुक्त कामेंहि पार पाडलीं होतीं. आई आजारांतून निभावली, धाकट्या बहिणीचा विवाह पार पडला, मुलीच्या पुढील शिक्षणाची तरतूद लागली; घरच्या पैशाअडक्यांच्या व्यवहारांतील बरीचशी गुंतागुंत आतां उलगडली होती. पुष्कळ वैयक्तिक बाबींकडे आतांपर्यंत दुर्लक्ष झालें होतें त्यांची व्यवस्था लागली होती. सार्व-जनिक कामांत त्या वेळीं कोणालाच फारसें कांहीं करतां येणें शक्य नव्हतें; पण कॉंग्रेसचें धोरण जरा अधिक कणखर करणें व कॅांग्रेसची दृष्टि सामाजिक व आर्थिक विचार-सरणीकडे वळवणें एवढें काम करतां येण्यासारखें होतें तें मीं केलें. गांधीजीं-बरोबर पुण्याला माझा जो पत्रव्यवहार झाला त्यामुळें विचारांना चालना मिळाली. माझे जातीय प्रश्नावरील लेख देखील बरेच उपयुक्त ठरले. शिवाय मी गांधीजींना व माझ्या इतर सहकाऱ्यांना दोन वर्षांत भेटलों नव्हतों. त्यांच्या गांठीभेटी झाल्या, व त्यामुळें दोन वर्षें पुरेल इतकी उत्साहाची व भावनांची शिदोरी मला बरोबर घेतां आली.

माझ्या मनावर औदासीन्याची छाया पाडणारी एक गोष्ट म्हणजे कमलाचें दुखणें. अगदीं कडेलोट होईपर्यंत काम करीत राहावयाचें अशी तिची वृत्ति असल्या-मुळें तिचें दुखणें किती भयंकर आहे याची मला खरी कल्पनाच आली नव्हती. माझ्या मनाची तगमग मात्र सुरू होती. पण मला अशी आशा वाटे कीं आतांपर्यंत तिला औषधोपचार करावयाला सवड मिळाली नव्हती ती मी तुरुंगांत आल्यावर मिळूं लागेल.

दुसरी एक गोष्ट मनाला लागून राहिली होती ती अशी कीं, अलाहाबाद जिल्ह्यांतील खेड्यांना भेटी देण्याचें काम तसेंच राहून गेलें. आम्हीं आंखून दिलेला

कार्यक्रम पार पाडीत असतांच पुष्कळ कार्यकर्त्यांना अटक झालेली होती. तेव्हां ते जेथून तुरुंगांत गेले तेथें त्यांच्या मागोमाग न जाणें हा मित्रद्रोह आहे असें मला वाटे.

पोलिसांच्या मोटरींतून तुरुंगाकडे जात असतां वाटेंत आम्हांला यांत्रिक बंदुका आणि चिलखती मोटरी यांच्यासह कूच करीत चाललेलें बरेंचसें सैन्य भेटलें. आमच्या गाडीच्या खिडकींतून मीं त्यांच्याकडे दृष्टि टाकली तेव्हां मनांत विचार आला कीं, ह्या चिलखती गाड्या किती बेडौल व भयंकर दिसत आहेत; जणूं कांहीं इतिहासपूर्वकालांतील जमिनीवर सचार करणारे राक्षची पशूच.

प्रेसिडेन्सी जेलमधून मला अलिपूरच्या मध्यवर्ति तुरुंगांत नेण्यांत आलें. तेथें सुमारें दहा फूट लांब व नऊ फूट रुंदीची एक लहानशी खोली मला मिळाली होती. पुढें एक व्हरांडा व छोटेंसें अंगण असून आवाराभोंवतालची तटबंदी सखल होती. तिच्या पलीकडे पाहिल्यावर एक विचित्रच दृश्य माझ्या दृष्टीस पडलें. एकमजली आणि दुमजली, वाटोळ्या व चौकोनी अशा विचित्र आकाराचीं छपरें असलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या इमारती दिसत होत्या. तें दृश्य एखाद्या कोड्याप्रमाणें किंवा भविष्यवादी चित्रकाराच्या कलाकृतीप्रमाणें भासत होतें. पण मला असें सांगण्यांत आलें कीं, त्या सर्व इमारतींची मांडणी अगदीं पद्धतशीर रीतीनें केलेली आहे. तुरुंग शहरांत असल्यामुळें मर्यादित जागेपैकीं मिळेल तितक्या जागेचा उपयोग करून घेतां यावा म्हणून अशा प्रकारची मांडणी करणें भाग पडलें.

त्या इमारतींकडे पाहून झाल्यावर दुसरीकडे दृष्टि वळवतांच मला एक फारच भयंकर दृश्य पाहावयास सांपडलें. माझ्या कोठडीच्या अगदीं समोरचं दोन धुराडीं उभीं असून त्यांतून काळ्याकुट्ट धुराचे लोटच्या लोट बाहेर पडत होते. वाऱ्याबरोबर हा धुराचा लोट अंगावर आला कीं, जीव गुदमरल्यासारखें होई. तुरुंगांतील स्वयंपाकघराचीं धुराडीं होतीं तीं. धुराच्या माऱ्यापासून रक्षण व्हावें म्हणून विषारी वायूपासून बचाव करणारे मुखवटे कैद्यांना पुरवण्यांत यावेत अशी सूचना मीं तुरुंगावरील अधिकाऱ्यांना करून पाहिली.

अलिपूर-तुरुंगांतील तांबड्या विटांनीं बांधलेल्या त्याच त्याच इमारती पाहाव्या लागणार आणि हा धूर खात बसावें लागणार—एकंदरींत भविष्यकाळ कांहीं सुखाचा जाईल असें चिन्ह दिसेना. माझ्या आवारांत झाडपेड मुळींच नव्हतें. सर्व जमिनीवर पक्की फरसबंदी केलेली असून ती स्वच्छ करण्यांत येई. पण ती अगदींच रुक्ष व रखरखीत अशी दिसावयाची. शेजारच्या आवारांतील एक दोन झाडांचे शेंडे मात्र माझ्या दृष्टीस पडत. मी आलों तेव्हां त्या फांदीवर ना पान ना फूल. परंतु हलके हलके त्यांच्यांत नकळत फरक पडत गेला आणि त्या रुक्ष फांद्यांवर हिरवे डोळे चमकूं लागले. हां हां म्हणतां त्यांतून पालवी बाहेर आली आणि नागड्या उघड्या दिसणाऱ्या त्या झाडांवर हिरवीं महावस्त्रें लपेटलीं गेलीं. हें

स्थित्यंतर इतकें सुखकारक होतें कीं, त्यामुळें अलिपूर-तुरुंग सुद्धां आनंददायक भासूं लागला.

त्यांपैकीं एका झाडावर घारीचें घरटें होतें. त्याच्याकडे मी पुष्कळ वेळां पाहत बसत असें. पिलें वाढत होतीं आणि आपल्या जातीच्या कला शिकून तरबेज होत होतीं. कधीं कधीं तीराप्रमाणें बिनचूक झेंप टाकून कैद्यांच्या हातांतील भाकर तीं पळवून नेत असत!

सूर्यास्तापासून तों जवळ जवळ सूर्योदयापर्यंत आम्हांला खोलींत बंद करून ठेवण्यांत येई आणि कंटाळवाणा संध्याकाळ संपतां संपत नसे. तासन् तास लिहीत अथवा वाचीत बसून जीव उबगून गेला म्हणजे मग त्या लहानशा खोलींत फेऱ्या घालण्यास प्रारंभ करावा आणि फेऱ्या म्हणजे तरी काय? चार पावलें पुढें टाकलीं कीं मागें वळावयाचें. पशुसंग्रहालयांतील पिंजऱ्यांत फेऱ्या घालणारीं अस्वलें मीं पाहिलीं होतीं, त्यांची मला आठवण होई. एकादे वेळीं अतिशय कंटाळा आला म्हणजे मी शीर्षासन करीत असें.

रात्रीच्या पहिल्या प्रहरांत बरीच शांतता लाभत असे. शहरांतील निरनिराळे आवाज तेथवर येत. ट्रामगाड्यांचें, ग्रामोफोनचे, अथवा दूर अंतरावर गाणाऱ्या माणसांचें आवाज तुरुंगापर्यंत पोंचत. संगीताचे हे मृदु ध्वनि ऐकून मोठा आनंद होत असे. पण रात्रीं कोणी कैदी पळून तर गेला नसेल ना, याची खात्री करून घेण्यासाठीं दिवा घेऊन फिरणाऱ्या रखवालदारांची तपासणी सुरू झाली म्हणजे शांतता पार बिघडून जाई. दररोज पहाटे तीन वाजतां घासण्या पुसण्याचा व भांड्यांचा खडखडाट होऊं लागला म्हणजे समजावें कीं, तुरुंगाची 'भिशी' सुरू झाली.

अलिपूर-तुरुंगांत व प्रेसिडेन्सी तुरुंगांत वॉर्डर, रखवालदार, अधिकारी व कारकून यांचा खूप भरणा होता. ह्या प्रत्येक तुरुंगामध्यें नैनी-तुरुंगाइतकेच म्हणजे २२००-२३०० कैदी असत, पण अधिकाऱ्यांचा संच मात्र नैनीपेक्षां दुपटीहून अधिक असे. साम्राज्यशाहीच्या वर्चस्वाची स्मृति सदैव जागती राहावी म्हणूनच कीं काय, कोणीहि वरिष्ठ अधिकारी दिसला कीं, कैद्यांना 'सरकार सलाम' असें ओरडून तदनुरूप कांहीं अंगविक्षेप करावे लागत. हा आवाज माझ्या कानीं दिवसाकांठीं अनेकवार येत असे. माझ्या भिंतीच्या पलीकडून सुपरिंटेंडेंट जाऊं लागला म्हणजे त्याच्या डोक्यावर धरण्यांत येणाऱ्या दरबारी छत्रीचें टोंक तेवढें माझ्या नजरेस पडे.

'सरकार, सलाम' हे शब्द व ते उच्चारतांना करावयाचे अंगविक्षेप हे जुन्या काळच्या एकाद्या चालीरीतीचें अवशेष म्हणून होतें कीं, एकाद्या इंग्रज बहादुराच्या सुपीक डोक्यांतून ते निर्माण झाले होते तें मला कळेना. बहुधा ती इंग्रजांचीच शक्कल असावी असें त्या शब्दांच्या एकंदर ढंगावरून मनांत येई. बंगाल व आसाम

प्रांतांव्यतिरिक्त इतर प्रांतांतील तुरुंगांत ही पद्धत प्रचारांत नाहीं हें सुदैवच. कारण जुलमानें रामराम करावयास लावण्याची ही पद्धत अत्यंत अपमानकारक आहे.

अलिपूरच्या तुरुंगांतील एक गोष्ट पाहून मात्र मला समाधान वाटलें. तेथील सर्वसाधारण कैद्यांचें अन्न संयुक्त प्रांतांतील कैद्यांच्या अन्नाहून बरेंच सरस असे.

हिंवाळा लवकरच संपला. वसंतकालहि झपाट्यानें निघून गेला, आणि उन्हाळ्याला सुरुवात झाली. रोजच्या रोज उकाड्याचें मान वाढत चाललें. मला कलकत्त्याची हवा मुळींच आवडत नसे. चार दिवसांच्या वास्तव्यानेंच मी अगदीं गळून व विटून गेलों होतों. तुरुंगांतील वातावरण तर साहजिकच अधिक वाईट होतें. माझ्या प्रकृतीचें मान ठीक राहीना. वजन झपाट्यानें घटूं लागलें. कड्या, कुलुपें, भिंती आणि तट हीं दृष्टीस पडलीं कीं, माझें मन वैतागून जाई.

एका महिन्यानंतर मला आवाराच्या बाहेर थोडासा व्यायाम घेण्याची परवानगी मिळाली. सकाळ-संध्याकाळ मुख्य तटाच्या आडोशाला फिरण्याची मला मुभा देण्यांत आली होती. हळूहळू अलिपूरचा तुरुंग आणि कलकत्त्याची हवा इतकेंच काय, पण तुरुंगांतील मिशींतला धूर व आवाज हीं सुद्धां माझ्या पचनीं पडलीं. खरें म्हणजे दुसऱ्याच विचारांनीं माझें मन सतावून गेलें होतें. बाहेरून येणाऱ्या बातम्या फारशा आनंददायक नव्हत्या.

६०

# पौर्वात्य आणि पाश्चात्य देशांतील लोकशाही

मला शिक्षा झाल्यानंतर अलिपूर तुरुंगांत असतां कोणतेंहि दैनिक वर्तमानपत्र मला देण्यांत येऊं नये याचें माझ्या मनाला मोठें आश्चर्य वाटलें. खटला सुरू असतांना मला कलकत्त्याचें स्टेट्स्मन नांवाचें दैनिक मिळत असे. पण शिक्षा सुरू होतांच तें बंद झालें. संयुक्त प्रांतांत १९३२ सालापासून 'अ' वर्गाच्या कैद्यांना सरकारमान्य असें एकादें दैनिक देण्याची प्रथा होती. तोच नियम बंगालमध्येंहि चालू असेल अशी माझी कल्पना. पण दैनिकाऐवजीं मला स्टेट्स्मनचा साप्ताहिक अंक मिळूं लागला. हा अंक हिंदुस्थानांतील नोकरी अथवा कामकाज संपवून, इंग्लंडांत 'हरिहरि' म्हणत बसलेल्या इंग्रज नोकरांसाठीं व व्यापाऱ्यांसाठीं प्रसिद्ध होत असतो; आणि त्यांना ज्यांत गोडी वाटेल अशाच हिंदुस्थानांतील बातम्या गोळा करून त्यांत छापण्यांत येत असतात. परराष्ट्रीय वृत्तांताचा त्यांत मागमूसहि सांपडावयाचा नाहीं. परराष्ट्रीय घडामोडींकडे माझें विशेष लक्ष असल्यामुळें मला मात्र अगदीं चुकल्या-चुकल्यासारखें होई. परंतु सुदैवानें मला मँचेस्टर गार्डियनचें साप्ताहिक मिळण्याची व्यवस्था झाल्यामुळें माझा परराष्ट्रीय राजकारणाशीं असलेला संबंध टिकून राहिला.

फेब्रुवारीमध्यें मला शिक्षा झाली त्याच वेळीं युरोपमध्यें प्रचंड खळबळ आणि तीव्र असे कलह माजून राहिले होते. फ्रान्समध्यें फॅसिस्टांच्या बंडाळ्या होऊन "राष्ट्रीय सरकारची" स्थापना झाली होती. त्याहून अनिष्ट बातमी म्हणजे ऑस्ट्रियामध्यें चॅन्सेलर डोल्फस् यानें कामगारांना गोळ्या घालून तेथील सामाजिक लोकशाहीच्या भव्य प्रासादावरून नांगर फिरविण्याचा उद्योग आरंभिला होता. ऑस्ट्रियांतील रक्तपाताचें वर्तमान ऐकून माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें. हें जग किती क्रूर व किती रक्तपिपासु आहे! आपल्या स्वार्थाचें रक्षण करण्याची वेळ आली कीं, मनुष्य किती पाशवी बनतो! युरोप व अमेरिका खंडांत फॅसिझमच्या विजयाचें दृश्य दिसत होतें. जर्मनीमध्यें हिटलर सत्तारूढ झाला तेव्हां मला वाटलें कीं, जर्मनीचा आर्थिक संकटापासून बचाव करण्याचा मार्ग त्याला ज्या अर्थी दाखवतां येत नाहीं, त्या अर्थी त्याची बैठक फार वेळ टिकणार नाहीं. फॅसिझमचा वणवा दुसरीकडे पसरूं लागलेला पाहून विझण्यापूर्वी ज्योत मोठी व्हावी त्याप्रमाणें प्रगति-विरोधी समाज-घटकांचा तात्कालिक विजय होत आहे असेंहि मी आपल्या मनाचें समाधान करून घेऊं लागलों. हा ग्रहणाचा काळ एकदां संपला कीं नंतर

गुलामगिरीच्या बेड्या तुटणार अशी मनाला खात्री वाटे. परंतु आपल्याला प्रिय तेवढेच विचार मनांत येतात असें तर घडत नसेल ना, अशी शंकाहि मनांत डोकावूं लागे. हा फॅसिझमचा पूर इतक्या लवकर व इतक्या सहजासहजीं ओसरून जाईल असें समजण्याला आधार काय? आणि समजा कीं फॅसिस्ट दंडुकेशाहीला आपला निभाव लागत नाहीं असें वाटलें, तर शरण येण्याऐवजीं आपापल्या राष्ट्रांना, फॅसिस्ट लोक महायुद्धाच्या काळमुखांत लोटणार नाहींत हें तरी कशावरून? आणि अशा रणकंदनाचा परिणाम काय घडेल?

दरम्यानच्या काळांत फॅसिझमचा अनेक रूपांनीं प्रसार चाललाच होता. "प्रामाणिक जनांचें लोकसत्ताक राज्य" असा स्पेनचा नांवलौकिक, पण तें सुद्धां कमालीचें प्रगतिविरोधक बनलें होतें. तेथील प्रागतिकांनीं आपली साखरवाणी खूप शिणवली, पण व्यर्थ. स्पेनची अधोगति कांहीं त्यामुळें थांबली नाहीं. आधुनिक परिस्थितीपुढें प्रागतिक पंथ किती दुर्बल ठरतो त्याचा सगळीकडे प्रत्यय येत होता. शब्द आणि वाक्यें ह्यांवर त्यांची सारी भिस्त! वाणीचें साहाय्य असलें म्हणजे प्रत्यक्ष कार्याची जरूरीच नाहीं असें त्यांना वाटत असतें. पण अंगावर संकट येऊन गुदरलें म्हणजे चित्रपटाची अखेरची पट्टी अंधुक होत जावी त्याप्रमाणें त्यांचें वाक्-पाटव देखील लुप्त होत जातें.

ऑस्ट्रियांतील अनर्थासंबंधीं मँचेस्टर गार्डियनमध्यें आलेले संपादकीय लेख मला फारच आवडले. "या रणकंदनांतून बाहेर पडलेल्या ऑस्ट्रियाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असेल? सर्व युरोपमध्यें पहिल्या प्रतीचा प्रगतिविरोधक म्हणून नांवाजलेला कंपू जनतेच्या छातीवर बंदुका व संगिनी रोखून आपलें अधिराज्य तेथें गाजवीत राहील." "इंग्लंड एवढें स्वातंत्र्याचें कैवारी, मग या बाबतींत मुख्य प्रधानांनीं (मॅक्डोनल्ड) मूग गिळलेले दिसतात तें कां? हुकुमशाहीचे पोवाडे त्यांच्या तोंडून आम्हीं ऐकले आहेत. त्यामुळें राष्ट्राचें 'सुप्त' अंतःकरण जागृत होतें." त्यामुळें राष्ट्राला "नवी दृष्टि आणि नवा उत्साह प्राप्त होतो." अशा आशयाचीं त्यांनीं केलेलीं भाषणेंहि आम्हांला ऐकावयास मिळालीं आहेत. परंतु शरीराचें आणि त्याहिपेक्षां मनाचें मातेरें करून सोडणाऱ्या दडपशाहीविषयीं इंग्लंडच्या प्रधानानें आपलें मत अवश्य व्यक्त केलें पाहिजे.

मॅंचेस्टर गार्डियनला जर स्वातंत्र्याचा एवढा पुळका वाटतो तर हिंदुस्थानांत स्वातंत्र्याची गळचेपी चालू असतां मात्र त्याचा आवाज कां बसावा? आमच्या फक्त शरीराचेच हाल झाले असें नाहीं, आमच्या मनालाहि अग्निदिव्यांतून जावें लागलें होतें.

"ऑस्ट्रियन लोकशाही गेली, मातीस मिळाली. पण शत्रूंशीं झुंजतां झुंजतां मरण पत्करून अक्षय्य कीर्तीची जोड तिनें करून घेतली. ह्या कीर्तीच्या स्फुलिंगापासूनच भविष्य काळीं केव्हां तरी युरोपच्या स्वातंत्र्याचा दीप पाजळला जाईल."

" गुलामगिरींत जखडलेल्या युरोपचें निवळ कलेवर आपणांपुढें पडलें आहे. जिवंत भावनांचा प्रवाह त्याच्या नाड्यांतून वाहीनासा झाला आहे. श्वासोच्छ्वास हळूहळू बंद होत चालला आहे. आंतून अत्यंत प्रबल अशी ऊर्मि अगर झटका येऊन अंगाभोंवतीं पडलेले फांस तुटले तरच ही राजकीय मूर्च्छना नष्ट होईल .............. ऱ्हाइनपासून उरलपर्यंतचा प्रदेश म्हणजे एकाद्या प्रचंड तुरुंगाप्रमाणें बनला आहे. "

शब्द माझ्या हृदयांत कसे निनादत आहेत. पण मनांत विचार येई: हिंदुस्थानचें काय ? इंग्लंडमध्यें मँचेस्टर गार्डियनप्रमाणें इतर दुसरे स्वातंत्र्याचे भक्त आहेत यांत शंकाच नाहीं. पण मग आमच्यापुरतेच त्यांचे डोळे रातांधळे कां होतात ? ज्या गोष्टी दुसरीकडे झाल्या कीं हे लोक संतापानें लाल होतात, नेमक्या त्याच गोष्टी हिंदुस्थानांत घडत असतां त्या मात्र त्यांना दिसू देखील नयेत ! इंग्रजी प्रागतिकांचे मुरलेले पुढारी ॲस्क्विथ हे प्रकृतीनें दक्ष आणि शब्द तोलून मापून बोलणारे. पण त्यांनीं महायुद्धाच्या प्रारंभीं उद्गार काढले कीं, " अन्यायाची न्यायावर मात होत असतांना तें दुष्ट कृत्य निमूटपणें पाहत बसण्यापेक्षां आमचा हा देश सगळ्याच्या सगळाच बेचिराख होऊन गेलेला पाहणें अधिक श्रेयस्कर आहे असें मला वाटतें. " विचार उदात्त आहे, भाषा अनुरूप आहे. ह्या उद्गारांचा जयघोष करीत हजारों लाखों इंग्रज तरुणांनीं रणभूमीकडे धांव घेतली. पण एकाद्या हिंदी माणसानें खंबीरपणानें असें विधान केलें तर त्याची काय गत होईल !

राष्ट्रीय भावना अतिशय गुंतागुंतीच्या असतात. आपणांस वाटतें आपण किती न्यायी, किती निःपक्षपाती. दोष असेल तर तो दुसऱ्या माणसाचा, दुसऱ्या देशाचा. मनांतल्या मनांत आपली अशी समजूत असते कीं, आपण इतरांसारखे नाहीं. अर्थात् शिष्टाचाराचा भंग होईल म्हणून या गोष्टी आपण चारचौघांत बोलून दाखवीत नाहीं, इतकेंच. त्यांतून आपण जर साम्राज्यपदावर चढलेले असलों, तर आनंदभुवन अथवा कृतयुग कोठें असेल तर तें आपल्याच साम्राज्यांत आहे आणि स्थित्यन्तर घडवून आणूं पाहणारे तेवढे सगळे लोक कृतघ्न, स्वार्थी, अथवा भोळसर असे आहेत ह्याबद्दल आपल्याला शंकाच उरत नाहीं.

ब्रिटिश लोकांत कूपमंडूक वृत्ति आढळून येते. आणि तरवार विजयी व तागडी लाभाची होत गेल्यामुळें इतर सर्वांनाच ते तुच्छ लेखतात. " इंग्रजांना वाटतें कीं, कॅलेपासूनच काळ्या आदमींचा प्रदेश सुरू झाला " असें कोणीं तरी म्हटलें आहे. पण हें फारच सर्वसामान्य विधान झालें. ब्रिटिश वरिष्ठ वर्गाच्या मतें जगाचे साधारणतः पुढीलप्रमाणें विभाग पाडतां येतील : ( १ ) इंग्लंड—त्यानंतर पुष्कळशी जागा मोकळी ठेवून मग ( २ ) ब्रिटिश मुलुख ( त्यांतले फक्त गोरे लोकच बरें का ! ) आणि अमेरिका; ( म्हणजे अमेरिकेंतील फक्त ॲंग्लो-सॅक्सन रक्ताचे लोक; अकरमाशी, कट्टू वगैरे नव्हेत. ) नंतर ( ३ ) पश्चिम युरोप; मग ( ४ )

बाकीचा युरोप. त्यानंतर ( ५ ) दक्षिण अमेरिकेंतील युरोपियन लोक; नंतर पुनः बरीचशी जागा रिकामी, आणि सरते शेवटीं ( ६ ) आशियांतील सांवळ्या, काळ्या व पिवळ्या कातडीच्या लोकांचा गट.

कोठें विक्रम राजा आणि कोठें गंगा तेली, कोठें आपण आणि कोठें आपले राज्यकर्ते ! आपल्या प्रासादशिखरावरून ते आपणांकडे पाहूं लागले कीं अंतरामुळें त्यांना नीटसें दिसत देखील नाहीं आणि लोकशाही व स्वातंत्र्य ह्यांविषयीं आपण कोलाहल करूं लागलों कीं त्यांना त्रास होतो, ह्याचें आपणाला नवल काय म्हणून वाटावें ? ते जाडे शब्द तरी आमच्या तोंडीं शोभतात काय ? लोकशाही पद्धति हिंदुस्थानांत आणखी दहा युगांनीं तरी अवतरेल असें मला कांहीं वाटत नाहीं; हें थोर प्रागतिक आणि राजकारणधुरंधर जॉन मोर्ले यांचेंच ना वाक्य ? लोकशाहीचा कल्पतरु हिंदुस्थानच्या मर्त्य भूमीवर रुजावा कसा ? प्रागतिकांनंतर समाजवादाच्या बिनीची फौज म्हणजे ब्रिटिश मजूर पक्ष अधिकारावर आला. तो पडला दलितांचा कैवारी. त्यानें विजयाच्या गुंगींत १९२४ सालीं बंगालमध्यें वटहुकुम जारी केले आणि दुसऱ्या खेपेला तर त्याचे जे चाळे सुरू झाले ते अवर्णनीयच ! आपल्याविषयीं त्यांच्या मनांत पाप नाहीं; आम्हाला " प्रिय बंधूंनो " अशी ते जेव्हां हांक मारतात तेव्हां सद्भावनांनीं त्यांचें मन पुलकित होत असतें याबद्दलहि मला शंका वाटत नाहीं. पण आम्हांला जोखण्याचीं वजनेंमापें निराळींच ठेविलीं पाहिजेत अशीच त्यांचीहि समजूत आहे. भाषा व संस्कृति-भेदामुळें इंग्रज व फ्रेंच माणसांच्या सुद्धां विचारांत फेर पडलेला दिसतो. मग इंग्रज आणि आशियांतील माणूस यांच्यांत केवढा फेर पडत असेल बरें !

हिंदी राज्यघटनेबाबत हाउस ऑफ लॉर्डसमध्यें चर्चा चालू असतां नुकतींच कांहीं बडया बडया सरदारांचीं मोठीं उद्बोधक अशीं भाषणें झालीं. त्यांपैकीं एक भाषण लॉर्ड लिटन ह्यांनीं केलें. एके काळीं हिंदुस्थानांत प्रांताच्या गव्हर्नरचें व कांहीं काळ गव्हर्नर जनरलचेंहि काम त्यांनीं केलें होतें. उदारमतवादाचा व सहानुभूति बाळगणारा गव्हर्नर असा त्यांचा अनेकदां उल्लेख करण्यांत येत असतो. ते म्हणाले कीं " कॉंग्रेसपेक्षां सरकारच खरें हिंदुस्थानचें प्रतिनिधि आहे. अधिकारी वर्ग, सैन्य, पोलिस व संस्थानिक, तसेंच हिंदु व मुसलमान जनता या सर्वांच्या वतीनें सरकारलाच अधिकारयुक्त वाणीनें बोलतां येईल. परंतु कॉंग्रेसची स्थिति पाहिली तर तिला हिंदुस्थानांतील एकाहि प्रमुख जातीच्या वतीनें बोलण्याचा अधिकार पोंचत नाहीं. " आपल्या विधानांचा अधिक खुलासा करण्याकरितां त्यांनीं पुढें असें सांगितलें कीं " हिंदी जनता ह्याचा अर्थ ज्या लोकांवर मला अवलंबून राहावें लागलें व ज्यांच्यावर भावी गव्हर्नर आणि व्हाइसरॉय यांना अवलंबून राहावें लागेल ते लोक. "

ह्या भाषणावरून दोन महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट होतात. ब्रिटिशांना मदत करतील त्याच लोकांचा विचार सरकारतर्फे करण्यांत येतो हा एक; आणि हिंदुस्थान सरकारचें

स्वरूप अतिशय प्रातिनिधिक असल्यामुळें देशांतील सर्व संस्थांत अधिकांत अधिक लोकसत्ताक संस्था म्हणजे सरकारच आहे हा दुसरा. हें तर्कशास्त्र ज्या अर्थी इतक्या गंभीरपणें मांडण्यांत आलें आहे, त्या अर्थी सुवेझ कालव्याच्या पलीकडच्या भागांत शब्दांचे अर्थ पार बदलून जातात असेंच म्हटलें पाहिजे. हें तर्कशास्त्र असेंच पुढें वाढवीत गेलें तर असेंहि म्हणतां येईल कीं राजा हा सर्व लोकांचा प्रतिनिधि असल्यामुळें अनिर्बंध राजसत्ता हीच लोकसत्तेची परमावधि होय. "राष्ट्र? मी म्हणजेच राष्ट्र" असें एका फ्रेंच राजानें म्हटलें होतें त्याचीच ही पुनरावृत्ति होत आहे.

आणि नुकतीच एका थोर गृहस्थांनीं पूर्ण अनियंत्रित सत्तेची तरफदारी केलीच कीं. इं. सि. सर्व्हिसला ललामभूत झालेले सर माल्कम हेले यांनीं १९३४ च्या नोव्हेंबरमध्यें बनारस येथें भाषण करतांना हिंदी संस्थानांत राजसत्ताच चालू राहावी असें प्रतिपादन केलें. अर्थात् त्यांच्या सल्ल्याची कांहींच गरज नव्हती; कारण म्हैसूरचे दिवाण सर मिर्झा इस्माइल ह्यांनीं पांच महिने आधींच ह्या मताची तरफदारी करणारें भाषण करून ठेवलें होतें.

लोकशाहीला हिंदुस्थानची हवा ज्याप्रमाणें मानवत नाहीं, त्याचप्रमाणें इजिप्तची हवा देखील तिला मानवत नसावी. कैरोचें एक बातमीपत्र मीं स्टेट्समनमध्यें वाचलें. त्यांत घटना परिषद् बोलावण्यासाठीं अथवा राज्यघटनेमध्यें फेरफार करून घेण्यासाठीं सर्व राजकीय पक्षांनीं व विशेषतः वफद पक्षांतील लोकांनीं एकजूट करावी ह्या दृष्टीनें मुख्य प्रधान नेसीमपाशा यांची खटपट सुरू आहे अशी बातमी प्रसिद्ध झाली होती. नंतर अशी मल्लीनाथी केलेली होती कीं "ज्याला इजिप्तच्या राजकारणाची व तेथील लोकांची सांगोपांग माहिती आहे, त्याला निवडणुकी झाल्यावर वफद पक्षाचें बहुमत होईल याबद्दल शंकाच वाटणार नाहीं. नेसीम पाशाचा हा प्रयत्न उधळून टाकण्याची खटपट झाली नाहीं तर इजिप्तमध्यें थोड्याच काळांत परकीय सत्तेला विरोधी, क्रांतिकारक व फाजिल लोकसत्ताक अशी राजवट सुरू झाल्याशिवाय राहणार नाहीं."

वफद पक्षाच्या सामर्थ्याला शह देण्यासाठीं वास्तविक अधिकारी वर्गानें निवडणुकीच्या वेळीं मतदारांवर दडपण आणलें पाहिजे: परंतु मुख्य प्रधानांच्या मनांत "कायद्याबद्दल फाजिल आदर असल्यामुळें" तें शक्य होईलसें वाटत नाहीं; तेव्हां इंग्लंडमधील सरकारनें या कामीं लक्ष घालून "असल्या तऱ्हेची लोकसत्ताक राज्य-पद्धति आम्हीं चालूं देणार नाहीं," असें स्पष्ट शब्दांत जाहीर करावें हा एकच मार्ग यापुढें उरलेला आहे, असेंहि त्या लेखांत सूचित करण्यांत आलें होतें.

ब्रिटिश सरकार काय करील अथवा इजिप्तमध्यें काय गोष्टी घडतील तें मला सांगतां येणार नाहीं.* परंतु हिंदुस्थानांतील व इजिप्तमधील राजकारणाची

* १९३५ च्या नोव्हेंबरांत ब्रिटिश वर्चस्वाविरुद्ध इजिप्तमध्यें अनेक ठिकाणीं राजकीय दंगे झाले.

गुंतागुंत समजण्यास स्वातंत्र्यप्रेमी अशा इंग्रजांनीं लिहिलेल्या या लेखाचा बराच उपयोग होण्यासारखा आहे. एका संपादकीय लेखांत स्टेट्स्मन म्हणतो कीं " ज्या तऱ्हेच्या जीवनांतून व वृत्तींतून लोकसत्ताक तत्त्वांचा विकास होतो त्यांच्याशीं विसंगत अशी इजिप्तच्या मतदारांची राहणी व वृत्ति आहे. मुळांत गोम आहे ती हीच."

हिंदुस्थानांत जातिभेद असल्यामुळें लोकसत्ताक प्रगतीच्या मार्गांत विघ्नें येतात असें सांगण्यांत येतें आणि म्हणूनच जणूं कांहीं जातिभेद पक्के करण्याचा प्रयत्न करण्यांत येत असतो ! असाहि मुद्दा मांडण्यांत येतो कीं आमच्यांत पुरेशी एकी नाहीं. पण इजिप्तमध्यें मात्र जातिभेद मुळींच नसून उत्तम तऱ्हेची राजकीय एकी तेथें नांदत असावी असें दिसतें. पण अशी एकजिनसी एकीसुद्धां खऱ्या लोकशाहीला व स्वातंत्र्याला विघातक ठरते असाहि मुद्दा आमचे राज्यकर्ते उपस्थित करतातच. म्हणजे लोकशाहीचा मार्ग किती बिकट आहे पाहा ! आपल्यावर राज्य करणाऱ्या साम्राज्यशाहीचे हुकुम तंतोतंत पाळावेत व त्यांच्या स्वार्थाला हानिकारक असें कोणतेंहि कृत्य करूं नये हीच खास पौर्वात्य देशांसाठीं केलेली लोकशाहीची व्याख्या आहे. एवढीं दोन पथ्यें संभाळल्यावर मात्र लोकसत्ताक स्वातंत्र्याचा हवा तेवढा विकास येथें झाला तरी चिंता नाहीं.

# ६१

# शून्याकार

" पदपंकजीं तुझ्या गे ! हे श्रान्त बाळ माते,
स्वप्नें मनोज्ञ सारीं गेलीं त्यजून ज्यातें.
मधु गारशा तृणाच्या शय्येवरी अखेरी
शिर तप्त टेकवावें ही एक आस भारी "

एप्रिल महिना उजाडला. अलिपूर जेलमध्यें माझ्या कानावर आलेल्या अप्रिय बातम्यांमुळें माझें मनःस्वास्थ्य बिघडून गेलें होतें. एके दिवशीं तुरुंगाच्या सुपरिन्टेन्डेंटनीं सहजगत्या मला सांगितलें कीं ' गांधीजींनीं कायदेभंग परत घेतला. ' याहून जास्त मला कांहींच कळलें नाहीं. इतकीं वर्षे महत्त्वाची मानलेली चळवळ संपुष्टांत आली हें ऐकून मनाला दुःख झालें; तथापि तिचा असा शेवट व्हावयाचा हें ठरलेलेंच होतें अशी माझी मीं समजूत केली. एकाद दुसरी व्यक्ति अगदीं शेवटपर्यंत लढत राहील, परंतु राष्ट्रीय संस्थांना अशा तऱ्हेचें वर्तन शक्य होत नाहीं. कॉंग्रेसमधील बहुसंख्य लोकांची व राष्ट्राची नाडी बरोबर ओळखूनच गांधीजींनीं हें पाऊल टाकलें असावें याविषयीं मला शंका नव्हती. म्हणून मनाला दुःख होत असले तरी समाधान मानून घेण्याचा मीं प्रयत्न केला.

कायदेमंडळांत जाण्यासाठीं जुन्या स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न सुरू आहे असेंहि मला उडत उडत समजलें होतें. हा बनाव देखील अपरिहार्यच होता. कॉंग्रेसनें निवडणुकींपासून फटकून राहूं नये असें बरेच दिवसांपासून माझें मत होतें. तरीहि पांच महिने बाहेर होतों तेवढ्या काळांत ही सनदशीर वृत्ति खोडून काढण्याचा मीं प्रयत्न केला. तो अशासाठीं कीं अप्रस्तुत व बुद्धिभेद करणाऱ्या सनदशीर राजकारणाच्या भाषेमुळें नव्या आर्थिक व सामाजिक विचारांचे जे कढ कॉंग्रेसच्या अनुयायांत उसळत होते, ते मंद व्हावे. संकटकाल जितका अधिक टिकेल तितक्या नव्या विचारांच्या ह्या मुळ्या जनतेंत व बुद्धिजीवि वर्गांत खोलवर घुसतील आणि आमच्या राजकीय व आर्थिक जीवनाची खरी दुरवस्था स्पष्ट ध्यानांत येईल असा माझा तर्क होता. " कोणतेंहि राजकीय संकट उपयुक्तच ठरतें. कारण अंधारांत वावरणाऱ्या गोष्टी त्यामुळें उजेडांत येतात आणि राजकारणांत वावरणाऱ्या खऱ्या शक्तींचें यथार्थ दर्शन घडतें. त्यामुळें असत्य व थापेबाजी उघडकीस येते. वस्तुस्थितीचें समग्र दिग्दर्शन होऊन वास्तविक परिस्थितीचें ज्ञान संकटामुळेंच जनतेच्या

डोक्यांत उतरतें, " असें लेनिननें एके ठिकाणीं लिहून ठेवलें आहे. तेव्हां संकटांशीं झुंजत असतां कॉंग्रेसचें ध्येय नीट कोरलें जाऊन तिची संघटना अधिकाधिक दृढ होत जाईल व तिच्यांतील कमकुवत माणसें गळून पडतील अशी माझी अपेक्षा होती. त्यांत कोणतेंच नुकसान नव्हतें. पुढें प्रत्यक्ष प्रतिकार बंद ठेवून सनदशीर राजकारण आवश्यक होऊन बसलें तरी कॉंग्रेसमध्यें उरलेली खरी कर्तव्यदक्ष मंडळी त्याहि संधीचा उपयोग आपल्या ध्येयाच्या दृष्टीनें करून घेतील असें मला वाटत होतें.

आणि आतां तशी वेळ येऊन ठेपली होती. पण दुःखाची गोष्ट अशी कीं कॉंग्रेस-मधील खरे कार्यकर्ते आणि सत्याग्रह-युद्धांतील करोल सैनिक मागें हटले व ज्यांनीं सत्याग्रहांत विशेष भाग घेतला नव्हता, त्यांच्या हातीं अधिकारसूत्रें जाऊं लागलीं.

तदनंतर माझ्या हातीं साप्ताहिक स्टेट्स्मन पडला व कायदेभंग थांबवतांना गांधीजींनीं केलेला खुलासा मला वाचावयास मिळाला. तो विपरीत खुलासा पाहिल्यावर माझें अन्तःकरण अंधारांत खचत चाललें आहे असें मला वाटलें. मीं तो मजकूर पुनः पुनः वाचून पाहिला. सत्याग्रहाचे वगैरे अनेक विचार मनांत होते ते पार नाहींसे होऊन दुसऱ्याच शंका-कुशंकांची मनांत दाटी झाली. गांधीजींनीं लिहिलें होतें कीं " सत्याग्रह-आश्रमांतील सदस्यांशीं व सहकाऱ्यांशीं केलेल्या चर्चेमुळें हा खुलासा जाहीर करण्याची स्फूर्ति प्राप्त झाली. एका चांगल्या व कसलेल्या मित्राच्या वागणुकीसंबंधीं चर्चा सुरू असतां मला जी अकल्पित माहिती मिळाली त्यामुळें तर हा खुलासा करण्याची इच्छा फारच बलवत्तर झाली. तुरुंगांतील कार्य ते पूर्णपणें पार पाडीत नसत, आणि नेमून दिलेल्या कामापेक्षां ते आपल्या अभ्यासांतच अधिक वेळ दवडीत. त्यांचें हें वर्तन सत्याग्रही नियमांच्या सर्वस्वी विरुद्ध होतें. ह्या गोष्टीवरून माझ्या प्रिय मित्राची अपूर्णता तर स्पष्ट झालीच, पण त्याहिपेक्षां माझ्या ठिकाणच्या अपूर्णतेची मला ओळख पटली. ' मला वाटलें कीं माझ्या ठिकाणचा कमकुवतपणा तुम्हाला ठाऊक असेल, ' असे माझ्या मित्रानें उद्गार काढले. मी आंधळा बनलों होतों खराच. पुढाऱ्याच्या अंगीं अशी अंधदृष्टि असणें अक्षम्य होय. कांहीं काळ सक्रिय सत्याग्रहाचें एकमेव प्रतिनिधित्व मला माझ्याकडेच राखून ठेवलें पाहिजे ही गोष्ट मला त्याच क्षणीं पटली."

गांधींच्या " मित्राची " जी कांहीं अपूर्णता अथवा दोष असेल तो अगदींच किरकोळ होता. माझ्या हातूनहि असें दोषास्पद वर्तन घडलें आहे आणि त्याबद्दल मला काडीमात्र खेद वाटत नाहीं. पण हा दोष अगदीं गंभीर स्वरूपाचा असता तरी ज्या चळवळींत हजारों लोक प्रत्यक्षपणें सामील झाले व लाखो लोक अप्रत्यक्षपणें गोंवले गेले, ती चळवळ कोणी व्यक्ति चुकली माकली म्हणून बंद पाडावयाची ही कोठली रीत ! मला तरी ही विचारसरणी अमानुष व नीतिविरुद्ध अशी वाटली. सत्याग्रहांत काय येतें आणि काय नाहीं त्याबद्दल अधिकारवाणीनें सांगावयाची बढाई मला मारावयाची नाहीं. परंतु माझ्या परीनें मी देखील कांहीं

नीतितत्त्वें संभाळून वागण्याचा प्रयत्न करीत असतों. गांधीजींच्या या खुलाशानें मात्र माझ्या नीतिकल्पनांना जबरदस्त टोला बसला. गांधीजी बहुधा सहज प्रेरणेनुसार ( 'आन्तर्ध्वनि' अथवा प्रार्थनेला देवाकडून आलेलें उत्तर असें म्हणण्याऐवजीं हा शब्दच मला पसंत आहे. ) वागतात व सहसा त्यांच्या हातून चूक घडत नाहीं. जनतेची परिस्थिति बरोबर ओळखून योग्य क्षणाला हमखास योग्य असेंच कार्य सुरू करण्याची गांधीजींच्या अंगीं असलेली हातोटी अनेकवार दिसून आली होती. आपल्या कार्याचें समर्थन करण्यासाठीं ते जें समर्थन पुढें करतात तें बहुधा मागाहून सुचलेलें असतें व त्यापासून फारसा उलगडाहि होत नाहीं. आणी-बाणीच्या प्रसंगीं बहुतेक सर्वच पुढारी अंतःस्फूर्तीनें कार्ययोजना करीत जातात, आणि मागाहून आपण केलेल्या गोष्टीचें तर्कशास्त्र जुळवीत बसतात. कायदेभंग बंद करण्यांत गांधीजींनीं यथोचित वर्तन केलें असेंच मला वाटलें. पण त्यांनीं जी कारणमीमांसा मांडली होती ती मात्र बुद्धीची अवहेलना करणारी होती. राष्ट्रीय चळवळीच्या पुढाऱ्यांनीं असल्या तर्कशास्त्राचा अवलंब करावा ही विलक्षण गोष्ट होय. आपल्या आश्रमांतील सदस्यांना हवें त्याप्रमाणें वागण्याची त्यांना पूर्ण मुभा होती. कारण सदस्यांनीं विशिष्ट तऱ्हेचे नियम आपणावर स्वखुषीनें लादून घेतले होते. परंतु काँग्रेसनें तसें कांहींच केलें नव्हतें. मीं कांहीं त्यांच्या आश्रमाचा सदस्य नव्हतों. मग त्यांनीं आमची अशी ओढाताण कां करावी ? अशा प्रकारें कोणतीहि राजकीय चळवळ चालवणें कसें शक्य होणार ? सत्याग्रहाचें नैतिक स्वरूप ( कांहीं एका मर्यादेपर्यंत ) मीं स्वखुषीनें मान्य केलें होतें हें खरें. त्यामुळें राजकारणाला अधिक शुद्ध आणि अधिक उच्च दर्जा प्राप्त झाला. साध्यासाठीं वाटेल तीं साधनें उपयोगांत आणूं नयेत हेंहि मला मान्य आहे. परंतु सत्याग्रह-चळवळीचा हा नवा विकास म्हणा किंवा हा नवा अर्थ म्हणा फारच व्यापक होता. आणि त्यांतील संभाव्यता लक्षांत आल्यावर मला त्याबद्दल एक प्रकारची धास्तीच वाटूं लागली.

ह्या खुलाशामुळें माझ्या मनाला धाक बसून माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें. काँग्रेसच्या अनुयायांना गांधीजींनीं असा सल्ला दिला होता कीं "स्वखुषीनें लादून घेतलेलें दारिद्र्य आणि आत्मदमन यांचें तंत्र व त्यांच्यांतील सौंदर्य आत्मसात् करण्यास तुम्हीं तयार झालें पाहिजे. राष्ट्राला धष्टपुष्ट करणाऱ्या कार्यांत, वस्त्रस्वावलंबनाच्या प्रचारांत, स्वतःची वर्तणूक सर्वतोपरी निर्दोष ठेवून जातीय ऐक्य साधण्याच्या कामांत, आपल्या मनांतून अस्पृश्यतेचे विचार अजिबात नष्ट करण्याच्या प्रयत्नांत व स्वतःचें आचरण निर्मळ राखून आणि दारुड्या लोकांशीं व्यक्तिशः संबंध ठेवून मादक पेयापासून त्यांना पूर्णपणें परावृत्त करण्यांत आपला सर्व वेळ खर्च करण्याची त्यांनीं तयारी केली पाहिजे. अशा प्रकारची सेवा केली तर गरीब माणसाइतकी मजुरी कार्यकर्त्याला मिळवतां येईल. ज्यांना तेवढी मजुरी

पुरत नसेल त्यांनीं राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या लहान सहान असंघटित अशा उद्योग-धंद्यांत पडून अधिक मजुरी कमवावी."

हा आमचा राजकीय कार्यक्रम! गांधीजींच्या व माझ्यामध्यें अफाट दर्या पसरला आहे असें मला वाटलें. गेलीं कित्येक वर्षे ज्या स्नेहबंधनांनीं मी त्यांच्याशीं निगडित होऊन गेलों होतों तीं तुटून जात आहेत असें वाटून अंतःकरणांत सुरी खुपसल्याप्रमाणें मला वेदना झाल्या. कित्येक वेळपर्यंत माझ्या मनांत तुफान माजून राहिलें होतें. गेल्या एकदोन वर्षांत गांधीजींनीं केलेल्या गोष्टी मला फारशा पसंत नव्हत्या. कायदेभंगाच्या चळवळींत आपले सहकारी गुंतले असतां त्यांनीं चालू केलेले उपवास व उत्पन्न केलेले नवे नवे प्रश्न, त्यांनीं स्वतःच उपस्थित केलेल्या अनेक भानगडी व त्यामुळें त्यांच्यापुढें पडलेले विलक्षण पेंच, ह्या सर्व गोष्टींच्या मी विरुद्ध होतो. अनेक सहकाऱ्यांबरोबर प्रतिज्ञा करून जें कार्य करण्यासाठीं आपण बाहेर पडलों तें कार्य पार पडण्याच्या आधींच त्यांनीं नवीन कार्याला हात घातल्यामुळें जुन्या कामावरची निष्ठा मंद झाली. मी थोडा वेळ तुरुंगाबाहेर होतों. तेवढ्या वेळांत आमच्यांतील हे सर्व भेद माझ्या पूर्णपणें लक्षांत आले होते. 'आपल्यामध्यें स्वभावभिन्नता आहे' असें गांधीजी म्हणाले, परंतु हे केवळ स्वभावांतील भेद नव्हत. अनेक प्रश्नांसंबंधींच्या माझ्या ठाम व निश्चित विचारांचा त्यांच्या मताशीं विरोध येत असे. तथापि ज्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं कॉंग्रेस झटत आहे त्याच्याकडे लक्ष देऊन मी ह्या विचारांना आतांपर्यंत गौण स्थान देत आलों. सहकाऱ्यांशीं व ध्येयाशीं एकनिष्ठ राहणें ह्या गुणाचें महत्त्व माझ्या दृष्टीला अत्यंत वाटत असल्यामुळें माझ्या पुढाऱ्यांशीं व सहकाऱ्यांशीं मी निष्ठेनें राहण्याचा प्रयत्न करीत होतों. माझ्या मनाला पटलेल्या गोष्टीपासून मला खेंचून दूर नेण्यांत येत आहे असें वाटलें म्हणजे माझ्या मनांत विचारांचें काहूर माजे. पण कसें तरी करून मी सलोखा घडवून आणीत होतों. कदाचित् ती माझी चूकच असावी; कारण स्वतःच्या निश्चयापासून ढळणें केव्हांहि योग्य नव्हे. परंतु भिन्न भिन्न ध्येयांचे कलह सुरू असतां मी आपल्या सहकाऱ्यांशीं एकनिष्ठ राहिलों तो एवढ्याच आशेवर कीं वाढत्या चळवळीच्या जोरदार प्रवाहांत मला भासणाऱ्या अडचणी निर्मूल होतील आणि माझी विचारसरणी माझ्या सहकाऱ्यांना अधिकाधिक पटूं लागेल.

आणि आतां? एकदम मनांत विचार आला कीं अलिपूरच्या तुरुंगांत आपण एकाकी कोंडलेले आहोंत. सर्व जीवन असार आणि अरण्याप्रमाणें भासूं लागलें. आतांपर्यंत अनेक बिकट धडे मीं गिरवले असतील; परंतु सर्वांत बिकट व दुःखदायक असा धडा मला आतां गिरवावयाचा होता तो असा कीं, आपण दुसऱ्या कोणावरहि विसंबून राहतां कामा नये; आयुष्याच्या मार्गावर सोबतीची पर्वा न करतां चालत राहिलें पाहिजे; दुसऱ्यावर विसंबून राहिलें म्हणजे निराशा व्हावयाचीच.

माझ्या मनांत पेटलेल्या क्षोभाची झळ धर्म व धर्मग्रंथांनाहि लागली. सुदैवा

विचारसरणी आणि अविचलित ध्येय यांचे हे वैरी आहेत असें मला वाटलें. भावना आणि मनोविकार या दोन खांबांवरच त्यांचा तंबू उभारलेला नाहीं का? त्यांना आध्यात्मिक म्हणावयाचें पण खऱ्या अध्यात्मापासून ते किती दुरावलेले असतात. पारलौकिकाचा विचार करतांना मानवी मूल्यें, सामाजिक मूल्यें व सामाजिक न्याय-अन्याय यांची कदरच राहत नाहीं. आपल्या गृहीत कृत्यांशीं वस्तुस्थिति कदाचित् विसंगत असल्याचें आढळून येईल ह्या धास्तीनें त्यांनीं आपले डोळे घट्ट मिटून घेतलेले आहेत. धर्माची प्रतिष्ठापना सत्यावर झाली आहे असें म्हणतात, पण सत्य–अगदीं संपूर्ण सत्य–आपणाला उपलब्ध झालें असल्याबद्दल धर्माची एवढी खात्री झालेली असते कीं, सत्य काय आहे तें शोधण्याचा शीण घ्यावा असें त्याच्या मनांतहि येत नाहीं. सत्य आपणाला केव्हांच गवसलें आहे, त्याचा फक्त प्रसार करण्याचें काम बाकी आहे, ते आपण केलें म्हणजे झालें, असें धर्मानें ठरवूनच टाकल्याप्रमाणें दिसतें. श्रद्धा आणि सत्यसंशोधनाची इच्छा हीं एक नव्हत. शांतीची नौबत बडवून केवळ हिंसा-कर्मासाठींच अस्तित्वांत आलेल्या समाजघटनांना व शासनसंस्थांना हा धर्म पाठिंबा देत असतो. शस्त्राच्या हिंसेचा त्यानें निषेध केला, पण बगळ्याच्या पावलानें आणि धुवट वेषानें येऊन गळा पकडणाऱ्या हिंसेचा तो निषेध कां करीत नाहीं? उपास-मारीनें मृत्यु ओढवतो त्याचें काय? आणि त्याहिपेक्षां शरीर शाबूद ठेवून मनाचा तेजस्वी कोंब चुथडून टाकणाऱ्या आणि अंतःकरणाचीं छकलें छकलें उडवणाऱ्या हिंसेच्या बाबतींत धर्माची निषेधवाणी कां ऐकूं येऊं नये?

माझ्या अन्तःकरणांतील वादळ ज्यांनीं माजवलें त्यांची मला पुन्हां आठवण झाली. गांधीजी म्हणजे किती असामान्य माणूस. त्यांच्या स्वभावांतील गोडी किती अनुपम, किती अनिवार्य, आणि जनमनावरील त्यांचें प्रभुत्व तरी किती सूक्ष्म पण गाढ! त्यांच्या लेखावरून आणि उक्तीवरून गांधीजींची खरी कल्पना येणार नाहीं. त्यापेक्षां किती तरी पटींनीं त्यांचें व्यक्तित्व मोठें आहे. आणि त्यांनीं केलेली हिंदुस्थानची सेवा किती विशाल आहे बरें! हिंदी जनतेंत त्यांनीं मनुष्यपणा निर्माण केला, धैर्याचा स्फुल्लिंग चेतवला, शिस्त व सहानशक्ति यांचें बीजारोपण केलें; आणि ध्येयासाठीं हंसतमुखानें त्याग करावयास आणि त्या त्यागाला अनुरूप असा विनय अंगीं धारण करण्यासहि त्यांनींच ना शिकवलें? धैर्याच्या खंबीर पायावरच शीलसंवर्धन करतां येईल असें ते म्हणत असत. ज्याच्यापाशीं धैर्य नाहीं त्याच्यापाशीं नीति, धर्म, प्रेम कांहींहि असणें शक्य नाहीं. 'मनावर भीतीचें दडपण असेल तर सत्य अथवा प्रेम यांची साथ फार काळपर्यंत करतां येणार नाहीं.' हिंसेबद्दल मनांत आत्यंतिक तिटकारा असूनहि 'भ्याडपणा हा हिंसेपेक्षांदेखील तिरस्करणीय आहे,' असें ते म्हणत असत. "शिस्तीवरून माणसाच्या तळमळीची खात्री पटते. त्याग, शिस्त व संयम हे गुण नसतील तर उद्धाराची आशा करणें व्यर्थ आहे. शिस्तीवांचून त्याग निष्फळ ठरेल." हे काय नुसते शब्द आहेत, हीं जीर्ण सुभाषितें आहेत

असें वाटेल, पण तें खरें नाहीं. ह्या वाक्यांत आम्हांला सामर्थ्याची सुदृढता प्रतीत होत होती, आणि हीं वाक्यें उच्चारणाऱ्या व्यक्तीची तळमळ सर्व हिंदुस्थानला ज्ञात होती.

गांधीजी हिंदुस्थानचे अनन्यसामान्य असे प्रतिनिधी बनले. ह्या पुरातन आणि हतदैवी देशाचें अन्तःकरणच त्यांच्या शब्दावाटे प्रकट होत होतें. गांधीजी म्हणजेच जणूं कांहीं हिंदुस्थान असें वाटावें. त्यांच्यांतील उणीवा देखील हिंदुस्थानच्या राष्ट्रदेहांतील उणीवा होत्या. त्यांचा अपमान झाला तर तो गांधीजी या व्यक्तीचा नसून सर्व राष्ट्राचा झाला असें वाटत असे. व्हाइसरॉय वगैरे सारखे जे सद्गृहस्थ गांधीजींची नालस्ती करीत, त्यांना आपण सर्व राष्ट्राच्या हृदयाला सुया बोंचीत आहों याची जाणीव नसावी. १९३१ च्या डिसेंबरांत मंडलाकार परिषदेहून परत येत असतां पोपनें गांधीजींची मुलाखत घेण्याचें नाकारलें हें वृत्त ऐकून माझा कसा संताप झाला होता त्याची मला आठवण आहे. हा हिंदी राष्ट्राचा अपमान आहे असें मला वाटलें; आणि अपमान करण्याचा हेतु नसला तरी गांधीजींना नकार जाणून बुजून देण्यांत आला हें निःसंशय. आपल्या मठाच्या बाहेर राहणाऱ्या संतांबद्दल आणि महात्म्यांबद्दल कॅथोलिकपंथीय लोक अगोदर तुच्छताच दाखवतात. त्यांतून कांहीं प्रॉटेस्टंटांनीं गांधीजी हे फार थोर धर्मप्रवर्तक आणि खरे ख्रिस्तानुयायी आहेत असें मत व्यक्त केलेलें. मग ह्या नव्या पाखंड्याची आपल्या धर्मपीठावर सावली देखील पडूं नये अशी खबरदारी रोमच्या पोपमहाराजांनीं घ्यावी यांत नवल काय?

त्याच सुमारास म्हणजे १९३४ च्या एप्रिलांत अलिपूरच्या तुरुंगांत बर्नार्ड शॉचीं नवीं नाटकें मला वाचावयास मिळालीं. त्यांपैकीं "ऑन् दी रॉक्स्" या नाटकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतील ख्रिस्त व पायलेट यांच्यामधील संवाद मला फारच आवडला. पायलेट हा रोमन साम्राज्याचा प्रतिनिधि तर ख्रिस्त नव्या धर्माचा प्रणेता. त्यांच्या संवादामध्यें मला आधुनिक घटनांना लागू पडणारें तात्पर्य आढळून आलें. ख्रिस्त पायलेटला उद्देशून म्हणतो, " ही भीति तूं सोडून दे. रोमच्या वैभवासंबंधींच्या बढाया माझ्यापाशीं कशाला मारतोस? ज्याला तूं रोमन साम्राज्याचें वैभव असें म्हणतोस तें भीतीचें केवळ माहेरघर आहे. गतकाळची भीति, भविष्यकाळाची भीति, गरिबांची भीति, श्रीमंतांची भीति, धर्मगुरूंची भीति, विद्वान् अशा ग्रीक व ज्यू लोकांची भीति, आडदांड अशा गॉल, गॉथ आणि हूण रानवटांची भीति, आणि भीतीचें मूळ नाहींसें व्हावें म्हणून धुळीस मिळवलेल्या कार्थेजची भीति! तुम्हांला भीतीनें ग्रासून टाकलें आहे; आणि आतां तर स्वतःच निर्माण केलेल्या साम्राज्यवादी सीझरची आणि माझ्यासारख्या कफल्लक आणि कंगाल, धिःकारित आणि विडंबित अशा भटक्या माणसाची देखील तुम्हाला भीति वाटूं लागली आहे. खड्ग, हिंसा, आणि संपत्ति एवढ्या गोष्टींवरच काय ती तुमची श्रद्धा राहिलेली दिसते. अखिल रोमन साम्राज्याचा कैवारी असा तूं भ्याडांतला भ्याड ठरला आहेस; आणि परमेश्वराचा

पाईक बनलेला मी सर्व संकटांशीं झुंजलों, होतें नव्हतें तें गमावलें पण अजरामर कीर्तीचा मुकुट मीं मिळवला."

परंतु गांधीजींचें धोरण, त्यांची देशसेवा, अथवा त्यांचे माझ्यावर झालेले अनंत उपकार यांविषयीं प्रश्नच नव्हता. ह्या सर्व गोष्टी मान्य असल्या तरीहि इतर बाबतींत माणूस घोडचुका करणार नाहीं असें थोडेंच आहे? त्यांचें ध्येय तरी कोणतें? इतक्या वर्षांचा त्यांचा सहवास घडून सुद्धां मला त्यांचें ध्येय स्पष्टपणें कळलेलें नाहीं, आणि त्यांना तरी स्वतःच्या ध्येयाची स्पष्ट कल्पना आलेली आहे कीं नाहीं याची मला शंकाच वाटते. त्यांचें म्हणणें असतें कीं एक पाऊल टाकलें तेवढेंच मला पुरे. भविष्याच्या दालनांत डोकावण्याच्या अथवा अंतिम ध्येयाचें संपूर्ण चित्र रेखाटण्याचा ते प्रयत्नच करीत नाहींत. त्यांचें आवडतें सूत्र म्हणजे हें कीं साधनें निर्मळ ठेवा म्हणजे परिणामीं फळें मिळतील तीं आपोआपच "रसाळ गोमटीं" मिळतील. आणि आपले वैयक्तिक आचार प्रक्षाळून स्वच्छ केलेत कीं सिद्धि हात जोडून मागोमाग येतील. ह्याला राजकीय अगर शास्त्रीय वृत्ति म्हणतां येणार नाहीं. ही वृत्ति नैतिक नव्हे असेंहि कदाचित् म्हणावें लागेल. अगदीं संकुचित व तात्त्विक अशी ती भूमिका असून त्यामुळें सत्प्रवृत्ति कशाला म्हणावें हा प्रश्न मुळींच सुटत नाहीं. सत्प्रवृत्ति ही व्यक्तिगत असावी कीं समष्टिगत? गांधीजींचा सर्व भर शीलावर आहे. बौद्धिक शिक्षा व विकास ह्यांचें महत्त्व त्यांच्या दृष्टीनें फारच क्षुल्लक आहे. शीलाची जोड नसेल, तर बुद्धि अनाचार माजवील हें खरें मानलें तरी बुद्धीचे डोळे नसलेलें शील तरी काय कामाचें? शीलाचा विकास होतो तरी कोणत्या रीतीनें? गांधीजींची तुलना मध्ययुगीन ख्रिस्ती संतांबरोबर करण्यांत येते आणि त्यांची विचारसरणी पाहिली तर त्या तुलनेची यथार्थता पटतेहि. परंतु सध्याच्या युगांतील मानसिक अनुभवांशीं व पद्धतींशीं त्यांचे विचार मुळींसुद्धां जमत नाहींत.

तें असेंहि असो, ध्येयाकृति स्पष्ट नसणें ही कींव करण्यासारखी गोष्ट आहे खास. ध्येय निश्चित करून काम करूं लागलें तरच तें परिणामकारक रीतीनें वठेल. तर्कशास्त्राच्या कित्त्याप्रमाणें जगरहाटी चालत नाहीं, म्हणून तात्कालिक ध्येयांत परिस्थित्यनुरूप फेरफार करावे लागत असले, तरी कार्याला हात घालीत असतां एक कोणतें तरी परम ध्येय डोळ्यांसमोर ठेवलेंच पाहिजे.

तथापि ध्येयासंबंधीं गांधीजींच्या कल्पना जितक्या अस्पष्ट दिसतात, तितक्या त्या वास्तविक नाहींत असें मला वाटतें. कोणत्या तरी एका निश्चित मार्गानें जाण्याची अत्यंत प्रबळ इच्छा त्यांच्या मनांत वसत आहे. परंतु आधुनिक कल्पना व परिस्थिति यांच्याशीं सर्वस्वी विरुद्ध असा तो मार्ग असून आतांपर्यंत या दोहोंचा समन्वय करणें अथवा ध्येयाप्रत नेणारा एखादा मध्यम मार्ग शोधून काढणें त्यांना शक्य झालेलें नाहीं. त्यामुळेंच त्यांच्या विचारसरणींत संदिग्धता व अस्पष्टपणा भासत असावा. तथापि दक्षिण आफ्रिकेंत असतांपासून त्यांनीं जें तत्त्वज्ञान प्रथित केलें आहे, त्यावरून त्यांच्या

मनाचा कल एकंदरींत कोणत्या बाजूला झुकतो तें सहज समजून येईल. त्या काळीं व्यक्त केलेलीं मतें त्यांना अद्यापि ग्राह्य वाटतात कीं काय तें मला सांगतां येणार नाहीं; पण त्यांची आतांची विचारसरणी तंतोतंत तशी नसावी असें वाटतें. तथापि त्यांच्या मनोभूमीची ओळख तेव्हांच्या मतांवरूनहि होण्यासारखी आहे.

१९०९ सालीं लिहिलेल्या पुस्तकांत त्यांनीं म्हटलें आहे कीं " हिंदुस्थानला स्वतःचा उद्धार करून घ्यावयाचा असेल तर गेल्या ५० वर्षांत त्यानें जें कांहीं आत्मसात केलें तें सर्व आतां विसरून गेलें पाहिजे. आगगाड्या, तारायंत्रें, रुग्णालयें, वकील, डॉक्टर वगैरे सर्व गोष्टींना चाट दिली पाहिजे; आणि वरिष्ठ वर्गांतील म्हणून जे कोणी लोक आहेत त्यांनीं बुद्धिपुरःसर व धर्मपुरःसर साध्यासुध्या शेतकरी राहणीचा अंगीकार केला पाहिजे. कारण खऱ्या आनंदाचा लाभ शेतकरी जीवनापासूनच होत असतो हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें." "जेव्हां जेव्हां मी आगगाडींत किंवा मोटरींत बसतों तेव्हां तेव्हां माझ्या दृष्टीला योग्य वाटणाऱ्या मार्गाचें मीं उल्लंघन करीत आहें ह्याची जाणीव मला होत असते." "कमालीच्या कृत्रिम व राक्षसी वेगाच्या यंत्रांच्या साहाय्यानें जगाची सुधारणा करूं पाहणें म्हणजे वाळूची साखर करून दाखवण्यापैकीं प्रकार आहे." अशीं वाक्यें देखील त्यांच्या लेखांत आढळतात.

हीं सर्व तत्त्वें अत्यंत चुकीचीं, अनिष्ट व असंभाव्य आहेत असें मला वाटतें. दारिद्र्य, कष्ट व संन्यस्त जीवन यांच्याविषयीं त्यांना जो प्रेमादर वाटतो तोच त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या मुळाशीं आहे. गरजांचा गुणाकार करीत जाणें हें प्रगति वा संस्कृतीचें लक्षण नसून " जाणून बुजून आणि स्वेच्छेनें वासनांचें दमन करणें " हेंच प्रगतीचें व संस्कृतीचें लक्षण आहे असें ते मानतात. कारण " वासनादमनापासूनच खरें सुख व समाधान यांचा लाभ होऊन सेवेचें सामर्थ्य वृद्धिंगत होत असतें." गांधीतत्त्वज्ञानाची ही पकड ध्यानांत धरली म्हणजे त्यांचे बाकीचे विचार व त्यांचें कार्य यांचा अधिक संगतवार संदर्भ लागत जातो. परंतु त्यांच्या तत्त्वज्ञानाची भूमिका आपल्यापैकीं बहुतेकजण स्वीकारीत नाहींत आणि मग त्यांचें कार्य आपणास पसंत पडत नाहीं म्हणून तक्रार करीत बसतात.

व्यक्तिशः मला दारिद्र्य व कष्ट यांचें गुणवर्णन करणें आवडत नाहीं. त्या इष्ट गोष्टी नाहींत, त्यांचें समाजांतून उच्चाटनच केलें पाहिजे असें माझें मत आहे. आणि संन्यस्त वृत्ति ही कांहीं व्यक्तींना परवडत असली तरी सामाजिक ध्येय म्हणून तिचा पुरस्कार करावा एवढी तिची लायकी नाहीं. साधेपणा, समानता, संयम या गोष्टी मला समजतात व आवडतातहि. परंतु शरीर वाळवणारें तत्त्वज्ञान मला मान्य नाहीं. मल्ल शरीर कसतो त्याप्रमाणें आपल्या संवयी व आपलें मन देखील कसून आणि वळवून घाटदार केलें पाहिजे व आपल्या काबूंत ठेवलें पाहिजे. भोगलोलुप माणूस कष्ट सहन करील अथवा संयमानें वागेल किंवा आपत्कालीं शौर्य

गाजवील अशी आशा धरणें वेडेपणाचें ठरेल. म्हणून शरीर निकोप राहण्यासाठीं जशी दक्षता घ्यावी लागते त्याच तोलाची दक्षता मन निकोप ठेवण्यासाठींहि घेणें आवश्यक आहे. पण म्हणून संन्यस्त वृत्तीनें अथवा हठयोगानें शरीर झिजवलें पाहिजे असा त्याचा अर्थ होत नाहीं.

माझ्या शेतकरी जीवनाचा बडेजाव करणें मला बिलकुल पसत नाहीं. मला तर त्याचा तिटकारा वाटतो. त्या जीवनाचा स्वतः अंगीकार करणें तर राहोच, पण सर्व शेतकरी समाजालाहि त्या जीवनाच्या चिखलांतून खेंचून बाहेर काढावें अशी माझी मनीषा आहे. मला खेड्यांचें शहरीकरण करावयाचें नाहीं. पण शहरांतील सांस्कृतिक सोयी खेडोपाडीं फैलावाव्या असें माझें म्हणणें आहे. हल्लींच्या शेतकऱ्यांची राहणी स्वीकारली तर आनंद न होतां माझ्या जिवाचा कोंडमारा मात्र होईल. हातीं नांगर धरलेल्या शेतकऱ्याच्या जीवनांत अशी कोणती गोष्ट आहे कीं जिचा आम्हीं उदोउदो करावा ? पिढ्यान् पिढ्या चिरडला आणि पिळला जाणारा शेतकरी त्याचा नांगर ओढणाऱ्या बैलापासून जितका शरीरानें जवळ तितकाच मनानेंहि जवळ नसतो काय ?

मनुष्याच्या विकसित मनाचा त्याग करून ज्या वेळीं मानवी मन अचेतन पडलेलें होतें, त्या प्राचीन काळाकडे आपण कां धांव घ्यावी तेंच मला उमगत नाहीं. मनुष्याच्या वैभवाचें व विजयाचें द्योतक असें जें कांहीं वस्तुजात त्यानें निर्माण केलेलें आहे त्याचा निषेध करून मनाला जागच्या जागीं खिळवून व खुरटून टाकणाऱ्या परिस्थितीला इष्ट समजण्यांत येत आहे. आजकालच्या संस्कृतिवेलीवर अनिष्ट गोष्टींचे कांटे भरगच्च दिसत असले, तरी इष्ट गोष्टींचाहि भरगच्च फुलोरा तिच्यावर बहरलेला असून ह्या कांट्यांचा नायनाट करण्याची शक्तीहि तिच्या अंगीं आहे. परंतु ती सर्व वेलच मुळासकट उपटून काढण्याचा विचार केला तर रूक्ष, निःसार व आनंदशून्य असें जीवन आपल्या नशिबीं येईल. असलें जीवित इष्ट आहे असें धरून चाललें तरीहि विद्यमान् संस्कृतीचा उच्छेद करणें शक्य नाहीं. बदलत्या जगरहाटीचा हा ओघ अडवून धरणें अथवा तो टाळून जगांत वावरणें आपल्या हातीं नाहीं. ईडनमधील ज्ञानफलाचा* आस्वाद आपण घेतला, आतां त्याची चटक विसरणें कसें शक्य होईल ?

हे दोन दृष्टिकोण सर्वस्वी भिन्न असल्यामुळें त्यांच्या बाबतींत वादविवाद करणें

* ॲडम आणि ईव्ह हें पहिलें मानवी दांपत्य ईश्वरानें नंदनवनांत ठेवलें होतें. तेथील ज्ञानवृक्षाचीं फळें सोडून इतर सर्व वस्तुजाताचा उपभोग घेण्याची मुभा ईश्वरानें त्यांना दिली. पण फाजिल जिज्ञासेच्या भरीस पडून ईव्हनें त्या वृक्षाचें फळ खाल्लें. ह्या आज्ञाभंगाचें शासन म्हणून देवानें नंदनवनांतून त्यांची हकालपट्टी केली व जगांतील अनंत दुःखें त्या पापामुळें मनुष्यजातीच्या वांट्यास आलीं अशी बायबलांतील गोष्ट आहे.

कठीण आहे. पाप आणि आत्मविमोचन यांसंबंधीं गांधीजींची विचारचालना नेहमीं सुरू असते, तर आपण सामाजिक हितावरच अधिक भर देतों. पापासंबंधीं तर मला कल्पनाच करतां येत नाहीं. कदाचित् त्यामुळेंच गांधीजींच्या विचारसरणीचें आकलन मला होत नसावें. समाजाचें अथवा समाजघटनेचें स्थित्यंतर घडवून आणावें असा अभिनिवेश मनांत बाळगून ते बाहेर पडलेले नसून व्यक्तींच्या मनोभूमींत रुजलेलें पापवासनांचें तण कुळवून टाकावें यासाठीं त्यांचे सारे प्रयत्न चाललेले आहेत. " स्वदेशी व्रताचा अंगीकार करणारे लोक जगाची सुधारणा करण्याची व्यर्थ हांव मनाशीं बाळगीत नाहींत. कारण जगाचीं सूत्रें ईश्वराच्या हातीं आहेत व राहतील आणि त्याच्या इच्छामात्रेंकरूनच जगाचे व्यवहारहि होत जातील, अशी त्यांची श्रद्धा असते. " इकडे असें म्हणत असतांनाच जगाला सुधारण्याचे प्रयत्नहि मोठ्या हट्टाला पेटून ते करीत असतात. परंतु त्यांच्या उद्दिष्ट सुधारणा व्यक्तिगत स्वरूपाच्या आहेत. वासनांच्या मगरमिठींतून म्हणजेच पापविपाशांतून व्यक्तिमात्रानें आपली सोडवणूक करून घ्यावी यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत. फॅसिझमचा विषय प्रतिपादन करीत असतां एका रोमन कॅथोलिक लेखकानें स्वातंत्र्याची व्याख्या केली आहे ती अशी:—" स्वातंत्र्य म्हणजे पापाचरणाच्या बंधनांतून सुटका. " ही व्याख्या गांधीजींनाहि मान्य होईल असें वाटतें. २०० वर्षांपूर्वी लंडनच्या धर्मगुरूनें जवळ जवळ याच शब्दांत स्वातंत्र्याची व्याख्या करून ठेवलेली आहे.

हा दृष्टिकोण एकदां मान्य केला म्हणजे लैंगिक संबंधाविषयीं आधुनिक माणसाला विचित्र दिसणाऱ्या गांधीजींच्या विचारांचा थोडासा उलगडा होतो. " अपत्याची इच्छा मनांत न धरतां केलेला संभोग हा गुन्हा आहे " आणि " संततिनियमनाच्या कामीं कृत्रिम उपायांचा अवलंब केल्यास मनुष्य पोचट व कर्तृत्वशून्य बनेल " असें त्यांचें मत आहे. ते म्हणतात कीं, " स्वतःच्या कृत्यांचा परिणाम टाळणें हें चुकीचें व नीतिबाह्यच आहे. आपल्या भुकेचे चोजले पुरवल्यावर दुखणें येऊ नये यासाठीं औषधांच्या बाटल्या घशांत ओतणें हें जसें अनिष्ट, त्याचप्रमाणें आपले पाशवी कामविकार यथेच्छ पुरवून त्यांच्या परिणामांतून सुटून जाण्याची धडपड करणें हेंहि अनिष्टच आहे. "

माझें वैयक्तिक मत विचारलें तर गांधीजींची उपरोक्त विचारसरणी मला अनैसर्गिक व विपरीत वाटते. त्यांचें म्हणणें जर रास्त असेल तर स्वतः मी, चांचल्य व नेभळेपणा यांच्या आहारीं चाललेला गुन्हेगार आहे असेंच म्हटलें पाहिजे. संततिनियमनाला रोमन कॅथोलिकहि जोराचा विरोध करीत असतात, पण गांधीजींच्या तर्काची मुसंडी जेथवर जाते तेथवर त्यांनीं मजल मारलेली दिसत नाहीं. मनुष्यस्वभाव लक्षांत घेऊन त्यांनीं कांहीं पर्याय व तडजोडी सुचवलेल्या आहेत. गांधीजींनीं वाद अगदीं कडेला पोंचवला असून संतानेच्छा नसतांना झालेल्या संभोगाचा

रास्तपणा अथवा आवश्यकता मानावयास ते मुळींच तयार नाहींत. स्त्री-पुरुषांत नैसर्गिक विषयासक्ति असते ही गोष्टच त्यांना कबूल नाहीं. " मी स्त्री-पुरुषांतील नैसर्गिक आकर्षण विचारांत घेत नाहीं. माझा आदर्श अशक्यप्राय असें मला सांगण्यांत येतें. पण टीकाकारांनीं दिग्दर्शित केलेली विषयाशक्ति नैसर्गिक आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. वस्तुस्थिति तशी असेल तर लवकरच आपणावर प्रलयकाळ ओढवेल. स्त्रीपुरुषांत जो नैसर्गिक प्रेमभाव वसत असतो, तो बहीण-भावाचा, मायलेंकराचा, पिताकन्येचा. ह्या प्रेमावरच जगाचे व्यवहार अवलंबून आहेत. " ह्या शब्दांपेक्षांहि आग्रही शब्द हवे असतील तर पुढील विचार पाहा : " अंगांत असेल नसेल ती सारी शक्ति एकवटून मला आग्रहानें असें घोषित करावयाचें आहे कीं, प्रत्यक्ष पतिपत्नीमधील कामुक आकर्षण हें अनैसर्गिक होय. "

फ्रूड, ओडिपस-मनोगंड आणि मनोविश्लेषणविषयक कल्पना यांच्या आधुनिक जमान्यांत हे निष्ठेनें खचून भरलेलें शब्द कानावर फार विलक्षण व अनोळखी असे वाटतात. श्रद्धा असेल तर त्यांचा स्वीकार करावा, नसेल तर धिक्कार करावा. मधली स्थिति या बाबतींत संभवतच नाहीं. कारण या ठिकाणीं श्रद्धेचें काम आहे, बुद्धीचें नव्हे. मला तरी निदान असें वाटतें कीं, गांधीजी या बाबतींत साफ चुकले आहेत. कांहीं व्यक्तींच्या बाबतींत त्यांचा सल्ला उपयुक्त ठरेल; पण त्यांचें म्हणणें सरसकट लागू केलें तर वासनाभंग, दमनविकृति, आकस्ताळेपणा वगैरे अनेक शारीरिक व मानसिक घोटाळे निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहींत. कामवासनेचें नियंत्रण करणें इष्ट आहे, पण या बाबतींत गांधीजींच्या तत्त्वाला मोठ्या प्रमाणांत यश येईल असें मला वाटत नाहीं. गांधीजींचा धर्मसिंधु महाकठिण आहे, तो आपणास झेपण्यासारखा नाहीं असें ठरवून लोक काडीमात्र फरक न करतां जुनेंच वळण गिरवीत राहतात अथवा कोणी त्यांचें तत्त्व अमलांत आणण्याचा प्रयत्न केलाच तर पतिपत्नींत खडाष्टक माजतें. नियमनाचे उपाय प्रचारांत आले कीं संभोग-क्रिया मनसोक्त होऊ लागेल आणि स्त्रीपुरुषांमध्यें विषयाकर्षण असतें असें मानले कीं पुरुष स्त्रियांच्या व स्त्रिया पुरुषांच्या मागें धांवू लागतील अशी धास्ती गांधीजींना वाटत असली पाहिजे. यांपैकीं कोणतेंच अनुमान योग्य नाहीं. आणि लैंगिक विषय महत्त्वाचा असला तरी त्यामुळें त्यांना एवढा घोर कां लागावा तेंहि मला समजत नाहीं. लैंगिक विषय म्हटला कीं गांधीजींना सदाचार अथवा अनाचार हे दोनच प्रकार दिसतात, अधले मधले मार्ग ते ओळखीतच नाहींत. आणि दोन्ही बाबतींत त्यांची भूमिका अतिरेकी आहे, असाधारण व अनैसर्गिक आहे. कदाचित सध्यां बाजारांत चाहटळ लैंगिक वाङ्मयाचा जो पूर आलेला आहे त्याची ही प्रति-क्रिया असावी. मी एक दहाजणांसारखा माणूस आहें आणि इतर वासनांप्रमाणें कामवासनेलाहि माझ्या जीवनक्रमांत स्थान मिळालेलें आहे. पण मी त्या वासनेच्या

आहारीं कधींच गेलों नाहीं, आणि माझ्या मार्गांत ती कधीं आडवीहि आलेली नाहीं. माझ्या आयुष्यांत त्या वासनेला नेहमीं गौण स्थानच मिळालेलें आहे.

जगाकडे पाठ फिरवलेल्या, भोगाभिलाषांना पापकारी समजून त्यांचें यमन करणाऱ्या वीतराग्याप्रमाणें गांधीजींची वृत्ति आहे. आणि संन्यस्तांच्या बाबतींत ती साजेशीच आहे. पण पदरीं पडलेल्या जगाला पवित्र मानून त्यांतून शक्य तेवढा रसास्वाद घ्यावयास प्रवृत्त झालेल्या प्राकृत जनांना ही वृत्ति पढवण्याचा उद्योग करण्यांत काय अर्थ आहे? एक अनिष्ट गोष्ट टाळण्याच्या असल्या प्रयत्नामुळें गांधीजींच्या पुढें दुसऱ्या दहा अधिकच अनिष्ट गोष्टी दत्त म्हणून उभ्या राहतात.

लिहिण्याच्या भरांत दुसरेच विषय उपस्थित झाले. पण अलिपूर-तुरुंगांतील त्या दुःखमय कालांत ह्या विचारांचा पिंगा माझ्या डोक्यांत सुरू होता. ते क्रमशः पद्धतशीर रीतीनें येत होते असें नव्हे. त्यांची एकच गंतागंत झाली होती, त्यामुळें मनाचा साराच गोंधळ उडून फार त्रास झाला. विशेषतः एकांतवास आणि औदासीन्य ह्यांची विषण्ण छाया मनांत पसरली होती ती तुरुंगांतील आणि माझ्या टीचभर खोलींतील कुंद वातावरणामुळें तर अधिकच घनवटली. मी बाहेर असतों तर मनाला बसलेला धक्का क्षणमात्रच टिकला असता. कारण नव्या परिस्थितीशीं समरस होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाल्याबरोबर मनाला विरंगुळा वाटला असता. पण तुरुंगांत विसाव्याचें कोणतेंच साधन हाताशीं नसल्यामुळें कांहीं दिवस जीवन अगदीं बेचव झालें. तथापि स्वभावतः मी उत्साही असल्यामुळें माझ्या मनावरचें निराशेचें किटण लवकरच झडून जातें. हळूहळू निराशेचें मळभ वितळूं लागलें, तितक्यांत कमलहि माझ्या भेटीला आली. ती भेटल्यामुळें मला एवढा आनंद झाला कीं, एकांतवासाचें दुःख चारी वाटा पळालें. जगांत कांहींहि घडो आम्ही दोघें तरी जिवास जीव देणारीं आहोंत ना, असें मनांत आलें.

## ६२

# मूर्तिमंत कोडें

ज्या लोकांनीं गांधीजींचे केवळ लेखच वाचले असतील म्हणजे ज्यांचा त्यांच्याशीं प्रत्यक्ष परिचय झालेला नसेल, त्यांना गांधीजी म्हणजे एखाद्या भिक्षूप्रमाणें मोठे कर्मठ, शुष्कगंभीर आणि आंबट चेहऱ्याचे गृहस्थ असावेत असें वाटण्याचा संभव आहे. पण लेखांवरून त्यांच्याविषयीं अनुमान करणें अन्यायाचें होईल. लेखांच्या द्वारां त्यांचें यथातथ्य दर्शन होत नाहीं. ते त्याहून किती तरी थोर आहेत. तेव्हां त्यांनीं लिहिलें आहे तेवढेंच उद्धृत करून त्यावर टीका करणें वाजवी होणार नाहीं. रूक्ष कर्मठांच्या सर्वस्वीं विरुद्ध अशी त्यांची वृत्ति आहे. त्यांचें स्मित मोठें आनंददायक असतें; ते स्वतः हंसतात, इतरांनाहि हंसवतात, आणि सगळीकडे उल्हासाचें वातावरण पसरून देतात. त्यांच्या स्वभावांत कांहीं अवर्णनीय असा बालसदृश मिठासपणा आहे. खोलींत गांधीजींनीं पाऊल ठेवलें कीं, कुंद वातावरणांत वाऱ्याची झुळुक यावी त्याप्रमाणें भास होतो.

गांधीजी म्हणजे एक कोडें आहे; विसंगतीचें एक उदाहरण आहे. सर्वच असामान्य माणसें मला वाटतें अशीं असतात. कित्येक वर्षे मला एक मोठें गूढ पडलें आहे कीं, पददलित माणसाविषयीं ज्याला इतकें गाढ प्रेम व आस्था वाटते, त्यानें पददलित वर्ग हमखास उत्पन्न करणाऱ्या व त्याला पिसून काढणाऱ्या समाजरचनेला पाठिंबा द्यावा हें कसें? अहिंसेचा जो एवढा मोठा कैवारी त्यानेंच निर्भेळ हिंसा व दडपशाही यांवर आधारलेल्या सामाजिक व राजकीय संस्थांना मान्यता द्यावी हा काय न्याय? विद्यमान समाजघटनेचा ते कड घेतात हें विधान कदाचित् बरोबर ठरणार नाहीं; कारण गांधीजी जवळ जवळ दंडहीन समाजवादाचे पुरस्कर्ते आहेत. पण त्यांना ध्येयभूत वाटणारा दंडहीन समाज ही फार लांबची व समजण्यास कठिण अशी गोष्ट असल्याकारणानें ते सद्यःस्थितीला मान्यता देत असावेत. हिंसेवर ते आक्षेप घेत असले, तरी सामाजिक स्थित्यंतर घडवून आणण्याच्या कामीं वापरण्यांत येणाऱ्या यच्चयावत् साधनांविषयीं ते आक्षेप घेत असतील असें मला वाटत नाहीं. साधनांचा विचार कांहीं काळ बाजूला ठेवून नजीकच्या काळांत शक्य होईल अशा समाजरचनेच्या आदर्शाची कल्पना करणें अशक्य नाहीं असें वाटतें.

स्वतःला ते कधीं कधीं समाजवादी म्हणवतात. पण त्या शब्दाला त्यांच्या कोशांत विशिष्ट अर्थ आहे. व्यवहारांत समाजवाद या शब्दामुळें ज्या आर्थिक

घटनेचा बोध होतो तो त्यांच्या व्याख्येंत बसत नाहीं. त्यांच्या मागोमाग बऱ्याच प्रमुख कॉंग्रेस-कार्यकर्त्यांनींहि त्या शब्दाचा वापर करण्यास प्रारंभ केलेला आहे. त्यांच्या तोंडीं असणाऱ्या समाजवादाचा भूतदयावादाचें कडबोळें एवढाच अर्थ करतां येईल. रॅम्से मॅक्डोनल्डसाहेबांचा कित्ता सहीसही गिरवून हे बडे लोक राजकीय परिभाषेचा सदोष उपयोग करीत असतात. समाजवादाचा विषय गांधीजींना अज्ञात नाहीं हें मला ठाऊक आहे. कारण अर्थशास्त्र, समाजवाद व मार्क्सप्रणीत समाजवाद या विषयावरील ग्रंथ वाचून त्यांनीं या बाबतींत इतरांशीं चर्चादेखील केलेली आहे. परंतु मूलभूत प्रश्नांच्या बाबतींत केवळ बुद्धीवर विसंबून राहिलें तर फारशी प्रगति होत नाहीं असें मला अलीकडे वाटूं लागलें आहे. "तुमच्या अंतः-करणाची इच्छा नसेल तर मेंदूनें कितीहि प्रयत्न केला तरी एखाद्या गोष्टीबद्दल तुमच्या मनांत विश्वास उत्पन्न करणें कदापि शक्य नाहीं," असें विल्यम जेम्सचें म्हणणें आहे. एकंदर दृष्टिकोणावर भावनांची छाप असते व बुद्धीवरहि त्या आपली हुकमत चालवितात. धार्मिक, राजकीय वा आर्थिक कोणत्याहि बाबतींतील आपले वादविवाद पाहा, ते आपल्या भावनांच्या व सहजप्रेरणेच्या अनुरोधानें चालत असतात. शोपेनहॉरनें म्हटलें आहे कीं, "इष्ट असेल तें माणूस साध्य करील, पण आपणाला काय इष्ट वाटावें तें त्याला इच्छामात्रेंकरून ठरवतां येणार नाहीं."

दक्षिण आफ्रिकेंत असतांना गांधीजींच्या मनांत कल्पनातीत स्थित्यंतरें घडून आलीं व त्या योगानें प्रचंड विचारमंथन होऊन त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण पार पालटून गेला. तेव्हांपासून एका ठाम विचारसरणीच्या स्थिर पायावर त्यांच्या कल्पनांना अधिष्ठान सांपडलेलें असून गांधीजींच्या विचारांत आतां स्थित्यंतराला वाव उरलेला नाहीं. नव्या सूचना करणारांचें म्हणणें ते मोठ्या धिमेपणानें व सावधानतेनें ऐकून घेत असले तरी ह्या दाक्षिण्यपूर्ण अवधानाच्या मागें असलेलीं मनाचीं कवाडें बंद झालेलीं आहेत याची जाणीव त्यांच्याशीं बोलणाऱ्याला होत असते. त्यांच्या मनाचीं कांहीं कांहीं कल्पनांनीं अशी जबरदस्त पकड घेतलेली आहे कीं, इतर कल्पना त्यांना क्षुद्र भासतात. असल्या गौण मुद्द्याविषयीं आग्रह धरणें म्हणजे बुद्धिभेद करून प्रधान कार्याचा विपर्यास करण्याप्रमाणें आहे असें गांधीजींना वाटतें. आपल्या कल्पनांना ठामपणें चिकटून राहिलें कीं, कांहीं वेळानें हें वरपांगी वादळ निवळेल व साधनें योग्य असतील तर योग्य असेंच साध्य हातीं येईल असा त्यांचा विश्वास आहे.

माझ्या मतें त्यांच्या विचारसरणीची बैठक ही अशा प्रकारची असावी. हिंसा-कर्माशीं निगडित झालेल्या समाजवादाविषयीं व विशेषतः मार्क्सवादाविषयीं त्यांचें मन साफ नाहीं, कलह व हिंसा यांचा भपकारा वर्गकलह ह्या शब्दांतून येत असल्यामुळें त्यांना तो शब्ददेखील त्याज्य वाटतो. जनतेच्या राहणीचें मान कांहीं एका किमान दर्जापलीकडे जावें अशी त्यांची मुळींच इच्छा नाहीं. त्यांची कल्पना अशी कीं राहणी

अधिक सुखमय व उंची झाली तर भोगलोलुपतेचा व पापाचा फैलाव होईल. कांहीं मूठभर सुखासीन लोक विषयकर्दमांत लोळत आहेत तेवढे पुरे. त्यांची संख्या वाढवून परिस्थिति अधिकच बिघडविण्यांत काय हंशील? त्यांचे विचार ह्या प्रकारचे असावेत असें अनुमान १९२६ सालीं लिहिलेल्या त्यांच्या पत्रांवरून काढतां येईल. त्या वेळीं इंग्लंडांतील प्रचंड संप सुरू होता. गांधीजींना पत्र लिहिणाऱ्या माणसानें असा मुद्दा मांडला कीं, खाणमजुरांची संख्या फार मोठी असल्याकारणानें ते पराभूत होण्याचा संभव आहे; तेव्हां त्यांनीं संततिप्रतिबंधक उपायांचा अवलंब करून आपली संख्या आटोपशीर करावी. त्यावर उत्तर देतांना गांधीजी म्हणतात, "सरतेशेवटीं मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, खाण-मालकांची बाजू अन्यायाची असून देखील जर त्यांचाच विजय झाला तर खाण-मजुरांच्या मागें पोराबाळांचें लेंढार फार मोठें होतें म्हणून ते पराभूत झाले असें न म्हणतां जीवनांतील हरएक बाबतींत संयम कसा राखावा याचें शिक्षण त्यांना मिळालेलें नव्हतें म्हणून ते पराभूत झाले असें म्हटलें पाहिजे. मजुरांना मुलेंबाळे नसतीं तर मजुरींत वाढ व्हावी या मागणीचें समर्थन करणें शक्य झालें नसतें. त्यांनीं दारू प्यावी कशाला? जुगार खेळावा कशाला? आणि विड्या ओढाव्या कशाला? हीं सर्व व्यसनें संभाळून देखील खाणमालक वरचष्मा गाजवतातच कीं नाहीं, असा उलट प्रश्न विचारणें योग्य होईल काय? मालकवर्गापेक्षां मजूर जर अधिक सदाचरणी नसतील तर जगाच्या सहानुभूतीवर त्यांनीं हक्क तरी कां सांगावा? मालकवर्गाची संख्या फुगत जावी व मालकशाहीचें बळ अधिकाधिक वाढत जावें अशी का मजुरांची इच्छा आहे? लोकशाहीची सत्ता प्रस्थापित होईल तेव्हां जगांत सुधारणा घडून येतील अशा आश्वासनाच्या जोरावर लोकशाहीला आम्हीं पाठिंबा द्यावा असें सांगण्यांत येते; पण भांडवलदार व भांडवलशाही यांच्यापासून अवतीर्ण झालेल्या ज्या अनिष्ट गोष्टी आहेत, त्या तरी फार मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊं नयेत अशी आपण खबरदारी घ्यावयास नको काय?"

हें वाचीत असतांना १९२६ सालीं मीं पाहिलेले इंग्रज मजूर व त्यांचीं बायका-मुलें यांचे उपासमारीनें सुकून व सुरकतून गेलेले चेहरे माझ्या दृष्टीसमोर उभे राहिले. आपल्याला भरडून काढणाऱ्या राक्षसी पद्धतीबरोबर असहाय आणि दीन असे ते बिचारे कामकरी झुंज खेळत होते. गांधीजींची माहिती बिनचूक नाहीं. मजुरी वाढवावी यासाठीं त्या वेळचा लढा नसून मजुरी कमी होऊं नये म्हणून ते लढत होते. शिवाय, मालकवर्गानें स्वतःच खाणींना टाळें ठोकलें होतें. परंतु या गोष्टींचें विशेष महत्त्व नाहीं, आणि संततिप्रतिबंधक साधनांविषयींची सूचना कितीहि विलक्षण दिसत असली, तरी तीहि अप्रस्तुत म्हणून सोडून देऊं या. मीं गांधीजींच्या पत्रांतील उतारा उद्धृत केला तो अशासाठीं कीं, पगारवाढ वगैरे मजुरांच्या मागण्यां-संबंधीं गांधीजींचे विचार काय आहेत ते कळावे. त्यांच्या विचारांचा समाजवादी

अथवा तसेंच म्हणावयाचें तर भांडवलशाही दृष्टिकोणाशींसुद्धां काडीमात्र संबंध असल्याचें दिसून येत नाहीं. भांडवलशाहीची लुडबुड थांबविली तर हरएक व्यक्तीची अन्नवस्त्राची व निवाऱ्याची सोय करतां येईल इतकी विज्ञानाची आणि यांत्रिक साधनांची प्रगति झाली आहे असें प्रयोगानें सिद्ध करून दाखवतों म्हणून कोणीं वादविवाद सुरू केला, तरी गांधीजींना त्याची मोठीशी मातब्बरी वाटणार नाहीं. कारण विशिष्ट मर्यादेपलीकडे सुखसाधनांची वाढ व्हावी याविषयीं ते उत्सुक नसल्यामुळें समाजवाद जें चित्र रेखाटतो तें त्यांना यत्किंचितहि विलोभनीय वाटत नाहीं. मग भांडवलशाही अंशतः तरी मान्य कां करावयाची ? तर त्याचें उत्तर असें कीं, जगांतील उपासमार भांडवलशाही कांहीं प्रमाणांत निवारते म्हणून. वास्तविक त्यांना दोन्ही पद्धतींबद्दल तिटकाराच आहे. परंतु भांडवलशाही सध्यां प्रत्यक्ष विद्यमान् आहे म्हणून, तिच्याकडे दुर्लक्ष करणें शक्य नाहीं म्हणून व सपशेल उपासमारीपेक्षां ती जरा बरी म्हणून, ते भांडवलशाहीला मान्यता देतात, इतकेंच.

गांधीजींचे विचार बरोबर अशा प्रकारचेच आहेत असें विधान करणें कदाचित् चुकीचें ठरेल. परंतु त्यांची विचारसरणी खरोखरीच अशा प्रकारची आहे असें मला वाटतें आणि त्यांच्या भाषणांतून जो व्याघात आणि गोंधळ दिसून येतो तो त्यांचीं गृहीतकृत्यें सर्वस्वी भिन्न असल्यामुळेंच दिसून येतो. आत्यंतिक सुख व स्वास्थ्य मिळविणें हें ध्येय असें लोकांनीं न मानतां जीवन अधिक नीतिमय करावें, दुराचरणाचा त्याग करावा, चैन सोडावी, आणि अशा रीतीनें स्वतःची आत्मोन्नति साधीत जावें अशी त्यांची इच्छा आहे आणि ज्या कोणाला जनतेची सेवा करावी असें वाटत असेल, त्यानें जनतेची आर्थिक उन्नति साधणें हेंच आपलें मुख्य काम आहे असें न समजतां स्वतःच्या राहणीचें मान कमी करून सामान्य जनांच्या पायरीवर यावें व त्यांच्याशीं मिसळावें, खरी लोकशाही ती हीच असें त्यांचें मत आहे, हें १७ सप्टेंबर १९३४ रोजीं गांधीजींनीं काढलेल्या जाहीर पत्रकावरून दिसून येईल.

ह्या विचारसरणीशीं अथवा दृष्टिकोणाशीं कोणत्याहि आधुनिक लोकसत्तावादी, समाजवादी अथवा भांडवलवादी विचारवंतांचें एकमत होणें शक्य नाहीं. मात्र जनतेशीं फटकून वागून, ज्या लोकांना अत्यावश्यक गरजा भागण्यापुरतीहि सामग्री मिळत नाहीं त्यांच्यापुढें आपल्या सुखसाधनांची व उच्च राहणीची शेखी मिरविणें हें सभ्याचाराला सोडून आहे ही गोष्ट कोणींहि मान्य करील. तथापि गांधीजींच्या विचारसरणीशीं जुन्या धार्मिक वळणाच्या व्यक्तीचें थोडेंफार एकमत होण्यासारखें आहे. कारण दोघांच्याहि भावना गतकालाशीं संबद्ध झालेल्या असून गतकालीन परिभाषेंतच दोघांचेहि विचार चालू असतात. जें सध्यां आहे अथवा जें पुढें होणार आहे, त्यांच्यापेक्षां जें होऊन गेलें त्याच्याकडेच अशा लोकांचे अधिक लक्ष असतें. भूतकालाकडे धांव घेणारी मनोवृत्ति व भविष्यकालाकडे टक लावून बसणारी मनोवृत्ति या दोहोंत जमीनअस्मानाचा भेद आहे. जनतेच्या राहणींत

सर्वसाधारणपणें सुधारणा करण्याचा विचारहि जुन्या जमान्यांत शक्य नव्हता. भिकारटाकार हें नेहमीं असावयाचेंच. दहापांच श्रीमंत माणसें असत, तीं समाजधारणेला व उत्पादन–कार्याला आवश्यक होतीं. त्यामुळें त्या वेळचा नीतिवेत्ता, त्या वेळचा सुधारक व त्या वेळचा भावनाप्रधान माणूस, होती ती समाजस्थिति गृहीत धरून, गरजू धर्मबांधवांवर धर्म करणें श्रीमंतांचें कर्तव्य आहे अशा प्रकारच्या शिकवणुकीचा ठसा धनिकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत असे. त्यांनीं गरिबांचे निधिधारक व्हावें, धर्मशील व्हावें, अशी शिकवणूक त्या काळीं देण्यांत येई. धर्मानें दानाचें मोठेंच महात्म्य वर्णन केलें आहे; आणि राजेरजवाडे, जमीनदार व भांडवलदार यांच्यासंबंधीं बोलतांना त्यांनीं गरिबांचे निधिधारक व्हावें या मुद्द्यावर गांधीजी जेव्हां भर देतात त्या वेळीं अनेक धर्मगुरूंनीं प्रतिपादिलेल्या आदेशाचाच ते पुनरुच्चार करीत असतात. ख्रिस्ती धर्माचा जगद्गुरु जो पोप तोदेखील असेंच सांगतो. श्रीमंतांनीं दानसंपन्न असावें हीच आळवणी हिंदु धर्म व मुसलमान धर्म करीत राहतात. आणि श्रीमंत लोक मंदिरें व मशिदी बांधून, धर्मशाळा उभारून अथवा आपल्या गडगंज खजिन्यांतून गरिबांना कांहीं ताम्रदान, रौप्यदान करून आपण मोठें पुण्याईचें कृत्य करून कृतार्थ झालों असें समाधान मानतात.

पोप १३ वा लुई यानें नवीन औद्योगिक युगासंबंधीं लिहिलेला एक लेख फार प्रसिद्ध आहे. त्यावरून जुन्या धार्मिक प्रवृत्तींची चांगली कल्पना येईल. तो म्हणतो :—

"दुःख आणि कष्ट सहन करावे असेंच मानव जातीच्या ललाटीं लिहिलेलें आहे. आणि मनुष्यानें कितीहि आटापीट केली तरी मानवी जीवनाभोंवतीं घोंघावणारीं दुःखें व कष्ट अजिबात नष्ट करण्यास कोणतीहि शक्ति अथवा कोणताहि उपाय समर्थ होणार नाहीं. याहून भिन्नमताचे जर कोणी लोक असतील, आपद्ग्रस्त लोकांना यातनांतून आणि हालांतून मुक्त करण्याचें व त्यांना अखंड विश्रांतीचें व अविच्छिन्न सुखाचें जर कोणी वचन देत असतील तर ते जनतेची केवळ फसवणूक करीत आहेत व परिस्थिति अधिक बिकट करीत आहेत असेंच म्हटलें पाहिजे. जगाचें वास्तविक स्वरूप समजून घेण्यासारखी दुसरी उपयुक्त गोष्टी नाहीं. पण त्याचबरोबर जगांतील दुःखांचा उपशम करण्याचें साधन आपण कोठें तरी दुसरीकडे शोधलें पाहिजे."

दुसरीकडे म्हणजे कोठें तें पुढें सांगितलें आहे :—

"इत्युत्तर कालांतील अक्षय्य जीवनाचा विचार केल्याशिवाय इहलोकींच्या वस्तुजाताचें आकलन अथवा मूल्यमापन योग्य रीतीनें होणें शक्य नाहीं....निसर्गाकडून जें श्रेष्ठ सत्य आपणांस समजतें त्यावरच ख्रिस्ती तत्त्वज्ञानाची भव्य इमारत उभारलेली आहे. इहलोकींची आयुष्य-यात्रा संपल्यावर खऱ्या जीवनाचा प्रारंभ होतो हेंच तें सत्य होय. पृथ्वीतलावर सांपडणाऱ्या विनाशी व क्षणभंगुर वस्तूंचा

उपभोग घ्यावा म्हणून ईश्वरानें आपणास जन्मास घातलें नसून स्वर्गीय व अविनाशी अशा गोष्टींनीं आपण समृद्ध व्हावें म्हणून त्यानें आपणास निर्मिलें आहे. जग ही आपली मायभूमि नव्हे, ती बंदिशाळा आहे. धनधान्य वगैरे ज्या वस्तू मनुष्यांना इष्ट व आवश्यक वाटतात, त्यांचे आपल्या दारीं ढीग पडलेले असले काय अथवा घरच्या मडक्यांत चिमूटभर देखील पीठ नसलें काय, जो अक्षय्य असा आनंद आहे तो त्यामुळें बाधित होण्याचें कारण नाहीं."

ही धर्मदृष्टि पुरातन काळाशीं संलग्न झालेली आढळते. कारण त्या काळच्या दुःखद परिस्थितींतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या परलोकावर श्रद्धा. आणि परिस्थिति बदलून स्वप्नांतहि कधीं कल्पना आली नसेल इतकी साधनसंपत्ति मानव जातीच्या हातीं आतां जमा झाली असली तरी आमच्या मनाभोंवतीं पडलेले भूतकालाचे पाश अद्यापि ढिले झालेले नाहींत. कांहीं संदिग्ध व अगम्य अशा आध्यात्मिक मूल्यांचे देव्हारे माजवण्याचें कार्य अद्याप चालूच आहे. दुसरे ज्याला तमोयुग म्हणतात तेंच आपलें कृतयुग अशी समजूत करून घेऊन कॅथोलिक लोक मध्ययुगीन कालाकडे माना मुरडून पाहत आहेत. कारण ख्रिस्ती साधुसंत त्या काळींच निर्माण झाले, धर्मयुद्धासाठीं राजे बाहेर पडले ते त्याच वेळीं, आणि गोथिक पद्धतीचीं देवळें उंच वाढलीं तींहि त्याच अमदानींत. "ख्रिस्ती लोकशाहीचें खरें युग तें" असें त्यांचें सांगणें आहे. "इस्लामी लोकशाहीचें" युग पहिल्या पहिल्या खलिफांच्या सदा विजयी राजवटींत होऊन गेलें. म्हणून मुसलमानांची दृष्टि त्या जमान्यावर खिळून राहिली आहे व वैदिक काळ आणि रामराज्य यांचीं स्वप्नें हिंदु लोक या घडीला पाहत आहेत व इतिहास मात्र कानांशीं ओरडून सांगतो आहे कीं, सुवर्ण युगांत अन्नवस्त्रादि अत्यावश्यक गोष्टी देखील जनतेला मिळत नसत. लोकांना फांके मारावे लागत. कळसावरच्या मूठभर लोकांनीं अत्यानंद चाखला असेल; कारण आत्मिक विलास उपभोगण्यासाठीं आवश्यक तीं साधनें व स्वास्थ्य त्यांना लाभत होतें; पण इतरांची दशा पुसाल तर उदरंभरणासाठीं घाम शिंपीत राहण्यापलीकडे त्यांनीं कांहीं केलें असेल अशी कल्पनासुद्धां करवत नाहीं. उपाशीं पोटाला संस्कृति कसली आणि वेदान्त कसला? पोटाला गोळाभर अन्न कसें मिळवावें ह्या विवंचनेंत ते निमग्न असणार.

औद्योगिक युगाबरोबर अनेक अनिष्ट गोष्टी आलेल्या असून भव्य स्वरूपांत त्याच तेवढ्या आपल्यापुढें उभ्या आहेत. परंतु सर्व जगाचा साकल्यानें विचार केला व विशेषतः बहुतांशीं यांत्रिक देशांकडे नजर टाकली तर बहुसंख्य लोकांची सांस्कृतिक व आत्मिक उन्नति सुलभतेनें होण्यासाठीं आवश्यक त्या साधनसंपत्तीचा संग्रह औद्योगिक युगामुळेंच झालेला आढळून येईल. पण ह्या गोष्टीची आपणास विस्मृति होते. हिंदुस्थान वगैरे सारख्या ज्या देशांना औद्योगीकरणाचे फायदे मिळालेले नाहींत, तेथें ही गोष्ट चटकन ध्यानांत येणार नाहीं. यंत्रांच्या साहाय्यानें

आपलेंच तेल काढण्यांत आलें, आणि आपली सांपत्तिक दृष्टया हानि तर झालीच, पण अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सांस्कृतिक व आत्मिक प्रगतीलाहि आपण आंचवलों. पण ह्याचा दोष यंत्रांकडे नसून परकीय सत्तेकडे आहे. आपल्या देशांतील नामधारी पाश्चात्य संस्कृतीच्या साहाय्यानें सरंजामदारी पद्धतीला कांहीं काळ तरी अवसान चढलें असून आमचा कोणताहि प्रश्न सुटण्याच्या ऐवजीं तो उलट बिकटच होत चालला आहे.

असा विपरीत अनुभव आपणास यावा हें आमचें दुर्भाग्य होय. पण जगाकडे पाहतांना आपण आपली दृष्टि यामुळें मलिन होऊं देतां उपयोगी नाहीं. कारण आजच्या कालांत समाजधारणेशीं अथवा वस्तूत्पादनासाठीं धनिक वर्गाला संभाळून ठेवण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. अजागलस्तनासारखी त्याची स्थिति झाली आहे, एवढेंच नव्हे तर प्रगतीच्या वाटेंत त्याची अडगळ भासू लागली आहे. संपत्तिमानांनीं उदार व्हावें आणि गरिबांनीं देवावर भार टाकून व नशिबावर हवाला ठेवून सदाचरणानें व काटकसरीनें राहावें असा बोध करणारा भिक्षुकवर्गहि अनवश्यक झाला आहे. मनुष्याची साधनसंपदा इतकी उदंड वाढली आहे कीं जगापुढचे समस्त प्रश्न त्याला सोडवून दाखवितां येतील. अनेक धनिक, निवळ बांडगुळांचें जिणें जगत आहेत. आणि अशीं बांडगुळें समाजवृक्षाच्या वाढीला अडचण करतात इतकेंच नव्हे, तर त्यांच्यामुळें जीवनरसाचा भलत्याच कामीं विनियोग होतो. हा परोपजीवि वर्ग आणि त्याला निर्माण करणारी समाजरचना ह्यांच्या योगानें, कार्याचें व उत्पादनाचें क्षेत्र संकुचित होत जाऊन दुसऱ्याच्या श्रमावर जगणाऱ्या धनिक ऐदी बेकारांत आणि काम मिळत नाहीं म्हणून वणवण भटकणाऱ्या उपाशी बेकारांत भर मात्र पडत जाते. कांहीं दिवसांमागें स्वतः गांधीजींनीं लिहिलें होतें: " उपाशी आणि बेकार लोकांच्या जगांत ईश्वराला अवतार घ्यावयाचा असेल तर कामधंदा आणि पोटाला घांस मिळवून देणाऱ्या मजुरीच्या रूपानेंच त्याला अवतीर्ण व्हावें लागेल. अन्न मिळविण्यासाठीं काम करावें म्हणून ईश्वरानें मानवाला निर्माण केलें असें असतां, काम न करतां जे जेवतील ते चोर होत, असें भगवंताचेंच वचन आहे."

ज्या काळीं सध्यांचे प्रश्न उपस्थित झालेले नव्हते, त्या काळचे दंडक व त्या काळच्या पद्धति स्वीकारून, आणि जीर्ण झालेल्या परिभाषेचा आधार घेऊन, आधुनिक जगाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा विचार करावयास लागलें तर गोंधळ आणि फजिती हमखास व्हावयाची, ही काळ्या दगडावरील रेघ, खाजगी मालमत्तेची कल्पना ही जगांतील एक मूलभूत व सनातन अशी कल्पना आहे अशी कांहीं जणांची समजूत असल्याचें दिसतें. परंतु ही कल्पनादेखील एकसारखी बदलत गेल्याचें आढळून येईल. एके काळीं गुलाम हे खाजगी मालमत्तेंत जमा होत, बायकामुलांची तीच स्थिति होती; आपल्या जहागिरींत कोणाचें लग्न झालें तर नवऱ्या मुलीच्या प्रथम-समागमाचा जो हक्क पाश्चात्य देशांत सरंजामदारांना होता,

तो देखील खाजगी मालकीपैकींच समजण्यांत येई ! त्याचप्रमाणें रस्ते, मंदिरें, तऱ्या, पूल, हवा, उदक, जमीन, सगळ्यावर सरंजामदाराची खाजगी मालकी होती. युद्धकाळांत खाजगी हक्कांवर एकसारखी गदा येत असते. सध्यांच्या काळांत शेअर्स, बँकेंतील ठेवी, वगैरे गोष्टींमुळें मालमत्तेला अमूर्त स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे. मालमत्तेचें स्वरूप जसजसें बदलत आहे, तसतसा खाजगी मालमत्तेच्या बाबतींत सरकारचा हात अधिकाधिक शिरत असून, लोकांच्या मागणीला अनुसरून मालमत्तेवरील भरमसाट वैयक्तिक हक्कांवर कायद्याचें नियंत्रण जास्त जास्त तंग बसूं लागलें आहे. हरतऱ्हेच्या जादा करांच्या द्वारा खाजगी मालमत्तेचे लचके तोडले जात असून सार्वजनिक हिताकडे त्या रकमेचा विनियोग करण्यांत येत आहे. सार्वजनिक कार्याचें धोरणहि सार्वजनिक हिताकडे दृष्टि ठेवूनच आंखलें जातें. स्वतःच्या मालमत्तेचें रक्षण करण्यासाठीं एकादी व्यक्ति सार्वजनिक हिताला विरोधी असें वर्तन करूं लागेल, तर तें मंजूर होणार नाहीं. खरें पाहिलें तर गतकालांत बहुसंख्य लोकांना कोणतेच मालकी हक्क नव्हते, ते बिचारे स्वतःच दुसऱ्या कोणाची तरी मालमत्ता समजले जात. आजच्या घटकेलासुद्धां •फारच थोड्या लोकांना मालकी हक्क प्राप्त झालेले आहेत. बहुविध हक्कांच्या मालकांविषयीं अनेकदां उल्लेख होत असतो. पण सांप्रतच्या युगांत प्रत्येक स्त्रीपुरुषाला जगण्याचा, श्रम करण्याचा व आपल्या श्रमाचें फळ चाखण्याचा अधिकार आहे असें मानण्यांत येत असल्यामुळें एक नवीनच हक्कसंबंध निर्माण झालेला आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कल्पना अशा रीतीनें बदलत गेल्या म्हणून भांडवल व मालमत्ता कांहीं कापराच्या वडीप्रमाणें हवेंत मिसळून जात नाहीं. ती शतधा वांटली जाते व संपत्ति एकठाय झाल्यामुळें इतरांवर सत्ता गाजवण्याचें जें सामर्थ्य कांहीं थोड्या व्यक्तींना प्राप्त झालेलें होतें तें त्यांच्या हातून जाऊन सर्व समाजाच्या हातीं येतें, इतकेंच.

व्यक्तीची मानसिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नति करून तद्द्वारां परिस्थितींत बदल करावा असें गांधीजींना वाटतें. दुराचरणाचा व भोगलोलुपतेचा मार्ग वर्जून लोकांनीं शुद्ध व्हावें अशी त्यांची इच्छा आहे. मद्यपान, धूम्रपान इत्यादि व्यसनें सोडा, कामवासनेचें दमन करा असा त्यांचा आग्रहाचा उपदेश आहे. या दुर्गुणांची प्रतवारी करतांना मतभेद होतील; परंतु व्यक्तिहिताच्या व विशेषेंकरून राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पाहिलें तर लोभ, स्वार्थ, वित्तैषणा, स्वार्थासाठीं करण्यांत येणारे कलह, अत्यंत क्रूर अशीं गटांगटांतील व वर्गावर्गांतील युद्धें, एका वर्गाचा दुसऱ्या वर्गाकडून होणारा अमानुष छळ व पिळवणूक, राष्ट्राराष्ट्रांतील दारुण संग्राम वगैरे गोष्टीपेक्षां उपरोक्त दुर्गुण किती तरी कमी अहितकारक आहेत असें नाहीं का कबूल करावें लागणार ? अर्थात् ही हिंसा आणि मनुष्याची माणुसकी घालविणारे हे कलह गांधीजींना त्याज्यच वाटतात. परंतु प्रबल असतील त्यांनीं दुर्बलांना गिळावें असाच जेथें कायदा आहे व "समर्थ असतील त्यांनीं मिळवावें व शक्त असतील त्यांनीं राखावें" असेंच जेथें

स्मृतिवचन आहे, त्या वित्तेषणेवर चाललेल्या समाजांत अशा प्रकारची हिंसा व असे कलह अपरिहार्यच नव्हेत काय? नफेबाजीच्या संघर्षातून कलहाच्या ठिणग्या पडणारच. माणसाची लुटारू वृत्ति उतावी, मातावी आणि ती स्वैर सुटावी, अशीच सध्याची समाजव्यवस्था आहे. कांहीं सभ्यपेलव भावनांचें पोषण सांप्रतच्या समाजांत खात्रीनेंच होतें; पण मनुष्याच्या अधम वृत्ति "गवता ऐशा उदंड" पोसतात, हेंहि तितकेंच खरें आहे. दुसऱ्यांना जमिनीवर लोळवून त्या मुडद्यांच्या उंच राशीवर उभा राहील तो यशवंत. असल्या आकांक्षा व असल्या भावना, समाजांत जोपासल्या जात असतां व शिखरावरचीं माणसें त्यांच्या संमोहनाला बळी पडत असतां नीतिमान मानव निर्माण करण्याचें आपलें ध्येय जयास जाईल, असें गांधीजींना वाटतें तरी कसें? त्यांना सेवावृत्तीचा प्रसार व्हावयास हवा आहे, व तो कांहीं व्यक्तींच्या बाबतींत साध्य होईलहि. परंतु वित्तेषणेचे विजयी शिलेदार हेच जोंपर्यंत समाजांत आदर्शभूत समजले जात आहेत व स्वार्थवृत्तीलाच प्रधानप्रेरक शक्ति असें मानण्यांत येत आहे, तोंपर्यंत बहुसंख्य जनता वाहत्या मार्गानेंच जात राहणार.

परंतु या प्रश्नाला इतःपर केवळ नैतिक वा तात्त्विक समस्येचें स्वरूप राहिलेलें नाहीं. कारण जगाचा गाडा चिखलांत रुतून पडून सुटकेचा कोणता तरी मार्ग शोधून काढणें अवश्य झाल्याकारणानें हा प्रश्न व्यावहारिक स्वरूपाचा व तांतडीचा झालेला आहे. मिकॉबरप्रमाणें* वाईटांतून कांहीं तरी चांगलें निघेलच अशी आशा करीत स्वस्थ बसणें आपणांस शक्य नाहीं. बरें, भांडवलशाही, समाजवाद, वगैरेंतील दोष काढीत निष्क्रिय बसावें आणि जुन्या व नव्या सर्व पंथांतील गुणांच्या समन्वयाची सुवर्णमध्यमी मृतशेखरची मात्रा आपल्या हातीं लागेल अशा आशामय तंद्रींत राहावें तर तेंहि शक्य दिसत नाहीं. रोगाचें निदान करून व त्यावरील औषधयोजना निश्चित करून तें औषध हस्तगत करण्याच्या उद्योगाला लागलें पाहिजे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टीनें विचार केला तर बसली जागा कायम टिकणें शक्य नाहीं हें निश्चित. मागें हटण्याचा प्रयत्न करतां येईल अगर पुढें तरी पाऊल घालतां येईल. तथापि या बाबतींतसुद्धां आपणाला निवड करतां येईलसें दिसत नाहीं; कारण मागें हटणें आतां सर्वथैव अशक्यच झालें आहे, असें मला वाटतें.

तथापि गांधीजींच्या उद्योगाकडे पाहिल्यावर अशी कल्पना होते कीं, मागें हटत हटत अत्यंत संकुचित अशा स्वयंपूर्णतेकडे त्यांना जावयाचें आहे; म्हणजे राष्ट्र स्वयंपूर्ण झालें तरी त्यांचें समाधान होणार नसून स्वयंपूर्ण खेडीं अस्तित्वांत आणण्याचा त्यांचा इरादा दिसतो. प्राथमिक काळांत प्रत्येक खेडें जवळ जवळ संपूर्ण असे. अन्नवस्त्रादि स्वतःच्या गरजा तें स्वतःच भागवी. अर्थातच अशा परिस्थितींत

---

* डिकन्स् यांच्या सुप्रसिद्ध 'डेव्हिड कॉपरफील्ड' या कादंबरींतील एक सनातन आशावादी पात्र.

राहणीचा दर्जा अत्यंत निकृष्ट असणें अपरिहार्य होतें. अशी स्थिति सदोदित राहावी हें गांधीजींचें ध्येय नसेल; कारण तें केवळच असाध्य आहे. अशी व्यवस्था झालीच तर आजकालच्या प्रचंड लोकसंख्येला कांहीं देशांतून उपाशीं मरण्याची पाळी येईल, व असली दरिद्री योजना कोणीं आंखली तर लोक त्याचें चालूंहि देणार नाहींत. हिंदुस्थानसारखा कृषिप्रधान देश घेतला तर ग्रामोद्योगाची वाढ झाल्यास आपल्या खेड्यांतल्या कमालीच्या निकृष्ट राहणींत अल्पस्वल्प सुधारणा करतां येईल असें मला वाटतें. पण इतर कित्येक देशांप्रमाणें आपणहि जगाशीं जखडले गेलों आहोंत, ते बंध तोडून एकांडेपणानें व्यवहार करणें यानंतर शक्य होणार नाहीं. तेव्हां जागतिक दृष्ट्याच आपणाला विचार केला पाहिजे. आणि तसा विचार करूं लागलें कीं संकुचित स्वयंपूर्णतेच्या प्रश्नाची लगेच वावडी होते असें आढळून येईल. मला तर स्वयंपूर्णतेचें धोरण सर्वतोपरी अनिष्ट वाटतें.

येणेंप्रमाणें समाजवादाच्या एकमेव आणि संभाव्य अशा उपाययोजनेकडे वळणें अपरिहार्य ठरतें. जनहितासाठीं संपत्तीचें उत्पादन आणि विभजन नियंत्रित करून प्रथम राष्ट्राराष्ट्रांत आणि नंतर क्रमशः अखिल जगांत समाजवाद प्रस्थापित करणें अवश्यमेव आहे. हें साध्य हस्तगत करण्यासाठीं कोणतीं साधनें हातीं घ्यावींत तो प्रश्न अलाहिदा, परंतु सद्यःस्थितीमुळें ज्यांचा नफा होतो ते समाजपालटाला हरकती घेतात एवढ्याचसाठीं राष्ट्राचा अथवा मानवजातीचा उद्धार तटून बसावा हें योग्य नव्हे. इष्ट आणि साध्य अशा ध्येयाची गळचेपी करून असल्या लोकांना राजी राखावें यासारखें जनताद्रोहाचें कृत्य नाहीं. हा समाजपालट जागतिक परिस्थितीच्या दडपणामुळें अथवा अंशतः जबरदस्तीनें अपेक्षित काळाच्या जरा आधींहि घडून येण्याचा संभव आहे, परंतु जनतेपैकीं बहुसंख्य लोकांची संमति मिळाल्याखेरीज समाजस्थित्यंतर घडून येणें शक्य नाहीं एवढी गोष्ट मात्र निश्चित. संमति मिळावी म्हणून जनतेचें मतपरिवर्तन केलेंच पाहिजे. ज्यांच्या पदरांत वर्तमान परिस्थितीमुळें रुपयांचे तोडे पडत आहेत, त्यांचेंहि मन वळवण्याचा प्रयत्न करावयास हवा; पण त्यांपैकीं फार लोकांचें मतपरिवर्तन होईल हें संभवनीय दिसत नाहीं.

खादी-कार्य, हातकताई व हातविणाई वगैरे गांधीजींच्या आवडत्या गोष्टीं-मुळें उत्पादनकार्यांतील व्यक्तिभावाचा उद्रेक होत असल्याकारणानें यंत्रपूर्व युगाकडे आपली पिछेहाट होईल. वर्तमान समाजांतील कोणत्याहि जिव्हाळ्याच्या प्रश्नां-वरील उपाय म्हणून गंभीरपणें विचार करण्यास लायक अशा ह्या योजना नाहींत. शिवाय तद्द्वारा जी मनोवृत्ति निर्माण होते, तीसुद्धां योग्य प्रगतीच्या मार्गावरील धोंड ठरण्याचा संभव आहे. परंतु तात्कालिक उपचार म्हणून त्यांच्या योजना उपयुक्त ठरल्या आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं आणि जोंपावेतों शेतकीविषयक अडचणी व औद्योगिक प्रश्न हे सोडवण्याचें काम सरकारनें हातीं घेतलें नाहीं

तोंपावेतों ह्या योजनांची उपयुक्तता कायम राहील. ज्यांचा थांगपत्ता नाहीं असे हजारों बेकार हिंदुस्थानांत आहेत, खेडोपाडीं तर असंख्य अर्धबेकार सांपडतील. ही बेकारी नष्ट करण्यासाठीं सरकारनें मुळींच प्रयत्न केलेले नाहींत, आणि बेकारांना सुतळीच्या तोड्याचीसुद्धां मदत पोंचवलेली नाहीं. पूर्ण बेकारांना व अर्धबेकारांना खादीनें अल्प प्रमणांत आर्थिक साहाय्य केलेलें आहे, आणि हें साहाय्य स्वकष्टार्जित असल्या-मुळें त्यांच्या ठिकाणचा स्वाभिमान पोसला जाऊन त्यांना आत्मविश्वासहि वाटूं लागला आहे. खादीचा मानसिक परिणाम फार ध्यानांत ठेवण्यासारखा झाला. शहरें व खेडीं यांच्यांतील अंतर तोडण्याच्या कामांत खादीला कांहीं अंशीं यश मिळालें. तिनें पांढरपेशा आणि शेतकरी यांच्या मनाचे धागेहि कांहीं प्रमाणांत सांधले. कपड्यांचा परिणाम वापरणाऱ्यांच्या व पाहणाऱ्यांच्या मनावर फार होतो. साध्या सफेत खादीच्या वस्त्रांमुळें पांढरपेशावर्गांत साधेपणा आणि जनतेबरोबर वागतांना तादात्म्यभाव यांची वाढ होऊन दिमाख आणि छिचोरपणा ह्यांना बराच आळा बसला आहे. पोषाखाच्या बाबतींत श्रीमंतांचें बालिश अनुकरण करण्याची वृत्ति कनिष्ठ मध्यम वर्गांतून नष्ट होऊन हलके कपडे वापरण्याची त्यांना शरम वाटेनाशी झाली. इतकेंच नव्हे, तर रेशमी आणि साटणीचे कपडे घालून मिरवणाऱ्या गलहोशांपेक्षां आपण अधिक सभ्यच काय पण अधिक उच्च आहोंत असें त्यांना वाटूं लागलें. खादी वापरणाऱ्या गरिबांतल्या गरीब व्यक्तीच्या अंगीं हा अभिमानाचा आणि प्रतिष्ठेचा भाव उपजला. फार मोठ्या खादीधाऱ्यांच्या सभेंत गरीब कोण, श्रीमंत कोण हें निवडून काढणें कठीण आहे. त्यामुळें बंधुभावहि वृद्धिंगत होतो. कॉंग्रेसचा संदेश जनतेपर्यंत पोंचवण्याच्या कामीं खादीनें खासच उपयुक्त कामगिरी बजावली असून खादी म्हणजे हिंदी स्वातंत्र्याची निशाणी ठरली आहे.

खादीमुळें मालाच्या किंमती एकसारख्या वाढवणाऱ्या गिरणी-मालकांच्या वृत्तीलाहि पायबंद बसला. पूर्वी परदेशी व विशेषतः लँकेशायरच्या स्पर्धेमुळें हिंदु-स्थानांतल्या गिरणीमालकांना पायबंद बसत असे. पण महायुद्धासारखें संकट उद्भवून तो पायबंद नाहींसा झाला म्हणजे येथील कापडाच्या किंमती भरमसाट चढवून गिरणीमालक यथेच्छ नफा मिळवीत असत. स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीनें देखील गिरणीवाल्यांचें उखळ पांढरें झालें होतें. परंतु बाजारांत खादी येऊं लागल्यामुळें कापडाची किंमत हवी तशी वाढवतां आली नाहीं. लोकांच्या भाविकपणाचा फायदा घेण्यासाठीं येथील ( व जपानांतील ) गिरणीमालकांनींहि जाडेंभरडें कापड विणण्यास सुरुवात केली आणि हातसुताच्या व हातविणीच्या खादींतून तें कापड निवडून वेगळें काढणें मुष्किलीचें झालें. परंतु आतां महायुद्धासारखा निर्वाणीचा प्रसंग उत्पन्न होऊन परदेशी कापड हिंदुस्थानच्या धक्क्यावर उतरेनासें झालें, तरी गिरणीमालकांना १९१४ सालाइतका नफा उकळतां येणार नाहीं.

खादीपासून अशा तऱ्हेचे फायदे सध्यां होत असले तरी खादीचें महत्त्व तात्पुरतेंच

आहे असें मला वाटतें. आर्थिक व्यवस्थेंत पालट होत असतांनाच्या काळांत खादीचा धंदा दुय्यम म्हणून चालू राहील व त्यामुळें कदाचित् संक्रमण कालांतील बोजा हलका होण्यास मदतहि होईल. तथापि भविष्यकाळांत मुख्यत: शेतकीची आमूलाग्र पुनर्घटना करण्यांत व यांत्रिक प्रगति करण्यांतच आपणाला आपलें शक्तिसर्वस्व वेंचावें लागेल. जमिनीबाबत केवळ जुजबी सुधारणा अंमलांत आणून आणि लाखों रुपये फस्त करणारीं व वरपांगी करावयाच्या मामुली सूचना पुढें मांडणारीं कमिशनें बसवून कांहींमात्र फायदा होणार नाहीं. आपल्या इकडील जमिनीच्या वहिवाटीची पद्धत कुचकामी ठरत असलेली आपण प्रत्यक्ष पाहत आहोंत. उत्पादनाच्या, विभजनाच्या व मोठ्या प्रमाणावरील पद्धतशीर शेतीच्या कामीं तिच्यामुळें अडथळे उत्पन्न होत आहेत. अशा परिस्थितींत जमीनधारणेच्या पद्धतींत आमूलाग्र बदल करून आणि जमिनीचे लहान तुकडे एकत्र जोडून सहकारी व सामुदायिक शेतीच्या द्वारां थोड्या श्रमानें अधिक उत्पादन होईल अशी व्यवस्था केल्याशिवाय आधुनिक काळांत निभाव लागणार नाहीं. शेतीवर हिंदुस्थानची सर्व लोकसंख्या पोसणें शक्य नाहीं, आणि मोठ्या प्रमाणावर शेती सुरू झाली तर गांधीजींची शंका खरी ठरून शेतकामासाठीं हल्लींपेक्षां पुष्कळच कमी लोकांची गरज लागणार. उरलेल्या लोकांना कांहीं प्रमाणांत छोट्या छोट्या धंद्यांमध्यें काम मिळालें तरी त्यांची सोय मुख्यत्वेंकरून समाजवादी पद्धतीवर चाललेल्या कारखान्यांत व सार्वजनिक हिताच्या कामांतच करून द्यावी लागेल.

खादीमुळें कांहीं भागांतील लोकांना थोडीशी मदत झाली असली तरी तिच्या उपयुक्ततेबरोबर एका अनिष्ट गोष्टीचाहि प्रादुर्भाव झालेला आहे. मृतप्राय झालेल्या जमीन-वहिवाटीच्या पद्धतीला खादीच्या धंद्याचें थोडेंसें जीवन मिळाल्यामुळें ती अल्प प्रमाणांत टवटवीत झाली आहे व त्यामुळे इष्ट असणारा पालट लांबणीवर पडत आहे. अर्थात् ह्या परिणामाचें स्वरूप विशेष तीव्र नसलें तरी तसा परिणाम घडला आहे, हें खास., कुळाला अथवा छोट्या शेतकऱ्याला जमिनीच्या उत्पन्नाचा जो वांटा मिळतो, तेवढ्यावर आपली निकृष्ट दर्जाची राहणीदेखील संभाळतां येत नाहीं; त्यामुळें आपल्या उत्पन्नांत भर टाकण्यासाठीं त्याला निराळे मार्ग शोधावे लागतात अथवा आपला खंड व सारा भरण्यासाठीं कर्ज तरी काढावें लागतें. शेतकऱ्यांनीं शेतकीव्यतिरिक्त मार्गांनीं मिळविलेल्या पैशामुळें सरकारला व जमीन-दारांना आपला सारा आणि खंड वसूल करतां येतो. ह्या अन्य मार्गांनीं मिळणारा पैसा जर भरपूर असेल तर कांहीं काळानंतर खंडाचें प्रमाण वाढत जाऊन त्यांतच सर्व पैसा मुरून जाण्याचा संभव आहे. सध्याच्या परिस्थितींत अधिक श्रम करून व काटकसरीनें राहून जो पैसा शेतकरी जमवतो, तो सरतेशेवटीं जमीनदाराच्याच घशांत जातो. मला वाटतें कीं ह्या मुद्दा हेन्री जॉर्जनें आपल्या “ प्रगति व दारिद्र्य,’ ह्या पुस्तकांत आयर्लंडचें उदाहरण देऊन स्पष्ट केला आहे.

ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करण्याचे गांधीजींचे प्रयत्न म्हणजे त्यांच्या खादी कार्याचाच विस्तार आहे. त्यामुळें तात्कालिक हित साधेल आणि त्यांतील कांहीं अंश चिरकालीन स्वरूपाचा ठरला तरी त्यांपैकीं पुष्कळसा भाग जुजबी स्वरूपाचाच होणार. ग्रामोद्योगामुळें शेतकऱ्यांचें सध्यांचें दैन्य दूर होऊन त्यांच्यांतील नष्टप्राय झालेल्या कलात्मक व सांस्कृतिक वृत्तींना पुन्हां पालवी फुटेल. परंतु त्यांच्या जोरावर यांत्रिक व औद्योगिक शक्तीविरुद्ध बंड करण्याचा जो घाट घातलेला आहे तो मात्र तडीस जाणें शक्य नाहीं. ' हरिजन ' पत्राच्या अंकांत ग्रामोद्योगासंबंधीं नुकत्याच लिहिलेल्या एका लेखांत गांधीजी म्हणतात कीं, " इष्ट कार्य साध्य करण्यासाठीं ज्या वेळीं फार थोडीं माणसें हाताशीं असतील, त्या वेळीं यांत्रिक मदत घेणें योग्य आहे. परंतु आवश्यक असणाऱ्या माणसापेक्षां अधिक माणसें आपल्यापाशीं आहेत अशी हिंदुस्थानप्रमाणें जेव्हां स्थिति असेल, तेव्हां यांत्रिक मदत घेणें अनिष्ट ठरतें. खेड्यापाड्यांतून राहणाऱ्या लक्षावधी लोकांना विश्रांति कशी मिळेल हा आपणापुढील प्रश्न नसून, वर्षांतून सहाच महिने काम मिळणाऱ्या लोकांना उरलेल्या सहा महिन्यांत कोणतें उपयुक्त काम द्यावें हा प्रश्न आपणापुढें पडलेला आहे. " ज्या ज्या देशांत बेकारी आहे त्या त्या देशांच्या बाबतींत अधिकउण्या प्रमाणांत हा आक्षेप लागू पडेल. परंतु करावयास कामच उरलें नाहीं अशी परिस्थिति उद्भवलेली नसून सध्याच्या मालकवर्गाला लोकांना कामावर लावणें फायद्याचें होत नाहीं ही मुख्य अडचणीची बाब आहे. ताबडतोब केलें पाहिजे अशा कामाचे ढीगच्या ढीग पडलेले आहेत. रस्ते, कालवे, घरें, नळ व मोऱ्या, त्याचप्रमाणें औषधोपचार, उद्योगधंदे, वीजपुरवठा, सामाजिक व सांस्कृतिक कार्य, शिक्षण व लोकांना लागणाऱ्या शेंकडों वस्तूंचें उत्पादन अशीं किती तरी कार्ये करतां येतील. आपल्या देशांतील कोट्यवधि लोकांनीं येथून पुढील पन्नास वर्षेपर्यंत एकसारखें राबण्याचें ठरवलें तरी हें काम संपणार नाहीं. पण ही गोष्ट साध्य होण्यासाठीं स्वार्थाऐवजीं सामाजिक सुधारणा ही प्रेरकशक्ति बनली पाहिजे व सार्वजनिक सुधारणा करण्याचें राष्ट्रांनीं मनावर घेतलें पाहिजे. रशियांतील समाजसत्ताक राज्यव्यवस्थेंत इतर कोणतेहि दोष असोत, तिच्यांत बेकारीला स्थान नाहीं. आपल्या देशांतील लोक " हरि हरि " म्हणत स्वस्थ बसतात याचें कारण करण्याजोगें काम उरलें नाहीं हें नसून कामासाठीं व सांस्कृतिक उन्नतीसाठीं लागणाऱ्या सवलती त्यांना उपलब्ध होत नाहींत हें आहे. मुलांना मजुरीवर लावण्याचें बंद केलें, कांहीं एका वयापर्यंत शिक्षण सक्तीचें ठेवलें, तर मुलें व मुली निघून गेल्यामुळें बेकारांची संख्या कमी होऊन मजुरांच्या अड्ड्यावरील खेंचाखेंचीतील लक्षावधि कामगार कमी होतील.

चरखा व टकळी यांच्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं गांधीजींना थोडेंफार यश आलेलें आहे. अर्थात् उपकरण अथवा यंत्र अधिक कार्यक्षम करण्याचाच हा प्रयत्न आहे. आणि हा प्रयत्न असाच राहिला ( ग्रामोद्योग विजेच्या शक्तीवर

पुढें चालू करतां येतील ही गोष्ट अगदीं शक्य आहे.) तर नफेबाजीची वृत्ति बळावून फाजिल उत्पादन व बेकारी यांचा प्रादुर्भाव ग्रामोद्योगाच्या क्षेत्रांतहि होईल. आधुनिक औद्योगिक पद्धतीशीं ग्रामोद्योगाचा मेळ घालून दिल्याशिवाय आजकालच्या आवश्यक गरजा भागवतां येतील इतकें देखील उत्पादन ग्रामोद्योगामार्फत करतां येणार नाहीं. आपल्या देशांत मोठ्या प्रमाणावर चाललेले यांत्रिक धंदे बंद करणें इष्ट अथवा शक्य आहे काय? आपण यंत्रविरोधक नसल्याचें गांधीजींनीं अनेकवार सांगितलेलें आहे. ह्यावरून आजच्या काळांत हिंदुस्थानमध्यें यंत्रें उपयुक्त ठरणार नाहींत असें गांधीजींचें मत असावें. तथापि लोखंड व पोलाद तयार करणारे मूलभूत कारखाने अथवा सध्या अस्तित्वांत असलेले किरकोळ माल तयार करणारे कारखाने आपणास थांबवणें शक्य होईल काय?

कारखाने थांबवणें शक्य नाहीं हें उघड दिसत आहे. आगगाड्या, पूल, वाहतुकीचीं साधनें वगैरे गोष्टी जर आम्हांला हव्या, तर आम्ही त्या स्वतः तयार केल्या पाहिजेत अथवा त्यांच्यासाठीं दुसऱ्यांच्या तोंडाकडे तरी पाहिलें पाहिजे. राष्ट्र-संरक्षणाचीं साधनें हवीं असतील तर केवळ मूलभूत कारखाने असून भागणार नाहीं. उच्च दर्जाची यांत्रिक पद्धतीहि आम्हाला प्रस्थापित केली पाहिजे. ज्या देशाचा यांत्रिक विकास झालेला नाहीं तो देश स्वतंत्र अथवा प्रतिकारक्षम आहे, असें म्हणतां येणार नाहीं. आणि एक मूलभूत कारखाना उभारावयाचा म्हटला तर त्याच्या पाठीशीं जोडीदार म्हणून दुसरा मूलभूत कारखाना उभा करावा लागतो; असें होतां होतां यंत्रें निर्माण करणारे कारखाने देखील अवश्य होऊन बसतात आणि हे मूलभूत कारखाने सुरू झाले कीं किरकोळ वस्तूंच्या कारखान्यांचा प्रसार होणेंहि अपरिहार्य होऊन बसतें. हा क्रम थांबवणें शक्य नाहीं. कारण आपली केवळ भौतिक व सांस्कृतिक प्रगतिच नव्हे, तर आपल्या स्वातंत्र्याचा प्रश्नहि या उद्योगधंद्यांच्या विकासाशीं संबद्ध झालेला आहे, आणि मोठ्या कारखान्याचा प्रसार जसजसा होत जाईल, तसतशी त्यांच्याबरोबर स्पर्धा करणें अल्प प्रमाणावर चालणाऱ्या ग्रामोद्योगाला झेपणार नाहीं. समाजवादी पद्धतींतच ग्रामोद्योग टिकले तर टिकतील, भांडवलदारी पद्धतीमध्यें त्यांचा टिकाव लागेल ही आशा व्यर्थ होय. आणि समाजवादी पद्धतींतसुद्धां ज्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर निपज होत नाहीं अशा कांहीं खास वस्तू तयार करणें एवढेंच ग्रामोद्योगाचें कार्य राहील.

कांहीं कॉंग्रेसपुढाऱ्यांच्या छातींत औद्योगीकरण म्हटलें कीं धडकी भरते. औद्योगिक राष्ट्रांत दिसून येणाऱ्या सर्व आपत्ति यांत्रिक उत्पादनामुळें उद्भवतात अशी त्यांची समजूत असावी. वस्तुस्थितीसंबंधींचें हें अज्ञान मोठें विलक्षण आहे.*

* तीन जानेवारी १९३५ रोजीं अहमदाबाद येथें सरदार वल्लभभाई पटेल यांनीं केलेलें भाषण पाहा: "ग्रामोद्योगाच्या प्रसारानेंच खरा समाजवाद प्रस्थापित होईल. यांत्रिक उत्पादनामुळें पाश्चात्य देशावर उद्भवलेल्या अनर्थावह प्रसंगांची पुनरावृत्ति आपल्या देशांत आपण होऊं देतां कामा नये."

जनतेच्या गरजा जर भागत नसतील तर पुरेसें उत्पादन करण्यांत बिघडलें कोठें? नेहमींच दुष्काळांत खिचपण्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें बरें नव्हे काय? यामध्यें उत्पादनाचा कांहीं एक दोष नसून विभाजनाच्या पद्धतीमध्यें असणारा सांवळागोंधळ व अपुरेपणा ह्या सर्व अनर्थाला कारणीभूत झालेला आहे.

ग्रामोद्योगाच्या पुरस्कर्त्यांच्या मार्गांत दुसरी एक अडचण उभी आहे ती अशी कीं, आपली शेती जागतिक बाजारपेठेवर अवलंबून असल्यामुळें शेतकऱ्यांना त्या बाजारपेठेंत खपणारीं पिकें काढावीं लागतात व जागतिक बाजारभावावरच त्यांचें भाग्य अवलंबून असतें. बाजारभावांत कसाहि फरक झाला तरी खंड व सारा मात्र त्याला नगदी रुपायांतच मोजावा लागतो. तेव्हां कांहींहि करून पैसे उभे करणें भाग असल्यामुळें ज्या पिकाला बाजारभाव येईल असें त्याला वाटतें, त्या पिकाची तो पेरणी करतो. स्वतःला व स्वतःच्या कुटुंबाला अवश्य अशा अन्नादिक गोष्टीच पिकवीत राहणें त्याला शक्य होत नाहीं.

अलीकडच्या कांहीं वर्षांत धान्य वगैरे वस्तूंचे भाव घटल्यामुळें विशेषतः संयुक्तप्रान्त व बिहारमधील लाखों शेतकऱ्यांनीं उसाची लागवड करण्यास प्रारंभ केलेला आहे. साखरेच्या आयातीवर जकात बसविल्यामुळें साखरेचे कारखाने पावसाळी छत्र्यांप्रमाणें सर्व देशभर उभे झाले व उसासाठीं जोराची मागणी येऊं लागली. परंतु लवकरच मागणीपेक्षां पुरवठा जास्त अशी परिस्थिति निर्माण होऊन साखरेच्या कारखानदारांनीं शेतकऱ्यांस नाडण्यास सुरुवात केली व उसाचा भाव घसरला.

या व इतर अनेक कारणांमुळें आमचे शेतकीविषयक व औद्योगिक प्रश्न संकुचित अशा स्वयंपूर्णतेच्या तत्त्वानें सुटणें इष्ट अथवा संभाव्य नाहीं, असें माझें मत झालें आहे व हीं कारणें आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्वच पैलूंना लागू पडतील अशीं आहेत. संदिग्ध व भावनामय शब्दांच्या पसाऱ्यांत बुडी मारून बसण योग्य होणार नाहीं. आपण परिस्थिति पारखून आपल्यांत फेरफार केला पाहिजे, तरच इतिहासाच्या हातची शिकार होण्याऐवजीं आपणाला इतिहासाच्या पाठीवर स्वार होतां येईल.

आणि पुन्हां एकवार गांधीजींच्या उलट सुलट धोरणाचा विचार मनांत येतो. एवढी कुशाग्रबुद्धि असून आणि दलितवर्गाविषयीं मनांत धगधगती आस्था असून, मरणोन्मुख, कष्टप्रद आणि अनर्थावह अशा पद्धतीचा त्यांनीं काय म्हणून कैवार घ्यावा? परिस्थितीच्या सांपळ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग ते शोधीत आहेत हें खरें, पण गतकालाकडे नेणारा मागचा मार्ग खुंटलेला आहे हें त्यांना काय माहित नाहीं? आणि प्रगतीच्या मार्गांत खळगे खणून ठेवणाऱ्या जुन्या समाजपद्धतीच्या

अवशेषांवर म्हणजे संस्थानिक, जमीनदार, तालुकदार, व भांडवलदार यांच्यावर ते आपला वरदहस्त अद्यापि ठेवीतच आहेत, हें काय? व्यक्तीच्या हातीं अमर्याद सत्ता व संपत्ति ठेवावयाची आणि मग त्यांचा उपयोग ती सर्वस्वी जनहितासाठींच करील अशी उमेद मनांत बाळगावयाची, ही निधिधारणाची कल्पना बुद्धीला कितपत पटते? आमच्यापैकीं अगदीं निवडक लोक घेतले, तरी त्यांच्यावर असा डोळे मिटून विश्वास ठेवतां येईल काय? प्लेटोच्या कल्पनासृष्टींतील राजर्षींना देखील ही जबाबदारी नेकीनें संभाळणे जड गेलें असते. आणि जनतेच्या दृष्टीनें विचार केला तरीसुद्धां अशीं अतिमानवी माणसें तिच्या डोक्यावर बसवणें कितपत हिताचें ठरेल? पण अतिमानव आणि राजर्षी आहेतच कोठें? पाहावें तिकडे स्वार्थालाच परार्थ मानणारीं पंगु माणसेंच आढळतात व जन्म, दर्जा आणि धनसत्ता ह्यांमुळें प्राप्त होणारा लब्धप्रतिष्ठितपणा वंशपरंपरा चालू राहून त्यामुळें अनेक प्रकारचे घोर अनर्थ ओढवलेले दिसून येतात.

समाजांत पालट कसा घडवून आणावा, अडथळे दूर करण्यासाठीं मतपरिवर्तन करावें कीं जबरदस्ती, हिंसा आचरावी कीं अहिंसा, यांसंबंधीं मी आतांच कोणत्याहि प्रकारचे विचार व्यक्त करीत नाहीं, ही गोष्ट पुन्हां एकवार सांगितली पाहिजे. याबद्दलचे विचार मी नंतर मांडीन. परंतु स्थित्यंतराची गरज आहे एवढी गोष्ट मान्य केली पाहिजे, पुढें मांडली पाहिजे. स्थित्यंतराचें ध्येय पुढाऱ्यांच्या दृष्टीला दिसतच नसेल व तें प्रदर्शित होत नसेल, तर मतपरिवर्तन तरी कसें होणार, आणि लोकांत जरूर ती विचारसरणी तरी कशी फैलावणार? प्रसंगासारखे जबरे शिक्षक नाहींत हें त्रिवार सत्य, पण प्रसंगांचें सूत्र यथार्थतेनें समजलें व उलगडलें तरच त्यांच्यांतील रहस्य ग्रहण करतां येईल व अचूक असा कार्यक्रम आंखतां येईल.

माझे विचार ऐकून माझे मित्र व सहकारी पुष्कळ वेळां वैतागून मला विचारतात: का हो, सदाचरणी आणि दिलदार संस्थानिक, दानशूर जमीनदार, सत्प्रवृत्त आणि मनमिळाऊ भांडवलदार तुम्हांला आढळलेच नाहींत का? असे लोक मला आढळले आहेत. असल्या भूपतींबरोबर आणि लक्ष्मीपुत्रांबरोबर मिळून मिसळून वागणाऱ्या वर्गांतलाच मीहि एक आहें. मी अस्सल पांढरपेशावर्गांत जन्मलों, वाढलों सवरलों, आणि त्या वर्गांत मिळणाऱ्या शिक्षणामुळें मनाचे जे ग्रह बनतात तेच माझ्या मनाचे ग्रह होऊन बसले. कम्युनिस्ट मला कनिष्ठ मध्यमवर्गीय असें म्हणतात तें योग्यच आहे. आतां कदाचित् ते मला "मध्यमवर्गीय पण पश्चात्तापदग्ध" असें म्हणतील. पण मी कोण हा मुद्दा अप्रस्तुत होय. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, आर्थिक वा सामाजिक प्रश्नाकडे एकळत्या व्यक्तीच्या दृष्टिकोणांतून पाहणें म्हणजे शुद्ध खुळचटपणा आहे. मला प्रश्न विचारणारे लोक नेहमीं स्वतः मात्र असें सांगत असतात कीं आम्ही पापाशीं झगडत असून पापाचरण करणाऱ्या व्यक्तींशीं आमचें वैर नाहीं. मी इतक्या दूरवर जाण्यासहि तयार नाहीं. मी म्हणतों

माझें व्यक्तिमात्राशीं मुळींच भांडण नसून विशिष्ट सामाजिक पद्धतीला माझा विरोध आहे. परंतु ही पद्धति बहुतांशीं मानवी गटाच्या द्वारा अथवा व्यक्तींच्या द्वाराच आविष्कृत होत असल्यामुळें ह्या गटांना अथवा व्यक्तींना वळवून अथवा नमवूनच कार्यभाग उरकावा लागणार. जी कोणती पद्धति निरुपयोगी व भारभूत झाली असेल ती निकालांतच निघाली पाहिजे. आणि जे वर्ग अथवा गट त्या पद्धतीला घट्ट धरून राहिलेले असतील त्यांनींहि आपल्यांत पालट घडवून आणला पाहिजे. ही स्थित्यंतराची प्रतिक्रिया शक्य तितक्या अनायासानें पार पडावी हें उत्तमः पण स्थित्यंतर होत असतां विघटना आणि यातना अनिवार्य होतात ही दुर्दैवाची गोष्ट होय. तथापि सर्वतोपरी अटळ अशा अल्प हानीच्या भीतीनें बहुविध हानीच्या यातनांत कुजत राहण्यास कोण तयार होईल ?

राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक कोणताहि मनुष्यसंघ तपासला तरी त्याच्या मुळाशीं कांहीं तरी तत्त्वज्ञानाचा आधार असलेला आढळेल. मनुष्यसंघाचें स्वरूप पालटलें कीं तदनुसार तत्त्वज्ञानाच्या पायांतहि बदल व्हावयास हवा. परंतु बहुशः स्थित्यंतरांच्या बरोबरीनें तत्त्वज्ञान धांवत नाहीं, तें मागें रेंगाळतें. आणि स्थित्यंतरें आणि तत्त्वज्ञान यांच्यांत अंतर पडलें कीं अनेक भानगडी उपस्थित होतात. लोकशाही आणि भांडवलदारी ह्या गेल्या शतकांत बरोबरीनें वाढल्या, पण परस्परांचें फार वेळ पटण्यासारखें नव्हतें. त्यांच्यामध्यें मूलतःच विरोध होता. कारण अनेकांना सत्ता मिळावी असा लोकशाहीचा आग्रह, तर खरी सत्ता थोडक्यांच्या हातीं एकत्रित व्हावी हें भांडवलदारीचें धोरण. ही विजोड जोडी कशीबशी मार्गक्रमण करीत होती. पण तें तरी कायदेमंडळांतर्गत लोकशाहीचें स्वरूप स्वाभाविकपणेंच मर्यादित राहून मक्तेदारीला व भांडवलाच्या केंद्रीकरणाला तिनें अडथळा केला नाहीं म्हणूनच शक्य झालें.

परंतु लोकशाहीच्या भावनेची वाढ झाल्यावर दोघींची फारकत होणें अपरिहार्य होतें, आणि आतां त्या फारकतीचा काळ येऊन ठेपलेला आहे. कायदेमंडळांतर्गत लोकशाहीचें आज दिवाळें निघालेलें असल्याकारणानें प्रतिक्रिया म्हणून हरतऱ्हेच्या नव्या नव्या घोषणा डोकें वर काढीत आहेत. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार त्यामुळें अधिकच प्रतिगामी बनलें असून राजकीय स्वातंत्र्याचीं फोलपटें सुद्धां आमच्या हातांतून हिसकून नेण्यांत येत आहेत. लोकशाहीच्या नादारीची सबब पुढें करून हिंदी संस्थानिकसुद्धां आपल्या स्वैर अरेरावीचें समर्थन करण्यास पुढें सरसावले असून, जगांत दुसरीकडे कोठेंहि नजरेस न पडणारी अशी मध्ययुगीन राज्यपद्धति आपल्या राज्यांत आपण चालू ठेवणार असें ते बिनदिक्कत जाहीर करीत आहेत.* पण लोकशाहीला

---

* २२ जानेवारी १९३५ रोजीं नरेंद्र मंडळाचे चान्सेलर पतियाळाचे महाराज यांनीं दिल्ली येथें नरेंद्र मंडळांत केलेलें भाषण पाहा. त्याचप्रमाणें त्याच दिवशीं आणि त्याच स्थळीं बिकानेरच्या महाराजांनीं केलेलें भाषणहि वाचा.

अपेश घ्यावें लागलें तें ती फार पुढें गेली म्हणून नव्हे, तर ती अवश्य तितकी पुढें गेली नाहीं म्हणून. ती पुरेशी लोकसत्ताक झाली नाहीं, कारण आर्थिक लोकसत्ता निर्माण करण्याचें काम तिनें बजावलें नाहीं. तिची कार्यपद्धति देखील भारी अवजड, संथ व त्वरित संक्रमणाच्या काळांत अननुरूप अशी बनून राहिली होती.

जगांतील अरेरावीची हद्द झालेली आज कोठें पाहावयाची असेल तर हिंदी संस्थानांत जावें. ते ब्रिटिश सार्वभौमत्वाचे मांडलिक आहेत; पण ब्रिटिशांच्या हक्कांचें संरक्षण अथवा संवर्धन करण्याचा प्रश्न असेल तरच ब्रिटिश सरकार संस्थानिकांच्या कारभारांत मन घालतें. जुन्या जगाच्या या प्रतिनिधींनीं आपलें तट्टू जसेंच्या तसें सरळ विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत दामटीत आणावें ही मोठ्या नवलाची गोष्ट होय. संस्थानांतील खरें वातावरण कुंद आणि अचेतन आहे, तेथील प्रजा-जीवनाचें पाणी तुंबून राहिलेलें आहे. बाहेरच्या जगांतील खळबळीला आणि घडामोडींना जरासा विटलेला मनुष्य संस्थानांत प्रथमच पाऊल घालतो तेव्हां तेथील वातावरणामुळें अंगांत आळस भरून त्याला किंचित् समाधानाचीहि जाणीव होते. जेथें काळाची दौड खुंटली आहे असा एकच एक देखावा सदोदित डोळ्यांसमोर धरणाऱ्या चित्राप्रमाणें तेथील वातावरण अवास्तव भासतें. मन गतकाळाकडे नकळत खेचलें जाऊन बालपणींची स्वप्नसृष्टि पुन्हा दिसूं लागते; चिलखतें घातलेले आणि कमरबंद कसलेले सरदार, सुंदर वीरयुवती आणि प्रचंड किल्ले यांची आठवण होऊन, स्त्रीदाक्षिण्य, मानापमान, अप्रतिरथ शौर्य आणि मृत्यूची अवहेलना वगैरे संबंधींचे विलक्षण विचार डोळ्यांत तरंगूं लागतात. त्यांतून रोमांचकारी, गर्वपूरित आणि असंभाव्य अशा वीरकथांचें माहेरघर असा जो राजपुताना तेथें माणूस गेला तर मग विचारावयासच नको.

पण लवकरच ही स्वप्नसृष्टि विरघळून जाते आणि मनाला काच बसूं लागतो. तेथील वातावरणांत श्वास घेणें जड होऊन जीव गुदमरूं लागतो. वर दिसावयाला संथ दिसणारें पाणी आंत सडलेलें, थिजलेलें आहे असें आढळून येतें. आपल्या शरीरा-भोंवतीं व मनाभोंवतीं तटबंदी उभारलेली आहे, पायांत लंगर अडकवले आहेत, आपणाला चिणण्यांत येत आहे असें वाटूं लागतें. संस्थानिकांचा राजवाडा आणि प्रजेचें दैन्य यांमधील विरोध डोळ्यांत सलूं लागतो. संस्थानिकांच्या सुखोपभोगा-साठीं किती संपत्ति राजवाड्यांत मुरते आणि प्रजेच्या तोंडीं त्या धनगंगेंतील किती थेंब पडतात बरें! या संस्थानिकांना पोसायचें आणि पाळायचें म्हणजे फार खर्चाचें काम आहे. आणि इतका खर्च करून ते मोबदला तरी काय देतात?

संस्थानें म्हणजे एक मोठें गूढच आहे, वृत्तपत्रांना तेथें उत्तेजन मिळत नाहीं. फार तर एकादें साहित्यविषयक अथवा अर्धवट सरकारी वर्तमानपत्र चालणें शक्य असतें. बाहेरच्या वृत्तपत्रांना बहुशः बंदी करण्यांत येते. तेथील साक्षरतेचें प्रमाण फारच अल्प आहे. त्रावणकोर आणि कोचीनमध्यें मात्र ब्रिटिश हिंदुस्थानपेक्षां

किती तरी अधिक प्रमाणांत साक्षरतेचा प्रसार झालेला दिसतो. बडेजावाच्या आणि अहोरूपम् प्रशंसेच्या व्हाइसरॉयच्या भेटी, संस्थानिकांचा उधळमाधळीचा विवाह अथवा पुत्र वा कन्यारत्नाचा जन्म, अगर शेतकऱ्यांचें बंड ह्याच काय त्या बातम्या संस्थानांतून यावयाच्या. ब्रिटिश हिंदुस्थानांत, संस्थानिकावरील टीकेला नियंत्रण बसावें म्हणून खास कायदा आहे, आणि संस्थानांत तर अतिसौम्य अशा टीकाकाराची सुद्धां गठडी वळवण्यांत येत असते! सार्वजनिक सभा ही तेथें एक अपरिचित चीज आहे. कधीं कधीं समाजविषयक सभांनाहि मज्जाव करण्यांत येतो! जनतेच्या पुढाऱ्यांना संस्थानांत येण्याची पुष्कळ वेळां मनाई करण्यांत आलेली आहे. एकदां प्रकृति फार बिघडली म्हणून चित्तरंजन दासांनीं काश्मीरमध्यें हवा पालटण्याकरतां जाण्याचें ठरवलें. राजकारणासाठीं कांहीं त्यांनीं दौरा काढलेला नव्हता. थेट काश्मीरच्या सरहद्दीपर्यंत पोंचल्यावर त्यांना मज्जाव करण्यांत आला. महंमद अल्लींना व जिन्हांना देखील हैद्राबाद संस्थानांत येण्याची मनाई करण्यांत आली होती. श्रीमती सरोजिनी नायडूंचें घर खुद्द हैद्राबाद शहरांत असतांहि त्यांना कित्येक वर्षेंपर्यंत संस्थानांत येऊं देत नसत!

संस्थानांतील परिस्थिति अशा प्रकारची असल्यामुळें संस्थानी प्रजेच्या मूलभूत हक्कांचा कैवार घेऊन त्यांच्यावर चालू असलेल्या सर्रास दडपशाहीचा निषेध कॉंग्रेसनें करणें स्वाभाविक झालें असतें. पण गांधीजींनीं संस्थानासंबंधीं कॉंग्रेसला एक नवीनच धोरण स्वीकारावयाला लावलें. "संस्थानांच्या अन्तर्गत कारभारांत ढवळाढवळ करावयाची नाहीं" असें धोरण तें होतें. संस्थानांतून कल्पनातीत जुलुमाचे प्रसंग घडले असले व कॉंग्रेसची कोणतीहि आगळीक नसतांना संस्थानिकांनीं तिच्यावर घाला घातला असला तरी देखील गांधीजींनीं आपलें गुपचुपीचें धोरण अद्यापि सोडलेलें नाहीं. कॉंग्रेसनें टीका केली तर ती संस्थानिकांना झोंबेल आणि मग त्यांचा अन्तःकरणपालट करणें अवघड होईल अशी धास्ती गांधीजींना वाटत असावी. संस्थानी प्रजा-परिषदेचे अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांना १९३४ च्या जुलैत लिहिलेल्या पत्रांत तटस्थवृत्तीचें धोरणच शहाणपणाचें व योग्य आहे असें गांधीजींनीं म्हटलें आहे. शिवाय संस्थानांविषयीं त्यांनीं जो दृष्टिकोण आपल्या पत्रांत मांडला आहे तो तर विलक्षणच वाटतो. ते म्हणतात, "ब्रिटिश कायद्यान्वयें संस्थानांचें स्वतंत्र अस्तित्व मान्य झालेलें आहे. अफगाणिस्तान अथवा सीलोन यांचें धोरण ठरवण्याचा जितका हक्क ब्रिटिश हिंदुस्थानला आहे, तेवढाच त्याला संस्थानांचें धोरण ठरवण्याचाहि हक्क आहे." अगदीं सौम्य व मवाळ वृत्तीची संस्थानी प्रजापरिषद व प्रागतिक पक्ष यांनीं सुद्धां गांधीजींच्या या विधानावर आक्षेप घेतले तर नवल कां वाटावें?

पण संस्थानिकांना हें धोरण साहजिकच अभिवंदनीय वाटलें, आणि त्यांनीं या संधीचा फायदाहि घेतला. एका महिन्याच्या आंतच त्रावणकोर संस्थानच्या हद्दींत कॉंग्रेसला बेकायदा ठरवण्यांत येऊन तिच्या सभांना व सभासद-नोंदणीला मनाई

करण्यांत आली. याचा खुलासा करतांना दरबारनें सांगितलें कीं " जबाबदार पुढाऱ्यांनीं " दिलेल्या सल्ल्याला अनुसरूनच हें करण्यांत येत आहे. गांधीजींच्या पत्रकाकडेच हा अंगुलिनिर्देश करण्यांत आला होता हें उघड आहे. आणि हें झालें केव्हां ? तर काँग्रेसनें कायदेभंग थांबविल्यावर आणि सरकारनें काँग्रेस ही कायदेशीर संस्था आहे असें जाहीर केल्यावर ! शिवाय मौजेची गोष्ट अशी कीं त्रावणकोर दरबारचे त्या वेळचे ( आणि सध्यांचेहि ) राजकीय सल्लागार सर सी. पी. रामस्वामी अय्यर हे एका काळीं काँग्रेसचे आणि होमरूल लीगचे सर चिटणीस होते. नंतर ते प्रागतिक बनले आणि हिंदुस्थान सरकार आणि मद्रास सरकारचे एक बडे अधिकारी झाले.

गांधीजींच्या सल्ल्यानुरूप काँग्रेसचें धोरण ठरलेलें असल्यामुळें त्रावणकोर संस्थानच्या अकारण दडपशाहीबद्दल जाहीर रीत्या कोणी एका शब्दानेंहि टीका केली नाहीं.* नेमस्तांनीं देखील या कृत्याबद्दल दरबाराचा निषेध केला. संस्थानविषयक गांधीजींचें धोरण नेमस्तांपेक्षांहि मवाळ आहे ही गोष्ट अगदीं खरी. संस्थानिकांना बोंचेल असें भाषण न करण्याची खबरदारी गांधीजींच्या बरोबरीनें घेणारे दुसरे प्रमुख पुढारी म्हणजे पंडित मदन मोहन मालवीय हेच असावेत.

हिंदी संस्थानिकांच्या बाबतींत गांधीजींचें धोरण पूर्वीपासून इतकें सौम्य होतें असें नव्हे. १९१६ च्या फेब्रुवारी महिन्यांत बनारसच्या हिंदु विश्वविद्यालयाचा उद्घाटन समारंभ चालू असतां त्यांनीं एका सभेंत केलेलें भाषण प्रसिद्धच आहे. सभेच्या अध्यक्षस्थानीं एका संस्थानिकाची योजना झालेली होती व श्रोतृवर्गांतहि अनेक संस्थानिक हजर होते. गांधीजी नुकतेच दक्षिण आफ्रिकेतून परतले असून अखिल भारतीय राजकारणाची जोखमदारी त्यांच्या शिरावर त्या काळीं पडलेली नव्हती. मोठ्या कळकळीनें, व धर्मसंस्थापकाच्या आवेशानें ते त्या सभेंत बोलले व आपले मार्ग सुधारा आणि हा व्यर्थ बडेजाव सोडून द्या असा त्यांनीं संस्थानिकांना उपदेश केला. " संस्थानिकहो ! निघा येथून आणि विकून टाका तें जडजवाहीर " असेहि ते म्हणाले. त्यांनीं 'आपलें जडजवाहीर कांहीं विकलें नाहीं, पण ते सभास्थानांतून निघून मात्र गेले. गांधीजींच्या भाषणामुळें मोठी खळबळ उडाली आणि एका पाठोपाठ अध्यक्षासकट सर्व संस्थानिक सभागृहांतून निष्क्रमण करते झाले. वक्ता मात्र बोलत होता. सभास्थानीं बेझंटबाई उपस्थित होत्या, त्यांनादेखील गांधीजींच्या बोलण्याचा राग येऊन त्या सभागृहांतून उठून गेल्या !

श्रीयुत न. चिं. केळकर यांना लिहिलेल्या पत्रांत गांधीजी पुढें म्हणतात कीं,

* सरदार वल्लभभाईनीं बडोदा येथें ६ जानेवारी १९३५ रोजीं केलेल्या भाषणांत याच धोरणावर प्रामुख्यानें भर दिला. " दरबारचीं सर्व नियंत्रणें संभाळून संस्थानांतील कार्यकर्त्यांनीं कामें करावींत, आणि दरबारच्या कारभारावर टीका करण्याऐवजीं संस्थानिक व प्रजा यांच्यामधील संबंध सलोख्याचे राहावेत यासाठीं खटपट करीत राहावें. "

" संस्थानिकांनीं आपल्या प्रजेला स्वायत्तता दिली तर तें मला हवेंच आहे. आणि खरें बोलावयाचें तर ज्या प्रजेवर संस्थानिक राज्य करतात तिचे त्यांनीं निधिधारक बनावें असेंच माझें मत आहे........... " या निधिधारणेच्या कल्पनेंत कांहीं तथ्य असेल तर आम्ही हिंदी जनतेचे निधिधारक आहों असा दावा ब्रिटिश सरकार करतें त्याला आपण कां विरोध करावा तें कळत नाहीं. ते परकीय आहेत एवढाच त्यांच्यांत व संस्थानिकांत फरक. पण तसें पाहिलें तर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या वंशांतहि वर्ण, संस्कृति आणि वंशप्रारंभ वगैरे बाबतींत फार मोठी भिन्नता असल्याचें दिसून येईल.

गेल्या कांहीं वर्षांत हिंदी संस्थानांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांची संख्या खूपच वाढली आहे. पुष्कळ वेळां नाखूष परंतु दुबळ्या संस्थानिकांच्या मानगुटीवर ब्रिटिश अधिकाऱ्याला जबरदस्तीनें बसवण्यांत येतें. संस्थानिकांवर हिंदुस्थान सरकारचें दडपण वरून नेहमींच पडत असे. आतां भरींत भर म्हणून अशा रीतीनें लादलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या द्वारा कांहीं प्रमुख संस्थानांवर ब्रिटिश सरकारनें आंतूनहि आपली पकड बसविली आहे. त्यामुळें संस्थानिकांचे उद्गार म्हणजे हिंदुस्थान सरकारचेच उद्गार, फक्त आवाज तेवढा निराळा अशी स्थिति झाली आहे. अशा प्रसंगीं सरंजामदारी परंपरेचा भरपूर फायदा घेण्यास मात्र सरकार चुकत नाहीं.

इतर ठिकाणचे कार्यक्रम जसेच्या तसे संस्थानांतून सुरू करणें शक्य नाहीं याची जाणीव मला आहे; खुद्द ब्रिटिश हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून देखील शेतकी-विषयक, औद्योगिक, जातिविषयक व सरकारी कारभारासंबंधीं अनेक भेद दृष्टोत्पत्तीस येतात. पण परिस्थित्यनुरूप कार्यक्रम बदलला पाहिजे ही गोष्ट जरी खरी असली, तरी आपलें सर्वसाधारण धोरण बदलतां कामा नये. एका ठिकाणीं जें कृत्य वाईट ठरतें तें दुसऱ्या ठिकाणीं घडलें तरी वाईटच ठरणार. तसें नच झाले तर आपल्या धोरणांत व तत्त्वांत सुसंगति नाहीं आणि आपण केवळ स्वतःला अधिकार मिळावा म्हणून झगडत आहों असा आरोप पूर्वीप्रमाणेंच पुढेंहि आपल्यावर करण्यांत येईल.

भिन्न धर्माच्या अथवा अल्प संख्येच्या सबबीवर स्वतंत्र मतदार संघ निर्माण करण्याच्या धोरणावर बरीच टीका करण्यांत येत आहे ती योग्यच आहे. स्वतंत्र मत-दार संघ लोकशाहीच्या तत्त्वाशीं विसंगत आहेत असा एक आक्षेप घेण्यांत येत असतो. ही गोष्ट खरीच कीं मतदार संघांचे धर्मशः बदिस्त असे गट पाडण्यांत आले, तर लोकशाही अथवा लोकमताला जबाबदार असें राज्ययंत्र अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. परंतु अशा प्रकारची टीका मोठ्या तळमळीनें व चिकाटीनें करीत राहणारे पंडित मदन मोहन मालवीय आणि हिंदु महासभेचे दुसरे पुढारी हे संस्थानांतील परिस्थिती-बद्दल मूग गिळून बसतात. बेजबाबदार संस्थानिक व ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकशाही (?) यांचा समन्वय साधून फेडरेशन स्थापन करावें अशी मात्र त्यांची इच्छा दिसते. वास्तविक याहून विरोधमय आणि विचित्र अशी जोडी

शोधूं गेलें तरी आढळणार नाहीं. परंतु हिंदु महासभेंतील राष्ट्रवाद्यांना व लोकशाहीच्या कट्टर कैवाऱ्यांना त्याची दिक्कत वाटत नाहीं. आपण तर्कशुद्ध आणि संगतवार विचारसरणीविषयीं पुष्कळ बोलत असलों तरी आपली विचारसरणी अद्यापि भावनेच्या जोरावरच पुढें ढकलली जात आहे.

काँग्रेस व संस्थानिक यांच्या संबंधांतील विसंगतीच्या मूळ पदावर मी पुनः येऊन ठेपलों. बर्कसंबंधीं बोलतांना थॉमस पेन यांनीं काढलेले उद्गार मला या वेळीं आठवतातः "पिसारा उपटला म्हणून त्याला खेद वाटतो पण पक्षी मेला याचें त्याला कांहींच सोहेरसुतक नाहीं." गांधीजींना अर्थातच मरणाऱ्या पक्ष्याची विस्मृति कधींहि झालेली नाहीं. परंतु पिसारा गळून पडेल याचें ते इतकें स्तोम कां माजवितात कोणास ठाऊक?

संस्थानांच्या बाबतींतील विचारसरणी तालुकदारी व जमीनदारी पद्धतींनाहि लागू पडते. ही अर्धवट सरंजाम पद्धति सद्यःस्थितीशीं विसंगत असून शेतकी-उत्पादनाच्या आणि एकंदर प्रगतीच्या मार्गांत तिच्यामुळें विघ्नें उत्पन्न होतात हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. वाढत्या भांडवलशाहीलासुद्धां तिचा विरोध होत आहे. आज सर्व जगांतील मोठ्या जमीनदाऱ्या नष्ट झाल्या असून त्यांची जागा छोट्या शेतकऱ्यांनीं घेतली आहे. जमीनदारीच्या संबंधांत झालाच तर भरपाईसंबंधींचा प्रश्न उत्पन्न होईल अशी माझी कल्पना होती. पण गेल्या एका वर्षांत माझ्या असें नजरेला आलें कीं, गांधीजींना तालुकदारी पद्धत मान्य असून ती चालू राहावी असें त्यांचें मत आहे. १९३४ च्या जुलैमध्यें त्यांनीं कानपूर येथें असें सांगितलें कीं, "जमीनदार व कुळें यांच्यामधील संबंध सुधारणें शक्य आहे. मात्र दोन्ही पक्षांच्या अंतःकरणांत पालट घडून आला पाहिजे. तेवढें झालें कीं, दोघांनाहि शांततेनें व सलोख्यानें राहतां येईल. तालुकदारी व जमीनदारी पद्धति नष्ट व्हाव्या असें मला कधींच वाटलें नाहीं, आणि जे लोक ह्या पद्धती नष्ट व्हाव्या असें म्हणतात, त्यांना स्वतःला काय म्हणावयाचें आहे तेंच कळत नसावें." (हा शेवटचा आरोप जरासा कठोर आहे.)

ते आणखी असेंहि म्हणाले कीं, "योग्य कारण न दाखवितां तुमची खाजगी मालमत्ता कोणी काढून घेऊं लागलें तर मला तें मान्य होणार नाहीं. मला तुमच्या अंतःकरणांत शिरून पालट घडवून आणावयाचा आहे. उद्देश असा कीं, तुम्ही आपली खाजगी मालमत्ता तुमच्या कुळांचा निधि म्हणून आपल्याचजवळ बाळगावी व मुख्यतः त्यांच्याच कल्याणासाठीं तिचा विनियोग करावा.........पण समजा कीं, अन्यायानें तुमची मालमत्ता हिसकावून घेण्याचा प्रयत्न झाला, तर मी तुमच्या बतीनें लढेन.........पाश्चात्य देशांतील समाजवाद हा आपल्याकडील कल्पनांहून मूलतः भिन्न अशा विचारसरणीवर आधारलेला आहे. त्यापैकीं एक कल्पना अशी कीं, मनुष्यस्वभाव हा जात्याच स्वार्थी आहे.....म्हणून आपल्या देशांतील समाजवादाची

उभारणी अहिंसेवर आणि मजूर व भांडवलदार, कुळें व जमीनदार यांच्या सहकार्यावर झाली पाहिजे."

पौर्वात्यांच्या व पाश्चात्यांच्या विचारसरणीमध्यें मूलतःच फरक आहेत कीं काय तें मला माहित नाहीं; कदाचित् असतीलहि. परंतु अलीकडच्या काळांत ठळकपणें दिसून येणारा एक फरक मात्र असा आहे कीं, हिंदुस्थानांतील भांडवलदार व जमीनदार आपल्या पाश्चात्य बांधवांपेक्षां येथील कामगारांच्या व कुळांच्या हितसंबंधांकडे अधिक दुर्लक्ष करीत असतात. कुळांच्या कल्याणाचे प्रयत्न सुरू करण्याची फिकीर हिंदुस्थानांतील जमीनदार वर्गानें यत्किंचितहि केलेली नाहीं. एच. एन. ब्रेल्सफर्ड या नांवाच्या एका पाश्चात्य निरीक्षकानें असें म्हटलें आहे कीं, "आधुनिक समाजांत, हिंदी सावकार–जमीनदाराइतके धनलोभी व परोपजीवि लोक इतर कोठेहि सांपडणार नाहींत." हा कदाचित् हिंदी जमीनदाराचा दोष नसेल. परिस्थितिच अशी प्राप्त झाली असेल कीं तिच्यापुढें कांहीं मात्रा चालेनाशी होऊन तो उत्तरोत्तर खालीं खालीं घसरत गेला आणि अशा पेंचांत सांपडला कीं तेथून त्याची सुटका होणें कठिण होऊन बसलें. पुष्कळ जमीनदारांच्या जमिनी सावकारांनीं गिळंकृत केल्या असून छोट्या जमीनदारांना स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर कुळें म्हणून राहण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. शहरांतील सावकारांनीं जमिनी गहाण लावून घेतल्या, कर्जें दिलीं व जमिनी आपल्या ताब्यांत घेऊन ते स्वतःच जमीनदार बनले. जमिनीच्या पूर्वींच्या मालकांना ज्यांनीं हांकून लावलें तेच हे जमीनदार आतां गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणें त्या दुर्दैवी कुळांचे निधिधारक होणार आणि मुख्यतः आपल्या कुळांच्या कल्याणाकडे आपल्या संपत्तीचा विनियोग करणार!

तालुकदारी पद्धति जर चांगली आहे, तर सर्व हिंदुस्थानभर ती अंमलांत कां आणूं नये? हिंदुस्थानांतील बऱ्याच भागांत रयतवारी पद्धति सुरू आहे. गुजराथमध्यें मोठमोठ्या जमीनदाऱ्या आणि तालुकदाऱ्या निर्माण करावयाला गांधीजी संमति देतील कीं नाहीं कोणास ठाऊक? बहुधा त्यांची संमति मिळणार नाहीं. पण मग असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, संयुक्त प्रांत, बंगाल आणि बिहार येथें एक पद्धति चांगली आणि दुसरीकडे दुसरी पद्धति चांगली असें कां? हिंदुस्थानांतील पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांच्या रहिवाशांमध्यें फारसा महत्त्वाचा फरक नसावा असें वाटतें; त्यांची मूलभूत विचारसरणीहि एकाच स्वरूपाची आहे. तात्पर्य इतकेंच कीं, जें आहे तें चालावें, लोकांच्या हिताच्या दृष्टीनें योग्य काय किंवा इष्ट काय तें ठरविण्याकरितां आर्थिक विचक्षणा करीत बसूं नये, आणि सध्यांच्या परिस्थितींत बदल करण्याच्या खटाटोपांत पडूं नये; लोकांच्या अंतःकरणांत बदल केला म्हणजे काम भागेल. यालाच जीवनाकडे व जीवनांतील प्रश्नांकडे पाहण्याची निवळ धार्मिक दृष्टि असें म्हणतात. राजकारणाशीं, अर्थकारणाशीं अथवा समाज-

शास्त्राशीं तिचा मुळींच संबंध नाहीं. पण तसें म्हणावें तर धर्माच्या मर्यादा ओलांडून गांधीजी राजकीय व राष्ट्रीय क्षेत्रांतहि वावरतांना दिसतात.

आज हिंदुस्थानपुढें पडलेली कोंडी ही अशा प्रकारची आहेत. अनेक तऱ्हेच्या पाशांनीं स्वतःचेंच शरीर जखडून टाकण्यांत आपण अपूर्व यश जोडलें आहे. आतां ते पाश सोडवल्याशिवाय एक रेसभरदेखील पुढें सरकणें शक्य नाहीं. भावनांचे पंख लावून सुटका व्हावयाची नाहीं. कित्येक वर्षांपूर्वी स्पिनोझानें एक प्रश्न विचारून ठेवला आहे कीं " बंधनांतून मोक्ष पाहिजे तो विज्ञानाच्या मार्गानें कीं भावनेच्या मार्गानें ? " स्वतः त्यानें पहिल्याच मार्गाचा स्वीकार केला होता.

## ६२

# मतपरिवर्तन कीं सक्ति ?

सोळा वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या मनावर आपल्या अहिंसा तत्त्वाचा ठसा गांधीजींनीं उमटविला. तेव्हांपासून हिंदुस्थानच्या भूमीवर ह्या तत्त्वाचें वर्चस्व कायम राहिलें असून अजाणतेपणानें पण आवडीनें ह्या तत्त्वाचा पुनरुच्चार अनेक लोकांनीं केलेला आहे. कांहींनीं खूप विवेक करून नंतर त्याचा संपूर्णतः अथवा अंशतः स्वीकार केला, तर कांहींनीं त्याची उघड उघड टवाळी केली. आमच्या राजकीय किंवा सामाजिक जीवनामध्यें ह्या तत्त्वानें पुष्कळच कामगिरी बजावली असून जगाचें लक्षहि बऱ्याच अंशीं आपणाकडे वेधून घेतलें आहे. हें तत्त्व अर्थातच मानवी मताइतकेंच पुरातन आहे. तथापि राजकीय व सामाजिक चळवळीसाठीं त्याचा विस्तृत प्रमाणावर उपयोग करून घेणारी गांधीजी ही पहिलीच व्यक्ति असावी. पूर्वींच्या काळांत ह्या तत्त्वाचा व्याप व्यक्तीपुरताच राहिल्यामुळें त्याला मुख्यतः धार्मिक स्वरूप प्राप्त झालें होतें. विस्तृत अशा सामाजिक प्रश्नांशीं अथवा बदलत्या सामाजिक परिस्थितीशीं व्यवहार करतांना त्याचा उपयोग करण्याची कल्पना कधींच उद्भवली नाहीं. अन्यायपूर्ण व विषमतापूर्ण समाजस्थिति जवळ जवळ मान्य करूनच सर्व व्यवहार चालत. ह्या वैयक्तिक ध्येयाला सामाजिक ध्येयाचें स्वरूप देण्याचा प्रयत्न गांधीजींनीं केला. राजकीय, त्याचप्रमाणें सामाजिक स्थित्यंतरेंहि त्यांना घडवून आणावयाचीं होतीं. आणि हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवूनच अधिक विस्तृत व सर्वस्वी भिन्न अशा क्षेत्रांत त्यांनीं अहिंसा तत्त्वाला बुद्धिपुरःसर प्रयोग करून पाहिला. "ज्यांना मानवी परिस्थितींत व जीवनांत आमूलाग्र फरक घडवून आणावयाचे असतील, त्यांना समाजामध्यें खळबळ उत्पन्न करावीच लागते. खळबळ उडविण्याचीं साधनें दोन : एक हिंसेचें दुसरें अहिंसेचें. हिंसेचें दडपण शरीरास भासमान होत असतें आणि हिंसेला बळी पडणारी व्यक्ति हिंसेच्या साधनानें जशी दडपली जाते, त्याचप्रमाणें तें साधन वापरणारी व्यक्तीहि अधोगतीला पोंचते. परंतु उपवासासारख्या आत्मक्लेशानें आणलेल्या अहिंसेच्या दडपणाचें कार्य अगदीं निराळ्याच पद्धतीनें होत असतें. त्यामुळें शरीराला इजा न पोंचतां उलट ज्या व्यक्तींविरुद्ध तें वापरण्यांत येतें, त्या व्यक्तींची नीतिमत्ता अहिंसेच्या सहवासानें अधिक दृढ होत जाते." *

---

* ४ डिसेंबर १९३४ रोजीं उपोषणाच्या प्रसंगीं प्रसिद्ध झालेल्या गांधीजींच्या जाहीर पत्रकांतील उतारा.

अहिंसेची कल्पना हिंदी विचारसरणीशीं कांहीं अंशीं जुळती असल्यामुळें बाह्यात्कारी तरी राष्ट्राकडून मोठ्या उत्साहानें तिचा स्वीकार करण्यांत आला. तिचीं मुळें किती दूरवर पसरलेलीं असतात याची कल्पना फारच थोड्यांना आली असेल. ज्या थोड्या लोकांना त्याची जाणीव झाली होती, त्यांचे देखील विचार संदिग्धच होते. श्रद्धा आणि प्रत्यक्ष कार्य यांचाच आसरा त्यांनीं घेतला. पण कार्यक्रमाचा जोर ढिला पडल्यावर कांहीं लोकांच्या मनांत असंख्य प्रश्न उद्भवून त्यांचीं समाधानकारक उत्तरें देणें फार कठिण झालें. राजकारणांतील नजीकचा कार्यक्रम त्या प्रश्नांच्या योगानें बाधित होणार नव्हता. पण अहिंसामय प्रतिकाराच्या मागें असलेल्या एकंदर तत्त्वज्ञानासंबंधींच त्या प्रश्नांच्या द्वारा शंका उपस्थित करण्यांत आल्या. राजकीय दृष्ट्या विचार केला तर अहिंसामय चळवळ अद्यापपावेतों यशस्वी झालेली नाहीं; कारण हिंदुस्थानच्या भोंवतालचे साम्राज्यशाहीचे पाश पूर्वींप्रमाणेंच बळकट आहेत. सामाजिक दृष्टीनें पाहिलें तर आमूलाग्र स्थित्यंतराचें ध्येयहि तिनें मान्य केलेलें नाहीं. तथापि थोडीदेखील सूक्ष्म दृष्टि असणाऱ्या माणसास अहिंसेच्या योगानें हिंदुस्थानांतील लक्षावधि लोकांत केवढा पालट झालेला आहे तें दिसण्यासारखें आहे. त्यामुळें त्यांच्यामध्यें शील, सामर्थ्य आणि आत्मविश्वास ह्यांचा परिपोष झाला. ज्यांच्या साहाय्याशिवाय राजकीय वा सामाजिक कोणतीहि प्रगति साध्य करणें किंवा संभाळणें शक्य होणार नाहीं, अशाच ह्या बहुमोल भावना आहेत. पण हा फायदा अहिंसेमुळें झाला कीं लढ्यामुळें झाला तें ठरविणें फार कठिण आहे. अनेक राष्ट्रांचा अनेक प्रसंगीं हिंसामय लढे लढूनहि असा फायदा झालेला दिसतो. परंतु माझ्या मतें अहिंसामय पद्धतीमुळें आमचा अमोलिक असा फायदा झालेला आहे असें छातीठोकपणें सांगतां येईल. त्यामुळें समाजांत खळबळ उडवतां आली हें निश्चित; अर्थातच खळबळीला परिस्थितीचीं मूलभूत कारणेंसुद्धां होतींच; पण क्रांतिकारक फेरबदल होण्याच्या पूर्वी जनतेमध्यें ज्या प्रक्रिया व्हाव्या लागतात, त्या झपाट्यानें घडवून आणण्याच्या कामीं अहिंसा पद्धतीचा उपयोग झाला आहे.

हा एक मुद्दा अहिंसेच्या वतीनें मांडतां येईल. पण त्यामुळें सर्व शंकांचा परिहार होत नाहीं. दुर्दैव असें कीं शंकांचें समाधान करण्याच्या कामीं आपणाला गांधीजींचें साहाय्य मिळण्यासारखें नाहीं. या विषयावर असंख्य वेळां ते बोलले आहेत व त्यांनीं लेख लिहिले आहेत; परंतु माझ्या माहितीप्रमाणें तात्त्विक व शास्त्रीय दृष्टीनें अहिंसा पद्धतीची सांगोपांग मांडणी गांधीजींनीं जाहीर रीत्या केलेली नाहीं. साध्यापेक्षां साधनांचें महत्त्व अधिक आहे, जबरदस्तीपेक्षां मतपरिवर्तन बरें, वगैरे मुद्द्यांवर गांधीजींचा विशेष भर असतो. अहिंसा म्हणजे सत्य आदिकरून सर्व प्रकारच्या मंगल गोष्टी असें मानण्याची वृत्ति आढळून येते. गांधीजी तर ह्या गोष्टी जणूं कांहीं एकरूपच आहेत अशा रीतीनें बोलत असतात. ह्या मताशीं ज्यांचें पटणार नाहीं ते निवडक लोकांच्या कक्षेबाहेरचे असून ते नीतिधर्माचे विपक्षी

आहेत असें समजण्याची वृत्तिहि दृष्टोत्पत्तीला येते. गांधीजींच्या कांहीं शिष्यांच्या ठिकाणीं ह्याच वृत्तीला सात्त्विक अहंकाराचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे.

आमच्यापैकीं ज्या माणसांच्या भाग्यांत अशा प्रकारच्या श्रद्धेचें देणें लिहिलेलें नाहीं त्यांच्या मनाला अनेक शंकांमुळे पीडा होते. तात्कालिक गरजांशीं त्या शंकांचा संबंध येतो असें नाहीं. पण तत्त्वज्ञान हें व्यक्तिदृष्ट्या नैतिक, समाजदृष्ट्या परिणामकारक व सुसंगत असावें अशी इच्छा मनांत उद्भवणारच. अशा शंकांच्या तावडींतून मी मुक्त झालेला नाहीं, आणि व्यक्ति व समष्टींदृष्ट्या समाधानकारक असा मार्गहि मला सांपडलेला नाहीं. हिंसेबद्दल मला अत्यंत तिटकारा असला तरी माझ्या रोमरोमांत हिंसा भरलेली असून कळत-नकळत माझ्या हातून पुष्कळ वेळां सक्तिहि होते. पण आपल्या जिवलग सहकाऱ्यांच्या व निष्ठावंत अनुयायांच्या मताचा भुगा उडवून टाकणाऱ्या गांधीजींच्या मानसिक सक्तीपेक्षां अधिक सक्ति ती कोणती असणार?

परंतु खरा प्रश्न असा आहे कीं, अहिंसेचा हा व्यक्तिगत वसा राष्ट्राला अगर सामाजिक गटांना नीटपणें पाळतां येईल काय? त्यासाठीं मानवसमूहच्या समूह प्रेमाच्या व सदाचरणाच्या अतिशय उन्नत अशा पायरीवर जाणें आवश्यक आहे. अखिल मानवजातीचा दर्जा या पदवीला नेऊन वैमनस्य, हीनवृत्ति आणि स्वार्थ या भावनांचा बीमोड करावयाचा हेंच इष्ट असें अंतिम ध्येय होय. अखेरीस कधीं काळीं तरी हें साध्य होईल किंवा नाहीं हा प्रश्न विवाद्य आहे. पण तशी आशा मनाला नसेल तर जीवन म्हणजे वेडप्याचा वाचाटपणा ठरून आवेश मोठा पण पुरुषार्थाच्या नांवानें आळें असा प्रकार होईल; पण ध्येयसाधनाकरितां अवश्य ते गुण पैदा करणें ज्यामुळें अशक्य होत आहे इतकेंच नव्हे, तर ज्यामुळें हरएक प्रकारची विरोधी भावना जोपासली जात आहे असे प्रतिबंध ध्यानांत न घेतांच आम्ही त्या गुणांच्या प्रसारासाठीं मतप्रतिपादन करीत बसावें काय? प्रथम हें मारक प्रतिबंधांचें रान दूर करून प्रेम, सौंदर्य आणि सत्प्रवृत्ति ह्यांची वाढ होण्याकरितां योग्य तें वातावरण निर्माण करण्याची खटपट आम्ही करावयास नको का? कीं आम्हांला हीं दोन्हीं कार्यें एकाच वेळीं उरकतां येतील?

आणि अशीहि शंका उद्भवते कीं, अहिंसा आणि हिंसा, अन्तःकरणपालट आणि सक्ति यांच्यांतील भेद इतका स्पष्ट असतोच कोठें? पुष्कळदां शारीरिक जुलमापेक्षां नैतिक शासन हेंच भयंकर जबरदस्त ठरतें. आणि अहिंसा म्हणजेच सत्य हें तरी खरें आहे का? सत्य म्हणजे काय? ह्या पुरातन प्रश्नाला हजारों उत्तरें मिळालीं असलीं तरी अद्यापि तो प्रश्न अनिर्णीतच राहिलेला आहे. सत्याचें स्वरूप कसेंहि असलें, तरी तें अहिंसेशीं एकरूप आहे असें म्हणतां येणार नाहीं. हिंसा अनिष्ट असेल, पण ती स्वभावतः अनीतिमय आहे असें नव्हे. हिंसेचे बहुत रंग आहेत, बहुत प्रकार आहेत आणि पुष्कळदां कोणत्या तरी अधिक अनिष्ट गोष्टी-

पेक्षां हिंसा बरी असें म्हणावें लागतें. षंढता, भीति, दास्य वगैरे वृत्तींपेक्षां हिंसावृत्ति बरी असें मत खुद्द गांधीजींनींच व्यक्त केलेलें आहे. ही यादी आणखीसुद्धां लांबवतां येईल. आतां हें खरें कीं, हिंसेची सांगड नेहमीं वैमनस्याशीं घालण्यांत येत असते, पण शास्त्रीय चर्चा करतांना तसा आग्रह धरण्याचें कारण नाहीं. सद्धेतूनें हिंसा-कर्म करणें ही कल्पना बुद्धिगम्य आहे, ( उदाहरणार्थ शस्त्रवैद्यानें आचरलेली हिंसा ) आणि अशी सद्धेतुप्रेरित हिंसा कधींहि अनीतिमय असणें शक्य नाहीं. कोणतीहि गोष्ट धर्म्य अथवा नीतियुक्त आहे कीं नाहीं तें ठरवावयाचा धर्मकांटा म्हणजे सदसद्धेतु हाच असणार. तेव्हां हिंसा ही जरी पुष्कळदां नैतिक दृष्ट्या असमर्थनीय अतएव भयंकर ठरत असली, तरी नेहमीं ती तशीच असली पाहिजे असें नाहीं.

कलह व हिंसा यांनीं सगळें जीवन परिपूर्ण असें आहे. हिंसेनें हिंसा वाढत असल्यामुळें हिंसेनें हिंसेचा नायनाट करतां येणार नाहीं हें तत्त्व बरोबर आहे असें वाटतें. परंतु हिंसा सर्वस्वी वर्जावियाचें धोरण अकरणात्मक आणि साक्षात् जीवनाला सोडून आहे. हिंसा म्हणजे आधुनिक शासनसंस्था आणि समाजरचना यांचा प्राण. शासनसंस्थेच्या हातीं दंडसाधन नसेल तर कर वसूल होणार नाहींत, जमीनदारांना खंड मिळणार नाहीं आणि खाजगी मालकीचाहि बोजवारा उडेल. खाजगी मालकीच्या वस्तूंवर इतरेजन अधिकार सांगूं लागले तर शस्त्रबळाचा उपयोग करून कायदा त्यांना पायबंद घालतो. आक्रमणात्मक आणि संरक्षणात्मक हिंसेचीं साधनें आहेत म्हणूनच शासनसंस्थेचें राष्ट्रीय स्वरूप टिकलें आहे.

गांधीजींची अहिंसा ही संपूर्णतया अकरणात्मक नाहीं; कारण ती प्रतिकार-शून्य नाहीं. तिचें स्वरूप अहिंसामय प्रतिकाराचें म्हणजे अक्रियात्मक वृत्तीपेक्षां अगदीं निराळें, क्रियात्मक असें असून, कार्याची ती एक गतिमान् अथवा सवेग पद्धति आहे. यथास्थितीचा नेभळेपणानें स्वीकार करणाऱ्या लोकांना ही अहिंसा झेपणार नाहीं. समाजांत खळबळ उडवण्यासाठीं व सद्यःस्थिति पालटण्यासाठींच अहिंसेचें उपकरण बनविण्यांत आलें. मतपरिवर्तनाचा हेतु अहिंसेच्या मुळाशीं असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत सक्तीच्या जबरदस्त साधनाप्रमाणेंच तिचा उपयोग झालेला आहे. इतकेंच कीं ह्या सक्तीचें स्वरूप अत्यंत सभ्य आणि कमालीचें अनश्लील असें होतें. वस्तुतः गांधीजींनींसुद्धां प्रारंभींच्या लेखांतून " भाग पाडणें " असे शब्द वापरलेले आहेत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. पंजाबांतील लष्करी कायद्याबाबत १९२० सालीं व्हाइसरॉयनीं ( लॉर्ड चेम्सफर्डनें ) केलेल्या भाषणावर टीका करतांना ते लिहितात :

" ......कायदेमंडळाच्या उद्घाटनाच्या प्रसंगीं व्हाइसरॉयनीं केलेल्य भाषणांत प्रतिबिंबित झालेली मनोवृत्ति अशा प्रकारची आहे कीं व्हाइसरॉयशीं अथवा त्यांच्या सरकारशीं संबंध ठेवणें स्वाभिमानी माणसाला अशक्य व्हावें.

" दुःख निवारण करण्याची सरकारची मुळींच इच्छा नाहीं हाच पंजाब-प्रकरणीं केलेल्या विधानांचा अर्थ आहे. नाकासमोर दिसत असलेल्या प्रश्नाकडे आम्ही सारें लक्ष केंद्रित करावें, अशी त्यांची इच्छा आहे ! पण पंजाब-प्रकरणाबाबत सरकारला पश्चात्ताप व्यक्त करण्यास भाग पाडणें हाच आम्हाला जिव्हाळ्याचा प्रश्न वाटतो. व्हाइसरॉयच्या भाषणांत पश्चात्तापाचा मागमूसहि नाहीं. उलट " टीका-कारांना उत्तर देण्याचा मोह मी आवरता घेतों " असें लाटसाहेब म्हणतात. याचा मथितार्थ असा कीं हिंदुस्थानच्या प्रतिष्ठेशीं संबद्ध अशा अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरील त्यांचीं मतें होतीं तशींच राहिलीं आहेत. 'मी हे प्रश्न निर्णयासाठीं इतिहासाकडे सोंपवतों' असे ते सांगतात. माझ्या समजुतीनें असल्या भाषेमुळें हिंदी लोकांचीं मनें अधिकच भडकण्याचा संभव आहे. ज्यांचे धिंडवडे निघाले, आणि जबाबदारीच्या आणि विश्वासाच्या जागांवर काम करण्याची आपली नालायकी ज्यांनीं भरमाप सिद्ध केलेली आहे, अशा अधिकाऱ्यांच्या टांचांखालीं ज्यांचा अद्यापि चेंदामेंदा होत आहे, त्यांचे कोणतें हित इतिहासानें त्यांच्या बाजूचा निर्णय दिला म्हणून साधणार आहे ? पंजाब-प्रकरणीं न्याय करण्याचें नाकारून उलट सहकार्य करा अशी भाषा उच्चारणें हा सौम्य शब्दांत बोलावयाचें तर शुद्ध ढोंगीपणा आहे. "

हिंसेच्या साहाय्यानेंच शासनसंस्था चालतात ही गोष्ट कुविख्यातच आहे. आणि हिंसा म्हणजे सैन्याकडून होणारी उघड हिंसाच नव्हे तर तिच्याहून अति-भयानक आणि अतिसूक्ष्म अशी टेहळे, चहाडखोर, आगलावे, वगैरेंकडून व फसव्या मतप्रचाराच्या, वृत्तपत्रांच्या, धार्मिक रूढींच्या, आर्थिक आपत्तीच्या व उपासमारीच्या द्वारा, आणि शिक्षण संस्थांच्या मदतीनें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें होणारी हिंसा. राष्ट्राराष्ट्रांच्या संबंधांत हरतऱ्हेच्या खोट्या कंड्या आणि दगलबाजी हीं न्याय्य आहेत असें समजूनच शांततेच्या काळांतहि व्यवहार चालत असतात. युद्धकाळीं तर अशा गोष्टींना ऊतच येतो. तीन शतकांपूर्वी सर हेन्री वोटन नांवाच्या ब्रिटिश वकिलानें–तो स्वतः कवि होता–परराष्ट्रीय वकिलाची व्याख्या केली होती ती अशीः " स्वदेशाच्या कल्याणासाठीं बाहेरच्या देशांत खोटें बोलण्याकरतां पाठवलेला प्रामाणिक माणूस म्हणजे वकील. "

सध्यां वकिलांबरोबर सहकारी म्हणून लष्कर, आरमार आणि व्यापार या विषयांतील तज्ज्ञ ठेवलेले असतात. त्यांचा मुख्य उद्योग म्हणजे त्या देशाची टेहळणी करणें. त्यांच्या पाठीशीं हेर खात्याचें प्रचंड यंत्र काम करीतच असतें. शांततेच्या काळांत अशा गोष्टी चालू असणें अनिष्ट वाटलें तरी युद्ध सुरू झाल्याबरोबर त्यांना अपरंपार महत्त्व प्राप्त होऊन हेरखात्याचें संहारक जाळें सगळ्या दिशांना पसरत जातें. गेल्या महायुद्धाच्या काळीं पिकवण्यांत आलेल्या कंड्या व खोट्या मत-प्रसारासाठीं व हेरखात्यासाठीं झालेला खर्च, यांच्याबद्दलची माहिती आतां वाचली कीं माणूस हतबुद्ध होतो ! पण सध्यांची शांतता दोन युद्धांतील सुट्टीच्या

वेळेप्रमाणें किंवा तयारीच्या मुदतीप्रमाणें आहे. आर्थिक व इतर क्षेत्रांतील झुंज शांततेच्या काळांतहि चालू आहेच. जित आणि जेते, साम्राज्यवादी राष्ट्रें आणि त्यांच्या वसाहती, पिळणारे वर्ग आणि पिळले जाणारे वर्ग ह्या द्वंद्वांत अव्याहत झगडा चाललेला दिसतो. हिंसा आणि असत्य यांनीं गजबजलेलें युद्धकालीन वातावरण शांततेच्या समजण्यांत येणाऱ्या काळांतहि कांहीं प्रमाणांत विद्यमान् असतें आणि लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांना वेळवखत आला तर उपयोगी पडणारें शिक्षणहि त्याच वेळीं देण्यांत येत असतें. "सैनिकांची युद्धोपयोगी चोपडी" या ग्रंथांत लॉर्ड वुल्स्ले यांनीं म्हटलें आहे कीं "सर्वांत उत्तम धोरण म्हणजे सचोटी 'सत्यमेव जयते' वगैरे वचनें नेहमीं जिव्हाग्रीं असू द्यावीत. हीं गोंडस वाक्यें लहान मुलांना शिकवावयास ठीक आहेत; पण त्यांचा उपयोग युद्धाच्या वेळीं कोणी करूं म्हणेल तर त्यानें आपली तरवार कायमची म्यान करावी हें उत्तम."

राष्ट्र राष्ट्रांशीं व वर्ग वर्गाशीं भिडला असतां अहिंसा व सत्य यांना वाव सांपडणें अशक्य आहे. आपल्या हातांतील सत्ता व हक्क मुठींत ठेवतां यावेत आणि जित लोकांना विकासाची संधि मिळू नये यासाठीं अधिकारारूढ राष्ट्रांना आणि गटांना हिंसा, दडपशाही व असत्य यांचा उपयोग करावाच लागणार. जनमत जागृत होऊन त्याला ह्या झगड्यांचें व दडपशाहीचें विकाळ स्वरूप समजून आलें म्हणजे मग हिंसा कदाचित् सौम्य होण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति पाहूं गेलें तर उलट अनुभव येतो. वर्तमान समाजघटनेच्या प्रतिकाराला जसजसें बळ चढत आहे तसतशी हिंसा देखील अधिक प्रमाणांत होऊं लागली आहे. हिंसा बाह्यतः सौम्य झाली असली तरी ती अधिक सूक्ष्म व भयावह होत आहे. बुद्धि वाढली, धर्मप्रसार झाला, नीति समजली तरीहि हिंसेच्या वृत्तीला कोणत्याहि प्रकारें आळा पडलेला नाहीं. व्यक्तीची उन्नति होऊन त्या मनुष्यजातीला भूषणभूत झाल्या आहेत आणि अशा उच्च दर्जाच्या व्यक्तींची (असामान्य मनुष्यें अर्थात्च वगळलीं पाहिजेत.) संख्यादेखील जगांत पूर्वीहून अधिक वाढली आहे. हा एकंदर समाज अधिक उन्नत झाला असून पाशवी व असंस्कृत विकारांचें नियंत्रण करण्याचे प्रयत्न तो थोड्याफार प्रमाणांत करूं लागलेला आहे. परंतु समूहांचें वर्तन पाहिलें तर फारशी सुधारणा झाल्याचें आढळून येत नाहीं. मानव स्वतः सुसंस्कृत बनत असतां आपल्या वैयक्तिक रानटी भावनांची व आकांक्षांची अडगळ त्यानें जणूं कांहीं जमातीच्या कोठारांत भरली. नैतिक दृष्ट्या दुय्यम प्रतीचीं माणसेंच हिंसाकर्माकडे आकृष्ट होत असल्यामुळें अशा हिंसासंपन्न समूहांचें नेतृत्व समाजांतील सर्वोत्कृष्ट स्त्रीपुरुषांकडे क्वचितच येतें.

हिंसेचे हीन प्रकार नष्ट करतां येतील असें गृहीत धरलें तरीहि शासनसंस्थेंत व समाजजीवनांत थोड्या तरी सक्तीची जरूरी भासणारच, ही गोष्ट दृष्टीआड होतां कामा नये. सामाजिक जीवनाच्या धारणेसाठीं कोणत्या तरी प्रकारची शासन-व्यवस्था लागणारच आणि अधिकारपदस्थ व्यक्तीला स्वभावतः स्वार्थी अथवा

समाजविघातक अशा ज्या व्यक्तिगत व समूहगत प्रवृत्ती असतील त्या नियंत्रित अथवा निकामी करणें भाग पडणारच. अशा प्रसंगीं अधिकारी आवश्यक असेल त्यापेक्षां जास्त जबरदस्ती करीत असतातः कारण सत्ता हातीं आली कीं माणसाला कैफ चढतो. तात्पर्य असें कीं राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ति पूर्णपणें स्वार्थी व समाजहित-तत्पर अशी होईपर्यंत अधिकारी स्वतः स्वातंत्र्याचे कितीहि भोक्ते आणि जुलमाचे दुष्मन् असले, तरी नाठाळ व्यक्तींच्या मानेभोंवतीं त्यांना दांवें घालावेंच लागेल व आक्रमण करणाऱ्या लोभी परकीय लोकांनाहि सक्तीनें परतवावें लागेल; म्हणजेच स्वरक्षणासाठीं टोल्यास टोला हाणावा लागेल. जगाचें एक राष्ट्र झालें तरच स्वसंरक्षणाची जरूरी उरणार नाहीं.

अशा प्रकारें परचक्रनिवारण आणि अन्तर्गत एकी यांकरितां दंडशक्तीची आवश्यकता आहे असें ठरल्यावर मर्यादा घालावयाची ती कोठें? आणि नीति-शास्त्रानें ही सवलत एकदां का राज्यशास्त्राला दिली, आणि समाजधारणेसाठीं दंडाची आवश्यकता आहे असें मान्य केलें, कीं मग हिंसायुक्त व अहिंसायुक्त सक्ति अथवा सरकारनें योजलेली सक्ति आणि क्रांतिकारकांनीं योजलेली सक्ति अशी निःसंदिग्ध विभागणी करतां येणें शक्य नाहीं ही गोष्ट नेबूर ह्यांनीं आपल्या पुस्तकांत दाखवून दिलेली आहे.

या अपरिपूर्ण जगांत परराष्ट्राकडून झालेल्या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं राष्ट्रीय-शासनसंस्थेला शक्तीचा उपयोग करावा लागेल, ही गोष्ट गांधीजी मान्य करतील अशी माझी कल्पना आहे. अर्थात् गांधीजींच्या मताबद्दल मला निर्वाळा देतां येणार नाहीं. शेजारच्या व इतर राष्ट्रांबरोबर सरकारनें शांततेचें व मित्रत्वाचें धोरण ठेवावें हें योग्य असलें, तरी हल्ला होणारच नाहीं असें समजून चालणें मूर्खपणाचें होईल. निरनिराळ्या वर्गांचे व गटांचे कांहीं अधिकार व हक्क हिरावून घेणारे व क्रिया-स्वातंत्र्याला मर्यादा घालून देणारे सक्तीचे कायदे देखील सरकारला करावे लागतील. कायदा म्हटला कीं त्यांत सक्ती आलीच. कराचीच्या ठरावामध्ये असे शब्द आहेत कीं "जनतेची पिळणूक बंद व्हावी म्हणून राजकीय स्वातंत्र्यांत लक्षावधि उपाशी लोकांच्या आर्थिक स्वातंत्र्याचाहि समावेश करणें जरूर आहे." हें इष्ट धोरण व्यवहारांत उतरावयाचें असेल, तर कनिष्ठवर्गासाठीं वरिष्ठवर्गाला आपल्या बऱ्याचशा हक्कांचा त्याग करणें भाग आहे. कामकऱ्यांना उदरनिर्वाहापुरती मजुरी आणि इतर अनेक सवलती मिळाल्या पाहिजेत; संपत्तीवर जादा कर बसवले पाहिजेत. महत्त्वाच्या खाणी, आगगाड्या, जलमार्ग, समुद्रावरील व इतर वाहतुकीचीं साधनें ह्यांवर सरकारचें नियंत्रण असावें अथवा ह्या गोष्टी सरकारच्या मालकीच्या असाव्या असेंहि त्यांत म्हटलेलें आहेच. मादक पेयांना व वस्तूंना सर्वस्वी मज्जाव करण्यांत यावा असेंहि कलम त्या ठरावांत आहेच. ह्या सर्व गोष्टींविरुद्ध अनेक लोक आक्षेप घेऊन उठतील. बहुसंख्य लोकांच्या मताला ते कदाचित् मान्यताहि देतील. परंतु

त्या अमान्यतेचे परिणाम काय होतील याची कल्पना आल्यामुळेंच ती देण्यांत येईल. म्हणजे अल्पसंख्येवर बहुसंख्येची होणारी सक्ति हाच लोकशाहीचा अर्थ ठरला.

मालकी हक्कांना बाध आणणारे अथवा त्यांचें बहुतांशीं उच्चाटन करणारे कायदे बहुसंख्येनें मान्य केले तर सक्ति केली अशी ओरड बहुसंख्य लोकांविरुद्ध करतां येईल काय ? खासच नाहीं. कारण लोकशाहींतील सर्वच कायदे अशा रीतीनें मंजूर करण्यांत येत असतात. तेव्हां सक्ति होते म्हणून आक्षेप घेतां येणार नाहीं. बहुसंख्येचें वर्तन चुकीचें अथवा अनैतिक होतें असें मात्र म्हणतां येईल. मग असा प्रश्न उद्भवतो कीं बहुसंख्येनें केलेल्या कायद्यामुळें एखाद्या नीतितत्त्वाचें उल्लंघन झालें कीं काय ? आणि हें ठरवावयाचें कोणी ? स्वतःच्या हिताला मानवेल असा अर्थ नीतिशास्त्रांतून काढण्याची मुभा व्यक्तींना किंवा गटांना दिली तर लोकसत्ताक पद्धतीचा कपाळमोक्षच होईल. खासगी मालमत्तेमुळें कांहीं व्यक्तींना एकंदर समाजावर भयावह असे अधिकार गाजवतां येत असल्यामुळें खासगी मालमत्ता ही अहितकारक आहे असें मी स्वतः मानतों. समष्टीपेक्षां व्यक्तीचेंच अहित जास्त प्रमाणांत करणाऱ्या दारूपेक्षां देखील सर्व समाजाचें अहित करणारी खाजगी मालमत्ता माझ्या मतें जास्त अनैतिक आहे.

अहिंसेवर आपली श्रद्धा आहे असें मानणारे कांहीं लोक मला सांगतात कीं मालकांच्या संमतीशिवाय खाजगी मालमत्तेचें राष्ट्रीकरण करणें हें जुलमाचें असल्यामुळें अहिंसातत्त्वाला सोडून आहे. कुळाकडून खंड वसूल करून घेण्यासाठीं सरकारी मदत मागतांना ज्यांच्या मनांत कोणत्याहि प्रकारचा किंतु येत नाहीं, अशा मोठमोठ्या जमीनदारांनीं आणि आपल्या हद्दींतील स्वतंत्र कामगार संघांचीं पाळेंमुळें खणून काढणाऱ्या अनेक गिरणीमालकांनीं देखील हेंच तत्त्वज्ञान मला पाजण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या विशिष्ट पद्धतीमुळें बहुसंख्य लोकांना हाल सोसावे लागतात, त्यांना तिच्यांत बदल हवा आहे एवढी गोष्ट पुरेशी न मानतां समाज पालटल्यामुळें ज्यांच्या स्वार्थाला धक्का पोंचणार आहे त्यांचींच मनें वळवा असें सांगण्यांत येतें. अत्यंत आवश्यक अशा समाजस्थित्यंतरांचा मार्ग सुद्धां मूठभर लोकांना अडवून धरणें शक्य होतें तें ह्यामुळेंच.

आर्थिक हितसंबंधानुसार गटांचें आणि वर्गाचें राजकारण बनत जातें असेंच इतिहासाचें रोकडें तात्पर्य आहे. बुद्धि अथवा नीति ह्यांना आर्थिक हितसंबंधांवर मात करतां येत नाहीं. व्यक्तींचें अंतःकरण पालटतां येईल. आपले खास अधिकार कांहीं व्यक्ती सोडूनहि देतील. पण वर्ग अथवा संघ असें कधींहि करणार नाहींत. सत्ताधारी व अधिकारारूढ वर्गाचें मन वळवून त्याला आपल्या अधिकाराचा व आपल्या अन्याय्य हक्कांचा त्याग करण्यास उद्युक्त करण्याचे आतांपर्यंतचे प्रयत्न फसलेले आहेत, आणि इतःपर असले प्रयत्न यशस्वी होतील असें मानण्यास जागा दिसत नाहीं. हें सत्य नेबूहर ह्यांनीं आपल्या पुस्तकांत विशद केलें आहे. ते म्हणतात,

" कोणत्याहि सामाजिक परिस्थितींत बुद्धीचा उपयोग हितसंबंधांचें रक्षण करण्याकडेच अंशतः होत असल्यामुळें समाजामध्यें केवळ नीतीच्या अथवा आळवणीच्या जोरावर न्याय प्रस्थापित करतां येणार नाहीं...कलह हा क्रमप्राप्त आहे आणि असा कलह उपस्थित होईल तेव्हां सामर्थ्याचा प्रतिकार सामर्थ्यानेंच केला पाहिजे. "

तेव्हां वर्गाचें अथवा राष्ट्राचें मतपरिवर्तन करून अगर बौद्धिक वादविवादानें आपलें मत पटवून आणि न्यायबुद्धीची करुणा भाकून कलहाचा उपशम करूं म्हणणें म्हणजे आपल्याच डोळ्यांत धूळफेंक करण्यासारखें आहे. सक्तीच्या स्वरूपाचें परिणामकारक दडपण आणल्याशिवाय सत्ताधिष्ठित साम्राज्यवादी राष्ट्र एकाद्या देशावरील आपल्या वर्चस्वाचा न्यास करील अथवा एकादा वर्ग आपलें उच्चपद व अधिकार यांच्यावर तुळशीपत्र ठेवण्यास तयार होईल, अशी कल्पना करून घेणें हा शुद्ध भ्रम होय.

अशा तऱ्हेचें दडपण गांधीजींना आणावयाचें आहे ही गोष्ट उघड दिसते; परंतु त्याला ते सक्ती म्हणण्यास तयार नाहींत. आपली पद्धति आत्मक्लेशाची आहे असें ते सांगत असतात. त्यांच्या तत्त्वाची छाननी करणें थोडें अवघड आहे; कारण त्यांत अध्यात्माचा भाग असल्याकारणानें त्याविषयीं अंदाज बांधणें अथवा कोणत्याहि जड परिमाणानें त्याची लांबीरुंदी मोजणें शक्य होणार नाहीं. गांधीप्रणीत मार्गाचा प्रतिपक्षावर बराच परिणाम होतो ह्यांत शंका नाहीं. नैतिकदृष्ट्या तो स्वतःचा करीत असलेला बचाव किती फोल आहे तें त्यानें उघडकीस येतें, त्यांचें धैर्य गळून जा[illegible], त्यांच्यांतील उच्च मनोवृत्ती हेलावतात व समेटाला भूमि निर्माण होते. प्रेमाच्या आणि आत्मक्लेशाच्या मार्गामुळें प्रतिपक्षावर आणि तटस्थ प्रेक्षकांवर होणारा मानसिक परिणाम फार जबरदस्त असतो हें खास. वन्य श्वापदावर आपण कोणत्या मार्गानें चाल करून जातों त्यावर शिकारींतील यश अवलंबून असतें, ही गोष्ट सर्व शिकाऱ्यांच्या परिचयाची आहे. शिकाऱ्याचा नूर लांबूनच ओळखून श्वापद आपले पवित्रे ठरवीत असतें. शिकाऱ्याच्या अंतःकरणांत भीतीची कळे-नकळेशी सावली पडली तरी ती जनावराला उमगते आणि त्यासरशीं तें झडप घालतें. सिंह माणसाळवणाराचें धैर्य क्षणमात्र गडबडलें तरी देखील श्वापदाचा हल्ला होईल असा संभव असतो. अगदीं निखालस धैर्याच्या माणसाला मात्र वन्य श्वापदापासून सहसा धोका पोंचत नाहीं. कांहीं अपघातच झाला तर गोष्ट निराळी. वन्य श्वापदांची जर ही तऱ्हा, तर मग मनुष्यावर मानसिक शक्तींचा परिणाम घडावा यांत काय नवल? परंतु व्यक्तीवर असा परिणाम घडत असला तरी वर्गावर अथवा संघावर तसा तो घडेल कीं नाहीं याविषयीं शंका आहे. अहिंसाचारी पक्षाबरोबर शत्रुपक्षांतील सर्व व्यक्तींचा निकट असा साक्षात् संबंध येत नाहीं. त्यांच्या कानांवर जाणाऱ्या बातम्यादेखील पक्षपाती व विपर्यस्त अशा असतात आणि कांहींहि झालें तरी आपल्या अधिकाराला हरकत घेणाऱ्या कोणत्याहि गटाबद्दल त्यांना स्वाभाविकपणेंच इतका भयंकर क्रोध येतो

कीं त्यांत बारीक बारीक चटसाऱ्या भावना भस्मसात् होऊन जातात. आपलें उच्च स्थान व अधिकार हेच समाजस्वास्थ्याला आवश्यक आहेत अशी कल्पना अंगवळणीं पडलेली असल्यामुळें तद्विरुद्ध कोणतेंहि मत म्हणजे पाखंड आहे असें त्यांना वाटूं लागतें व कायदा, सुव्यवस्था आणि चालू स्थितीचें संरक्षण यांची सत्कृत्यांत गणना होऊन विरोधी आचरण म्हणजे पाप असें मानण्यांत येऊं लागतें.

एवंच, शत्रुपक्षाचा विचार केला तर, मतपरिवर्तनाचा फारसा परिणाम झालेला दिसत नाहीं. केव्हां केव्हां तर विरोधकाचें सौजन्य व सात्त्विक भाव पाहून ते अधिकच चिडतात; कारण विरोधकांच्या ह्या वृत्तीमुळें त्यांच्याकडे उणेपणा येतो. आणि आपल्यांत उणेपणा असणें शक्य आहे अशी शंका मनांत सलूं लागली कीं माणसाचा सात्त्विक संताप अधिकच वाढत जातो. तथापि अहिंसेच्या मार्गामुळें प्रतिपक्षांतील कांहीं व्यक्तींवर परिणाम होऊन त्यांच्या विरोधांतील पीळ थोडासा ढिला पडतो. अहिंसेमुळें होणारा याहून मोठा फायदा म्हणजे तटस्थांची सहानुभूति संपादन करून जागतिक मतावर बराच परिणाम घडवून आणणें शक्य होतें. परंतु मतप्रचाराचीं साधनें सत्ताधाऱ्यांच्या हातीं असल्यामुळें बातम्या बाहेर जाऊंच नयेत अथवा बाहेर जाणाऱ्या बातम्या विपर्यस्त स्वरूपांत जाव्या अशी कारवाई होण्याचा संभव असतोच. ज्या देशांत अहिंसामय लढा सुरू असेल तेथील लढ्याबाहेर राहिलेल्या बहुसंख्य लोकांवर अहिंसापद्धतीमुळें अत्यंत प्रभावशाली आणि दूरगामी असा परिणाम होत जातो. त्यांचें मात्र हमखास मतपरिवर्तन होतें व पुष्कळदां ते अहिंसेचे कैवारी बनतात. तथापि चळवळीचें ध्येय त्यांना सर्वसाधारणपणें मान्यच असल्यामुळें त्यांचें मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठीं फारसे प्रयास पडण्याचें कारणच नसतें. परंतु सद्यःस्थितींत बदल होईल ह्या भीतीनें जे घाबरे होतात, त्यांच्यावर अहिंसेचा फारसा परिणाम झालेला दिसत नाहीं. अहिंसेच्या चळवळीमुळें बहुसंख्य लोकांवर होणारा परिणाम किती प्रभावी असतो आणि सुरुवातीला ठाम नसणाऱ्या अनेक लोकांचीं मतें तिच्यामुळें कशीं बदलतात तें हिंदुस्थानांतील असहकाराच्या व कायदेभंगाच्या झपाट्यानें वाढत गेलेल्या चळवळीवरून निदर्शनास आलेंच आहे. आरंभापासून जे तिचे विरोधक होते, त्यांच्यावर मात्र फारसा परिणाम झाला नाहीं. किंबहुना चळवळीला यश येत चाललेलें पाहून ते अधिकच बिथरले व त्यांचा विरोध जास्तच भडकला.

स्वातंत्र्यरक्षणाकरितां शासनसंस्थेनें हिंसाकर्म आचरणें हें जर धर्म्य आहे, तर स्वातंत्र्यप्राप्तीकरितां जबरदस्तीची व हिंसेची पद्धति स्वीकारणें अधर्म्य कां ठरावें तें समजणें फार कठीण आहे. हिंसामार्ग अनिष्ट असेल, परंतु तो असमर्थनीय वा निषिद्ध मानण्याचें कारण नाहीं, सरकार अधिकारारूढ आहे व त्यांच्या हातीं सेनाबल आहे म्हणूनच त्याला हिंसा करण्याचाहि अधिक अधिकार आहे हें समीकरण योग्य नव्हे. अहिंसामय क्रांति यशस्वी होऊन शासनयंत्राचा कबजा तिनें मिळवला कीं

लगेच पूर्वी नसलेला हिंसाकर्माचा अधिकार स्वतःच सरकार बनलेल्या क्रांतिकारकांना प्राप्त होतो हें कसें? त्यांच्या सत्तेविरुद्ध बंड उठलें तर त्याचा पाडाव ते कसा करतील? हिंसाकर्मापासून अलिप्त राहावेंसें त्यांना वाटेल, परिस्थितीचा उलगडा शांततेच्या मार्गानें करण्याचा यावच्छक्य प्रयत्नहि ते करतील, पण हिंसा करण्याचा हक्क त्यांना हातचा राखून म्हणून ठेवावाच लागेल. समाजांत झालेलें स्थित्यंतर नापसंत असणारे कांहीं असंतुष्ट गट असणारच व क्रान्तीपूर्वीची परिस्थिति पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्नहि केल्यावांचून ते राहणार नाहींत. आपल्या हिंसाकर्माला शासन-संस्थेकडून पायबंद घालण्यांत येणार नाहीं अशी जर त्यांची खात्री झाली, तर हिंसा-कर्माचा धुडगूस अधिकच वाढेल. एवंच हिंसा आणि अहिंसा, सक्ती व मतपरिवर्तन यांच्यामध्यें सुस्पष्ट व ठाम अशी सीमारेषा काढतां येणें मुळींच शक्य नाहीं. राजकीय स्थित्यंतराचा विचार करतांना ही अडचण येतेच, पण पिळणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या वर्गासंबंधीं विचार करतांना तर ह्या विवेकाचें स्वरूप अत्यंत सूक्ष्म व गहन होतें.

ध्येयासाठीं केलेले कष्ट नेहमींच कौतुकास्पद होत असतात. आणि मागें न हटतां पण त्याचबरोबर प्रतिहिंसा न करतां यातना भोगण्यांत व्यक्त होणारी एक प्रकारची उच्च मनोवृत्ति व श्रेष्ठ चारित्र्य यांच्या योगानें चित्त आकर्षित झाल्याशिवाय राहत नाहीं. परंतु ध्येयासाठीं क्लेश सहन करणें आणि विनाध्येय क्लेश सहन करणें यांमधील फरक अतिशय अल्प आहे. ध्येयहीन क्लेशसहन रोगट मनोवृत्तींना कारणी-भूत होणारे असून जरासें गौणच आहे. हिंसा ही जशी पुष्कळदां अधम नैर्घृण्याची द्योतक ठरते, त्याचप्रमाणें अहिंसेचें अक्रियात्मक स्वरूप हें देखील कदाचित् आत्मक्लेशांतच गोडी मानणाऱ्या दुसऱ्या एका प्रकारच्या विकृत मनोरचनेचें द्योतक ठरण्याचा संभव आहे. शिवाय अहिंसेच्या प्रशस्त आवरणाखालीं भ्याडांना व नाकर्त्यांना दडतां येऊन, आहे तीच स्थिति शाबूत ठेवण्याच्या कामीं सुद्धां अहिंसेचा उपयोग करणें शक्य होईल.

अलीकडच्या कांहीं वर्षांत सामाजिक स्थित्यंतराच्या कल्पनेला हिंदुस्थानांत महत्त्व प्राप्त होऊं लागल्यामुळें वारंवार असें विधान केलेलें ऐकूं येतें कीं अशा स्थित्यंतराच्या वेळीं हिंसा ही अनिवार्य ठरत असल्याकारणानें सामाजिक स्थित्यंतराची तरफदारी करण्यांत येऊं नये व ( वर्गकलह कितीहि स्पष्ट स्वरूपांत अस्तित्वांत असला तरीहि ) वर्गकलहाचा उच्चार करूं नये. कारण काय, तर संपूर्ण सहकार्याच्या व भविष्यकाळांतील कोठल्या तरी अनिर्णित ध्येयाकडे नेणाऱ्या अहिंसामय प्रगतीच्या सुंदर कल्पनेचा वर्गकलहाच्या भाषेमुळें वेरंग होतो. प्रगतीच्या एका विशिष्ट अवस्थेंत हिंसा आचरल्याशिवाय सामाजिक प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं हें अगदीं संभवनीय आहे. कारण आपल्या दौलती कायम टिकवण्याकरतां वरिष्ठवर्ग हिंसाकर्म करण्यास कदापि मागेंपुढें पाहणार नाहींत असें वाटतें. पण अहिंसामार्गानें राजकीय क्षेत्रांत आमूलाग्र फेरबदल करणें शक्य होईल असें वादासाठीं गृहीत धरलें

तर सामाजिक रचनेंतसुद्धां त्याच मार्गानें आमूलाग्र फेरबदल कां करतां येऊं नयेत ? अहिंसाबलानें ब्रिटिश साम्राज्यशाहीची मगरमिठी सोडवून आपण राजकीय स्वातंत्र्याचा किनारा गांठला तर मग संस्थानिक, जमीनदार वगैरे विरोळ्यांची कथा काय ? मग सामाजिक प्रश्नांची वासलात देखील अहिंसा पद्धतीनें लावून तिच्याच साहाय्यानें समाजवादाची प्रस्थापना कां होऊं नये ? अहिंसेनें या सर्व गोष्टी शक्य होतील कीं नाहीं हा प्रश्न येथें प्रस्तुत नाहीं. मुद्दा असा आहे कीं झालीं तर राजकीय व सामाजिक अशीं दोन्ही स्थित्यंतरें अहिंसेनें सिद्ध होतील अथवा एकहि होणार नाहीं. अहिंसाशस्त्र फक्त परकीय सत्तेविरुद्धच वापरतां येतें असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. सकृद्दर्शनीं तरी स्वदेशांतील स्वार्थी व प्रगतिविरोधी लोकांविरुद्ध तें अधिक सुलभतेनें वापरतां यावें असें वाटतें. कारण अहिंसेचा मानसिक परिणाम इतरांपेक्षां आपल्या हाडामांसाच्या व्यक्तींवरच अधिक प्रमाणांत व्हावयास हवा.

अहिंसेशीं ज्या ध्येयांचा व पद्धतींचा विरोध येतो असें वाटेल त्यांचा निषेध करण्याची जी वृत्ति हिंदुस्थानांत अलीकडे आढळते ती माझ्या समजुतीनें कोणत्याहि प्रश्नाकडे पाहावयाच्या रास्त मार्गाच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. पंधरा वर्षांपूर्वी आपण अहिंसा मार्गाचा स्वीकार केला तो त्यामुळें आपलें उद्दिष्ट अत्यंत इष्ट व परिणाम-कारक रीतीनें साध्य होईल असें वाटलें म्हणून. साधनरूप अहिंसा आणि ध्येयभूत स्वातंत्र्य यांच्यांतील पृथगात्मता आपण मान्य केली होती. अहिंसेच्या देंठाला चिकटलेलें फळ म्हणजेच स्वातंत्र्य असें आपल्या ध्येयाचें स्वरूप नव्हतें. स्वातंत्र्य अहिंसेच्या मार्गानें मिळत असेल, तरच तें आपलें ध्येय समजण्यांत यावें असें म्हणण्याची त्या वेळीं कोणाचीहि प्राज्ञा नव्हती. परंतु आतां आमचें उद्दिष्ट अहिंसेच्या सांच्यांत बसलें तर ठीक, न बसलें तर गेलें केराच्या टोपलींत असा प्रकार झाला आहे. म्हणजे अहिंसेला आतां अपरिवर्तनशील अशा वेदवाक्याचें स्वरूप प्राप्त झालें असून त्याविरुद्ध बोलण्याची सोय राहिलेली नाहीं. पण त्यामुळें बुद्धीला आळवण्याचें आध्यात्मिक सामर्थ्य अहिंसातत्त्वांतून नष्ट होऊन तें श्रद्धाविषय व धर्मविषय बनलेल्या लांकडी सांच्याप्रमाणें बनत चाललें आहे. अहिंसा हें वरिष्ठ वर्गांच्या हातांतील ब्रह्मास्त्र झालें असून यथःस्थिति सनातन राहावी म्हणून त्याचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे.

अहिंसामय प्रतिकार व लढ्याचें अहिंसामय तंत्र हें हिंदुस्थानलाच नव्हे तर सर्व जगाला फार उपयुक्त आहे असें माझें मत असल्यामुळें अहिंसा तत्त्वाला असें ठोकळेबजा रूप प्राप्त व्हावें ह्याचा मला खेद वाटतो. आधुनिक विचारवंतांचें ह्या तत्त्वाकडे लक्ष वेधून घेऊन गांधीजींनीं फार थोर कामगिरी बजावलेली आहे. अहिंसामय प्रतिकार व तंत्र ह्यांचा भविष्यकाळ फार उज्ज्वल आहे असें मला वाटतें. त्यांचा सामग्र्यानें स्वीकार करण्याइतकी मनुष्यजातीची प्रगतिच अद्यापि झालेली नाहीं. आंधळ्याच्या हातीं पाजळलेला रत्नदीप दिला म्हणून काय होणार ? पण

अहिंसेची उदात्त कल्पना वास्तव जगांत संपूर्णतया अवतीर्ण होणें या घडीला शक्य नसलें तरी सर्व उदात्त कल्पनांप्रमाणें ह्या कल्पनेची प्रतिष्ठा अधिकाधिक वाढत जाऊन आपल्या वर्तनावरहि तिचा परिणाम होऊं लागेल. असहकार करणें म्हणजे अनिष्ट मानलेल्या शासनयंत्राला अथवा समाजघटनेला सहकार्य नाकारणें. ही एक वीर्यवती व वेगवती अशी कल्पना आहे. नीतिश्रेष्ठ अशा दहापांच लोकांनीं तिचें व्रतपालन केलें तरी देखील ती फैलावत जाईल. पुष्कळ लोक त्या कल्पनेचें प्रतिपालन करूं लागल्यास बाह्य परिणाम विशेष प्रमाणांत घडतो. परंतु मग अनेक इतर गोष्टींची राख भोंवतीं सांचून त्यांतल्या नैतिक स्फुल्लिंगाचें तेज लुप्त होत जातें, किंवा पाणी फैलावून त्याची खोली कमी व्हावी तसा प्रकार होतो. समष्टींत व्यक्तीच्या प्रभावाची प्रखरता नष्ट होत असते असा अनुभव आहे.

तथापि केवळ अहिंसेवर भर देत राहिल्यामुळें साक्षात् जीवनाशीं तिचा संबंध न उरून अशी अवस्था प्राप्त झाली आहे कीं लोक तिचा अंध विश्वासानें स्वीकार तरी करतात अथवा तिच्याकडे ढुंकूनहि पाहत नाहींत. बुद्धिवान् वर्ग तिच्यापासून दूर झटकला आहे. १९२० सालीं अहिंसातत्त्वाचा फार मोठा परिणाम दहशतवाद्यांवर होऊन अनेकजणांचें मतपरिवर्तन घडलें व उरलेल्यांच्या मनांत द्विधा वृत्ति उत्पन्न होऊन त्यांनीं आपलीं हिंसाकर्में थांबवलीं. तो परिणाम आज त्यांच्या मनावर राहिलेला नाहीं. असहकाराच्या व कायदेभंगाच्या काळांत ज्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला व अहिंसेचें संपूर्णतया पालन करण्याचा निष्ठापूर्वक प्रयत्न केला त्यांनाच, ते आज अहिंसेला धर्म मानावयास व समाजवादी शासनसंस्था प्रस्थापित करण्याचा आपला हेका सोडून द्यावयास तयार नाहींत, म्हणून पाखंडी समजण्यांत येत आहे. अर्थातच गांधीजींच्या मनांतील ज्योत अद्यापि तेवती आहे, त्यांची अहिंसा युयुत्सु व जयिष्णु असून, प्रगतिपर चळवळीच्या योगानें देशांत ते केव्हां उत्साहाचें तुफान उठवतील त्याचा नेम सांगतां येणार नाहीं. त्यांची थोरवी, त्यांच्यांतील विसंवाद व जनसागर हेलावण्याची शक्ति यांमुळें ते अनन्यसामान्य झालेले आहेत. इतरांप्रमाणें त्यांचें मोजमाप घेतां येणार नाहीं. पण त्यांचा गंडा बांधणाऱ्या पुष्कळ लोकांचा कल प्रतिकारशून्य शांतताप्रियतेकडे व टॉलस्टॉयी असहकारितेकडे झुकतो व जगापासून फटकून वागणाऱ्या एकाद्या पंथांतील व्यक्तीप्रमाणें त्यांची वृत्ति बनत जाते. सद्यःस्थिति कायम राहावी अशी इच्छा मनांत बाळगणाऱ्या व त्यासाठीं अहिंसेची कांस धरणाऱ्या अनेक लोकांचा थवाहि त्यांच्यासभोंवार जमतो. संधिसाधूपणाचा शिरकाव अशा प्रकारें झाला कीं विपक्षाचें मतपरिवर्तन व्हावयाच्या ऐवजीं अहिंसारक्षणाखातर आपलेंच मत परिवर्तित करून विपक्षाच्या खांद्याशीं खांदा भिडवून उभें राहण्यापर्यंत मजल जाते ! उत्साह मावळला आणि पीळ ढिला पडला कीं दोन पावलें मागें सरावें व पिछेहाटीलाच विरुद्ध पक्षाचें मन वळवण्याची हातोटी असें

म्हणावें ही कल्पना मोठी गोड वाटूं लागते, आणि मग जुन्या सहकाऱ्यांना आपण मुकलों तरी आपणांस त्याची कदर करावीशी वाटत नाहीं. आपल्या नव्या मित्रांना झोंबेल अशी अतिरेकी भाषा वापरल्याबद्दल जुन्या मित्रांना दोष देण्यांत येऊन आपल्या एकजुटीचा हे विध्वंस करीत आहेत असा त्यांच्यावर आरोपहि होऊं लागतो. समाजांत स्थित्यंतर घडवून आणण्याऐवजीं आहे हीच समाजरचना टिकावी, वरिष्ठ वर्गाचा पाय जसाच्या तसाच रोवलेला राहावा असें सांगण्यांत येऊन दान व दया यांचें गुणसंकीर्तन सुरू होतें.

साधनांचें महत्त्व मनावर बिंबवून देण्यांत गांधीजींनीं फार मोठी कामगिरी बजावली आहे याविषयीं मला संदेह वाटत नाहीं. तथापि सरतेशेवटीं आपण ध्येयावरच भर देत गेलें पाहिजे असें माझें स्पष्ट मत आहे. ध्येयाची रेखीव कल्पना आली नसेल तर आपले श्रम आंधळ्याच्या हेलपाट्याप्रमाणें होतील व गौण प्रश्नांतच आपली सारी शक्ति जिरून जाईल. तथापि साधनाकडे सुद्धां दुर्लक्ष करतां कामा नये. नैतिक दृष्टि सोडली तरी व्यवहारतः साधनांचें महत्त्व फार आहे. अनिष्ट अथवा अनैतिक साधनें हातीं धरलीं तर ध्येयाची खराबी होते अथवा नव्या दुर्लंघ्य अडचणी मार्गांत उत्पन्न होतात. आणि माणसाची खरी पारख होते ती तो कोणत्या ध्येयाचा पुकारा करतो त्यावर होत नसून तो कोणतीं साधनें वापरतो त्यांच्यावरून होत असते. निष्कारण कलह पेटवणारीं व वैमनस्य माजवणारीं साधनें घेतलीं तर ध्येय दुरावून ध्येयप्राप्ति कठीण होऊन बसेल. साध्य व साधनें यांच्यांतील संबंध इतका जिव्हाळ्याचा असतो कीं, त्यांत फारकतीला फारच थोडा अवकाश मिळण्यासारखा आहे. त्यामुळें कलह व तेढ कमी करतील, निदान पक्षीं त्यांना कह्यांत ठेवतील ( कारण कलह व तेढ असणें अपरिहार्य दिसतें. ) व सहानुभूति वाढवतील अशींच उपकरणें जवळ केलीं पाहिजेत. याचा अर्थ हा प्रश्न कोणती विशिष्ट पद्धति स्वीकारण्यांत येते त्यावर अवलंबित नसून हेतु व स्वभावभेदांवर अवलंबून आहे. या हेतूवरच गांधीजींनीं भर दिला व त्यामुळे मानवी स्वभावांत लक्षांत येण्याजोगा फरक घडून आलेला नसला तरी लक्षावधि लोकांचा समावेश जींत झाला होता अशा प्रचंड राष्ट्रीय चळवळीवर या हेतुशुद्धीचा ठसा उमटवण्याच्या कामीं त्यांनीं आश्चर्यजनक यश कमावलें. नैतिक शिस्तीचे त्यांनीं घालून दिलेले दंडक विवादनीय असले तरी नैतिक शिस्तीविषयीं त्यांनीं धरलेला आग्रह आवश्यक असाच होता. आपल्या अंगच्या दोषांना अथवा पापाचरणाला त्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्व असून समाजाकडून होणाऱ्या पापांना ते गौण लेखतात. असल्या शिस्तीची उघडच अत्यंत जरूरी आहे. कारण रणांगण सोडून अधिकाराधिष्ठित वरिष्ठ वर्गाच्या मजलशींत जाऊन मिसळण्याच्या मोहानें अनेक कॉंग्रेसकार्यकर्ते मार्गभ्रष्ट झाल्याचें आपण पाहतच आहों. आणि त्या माया-मंदिराचा दरवाजा कोणत्याहि विख्यात कार्यकर्त्यासाठीं सदैव उघडाच ठेवलेला असतो.

आमचें जग बहुविध अरिष्टांच्या कचाट्यांत सांपडलें आहे. पण जनतेचा जो मानसिक सन्निपात झालेला दिसत आहे तें सर्वांत मोठें अरिष्ट होय. इतर ठिकाणच्या मानानें आशियांत फार उशीरा फेरबदल सुरू झालेले असल्यामुळें स्थित्यंतराची प्रक्रिया मोठी कष्टप्रद होत आहे. त्यामुळें आपल्या पौर्वात्य देशांत हा मानसिक सन्निपात विशेषच प्रमाणांत आढळून येतो. सर्व आयुष्यक्रमावर राजकीय प्रश्नाचें वर्चस्व गाजत असल्याचें दिसत असलें, तरी वस्तुतः त्याचें महत्त्व तितकेंसें नाहीं. परंतु इतर जिव्हाळ्याचे प्रश्न हातीं घेण्यापूर्वी ह्या राजकीय प्रश्नाचा निकाल लावल्याखेरीज पुढें पाऊल टाकणेंहि शक्य नाहीं. गेलीं कित्येक शतकें जवळ जवळ सनातन अशी एकच एक समाजरचना आमच्या परिचयाची होऊन बसल्यामुळें आमच्यापैकीं कित्येकांना अद्यापि असेंच वाटत असतें कीं हीच एक शक्य व योग्य अशी समाजव्यवस्था आहे. आमच्या नीतिविषयक कल्पनासुद्धां त्या समाजव्यवस्थेशींच निगडित झालेल्या आहेत. पण गतकालीन समाजव्यवस्थेचा सांधा नव्या कल्पनांशीं जुळवून देण्याचे आमचे प्रयत्न फसत असून ते असेच फसत राहणार हें निश्चित. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ व्हेब्लेन म्हणतो कीं, "अर्थशास्त्रांतील नीतितत्त्वें हीं अखेरीस आर्थिक गरजांवरच अवलंबून असतात." तेव्हां आमच्या गरजांना साजेशीं नीतितत्त्वें बनवण्यावांचून आपणाला गत्यंतर नाहीं. या मानसिक सन्निपाताचें निराकरण करून ह्या युगमानांत कोणत्या प्रकारच्या मानसिक मूल्यांची प्रतिष्ठापना करणें अवश्य आहे ते जाणून घ्यावयाचें असेल तर सद्यःस्थितीचें समीक्षण आपण प्रांजलपणें आणि निडरपणेंच करावयास हवें. ह्या वेळीं कोणत्याहि धर्मवचनांचा आसरा घेऊन निभाव लागणार नाहीं. धर्म जें कांहीं आज्ञापितो तें इष्ट असेल अथवा अनिष्ट असेल, त्याचा प्रश्न नाहीं. पण सांगावयाच्या गोष्टी धर्म अशा तऱ्हेनें सांगतो आणि अशा प्रकारच्या श्रद्धेची आपणाकडून तो अपेक्षा करतो कीं त्यापासून कोणत्याहि मुद्द्याचा तर्कशुद्ध अभ्यास करण्याचें वळणच लागूं नये. फ्राइड म्हणतो त्याप्रमाणें धर्माच्या अनुशासनावर "श्रद्धा ठेवावयाची ती कां? तर आमच्या प्राचीनतम पूर्वजांनीं त्यावर विश्वास ठेवला, हें एक कारण: त्याच पुरातन काळापासून वंशपरंपरा चालत आलेला धर्मवचनें सिद्ध करणारा पुरावा देखील आपल्यापाशीं आहे, हें दुसरें कारण; आणि धर्मवचनें खरीं कीं खोटीं हा प्रश्नच उपस्थित करतां कामा नये असें खुद्द धर्मच सांगत आहे, हें तिसरें कारण."

अहिंसेचा आणि अहिंसेंत अन्तर्भूत होणाऱ्या सर्व बारकाव्यांचा विचार धर्माच्या कट्टर दृष्टीनें करण्याचें ठरविलें म्हणजे वादविवादाला जागाच उरत नाहीं व अहिंसेला संकुचित धर्मपंथाचें स्वरूप प्राप्त होतें. लोकांनीं त्यांत सामील तरी व्हावें अथवा बाहेर तरी उभें राहावें. तिच्यांतील ताजेपणा नष्ट होऊन वर्तमानकालांत नित्य उपस्थित होणारे प्रश्न सोडविण्याची पात्रता तिच्यांत उरत नाहीं. परंतु आधुनिक परिस्थितीशीं अनुसंधान राखून आपण अहिंसेची चर्चा सुरू केली, तर जगाची पुनर्घटना

करण्याच्या कार्यांत आपणाला तिच्यापासून बहुमोल साहाय्य मिळण्यासारखें आहे. पण अशी चर्चा होत असतां समष्टीच्या म्हणजे लोकसमूहाच्या सामुदायिक मनाचा कमकुवतपणा व स्वभावविशेष आपण विसरतां कामा नये. सामुदायिक अशी कोणतीहि चळवळ व विशेषतः क्रांतिकारी व मूलगामी फेरबदल करण्यासाठीं प्रवृत्त झालेली चळवळ ही केवळ पुढाऱ्यांच्या कल्पनेबरहुकुम चालत नाहीं, तर परिस्थितीचा व विशेषेंकरून ज्या जनतेला हाताशीं धरून पुढारीवर्ग काम चालवतो त्या जनतेच्या तद्विषयक कल्पनांचा फार मोठा परिणाम चळवळीवर होत असतो.

जागतिक इतिहासांत हिंसेनें देखील फार महनीय कामगिरी पार पाडलेली आहे. आजच्या घटकेलाहि त्याच तोलाची कामगिरी ती बजावीत असून आणखी बराच काळ हीच परिस्थिति कायम राहील असा रंग दिसतो. गतकालांत झालेलीं बहुतेक स्थित्यंतरें हिंसा व जुलूम यांच्याच द्वारां घडून आलेलीं आहेत. " हिंसेविषयीं तिरस्कार, शिस्तीविषयीं प्रेम आणि सहनशीलतेचें आचरण यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि गोष्टी संकटकालीं आम्हीं जनतेला शिकविल्या नसत्या तर ह्या देशाला मिळालेलें स्वातंत्र्य कदापि मिळालें नसतें असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें, " असे उद्गार डब्ल्यू. ई. ग्लॅडस्टन यांनीं काढलेले आहेत.

गत व वर्तमान कालांत हिंसेला लाभलेलें महत्त्व दृष्टीआड करतांच येणार नाहीं. त्याच्याकडे दुर्लक्ष करणें म्हणजे जीवनाकडे दुर्लक्ष करण्याप्रमाणें आहे. तथापि हिंसा अनिष्ट असून तिच्यामुळें दुष्परिणामांची परंपरा निर्माण होत जाते यांत तिळमात्र शंका नाहीं. आणि वैमनस्य, क्रौर्य, सूड आणि दंडन वगैरे हिंसेचा अवलाद तिच्यापेक्षांहि फार भयंकर आहे. खरें बोलावयाचें तर हिंसा ही मूलतः वाईट नसून ह्या अनुबंधी भावनांमुळें ती वाईट झालेली आहे. असद्धेतू-प्रमाणें सद्धेतूनेंहि हिंसा करणें शक्य असल्याकारणानें उपरोक्त विकृत भावना मनांत न बाळगतांगुद्धां हिंसा करतां येईल. परंतु ह्या भावनांपासून अलिप्त अशी हिंसा दुर्मिळ आहे, आणि म्हणूनच शक्य तों हिंसा टाळण्याचा प्रयत्न करीत असावें. परंतु हिंसा टळावी म्हणून हिंसेपेक्षांहि अनिष्ट अशा गोष्टींपुढें मान तुकवण्याची क्रियाशून्य वृत्ति मात्र धारण करतां कामा नये. हिंसेपुढें मान तुकवणें अथवा हिंसेवर आधारलेल्या राजसत्तेचा अंगीकार करणें म्हणजे अहिंसेला तिलांजलि देण्यासारखें आहे. अहिंसा मार्ग टिकून राहावयास हवा असेल, तर तो चैतन्यमय आणि हिंसाधिष्ठित राजवटींत अथवा समाजरचनेंत फेरबदल घडवून आणण्यास शक्त-समर्थ असा व्हावयास हवा.

तेवढी शक्ति अहिंसामार्गांत आहे कीं नाहीं तें मला सांगतां येणार नाहीं. अहिंसेच्या बळावर आपणाला बराचसा मार्ग आक्रमण करतां येईल, परंतु तिच्याच बळावर आपलें अंतिम ध्येयहि आपणांस साध्य करतां येईल कीं काय याविषयीं मला

संदेह वाटतो. कांहींहि झालें तरी कोणत्या ना कोणत्या प्रकारची सक्ती केल्याशिवाय सुटका नाहीं अशी माझी समजूत आहे. कारण अधिकारारूढ वर्ग गत्यंतर दिसेनासें झाल्याशिवाय, अथवा मूठ घट्ट दाबून ठेवण्यापेक्षां पांचहि बोटें उघडलेलीं बरीं अशी परिस्थिति निर्माण केल्याशिवाय हातची सत्ता सोडील असें वाटत नाहीं. सध्यां समाजांत दिसणारे कलह–मग ते राष्ट्रीय असोत कीं वर्गीय असोत–सक्तीशिवाय मिटले असें कदापि व्हावयाचें नाहीं. मतपरिवर्तन तर मोठ्या प्रमाणांत झालेंच पाहिजे, कारण मोठमोठ्या गटांचें मतपरिवर्तन झालें नाहीं तर सामाजिक स्थित्यंतराची चळवळ तरी कशी मूळ धरणार? परंतु कांहीं जणांना जबरदस्तीनेंच वठणीवर आणावें लागेल. आणि समाजांतील मूलगामी कलहावर पांघरूण घालून ते नाहींतच असें भासवणें देखील योग्य नव्हे. त्यामुळें सत्याची मुस्कटदाबी केल्याप्रमाणें होईल, इतकेंच नव्हे, तर जनतेपासून सत्य लपवून ठेवून, तिची दिशाभूल करून, सद्य:स्थितीस पाठबळ दिल्याप्रमाणें होईल. शिवाय सत्तासंपन्न वर्गाला आपल्या सत्तेचें समर्थन करण्यासाठीं नेहमीं हवेंसें वाटणारें नैतिक साहाय्यदेखील त्यामुळें मिळेल. अन्याय्य पद्धतीचा प्रतिकार करावयाचा असेल तर ज्या असत्य सिद्धांतांच्या पायावर ती उभारलेली आहे तो पाया उध्वस्त करून वस्तुस्थिति चवाठ्यावर मांडणें इष्ट आहे. भ्रान्त सिद्धांताच्या व लटक्या विचारांच्या प्रसाराच्या कामीं आपलें सहकार्य नाकारून त्यांचें खरें स्वरूप लोकांच्या निदर्शनास आणून देतां येतें हा असहकारितेपासून होणारा एक मोठा फायदा होय.

ज्या समाजांतील आर्थिक जीवनामध्यें सर्वांना सारखा न्याय व संधि मिळेल, मानवजातीला भौतिक व सांस्कृतिक उन्नतीचीं उच्चतर शिखरें गांठतां यावींत म्हणून ज्यांतील समाजरचना योजनापूर्ण रीतीनें करण्यांत आली असेल, जेथें आध्यात्मिकता, सहकार्य, नि:स्वार्थ, सेवावृत्ति, सदाचरण, परहितेच्छा आणि प्रेम या सद्‌गुणांचें बीजारोपण होईल व हळूहळू अखिल मानवजातीवर एकशासन सुरू होईल, असा वर्गमुक्त समाज प्रस्थापित करणें हेंच आपलें अंतिम ध्येय असावयास पाहिजे. त्या ध्येयाच्या मार्गांत जें जें येईल तें तें शक्य तों सामोपचारानें आणि जरूर तर तीक्ष्णोपचारानें दूर केलें पाहिजे. आणि अशी सक्ती करणें अपरिहार्य होईल ह्याबद्दल शंकाच नको. परंतु सक्ती करावी लागली तर द्वेषभावनेनें अथवा क्रूरपणें न करतां अडचण काढून टाकण्याची बुद्धि ठेवूनच ती करावी. हें बरेंच कठिण आहे. ती सोपी गोष्ट नव्हे. पण साफ फरसबंदी रस्ता आपणांपुढें नाहींच, त्यांत ठिकठिकाणीं खाचखळगे आहेत. आणि आपण आपली डोळेझांक केली म्हणून ते नाहींसे कसे होणार? त्यांचें योग्य स्वरूप ध्यानांत घेऊन धिटाईनें आपण रस्ता पकडला तरच ते नाहींसे होतील. ह्या गोष्टी मृगजलाप्रमाणें केवळ कल्पनारम्य आहेत असें वाटेल व ह्या उच्च विचारांनीं प्रेरित होऊन पुष्कळ लोक कामास जुंपले आहेत असें घडणारहि नाहीं. पण तें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्याचा आपण आग्रह धरला तर प्रतिपादनाच्या

संतत धारेमुळें आपल्यापैकीं पुष्कळांच्या मनांत भरून राहिलेल्या द्वेषादिक भावना कदाचित् विरघळूनहि जातील.

आपली कार्यपद्धति उपरोक्त ध्येयाकडे जाणारी व उपरोक्त विचारांनीं प्रेरित झालेली असली पाहिजे. परंतु मनुष्यस्वभाव आहे असा असल्यामुळें आपल्या विज्ञप्तीला अथवा आपल्या मनधरणीला सर्व जनसमूह नेहमींच होकार देईल अथवा उच्च अशा नैतिक तत्त्वाप्रमाणें तो सतत वर्तन ठेवील अशी अपेक्षा करूं नये. मतपरिवर्तनाबरोबरच सक्तीहि करावी लागेल, पण सक्तीचें क्षेत्र मर्यादित राहावें व सक्ती करतांना अनिष्ट गोष्टी कमींत कमी प्रमाणांत व्हाव्या म्हणून शक्य तों दक्षता बाळगावी; अधिकांत अधिक आपणांला इतकेंच करतां येण्यासारखें आहे.

# पुनश्च डेहराडून तुरुंग

अलिपूर-तुरुंगांतील हवा मला मानवेना. माझें वजन बरेंच घटलें आणि कलकत्त्याच्या वाढत्या उन्हाळ्याचाहि मला त्रास होऊं लागला. मला चांगल्या हवेच्या ठिकाणीं बदलणार अशी बातमी उठली होती. शेवटीं १७ मे रोजीं "लपेट बिस्तरा" असा हुकुम होऊन मी त्या तुरुंगांतून बाहेर पडलों. मला डेहराडून तुरुंगांत पाठवावयाचें ठरलें होतें. इतक्या महिन्यांच्या एकांतवासानंतर संध्याकाळच्या थंड हवेंत कलकत्त्याहून मोटरीनें जातांना फार मजा वाटली आणि हौरा स्टेशनच्या भव्य आवारांतील गर्दी पाहून अतिशय आनंद झाला.

बदली झाल्यामुळें मला फार समाधान वाटलें. मनांत म्हटलें कीं आतां डोंगराच्या शेजाराला आपण जाणार. पण आल्यावर पाहतों तों नऊ महिन्यां-पूर्वीचें डेहराडून आतां राहिलेलें नव्हतें. एका स्वच्छ व दुरुस्त केलेल्या गोठ्यांत माझी सोय करण्यांत आली.

जागा तशी कांहीं वाईट नव्हती: पुढें लहानसा व्हरांडाहि होता. शेजारीं पन्नास फूट लांबीचें अंगण होतें. मागच्या खेपेला डेहराडूनमध्यें मिळालेल्या जागेपेक्षां ही जागा खात्रीनेंच अधिक चांगली होती. पण इतर गोष्टी मात्र अधिक चांगल्या नव्हत्या असें मला लवकरच कळून आलें. आवाराभोंवतालचा तट जणुं कांहीं माझ्या भल्यासाठींच दहा फुटांचा चौदापंधरा फुटांपर्यंत चढवला होता. त्यामुळें ज्या टेकड्या पाहण्यासाठीं मी उतावीळ झालों होतों, त्या मुळींच दिसेनात. क्वचित् झाडांचे शेंडे तेवढे दिसत. या तुरुंगांत मीं तिनांपेक्षां अधिक महिने वास्तव्य केलें, पण मला पर्वताचें एकदांहि दर्शन घडलें नाहीं. पूर्वीप्रमाणें तुरुंगाच्या दारासमोर फेऱ्या मारण्याची परवानगी नाकारण्यांत आली. अधिकाऱ्यांचें म्हणणें असें पडलें कीं माझ्या खोलीपुढचें अंगण फिरावयास पुरेसें आहे.

हे आणि इतर नवे निर्बंध मोठे निराशाजनक होते. त्यांचा मला जाच वाटूं लागला. माझा उत्साह पार मावळला आणि अंगणांतल्या अंगणामध्यें जो कांहीं थोडाफार व्यायाम करतां येण्यासारखा होता, तोहि मला करावासा वाटेना. इतका एकलेपणा मला पूर्वी कधींच वाटला नव्हता. ह्या एकांतवासाचा अनिष्ट परिणाम माझ्या मनावर होऊन माझें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडून गेलें. केवळ कांहीं यार्डांच्या अंतरावर भिंतीच्या पलीकडे नवोन्मेष आणि सुगंध थाटला आहे,

हरिततृणें आणि सुखस्पर्शी भूमि पसरली आहे, त्यांवर पसरलेली शोभा विलसत आहे. हें मला ठाऊक असलें तरी तें सर्व माझ्या कक्षेपलीकडे होतें. त्या तटबंदीकडे सारखें पाहून माझे डोळे दमून गेले, सुस्त झाले. मला एकट्यालाच एकीकडे ठेवलेलें असल्यामुळें तुरुंगांतील माणसांच्या नेहमींच्या हालचालीदेखील दृष्टीस पडेनात.

सहा आठवड्यांनंतर पावसाळा सुरू होऊन मुसळधार पाऊस पडूं लागला. पहिल्याच आठवड्यांत बारा इंच पाऊस झाला. हवा बदलली आणि नवजीवनाच्या हालचालींची चाहूल ऐकूं येऊं लागली. हवेंत गारवा येऊन शरीराला हायसें वाटूं लागलें. पण मनाचें अथवा डोळ्यांचें शांतवन होईना. मधून मधून माझ्या आवाराचा लोखंडी दरवाजा उघडून वॉर्डर आंत येई अथवा बाहेर जाई, तेव्हां कांहीं थोडे क्षण बाहेरच्या जगाचें ओझरतें दर्शन मला घडत असे,—हिरवीं गार शेतें आणि हिरवीं गार झाडें, त्यांचा तो चमकदार रंग आणि त्यांच्यावर मोत्यांप्रमाणें चमकणारे ते पावसाचे थेंब—पण हें दृश्य क्षण दोन क्षणच दिसून विजेच्या सळीप्रमाणें लक्-दिशीं नाहींसें होई. दरवाजा सताड असा कधींच उघडा राहत नसे. मी जवळपास असलों म्हणजे दरवाजा पुरा उघडूं नये अशी वॉर्डरांना ताकीद झालेली असावी. बाहेरच्या प्रसन्न सृष्टीच्या क्षणिक दर्शनामुळें मला फारसा आनंद होत नसे. तें दृश्य डोळ्यांसमोर चमचमलें कीं मनाला घराची ओढ लागून अन्तःकरण व्याकुळ होई. म्हणून दरवाजा उघडला कीं मी बाहेर पाहण्याचेंच टाळीत असें.

परंतु माझ्या मनाला विपण्णता प्राप्त झाली त्यांत वास्तविक तुरुंगाचा कांहींच दोष नव्हता. तेथील वातावरणामुळें तींत भर पडली, इतकेंच. बाहेरच्या घटनांचाच माझ्या मनावर अनिष्ट परिणाम घडून आला होता. कमला आजारी होती आणि राजकारणाविषयीं मनाला चिंता लागून राहिली होती. कमला पुनरपि जुन्या आजाराच्या तावडींत सांपडलेली आहे ह्याची मला कल्पना येऊन चुकली होती. मी जवळ असतों तर तितकाच फेर पडला असता.

डेहराडूनला अलिपूरपेक्षां निराळी व्यवस्था होती. तेथें मला दैनिक वृत्तपत्र मिळत असल्याकारणानें राजकीय व इतर घडामोडींशीं मला संबंध ठेवतां येई. जवळ जवळ तीन वर्षांच्या अवधीनंतर पाटण्याला ऑ. इं. कॉं. समितीची बैठक भरली. (ह्या काळांत ती बेकायदा ठरविण्यांत आलेली होती.) तेथें झालेल्या विचारविनिमया-संबंधींची बातमी वाचून मला विषाद वाटला. हिंदुस्थानांत आणि जगांत इतक्या घडामोडी झालेल्या असूनदेखील ह्या पहिल्या बैठकीच्या प्रसंगीं परिस्थिति सूक्ष्मपणें निरखून व सविस्तर विचारविनिमय करून जुन्या चाकोरींतून बाहेर पडण्याचा कांहींच प्रयत्न होऊं नये याचें मला आश्चर्य वाटलें. गांधीजींची जुनी हुकुमशाही अद्याप कायमच आहे असा मला दुरून तरी भास झाला खरा. "तुम्हांला माझें नेतृत्व

हवें असेल तर माझ्या अटी तुम्हीं पत्करल्या पाहिजेत" हे त्यांचे उद्‌गार. त्यांचें म्हणणें ठीकच होतें म्हणा. कारण त्यांना तर सोडावयाचें नाहीं आणि उलट त्यांनींच आपल्या ठाम समजुतीवर पाणी सोडावें अशी अपेक्षा धरावयाची हें कसें जुळणार? पण चर्चा-वादविवाद होऊन धोरण ठरण्याऐवजीं वरूनच सर्व शिजून यावें असा प्रकार फार माजला होता. दुसऱ्यांच्या मनाचा कबजा घेऊन पुन: लोकच दुबळे आहेत अशी तक्रार सांगण्याची गांधीजींची रीत कांहीं औरच आहे. त्यांना लाभली इतकी सामुदायिक निष्ठा क्वचितच कोणाला लाभली असेल. अशी स्थिति असतां त्यांनीं घालून दिलेल्या उच्च पायरीपर्यंत लोकांची उडी पोंचली नाहीं म्हणून लोकांना दोष देणें योग्य दिसत नाहीं. पाटण्याच्या बैठकीला तर ते शेवटपर्यंत हजर देखील राहिले नाहींत. त्यांना आपला हरिजन दौरा चालवावयाचा होता ना? जरा झटपट काम उरका आणि वर्किंग कमिटीनें पुढें मांडलेले ठराव चटाचट पास करा असा आदेश आ. इ. कांग्रेस समितीला देऊन ते निघून गेले.

फार वेळ चर्चा चालवून अधिक चांगला निष्कर्ष निघाला नसता असेंहि कदाचित् असेल. सभासदांचा गोंधळ उडालेला होता, कोणालाहि नीट न्याहाळत नव्हतें आणि टीका करावयाला बरेच जण तयार असले तरी विधायक सूचना जवळजवळ कोणींच केल्या नाहींत. त्या काळच्या परिस्थितींत असें होणें साहजिकच होतें. कारण निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांच्या खांद्यावर लढ्याचा भार नित्य पडलेला असल्या-मुळें त्यांच्या शरीराला थकवा आणि मनाला मरगळ आली होती. कायदेभंग थांबवला पाहिजे एवढी अंधुकशी कल्पना आलेली असली तरी पण पुढें काय? पाटण्याला दोन तट पडले. कायदेमंडळांतून केवळ सनदशीर चळवळ करीत राहावें अशी एकाची इच्छा होती, तर समाजवादी मार्गपद्धतीचा स्वीकार करावा अशा तऱ्हेची अस्पष्ट कल्पना दुसऱ्या गटाच्या मनांत होती. बहुसंख्य सभासद असे होते कीं, जे ना तळ्यांत ना मळ्यांत. सनदशीर मार्गाकडे परतून जावें हें बरें वाटेना. इकडे समाजवादाची थोडीशी भीति वाटत होती, व आपल्यांत दुही माजवणाऱ्या गोष्टी समाजवादाच्या तत्त्वज्ञानामुळें येतील अशी शंकाहि मनांत डोकावत होती. पण त्यांच्यापाशीं एकहि विधायक कल्पना नव्हती. त्यांच्या साऱ्या आशेचें व श्रद्धेचें स्थान म्हणजे गांधीजी. तेव्हां पूर्वीप्रमाणें याहि खेपेला ते गांधीजींना शरण गेले व त्यांचें म्हणणें पुष्कळ जणांना मान्य नसलें तरी गांधीजींच्या मागोमाग जाण्याचें त्यांनीं ठरविलें. नेमस्त सनदशीर गटाला गांधीजींचा पाठिंबा मिळाल्यामुळें या मधल्या गटाला वर्किंग कमिटींत व कॉंग्रेसमध्यें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें.

ह्या साऱ्या गोष्टी अपेक्षित अशाच होत्या. पण ह्या प्रतिगामी वृत्तीनें मला कल्पना नव्हती इतक्या मागें कॉंग्रेसला रेंटीत नेलें. असहकारिता सुरू झाल्यापासूनच्या गेल्या पंधरा वर्षांत कॉंग्रेस-पुढाऱ्यांच्या भाषेंत सनदशीरपणाचा इतका अतिरेक

झालेला माझ्या पाहण्यांत नाहीं. स्वराज्यपक्ष सुद्धां अशा पराभूत मनःस्थितींतून उदयास आला होता; पण त्याची भाषादेखील या नव्या पुढाऱ्यांच्या भाषेहून किती तरी प्रगतिपर असे. शिवाय स्वराज्य पक्षांतील थोर नेत्यांप्रमाणें कोणी नेतेहि नव्या गटाला लाभले नाहींत. चळवळींत भाग घेणें धोक्याचें म्हणून जे लोक इतके दिवस लांब अंतरावर उभे राहिले होते, तेच आतां भराभर आंत घुसून मानाच्या जागा पटकावूं लागले.

कॉंग्रेसवरील बेकायदेशीरपणाचा शिक्का सरकारनें पुसून टाकल्यावर ती पुनः कायदेशीर संस्था बनली. परंतु तिच्याशीं संबद्ध व तिला दुय्यम अशा सेवादल व किसान सभा यांच्यासारख्या अनेक संस्था बेकायदेशीर राहिल्या होत्या. त्यांपैकीं प्रमुख म्हणजे सरहद्दींतील "खुदा-इ-खिदमतगार" ही संस्था होय. कायदेभंग थांबला तरी कायदेभंगासाठीं अस्तित्वांत आणलेले सर्व खास कायदे सरकारनें जारी ठेवले व शेतकरी-संघ व मजूर संघ यांना दडपून टाकण्याची विशेष दक्षता ठेवण्यांत येऊं लागली. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे जमीनदारांनीं व तालुकदारांनीं आपापल्या संघटना कराव्यात असा मतप्रचार करण्यासाठीं खुद्द बडे बडे अधिकारी बाहेर पडले व त्यांच्या संघटनांना सर्व तऱ्हेच्या सवलती देण्यांत येऊं लागल्या. संयुक्त प्रांतांतील अशा प्रकारच्या दोन संघटनांची वर्गणी सरकारी कामदाराकडून सारा व खंड यांच्याबरोबर गोळा करण्यांत येत असे.

हिंदु अथवा मुसलमान यांपैकीं कोणाच्याहि जातीय संघटनांचा पक्षपात मीं केलेला नाहीं. पण एका प्रसंगामुळें हिंदु महासभेविषयीं माझ्या मनांत फार चीड उत्पन्न झाली. "लाल डगलेवाल्यांची" संघटना बेकायदेशीर ठरवली हें ठीक केलें म्हणून सरकारची पाठ थोपटण्याचा रिकामटेकडा उद्योग महासभेच्या एका चिटणीसांनीं करावा याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न बाजूस ठेवला तरी गेल्या लढ्याच्या वेळीं सरहद्द प्रांतांतील लोक अत्यंत शिस्तीनें वागले ही गोष्ट मशहूर आहे. अखिल हिंदुस्थानांत उमद्यांतला उमदा आणि शूरांतला शूर म्हणून नावाजलेला खान अबदुल गफारखान यांच्यासारखा त्यांचा पुढारी त्या वेळीं विनाचौकशी तुरुंगांत होता. जातीय पक्षपाताची मजल याहून पलीकडे जाणें शक्य आहे काय? हिंदुमहासभेचे प्रमुख पुढारी या बाबतींत आपल्या सहकाऱ्याला तावडतोब कानपिचक्या देतील अशी माझी अपेक्षा होती; पण एकाहि पुढाऱ्यानें त्या बाबतींत चकार ब्र काढलेला मला आढळला नाहीं.

हिंदुमहासभेच्या चिटणीसांच्या ह्या पत्रकाचा मला फार राग आला. पत्रक तर किडकें होतेच, पण देशांतील नव्या परिस्थितीचेंहि ते निदर्शक आहे असें मला वाटलें. त्या उन्हाळ्यांत एके दिवशीं दुपारीं माझा डोळा लागला असतां मला एक विलक्षण स्वप्न पडलें. अबदुल गफार खानावर चौबाजूंनीं हल्ला होत असून मीं त्यांचें संरक्षण करण्याची शिकस्त चालवली होती. जाग आली, तेव्हां अगदीं

थकून गेल्याप्रमाणें मला वाटलें. मन खिन्न झालें होतें, आणि उशी अश्रूंनीं भिजून निघाली होती. हा सर्व प्रकार मोठा आश्चर्यजनक होता. कारण जागेपणीं मी कधींच असा भावनाविव्हल होत नाहीं.

त्या वेळीं माझें मनःस्वास्थ्यहि बिघडलेलेंच होतें. मला स्वस्थ झोंप लागत नसे आणि तऱ्हेतऱ्हेचीं स्वप्नें पडत. माझ्या बाबतींत हा नवाच प्रकार होता. कधीं कधीं मी झोंपेंत ओरडत असें. एकदां मी नेहमींपेक्षां बराच मोठयानें झोंपेंत ओरडलों असलों पाहिजे. कारण मी खडबडून जागा होऊन पाहतों तों माझ्या अंथरुणाशीं दोन वॉर्डर सचिंत मुद्रेनें उभे असलेले दिसले. माझा गळा कोणी तरी दाबीत असल्याचें मीं स्वप्नांत पाहिलें.

याच वेळीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें केलेल्या एका ठरावामुळें माझ्या मनाला खेद झाला. "खाजगी मालमत्तेच्या जप्तीविषयीं व वर्गकलहाविषयीं जी स्वैर भाषा वापरण्यांत येत आहे" तिला अनुलक्षून हा ठराव पास करण्यांत येत आहे असें म्हटलेलें होतें. "न्याय्य कारणाशिवाय खाजगी मालमत्ता जप्त करण्याचा अथवा वर्गकलहाचा पुरस्कार करण्याचा कराचींच्या ठरावाचा आशय नाहीं. त्याचप्रमाणें मालमत्तेची जप्ती व वर्गकलह ह्या गोष्टी कॉंग्रेसच्या अहिंसा धर्माच्या विरुद्ध आहेत असें वर्किंग कमिटीचें मत आहे," असें या ठरावामार्फत कॉंग्रेसवाल्यांच्या निदर्शनास आणण्यांत आलें होतें. ठरावाची भाषा भोंगळ होती आणि ठराव तयार करणारांच्या मनांत वर्गकलह म्हणजे काय याविषयीं अज्ञान वसत असावें ही गोष्ट त्यावरून उघड होत होती. नव्या स्थापन झालेल्या कॉंग्रेस समाजवादी पक्षावर या ठरावाचा रोख होता हें स्पष्टच दिसत होतें. ह्या नव्या गटाच्या कोणत्याहि जबाबदार पुढाऱ्यानें जप्तीची भाषा वापरली नव्हती. सध्याच्या समाजांत वर्गकलह विद्यमान आहे असा उल्लेख मात्र वारंवार करण्यांत येई. वर्किंग कमिटीच्या ठरावाचा झोंक असा होता कीं, वर्गकलहाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीला कॉंग्रेसचा साधा सभासद होणेंहि शक्य नाहीं. कॉंग्रेस समाजवादी झाली अथवा ती खाजगी मालमत्तेच्या विरुद्ध आहे असा आरोप कोणींहि केलेला नव्हता. कॉंग्रेसमधील कांहीं सभासदांचीं मतें मात्र तशा प्रकारचीं होतीं. पण इतःपर अशा लोकांना कॉंग्रेससारख्या देशव्यापी संस्थेच्या सामान्य सभासदांतहि थारा मिळणार नाहीं असें दिसूं लागलें.

कॉंग्रेस ही राजापासून रंकापर्यंत सर्व गटांचा व हितसंबंधांचा समावेश असणाऱ्या अखिल राष्ट्राची संस्था आहे असें वारंवार सांगण्यांत येतें व अशा प्रकारचा दावा राष्ट्रीय चळवळींच्या तर्फे पुष्कळदां करण्यांतहि येतो. ही चळवळ राष्ट्रांतील बहुसंख्य लोकांची प्रतिनिधि आहे व सर्व तऱ्हेच्या हक्कसंबंधांचें कल्याण व्हावें असें तिचें उद्दिष्ट आहे इतकाच बहुधा त्यांतील मथितार्थ असावा. परंतु हा आग्रह आपाततःच असमर्थनीय आहे. कारण कोणतीहि राजकीय संघटना परस्परविरोधी

हितासंबंधांचें प्रतिनिधित्व पत्करूं म्हणेल तर तिला बिलबिलीत आणि अर्थशून्य अशा फापटपसाऱ्याचें स्वरूप प्राप्त होऊन तिच्यांत कोणतेंहि वैशिष्ट्य अथवा ठळकपणा उरणार नाहीं. काँग्रेस म्हणजे निःसंदिग्ध (अथवा संदिग्ध) ध्येय असलेला, सत्तासंपादनाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें आचरण करणारा व राष्ट्रीय हितार्थ सत्तेचा उपयोग करण्याची मनीषा बाळगणारा पक्ष आहे असें तरी म्हणावें किंवा काँग्रेस म्हणजे उदारमतवादी, भूतदयाप्रेरित, विशिष्ट दृष्टिकोण नसलेली आणि ' सर्वेऽपि सुखिनः सन्तु ' हें ध्येयवाक्य मानणारी संस्था आहे असें तरी मान्य करावें. तिचें ध्येय व तिचें तत्त्वज्ञान ज्यांना सामान्यतः मान्य आहे त्यांचीच ती प्रतिनिधि बनणें शक्य आहे; ज्यांचा त्याला विरोध असेल त्यांना अराष्ट्रीय वा समाजविरोधी आणि प्रतिगामी लेखून स्वतःचे तत्त्वज्ञान प्रस्थापित व्हावें म्हणून त्यांच्या प्रतिष्ठेला पायबंद घालण्याकरितां अथवा त्यांचें उच्चाटन करण्याकरितां काँग्रेसला खटपट करावी लागेल. राष्ट्रीय साम्राज्यविरोधी चळवळीपासून सामाजिक विरोधांना चेतना मिळत नसल्याकारणानें तिच्यामार्फत विस्तृत अशा प्रमाणावर एकमत करणें शक्य होईल हें निश्चित. आणि म्हणून तर हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोकांचे हितसंबंध कमीअधिक प्रमाणांत काँग्रेसमध्यें प्रतिबिंबित होऊन फक्त साम्राज्यविरोधाच्या बाबतींत ऐकमत्य असलेले सगळे परस्परभिन्न गट काँग्रेसकडे आकर्षित झाले होते. तथापि साम्राज्यविरोधाच्या बाबतींत देखील भिन्न भिन्न गटांचा वेगवेगळ्या मुद्द्यावर भर असलेला दिसून येई. परंतु साम्राज्यविरोधाच्या मूलभूत प्रश्नांवरच ज्यांची मत-भिन्नता होती, ते मात्र काँग्रेसच्या बाहेर राहिले व कमीअधिक प्रमाणांत त्यांनीं सरकारशीं सहकार्य केलें. अशा प्रकारें एकमेकांत मिसळून गेलेल्या गटांच्या एका कायमच्या सार्वपक्षीय परिषदेचें स्वरूप काँग्रेसला प्राप्त झालेलें आहे व एका ध्येयावरील श्रद्धेमुळे आणि गांधीजींसारख्या पुरुषाच्या थोरवीमुळें हे सर्व गट सूत्रबद्ध होऊन राहिलेले आहेत.

वर्गकलहासंबंधींच्या आपल्या ठरावाचा खुलासा करण्याचा प्रयत्न वर्किंग कमिटीनें तदनंतर केला. त्या ठरावांतील शब्दांपेक्षां अथवा आशयापेक्षां काँग्रेसची जी वृत्ति त्यांत पुनः एकवार प्रदर्शित झालेली दिसली तिचें महत्त्व होतें. मध्यवर्ति कायदे-मंडळाच्या आगामी निवडणुकीच्या वेळीं धनिकांचीं मतें मिळविण्याची इच्छा मनांत बाळगणाऱ्या सनदशीर गटाच्या प्रेरणेनेंच तो ठराव करण्यांत आला हें उघड दिसत होतें. त्यांच्या आग्रहामुळें काँग्रेस अधिकाधिक नेमस्त होत चालली होती व नेमस्त आणि पुराणप्रिय गटांना आपल्याकडे वळवण्याची खटपट सुरू होती. जे पूर्वी काँग्रेसच्या विरुद्ध गेले व कायदेभंग चालू असतां सरकारला सामील झाले त्यांच्याविषयीं बोलतांना मोठे सौजन्याचे उद्गार निघूं लागले. हा समेटाचा आणि अन्तःकरणपालटाचा प्रयोग सुरू असतां काँग्रेसमधील भांडकुदळ आणि मर्मभेदक अशा जहाल गटाची मोठीच अडचण भासूं लागली आणि वर्किंग कमिटीच्या ठरावावरून

व कांहीं व्यक्तींच्या उद्‌गारांवरून असें दिसूं लागलें कीं, जहाल गटानें कितीहि ओरबाडलें तरी कार्यकारी मंडळ आपल्या नव्या धोरणापासून परावृत्त होणें शक्य नाहीं. जहाल गट समजूतदारपणानें वागला नाहीं तर बकोटीला धरून काँग्रेस-मधून त्यालाच बाहेर काढून लावण्यांत येईल. काँग्रेसच्या पार्लमेंटरी बोर्डानें जो जाहीरनामा काढला, त्यांतील कार्यक्रमाइतका बुजरा आणि नेभळा कार्यक्रम काँग्रेसनें गेल्या पंधरा वर्षांत कधींच मंजूर केला नसेल.

गांधीजींव्यतिरिक्त अनेक प्रसिद्ध अशीं माणसें काँग्रेस पुढाऱ्यांमध्यें होतीं. त्यांनीं राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत उत्तम प्रकारची कामगिरी बजावली असून त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि निर्भयपणाची तारीफ सर्व देशभर होत असे. परंतु या नव्या धोरणामुळें काँग्रेस-पुढाऱ्यांच्या दुसऱ्या वर्गांत, फार काय, पण पहिल्या वर्गांत देखील अशीं अनेक माणसें येऊन बसलीं कीं त्यांना ध्येयवादी म्हणण्याची पंचाईत पडावी. काँग्रेसमध्यें पुष्कळ ध्येयवादी लोक होते ही गोष्ट खरी. परंतु या धोरणामुळें स्वार्थसाधु व संधिसाधु लोकांना आपलें सोंवळेंभांडें आंत टाकण्यास अधिक सवड सांपडली. गांधीजींसारखी अगम्य गहन व्यक्ति वगळली, तर बाकीच्या काँग्रेसचें स्वरूप दुरंगी असावें असें वाटूं लागलें. राजकीय प्रश्नांच्या बाबतींत कंपूशाही स्वरूपाचा एक गट तयार होत चालला होता व दुसऱ्या गटाला धर्मवश आणि भावनावश होऊन टाळ कुटणाऱ्या भजनी मंडळाचें स्वरूप येत चाललें होतें.

कायदेभंग व त्यांतून निघालेल्या चळवळी यांना दडपून टाकण्याचें आपलें धोरण यशस्वी झालें म्हणून वाटणारा विजयानंद सरकार कोणताहि आडपडदा न ठेवतां व्यक्त करीत होतें. हिंदुस्थानला जडत चाललेला एक राजकीय रोगच जणूं काय सरकारनें कापून काढला होता. आणि त्या शस्त्रक्रियेमुळें रोगी जिवंत राहतो कीं मरतो याबद्दल इतक्यांतच फिकीर करण्याचें कारण नव्हतें. काँग्रेस कांहीं अंशीं वठणीवर आली असली तरी दडपशाहीचें तेच धोरण थोडा फेरफार करून पुढें चालू ठेवण्याचा सरकारचा निश्चय झाला होता. मूलभूत प्रश्न सुटला नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय धोरणांत झालेले असले चढउतार अस्थायी असतात. तेव्हां आपण आपली लगाम सैल सोडली तर राष्ट्रीय चळवळीची वाढ पुनरपि फार झपाट्यानें होईल ही गोष्ट सरकार ओळखून होतें. कदाचित् त्यांचा असाहि समज असवा कीं काँग्रेसमधील अथवा शेतकरी-कामकऱ्यांतील अधिक जहाल माणसांना दडपण्याचें कार्य असेंच पुढें चालू ठेविलें, तरी काँग्रेसमधील अधिक नेमस्त वृत्तीच्या पुढाऱ्यांचीं मनें फारशीं नाराज होणार नाहींत.

डेहराडून तुरुंगांतील माझ्या विचारांचें वळण हें अशा प्रकारचें होतें. बाहेरच्या प्रसंगांशीं साक्षात् संबंध नसल्यामुळें त्याबद्दल ठाम मतें बनवावींत अशी माझी परिस्थिति नव्हती. अलिपूर तुरुंगांत संबंध अजिबातच तुटला होता. डेहराडूनच्या तुरुंगांत सरकारमान्य अशा वर्तमानपत्रांतून पक्षपाती व कधीं कधीं एकतर्फी

बातमी तरी मला मिळत असे. माझ्या बाहेरच्या सहकाऱ्यांशीं माझा संबंध राहिला असता व परिस्थितीचा अधिक बारकाईनें अभ्यास करतां आला असता तर माझीं मतें कदाचित् जरा निराळीं झालीं असतीं.

वर्तमानकाळाविषयीं मन नाउमेद झाल्यामुळें माझ्या सार्वजनिक आयुष्याच्या प्रारंभापासून हिंदुस्थानांत झालेल्या राजकीय घडामोडींसंबंधीं मी विचार करूं लागलों. आम्हीं केलें तें कितपत योग्य होतें? कितीसें चूक होतें? मीं माझे विचार जर लिहून काढले तर ते अधिक सुसंगत व उपयुक्त होतील अशी कल्पना माझ्या डोक्यांत आली आणि मन एका निश्चित कार्यामध्यें गुंतून राहिलें म्हणजे त्याला विरंगुळा मिळेल असें वाटलें. म्हणून १९३४ च्या जूनमध्यें मीं हें 'आत्मचरित्रपर कथानक' लिहावयास घेतलें. लहर लागली कीं लेखणी उचलावी असें गेले आठ महिने चाललें आहे. पुष्कळदां अशा वेळा आल्या कीं लिहिण्याची वांच्छाच होऊं नये. तीनदां महिन्या-महिन्याचे खंड पडले. परंतु मीं काम तसेंच पुढें रेटलें आणि आतां ह्या वैयक्तिक प्रवासाच्या अखेरच्या मुक्कामाची वेळ जवळ येत चालली आहे. विषण्णतेच्या छाया मनांत दाटलेल्या असतांना व भावनांचीं वादळें मनांत उठलीं असतांना त्यांपैकीं बहुतेक लेखन झालेलें आहे. त्याचें प्रतिबिंब कदाचित् माझ्या लेखनांतहि उमटलेलें असेल. लेखनाचें साहाय्य होतें म्हणूनच वर्तमानकालांतील दगदगींतून माझी बऱ्याच अंशीं सुटका झाली. लिहीत असतांना वाचकांचा विचार माझ्या मनांत क्वचित्च येत असे. मी स्वतःशींच बोलत होतों. स्वतःच प्रश्न मांडीत होतों व स्वतःच्या समजुतीसाठीं त्यांचीं उत्तरेंहि पण मीच देत होतों. ह्या उद्योगापासून कधीं कधीं माझें मनोरंजनहि होई. आपणाला शास्त्रशुद्ध विचार करतां यावा अशी माझ्या मनाची आकांक्षा असल्याकारणानें हें गतेतिहासाचें समालोचन स्वतःला उपयुक्त होईल असें मला वाटलें.

जुलै महिन्याच्या अखेरीला कमलाची प्रकृति झपाट्यानें बिघडूं लागली आणि थोड्याच दिवसांत मोठा निर्वाणीचा प्रसंग उद्भवला. ११ ऑगस्ट रोजीं मला एकाएकीं डेहराडूनमधून काढून पोलिसांच्या पहाऱ्यांत अलाहाबादेला पाठविण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं अलाहाबादमधील प्रयाग स्टेशनवर आम्हीं पोंचलों, तेव्हां आजारी पत्नीची भेट घेण्यासाठीं तुम्हाला कांहीं काळ सोडण्यांत येत आहे असें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें कळवलें. मला अटक झाल्याला त्या दिवशीं बरोबर सहा महिने होऊन गेले होते.

६५

# अकरा दिवस

" जशि धार कट्यारी विदारिते निजकोश
तशि व्यथा मनींची विदारिते हृत्कोश "

—बायरन.

माझी सुटका तात्पुरतीच होती. एक, दोन अथवा डॉक्टरना अगदीं अवश्य वाटतील तेवढेच दिवस मला बाहेर ठेवण्यांत येईल असें सांगण्यांत आलें. सर्वच अनिश्चित अशी ती विचित्र परिस्थिति होती. कांहींहि काम स्वस्थ चित्तानें हातीं घ्यावें तर तें शक्य नव्हतें. ठराविक मुदत दिली असती म्हणजे मला त्या मानानें बस्तान बसवतां आलें असतें. आतांची परिस्थिति अशी होती कीं कोणत्याहि दिवशीं कोणत्याहि क्षणीं मला परत तुरुंगांत जावें लागणार होतें.

सुटका एकाएकीं झाली असल्यामुळें नवीन परिस्थितीशीं जमवून घेण्याची मीं कांहींच तयारी केली नव्हती. एकांतवासाच्या कोठडींतून पाऊल टाकलें तें सरळ डॉक्टर, परिचारिका व आप्तस्वकीय ह्यांनीं गजबजलेल्या घरांत. शांतिनिकेतनहून माझी मुलगी इंदिरा ही देखील घरीं आली होती. कमलाच्या प्रकृतीची चवकशी करण्यासाठीं व मला भेटण्यासाठीं स्नेहीसोबती एकसारखे येत असत. राहण्याची तऱ्हा तुरुंगांतल्यापेक्षां अगदीं निराळी होती, घरांतल्या सुखसोयी होत्या, चांगलें अन्न-पाणी होतें; पण या सर्व गोष्टींवर कमलाच्या जिवावरच्या दुखण्याबद्दल वाटणाऱ्या चिंतेचें पटल पसरलेलें असे.

कमला अगदीं निःशक्त आणि दुबळी होऊन पडली होती. पूर्वीच्या कमलेची ही जणूं कांहीं छायाच आपण पाहतों आहों असें वाटे. तिचें शरीर व्याधीबरोबर क्षीणपणानें झगडत होतें. ती कदाचित् मला सोडून जाईल असा असह्य विचार माझ्या मनाला एकसारखा भेडसावूं लागला. आमच्या विवाहाला अठरा-साडेअठरा वर्षें झालीं होतीं. आमचा विवाह झाला तो दिवस आणि त्यानंतरच्या काळांतील अनेक प्रसंग मला आठवले. विवाहाच्या वेळीं मी २६ वर्षांचा होतों व कमला अवघी १७ वर्षांची मुग्ध अशी बाला होती. आमच्या दोघांच्या वयांत बरेंच अंतर होतें, परंतु आमच्या दृष्टिकोणांतील अंतर त्यापेक्षांहि अधिक होतें. तिच्यापेक्षां माझी किती तरी अधिक मानसिक वाढ झालेली होती. परंतु जगाबद्दलच्या ज्ञानाचा टेंभा मी बाह्यात्कारी कितीहि मिरवीत असलों, तरी मी अद्यापि अजाणच होतों. त्या नाजुक,



आणि भावनामय मुलीचें मन एकाद्या सुकुमार फुलाप्रमाणें पाकळी-पाकळीनें उमलत आहे, फार स्नेहानें आणि दक्षतेनें त्याची निगा राखली पाहिजे हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. आम्हीं परस्परांकडे आकर्षित होत होतों आणि आमचा जीवन-क्रमहि व्यवस्थितपणें चालला होता; परंतु दोघांच्या मनाची पार्श्वभूमि असमान असल्यामुळें मनाची गुंफण बेमालुम होत नसे. त्यामुळें कधीं कधीं खटके उडत. बारीक सारीक गोष्टीवरून रुसणींफुगणींहि होत. परंतु हीं पोरसोदा भांडणें फार वेळ टिकत नसत. तेव्हांच समेट घडून येई. आमचे दोघांचेहि स्वभाव तिखट होते, दोघांचींहि अंतःकरणें हळवीं होतीं व आमच्या प्रतिष्ठेसंबंधींच्या कल्पनाहि बालिश होत्या. असें असून सुद्धां आमच्यांतील स्नेह गाढ होत चालला. आमच्यांतील मानसिक असमानता नष्ट होण्याला मात्र बराच अवधी लागला. विवाह झाल्यानंतर एकवीस महिन्यांनीं आमची एकुलती एक मुलगी इंदिरा हिचा जन्म झाला.

आमचा विवाह व्हावयाला आणि राजकारणाला नवी कलाटणी मिळावयाला एकच गांठ पडली. राजकारणामध्यें मी गर्क होऊन गेलों होतों. ते होमरूलचे दिवस होते. त्यानंतर लवकरच पंजाबमध्यें लष्करी कायदा जारी करण्यांत आला, नंतर असहकारितेची लाट उठली, आणि अशा रीतीनें सार्वजनिक कार्याच्या धुमश्चक्रींत मी अधिकाधिक गुरफटला गेलों. या चळवळीमध्यें मी इतका गुंगून गेलों होतों कीं ज्या काळांत कमलेला माझ्या पूर्ण सहकार्याची आवश्यकता होती, नेमकी त्याच वेळीं तसा हेतु नसताहि माझ्याकडून तिची उपेक्षा झाली. ती एकटीच मागें पडली. माझें तिच्यावरचें प्रेम कायम होतें; नव्हे, वाढत होतें. आपल्या सौजन्यानिशीं ती मला साहाय्य करण्यास सदैव तयार आहे ही कल्पना मनांत आली कीं मनाला किती तरी समाधान वाटत असे. तिच्यामुळें मला सामर्थ्य प्राप्त झालें. परंतु तिच्या मनाला मात्र यातना होत असाव्यात, आपली हेळसांड होत आहे असें तिला वाटलें असावें. असल्या मामुली उपचारापेक्षां, असल्या अर्धवट उपेक्षेपेक्षां उघड उघड अवहेलना तिला जास्त पसत पडली असती.

आणि नंतर तिच्या आजाराला व माझ्या दीर्घकालीन शिक्षांना सुरुवात झाली. त्या मुदतींत फक्त तुरुगातच काय ती आमची भेट व्हावयाची. कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यावर आघाडीच्या सैनिकांच्या बरोबरीनें ती लढली आणि शिक्षा झाली तेव्हां तिला समाधान वाटलें. त्यामुळें आमचे प्रेमसंबंध अधिकच दृढ झाले. कधीं काळीं होणारी आमची भेट आम्हांला अमोलिक वाटूं लागली. भेटीची आम्हीं किती किती उत्सुकतेनें वाट पाहत असूं. मध्यंतरींचे दिवस आम्ही मोजीत बसत होतों. एकमेकांचा आम्हांला कधीं कंटाळा आला नाहीं कीं सहवास कधीं शिळा वाटला नाहीं. कारण आमच्या अल्पकालीन भेटींतील नवनवोन्मेषी आनंद कधीं नष्ट होईल तर ना ? परस्परांचे नित्य नवे पैलू आम्हाला दिसत होते. एखादा नवा पैलू आपल्या पसंतीला

येऊं नये असेंहि कधीं काळीं घडे. आमच्या वाढत्या वयांतील मतभेदांत देखील एक प्रकारचा मनोरम अल्लडपणा प्रतीत होई.

विवाहाला अठरा वर्षें झाल्यानंतर सुद्धां कमलाचें तारुण्य आणि सुकुमारपणा कायम होता. जरेची दृष्ट तिला कधीं लागलीच नाहीं. अठरा वर्षांपूर्वी आमच्या घरांत पाऊल ठेवलेली कमला ती हीच असें वाटावें. पण माझ्यांत मात्र कल्पनातीत फरक पडला. वयाच्या मानानें पाहतां माझें शरीर निकोप आणि चपळ राहिलें असलें आणि माझ्या ठिकाणीं लोक म्हणत त्याप्रमाणें थोडीफार पोरसौदा वृत्तीहि कायम असली तरी माझ्या मुद्रेवर काळाची निशाणी उमटलेली दिसत होती. मला थोडेंसें टक्कल पडलें होतें, केंसांवर रुपेरी छटा दिसूं लागली होती, चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या आणि डोळ्यांभोंवतीं कृष्णवलयांची छाया पसरली होती. गेल्या चार वर्षांतील दगदगीचा व चिंतेचा परिणाम माझ्या शरीरावर चांगलाच झाला होता. अलीकडच्या काळांत अनोळखी ठिकाणीं आम्हीं दोघें गेलों म्हणजे पुष्कळ वेळां लोक तिला माझी मुलगीच असें समजत, आणि माझा गोंधळ उडत असे. इंदिरा आणि ती पाठच्या बहिणींप्रमाणें दिसत असत.

वैवाहिक जीवनाचीं अठरा वर्षें ! पण त्यांतील किती तरी वर्षें मी तुरुंगांत काढलीं, आणि किती तरी वर्षें कमलानें रुग्णालयांत काढलीं ! याहि खेपेला मी तुरुंगांत खितपत पडलो होतों, आणि कमला अंथरुणावर खिळून होती. एक दोन दिवसच काय ती मला मोकळीक मिळणार. प्रकृतीची ती योग्य काळजी घेत नाहीं म्हणून मला तिचा थोडासा रागहि आला. परंतु तिला तरी कसा दोष द्यावा ? शरीराचा दुबळेपणा आणि निष्क्रियता यांच्यामुळें स्वातंत्र्याच्या लढ्यांत आपणाला योग्य तो भाग घेतां येत नाहीं म्हणून तिच्या कर्तव्यपरायण मनाची तडफड चालली होती. परंतु शरीर कमकुवत झाल्यामुळें तिला धड कामहि करतां येईना, धड औषधोपचाराकडेहि मन वळेना. अशा अवस्थेंत अंतरंगांतील आकांक्षांच्या धगीनें तिचें शरीर कोळून जाऊं लागलें.

तिच्या साहाय्याची मी अपेक्षा करीत असतांना मला एकट्याला सोडून तिला जाववेल तरी कसें ? परस्परांच्या अंतःकरणाची साक्ष आतां कोठें आम्हांला पटूं लागली होती आणि आमच्या खऱ्या सहजीवनाला नुकती कुठें सुरुवात होत होती. आम्ही एकमेकांवर पूर्णपणें विसंबून राहिलों होतों, बरोबरीनें किती तरी काम करण्याची उमेद आम्हीं मनांत बाळगली होती.

अशा तऱ्हेचें विचारचक्र माझ्या मनांत भ्रमत होतें. आणि तासामागून तास, दिवसामागून दिवस जात असतां मी तिच्या उशाशीं बसून राहिलों होतों.

माझे सहकारी आणि मित्र मला भेटावयास येत. मला माहित नसलेल्या अनेक गोष्टी मला त्यांच्या तोंडून कळल्या. चालू राजकीय प्रश्नावर त्यांनीं वाटाघाट केली आणि मला शंका विचारल्या. त्यांचीं उत्तरें देणें

बरेंच कठिण होतें. कमलाच्या दुखण्याचा विचार मनांतून जात नसे. शिवाय तुरुंगांत इतके दिवस एकांतवासांत घालवल्यानंतर दैनंदिन प्रश्नांची घडाघड उत्तरें देणेंहि शक्य नव्हतें. तुरुंगांत मिळणाऱ्या तुटपुंज्या माहितीच्या आधारावर परिस्थितीविषयीं नक्की मत बनवणें शक्य होत नाहीं हें मी इतक्या दिवसांच्या अनुभवानें शिकलों होतों. योग्य ती विचारप्रक्रिया घडून येण्यासाठीं साक्षात संबंध असले पाहिजेत, एरवीं आपलीं मतें वस्तुस्थितीशीं विसंगत व निवळ शास्त्रीय स्वरूपाचीं अशीं बनतात. सर्व प्रश्नांचा ऊहापोह वर्किंग कमिटीच्या सभासदांशीं व गांधीजींच्या बरोबर न करतांच कॉंग्रेसच्या धोरणासंबंधीं कोणतेहि ठाम मत देणें अन्यायाचें झालें असतें. झालेल्या अनेक गोष्टींवरील टीका माझ्या मनांत सळसळत होती पण कोणतीहि विधायक सूचना करण्याइतकी मात्र माझी तयारी झालेली नव्हती. तुरुंगांतून ह्या सुमाराला बाहेर यावें लागेल अशी कल्पनाच नसल्यामुळें मीं त्या दृष्टीनें विचारच केलेला नव्हता.

पत्नीची भेट घेतां यावी म्हणून मला मुक्त करण्यांत सरकारनें जें औदार्य दाखविलें होतें तें लक्षांत घेतां मला मिळालेल्या संधीचा मी राजकारणासाठीं विनियोग करावा हें मुद्दां मला योग्य वाटेना. मीं अशा प्रकारचा कोणताहि निर्बंध स्वतःवर घालून घेतला नव्हता, अथवा सरकारला आश्वासनहि दिलें नव्हतें. परंतु सरकारच्या चांगुलपणामुळेंच मी बाहेर राहिलों आहें ही कल्पना मनांत सतत जागृत असल्यामुळें राजकारणापासून माझें मन माघारें वळत असे.

खोट्या वदतांचा इन्कार करण्यासाठीं मीं काय जाहीर पत्रकें काढलीं असतील तेवढींच. इतर जाहीर पत्रकें प्रसिद्ध करण्याचें मीं टाळलें. खाजगी चर्चेंत देखील कोणत्याहि निश्चित धोरणाचा पुरस्कार करण्याची सावधगिरी मीं बाळगली होती. गत गोष्टींवर मात्र मी खुल्या दिलानें टीका करीत असें. कॉंग्रेस-समाजवादी पक्ष नुकताच अस्तित्वांत आला होता व माझें कांहीं जिवलग मित्र त्या पक्षाशीं संबंध झाले होते. मला जी हकीगत समजली तेवढ्यावरून मला त्या पक्षाचें धोरण पसंत वाटलें. पण त्या पक्षांतील सभासदांचा जमाव संमिश्र आणि विलक्षण स्वरूपाचा भासला. मी मोकळा असतों तरीहि मी त्या पक्षाला एकदम जाऊन मिळालों नसतों. स्थानिक राजकारणांतहि माझा बराचसा वेळ गेला. स्थानिक कॉंग्रेस समित्यांच्या निवडणुकीसाठीं इतर ठिकाणच्याप्रमाणेंच अलाहाबादेंतहि जोराची मोहीम सुरू होती. जे झगडे चालले होते त्यांना तात्त्विक असें मुळींच महत्त्व नव्हतें; त्यांत केवळ व्यक्तींचा प्रश्न होता. कांहीं व्यक्तिविषयक झगडे मिटवण्यासाठीं मला पाचारणहि करण्यांत आलें.

या भानगडींत शिरण्याची माझी इच्छा नव्हती आणि मला फुरसदहि नव्हती. तथापि कांहीं गोष्टी माझ्या कानावर आल्याच, आणि त्या ऐकून मला थोडें वाईट वाटलें. स्थानिक कॉंग्रेस निवडणुकींच्या बाबतींत लोकांनीं इतक्या वर्दळीवर यावें

ह्याचें मला आश्चर्य वाटलें. लढा चालू असतां खाजगी अडचणींची सबब सांगून ज्यांनीं काढता पाय घेतला होता तेच या बाचाबाचींत प्रामुख्यानें चमकतांना दिसले. कायदेभंग संपल्याबरोबर ते बिळांतून बाहेर पडले आणि त्यांनीं परस्परांविरुद्ध कडाक्याचा व कधीं कधीं असभ्य अशा मतप्रचाराचा धडाका सुरू केला. दुसऱ्या पक्षाची नाचक्की करण्याच्या आवेशांत शिष्टाचाराचे साधेसुधे नियमहि कचऱ्याच्या टोपलींत गेले ! स्थानिक निवडणुकीच्या प्रसंगीं कमलाच्या नांवाचा व तिच्या आजाराचा देखील दुरुपयोग लोकांनीं करावा याचें दुःख मला विशेषेंकरून झालें.

ज्या व्यापक प्रश्नांची भवति न भवति झाली त्यांपैकीं एक असा होता कीं काँग्रेसनें मध्यवर्ति कायदेमंडळाच्या आगामी निवडणुकी लढवाव्या कीं नाहीं ? निवडणुकी लढवणें म्हणजे सनदशीर व नेमस्त राजकारणाकडे वळण्याप्रमाणें आहे असें तरुणांचें मत असल्यामुळे त्यांनीं या धोरणाला विरोध दर्शविला. पण दुसरा परिणामकारक मार्ग त्यांना सुचवतां येईना. उच्च तत्त्वांच्या भूमिकेवरून निवडणुकींना विरोध करणारांचा दुसऱ्या एखाद्या कॉंग्रेसेतर पक्षानें निवडणुकी लढवल्या तर त्याला मात्र आक्षेप नव्हता. म्हणजे सर्व क्षेत्र जातीय संस्थांना मोकळें सोडावें असा त्यांचा इरादा होता कीं काय अशी शंका उद्‌भवत असे.

स्थानिक बाचाबाची आणि भराभर पसरत चाललेलें नवें राजकारण यांमुळें माझा जीव अगदीं उबून गेला. मला आपला सूर त्यांत मिळवतां येईना. आमच्या अलाहाबाद शहरांतच मला परक्याप्रमाणें वाटूं लागलें. अशा गोष्टींत मन घालण्याचा प्रसंग स्वतःवर आला म्हणजे माझ्यासारख्याला कसें वागावें लागेल ह्या विवंचनेंत मी पडलों होतों.

कमलाच्या प्रकृतीची हकीगत मीं गांधीजींना पत्रद्वारें कळवली व मी लवकर पुन्हां तुरुंगाकडे परतणार, मग मोका सांपडणें कठीण म्हणून माझीं मतेंहि मीं त्यांना थोडक्यांत निवेदन केलीं. अलीकडचे कांहीं प्रसंग माझ्या जिव्हारी लागून माझें मन खिन्न झालें होतें. माझी मनःस्थिति पत्रांत सुद्धां थोड्याशा प्रमाणांत उतरली असावी. असें करावें, तसें करूं नये असल्या प्रकारच्या सूचना करण्याच्या फंदांत मी पडलों नव्हतों. प्रसगविशेषीं मला काय वाटलें तेवढेंच मीं विशद केलें होतें. भावना दडपून टाकण्याचा प्रयत्न मात्र मीं त्या पत्रामध्यें मुळींच केला नव्हता असें म्हटलें तरी चालेल. तें पत्र वाचून गांधीजींना फार दुःख झालें असें मला मागाहून समजलें.

दिवसामागून दिवस जात होते. सरकारकडून बोलावणें येईल, निदान कांहीं तरी खबर मिळेल म्हणून मी वाट पाहत राहिलों होतों. उद्यां अथवा परवां नव्या सूचना देण्यांत येतील असें मला वरचेवर कळवण्यांत येई. दरम्यान डॉक्टरांनीं कमलाच्या प्रकृतीचें मान दररोज सरकारला कळवीत जावें असें सांगण्यांत आलें. मी आल्यापासून कमलाच्या प्रकृतींत थोडीशी सुधारणा दिसून येत होती.

सर्वसामान्य लोकांची व सरकारच्या विश्वासांतील समजल्या जाणाऱ्या

लोकांची देखील समजूत अशी कीं मला एरवीं सोडलेंच असतें, पण दोन महत्त्वाच्या गोष्टी पुढें दिसत असल्यामुळें तें शक्य झालें नाहीं. ऑक्टोबरमध्यें मुंबई येथें काँग्रेसचें अधिवेशन भरावयाचें होतें व नोव्हेंबरांत मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकी व्हावयाच्या होत्या. मी तुरुंगाबाहेर राहिलों तर उपरोक्त प्रसंगीं मी कांहीं तरी गडबड उडवीन, तेव्हां आणखी तीन एक महिने मला तुरुंगांत ठेवून मग सोडण्यांत येईल अशी कल्पना होती. तुरुंगांत परत पाठवणार नाहींत असाहि संभव होता व दिवसगतीप्रमाणें तोच अधिक खरा वाटूं लागला आणि नित्य व्यवसाय निर्वेधपणें सुरू करावयाचे असें मीं ठरवलें.

माझी सुटका होऊन अकरा दिवस झाले होते. २३ ऑगस्ट रोजीं पोलिसची मोटर दाराशीं आली व तुमची मुदत संपली असल्याकारणानें तुम्ही मजबरोबर नैनी-तुरुंगाकडे चलावें असें पोलिस अधिकाऱ्यानें मला सांगितलें. मंडळींचा मीं निरोप घेतला. आतां मोटरींत बसणार इतक्यांत आई आजारी असतांहि धांवत माझ्यापाशीं आली व तिनें मला घट्ट पोटाशीं धरलें. त्यावेळचा तिचा तो चेहरा किती तरी वेळ माझ्या डोळ्यांपुढून हालला नाहीं.

## ६६

# पुन्हां तुरुंगांत

छाया निरङ्कुशगतिः स्वयमातपस्तु छायान्वितः शतश एव निजप्रसङ्गम् ।
दुखं सुखेन पृथगेवमनन्तदुःखपीडानुवेधविधुरा तु सुखस्यवृत्तिः ॥

—राजतरंगिणी, ८-१९१३.

मी पुन्हा नैनी-तुरुंगांत येऊन दाखल झालों आणि वाटलें कीं जणूं कांहीं नव्या शिक्षेलाच सुरुवात होते आहे. आंतून बाहेर, बाहेरून आंत, टेनिसच्या चेंडूप्रमाणें माझी अवस्था झाली होती. ह्या फेकाफेकीमुळें माझें सर्व मन हादरून गेलें. हे सारखे होणारे फेरबदल अंगवळणीं पाडणें सोपें नव्हतें. नैनी येथें मला पूर्वी ठेवलें होतें त्याच खोलींत ठेवतील अशी माझी अपेक्षा होती. त्या जागेचा बऱ्याच दिवसांच्या वास्तव्यामुळें मला परिचय झाला होता. रणजित पंडित यांनीं लावलेलीं कांहीं फुलझाडें तेथें होतीं आणि कोठडीला लागून एक व्हरांडाहि होता. पण ह्या सहा नंबरच्या बराकींत चौकशीवांचून ठेवलेले एक स्थानबद्ध गृहस्थ होते. त्यांचा व माझा सहवास घडावा हें सरकारला अनिष्ट वाटत असल्यामुळें मला दुसरीकडे ठेवण्यांत आलें. ती जागा अधिक कोंदट होती. फुलाची पाकळी कीं हिरवा देठ यांपैकीं तेथें कांहींहि नजरेस पडलें असेल तर शपथ.

पण अहोरात्र मी जेथें वास्तव्य करीत होतों त्या जागेची मला खरोखरी मातब्बरीच वाटली नाहीं; कारण माझें चित्त होतें दुसरीकडे. कमलाची प्रकृति थोडीफार सुधारली होती, ती माझ्या फेरअटकेची बातमी ऐकल्यानंतर पुन्हा पूर्वपदावर येणार अशी धास्ती माझ्या मनाला लागून राहिली होती. आणि वाटलें तसेंच झालें. डॉक्टरचा रोजचा अहवाल मला तुरुंगांत कळावा अशी व्यवस्था कांहीं दिवस ठेवण्यांत आली होती. पण बातमी तुरुंगांत पोंचेपर्यंत तिला त्रिस्थळी यात्रा करावी लागत असे. डॉक्टरनें ती पोलिसखात्याकडे कळवावयाची व तेथून ती तुरुंगावरील अधिकाऱ्याकडे यावयाची. डॉक्टरनें परस्पर तुरुंगांत बातमी कळवणें इष्ट समजलें जात नसे. दोन आठवडे बातमी कशीबशी मिळत गेली आणि नंतर कमलाची प्रकृति उत्तरोत्तर अधिकच बिघडत जात असतांहि बातमी मुळींच कळवण्यांत येईना.

कानावर पडणारी अनिष्ट बातमी आणि तिच्यासाठीं करावी लागणारी मार्गप्रतीक्षा यांच्यामुळें दिवस संपतां संपत नसे. आणि दिवसापेक्षांहि रात्री कंटाळवाण्या होत. कालाचा प्रवाह जणूं कांहीं थिजून गेला होता; आणि कालाचा ओघ

यदाकदाचित् वाहत असलाच तरी तो मोठ्या माराकुटीनें वाहत असला पाहिजे. एकेक तास म्हणजे मानगुटीवर ठेवलेल्या ओझ्यासारखा, फार भयंकर वाटत असे. वेळ इतका कंटाळवाणा झालेला मला कधींच आठवत नाहीं. मुंबईचें कॉंग्रेस-अधिवेशन झाल्यावर म्हणजे सुमारें दोन महिन्यांनीं माझी सुटका होईल अशी माझी कल्पना होती. पण ते दोन महिनेच मला युगाप्रमाणें भासत होते.

तुरुंगांत पुन्हा पाऊल ठेवल्यानंतर बरोबर एका महिन्यानें एका पोलिस ऑफिसरनें मला जरा वेळ पत्नीच्या भेटीसाठीं नेलें व आठवड्यांतून दोनदां भेटीची परवानगी देण्यांत येईल असें मला सांगण्यांत आलें. वेळहि नक्की ठरली व चौथ्या दिवशीं मी वाट पाहत बसलों. पण मला न्यावयाला कोणीच आलें नाहीं. पांचवा, सहावा, सातवा दिवसहि सुनाच गेला आणि वाट पाहतां पाहतां मी अगदीं कंटाळून गेलों. तिची प्रकृति पुन्हां चिंताजनक झाल्याचें वृत्त मला समजलें. आणि मला वाटलें, आठवड्यांतून दोनदां भेटीसाठीं नेण्यांत येईल असें मला सांगावें ही काय राक्षसी थट्टा !

होतां होतां सप्टेंबर महिना संपला. हे सप्टेंबरचे तीस दिवस म्हणजे माझ्या अनुभवांतले वाईटांतले वाईट दिवस होत. अनेक मध्यस्थांमार्फत मला सूचना करण्यांत आल्या कीं शिक्षेच्या उरलेल्या दिवसांत राजकारणापासून अलिप्त राहीन असें नुसतें शब्दानें मीं कळवलें तरी कमलेच्या शुश्रूषेसाठीं माझी सुटका करण्यांत येईल. त्या वेळीं माझ्या डोक्यांत राजकारणाच्या विचारांना फारच थोडा अवकाश होता. आणि अकरा दिवसांत बाहेर चाललेल्या राजकारणाचा चिखल पाहून तर मला त्याची शिसारीच बसली होती. पण हमी द्यावयाची आणि माझ्या प्रतिज्ञेशीं, सहकाऱ्यांशीं व खुद्द स्वतःशींच बेइमान व्हावयाचें ! कांहींहि झालें तरी ती अट मान्य करणें अशक्य होतें. ही अट कबूल केली असती तर मीं ज्या गोष्टी पवित्र मानल्या त्यांच्या, आणि माझ्या तात्त्विक जीवनाच्या मुळावरच कुऱ्हाड घातल्याप्रमाणें झालें असतें. कमलाची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे, मी तिच्याजवळ राहिलों तर कदाचित् मृत्यूच्या पाशांतून ती सुटेल असेंहि मला सांगण्यांत आलें. तिच्या जीवनापेक्षांहि माझ्या अहंकाराची आणि प्रतिष्ठेची मातब्बरी मला अधिक वाटावी काय ? असा प्रश्न कोणी विचारता तर माझ्या मनाला दुःसह पेंच पडला असता. पण तसा प्रश्न उपस्थित झाला नाहीं. मीं अट मान्य केली तर खुद्द कमलेलाच तें पसंत पडणार नाहीं हें मला ठाऊक होतें. मीं अट वगैरे मान्य केली असती तर मात्र तिच्या मनाला धक्का बसला असता.

ऑक्टोबरच्या सुरुवातीला मला पुन्हां भेटण्यासाठीं नेण्यांत आलें. तापानें फणफणून ती सुंद होऊन पडली होती. मी तिच्याजवळ बसून राहावें अशाकरितां तिचें मन तळमळत होतें, पण मी जावयास निघालों तेव्हां मोठ्या धैर्यानें स्मित करून तिनें मला जरा वांकण्यासाठीं खुणावलें. मी वांकल्यावर ती हळूच म्हणाली,

" सरकारला आश्वासन देण्याविषयीं बोलणीं चालतात तीं खरी का? तसें कांहीं एक करूं नका! "

अकरा दिवसांची सवड मला मिळाली; तेवढ्या अवधींत आम्हीं असें ठरवलें होतें कीं कमलेला जरा हुषारी वाटूं लागतांच दुसऱ्या चांगल्या स्थळीं हालवायचें. तिला केव्हां बरें वाटेल म्हणून आम्ही वाट पाहत बसलों होतों. पण बरें वाटण्याचें बाजूला राहून तिची प्रकृति खालावतच चालली. सहा आठवड्यांनंतर तर ती फारच क्षीण झाली. इतःपर फक्त वाट पाहत न बसतां आहे अशा क्षीण अवस्थेंत देखील तिला हिमालयांत भोवाली येथें न्यावें असें ठरलें.

भोवालीला ती उद्यां जाणार म्हटल्यावर आज मला तिच्या भेटीसाठीं नेण्यांत आलें. निरोप देतांना मला वाटलें, कमला पुन्हां केव्हां बरें दृष्टीस पडेल? दृष्टीस पडेल तरी का? कीं ही शेवटचीच भेट? पण त्या दिवशीं तिची चित्तवृत्ति प्रसन्न होती हें पाहून बरेच दिवसांत झाला नव्हता इतका आनंद मला झाला.

पाऊण महिन्यानंतर नैनीहून मला आलमोऱ्याच्या जिल्हातुरुंगांत नेण्यांत आलें. भोवाली वाटेवरच होती. तेथें आम्ही कांहीं तास थांबलों. कमलेची प्रकृति बरीच सुधारलेली दिसली व त्यामुळें मलाहि फार आनंद आला. तिचा निरोप घेऊन मी आलमोऱ्यास जाण्याकरतां निघालों तेव्हां माझें मन आनंदानें हलकें फूल झालें होतें. वास्तविक कमलेची भेट होण्यापूर्वींच पर्वतांच्या पंक्ती पाहून माझें मन उमललें होतें.

पर्वतराजींचें सान्निध्य पुन्हां लाभलें म्हणून मी आनंदांत होतों. आणि त्या वळणावळणाच्या रस्त्यावरून जेव्हां आमची मोटर भरधांव निघाली तेव्हां थंड गार प्रभातवायु आणि दृष्टीसमोर उलगडून चाललेली निसर्गशोभा यांच्यामुळें मन डोलूं लागलें. आम्ही वरवर चाललों होतों तर दऱ्या खोलखोल बुडत होत्या. गिरिशिखरें मेघांच्या गर्दींत लुप्त होत होतीं, तर वनस्पतींच्या निरनिराळ्या जाती दृष्टीस पडतां पडतां शेवटीं भूर्जाचीं आणि देवदारूचीं अरण्यें दिसूं लागलीं. वळण घेतलें कीं दऱ्या, टेकड्या व खालच्या घळींत फेसाळणारा झरा यांचें नित्य नवें चित्र नजरेपुढें उभें राही. त्या शोभेकडे कितीहि वेळ पाहत राहिलों तरी 'डोळ्यांचें पारणें फिटेना. एकाद्या अधाशासारखा मी बघत बसलों होतों, आणि आपल्या स्मृतिमंजुषेंत तें सौंदर्य सांठवीत होतों; हेतु हा कीं दृष्टीसमोरून तें नष्ट झालें कीं मनांतल्या मनांत तें चित्र पुन्हां निर्माण करतां यावें.

टेकड्यांच्या उतरणीवर झोपड्यांचीं जणूं कांहीं मोहोळें लागलीं होतीं आणि त्यांच्या सभोंवार जिवापाड श्रम करून, मिळालेल्या जागेवर ताली बांधून तयार केलेले कुणगे दिसत होते. लांबून तीं शेतें गच्च्यांप्रमाणें दिसत, किंवा असें वाटे कीं तळवटीपासून डोंगरमाथ्यापर्यंत गेलेल्या ह्या अवाढव्य पायऱ्याच आहेत. तुटपुंज्या

लोकवस्तीला निसर्गानें पांच पन्नास खंडी अन्न द्यावें म्हणून किती अचाट श्रम येथें खर्ची पडले असतील! कसेंबसें पोट भागावें म्हणून लोक कसे मुंग्यांप्रमाणें खपत होते. नांगरलेल्या तालींमुळें त्या टेकड्या माणसाळल्यासारख्या दिसत होत्या. उजाड अथवा जंगलमय डोंगरापेक्षां त्या किती तरी निराळ्या भासत.

दिवसा हें दृश्य फार रमणीय दिसे. सूर्य वर येत चालला कीं त्या डोंगरांत जणूं कांहीं चैतन्य भरे, आणि त्यांच्या ठिकाणचा परकेपणा जाऊन ते अधिकाधिक स्नेहमय व सौम्यदर्शन होत. पण दिवस बुडाला म्हणजे मात्र त्यांचें स्वरूप पार पालटून जाई! तिमिरपटलाची बुंथी जगतावर पसरली, स्वसंरक्षणासाठीं जीवनसृष्टि निवाऱ्याच्या जागीं जाऊन दडली आणि क्रूर श्वापदांचा संचार सुरू झाला कीं तेच पर्वत स्नेहशून्य आणि भयाण दिसूं लागत. चंद्राच्या अथवा तारकांच्या मंद प्रकाशांत ह्या पर्वतांचें दृश्य गूढ, भयानक, आणि सामर्थ्योग्र असें दिसावयाचें. तथापि असें वाटे कीं पिशाच योनीप्रमाणेंच ते अशरीरी असावेत. खोऱ्यांतून वाहणाऱ्या वाऱ्याचें कण्हणें ऐकूं येई. रात्रीच्या प्रहरीं असलें रौद्र आणि निःस्नेह स्वरूप पाहिलें कीं एकाकी प्रवाशाच्या अंगावर भीतीनें कांटाच उभा राहतो, आणि वारासुद्धां आपणाला वेडावीत दरडावीत आहे असें वाटूं लागतें. कधीं कधीं वाऱ्याचा किंवा दुसरा कसलाहि आवाज जरासुद्धां होत नाहीं, आणि त्यामुळें अशी सांद्र निःशब्दता पसरते कीं जीव दडपूनच जावा. तारायंत्राच्या तारा काय गुणगुणत असतील, तेवढ्याच. तारे अधिक तेजस्वी आणि अधिक निकट आल्याप्रमाणें दिसतात, पर्वतराज आपल्याकडे कठोर नजरेनें पाहत असतात आणि एकाद्या प्रचंड गूढाच्या जबड्याशीं आपण उभे आहोंत असें वाटून अंगाचा थरकांप होतो. खालच्या मैदानावर रात्र इतकी कधींच शांत नसते. तेथें गुराढोरांच्या हंबरण्यानें आणि रातकिड्यांच्या किरकिरीनें रात्रीं देखील शांततेचा भंग होत असतो.

पण आम्हीं आलमोऱ्याला चाललों होतों तेव्हां रात्र व्हावयाला फार अवकाश होता. मुक्कामाला पोंचण्याच्या सुमारास आम्हीं एक वळण घेतलें. इतक्यांत ढग फांकले जाऊन जें एक नवेंच दृश्य मला दिसलें, त्यासरशीं आश्चर्य व आनंद यांनीं मी थक्क होऊन गेलों. घनदाट अरण्यानें आच्छादलेल्या पर्वतांच्या पलीकडे, लांब अंतरावर हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें लखलखत होतीं. मला वाटलें कीं युगानुयुगांच्या ज्ञानानें गंभीर आणि अगम्य अशीं भासणारीं तीं गिरिशृंगें खालच्या मुलखावर पहारा करण्यासाठींच जणूं कांहीं उभीं राहिलीं आहेत. त्यांच्या दर्शना-बरोबर माझा मनस्ताप निवाला आणि खालच्या प्रदेशांत आणि शहरांत चाललेले क्षुद्र कलह आणि कारस्थानें, अभिलाषा आणि असत्यें हीं ह्या नगाधिराजाच्या गौरवाच्या मानानें निःसार आणि नगण्य आहेत असा विचार मनांत आला.

आलमोऱ्याचा छोटेखानी तुरुंग एका डोंगराच्या कंगोऱ्यावर बसलेला होता. मला राहण्यासाठीं एक भली प्रशस्त बराक देण्यांत आली. ती बराक म्हणजे एकावन्न

फूट लांब व सतरा फूट रुंद असा एक प्रचंड गाळाच होता. जमीन उकीरपाकीर आणि छप्पर वाळवीनें किडलेलें होतें. वरून एकसारखा चुन्हा पडत असे. बराकीला पंधरा खिडक्या आणि एक दरवाजा होता. खरें म्हणजे खिडक्या व दारें असें त्यांना म्हणतांच यावयाचें नाहीं; गज घातलेलीं तीं सोळा भगदाडें होतीं असें म्हटलें पाहिजे. तेव्हां ताज्या हवेची तर तेथें वाणच नव्हती. थंडी पडूं लागल्यावर कांहीं भगदाडें तरटें लावून बंद करावीं लागलीं. त्या प्रचंड दालनांत एकाद्या एकछत्री राजाप्रमाणें मी राहत होतों. पण मी अगदींच एकटा होतों असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कारण त्या चव्रमोळी छपरांत कमींत कमी चाळीस पन्नास चिमण्यांनीं तरी कोठें केलेले होते. कधीं कधीं एकादा प्रवासी मेघ मला भेटावयास आला कीं खिडक्यांवाटे त्याचे अनेक बाहू आंत घुसत आणि मग ती सर्व खोली ओलसर धुक्यानें भरून जाई.

दुपारीं साडेचार वाजतां माझें जेवण झालें कीं पांचच्या सुमारास मला बराकींत बंद करण्यांत येत असे, आणि सकाळीं सात वाजतां दरवाजा खोलला जाई. दिवसा मी बराकींत अथवा शेजारच्या अंगणांत उन्ह खात बसावयाचा. भोंवतालच्या तटावरुन एक दोन मैल अंतरावरच्या डोंगराचें शिखर दिसत असे; डोक्यावर ढगांच्या बुट्ट्यांचा निळ्या नभाचा विस्तीर्ण चांदवा ताणलेला दृष्टीस पडे. हे ढग विलक्षण रूपें धारण करीत आणि त्यांच्याकडे पाहत बसण्याचा मला कधींहि कंटाळा येत नसे. हरतऱ्हेच्या श्वापदांचें स्वरूप ढगांना प्राप्त होत आहे अशी माझ्या मनांत कल्पना येई आणि कधीं कधीं सारेजण एकत्र गोळा झाले कीं ढगांचा अफाट समुद्रच पसरला आहे असें वाटे. अथवा ते पुळणीप्रमाणें दिसत आणि देवदाराच्या झाडांतून वारा घोंघावूं लागला कीं दूर अंतरावरच्या वेळेवर भरतीच्या थापेचा आवाज व्हावा त्याप्रमाणें भास होई. कधीं कधीं एकादा मेघ आमच्यावर मोहरा करून येई. येतांना तो चांगला भरदार आणि आटींव दिसावयाचा; पण जवळ आला कीं पिंजलेल्या कापसासारखा फुलून त्याचें धुकें होई आणि सरतेशेवटीं मी त्यांत लुप्त होऊन जात असें.

बिळासारख्या अरुंद खोलीपेक्षां हा प्रशस्त गाळाच मला अधिक पसंत होता. लहानशा खोलीहून अशा ठिकाणीं एकटेपणा जरा अधिक जाणवतो हें खरें; पण बाहेर पाऊस पडला असला तरी मला त्या बराकींत हिंडतां फिरतां येई. हिंवाळा सुरू झाल्यावर मात्र त्या जागेचा रुक्षपणा विशेष प्रकारें लक्षांत येऊं लागला. आणि शून्यांशाच्या आसपास उष्णतामान येऊन पोंचल्यावर मोकळ्या हवेविषयीं वाटणारें प्रेमहि जरासें ओसरलें. वर्षारंभीं बरेंचसें बर्फ पडलेलें पाहून मला फार आनंद वाटला. तुरुंगांतील भकास वातावरणदेखील बर्फामुळें धवलरम्य दिसूं लागलें. तुरुंगाच्या तटापलीकडे पांढरेंफेक हिमवस्त्र पांघरून उभ्या राहिलेल्या देवदारूंची शोभा तर काय वर्णावी !

कमलेच्या प्रकृतींत सारखे चढउतार चालले होते. त्यामुळें मन अस्वस्थ होत असे. अनिष्ट बातमी समजली कीं थोडा वेळ जीव खालवर होई. पण डोंगरी वाऱ्याचा हात अंगावरून फिरला म्हणजे मनांतील काहूर निवत असे, आणि चित्ताचें सांत्वन होई. तेथील हवेमुळें मला फिरून पूर्वीप्रमाणें गाढ झोंप लागूं लागली. झोंप पापण्यांवर घुटमळूं लागली कीं मला वाटे कीं झोंप म्हणजे किती अजब आणि किती गूढ चीज आहे. झोंपेंतून मनुष्य जागा होतोच कशाला? समजा कीं मी कधींच जागा झालों नाहीं तर?

पण तुरुंगांतून सुटण्याची मात्र माझी जबरदस्त इच्छा होती. मुंबईचें कॉंग्रेस-अधिवेशन संपलें, नोव्हेंबर उलटला, मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकीची धांदलही शांत झाली. आपण अतां लवकरच सुटणार अशी अर्धवट आशा मनाला वाटत होती.

पण इतक्यांत खान अबदुल गफार खान यांच्या शिक्षेची व सुभाषबाबू हिंदुस्थानांत थोडे दिवस आले असतां त्यांच्यावर लादण्यांत आलेल्या विलक्षण अटींची बातमी कानीं पडली. त्या अटींमध्यें समजूतदारपणा अथवा माणुसकी मुळीं नव्हतीच. पण असंख्य लोकांना प्रिय व मान्य असणाऱ्या सुभाषचंद्रांवर, ते मृत्युशय्येवर पडलेल्या आपल्या पित्याची भेट घेण्यासाठीं लगबगीनें आले असतां त्या लादण्यांत आल्या हें विशेष. सुभाषबाबू तांतडीनें आले खरे, पण त्यांना जरा उशीरच झाला. कारण मृत्यूनें आपलें कार्य आधींच बजावलें होतें. सुभाषबाबूंविषयीं सरकारी वृत्ति जर ह्या प्रकारची, तर मग मी अगोदर सुटेन असा संभवच नव्हता. नंतर सरकारनें केलेल्या खुलाशावरून तर कसलीच शंका उरली नाहीं.

एक महिन्यानंतर आलमोऱ्याहून मला कमलच्या भेटीसाठीं भोवालीस नेण्यांत आलें. तेव्हांपासून साधारणतः दर तिसऱ्या आठवड्याला मी तिची भेट घेत असतों. भारतमंत्री सर सॅम्युअल होअर यांनीं वारंवार ठांसून सांगितलें आहे कीं मला आठवड्यांतून एकदां अथवा दोनदां तिची भेट मिळते. महिन्यांतून एक दोन वेळां असें म्हणणें अधिक रास्त झालें असतें; कारण आलमोऱ्याच्या गेल्या साडेतीन महिन्यांच्या वास्तव्यांत मी फक्त पांच वेळां कमलच्या भेटीला गेलों. मी हें तक्रार म्हणून सांगत नाहीं. कारण या बाबतींत सरकारनें माझ्या बाबतींत सौजन्य दाखवलें असून मला अपूर्व अशा सवलती त्यांच्याकडून मिळाल्या आहेत आणि त्याबद्दल मी सरकारचा ऋणी राहीन. कारण थोडा वेळ भेटी होतात त्यासुद्धां मला फार मोलाच्या वाटतात; कमलला देखील त्या मोलाच्या वाटत असाव्यात. भेटीच्या दिवशीं डॉक्टर आपली सत्ता जरा आवरती घेत आणि मला कमलशीं बोलण्यासवरण्याला बराच वेळ मिळत असे. या काळांत आमचीं अन्तःकरणें अधिकाधिक स्नेहबद्ध होत गेलीं. तिचा निरोप घेतांना अन्तःकरण चिमट्यानें ओढून बाहेर काढावें त्याप्रमाणें मला दुःख होई. आम्ही एकमेकापासून दूर जावें म्हणूनच जशा कांहीं आमच्या

भेटी होत होत्या. कधीं कधीं मन विव्हल करून सोडणारी अशी कल्पना मनांत येई कीं आमचा निरोप शेवटचाच ठरावा असाहि दिवस केव्हां तरी उगवणार असेल.

औषधोपचारासाठीं आई मुंबईला गेली होती. तिची प्रकृति सुधरत होती. पण जानेवारींत एके दिवशीं सकाळीं तार आली तों त्यांत अगदींच अनपेक्षित असा मजकूर वाचून मनाला धक्का बसला. तिला अर्धांगवायूचा झटका आल्याचें समजलें. तिला भेटतां यावें म्हणून मुंबईच्या तुरुंगांत माझी रवानगी होईल असें वाटत होतें; पण तिच्या प्रकृतींत सुधारणा झाल्यामुळें ती गोष्ट तितक्यावरच थांबली.

जानेवारी महिना संपून फेब्रुवारीला नुकताच प्रारंभ झाला आहे आणि वातावरणांत वसंताचा पदरव ऐकूं येत आहे. बुलबुल वगैरे पक्षी दिसूं लागले असून त्यांचें संगीत कानावर पडत आहे. इवलाले कोंभ जमिनींच्या कवचा फोडून वर डोकावत असून या विचित्र सृष्टीकडे विस्मयानें पाहत आहेत. टेकड्यांच्या उतरणीवर ऱ्होडोडेड्रनचे रक्तासारखे लाल गुच्छ बहरले आहेत आणि पीच व प्लमच्या झाडावर नुक्ता कोठें मोहर डोकावूं लागला आहे. सरांतून ओघळून जाणाऱ्या मण्याप्रमाणें चाललेले दिवस मोजीत व कमलच्या पुढील भेटीचा विचार करीत मी बसलों आहें. आशाभंग, यातना आणि वियोग यांच्या शिशिर ऋतूनंतर जीवनाच्या प्रफुल्ल वसंताला प्रारंभ होतो असें म्हणतात तें कितपत खरें असेल? असा विचार माझ्या मनांत येत आहे. दुःखावांचून आनंदाला रुचि चढत नसावी. विचारांतील गाळ नाहींसा होण्यासाठीं हालअपेष्टांची आवश्यकता असेलहि. पण त्या देखील पराकोटीला पोंचल्या म्हणजे माणसाची बुद्धि मंद होते नव्हे का? तुरुंगवासामुळें अन्तर्निरीक्षणाची संवय लागते. माझीं अनेक वर्षे तुरुंगांत गेलीं असल्याकारणानें अधिकाधिक अन्तर्मुख होणें मला भागच पडलें. मी जात्या अन्तर्मुख नव्हतों, पण दाट कॉफी अथवा अफू यांच्याप्रमाणें तुरुंगवासामुळेंसुद्धां मनुष्य अन्तर्मुख बनत असतो. कधीं कधीं गमत म्हणून, अन्तर्मुखता व बहिर्मुखता यांच्या मापनासाठीं प्रो. मॅक्डूगल यांनीं योजलेल्या घनाची आकृति काढून माझ्या मनांतल्या घडामोडींचें प्रमाण काय पडतें तें मी पाहत बसतो. माझ्या मनांत फार झपाट्यानें घडामोडी होत असतात असें मला त्या प्रयोगावरून आढळून आलें आहे.

६७

# अलीकडचे कांहीं प्रसंग

" जातां श्यामा रजनि उदया ये उषा व्योमराणी
आयुष्याचे गत-दिन परी यायचे ना फिरूनी
नेत्रांना या क्षितिज दिसतें दूर विस्तारलेलें ।
चित्तीं राही सलत ' मधु ' चें शल्य जें खोल गेलें "

—ली टाइ-पो.

मुंबईस झालेल्या काँग्रेस-अधिवेशनाची हकीगत मला वृत्तपत्रावरून समजली. तेथील राजकारणाची व राजकीय व्यक्तींची हालचाल समजून घेण्यासाठीं मी साहजिकच उत्सुक होतों. वीस वर्षांच्या निकट सहवासानें मी काँग्रेसशीं इतका निगडित झालेला होतों कीं माझें व्यक्तित्व तिच्यांत सर्वस्वीं विलीन झालें होतें आणि केवळ अधिकारपदामुळें उत्पन्न होणाऱ्या संबंधापेक्षां किती तरी पटींनीं अधिक सामर्थ्यवान् अशा अदृश्य बंधनांनीं मी त्या थोर संस्थेशीं व तिच्यांतील हजारों परिचित सहकाऱ्यांशीं संबद्ध झालों होतों. असें असून देखील अधिवेशनाची हकीगत वाचून मला उल्हास वाटला नाहीं. कांहीं महत्त्वाचे निर्णय झाले असले, तरी एकंदरींत सर्व अधिवेशन नीरसच वठलें. माझ्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा विषयांचा विचार जवळ जवळ झालाच नाहीं. मी अधिवेशनाला हजर असतों तर मीं काय केलें असतें, असा विचार मनांत आला. नव्या परिस्थितीचा माझ्या मनावर कोणता परिणाम घडला असता तें सांगतां येणार नाहीं. आणि अशा बिकट मुद्द्यावर तुरुंगामध्यें मी डांबलेला असतांना मी माझ्या बुद्धीला निर्णय देण्यास तरी कां भाग पाडावें ? बरें, त्या वेळीं निर्णयाला येण्याची कांहीं आवश्यकताहि दिसत नव्हती. पुढें उभ्या राहिलेल्या प्रश्नांचा विचार करून माझें धोरण ठरवण्याचा प्रसंग नंतर येणार होताच. मग मनांतल्या मनांतसुद्धां आगाऊच निर्णय देऊन ठेवणें अनवश्यक आणि मूर्खपणाचें ठरलें नसतें का ! कारण निर्णय प्रत्यक्ष अमलांत आणण्यापूर्वीच परिस्थितींत कदाचित् बदलहि झाला असता.

इतक्या लांब अंतरावरून काँग्रेसकडे पाहत असतां दोन गोष्टी माझ्या विशेष ठळकपणें लक्षांत आल्या. एक म्हणजे गांधीजींचें वर्चस्व आणि दुसरी म्हणजे पंडित मालवीय व श्री. अणे यांच्या नेतृत्वाखालीं जातिनिष्ठांनीं केलेला पोंचट विरोध. हिंदी जनमनाचा बारकावा ज्यांना नीट कळलेला आहे, त्यांना गांधीजींचें अप्रतिरथ

वर्चस्व हिंदुस्थानांत टिकून राहावें यामध्ये आश्चर्य वाटण्याचें कारण नव्हतें. राजकीय क्षेत्रांतील त्यांची सद्दी संपली, निदान त्यांची प्रतिष्ठा तरी बरीचशी मावळली अशी कल्पना त्यांना पाण्यांत पाहणारे सरकारी अधिकारी व कांहीं सांदीकोंपऱ्यांतून पडलेले राजकारणी लोक करीत असतात. आणि पुन्हा पूर्वीच्याच ईर्षेनें पुढे येऊन ते लोकप्रियतेच्या अधिकारपीठावर विराजूं लागले कीं अशा लोकांची तारांबळ उडून गांधीजींच्या नव्या उदयाची कारणमीमांसा ते हुडकूं लागतात. गांधीजींचीं कांहीं मतें लोकमान्य झालीं म्हणून त्यांना जेवढें वर्चस्व लाभलें, त्याहून किती तरी पटींनीं अधिक वर्चस्व त्यांना त्यांच्या अनन्यसामान्य व्यक्तिमत्तेमुळें लाभलें आहे. व्यक्तिमत्त्वाची महती पृथ्वीच्या पाठीवर सगळीकडेच आहे, आणि इतर ठिकाणच्यापेक्षां हिंदुस्थानांत तर तिला विशेषच महत्त्व आहे.

गांधीजींचा राजकारणसंन्यास हीच अधिवेशनांतील विशेष महत्त्वाची बाब होती. बाह्यात्कारी असें वाटलें कीं कॉंग्रेसच्या व हिंदुस्थानच्या इतिहासाचें एक प्रकरण त्या वेळीं संपलें. परंतु वस्तुतः त्यांच्या राजकारणसंन्यासाला विशेष महत्त्व नव्हतें. कारण त्यामुळें त्यांना प्राप्त झालेल्या महान् पदापासून त्यांची सुटका अशानें थोडीच होणार होती? त्यांना मिळालेला श्रेष्ठपणा अधिकारपदासारख्या बाह्य उपाधीच्या योगानें प्राप्त झाला नव्हता. गांधीजींचा दृष्टिकोण पूर्वीइतकाच आतांहि कॉंग्रेसमध्यें प्रतिबिंबित झालेला आढळेल. आणि उद्यां गांधीजींचा मार्ग तिनें सोडला तरीदेखील कॉंग्रेसवर व देशावर त्यांची छाप बऱ्याच प्रमाणांत पडत राहणार. मग त्यांची तशी इच्छा असो वा नसो. त्या जबाबदारींतून त्यांची यापुढे सुटका होणें नाहीं. हिंदुस्थानांतील बाह्य परिस्थितीचा विचार करूं लागल्यावर गांधीजींचें व्यक्तित्व इतक्या प्रामुख्यानें नजरेसमोर उभें राहतें कीं तिकडे दुर्लक्ष करणें शक्यच होत नाहीं.

कॉंग्रेसला बुचकळ्यांत पाडूं नये म्हणून ते राजकारणनिवृत्त झाले असावेत. सरकारशीं खटका उडणें अपरिहार्य होईल असा कांहीं वैयक्तिक सत्याग्रह करण्याचा त्यांचा विचार असावा. त्याला सबंध कॉंग्रेसच्या प्रश्नाचें स्वरूप प्राप्त होऊं नये अशी त्यांची कदाचित् इच्छा असेल.

देशाची राज्यघटना मुक्रर करण्यासाठीं घटना-परिषद् बोलावण्याची कल्पना कॉंग्रेसनें मान्य केल्याचें वाचून मला समाधान झालें. घटनेचा प्रश्न सोडवण्याचा दुसरा उपायच नाहीं व अशा प्रकारची परिषद् केव्हां ना केव्हां तरी बोलवावी लागेलच असें मला वाटत होतें. ब्रिटिश सरकारच्या संमतीवांचून ती भरणें शक्य नाहीं हें उघड आहे. क्रान्ति तत्पूर्वी यशस्वी झालेली असेल तर मात्र गोष्ट निराळी. तथापि सध्यांच्या परिस्थितींत ब्रिटिश सरकारची संमति या गोष्टीला मिळणें शक्य नाहीं हे सुद्धां स्पष्टच दिसत आहे. तेव्हां घटना परिषदेच्या राजकारणाला प्रत्यक्ष स्वरूप येण्यासाठीं देशांत आवश्यक तें सामर्थ्य निर्माण केल्याशिवाय खरी घटना परिषद्

भरणें शक्य नाहीं. याचा क्रमप्राप्त अर्थ असा आहे कीं आमचा राजकीय प्रश्नमुद्दां घटना-परिषदेचें राजकारण यशस्वी होईपर्यंत मिटणें शक्य नाहीं. कांहीं कॉंग्रेस-पुढाऱ्यांनीं घटना-परिषदेची कल्पना मान्य केली असली, तरी त्यांत मुरड घालून त्यांनीं तिला जुन्या थाटाच्या सर्वपक्षीय परिषदेचें स्वरूप आणून दिलें आहे. प्रमाण जरा घसघशीत, एवढाच काय तो फरक. पण हा उद्योग अगदीं निष्फळ ठरणार. कारण तेच ते स्वयंसिद्ध वृद्ध कपि जमतील आणि भांडून घरीं जातील. जनसमूहा-मार्फत प्रतिनिधि निवडले जावेत आणि जनतेचा उत्साह व शक्ति परिषदेंत प्रतिबिंबित व्हावी हाच एक विचार घटना-परिषदेच्या मुळाशीं आहे. अशी परिषदच खऱ्या नडणाऱ्या प्रश्नांना ताबडतोब हात घालील आणि तसें झालें म्हणजे नेहरूंच्या जातीय चिखलानें भरलेल्या चाकोरींत तिचा गाडा रुतून पडणार नाहीं.

ह्या कल्पनेचा सिमला व दिल्ली येथील अधिकाऱ्यांवर झालेला परिणाम पाहण्याजोगा होता. अर्धवट अधिकृत रीत्या असें जाहीर करण्यांत आलें कीं सरकार-कडून परिषदेला विरोध होणार नाहीं. ही परिषद् म्हणजे नव्या नांवानें भरणारी जुनीच सर्वपक्षीय परिषद असून तिचे बारा वाजणार हें ठरलेलेच आहे; तेव्हां तिच्या योगानें सरकारचीच बाजू सबळ ठरणार असें समजून सरकारनें परिषदेची कल्पना मोठ्या दिलदारपणें मान्य केली. पण मागाहून त्यांना त्या कल्पनेंत दडून बसलेलीं संकटें व संभाव्यता यांची ओळख पटली असावी. कारण नंतर ह्या राजकारणाला सरकारमार्फत जोराचा विरोध होऊं लागला.

मुंबई-कॉंग्रेसनंतर लवकरच निवडणुकी आल्या. कॉंग्रेसच्या सनदशीर राजकारणाविषयीं मला मुळींच आस्था वाटत नसली, तरी निवडणुकीकडे मी लक्षपूर्वक पाहत होतों, आणि कॉंग्रेसच्या उमेदवारांना यश यावें असेंहि मला वाटत होतें. किंवा खरें बोलावयाचें तर विरोधकांचा पराभव होईल अशी आशा मला वाटत होती. विरोधकांचें दल म्हणजे अठरा धान्यांचें कडबोळें होतें. त्यांत संधिसाधु, जातिनिष्ठ, पक्षघातकी आणि दडपशाहीच्या काळांत सरकारधार्जिण्या बनलेल्या लोकांचा भरणा होता. ह्या बहुतेक लोकांचा धुव्वा उडेल ह्याविषयीं मला फारशी शंकाच नव्हती, पण जाति-निर्णयाच्या धुरळ्यांत खरे प्रश्न डोळ्यांआड झालेले असल्यामुळें ह्या लोकांना जातीय संस्थांच्या सुविस्तृत छपराचा आश्रय घेतां आला. अशा परिस्थितींत देखील कॉंग्रेसला चांगला यशलाभ होऊन बरेचसे चव्हाटे पाखडून निघाले हें पाहून मला आनंद वाटला.

कॉंग्रेस राष्ट्रीय पक्षाचें धोरण माझ्या मतें फारच खेदजनक होतें. जातिनिर्णयाबद्दलचा त्या पक्षाचा तीव्र विरोध समजण्यासारखा होता. पण आपलें सामर्थ्य वाढवण्यासाठीं त्यांनीं अतिरेकी जातीय संस्थांशीं व अखिल हिंदुस्थानांत राजकीय व सामाजिक दृष्ट्या पहिल्या प्रतीच्या प्रतिगामी सनातन्यांशीं आणि कुविख्यात अशा राजकारणांतील प्रगतिविरोधकांशीं देखील सहकार्य केलें. पण असे अनेक प्रकारचे विरोध असतांहि कॉंग्रेसच्या उमेदवारांनीं उत्तम यश संपादन केलें.

जातिनिर्णयाबाबतचें कॉंग्रेसनें अंगीकारलेलें धोरण विलक्षणच होतें. परंतु त्या परिस्थितींत फारसें निराळें धोरण आंखणें शक्यहि झालें नसतें. पूर्वी तटस्थ व नेभळें धोरण ठेवीत असल्यामुळें ही गोष्ट क्रमप्राप्तच झाली होती. परिणामाची दहशत न बाळगतां प्रथमपासूनच ताठ धोरण ठेवावयास हवें होतें. त्यामुळें कॉंग्रेसची प्रतिष्ठाहि वाढली असती. पण तसें करण्याचें कॉंग्रेसनें टाळल्यामुळें ह्या प्रसंगीं दुसरें तिसरें कांहीं करतां येईना. जातीय निर्णय म्हणजे बावनकशी खुळचटपणा होता. तो अस्तित्वांत असेतोंपर्यंत कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य मिळणें असंभवनीय होतें. तेव्हां त्याचा स्वीकार करणें कधींच शक्य झालें नसतें. मुसलमानांना फार सवलती मिळाल्या म्हणून तो त्याज्य ठरला असें नव्हे. मुसलमानांना हव्या त्या सर्व गोष्टी कदाचित् निराळ्या मार्गांनीं देखील देतां आल्या असत्या. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं परस्परांना विरोधी लेखणारे जे गट हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारनें निर्माण केले आहेत, ते एकमेकांना मारक ठरून ब्रिटिशांचें वर्चस्व येथें अबाधित राहतें, व त्याचाच परिणाम म्हणून सर्व देशाला ब्रिटिश सरकारवर अवलंबून राहणें क्रमप्राप्त होतें.

विशेषतः बंगालमध्यें मूठभर युरोपियनांना भरमसाट जागा देऊन हिंदूंचें अतिशय नुकसान करण्यांत आलेलें आहे. राजकीय कारणासाठीं असला अन्यायी जातिनिर्णय कांहीं काळ लोकांनीं सहन केला तरी तद्विषयक असंतोष कायमचा धुमसत राहणारच. मला तर असें वाटतें कीं जातिनिर्णय इतका सदोष झाला हेंच ठीक झालें. कारण त्याच्या आधारें कोणतीहि पक्की व्यवस्था अमलांत आणणें अशक्य होऊन बसेल. ह्या अन्यायामुळें राष्ट्रीय पक्ष व विशेषतः हिंदुमहासभा यांच्यामध्यें असंतोष पसरला. परंतु जातिनिर्णय मान्य करणाऱ्यांच्या मान्यतेप्रमाणें ह्या गटाचा विरोधहि ब्रिटिश सरकारच्या विचारसरणीवरच वस्तुतः आधारलेला होता. त्यामुळें त्यांनीं जें विचित्र धोरण तेव्हां स्वीकारलें व उत्तरोत्तर स्वीकारीत आहेत, तें सरकारला फार पसंत पडेल असेंच आहे. ध्यानीं-मनीं-स्वप्नीं जातिनिर्णय दिसत असल्यामुळें सरकारला लांच चारून अथवा सरकारची खुशामत करून जातिनिर्णयांत इष्ट तो फेरफार करून घेण्याच्या वेड्या आशेनें जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरील आपला विरोध ते सौम्य करीत चालले आहेत. या बाबतींत हिंदुमहासभेनें तर कमालच केली! सरकारशीं अशा रीतीनें वागणें म्हणजे शरमेची गोष्ट आहे एवढेंच नव्हे, तर आपल्या धोरणामुळें मुसलमान लोक चिडून आणखी दूर गेल्यावर जातिनिर्णय बदलून घेण्याची आशासुद्धां करावयास नको ही गोष्ट त्यांना उमगत नसावी असें दिसतें. राष्ट्रवादी लोकांना मथवणें सरकारला शक्य नाहीं; कारण दोन बाजूंतील अंतर अफाट आणि हितविरोध फार तीव्र. बरें, जातीय प्रश्नासारखा संकुचित प्रश्न घेतला, तरी हिंदु आणि मुसलमान या दोन्ही समाजांतील जातिनिष्ठांना खूष करणेंहि सरकारला शक्य होणार नाहीं. तेव्हां कोणाला तरी एकाला जवळ करणें प्राप्त होतें.

म्हणून मुसलमान जातिनिष्ठांना त्यांनीं फितविलें. त्यांच्या हिताच्या दृष्टीनें योग्य तेंच त्यांनीं केलें. ही ठाकठीक बसलेली आणि फायद्याची ठरलेली घडी विस्कटून ते मुसलमानांना काय म्हणून भडकूं देतील? आणि ते कशासाटीं? मूठभर जातिनिष्ठ हिंदू प्रसन्न व्हावे म्हणून?

हिंदूंचा गट म्हणून विचार केला तर राजकीय दृष्ट्या ते अधिक पुढारलेले आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या बाबतींत अधिक धामधूम उडवणारे आहेत हीच गोष्ट सरकारच्या मनांतून त्यांना उतरवण्यास कारणीभूत होत असते. अल्पस्वल्प जातीय सवलती देऊन (आणि त्या नेहमीं अल्पस्वल्पच असणार) हिंदूंचा राजकीय विरोध शमवतां येईल असें नाहीं. पण मुसलमानांची गोष्ट निराळी आहे. थोडी सवलत दिली कीं त्यांना कांहीं काळ तरी गप्प करतां येतें.

निवडणुकीमुळें हिंदुमहासभा आणि मुस्लिम कॉन्फरन्स् या दोन कट्टर प्रगतिविरोधक संस्थांचें सगळेंच बेंड फुटलें. त्यांचे उमेदवार व साहाय्यक, जमीनदार व सावकार वर्गांतले होते. कर्जनिवारणाच्या बिलाला कडाक्याचा विरोध करून महासभेनें सावकारांच्या हिताविषयीं आपण किती दक्ष आहोंत तें पटवून दिलें आहे. हिंदुसमाजावरील हा धनिकांचा कोशिटा म्हणजेच हिंदुमहासभा. त्यांतलाच थोडासा भाग घेऊन त्यांत धंदेवाल्या पांढरपेशांची साखर मिसळली कीं तो झाला प्रागतिक पक्ष. कनिष्ठ मध्यमवर्ग राजकीय दृष्ट्या आतां जागृत झालेला असल्यामुळें ह्या वरिष्ठांची छाप त्या वर्गावर फारशी पडत नाहीं. कारखानदारांचे म्होरके देखील या महासभावाल्यांपासून फटकून राहतात. कारण वाढता उद्योगधंदा आणि तुंबून पडलेली अर्धवट सरंजामदारी यांचें गणगोत्र बरोबर जमत नाहीं. प्रत्यक्ष प्रतिकाराच्या अथवा इतर कसल्याहि विस्तवाशीं खेळण्याची कारखानदारांची तयारी नसल्यामुळें ते राष्ट्रवादी व सरकार या दोघांच्याहि बरोबर गोडीगुलाबीनें वागण्याच्या प्रयत्नांत असतात. प्रागतिक अथवा जातीय गटांची मनधरणी करण्याची फिकीर ते करीत नाहींत. धंद्याची वाढ व नफ्यांत बरकत या दोनच गोष्टी मनांत बाळगून त्यांचे सारे व्यवहार चालत असतात.

पण मुसलमानांतील कनिष्ठ मध्यम वर्ग अद्यापि जागृत व्हावयाचा आहे. औद्योगिक दृष्ट्याहि ते मागसलेले आहेत. त्यामुळें सरंजामदारीचे पुरस्कर्ते आणि सेवानिवृत्त अधिकारी वगैरे कमालीचे परागतिक लोक त्यांच्या जातीय संस्थावर अधिकार गाजवीत असतात. इतकेंच नव्हे, तर सर्व मुसलमान समाजावर देखील त्यांची खूपच हुकमत चालते. मुस्लिम कॉन्फरन्समध्यें सर, माजी दिवाण आणि बडे जमीनदार, यांची नुसती खेंचाखेंच झालेली आढळेल. तरी देखील एकदां चालना मिळाली कीं त्यांच्या जातींमध्यें व्यक्तिस्वातंत्र्य अधिक असल्यामुळें हिंदु जनतेपेक्षां मुसलमान जनता समाजवादाकडे जास्त तडफेनें जाईल अशी माझी समजूत आहे. सांप्रतचा मुसलमान पांढरपेशा वर्ग शरीरानें व बुद्धीनें गळाटून गेलेला आहे.

थोडेंदेखील कर्तृत्व त्यांच्या ठायीं उरलेलें नाहीं. त्यामुळें जरठ पुढाऱ्यांना हुसकून लावण्याचा धीर त्यांना व्हावयाचा नाहीं.

काँग्रेसच्या पुढाऱ्यांचा गट राजकीय दृष्ट्या सर्वांत पुढारलेला आणि संख्येनें मोठा असून देखील तो जनतेच्या तयारीच्या दृष्टीनें जरूर त्यापेक्षां अधिक सावधगिरीनें पावलें टाकीत असतो. जनतेपुढें साहाय्यासाठीं ते पदर पसरतात, पण तिला काय वाटतें, काय नाहीं, तिला दुखतें-खुपतें कोठें, त्याबद्दल ते क्वचितच चौकशी करतात. मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकींच्या आधीं काँग्रेसबाहेरच्या नेमस्त गटांचें सहकार्य मिळवावें म्हणून त्यांनीं आपला कार्यक्रम पातळ करण्याची शिकस्त केली. मंदिरप्रवेश बिलासंबंधींचें धोरण देखील बदलण्यांत येऊन मद्रासमधील कट्टरांना चुचकारण्यासाठीं आश्वासनें देऊं केलीं. सरळ चढाईचा कार्यक्रम आखून निवडणुकी लढवल्या असत्या म्हणजे जनतेंत अधिक उभारी येऊन त्यांचा शैक्षणिक फायदा देखील भरपूर झाला असता. काँग्रेसनें सनदशीर मार्ग पत्करलाच आहे, आतां कायदेमंडळांतील मतनोंदणीच्या वेळीं चारदोन मतें अधिक गटवावीं या हेतूनें राजकीय व सामाजिक प्रगतिविरोधकांना अधिकच वाव देण्याचा प्रयत्न होईल आणि काँग्रेसचे पुढारी आणि जनता यांच्यांतील भेद मात्र अधिकच रुंदावत जाईल. वक्तृत्वाचे गुच्छ फुलतील, कायदेमंडळांतील नाजुक साजुक शिष्टाचार पाळण्यांत येतील आणि वेळोवेळीं सरकारचे दणदणीत पराभवहि होतील. पण सरकार मात्र पूर्वीप्रमाणेंच आतांहि पराभवांची कार्डीइतकी क्षिति बाळगणार नाहीं.

गेलीं कांहीं वर्षे काँग्रेसनें कायदेमंडळांवर बहिष्कार टाकला होता तेव्हां सरकारतर्फे असें सांगण्यांत येई कीं मध्यवर्ति आणि प्रांतिक कायदेमंडळें हींच खरीं प्रातिनिधिक असून त्यांच्या द्वारांच जनतेचें खरें मत प्रदर्शित होत असतें. परंतु कायदेमंडळांत जहाल मताच्या लोकांचें वर्चस्व झाल्याबरोबर सरकारनें पगडी फिरवलेली दिसते! निवडणुकींत काँग्रेसला मिळालेल्या यशाचा उल्लेख कोणी केला कीं मतदार संघ फार लहान होते, तीस कोटींपैकीं फक्त तीस लक्ष लोकांनाच मताधिकार होता वगैरे वेदान्त सरकार सांगूं लागतें. मतें नसणारे कोट्यवधि लोक हे एकजात आपल्याच बाजूचे आहेत असें सरकार मानीत असावें! यावर अगदीं साधा उपाय आहे. सज्ञानांना मताधिकार द्या, म्हणजे उरलेल्या लोकांचें मत काय आहे तेंहि कळून येईल.

निवडणुकी झाल्यानंतर लगेच संयुक्त पार्लमेंटरी समितीचा राज्यघटनेबाबतचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यावर पुष्कळ टीका झाली. टीकेंत अनेक प्रकार असले तरी हिंदी जनतेसंबंधीं अहवालामध्यें अविश्वास व साशंकता प्रदर्शित केलेली आहे, ह्या गोष्टीवरच अनेक टीकाकारांचा रोख होता असें दिसलें. आमच्या राजकीय व सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची ही पद्धति मला ओरच वाटली.

ब्रिटिश साम्राज्यशाहीचें धोरण व आमचे राष्ट्रीय हितसंबंध यांच्यामध्यें कांहीं मूलगामी विरोध होते कीं नव्हते ? यांपैकीं कोणाचा विजय होणार हा खरा मुद्द्याचा प्रश्न होता. आम्हांला स्वातंत्र्य हवें होतें तें काय ब्रिटिश साम्राज्यशाहीचें धोरण पुढें चालविण्यासाठीं ? सरकारची मात्र तशी इच्छा असावी. कारण ब्रिटिश धोरणाला न खुपेल अशा तऱ्हेनें वागून आम्हीं स्वयंशासनाची योग्यता आमच्या अंगीं आहे हें सिद्ध केलें आणि ब्रिटिशांबरोबर भलेपणानें वागलों म्हणजे संरक्षक बंधनांचा उपयोग करण्यांत येणार नाहीं असें आम्हाला सांगण्यांत येई. पण आम्हाला जर ब्रिटिशांचेंच धोरण हिंदुस्थानांत चालू ठेवावयाचें असेल तर अधिकाराचीं सूत्रें आमच्या हातीं मिळावीं म्हणून एवढी हाकाटी करण्याचें कारण तरी काय !

ओटावा-करारापासून आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थानव्यतिरिक्त कोणत्याहि देशाशीं असलेल्या व्यापारांत इंग्लंडचें हित झालेलें नाहीं. हिंदुस्थानांतील ब्रिटिश व्यापार मात्र खात्रीनेंच वाढला आणि हिंदुस्थानचे जागतिक हितसंबंध तेवढे धोक्यांत आले असें येथील राजकीय कार्यकर्त्यांचें व व्यापारी लोकांचें मत आहे. परंतु वसाहतींच्या बाबतींत विशेषतः कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशांच्या बाबतींत उलटा प्रकार घडून आला. त्यांनीं इंग्लंडशीं खूप घासाघीस करून इंग्लंडला बुडवलें व आपलें हित साधून घेतलें. असें असूनदेखील ओटावा-करारामुळें निर्माण झालेल्या पायगोव्यांतून आपली सुटका करून घेऊन आपले उद्योगधंदे व आपला व्यापार वाढवावा म्हणून त्यांची अव्याहत खटपट सुरू आहेच.

कॅनडा व ऑस्ट्रेलियामधील लोकांचें ब्रिटिश लोकांशीं कांहीं खाजगी वैमनस्य आहे म्हणून हे आर्थिक लढे चालू आहेत असें मुळींच नाहीं. आयर्लंडच्या बाबतींत मात्र वैरभाव असल्याचें उघड दिसून येतें. पण आर्थिक लढे उत्पन्न होतात याचें खरें कारण हितसंबंधांमध्यें विरोध येत जातो हें होय. आणि अशा प्रकारचे आर्थिक लढे निर्माण झाले कीं हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचे हितसंबंध सुरक्षित राहावे याच उद्देशानें संरक्षक बंधनांची अंमलबजावणी होऊं लागते. संरक्षक बंधनांचा उपयोग कशा तऱ्हेनें होईल याचें एक सौम्यसें उदाहरण नुकत्याच गुप्तपणें शिक्कामोर्तब झालेल्या इंडो-ब्रिटिश व्यापारी करारनाम्याच्या द्वारां सरकारनें आपणास घालून दिलें आहेच.

साम्राज्य हें एक कर्ज आहे आणि हें कर्ज देणाऱ्या साम्राज्यवादी सावकारांना जित राष्ट्ररूपी ऋणकोवरील आपले पाश पक्के ठेवतां यावेत व त्यांचे हितसंबंध आणि सत्ता सुरक्षित राहावी म्हणून संरक्षक बंधनांची योजना करण्यांत आली आहे असें सांगण्यांत येत असतें. आणि १९३१ च्या दिल्ली-तहाप्रमाणें " हिंदुस्थानच्या हिताचीं अशीं संरक्षक बंधनें " मान्य करण्यांत आलीं होतीं, अतएव गांधीजी व कॉंग्रेस यांना संरक्षक बंधनांची कल्पना मान्य असल्याचें दिसून येईल, असें एक विचित्र तर्कशास्त्र सरकार पुढें मांडीत असतें.

सापेक्षतया पाहिलें असतां व्यापारविषयक ओटावा-करार व संरक्षक बंधनें या क्षुल्लक महत्त्वाच्या गोष्टी आहेत. हिंदुस्थानी जनतेवर ज्या राजकीय व आर्थिक नियंत्रणाच्या फासण्या टाकून गत व वर्तमान कालांत या देशाची पिळवणूक करण्यांत आली, त्या फासण्या कायम टिकवण्यासाठीं जे अनेक उपाय करण्यांत येत आहेत तेच अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही उपाययोजना आणि हीं संरक्षक बंधनें जोंपर्यंत टिकून आहेत, तोंपर्यंत कोणत्याहि प्रकारची खरी प्रगति होणें अथवा सनदशीर मार्गानें कोणत्याहि तऱ्हेचा फेरबदल घडवून आणणें शक्य नाहीं. प्रगतीसाठीं कसलाहि प्रयत्न करूं म्हटलें तरी संरक्षक बंधनांचे तट वाटेंत आडवे येऊन सनदशीर मार्ग कुचकामाचे आहेत हीच गोष्ट सिद्ध होणार. राजकीय स्थित्यंतराच्या दृष्टीनें विचार केला तर फेडरेशननें युक्त अशी राज्यघटना म्हणजे शुद्ध धूळफेक आहे. सामाजिक व आर्थिक दृष्टीनें तर तिचा विचार करण्याची सोयच नाहीं. या राज्यघटनेच्या द्वारां समाजसत्तावादाचा मार्ग जाणून बुजून बंद करण्यांत आला आहे. बाह्यात्कारी पुष्कळशा सत्तेचें दान केल्याची बतावणी चाललेली असली ( आणि हें दान देखील बहुतांशीं ‘ विश्वास् ’ अशा वर्गांतील लोकांनाच देण्यांत आलेलें आहे. ) तरी महत्त्वाचे असें कोणतेंहि काम करण्याची सत्ता हिंदुस्थानला मिळालेली नाहीं. सगळी खरी सत्ता ब्रिटिशांच्या हातींच राहिली आहे. त्यांच्या शिरावरील जबाबदारी मात्र खालीं उतरली. अरेरावी सत्तेचा नागडेपणा झांकतां यावा म्हणून अजापुच्छाइतकें आवरणसुद्धां इतःपर ठेवलेलें नाहीं. झपाट्यानें बदलणाऱ्या परिस्थितीशीं मिळतें घेतां यावें म्हणून राज्यघटनेमध्यें कमालीचा लवचिकपणा असणें हल्लींच्या काळीं आवश्यक आहे ही गोष्ट सर्व लोक जाणतात. तत्काल निर्णय घेतां आले पाहिजेत व त्यांची अंमलबजावणीहि झाली पाहिजे. आधुनिक जगाचा गाडा सुयंत्रितपणें हांकतां येईल इतकें सामर्थ्य कांहीं थोड्या पाश्चात्य देशांत हल्लीं चालू असलेल्या लोकशाहीच्या अंगीं आहे कीं नाहीं याविषयीं शंकाच वाटते. पण हिंदुस्थानला देऊं केलेल्या राज्यघटनेच्या बाबतींत हा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण जनतेनें कसलीहि चळवळ करूं नये म्हणून तिला बुद्धिपुरःसर खोड्यांत अडकवलेली असून चोहोंकडच्या दाराखिडक्यांना टाळे ठोकण्यांत आले आहेत. आमच्यासाठीं पाठविलेल्या ह्या गाडीला सर्व ब्रेकच आहेत, इंजिन मुळीं नाहींच ! लष्करी कायद्याचा विचार मनांत सदोदित चघळीत बसणाऱ्या लोकांनींच ही राज्यघटना तयार केलेली आहे. लष्करी कायद्याचें शस्त्र हातांतून काढून घेतलें म्हणजे, आपली इतिश्री होईल अशी भीति सर्वस्वी दंडशक्तीवर विसंबून राहणाऱ्या लोकांना सदैव वाटत असते.

हिंदुस्थानांतील अत्यंत नेमस्त व राजकीय दृष्ट्या प्रगतिविरोधी अशा गटांनीं सुद्धां प्रतिगामी राज्यघटना अशी तिची संभावना केली आहे. ह्यावरून तिच्यामुळें स्वातंत्र्याचा लाभ कितीसा होईल तें कळून येईलच. सरकारच्या सनातन साहाय्य-

कर्त्यांना मात्र टीका करतांना तोंडांत थोडीशी लाळ घोटणें भागच पडलें. इतरांचा निषेध अधिक खणखणीत होता.

ह्या राज्यघटनाविषयक सूचनांमुळें, हिंदुस्थानला ब्रिटिश वर्चस्वाखालीं आणणाऱ्या जगन्नियंत्याच्या अचाट बुद्धिमत्तेवर अखंड विश्वास ठेवणें प्रागतिकांना सुद्धां जरा जड पडूं लागलें आहे. त्यांनीं खूप जोराचा निषेध केला. परंतु वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून आणि सरकारच्या गोड गोड थापांना भुरळून जाऊन अहवालांत व बिलांत ' वसाहतीचें स्वराज्य ' असे शब्द नाहींत या मुद्द्यावरच त्यांनीं आपलें सर्व रक्त आटवलें. ह्या शब्दासंबंधीं मोठाच गोंगाट माजून राहिला होता; पण सर सॅम्युअल होअर यांनीं त्यासंबंधीं कांहीं गुळपापडीच्या वड्या थापल्यावर त्यांचा राग शांत झाला असावा. वसाहतींचें स्वराज्य म्हणजे अज्ञात भविष्यकाळामध्यें विकसणारी एक केवळ कल्पना असेल, जेथें आपणाला कधीं पोंचतां येणार नाहीं अशी ती अप्राप्य भूमि असेल; कसेंहि असो, आपणाला तिच्याविषयीं कल्पनाचित्रें रेखाटून त्या आनंदवनभुवनाविषयीं काव्यें तर रचतां येतील ना ? ब्रिटिश पार्लमेंट व ब्रिटिश लोक यांच्याविषयीं मनांत किंतु असल्यामुळेंच कीं काय, सर तेज बहादूर सप्रू आतां राजाला शरण गेले असून या विख्यात कायदेपंडितांनीं एक नवलाईचें राज्यघटनाविषयक तत्त्व प्रतिपादन केलें आहे. " हिंदुस्थानसाठीं ब्रिटिश पार्लमेंट अथवा ब्रिटिश लोक कांहीं करोत अथवा न करोत, हिंदुस्थानच्या रयतेच्या हिताची आणि हिंदुस्थानची सुरक्षितता व उत्कर्ष यांच्याविषयींची आस्था बाळगणारा राजा त्या सर्वांच्या शिरावर आहे ही गोष्ट लक्षांत असूं द्या. "* हें किती सुखदायक तत्त्वज्ञान आहे पाहा. त्याचा स्वीकार केला कीं, राज्यघटना, कायदेकानू, राजकीय व सामाजिक स्थित्यंतरें यांच्यासंबंधींच्या तापदायक विचारांचा भगभगच उरत नाहीं.

तथापि राज्यघटनेला प्रागतिकांचा जो विरोध होता त्याचा जोर त्यांनीं कमी केला आहे असें ध्वनित करणें योग्य होणार नाहीं. सध्यांची परिस्थिति कितीहि दुर्घट असली तरी ह्या व्याह्यानें धाडलेल्या घोड्याची त्यांत आणखी भर पडावयास नको असें त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं ठणकावून सांगितलें आहे. इतकें ठणकावून सांगितल्यानंतर पुढें आणखी कांहीं करावें तर तें त्यांच्या श्रुतींच्या विरुद्ध वर्तन घडणार पण निःसंदिग्धपणें, स्पष्टपणें, ठणकावून, खडसावून, बजावून आपलें मत ते सांगत राहतील ह्याबद्दल मात्र शंका बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. एका जुन्या वचनाची नवी सुधारलेली आवृत्ति त्यांनीं आपलें ब्रीदवाक्य म्हणून समजण्यास हरकत नाहीं: "पहिल्याच खेपेला यश मिळालें नाहीं तर फिरून एकवार रडून पाहा !"

इंग्लंडमध्यें मजूर पक्षाचा विजय होऊन मजूरमंत्रिमंडळ स्थापन झालें तर कांहीं तरी होईल असा प्रागतिक पुढाऱ्यांचा व कॉंग्रेसमधील कांहीं लोकांचादेखील विश्वास असावा. ब्रिटनमधील पुढारलेल्या गटांचें साहाय्य मिळवून, अथवा मजूरमंत्रिमंडळ

* २९ जानेवारी १९३५ रोजीं केलेल्या लखनौच्या जाहीर सभेंतील भाषण.

स्थापन झाल्याचा फायदा घेऊन हिंदुस्थाननें आपली प्रगति करावी यांत खरें पाहिलें तर वाईट काय आहे? पण आपलें भाग्यचक्र इंग्लंड फिरवील आणि मग आपण सुखी होऊं अशा दुबळेपणानें विसंबून राहिलों तर प्रतिष्ठेला कमीपणा येऊन राष्ट्राभिमानाला काळीमा लागतो. बरें, प्रतिष्ठेचा प्रश्न बाजूला ठेवला तरी त्यांत व्यवहारी शहाणपणाचाहि भाग दिसत नाहीं. मजूर पक्षाकडून आपणाला महादान मिळेल अशी अपेक्षा आपण कां करावी? आतांपर्यंत दोन मजूरमंत्रिमंडळें स्थापन झालीं. त्यांनीं हिंदुस्थानला कोणती बक्षिसी दिली तें आपण जाणतोंच आहोंत. रॅम्से मॅक्डोनल्ड मजूरपक्षांतून फुटले. पण उरलेल्या सहकाऱ्यांच्या मनोवृत्तींतहि फारसा पालट झालेला दिसत नाहीं. १९३४ ऑक्टोबरमध्यें साउथ पोर्ट येथें भरलेल्या मजूरपक्षाच्या अधिवेशनाच्या वेळीं "हिंदुस्थानांत पूर्ण स्वायत्तता प्रस्थापित करण्यासाठीं स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची तावडतोब अंमलबजावणी करणें अत्यंत आवश्यक आहे," असें निश्चित मत व्यक्त करणारा एक ठराव श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांनीं मांडला होता. तो परत घेण्यांत यावा म्हणून मि. आर्थर हेंडरसन यांनीं गळ घातली आणि "हिंदुस्थानच्या बाबतींत स्वयंनिर्णयाच्या धोरणाची कार्यकारी मंडळ अंमलबजावणी करील" असें आश्वासन देण्याचें त्यांनीं साफ नाकारिलें. "शक्य झालें तर हिंदुस्थानांतील सर्व गटांशीं विचारविनिमय करावा असें धोरण आपण स्पष्टपणें जाहीर केलें आहे. एवढ्यानें प्रत्येक व्यक्तीचें समाधान वास्तविक व्हावयास पाहिजे" असें ते म्हणाले. पण समाधान होण्यास थोडी अडचण येत होती ती ही कीं पूर्वीच्या मजूरमंत्रिमंडळानें व राष्ट्रीय मंत्रिमंडळानें नेमकें हेंच धोरण आंखलें होतें व त्याचा परिणाम मंडलाकार परिषद, शुभ्रपत्रिका, संयुक्त समितीचा अहवाल, आणि सरते शेवटीं हिंदी राज्यघटनेचा कायदा अशा क्रमानें होत असतो असा इतिहासाचा दाखला आमच्या पुढ्यांत होता.

साम्राज्यविषयक धोरणाच्या बाबतींत इंग्लंडांतील हुजूर व मजूर-पक्षांत मुळींच अंतर नाहीं ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. गृह्य मजुरांचीं मतें अधिक प्रगत असलीं तरी स्वतः ते स्थितिप्रिय पुढाऱ्यांच्या मुठींत आहेत. परिस्थिति झपाट्यानें बदलत आहे, तेव्हां मजूरपक्षांतील जहाल दलाचें सामर्थ्य कदाचित् वाढेलहि. पण कोठें तरी दुसरीकडे घडणाऱ्या संभवित स्थित्यंतरावर विसंबून राष्ट्रीय व सामाजिक चळवळी मुकाट्यानें हातापायांची गुंडाळी करून राहिल्या असें कधींच घडत नाहीं.

ज्या ब्रिटिश मजूरपक्षावर आमचे प्रागतिक लोक विसंबून राहिले आहेत तो समजा, अधिक जहाल बनला व त्यानें इंग्लंडमध्यें समाजवादी कार्यक्रम अंमलांत आणला, तर येथील नेमस्त आणि प्रागतिक गटांची अवस्था काय होईल? त्यांच्या-पैकीं बहुतेक लोक इरसाल स्थितिप्रिय आहेत. मजूरपक्षानें अंमलांत आणलेलीं सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरें त्यांना आवडणार नाहींत व तीं येथें सुरू होतील

कीं काय अशी त्यांना बागबुग वाटूं लागेल. ब्रिटिशांच्या संबंधाबद्दल त्यांना वाटणाऱ्या प्रेमाची गंगा कदाचित् राजापुरी गंगा ठरून ती आटूनहि जाईल. कारण मग ब्रिटिश संबंध म्हणजे सामाजिक उलथापालथींची निशाणीच होऊन बसणार. आणि ज्या माझ्यासारख्या व्यक्तींना राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणजेच ब्रिटिश संबंधांची समाप्ति हवी आहे त्यांचीं मतें बदलून समाजवादी ब्रिटनशीं निकट संबंध असावेत असेंहि वाटूं लागेल. ब्रिटिश लोकांबरोबर सहकार्य करण्यास वस्तुतः आमच्यापैकीं कोणाचीच हरकत नाहीं. आम्हांला त्यांची ती साम्राज्यशाही तेवढी नको. ती नष्ट झाली कीं सहकार्याचा मार्ग खुला झालाच. मग नेमस्तांची वाट काय? हा देखील अगम्य अशा ईश्वरी लीलेचाच एक आविष्कार आहे असें समाधान ते मानून घेतील असा रंग दिसतो.

मंडलाकार परिषद् आणि फेडरेशनची सूचना यांच्यामुळें हिंदी संस्थानिक मात्र खूपच आघाडीला ढकलले गेले. त्यांच्या "स्वतंत्र अस्तित्वाविषयीं" कट्टर हुजूरपक्षीयांनीं जी आस्था प्रदर्शित केली, तिच्यामुळें त्यांना नवीन हुरूप चढला आहे. इतक्या सढळ हातानें त्यांच्यावर पूर्वीं कधींच मानपानाचा वर्षाव झालेला नव्हता. पूर्वीं ब्रिटिश रेसिडेंटनें डोळ्यानें नुसतें खुणावलें तरी त्याच्या विरुद्ध जाण्याची त्यांची प्राज्ञा नव्हती, आणि हिंदुस्थान सरकार तर अनेक राजेमहाराजांना उघड उघड तुच्छतेनें वागवीत असे. त्यांच्या राज्यकारभारांतहि सरकार नेहमीं ढवळाढवळ करी. अनेक प्रसगीं सरकारचें धोरण योग्यच असे म्हणा. आणि आजदेखील सरकारनें संस्थानिकांना "कर्जाऊ" दिलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांमार्फत अनेक संस्थानांवर ब्रिटिश सरकारचीच प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या हुकमत चालत असते. पण मि. चर्चिल आणि लॉर्ड रॉदरमिअर यांनीं चालवलेल्या चळवळीच्या धाकानें हिंदुस्थान सरकार जरासें हादरलें असून संस्थानिकांच्या निर्णयांत ढवळाढवळ करतांना तें जरा सावधगिरी बाळगूं लागलें आहे. उलट संस्थानिक मात्र जरा गुर्मीनेंच बोलूं लागलेले दिसतात.

हिंदी राजकारणावरील हे बाह्यतरंग समजून घेण्याचा मीं प्रयत्न चालवला होता. पण मनांत असा विचार येई कीं, ह्या सगळ्या बाह्यात्कारी गोष्टी आहेत. आपण अंतरंगाकडे पाहिलें तर किती खेदजनक प्रकार दृष्टीस पडतील. हरतऱ्हेच्या स्वातंत्र्याची गळचेपी, कल्पनातीत हालअपेष्टा व नैराश्य, प्रतिष्ठेचा दुरुपयोग आणि अनिष्ट वृत्तींना उत्तेजन, हेच प्रकार परिस्थितीच्या अंतरंगांत सुरू आहेत. शेंकडों लोक तुरुंगांत पडलेले आहेत; वर्षानुवर्षें ह्या तरुण मुलांचीं शरीरें झिजत आहेत, अन्तःकरणें भग्न होत आहेत.* त्यांच्या कुटुंबांतील मंडळींची, मित्रस्वकीयांची व

* सर हॅरी हेग यांनीं मध्यवर्ति कायदेमंडळांत २३ जुलै १९३४ रोजीं बंगालमध्यें १५०० ते १६०० व देवळी कॅंपमध्यें ५००, मिळून २००० ते २१०० विनाचौकशी कैदी असल्याचें सांगितलें.

हजारों इतर लोकांचीं मनें द्वेषानें माखून जात असून पाशवी शक्तीपुढें हतबल ठरणाऱ्या आपल्या दुबळेपणाच्या व अपमानाच्या भावनांमुळें त्यांचीं अन्तःकरणें पिचून चाललीं आहेत. शांततेच्या काळांत देखील अनेक संस्थांना बेकायदा ठरविण्यांत येत असून "निर्वाणीचे अधिकार" आणि "शांतता प्रस्थापनेचे कायदे" हीं सरकारी शस्त्रागारांतील कायमचीं हत्यारें होऊन बसलीं आहेत. "सी कस्टम ॲक्ट" च्या द्वारां पुष्कळशा पुस्तकांना आणि वृत्तपत्रांना बंदी करण्यांत येत आहे, अथवा तीं जप्त होत आहेत. "घातुक वाङ्मय" कोणाजवळ सांपडलें तर त्याला जबरदस्त शिक्षा होण्याचा संभव असतो. सद्यःकाळच्या आर्थिक व राजकीय परिस्थितीसबंधीं स्पष्टोद्गार काढले अथवा रशियांतील सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीविषयीं अनुकूल शब्द लिहिले तर लगेच नियंत्रक डोळे वटारतात. रशियांत स्वतः जाऊन आल्यानंतर रवींद्रनाथ टागोरांनीं लिहिलेला एक लेख प्रसिद्ध केला म्हणून बंगाल सरकारनें मॉडर्न रिव्ह्यूला तंबी दिली आणि तत्संबंधीं हिंदुस्थानच्या दुय्यम चिटणीसांनीं पार्लमेंटांत असे उद्गार काढिले कीं, "हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजवटी-बद्दल विपर्यस्त विचारसरणी त्या लेखांत व्यक्त झाली असल्यामुळें" संपादकांना समज देण्यांत आली. ब्रिटिश राजवटीनें काय ध्वज लावले तें ठरविण्याची सगळी काय ती अक्कल नियंत्रकालाच आहे. आमचें मत त्याच्या विरुद्ध असतां कामा नये व तें आम्हीं व्यक्तहि करतां उपयोगी नाहीं. डब्लिन सोसायटी ऑफ फ्रेंड्स् या संस्थेला रवींद्रनाथांनीं पाठविलेला संदेशदेखील सरकारला आक्षेपार्ह वाटला. सांस्कृतिक बाबींत विशेष लक्ष घालणारे आणि राजकारणापासून जाणूनबुजून दूर राहणारे, हिंदुस्थानला वंद्य आणि साऱ्या जगतांत मान्य असे, जे ऋषितुल्य रवींद्रनाथ त्यांची ही अशी मुस्कटदाबी, मग सामान्य जन म्हणजे कोणत्या झाडाचा पाला! आणि ह्या प्रत्यक्ष दडपशाहीपेक्षां देखील तिच्यामुळें जें भीतीचें वातावरण निर्माण होतें तें फार विषारी असतें. अशा परिस्थितींत वृत्तपत्रव्यवसायांत निर्भीडपणें बोलण्याची व इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण अथवा चालू घडामोडींसंबंधीं यथार्थ विवेचन करण्याची गोष्टच बोलावयास नको.* राज्यघटना आणि जबाबदार सरकार वगैरे गोष्टींचें देवक बसवण्यास ही फारच शुभ वेळ आहे म्हणावयाची?

---

* वृत्तपत्रांच्या कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधीं मध्यवर्ति कायदेमंडळांत सरकारतर्फे सांगण्यांत आलेली माहिती पाहा. (ता. ४-९-३५) जामीन व जप्ति यांचा टोला १९३० सालापासून ५१४ वर्तमानपत्रांच्या डोक्यांत बसला; अधिक जामिनकी भरणें अशक्य झाल्यामुळें ३४८. वृत्तपत्रें बंद पडलीं आणि १६६ वृत्तपत्रांनीं २,५२,८५२ रुपयांचे जामीन भरले.

१९३५ च्या उत्तरार्धांत वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारे अनेक कायदे तयार झाले. त्यांपैकीं "क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट" कायदेमंडळांत नापास झाला असूनहि गव्हर्नर जनरलनें शिक्केबाजी करून तो पास केला.

सध्यां सर्व जगभर विचारमंथन चालू असून विद्यमान परिस्थितीविषयीं अस्पष्ट पण फार तीव्र आणि सखोल असें असमाधान सर्वत्र फैलावलें आहे ही गोष्ट प्रत्येक बुद्धिवंताला ठाऊक आहे. दूर परिणामी स्थित्यंतरें आपल्या दृष्टीसमोर घडून येत असून भविष्यकाळाला कसाहि घाट येत असला तरी तत्त्वज्ञान्यांच्या, समाजवेत्त्यांच्या आणि अर्थशास्त्र्यांच्या पक्षपातविरहित ज्ञानचक्षूंनाच केवळ आकलन होईल इतकें त्याचें स्वरूप आतां अगम्य राहिलेलें नाहीं. भविष्यकाळाचें स्वरूप कसें असावें हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला आहे. तेव्हां कार्य-प्रवृत्त झालेल्या निरनिराळ्या समाजशक्तींचा विचार करून स्वतःचा पथ निश्चित करणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य ठरतें. एक जग संपून दुसरें जग जन्माला येत आहे. कोणत्याहि प्रश्नाचे उत्तर द्यावयाचें असेल तर त्या प्रश्नाचें स्वरूप प्रथम समजलें पाहिजे. म्हणून उत्तर शोधून काढण्याइतकेंच आपल्यापुढील प्रश्न समजावून घेणें देखील अगत्याचें आहे.

आमच्या राजकारण-विशारदांचें जागतिक घडामोडींविषयींचें अज्ञान अथवा अनास्था आश्चर्यकारक आणि खेदजनक आहे. हें अज्ञान अधिकारीवर्गापैकीं बहुतेक लोकांतमुद्धां आढळून येत असावें. कारण सिव्हिल सर्व्हिसमधील नोकर आपल्याच डबक्यांत मुखानें ठराव ठरांव करीत विहरत असतात. अगदीं वरचे जे अधिकारी आहेत त्यांना तेवढा ह्या प्रश्नांचा विचार करावा लागत असेल. कारण जागतिक घडामोडींचें निरीक्षण करूनच ब्रिटिश सरकारला आपलें धोरण आंखावें लागतें. हिंदुस्थानवरील ताबा व हिंदुस्थानचें संरक्षण या दोन गोष्टींची छाप ब्रिटिशांच्या परराष्ट्रीय धोरणावर बऱ्याच अंशानें पडत असते ही जगजाहीर गोष्ट आहे. पण जपानी साम्राज्यशाही, सोव्हियट रशियाचें वाढतें सामर्थ्य, सिनकियांग-मध्यें रशिया, जपान व इग्लंड यांचीं सुरू असलेलीं कारस्थानें, अथवा मध्यआशिया, अफगाणिस्थान व पर्शिया या देशांतील घडामोडी ह्या सर्वांचा हिंदी राजकारणाशीं फार निकटचा संबंध आहे ह्या गोष्टींचा आपल्या देशांतील कितीसे राजकीय पुढारी विचार करीत असतील? मध्य आशियांतील परिस्थितीचा शह काश्मीरला बसत असल्यामुळें ब्रिटिश धोरणाचें व स्वसंरक्षणात्मक हालचालींचें तें एक केंद्रस्थान बनून राहिलें आहे.

याहिपेक्षां जगांत होत असणाऱ्या आर्थिक घडामोडी फार महत्त्वाच्या आहेत. एकोणिसाव्या शतकांतील पद्धतींचा केव्हांच इतिश्री झाली, सध्यांच्या जगाला त्या काळचे सिद्धांत लागू पडत नाहींत ही गोष्ट आपण ध्यानांत वागवावयास हवी. मागच्या पायरीवरून पुढच्या पायरीवर पाय टाकावयाचा ही जी हिंदुस्थानांत फैलावलेली कायदेपंडिती वृत्ति ती निरुपयोगी ठरली आहे; कारण मागच्या पायऱ्या शिल्लक आहेतच कोठें? बैलगाडी रुळावरून पिटाळली म्हणून कांहीं तिला आगगाडी

म्हणतां येणार नाहीं. तिचे दिवस संपले. ती होळीच्या लांकडांतच जमा केली पाहिजे. रशियाच्या बाहेरदेखील नवोपक्रमांची व अपूर्व अशा फेरबदलांची भाषा सुरू आहे. भांडवलदारी पद्धति कायम ठेवण्याची पूर्ण इच्छा असूनहि "अतिरिक्त सत्ता प्राप्त झालेल्या वर्गाची खच्ची करून सत्ताशून्य लोकांचा उद्धार" करण्याची भाषा रूझवेल्ट बोलत आहे. त्याला यश येईल अथवा न येईल. परंतु त्याची धडाडी व चाकोरींतून आपल्या देशाचा गाडा बाहेर खेंचून काढण्याची त्याची इच्छा अमान्य करतां यावयाची नाहीं. धोरण बदलण्याची अथवा आपल्या चुका कबूल करण्याची त्याला धास्ती वाटत नाहीं. इंग्लंडांतहि मि. लॉइड जॉर्ज ह्यांनीं आपल्या नवोपक्रमाची ध्वजा फडकवली आहेच. हिंदुस्थानांत देखील अनेक नवोपक्रम व्हावयास पाहिजेत. "जाणण्यासारखें होतें तें सर्व पूर्वींच जाणलें आहे आणि करण्यासारखें होतें तें सर्व पूर्वींच केलें आहे" ही वृत्ति आत्मघातकी आणि आचरट-पणाची ठरेल.

अनेक प्रश्न आपणांस सोडवावयाचे आहेत. तेव्हां मन खंबीर करून आपण कार्याला आरंभ केला पाहिजे. जनतेच्या स्थितींत उत्तम प्रकारची सुधारणा घडवून आणणें जर सध्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पद्धतीला शक्य होत नसेल, तर ती पद्धति जीवंत ठेवावी तरी कशाला? तशी सुधारणा घडवून आणील अशी दुसरी एकादी पद्धति उपलब्ध आहे काय? केवळ राजकीय स्थित्यंतर घडवून आणले म्हणून समाजांत आमूलाग्र फरक घडून येणें शक्य होईल काय? अत्यंत इष्ट अशा प्रकारच्या स्थित्यंतरांच्या मार्गांत जर वरिष्ठ वर्गाचा अडथळा होत असेल, तर जनतेला तशीच विपत्तींत व दारिद्र्यांत खितपत ठेवून वरिष्ठ वर्गाच्या हितसंबधांचें रक्षण करीत बसणें योग्य कसें ठरेल? त्यांच्याशीं समेट करणें शक्य झालें तर तें हवेंच आहे. समेटाच्या न्याय्य-अन्याय्यपणाबद्दल मतभेद होतील. पण अशा समेटाची आज जरूरी आहे. हा समेट म्हणजे अर्थातच एका वरिष्ठ वर्गाचें उच्चाटन करून त्याच्या जागीं दुसऱ्या वरिष्ठ वर्गाची प्रस्थापना करणें नव्हे. शक्य व इष्ट असेल तेथें योग्य ती भरपाई द्यावी. कारण भरपाईच्या रकमेपेक्षां लढा झाला असतां लागणारा पैसा किती तरी पटींनीं अधिक असणार. परंतु वरिष्ठ वर्ग अशा समेटाला तयार होत नाहींत अशीच दुर्दैवानें इतिहासाची शिकवणूक आहे. ज्या वर्गाचें समाजांतील कार्य संपलेलें आहे ते अतिशय मद्द होत जातात, आणि बसेन तर अंबारींत नाहीं तर धुळींत अशी वृत्ति ठेवल्यामुळें ते धुळीलाच मिळाल्याचे दाखले दिसून येतात.

खाजगी मालमत्तेची जप्ती वगैरेसारखे शब्द भरमसाटपणें वापरले जात आहेत. पण वर्तमान सामाजिक घटनेमध्यें जप्तीची पद्धति सरसकट सुरूच नाहीं का? ती बंद व्हावी यासाठीं तर समाजांत फेरबदल करावयाचा आहे. मजुराच्या श्रमफलाचा अपहार अथवा जप्ती हरघडी होत असते. खंड अथवा सारा

भरमसाट प्रमाणांत वाढवून शेतकऱ्यांच्या जमिनी सरतेशेवटीं गिळंकृत करण्यांत येतात. पूर्वी अखिल समाजाच्या मालकीच्या जमिनी व्यक्तींनीं बळकावल्या व त्यांचें रूपांतर मोठमोठ्या खाजगी जमिनींत झालें. स्वतःचा तुकडा कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी देखील अशाच प्रकारें नाहींशा झाल्या. सध्यांची समाज-पद्धति अपहाराच्या पायावरच आधारलेली असून अपहारावरच ती जगत आहे.

ह्यांतून मार्ग काढण्यासाठीं समाज उत्पन्नावरील कर, मृत्यु-कर, वगैरेसारख्या ज्या उपाययोजना करीत असतो, त्यादेखील जप्तीच्याच स्वरूपाच्या आहेत. कर्जाऊ घेतलेल्या अवाढव्य रकमा रशियन सरकारनेंच नव्हे, तर इतर राष्ट्रांनींहि नाकारल्याचीं उदाहरणें नुकतींच घडून आलेलीं आहेत. त्याचें अगदीं ठळक उदाहरण म्हणजे ब्रिटिश सरकारनें नाकारलेलें अमेरिकेचें कर्ज होय. हा कित्ता हिंदुस्थानपुढें ठेवणें किती भयंकर आहे, नाहीं? तथापि अशा तऱ्हेनें केलेली जप्ती अथवा अपहार मूलभूत प्रश्न सोडविण्याच्या कामीं फारच थोड्या प्रमाणांत उपयोगी पडतो. नव समाजाची रचना करावयाची असेल तर अपहाराचें समूळ उच्चाटनच करावयास हवें.

सध्यांची परिस्थिति बदलण्याचा उपाय शोधतांना अशा बदलापासून भौतिक व आध्यात्मिक नुकसान किती पोंचेल त्याची गणती केली पाहिजे. केवळ तात्पुरत्या लभ्यांशाकडे दृष्टि देऊन चालणार नाहीं. आपण ज्या पद्धतीचा स्वीकार करतों तिच्या योगानें भौतिक व आध्यात्मिक अशा दोन्ही तऱ्हेच्या मानवी सुखांत व प्रगतींत सरते शेवटीं किती भर पडेल त्याचा अंदाज करणें जरूर आहे. परंतु ही मोजदाद करतांना सद्यःस्थिति न बदलल्यामुळें होणारें अपरिमित नुकसान, आशाभग झालेले व अनिष्ट मार्गाला लागलेले जीव, उपासमार व हालअपेष्टा आणि आध्यात्मिक व नैतिक अधोगति यांचीदेखील नोंद व्हावयास हवी. वर्षाकाठीं येणाऱ्या पुराप्रमाणें सध्यांची ही आर्थिक पद्धति असंख्य लोकांना जावें बुडवून मृत्युसागराकडे ओढून नेत आहे. गाडग्यामडक्यांनीं पाणी उपसून काढून हा पूर थांबवणें अथवा संकटग्रस्त लोकांना वांचविणें शक्य नाहीं. त्यासाठीं बंधारेच उभारले पाहिजेत, कालवे खणले पाहिजेत आणि पाण्याच्या संहारक शक्तींना लगाम घालून त्यांना मानवी हितासाठीं राबविलें पाहिजे.

समाजसत्तावादाला इष्ट वाटणारें स्थित्यंतर तडकाफडकीं चार-दोन कायदे मंजूर करून घडवून आणतां येणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. परंतु कांहीं मूलभूत कायदे व त्यांची अंमलबजावणी करण्याचें सामर्थ्य हीं प्रगतीची दिशा नक्की करण्यासाठीं व नव्या समाजरचनेचा पाया आंखण्यासाठीं आवश्यक असतात. आपणास जर समाजरचनेची प्रचंड इमारत उठवावयाची असेल तर नशिबावर हवाला ठेवून चालणार नाहीं. थबकत थबकत काम चाललेच आहे व मध्यंतरींच्या काळांत, उभारलेली इमारत ढांसळून पडतेच आहे अशा प्रकारें काम करून निभाव लागणार

नाहीं. मार्गांतील प्रचंड अडथळे दूर सारले पाहिजेत. लुबाडणें हें ध्येय नसून पुरवठा करणें, सध्यांची चणचण घालवून समृद्धि निर्माण करणें हें आपलें ध्येय होय. परंतु तें साध्य करून घेतांना समाजाची प्रगति कुंठित करणाऱ्या मार्गावरील आडकाठ्या आणि स्वार्थरूपी सराटे उडवून लोटून टाकावयास हवेत. आणि आमची आवड-निवड अथवा न्यायाची कल्पना यांचा विचार करून हा नवा मार्ग आंखण्यांत येणार नाहीं, तर जो आर्थिक दृष्ट्या योग्य, बदलत्या परिस्थितीशीं जुळता, प्रगतिक्षम व अधिकांत अधिक लोकांना कल्याणप्रद असा ठरेल, तोच मार्ग पसंत करण्यांत येईल.

मात्र हितसंबंधांत विरोध येणे अपरिहार्य दिसते. दोघांनाहि कल्याणप्रद असा मध्यम मार्ग उपलब्ध झालेला नाहीं म्हणून कोणत्या गटांत जावयाचें ते प्रत्येकानें ठरवून ठेवावें. परंतु तें ठरविण्याच्या आधीं आपण परिस्थिति समजावून घेणें आवश्यक आहे. समाजवाद भावनेला पटतो एवढ्यानें भागणार नाहीं. वस्तुस्थिति, पूर्वोत्तरपक्ष आणि तपशीलवार टीका यांच्या कसोटीवर घांसून तो आपण आपल्या बुद्धीला पटविला पाहिजे. पाश्चात्य देशांत अशा प्रकारचें वाङ्मय मुबलक निर्माण झालें आहे. परंतु हिंदुस्थानमध्यें अशा वाङ्मयाचें दुर्भिक्ष्य असून अनेक चांगल्या चांगल्या ग्रंथांना या देशांत मज्जाव करण्यांत येतो. परंतु इतर देशांतील पुस्तकें वाचलीं म्हणजे सर्व संपलें असें नव्हे. समाजवाद हिंदुस्थानांत प्रस्थापित करावयाचा तर हिंदुस्थानांतील परिस्थितीला अनुलक्षूनच त्याची मांडणी होणें जरूर असल्यामुळें देशांतील परिस्थितीचा सखोल असा अभ्यास होणें अवश्य आहे. असा अभ्यास करून तपशीलवार योजना आंखणारे तज्ज्ञ आपणांस मिळाले पाहिजेत. परंतु दुर्दैवानें आमच्या बहुतेक तज्ज्ञांच्या पायांत सरकारची अथवा निमसरकारी विश्वविद्यालयाची रुपेरी बेडी अडकली असल्यामुळें त्यांची मजल फार लांबवर जात नाहीं.

समाजवाद प्रस्थापित करण्यास केवळ बौद्धिक तयारी पुरेशी नाहीं. इतर सामर्थ्यहि जमविलें पाहिजे. तथापि बुद्धीचें पाठबळ असल्याशिवाय विषयाचें बिनचूक आकलन होणार नाहीं व प्रचंड अशी चळवळहि आपणास उभारतां यावयाची नाहीं. सध्यांच्या घडीला हिंदुस्थानांत शेतकऱ्यांचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला असून त्याचें महत्त्व पुढेंहि कदाचित तसेंच राहील. परंतु त्या प्रश्नाच्या खालोखाल उद्योगधंद्यांचें महत्त्व असून तें मला वाटत आहे. शेतकऱ्यांचें राज्य हें आपलें ध्येय कीं कामकऱ्यांचें राज्य हें आपलें ध्येय? आपल्या देशांत शेतकऱ्यांचें वर्चस्व हें राहणारच, परंतु आपण उद्योगधंद्यांची सुद्धां प्रगति केली पाहिजे असें मला वाटतें.

आमच्याकडील पहिल्या प्रतीच्या कारखानदारांच्या कल्पना देखील कमालीच्या मागसलेल्या आहेत; त्यांची भांडवलशाही सुद्धां अद्ययावत् नाहीं. जनसमुदाय इतका दरिद्री आहे कीं तो कधीं काळीं आपला गिऱ्हाइक बनेल असें त्यांना वाटत नसल्या-

कारणानें मजुरी वाढवा अगर कामाचे तास कमी करा असें म्हटलें कीं ते दांतओंठ खाऊं लागतात. अलीकडे कापड-गिरण्यांतील कामाचे तास दहावरून नवावर आले आहेत ही सबब पुढें करून अहमदाबादच्या गिरणीमालकांनीं उक्त काम करणाऱ्या कामगारांसकट सर्वांचीच मजुरी छाटली आहे. म्हणजे कामाचे तास कमी झाल्या-बरोबर प्राप्ति कमी झाली व त्यामुळें आधींच निकृष्ट असणाऱ्या राहणीचें मानहि उतरलें. गिरण्यांतून यंत्रसुधारणा झपाट्यानें होत चालली असून त्यामुळें मजुरा-वरील कामाचा बोजा व त्याचे श्रम वाढत आहेत. त्याच्या मजुरींत मात्र त्या प्रमाणांत वाढ होत नाहीं. औद्योगिक क्षेत्रांतील सर्व दृष्टिकोणच अत्यंत पुराणा असा आहे. संधि सांपडली कीं मालक गडगंज नफा मिळवितात, पण मजुराला मात्र तसाच रखडत ठेवतात. आणि बाजारभाव पडले कीं पगारकाट केल्यावांचून कारखाने चालविणें शक्य नाहीं अशा बयादीहि मालकवर्ग सांगूं लागतो! त्यांना सरकारकडून मदत मिळते इतकेंच नव्हे, तर मध्यम वर्गाची देखील सहानुभूति बहुधा त्यांच्याच बाजूला असते. परंतु एकंदरीनें पाहतां बंगालमधील ज्यूटमजुरांपेक्षां व खाण-कामगारांपेक्षां कापडाच्या गिरणींतील मजुरांची स्थिति जरा बरी आहे. छोट्यांत छोट्या कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची स्थिति तर खरोखरीच अत्यंत निकृष्ट दर्जाची असते. ज्यूट व कापड-गिरण्यांच्या लक्षाधीश मालकांचे भव्य प्रासाद आणि त्यांच्या सुखविलासाचीं प्रदर्शनें पाहावीं आणि अर्धनग्न मजुरांच्या तबेल्याकडे दृष्टि टाकावी, म्हणजे मनाला फारच उत्कृष्ट असा बोध होईल. पण हे विरोध असावयाचेच असें मानून आपण वागत असल्यामुळें आपल्या अन्तःकरणावर अशा दृश्यांचा परिणाम घडत नाहीं.

हिंदी मजुराचे नशीब फुटकें तर खरेंच, परंतु प्राप्तीच्या दृष्टीनें विचार केला तर हिंदी शेतकऱ्यापेक्षां त्याचीच स्थिति बरी असें म्हणावें लागेल. शेतकऱ्याची एक सोय मात्र फार छान होते. त्याला मुबलक ताजी हवा मिळते आणि मजुराप्रमाणें उकिरड्यासारख्या घरांत त्याला राहावें लागत नाहीं. परंतु दारिद्र्यांत तो असा आकंठ बुडालेला आहे कीं, गांधीजींनीं म्हटल्याप्रमाणें हवाशीर अशा आपल्या खेड्याला सुद्धा तो उकिरड्याचें स्वरूप प्राप्त करून देतो. सहकार्याच्या अथवा सामाजिक हितासाठीं कराव्या लागणाऱ्या सामुदायिक प्रयत्नांच्या कल्पनादेखील त्याच्या मनाला शिवत नाहींत. त्याबद्दल त्याला दोष देणें फार सोपें काम आहे. परंतु चोहोंकडून गांजलेला व अव्याहत खडतर श्रम करणारा असा बिचारा शेतकरी करील तरी काय? तो जिवंत तरी कसा राहतो याचेंच मला आश्चर्य वाटतें. १९२८-२९ सालीं पंजाबांतील शेतकऱ्याची दैनिक प्राप्ति सुमारें ९ आण्यांची होती असें सिद्ध झालें आहे. ती १९३०-३१ सालीं ३ पैशांवर आली. आणि हा पंजाबांतील शेतकरी संयुक्तप्रांत, बिहार आणि बंगाल या प्रांतांतील शेतकऱ्यां-पेक्षां फार सुखी असें मानण्यांत येतें. संयुक्त प्रांताच्या गोरखपूर वगैरे पूर्वेकडील

जिल्ह्यांत तर आर्थिक मंदीच्या अगोदर म्हणजे ऐन भरभराटीच्या काळांत शेतावरील मजुराला रोज २ आणे मिळत असत. असल्या महाभयंकर परिस्थितींत भूतदयेच्या अथवा ग्रामसुधारणेच्या स्थानिक प्रयत्नांनीं सुधारणा घडवून आणूं असें म्हणणें म्हणजे शेतकऱ्यांची व त्यांच्या दारिद्र्याची टवाळी करण्याप्रमाणें आहे.

मग ह्या कर्दमांतून आपण बाहेर पडणार तरी कसे? इतक्या हीन स्थितीस पोहोंचलेल्या जनसमुदायाचा उद्धार करणें अवघड असलें तरी मार्ग काढतां येईल ह्यांत शंका नाहीं. परंतु सद्यःस्थितींत ज्यांना बदल नको त्यांच्याकडून विरोध होत असतो हीच खरी अडचण आहे. साम्राज्यशाहीचा अंमल चालू असेतोंपर्यंत कोणताहि बदल होणें शक्य वाटत नाहीं. आगामी कालांत हिंदुस्थान कोणता मार्ग स्वीकारील? समाजवाद आणि लष्करी भांडवलशाही (फासिझम) ह्या आधुनिक युगांतील दोन प्रमुख प्रवृत्ति असून अधल्या मधल्या प्रवृत्ति व गट हळूहळू नामशेष होत चालले आहेत. हिंदुस्थान राष्ट्रीय समाजवादाकडे म्हणजे एक प्रकारच्या लष्करी भांडवलशाहीकडे वळेल असें सर माल्कम हेले यांनीं भाकित केलेलें आहे. अगदीं नजीकच्या भविष्यकाळापुरतें त्यांचें भाकित कदाचित् खरेंहि ठरेल. हिंदुस्थानांतील व विशेषतः बंगालमधील तरुण स्त्री-पुरुषांत लष्करी भांडवलशाहीच्या कल्पना उदित होत असल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत असून कॉंग्रेस-मध्येंहि त्यांचें प्रतिबिंब दिसूं लागलें आहे. पाशवी अत्याचारांशीं लष्करी भांडवल-शाहीचें दृढ साहचर्य असल्यामुळें कॉंग्रेसमधील अहिंसावादी जुन्या पुढाऱ्यांना लष्करी भांडवलशाहीचा तिटकारा वाटतो. परंतु लष्करी भांडवलशाहीच्या मागें खाजगी मालमत्ता संरक्षण करणाऱ्या व वरिष्ठ वर्गांचे हितसंबध नष्ट न करतां ते नियंत्रित करणाऱ्या सामन्वयिक राज्ययंत्राच्या तत्त्वज्ञानाचा जो आभास निर्माण करण्यांत येत असतो तो त्यांना मान्य होईलसें वाटतें. जुनें ठेवणारा व नवें पचवणारा हा मार्ग सुरुवातीला मोठा आकर्षक दिसतो. तो अनुसरणें शक्य आहे कीं नाहीं तें अलाहिदा.

लष्करी भांडवलशाहीचा जोमदार पुरस्कार साहजिकच मध्यम वर्गांतील तरुणांकडून होणार. वस्तुस्थिति पाहिली तर असें दिसेल कीं, मध्यम वर्गांतील कांहीं गटच क्रांतिकारक आहेत, शेतकरी कामकरी वर्ग नव्हेत. अर्थात् कारखाने वगैरेंतून काम करणाऱ्या मजुरांत सुप्त असें क्रांतिसामर्थ्य मध्यमवर्गापेक्षां अधिक असतें ही गोष्ट निःसंशय. राष्ट्रवादी मध्यम वर्गांत लष्करी भांडवलशाहीचीं बीजें पेरण्यास सुपीक जमीन मिळेल. परंतु जोंपर्यंत येथें परराज्य आहे तोंपर्यंत युरोपप्रमाणें लष्करी भांडवलशाहीचा फैलाव येथें होणें शक्य नाहीं. कारण हिंदुस्थानांतील लष्करी भांडवलशाहीला सुद्धां स्वातंत्र्यासाठीं लढावें लागणारच; तेव्हां तिला ब्रिटिश साम्राज्य-शाहीशीं सोयरीक जुळवून चालावयाचें नाहीं. आणि स्वातंत्र्यासाठीं जनतेचें पाठबळ तर हस्तगत केलेंच पाहिजे. ब्रिटिश सत्ता पार झुगारून दिली तर मात्र वरिष्ठ

मध्यम वर्ग व भांडवलदार यांच्या साहाय्याच्या बळावर लष्करी भांडवलशाहीची वाढ झपाट्यानें होणें शक्य दिसतें.

पण ब्रिटिश सत्तेचा पाय येथून लवकर निघेल असें लक्षण दिसत नाहीं. शिवाय ब्रिटिश सरकारच्या जबर दडपशाहीला न जुमानतां समाजवादी कल्पनांचा प्रसारहि इकडे होतच आहे. हिंदुस्थानांत कम्युनिस्ट पक्ष बेकायदेशीर ठरविण्यांत आला असून कम्युनिस्टांविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्यांची व प्रगतिपर कार्यक्रमाचा पुरस्कार करणाऱ्या मजूर-संघांचीहि कम्युनिस्टांतच गणना करण्यांत येत असते.

लष्करी भांडवलशाही व समाजवाद या दोहोंपैकीं समाजवादालाच माझी पूर्ण सहानुभूति आहे. माझ्या मनाचे धागे अद्यापि एकोणिसाव्या शतकांत बरेचसे गुरफटलेले असून माझ्या मनावर बसलेला भूतदयात्मक प्रागतिक परंपरेचा ठसाहि साफ धुवून निघालेला नाहीं हे ह्या पुस्तकावरून लक्षांत येईलच. ही मध्यमवर्गीय विचारसरणी सावलीप्रमाणें माझ्या मागोमाग जेथें तेथें येत असलेली पाहून अनेक समाजवाद्यांना मोठा उद्वेग वाटत असेल. मला शब्दप्रामाण्याचा तिटकारा आहे आणि कार्ल मार्क्सच्या ग्रंथांना अपौरुषेय श्रुतींप्रमाणें मानून आधुनिक कम्युनिस्टांप्रमाणें त्यांचे जटापाठ, घनपाठ करावे व पाखंड्यांना निपटून काढावेत हें धोरण मला पसत नाहीं. रशियांतील अनेक गोष्टी व विशेषतः शांततेच्या काळांत तेथें घडलेली अतिरिक्त हिंसा देखील मला गर्ह्य वाटते. तथापि कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाकडे मात्र मी अधिकाधिकच आकर्षित होत चाललों आहें.

मार्क्सचीं कांहीं विधानें चुकलीं असतील, त्याचा मूल्य सिद्धांत बरोबर नसेल, त्याबद्दल अधिकारानें बोलण्याची माझी लायकी नाहीं. परंतु सामाजिक देहासंबंधींचें त्याचें सूक्ष्म व बिनचूक ज्ञान केवळ अलौकिक होतें. आणि हें सूक्ष्म ज्ञान त्याच्या शास्त्रीय अनुमानपद्धतीमुळेंच त्याला प्राप्त झालें असावें. ह्या मार्क्सप्रणीत अनुमानपद्धतीची कसोटी गतेतिहासाला व चालू घडामोडींना लावली म्हणजे त्यांचें आकलन जितक्या उत्तम रीतीनें होतें तितकें दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीचा अवलंब करून होणार नाहीं. आणि ह्याच कारणामुळे आजच्या जगांत चाललेल्या स्थित्यंतरांचें मर्मग्राहि व सूक्ष्मविवेचनात्मक असें पृथक्करण फक्त मार्क्सवादी लेखकांच्या हातूनच झालेलें आढळून येईल. उत्तर कालांतील सामाजिक प्रवाहांकडे मार्क्सचें लक्ष गेलें नाहीं अथवा त्यांना क्षुद्र लेखण्यांत त्याची चूक झाली हें सिद्ध करणें सोपें आहे. मध्यमवर्गांत क्रांतिकारक घटक निर्माण होतात हें आज ठळकपणें दिसत आहे. परंतु शब्दप्रामाण्याचें उच्चाटन, एका विशिष्ट दृष्टिकोणावर व तर्कपद्धतीवर भर, आणि मनुष्यकर्माकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टि ह्या मला मार्क्सवादांतील बहुमोल गोष्टी वाटतात. मार्क्सनें दाखवलेल्या मार्गानें गेलें म्हणजे सद्यःकालीन समाजाचें सम्यक् दर्शन घडून कार्याचा आणि या कोंडींतून बाहेर नेऊन सोडणाऱ्या वाटेचा बोध होऊं लागतो.

त्याची कार्यपद्धति देखील ठोकळेवजा व नाफेरवादी नाहीं. परिस्थित्यनुरूप बदलणारी अशी ती आहे. निदान लेनिनचें मत तरी तसें दिसतें. बदलत्या परिस्थितीला जुळता असा कार्यक्रम आंखून लेनिननें आपल्या मताचें बिनतोड समर्थन करून दाखविलें आहे. "एका विशिष्ट घटकेला विकासाच्या एका विशिष्ट ईयत्तेपर्यंत पोंचलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीची तपशीलवार छाननी केल्याशिवाय चढाईचीं निश्चित साधनें कोणतीं ह्या प्रश्नाचें अस्ति अथवा नास्ति पक्षीं उत्तर देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे मार्क्सवादाचा त्याग करण्याप्रमाणें आहे." "कोणतीहि गोष्ट निर्णयात्मक नाहीं; परिस्थितीपासून आपण नेहमीं बोध घेत असलें पाहिजे," अशीं लेनिनचीं वाक्यें आहेत.

मार्क्सवाद्यांचा दृष्टिकोण अशा प्रकारें विशाल व सर्वकष असल्याकारणानें खरा ज्ञाता समाजवादी सर्व समाजजीवन हें कांहीं अंशीं एकदेहात्मक आहे असें समजतो. राजकारण म्हणजे संधिसाधूपणाची तारीखवार जंत्री, अथवा मार्ग हुडकण्यासाठीं चाललेली अंधारांतील धडपड, असें तो मानीत नाहीं. ज्या कल्पनांसाठीं व ध्येयासाठीं तो झगडतो, त्यांच्या योगानें त्याच्या धडपडीला व स्वार्थत्यागाला कांहीं अर्थपूर्णता प्राप्त होत असते. मानवी भवितव्य सत्यसृष्टींत उतरवण्यासाठीं ज्या प्रचंड फौजा पुढें सरसावत आहेत, त्यांच्यापैकींच आपण एक आहोंत अशी भावना त्याच्या मनांत प्रज्वलित होऊन इतिहासाच्या खांद्याशीं खांदा भिडवून आपण चाललों आहों असा विश्वास त्याला वाटूं लागतो.

सर्वच समाजवादी समाजाकडे अशा दृष्टीने पाहत असतील असें नव्हे. समाजजीवनाच्या एकदेहीपणाची पुरेपूर कल्पना कदाचित् एकाद्या लेनिनलाच ग्रहण करतां आल्यामुळें त्याचें कार्य इतकें प्रभावी झालें असावें. परंतु सामाजिक आंदोलनांचें तत्त्व ज्या ज्या समाजवाद्याला उमगलेलें आहे, त्याला त्याला थोड्याफार प्रमाणांत तरी ही कल्पना आलेली असतेच.

पुष्कळशा कम्युनिस्टांबरोबर चर्चा करतांना डोकें शांत ठेवणें फार कठीण जातें. दुसऱ्यांना दुखविण्याची त्यांना एक विचित्र सवय जडलेली आहे. परंतु त्यांचें जीवन मोठें खडतर असून रशियाव्यतिरिक्त इतर देशांत त्यांना आत्यंतिक अडचणींशीं झगडावें लागत आहे. त्यांचें अलोट धैर्य व उंचा स्वार्थत्याग मला नेहमींच कौतुकास्पद वाटतो. लक्षावधि अज्ञात लोक नानातऱ्हेच्या अनेक हालअपेष्टा भोगीत असतात, तसेच कम्युनिस्ट दुर्बल अत्यंत हालांत दिवस घालवतात. पण निर्दय आणि सर्वशक्तिमान् अशा देवाची ही सारी करणी आहे असा आंधळा विश्वास ठेवून ते हाल काढीत नाहींत. तर मानवी जीवनांत इतिहासप्राप्त अशीं हीं दुःखें आहेत असें मानून ते वागतात, आणि त्यांच्या वागण्यांत एक प्रकारचा उदासवाणी परंतु अभिजातपणाची छटा उमटलेली आढळून येते.

रशियांत चाललेल्या सामाजिक प्रयोगांना यश लाभो वा न लाभो, मार्क्सच्या सिद्धांतांचे गुणावगुण त्यावरून ठरणार नाहींत. रशियांतील प्रयोग कांहीं अस्मानी-सुलतानी होऊन अथवा शत्रुराष्ट्रांच्या सामुदायिक चढाईमुळें फसतील सुद्धां. तसा फारसा संभव दिसत नसला, तरी रशियांतील प्रयोग अयशस्वी होतील अशी कल्पना करणें शक्य आहे. परंतु रशियाचे प्रयोग फसले तरी रशियांत झालेल्या प्रचंड सामाजिक उलथापालथींचें महत्त्व कमी व्हावयाचें नाहीं. तेथें घडलेल्या अनेक गोष्टी माझ्या स्वभावाला मुळींच परवडत नाहींत. तरी देखील तेथील सामाजिक प्रयोगांनीं जगाला आशेचा सर्वश्रेष्ठ असा मार्ग दाखवून दिला आहे असें मात्र मला वाटतें. मला भीति वाटते ती एवढीच कीं हिंसेच्या व दडपशाहीच्या अतिरेकामुळें रशियांत अशी एक प्रथा रूढ होऊन राहील कीं जी बुजतां बुजणार नाहीं. तथापि आपल्या हातून झालेल्या प्रमादापासून योग्य तो बोध घेण्याची तयारी रशियाच्या भाग्यविधात्यांनीं ठेवलेली आहे, ही गोष्ट त्यांच्या गुणाचीच निदर्शक होय. चुकीचें धोरण ते मागें घेतात आणि पुन्हां नवी उभारणी करतात. ध्येयाचा नंदादीप त्यांच्या हातीं सतत पाजळलेला असतो. कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय मंडळामार्फत इतर देशांत चालवलेल्या कार्याची मात्र वाताहात झालेली आहे. पण सध्या ते उद्योग त्यांनीं आंखडते घेतलेले दिसतात.

हिंदुस्थानकडे पाहिलें तर समाजवाद " बहोत दूर " आहे असें वाटतें. बाह्य परिस्थितीच्या दडपणानें इतिहासाला झपाट्यानें पुढें ढकललें तर गोष्ट निराळी. सध्यां आपणाला दोन हात करावयाचे आहेत ते समाजवादाशीं नव्हेत, तर जातिवादाशीं. हिंदुस्थानांतील जातीय दृष्टि अगदींच अंध आहे. कर्तृत्ववंतांचें सारें कर्तृत्व ह्या चवली-पावलीएवढ्या क्षुद्र गोष्टींत, कारस्थानांत आणि डावपेंचांत संपून जातें व ते एकमेकावर मात करण्यांत गुंतलेले असतात. जग सुधरावें, उजळावें असें त्यांच्यापैकीं फारच थोड्यांना वाटत असेल. पण कदाचित् हे ढग वळवाचे ठरून लवकरच पांगूनहि जातील.

या जातीय अंधारांतून कॉंग्रेस मुक्त राहिलेली आहे. परंतु तिचा दृष्टिकोण देखील कनिष्ठ मध्यमवर्गीय असून जातीय व इतर दुःखांच्या परिहाराचे उपाय शोधतांना तो दृष्टिकोन कायमच राहतो. पण तशी दृष्टि ठेवून कॉंग्रेसला यश येणार नाहीं. कनिष्ठ मध्यमवर्गाची ती प्रतिनिधि बनली आहे. कारण आज तोच वर्ग चळवळ्या आणि क्रान्तिकारक असा आहे. परंतु दिसतो तितका तो वर्ग प्रबळ नाहीं. दोन बगलांकडून दोन शक्तींचें जोराचें दडपण त्याच्यावर पडत आहे. एक बलाढ्य असून दुसरी या घटकेला कमकुवत असली तरी तिचें बळ झपाट्यानें वाढत आहे. कनिष्ठ मध्यमवर्गाच्या जीवनांत ही मोठी आणीबाणीची वेळ येऊन ठेपलेली असून भविष्यकाळांत ह्या वर्गाचें पाऊल कसें पडेल ते सांगतां येणार नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवण्याचें इतिहासदत्त कर्तव्य पार पाडल्याशिवाय बलाढ्य अशा

वरिष्ठवर्गाला जाऊन मिळणें सुद्धां त्याला शक्य होणार नाहीं. परंतु असें घडून येण्याच्या अगोदरच सध्या कमताकद दिसणारा दुसरा वर्ग शक्तिसंपन्न बनून तो कनिष्ठ मध्यमवर्गाला आपल्या मार्गाकडे वळवील अथवा त्याला हळूहळू हुसकूनहि लावील. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न जोंपर्यंत बऱ्याच प्रमाणांत सुटला नाहीं, तोंपर्यंत कॉंग्रेसचें वर्चस्व हिंदी राजकारणांत कायमच राहणार.

कोणत्याहि प्रकारच्या हिंसामय कार्यक्रमाचा विचारच आपणांस कर्तव्य नाहीं; कारण तो कार्यक्रम अनिष्ट व निष्फळ ठरेल. तुरळक व फुटकळ अशीं हिंसाकर्मे अद्यापि घडत असलीं तरी ह्या कार्यपद्धतीचें वैफल्य लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें आहे असें मला वाटतें. हिंसेचा मार्ग स्वीकारला तर हिंसा आणि प्रतिहिंसा यांच्या गुंताड्यांत सांपडून त्यांतून बाहेर पडतां पडतां आपली दमछाक होईल.

कोणी म्हणतात कीं आपसांत एकी करून आपण एकजूट करावयास हवी. आपल्या काव्यशक्तीचा उपयोग करून श्रीमती सरोजिनी नायडू एकजुटीची तरफदारी करीत असतात. स्वतः कवयित्री असल्यामुळें संवाद आणि सुसंगति यांचा आग्रहानें पुरस्कार करण्याचा त्यांना अधिकारच आहे. "एकजूट" केव्हांहि इष्टच आहे; मात्र त्यांत खरीखुरी जूट असावी. पण या शब्दार्चा फोड करूं लागलें म्हणजे असें निष्पन्न होतें कीं मूठभर पुढाऱ्यांत समेट घडावा एवढेच ह्या शब्दाचा आग्रह धरणारांना हवें आहे. असली एकजूट झाल्यावर सर्वांत अधिक नेमस्त व फाजिल दक्ष असतील ते ठरवतील तें ध्येय व म्हणतील ती चाल असा प्रकार घडतो. पुष्कळ पुढाऱ्यांना कसल्याहि प्रकारची हालचाल सोसत नाहीं, ही गोष्ट तर सुविख्यातच आहे. तेव्हां एकजुटीचा परिणाम असा घडेल कीं मेढ्यांच्या पंजऱ्याप्रमाणें सर्व गट बसल्या जागीं आखून राहतील, अथवा मनगटाशीं मनगट जुळवून मोहरा करण्याऐवजीं सर्वजण माघार घेण्यांत मात्र एकजूट दाखवतील !

दुसऱ्या लोकांशीं आम्हीं सहकार्य करणार नाहीं अथवा त्यांच्याशीं समेट करणार नाहीं असें म्हणणें अर्थातच वेडेपणाचें होईल. जीवनाचे व राजकारणाचे मार्ग इतके सरधोपट नसतात. त्यांची विलक्षण गल्लत झालेली आढळते. लेनिन एवढा कडवा क्रांतिकारक, पण त्यानें असें म्हटलें आहे कीं, "समेट न करतां, जरा देखील मार्ग न सोडतां पुढें जाऊं असें म्हणणें हें क्रान्तिकारक वर्गाला शोभेसें धोरण नसून तो बुद्धीचा उथळपणा आहे." राजकारणांत तडजोडी ह्या व्हावयाच, त्यांची खंत बाळगण्याचें कारण नाहीं. परंतु आपण समेट केला अथवा न केला तरी प्रधान गोष्टींना नेहमींच प्रथम स्थान मिळेल आणि गौण गोष्टींना त्यांच्यापेक्षां अधिक महत्त्व प्राप्त होणार नाहीं, याबद्दल मात्र विशेष दक्षता राखली पाहिजे. आपलीं तत्त्वें व आपलें ध्येय ठाम असेल तर तात्पुरत्या समेटानें कांहीं बिघडावयाचें नाहीं. परंतु आपल्या दुबळ देशबांधवांचीं मतें दुखावूं नयेत म्हणून आपण आपल्या तत्त्वापासून आणि ध्येयापासून च्युत झालों तर मात्र धोका उत्पन्न

होतो. आणि लोकांना दुखवण्यापेक्षां लोकांची दिशाभूल करणें हें अत्यंत निंदास्पद कर्म आहे.

चालू प्रसंगाविषयींचें माझें लिहिणें थोडेंसें संदिग्ध व थोडेंसें पुस्तकी थाटाचें आहे व तटस्थ माणसाची भूमिका स्वीकारण्याचा मीं प्रयत्न करीत आहें. पण प्रत्यक्ष कार्याचें शिंग वाजलें कीं मला तटस्थ राहतांच येत नाहीं. पुरेसें कारण नसले तरी सुद्धां मी बेधडक कोणत्याहि कार्यांत उडी टाकतों, असें माझ्याविषयीं लोक अनेकदां बोलत असतात. यापुढें मी कोणता मार्ग पत्करावा ? माझ्या देशबांधवांना मीं कोणता मार्ग सुचवावा ? सार्वजनिक कामामध्यें लुडबुड करणाऱ्या माणसाच्या अंगीं जो एक सावधपणा येत असतो, त्याचा लगाम बसल्यामुळेंच या घटकेला कोणतेंहि मत ठामपणें देण्याचें मी टाळीत आहें. पण सत्य बोलावयाचें तर मला या प्रश्नांचीं उत्तरें खरोखरीच देतां येणार नाहींत व तीं उत्तरें शोधून काढण्याचा प्रयत्नहि मीं केलेला नाहीं. या घटकेला कोणतेंहि कार्य करतां येणें शक्य नाहीं; मग वृथा शीण तरी घ्या कां ? नाहीं म्हटलें तरी विचारचक्र भ्रमत राहतेंच, पण तें अपरिहार्य आहे. तुरुंगांत असेपर्यंत तरी ताबडतोब कोणता कार्यक्रम हातीं घ्यावा ह्यासंबंधीं विवंचना करून डोकें शिणवूं नये अशी दक्षता मी बाळगीत असतों.

तुरुंगामध्यें असलें म्हणजे चळवळीपासून आपण फार दूर आहों असें मनाला वाटतें. कार्याची लगाम आपल्या हातीं येण्याऐवजीं परिस्थितीचें खोगीरच आपल्या पाठीवर चढतें, व कांहीं तरी घडेल का, कांहीं तरी होईल का, अशी मार्गप्रतीक्षा करीत बसावें लागतें. हिंदुस्थानांतल्या व जगांतल्या राजकीय व सामाजिक प्रश्नांबद्दल मी सारें लिहितो आहें; परंतु माझें घर बनलेल्या ह्या तुरुंगरूपी स्वयंपूर्ण अशा चिमुकल्या जगाला त्याची थोडी तरी दखल आहे का ? कैद्यांचें सारें लक्ष एका गोष्टीवर खिळलेलें असतें. ती म्हणजे स्वतःच्या सुटकेची तारीख.

नैनीच्या व आलमोऱ्याच्या तुरुंगांत अनेक कैदी माझ्याकडे येऊन ' जुगली '-विषयीं मोठ्या अधीरतेनें विचारपूस करीत असत. मला प्रथम प्रथम त्या शब्दाचा अर्थच कळेना; पण नंतर मला समजलें कीं जुगली म्हणजे ज्युबिली. बादशहाच्या रौप्यज्युबिलीसंबंधीं बातम्या येत होत्या, म्हणून ही विचारपूस सुरू होती. ज्युबिली म्हणजे कांहीं कैद्यांची सुटका, निदानपक्षीं बऱ्याचशा शिक्षेची माफी एवढाच अर्थ त्यांना परंपरेनें ठाऊक झाला होता. त्यामुळें प्रत्येक कैदी व विशेषतः लांब शिक्षेचे कैदी जुगलीची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहत असतात. राज्यघटना, पार्लमेंटचे कायदे, अथवा समाजवाद यांच्यापेक्षां त्या बिचाऱ्यांना ' जुगली ' किती तरी अधिक महत्त्वाची वाटत असते.

# भरतवाक्य

कर्म करीत असावें एवढेंच आपल्या ललाटीं लिहिलें आहे, श्रमाचें फळ चाखावें असें लिहिलेलें नाहीं.

--टालमुड. *

संपलें माझें निवेदन. माझ्या जीवनांतील प्रसंगांचें हें आत्मप्रधान कथानक मी आज १४ फेब्रुवारी १९३५ रोजीं आलमोऱ्याच्या जिल्हा-तुरुंगांत लिहून पुरें करीत आहें. याच तुरुंगांत बरोबर तीन महिन्यांपूर्वी मीं माझा ४५ वा वाढदिवस साजरा केला. मला वाटतें कीं मी अद्यापि पुष्कळ वर्षे जगेन. कधीं कधीं वार्धक्याच्या कल्पनेनें मन झांकोळून जाऊन गात्रें थकून जातात, तर कधीं कधीं मला उत्साहाचें व उल्हासाचें भरतें येतें. माझें शरीर चांगलें टणक आहे. आघात झाल्यानंतर माझें मनहि लवकरच पूर्ववत होतें, तेव्हां मध्यंतरीं कांहीं अस्मानी सुलतानी झाली नाहीं तर मी पुष्कळ दिवस तग धरीन असें मला वाटतें. भविष्यकाळासंबंधीं लिहावयाचें तर आधीं माणूस जगला वांचला पाहिजे ना?

माझ्या जीवनांतील प्रसंग कदाचित् तितके रोमांचकारी नसतील. पण कैदेंत व्यतीत झालेल्या दीर्घकालांत रोमांचकारी प्रसंग घडणार तरी कोठून? बरें, त्यांत असामान्य असेंहि कांहीं नाहीं; कारण माझ्या असंख्य देशबंधूंनीं व भगिनींनीं हा चढता पडता काळ तुरुंगांत काढला त्याचप्रमाणें मींहि काढला. तेव्हां बदलत्या मनोवृत्तींचा, उल्हासाचा व विपण्णतेचा, धडाडीच्या कार्याचा व जुलमानें लादलेल्या एकान्तवासाचा हा इतिहास सर्वांना सामान्य असाच असणार. जनसमुदायांतील मी एक अणु आहें, त्याच्याबरोबर मी हाललों, त्याची छाप माझ्यावर पडली. क्वचित् प्रसंगीं मींहि त्याला हलवलें असेल. तरी देखील इतर घटकांप्रमाणें जनसमुदायांमध्यें मीं बुडून गेलों असतांहि माझें स्वतंत्र जीवन मी अनुभवीत होतोंच. असे प्रसंग आले असतील कीं जेव्हां आम्हीं कृत्रिमपणानें वागलों, आणि लटका आवेशहि दाखवला. परंतु आम्हीं जें जें केलें त्यांत पुष्कळसें निर्मळ असें सत्य होतें व त्या सत्यानेंच क्षुद्र अहंकाराच्या चिखलांतून आमचा उद्धार केला आहे. आमच्या अंगीं त्यामुळें अधिक कार्यक्षमता आली, आणि आम्हांला अधिक महत्त्व प्राप्त झालें तेंहि त्यामुळेंच. ध्येयाला साजेल असें कार्य शिरावर घेतल्यामुळें जीवनांतील ज्या

* ज्यू लोकांचा एक स्मृतिग्रंथ.

परमोच्च आनंदाची गोडी चाखतां येते ती अनुभवण्याचें भाग्यहि आम्हांला लाभलें आणि ज्या जीवनांत ह्या ध्येयापासून भ्रष्ट व्हावें लागेल व अधिक समर्थ अशा शक्तीपुढें निमूटपणें मान तुकवावी लागेल ते असंतोषाच्या व अंतःस्थ दुःखांच्या विषानें करपलेलें जिणें सर्वस्वीं त्याज्य होय. ह्याची जाणीवहि आम्हांला झाली.

गेल्या कांहीं वर्षांतील अनुभवापासून अनेक फायदे झाले आहेत; पण त्यांतला एक फायदा अत्यंत महत्त्वाचा म्हटला पाहिजे. जीवन हा एक नितान्त रमणीय अनुभव आहे, त्यांत किती तरी शिकण्यासारखें आहे, किती तरी करण्यासारखें आहे असें मला वाटूं लागलें. माझी एकसारखी प्रगति होत आहे असे मला वाटत असे व अजूनहि माझी तीच कल्पना आहे. त्या कल्पनेमुळेंच माझ्या कार्याला उत्साहाची जोड मिळते, पुस्तकें वाचतांना माझें मन तल्लीन होऊन जातें व एकंदर आयुष्याला रुचिरंजकता प्राप्त होते.

हें निवेदन लिहीत असतांना प्रसंगानुरोधानें जे जे भावनांचे व विचारांचे तरंग उठत गेले ते ते मीं चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हेतु असा कीं त्या त्या प्रसंगीं झालेली माझ्या मनाची स्थिति लक्षांत यावी. कोणत्याहि विचाराची लाट एकदां ओसरून गेली म्हणजे ती पुन्हां उभी करून दाखवणें कठीण असतें. शिवाय त्यानंतर घडलेले प्रसंग देखील आपणाला सहजासहजीं विसरतां येत नाहींत. त्यामुळें मनांत मागाहून उद्भवलेल्या कल्पनांची पडछाया माझ्या आयुष्याच्या पूर्वरंगांतील कथानकावर स्वाभाविकच पडली असावी. परंतु माझा मनोविकास कसकसा होत गेला तें कळावें, ह्या मुख्यतः स्वार्थी हेतूनेच हें कथानक लिहिलेलें आहे. माझ्या लेखनावरून मी कसा होतों हें कळून येण्यापेक्षां मी कसें असावें अथवा मी कसा आहे याबद्दल माझ्या मनांत ज्या कल्पना येत त्यांचेंच दिग्दर्शन होणार आहे.

कांहीं महिन्यांपूर्वी सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनीं सर सभेत असें सांगितलें कीं जनतेच्या भावना माझ्याप्रमाणें ( जवाहरलालप्रमाणें ) आहेत म्हणून नव्हे, तर माझ्या अंगीं त्याग, ध्येयनिष्ठा व कडवेपणा वगैरे गुण आहेत म्हणूनच माझ्या हातून समाजाला धोका येण्याचा संभव आहे. माझ्यांतील कडवेपणा म्हणजे केवळ आत्मवंचना आहे असेंहि सरमहाशयांनीं सांगितलें. आतां ज्याच्या मनाला अशी भुरळ पडली तो स्वतःचें परीक्षण तरी काय करणार ? परंतु या बाबतींत सर सी. पी.च्या बरोबर हुजत घालण्याची माझी इच्छा नाहीं. अलीकडे कित्येक वर्षांत आमची गांठभेट झालेली नसली तरी एके काळीं होमरूल लीगचे आम्हीं दोघेहि चिटणीस होतों. त्यानंतरच्या काळांत अनेक गोष्टी घडल्या. सर सी. पी. पायऱ्या-मागून पायऱ्या चढत चढत, डोळे फिरतील इतक्या उंच पदावर विराजमान झालेले आहेत आणि मी मात्र होतों तसाच जमिनीवर पडून राहिलों आहें. एकाच राष्ट्राचे आम्ही दोघे नागरिक यापलीकडे कसलेंहि साम्य आज आमच्यांत उरलेलें नाहीं. आज ते हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचे भाट बनले असून, हिंदुस्थानांतील व इतर देशांतील

हुकुमशाहीचे स्तुतिपाठक झालेले आहेत; आणि स्वतः एका हिंदी संस्थानिकाच्या अरेरावीला आपल्या सहकार्यानें भूषवीत आहेत. बहुतेक सर्व बाबतींत आमचे मतभेद असतील असें मला वाटतें. परंतु एका क्षुल्लक बाबतींत मात्र त्यांचें व माझें एकमत आहे. जनमताचा मी प्रतिनिधि नाहीं असें जें ते म्हणतात तें त्रिवार सत्य आहे. त्याविषयीं माझ्या मनालासुद्धां कोणत्याहि प्रकारची भुरळ पडलेली नाहीं.

वास्तविक पुष्कळ वेळां माझ्या मनांत अशी शंका उत्पन्न होते कीं मी एका तरी व्यक्तीचा प्रतिनिधि आहें काय? अनेकांच्या मनामध्यें माझ्यासंबंधीं मित्रत्वाची अथवा आपुलकीची भावना वसत असली तरी कोणाचाहि प्रतिनिधि असें मला म्हणतां येणार नाहीं. पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींच्या संमिश्र रांध्यापासून मी निर्माण झालों आहें. माझें सूत कुठेच जमत नाहीं, मी कोठेहि नांदत नाहीं. माझे विचार व माझा जीवनविषयक दृष्टिकोण पौर्वात्य संस्कृतीपेक्षां पाश्चात्य संस्कृतींशींच अधिक मिळता जुळता असावा. परंतु हिंदभूच्या कोट्यवधि अपत्यांप्रमाणेंच मीहि अनेक पाशांनीं तिच्या अन्तःकरणाशीं संबद्ध होऊन गेलों आहें, आणि माझ्या अन्तर्मनाचा एक धागा आतांपर्यंतच्या ब्राह्मणांच्या ज्या शेकडों हजारों पिढ्या झाल्या त्यांच्या स्मृतींशीं संलग्न होऊन राहिला आहे तें इतिहासाचे देणें मला विसरतां येत नाहीं, आणि आधुनिक सस्कृतीचीं लेणींहि मला झुगारून देतां येत नाहींत. इतिहास व वर्तमान काळ माझ्या रक्तांत जसे कांहीं भिनून गेलेले आहेत. पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींचें आकलन करतांना त्यांचा मला उपयोग होत असला तरी त्यांच्या मीलनामुळें सार्वजनिक व्यवहारांतच नव्हे, तर सर्व जीवनांतच एक प्रकारच्या आध्यात्मिक एकलेपणाची भावना निर्माण होते. पाश्चात्य देशांत गेलों म्हणजे अनोळखीपणाच्या व दुजेपणाच्या भावना मनांत येतात आणि तेथील जीवनप्रवाहाशीं समरस होतां येत नाहीं. बरें, माझ्या मायभूमीकडे वळावें तर येथेहि मला कधीं कधीं बहिष्कृताप्रमाणें वाटूं लागतें.

दूरचे डोंगर साजरे दिसतात, चढावयाला सोपे वाटतात; मनाला वाटतें कीं गिरीशिखर आपणाला जणूं काय बोलावीत आहे. परंतु जवळ जावें तों अडचणी दिसूं लागतात व प्रत्येक पावलागणिक प्रवास कठीण होत जाऊन डोंगरमाथा ढगामध्यें दिसेनासा होतो. तथापि डोंगर चढून पाहण्यांत देखील एक प्रकारचा आनंद व समाधान असतेंच कीं नाहीं? आणि जीवनाला सुद्धां जें महत्त्व प्राप्त होतें तें कदाचित् आयुष्यांतील कराव्या लागणाऱ्या झगड्यामुळेंच असेल. झगड्याचा परिणाम काय होतो, त्यावर जीवनाचें महत्त्व तितकेसें अवलंबून नाहीं. योग्य मार्ग कोणता ह्याबद्दल पुष्कळदां संदेह उत्पन्न होईल. परंतु अयोग्य कोणतें तें ओळखणें कधीं कधीं अधिक सोपें असतें. आणि अयोग्य वाटणारा मार्ग टाळणें हें देखील महत्त्वाचेंच आहे. महात्मा साक्रेतिसाचे अंतकाळचे उद्गार मोठ्या नम्र भावनेनें मी उद्धृत करूं का? "मरण म्हणजे काय तें मला सांगतां येणार नाहीं—मरण ही कदाचित्

चांगली गोष्ट असेल; मग मला त्याचें भय काय म्हणून वाटावें? आपल्या गत आयुष्यापासून च्युत होणें ही वाईट गोष्ट आहे एवढें मात्र निश्चित. तेव्हां जी गोष्ट वाईट आहे अशी माझी खात्री पटली, तिच्यापेक्षां जी गोष्ट चांगली असण्याचा संभव आहे तिचाच स्वीकार करणें योग्य नव्हे काय ?"

तुरुंगामध्यें बसून काढलेलीं हीं वर्षें ! एकाकी बसून, आपल्याच विचारांत गुरफटून राहून, एकामागून एक काळाच्या अनन्त अंधारांत विलीन झालेले कित्येक ऋतू, शुक्लपक्षाचें कौमुदी हास्य आणि कृष्णपक्षाच्या निबिड छाया, मीं कितीं वेळां तरी पाहिल्या असतील; जगाकडे तुच्छतेने पाहत मोठ्या दिमाखानें मिरवणाऱ्या तारकापंक्ति किती तरी वेळां माझ्या डोळ्यांसमोरून गेल्या असतील. माझ्या तारुण्यांतील शेंकडों हजारों दिवसांचे मृतदेह ह्या तुरुंगाच्या आवारांत पडलेले आहेत. केव्हां केव्हां त्या नष्टदिनांचीं स्मृतिपिशाच्चें जागृत होऊन माझ्या कानांत कुजबुजतात कीं, "एवढा खटाटोप केलास, पण साधलें काय ?" या प्रश्नाला उत्तर देतांना मला कचरण्याचें कांहींच कारण नाहीं. माझ्या गतायुष्याचें दान मला पुन्हां कोणी केलें तर माझ्या सध्याच्या ज्ञानाचें व अनुभवाचें साहाय्य घेऊन मी माझ्या आयुष्यांत खासच अनेक फेरबदल करीन, आणि पूर्वी केलेल्या गोष्टींत अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याचाहि प्रयत्न करीन; परंतु सार्वजनिक आयुष्यांत मीं घेतलेल्या मुख्य मुख्य निर्णयांच्या बाबतींत बदल होणें संभवनीय नाहीं आणि तसा बदल करूं म्हटलें तरी तो होणेंहि शक्य नाहीं; कारण माझ्या कक्षेपलीकडे असलेल्या परिस्थितीमुळें त्या निर्णयांचें स्वरूप निश्चित झालें आणि त्या निर्णयाकडे माझ्याहून समर्थ अशा शक्तींच्या द्वारांच मी खेंचला गेलों.

शिक्षा झाल्याला जवळ जवळ एक वर्ष होत आलें आहे. माझ्या दोन वर्षांच्या शिक्षेपैकीं एक वर्ष मागें पडलें. परंतु सबंध एक वर्ष अद्यापि उलटावयाचें आहे, कारण शिक्षा साधी असल्यामुळें या वेळीं माफी वगैरे कांहींच मिळणार नाहीं. ऑगस्ट महिन्यांत अकरा दिवस बाहेर राहिलों त्यांची देखील माझ्या शिक्षेंत भर पडलीच, पण हेंहि वर्ष जाईल, माझी सुटका होऊन मी बाहेर पडेन, आणि मग ? मग काय होईल तें सांगतां येत नाहीं. परंतु माझ्या आयुष्यांतील एक पर्व संपूर्ण झालें असून आतां दुसऱ्या पर्वाला प्रारंभ होणार एवढें मात्र निःसंशय. त्याचें स्वरूप काय असेल याविषयीं मला देखील स्पष्ट कल्पना आलेली नाहीं. कारण जीवनाच्या ग्रंथाचीं किती तरी पानें अद्यापि उघडावयाचीं आहेत.

# ताजा कलम

बेडन वायलर, श्वार्त्सवाल्ड,
२५ ऑक्टोबर, १९३५

गेल्या मेमध्यें अधिक औषधोपचारासाठीं माझी पत्नी भोवालीहून निघाली. ती गेल्यानंतर माझें भोवालीला जाणें बंद पडून मला पूर्वी दर पंधरवड्याला घडणारा डोंगरी रस्त्यावरील मोटरप्रवासहि घडेनासा झाला. त्यामुळें चुकल्याचुकल्यासारखें होऊन आलमोरा-तरुंगांतील वास्तव्य अधिकच रुक्ष वाटूं लागलें.

इतक्यांत क्वेट्टा येथील भूकंपाची हकीगत समजली. त्यानंतर कांहीं काळ दुसरें तिसरें कांहीं सुचेनाच. परंतु ती स्थिति फार काळ टिकली नाहीं. कारण आपली व आपल्या विचित्र वर्तनाची विस्मृति होऊं नये म्हणून हिंदुस्थान सरकार फार दक्ष असतें. कॉंग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद ह्यांना दुःखनिवारणाच्या कामासाठीं क्वेट्टयाकडे जाण्याची परवानगी सरकारनें नाकारली असें वृत्त आमच्या कानीं आलें. धरणीकंपानंतरच्या दुःखनिवारणाच्या कामासंबंधींची हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणत्याहि माणसापेक्षां राजेन्द्रबाबूंना जास्त माहिती असेल. गांधीजी अथवा दुसऱ्या कोणत्याहि लोकप्रसिद्ध व्यक्तीला क्वेट्टयाला जाऊं देण्यास सरकार तयार नव्हतें. क्वेट्टा येथील भूकंपाबाबत लेख लिहिल्याबद्दल अनेक वृत्तपत्रांचे जामीनहि जप्त करण्यांत आले.

जिकडे जावें तिकडे लष्करी मनोवृत्ति आणि पोलिशी नजर—मग तुम्हीं असेंब्लींत जा, मुल्की कारभाराकडे नजर टाका, अथवा सरहद्दीवरील बॉम्बफेकीचा विचार करा. एखाद्याला वाटेल कीं हिंदुस्थानांतील बहुजनसमाज व हिंदुस्थान सरकार यांच्यामध्यें जणूं कांहीं नित्याचें तुंबळ युद्ध जुंपलेलें आहे.

पोलिसांचा उपयोग आहे, आवश्यकताहि आहे, परंतु सर्व जगांत पोलिस आणि पोलिसांचा दंडुका यांवाचून दुसरें कांहीं दिसेनासें झालें तर मात्र जगांत राहावेंसें वाटेल कीं नाहीं याची शंकाच आहे. सत्तेचा अनिर्बंध उपयोग केला म्हणजे तिला बळी पडणारे व तिचा असा उपयोग करणारे दोघेहि अधोगतीला जातात, असें आप्तवचन आहे. हिंदुस्थानांतील वरिष्ठ दर्जाच्या नोकरांचा व विशेषेंकरून सिव्हिल सर्व्हिसमधील नोकरांचा उत्तरोत्तर होत चाललेला नैतिक व बौद्धिक अधःपात डोळ्यांत भरण्यासारखा आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हा अधःपात सहज लक्षांत येत असला तरी सर्व नोकरवर्गच या रोगानें डागाळलेला दिसतो. वरिष्ठ जागेवर नेमणूक करण्याचा प्रसंग आला म्हणजे ही अरेरावी वृत्ति ज्या माणसांत प्रकर्षानें वसत असेल त्याचीच हमखास निवड करण्यांत येते.

माझ्या पत्नीची प्रकृति चिंताजनक असल्याची बातमी असल्यामुळें ४ सप्टेंबर रोजीं आलमोरा तुरुंगांतून माझी अकस्मात् सुटका झाली व माझी शिक्षा "तहकूब" करण्यांत आली आहे असें मला कळविण्यांत आलें. मी साडेपांच महिने आधीं सुटलों व सुटल्याबरोबर विमानमार्गें तडक युरोपकडे प्रयाण केलें.

धुमश्चक्रींत सांपडलेलें, युद्ध व यादवी यांच्या चिंतेनें काळवंडलेलें, क्षितिजावर आर्थिक आपत्तींचें वादळ सदैव उभें असलेलें युरोप; परचक्राखालीं भरडला जाणारा व बॉम्बमुळें होरपळून जाणारा अबिसीनिया; आणि स्वतःच्या प्रजाजनांवर निर्दयपणें दडपशाही करणारें, बॉम्बचा पाऊस पाडणारें, पण त्याचबरोबर राष्ट्रसंघाचा कैवार घेऊन तोंडानें शांतिस्तोत्रें गाणारें सर्वबलाढ्य असें साम्राज्यवादी इंग्लंडसारखें राष्ट्र; माझ्यापुढील जगताचें दृश्य हें असें आहे. पण ह्या ब्लॅक फॉरेस्टमधील शांततेचा व गांभीर्याचा तिळमात्र भंग झालेला नाहीं, इतकेंच नव्हे तर स्वस्तिकांकित निशाणांचा धुमाकूळदेखील येथें फारसा दिसत नाहीं. खालच्या दरींतून धुकें हळूहळू वर चढत आहे तिकडेच माझे डोळे लागून राहिले आहेत. दूर अंतरावरील फ्रान्सची सरहद्द आणि इतर सर्व भूप्रदेश पाहतां पाहतां धुक्याआड दिसेनासा झाला. धुक्याच्या ह्या पडद्याआड काय काय गोष्टी दडल्या आहेत कोणास ठाऊक ?

७०

# पांच वर्षांनंतर

साडेपांच वर्षांपूर्वी अलमोरा जिल्हा तुरुंगाच्या बराकींत बसून मीं माझ्या आत्मचरित्राच्या शेवटच्या ओळी लिहून संपविल्या. त्यानंतर आठ महिन्यांनीं जर्मनींतल्या बेदन वायलर मुक्कामीं मीं त्याला एक पुरवणी जोडली. माझें तें आत्मचरित्र इंग्लंडहून प्रकाशित झालें आणि देशोदेशींच्या नाना प्रकारच्या लोकांकडून त्याचें आपुलकीनें स्वागतहि करण्यांत आलें. आत्मचरित्रांत मीं जें कांहीं लिहिलें, त्यामुळें परदेशच्या अनेक मित्रांना हिंदुस्थानचें अधिक निकट दर्शन घडवतां आलें आणि आमच्या स्वातंत्र्यप्रयत्नांचें मर्म कांहीं प्रमाणांत त्यांना समजावून सांगतां आलें म्हणून माझ्या मनाला समाधान वाटलें. पण दुर्दैवानें या पुस्तकाची पोंच अमेरिकेपर्यंत झाली नाहीं. आणि अशा अनेक घटना घडत गेल्या कीं त्यांच्यामुळें अमेरिकन वाचकांसाठीं आवृत्ति छापून घेण्याचें लांबणीवर पडत गेलें. आतां नव्या स्वरूपांत तें अमेरिकेमध्यें प्रकाशित होणार आहे ही समाधानाची गोष्ट होय.

आत्मचरित्र अद्ययावत व्हावें म्हणून त्यांत भर घालण्याची सूचना माझ्या प्रकाशकाकडून करण्यांत आलेली आहे. सूचना रास्तच आहे; तिला नकार देणें मला शक्य नाहीं. पण त्यांच्या सूचनेची अंमलबजावणी करणें मला सोपें गेलें नाहीं. मोठ्या विलक्षण कालखंडांत आपण राहत आहों. जीवनाच्या नित्याच्या ओघांत पार उलटापालट झालेली आहे. प्रकाशकाबरोबर साधा पत्रव्यवहार करणें देखील मला दुरापास्त होऊन बसलेलें आहे. माझ्या संमतीनें माझ्या आत्मचरित्रांत बरीच छाटाछाट करण्यांत आलेली आहे. कारण चालू घटकेला-विशेषेंकरून अमेरिकन वाचकाला ज्यांत स्वारस्य वाटणार नाहीं असा बराचसा भाग त्यांत होता. तथापि कोणता भाग वगळला आहे आणि कोणता ठेवला आहे त्याची मला अद्यापि माहिती नाहीं. युद्धाच्या पाठोपाठ पत्रव्यवहाराच्या मार्गांत उपस्थित होणाऱ्या अडचणींना उल्लंघून जाणें आम्हाला शक्य झालेलें नाहीं. हल्लीं असा भास होतो कीं अमेरिका हिंदुस्थानपासून फार दूर सरकली आहे. समुद्र ओलांडून मुक्कामावर पोंचण्यासाठीं पत्रांना महिने नि महिने लागतात. वरकड सेन्सॉरचें विघ्न आहे तें निराळेंच. !

पण याहिपेक्षां बिकट अडचण माझ्यासमोर उभी राहिली. माझें सबंध आत्मचरित्र मीं तुरुंगांतच लिहून काढलेलें. बाह्य हालचालींचा वाराहि तेथें नसावयाचा. सर्वच बंदिवानांना येतात तशा नाना प्रकारच्या लहरी मला येत. पण हळूहळू अंतर्मुख होण्याकडे कल होत गेला आणि मनाला किंचित शांति वाटूं लागली. ती मानसिक

अवस्था आतां पुनर्जागृत कशी करतां येणार ? त्या अवस्थेंत केलेल्या लेखनाच्या सूत्राशीं हें सूत्र सांधून कसें घेतां येणार ? माझें आत्मचरित्र मी चालूं लागलों म्हणजे असें वाटतें कीं जणूं कांहीं कोणी तरी दुसऱ्याच व्यक्तीनें फार पूर्वीच्या काळीं केलेलें हें लेखन आहे ! ह्या जो पांच वर्षांचा अवधि लोटला, त्यामध्यें जग पालटलें आहे आणि त्याचा ठसा माझ्यावर उमटलेला आहे. देहानें तर मी वृद्ध झालों आहेंच, पण पुनः पुनः धक्के बसले आहेत, संस्कार झाले आहेत ते मनावर. त्यामुळें तें वातड बनलें आहे, किंवा पक्व बनलें आहे. माझी पत्नी स्वित्झर्लंडांत मृत्यु पावली तेव्हां माझ्या जीवनांतील एक पर्व समाप्त झालें. तिच्या मृत्यूमुळें माझ्या जीवनाशीं एकाकार झालेलें केवढें तरी मनोधन हरपलें. ती कायमची अंतरली हें माझ्या मनाला पटणें फार अवघड गेलें. मनाचा मांड पुन्हां सहजासहजीं जमेचना. म्हणून उद्योगांत मी गढून गेलों. हेतु हा कीं त्यामुळें तरी थोडाबहुत विरंगुळा वाटेल. हिंदुस्थानच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापावेतों धांवपळ केली. प्रचंड सभा, मान मोडे तों काम आणि एकलेपणा यांचें रहाटगाडगें पूर्वीपेक्षांहि आतां अधिक वेगानें फिरूं लागलें. पुढें आईला मृत्यु आला त्यामुळें तर पूर्वजीवनाशीं असलेला अखेरचा दुवा देखील तुटला. माझी मुलगी दूर आक्स्फर्डमध्यें विद्याभ्यास करीत होती. पुढें परदेशांतल्याच एका आरोग्यालयांत तिच्यावर उपचार चालू झाले. माझ्या दौऱ्यावरून मी परतत असें तो सुद्धां मोठ्या नाखुषीनेच. घरीं आलों कीं त्या ओसाड वाटणाऱ्या वाड्यांत मी एकटाच वसे; गांठीभेटी देखील मी टाळूं पाहीं. जनसंमर्दांतून बाहेर पडले कीं शांतीसाठीं माझें मन जणूं तान्हलेलें असे.

परंतु कामांत अथवा विचारांत मला शांति लाभली नाहीं. आणि माझ्यावर ज्या जबाबदाऱ्या येऊन पडत, त्यांमुळें अनेकदां माझें चित्त अगदीं अस्वस्थ होऊन जाई. कोणत्याहि प्रकारच्या पक्षाशीं वा गटाशीं संबद्ध होणें मला अशक्य वाटे; माझ्या अगदीं निकटच्या सहकाऱ्यांबरोबर देखील माझें तंतोतंत जमत होतें असें नाहीं. पाहिजे तसें कार्य करणें मला अशक्य होई आणि इतरांनाहि पाहिजे त्याप्रमाणें कार्य करण्याच्या कामीं माझ्यामुळें अडथळे निर्माण होत. त्यामुळें मनाचा कोंडमारा होऊं लागला, वैफल्याची जाणीव वाढीस लागली आणि माझे बोल ऐकण्यासाठीं जनसंमर्द लोटत असले आणि माझ्या भोंवताली उत्साहाच्या लाटा उठत असल्या, तरी सार्वजनिक जीवनांत मी एकाकीच उभा असल्यासारखें वाटूं लागलें.

युरोपांतील व अति पूर्वेकडील घडामोडींचा परिणाम माझ्यावर इतरांपेक्षां अधिक झाला. म्यूनिक-करारामुळें माझ्या मनाला असह्य धक्का बसला आणि स्पेनवरील घोर संकटामुळें मला स्वतःचें कांहीं गमावल्याप्रमाणें हळहळ वाटली. या भयावह कालाचीं वर्षांवर वर्षें लोटूं लागलीं तसतसें आगामी सर्वनाशाच्या विचारानें माझें मन भारावत गेलें आणि जगताचें होष्यमाण उजळच असेल ही श्रद्धा अस्तंगत होऊं लागली.

आणि आतां ती सर्वनाशाची घडी येऊन ठेपली आहे. युरोपांतील ज्वालामुखी संहाराचे अंगार ओकूं लागले असून आम्ही हिंदुस्थानांतील रहिवासी दुसऱ्या एका ज्वालामुखीच्या विवरापाशीं येऊन पोंचलों आहोंत. त्याचा स्फोट कोणत्या क्षणीं होईल कोण जाणें. या क्षणाला समोर ठाकलेल्या प्रश्नावर खिळलेलें लक्ष खेंचून मागें घेऊन अन्तर्मुख बनणें, गेल्या पांच वर्षांचें सिंहावलोकन करणें आणि तत्संबंधीं विचार शांत चित्तानें लिहून काढणें फार अवघड आहे. पण ही गोष्ट शक्य झाली तर मला एक वेगळाच जाडजूड ग्रंथ लिहून काढावा लागेल: कारण लिहावयाचें म्हटलें तर लिहण्यासारखें खूपच आहे. तेव्हां ज्यांत मीं भाग घेतला असेन अथवा ज्यांचा माझ्यावर परिणाम घडून आलेला असेल अशा कांहीं विशिष्ट घटनांचा थोडक्यांत निर्देश करण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न करणार आहें.

२८ फेब्रुवारी १९३६ रोजीं लोझान येथें माझ्या पत्नीनें देह ठेवला.त्या वेळीं मी तिच्या सन्निधच होतों. तिच्या मृत्यूच्या जरा आधीं राष्ट्रसभेचा अध्यक्ष म्हणून पुनरपि माझी निवड झाल्याची बातमी मला मिळाली होती. पुढें लवकरच मी विमानमार्गे हिंदुस्थानला परतलों. त्या प्रवासांत रोम शहरीं असतांना एक अनपेक्षित घटना घडून आली. प्रवासाला निघण्यापूर्वी कांहीं दिवस माझ्याकडे संदेश पाठवण्यांत आला कीं मी रोमवरून जाईन तेव्हां मला भेटण्याची सिन्योर मुसोलिनींची इच्छा आहे. फॅसिस्ट राज्यपद्धतीचा मला कितीहि तिटकारा वाटत असला, तरी सिन्यॉर मुसोलिनीला भेटावें आणि जगाच्या कारभारांत एवढी महत्त्वाची कामगिरी बजावणारी ही व्यक्ति आहे तरी कशी तें पाहावें असें मनांत येणें स्वाभाविक ठरलें असतें. पण गांठीभेटी घेण्याच्या त्या वेळीं मी मनःस्थितींतच नव्हतों. शिवाय त्या वेळीं अबिसीनियावरील मोहीम जारी होती हा एक बलवत्तर अंतराय मार्गात होताच. माझ्या मुलाखतीचा उपयोग फॅशिस्ट स्वतःच्या प्रचारास्त्रत्र करून घेतील ही आशंका मनांत होतीच. मागाहून मी इन्कार करून फारसा फायदा झाला नसता. १९३१ सालीं महात्माजी रोममार्गे गेले तेव्हा त्यांच्या-संबंधीं एक खोटीच मुलाखत ' जर्नल द इतालिया ' या पत्रांत कशी प्रसिद्ध करण्यात आली होती तें मला स्मरत होतें. इटलीला भेट देणाऱ्या इतर अनेक हिंदी गृहस्थांच्या बाबतींतहि, त्यांच्या नापसंतीची कदर न करतां, असेच प्रकार घडल्यानीं उदाहरणें माझ्या लक्षांत होतीं. माझ्या बाबतींत तसा प्रकार घडणार नाहीं, माझी सिन्योर मुसो-लिनींशीं होणारी भेट संपूर्णपणें खाजगी असेल असें आश्वासन मला देण्यांत आलें होतें. तरी देखील भेट न घेण्याचेंच मीं ठरवलें आणि माझा सखेद नकार मी सिन्योर मुसोलिनींला कळवला.

इतकें झालें तरी डच के. एल्. एम्. कंपनीचें विमान रोमला एक रात्र मुक्काम करीत असल्याकारणानें रोम टाळून जाणें मला शक्यच नव्हतें. रोमला पोंचल्यानंतर लगेच एका बड्या अधिकाऱ्यानें माझी भेट घेतली आणि त्या रात्रीं सिन्यॉर मुसोलिनीला भेटण्यासाठीं मी यावें म्हणून त्यानें मला निमंत्रण दिलें. तो म्हणाला कीं भेटीची

सारी व्यवस्था करून ठेवलेली आहे. मला याचें मोठें नवल वाटलें. भेटीस येणें अशक्य असल्यामुळें मला क्षमा असावी असें मीं आधींच कळवलेलें असल्याचेंहि मीं त्याच्या निदर्शनास आणलें. चांगला एक तास म्हणजे भेटीचा वेळ होईपर्यंत आमचा वाद चालू होता. अखेर निर्णय माझ्या मताप्रमाणेंच लागला. आमची भेट झाली नाहीं.

हिंदुस्थानला मी परतलों आणि कामाला जुंपलों. थोड्याच दिवसानंतर राष्ट्र-सभेच्या वार्षिक अधिवेशनाचें अध्यक्षीय कार्य मला करावें लागलें. गेलीं बरींच वर्षें मीं तुरुंगांतच काढल्याकारणानें बाहेरच्या घटनांशीं मी अपरिचित होतों. अनेक घडामोडी, नवे गटबंध, ठळक पक्षभेद राष्ट्रसभेंत झाल्याचें मला आढळून आलें. संशय, कटुता व विरोध यांचें वातावरण पसरलेलें दिसलें. पण परिस्थितीचें नियंत्रण करण्याची धमक आपल्या अंगीं आहे असा आत्मविश्वास वाटत असल्याकारणानें मी या गोष्टींची दखल घेतली नाहीं. मला इष्ट त्या मार्गानें राष्ट्रसभेचें गाडें मला नेतां येत आहे असें दृश्य कांहीं काळ दिसलें. पण लवकरच मला अनुभव आला कीं विरोधाचीं मुळें खोलवर गेलेलीं आहेत, परस्परांविषयींचा संशय आणि आमच्यांत उद्भवलेली कटुता फुंकर मारून सहज नाहींशी करतां येण्यासारखी नाहीं. अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा विचार मीं अनेकवार केला. पण त्यामुळें परिस्थिति अधिकच बिघडेल ही जाणीव असल्याकारणानें मीं तो बेत रहित केला.

पुढें कांहीं महिने हा राजीनाम्याचा प्रश्न वारंवार माझ्या मनांत उभा राही. राष्ट्रसभेच्या कार्यकारी मंडळांतील माझ्या सहकाऱ्यांसमवेत सुरळीतपणें कार्य करणें मला अवघड जाऊं लागलें. माझ्या कार्याकडे ते साशंकतेनें पाहत आहेत ही गोष्ट मला स्पष्टपणें दिसून आली. माझी कोणतीहि एकादी गोष्ट त्यांना नापसंत पडली असें नाहीं. पण माझ्या एकंदर कार्याचा रोख त्यांच्या पसंतीस उतरेना. त्यांना तसें वाटावें हें सकारण होतें. कारण माझा दृष्टिकोण त्यांच्याहून भिन्न होता. राष्ट्रसभेनें घेतलेल्या निर्णयांशीं मी पूर्णतया एकनिष्ठ असें. पण त्या निर्णयांतील कांहीं मुद्द्यांवर मी जोर देई, तर त्यांचा जोर निराळ्याच मुद्द्यावर असे. शेवटीं राजीनामा देण्याचें मीं निश्चित केलें आणि माझा निर्णय गांधीजींच्या कानावर घातला. त्यांना पाठवलेल्या पत्रांत मीं लिहिलें होतें कीं : "युरोपहून परत आल्यापासूनचा माझा असा अनुभव आहे कीं कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर मला अत्यंत शीण येतो. त्यांच्यामुळें माझा शक्तिपात होत आहे असें वाटतें. प्रत्येक बैठकीनतर मला वाटतें कीं मी वृद्ध होत आहें. कार्यकारी मंडळाच्या इतर सभासदांना देखील असाच अनुभव येत असल्यास त्यांत नवल नाहीं. हा अनुभव मोठा कटु आहे. त्यामुळें काम नीट पार पडत नाहीं.:"

पुढें लवकरच दूरदेशीं कांहीं घटना घडली. हिंदुस्थानशीं तिचा संबंध नव्हता. परंतु माझ्या मनावर तिचा फार परिणाम झाला आणि माझा निर्णय मीं बदलला. ती घटना म्हणजे स्पेनमधील जनरल फ्रँकोचें बंड. जर्मन व इटालियन सहाय्यानें चालू असलेल्या या बंडाचा परिणाम युरोपव्याप्त अथवा जगद्व्यापि संग्रामांत होणार असें मला

वाटूं लागलें. हिंदुस्थान त्यामध्यें खेंचला जाणें अपरिहार्य होतें. अशा वेळीं एकदिलानें काम करण्याची गरज असतां आमची संघटना कमकुवत बनवणें अथवा तिच्यांत अंतर्विरोध निर्माण करणें युक्त झालें नसतें. युरोपांतील घटनेचें मीं केलेलें विश्लेषण संपूर्णपणें चूक नव्हतें. पण कालगणतींत चूक झाली आणि ज्या घटना कांहीं वर्षे लोटल्या-नंतर घडल्या, त्या आगाऊच घडतील असा आगाऊ निर्णय माझ्या बुद्धीनें घेतला.

स्पेनमधील लढ्याची माझ्या मनावर संस्क्रिया झाली, तिच्यावरून माझ्या मनांत हिंदी प्रश्न जागतिक घडामोडींशीं कसे संलग्न झालेले होते तें दिसून येईल. चीन, अबिसीनिया, स्पेन, मध्ययुरोप, हिंदुस्थान किंवा अशाच इतर देशांत जे वेगवेगळे राजकीय वा आर्थिक प्रसंग घडून येत होते, ते सारे एकाच जागतिक प्रश्नाचे विविध पैलू आहेत असें मला अधिकाधिक वाटूं लागलें. हा मूलभूत प्रश्न निकालांत निघाल्या-वांचून त्यांचें खरें निराकरण होणें शक्य नाहीं. आणि हे प्रश्न कायमचे मिटण्यापूर्वी आंदोलनें व उत्पात होण्याचाच संभव फार. आधुनिक जगांत शांतता अविभाज्य आहे असें ज्याप्रमाणें म्हणतात, त्याचप्रमाणें स्वातंत्र्यहि अविभाज्यच आहे. त्यामुळें जगाचे कांहीं भाग स्वतंत्र तर कांहीं दास्यांत असें फार काळ चालणें शक्य होणार नाहीं. फॅशिस्टवाद व नाझीवाद यांनीं जगाला जें सांकडें घातलें आहे, त्याचें एन स्वरूप साम्राज्यवादासारखेंच आहे. तीं जुळीं भावंडेंच आहेत. फरक इतकाच कीं साम्राज्यशाहीचा कारभार वसाहतींत व अंकित प्रदेशांत चालतो. तर फॅशिस्ट-नाझी वादांचा अंमल तितक्याच करडेपणानें स्वदेशांतहि सुरू असतो. म्हणून जगांत स्वातंत्र्य नांदावयाचें असेल तर केवळ फॅशिस्टवाद व नाझीवाद यांची हकालपट्टी करून भागणार नाहीं, तर साम्राज्यशाहीचें देखील पुरेपूर उच्चाटन केलें पाहिजे.

परराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम केवळ माझ्यापुरताच मर्यादित नव्हता. हिंदु-स्थानांतील अनेक लोकांच्या मनांत तसेच विचार येऊं लागले आणि सामान्य जनतेमध्यें देखील त्या विषयांविषयीं औत्सुक्य निर्माण झालें. चीन, अबिसीनिया, पॅलेस्टाइन व स्पेन यांच्या विषयींची सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं राष्ट्रसभेनें सबंध देशभर ज्या हजारों सभा घेतल्या, त्यांमुळें जनतेमधील हें औत्सुक्य टिकून राहिलें. चीन व स्पेनकडे औषधीय स्वरूपाचें थोडेंबहुत साहाय्य पाठवण्याचेहि प्रयत्न आम्हीं केले. आंतरराष्ट्रीय घडामोडीं-बाबतची ही व्यापक आस्था आमच्या राष्ट्रीय लढ्याला उच्चतर भूमिका प्राप्त करून देऊन राष्ट्रवादाला सदैव चिकटलेला संकुचितपणा कमी करण्याच्या कामीं उपकारक ठरली.

तथापि देशांतील सर्वसामान्य माणसांच्या जीवनावर या परदेशीय घटनांचा परिणाम झाला नाहीं. तसें होणें अपरिहार्यच होतें. तो आपल्याच विवंचनेंत चूर होता. नित्य वाढत्या कर्मकटकटींनीं, दारिद्र्यानें आणि त्याला चिरडून टाकणाऱ्या नानाविध ओझ्यांनीं त्याचें जीवन व्याप्त झालेलें होतें. शेतकऱ्यांचा प्रश्न हाच कांहीं म्हटलें तरी हिंदुस्थानांतील प्रमुख प्रश्न होता. राष्ट्रसभेनें शेतकऱ्यांचा एक कार्यक्रम आंखला होता.

तो बराच व्यापक असला, तरी त्यामध्यें विद्यमान समाजव्यवस्था संमत धरलेली होती. कामगारांची स्थिति अधिक चांगली होती असें नव्हे. संप वरचेवर होत. राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या लोकांमध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदुस्थानवर लादलेल्या नव्या राज्यघटनेबद्दल ऊहापोह चालू असे. या राज्यघटनेनुसार प्रांतांच्या हातीं थोडेबहुत अधिकार देण्यांत आलेले असले, तरी खऱ्या सत्तेची किल्ली ब्रिटिश सरकारच्या व त्यांच्या प्रतिनिधींच्या हातींच सुपूर्द करण्यांत आलेली होती. अर्धवट लोकसत्ताक असे प्रांत व स्वयंतंत्र संस्थानें यांची मोट बांधून एक संयुक्त राज्य स्थापावें अशी योजना मध्यवर्ति सरकाराबाबद करण्यांत आलेली होती. आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीची चौकट खंबीर करावी हा तिच्यांतील हेतु होता. हा साराच प्रकार लोकविलक्षण होता. तदनुसार राज्यकारभाराचा गाडा चालू होणें अशक्य होतें. ब्रिटिशांचे हितसंबंध सुरक्षित राहावे म्हणून मानवी बुद्धीला ज्या कल्पत्या योजणें शक्य होईल, तेवढ्या त्यांत घुसडून दिलेल्या होत्या. राष्ट्रसभेने ही राज्यघटना धुडकावून लावली होती. खरें म्हणजे तिच्याविषयीं चांगलें बोलणारी व्यक्ति उभ्या देशांत विरळाच होती.

प्रारंभीं घटनेपैकीं प्रांतिक विभागाची अंमलबजावणी सुरू करण्यांत आली. आम्ही राज्यघटना धुडकावली असली तरी निवडणुकी लढवण्याचें टरवलें. निवडणुकीमुळे लक्षावधि मतदारांचाच नव्हे, तर इतरांचाहि संबंध घडतो. या सार्वत्रिक निवडणुकींचा प्रसंग माझ्या दृष्टीनें एक संस्मरणीय प्रसंग ठरला. स्वतः मी उमदेवार नसलों, तरं राष्ट्रसभेच्या वतीनें मीं सारा देश पालथा घातला आणि निवडणुकीप्रीत्यर्थ केलेल्य दौऱ्याच्या बाबतींत मीं जवळ जवळ एक उच्चांकच प्रस्थापित केला. उण्यापुऱ्या चा महिन्यांच्या अवधींत मीं सुमारें पन्नास हजार मैलांचा प्रवास केला; सर्व प्रकारचीं वाहनं वापरलीं आणि जेथें वाहनें पोंचत नव्हतीं असे दूरचे ग्रामीण भागहि सोडले नाहींत विमान, आगगाडी, मोटर, मालमोटर, टांगा, बग्गी, खटारा, पायगाडी, हत्ती, उंट घोडा, आगबोट, होडी, इत्यादि साधनें तर मीं वापरलींच; पण पायीं देखी प्रवास केला.

माझ्याबरोबर मीं ध्वनिक्षेपक बाळगीत असें आणि दिवसाकाठीं डझनभर सभांतून भाषणें करीत असें. वाटेनें जमा झालेल्या मंडळींना उद्देशून बोलावें लागे तें वेगळेंच. कांहीं प्रचंड सभांतून लाखापर्यंत श्रोतृवर्ग जमे. सरासरी दरसभेला वीस हजार लोक असतच. प्रत्यहीं सर्व सभेंत मिळून एक लाख तरी लोक उपस्थित असत. कधीं कधीं त्यांची संख्या लाखाच्या वरहि जाई. अंदाजें एक कोटी लोक माझ्या सभांना हजर राहिले असावेत आणि प्रवासामध्यें या ना त्या मार्गानें ज्यांचा माझ्याशीं सबंध आला अशांची संख्या तर याच्यापेक्षां कितीतरी पट अधिक असावी.

हिंदुस्थानच्या उत्तर सीमेपासून तों दक्षिण समुद्रापर्यंत मी भरधांव निघालों होतों. विश्रांति अशी जवळ जवळ नव्हतीच. त्या काळीं निर्माण झालेल्या खळबळीमुळें आणि जनतेच्या अपूर्व उत्साहामुळें माझा जोम टिकून राहिला होता. या निवडणुकीच्या

दौऱ्यांत हजारों लोकांनीं आमच्या वतीनें काम केलें आणि त्यामुळें सारा देश हालून सर्वत्र नवीन जीवनाचीं चिन्हें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं. या सर्व प्रचाराकडे आम्ही केवळ निवडणुकीचा प्रचार म्हणून पाहत नव्हतों. आमचें लक्ष निवळ तीन कोट मतदारांकडे नव्हतें; मतदानाचा अधिकार नसणारे जे कोट्यवधि इतर लोक होते, त्यांच्याकडेहि आमची दृष्टि लागलेली होती.

विस्तृत अशा या दौऱ्यामध्यें माझ्या मनाला वेधून टाकणारा आणखी एक भाग होता.

या पर्यटनामध्यें हिंदुस्थानचा व तिच्यांतील जनतेचा माझ्या मनासमोर आविष्कार झाला. माझ्या देशाचे सहस्रावधि रंगदार पैलू जसे माझ्या दृष्टीला पडले, त्याचप्रमाणें त्या सर्वांवर सदैव उमटलेला हिंदुस्थानच्या एकत्वाचा ठसाहि माझ्या दृष्टीस पडला. माझ्याकडे नजर लावलेल्या लक्षावधि डोळ्यांच्या आड काय दडलले असेल त्याचा अंदाज बांधण्याचा मीं प्रयत्न केला. भारताचें स्वरूप मी जसजसें अधिकाधिक न्याहाळीत गेलों, तसतसें त्याच्या अपार सौंदर्याविषयीं व वैविध्याविषयीं मी किती अनभ्यस्त होतों आणि मी जाणून घेण्यासारख्या किती तरी गोष्टी अद्यापि बाकी होत्या त्याची कल्पना मला आली. माझ्याकडे भारत जणू कांहीं सस्मित पाहत आहे असें मला वाटे. क्वचित असेहि मनांत येई कीं तो उपहासानें पाहत आहे, त्याचें यथार्थ आकलन आपणाला होत नाहीं.

अधूनमधून मी एकादा दिवस सुटी घेत असे आणि अजंठ्याचीं लेणीं व मोहेंजोदारो येथील उत्खननें पाहावयास जाई. क्षणभर इतिहासकाळांतच मी वावरत आहें असा भास होई आणि अजंठ्याच्या भित्तिचित्रांतील बोधीसत्त्वांची व प्रमदूरांची माझ्या मनांत गर्दी उडून जात असे. नतर कांहीं दिवसांनीं शेतांत राबणाऱ्या अथवा गांवच्या विहिरीवर पाणी भरणाऱ्या स्त्रीकडे पाहतांच मला अजंठ्याच्या चित्रांत पाहिलेल्या स्त्रियांच्या आकृतींचें स्मरण होऊन माझें मन चकित होत असे.

सर्वसाधारण निवडणुकांत राष्ट्रसभा विजयी झाली आणि प्रांतामध्यें राष्ट्रसभेनें मंत्रिपदें स्वीकारावीं कीं नाहीं या प्रश्नावर फार मोठें रण माजलें. अखेरीस व्हाइसरॉय अथवा गव्हर्नर यांच्याकडून राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्यांत येऊं नये या आश्वासनावर तडजोड निघून मंत्रिपदें स्वीकारण्याचें आम्हीं ठरवलें.

१९३७ च्या उन्हाळ्यांत मीं ब्रह्मदेश व मलाया या देशांना भेट दिली. विश्रांति मात्र मुळींच मिळाली नाहीं. कारण जाईन तेथें जनता व कार्यक्रम पाठीमागें लागलेले असतच. पण वातावरणांतील फेरबदल सुखद होता. ब्रह्मदेशांतील उमलत्या व नवथर उमेदीची जनता पाहून मला फार आनंद झाला. प्राचीनत्वाची निशाणी धारण करणाऱ्या हिंदी जनतेपेक्षां ही ब्रह्मी जनता अनेक दृष्टींनीं निराळी दिसत होती.

हिंदुस्थानांत नवीन समस्या निर्माण झाल्या होत्या. देशांतील बहुतेक प्रांतांतून राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ झालेलीं होतीं आणि त्यांपैकीं कित्येक मंत्री

वर्षोगणती तुरुंगवास भोगून आलेले होते. माझी बहीण विजयालक्ष्मी पंडित संयुक्त-प्रांतीय मंत्रिमंडळामधील एक मंत्री बनली. हिंदुस्थानांतील तीच पहिली स्त्रीमंत्री. राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें स्थापन झाल्याचा तत्काळ परिणाम असा झाला कीं डोक्यावरचें एक मोठें ओझें खालीं उतरल्यासारखें एक समाधानाचें वातावरण देशभर पसरलें. देशांत नवीन जीवन संचरूं लागलें, आणि आतां कांहीं तरी फार मोठ्या घटना ताबडतोब घडणार अशी अपेक्षा शेतकरी व कामगार वर्गांत उत्पन्न झाली. राजकीय कैदी मुक्त झाले, पूर्वी कधींहि मिळालें नसेल असें नागरिक स्वातंत्र्य जनतेला मिळूं लागलें. राष्ट्रसभेचे मंत्री स्वतः अंग मोडून खपत व इतरांनाहि अंग मोडून काम करावयास लावीत. पण त्यांना पुराण्या सरकारी यंत्राला हाताशीं धरूनच काम करावें लागे. तें पडलें अपरिचित आणि पुष्कळ अंशीं विरोधी. त्यांतील वरिष्ठ अधिकारी-वर्गहि मंत्र्यांच्या हुकमतींत नव्हता. गव्हर्नरांशीं मंत्रिमंडळांचा दोनदां खटका उडाला आणि मंत्र्यांनीं राजीनामे सादर केले. इतक्या थराला गोष्टी गेल्यावर गव्हर्नरांनीं मंत्र्यांचें म्हणणें मान्य केलें आणि पेचप्रसंग टळला. तथापि मुलकी अधिकारी, पोलिस अधिकारी व इतर वरिष्ठ नोकरवर्ग मिळून बनलेला जो जुना संच त्याला गव्हर्नरांचें पाठबळ आणि खुद्द राज्यघटनेचें कवच लाभल्यामुळे त्याचें सामर्थ्य व प्रभाव खूपच होता, याची जाणीव पदोपदीं होत असे. या अडथळ्यामुळें प्रगतीचा वेग मंदावला आणि असंतोष वाढत चालला.

या असंतोषाचा आविष्कार खुद्द राष्ट्रसभेंतच होऊं लागला, आणि अधिक पुरोगामी गट अस्वस्थ होऊं लागले. आमच्या राष्ट्रसभेच्या लढाऊ संघटनेला हळूहळू केवळ नियंत्रक मंडळाचें स्वरूप प्राप्त होत चाललेलें पाहून मी सुद्धा बेचैन झालों होतों. स्वातंत्र्यास्तव लढा करणें अपरिहार्य होणार, प्रांतिक स्वायत्तता हें घडीभऱ्याचें स्वप्न ठरणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. १९३८ च्या एप्रिल महिन्यांत राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांच्या कारभाराविषयीं मला वाटणारें असमाधान मी गांधीजींना एका पत्रद्वारें कळवलें. " जुन्या चाकोरींत बसण्याची धडपडच अधिक प्रमाणांत त्यांच्याकडून चालू असून तिचेंच समर्थन करण्याचे प्रयत्न त्यांच्या हातून होत आहेत. आम्ही एवढ्या परिश्रमानें जनमानसांत जें श्रेष्ठ स्थान मिळवलें आहे, तेथून आपण च्युत होत आहोंत ही त्याहूनहि दुःखद गोष्ट. मामुली राजकारणाच्या पातळीवर आपण येऊन पोंचत आहों."

मंत्रिमंडळांच्या बाबतींत ही टीका कदाचित् वाजवीहून अधिक कडक झाली असेल. कारण मंत्रिमंडळापेक्षां त्यावेळच्या घटना व परिस्थिति यांच्याकडेच दोषाचा बराचसा वांटा होता. राष्ट्रकार्याच्या अनेकविध क्षेत्रांत आमच्या मंत्रिमंडळांनीं केलेली कामगिरी वास्तविक चांगली भरीव अशी होती. पण त्यांना आखून ठेवलेल्या चतुःसीमांत काम करावें लागे आणि आमचे प्रश्न त्या सीमांच्या पार झाल्याविना सुटण्यासारखे नव्हते. शेतकरीविषयक कायदे व वर्धाशिक्षण योजना यांबाबतचे उपक्रम हे त्यांनीं केलेल्या विविध अशा हितकारक उपक्रमांपैकीं होत. शेतकरी कायद्यामुळें शेतकऱ्यांचा

बराच बोजा कमी झाला. हरएक मुलाला वयाच्या सातव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत मोफत व सक्तीचें शिक्षण मिळावें हा वर्धा-शिक्षण-योजनेचा हेतु आहे. व्यवसायद्वारा शिक्षण देण्यांत यावें, या आधुनिक सिद्धांताच्या पायावर त्याची रचना झालेली असून त्यांची योजना अशा प्रकारें आंखण्यांत आलेली आहे कीं शिक्षणांतील सत्त्वांश तर नष्ट होऊं नये, पण खर्च तर कमी होत जावा. हिंदुस्थान-सारख्या देशांत जेथें कोट्यवधि मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवावयाचा आहे, तेथें खर्चाच्या बाबीचें अतोनात महत्त्व आहे. या योजनांमुळें हिंदुस्थानांतील शैक्षणिक क्षेत्रांत क्रान्ति घडून आली असून तिचा भरपूर विकास करतां येण्यासारखा आहे.

उच्च शिक्षणाचा प्रश्न धडाडीनें हाताळण्यांत आला. त्याचप्रमाणें सार्वजनिक आरोग्याकडेहि लक्ष पुरवण्यांत आलें. पण राष्ट्रसभेच्या मन्त्रिमंडळांच्या प्रयत्नांना बहर येण्यापूर्वींच त्यांनीं राजीनामे दिले. प्रौढ शिक्षणाचा प्रसार बराच नेटानें करण्यांत आला होता आणि तो चांगला यशस्वी पण झाला. ग्रामोद्धाराचें कार्य देखील खूप तळमळीनें करण्यांत आलें.

मंत्रिमंडळांनीं चांगलें भरीव कार्य केलें. पण त्यामुळें हिंदुस्थानचे मूलभूत प्रश्न सुटण्यासारखे नव्हते. ते सुटण्याकरितां अधिक मूलगामी पालट घडवून आणून सर्व प्रकारच्या वरिष्ठ हितसंबंधांचें रक्षण करणाऱ्या साम्राज्यशाही तटबंदीचें उच्चाटन करून टाकणें जरूरीचें होतें.

असें असल्यामुळें राष्ट्रसभांतर्गत स्थितिप्रिय व प्रगतिप्रिय गटांतील संघर्ष वाढत चालला. १९३७ च्या आक्टोबरांत भरलेल्या अ. इं. कां. कमिटीच्या बैठकींत या विरोधांचा आविष्कार मर्यादित स्वरूपांत झाला. ही घटना गांधीजींच्या मनाला फारच लागली आणि खाजगी बोलण्यामध्यें त्यांनीं त्यासंबंधींची आपली नापसंती सडेतोडपणें व्यक्तहि केली. तदनंतर त्यांनीं एक लेख लिहून राष्ट्रसभेचा अध्यक्ष म्हणून मीं जें कांहीं एक कृत्य केलें होतें, त्याविषयीं आपली नापसंती व्यक्त केली.

कार्यकारी मंडळाचा एक जबाबदार सभासद म्हणून इतःपर कार्य करणें मला शक्य नाहीं असा विचार माझ्या मनांत आला, परंतु गोष्टी निकरावर येतील असें कांहींहि न करण्याचें मीं ठरविलें. राष्ट्राध्यक्षत्वाचें वर्ष संपत आलें होतें. त्यामुळें वर्ष संपतांच अधिकारसूत्रें हळूच खालीं ठेवतां येणार होतीं. लागोपाठ दोनदा आणि एकंदर मिळून तीनदा मला अध्यक्षपद मिळालें होतें. पुन्हा एकवार मलाच अध्यक्ष करावें अशी भाषा ऐकूं येत होती. पण आतां अध्यक्षपदासाठीं उभें न राहण्याचा माझ्या मनाचा निर्णय झालेला होता. त्या सुमारास मीं एक गंमत केली, आणि तिच्यामुळें माझी करमणूकहि खूप झाली. मीं एक लेख लिहून तो नांव न घालतां मॉडर्न रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध केला. त्यांत माझ्या फेरनिवडणुकीला मीं विरोध केलेला होता. लेख कोणी लिहिला त्याची कोणालाच म्हणजे संपादकालासुद्धां दाद नव्हती. त्याच्या प्रतिक्रिया माझ्या सहकाऱ्यांवर

आणि इतर मंडळींवर कसकशा होत होत्या त्याची मौज मी पाहत राहिलों. लेखक कोण असावा याबद्दल वाटेल तसे तर्कवितर्क सुरू होते. आणि आपल्या ' इन्साइड एंडिया ' या ग्रंथांत जॉन गंथरनें या लेखाच्या लेखकाचें नांव उद्धृत करीपर्यंत या रहस्याचा भेद फारच थोड्या व्यक्तींना झाला असेल.

हरिपुरा येथील राष्ट्रसभेच्या पुढील अधिवेशनासाठीं सभापतींची निवड झाली, आणि तदनंतर लवकरच मी युरोपांत जावयाचें ठरवलें. मुलीला भेटावयाचें होतेंच; पण युरोपांत सफर करून माझे थकलेलें व गोंधळलेलें मन ताजेतवानें करावें हा त्या सफरीचा खरा उद्देश होता.

परंतु शांत चित्तानें विचार करावा किंवा मनाचे अंधारलेले कानेकोंपरे ज्ञानदीपानें उजळावे, अशी युरोपांतील परिस्थिति नव्हती. तेथील वातावरण कोंदटलें होतें आणि वादळ उठण्यापूर्वीच्या शांततेसारखी वरकरणी शांतता तेथें दिसून येत होती. १९३८ सालचें तें युरोपखंड होतें. नेव्हिल चेंबर्लेन यांच्या तडजोडीच्या राजकारणाला त्या वेळीं भरती आलेली होती आणि विश्वासघात करून चिरडून टाकलेल्या राष्ट्राच्या माथ्यावर पाय देऊन ते म्युनिक येथें पुढें जो प्रसंग घडून आला तिकडे भरधांव निघालें होतें. हिंदुस्थानांतून मी तडक बासिलोना येथें उतरलों आणि संघर्षानें पेटलेल्या युरोपांत प्रवेश केला. पांच दिवस माझा तेथें मुक्काम होता. रोज रात्रीं आकाशांतून होणारी बाबंची वृष्टि मी पाहत होतों. तद्व्यतिरिक्तहि मीं तेथें अशा अनेक गोष्टी पाहिल्या कीं ज्यांचा माझ्या मनावर खूपच परिणाम घडून आला. अपेष्टा, संहार आणि माथ्यावर कोसळू पाहणारीं संकटें यांनीं वेढलेल्या त्या स्थानीं माझ्या मनाला जी शांति लाभली ती मला युरोपांत अन्यत्र लाभली नसेल. धैर्य, निश्चय आणि आपण कांहीं तरी सत्कर्म करीत असल्याची भावना यांची प्रभा तेथें फांकलेली होती.

तेथून मी इंग्लंडला गेलों आणि एक महिना त्या देशांत राहिलों. सर्व दर्जाच्या व मतांच्या लोकांच्या गांठीभेटी घेतल्या. तेथील सर्वसामान्य जनांत एक प्रकारचा सुयोग्य असा बदल झाल्याचें मला आढळून आलें. पण ज्या शिखरावर चेंबर्लेन अधिष्ठित झालेले होते, तेथें मात्र कांहींच बदल झालेला नव्हता. नंतर मी चेकोस्लोव्हाकियांत गेलों आणि तेथें आपण ज्या पक्षाचे कैवारी मानले जातों आणि ज्यांचे स्नेही म्हणवितों त्यांचे गळे मोठ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगून कसे कापावेत तो राजकारणांतील महागहन व गुंतागुंतीचा खेळ मीं अगदीं जवळून पाहिला. म्यूनिक येथील घटनेच्या वेळीं लंडन, पॅरिस व जिनेव्हा या तीन ठिकाणाहून मला हा डाव पाहावयास मिळाला आणि मीं माझ्या मनाशीं अनेक सिद्धांत बांधले. संकटकाळ येतां क्षणीं प्रगत समजले जाणारे गट व लोक यांचा पुरेपूर अधःपात व्हावा याचें मला भारी नवल वाटलें. जिनिव्हा शहर मला पुराणवस्तुसंग्रहालयांतील एकाद्या चिजेप्रमाणें भासलें. तेथें आपापल्या मुख्य कचेऱ्या थाटून बसलेल्या विविध आंतरराष्ट्रीय संघटनांचीं कलेवरेंच जणूं कांहीं त्या ठिकाणीं इतस्ततः पसरलेलीं होतीं. युद्धप्रसंग टळला एवढ्या-

वरच लंडन शहर खूप होतें, त्यापलीकडे दुसऱ्या कशाचीहि त्याला दखल नव्हती. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून आपणाला निश्चिंत बसतां येईल ही कल्पना. पण एक साल उलटण्याच्या आंतच असें मानणारांचा भ्रमनिरास झाला. चेंबर्लेनच्या भाग्यरेषेची कमान सध्यापुरती तरी चढती होती. अधून मधून टीकेची कुजबूज ऐकूं येत होती, नाहीं असें नाहीं. पॅरिसकडे आणि विशेषेंकरून तेथील मध्यम वर्गाकडे पाहून मला फार हळहळ वाटली. बिचाऱ्यांनीं जोराचा निषेध देखील केला नाहीं. क्रांतीचें प्रतीक म्हणून त्रिखंड कीर्ति गाजलेल्या पॅरिसची ही अवस्था !

कष्टी मनानें मी युरोपांतून परत लोटलों. माझ्या अनेक भ्रमांचा निरास झालेला होता. वाटेंत मी इजिप्तमध्यें थांबलों. तेथें मुस्ताफा नाहासपाशा व वफ्द पक्षाचे इतर नेते यांनीं माझें अतिशय प्रेमानें स्वागत केलें. त्यांची पुनश्च भेट झाली आणि भराभर पालटत चाललेल्या जागतिक परिस्थितीच्या अनुरोधानें उभय देशांपुढील समान प्रश्नांची चर्चा करण्याची संधि मिळाली म्हणून मला बरें वाटलें. पुढें कांहीं महिन्यांनीं वफ्द पक्षाचें एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत आलें आणि त्यांनीं राष्ट्रसभेच्या वार्षिक अधिवेशनालाहि भेट दिली.

देशांतील नेहमींच्या कटकटी व गुंते चालूच होते. माझ्या सहकाऱ्यांशीं कसें जमवून घ्यावयाचें ही पंचाईत माझ्यासमोर उभी होतीच. जग कल्पान्ताच्या उंबऱ्यावर उभें असतां अनेक राष्ट्रसभावाले आपसांतील क्षुद्र स्पर्धेंत चूर असल्याचें पाहून माझें मन व्यथित झालें. समाधानाची गोष्ट एवढीच होती कीं राष्ट्रसभेच्या वरिष्ठ नेत्यांमध्यें अजूनहि सारासार विवेक बऱ्याच प्रमाणांत जागृत होता. राष्ट्रसभेव्यतिरिक्त संघटनांत तर खूपच अधःपात झालेला होता. जातीय तेढ व संघर्ष वाढत्या प्रमाणांत होता. जनाब जिन्हांच्या नेतृत्वाखालीं मुस्लिम लीग उत्तरोत्तर अधिकच अराष्ट्रीय, संकुचित वृत्तीची आणि तऱ्हेवाईक होत चालली होती. द्वेष व अत्याचार हा तिचा नाझी पक्षासारखा विघातक कार्यक्रम होता. आमच्या सार्वजनिक जीवनावर दुष्परिणाम घडवून आणणाऱ्या या जातीय संघटनांतील वाढता बाष्कळपणा पाहून अधिकच दुःख होई. लीगचें वर्तन नापसंत असणाऱ्या आणि राष्ट्रसभेला मानणाऱ्या मुसलमानांची संख्याहि बरीच होती, हे खरें.

स्वीकृत मार्गानें जातां जातां लीग साहजिकपणेंच वाममार्गाला लागली आणि शेवटीं हिंदुस्थानांत लोकसत्ता नको व देशाची फाळणी झाली पाहिजे असें म्हणण्या-पर्यंत तिची मजल गेली ! या वाह्यात मागण्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून प्रोत्साहन मिळालें. कारण राष्ट्रसभेचें प्रभुत्व हाणून पाडण्यासाठीं इतर सर्व विरोधी शक्तींप्रमाणें लीगलाहि त्यांचा पाठिंबा होताच. जगांत कोठेंहि यापुढें छोट्या राष्ट्रांना स्थान उरलेलें नाहीं. एकाद्या राष्ट्रसंघाचे घटक म्हणूनच त्यांना जगतां आलें तर येईल ही गोष्ट ज्या काळीं स्पष्ट होत चालली होती, त्याच वेळीं देशाचे तुकडे पाडण्याची ही योजना पुढें मांडण्यांत यावी ही घटना आश्चर्यावह होय. कदाचित् ही मागणी गंभीरपणानें केलेली

नसण्याचाहि संभव आहे; पण जनाब जिन्हांनीं जो द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला होता त्याची ही मागणी म्हणजे क्रमशुद्ध पर्यवसान होतें. जातीय वादाला जें हें नवें वळण मिळालें होतें त्याचा धर्मभिन्नतेशीं फारसा संबंध नव्हता. कारण ती खासच दूर करतां येण्याजोगी होती. देश स्वतंत्र, अखंड व लोकसत्ताक असावा असें म्हणणाऱ्या व धर्माच्या नांवाखालीं स्वतःचे खास हितसंबंध टिकवूं पाहणाऱ्या कांहीं प्रतिगामी व सरंजामी गटांमधील संघर्षामुळें ही तेढ निर्माण झालेली होती. निरनिराळ्या धर्मपंथांच्या अनुयायी गणाकडून अशा प्रकारें आचरला व राबवला जाणारा धर्म हा मला आपत्तीसमान वाटे, वैयक्तिक व सामाजिक प्रगतीच्या मार्गांतील तो धोंड आहे असें वाटे. जो धर्म आध्यात्मिकता व भ्रातृभाव यांचें उगमस्थान असावयाचा त्यांतून द्वेष, संकुचितपणा, नीचता व निंद्य स्वार्थ यांचें हालाहल बाहेर पडत होतें.

१९३९ च्या प्रारंभीं राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीच्या प्रसंगीं राष्ट्रसभेंतील विरोध निकरावर आले. दुर्दैवानें मौलाना अबुल कलाम आझादांनीं उभें न राहण्याचें ठरवल्या-नंतर निवडणुकीचा सामना होऊन सुभाषचंद्र बोस विजयी झाले. या घटनेमुळें अनेक भानगडी उपस्थित होऊन पुढें अनेक महिने पेंचप्रसंगांतच गेले. त्रिपुरी येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्या वेळीं अप्रशस्त देखावा दिसून आला. माझा उत्साह त्या वेळीं अगदीं मावळला होता. वाटेतच मोडून न पडतां आमचें गाडें शेवटपर्यंत ढकलत जातें कीं नाहीं याची शंकाच वाटत होती. राष्ट्रांत व परराष्ट्रांत ज्या राजकीय घडामोडी सुरू होत्या त्यांचा तर माझ्या मनावर परिणाम झाला होताच पण माझें मन मरगळून जाण्याच्या कारणांचा सार्वजनिक जीवनाशीं साक्षात् संबंध नव्हता. माझा मलाच वीट आला होता. त्या वेळच्या एका लेखांत मीं लिहिलें होतें कीं, "माझ्या सहकाऱ्यांना माझ्यापासून समाधान लाभत नसावें असें मला वाटतें. पण तसें होत असल्यास नवल नाहीं. कारण माझ्याकडे पाहून मला स्वतःलाच समाधान वाटत नाहीं. असल्या प्रकृतीच्या माणसाकडून नेतृत्व होणें नाहीं, आणि ही गोष्ट माझ्या सहकाऱ्यांना जितकी लवकर उमगेल तितकें बरें. मनोव्यापार ठाकठीक होत असले आणि वळण लागलेलें असल्याकारणानें बुद्धि कार्यक्षम असली तरी मनोबुद्धीच्या कार्यांत ज्यामुळें चेतना व सामर्थ्य प्राप्त होत असतें त्या शक्तीच गेल्यासारख्या झाल्या आहेत."

सुभाषचंद्रांनीं नतर अध्यक्षपदाचा त्याग करून फारवर्ड ब्लॉकची स्थापना केली. ही संघटना राष्ट्रसभेची प्रतिस्पर्धी बनावी असाच जवळ जवळ त्यांतला हेतु होता. कांहीं काळानंतर ती संपुष्टांत आली. तसें होणें अपरिहार्यच होतें. परंतु तिच्या प्रस्थापनेमुळें विघटनात्मक प्रवृत्तींना जोर चढून एकंदर जी पिछेहाट चालू होती, तिच्यांत भरच पडली. आकर्षक घोषवाक्यांच्या आडोशाला उभें राहून संधिसाधु व साहसी लोकांना आपले घोडे पुढें दामटण्यास अवसर मिळाला. या घटनेमुळें जर्मनीमधील नाझी पक्षाच्या उदयाचा इतिहास मला आठवल्यावांचून राहिला नाहीं.

एखादा कार्यक्रम पुढें करून जनतेचें पाठबळ संपादन करावयाचें आणि मग तेंच बळ अजिबात दुसऱ्याच कोणत्या तरी कार्यासाठीं वापरावयाचें ही त्यांची नीति असे.

राष्ट्रसभेच्या नवीन कार्यकारी मंडळापासून मी बुद्ध्याच अलग राहिलों. माझें तेथें जमेल असें वाटेना. झालेल्या अनेक गोष्टीहि मला नापसंत होत्या. राजकोट प्रकरणीं गांधीजींनीं केलेला उपवास आणि तदनंतरच्या घटना यांमुळें मी अस्वस्थ झालों होतों. त्या वेळीं लिहिलेल्या एका लेखांत मीं लिहिलें होतें: " राजकोट प्रकरणाकडे पाहून माणसाला अधिकच अगतिक वाटूं लागतें. मला जें समजत नाहीं तेथें मला कार्य करतां येत नाहीं. ज्या घटना घडल्या आहेत त्यांचा ग्रंथच मला लागत नाहीं. " मीं आणखी असेंहि लिहलें होतें कीं, " आमच्यापैकीं अनेकांना मार्गनिश्चय करणें उत्तरोत्तर कठिण होत आहे. डाव्या उजव्या गटांपैकीं एकाची निवड करण्याचा अथवा खरें म्हणजे राजकीय निर्णय घेण्याचाहि हा प्रश्न नाहीं. परस्पर-विरोधी व तर्कशून्य निर्णयांना अंधपणें मान्यता देत राहावें, त्यांना विरोध करावा किंवा मुकाट बसून राहावें एवढेच तीन पर्याय होते. त्यांतला कोणताहि पर्याय सहजासहजीं पसंत पडण्याजोगा नव्हता. नापसंत वाटणाऱ्या अथवा बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टींचा अंधश्रद्धेनें स्वीकार करीत गेल्यानें मनःशक्ती ढिल्या व पांगळ्या बनत जातात. अशा मार्गानें कोणताहि व्यापक चळवळ चालवणें शक्य नाहीं, निदान लोकसत्ताक चळवळ तर नाहींच नाहीं. विरोधामुळें आपला शक्तिपात होऊन शत्रूचें बळ वाढलें असें चिन्ह दिसूं लागलें कीं विरोध करणें मनाला अवघड वाटतें. बरें, सगळीकडून कार्यशक्तीला हांक येत असतां क्रियाशून्य बनून राहावें, तर वैफल्याचा व अशाच हरतऱ्हेच्या भावनांचा गंज मनावर चढूं लागतो. " प्रन

१९३८ च्या अखेरीस युरोपहून परत आल्यानंतर लगेच कांहीं काळानें आणखी दोन कार्यांकडे माझें लक्ष वेधलें. लुधियाना येथें भरलेल्या अखिल भारतीय संस्थानीं प्रजापरिषदेच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद मीं स्वीकारलें. त्यामुळें हिंदुस्थानांतील जवळ जवळ सरंजामदारी पद्धतीनें चालणाऱ्या संस्थानांतील पुरोगामी शक्तींशीं माझा संबंध आला. अनेक संस्थानांमध्यें त्यावेळीं वाढता प्रक्षोभ प्रत्ययास येत होता. त्यामुळें जनसंघटना व अधिकारी यांच्यामध्यें मधून मधून खटके उडत. अधिकाऱ्यांना अनेकदा ब्रिटिश सोजीरांची कुमक मिळे. या संस्थानांविषयीं आणि मध्ययुगाचे हे अवशेष टिकवून ठेवण्याच्या कामीं ब्रिटिश सरकारनें केलेल्या साहाय्याविषयीं तोल संभाळून लिहणें अवघडच आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचा पंचमस्तंभ असें जें त्यांचें वर्णन अलीकडेच एका लेखकानें केलेलें आहे तें यथार्थ आहे. कांहीं उदार राज्यकर्ते त्यांच्यांत आहेत. जनतेच्या बाजूनें उभें राहावें, कांहीं भरीव सुधारणा जनतेला द्याव्या अशी त्यांची इच्छा आहे. पण अधिराज्यसत्तेची धोंड त्यांच्या मार्गांत आडवी येते. संस्थानांत लोकसत्ता असेल तर तें पंचमस्तंभी बनणें शक्य नाहीं.

हीं पांचशें-साडेपांचशें संस्थानें राजकीय वा आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र घटक म्हणून राहूं शकणार नाहींत हें स्पष्ट आहे. लोकसत्ताक हिंदुस्थानांत सरंजामदारीचे अड्डे बनूनहि त्यांना राहतां यावयाचें नाहीं. संयुक्त राज्यांतले लोकसत्ताक घटक म्हणून त्यापैकीं कांहीं मोठ्या संस्थानांना राहतां येईल; उरल्यासुरल्यांचें विलीनीकरणच झालें पाहिजे. किरकोळ सुधारणा करून संस्थानांचा प्रश्न निकालांत निघणार नाहीं. संस्थानी सत्ताप्रकारच नष्ट झाला पाहिजे, आणि ब्रिटिश साम्राज्य गेलें कीं मागोमाग तो जाईलहि.

राष्ट्रीय योजना समितीचें अध्यक्षपद हें माझें दुसरें कार्य. प्रांतिक सरकारांच्या साहाय्यानें राष्ट्रसभेच्या तर्फे ही समिति बनविण्यांत आलेली होती. या कामाला हात घातल्यावर दिवसमास तें इतकें वाढत चाललें कीं त्याच्या कक्षेंत हरएक व्यवहार समाविष्ट झाला. निरनिराळ्या विषयांसाठीं आम्हीं उपसमित्या नेमल्या. शेतकी, उद्योगधंदे सामाजिक व आर्थिक विषय इत्यादिकांच्या समित्या नेमून हिंदुस्थानांतील अर्थव्यवहाराची एक सुसंबद्ध योजना बनवण्याचा आम्हीं प्रयत्न केला. आमची ही योजना म्हणजे आराखड्याप्रमाणेंच असणार. नंतर त्यांत तपशील भरावा लागेलच. योजनासमितीचें कार्य अद्यापि चालू असून तें आणखी कांहीं महिने तरी पुरें होण्याचा संभव नाहीं. या कामांत माझें मन रमून गेलें आणि मला त्यापासून पुष्कळच ज्ञान मिळालें. आम्हीं कोणतीहि योजना आंखली तरी तिची अंमलबजावणी स्वतंत्र हिंदुस्थानांतच होऊं शकेल हें स्पष्टच आहे. त्याचप्रमाणें हेंहि उघड आहे कीं कोणतीहि योजना फलदायी होण्यासाठीं आपल्या अर्थव्यवहाराचें समाजीकरण करणें आवश्यक ठरेल.

१९३९ च्या उन्हाळ्यांत मी सीलोनमध्यें थोडे दिवस जाऊन आलों. तेथील हिंदी रहिवासी व सिलोनी सरकार यांच्यामध्यें तेढ निर्माण झाल्यामुळें मला जावें लागलें. सिलोनच्या निसर्गरमणीय बेटांत पुनरपि जाण्याची संधि मिळाली याचा मला फार आनंद झाला. आणि माझ्या भेटीमुळें हिंदुस्थान व सिलोन यांच्यामधील स्नेहाचें सूत चांगलें भक्कम सांधलें गेलें. साऱ्यांनींच म्हणजे सिलोनी मंत्र्यांनीं सुद्धां माझें मनःपूर्वक स्वागत केलें. भविष्यकाळीं कोणतीहि परिस्थिति असली, तरी हिंदुस्थान व सीलोन यांना खांद्याला खांदा भिडवून उभें राहावें लागेल असें माझें निश्चित मत आहे. चीन व हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सीलोन, अफगाणिस्थान व आणखीहि कांहीं राष्ट्रें मिळून एक संयुक्त राष्ट्र बनावें ही माझी भावी काळांतील कल्पना आहे. सर्व जगांतील राष्ट्रांचेंच संयुक्त राज्य बनलें तर फारच बरें.

१९३९ च्या ऑगस्टमधील युरोपांतील परिस्थिति चांगलीच उग्र झाली होती. अशा वेळीं देश सोडून बाहेर जावें हें मनाला प्रशस्त वाटेना. पण उभ्या उभ्याच कां होईना, चीनमध्यें जाऊन येण्याची इच्छाहि प्रबळ होती. म्हणून विमानमार्गें मी चीनमध्यें गेलों आणि हिंदुस्थान सोडल्यावर दोन दिवसांत चुंकिंग येथें पोंचलों. पण लगेच मला तांतडीनें परतावें लागलें; कारण युरोपांत युद्धाचा वणवा भडकला होता.

स्वतंत्र चीनमध्यें मी उणेपुरे दोनच आठवडे होतों खरा, पण ते आठवडे माझ्या वैयक्तिक दृष्टीनें आणि चीनच्या व हिंदुस्थानच्या भविष्यकालीन परस्पर संबंधांच्या दृष्टीनें संस्मरणीय ठरतील. चीन व हिंदुस्थान यांनीं स्नेहसंल्लग्न व्हावें अशी इच्छा माझ्याप्रमाणेंच चीनच्या पुढाऱ्यांच्या, आणि त्यांतल्या त्यांत चीनच्या ऐक्याचें व स्वातंत्र्य-निश्चयाचें प्रतीक बनलेल्या चँग कै शेक सारख्या थोर पुरुषाच्या मनांतहि वागत होती याचें मला फार समाधान वाटलें. श्री. चँग कै शेक व त्यांच्या पत्नी यांच्या व माझ्या अनेकदा गांठीभेटी झाल्या, आणि आम्ही आपापल्या देशांच्या वर्तमान व भविष्यकालाबाबत चर्चाहि केली. चीन देश व चीन जनता यांच्यासंबंधीं माझ्या अन्तःकरणांत जो आदर पूर्वी वसत होता, तो वर्द्धिगत झाला. पुनरपि जणूं तारुण्य प्राप्त झालेल्या प्राचीन राष्ट्राची हिंमत आपदांचे कितीहि घाव पडले तरी खचेल असें मला कल्पनेंतहि कधीं वाटेना.

महायुद्ध आणि हिंदुस्थान. काय करावयास हवें होतें आम्हीं? गेलीं कित्येक वर्षें आम्ही याचाच विचार करीत होतों आणि आमची भूमिका आम्हीं घोषित केलेली होती असें असूनहि ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थान युद्धयमान राष्ट्र झाल्याचें जाहीर करून टाकलें. जनतेला कीं मध्यवर्ति विधिमंडळाला, वा प्रांतिक सरकारांना त्यानें पुसलें देखील नाहीं. हा अपमान गिळणें अवघड होतें. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा पुराणा खाक्याच अद्यापि चालू आहे असा त्यांच्या या करणीचा अर्थ होता १९३९ च्या सप्टेंबरच्या मध्याला राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें एक विस्तृत निवेदन प्रसिद्ध करून त्यांत आपल्या गत व वर्तमान भूमिकेचें स्पष्टीकरण केलें आणि ब्रिटिश सरकारला आपल्या युद्धहेतूंचें विवरण करण्याबद्दल व विशेषतः स्वतःच्या साम्राज्यशाही सबंधींचा दृष्टिकोण विशद करण्याबद्दल पाचारण करण्यांत आलें. फॅशिस्टवाद व नाझीवाद यांचा निषेध आम्हीं अनेकवार करून चुकलों होतों, पण आमच्या मानेवर बसलेल्या साम्राज्यशाहीसंबंधींच आम्हाला विशेष विचार कर्तव्य होता. ही साम्राज्यसत्ता नष्ट होणार कीं नाहीं? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला व घटना परिषदेमार्फत स्वतःची राज्य-घटना बनविण्यासंबंधीच्या आमच्या हक्काला ब्रिटिश सरकार मान्यता देणार कीं नाहीं? मध्यवर्ति सरकारामध्यें लोकप्रतिनिधींच्या हातीं नियंत्रणाचीं सूत्रें देण्याबाबत तावडतोब काय व्यवस्था करण्यांत येणार आहे? पुढें अल्पसंख्यांकांकडून जे जे आक्षेप घेतां येण्यासारखे होते त्यांचें निराकरण करण्यासाठीं आम्ही घटना परिषदेच्या कल्पनेचा अधिक विस्तार केला. घटना परिषदेंत मताधिक्याच्या द्वारा अल्पसंख्यांकांच्या प्रश्नांचा निर्णय न लावतां तो त्यांच्या अनुमतीनें लावण्यांत येईल असा खुलासा करण्यांत आला. अनुमति न मिळून एखाद्या प्रश्नावर मतभेद माजला तर निर्णयासाठीं तो निपःक्षपाती पंचायतीकडे सोंपविण्यांत येईल. लोकसत्ताक पद्धतीच्या दृष्टीनें पाहिलें तर ही तडजोड अपायकारकच होती; पण अल्पसंख्याकांचें शंकानिरसन व्हावें म्हणून राष्ट्रसभेनें हा मार्ग पत्करण्याचीहि तयारी दर्शविली.

याबाबत ब्रिटिश सरकारनें पत्करलेलें धोरण स्पष्टच होतें. युद्धहेतु जाहीर करण्याची अथवा लोकप्रतिनिधींच्या हातीं शासनसूत्रें देण्याची आपली तयारी नाहीं याबद्दल त्यांनीं कोणाच्याहि मनांत कांहीं शंका उरूं दिली नव्हती. जुन्या जमान्याबर-हुकुम काम चालू होतें आणि तसेंच तें पुढेंहि चालणार होतें. हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचे हितसंबंध संरक्षणाविना ठेवण्याची कल्पना सरकारला मान्य नव्हती. परिस्थिति अशी असल्याकारणानें राष्ट्रसभेच्या प्रांतीय मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. या शर्तीवर सरकारशीं युद्धप्रयत्नांबाबत सहकार्य करण्यास मंत्रिमंडळें तयार नव्हतीं. सरकारनें राज्यघटना स्थगित केली व स्वयंतंत्र कारभार सुरू झाला. इंग्लंड व फ्रान्समध्यें लोकप्रतिनिधि व अनिर्बंध राजसत्ता यांच्यांतील ज्या सनदशीर संघर्षामुळें दोन राजांचे शिरच्छेद झाले, तसलाच संघर्ष हिंदुस्थानांतहि सुरू झाला. पण येथील संघर्षाचें स्वरूप सनदशीर विरोधाहून बरेंच निराळें होतें. अद्यापि ज्वालामुखी आग ओकूं लागला नव्हता; परंतु त्यांच्या पोटांतला गडगडाट ऐकूं येऊ लागला होता.

पेंचप्रसंग कायम राहिला आणि वटहुकुमी राजवटीला प्रारंभ होऊन कॉंग्रेसजनांना व इतरांना अटक होऊं लागली. त्यामुळें चीड उत्पन्न होऊन प्रत्यक्ष कृतीला सुरुवात होऊं द्या अशी आमचे लोक निकड लावूं लागले. परंतु लढ्याचा रागरंग आणि इंग्लंडवर कोसळलेलें संकट पाहून आमच्या बुद्धीची ओढाताण सुरू झाली. शत्रु पेंचांत असतांना त्याची तारांबळ उडवणें हें आपलें ध्येय असूं नये या गांधीजींच्या शिकवणुकीचा आम्हांला सर्वस्वी विसर पडलेला नव्हता.

युद्ध लांबत चाललें तसे नवे प्रश्न उपस्थित झाले, अथवा जुन्याच प्रश्नांना नवें स्वरूप प्राप्त झालें. जुने संच उधळले, जुनी मूल्यें लोपलीं. पुनः पुनः धक्के बसत राहिल्यामुळें कोणताहि जम बसवणें दुष्कर होऊन बसलें. रशिया-जर्मनांचा तह, फिन्लंडवर रशियाचें आक्रमण, रशियाची जपानशीं मैत्री, हे अशा प्रकारचे प्रसंग होते. या जगांत तत्त्वें म्हणून, व्यवहाराचे आदर्श म्हणून कांहीं चीज आहे कीं नाहीं? कीं सारा वारा येईल तशी पाठ फिरवण्याचाच प्रकार आहे!

एप्रिल उजाडला आणि नॉर्वेचा पाडाव झाला. मे महिन्यांत हॉलंड व बेल्जमवर काळरात्र पातली. जूनमध्यें फ्रान्स धरणीवर कोसळलें. पॅरिसची ती सुंदर व मानधन नगरी, स्वतंत्रतेची ती धात्री, अवमानित होऊन पायदळीं पडली होती. फ्रान्सचा केवळ पराभव होऊन थांबला नाहीं, त्याचें मनच मेलें, तो नीतिभ्रष्ट झाला. हा अधःपात देश आंतूनच कोठें तरी सडल्याशिवाय कसा झाला असेल अशी शंका माझ्या मनांत उत्पन्न झाली. जगण्यास असमर्थ बनलेल्या जीर्ण जगाचीं इंग्लंड व फ्रान्स हीं दोन प्रतीकें होतीं. त्यामुळेंच तग धरणें त्यांना अशक्य झालें असावें काय? कीं साम्राज्यशाहीमुळें त्यांचें सामर्थ्य वाढल्यासारखें दिसत असलें तरी वस्तुतः अशा लढ्याच्या प्रसंगीं ती त्यांच्या शक्तिपातासच कारणीभूत होत होती? जें स्वातंत्र्य ते इतरांना नाकारतात, त्याच्यासाठीं झगडण्यास ते कितपत तयार होतील? फ्रान्समध्यें घडलें त्याचप्रमाणें त्यांच्या

साम्राज्यशाहीला नागड्या फॅशिझमचें स्वरूपहि आल्यावांचून राहणार नाहीं. नेव्हिल चेंबर्लेनच्या जुन्या धोरणाचें भूत अद्यापि इंग्लंडच्या मानेवरून उतरलेलें नव्हतें. जपानची खुशामत करावी म्हणून ब्रह्मदेश-चीन मार्ग बंद करण्याचे ठरले होतें आमच्या देशांत कांहीं बदल करण्याचें नांव नव्हतें. आम्ही जो संयम पाळीत होतों तो असमर्थतेचे लक्षण मानण्यांत येत होता. ब्रिटिश सरकारचा हा निर्बुद्धपणा पाहून मी थक्क होऊन गेलों. काळवेळ ओळखण्याची अथवा काय घडतें आहे त्याचा अंदाज बांधून तदनुसार धोरण बदलण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणीं अजिबात राहिलेली नव्हती इतर बाबतींप्रमाणें आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या बाबतींतहि दृष्टोत्पत्तीला येणारा कार्यकारणाचा हा कांहीं निसर्गसिद्ध नियम तर नसावा ना की ज्या राजवटीची उपयुक्तता संपुष्टांत आलेली आहे तिला आपला जीव बचावण्याचा सुद्धां शहाणपणा सुचूं नये ?

ब्रिटिश सरकारच जेथें इतकें मंदबुद्धि आणि ठेंच खाऊन देखील अक्कल न सुचणारें, तेथें हिंदुस्थान सरकारची गोष्टच काय पुसावी ? या सरकारचा कारभार कांहींसा हास्यास्पद तर कांहींसा खेदजनक अशा प्रकारचा आहे. काय वाटेल तें होवो त्यांची आत्मसंतुष्ट वृत्ति विचलित व्हावयाची नाहीं. मग त्यांच्यापुढें तुम्ही कितीहि तर्क लढवा, युक्तिवाद करा; डोक्यावर संकट कोसळणार असो कीं समोर सर्वनाश ठाकलेला असो. गोष्टींतल्या रिप व्हॅन विंकलप्रमाणें डोळे उघडे ठेवून सिमल्याच्या टेकाडावर हे सरकार खुशाल घोरत पडलेले असतें.

युद्धांतील घटनांमुळें राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीसमोर नवेनवे प्रश्न येऊन उभे राहिले. गांधीजींचें मत असें होतें कीं आपल्या स्वातंत्र्यप्रयत्नांत आम्हीं ज्या अहिंसा-तत्त्वाचें चिकाटीनें पालन केलें, त्याचाच अवलंब स्वतंत्र हिंदुस्थानचे शासन करतांनाहि करण्यांत यावा. परचक्र अथवा अन्तर्गत कलह यांचें निवारण करण्यासाठीं स्वतंत्र हिंदुस्थाननें हेंच साधन वापरावयास हवें. हा सवाल त्या वेळीं आमच्यासमोर उपस्थित झालेला नव्हता; पण गांधीजींच्या मनांत तो घोळत होता. तत्संबंधीं आपली भूमिका स्पष्ट शब्दांत बोलून दाखवण्याची वेळ आलेली आहे असें गांधीजींना वाटलें. आमच्या लढ्यामध्यें मागच्याप्रमाणेंच यापुढेंहि आम्हीं अहिंसेचाच अवलंब केला पाहिजे याविषयीं आमच्यापैकीं प्रत्येकाची खात्री पटलेली होती. युरोपांतील युद्धामुळें तर आमची ही श्रद्धा अधिकच बळकट बनली होती. परंतु भावी सरकारला या बाबतींत आतांपासून वचनबद्ध करून ठेवणें फार बिकट होतें; राजकारणाच्या क्षेत्रांत कार्य करणाराला ही गोष्ट सहजासहजीं कशी करतां येणार ?

सर्व जगाला जो अहिंसेचा संदेश आपण ऐकवणार आहों, त्याचा स्वतःच त्याग करणें अथवा तो शिथिल करणें शक्य नाहीं असें गांधीजींना वाटलें. त्यांची ही भावना रास्तच असेल. आपला संदेश कोणत्या प्रकारें द्यावा तें ठरवण्याचा पूर्ण अखत्यार त्यांच्या हातीं राहूं देणें अवश्य होतें. राजकीय पक्षांच्या निकडीचा खोडा त्यांच्या पायांत आम्हीं काय म्हणून अडकवावा ? म्हणून ते आपल्या मार्गानें गेले आणि कार्यकारिणीनें

आपला मार्ग अनुसरला. म्हणजे त्यांचा आमचा संबंध संपला असें नाहीं. आमच्यामधील स्नेहबंधनें फार दृढ होतीं. यापुढेंहि ते आम्हांस परोपरीनें मार्गदर्शन करतील व अनेक प्रसंगीं आमचें नेतृत्वहि स्वीकारतील. तथापि त्यांच्या या अर्धवट निवृत्तीमुळें आमच्या राष्ट्रीय लढ्याच्या इतिहासाचें एक खंड समाप्त झालें असें म्हणणें सयुक्तिक होईल. गेल्या कांहीं वर्षांत त्यांच्या अंगीं एक प्रकारचा कर्मठपणा येत चालला आहे. त्यांच्यांतील पूर्वींची प्रसंगानुकारिता घटत चालली आहे असें मला वाटतें. तथापि पूर्वींची प्रभुता अद्यापहि कायम आहे, पूर्वींचें आकर्षण अजूनहि टिकून आहे, त्यांचें व्यक्तित्व व त्यांची गुरुता इतरांपेक्षां अजूनहि उत्तुंग दिसतात. हिंदुस्थानांतील कोट्यवधि जनतेच्या हृदयांतील त्यांचें स्थान लवमात्र कमी झालें आहे अशी कल्पना-देखील कोणी करूं नये. हिंदुस्थानचें भाग्यविधान म्हणून गेलीं वीस वर्षें ते वर्तत आहेत. अजूनहि त्यांचें कार्य पूर्ण झालेलें नाहीं.

'गेल्या कांहीं आठवड्यांत श्री. राजगोपालाचारींच्या सांगण्यावरून राष्ट्रसभेनें ब्रिटनसमोर आणखी एक योजना मांडली आहे. राष्ट्रसभेच्या उजव्या गटांतले म्हणून श्री. राजगोपालाचारींची गणना होते. तेज, बुद्धि, निःस्वार्थी जीवन आणि मर्मग्राही विचारशक्ति हे त्यांचे गुण आमच्या ध्येयाला अत्यंत उपकारक ठरलेले आहेत. राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें होतीं तेव्हां ते मद्रास प्रांताचे मुख्य प्रधान होते. संघर्ष टळावा या तीव्र इच्छेनें त्यांनीं एक सूचना मांडली व तिचा कांहीं सहकाऱ्यांनीं साशंक मनानें स्वीकारहि केला. त्यांची सूचना अशी होती कीं ब्रिटननें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य करावें व मध्यवर्ति शासनसंस्थेंत विधिमंडळाला जबाबदार अशा तात्पुरत्या राष्ट्रीय सरकारची स्थापना करावी. इतकें घडलें तर हें सरकार संरक्षण खात्याची जबाबदारी पत्करील व अशा प्रकारें युद्धप्रयत्नांना साहाय्य करूं लागेल.

ही योजना अत्यंत व्यवहार्य होती, कोणत्याहि प्रकारची उलथापालथ न करतां अमलांत आणतां येण्याजोगी होती. योजनेबरहुकूम येणारें राष्ट्रीय सरकार संमिश्र स्वरूपाचें बनणें अपरिहार्यच होतें. अल्पसंख्याकांना त्यामध्यें पुरेपूर प्रतिनिधित्व मिळालें असतें. सूचनेचें स्वरूप खासच सौम्य असें होतें. जनतेचें साहाय्य व तिचा विश्वास संपादन केल्यावांचून खरें संरक्षणकार्य व युद्धप्रयत्न होणें शक्य नसतें. या दृष्टीनेंहि ही योजना उचितच ठरते. जनतेचें साहाय्य व विश्वास साम्राज्यवादी सरकारला मिळवणें शक्यच नाहीं. राष्ट्रीय सरकारच तें करूं शकेल.

पण साम्राज्य सरकारांची दृष्टि उलटी असते. जनतेला वेठीला धरून कामें करून घेऊं व राज्यकारभार चालवूं असें त्यांना वाटतें. संकट आ वासून उभें असलें तरी हिंदुस्थानवरील आपला राजकीय व आर्थिक ताबा सोडून जनतेचें साहाय्य मिळवण्यास साम्राज्यसरकार तयार होत नाहीं. हिंदुस्थानांत व साम्राज्यामधील इतर देशांत न्याय्य भूमिका ठरली तर जी अपूर्व नैतिक प्रतिष्ठा ब्रिटिश सरकारला प्राप्त होईल तिची देखील त्याला कदर करावीशी वाटत नाहीं.

आज ८ ऑगस्ट १९४० रोजीं मी या ओळी लिहीत असतां व्हाइसरॉयनें ब्रिटिश सरकारनें आम्हांला दिलेलें उत्तर सादर केलें आहे. साम्राज्यवाद्यांची तीच परिचित भाषा आणि तोच नेहमीचा आशय. युरोपप्रमाणें व जगांतील प्रत्येक देशांतल्याप्रमाणें येथील सत्तेचा घडाहि भराभर भरत चालला आहे.

माझे अनेक मित्र तुरुंगांत जाऊन बसले आहेत. त्यांचा मला किंचित् हेवाच वाटतो. बंदिवासाच्या जीवनांत जीवनासंबंधीं जसा एक साकल्यानें विचार करणें साधतें तसा विचार या पिसाट झालेल्या, युद्धें, राजकारण, फॅशिझम व साम्राज्यवाद यांनीं आक्रांत झालेल्या जगांत करणें जमत नाहीं.

पण या जगांतून देखील क्वचित प्रसंगीं सोडवणूक करून घेतां येते. गेल्या महिन्यांत मी काश्मीरांत जाऊन आलों. तेवीस वर्षांनीं हें जाणें झालें. बाराच दिवस तेथें राहिलों. पण सौंदर्यानें पूरित असे ते दिवस होते. त्या यक्षभूमीचें सौंदर्य मीं पिऊन घेतलें. काश्मीरच्या दरींतून, पर्वतराजींतून यथेच्छ भटकलों, एक हिमनदी चढून गेलों, आणि मनांत आलें—आहे, जीवनांत कांहीं राम आहे.

—जवाहरलाल नेहरू

# भिन्न मार्ग

कोणती एकादी घटना घडून आल्याकारणानें हिंदुस्थान व ब्रिटन यांचे मार्ग वेगवेगळे झाले आहेत असें म्हटलें तर तें समुचित ठरणार नाहीं. कारण जोंपर्यंत इंग्लंड हें जेतें राष्ट्र व हिंदुस्थान हें जित राष्ट्र म्हणून मानण्यांत येत असेल, तोंपर्यंत त्या दोघांचे मार्ग भिन्न असणें अपरिहार्यच ठरतें आणि ते तसे होतेहि. जित व जेत्यांचे संबंध जबरदस्तीवरच आधारलेले असतात. आणि जेथें जबरदस्ती आहे तेथें हातमिळवणी होणें असंभाव्य असतें. अशा परिस्थितींत प्रभुराष्ट्र जित राष्ट्राला लोहदंडांनीं बांधून आपल्या मागोमाग फरपटीत तरी नेतें अथवा जितराष्ट्र तो लोहदंड तोडून तरी टाकतें.

यामुळें आमचे मार्ग सदैव भिन्नच राहिलेले आहेत. आणि रस्सीखेंचीचा खेळ सतत चालू आहे. कधीं हा संघर्ष मानसिक व शाब्दिक स्वरूपाचा तर कधीं उघड बंडाच्या स्वरूपाचा असतो. १८५७ मध्यें रक्तमय उठाव झाला आणि अमानुषपणें त्याला दडपण्यांत आलें. तदनंतर बाह्यात्कारी दिसत नसला, तरी संघर्ष कायमच होता; कटु आणि अखंड असा संघर्ष चालू होता. राष्ट्रीय संघटनेच्या स्वरूपांत तो प्रगट झाला. त्याचे प्रथमचे उद्गार मवाळ असले, तरी उत्तरोत्तर जनतेचें हृद्गत तो प्रकट करूं लागला. तेव्हां त्याच्या शब्दांना धार येऊं लागली. जेत्यांच्या विरुद्ध एक शांततेचें बंड उभें राहिलें. हिंसेचा त्यानें सर्वस्वी त्याग केलेला असला, तरी पूर्वीच्या कोणत्याहि बंडाहून तें अधिक व्यापक व सामर्थ्यवान होतें. हिंदुस्थानांतील कोट्यवधि जनता आपल्या चिरकालीन दास्याचा, दारिद्र्याचा व पिळवणुकीचा वीट आल्यामुळें भय दूर सारून आणि साम्राज्यशाहीच्या डोळ्याला डोळा भिडवून स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठीं खडी झाली.

जनतेच्या चळवळींत अनेक भरत्याओहोट्यांचे काळ आले. नाना कष्ट व नाना दुःखें तिला सोसावीं लागलीं, पण तिनें मागें पाऊल घेतलें नाहीं. निरनिराळ्या मार्गांनीं चळवळ चालूच राहिली. इकडे सर्वनाशाच्या गर्तेकडे जग धांवत सुटलें होतें. हिंदुस्थानच्या प्रश्नांना व्यापक स्वरूप प्राप्त होऊं लागलें आणि जागतिक प्रश्नांचा व त्यांचा संदर्भ जुळून आला. अशा रीतीनें आमची दृष्टि व्यापक व गाढ बनली असली आणि भविष्याचा वेध ती घेऊं लागली असली, तरी हिंदुस्थानांतील प्रश्नाचें राष्ट्रवाद विरुद्ध साम्राज्यवाद असें जें ऐन स्वरूप होतें तें कायमच राहिलें. स्वातंत्र्यावांचून जगांतील उलाढालींत भाग घेणें आम्हाला शक्यच नव्हतें. आणि साम्राज्यवादाला

चिकटून राहणारांनीं जगांत स्वातंत्र्य व लोकशाहीचा डांगोरा पिटावा हा दांभिकपणाचा व कुचेष्टेचा प्रकार आहे असें आमचें मत होतें.

फॅशिझम व नाझीवाद यांची आम्हाला शिसारी होती. युरोपांत कहर उसळला होता त्याचा फार दृढ असा परिणाम हिंदी लोकांवर झाला. पण हिंदुस्थानांत पाहिलेल्या अत्याचारांचाहि आम्हाला विसर पडला होता असें नाहीं. ( आणि असा विसर कसा पडेल ? ) आमच्या देशबांधवांना रोजच्या रोज सहन करावा लागणारा अपमान व पिळणूक आमच्या डोळ्यांना दिसत नव्हती अथवा त्याची कळ आमच्या अंतःकरणाला जाऊन भिडत नव्हती, असेंहि नाहीं. नाझीवाद व फॅशिझम हे वाईट आणि साम्राज्यवाद तेवढा भला असला शहाणपणा आमच्यापाशीं नव्हता.

युरोपांत युद्ध पेटलें आणि इकडे हिंदुस्थान युद्धयमान राष्ट्र म्हणून घोषणा झाली. हिंदी जनतेच्या नेत्यांना फुकटचें एका शब्दानें देखील विचारण्यांत आलें नाहीं. राष्ट्रसभा ही अनधिकृत संस्था म्हटली तरी मध्यवर्ति विधिमंडळ, आणि प्रांतिक स्वायत्तता उपभोगणारीं प्रांतिक सरकारें तर विद्यमान होतीं कीं नाहीं ? पण त्यांना कांहीं सांगितलें नाहीं कीं त्यांचें मत कोणी पुसलें नाहीं.

स्वातंत्र्य व लोकशाहीच्या नांवानें दुनियेंत एकच कालवा सुरू झाला. कानाला तो जयघोष चोखट वाटत होता. पण हे आवाज पूर्वी आमच्या कानांवरून गेलेले होते. आणि त्यांचें फळ काय मिळतें तेंहि आम्हीं चाखलेलें होतें. सहजासहजीं आम्ही गळांत अडकणें शक्य नव्हतें. आम्ही सावधपणें वागत होतों. वारंवार बजावून सांगितलें असतांहि आमच्या टाळक्यावर युद्धाचा हा बोजा लादण्यांत आल्यामुळें तर आम्ही अधिकच दक्ष झालों होतों. हें स्वातंत्र्य व ही लोकसत्ता आमच्याहिसाठीं आहे कीं फक्त युरोपांत व युरोपच्या परिसरांत राहणाऱ्या देवदेवतांसाठीं आहे ? हिंदुस्थानांत अथवा जगांत कोठेंहि साम्राज्यवाद म्हणून शिल्लक राहणार नाहीं असा याचा अर्थ खरोखर आहे काय ?

आम्हीं ब्रिटिश सरकारकडे विचारणा केली. स्पष्टीकरण करा म्हणून सांगितलें. हेतु हा कीं आम्हाला मार्गनिश्चय करतां यावा. पण आमची ही विचारपूस त्यांना गैरलागू आहे, उद्धटपणाची आहे असें वाटलें. त्यांनीं जीं उत्तरें दिलीं त्यावरून लोकप्रतिनिधींच्या हातीं सत्ता देण्याची इच्छाच त्यांच्या ठायीं नव्हती इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील साम्राज्यशाही चौकट नष्ट होण्याचा संभवहि नव्हता असें दिसून आलें. स्वतःसाठीं राष्ट्रसभेनें कांहींच मागितलें नव्हतें. वरिष्ठ नोकऱ्या तिला नको होत्या. त्या हव्या असत्या तर न मागतांच मिळाल्या असत्या. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा व्हावी आणि लोकप्रतिनिधींची घटना परिषद् भरवण्यांत येऊन तिच्यामार्फत सर्व अल्पसंख्याकांना संरक्षण देणारी स्वतंत्र हिंदुस्थानची घटना बनवावी अशी राष्ट्रसभेची मागणी होती.

हिंदी जनतेच्या मनाची व बुद्धीची ओढाताण सुरू होती. नाझीवाद व फॅशिझम यांच्याविषयीं तिला भयंकर तिटकारा होता. त्यांना यश मिळावें अशी कांहीं जनतेची इच्छा नव्हती. नवी दुनिया निर्माण करण्यासाठीं, खऱ्या स्वातंत्र्यासाठीं हें युद्ध चालू आहे अशी जर हिंदुस्थानची खात्री पटली असती तर त्यानें आपले सारें बळ एकवटून युद्धांत उडी घेतली असती. पण साम्राज्यशाहीचा आणि आमचा परिचय फार दिवसांचा, कित्येक पिढ्यांचा. आम्ही परस्परांना पुरे ओळखून होतों, परस्परांच्या मनांत अंदेशा होता, एकामेकांविषयीं वीट आलेला होता. वैमनस्य, पिळणूक, कटुता, वचनभंग, दुहीला व फाटाफुटींना दिलेलें उत्तेजन आणि देशाचीं शकलें पाडण्याचे प्रयत्न यांनीं भरलेल्या गेल्या दीडशें वर्षांच्या इतिहासाची पार्श्वभूमि होती. हीं सर्व विघ्नें बाजूस सारणें, या सर्व अडथा दूर करणें सोपें काम नव्हतें. तरीहि आम्हीं हें सारें करावयाचें ठरवलें. परंतु जनतेला कांहीं तरी एक जोराचा धक्का दिल्याशिवाय, एक आनंदाची लाट उठवल्याशिवाय, हे पक्के झालेले ग्रह घालवण्याचा नुसता प्रयत्न करणें देखील अशक्यप्राय होतें. हिंदुस्थानांतील सारें वातावरण बदलून टाकील व शंकाकुशंका लयास नेईल अशी कांहीं तरी गोष्ट व्हावयास हवी होती. स्वातंत्र्याची घोषणा निःसंदिग्ध शब्दांत केली असती आणि राज्यकारभार लोकमतानुसार करण्याची तरतूद ताबडतोब केली असती तर हें घडून आलें असतें. त्याच्या अभावीं युद्धप्रयत्नाशीं स्वखुषीनें सहकार्य करण्यास जनतेला प्रवृत्त करणें हिंदुस्थानांतील कोणाहि व्यक्तीला वा गटाला शक्य होतें ना.

आजकाल युद्धांना जनतेचा पाठिंबा अवश्य असतो. हुकुमशाही राष्ट्रांत देखील अखंड प्रचार चालू ठेवून जनतेची उत्सुकता नेहमीं खडी ठेवतात. जनतेच्या मनांत दुरावा अथवा बेफिकिरी असली तर धंदेवाईक फौजेला देखील धडपणें युद्ध चालवितां येणार नाहीं. युद्ध व्यवस्थितपणें चालविण्याचा संकुचित दृष्टिकोन घेतला, तरीसुद्धां प्रातिनिधिक सरकार आवश्यकच ठरलें असतें. साम्राज्यशाही ही जनतेला वेठीला धरूं शकेल; पण जनतेची संमति वा सदिच्छा संपादन करणें तिला जमणार नाहीं.

व्हाइसरॉय व ब्रिटिश सरकार यांनीं आम्हाला नकार दिल्यावर आमचा मार्ग स्पष्ट झाला. प्रांतांतील राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले, प्रांतांतील प्रातिनिधिक कारभार संपला. लोकेच्छेविरुद्ध असणारे ब्रिटिश सरकारचे हुकुम मानण्यास मंत्रिमंडळें व विधिमंडळें तयार नव्हतीं. इंग्लंडातील जुन्या काळचा राजा व विधिमंडळांतील संघर्षच नव्या स्वरूपांत यथें सुरू झाला. राजाच्या ऐवजीं येथें व्हाइसरॉय व गव्हर्नर होते व विधिमंडळें जनेच्छेचीं प्रतिनिधि बनलीं होतीं. दूर बसून राज्य करणाऱ्या राजाच्या व त्याच्या मंत्र्यांच्या आदेशांचा प्रतिकार अमेरिकेच्या स्वाभिमानी व स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनीं केला व दीर्घकालपर्यंत लढा केल्यावर आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यांत त्यांनीं यश मिळवलें असा इतिहासाचा दाखला आहे.

परंतु हिंदुस्थानांत काय परिस्थिति होती ? नव्या जगाच्या उदयकालीं, स्वातंत्र्य व लोकसत्ता यांचे जयघोष सुरू असतां जें कांहीं अल्पस्वल्प प्रातिनिधिक सरकार देशांत नांदत होतें तेंहि गुंडाळण्यांत आलें. व्हाइसरॉय सर्वाधिकारी बनला. कायदेकानूंच्या बाबतींत कर्तुमकर्तुम् सत्ता गाजवावी, लोकांवर कर बसवावा, त्यांना वेठीस धरावें; कोणत्याहि प्रातिनिधिक संस्थेला एका शब्दानें विचारण्याचें कारण नाहीं.

पाठीशीं बहुसंख्य प्रतिनिधींचें बळ असतांहि राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले हें खरें. पण व्हाइसरॉयचे आदेश अथवा ब्रिटिश सरकारची नीति त्यांना मान्य नव्हती हें त्यांच्या राजीनाम्याचें कारण होतें. व्हाइसरॉय अथवा गव्हर्नर यांना विधिमंडळें बरखास्त करून नव्या निवडणुकी करतां आल्या असत्या. परंतु नव्या निवडणुकी केल्या तर राजिनामे दिलेल्या राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांना परत प्रचंड पाठिंबा मिळेल याची त्यांना पूर्ण जाणीव होती. इतर कोणत्याहि पक्षाला बहुमत न मिळाल्याकारणानें मंत्रिमंडळ बनवतांच आलें नसतें. एतावता विधिमंडळ बरखास्त करणें, निवडणुकी बंद ठेवणें, आणि सारीं सत्तासूत्रें स्वतःच्या हातीं घेणें याविना व्हाइसरॉयला काय किंवा गव्हर्नरला काय दुसरा मार्गच उरला नव्हता. जनता व विधिमंडळें एका बाजूला व राजाचे प्रतिनिधि दुसऱ्या बाजूला असा हा स्पष्ट सामना होता. कोणत्या तरी एका पक्षानें दुसऱ्याला चिरडावें अथवा स्वतः माघार घ्यावी असा निनतोड प्रसंग तो होता. विधिमंडळांना दडपण्यांत आलें. नेव्हिल चेंबर्लेननें पार्लमेंटचा विश्वास गमावल्यावर तें बरखास्त करून वटहुकुमानें राज्य करण्याचा सल्ला राजाला दिला असता, अथवा अध्यक्ष रूझवेल्टनें हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचें व सीनेटचें मत अवमानून वटहुकुमानें आपलीच सर्वाधिकारशाही प्रस्थापित केली असती तर जसें झालें असतें, तसाच हा प्रकार झाला. सर्वाधिकारशाही व हुकुमशाही यांच्या निषेधाचा बकवा सर्वत्र चालू आहे. या दोन्ही सत्ताप्रकारांचा निषेध इंग्लंडचे राज्याधिकारी तारस्वरांत करीत असतात. पण हिंदुस्थानकडे पाहिलें तर येथें हुकुमशाही व सर्वाधिकारशाहीच माजलेली दिसून येते.

आमच्यापुढील मार्ग स्पष्ट होता. तरीही आम्हीं संयम राखला. आमच्यांतील अनेकांचा आमच्यावर रोष झाला आणि अनेक साथी राष्ट्रसभेची भूमिका समजावून सांगितल्याच्या अपराधावरून बंदिवासांत पडले. तरीहि आम्हीं पाऊल उचललें नाहीं. कारण या ऐन कसोटीच्या वेळीं तरी इंग्लंडच्या सरकारांतील कांहीं प्रगतिवादी व मजूरपक्षीय सदस्य साम्राज्यवादाच्या मगरमिठींतून आपली सुटका करून घेतील व बोलल्याप्रमाणें चालतील अशी वेडी आशा आम्हीं मनाशीं बाळगून होतों. नाझी सत्ताधाऱ्यांना आमच्याकडून कोणतेंहि प्रोत्साहन मिळूं नये अशी आमची इच्छा होती. युरोपवर अथवा अन्य कोणत्याहि देशावर त्यांचें प्रभुत्व स्थापन व्हावें ही कल्पना आम्हाला दुःखदायक वाटे. गुलामगिरीच्या आगींत आम्ही होरपळलेले असल्याकारणानें इतरांना तिचे चटके कसे

बसतील याची आम्हास कल्पना होती. नाझींचे वंशविषयक विचार अथवा वंशविषयक अत्याचार जगांत दुसऱ्या कोणाला नसले तरी निदान आम्हाला तरी असह्य होते. हॉलंड व बेल्जमवर हें आकाश कोसळलें, फ्रान्सची जी दुर्दशा उडाली त्यामुळें आमचें चित्त हेलावून गेलें होतें. इंग्लंड संकटाच्या तोंडाशीं उभें होतें, अशा वेळीं त्याची स्थिति अधिक बिकट करावी असें आम्हास वाटेना. इंग्लंडच्या शास्त्या वर्गानें आमच्यावर अन्याय केले असतील, तिच्या साम्राज्यवादानें आम्हाला भरडून काढलें असेल; पण इंग्लंडमधील जी जनता धैर्यानें संकटाशीं झुंज खेळत होती तिच्याविषयीं आमच्या मनांत वैरभाव नव्हता. हिंदुस्थान व इंग्लंड या उभयतांना गौरवास्पद व हितावह ठरेल असा मार्ग हुडकण्याचा आम्हीं आटोकाट प्रयत्न केला. आम्ही नव्या सूचना मांडल्या, रामगडच्या अधिवेशनांत आम्हाला जो आदेश देण्यांत आलेला होता त्याच्याहिपलीकडे आम्ही गेलों. हिंदुस्थानच्या संरक्षणास्तव संघटना करण्याचें व युद्धप्रयत्नांत साहाय्य करण्याचे आश्वासनहि आम्हीं दिलें. पण या गोष्टी स्वतंत्र राष्ट्र म्हणून, हिंदुस्थानच्या कोट्यवधि जनतेच्या साहाय्यानेंच आम्हाला करणें शक्य झालें असतें. म्हणून स्वातंत्र्य जाहीर करून एकाच पक्षाचें नव्हे तर सर्व पक्षांचें प्रातिनिधिक असें तात्पुरतें राष्ट्रीय सरकार बनवणें आवश्यक होतें. आणि हें करावयाचें तर साम्राज्यवादी चौकट नष्ट केलीच पाहिजे हें मूलभूत तत्त्व मान्य करावयास हवें होतें.

व्हाइसराय व ब्रिटिश सरकार यांनीं आम्हाला व देशाला चक्क नकार दिलेला आहे. फ्रान्सची घटका भरत आली होती तेव्हां इंग्लंड व फ्रान्सचें संयुक्त राष्ट्र बनवावें असें सुचवण्याची धडाडी ब्रिटनच्या राज्यकर्त्यांनीं दाखवली. ती सूचना चकित करणारी अशी होती. पण तोपर्यंत वेळ टळून गेलेली होती. तथापि वेळ आलीच, तर मळलेली वाट सोडून निराळ्या वाटेनें पाऊल टाकण्याची हिंमत ब्रिटिश सरकारांत आहे हे त्यावरून दिसून आले. परंतु हिंदुस्थानांतल्याप्रमाणें त्यांचे हितसंबंध जेथें गुंतलेले आहेत तेथें जिवावर बेतलें असलें आणि युद्ध अंगलट येऊं लागलें असलें तरी जुन्या चाकोरींतून बाहेर पडण्यास तें तयार होत नाहीं. साम्राज्य-शाहीमुळे त्यांना जे विशेष अधिकार प्राप्त झालेले आहेत, त्यांचा त्याग युद्धप्रसंगीं आपली बाजू बळकट होईल हें उघड दिसत असतांहि त्यांना करवत नाहीं. आपल्या साम्राज्याविषयीं व तें टिकवून ठेवण्याविषयीं मोठ्या खुशींत येऊन ते बोलत असतात. पण स्वतःच्या कानांना गोड वाटणारे हे प्रलाप म्हणजे आमच्या गुलामीची, अधोगतीची आणि दारिद्र्याची जाणीव करून देणाऱ्या प्रतीकाप्रमाणें आम्हाला वाटतात याची त्यांना शुद्ध राहत नसावी. म्हणून या युद्धापासून आमच्या वाटा वेगवेगळ्या झाल्या असें म्हणणें चुकीचे होईल. त्या कधींच एक नव्हत्या असें मला बजावून सांगावयाचें आहे. आतां ब्रिटिशसरकारच्या या घोषणेमुळे तरी आमच्यांतील जे सूक्ष्म मनोबंध होते तेहि तुटून गेले आहेत. यापुढें आम्ही कधींकाळीं बरोबर चालू अशी शक्यताच या घोषणेमुळें राहिलेली

नाहीं. या घटनेचा मला विषाद वाटला. कारण ब्रिटिश साम्राज्यासकट सर्वच साम्राज्य-शाह्यांचा मी दुष्मन असलों तरी इंग्लंडच्या अनेक गुणांचा मी चाहता होतों आणि हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामधील सूक्ष्म स्नेहबंध न तुटतील तर बरें असें मला वाटत असे. पण हे स्नेहसंबंध स्वातंत्र्याच्या वातावरणांतच टिकूं शकणार. हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं मला हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा असें वाटे हें उघडच आहे. पण इंग्लंडचें कल्याण व्हावें हाहि त्यांतला हेतु होता. पण माझ्या आशा भंग पावल्या आहेत. विधात्यानें आमच्यासाठीं निराळेंच भवितव्य लिहून ठेवलें आहे असें दिसतें. यापुढील काळांत गेल्या शंभर वर्षांचें वैर कायम राहणार आणि वाढणार आहे; आणि जेव्हां केव्हां ताटातूट होईल आणि ती होणारच, तेव्हां ती मैत्री तुटल्यामुळें न होतां वैर विकोपाला गेल्यामुळें होईल.

इतके दिवस आम्ही स्वस्थ राहिलों, तेव्हां यापुढेंहि आम्ही त्यांच्या आदेशापढें मान तुकवूं अशी ब्रिटिश सरकारची कल्पना झाली असल्याचें मला सांगण्यांत आलें. आमच्या संयमाचा अर्थ आम्ही क्रियाशून्य बनलों असा करण्यांत येत आहे. जुलूम-जबरदस्तीच्या, बाँबफेक्या विमानांच्या, टँकसच्या, हत्यारबंद सैनिकांच्या या दुनियेंत आम्ही खरोखरच किती दुबळे भासतों, नाहीं! मग अशा दुर्बळांचा विचार करा कशाला? पण सशस्त्र संगरानें परिपूर्ण अशा जगांत देखील मनुष्याचें मन, राष्ट्राचें अन्तःकरण म्हणून कांहीं चीज असेलच ना? तें क्षुद्र नाहीं, तें दुबळें नाहीं; त्याला तुच्छ लेखणें धोक्याचें ठरल्यावांचून राहणार नाहीं.

आमच्यापैकीं ज्यांचा ज्यांचा हिंदी राजकारणाशीं घनिष्ट संपर्क आलेला आहे त्यांना ब्रिटिश सरकारच्या उत्तराची फोड अथवा विश्लेषण करून सांगण्याचें कारण नाहीं. त्यांनीं कोणताहि संदेह उरूं दिलेला नाहीं हें कबूल केलें पाहिजे. परंतु इतरेजनांना या उत्तराचें मर्म कदाचित् उमगणार नाहीं, त्यांतील झोकदार शब्दांमुळें हिंदुस्थानला कांहीं घबाड देऊं केलें होतें आणि हिंदी लोकांना अधिक राजकीय सत्ता मिळणार होती असा संभ्रम त्यांच्या मनांत निर्माण होईल.

व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर कांहीं बिनसरकारी सभासद घेण्यांत यावे अशी ही योजना आहे. हें कार्यकारी मंडळ खऱ्या अर्थानें कार्यकारी मंडळ नाहीं तें बऱ्याच अंशीं सल्लागार मंडळासारखें आहे. खरी सत्ता व्हाइसरॉयच्या हातीं आहे. तो कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना नेहमी विश्वासांत घेतोच असें नाहीं. हे सदस्य म्हणजे आपापल्या खात्याचे प्रमुख मानण्यांत येतात व ते व्हाइसरॉयला आपल्या अधिकारांतील खास विषयाबाबत सल्लामसलत देतात. पण धोरण ठरतें तें व्हाइसरॉयकडून. वस्तुतः धोरण ठरवण्याची जबाबदारी त्याच्यावर असते आणि ब्रिटिश पार्लमेंटांतील भारतमंत्र्याला तोच जबाबदार असतो. हीच कायदेशीर, घटनादत्त व परंपरागत चौकट जोंपावेतों कायम असेल, तोंपर्यंत कार्यकारी मंडळांत कोण गेले व किती गेले याला अर्थ उरत नाहीं. व्हाइसरॉयच्या अधिकारांत वा प्रतिष्ठेंत त्यांच्यामुळें तसूभर फेरफार होणार नाहीं. त्यांच्या लाघवीपणामुळें व्हाइसरॉयच्या विचारांत काय फरक पडेल तेवढाच.

हा विचार बाजूला ठेवला, तरी कार्यकारी मंडळांत चारदोन बिगरसरकारी सदस्यांची भर टाकल्यानें त्यांच्या स्वरूपांत कांहीं मूलभूत फरक पडत नाहीं. सरकारनियुक्त व अधिकारी सदस्यांची बहुसंख्या कायमच राहते. त्यांच्या अंगीं कांहीं गुणविशेष असतीलहि ( त्यांचा प्रत्यय मात्र येत नाहीं ) परंतु ते शंभर टक्के साम्राज्य-वादी नोकरशाहीचे प्रतिनिधि असतात एवढें मात्र खरें. त्यांचें अधिकारपद सर्वस्वी व्हाइसरॉयच्या आधीन असतें, त्याची आज्ञा त्यांना शिरसावंद्य असते. जनतेचें जीवन, विचार व व्यवहार यांपासून त्यांची सर्वस्वी फारकत झालेली असते. या अधिकारी वर्गाचें एक वेगळेंच जग असतें. जुन्या जमान्यांतील पोलिशी राज्यव्यवस्था ठेवण्यांतच त्यांची जी कांहीं कर्तबगारी असेल ती खर्च होत असते. आधुनिक जगापासून ते फार दूर असतात. आधुनिक जग व त्यांतील समस्या त्यांना आकलन होत नाहींत. इतर देशांतून नष्टप्राय झालेल्या वर्गाचे हे अवशेष असून त्यांची येथूनहि उचलबांगडी व्हावयास हवी.

आणि ज्या 'प्रातिनिधिक हिंदी गृहस्थांची' निवड कार्यकारी मंडळासाठीं करण्यांत येईल ते देखील बहुतकरून सर्व तऱ्हेच्या गटांतून निवडले जातील. त्यांतले कांहीं गट तर पूर्णपणें प्रतिगामी आहेत. हिंदुस्थानांतील पुरोगामी शक्तींचें मत देखील त्यांच्या द्वारा व्यक्त होणें कठीण आहे. कार्यकारी मंडळांत ते परस्परांना शह देऊन बसतील किंवा याहूनहि वाईट म्हणजे परस्परांना मारकहि होतील. ते जनतेकडून निवडलेले नसणार, आणि जनतेला कोणत्याहि प्रकारें जबाबदारहि नसणार. व्हाइसरॉय त्यांची निवड व्यक्तिशः करणार.

एवंच राष्ट्राच्या दृष्टीनें अथवा सत्तासंक्रमणाच्या दृष्टीनें मूठभर हिंदी लोकांची भर पडल्यामुळें कांहींच साधणार नाहीं हें स्पष्ट आहे.

युद्धसल्लागार मंडळ स्थापण्याची आणखी एक सूचना करण्यांत आलेली आहे. हें सल्लागार मंडळ म्हणजे नाना तऱ्हेच्या लोकांची एक भेळ होणार असून निमसरंजामदारी संस्थानांचेहि प्रतिनिधि त्यांत असणार आहेत. त्यांच्या अधूनमधून बैठकी भरतील, जें बोधामृत पाजण्यांत येईल तें मुकाटपणें पितील आणि लष्करभरतीचे दलाल म्हणून ते काम करीत राहील. यांना अधिकार असा कोणताच असणार नाहीं. व्यवहार दृष्ट्या अगदीं निरुपयोगी व महत्त्वाच्या दृष्टीनें शून्य असें हें पोकळ मंडळ बनून राहील.

सध्या या दोन सूचना पुढें मांडण्यांत आलेल्या आहेत. आणि हातच्या सत्तेपैकीं पावआणा देखील आमच्या हातीं देण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार नाहीं ही गोष्ट व्हायसरॉयनीं निःसंदिग्ध शब्दांत सांगून टाकलेली आहे. भारतमंत्र्यांनीं वर हेंहि स्पष्टी-करण केलें आहे कीं ''हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांतील महत्त्वाचे घटक'' असा शब्दप्रयोग आम्ही जेव्हां करतों तेव्हां हिंदुस्थानांतील युरोपियनांचे हितसंबंधहि आम्हाला अभिप्रेत असतात. एमरी व व्हाइसरॉय यांच्या डोळ्यांसमोर हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनाचें

जें चित्र आहे, त्यांत युरोपियन, संस्थानिक, बडे जमीनदार, जातीयवादी व इतर प्रतिगामी गट यांनींच सारी जागा अडवलेली असावी. आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या पटाचा ताणा व बाणा याच समाजसूत्रांनीं विणला गेलेला आहे. तेव्हां त्याचें रक्षण अवश्य आहे, त्यांना प्रतिनिधित्व दिलें पाहिजे हा त्यांचा सिद्धांत. जे तीस चाळीस कोट लोक कष्टत असतात, क्वचित उपाशी पोटींहि राबत असतात ते म्हणजे त्यांच्या दृष्टीनें केवळ धूळ, कचरा !

सध्या हें असे आहे आणि युद्ध चालू असेपावेतों हें असेंच चालू राहावयाचें. आमच्या मनांत भावी कालाबद्दलच्या ज्या चंदेरी कल्पना आहेत, ज्या स्वतंत्रतेविषयीं आम्ही नित्य ऐकत आहों ती सत्यसृष्टींत उतरवण्याविषयींची सरकारी योजना पुढील-प्रमाणें आहे. युद्ध संपलें कीं हिंदुस्थानांतील राष्ट्रीय जीवनांतील प्रातिनिधिक घटक जमवून त्यांचें एक मंडळ बनवावयाचें आणि त्यानें नवीन घटनेचा आराखडा तयार करावयाचा. या प्रातिनिधिक घटकांत एमेरी व व्हाइसरॉय यांच्या दृष्टीनें कोणाकोणाचा समावेश होणार तें आपण पाहिलेंच. रत्नालंकारविभूषित राजेमहाराजे, कमरबंद चढवलेले सरदार, युरोपियन कारखानदारांचीं धेंडें, जमीनदार, तालुकदार, हिंदी भांडवलदार, वरिष्ठ सरकारी नोकरांचे प्रतिनिधि, असा हा मोठा पोक्त मेळावा असणार. त्यांत चारदोन सामान्य जनहि असतील. ( आंखलेली योजना अशी आहे. आतां दैवगति उलटीहि फिरेल कदाचित्.) हे सर्व एकत्र जमून हिंदुस्थानची घटना सिद्ध करणार. मेळाव्याचें अध्यक्षपद बहुतेक खुद्द व्हाइसरॉयकडेच असणार, आणि स्वयंनिर्णयाचा अधिकार हिंदुस्थान हा अशा प्रकारें बजावणार. या मंडळाचा पट मोठा उठावदार दिसेल खरा. ब्रिटिश साम्राज्यशाहीची जमीन आणि त्यावर काढलेल्या वेलपत्रानें प्रत्येक भांडवलदाराच्या व सरजामदाराच्या जागीं एक एक झुपकेदार फूल. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेल्या ब्रिटिशांच्या हितसंबंधांचें रक्षण या मंडळाकडून होईल आणि त्यांना त्यांचें न्याय्य तें स्थानहि मिळेल. सर्वांचीच तब्येत खूष राहावी म्हणून या सर्व बनावाला वासाहतिक स्वराज्य ( डोमीनियन स्टेटस् ) असें गोंडस नांव दिलें म्हणजे झालें.

पण या मंडळाला मुद्दां मन मानेल तसें वागतां येणार नाहीं, याचा विसर पडतां कामा नये. कांहींहि झाले तरी ब्रिटिशांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याची जी जबाबदारी ब्रिटिश सरकारवर आहे, ती सरकारला हातावेगळी कशी करतां येणार ? तेव्हां या मंडळानें कांहींहि ठरवलें तरी " हिंदुस्थानशीं ग्रेट ब्रिटनचा जो दीर्घकालीन संबंध आहे व त्यामुळें निर्माण झालेल्या ज्या जबाबदाऱ्या बादशहांच्या सरकारच्या शिरावर आलेल्या आहेत व ज्यांचा त्यांना इन्कार करणें शक्य नाहीं, त्या पार पाडणें शक्य होत असेल " तरच मंडळाच्या कार्याला मंजुरी मिळणार.

आमच्यासारखे जे सरकारी जगाच्या बाहेर उभे असल्यामुळें अंधारांत चांच-पडणार लोक आहेत, त्यांना हिंदुस्थानच्या भवितव्याचें हें चित्र नापसंत वाटतें. पण हें

आमचेंच दुर्दैव म्हटलें पाहिजे. जगभर जुनीं साम्राज्यें लयास जात असतां आणि जुनी समाजरचना कोसळून पडत असतां ब्रिटिश सरकारनें या संक्रमणाच्या व क्रांतीच्या कालांतसुद्धा वरील प्रकारच्या योजना हिंदी लोकांसमोर मांडाव्या हें आम्हाला धाष्ट्याचें वाटलें तर तें देखील आमच्या भोळसटपणाचें व अपक्व बुद्धीचेंच चिन्ह म्हटलें पाहिजे. साम्राज्यशाह्या राजसंन्यास करीत नसतात; सत्तेला कवटाळून बसणें केवळ मूर्खपणाचेंच असलें तरी आपली मिठी त्या सोडत नाहींत या गोष्टी आम्हीं समजल्या पाहिजे होत्या. पण आम्हीं साधेभोळे पडलों, त्यामुळें ब्रिटिश मजूर पक्षाच्या नेत्यांनीं, स्वातंत्र्याच्या व साम्राज्यवादाच्या त्या कैपक्ष्यांनीं, हिंदुस्थानपुढें ही सूचना मांडावी याचें आम्हाला आपलें थोडेंसें नवल वाटतें. पण ही सूचना नाहींच मुळीं. हा निर्णय आहे आणि आम्हांला तो आवडो वा न आवडो, आमच्या माथीं तो मारण्यांत येणार आहे.

आणखी एक पर्याय राष्ट्रसभेनें सुचवून पाहिला. जनतेपैकीं सज्ञान मतदारांच्या मतांनीं निवडलेल्या घटना समितीनें राज्यघटना बनवावी असा तो पर्याय होता. पण ही झाली लोकसत्ताक पद्धति. तिच्यामुळें प्रत्येक व्यक्तीला समान महत्त्व प्राप्त झालें असतें. ही फारच मोठी गोम राष्ट्रसभेच्या पर्यायांत होती. व्हाइसरॉय व एमरी यांच्या नजरेसमोर ' हिंदी राष्ट्रीय जीवनांतले जे प्रमुख घटक ' होते, त्यांना निवडणुकींत यश मिळणें अशानें दुर्घट झालें असतें ना ? लोकमतानुसार निवडणुकींत या घटकांना अथवा ब्रिटिश हिंदी भांडवलदारांना न्याय्य स्थान कसें मिळालें असतें ?

व्हाइसरॉयनें आणखी असेंहि सांगून ठेवलें आहे कीं: " ज्या शासन-व्यवस्थेला हिंदुस्थानांतील मोठ्या व प्रबळ अशा घटकांचा विरोध असेल तिच्याकडे देशाच्या शांततेची व सुरक्षिततेची सध्या ब्रिटिश सरकारकडे असणारी जबाबदारी सोंपवण्याचा विचार आम्हाला करतां येणार नाहीं हें सांगणे नलगे. आणि अशा घटकांना बळेंच अशा सरकारचा अधिकार मान्य करावयास लावण्याची कल्पनाहि ब्रिटिश सरकार मान्य करूं शकणार नाहीं. "

फार बारकाईनें विचार करण्याच्या लायकीचें हें विधान आहे. हिंदुस्थानसाठीं कोणतीहि शासनव्यवस्था निर्माण केली तरी नाना प्रकारचे गट व हितसंबंध विरोधाला उभे राहतील हें उघडच आहे. विविध प्रकारच्या या गटांना आणि हितसंबंधांना मान्य आणि देशांतील चाळीस कोटी जनतेलाहि पसत अशी एक सर्वसंमत योजना करतां येईल कीं नाहीं याची वानवाच आहे. कोणताहि शेतकी कायदा घेतला, तर त्याचा जमीनदार व कुळें यांच्यांतील नैसर्गिक संघर्षाशीं सबंध येतोच; आणि कोणताहि कामगार-विषयक कायदा करावयास लागलें तर भांडवलदार डोळे वटारतात. भांडवलदारांतसुद्धां ब्रिटिश भांडवलदार आणि नवोदित हिंदी भांडवलदार यांचे झगडे आहेतच. कारण इतके दिवस स्वतःला धक्का पोंचूं नये म्हणून ब्रिटिश भांडवलशाहीनें हिंदी भांडवल-दारांना बुद्धिपुरःसर दडपून ठेवले होतें. तात्पर्य असें कीं परस्परविरुद्ध हितसंबंधांचे वर्ग देशांत विद्यमान असल्या कारणानें येथील राष्ट्रीय जीवनांतहि सर्वत्र संघर्षच आढळून

येतात. आमच्यापैकीं कांहींजणांना वाटतें कीं वर्गविहीन समाजरचना येथें स्थापन व्हावी आणि पुढेंमागें तशी समाजरचना प्रस्थापित होईलहि. पण दरम्यानच्या काळांत हे संघर्ष मिटवण्याचा हिंसेव्यतिरिक्त उपलब्ध उपाय म्हटला म्हणजे लोकशाहीचाच उलट प्रचंड बहुसंख्येला इष्ट वाटणारा आर्थिक अथवा राजकीय बदल जर एकादा गट थोपवून ठेवूं लागला, तर राष्ट्र भंगेल, कदाचित यादवीहि माजेल.

ब्रिटिश सरकारच्या योजनेचा फलितार्थ निघतो तो असा कीं यापुढें कोणतेंहि दूरगामी आर्थिक वा राजकीय स्थित्यंतर होऊंच नये. कारण त्याला विरोधी असा एकादा तरी गट पुढें येणारच. विरोधाला हिंदी गट पुढें सरला नाहीं तर युरोपियन गट सरेल; पण विरोधकाची भूमिका पार पाडावयास तयार असलेले प्रतिगामी हिंदी गट आहेतच कीं! याचा अर्थ असा कीं आहे ही स्थिति राहणार आणि त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याचे आतांप्रमाणेंच पुढेंहि फावणार. सद्यःस्थिति यावच्चंद्रदिवाकरौ टिकवण्याची व ब्रिटिश हितसंबंध सुरक्षित ठेवण्याची ही युक्ति आहे.

कोणत्याहि गटावर ब्रिटिश सरकारनें जबरदस्ती करावी अशी मागणी कोणी करील हें विधान तर हास्यास्पद आहे. अशा प्रकारची सूचना देखील कोणीं केलेली नाहीं. पुरोगामी शक्तींची मुस्कटदाबी करूं इच्छिणाऱ्या प्रतिगाम्यांनीं व जातीयवाद्यांनीं मात्र या प्रकारच्या मागण्या केलेल्या आहेत. उलट आमची मागणी आहे ती अशी कीं सध्या चालू असलेली सर्व प्रकारची जबरदस्ती ब्रिटिशांनीं बंद करावी; सरकार म्हणून त्यांनीं आतां येथून आपलें चंबूगबाळें आटोपावें. असें झालें तरच परस्परांत तडजोड करून घेण्याची वृत्ति हिंदुस्थानांतील विविध गटांत निर्माण होईल; कारण तडजोड न केली तर यादवीविना अन्य मार्ग उरणार नाहीं. पण जोंपावेतों ब्रिटिश सरकार राहील, तोंपावेतों तें एकाच्या विरुद्ध दुसऱ्याला खेळवणार आणि आपल्या देशबांधवांचा घात करून देखील स्वार्थासाठीं ब्रिटिशांची खुशामत करण्याची हीन मनोवृत्ति कायम राहणार.

एकाद्या महत्त्वाच्या गटाला जर कोणती राज्यव्यवस्था नापसंत असेल, तर ती स्वीकारण्याची सक्ति आपण त्या गटावर करणार नाहीं असें ब्रिटिश सरकारचें म्हणणें आहे. याचा क्रमप्राप्त उपसिद्धांत असा कीं ज्यांना ती राज्यव्यवस्था हवीशी वाटते त्यांच्यावर मात्र ब्रिटिश सरकार सक्ति करणार. हिंदुस्थानांत इतके दिवस ब्रिटिश सरकारनें कोणतें कार्य केलेलें आहे? आतां तें काय करीत आहे? आपली पकड व प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठीं सर्व जनतेला, प्रत्येक गटाला दडपणांत राहणें हेंच ना? हिंदुस्थानांतील ब्रिटिश कारखानदारी सुरक्षित राहावी म्हणून हिंदी कारखानदाराला दडपा. हिंदी जनतेला दडपण्यासाठीं खडी फौज ठेवा. संस्थानी प्रजाजनांना डोकें वर काढतां येऊं नये म्हणून संस्थानिकांनी तळीं उचलून धरा. आम्हाला सक्ती करावयाची नाहीं असें ब्रिटिश सरकारनें म्हणणें याचें फारच नवल वाटतें. सक्तीव्यतिरिक्त हिंदुस्थानांत ते दुसरें करताहेत तरी काय?

बरें, एकादी राज्यव्यवस्था एकाद्या महत्त्वाच्या गटाला नकोशी वाटते हें ठरवावयाचे तरी कसं ? सर्वसामान्य मार्ग म्हटला म्हणजे त्या गटानें मतदान करावें, तसेंच इतरांनींहि करावें. म्हणजे निरनिराळ्या गटांच्या भावना व कल्पना काय आहेत तें व्यक्त होतें. मग परस्परांना मान्य अशी तडजोड तरी ते करतात किंवा दुर्दैवानें ती न झाल्यास लढा होतो.

कोणत्याहि प्रकारची प्रगति अथवा पालट होऊं द्यावयाचा नसेल तर त्या दृष्टीनें ब्रिटिश योजना आदर्शभूत मानली पाहिजे. येथील ब्रिटिश भांडवलदारसुद्धा त्या कामीं हातभार लावतील. सरकार तर याच्याहि पुढें गेलें आहे आणि कोणत्याहि परिस्थितींत या हितसंबंधांचें रक्षण करण्याची जबाबदारी सोडण्यास आम्ही तयार होणार नाहीं असें त्यांनीं बजावलें आहे. कांहींहि होवो, हे हितसंबंध राहणारच; म्हणजे कांहींहि झालें तरी ब्रिटिशांची कारखानदारी व पेढ्या हिंदुस्थानच्या मानगुटीवर बसणारच. पण हें जोखड दूर व्हावें हीच तर आमची इच्छा आहे. तें दूर झालें नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानचें भयानक दारिद्र्य कमी होणार नाहीं, प्रगति साधणार नाहीं. आधीं तें दूर केलें पाहिजे, बाकीचें सर्व मागाहून.

व्हाइसरॉयच्या निवेदनावरून आमच्या पुढें आमिष म्हणून ठेवलेल्या वासाहतिक स्वराज्याची आम्हाला चांगली कल्पना आलेली आहे. त्याला आमच्यापैकीं फारसें कोणी बळी पडेल असें वाटत नाहीं.

कोणत्याहि महत्त्वाच्या गटावर सक्ति न करण्यासंबंधींचा जो भाग व्हाइसरॉयच्या निवेदनांत आहे, तो प्रामुख्यानें धार्मिक अल्पसंख्याकांना उद्देशून असावा. धार्मिक सक्ति असूं नये याला आमची संमति आहे. ब्रिटिशांनीं तशा प्रकारची सक्ति करूं नये हेंहि मान्य. कोणीच तशी सक्ति करूं नये. पण हा सक्तीचा प्रश्न येतोच कोठें ? सक्तीचें नांव तरी कोणी काढलें आहे ?

कोणा तरी एकाद्या पक्षाच्या अथवा धार्मिक गटाच्या हातीं सत्ता सुपूर्द करावी अशी राष्ट्रसभेची सूचना नव्हतीच. यच्चयावत् हिंदी जनतेसाठीं तिनें सत्तेची मागणी केलेली होती. हिंदी जनतेला जें इष्ट वाटेल तें तिनें लोकसत्ताक पद्धतीनें ठरवावें असें राष्ट्रसभेचें म्हणणें होतें. इतकेंच नव्हे तर एक पाउल पुढें टाकून सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांचें हितरक्षण व्हावें असें तिनें प्रतिपादन केलें. ज्या अल्पसंख्यांकांची तशी इच्छा असेल त्यांना स्वतंत्र मतदारसंघ द्यावेत आणि अल्पसंख्याकांच्या हक्कासंबंधीं कांहीं निर्णय घ्यावयाचा झाल्यास तो बहुसंख्यांकांनीं स्वतःच्या बहुमताच्या जोरावर घेऊं नये यालाहि राष्ट्रसभेनें संमति दिली. असे निर्णय तडजोडीनें मिटवावेत आणि हा मार्ग जर एकाद्या बाबतींत दुर्दैवानें अशक्य झाला, तर निःपक्षपाती लवादाचा आश्रय करावा. अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठीं याहून अधिक व्यापक व परिणामकारक पद्धति दाखवून देतां येणार नाहीं. आतां लोकसत्ताक पद्धतीचीच इतिश्री करावयाची असेल आणि अल्पसंख्याकांना सर्वाधिकार बहाल करावयाचे असतील, तर गोष्ट वेगळी !

हिंदुस्थानांतील मुसलमानांना केवळ तांत्रिक दृष्टयाच अल्पसंख्य म्हणतां येईल. त्यांची लोकसंख्या घसघशीत असून ते इतर अनेक दृष्टींनीं चांगले सबळ आहेत. त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर जबरदस्तीनें कांहीं लादतां येईल अशी परिस्थिति नाहीं. हिंदूंवरहि कसली सक्ति करतां येणार नाहीं. सांघिक दृष्टया या दोन जमातींचें पटलें नाहीं तर तें हिंदुस्थानचें दुर्दैवच म्हणावयाचें. मग या बेबनावाचे काय परिणाम होतील तें कोणी सांगावें? परंतु राजकीय व आर्थिक प्रश्नाच्या बाबतींत जनता धार्मिक गटवारीनें वागत नसते हें आपण सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे. जनतेंत गटवारी पडते ती निराळया अनुरोधानें.

अल्पसंख्याकांचा प्रश्न उपस्थित होतो तो हिंदु वा मुसलमानाव्यतिरिक्त असणाऱ्या जमातींच्या बाबतींत. पण हिंदु, मुसलमान, शीख अथवा ख्रिश्चन कोणीहि हिंदी इसम असो, त्यानें आपल्या देशबांधवांविरुद्ध परकीय सत्तेपाशीं रक्षणाची याचना करावी ही गोष्ट मला अत्यंत विस्मयकारक वाटते. वस्तुस्थिति अशी आहे कीं संरक्षण मागणारे धर्म भिन्न म्हणून संरक्षण मागतच नाहींत; आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहावे म्हणून ते संरक्षण मागत असतात.

हा मुद्दा अगदीं स्पष्ट समजून घ्यावयास हवा. जातीय प्रश्नाचें अंतःस्थ स्वरूप नेहमींच आर्थिक हितरक्षणाचें असतें आणि धार्मिक भावनांचा वापर केवळ साधन म्हणून करण्यांत येत असतो. ज्यांच्यापाशीं सरंजाम आहेत, अर्थसाधनें आहेत त्यांना कोणत्याहि प्रकारच्या स्थित्यंतराबद्दल धाकधुक वाटत असते. म्हणून ते ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या कच्छपीं लागतात. इकडे ब्रिटिश सरकारलाहि स्वातंत्र्य, लोकसत्ता, अथवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याहि संक्रमणाला नाट लावण्यांत आणि स्वतःची मांड अधिकाराच्या खोगीरांतून हालूं न देण्यांत मोठा आनंद वाटतो. हिंदुस्थानांतील जातीय वादाचें मूलकारण व समर्थन हें अशा प्रकारचें आहे. मागें म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील संस्थानिकांचें वर्णन ब्रिटिशांचा 'पंचमस्तंभ' असें करावयाचें झाल्यास वर या पंचमस्तंभांत जातीय वाद व त्यांच्या पुरस्कर्त्यांचा समावेश करण्यासहि हरकत नाहीं. जातीयवादी व संस्थानिक यांचें परस्परांशीं इतकें जमतें आणि त्यांचें परस्पर सहकार्य होतें याचें आश्चर्य वाटावयास नको. दोघांचेंहि उद्दिष्ट एकच आहे—तें म्हणजे स्वातंत्र्याचा मार्ग रोखून धनवानांची चलती कायम ठेवणें.

अर्थात्च जातीय वादाचें स्वरूप मूलतः अशा प्रकारचें असलें तरी तो वाद इतक्या सहजासहजीं निकालांत काढतां येणार नाहीं. त्यांत आणखीहि इतर गोष्टी आहेत. जातीयवादांत जो जनसमुदाय गुरफटलेला आहे, त्याला आपल्या आर्थिक हितसंबंधांची जपणूक करावयाची असते किंवा त्याला ब्रिटिश सत्तेविषयीं आपुलकी वाटते असें नाहीं. जनमन जातीयवादानें कसें झालें त्याचा उलगडा, जर्मन जनतेवर हिटलरनें आपलें प्रभुत्व कसें बसवलें त्याचें ज्ञान झाल्यास होऊं शकेल. या दोन्ही घटनांत

पूर्णतया साम्य नाहीं; पण दृष्टांत म्हणून उपयुक्त आहे. मनाची पकड घेणाऱ्या घोषणांनीं जनता वेडी होते. आणि मग तिला निराळ्याच मार्गाकडे नेलें जातें. अलीकडे देशांतील जातीय वादाला लागलेलें वळण आणि नाझीवादाचा विकास यांच्यामध्यें विलक्षण साम्य दिसून येतें खरें.

हिंदुस्थानांत जातीय वादाचा प्रारंभ झाला तो नोकऱ्यांमध्यें व विधिमंडळांत विशिष्ट वांटा मिळण्याच्या हेतूनें. आतां त्याचा विकास अराष्ट्रीय, लोकसत्ताविरोधी चळवळींत झाला असून देशाच्या फाळणीची सूचना करण्यापर्यंत त्याची मजल गेलेली आहे! बराच काळपर्यंत त्याला विधायक अथवा अन्य कांहीं कार्यक्रम असा नव्हताच. शिव्याशाप, हिंसा व उद्धटपणा यांवर तो जगला. आमच्या सार्वजनिक जीवनाचा त्याच्या योगानें जो अधःपात झालेला आहे त्याचें आश्चर्य वाटतें. ज्या स्वतंत्र मतदार संघावर त्याची पूर्वी सारी मदार होती त्यांच्यापासून कांहींच लभ्यांश होत नाहीं हें त्याला समजून आलें. उलट त्या पद्धतीमुळें अल्पसंख्याक गटाची शक्ति क्षीणच होते असा अनुभव आला. मग जो वैमनस्याचा व सवतेपणाचा मार्ग आतांपर्यंत त्यांनीं चोखाळला होता त्याच मार्गानें अखेरपर्यंत जाऊन हिंदुस्थानच्या फाळणीची मागणी करणें त्यांना क्रमप्राप्तच झालें. धार्मिक गटांनाच राजकीय सहति मानण्याचा जो मध्ययुगीन सिद्धांत युरोपमध्यें वाढत्या राष्ट्रवादाच्या लाटेंत विलीन होऊन गेला होता त्याचाच हिंदुस्थानांत पुरस्कार करण्यांत आला. क्रुसेडसच्या युद्धांत ख्रिस्ती विरुद्ध इस्लामी अशी जी भावना होती तीच हिंदुस्थानांत एकाएकीं प्रकट झाली. ( तिच्या मागें ब्रिटिशांची प्रेरणा होती असें म्हणतात. ) जणू कित्येक शतकें आम्ही एकदम मागें गेलों. या अद्भुत पिछेहाटीमुळें कोणाचें नफानुकसान झालें असेल तें असो; ब्रिटिश साम्राज्यवादाचा लाभ झाला इतकें मात्र खरें.

पाश्चात्य देशाप्रमाणें प्राचीन वा मध्ययुगीन हिंदुस्थानांत या सिद्धांतानें मूळ धरलेलें दिसत नाहीं. इतर धर्मांचें येथें स्वागत झालेलें आहे, त्यांना वस्तीला जागा देण्यांत आलेली आहे. पहिल्या शतकांत सुरुवातीचे ख्रिश्चन आले आणि त्यांना आसराहि मिळाला. ज्यूंना घरठाण दिलें, मुसलमानांचें स्वागत झालें व ( मुसलमानांच्या स्वाऱ्या सुरू होऊन राजकीय लढे सुरू होईपर्यंत ) त्यांच्या धर्मप्रचाराला देखील वाव मिळाला. पार्शी आले, त्यांना समाविष्ट करून घेतलें. उत्तरकालीन मुसलमानी राज्यकर्त्यांनीं हिंदु-मुसलमान व इतर पंथ यांचें एक राष्ट्र निर्माण करण्याची मनीषा बाळगली. थोर अकबरानें या नवराष्ट्राचा पाया घातला. अपरिचित संस्कृतींचा मिलाफ करून एक सामान्य संस्कृति क्रमशः घडवण्यांत आली. उत्तर हिंदुस्थानांत तिचा प्रसारहि झाला.

आतां अकबराच्या पूर्वीच्या जमान्यांत पुनश्च दाखल व्हावें, इतिहासाचा ओघ उलटवावा, आम्ही मध्ययुगीन बनावें म्हणून आम्हाला सांगण्यांत येत आहे. राष्ट्रवाद लुप्त होऊन सार्वराष्ट्रीय वाद उदयास येत असतां राष्ट्रवादाहून देखील संकुचित असा

एक पंथ उपस्थित करण्यांत येत आहे आणि ब्रिटिशांनीं त्याचा पुरस्कार चालवला आहे. एका संयुक्त राष्ट्राच्या ध्येयाकडे सारें जग चांचपडत निघालें असतां हिंदुस्थानचीं शकलें पाडण्याच्या योजना पुढें मांडल्या जात आहेत.

तुर्कस्थान, इजिप्त, इराण, सीरिया, पर्शिया इत्यादिक मुसलमानी राष्ट्रांनीं हे मध्ययुगीन सिद्धांत केव्हांच झुगारून दिले आहेत. तीं राष्ट्रें अत्यंत राष्ट्रवादी आहेत. स्वतःच्या पुरातन संस्कृतीचा त्यांना अभिमान वाटतो. त्यांपैकीं कांहीं राष्ट्रें स्फूर्ति प्राप्त करून घेण्यासाठीं आपल्या इस्लाम-पूर्व संस्कृतीकडे देखील बुद्धिपुरःसर धांव घेत आहेत. चिनी मुसलमानांना आपल्या चिनी संस्कृतीविषयीं अभिमान वाटतो, तिचें जतन करण्यासाठीं ते लढण्यास तयार होतात. हाच इतिहासाचा क्रम आहे. खरें बोलावयाचें तर राष्ट्रवादाचा हा ऐतिहासिक कालखंड देखील संपला असून आज जगांत जें भव्य मन्वंतर सुरू आहे तें एका अभिनव युगाचा प्रारंभ करीत आहे—राष्ट्रीय स्वातंत्र्य व न्याय्यतर अर्थव्यवहार यांनीं युक्त अशा संयुक्त राष्ट्राचें युग. त्यांत परंपरागत अधिकार व आर्थिक स्वामित्व यांना थारा नाहीं.

हेंच हिंदुस्थानचें उद्दिष्ट आहे–एकात्म, स्वतंत्र, लोकसत्ताक आणि इतर स्वतंत्र राष्ट्रांशीं जागतिक संयुक्त राष्ट्रव्यवस्थेंत निगडित झालेला देश. स्वातंत्र्य आम्हांला हवें आहे, पण तें जुन्या धर्तीचें, संकुचित, एकलकोंडें स्वातंत्र्य नको. परस्परांचें वैर करणाऱ्या वेगवेगळ्या राष्ट्रांचा काल संपलेला आहे असें आमचें ठाम मत आहे.

आम्हांला स्वातंत्र्य हवें, वासाहतिक अथवा दुसरें कसलेंहि स्वराज्य आम्हांला नको. वासाहतिक स्वराज्य ही गतकालांतील चीज झाली, इतःपर तिला स्थान नाहीं ही गोष्ट प्रत्येक समजूतदार माणसाला कळून चुकलेली आहे. या महायुद्धानंतर तिचें अस्तित्व टिकून राहणें अशक्य आहे, मग युद्धाचा निकाल कसाहि लागो. पण ती टिको न टिको, आम्हाला तिचें दर्शन देखील नको आहे. आमच्यावर ज्यांनीं सत्ता गाजवली व आम्हाला पिळून काढलें, त्या राष्ट्रांच्या गटांशीं स्वतःला जखडून घेण्यास आम्ही राजी नाहीं. जेथें कांहीं प्रदेशांत आम्हाला गुलाम म्हणून वागवतात आणि जेथें वंशद्वेष उतू जात आहे त्या साम्राज्याचे घटक म्हणून राहण्याची आमची तयारी नाहीं. लंडनच्या पेढयांच्या हातीं आमच्या आर्थिक व्यवहारांचे लगाम आहेत ते आम्हास तोडावयाचे आहेत. आम्हाला बिनडाक स्वातंत्र्य हवें, बिनशर्त व निरपवाद स्वातंत्र्य हवें. शर्ती अथवा अपवाद राहिलेच तर ते जागतिक राष्ट्रसंघांत अथवा नूतन जागतिक व्यवस्थेंत प्रविष्ट होण्याकरितां आवश्यक व इतर राष्ट्रांप्रमाणेंच आम्हीहि स्वखुषीनें मान्य केलेले असेच असतील. अशा प्रकारची नवीन व्यवस्था निर्माण न झाली तरी चीन, ब्रह्मदेश, सिलोन, अफगाणिस्थान, इराण या राष्ट्रांशीं संबंध जोडून आम्ही आमचा संघ स्थापन करूं. धोके पत्करावयास व संकटांशीं झुंजावयास आम्ही सिद्ध आहों. ब्रिटिश सैन्य व आरमार यांचें नामधारी संरक्षण आम्हाला नको आहे. आमचें आम्ही पाहून घेऊं.

गतकालाची साक्ष या निर्णयाला अनुकूल न पडती तरीहि वर्तमानकालांतल्या अनुभवावरून याच निर्णयाला येण्यावांचून गत्यंतर नव्हतें. कारण युद्ध पेटलें असतां व संकट दाराशीं असतां ब्रिटिश साम्राज्यशाहीची आमच्या राष्ट्राशीं जी वागणूक आहे, त्यांत पालट झालेला नाहीं. या कृपाप्रसादाची जे अपेक्षा ठेवतात ते तिच्याच मार्गानें जावोत. आम्ही आमच्या मार्गानें जाऊं. आतां त्यांचे व आमचे मार्ग वेगवेगळे झाले आहेत.

अलाहाबाद,<br>
१० ऑगस्ट, १९४०

—जवाहरलाल नेहरू

# सूचि


**अ**

अकबरपूर ६३
अकाली ११२
अजमलखान हकीम १७४
अजमीर ४६१
अझाद, चंद्रशेखर २६५, २६६
अझाद, मौलाना अबुल कलाम ९३, २०२, २३३, ४६८
अणे मा. श्री. ५८१
अन्नसत्याग्रह २००
अन्सारी डॉ. १९, १११, १७४, १९५, २५१, २५६, २०८, ४६८
अनुराधापूर २७४
अपोलोनियस १६
अमरनाथ ४०, ४३३
अमृतसर ४५, ४७, ८८, ७२, १९७
अल्मोरा ३५७, ५७७, ५७८, ६०३, ६०४
अय्यर सर शिवस्वामी ४२६, ४२७
अय्यर सर सी. पी. रामस्वामी ५३७, ६०५
अलाहाबाद ३, ५, ३७, ४५, ५४, ५८, ८१, ११७, १३६
अलिगड कॉलेज ४६५, ४६७
अलिपूर ४९७, ४९८, ५०६, ५०९, ५६०
अली, मुनशी मुबारक ९
अल्ली, मौलाना महंमद ४८, ९०, १०२, ११९, १२०–१२२, १४३
अल्ली, मौलाना शौकत ४९
अल्ली, सयद रेझा ४९
अर्विन, लॉर्ड १६९, २५५, २६१, २६४, २८६, ३०१, ३२१
असनसोल ३६२
असहकार ६५, ६६
अहमदखान, सर सय्यद ४६३–६६, ४७२

**आ**

आइन्स्टाइन १६८
आगाखान, ११९, २९५, २९७, ४६७ ४७०
आग्रा २, ४६५
आंतरजातीय विवाह १४, १५
आंतरराष्ट्रीय मजूर कचेरी १५२
आनंदभुवन १३, ९९, २३१, २३९, ३३२
आनंदमंडळ १५५, २४८
आशाभंग ४७८

**इ**

इकबल, सर महंमद ४३१
इजिप्त १६७
इटली २१, ४३३
इटारसी २३५
इटावा ३१७, ३१८
इंडियन सिव्हिल सर्व्हिस ४४४–४८, ४८८, ५०४
इंडोचायना १६७
इरादतगंज ३१८
इस्माइल, सर मिर्झा ५०४

**ए-ऐ**

एडवर्ड, थॉम्सन ४६
एबिग, क्रॅफ्ट २२
एल्विन, व्हेरिअर ३९३
एलिस, हॅव्हेलॉक २२
ऐक्य, परिषद १४४

**ओ-औ**

ओटावा-करार ३६९, ४७०, ५८७-८८
ओबीदुल्ला, मौलवी ११५
औध-तालुकदार ५६, ३००, ४३४
औध, कुळासंबंधीं कायदा ५९
औद्योगिक युग ५२२–२३
औरंगजेब १
ऑल्कॉट, कर्नल १७
अंदमान ३१५, ३८५
अँड्र्यूज सी. एफ्. ६८, ३८६

### क

करबंदी चळवळ २३६–३७, २४१–४२, २६३, ३००–१, ३३७, ४७६
कलकत्ता ४, ६५, ८१, १३६, १९८, ४८२–३, ४८५, ४९५
कलोन १६९
कल्हण कवि ४८५
कँपबेल, बॅनरमन् २०
कानपूर ४, १५०
काबूल १६३, ४५३
कामा, मॅडम् १५५
कायमधारा पद्धति ५२
काश्मीर १
किश्लू, डॉक्टर २५
किडवाई, रफि अहमद ३०६, ४०२, ४८१
कुंझरू, पंडित हृदयनाथ ४१०
कुमारस्वामी, डॉक्टर आनंद ४३६
कूपर, फ्रेड्रिक ३२९
कुंभमेळा १२३, २०९
कृष्णवर्मा श्यामजी २५, १५३, १५४
केमालपाशा १७५
केसमेंट, रोजर ३८
केळकर न. चिं. ५३६–३७
केंब्रिज १९, २८, २७
कैरा ५२
कैरो ५०४
कोकोनाडा ११९, १२३
कोचीन २७५
कोटिफंड २३८
कोमागाटा मारू ४३, ११७
कौल १
कौन्सिलप्रवेश १०१
क्वेट्टा ६०८

### ख

खादी १९८, ५२७–९
खान, अबदुल गफार २०८
खान डॉ. २८२, ३१८
खापर्डे ग. कृ. ३८, ३९
खिलाफत ४३, ४८, ७०
खुदा-ई-खिदमतगार २६९, २८१, ५६३
खेत्री संस्थान ३
ख्वाजा ए. एम्. २५

### ग

गॅरिबॉल्डी २१
गिडवानी ए. टी. ११३, ११७–१८
गुप्त, शिवप्रसाद ४५८
गुरुका बाग ११२
गुरुद्वार चळवळ ११२
गोखले गो. कृ. २४, २५, ३०, ३२, ३८, ३९, २०२, ४४४
गोरखपूर १९८, ५९७
गांधीजी ३७, ४४, ४७–४९, ५२, ५७, ६५–६७, ६९, ७२, ७३, ७५–७७, ८२–८३, ८५, ८७, ८८, ९०, १०२, १०३, १०७, १२०, १२२, १२६–१३५, १३९, १४३, १६९, १७३, १७५, १९१, १९२, १९८, १९९, २०१-२०४, २०८, २१६-२१८, २१९-२२१, २३३, २५०, २५२, २५४–२६१, २६४, २६९–२७१, २८१, २८२, २८५, २९३, २९७, ३०१, ३०३–३०५, ३०९, ३११, ३१२, ३१६, ३१७, ३२०, ३२१, ३२७, ३३७, ३३८, ३६६, ३६७, ३६९, ३७३–३७५, ३८०, ३८२, ३९८, ३९९, ४०२, ४०४, ४०७, ४१०, ४१३, ४१५, ४२०, ४६८, ४७८, ४८०, ४९१, ४९२, ४९६, ५०७, ५१३, ५१५-५२१, ५२४-५२७, ५३२, ५३६, ५३७, ५३९, ५४०, ५४२-५४४, ५४५–५४८, ५५०, ५५३, ५५५, ५६२, ५६५, ५६६, ५८१, ५८२, ५८७, ५९७, ६०८
गांधी, देवीदास ९७
ग्रामोद्योग ५३०–५३२

**घ**

घटनापरिषद ५८२, ५८३
घोष अरविंद २४
घोष मोतिलाल ६७, ६८,
घोष राशबिहारी ३८, ३९

**च**

चर्चिल ५९१
चट्टोपाध्याय, वीरेंद्रनाथ १५८, १५९
चंपारण्य ३७
चितगांव ३१२, ३१३
चिंतामणि, सी. वाय्. ३५
चिरोल, सर व्हॅलेंटाइन ६८, ४६६
चेटवुड, सर फिलिप ४४९
चेम्स्फर्ड, लॉर्ड ५४५
चेंबर्लेन ३८७
चौरीचौरा ८३, ८४, १२७, २१५

**छ**

छंबा १३६

**ज**

जबलपूर ४७५,
जमशेदपूर १९४
जयकर, बॅ. एम्. आर. २३२, २३६,२९०
जंबूसर २१८
जातिनिर्णय ३७१, ५८३, ५८४
जातीय भावना ११९, १४१, १६३, १६४, ४६१
जातीय प्रश्न १२२, १३९, १४३, १७८, २८३, ४६२, ४६८.
जावा १६७
जालियनवाला ४५, ७२, १९६
जिन्हा, अहंमदअली ६८, २०४, ४६८
जिनीवा १५२, १५३
जुहू १२६, १२७
जैतो ११२
जोशी एन्. एम्. १९३
जोसेफ, जॉर्ज ९७

**झ**

झारिया १९२, १९३
झेपलिन, कौंट २८

**ट**

टंडन पुरुषोत्तमदास ९७, ३००, ३०७ ३०९, ४९३
टागोर बडेदादा ६८
टागोर रवींद्रनाथ ६८, ३८६, ४२०, ४८५, ४९२, ५९२
टॉने, प्रोफेसर आर. एच्. २५, ४२५
टिळक, लोकमान्य २४, ३०, ३४, ३९, ९३, १३५
टोलर, अर्न्स्ट १५९

**ड**

डच इंडीज २४१
डलहौसी १३५
डायर, जनरल ४६, ४७
डिकिन्सन जी. एल्. २२, ३१
डिग्बी विल्यम् ४२९
डेहराडून ५३, २७४, ३४६, ३४९, ३५३, ४५१, ५६०, ५६६
ड्यूसेल्डॉर्फ १३९

**त**

तलवारीचा पंथ ८५
ताजमहाल ४, १३२
तिवारी, व्यंकटेश नारायण ३०६
तुर्कस्तान ४३
तेहरान ४५३
त्रावणकोर २७५, ५३७

**थ**

थिऑसॉफिकल परिषद १७
थिऑसॉफिकल सोसायटी १६

**द**

दत्त बटुकेश्वर १९९
दत्त रोमेश ४२९
दहशतवाद २६५, २६६, २७९, ३१३-३१५, ४८४-८५
दास, बॅ. चित्तरंजन ४६, ५३, ६६, ६८, ७३, ८०, ९०, ९८, १०२, १०७, १०८, ११०, १११, १२८, १२९, १३५, १३६, १६३

दास जतींद्रनाथ २००
दांडीकूच २१६.
दिवाणगिरी १०५, १०६
देसाई, महादेव ९७
दौलतराम, जयरामदास २३४

ध

धार बिशन नारायण १४
धर्म १२०, १२१, ३७१, ३७६–७९

न

नगरपालिका १०३, १४५, १४६, १४७, ३३२
नवरोजी, दादाभाई ४२९
नागपूर ६१
नागरिक स्वातंत्र्य १५९, ३३९
नाथ, राजा नरेंद्र १७५
नाभा ११२, ११३, ११६, ११८
नायडू, सरोजिनी ३७, २७६, २९४, ६०२
,, पद्मजा २७६
,, लीलामणि २७६
नित्शे २२
नेपाळ ४९०
नेबूहूर ५४८, ४९
नेस्टोरियन पंथ २७६
नेहरू रिपोर्ट १७८
नेहरू, पं. मोतीलाल ( वडील ) ३, ८, १०–१३, १६, १८, २३, २५, २६, ३५, ३७, ४५, ५२, ५३, ६६, ८०, ९०, ९५, १०२, १०४, १०७, ११५, १२६, १२९, १३१, १३३, १६४, १७०, १७८, १८५, १८६ १९५, २०२, २०४, २०८, २१३, २१८, २३१–३६, २३८–४१, २४५, २४८–५४, २८९, ३८९
नेहरू, इंदिरा २३८, ३४४, ३७२, ४८५ ५६८, ५६९, ५७०
,, कमला ५२, २१९, २२०, २२२, २३२, २३६, २३८–२४०, २४४, २४५, २४९, २५३, २७६, ३१६, ३१७, ३४४, ४५३, ४८२–८३, ४९३, ५६७, ५७०, ५७२, ५७४, ५७५, ५७६, ५७९
नेहरू, कृष्णा २१९, ४०३, ४५३
,, गंगाधर २
,, नंदलाल ३, ५
,, मोहनलाल ३२२
,, लक्ष्मीनारायण २
,, स्वरूप ७२, ३७२
नेव्हिन्सन्, एच्. डब्ल्यू. २६
नैनी २२२, २२३, २३९, २४५, २५०, ३२२, ३४९, ३५७, ५७४, ६०३
न्यूयाराएलिया २५२, २७५

प

पटेल, विठ्ठलभाई १०३, १९७, २०२, २०४, ३९६, ४६०
पटेल, सरदार वल्लभभाई १०३, १७६, २०४, २३३, २६९, २९०, ३०८, ३२१
पतियाळा ११२
पदव्यांचा उपसर्ग ११९, १२०
पॅलेस्टाइन १६७
पेटर वॉल्टर २३
पाटणा ४८६, ४९३
पायथॅगोरास १६
पाल, बिपिनचंद्र २४, २५
पुणें परिषद, ३८६, ४७६
पोल मेजर डी ग्रॅहॅम ४४४
पंडित, रणजित एस्. १५१, २३६, २४०, २४४, २५०, ३२२
पंत, गोविंद वल्लभ १८३, १८६, २६८, ३०५, ३०६, ३४६, ३४९
पंजाब प्रकरण ४५, ७०
प्रकाश श्री २९९
प्रतापगढ ५४, ५६, ५९
प्रताप, राजा महेंद्र १५४, १५५
प्रतिसहकारवादी १३५, २०३, ३३९, ३८८–३९०, ४०९, ४१५

प्रसाद, नर्मदा २४०, ३२२
प्रसाद, बाबू राजेंद्र ४८६, ४९०, ४९१, ६०८
प्रागतिक पक्ष ४११, ४१५, ४२७, ५३७
प्रिन्स ऑफ वेल्स ८०, ९०, २११

फ

फरुक्शीअर १
फेर-नाफेर १०३, १०७
फैजाबाद ५६, ६३
फॉक, मार्शल ३३४
फ्रॉइड १६, ५१६
फ्रेडरिकशाफेन २८

ब

बटलर, सर हारकोर्ट ५३, ९५
बदाऊन ९
बद्रीनाथ ४३३
बनारस ४५८
बरकतुल्ला, मौलवी १५६
बर्लिन १५६
बसू, भूपेंद्रनाथ ३०
बाकुलिआ ३३१
बार्डोली सत्याग्रह १७६
बाल्डविन, रोहर १५९
बिहार ४६५, ४८३
बिहारची बाग ४८९
बेझंट ॲनी १५, १६, ३४, ३५, १७२, ५३७
बेळगांव १३५
बोअर युद्ध १३
बोस, सुभाष १७९, २०३, ३९६, ५७९
बंगलोर २७६
बंगाल ४६५, ४८२
बंड, १८५७ चें २, २४, ४६२
बांकीपूर ३०
ब्रुसेल्स १६६
ब्लॅव्हॅटस्की १६
ब्लॉक आयव्हॉन २२
ब्रुक्स, फर्डिनंड टी. १५, १७

भ

भारत सेवक समाज ३२, ४१०
भारद्वाजतीर्थ २०९
भोवाली ५७६, ५७९, ६०८

म

मजलिस २४
मद्रास १७२
मलबार २७५
मसूरी ५२, ५९, २३६, २३८
महमूद, सय्यद २५, २२२, २३१, २४०
मार्क्सवाद ३६४, ५१९, ६००
मार्टिन, ले. कर्नल २३४, २३५
मालवीय, कपिलदेव ११६
मालवीय, पं. मदनमोहन ३६, ४६, १२४, १२५, १६१, १६२, २२२, २३३, २४४, ३६२, ५३७ ५३८, ५८१
मिअर्स, सर ग्रिमवुड १०४, १०५
मिदनापूर ४१२
मीरत १९५
मीठ सत्याग्रह २२१
मुकर्जी, धनगोपाळ १५९
मुंजे, डॉ. ३९२
मुझफरपूर ४८६, ४८९, ४९०
मुसोलिनी २९२, ३४०
मेनन व्ही. के. कृष्णा ५९०
मेहता डॉ. जिवराज २५१
मोपला ८९
मॅक्डोनल्ड, रॅम्से २४८, ४२२, ५१९, ५९०
मंडलाकार परिषद ९०, ११२, १२८, २४५, २४६–२४८, २५४, २६४, २७७–७९, २८३, २८७, २८९, २९३–९८, ३०८, ३३६, ३४१, ४६१, ४९१, ५११, ५९०
मॉस्को १७०
मॉस्लेम लीग ४९, ६८,
मॉंटेग्यू, एड्विन् ३५
मोहरम १३८

मोंटाना १५२
मोंघीर ४८६, ४९०
म्हैसूर २७५, २७६

### य

युवक चळवळ १७७
येरवडा २३२, २३५, २५०

### र

रशिया १७१, ३६३, ५९४
रसेल बर्ट्रांड ३८, ४३९
राइट बंधू २०
राजगोपालाचारी, चक्रवर्ति ९८, ३८२
रामचंद्र, बाबा ५६
रामराज्य ७३
रामलीला १३८
रायपूर २१९
रायबरेली ५६, ६२, ६३, ३५७
राय, लाला लजपत २१, २४, २५, ६५, ७३, १५६, १६१, १६२, १८०, १८२
राष्ट्रसंघ १५२
राष्ट्रवाद ७६, ४६२
राष्ट्रीय सप्ताह २१९, ३३४
राष्ट्रीय निशाण ३३२, ३३३
राष्ट्रीय पक्ष १६१, १६३, १६४
रॉदरमियर ५९१
रॉय, बिधनचंद्र २५१
रॉय, मानवेंद्रनाथ १५९, १९५, २७१, २७२
रीडिंग, लॉर्ड ७१, ९०
रुसो जपानी युद्ध १७
रूझवेल्ट ५९४
रोमां रोलां १५९, १६८, ३८०, ३८१
रौलट कायदे ४३
रंगून २४१

### ल

लखनौ ३७
लाहोर १९७
लिटन, लॉर्ड ५०३
लॅन्सबरी, जॉर्ज १६७
लॉइड, जॉर्ज ३२९, ४५०
लॉइड, लॉर्ड ४६९, ४७०
लिंडबर्ग २८
लेनिन ६००
लैंगिक २२, ५१५, ५१६

### व

वाइल्ड, ऑस्कर २३
विवेकानंद ४२८
विचारप्रवाह १३१
विलिंग्डन, लॉर्ड २८६, ३२०, ३२१
व्हाइटहेड, डॉ. ए. एन्. ४१३
व्हाइट, सर फ्रेडरिक ४२९
वोटन, सर हेन्री ५४६

### श

शर्मा बाळकृष्ण ९७
शास्त्री, श्रीनिवास ३३, ३४, ६९, १२७, २४७, २४८, २५४, ३९०–९३, ४१०, ४१४, ४२२
शिकार ३२
शांख १४३
शुभ्रपत्रिका ३८६–९१, ४२६, ४२७
शेरवाणी टी. ए. के. २५, २३३, २९९, ३०५, ३०७, ३०९, ३१०, ३१८, ३२२
शंकर उदय ४०५
शांतिनिकेतन ४८५, ५६८

### स

सत्याग्रह सभा ४४
सत्याग्रह ७४, ५०८
सन्यत्सेन, मॅडम १६८
सप्रू, सर तेजबहादूर १३, ३५, ३६, १६७, १७५, १७८, २०२, २०४, २३२, २३३, २३६, २५४, २९०, ३८७
सरकार सलाम ४९८
समाजवाद १८९, ४०७, ५२७, ५३१, ५६२, ५९६, ५९८, ५९९, ६०१
सर्वपक्षीय परिषद १७३, १७७–७९, १८८, १९१

सर्वाधिकारी २१७, २१८
सायमन कमिशन १७०, १७३, १७७, १७९, १८३, १८५, १८८
साम्राज्यविरोधी लीग १६७, १६९, १७२, १९२
साम्राज्यशाही १२७, १६६, ४४०, ४४४
सिमला ३८, ५३
सिंगापूर २४१
सिंग भगत १८१, १९९, २००, २६५, २६९, २७०
" कुनवार आनंद ३४९
" नर्मदा प्रसाद २३१
" सरदार अजित २१, २००
सीरिया १६७
सीली ६८
सुरत २६
सुलेमान एम्. एम्. २५
सूतवर्गणी १२८, १३०
सेनगुप्त जे. एम्. २५, ३९६
सोबानी, उमर २६०
सोलापूर ३१६
संतानम्, के. ११३
संततिनियमन ४४७, ५१५, ५१६
स्पेंडर जे. ए. ३४१
स्लेड मॅडेलाइन ३३०
स्लोकंब २३३
स्वराज्य ७०, ८९
स्वराज्यभवन २१८, ३३२, ४८३
स्वराज्यसघ ३४
स्वराज्यपक्ष १०३, १०७, १०८, ११२, १२६, १२८–१३०, १३३–३५, १६१, १६२, १६४, १७३, ५६३
संस्थानी कारभार ११५, ५३५
श्रद्धानंद स्वामी ४६, १६४, १६५
स्वित्झर्लंड १५२

### ह

हर्डीकर, डॉ. ना. सु. १२३, ३१६
हरदयाळ २५, १५६, १५७
हरिजन चळवळ ३८५, ४०५, ४७७
हर्दा २३५
हापकिन्स, गेरार्ड ४७९
हिजली ३१२, ३१३
हिटलर ३४०
हिंदुमहासभा १७५, ४६०, ४६१, ५३८, ५३९, ५६३, ५८५
हिंदुस्थानी सेवादल १२३, ३१६
हिंदी संरक्षक सैन्य ३४
हिंदुस्थान संरक्षक कायदा ३३
हिंदु विश्वविद्यालय १६२, ४६०, ५३७
हेग, फील्ड मार्शल ४५०
हेले, सर माल्कम २६८
हॅरो १५, १९–२१
हैद्राबाद २७५
होअर, सर सॅम्युअल ३२५, ३४३, ३७९
हॅरिसन ४
हंटर चौकशी कमिटी ४७
हेंडर्सन, आर्थर ५९०

# पुरवणी सूचि


अजिंठा ६१६
अबिसीनिया ६१२,६१४
अल्पसंख्याक ६२४,६३०,६३९
अहिंसा ६२६
इजिप्त ६२०
इंग्लंड ६२५,६२९,६३३,६३४
गांधीजी ६१८,६२२,६२६
घटना परिषद् ६२४
चीन ६१४,६२३,६२४
चेकोस्लोव्हाकिया ६१९
चेंबर्लेन, नेव्हिल ६१९,६२०
चँग-कै-शेक ६२४
जातीय वाद ६४०,६४१
जिना, जनाब ६२०,६२१
जिनीव्हा ६१९
जॉन गुंथर ६१९
द्विराष्ट्रवाद ६२१
नाझी ६२१
नाझीवाद ६१४,६२४
नाहासपाशा ६२०
पॅरिस ६१९,६२०,६३३
फ्रँको, जनरल ६१३
फॅसिस्ट राज्यपद्धति ६१२
—वाद ६१४, ६२४, ६२६, ६३०,६३१
फॉरवर्ड ब्लॉक ६२१
फ्रान्स ६२५,६३३
ब्रह्मदेश ६१६
भांडवलदार ६३७
महायुद्ध ६२४
मुसोलिनी ६१२
मुस्लिम लीग ६२०
मोहेंजोदारो ६१६
मॉडर्न रिव्ह्यूमधील लेख ६१८
म्यूनिक ६११,६१९
यूरोप, मध्य ६११,६१४,६१९
राजकोट ६२२
राजगोपालाचारी ६२७
राष्ट्रवाद ६२९,६४१,६४२
राष्ट्रसभा ६१३,६१६,६१७,६२१, ६२६
—हरिपुरा ६१९
—त्रिपुरी ६२१
राष्ट्रीय योजना समिति ६२३
रोम ६१२
लुधियाना
—अ. भा. संस्थानी लोकपरिषद् ६२२
वर्धा-शिक्षण-योजना ६१८
वफ्त पक्ष ६२०
विजयालक्ष्मी पंडित ६१७
सर्वाधिकारशाही ६३२
साम्राज्यवाद ६२९,६३०
—शाही ६३१
सालोन ६२३
सुभाषचंद्र बोस ६१९,६२१
संस्थानिक ६३६,६३८
संस्थानें ६२३
स्पेन ६११,६१३,६१४
स्वराज्य, वासाहतिक ६३६,६४२
स्वातंत्र्य ६३०
हिंदुस्थान ६१४,६१६,६३१
—नवी राज्यघटना ६१५
व्हाइसरॉय ६३२,६३३,६३५,६३९
—चें नवें कार्यकारी मंडळ ६३२, ६३३,६३४,६३९,६४५

# आमचें प्रकाशन

| ( शिल्लक नसलेल्या पुस्तकांची किंमत दिलेली नाहीं. ) | रु. आ. पै |
|---|---|
| * १, २ **सत्याचे प्रयोग** ( द्वितीयावृत्ति ) : म. गांधी | |
| * ३ **खादी-मीमांसा** ( द्वितीयावृत्ति ) : बाळूभाई मेहता | |
| ४ **स्वराज्य-शिष्टाई** : म. गांधी | |
| ५ **संयम कीं स्वैराचार ?** ( खंड १ ला ) : म. गांधी | |
| ६ **हिंडलग्याचा प्रसाद** : काका कालेलकर | |
| * ७ **हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना** : लेखक : एस्. राधाकृष्णन् | |
| * ८ **उपनिषदांतील दहा गोष्टी** ( तृतीयावृत्ति ) : लेखक : शंकरराव देव | ०-१२-० |
| * ९ **विद्यार्थी-जीवन** ( द्वितीयावृत्ति ) : लेखक : श्री. स. महाजन | |
| *१० **फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास** : लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर | १-४-० |
| ११ **कॉंग्रेसचा इतिहास** ( द्वितीयावृत्ति ) : लेखक : डॉ. पट्टाभि सीतारामय्या | |
| १२ **समाजवादच कां ?** ( द्वितीयावृत्ति ) : लेखक : जयप्रकाश नारायण | २-०-० |
| १३ **खानबंधू** : महादेवभाई देसाई | |
| १४ **जवाहरलाल नेहरू** : आत्मचरित्र ( द्वितीयावृत्ति ) पं. नेहरू | १२-८-० |
| *१५ **विश्राम** ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी | १-४-० |
| *१६ **भारतीय संस्कृति** ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी | ३-०-० |
| १७ **प्रसाददीक्षा** : म. गांधी | |
| १८ **भिल्ल साधु गुलामहाराज** : शं. वि. ठकार | |
| *१९ **आधुनिक भारत** : आचार्य शं. द. जावडेकर | |
| *२० **हिमालयांतील प्रवास** ( तृतीयावृत्ति ) : लेखक : काका कालेलकर | २-४-० |

| | | |
|---|---|---|
| २१ | **गांधीजींचें विविध दर्शन** ( द्वितीयावृत्ति ) | रु. आ. पै |
| | संकलनकार : एस्. राधाकृष्णन् | २–८–० |
| *२२ | **जिवंत व्रतोत्सव** : काका कालेलकर | |
| २३ | **गांधी-विचार-दोहन** : किशोरलाल मश्रूवाला | |
| २४ | **सत्याग्रही महाराष्ट्र** : प्रेमा कंटक | ३–०–० |
| *२५ | **अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ?** ( द्वितीयावृत्ति ) : | |
| | लेखक : जॉन रस्किन | २–०–० |
| *२६ | **जीवन-दर्शन** ( तृतीयावृत्ति ) : | |
| | लेखक : महाकवि खलिल जिब्रान | १-१२-० |
| २७ | **ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र** : जे. सी. कुमारअप्पा | |
| २८ | **बापू** : घनश्यामदास बिडला | १–८–० |
| २९ | **संस्कृतीचें भवितव्य** : एस्. राधाकृष्णन् | |
| ३० | **महात्मा गौतमबुद्ध** : ,, ,, | १–०–० |
| ३१ | **जीवन आणि साहित्य** : आचार्य स. ज. भागवत | २–८–० |
| ३२ | **प्राचीन साहित्य** : कविसमाट् रवींद्रनाथ ठाकुर | १–८–० |
| ३३ | **संयम कीं स्वैराचार ?** ( खंड २ रा ) : म. गांधी | १-१२-० |
| ३४ | **हिंदु-मुसलमान-ऐक्य** : आचार्य शं. द. जावडेकर | ३–०–० |
| ३५ | **गीताहृदय** ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी | ०-१२-० |
| ३६ | **हिंदूंचें समाजकारण** : काका कालेलकर | २–४–० |
| ३७ | **द्विखंड हिंदुस्थान** : डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद | ११–०–० |
| ३८ | **कॉंग्रेस : कथा** ( द्वितीयावृत्ति ) : गो. आ. देशपांडे | ४–८–० |
| ३९ | **आचार्य कृपलानी** : निवडक लेख व भाषणें | ३–०–० |
| ४० | **भगवान् बुद्धासाठीं** : शंकरराव देव | ३–८–० |

★

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्याखात्यांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

# आमच्याकडे एजन्सीनें असलेलीं पुस्तकें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | राजनीतिशास्त्र-परिचय : आचार्य जावडेकर | ३-०-० |
| २ | हिंदी राजकारणाचें स्वरूप : ,, ,, | ०-८-० |
| ३ | आधुनिक राज्यमीमांसा : ( भाग १ व २ ) ,, ,, | २-८-० |
| ४ | पुरोगामी साहित्य : ,, ,, | २-०-० |
| ५ | महाराष्ट्र व हिंदी राजकारण : ,, ,, | १-०-० |
| ६ | समाईक सहकारी स्वराज्य : ,, ,, | ०-४-० |
| ७ | भारतीय क्रांति व राष्ट्रसभा ,, ,, | ०-१२-० |
| ८ | लो. टिळक व म. गांधी : ,, ,, | २-०-० |
| ९ | विनोबाजी भावे : साने गुरुजी | १-०-० |
| १० | देशबंधु दास : ,, ,, | ०-१-४० |
| ११ | स्वराज्यसंस्थापक श्रीशिवराय : साने गुरुजी | ०-४-० |
| १२ | रामाचा शेला : ,, ,, | ३-०-० |
| १३ | पत्री : साने गुरुजी | ३-८-० |
| १४ | दरबार गोपाळदास : ह. मो. जोशी | ०-२-० |
| १५ | जीवनयोग : ना. ग. जोशी | ०-१२-० |
| १६ | पाकिस्तान : ॲड्. ग. वा. जोशी | १-०-० |
| १७ | विवाहसंस्थेचा इतिहास : डॉ. किर्लोस्कर | ०-८-० |
| १८ | कारागृहाच्या भिंती : ना. ग. गोरे | ३-०-० |
| १९ | त्रिमंत्रि-योजना ( भाग १ व २ ) | २-८-० |
| २० | हिंदी रेल्वे-कामगार : वि. न. साने | ०-१२-० |
| २१ | कॉंग्रेसचीं साठ वर्षें : रा. प्र. कानिटकर | ०-८-० |
| २२ | डॉ. सन्यत्सेन : वि. म. भुस्कुटे | ३-०-० |
| २३ | साजबा साळी : सुशील परभृत | ३-०-० |

सर्व प्रकारच्या राष्ट्रीय पुस्तकांकरितां प्रथम आमच्याकडे चौकशी करा.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : : १२ टिळक रोड, पुणें २